Veerbhadra Education Society's

Mahatma Jyotiba Phule Mahavidyalaya, Mukhed

Tq.Mukhed Dist.Nanded (MS)

NAAC Re-Accredited With "B"Grade

# "चिरंतन महात्मा बसवेश्वर"


## मुख्य-संपादक

**प्राचार्य डॉ.अडकीणे शिवानंद बळीराम**

महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड, .नांदेड

## संपादक

**प्रा. डॉ. कहाळेकर चांदोबा मरीबा**

लोकप्रशासन विभाग, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड, जि.नांदेड

### सह-संपादक

डॉ.मंगनाळे संतोष कल्याणराव
भूगोल विभाग,
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,
मुखेड जि.नांदेड

### सह-संपादक

श्री.गजमल अर्जुन बंडू
ग्रंथपाल,
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,
मुखेड जि.नांदेड

Veerbhadra Education Society's

Mahatma Jyotiba Phule Mahavidyalaya, Mukhed

Tq.Mukhed Dist.Nanded (MS)

NAAC Re-Accredited With "B"Grade

# अर्पण पत्रिका

आम्हा सर्वांना जीवनात

माणूसपणाचा आधार देणारे

संस्थापक अध्यक्ष

कै.माधवराव ज्योतिबा पाटील हंगरगेकर

यांच्या स्मृतीस अर्पण.....!

# संपादक मंडळ


| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. एकलारे सी. एन. | हिंदी विभाग, म. ज्यो. फुले महाविद्यालय, मुखेड |
| २. | प्रा. देवशेट्टे एस. एम. | इतिहास विभाग प्रमुख, म. ज्यो. फुले महा., मुखेड |
| ३. | डॉ. गित्ते ए.एन. | लोकप्रशासन विभाग प्रमुख, म. ज्यो. फुले महा., मुखेड |
| ४. | डॉ. वारकड व्ही. जी. | मराठी विभाग, म. ज्यो. फुले महाविद्यालय, मुखेड |
| ५. | डॉ. पाटील बी.टी. | भूगोल विभाग प्रमुख, म. ज्यो. फुले महा., मुखेड |
| ६. | डॉ. राठोड पी.डी. | भूगोल विभाग, म. ज्यो. फुले महाविद्यालय, मुखेड |
| ७. | डॉ. टाले एस.एच. | हिंदी विभाग, म. ज्यो. फुले महाविद्यालय, मुखेड |

# सल्लागार मंडळ

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. श्रीकांत विश्वनाथराव पाटील | (अध्यक्ष, वीरभद्र शिक्षण संस्था, मुखेड) |
| २. | श्री. सुभाष महादप्पा शिवपुजे | (उपाध्यक्ष, वीरभद्र शिक्षण संस्था, मुखेड) |
| ३. | श्री. रणजित शिवराज पाटील | (सचिव, वीरभद्र शिक्षण संस्था, मुखेड) |
| ४. | श्री. शंकरराव माधवराव बसापुरे | (सहसचिव, वीरभद्र शिक्षण संस्था, मुखेड) |
| ५. | श्री. ओंकारअप्पा कलयाप्पा मठपती | (कोषाध्यक्ष, वीरभद्र शिक्षण संस्था, मुखेड) |
| ६. | श्री. शिवराज माधवराव पाटील | (सदस्य, वीरभद्र शिक्षण संस्था, मुखेड) |
| ७. | श्री.ज्ञानोबा बळीराम वंजे | (सदस्य, वीरभद्र शिक्षण संस्था, मुखेड) |
| ८. | श्री. सुधाकर विश्वनाथ पोलावार | (सदस्य, वीरभद्र शिक्षण संस्था, मुखेड) |
| ९. | श्री. व्यंकटराव विठ्ठलराव पाटील | (सदस्य, वीरभद्र शिक्षण संस्था, मुखेड) |
| १०. | सौ. ओंकारबाई ज्ञानोबा वंजे | (सदस्या, वीरभद्र शिक्षण संस्था, मुखेड) |
| ११. | सौ. जयश्रीबाई चंद्रकांत साखरे | (सदस्या, वीरभद्र शिक्षण संस्था, मुखेड) |
| १२. | श्री. संजय व्यंकटराव गोंड | (सदस्य, वीरभद्र शिक्षण संस्था, मुखेड) |
| १३. | श्री. बाबुराव किशनराव कुलकर्णी | (सदस्य, वीरभद्र शिक्षण संस्था, मुखेड) |



!! ॐ श्री गुरु बसवलिंगाय नम: !!

हिरेमठ संस्थान भालकी संचालित,

# महाराष्ट्र बसव परिषद

संस्थापक अध्यक्ष

पूज्य श्री डॉ. बसवलिंग पट्टदेवरु



Hiremath Samasthan, BHALKI-585 328 Dist. Bidar ( Karnataka State)
Cell : 09448115404 / 08904638908 e-mail : mhbasavaparishath@gmail.com

जा. क्र. दिनांक : 28/05/2021

आत्मीय शरण

## शुभेच्छा संदेश

भारताच्या मध्ययुगीन कालखंडातील आद्य युगप्रवर्तक म्हणजे महात्मा बसवण्णा होत. बसवपूर्व काळात जातीयता, स्त्रिदास्यत्व, पंचसुतक, अंधश्रद्धा, कर्मकांड, वेदप्रामाण्य, देवालय संस्कृती, बहुदेवोपासना, यज्ञयाग, ऐतखाऊ प्रवृत्ती, देवधर्माच्या नावावर होणारे शोषण, विशिष्ट भाषेचा अट्टहास अशा राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, साहित्यिक व सांस्कृतिक क्षेत्रातील विषमता शिगेला पोहचली होती. बहुजन समाज सर्व क्षेत्रातील हक्क-अधिकारांपासून वंचित होता. श्रमजीवी लोक बहिष्कृत मानले जाऊन गुलामीचे जीवन जगत होते. अशा अस्वस्थ वातावरणात बसवण्णांचा जन्म झाला.

महात्मा बसवण्णा यांनी भारतीय पूर्वपरंपरांचा चिकित्सक अभ्यास केला. चिंतन-मंथन केले आणि भारतीय बहुजन समाजाला सर्व प्रकारच्या विषमतेतून मुक्त करण्यासाठी पर्यायी नवी समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या दिशेने कार्यारंभ केला. इष्टलिंग या समतासूत्राने सर्व स्त्री-पुरुषांना समानतेच्या पातळीवर आणले. सहपंक्ती भोजनाबरोबरच सहजीवनाचा आग्रह धरला. तसेच, शिलवंत आणि लावण्यवती यांच्या विवाहातून प्रत्यक्षात तशी कृती करून दाखविली. जगातील पहिल्या लोकशाही संसदेचे प्रारूप असलेल्या अनुभव मंटपाची संस्थापना करून ७७० स्त्री-पुरुषांची मांदियाळी जमविली. सर्वांना अभिव्यक्त होण्याचे मुक्त स्वातंत्र्य दिले. स्त्रियांना सर्व प्रकारच्या दास्यातून मुक्त केले. पंचसुतके नाकारली. देह हेच देवालय, कायक म्हणजे श्रम हेच कैलास आहे, असे सांगून अनुभावप्रामाण्य महत्वाचे मानले. पुरोहितशाही नाकारली. एकदेव उपासनेचा आग्रह धरला. दानाऐवजी दासोह परंपरा अस्तित्वात आणली. देवभाषा संस्कृतऐवजी लोकभाषा

कन्नडचा पुरस्कार केला. लोकभाषेत समताधिष्ठित वचन साहित्य निर्माण केले. ते साहित्य आज जागतिक साहित्य म्हणून लोकमान्यता पावत आहे.

हे साहित्य आमच्या श्रीमठाच्या वतीने महाराष्ट्र बसव परिषदेच्या माध्यमातून मराठीत विक्रमी प्रमाणात ग्रंथ प्रकाशित करीत आहोत. आजवर सुमारे १७५ पुस्तके म्हणजेच १,७५,००० याहून अधिक पुस्तके प्रकाशित करून ती सर्वांपर्यंत पोहचविण्यासाठी गत दोन दशकांपासून अविरत प्रयत्न करीत आहोत. या कार्याची फलश्रुती म्हणूनच की काय, आज मराठीत विविध संघ-संस्था यांच्यावतीने अनेक ग्रंथ प्रकाशित होत आहेत. विशेष म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड यांच्या वतीने 'चिरंतन महात्मा बसवेश्वर' हा संपादित ग्रंथ प्रकाशित होत आहे. याचा आम्हाला मनस्वी आनंद होत आहे. या ग्रंथात अनेक अभ्यासू विद्वान लेखक, संशोधकांचे सुमारे शंभर लेख समाविष्ट असल्याचे पाहून तो आनंद आणखी द्विगुणीत झाला. या ग्रंथाची अनुक्रमणिका पाहता यातील लेखांची विविधता, व्यापकता आणि मौलिकता आपले लक्ष वेधून घेतल्याशिवाय राहत नाही. म्हणून हा एक मौलिक ग्रंथ ठरतो. या ग्रंथ प्रकाशनासाठी संस्थेने पुढाकार घेतला त्याबद्दल संस्थेचे संस्थाचालक आणि सर्व संचालक मंडळास शुभेच्छा देतो. महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. डॉ. एस. बी. अडकिणे यांनी या ग्रंथ संपादनात जातीने लक्ष घालून हे मौलिक कार्य केले आहे. त्यांचे आणि संपादक मंडळातील सर्व सहकाऱ्यांचे, तसेच या ग्रंथसाठी लेखन केलेल्या सर्व लेखकांचे आम्ही मन: पूर्वक अभिनंदन करतो. आपले हे कार्य अन्य संस्था, विद्यालय, महाविद्यालये यांना प्रेरक ठरो. मराठीत महात्मा बसवण्णा यांच्याविषयी दर्जेदार असे विपुल साहित्य निर्माण होऊन, ते जनसामान्यांपर्यंत जावो अशी सदिच्छा आणि आपल्या पुढील कार्यास शुभेच्छा !

**पूज्य श्री डॉ. बसवलिंग पट्टद्देवरू**

संस्थापक अध्यक्ष, महाराष्ट्र बसव परिषद

हिरेमठ संस्थान, भालकी.

।। सा विद्या या विमुक्तये ।।
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade
कुलगुरूंचे कार्यालय (Office of the Vice-Chancellor)
Phone: (02462) 229282 Website: www.srtmun.ac.in E-mail: vcoffice@srtmu.ac.in

कुलगुरू/संदेश/२०२१–२०२२/ दिनांक ११ मे, २०२१

## संदेश



वीरभद्र शिक्षण संस्था द्वारा संचलित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड यांनी 'चिरंतर महात्मा बसवेश्वर' या नावाने प्रकाशित होत असलेल्या ग्रंथाचे संपादन कार्य सुरू केले आहे. त्यांच्या या मौलिक, समाजउपयोगी कार्यास सर्वप्रथम माझ्या शुभेच्छा!

'चिरंतर महात्मा बसवेश्वर' या संपादित ग्रंथाच्या माध्यमातून महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयातील प्राध्यापकांचे तसेच महाराष्ट्रातील वेगवेगळ्या प्राध्यापकांचे, लेखकांचे, अभ्यासकांचे, विचारवंतांचे लेख मागवून महात्मा बसवेश्वर यांच्या विचाराला मूर्त रूप देण्याचे मौलिक कार्य या ग्रंथाच्या माध्यमातून होणार आहे.

'चिरंतर महात्मा बसवेश्वर' नावाचा ग्रंथ प्रकाशित करण्याचा आपला उपक्रम अतिशय स्तुत्य असून सदर ग्रंथाद्वारे क्रांतीसुर्य जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या विधायक, सामाजिक, व शैक्षणिक विचार व कार्याची नव्याने ओळख भावी पिढींना होईल यात शंका नाही. विद्यार्थ्यांना सदर ग्रंथाच्या माध्यमातून महात्मा बसवेश्वर यांचे कार्य व विचार यामधून प्रेरणा मिळून भविष्यात ते स्वावलंबी व सुसंस्कृत नागरिक घडावेत ह्या शुभेच्छासह सदर ग्रंथ प्रकाशित करीत असल्याबद्दल आपले मनपुर्वक हार्दिक अभिनंदन !

धन्यवाद!

"कापडी पिशवी घरोघरी, पर्यावरणाचे रक्षण करी"

स्वा/–
(उद्धव भोसले)

प्रति,
प्राचार्य,
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,
मुखेड जि. नांदेड

Est:- 1972

# VEERBHADRA EDUCATION SOCIETY'S

## Tq. Mukhed Dist. Nanded (MS)

शुभेच्छा..!



अध्यक्ष
मा. श्री. श्रीकांत पाटील हंगरगेकर



सचिव
मा. श्री. रणजित पाटील हंगरगेकर

क्रांतीसुर्य जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त आमच्या महाविद्यालयातील प्राचार्य डॉ.अडकिणे एस.बी., प्रा.डॉ.कहाळेकर सी.एम., प्रा.डॉ. मंगनाळे संतोष कल्याणराव, ग्रंथपाल श्री. गजमल ए.बी. यांनी "चिरंतन महात्मा बसवेश्वर" या संपादित ग्रंथाच्या माध्यमातून महात्मा बसवेश्वर यांचे विचार प्रत्यक्षात आणण्याचा अतिशय चांगला प्रयत्न केला असून या संपादित ग्रंथातील शोधनिबंध महाराष्ट्रातील वेगवेगळया विचारवंत,प्राध्यापक,लेखक, अभ्यासक, व संशोधक विध्यार्थी इत्यादींचे शोधनिबंध/लेख माध्यमातून महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांना मूर्तरूप देण्याचे कार्य संपादक मंडळाने केलेले आहे.

या संपादित ग्रंथाच्या माध्यमातून आपण महात्मा बसवेश्वर यांचा जीवनप्रवास, इतिहास, वचन, त्यांनी केलेले ऐतिहासिक कार्य वाचकापुढे उपलब्ध करून देत आहात. हे काम नक्कीच समाजासाठी दिशादर्शक व प्रेरणा देणारे आहे. असेच नवीन कार्य आपल्याकडून व्हावे ही सदिच्छा व आपण संपादित केलेल्या ग्रंथास मन:पूर्वक शुभेच्छा..!

अध्यक्ष
मा. श्री. श्रीकांत पाटील हंगरगेकर

सचिव
मा. श्री. रणजित पाटील हंगरगेकर

## प्राचार्यांचे मनोगत..!



प्राध्यापक, संशोधक, अभ्यासक, विचारवंत मित्र हो, जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या ८९० व्या जयंतीनिमित्त त्यांचे जीवन कार्य व तत्वज्ञान या सबंधी "चिरंतन महात्मा बसवेश्वर" हा ग्रंथ प्रकाशित करीत आहोत. हा ग्रंथ आपल्या हाती देताना मला आनंद होत आहे. या ग्रंथात अनेक वैचारिक संशोधनपर शोधनिबंध लिहिलेले आहेत.

वीरभद्र शिक्षण संस्था संचालित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाची स्थापना १९७२ साली झाली. नांदेड जिल्ह्यातील मुखेड सारख्या तालुक्याच्या ठिकाणी डोंगराळ भागात, ग्रामीण भागात, शैक्षणिक दृष्ट्या कुठल्याही सुविधा उपलब्ध नसताना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. माधवराव पाटील हंगरगेकर, आणि सर्व संस्थेचे संस्थापक सदस्य यांच्या सहकार्याने महाविद्यालयीन उच्च शिक्षणाची सुविधा या परिसरातील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली.

१९७२ पासून आजपर्यंत महाविद्यालयाची वाटचाल अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून झालेली असून महाविद्यालय आपल्या उद्दिष्टपूर्तीकडे वाटचाल करीत आहे. संस्थाचालक, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, पालक या सर्वांच्या सहकार्याने व प्रयत्नाने महाविद्यालयाचा विकास चालू आहे. या महाविद्यालयातून अनेक गुणवंत विद्यार्थी शिक्षण घेवून महत्त्वाच्या पदावर नोकरी करत आहेत. विद्यार्थ्यास केंद्रबिंदू मानून त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी चिकाटीने प्रयत्नांची पराकाष्टा केली जात आहे. संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. श्रीकांत पाटील हंगरगेकर साहेब, सचिव मा.श्री.रणजित पाटील हंगरगेकर साहेब व संस्थेचे सर्व सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालय प्रगती पथावर चालत आहे.

वीरभद्र शिक्षण संस्थेने महाविद्यालयासाठी भव्य इमारत, मुलींचे वस्तीगृह, सुसज्ज ग्रंथालयाची इमारत, सांस्कृतिक सभागृह, मोठे क्रीडांगण, अभ्यासिका, प्रयोगशाळा, संस्थेसाठी ऑफिस, संगणक कक्ष, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अंतर्गत अभ्यास केंद्र, आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत दूर शिक्षण एम. ए. सर्व विषय असलेले अभ्यास केंद्र, दृक-श्राव्य विभाग, मोटार सायकल स्टॅंड, उपहारगृह, विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या (फिल्टर) पाण्याची व इत्यादी व्यवस्था संस्थेने करून दिलेली आहे.

वीरभद्र शिक्षण संस्थेने माझ्यावर प्राचार्य पदाची जबाबदारी सोपवली आहे. सर्व संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, आणि स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य यांच्या परिश्रमामुळे आणि सहकार्यामुळे महाविद्यालय प्रगतीपथावर वाटचाल करीत आहे.

आपल्या संस्कृतीची विशेषता काय? या प्रश्नाचे उत्तर म्हणजे या भारत देशात जन्माला आलेले महापुरुष त्यांचे चरित्र त्यांचे तत्त्वज्ञान व त्यांनी त्याप्रमाणे केलेले कार्य असे थोडक्यात सांगता येईल. आपला देश हा अशा महापुरुषांची खानच आहे. ज्या महापुरुषांनी समाजहित लक्षात घेऊन व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी निरंतर प्रयास केले व ईश्वरनिष्ठ जणांची एक मोठी संघटना पुनर्जीवित केली, त्यामध्ये महात्मा, आद्य क्रांतिकारक, प्रात: स्मरणीय बसवेश्वरांचा समावेश करावा लागेल. महान ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटो यांनी असे म्हटले होते की, A Philosopher Should be the king  हे वाक्य मला महात्मा बसवेश्वरांनी सत्य केले असे निश्चितच वाटते. जात, धर्म, पंथ, लिंग, पोथीनिष्ठा यांच्या भिंती त्यांनी तोडून टाकल्या. अवघड संस्कृत भाषेतील तत्त्वज्ञान किंवा धर्म उपदेश नाकारून सर्वांना समजेल अशा लोकभाषेत सांगितले. परमेश्वराचे स्वरूप अत्यंत सोप्या भाषेत सांगितले. देवपूजेतील अवडंबर दूर करून अंतःकरणपूर्वक केलेली अर्चना परमेश्वराला कशी प्रिय होते हे आपल्या विचार व कृतीतून समजावले. “क्रांती स्वतःची पिल्ले खाते” हे पाश्चात्त्य तत्त्वज्ञान चुकीचे ठरविले म्हणून तर लोकांच्या मनात परिवर्तन घडवून आणणारे महात्मा बसवेश्वर हे महान क्रांतिकारक व त्यांचे अनुयायी वीरशैव ठरतात.

कायक सिध्दांतात बसवेश्वरांनी व्यक्तीला श्रम करुन अर्थार्जन करावे, व्यवसाय स्वातंत्र्य आणि अधिक संपत्ती न बाळगता किंवा चक्क भिक्षापात्र घेऊन भीक न मागावी अशी तीन सुत्र प्रतिपादन केले आहेत.  बसवेश्वर आपल्या वचनात कायकाचे महत्व स्पष्ट करतात महात्मा बस्वेश्वर म्हणतात, की कष्टाला अनन्य साधारण महत्व दिले आहे.  ज्याने आपल्या घामाने ही काळी माती भिजवली, अखंड श्रमाने ज्याने आपला देह राबवला, कष्ट उपसले पोटासाठी, ज्याने आपले तन आणि मन श्रम पुर्वक झिजवले, श्रमाची पुजा करुन ज्याने शिवाची पुजा केली,

श्रमिकांच्या झोपडीला जो कैलास मानतो ।
ज्याची वाणी तशी करणी हे कूडलसंगमदेवा तो जगद्गुरु झाला ॥

बसवेश्वरांनी सांगितलेल्या कायकाचा परिपुर्ण अवलंब करण्यात आला. तर भारतीय समाज स्वयंपुर्ण होऊन आर्थिक सुबत्तेने समृध्द होईल. कायक हे भौतिक व आध्यात्मिक विकासाला चालणा देणारे तत्व आहे. जे बसवेश्वरांनी सर्वांगीण प्रगतीसाठी योजिले होते.

अशा या महात्म्याच्या जीवन व तत्त्वज्ञानाचा परिचय करून देण्याचे अवघड कार्य म्हणजे आकाशाला गवसणी घालण्यासारखे होय. यामध्ये आपण सर्व विद्वानांनी केलेले सहकार्य लाख मोलाचे आहे.

"चिरंतन महात्मा बसवेश्वर" हा संपादित ग्रंथ आमच्या वीरभद्र शिक्षण संस्थेतील सर्वच  सल्लागार मंडळाच्या आशिर्वादाने, महाविद्यालयातील संपादक, सह-संपादक, संपादक मंडळ, प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या प्रयत्नातून म्हणजेच महाविद्यालयीन परिवाराच्या सहकार्यातून  हा ग्रंथ आपल्या हाती देताना मला विशेष आनंद होत आहे. भविष्यात असेच सर्जनशील उत्कृष्ट कार्य यांच्या हातून घडो ही सदिच्छा...!



प्राचार्य
**डॉ. अडकिणे एस. बी.**
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड
ता. मुखेड, जि. नांदेड

# प्रस्तावना

▌नागोराव कुंभार

**वी**रभद्र शिक्षण संस्था संचालित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयानी "चिरंतन महात्मा बसवेश्वर" हा मौलिक ग्रंथ प्रकाशित करून एक महत्त्वाचे बौद्धिक कार्य केलेले आहे. त्याबद्दल मी प्रथमतः महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अडकिणे एस.बी. आणि संपादक व त्यांचे सर्व सहकारी यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो.

समाजामध्ये विद्यापीठ आणि महाविद्यालय यांची महत्त्वाची भूमिका असते. त्यांनी समाजाचे बौद्धिक व सांस्कृति नेतृत्त्व करावे व व्यक्ती आणि समाजाला सुखी व संपन्नजीवन जगण्यास उपयुक्त मार्गदर्शक अशा Ideas व Ideals द्यावेत, हे अभिप्रेत आहे. त्यांनी भौतिक विकासाबरोबर बौद्धिक विकासाकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. यासाठी त्यांनी चर्चासत्र, परिसंवाद, अधिवेशन, व्याख्यानमाला, मूलभूत संशोधन आणि मौलिक ग्रंथ निर्मिती आदि बौद्धिक उपक्रम व प्रकल्प गांभीर्याने राबविले पाहिजेत. याचा लाभ व्यक्ति व समाजाची वैचारिक दृष्टी प्रगल्भ होण्यासाठी होत असतो. यादृष्टिने महात्मा फुले महाविद्यालयाचा हा ग्रंथनिर्मिती प्रकल्प महत्त्वाचा व उपयोगाचा आहे.

प्रस्तुत ग्रंथ दुसऱ्या एका कारणासाठी महत्त्वाचा आहे. समाजातील सद्यःस्थितीत या ग्रंथाची उपयोगिकता व प्रासंगिकता मोलाची आहे. कारण सद्याचे देशातील बौद्धिक व सांस्कृतिक पर्यावरण दुषीत झालेले आहे. समाजामध्ये असहिष्णूता वाढत आहे. विरोधी मतांचा आदर करावा, तो ऐकूण घ्यावा, ही भारतातील सहिष्णुतेची जुनी व उज्ज्वल परंपरा क्षीण होत आहे. सत्तेला व प्रस्थापित व्यवस्थेला प्रश्न विचारले किंवा त्यांच्या विरोधात मतप्रदर्शन केले की त्यांच्यावर न्यायालयामध्ये खटले भरले जात आहेत. सुडो राष्ट्रवादी मतभिन्नता व्यक्त करणाऱ्यांना राष्ट्रद्रोही ठरवित आहेत. विरोधी विचार मांडणाऱ्या व्यक्तिची हत्या केली जात आहे. जाती-जातीमध्ये आणि धर्मा-धर्मामध्ये द्वेषाची भावना वाढत आहे. समाजामध्ये दहशत, भिती आणि दमनाचे वातावरण निर्माण केले जात आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच होत आहे. समाजाला व देशाला या परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी महात्मा बसवेश्वरांचे विचार व कार्य यांची आपल्याला निश्चितपणे मदत होईल. यामुळे या ग्रंथाचे मोल अधिक आहे.

प्रस्तुत ग्रंथामध्ये एकुण ८० लेखांचा समावेश आहे. हा महाग्रंथच झालेला आहे. या ग्रंथातील सर्व लेख अभ्यासपूर्ण, वाचनीय व उद्‌बोधक आहेत. लेखकांनी त्यांच्या लेखातील विषयाची मांडणी निर्भीडपणे केलेली आहे. या सर्व लेखांतून लेखकांनी महात्मा बसवेश्वर यांच्या व्यक्तिमत्त्व, विचार आणि कार्य यासंबंधी सुलभ व सोप्या भाषा आणि शैलीमध्ये अत्यंत समर्पक विवेचन व विश्लेषण केलेले आहे. त्यांच्या विचार व कार्याची उपयुक्तता व प्रासंगिकता स्पष्ट केलेली आहे. याबद्दल लेखकांना धन्यवाद दिले पाहिजेत. प्रस्तुत ग्रंथ म्हणजे महात्मा बसवेश्वर यांच्या विचारविश्वाचे शब्दबद्ध केलेले सुंदर शब्दशिल्प आहे. या शब्दशिल्याचे शिल्पकार लेखकांचे मी मनातून अभिनंदन करतो.

प्रस्तुत ग्रंथामध्ये ८० पेक्षा जास्त लेख असल्यामुळे विस्तारभयास्तव सर्व लेखांचा परामर्श घेणे संभव नाही. परंतु प्रत्येक लेखकांनी त्यांच्या लेखांतून महात्मा बसवेश्वरांच्या शिकवणीतील एखादा पैलू विस्ताराने वा संक्षेपाने व्यवस्थित मांडलेला आहे. लेखकांनी महात्मा बसवेश्वर यांच्या विचार व कार्य यासंबंधी नोदविलेली निरीक्षण महत्त्वाची आहेत. संक्षेपाने सूत्ररुपात ती निरीक्षणे पुढीलप्रमाणे आहेत. महात्मा बसवेश्वरांचे ध्येय मानवी जीवनामध्ये मानवी ऐक्य, बंधुभाव, सहिष्णूता, समता, स्वातंत्र्य आणि न्याय प्रस्थापित करणे हे होते. त्यांनी एकेश्वरवाद, बुद्धिप्रामाण्यवाद, विज्ञानवाद, विवेकवाद, इष्टलिंग साधना, प्रयत्नवाद आदि विचारांचा पुरस्कार केला. त्यांनी इहवादी जीवनदृष्टि मांडली. त्यांनी हिन्दु धर्म, संस्कृती आणि तत्त्वज्ञान यांच्यातील कालबाह्य मूल्य व तत्त्व यावर कठोर प्रहार केले. त्यांनी वर्णव्यवस्था, पुनर्जन्म, स्वर्ग, नर्क व मोक्ष आदि संकल्पना अन्यायकारक, काल्पनिक व निरर्थक आहेत, असे प्रतिपादन करून त्या संकल्पना

नाकारलेल्या आहेत. त्यांचा दैववाद व संन्यासवादालाही विरोध होता. त्यांनी मूर्तीपूजा व मंदिर संस्कृतीला नकार दिला. त्यांनी समाजातील अनिष्ट रुढी, परंपरा, कर्मकांड, अंधश्रद्धा आणि जातीयवाद आदि संकल्पना व विचारांची चिकित्सा करून त्या कशा निरुपयोगी आहेत, हे सांगितले व त्यांचा त्याग करावा, असा संदेश दिला.

माणसांनी कसे वागावे व कसे वागू नये यासंबंधी त्यांनी विस्ताराने वचनसाहित्य व कृतीमधून आपल्याला संदेश दिलेला आहे. दगडधोंड्यांची पुजा करू नका. मनुष्याचे आचरण हाच धर्माचा पाया आहे. मनुष्याला सदाचारी होण्यासाठी तो आंतरिक व बाह्यअंगाने शुद्ध असावा लागतो. मनुष्याच्या ठिकाणी संयम, विनयशीलता व सहनशीलता असली पाहिजे. प्रत्येकांनी श्रम करून स्वत:ची उपजिवीका भागविली पाहिजे. सर्व श्रम समान असतात. कोणतेही श्रम श्रेष्ठ वा कनिष्ठ नसते. प्रत्येकाला व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य असले पाहिजे. श्रम हाच कैलास वा स्वर्ग आहे, असे सांगून त्यांनी श्रमाला पावित्र्य आणि प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. भिक्षा मागून जगू नका, काम करून जगा. सर्वांनी शिक्षण घ्यावे, वचनसाहित्य वाचावे आणि ज्ञानी व्हावे असा त्यांचा आग्रह होता. स्त्री-पुरुषामध्ये कांहीही भेदाभेद नाहीत. स्त्रीयांना पुरुषासम वागविले पाहिजे. अस्पृश्य व स्त्रीयांना गुलामगिरीतून मुक्त केले पाहिजे. सर्वांना विकासासाठी समान संधी मिळावी; पण मागासवर्गीयांना विशेष अधिकार दिले पाहिजेत. जातीनिर्मूलनासाठी आंतरजातीय विवाह हा उपयुक्त उपाय आहे. संघर्षाशिवाय सामाजिक परिवर्तन संभव नसते; पण हा संघर्ष शांतता आणि लोकशाही मार्गाने करावा.

त्यांच्या तत्त्वज्ञान व कार्याचा समाजामध्ये खोलवर व सर्वदूरवर चांगला परिणाम झाला. त्यांच्यामुळे भारताला पुरोगामी चेहरा प्राप्त झाला. देशातील सर्व क्षेत्रातील पुरोगामी चळवळींची पाळेमुळे व आधार त्यांच्या तत्त्वज्ञानामध्ये आहेत. त्यांच्यामुळे समाजामध्ये समतेचा व सामाजिक न्यायाचा विचार रुजला. सामान्य मानसाला सन्मान व प्रतिष्ठा प्राप्त झाली. अस्पृश्य आणि महिला गुलामगिरी व शोषणातून मुक्त झाल्या. त्यांना स्वातंत्र्य व हक्क मिळाले. त्यांचा शिक्षण व ज्ञानातील सक्रीय सहभाग वाढला. त्यांच्यामध्ये आत्मविश्वास व माणूस म्हणून जगण्याचे सामर्थ्य आले. त्यांच्या मते सामाजिक परिवर्तनासाठी संघर्ष हा अढळ असतो पण तो शांतता आणि लोकशाही मार्गाने केला पाहिजे. त्यांच्यामुळे आपल्याला आधुनिक मूल्याधिष्ठीत समाजाची निर्मिती करणे शक्य झाले. ते बोलके नव्हे कृतिशील व क्रांतीकारी समाजसुधारक व विचारवंत होते. या ग्रंथातील ही व अन्य निरीक्षणे महत्त्वाची आहेत. तसेच यामध्ये त्यांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक विचारांचा आढावा घेतलेला आहे.

महात्मा बसवेश्वर यांचा जन्म इ.स. ११०५ मधील वैशाख शुद्ध तृतीया रोहिणी नक्षत्रावर अक्षय्य तृतीयेच्या दिनी मंगळवेढा राज्यातील तर्दवाडी भागातील बागेवाडी येथे झाला. त्यांच्या वडीलांचे नाव मादिराज व आईचे नाव मादलांबिका होते. त्यांचे वडिल धार्मिक वृत्तीचे पापभिरु, निःस्पृह, सात्त्विक आणि सद्वर्तनी होते. त्यांना ज्येष्ठ बंधु देवराज व ज्येष्ठ बहिण नागलांबिका ही दोन भावंडे होती. त्यांच्या बहिणीचे त्यांच्यावर मनस्वी प्रेम होते. त्यांना निलांबिका व गंगांबिका नामक दोन पत्नी होत्या. गंगांबिका यांना बालसंगय्या नामक पुत्ररत्न झाले होते; परंतु दुर्दैवाने अल्पजीवी ठरले. त्यांच्या व्यक्तिमत्त्व जडणघडणीमध्ये त्यांच्या आई-वडीलांच्या गुणांचा सिंहाचा वाटा होता. महात्मा बसवेश्वर अत्यंत कुशाग्र बुद्धिचे होते. त्यांच्याकडे सुक्ष्म निरीक्षण वृत्ती व शक्ती होती. त्यांची स्मरणशक्ती तिक्ष्ण होती. त्यांचे चारित्र्य निष्कलंक होते. त्यांच्या विचार व आचारामध्ये एकरूपता होती. त्यांच्यामध्ये स्वत:च्या विचारासाठी वाटेल ती किंमत देण्याची तयारी व निर्भयता होती. त्यांच्यामध्ये विवेक वृत्ती व चिकित्सक वृत्ती होती. म. बसवेश्वरांच्या वडिलांनी त्यांची मुंज करण्याचे योजिले होते. परंतु त्यांनी त्याला नकार दिला. या संदर्भात त्यांच्या वडिलांशी झालेल्या संवादातून त्यांच्या चिकित्सक वृत्तीची साक्ष पटते. त्यांनी वडिलांना सांगितले, माझ्या जन्मदात्या आईला आणि आक्काला संस्कारहिन ठेवणारा व्रतबंध संस्कार मला करून घ्यावयाचा नाही. पुढे ते म्हणतात, "तुम्ही चालीरीती पाळली, पाळत आहात म्हणून आम्हीही पाळलीच पाहिजे असे कुठे लिहून ठेवले ? कोणी तरी उघड्या डोळ्यांनी या चालीरीतीकडे पहायला नको का ? तो धावला म्हणून मी धावलो, मी धावले म्हणून त्यांनीही धावलेच पाहिजे ? पुढे खड्डा असलेला दिसत असला तरी विचारी

लोकांनी तरी डोळसपणे विचार करायला नको का ? ते काही नाही. आपले सारे विधी स्त्री-पुरुष आणि माणसा-माणसात भेद करणारे आहेत. मला त्यांची मनस्वी चिड वाटायला लागते. मानवा-मानवामध्ये भेदभाव करणारा हाच का तुमचा सनातन धर्म ?" त्यांनी बाराव्या शतकामध्ये प्रतिपादन केलेल्या या विचारावरून त्यांच्या प्रखर विवेकवाद व बुद्धिवादाचे दर्शन घडते.

ते कल्याणनगरीचे राजे बिज्जल यांचे महामंत्री होते. त्यांनी महामंत्री म्हणून केलेल्या कामातून प्रशासकीय सत्ता सामान्य लोकांच्या हितासाठी कशी वापरावी याचा एक वस्तूपाठ आपल्या समोर ठेवलेला आहे. सत्ता सोडल्यानंतर त्यांनी सर्व शक्ती पणाला लावून धार्मिक व सामाजिक सुधारणांचे कार्य केले. त्यांच्या प्रयत्नामुळेच मध्ययुगीन भारतामध्ये सामाजिक क्रांतीचा सूर्योदय होवू शकला.

यानिमित्ताने मी आपले त्यांच्या नैतिक विचारांकडे लक्ष वेधू इच्छीतो. महात्मा बसवेश्वरांनी मानवी जीवनाचा समग्र पद्धतीने विचार केलेला आहे. त्यांनी मांडलेल्या तात्त्विक, सामाजिक, राजकीय व आर्थिक विचारांमधून ही समग्रता लक्षात येते. त्यांनी मांडलेले नैतिक विचार मोलाचे व उपयुक्त आहेत. आज मानव जाती समोर नैतिक अध:पतनाचे मोठे संकट उभे आहे. मानवाला या संकटावर मात करण्यासाठी त्यांचे नैतिक विचार निश्चितपणे उपयोगी पडतील. त्यांच्या नैतिक विचारांचे काही विशिष्ट्ये आहेत. त्यांचे नैतिक विचार अत्यंत सोपे आहेत. हे सॉक्रेटिस, ॲरिस्टॉटल, कांट, बेंथम व मिल्ल या सुप्रसिद्ध तत्त्ववेत्यांनी मांडल्याप्रमाणे सैद्धांतिक स्वरूपाचे नाहीत. त्यांचे नैतिक विचार आकर्षक व जीवनोपयोगी आहेत. यातून मानवाने चांगले जीवन कसे जगावे व जीवनाचे अंतिम ध्येय काय असावे यासंबंधी मार्गदर्शन मिळते. त्यांच्या नैतिक चिंतनामध्ये शुद्ध जीवन जगणे याला फार महत्त्व आहे. त्यांचे नैतिक विचार भाषा आणि आशय या दोन्ही अंगांनी नाविन्यपूर्ण आहेत. ते लोकांच्या बोलीभाषेमध्ये मांडलेले असल्यामुळे ते सामान्य माणसालादेखील सहज समजतात. त्यांनी केवळ नैतिक विचार मांडले नाहीत तर त्या प्रमाणे स्वतः आचरण केले. त्यामुळे त्यांच्या विचाराला वजन प्राप्त झाले.

सर्वांना सुख प्राप्त व्हावे, सर्वांचे कल्याण व्हावे या ध्येयासाठी त्यांनी नैतिक विचारांची मांडणी केली. त्यांच्या मते केवळ भौतिक विकासाने खरे सुख व समाधान लाभणार नाही. याउलट केवळ भौतिक विकासाकडे लक्ष दिल्यास ते दुःखाला कारणीभूत ठरेल. जीवनामध्ये विविध संकटाची वाढ होईल. यामुळे मानवाने भौतिक विकासाबरोबर नैतिक विकासाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. भौतिक विकास आणि नैतिक विकास यांमध्ये संतुलन व सुसंवाद असला पाहिजे. वास्तव त्यांनी मानवाच्या नैतिक जीवनाची मशागत करण्याचे कार्य केले. व्यक्ती व समाज जीवनामध्ये नैतिक विचार व त्यानुरूप त्यांचे आचरण असेल तर त्यातून मानवी ऐक्य साध्य होऊ शकते. त्यामुळे समाजामध्ये शांतता प्रस्थापित होते. ईश्वराशी सख्य जोडता येते, अशी त्यांची धारणा होती. त्या गोष्टी साध्य करण्याचे त्यांनी दोन मार्ग सांगितलेले आहेत. एक मनुष्याने स्वतःचे विचार व आचार शुद्ध ठेवले पाहिजेत आणि दुसरे त्यांनी माणसा-माणसामध्ये भेदाभेद न करता सामान्य माणसांची सेवा केली पाहिजे. यासाठी मनुष्याला समाजापासून दूर जावून संन्यास घेण्याची आवश्यकता नाही. समाजातील सामान्यातला सामान्य माणूस देखील असे नैतिक जीवन जगू शकतो.

त्यांनी माणसाच्या नैतिक जीवणाच्या जडणघडणीचे सूत्र सांगितलेले आहे. माणसाला नितीमान होण्यासाठी त्याचा नैतिक मूल्य आणि तत्त्वे यावर विश्वास अला पाहिजे. नैतिक मूल्यांवर विश्वास ठेवल्याशिवाय जीवन अर्थपूर्ण होणार नाही. माणसाने जीवनामध्ये योग्य आकांक्षा बाळगली पाहिजे. त्यांनी चांगल्या ध्येय आणि कारणासाठी जगले पाहिजे. माणूस संकुचित विचार आणि ध्येयानुसार जगल्यास तो मोठा होणार नाही, मोठे ध्येय साध्य करु शकणार नाही. त्याची इतरांशी संवादाची भाषा देखील योग्य असली पाहिजे. माणसांनी योग्य आकांक्षा, ध्येय आणि भाषा कृतीतून प्रगट केली पाहिजे. नितीमान असणे म्हणजे माणूस विचार आणि कृतीत सत्यवादी असणे होय. त्यांच्या मते प्रतिकूल परिस्थितीमध्ये देखील सत्यापासून दूर जाता कामा नये. माणसाला सत्यवादी होण्यासाठी इतरांविषयी पाठीमागे बोलणे, इतरांचे चारित्र्यहनन

करणे, इतरांशी बोलताना कठोर शब्दाचा वापर करणे, निरर्थक व निरोपयोग बोलणे व इतरांची फसवणूक करणे या बाबी टाळल्या पाहिजेत. त्यांच्या मते सत्य म्हणजे स्वर्ग होय. माणसाला नितीमान होण्यासाठी योग्य कल व दृष्टिकोन असावा लागतो. त्याला योग्य कलाशिवाय शुभ-अशुभ, सत्य-असत्य व योग्य-अयोग्य यामध्ये भेद करता येत नाही. त्याच्याकडे योग्य कल असेल तर तो योग्य कृती करु शकतो. योग्य कल माणसाला कार्य करण्यासाठी प्रेरणा देत असते. तसेच माणसाला नितीमान होण्यासाठी त्याच्यामध्ये कारुण्यभाव असावा लागतो. सत्य बोलणे आणि सत्य कृती यांच्यामध्ये एकवाक्यता असावी लागते. सत्य कृती म्हणजे न्याय व सत्य यावर आधारलेली कृती होय. सत्य कृतीसाठी माणसाने स्वार्थ, स्वसुख आणि लालसा यांचे विसर्जन करणे आवश्यक आहे.

त्यांनी त्यांच्या वचनसाहित्यामध्ये मानवी जीवनाचे सार सांगितलेले आहे. त्यातून त्यांनी नैतिक मूल्यांचा संदेश दिलेला आहे. विवेकाने वागणे हे माणसाचे कर्तव्य आहे, असे त्यांनी प्रतिपादन केलेले आहे. त्यांच्या मते विवेकाने वागणे म्हणजे सद्‌गुणी जीवन जगणे होय. यामुळे त्यांनी त्यांच्या चिंतनामध्ये विवेकवाद व बुद्धिप्रामाण्यवाद यांना अधिक महत्त्व दिलेले आहे. त्यांनी मांडलेल्या 'पंचाचार' संकल्पनेतून त्यांचे नैतिक विचार प्रगट झालेले आहेत. पंचाचार म्हणजे नीतीविचारच होय. त्यांनी पंचाचारामध्ये वैयक्तिक, सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक नीतिमूल्याच्या आचरणाचा समावेश केलेला आहे. त्यांनी सांगितलेले लिंगाचार, सदाचार, शिवाचार, भृत्योचार आणि गणाचार हे पंचाचार आहेत. त्यांनी लिंगाचारातून धार्मिक नीतिमत्ता सांगितलेली आहे. त्यांच्या मते माणसाला त्यांच्या जीवनातील आध्यात्मिक उन्नती हे त्याचे जीवनाचे ध्येय साध्य करण्यासाठी लिंगाचार उपयुक्त आहे. त्यांच्या मते लिंग हेच परम तत्त्व आहे. यामुळे माणसांनी त्याला त्यांच्या गुरुकडून मिळालेल्या इष्टलिंगाची उपासना करावी. त्यांच्या मते शुद्ध व सत्य कायकाच्या माध्यमातून प्राप्त द्रव्यातून आत्मकल्याण साध्य करणे म्हणजे सदाचार होय. त्यांना यातून दासोहाच्या माध्यमातून लोककल्याण साधने अभिप्रेत आहे. तसेच यातून ते सांगतात माणसाने बांडगुळाप्रमाणे जीवन जगू नये. आर्थिकदृष्ट्या इतरांवर अवलंबून राहू नये. स्वतःची भाकर स्वतःच्या कष्टाने मिळवावी. शिवाचार म्हणजे सर्व माणसे समान आहेत, असे मानून सर्वांशी समानतेने वागणे होय. माणसा-माणसामध्ये वर्ण, वर्ग, लिंग, जात आदि आधारे भेदाभेद करु नये. भृत्याचारांमध्ये विनम्र होवून समाजाची सेवा करणे अभिप्रेत आहे. व्यक्तीपेक्षा समाज श्रेष्ठ आहे, हे मान्य करून समाजाची सेवा करावी. त्यांच्या मते गणाचार म्हणजे माणसाच्या अंतरंगात व बहिरंगात असलेल्या वाईट प्रवृत्तीचा प्रतिकार करणे होय. सत्याची, न्यायाची पाठराखण करणे आणि पंचसुतकांचे पालन न करणे यामध्ये अभिप्रेत आहे.

त्यांच्या मते माणसानी नैतिक आचरण केले तरच त्याची आंतरिक व बाह्यशुद्धी होते. अशा प्रकारची शुद्धी झाल्याशिवाय आत्मकल्याण व लोककल्याण साध्य होणार नाही; अंतर्बाह्य शुद्धीसाठी सप्तसूत्र सांगणारे त्यांचे एक वचन सुप्रसिद्ध आहे ते खालीलप्रमाणे -

"करु नको चोरी, करु नको हत्या,  
नको रागावू कधी, बोलू नको मिथ्या,  
अन्यायाची कधी करु नको घृणा  
नको करु कोणाची मानखंडना  
करु नको आत्मप्रशंसा कधी,  
हीच अंतरंग शुद्धी, हीच बहिरंग शुद्धी  
कुडलसंगमदेवाच्या कृपाप्राप्तीची हीच रीती"

याचा अर्थ कोणाचीही हत्या करुन नका, चोरी करु नका, कडक बोलू नका, स्वतःची स्तूती करु नका व खालच्या स्तरातील लोकांची सेवा करा, असा आहे नैतिक माणूस व नैतिक समाजनिर्मितीसाठी हा त्यांचा उपयुक्त नैतिक संदेश आहे.

त्यांच्या मते या सप्तसूत्रानुसार केलेले आचरण हे नैतिक आचरण असते. यामुळे माणसाचे कल्याण होते. त्याला देवाची कृपा होते. त्यांचे हे नैतिक चिंतन व्यक्ती व समाजजीवनातील नैतिक अध:पतन थांबविण्यासाठी दिपस्तंभासारखे मार्गदर्शक आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अडकिणे एस.बी. आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी "चिरंतन महात्मा बसवेश्वर" हा सर्वांगसुंदर ग्रंथ प्रकाशित करून महापुरुष महात्मा बसवेश्वर यांचे उचित असे स्मरण केलेले आहे. याबद्दल पुन:श्च एकदा प्राचार्य व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन. या बौद्धिक प्रकल्पाच्या निमित्ताने मी संस्थासंचालक व प्राचार्य यांना महाविद्यालयाच्या वतीने भविष्यात काही बौद्धिक उपक्रम राबवावेत अशी विनंती करतो. महाविद्यालयाने प्रत्येक वर्षी एका महापुरुषावर ग्रंथ प्रकाशित करावा. महाविद्यालयाच्या वतीने प्रत्येक वर्षी महाराष्ट्रातील नामांकित विचारवंत व साहित्यीक यांना निमंत्रीत करून तीन दिवसीय "महात्मा फुले व्याख्यानमाला" सुरू करावी. मुखेड तालुका : काल, आज व उद्या हा ग्रंथ प्रकाशित करावा. यामध्ये मुखेड तालुक्याचे सर्वांगीण दर्शन घडविणारे मुखेड तालुक्याचा इतिहास, भौतिक स्थिती, तालुक्यातील शैक्षणिक चळवळ, साहित्यीक व सांस्कृतिक चळवळ, सामाजिक व राजकीय चळवळ, आर्थिक विकास आदि पैलूंवर अभ्यासक व संशोधकांचे शोधनिबंध असावेत. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक वर्षी सामाजिक व राजकीय नेतृत्व कसे करावे, वैचारिक व ललित साहित्यलेखन कसे करावे आणि उद्योग-व्यापार कसा करावा यासंबंधी मार्गदर्शन करण्यासाठी १०० ते १५० विद्यार्थ्यांचे युवक नेतृत्व शिबीर, साहित्यलेखन शिबीर आणि उद्योजकता शिबीर अशा तीन युवक शिबीरांचे आयोजन करावे. या बौद्धिक प्रकल्पाचा विद्यार्थ्यांना व परिसरातील नागरिकांना निश्चितपणे लाभ होईल, असे मला वाटते.

वाचक या महाग्रंथाचे स्वागत करतील याचा मला निश्चितपणे विश्वास आहे. महाविद्यालयांनी भविष्यातही अशाच प्रकारचे बौद्धिक उपक्रम राबवावेत ही अपेक्षा !

**प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार**
माजी अधिष्ठाता (डीन),
सामाजिक शास्त्रे विद्याशाखा,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड तथा
माजी सदस्य,
महाराष्ट्र राज्य विश्वकोष निर्मिती मंडळ,
महाराष्ट्र शासन, मुंबई.
मो. - ९४२२९४९९६६

□□□

# ऋणनिर्देश

**"चिरंतन महात्मा बसवेश्वर"** हा संपादित ग्रंथ वाचकांच्या हाती देतांना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. प्रस्तुत संपादित ग्रंथाबद्दल असे म्हणावे वाटते की, या जगात जागतिक कीर्तीचे जेवढे महापुरुष होऊन गेलेले आहेत. त्यांच्या क्रांतीदर्शी विचारधारेला आणि विविधांगी तत्वज्ञानाला संदर्भित करणारी एक पार्श्वभूमी असते, त्यांच्या जीवन कार्याला वेगवेगळ्या उद्दिष्टांच्या कडा असतात. त्यांची निश्चित ठरलेली ध्येयसिद्धता असते, त्या ध्येयपूर्तीसाठीचे त्यांचे तत्वज्ञान आकलनीय असते, ते कालसापेक्ष असते. त्यांचे तत्त्वज्ञान देशहित, समाजहित, जनकल्याण साधण्यासाठी असते. या सर्वच राष्ट्रहितासाठी, जनकल्याणासाठी सतत झिजणाऱ्या महापुरुषांच्या, राष्ट्रसंतांच्या विचारांची नाळ आम्ही महात्मा बसवेश्वरांच्या विचारांना जोडण्याचा प्रयत्न केलेला आहे. महात्मा बसवेश्वर नैसर्गिक सत्य सांगतात. त्यांची विवेकवादावर आणि विज्ञानवादावर प्रचंड निष्ठा होती. मानवतावादी आणि समतावादी समाज निर्मितीसाठी जात हीच घातक असते, तिलाच समूळ नष्ट करायचे असेल तर भाषणे देऊन, पुस्तके लिहून किंवा परिसंवाद आयोजित करून काही साध्य होत नाही. त्यासाठी कृतीशील आचरणाची आवश्यकता आहे. याची पुरेपूर जाणीव महात्मा बसवेश्वरांना होती. म्हणूनच महात्मा बसवेश्वरांनी त्यांच्या काळात अनेक आंतरजातीय विवाह लावून दिले. म्हणून महात्मा बसवेश्वर हे जगातील जातीनिर्मुलनाचे पहिले कर्ता प्रणेता होते असे आम्हाला वाटते. बोलण्यापेक्षा कृतीवर भर देणारे एक महान समाज सुधारक म्हणजे महात्मा बसवेश्वर होय. यात तीळमात्र शंका नाही. 'मानवतावाद,समता,स्वातंत्र्य, बंधूभाव, सामाजिक न्याय ही संविधानिक मूल्ये' समाजात रूजविण्याचे पहिले प्रयत्न त्याकाळात महात्मा बसवेश्र्वरांनी केले हे निर्विवाद सत्य आहे.

भारतात आजपर्यंत अनेक संत होऊन गेले आहेत. याच नामावलीत महात्मा बसवेश्वर यांचा अग्रक्रमाने अंतर्भाव होतो. महात्मा बसवेश्वरांनी लोकांना समता, बंधुभाव, श्रम, मानवता, अहिंसा, परोपकार, स्त्री स्वातंत्र्य, लोकशाही, उपासना इत्यादी. मुल्यांची शिकवण दिली. तसेच भारतीय भूमी संताची भूमी म्हणून ओळखली जाते. त्याचबरोबर ही भूमी समाज सुधारकांची भूमी म्हणूनही ओळखली जाते. महात्मा गौतमबुध्दांनी या भूमीवर शांततेचा संदेश दिला. त्या गोष्टीला सुमारे अडीच हजार वर्षे उलटून गेली. परंतु त्यांच्या कल्पनेतली शांतता शोधण्यात आपण यश मिळवू शकलो नाही. महात्मा बसवेश्वर यांनी जातीव्यवस्थेवर आपल्या विचारांने व कार्यांने आसूड ओढून जातीभेद नष्ट करण्याचा प्रयत्न केला.अशी अनेक कार्ये महात्मा बसवेश्वरांनी केले. बाराव्या शतकातील थोर समाज सुधारक म्हणून आम्ही महात्मा बसवेश्वर यांच्या कार्याला मानाचा मुजरा करतो.

**"चिरंतन महात्मा बसवेश्वर"** या शिर्षकाखाली महात्मा बसवेश्वरांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकणाऱ्या ग्रंथासाठी महनीय व्यक्तींनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य केले त्या सर्वांचे ऋण व्यक्त करणे आमचे कर्तव्य समजतो.

विविध ठिकाणाहून प्राध्यापक, संशोधक, अभ्यासक, विचारवंतांनी, जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या ८९० व्या जयंतीनिमित्त त्यांचे जीवन कार्य व तत्वज्ञान या सबंधी "**चिरंतन महात्मा बसवेश्वर**" या ग्रंथात अनेक वैचारिक संशोधनपर शोधनिबंध/ लेख लिहून प्रकाशित करण्यासाठी सर्वांनी सहकार्य केले त्याबद्दल त्यांचे आभार मानतो.

या संपादित ग्रंथ निर्मितीसाठी ज्यांच्या प्रेरणेने आम्हाला उर्जा मिळाली असे आमचे **वीरभद्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.श्रीकांत विश्वनाथराव पाटील हंगरगेकर,सचिव मा.श्री.रणजीत शिवराज पाटील हंगरगेकर व इतर सर्व पदाधिकारी यांच्या आशीर्वादाने व प्रेरणेने हा ग्रंथ पूर्ण झाला त्याबद्दल त्यांच्याप्रती ऋण व्यक्त करत आहोत.**

त्याचबरोबर आमच्या शैक्षणिक उपक्रमात व कार्यात सातत्याने प्रोत्साहन देणारे तसेच मार्गदर्शन करणारे महाविद्यालयाचे **आदरणीय प्राचार्य डॉ.अडकिणे एस.बी.** यांच्या प्रेरणेने हा संपादित ग्रंथ पूर्णत्वास आला म्हणून आम्ही त्यांच्या ऋणातच राहू इच्छितो. तसेच प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार सर यांनी वेळातला वेळ काढून आमच्या संपादित ग्रंथासाठी प्रस्तावना दिले त्याबद्दल आम्ही सरांचे मन:पूर्वक आभारी आहोत. त्याचबरोबर महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रंथपाल, ग्रंथालयीन कर्मचारी व संगणकीय कामात सहकार्य करणारे **श्री.पताळे श्रीराम, श्री. गायकवाड नितीन आणि श्री.रनभीडकर श्रीनिवास** या सर्वांचे या कार्यास मौल्यवान सहकार्य लाभले त्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करत आहोत.

अंतरराष्ट्रीय, पियर रिव्हड रेफरीड, **स्कॉलरलि रिसर्च जर्नल फॉर इंटरडिसिप्लिनरी स्टडीज** (www.srjis.com)चे **मुख्य-संपादक**, यांनी सदरील अंक योग्य वेळेत प्रकाशित करून दिला त्याबद्दल त्यांचे व त्यांच्या सर्व सहकार्याचे मन:पूर्वक आभारी आहोत.

**डॉ. कहाळेकर चांदोबा मरीबा**
**श्री. गजमल अर्जुन बंडू**
**डॉ. मंगनाळे संतोष कल्याणराव**

## EDITORIAL BOARD

**PROF. MEGHA M. UPLANE, Ph.D.**
Professor, HOD, Department of Education & Extension, University of Pune. (M. S).

**PROF. UMMED D. SINGH, Ph. D.**
Rtd. Professor & Coordinator, M. Ed. VNSG University, Surat, Gujrat.

**PROF. ANIL KUMAR, Ph. D.**
Rtd. Professor, (NITTTR), Symla Hills, Bhopal

**PROF. SATISHCHAND BHADWAL, Ph. D.**
Rtd. Professor, Department of Education, HPU, Summer Hill, Shimla (HP)

**MAIYO K. JULIUS, Ph. D.**
Lecturer, Department of Educational Planning and Management, Masinde Muliro University of Science and Technology, Kenya.

**KANCHAN DATTA, Ph. D.**
Associate Professor,
Department of Economics, North Bengal University, WB.

**SUSHIL KUMAR THAKUR, Ph. D.**
Associate Professor & Registrar,
Lingaya's Vidyapeeth (Deemed to be University)
Faridabad (Haryana)

**PROF. MANOJ KUMAR SAXENA, Ph. D.**
SOE, Central University of Himachal Pradesh, Dharamshala, Dist. Kangra (H.P.)

**PROF. AMIT KAUTS, Ph. D.**
Dean, Dept. of Education, GNDU, Amritsar.

**DEEPA SIKAND KAUTS, Ph. D**
Associate Professor and Head GNDU, Amritsar.

**GEETA SHINDE, Ph. D**
Associate Professor, Department of Education & Extension, Savitribai Phule Pune University

**SHIREESH PAL SINGH, Ph. D**
Associate Professor, Mahatma Gandhi National Hindi Vishw Vidyalay Wardha

**PROF. MAHAPATRA B. C, Ph. D.**
FIT Group of Institution, CCS University, Meerut, (U. P)

**PROF. NAMRATA SHARMA, Ph. D.**
Director UGC, Academic Staff College,
Devi Ahilya Devi Vishwa Vidyalaya, Indore (M. P).

**DINESH KUMAR, Ph. D.**
Assistant Professor,
BMJM College of Education, Lehra Mohabat, Bhatinda, Punjab.

## INTERNATIONAL BOARD

**EWA DONESCH-JEZO, Ph. D.**
Vice-Director, Institute of Teaching Foreign Languages, Centre of Jagiellonian University, Krakow, Poland. Europe

**ALISON TAYSUM, Ph. D.**
Postgraduate Tutor EdD
School of Education, University of Leicester, 162-166 Upper New Walk, Leicester, England.

**MOHAMMAD REZA IRAVANI, Ph. D.**
Associate Professor, Department of Social work, Azad University of Khomeinishahr, Islamic Azad University, Khomeinishahr branch,
Khomeinishahr, Esfahan, Iran.

**NEMAH ABDULLAH AYASH EZZI, Ph. D.**
English Department, Faculty of Education, University of Hodeidah (Yemen)

**MD. SERAZUL ISLAM, Ph. D.**
Assistant Professor (Accounting), School of Business Bangladesh Open University,
Gazipur, -1705 Bangladesh.

**SAMSON OLUSOLA OLATUNJI, Ph. D.**
Lead City University, Ibdan Oyo State, Nigeria.

**SILAH CHERUIYOT LAGAT**, **Ph. D.**
Lecturer, PhyicalChemistry,
Masinde Muliro University of Science and Technology, Nairobi, Kenya

**JIM WATTERSTON, Ph. D.**
Director General, President
Australian Council for Education Leaders (ACEL),
ACT Education and Training
Directorate, Level 6, 220 Northbourne Ave, Braddon **.**Australia

**PHRA NARONG SRAKAEW, Ph. D.**
Lecturer, Department of Curriculm & Teaching
Faculty of Education,
Mahachulalongkornrajavidyalaya University,
Ayutthaya Province, Thailand

**MARIA ISABEL HERNÁNDEZ ROMERO**
Educational Innovation, University of Quintana Roo, Mexico.

# INDEX


| Sr. No. | Title & Author (S) Name | Page. No. |
|---|---|---|
| 1 | **म. बस्वेश्वरांचा लिंगायत धर्म आणि अनुयायांची वास्तव स्थिती**<br>*प्रा. डॉ. शंकर गड्डमवार* | 1-4 |
| 2 | **जातवर्गस्त्रीदास्यांतक चळवळीचे आद्य प्रवर्तक महात्मा बसवण्णा**<br>*डॉ. मारोती द . कसाव* | 5-9 |
| 3 | **महात्मा बसवेश्वर : समतेचा महामेरू कालातीत विचारधारा**<br>*डॉ. एस. सी. आडवितोट* | 10-11 |
| 4 | **जाती निर्मुलनाचा प्रणेता: महात्मा बसवेश्वर**<br>*डॉ.सुशीलप्रकाश चिमोरे* | 12-15 |
| 5 | **समतेचे उपासक : महात्मा बस्वेश्वर**<br>*प्रा.डॉ.तोळमारे शशिकांत शिवापा* | 16-20 |
| 6 | **जातीयतेची शृंखला तोडणारे समाज सुधारक : महात्मा बसवेश्वर**<br>*प्राचार्य डॉ. राम जाधव* | 21-24 |
| 7 | **अनुभव मंटप : महात्मा बसवेश्वरांचे अद्वितीय कार्य**<br>*प्राचार्य डॉ. सदानंद हरिबा गोणे & प्रा. डॉ. पद्माकर बालाजी गोणे* | 25-27 |
| 8 | **महात्मा बसवेश्वरांची सामाजिक चळवळ**<br>*प्रा.डॉ.विश्वनाथ गोविंदराव कंधारे* | 28-29 |
| 9 | **महात्मा बसवेश्वर यांचे सामाजिक योगदान : एक दृष्टिक्षेप**<br>*प्रा.डॉ. श्यामसुंदर पंढरीनाथ वाघमारे* | 30-33 |
| 10 | **महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांची प्रासंगिक गरज**<br>*प्रा. डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे* | 34-41 |
| 11 | **परिवर्तनवादी युगपुरुष: महात्मा बसवेश्वर**<br>*प्रा.डॉ.शंकर लेखणे* | *42-43* |
| 12 | **युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर**<br>*डॉ.माधव बसवंते* | *44-48* |
| 13 | **मध्ययुगीन भारतातील विद्रोही समाजसुधारक : महात्मा बसवेश्वर**<br>*प्रा.सचिन अशोक धेंडे* | *49-51* |

| | | |
|---|---|---|
| 14 | **सामाजीक न्याय,समता आणी बंधुभाव निर्मीतीचे आद्य प्रवर्तकः जगतज्योती महात्मा बसवेश्वर**<br>*प्रोफेसर डॉ. एकंबेकर पंचशील* | *52-57* |
| 15 | **महात्मा बसवेश्वर यांचा स्त्रीवादी दृष्टीकोन**<br>*प्रा. डॉ. विजय वारकड* | *58-60* |
| 16 | **महात्मा बसवेश्वर : कायक व दासोह मानवी जीवनाचे मुलाधार**<br>*प्राचार्य डॉ. अडकिणे एस. बी.* | *61-62* |
| 17 | **कार्यातून क्रांती घडविणारे महात्मा बसवेश्वर....**<br>*डॉ. विजया साखरे* | *63-67* |
| 18 | **महामारीत महात्मा बसवेश्वरांचा संदेश**<br>*डॉ.रवींद्र बेम्बरे* | *68-70* |
| 19 | **महात्मा बसवेश्वरांची ज्ञानाची संकल्पना – एक अभ्यास**<br>*सहा. प्रा. जगदीश जायेवार* | *71-73* |
| 20 | **बाराव्या शतकातील पहिले समाजसुधारक श्री महात्मा बसवेश्वर**<br>*डॉ. सिद्धेश्वर रा. शेटकर* | *74-76* |
| 21 | **जगत्ज्योती महात्मा बसवेश्वरांचे धर्मविषयक सामाजिक चिंतन**<br>*प्रा. डॉ. सुरेश विठ्ठलराव धनवडे* | *77-79* |
| 22 | **महात्मा बस्वेश्वरांचे कार्य आणि कर्तृत्व एक अभ्यास**<br>*डॉ आशा नरसिंगराव गिते* | *80-82* |
| 23 | प्रगतिशील समाज सुधारक : महात्मा बसवेश्वर<br>*प्रा.डॉ. मधुकर राऊत* | *83-84* |
| 24 | **MAHAATMA BASVESHWARA AND HIS SOCIAL BENEVOLENCE**<br>*Dr. Prasad A. Joshi* | *85-88* |
| 25 | **संत महात्मा बसवेश्वर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या तत्वज्ञानातील मुल्यदृष्टी**<br>*डॉ. उद्धव न. कांबळे* | *89-91* |
| 26 | **महात्मा बसवेश्वर: स्त्री मुक्ती चळवळीचे जनक**<br>*पाटील वैशाली शिवराज* | *92-94* |
| 27 | **सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा बसवेश्वर यांच्या कार्याचा आढावा**<br>*बोंबले राजू बालासाहेब* | *95-97* |

| | | |
|---|---|---|
| 28 | **महात्मा बसेश्वर यांचा "कायक वे कैलास" सिद्धांताचे महत्व**<br>*वाकडकर महेश गणपतराव* | *98-99* |
| 29 | **संत ज्ञानेश्वर व महात्मा बसवेश्वर यांचे तत्वविचार**<br>*डॉ. आहेर दिलीप किसन* | *100-104* |
| 30 | **महात्मा बसवेश्वर आणि त्यांच्या वचन साहित्याचे महत्व**<br>*प्रा. डॉ. प्रकाश डी.राठोड* | *105-106* |
| 31 | **आंतरजातीय विवाहाचे अध्य पुरस्कर्ते:: महात्मा बसवेश्वर**<br>*प्रा. उमाकांत शिवदास चलवदे* | *107-109* |
| 32 | **महात्मा बसवेश्वर: परिवर्तनीय योद्धा**<br>*डॉ.कहाळेकर सी.एम.* | *110-113* |
| 33 | **MAHATMA BASWESHWAR: FATHER OF SOCIAL REVOLUTION**<br>*Dr. Hatode Kirtiratna B.* | *114-115* |
| 34 | **समतावादी जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर**<br>*डॉ.केरबा कांबळे* | *116-117* |
| 35 | **मानवी हक्क आणि जगत्ज्योती महात्मा बसवेश्वरांचे तत्व**<br>*प्रा. डॉ. कलवले गोविंद केरबा* | *118-120* |
| 36 | **महात्मा बसवेश्वरांनी स्थापित केलेल्या लिंगायत धर्माचे तत्वज्ञान**<br>*प्रा.डॉ. बी.एन. नागलगावे* | *121-124* |
| 37 | **वचन साहित्याचा शोध व बोध**<br>*श्री.अर्जुन बंडू गजमल* | *125-128* |
| 38 | **महात्मा बसवेश्वरांचे क्रांती,परिवर्तनात्मक कार्ये**<br>*प्रा. डॉ. भगवान शंकरराव वाघमारे & प्रा.डॉ.संजय भालेराव* | *129-131* |
| 39 | **आद्य समाजसुधारक- महात्मा बसवेश्वर**<br>*प्रा. डॉ. विक्रम अभिमन्यू ओतारी* | *132-134* |
| 40 | **महात्मा बसवेश्वरांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन व कार्ये**<br>*प्रा.डॉ. शिवाजी किशनराव बल्लोरे* | *135-138* |
| 41 | **महात्मा बसवेश्वरांचे स्त्री विषयक विचार व कार्य**<br>*प्रा. डॉ. पाटील बी.टी.* | *139-140* |
| 42 | **BASAVESHWAR'S PHILOSOPHY HUMANITY ON SOCIAL REFORMS" `AND SOCIAL EQUITY**<br>*Dr. B.V. Halmandge* | *141-149* |

| | | |
|---|---|---|
| 43 | **विचारवंतांनी घडविलेले महात्मा बसवेश्वर दर्शन**<br>*प्रा.डॉ.संतोष कल्याणराव मंगनाळे* | *150-154* |
| 44 | **महात्मा बसवेश्वरांचे वचन आणि कार्याचे अध्ययन**<br>*प्रा. वडजे धनंजय बाबाराव* | *155-157* |
| 45 | **लिंगायत विमर्श और महात्मा बसवेश्वर**<br>*प्रा.डॉ.शिवसर्जन होनाजी टाले* | *158-160* |
| 46 | **सामाजिक क्रांतीचे जनक : महात्मा बसवेश्वर**<br>*प्रा. संग्राम जी. आंदे* | *161-162* |
| 47 | **स्त्री स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते महिला सबलीकरणाचे अग्रदुत - महात्मा बसवण्णा**<br>*प्रा.देशमुख गंगाधर बालाजीराव* | *163-165* |
| 48 | **बसवकल्याण : समग्र समाज क्रांतीचे केंद्र**<br>*डॉ.व्यंकट इरवंतराव पाटील* | *166-167* |
| 49 | **महात्मा बसवेश्वरांचे समाजातील शिक्षण स्थितीचे दर्शन**<br>*डॉ.कुडकेकर एन.पी.* | *168-169* |
| 50 | **धार्मिक विचाराचे योगदान - महात्मा बसवेश्वर**<br>*डॉ. डी. एन. माने* | *170-171* |
| 51 | **समतावादी विचारक बसवण्णा और सामाजिक सरोकार**<br>*प्रा. डॉ. एकलारे चंद्रकांत नरसप्पा* | *172-176* |
| 52 | **MAHATMA BASAWESHWARA AND SOCIAL EDUCATION**<br>*Kolli. Balaraju* | *177* |
| 53 | **महात्मा बसवेश्वर: आद्य थोर समाजसुधारक**<br>*प्रा.अनिल ह.गोडणारे* | *178-181* |
| 54 | **महात्मा बसवेश्वर यांचे स्त्रीविषयक योगदान**<br>*प्रा. डॉ. दंदे एस. बी.* | *182-184* |
| 55 | **महात्मा बसवेश्वर यांचे क्रांतीकारी विचार**<br>*प्रा. देवशेट्टे सुरेश मनोहरराव* | *185-188* |
| 56 | **महिलाओं की स्वतंत्रता के प्रणेता :महात्मा बासवन्ना**<br>*आसमा रिजवान बेग-सौंदलगे* | *189-190* |
| 57 | **GURU MAHATMA BASAVESHWARA: A TRUE SOCIAL REFORMER AND THE NEED OF HIS PREACHING TO THE PRESENT EDUCATIONAL SCENARIO**<br>*Dr. Sudam Laxmankumar* | *191-194* |

| | | |
|---|---|---|
| 58 | **महात्मा बसवेश्वरांचे कार्य**<br>*प्रा.डॉ. बडुरे राजू सायन्ना* | *195-198* |
| 59 | **सामाजिक क्रांतीचे अग्रदूत - महात्मा बसवेश्वर**<br>*डॉ. नारायण शिवशेट्टे* | *199-204* |
| 60 | **MAHATMA BASAVESHWARA VISHWAGURU - A RAY OF HOPE FOR MANKIND GROPING IN THE DARK**<br>*Shri Ganjare Bhalchandra Uttamrao* | *205-208* |
| 61 | **महात्मा बसवन्ना के अच्छे दिन**<br>*प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव* | *209-211* |
| 62 | **वीरांगना रानी चेन्नम्मा**<br>*प्रा डॉं अभिमन्यु नरसिंगराव पाटील* | *212-214* |
| 63 | **म.बसवेश्वर : कल्याणकारी राज्य एक दृष्टिकोण**<br>*प्रा. डॉ. चिलर्गे बी.व्ही.* | *215-217* |
| 64 | **महात्मा बसवेश्वरांचे आर्थिक विचार**<br>*श्री वायपणकर जी.एम.* | *218-219* |
| 65 | **महात्मा बसवेश्वर : एक अर्थतज्ञ**<br>*प्रा. रवींद्र विनायकराव सोनूले* | *220-221* |
| 66 | **महात्मा बसवेश्वर एक संत व समाज सुधारक**<br>*डॉ.गित्ते कविता नरसिंगराव( कराड) & डॉ.प्रा.गित्ते आशा नरसिंगराव* | *222-223* |
| 67 | **महात्मा बसवेश्वरांचे आर्थिक विचार**<br>*प्रा. केंद्रे बी. एस.* | *224-227* |
| 68 | **महात्मा बसवेश्वर: एक समग्र चिंतन**<br>*प्रा.कांबळे आर.जी.* | *228-233* |
| 69 | **सामाजिक सद्भावना के अग्रदूत - महात्मा बसवेश्वर**<br>*डॉ. लुटे मारोती भारतराव* | *234-237* |
| 70 | **आद्य समाज सुधारक, कर्माचे श्रेष्ठत्व सांगणारे बसव**<br>*प्रा. डॉ. गायकवाड एस.बी.* | *238-239* |
| 71 | **समतेचे पुरस्कर्ते : महात्मा बसवेश्वर**<br>*प्रा. स्वामी एस. जी.* | *240-241* |
| 72 | **महात्मा बस्वेश्वर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर**<br>*प्रा. शिवकुमार बाबुराव गुडमे* | *242-243* |

| | | |
|---|---|---|
| 73 | **महात्मा बसवेश्वर एवं संत कबीर की भक्ति भावना का तुलनात्मक अध्ययन**<br>*डॉ. मुकुंद कवडे* | *244-246* |
| 74 | **महात्मा बसवेश्वर यांचे धार्मिक विचार ;एक अभ्यास"**<br>*प्रा.करुणा विठ्ठलराव जोंधळे ( वाघमारे)* | *247-250* |
| 75 | **महात्मा बसवेश्वरांचे सामाजिक न्यायासंबंधी विचार व कार्य**<br>*प्रा.डॉ.आर.बी.शेटे* | *251-254* |
| 76 | **महात्मा बसवेश्वर यांचे मौलिक कार्य व संस्कृत साहित्यातील श्लोक**<br>*डॉ.गणंजय यज्ञेश्वरराव कहाळेकर* | *255-257* |
| 77 | **महात्मा बसवेश्वर आणि मानवतावादी विचारधारा**<br>*प्रा.डॉ. सौ.सुनिता सिद्रामप्पा बिरादार* | *258-260* |
| 78 | **महात्मा बसवेश्वर आणि तत्वज्ञान**<br>*प्रा.डॉ. राजेश्वर वैजनाथराव पाटील* | *261-263* |
| 79 | **महात्मा बसवेश्वरांचा कायक सिद्धांत**<br>*डॉ. शंकर हणमंतराव कल्याणे* | *264-266* |
| 80 | **महात्मा बसवेश्वर यांच्या कार्यांचा एक अभ्यास**<br>*प्रा. गजानन आनंदराव गाडले* | *267-272* |
| 81 | म. बसवेश्वर के वचनों में सामाजिक दर्शन<br>*प्रा.डॉ. अशोक तुकाराम जाधव* | *273-276* |
| 82 | **MAHATMA BASVESHWARA: LITERACY RENAISSANCE**<br>*Dr. Umakant Padamwar* **&** *Dr. Prakash D. Rathod* | *277-278* |
| 83 | **महात्मा बसवेश्वरांच्या वचनातील मानवतावाद**<br>*म. ई. तंगावार* | *279-280* |
| 84 | समतासूर्य महात्मा बसवेश्वर<br>*प्रा. डॉ.संगीता उप्पे* | *281-282* |
| 85 | **महात्मा बसवेश्वर एक समतावादी महापुरुष : एक अभ्यास**<br>*प्रा. सूनोदकुमार पंढरीनाथ वाघमारे* | *283-286* |
| 86 | **क्रांतिकारी युगप्रवर्तक बसवण्णा : एक अध्ययन**<br>*डॉ शंकर गंगाधर शिवशेट्टे* | *287-289* |
| 87 | **महात्मा बसवेश्वरांचे नीतीतत्वावरील विचार**<br>*डॉ. वसंत आनंदराव पवळे* | *290-293* |

| | | |
|---|---|---|
| 88 | **महात्मा बसवेश्वर और भगवान महावीर के विचारों की साम्यता**<br>*प्रा.डॉ.महावीर सुरेशचंद उदगीरकर* | *294-296* |
| 89 | **बाराव्या शतकातील सामाजिक क्रांतीचे उदगाते : जगतज्योती महात्मा बसवेश्वर**<br>*प्रा. डॉ. विजयकुमार शिवदास ढोले* | *297-301* |
| 90 | **महात्मा बसवेश्वर : काही आयाम**<br>*प्रा ज्ञानेश्वर भोसले* | *302-305* |
| 91 | **महात्मा बसवेश्वरांचे सामाजिक कार्य**<br>*प्रा.मनोज चंद्रकांत साखरे* | *306-309* |
| 92 | **महात्मा बसवेश्वर आणि मानसिक समतोल**<br>*प्रा. डॉ. जयदीप गोविंदराव कहाळेकर* | *310-312* |
| 93 | **महात्मा बसवेश्वरांचे समतावादी तत्त्वज्ञान**<br>*प्रा. डॉ. माधव नरहरी कांबळे* | *313-315* |
| 94 | **बसवप्रणीत शिक्षण पद्धती**<br>*राजू ब. जुबरे* | *316-321* |
| 95 | **बसवण्णा : दक्षिण भारताचा बुद्ध**<br>*डॉ. एम. एम. कलबुर्गी & राजू ब. जुबरे* | *322-323* |
| 96 | **कर्म हेच श्रेष्ठ सांगणारे महात्मा बसवेश्वर**<br>*साक्षी उद्धवराव कराड* | *324-326* |

---

## म. बस्वेश्वरांचा लिंगायत धर्म आणि अनुयायांची वास्तव स्थिती

**प्रा. डॉ. शंकर गड्डमवार**

*शरचंद्र महाविद्यालय, नायगांव बा., जि. नांदेड*

---

भारताच्या इतिहासामध्ये अनेक क्रांतीकारक, समाजसुधारक आणि युगपुरुष होऊन गेले. या सर्वच महामानवांनी या देशातल्या विषमतावादी व्यवस्थेवर प्रहार करुन समता प्रस्थापित करण्याचे कार्य केले त्यासाठी जनजागृती करण्याचे कार्य केले त्यामुळे अशा सर्वांना वेगवेगळया पध्दतीने त्रास देण्याचे कार्य इथल्या विषम व्यवस्थेच्या समर्थकांनी केले आहे. यामध्ये इ.स पूर्व काळातील चार्वाक, महात्मा गौतमबुध्द आणि इसवीसनानंतर महात्मा बस्वेश्वर, छ. शिवाजी महाराज, संत तुकाराम महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह शेकडो समाज सुधारकांना त्रास दिला तर कांहीना जीवानिशी मारुन त्यांचा वेगळाच इतिहास निर्माण केला आहे. तरी देखील समाज सुधारकांनी आपले पवित्र कार्य कधीच थांबवले नाही. उलट जे इतिहासामध्ये अजरामर झाले ते पुढच्या पिढीसाठी सतत प्रेरणा देणारे ठरले पण विषम व्यवस्थेला समर्थन देणाऱ्याचे नाव मात्र कुठेच दिसत नाही तर त्यांच्याबद्दल समाजमनामध्ये घृणा निर्माण झाली आहे. महात्मा बस्वेश्वर हे बाराव्या शतकाच्या सुरुवातीस म्हणजे इ.स. ११०५ च्या अक्षय तृतीयाच्या मुहूर्तावर कर्नाटक राज्यातील बागेवाडी जि. विजापूर या गावी मदिराज व मादलांबिका यांच्यापोटी जन्मास आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मतारखेप्रमाणेच महात्मा बसवेशरांच्या जन्मतारखेविषयी देखील बरेच मतभेद झाले होते पण इतिहास संशोधक डॉ. बी.जी. सावंत यांनी इ.स. ११०५ हेच वर्षे संशोधनाअंती निश्चित केले आहे. महात्मा बस्वेशरांची सर्वप्रथम जयंती कर्नाटकातील दावणगेरे येथे हर्डेकर मंजप्पा यांनी साजरी केली.[१]

महात्मा बस्वेश्वर यांनी समाजातील गरीबी, विषमता दूर करुन आर्थिक समृध्दता निर्माण करण्यासाठी **"ज ायज वे जै लास"** आणि **दासोह** अशा दोन क्रांतीकारक संकल्पना दिल्या. मनापासून केलेले प्रत्येक काम हीच खरी शिवउपासना होय. शारीरिक श्रम वा व्यवसाय म्हणजेच कैलास (स्वर्ग) होय. कायकातच देव आहे. श्रम करुन आलेल्या घामाने हदयावरील इष्टलिंग भिजला तर तो सर्व नद्याच्या जलाभिषेकापेक्षाही श्रेष्ठ आहे. श्रम प्रतिष्ठेबरोबरच गरजेनुसार संपतीची विभागणी केले पाहिजे आपण कमावलेले धन केवळ स्वतः पुरते न वापरता त्याचा समाजासाठीही वापर करावा. गरजेपेक्षा अधिक असलेले धन, सपंती हे माझे नाही ते समाजाचे आहे ही वृत्ती म्हणजेच दासोह होय. **दासोह** म्हणजे मी समाजाचा दास, सेवक आहे असे बसवेश्वराचे वचन आहे यावरुन बस्वेश्वरांची विचारसरणी ही समतावादी आणि समाजवादी होती हे सिध्द होते.[२]

**महात्मा बस्वेश्वराचे धाडसी निर्णय :-** महात्मा बस्वेश्वरांनी त्याच्या कालखंडामध्ये घेतलेला निर्णय हे १२ व्या शतकातील समाजव्यवस्थेला हादरवून टाकणारे होते. त्या काळात स्त्रीला शुद्र, हीन आणि बहिष्कृत समजले जायचे. त्यांच्यावर विविध सामाजिक व धार्मिक बंधने होती पण अशाही परिस्थितीमध्ये बस्वेश्वरांनी स्त्रीयांना सामाजिक, धार्मिक व राजकीय हक्क प्रदान केले, जातीपाती मानणाऱ्या काळामध्ये आंतरजातीय विवाहाचा विचारच मनाला स्पर्श करीत नाही पण बस्वेश्वरांनी ब्राम्हण जातीच्या मधुवय्या या व्यक्तीची मुलगी आणि चांभार जातीचा हरळय्या यांच्या मुलाशी लग्न लावुन पहिला आंतरजातीय विवाह लावण्यात आला. याचाच अर्थ बस्वेश्वरांच्या विचारधारेतला जो लिगांयत धर्म होता त्यामध्ये जातीव्यवस्थेला बिल्कुल थारा नाही, कोणताही भेदाभेद नाही. व्यवस्थेने अस्पृश्य ठरविलेल्या जातीच्या घरी जावुन त्यांनी जेवण करीत असत. म. बस्वेश्वरांचा बाल विवाहास विरोध होता तर विधवा पुर्नविवाहास सम्मती होती. या निर्णयामुळे अनेक विधवांना जगण्याची नवीन संजीवनी मिळाली. म. बस्वेश्वरांनी निर्माज ज़े लेला अनुभवमंटप ही जगातली पहिली धार्मिक संसद होती. या मंटपामध्ये चर्चा करण्यासाठी पुरुषाबरोबर स्त्रीयानांही भाग घेण्याची परवानगी होती. पुरुषाप्रमाणे लिंग धारण करण्याचा अधिकारही त्यांना देण्यात आला. अशा प्रकारच्या धाडसी निर्णयामुळे म. बस्वेश्वरांच्या सानिध्यामध्ये सर्वच जातीची माणसे आपली जात नष्ट करुन आकर्षित झाली होती ही भारतातील सर्वात मोठी एकात्मता निर्माज करण्याची वहिवाट होती पण पुढच्या काळात मनुवादी व्यवस्थेने भारतामध्ये विषम व्यवस्था निर्माण करज्यामध्ये यशस्वी झाले हे भारताचे फार मोठे दुर्दैव आहे.[३]

**शरण चळवळीमध्ये बंधुत्वाची जोपास-ना :-** म. बस्वेश्वरांनी स्थापण केलेल्या शरण चळवळीमध्ये सर्वच जातीपातीची माणसे व स्त्रीया सहभागी होत्या. पुरुषांना शरण तर स्त्रीयांना शरणी अशी नावे दिली जायची, बस्वेश्वरांनी या चळवळीचे रुपांतर लिंगायत धर्मामध्ये केले. ज्यांनी ज्यांनी या धर्माध्ये धर्मांतरीत झाले त्यांनी त्यांची पुर्वाश्रमीची जात नष्ट केली. त्या सर्वामध्ये रोटीबेटीचा व्यवहार सुरु झाला. याचाच अर्थ म. बसवण्णाच्या शरण चळवळीरुपी झाडाला समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, विवेक, कायक, दासोह याची फळे आली होती. चातुर्वर्ण्य व्यवस्थेने अतिशुध्द्र व कनिष्ठ समजलेल्या जातीतील व्यक्ती शरण चळवळीचे आधारस्तंभ झाले. मातंग चेन्नय्या, महार, शिवनागीमय्या, ढोर कक्कय्या, नुलीय चंदय्या, कुंभार गुंडय्या, चांभार, हरळय्या, बुरुड केतय्या, मादार धुळय्या, जि न्नरी बोमय्या, तेली कन्नप्पा, बहुरुपी चौडय्या, तुरुंगावी रामन्ना, वैद्य संगण्णा, शरण सुरय्या, शरण उरलिंगदेव हे सर्वजन वेगवेगळया जातीतील व्यक्ती होत्या त्यांना म. बस्वेश्वरांनी शरण चळवळीमध्ये आणले. याशिवाय ज्या स्त्रीयांना समाजामध्ये आजही अतिशय हीन भावनेने पाहिले जाते. वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रीयानाही या चळवळीमध्ये सहभाग करुन घेण्यात आले. ज्यामध्ये सुळे सक्कव्वे, सुळे पदमलादेवी, सुळे चामलदेवी, ह्या होत्या. या स्त्रीया आपला व्यवसाय सोडून देऊन नितीमान स्त्रीया बनल्या. तसेच चोर, लुटारु, डाकु, दरोडेखोर असणाऱ्या व्यक्ती देखील या चळवळीच्या पायाचे दगड बनले. या सर्वांना म. बस्वेश्वरांनी सदाचारी बनविले. त्यांना कष्टाचे महत्व पटवून दिले त्यामुळे दिवसभर कष्ट करुन संध्याकाळी शरण शरणी अनुभव मंटपामध्ये एकत्र येऊन विचारविनिमय, चर्चा करीत असत. या शरणांच्या स्वानुभवातून वचने जन्माला आली तीच वचने भारतीय संविधानाचा गाभा बनली आहेत. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय ही जी मुल्ये आहेत ती बस्वेश्वरांच्या वचन चळवळीची आधारभूत मुल्ये होती. महात्मा बस्वेश्वर म्हणत असत की, "मंदिराचा कळस बनून कावळयाच्या विष्ठेने अपवित्र होण्यापेक्षा शरणाच्या पायातील पादुका होऊन सेवा करण्यामध्ये आत्मसन्मान आहे." हे विचार ऐकताच कितिही गर्विष्ठ असलेला व्यक्ती नतमस्तक होतो ही म. बस्वेश्वरांच्या विचाराची ताकत होय. वरील सर्व विचारावरुन असे वाटते की, आजचा लिंगायत विचाराचा व्यक्ती म. बस्वेशरांच्या विचाराचा झालाच नाही. ते अजूनही शरण शरणी झ ाालेलेच नाहीत. आज लिंगायत ही एक हिंदु धर्मातील एक जात म्हणून अस्तित्वात आहे त्यामुळे लिंगायत जातीतील लोकांवर हिंदु विचार सरणीचाच फार मोठा पगडा आहे. त्यामुळे आपोआपच तो हिंदू धर्मातील सर्वच चालीरिती पाळत आहे ज्या म. बस्वेश्वरांनी १२ व्या शतकामध्येच नाकारलेल्या आहेत. म. बस्वेश्वरांनी जी विचारधारा सांगितलेली आहे त्यामध्ये जातीयता, भेदाभेद, अंधश्रध्दा, कर्मकांड, उपासतापास, स्वर्ग, नरक, आत्मा परमात्मा, पुनर्जन्म, यज्ञ, होम हवन, व्रत वैकल्ये अशा सर्व गोष्टींना अव्हेरण्यात आले आहे ही सर्व थोतांडं आहेत म्हणून त्यावर चौफेर टिकाही केली आहे पण मुळामध्ये आजच्या लिंगायत लोकांना या सर्व बाबीचे प्रबोधन करण्यात आले नाही. जात व्यवस्थेमध्ये उच्च जात म्हणून गणली जात असल्यामुळे त्यांना या देशातील विषम व्यवस्थेचा फटका बसलेला नाही, पण येणाऱ्या अल्प काळामध्ये बस्वेश्वरांच्या विचाराचे शरण शरणीच या देशामध्ये लिंगायत धर्माची मान्यता मिळवून विषमतावादी हिंदु धर्मापासून फारकत घेऊन बस्वेश्वरांच्या विचारातील समानतेवर आधारीत समान व्यवस्था निर्माण करेल असा विश्वास वाटतो.[४]

**लिंगायत धर्म आणि वारकरी संप्रदाय एकच :-**लिंगायत धर्मातील विचारधारा आणि वारकरी संप्रदायातील विचारधारा यामध्ये साम्य आहे कारण या दोन्ही विचारधाराचा आधार स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्यायाचा असून कर्मकांड, अंधश्रध्दा, पाप, पूज्य, स्वर्ज, नरक, आत्मा परमात्मा, देव, भूत, जपतप, होमहवन या थोतांड बाबीना अव्हेरणारा आहे. महात्मा बस्वेश्वरांचे वचन साहित्य हे अनुभवाधिष्टीत साहित्य आहे. त्यांनी वेदप्रामान्य, पुराण ग्रंथ प्रामाण्य नाकारले आहे. त्यांनी एक लाख शहाण्णव हजार वचनांची निर्मिती जे ली आहे. दोन्ही साहित्याची नाळ कृषी संस्कृतीशी जोडलेली आहे. या दोन्ही साहित्यकारांनी ऋषी संस्कृतीचे पाच घटक म्हणजे आर्य, वेद, संस्कृत, ब्राम्हण आणि यज्ञ हे नाकारलेले आहे पण मनुवादी साहित्यकारांनी हे समजू दिले नाही. महात्मा बसववण्णांनी आणि वारकरी संतानी देव मंदिरात न शोधता प्राणीमात्राच्या अंतरंगात शोधला आहे. आत्मभानाची आणि आत्मतेजाची स्वच्छ जाणीव म्हणजेच विवेक होय. हाच या दोन्ही विचाराचे प्रतिक आहे. महात्मा बसवण्णा आपल्या एका वचनात म्हणतात.

दगडाचा देव, देव नव्हे। मातीचा देव, देव नव्हे
वृक्ष देव, देव नाही । सेतू बंध रामेश्वर।।
अन् इतर क्षेत्राचा । देव, देव नव्हे
देव तुमच्या अंतर्यामी। आत्मदेव जाणनेची थोर।।
हे कुडल संगमेश्वर।।

तसेच वारकरी संप्रदायाचे महान विचारक संत नामदेवदेखील देवा बद्दलची भूमिका स्पष्ट करतांना म्हणतात......

दगडाचा देव मानिला ईश्वर । परि तो साचार देव भिन्न।।

दगडाचा देव इच्छा पुरवित । तरी का भंगत आघाताने ।।

पाषाण देवाची करती जे भक्ती । सर्वस्वी मुकती मुढपणे ।।

या संत नामदेवाच्या रचनेतून दगडाच्या देवाची संकल्पनाच नाकारली आहे. महात्मा बसवण्णानी शेवटी एक वाक्य म्हणतात त्यातून देव कशात आहे हे समजून हयायला हवे "देव आहे अंतर्यामी । कारे फिरती तीर्थग्रामी।।" या वचनावरुन आणि वारकरी संप्रदायाच्या रचनेवरुन असा अर्थ निघतो की, या दोन्हीचा अर्थ एकच आहे तपशिल वेगवेगळे असतील पण तत्व मात्र एकच आहे. सत्य, दया, क्षमा आणि शांती हे लिंगायत धर्माचे आणि वारकरी संप्रदायाचे आधिष्ठान आहे.[५]

**लिंगायत व वीरशैव यांच्यात फरक आहे का ? :-** सर्वसामान्य जनतेच्या मनामध्ये लिंगायत व वीरशैव हे दोन्ही शब्द आणि त्याची विचारधारा एकच आहे तसेच हे दोन्ही शब्द एकाच धर्माची आहेत असा समज आहे. पण हे पुर्णपणे चुकीचे व असंबंध आहे. या दोन्हीमध्ये अनेक बाबतीत फरक तर आहेच शिवाय ते एकमेकांच्या विरुध्द असल्याचेही दिसून येते. लिंगायत धर्म हा समतेवर आधारित आहे तर वीरशैव चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर विश्वास ठेवणारी विचारधारा आहे. लिंगायत धर्माचे अनुयायी संस्थापक म्हणून महात्मा बस्वेश्वरावर दृढ विश्वास ठेवतात. त्यांना धर्म गुरु मानतात तर वीरशैवी हे म. बसवण्णांना धर्मगुरु मानत नाहीत. तर भगवान शिवाला निर्माता मानतात, लिंगायत धर्मामध्ये जाती व्यवस्थेला अजिबात थारा नाही हा धर्म ज्यांनी स्विकारतो त्या व्यक्तीची पूर्वाश्रमीची जात नष्ट होते. आणि सर्व समान होतात तर वीरशैवामध्ये पुर्वाश्रमीच्या जाती जशास तशा राहतात कारण त्यांना चातुर्वर्ण्य व्यवस्था मान्य आहे. लिंगायत हे पूर्णपणे शाकाहारी आहेत तर वीरशैवातील कांही जाती ह्या मांसाहारी आहेत. लिंगायत हे इष्टलिंगाची पूजा करतात तर वीरशैवी हे स्थावर लिंगाची पूजा करतात. लिंगायत हे वचन साहित्यालाच धार्मिक संविधान मानतात तर वीरशैवी शिवपुराण हेच आधार ग्रंथ मानतात. या कांही बाबीवरुन लिंगायत व वीरशैव यामध्ये बऱ्याच बाबतीत फरक असल्याचे दिसून येते. सध्या परिस्थितीमध्ये जे लोक म. बस्वेश्वरांच्या लिगायत विचारसरणीचे आहेत त्यांच्यामध्ये ही लिंगायत वचने रुजली नाहीत त्याला तशा प्रकारची कारणेदेखील कारणीभूत आहेत. गो.स. चनबसवन्ना यांनी बसवण्णाचे स्थान कमी करण्यासाठी लिंगायत धर्मामध्ये लिंजी ब्राम्हण आणि लिंगीशुद्र असे विभाग करुन उच्चनिच भेद निर्माण करण्याच्या धुर्त विचारामुळे शितलीकृत शिवाचारामध्ये असलेले वीरशैव पद कृत्रिमपणे समाजामध्ये व साहित्यात घुसऊन अखिल भारत वीरशैव महासभा स्थापक झालेले हानजल ऊमारस्वामी व पंचपीठवाल्यांनी लिंगायत धर्माचा इतिहास, समाज साहित्य विकृत केले. हानगल कुमारस्वामीनी व पंचपीठवाल्यांनी लिंगायत धर्माचा इतिहास, समाज साहित्य विकृत केले. हानगल कुमारस्वामी यांनी अखिल भारत वीरशैव महासभा स्थापण केल्यानंतर. इ.स. १९०४ मध्ये धारवाड येथे पहिले अधिवेशन भरविण्यात आले त्यावेळी एक निर्णय घेण्यात आला की, हिंदु समाजव्यवस्थेमध्ये आम्ही सुध्दा ब्राम्हणांच्या समान आहोत.[६]

वरील सर्व बाबींचा विचार केल्यानंतर असे दिसून येते की, महात्मा बस्वेश्वरांनी स्थापण केलेला लिंगायत धर्म हा बौध्द, धम्म, ख्रिश्चनधर्म, व इस्लाम धर्मातील अनेक तत्वाशी समरस होणारा आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, जातीनिर्मुलन, अंधश्रध्दा निर्मुलन, स्त्री उध्दार आणि न्याय हा त्यांच्या विचारांचा पाया आहे. हे म. बस्वेश्वरांनी बाराव्य शतकामध्ये केवळ सांगितले नाही तर प्रत्यक्षामध्ये करुन दाखविले आज एकविसावे शतक चालू आहे तरीदेखिल बाराव्या शतकातील शरणशरणी ज्या विचाराने अनुयायी बनले त्याप्रमाणे आज लिंगायत विचारधारा माणणाऱ्यांनी अनुयायी बनू शकले नाहीत. त्यांच्यावर हिंदु धर्म संस्कृतीचा पगडा मोठ्या प्रमाणामध्ये बसलेला आहे. त्याचबरोबर अनेक लेखकांनी लिंगायत धर्माचा खरा ईतिहास लिखानाच्या माध्यमातून समाजासमोर आणला नाही. कांही लेखकांनी हिंदु धर्माच्या चालीरिती, रुंदी, परंपरा घुसडण्यात यशस्वी झाल्या त्यामुळे लिंगायत हा स्वतंत्र धर्म असूनही तो हिंदु धर्माचाच एक अविभाज्य भाग बनून जात व्यवस्थेमध्ये अडकला आहे. लिंगायत धर्माचा प्रसार व प्रचार करणारे कांही महाराज जे मठाचे मठाधिपती आहेत त्यांनाही स्वतःच्या स्वार्थासाठी लिंगायत धर्म असूनही लिंगडेर ही अनु. जातीतील जात आहे म्हणून निवडणूक लढवतात शिवाय महाराष्ट्रात अनेक राजकारणी लिंगडेर या जातीचे प्रमाणपत्र काढून जात व्यवस्थेशी जोडल्या गेले त्यामुळेही लिंगायत धर्म आणि त्याची स्वतंत्र विचारधारा आहे हे सांगण्यामध्ये अनुयायी अपयशी ठरले त्यामुळे आजच्या लिंगायत लोकांची अवस्था धर्म आहे की जात आहे या संभ्रमामध्ये आहे. ज्या विचारधरेमध्ये देव दैत्य पूण्य, पाप, वृतवैकल्ये, अंधश्रध्दा, जातीभेद या बाबीला थारा नसतानाही लिंगायत विचाराचा प्रसार व प्रचार योग्य पध्दतीने झाला नसल्यामुळे त्यांच्यामध्येही हिंदु विचारसरणीच

विकसित होत गेले त्यामुळे महात्मा बस्वेश्वरांचे खरे विचार रुजले नाहीत. अलीकडच्या कांही वर्षामध्ये लिंगायत धर्माला स्वतंत्र धर्म म्हणून मान्यता देण्यात यावी यासाठी आंदोलने करण्यात आली. कर्नाटकामध्ये कॉग्रेसच्या सरकारनी राज्याच्या वतीने मंजूरी देऊन केंद्र सरकारकडे पाठविले आहे. पण केंद्रातील सध्याचे (२०२०) भाजप सरकार हे लिंगायतांना हिंदूचाच अविभाज्य भाग समजत असल्यामुळे आणि मोठ्या प्रमाणामध्ये लिंगायत समाजाचे राजकीय लोक भाजपाचे समर्थक असल्यामुळे ते जरी सतेमध्ये असले तरी त्यांच्याच सतेच्या विरुध्द बोलण्याची हिमंत करतील अशी अपेक्षाच नाही कारण भाजपच्या लोकांना माहित आहे की, लिंगायत समाजाचे बहुतांशी लोक हे हिंदु विचारधारेचे समर्थक आहेत. त्यामुळे लिंगायत धर्मास स्वतंत्र धर्माचा दर्जा केंद्रातील सरकार तात्काळ देईल असे वाटत नाही. भविष्यात स्वतंत्र धर्माचा दर्जा मिळाल्यास महात्मा बस्वेश्वरांचा मानवतावादी धर्म सध्याच्या लिंगायत समाजामध्ये रुजल्या गेल्यास म. बसवण्णाच्या स्वप्नातील समतावादी समाज निर्माण होण्यास मदत होईल आणि संपूर्ण भारतामध्ये समतेची विचारधारा रुजल्या जाईल. ही भारतासाठी मोठी पर्वणी ठरेल.

**संदर्भसूची :-**

*विकिपिडीया - नितीन पाटील यांचा ९१२ वी जयंती विशेष लेख - दि. २८ एप्रिल २०१७.*

*ज्ि त्ता*

*म. बस्वेश्वर आद्य भारतीय समाज सुधारक-प्रमोद शेंडे याचा लेख - थिंक महाराष्ट्र दि. १८.०७.२०१५.*

*०४) विकिपिडीया-बस्वेश्वर, १२ व्या शतकातील हिंदु तत्वज्ञ.*

*लिंगायत धर्म आणि वारकरी संताचे आंदोलन-प्रा. गंगाधर गिते-संतवाणी सदर-मुलनिवासी न ायज्, दि. १३.०८.२०११ पा.ञ्. २*

*लिंगायत हिंदु नव्हेत-महाजगदगुरुमाता महादेवी-मराठी भाषांतर-मल्लीनाथ ऐनापूरे, विश्वकल्याण मिशन, बसव मंटप, बेंगलोर*

---

**जातवर्गस्त्रीदास्यांतक चळवळीचे आद्य प्रवर्तक महात्मा बसवण्णा**

**डॉ. मारोती द . कसाब**
*मराठी विभाग महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि.लातूर*

---

माणूस हा मूळातच संघर्षशील प्राणी आहे. उत्पत्तीपासूनच त्याचा स्वतःशी आणि भोवतालच्या निसर्गाशी, परिस्थितीशी सतत संघर्ष सुरू आहे. कालौघात त्याने टोळ्या निर्माण केल्या आणि त्या संघर्षातून पुढे टोळी युद्धेही झाली. अनेकदा पूर्ण संहार होता, होता मानव जात वाचली, ती मानवातल्या काही विचार करणाऱ्या माणसांमुळे ! अन्यथा जिथे डायनासोरसारखे महाकाय प्राणी काळाच्या उदरात गडप झाले, तिथे माणसाची काय कथा? अतितटीचे संघर्ष झाले, पण त्यातूनही माणूस जात जिवंत राहिली. मात्र त्यामुळे माणसातला उन्माद वाढीस लागला. एका टोळीने दुसऱ्या टोळीवर विजय मिळविल्यामुळे विजयी टोळी प्रमुखाने स्वतःचे वर्चस्व कायम राहावे यासाठी काही तरतुदी केल्या आणि त्यातूनच संस्कृती, धर्म, साहित्य आदी बाबींचा उदय झाला. वर्चस्वाच्या राजकारणातून संस्कृती, धर्म, साहित्य आदी बाबी पद्धतशीरपणे जेत्या वर्गाचे जीतांवर प्रभुत्व राहण्यासाठी निर्माण केल्या गेल्या. त्यातही जेत्यांनी विजयातून आलेल्या उन्मादामुळे स्वतःची, स्वतःच्या फायद्याची संस्कृती निर्माण केली आणि रूजवली. संस्कृती ही धर्मापेक्षाही मोठी असते. कदाचित व्यक्ती धर्म बंधनातून मुक्त होऊ शकते; मात्र संस्कृतीच्या कचाट्यातून तिची सुटका लवकर होऊ शकत नाही, कारण ती हजारो वर्षांचे संस्कार घेऊन व्यक्तीच्या नसानसातून रक्ताबरोबर वाहात असते. धर्म आणि संस्कृतीतील फरक स्पष्ट करताना ज्येष्ठ तुलनाकार डॉ.आनंद पाटील म्हणतात, 'संस्कृती हा महासागर आहे. धर्म हा एक तलाव म्हणावा. साहित्य म्हणजे संस्कृतीच्या महासागराच्या किनाऱ्यावरील चिमूटभर वाळू आहे.'[१] वर्चस्ववाद्यांनी म्हणूनच संस्कृतीला जीवापाड जपण्याचा प्रयत्न ॽ लेला दिसून येतो. संस्कृती हे सत्तासंवर्धनाचे आणि शोषणाचे साधन म्हणून उपयोगात आणले गेले. तिच्यावर धर्माचा मुलामा चढवून सामान्यांना नागवल्या गेल्याची उदाहरणे जगभर सापडतात. युरोपात पोप हे धर्मगुरू होते. तेही स्वतःला भूदेव, देवदूत समजत असत आणि सामान्य माणसांना मेल्यानंतर स्वर्गात जाण्यासाठीची लेखी परवानगी (हॉलतिकीट) देत असत. अर्थातच पैसे घेऊन स्वर्ग प्रवेशाची पावती देत असत. युरोपीय विचारवतांनी नंतर ही पोपशाही ज्ञानाच्या जोरावर संपवली. तेव्हा कुठे युरोपीय राष्ट्रे जगभर आपला प्रभाव निर्माण करू शॽ ली.

भारतातही सांस्कृतिक दहशतवाद बाहेरूनच आला. मूळात भारतीय सिंधू संस्कृती ही अत्यंत प्रगत आणि मानवतावादी, समतावादी, श्रम करणारांची 'श्रमणसंस्कृती' होती. मात्र बाहेरून आलेल्या आक्रमक आर्यांनी अनेक हल्ले करून सिंधू संस्कृती नष्ट केली आणि आपली वैदिक संस्कृती भारतीयांच्या मनात रूजवली. परिणामी भारतातही जातवर्गस्त्रीदास्य निर्माण झाले. माजसाला माणसाची गुलामी करावी लागली. भारतात बुद्धपूर्व काळापासून भेदभावनीती अवलंबली गेल्याचा दाखला महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी दिला आहे. आर्यांपूर्वीही भारतात अनेक वंशाचे परकीय लोक आले. मात्र ते महत्त्वाकांक्षी नव्हते. आर्य आले आणि त्यांनी लोकांना त्यांच्या संपत्तीसह जिंकून घेतले. त्यांच्या विजयी उन्मादामुळे सिंधू संस्कृती लयास गेली. भेदभाव करणारे आर्य स्वतःला सर्वश्रेष्ठ समजू लागले. त्यांनी चार वर्ण निर्माण केले. बुद्धकाळात ही वर्णयवस्था स्थीर झाली होती. महर्षी शिंदे लिहितात, 'स्वतः बुद्ध आणि महावीर तसेच त्यांचे अनुयायी क्षत्रिय वर्णाला सर्वश्रेष्ठ मानीत आणि ब्राह्मण वर्गास त्यांचे आश्रीत समजत. पुढे जी ब्राह्मणी संस्कृतीची पुराणे झाली, त्यातही रामकृष्ण इत्यादी अवतारी पुरुष आणि जनकादी तत्त्वद्रष्टे हे क्षत्रीयच होते. म्हणून क्षत्रियांविषयीची पूज्यबुद्धी ब्राह्मणांमध्येही पुढे रूढ झालेली आढळते. तथापि ब्राह्मण आणि क्षत्रिय यांचा जातिमत्सरविषयक तंटा बुद्धाच्या पूर्वीच विकोपाला गेला होता, हे पाली आणि संस्कृत वाङ्मयावरुन उघड होते.'[२] महर्षी म्हणतात त्याप्रमाणे आर्य-क्षत्रिय संघर्षात पुढे आर्यांचाच विजय झाला आणि ब्राह्मणी संस्कृतीने वर्चस्व निर्माण केले. विशेषतः ब्राह्मणी धर्माने जन्माधिष्ठित वर्चस्वाचे स्तोम माजवून भारतीय समाजात कायमची फूट पाडली. 'वर्जा-नाम ब्राह्मजो जुरू:' म्हणजे सर्व वर्णांचा ब्राह्मण हाच गुरू, अशी समजून करून देण्यात आली.

भारतीय जनमानसावर वर्चस्व निर्माण करण्याच्या हेतूने अनेक ग्रंथ रचण्यात आले. बळीसारख्या कुणब्यांच्या राजाला कपटाने पाताळात घातले गेले. ब्राह्मणांचा नेता परशुरामाने एकवीस वेळा पृथ्वी 'नि:जत्रीय' केल्याच्या कहाण्या रचण्यात आल्या. '-न

स्त्री स्वातंत्र्यम् अर्हती' असे श्लोक रचून स्त्री शुद्रातिशूद्रांना कायम गुलाम करण्यात आले. कालौघात ब्राह्मण वर्णाने क्षत्रीय आणि वैश्य हे दोन्ही वर्ण नेस्तनाबूत केले आणि शूद्रांना अंकित करून ठेवले. चातुर्वर्ण्य व्यवस्थेत सर्वात जास्त हाल झाले ते शूद्रांचे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिहितात, 'ब्राह्मणांनी क्षत्रीयांची खुशामत केली आणि दोघांनाही वैश्यांच्या जीवावर जगण्यासाठी त्याला जगू दिले. मात्र शुद्रांची अधिक अप्रतिष्ठा करण्यासाठी तिघांचे एकमत होते. तो तीन वर्णांपासून स्वतंत्र होऊ नये म्हणून त्याला धनसंचयाची मुभा दिलेली नव्हती. त्याने स्वतःच्या हितसंबंधावर दक्षपणे पहारा ठेऊ नये म्हणून त्याला शिक्षण घेण्यास मज्जाव केला होता, त्याच्याकडे त्रैवर्णिकांच्या अधिकाराविरुद्ध बंड करण्याचे साधन असू नये म्हणून त्याला शस्त्र बाळगण्यास मज्जाव केला होता. त्रैवर्णिक शूद्राला असे वागवित होते, हे मनुच्या कायद्याद्वारे सिद्ध होते. सामाजिक अधिकाराच्या संदर्भात कोणतीही विधीसंहिता मनुच्या कायद्यापेक्षा अधिक कुख्यात नाही. कुठल्याही आणि कसल्याही प्रकारच्या सामाजिक अन्यायाचा नमुना त्यापुढे फिकाच वाटेल. बहुसंख्य लोकांनी त्यांच्या वाट्याला आलेला सामाजिक दुष्टावा का सहन केला? जगात इतर देशांमध्ये सामाजिक क्रांत्या झाल्या, भारतात सामाजिक क्रांत्या का झाल्या नाहीत, या प्रश्नाने मला निरंतर त्रस्त केले आहे. त्याचे मी देऊ शकतो, ते एकमेव उत्तर म्हणजे, तिरस्करणीय चातुर्वर्ण्य व्यवस्थेच्या विरोधात प्रत्यक्ष कारवाई करण्यासाठी हिंदूमधला खालचा वर्ग पूर्णतः असमर्थ केला गेला. त्यांना शस्त्रे धारज करण्याची मुभा नव्हती आणि शस्त्रांशिवाय ते बंड करू शकत नव्हते. ते नांगर चालविणारे होते. किंबहुना त्यांना नांगर चालविण्याची शिक्षा फर्मावलेली होती आणि त्याचा फाळ काढून त्यापासून तलवार बनविण्याची त्यांना कधीही परवानगी नव्हती.'[३]

अशा प्रकारे एकंदरीत समाजाची चार वर्णांत विभागणी करून ब्राह्मण त्या सर्वांच्या शीर्षस्थानी विराजमान झाले. बुद्धाने आणि महावीरांनी या व्यवस्थेला जबर हादरे दिले. वैदिक भेदनीतीला कंटाळून अनेक लोक बौद्ध व जैन धर्माचे अनुयायी बनले. मात्र बुद्ध-महावीरांच्या नंतर जैन-बौद्ध-धर्मही लयास गेले त्यातही कर्मकांड शिरले. त्यांचे स्वतंत्र अस्तित्व फक्त नावापुरतेच उरले. इ.स. बाराव्या शतकात तर ब्राह्मणी नेतृत्वाचा सनातनी धर्म सर्वोच्च बनला होता. समाजाची विभागणी वर्णात आणि वर्णांतून जाती-जातीत झाली होती. 'जाती या कर्मामुळे निर्माण झाल्या' हे लोज ंमध्ये बिंबविण्यास प्रस्थापित व्यवस्था यशस्वी झाली. 'समाजावर प्रदीर्घ राज्य गाजवायचे असेल तर अज्ञानाची आणि अंधश्रद्धांची निर्मिती करा' अशी कूटनीती आहे. त्याप्रमाणे बाराव्या शतकात ब्राह्मणी धर्म वर्चस्वाने समाजात अज्ञान आणि रुढी परंपरा तसेच अंधश्रद्धांची निर्मिती केली होती. लोकांना आपल्या दुःखाचे मूळ त्यांच्या पूर्वजन्मात आणि पूर्वजन्माच्या कर्मात आहे, असे सांगितले जात होते आणि लोकही पुरोहितांवर डोळे झाकून विश्वास टाकत होते. अशा प्रकारे सर्वसामान्यांची चोहोबाजूंनी लूट सुरू होती. याच काळात महात्मा बसवेश्वरांचा उदय झाला.

महात्मा बसवेश्वरांचा जन्म इ.स.११०५ साली झाल्याचे मानले जाते. (काही अभ्यासक ११३२ साली झाल्याचे मानतात) बसवण्णांचे जन्मस्थान हे सध्याच्या कर्नाटकातील विजापूर जिल्ह्याचे (बसवण) बागेवाडी हे असून, त्यांच्या वडिलांचे नाव मादिराज तर आईचे नाव मादलांबिका होते. बसवण्णांना अक्कनागाई नावाची बहीण होती. बसवण्णांचे कुटुंब हे त्या भागातील पशुपालक शेतकरी कुटुंब होते. हा भाग भारतातील 'दज्जन' म्हणजेच 'दक्षिण भारत' या नावाने ओळखला जतो. भारताचे भौगोलिकदृष्ट्या उत्तर भारत आणि दक्षिण भारत असे दोन ठळक भाग पडतात. हे दोन भाग सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्ट्याही भिन्न आहेत. उत्तर भारतावर खैबर खिंडीतून आलेल्या आक्रमक आर्यांनी पूर्णपणे वर्चस्व निर्माण केले होते, मात्र त्यांना दक्षिण भारतात शिरकाव करूनही आपले सांस्कृतिक प्राबल्य निर्माण करता आले नाही. उत्तर भारतात गाय पूजली जाते तर दक्षिण भारतात नंदी (बैल) पूजला जातो. भारत हा मूलतः पशुपालकांचा देश असला तरी अशा प्रकारे या दोन्ही विभागात फरक दिसून येतो. आजही दक्षिण भारतात नंदीची पूजा केली जाते. नंदी हा महादेवाचा वाहक समजला जातो. नंदी हाच मूळ भारतीय सिंधू संस्कृतीचाही प्रतीक समजला जातो. म्हणजेच भारताच्या ज्या भागात मूळ संस्कृती आणि भाषा रुजलेली होती, अशा दक्षिण भारतात महात्मा बसवणांचा जन्म झाला. त्यांच्या आई-वडिलांनी मोठ्या आवडीने त्यांचे नाव 'बसव' ठेवले, ज्याचा अर्थ (बैल) '-नंदी', महादेवाचा वाहक असा होतो. महादेव अर्थात शिव ही दक्षिणेत पूजली जाणारी देवता. प्राचीन भारतात 'लिंगपूजा' केली जात होती. ती प्रथा उत्तरेत आर्यांनी मोडून काढली तरी दक्षिणेत मात्र कायम होती. बसवण्णांचा जन्म अशाच लिंगपूजक शिवभक्तांच्या घरी झाला. त्यापूर्वी वेदकाळात आर्यांच्या आणि बसवेश्वरांच्या पूर्वजांत मोठा संघर्ष झालेला होता. आर्य दक्षिणेत घुसू पाहात होते, मात्र दक्षिणेतील द्रविड त्यांच्याशी मुकाबला करत होते. आर्य-द्रविडांच्या संघर्षाची गाथाच महर्षी शिंदे यांनी नोंदविली आहे. आर्य हे आर्येत्तरांचा किती द्वेष करीत, याचा ऋग्वेदातील दाखला देताना महर्षींनी खालील ऋचा उद्धृत केली आहे ती अशी-

'सः वाजम् याता अपदु:ऽपदा यन्
स्वःऽसाता परिसदत् सनिष्यन् ।
अनर्वा यत् शतऽ दुरस्य वेदेः घ्नन्
शिश्नऽदेवान् अभि वर्पसा भूत् ।।'

(ऋग्वेद पदपाठ १०.९९.२)

अर्थ - तो (अग्नी) अत्यंत शुभ मार्गाने युद्धास जातो. स्वर्गातील ज्योती मिळविण्याकरिता तो झटतो. तो आपल्या विद्येने न अडखळता शंभर दरवाज्यांच्या किल्ल्यांतील भांडार लुटतो आणि शिश्न देवांना ठार करतो.'[४] अशा प्रकारे आर्य लिंगपूजकांचा कमालीचा द्वेष करत असत. ते घोड्यांना मानीत आणि गाई-बैलांचा द्वेष करीत. अर्थात पशुपालकांचाही द्वेष करीत. अशा पशुपालक कुटुंबात जन्म झालेल्या बसवण्णांनी लहानपणीच आपल्या पूर्वजांच्या शौर्यकथा ऐकल्या. वयाच्या आठव्या वर्षी ते ज्ञा-न संपाद-न ज रायला घराबाहेर पडले. बसव अभ्यासक राजू जुबरे लिहितात, 'महात्मा बसवणांनी वयाच्या आठव्या वर्षी उपनयनास नकार देऊन गृहत्याग केला. तत्कालीन शैव परंपरेचे प्रसिद्ध केंद्र असलेल्या कूडलसंगम येथे ईशान्य मुनींच्या आश्रमात धर्मशास्त्रांचा अभ्यास केला. धर्मग्रंथातील तत्त्वज्ञान आणि प्रचलित समाजव्यवस्था यातील भयंकर तफावत लक्षात घेऊन बसवणांचे चिंतन नव्या दिशेने सुरू झाले. जात, धर्म, पंथ, वर्ग, वर्ण, वंश व लिंग अशा भेदांनी छिन्नविच्छिन्न झालेल्या समाजास एकसंध करण्यासाठी समानतेचे प्रतीक असलेल्या इष्टलिंगाचा आविष्कार घडवून आणला आणि भेदनीतीला तिलांजली देऊन इष्टलिंग धारण करणारी प्रत्येक व्यक्ती 'लिंगवंत' म्हजू-न संबोधली. तोच आजचा 'लिंगायत धर्म' होय.'[५]

कुडलसंगम येथे शिक्षण घेतल्यावर बसवण्णांना महाराष्ट्रातील सोलापूर परिसरातल्या मंगळवेढ्यात कलचुरी घराण्यातील राजा बिज्जलाच्या दरबारात सेवेची संधी मिळाली. बसवण्णांचे मामा दरबारात होते. त्यांनी आपल्या मुलीचा विवाह बसवज्जांशी लावू-न दिला. बसवण्णांची कार्यपद्धती आणि लोकप्रियता पाहून राजाने त्यांची कोषाधिकारीपदी नियुक्ती केली. राज्यातील जनतेला सुखी करण्याचे, सर्वांचे कल्याण करण्याचे धोरण बसवण्णांनी आखले. त्यामुळे संपूर्ण राज्यात त्यांना मानणारा मोठा वर्ग तयार झाला. बसवण्णांनी सर्वसामान्यांची मने जिंकली. 'जात' हा जनतेच्या विकासातील सर्वांत मोठा अडसर असल्याचे बसवण्णांच्या लक्षात येताच त्यांनी जातिव्यवस्थेविरुद्ध बंड पुकारले. आपल्या राज्यातील अस्पृश्य जातीतील हरळय्या याच्या मुलाशी ब्राह्मण जातीतील मधुवरस याच्या मुलीचा विवाह लावून दिला. या एकाच घटनेने ब्राह्मणवर्ग त्यांच्याविरुद्ध खवळला. राजाचे ज ा-न भरले. मधुवरस व हरळय्या तसेच त्याच्या मुलाला राजाने हत्तीच्या पायाखाली देऊन मारले. या घटनेने संपूर्ण समाज हादरला. शरणांच्या बलिदानाने बसवण्णांची जातिविरोधी क्रांती यशस्वी झाली. अठरापगड जातीचे लोक आपापल्या जाती सोडून बसवण्णांनी स्थापन केलेल्या लिंगायत धर्मात स्वखुशीने दाखल झाले. बाराव्या शतकात जातीअंताची क्रांती बसवणांनी केली. त्यांनी आधी कृती केली आणि मग तेच वचनांतून सांगितले. जातबित काही नसते, हे सांगताना एका वचनात ते लिहितात,

'मातंग चेन्नय्यांच्या घरचा
दासाचा पुत्र,
डोहर कक्कयांच्या
घरची दासी कन्या
गेले होते शेतात गोवऱ्या वेचण्या
त्या दोघांनी तेथे संग केला
त्या दोघांच्या पोटी माझा जन्म झाला
कुडलसंगमदेवा यास साक्षी होय'[६]

ज्यामुळे जात टिकते ती कुटुंबसंस्था आणि जातिअंतर्गत विवाहसंस्थाच बसवणांनी नाकारली. 'जाती'या शोषणाचे केंद्र असून, ती शोषकांनी मुद्दाम आपल्या स्वार्थासाठी निर्माण केली, असे बसवण्णा पटवून देतात. पुढे एका वचनात ते म्हणतात,

'वडील आमचे मातंग चेनय्या,

आजोबा आमचे डोहर कक्कया
चुलते आमचे चिक्कया पहा
दादा आमचे किन्नरी बोमय्या
तरीही मज का बरे जाणत नाही
तुम्ही, कुडलसंगमदेवा'७

जाती-जातीत संकर झालेला आहे. कोणतीही जात शुद्धतेचा दावा करू शकत नाही, तर मग त्या जाती मानायच्याच कशाला? असा रोकडा सवाल करून त्यांनी जातीजातीतील स्पृश्य-अस्पृश्यता हा भेदही नाकारला आहे. यासाठी बसवण्णा स्वतःचे उदाहरण देतात, हे फार महत्त्वाचे आहे. इथे स्वानुभव महत्त्वाचा आहे. बसवण्णांच्या लोकोपयोगी धोरणाने राजा बिज्जलाची भरभराट झाली. कल्याण राज्यही त्याने स्थापन केले. तेव्हा कल्याण राज्याच्या प्रधानपदी बसवण्णा आरूढ झाले. कल्याण येथेच त्यांनी आपल्या लिंगायत धर्माची संसद म्हणजेच 'अनुभव मंटपा'ची स्थापना केली. त्यात हजारो स्त्री-पुरुषांना मुक्त प्रवेश दिला. जात पाहिली नाही, लिंज पाहिले नाही. सर्व माणूस इथून तिथून एक आहे, अशी शिकवण बसवण्णांनी दिली. एका वचनात भेदभाव करणाऱ्यांना ते थेट सुनावतात,

'अरे हा कोण, हा कोण
काय पुसता? हा आमचा
हा आमचा म्हणाना,
तुमच्या घरचा पुत्र म्हणावे
कुडलसंगमदेवा'८

बसवज्जांनी स्वर्ज--नरज नाज्ारला. पाप-पुण्य नाकारले. सर्व प्रकारची कर्मकांड नाकारली, वेद नाकारले, वेदांगे नाकारली. भेद निर्माज ज्रजारे पुराजे नाज्ारली आणि त्याला पर्याय म्हणून स्वतःच 'वचने' रचली आणि आपल्या शेकडो अनुयायांना वचनसाहित्य निर्माण करायला प्रेरीत केले. अशा वचन साहित्यातून जातिभेदाचा जाहीर निषेधच केला.

**स्त्रीदास्यविमोचक बसवज्जा**

बसवण्णांनी आपल्या क्रांतीकार्यात स्त्रियांना मोठ्या संख्येने सामील करून घेतले. वैदिकांनी ज्या स्त्रीला 'पापयोनी', 'नकराचे महाद्वार' म्हणून हिणवले होते, त्या स्त्रीला बसवण्णा महामाता म्हणतात. 'स्त्री ही प्रत्यक्ष महादेवी आहे' असे गौरवोद्‌गार काढतात. अनुभव मंटपाचे संचालन त्यांनी स्त्रियांच्या हाती दिले. हे फार मोठे धार्मिक बंड होते. स्त्रियांना त्यांनी आपल्या धर्मात सर्व अधिकार दिले म्हणूनच अक्कमहादेवी, अक्क नागाई, लक्कमा, वीरम्मा, लिंगम्मा, रायम्मा, मुक्ताक्का, नीलम्मा, बौंतादेवी, दानम्मा, संकव्वे आदी विविध जातिगटातील, वर्गातील स्त्रिया लिंगायत धर्मात सर्वोच्च स्थानी विराजमान झाल्या.

**वर्गांताचे प्रात्यक्षिक**

महात्मा बसवण्णा हे स्वतंत्र लिंगायत धर्माचे संस्थापक होते. प्रस्थापित भेदभावावर आधारित शोषण ज्रजारा वैदिज्‌ धर्म त्यांनी नाकारला, तेव्हाच त्यांनी गरीब-श्रीमंत, कामगार-मालज्‌ हा भेदही नाकारला. एकाने कष्ट करावे आणि एकाने आयते बसून खावे हे बसवण्णांना मान्य नव्हते. 'ज्ायज्‌ वे ज्ैलास' हा सिद्धांत मांडून त्यांनी कष्टाचे, श्रमाचे महत्त्व समाजाला पटवून दिले. ऐतखाऊ धर्मलंडांना त्यांनी फटकारले आणि श्रमिकांचे महत्त्व सांगितले. जो देवपूजा करून, दलाली करतो, हरामाचे खातो तो श्रेष्ठ नाही, तर जो कष्ट करून जगाचे पोट भरतो, तो शेतकरी पूजनीय आहे, हे सांगताना बसवण्णा एका वचनात लिहितात,

'कृषिकर्म हेच कायक,
पिकवितो धरणी तन-मन श्रमवुनी
धन-धान्य आणुनी दासोह करी
त्या परमभक्ताचे दर्शन घडवा तयाचे
चरणांचे,

शुद्ध तयाचे तनमन,
बोल तयाचे पावन
ज रजीही शुद्ध हेच कारण
कुडलसंगमदेवा'[९]

**समारोप**

बसवण्णांनी केलेल्या जातवर्गस्त्रीदास्यांतक क्रांतीची किंमत त्यांना मोजावी लागली. ऐतखाऊ ब्राह्मणादी पुजाऱ्यांनी त्यांच्याविरुद्ध सतत कट-कारस्थान रचले. नाना प्रकारे त्यांना त्रास दिला. तरीही बसवण्णांची क्रांती थांबत नाही हे लक्षात येताच त्यांनी राजाचे कान भरले. सत्तेला आपल्या बाजूने वळविण्यात बसवविरोधक यशस्वी झाले. त्यांनी बसवण्णांच्या क्रांतीला प्रतिक्रांतीने उत्तर दिले. राजाने बसवण्णांविरुद्ध राजद्रोहाचा आरोप केला. बसवण्णांच्या विश्वासू सहकाऱ्यांची धरपकड झाली. बसवण्णांच्यावर जीवघेणा हल्ला झाला. त्यांनी उभारलेला अनुभव मंटप जाळण्यात आला. यासंदर्भात सुभाष देशपांडे लिहितात, 'कल्याण क्रांतीनंतर शिवशरणांच्या वचन साहित्यास आणि ते ज्याठिकाणी सुरक्षित ठेवलेले होते, त्या अनुभव मंटपास आग लावण्यात आली. ग्रंथ भांडारातील किती वचने जळून नष्ट झाली, याची गणती करता येत नाही.'[१०]

प्रतिगामी शक्तींनी बसवण्णांच्या शिवशरणांची होळी केली, बसवण्णांची वचने जाळली, तरी त्यांचे विचार ते नष्ट करू शकले नाहीत. म्हणून आजही बसवण्णांचा लिंगायत धर्म जगाला जातिअंताचा, मानवतेचा, समतेचा संदेश देत स्वतंत्रपणे उभा आहे. भारतीय संविधानामध्ये बसवण्णांच्या जीवनमूल्यांचा समावेश करून घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय जनतेला सामाजिक न्यायासाठी जातीवर्गस्त्रीदास्यांताची आशा जिवंत ठेवली आहे. बसवण्णांचे स्वप्न सत्यात उतरण्यासाठी झटणे, हेच प्रत्येक अनुयायाचे कर्तव्य ठरते.

**संदर्भ**

*पाटील डॉ.आनंद, 'महाराष्ट्राला माहीत नसलेले सम्राट शिवाजी', आनंद ग्रंथसागर प्रकाशन, शाहू पार्क, कोल्हापूर-०४, प.आ. २०१८, पृ.१३*

*शिंदे महर्षी वि.रा., 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न', प्रथमावृत्ती, नवभारत, नागपूर, २० जुलै १९३३, नवी आवृत्ती ज शिल प्रज ाश-ा, हडको, औरंगाबाद, २३ एप्रिल २००३, पृ.१९*

*आंबेडकर डॉ.बाबासाहेब, 'जातिव्यवस्थेचे निर्मूलन', (मराठी अनु. प्रा.प्रकाश सिरसट), डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई-३२, प्र.आ. १९३६ नवीन आ.२०१५, पृ.४६-४७*

*शिंदे महर्षी, 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न', उ.नि. पृ.३३*

*जुबरे राजू, 'शरण जीवन दर्शन', महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी, जि.बिदर प्र.आ. २०१४, द्वि.आ. २०१६, पृ.२*

*तत्रैव, पृ.३*

*तत्रैव, पृ.३*

*तत्रैव, पृ.५*

*करजकर प्रा.विजयकुमार, 'नवयुगाचा प्रणेता म.बसवेश्वर', लेख उद्धृत, 'मानवमुक्तीची संत चळवळ', संपा.ज्जेश बेळंबे, श्रीमंज्ल बहुउद्येशीय संस्था, लातूर, प्र.आ. ६ जून २०११, पृ.३५*

*देशपांडे सुभाष कि., 'महात्मा बसवेश्वर : कार्य आणि कर्तृत्व', जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद, प्र.आ. २०१५, पृ.२८८*

# महात्मा बसवेश्वर : समतेचा महामेरू "कालातीत विचारधारा"

**डॉ. एस. सी. आडवितोट**
*भूगोल विभाग प्रमुख सी.बी. खेडगी कॉलेज, अक्कलकोट, सोलापूर*

परिस्थिती महापुरुषांना जन्म देते. संताचा जन्म त्या त्या काळात, काळाच्या गरजेपोटीच झालेले आहेत. महात्मा बसवेश्वर यांचा जन्म बाराव्या शतकात झाला. त्यांनी विश्वातील समस्त मानवजातीचे कल्याण हेच त्यांचे एक मात्र उद्दिष्ट होते. धर्माच्या नावाखाली चाललेल्या निरर्थक रूढी, परंपरा, कर्मकांड तसेच अंधश्रद्धेला मूठमाती देण्याचा प्रयत्न केला. बसवेश्वर हे विरशैव परंपरेचे पुरस्कर्ते होते. सर्वधर्मसमभावाची कल्पना समजावण्याचे काम त्यांनी सांगितलेल्या विविध वचनातून मांडले. ते सांगत असताना इतर संप्रदाय याविषयी आपले प्रतिकूल मत व्यक्त केले नाही. महात्मा बसवेश्वरांच्या पूर्वी शैवपंथाची विघटन होऊन मूळ तत्त्वावरच घाला घातले जात होते, स्वैराचारी वृत्ती, अत्यंत कर्मठपणा व निर्गुण आचार यांना उतू आला होता. धर्म आणि दैववाद यांचा समाजावर पगडा होता. त्यामुळे लोक भांबावून गेले होते. अशा सामाजिक स्थितीमध्ये कर्नाटक मधील बसवन बागेवाडी येथे महात्मा बसवेश्वर यांचा जन्म झाला. त्यांचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने कर्नाटक हेच होते. त्यांच्या कार्याचा प्रभाव आज संपूर्ण देश विदेशात आहे, याचे प्रमुख कारण म्हणजे त्यांनी सांगितलेले समतेचे तत्त्वज्ञान होय.

**जातीमुक्त समाजव्यवस्थेची रचना -** जे मनातून जात नाही त्याला जात म्हणतात. महात्मा बसवेश्वर यांनी सर्व मनुष्यमात्रास समान मानत असे. जातीचे उच्चाटन करण्यासाठी कर्नाटक येथील बसवकल्याण मध्ये 'अनुभव मंटप' ची स्थापना केली. जेथे सर्व शरण बंधू-भगिनी एकत्र येऊन अध्यात्मिक तसेच सामाजिक विचारांवर सखोल चिंतन करून जातीत व्यवस्था निर्माण केले. व त्या चिंतनातून 'वचनसाहित्य' निर्माण झाले. या अनुभव मंडपात संत पुरुषांना 'शरण' व संत स्त्रियांना 'शरणी' असे संबोधले जात व त्यांची संख्या तीनशेच्या वर होती. यातील काही प्रमुख प्रसिद्ध शरण होते. कश्मीरचा मोळीगे मारय्या (मोलीविक्या), त्याची पत्नी महादेवी, तमिळनाडूचे मादरचन्नय्या (चांभार), डोहर कक्कय्या ( चामडे विकणारा), जाडर दासिमया (कोष्टी), भालगावचे अल्लमप्रभू, तसेच सोलापूरचे शिवयोगी सिद्धाराम इ. शरणांचे व्यवसाय, जात पाहिल्यास त्यांचा जातीपातीवर विश्वास नव्हता हे लक्षात येते. महात्मा बसवेश्वरांनी जातपात, उच्च-नीच, स्त्री-पुरुष, लहान-मोठा असे फरक केले नाहीत. त्यांचा वर्ग कलहविरहित, नवनिर्मित समाज, विश्वबंधुत्ववर आधारित होता. पुरोगामी विचारसरणी हा त्यांच्या धार्मिक व सामाजिक क्रांतीचा कणा होता. ही क्रांती काळाची गरज होती, जी समाजात हवी होती. ते सामाजिक तसेच धार्मिक क्रांतीचे लोकनायक होते. समानता, स्वातंत्र्यता आणि विश्वबंधुत्व या तत्त्वाचे प्रतीक होते. माणसाच्या व्यवसायावरून त्याचे सामाजिक स्थान ठरविण्याची खूळचट रूढी त्यांनी धुडकावून लावली. बाराव्या शतकात हजारो वर्षे चालत आलेल्या रूढी आणि परंपरा यांना सामोरे जाऊन ब्राह्मण, मधुवरसाच्या विवाह हरिजन हरल्लय्याच्या मुलाबरोबर लावून दिला होता. हरिजन व सवर्ण एक आहेत हे वारंवार आपल्या वचनातून सांगितले.

**अंधश्रद्धा व कर्मकांडावर कठोर आघात-** बाराव्या शतकापूर्वी व आजही भारतीय लोक मानसिकतेत अंधश्रद्धा व कर्मकांड भरून आहे. अनेक सामाजिक सुधारणा करणारे अनेक विचारवंत होऊन गेले. जे अंधश्रद्धेवर आपल्या लिखाणातून, प्रबोधनातून हल्ला केला. बसवेश्वर हे पहिले असामान्य विचारवंत होते जे यावर परखड मत मांडले. केवळ हिंदू बाबतीतच नव्हे तर धर्मातील कर्मकांडावर तुटून पडले. मुहूर्त, शुभ-अशुभ, शुभशकुन, मूर्तिपूजा, रोज उपवास करणे इत्यादी बाबतचे विचार संत कबीराने पंधराव्या शतकात सांगितले. दोघांचे विचार स्वर्ग तसेच नरक विषयाची कल्पना देवलोक, मृत्युलोक हे सर्व थोतांड आहे. त्यांच्यामते सत्य बोलणे हेच देवलोक आणि असत्य बोलणे मृत्युलोक होय.

**श्रम प्रतिष्ठेस महत्व-** 'कायकवे कैलास' या बसवेश्वरांच्या विचारातील मूळ आधारभूत विचार आजही महत्त्वपूर्ण असून त्यांनी श्रमास प्रतिष्ठा प्राप्त झाले पाहिजे व आपण कमाविलेल्या संपत्तीतून काही भाग समाजाकरिता द्यावे असा अत्याधुनिक समाजवाद सिद्धांत मांडून, ते स्वतः आचरणात आणले. त्यांनी मानवी श्रमात आणि व्यवसायात भेदभाव केला नाही. संतपरंपरेचा अभ्यास केला असता असे दिसून येते की त्यांनी आपल्या व्यवसायात गुंतले होते व यातून त्यांनी आपले विचार मांडले आहेत. संत सावतामाळी, संत गोराकुंभार, संत कबीर, अंबिगर चौडय्या ( नावाडी), जाडर दासिमया यांनी श्रमप्रतिष्ठचे महत्व पटवून दिले. आजचे रोजगार हमी योजनेचे महत्व बाराव्या शतकात याबाबत विचार मांडले होते. श्रमाला आर्थिक मोबदला मिळालाच पाहिजे.

**स्त्रीविषयक दृष्टिकोन-** एकविसाव्या शतकात आपण महिला सक्षमीकरण याविषयी सबलीकरण, समानता इत्यादी शब्द स्त्री-पुरुष समानतेबाबत चर्चा करत आहोत. पण बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी महिलांना बरोबरीचे स्थान दिले होते. त्यांनी बालविवाहास विरोध, विधवा तसेच आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार केला. त्यांनी स्थापन केलेल्या अनुभव मंडपात अक्कामहादेवी, महादेवी. सत्यका, गुंडव्वा , रेवम्मा, आनालदेवी व निरलोचना (नीलंमा) महात्मा बसवेश्वर यांची धर्मपत्नी होत्या. समतेचा पुरस्कार त्यांच्या आचरणातून दिसून येते. त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की परधन, परस्त्री मोह योग्य नाही विषयासक्त असलेला माणूस शिवभक्त होऊ शकत नाही किंवा शिवप्रसादाचे सेवन त्याच्या नशिबी असत नाही असे म्हणत. प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध विचार मांडले त्यात प्रामुख्याने अनेक देवतांचे पूजा, तीर्थयात्रा, शकुन-अपशकुन, तिथि मुहूर्तावर श्रद्धा ठेवणे यामुळे समाजातील भाबडे लोकांचे फायदा घेणारे ब्राह्मण, जंगम हे पावलोपावली आपले दुकाने मांडून बसले आहेत. ते म्हणत देव एकच आहे, नावे अनेक आहेत, याकरिता महात्मा बसवेश्वर यांनी एकेश्वर (एक ईश्वर) नावाचा पुरस्कार करून अनेक देवतांचे उच्चारण केले. इष्ट लिंगाची( इष्टदेव) उपासना करण्यासाठी मानवाला तीर्थयात्रा, तीर्थस्थान इत्यादी गरज नाही. आपल्या इच्छेनुसार तो केव्हाही पूजा करू शकतो.

" दोन-तीन देव म्हणून फुशारकी नकोस मारू,
एकच देव खरा, दोन देव निरर्थक | कुडलसंगम मध्ये एकच खरा |"

बसवेश्वरांनी जातीव्यवस्था, स्त्री-पुरुष समानता, श्रमप्रतिष्ठा वर्ग, कलहरहित, आदर्श समाजव्यवस्था बाबत मांडलेले विचार आजही तितकेच खरे ठरत आहे, की ज्या बाराव्या शतकात मांडले होते. प्रत्येकांनी त्याचे आचरण केल्यास जीवन सफल होईल हे मात्र निश्चित आहे. त्यांचे विचार देशात नव्हे, समस्त विदेशात मार्गदर्शक व प्रेरक आहेत.

# जाती निर्मुलनाचा प्रणेता: महात्मा बसवेश्वर

**डॉ.सुशीलप्रकाश चिमोरे**
*श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर ता.उदगीर जि.लातूर*

**प्रस्तावना :-** भारताच्या सामाजिक सांस्कृतिक, ऐतिहासिक जडणघडणीत बाराव्या शतकाला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. इ.स.१२१२ला यादवांचे राज्य संपले आणि मोगलांच्या राजवटीला सुरूवात झाली.त्यामुळे मराठी भाषा संस्कृती आणि मराठी समाजाचे विघटन होते की काय? अशी भिती त्याकाळात निर्माण झाली.मराठी समाज एका विचार तत्त्वज्ञानाने आणि भाषा सांस्कृतिक दृष्टीने एकाच धाग्यात बांधला जावा असे त्याकाळातील समाजाचे हित पाहाणाऱ्या लोकांना वाटत होते.त्यातूनच महाराष्ट्रात महानुभाव, वारकरी,नाथ,सूफी, वीरशैव इ. संप्रदाय जन्माला आले. महाराष्ट्रात वीरशैव संप्रदाय बाराव्या शतकात फोफावला असला तरी त्यांची मूळे बसवेश्वरांच्या पूर्व होती. डॉ. सुधाकर मोगलेवार यांच्या मतानुसार वीरशैव- लिंगायत धर्मात संस्थापक पदावर हक्क सांगणारे दोन प्रवाह आहेत एक पंचाचार्यांची परंपरा आणि दुसरी विरक्त परंपरा पंचाचार्य परंपरा वेदोक्त आहे. त्यांची वैदिक कर्मकांडांना मान्यता आहे याउलट वीरशैव- लिंगायत धर्माची बीजे सिंधू संस्कृतीतून उदय पावलेली आहेत. ती वैदिक नसून संपूर्णत: अवैदिक आहेत.बाराव्या शतकात निर्माण झालेला आणि वाढलेला व प्रगत अवस्थेला पोहोचलेला विरक्तांचार्यांचा- बसवाचार्यांचा दुसरा प्रवाह आहे शिवशरण विरक्तमार्गी असल्यामुळे तो विरक्तांचा लिंगायत धर्म मानला जातो.त्यांनी धर्मातील लोकांना संघटित करून त्यात नवीन अस्मिता निर्माण केली.त्यांनी पंथीयांनाच नव्हे तर जाती आणि वर्णांना सामावून घेतले.दोन्ही प्रवाहाच्या परंपरेत पंचाचार,अष्टावरण,षट्स्थल,लिंग धारणा,शिवयोग इत्यादी बाबी समान आणि मान्य अशा आहेत.पण पंचाचार्यांना मान्य असलेली श्रौतसूत्र,स्मार्तसूत्रे,धर्मसूत्रे,वेद ही तत्वे बसवण्णांच्या वीरशैव धर्मास मान्य नाहीत. पंचाचार्यांना वैदिक कर्मकांडांना मान्यता आहे तर विरक्तांचा या सर्व कर्मकांडाना विरोध आहे.कायकाची संकल्पना, श्रमप्रतिष्ठा याला विरक्तांनी महत्त्व दिले.वर्णभेद नाहीसा करण्याचा प्रयत्न केला.अनुभव मंटपांची स्थापना करून धर्मचर्चेत सर्वसामान्य माणसाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले.पंचचार्यांना स्वर्ग, नरक या कल्पना मान्य होत्या तर विरक्तांनी त्या नाकारल्या अशाप्रकारेचे भेद वीरशैव-लिंगायत धर्मातील दोन प्रवाहात भेद पहावयास मिळतात. बाराव्या शतकात कर्नाटक राज्यात जी सामाजिक क्रांती झाली, त्याला जगात तोड नाही.बालवयात मुंज नाकरणे,दुसरा विवाह आंतरजातीय करणे,नागीदेव कांबळे या अस्पृश्यांच्या घरी जाऊन भोजन करणे.सनातनी राजगुरू नारायण भट्ट यांनी बिज्जल राजालाच धमक्या देण्यास मागेपुढे पाहिले नाही. बिज्जल राजाही या सनातनी मंडळीपुढे झुकला. त्याने मुधवरस व हरळय्या या दोन प्रमुख शरणार्थींचा वध केला. एवढेच नव्हे; तर महात्मा बसवेश्वरांनाही हद्दपार करण्याचा कट रचला गेला. त्यासही बिज्जल राजाची संमती होती. हे सारे चित्र पाहून बसवेश्वरांनी अशा अन्यायी राजाचा महामंत्री म्हणून राहण्यात अर्थ नाही हे लक्षात घेऊन महामंत्रीपदाचा त्याग केला.महात्मा बसवेश्वर हे कमालीचे स्वाभीमानी,विद्वान, सामाजिक तळमळ असणारे संवेदनशील त्यागीवृतीचे, ह्रदयात करूणा असलेले महापुरूष होते. महात्मा बसवेश्वर कुडल संगम येथे विद्यार्जनासाठी आले असताना आश्रमात समभावाची शिकवण म्हणून सहध्यायी शिष्यांनी आपल्या गावी जाताना आपल्या सोबत आपल्या शिक्षांनाही न्यावे लागत असे, त्यामुळे विद्यार्थ्यांना परमुलखाचे दर्शन घडत असे. त्यातूनच समाजजीवनाचे अनेक ठिकाणचे दर्शन बसवेश्वरांना झाले. यात्रेतील बाजारहाट, नृत्य लोकांचे रीतीरिवाज भोळ्या भक्तांना लुटणारे पुजारी, व्यापारी, गावोगावचे महाजन, शेट्टी सावकार यांची रंगेल वरती पाहून महात्मा बसवेश्वर महाराज अस्वस्थ होत असे त्याचे मन हळहळ करीत असे.हे सर्व बदलण्यासाठी बसवेश्र्वरांनी कर्नाटक राज्यात लिंगायत संप्रदायाची स्थापना केली.बसवेश्वरांनी आपल्या धर्म संप्रदायाचे तत्त्वज्ञान सांगण्यासाठी वचन साहित्याची निर्मिती केली. वचन म्हणजे शपथ घेणे, शब्द देणे,प्रतिज्ञा घेणे होय.बसवेश्वर महाराजांनी अशी वाचनातून शपथ घेतली होती की,त्यांना येथील

अज्ञान अंधश्रद्धा, वर्णभेद, लिंगभेद आणि वर्ग भेद नष्ट करून समताधिष्ठित समाजाची निर्मिती करावयाची होती.त्यासाठी त्यांनी वचने लिहिली ही वचने समाजातील सत्याचे दर्शन घडवितात.सत्य जीवनाचा अर्थ सांगतात आणि सदाचार आणि सद्‌गुणांचा मार्ग दाखवतात. डॉ.यू.म.पठाण यांनी केलेली वचन साहित्याची व्याख्या अर्थपूर्ण वाटते,"वचन साहित्य म्हणजे अंतिम सत्याचा शोध हे बसवेश्र्वरांच्या या सर्व चिंतनाचे प्रमुख प्रयोजन होय." मानवी जीवन कृतार्थ होण्यासाठी बसवेश्र्वरांची वचने फलदायी ठरतात.विज्ञान,विवेक,प्रज्ञा,शील आणि करुणा यांचा समुच्चय म्हणजे बसवेश्र्वरांचे वचन साहित्य आहेत.त्यात क्रांतीचे बीजक्ष, परिवर्तनाची आस,मानव्याची करूणा,विज्ञान विवेकाचा मूलमंत्र आहे. लिंगायत धर्मात बसवेश्र्वरांना विशेष महत्त्व आहे,त्यांना धर्माचा गुरु मानले जाते.वचनसाहित्य या धर्माची संहिता आहे. इष्टलिंग हे धर्मचिन्ह असून कुडलसंगम हे धर्मक्षेत्र होय.बसव मंत्रयुक्त षट्स्थल हे धर्मध्वज आहे तर धर्मकेंद्र बसवकल्याण हे आहे.या धर्माचे प्रयोजन वर्ण,वर्ग,लिंगविरहीत समाज निर्माण करणे हे आहे. बाराव्या शतकात बसवेश्वरांनी अनुभव मंडपाची स्थापना करून सर्वसामान्य स्त्री-पुरुषांना अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य दिले समाजात पुरुषापेक्षा स्त्रीचे शोषण होत असे, तिला कनिष्ठ समजले जात असे, पुरुषाबरोबर तिला न्याय हक्क आणि स्वातंत्र्य देण्याची आग्रही भूमिका बसवेश्वरांनी मांडली. स्त्रियांचे व्यक्तिस्वातंत्र्य मतस्वातंत्र्य सभा स्वातंत्र्य, वाद-विवाद स्वातंत्र्य, त्यांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे. त्यांनी स्त्रीयांना अध्यात्मिक उद्धार करून घेण्याचे स्वातंत्र्य दिले, उपासना करण्याचे स्वातंत्र्य दिले. वाड्.मय निर्मितीचे स्वातंत्र्य दिले. बसवेश्वरांनी स्त्रियांना सर्व क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने हक्क आणि अधिकार मिळवून देण्याचे महत्त्वाचे काम केले. त्यांना लेखन स्वातंत्र्य दिल्यामुळे अक्का महादेवी, राणी महादेवी, मुक्ता अक्का, रेवम्मा, लक्काम्मा, गंगाबिका, नीलांबिका,सोमम्मा,मोळीगे लख्खम्मा यांनी दर्जेदार वचनांची निर्मिती केली.वेगवेगळया जातीतील स्त्रीयांना अध्यात्मिक उपासना,भक्ती करण्याचे स्वातंत्र्य बसवेश्र्वरांनी दिले.महात्मा बसवेश्वर हे कर्ते समाज सुधारक होते.जे भारतातल्या कोणत्याही धर्मसंप्रदायांना जमले नाही ते बसवेश्र्वरांनी करून दाखविले.वारकरी संप्रदायाने शुद्रातिशुद्रांना पारमार्थिक स्वातंत्र्य दिले असले तरी चोखाबांना पायरी जवळच जागा मिळाली. वारकरी संप्रदायात कृती आणि युक्ती यात प्रचंड तफावत होती परंतु बसवेश्र्वरांनी उघड उघड आंतरजातीय विवाह लावून दिले. त्याची सुरुवातच स्वत: पासून केली.शुद्रांच्या घरी बसवेश्वर भोजन करीत असे,खऱ्या अर्थाने बसवेश्वर महाराज हे लोकशाही मूल्यांचा म्हणजेच समता,स्वातंत्र्य, बंधूभाव, सामाजिक न्यायाचा पुरस्कर्ते होते. बसवेश्र्वरांचा कर्नाटकातील लिंगायत धर्म कथनीपेक्षा करणारीला महत्त्व देणारा असल्यामुळे सर्वसामान्यांना आपला वाटला हेच या धर्माचे यश होते .वर्तमानकाळात बसवेश्वरांचा विचार सांगण्यापेक्षा त्यांच्यासारखी कृती जेव्हा त्यांचे अनुयायी करतील तेव्हाच बसवेश्र्वरांना अपेक्षित असलेला समताधिष्ठित समाज निर्माण करता येऊ शकेल.कोणत्याही महापुरुषांचे अनुयायीच त्या महापुरुषांचा पराभव करीत असतात कारण अनुयायी फक्त कथनीच करतात करणी पासून हजारो मैल दूर राहातात म्हणूनच समाजात परिवर्तन होऊ शकत नाही.म्हणूनच संत तुकाराम महाराज बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले म्हणतात हा अभंग खऱ्या अर्थाने बसवेश्र्वरांच्या विचार कार्याला लागू पडतो.या अर्थाने 'महात्मा' या पदवीची पात्रता प्राप्त केलेले बसवेश्वर हे खऱ्या अर्थाने महान ठरतात. महात्मा गौतम बुध्द आपल्या विचाराला कृतीची जोड देऊन तो विचार दृष्टांत देऊन पटवून देत असतं.या बाबतीत महात्मा बसवेश्वर गौतमाच्या वाटेचे प्रवासी वाटतात.बसवेश्वरांनी जातीनिर्मुलनाचे कार्य करताना किंवा विचार पटवून देताना त्यांच्या अनुयायांना सद्‌सदविवेक बुध्दीचा वापर करायला लावीत असतं. ते कधीच आपला आचार आणि विचार कुणावर लादत नसतं.ते खऱ्या अर्थाने व्यक्तीस्वातंत्र्याचे उपासक होते. त्यांचे जातीनिर्मुलनाचे कार्य त्यांच्या वचन साहित्यातून पहाता येतात ते लिहितात-

"शिखा ब्राह्मण,नेत्र क्षत्रिय,नासिक वाणी,
अधर शेतकरी,कर्ण गवळी,गळा कुंभार,
बाहू पांचाळ, तळहात गोवंडी,नख
न्हावी,
पोट डोंबारी,पाठ परीट,चर्म कोष्टी,

नितंब बेरड,गुप्तांग महार,गुडघे दारुवाला,
पोटरी चांभार,मांडी चप्पल शिवणारा.
चालणाऱ्या पायाचा तळपाय शुध्द मांग पहा हो.
अशा अठरापगड जाती आपुल्यामध्येच असती.
त्या नाहीत म्हणून बाहेरच्या जातीसाठी भांडणारे
अज्ञानी लोक आमुच्या सोड्डुळदेवास नावडती हो.॥१५८८॥

बसवेश्वर महाराजांनी कोणीही चतुर्वर्ण नसून सगळे समान आहेत हा विचार समाजात रुजवण्याचा प्रयत्न केलेला आहे. समाजात सर्वच जातीला तितकेच महत्त्व आहे, त्या एकमेकावर अवलंबून आहेत. एकमेकाचे अस्तित्व एकमेकावर आधारलेले असून एखाद्या जातीला शूद्र समजणे हे शूद्रवर्तीचेच असते.डोळे क्षत्रिय तर नाक वाणी,ओठ शेतकरी, कान गवळी तर गळा कुंभार, बाहू पांचाळ तळहात गवंडी, नख न्हावी, पोट डोंबारी, पाठ परीट,चर्म कोष्टी, नितंब बेरड, गुप्तांग महार,गुडघे दारूवाला, पोटरी चांभार,मांडी चप्पल शिवणारा, चालणाऱ्या पायाचा तळपाय शुध्द मांग आहे पाहा,अशा अठरापगड जाती आपुल्यामध्येच असतात.जातीसाठी भांडणारे अज्ञानी लोक असतात अशी लोक आमच्या सोड्डुलदेवास आवडत नाहीत.येथे बसवेश्र्वरांनी वर्णव्यवस्थेला नाकारून समतेचा विचारसंदेश दिलाआहे.त्यांचे वचन साहित्य म्हणजे सत्यदर्शन मांडणारी असून जात ही नसतेच ती माणसाने आपल्या सोयीसाठी,स्वार्थासाठी निर्माण केली आहे. ती माणसाच्या व्यवसायावर निर्माण झाली असून जातीच्या नावाने कुणालाही शूद्र समजू नका हा विचार पटवून देताना खालीलवचनात ते लिहितात-

" तापवून लोहार झाला;
धुवून परीट झाला;
धागे विणून कोष्टी झाला;
वेद वाचून ब्राह्मण झाला;
कानातून जन्मलेले असती का जगात?
या कारणें,कुडलसंगमदेवा,
लिंगाची संगत जाणणाराच कुलीन हो ॥१५८७॥

उपरोक्त वचनात बसवेश्वरांनी जातही व्यक्तीच्या कर्मावर पडलेली आहे हे पुन्हापुन्हा उदाहरणे देऊन पटवून देण्याचा प्रयत्न करतात लोखंड तापवून लोहार झाला, कपडे धुऊन परीट झाला, धागे विणुन कोष्टी झाला. वेद वाचून ब्राह्मण झाला कानातून जन्मलेले कोणी असतात का?असा प्रश्न व्यस्थेला बसवेश्र्वरांनी विचारलेला आहे.लिंगाची संगत जाणणाराच कुलीन असतो हा एकेश्वरवादाचा पुरस्कार त्यांनी केला.बसवेश्वरांनी अतिशय साध्या सोप्या भाषेत जनसामान्यांना समजेल उमजेल अशा भाषेत वचन साहित्य लिहून समाजप्रबोधन करण्याचा प्रयत्न केला आहे.आपले अध्यात्मिक तत्त्वज्ञान सूचकपणे लोकांना समजतील अशी लोकव्यवहारातील उदाहरणे देऊन त्यांनी पटवून दिली आहेत.या सर्व तत्वज्ञानामागचे प्रयोजन असे की,बसवेश्वरांना जातीव्यवस्थेचे उच्चाटन समाजातून करून मानवतावादी, समताधिष्ठित समाज निर्माण करावयाचा होता.बसवेश्वर हे अद्वैताचे पुरस्कर्ते होते.त्यांनी जातीव्यवस्था नाकारून सर्व व्यक्तींना पारमार्थिक स्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले. व्यक्ती हा निसर्गतःच स्वतंत्र असून त्याला निसर्गाने स्वातंत्र्य दिले आहे.कारण सर्व मानवजात समान आणि सारखी आहे हा सार्वकालिक आणि सार्वत्रिक संदेश ते समाजाला देताना लिहितात-

"बेरड कण्णप्पा,जेडर दासिमय्या,डोहर कक्कय्या
संबोळी नागय्या या सर्वांस
शिव प्रसन्न झाल्याची रीत पहा हो!
या जगी सामान्य माणसे संप्रदाय करत असती.
संप्रदाय करण्या तर काय स्वतंत्र असती?

यांनी केलेल्या ठायी दगडधोंडे,काटेबिटे असती,
म्हणे आमुचा अंबिगर चौडय्या॥१५९५॥

बसवेश्र्वरांनी कर्नाटकात स्थापन केलेल्या लिंगायत धर्मात सर्व जातीतील स्त्रीपुरूषांना अध्यात्मिक स्वातंत्र्य, उपासना स्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले.सर्वांनाच शिवाची भक्ती करून त्याला प्रसन्न करून घेण्याचे स्वातंत्र्य आहे, ही शिकवण त्यांनी दिली.पुढे ते लिहितात-

"मानवी कुळे अनेक असली तरी
योनीमधून जन्म एकच प्रकारचा असे
वाक्चातुर्य कितीही असून काय उपयोग?
योग्य काय ते जाणणे एकच प्रकारचे असे.
वस्तू,जात,गोत्र यांमध्ये विशेष म्हटल्यास
दिवस -रात्र हा द्विधा भाव घालविण्या
प्रकाश अंधार हे दोन भेदभाव राहिल्याविना न असती.॥१५९०॥

मानवी कुळे अनेक असले तरी सर्वांचा जन्म योनीमधूनच होत असतो.जन्मण्याची रितीही एकच असते.वेद-शास्त्र-आगमांद्वारे अनेक प्रकारे मनोरंजकपणे सांगितले तरी मोक्षाविषयी निश्चित पणे सांगण्याची रीत एकच असते.शेकडो रिती नसतात.पुन्हा:शेकडो कुळे व अठरापगड जाती असल्या तरी त्यांमधील गोत्रे दोनच-एक उत्तम व दुसरा अधम कसे म्हणता येईल.तसेच, दिवस व रात्र दोन्हीचा निर्णय करण्यासाठी उजेड व अंधार यांचाच आधार घ्यावा लागतो, त्याशिवाय दुसरा उपाय नसतो. स्त्री-पुरुष या दोनच जाती असून शेकडो कुळे अठरा जाती म्हटल्यास आम्ही सांगितलेले वाक्य उल्लंघून दिसणारे शास्त्र, प्रत्यक्ष ज्ञान दुसरे कुठले असणार? सर्व जातीचे लोक एकाच विहिरीचे पाणी वापरतात. वावरणारी जमीन एकच, सर्वावर प्रकाशणारा सूर्यही एकच आहे. चौकशी करून निरीक्षण करणारा डोळा एकच असतो, तेथेही डोळ्यातील बाहुली नाना रूपे पाहून ती बाहुली सुरुप-कुरुप, वेशभूषा, दागदागिने अशा अनेक तऱ्हा पाहून रूपे अनेक असली तरी पाहणारा डोळा एकच असतो. हे सर्व जाणून शिवच सर्वश्रेष्ठ म्हणून शेकडो कुळे अठरा जाती यांचे सूचक मुळीच नाही असा विचार समाजात रुजविण्याचा प्रयत्न महात्मा बसवेश्वरांनी आपल्या वाचनातून केलेला आहे. महात्मा बसवेश्वर नैसर्गिक सत्य सांगतात. त्यांची विवेकवादावर आणि विज्ञानवादावर प्रचंड निष्ठा होती.मानवतावादी आणि समतावादी समाज निर्मितीसाठी जात हीच घातक असते.तिलाच समूळ नष्ट करायचे असेल तर भाषणे देऊन, पुस्तके लिहून किंवा परिसंवाद ठेवून होत नाही त्यासाठी आंतरजातीय विवाह लावून देणे ही कृतीच केली पाहिजे याची पुरेपूर जाणीव महात्मा बसवेश्वरांना होती म्हणून च त्यांनी त्यांच्या काळात अनेक आंतरजातीय विवाह लावून दिले म्हणून महात्मा बसवण्णा जगातील जातीनिर्मुलनाचा पहिला कर्ता प्रणेता होता असे मला वाटते.बोलण्यापेक्षा कृतीवर भर देणारा एक महान कर्ता समाज सुधारक म्हणजे महात्मा बसवेश्वर हेच होते यात तीळमात्र शंका नाही.मानवतावाद,समता,स्वातंत्र्य, बंधूभाव, सामाजिक न्याय ही संविधानिक मूल्ये' समाजात रूजविण्याचा पहिला प्रयत्न महात्मा बसवेश्र्वरांनी केले हे निर्विवाद सत्य आहे.

**संदर्भसूची :-**

*प्रा. करडीगुद्दी आर.एम.( अनुवादक मराठी) वचन सिध्दांत सार-महाराष्ट्र बसव परिषद,*
*हिरेमठ संस्थान भालकी जि.बिदर प्रथम आवृत्ती १५जानेवारी,२०१६.*
*डॉ.सोमनाथ रोडे-सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा बसवेश्वर अश्विनी प्रकाशन, लातूर*
*प्रथमावृती अक्षय्य तृतीया दि.२७ एप्रिल,२००९*
*डॉ.श्रीदेवी शंकराप्पा कडगे-महात्मा बसवेश्वर व्यक्ती आणि वाड्.मय इसाप प्रकाशन,*
*नांदेड प्रथमावृती २८मार्च,२०१७.*
*सुभाष किशनराव देशपांडे-महात्मा बसवेश्वर कार्य आणि कर्तृत्व-जनशक्ती वाचक चळवळ*
*औरंगाबाद प्रथमावृती २१मार्च,२०१५.*

## समतेचे उपासक : महात्मा बसवेश्वर

**प्रा.डॉ.तोळमारे शशिकांत शिवापा**
*श्री.योगानंद स्वामी कला महाविद्यालय वसमत.*

जगातील बहुतेक क्रांत्या पैसा, सत्ता, संपत्ती, स्त्री वा शक्ती, संपती प्राप्त करण्यासाठी झाल्या. किंवा याचं प्रदर्शन करण्यासाठी झाल्या. मात्र महात्मा बसवेश्वरानी स्वातंत्र्य, समता व बंधुतेच्या पुनर स्थापनेसाठी, मानवतेच्या प्रतिष्ठापनेसाठी क्रांती केली. म्हणून ही क्रांती मानवमुक्तीचा आदर्श ठरली. या क्रांतीने लोकशाहीची पायाभरणी केली. म्हणून महात्मा बसवेश्वरांना समतेचा महानायक, मानवतेचा मानबिंदू मानले जाते, समतेचा उपासक मानले जाते. ब्राह्मणेत्तर कुटुंबांमध्ये जन्माला येऊन दुःख यातना झेलून त्याविरुद्ध विद्रोह करणे समजू शकतो. पण उच्च ब्राह्मण कुळांमध्ये जन्माला येऊन इतरांना गुलाम बनविण्याचे अधिकार जन्मजात प्राप्त असतानाही, शोषणाचा, जातीयवादाचा, धर्म वादाचा पुरस्कार न करता केवळ मानवता व माणुसकीच्या दृष्टिकोनातून बसवेश्वरांनी आपले सर्वस्व पणाला लावले. बुद्धानंतर विद्रोहाची मशाल तेवत ठेवण्याचे काम महात्मा बसवेश्वरांनी केले. म्हणून तर पुढे महाराष्ट्रामध्ये महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. आंबेडकर यांचे युग अवतरू शकले. त्यावेळचा समाज अज्ञान व अंधारामध्ये चाचपडत होता. समाजात अनिष्ठ परंपरा, चालीरीती, रूढी होत्या. समाजात वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था, विषमता नांदत होती. अशावेळी प्रस्थापित व्यवस्थेला वयाच्या केवळ आठव्या वर्षी बसवेश्वरांनी धक्का दिला. उपनयन संस्कार जोपर्यंत माझ्या ताईचा होत नाही, तोपर्यंत माझा उपनयन संस्कार करावयाचा नाही. अशी कणखर भूमिका घेऊन केवळ आठव्या वर्षी स्त्री-पुरुष समानतेचे बिगूल फुंकले. गृहत्यागानंतर जातवेद मुन्नीच्या आश्रमात कृष्णा नदीकाठी कुडल संगम येथे बारा वर्षे ज्ञानसाधना केली. ज्ञानसाधनेनंतर चालुक्याच्या राज्यकारभारात कारकून ते चालुक्यांचा पंतप्रधान अशी दैदीप्यमान वाटचाल केली. सुरुवातीचा काळ मंगळवेढा परिसरामध्ये व त्या नंतर कर्नाटकात बसवकल्याण परिसरात चंदनाप्रमाणे जिझून जनतेची सेवा केली. या संपूर्ण वाटचालीत प्रस्थापित व्यवस्थेला धक्के देऊन स्वातंत्र्य, समता व बंधुतेची प्रतिष्ठापना करून कल्याणकारी राज्य सत्ता निर्माण केली. हे कल्याणकारी राज्य निर्माण करण्यासाठी बसवेश्वरांना सर्वस्वाचे दान द्यावे लागले. कारकून ते पंतप्रधान अशी वाटचाल करत असताना बसवेश्वरांनी अनेक क्रांतिकारक कार्य केले. प्रत्यक्ष कृती व उक्तीतून समाजात सर्वांगीण परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. अनुभव मंडपाच्या माध्यमातून लोकशाही संसद निर्माण केली. पुढे महाराष्ट्र, कर्नाटक व देशातील अनेक राज्यात बसवेश्वर यांच्या प्रेरणेतून समाजसेवक व विचारवंताची पिढी निर्माण झाली. बसवेश्वरांनी अल्प काळामध्ये राज्यकारभाराच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक सुधारणा घडवून आणल्या. त्यात प्रामुख्याने पुढील सुधारणांचा आपणाला उल्लेख करता येईल.

1) अनिष्ट प्रथा व परंपरांचा त्याग केला
2) स्त्री-पुरुष समानतेचा स्वीकार केला
3) जातीप्रथा मोडीत काढली
4) आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह ला प्राधान्य दिले
5) विधवा-पुनर्विवाह केले
6) स्त्रियांना धर्मप्रचारक म्हणून मान्यता दिली
7) मंदिराचा त्याग केला व मंदिर व्यवस्था नाकारली.
8) ज्ञान बहुजनांसाठी खुले केले.
9) एकेश्वरवादाचा आग्रह धरला.

10) श्रप्रतिष्ठा जोपासली.
11) स्वातंत्र्य समता व बंधुता जोपासली.
12) भेदाभेद करणारा धर्म नाकारला.
13) धर्म भेद करणारा संस्कार नाकारला.
14) स्वतः आंतरजातीय विवाह केला.
15) ज्ञानमार्ग भक्तिमार्ग कर्ममार्गाने राज्यकारभार केला.
16) वेद व ब्राह्मणांची मक्तेदारी मोडून काढली.
17) पशुबळी ला विरोध केला.
18) देव व भक्तांमध्ये एजंट नाकारला.
19) हरळ्याने बनवलेली चप्पल डोक्यावर घेऊन श्रमाचा गौरव केला.
20) शिक्षेपेक्षा दयेवर भर देऊन परिवर्तन केले. गाय चोराला वासरू भेट दिले.

अशा क्रांतिकारी सुधारणा करून मानव मुक्तीचा मार्ग अंगीकारला. समतेसाठी प्रधानमंत्री पदाचा त्याग केला. पण मानवता व माणुसकीशी तडजोड केली नाही. महात्मा बसवेश्वरांच्या जीवनचरित्रातून आपण काय शिकायचं तर जीवनामध्ये ज्ञानप्राप्ती बरोबरच ज्ञानाचे उपयोजन महत्त्वाचे आहे. केवळ पुस्तकी ज्ञान कामाचे नाही. तर पुस्तकातील जोपर्यंत मस्तकामध्ये येत नाही तोपर्यंत परिवर्तन घडत नाही असा विचार त्यांनी मांडला. यावरून हे स्पष्ट होते की बसवेश्वर माहीत असून उपयोग नाही. केवळ ऐकून उपयोग नाही. केवळ बसवेश्वरांचा जय म्हणून उपयोग नाही. केवळ बसवेश्वर तोंडपाठ करून उपयोग नाही. तर त्यासाठी बसवेश्वरांनी दाखविलेल्या मार्गाने चालावे लागेल. त्यांची शिकवण आत्मसात करावी लागेल. त्यांना पचवावे लागेल. उक्ती, कृती, वर्तन आणि विचारातून बसवेश्वरांना आत्मसात करावे लागेल. यातच लिंगायत धर्माचे व मानवतेचे कल्याण आहे. आपण असे करणार असाल तर बसवेश्वर जयंती सार्थक झाली असेच म्हणायला हवे. प्रत्यक्षात होत असं, आम्ही रामाला मानतो पण रामाचं मानत नाही. आम्ही कृष्णाला मानतो पण कृष्णाचं मानत नाही. आम्ही बुद्धाला मानतो मात्र बुद्धाचं मानत नाही. आम्ही बसवेश्वरला मानतो पण बसवेश्वराचे मानत नाही. म्हणून हे सर्व प्रश्न निर्माण होत आहेत. हे सर्व बदलायचे असेल. खऱ्या अर्थाने सामाजिक व सर्वांगीण परिवर्तन करायचे असेल.. तर केवळ रामाला मानू नका. रामाचं माना कृष्णाला मानू नका. कृष्णाचं मानाबुद्धाला मानू नका. बुद्धाचं माना, बसवेश्वराला मानू नका बसवेश्वराचं माना, तरच खऱ्या अर्थाने त्यांनी दिलेली शिकवण प्रत्यक्षामध्ये अंमलात येऊ शकते. समाजाचं भलं होऊ शकत. व्यवस्तेचं कल्याण होऊ शकत. त्यांच्या विचाराच्या माध्यमातून व्यक्ती समाज आणि देशांमध्ये परिवर्तन निर्माण करता येऊ शकते. महात्मा बसवेश्वर यांच्या काळात व त्याआधीच्या काळात जातीप्रथा अतिशय प्रखर होती .अगदी सुरुवातीला केवळ कर्माची विभागणी करण्यात आली होती. त्या व्यक्तीला कर्म निवडण्याचा हक्क होता. अधिकार होता. मात्र एका विशिष्ट काळानंतर उच्च कर्म करणाऱ्यांना आहे हेच कर्म करणे सोयीचे वाटले. म्हणून त्यांनी आपले वर्चस्व टिकवून ठेवण्यासाठी व बाकी समाजाला गुलामगिरीत ठेवण्यासाठी किंवा आपल्या प्रभावात ठेवण्यासाठी कर्म निवडीला प्रतिरोध केला .तुमचे पूर्वज जे कर्म करतात तेच कर्म तुम्ही करा, परंपरेने आलेले कर्म करायला हवे असे बंधन घातले. परिणामी समाजात वरिष्ठ कनिष्ठ भेद निर्माण झाले. या कर्माच्या उतरंडीचा प्रभाव वाढून तथाकथित बुद्धिवंतांनी वर्ण श्रेष्ठत्वाचा विचार पुढे आणला. त्यातूनच जाती प्रथा रूढ झाली. जातिप्रथा समाज व देशाच्या हितासाठी कशी उपयोगी आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न झाला. अशा चाणाक्ष व षडयंत्रकारी लोकांनी आपल्या सोयीसाठी जातिप्रथेचा आग्रह धरला, विकास केला. हे उच्चवर्णीयांनी स्विकारले व याचाच आग्रह धरला. याचाच विकास केला हे उच्चवर्णीयांचे षड्यंत्र ओळखून महात्मा बसवेश्वरांनी जातिअंताचा विडा उचलला. स्वतः जातीभेद नष्ट केला, व जाती निर्मूलनासाठी आंतरजातीय विवाह घडवून आणले. आपल्या जीवनात आपल्या कार्यात विचार व आचरणातून जाती प्रथेला विरोध केला.

परिणामी त्यांनी निर्माण केलेल्या अनुभव मंडप मध्ये सर्व जाती-धर्माच्या लोकांना मुक्त प्रवेश देण्यात आला .महात्मा बसवेश्वरानी शिक्षणाला फार महत्त्व दिल्याचे पाहायला मिळते. त्यांच्या मते मानवी जीवनात आलेली ही दुरावस्था, दुःख, अज्ञान, अंधश्रद्धा, अविश्वास, अहंकार हे केवळ ज्ञानाचा अभाव असल्यामुळे निर्माण झाले आहे. जर माणसे ज्ञानापासून वंचित राहतील तर मानवाचे जीवन दुःखात, दारिद्र्यात, अंधश्रद्धेत, अज्ञानात, विषयामध्ये गुंतून पडेल. परिणामी त्याला जीवनाचा अर्थ कळणार नाही. जीवनाचे मर्म कळणार नाही. म्हणून मानव अधिक दुःखात जगेल म्हणून यातून समाजाला बाहेर काढण्यासाठी सद्‌गुणांची जोपासना करण्यासाठी व दुर्गुणांचा त्याग करण्यासाठी शिक्षण अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. म्हणून तर शिक्षणाचा प्रसार व प्रसार समाजातील सर्व घटकापर्यंत झाल्याशिवाय समाज व देशाचा उद्धार नाही असे त्यांनी सांगितले. अशाप्रकारे महात्मा बसवेश्वरांनी बाहेर अकराव्या शतकात लोकशाही प्रतिष्ठापनेचे महान कार्य करण्याच्या हेतूने अनुभव मंडप ची स्थापना केली. जातीअंतासाठी प्रयत्न केला. रुढी परंपरेवर आघात केला. अनिष्ट चालीरीती मोडून काढण्यासाठी समाजात जागृती निर्माण केली. स्त्री-पुरुष समानतेचा विचार मांडला. श्रमप्रधान जीवन जगण्याला महत्व दिले. प्रस्थापित व्यवस्थेला धक्के देऊन नवीन जीवन मूल्य नीतिमूल्य संस्कार रुजवण्याचा प्रयत्न केला. नवीन श्रमप्रधान आर्थिक मूल्यांची रुजवणूक केली. श्रमिक व श्रमलाप्रतिष्ठा प्राप्त करून दिली. जातीप्रथा, विषमता व माणसामाणसातील भेद निर्माण करणाऱ्या थोतांड देव – धर्म, मंदिर, पूजाअर्चा, दानधर्म या संकल्पनेला विरोध करून देह हेच देवालय आहे व त्यातील आत्मा हाच शिव आहे. लिंगाच्या रूपाने त्याचीच पूजा करा. विनाकारण देवदेवतांच्या व पूजार्याच्या नादाला लागू नका. असा क्रांतिकारी विचार सांगणारे महात्मा बसवेश्वर बुद्धानंतर चे खरे मानवतावादी संत होते. उत्तम प्रशासक होते. समाजसुधारक होते. दुरदृष्टे विचारवंत होते. महात्मा बसवेश्वर अत्यंत महान होते. मध्ययुगीन काळात मठ मंदिरे मध्यस्थ व दांभिक ढोंगी लोकांच्या संधीसाधू वृत्तीमुळे समाज वैतागला होता. माणूस माणसाचा गुलाम बनला होता. दीनदलित व स्त्रियांना गुलामाप्रमाणे वागवले जात होते. धर्माच्या नावावर अधर्माचे स्तोम माजले होते. अंधश्रद्धेत समाज भरडला जात होता. विवेकबुद्धी समाजातून संपत चालली होती. नीती व न्यायाची अपेक्षा असताना भोळा भक्तीभाव वाढला होता. अशा अंधकारमय युगात महात्मा बसवेश्वर आणि सामाजिक परिवर्तनाचा आग्रह धरला व समाजक्रांतीचे बीजारोपण केले. महात्मा बसवेश्वरांनी सर्वप्रथम सामाजिक विषमतेच्या मुळावर घाव घातले. व्यक्तीचा सामाजिक दर्जा त्याच्या जातीवरून नव्हे तर त्यांच्या विचारांवरून वर्तनावरून ठरवला जावा असे म्हटले. यासाठी तर बसवेश्वरांनी खऱ्या अर्थाने समाज परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. आम आदमी त्यांच्या चळवळीचा केंद्रबिंदू होता. समाज जातीच्या नव्हे तर विचाराच्या धाग्याने एकत्र आणता येतो यावर त्यांचा दृढ विश्वास होता. अनुभव मंडपाच्या माध्यमातून त्यांनी समाज संघटना समाज प्रबोधन सामूहिक चर्चा, संवाद, समता. स्वातंत्र्य, बंधुता इत्यादीवर भर दिला. आणि त्या काळामध्ये 770 शरण शिलेदारांच्या मदतीने समाज प्रबोधन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. दीन-दलित भटके आदिवासी बारा बलुतेदार आठरा आलुतेदार यांना एकत्र करून लिंगायत धर्माच्या माध्यमातून समाज क्रांतीची मुहूर्तमेढ रोवण्याचा प्रयत्न महात्मा बसवेश्वरांनी केला. नानाविध जातीच्या लोकांना महात्मा बसवेश्वरांनी इंस्टलिंगधारी लिंगायत बनवून त्यांच्यात रोटी-बेटी व्यवहार सुरू केली. जाती, वर्ण, वर्ग व लिंगभेद विरहित शोषणमुक्त भय, भूक व भ्रष्टाचारमुक्त आदर्श समाज निर्माण करण्याचा हेतू त्यांनी निश्चित केला. म्हणून तर सर्वांना एकत्र बसून विचारविनिमय करून सामूहिक प्रयत्न च्या माध्यमातून अनुभव मंडपाच्या माध्यमातून समाजाला वेगळी दिशा देण्याचा प्रयत्न त्या कालखंडामध्ये महात्मा बसवेश्वरांनी केला .हल्लाकीचे जीवन जगलेल्या शूद्रातिशूद्र आणि स्त्रियांना आपल्या भावभावना व्यक्त करण्याचे व विचारांच्या अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य अनुभव मंडप ने प्राप्त करून दिल्याचे पाहायला मिळते. त्यांच्यातील माणूसपणा बरोबरच सर्जनशीलतेला ही जागे करण्याचे काम अनुभव मंडप ने केले.ज्यांची कसलीही परंपरा नसलेल्या शोषित बहुजन समाजातून त्या कालखंडामध्ये वचनकार व वचनकरती निर्माण होऊन ,खऱ्या अर्थाने अनुभव मंडप ही एक बुद्धिवादी चळवळ म्हणून त्या कालखंडामध्ये उदयाला आल्याचे पाहायला मिळते. महात्मा बसवेश्वरांनी कायक व दासोह द्वारे परिश्रमाला सर्वाधिक प्राधान्य दिले. कष्टावर जीवन जगण्याची पद्धती अवलंबिली ऐतखाऊ आळशी

लोकांना धर्म बहिष्कृत केले. भीक मागून खाण्यावर बंदी घातली. काया कवे कैलास, हा महात्मा बसवेश्वर यांचा सिद्धांत होता. कष्टाच्या घामाच्या आधारेच खऱ्या अर्थाने जीवन जगता आले पाहिजे असे त्यांनी सांगितले. कष्टाच्या घामाच्या धारेने केलेले स्नान हे जगात सर्व श्रेष्ठ आसल्याचे सांगितले. आपले गाव आपले घर शेती भूमी या बाबीच महान असून आहे तेथेच काबाडकष्ट करण्यावर त्यांनी भर दिल्याचे पाहायला मिळते. दानधर्मा ऐवजी त्यांनी दासोह तत्त्वाचा पुरस्कार केला. मनगट व मेंदूच्या क्षमतेवरच त्यांनी सर्वाधिक भर दिला. बसवेश्वरांनी देहाला देवालय संबोधून मंदिर व्यवस्थेला धक्का देण्याचे काम केले. देव व भक्ता मधील मध्यस्थी दूर करून विश्वसाकारी शिव लिंगाच्या रूपाने प्रत्येककाने लिंगधारण करून त्याचीच पुजाअर्चा करण्याचा मार्ग दाखवला. महात्मा बसवेश्वरांनी एकाही देवाची मूर्ती घडविली नाही. तर देवासारखी माणसं घडवली. माणसं उभी केली. त्यासाठी त्यांना आपले सर्व आयुष्य वेचावे लागले. महात्मा बसवेश्वरांनी देव मंदिरात पाहिला नाही. तर मंदिराचे दगड घडविणाऱ्या शिल्पकाराच्या मूर्तीकारकांच्या कष्टात, श्रमात देव पाहिला. म्हणून त्यांनी काया कवे कैलास.. हा विचार मांडला. देवदासी प्रथा बंद केली कित्येक स्त्रियांचा उद्धार केला. त्यांचे लग्न लावले. त्यांना सन्मार्गाला लावले. त्यांना वचने लिहिण्यासाठी प्रेअरीत केले. अशा पद्धतीने व्यापक समाज परिवर्तन त्यांनी केल्याचे पाहायला मिळते. मानवी देह त्यागासाठी किंवा भोगासाठी नव्हे तर तो गौरवासाठी आहे. स्त्री घर-संसार त्यागुन.. अंगाला राख फासून संन्यास वैराग्य धारण करण्यात कुठल्याही प्रकारचा पुरुषार्थ नाही. तर खऱ्या अर्थाने संसारामध्ये राहून सहजीवनाच्या माध्यमातून आपल्या कर्तव्याच्या माध्यमातून आपण स्वतः चांगला समाज निर्माण करायला हवा. अशा प्रकारचे मत त्यांनी त्या कालखंडामध्ये मांडल्याचे पाहायला मिळते. उपास तापास व्रतवैकल्ये इत्यादी घटकांवर त्यांचा विश्वास नव्हता तर , देह धर्मानुसार वाघा, देह कष्ट देण्यासाठी नाही, तर तो परिश्रमासाठी आहे. कष्ट करण्यासाठी आहे. म्हणून कष्टाच्या माध्यमातून सर्वश्रेष्ठ योग आपण आत्मसात करायला हवा आणि कष्टामुळे खऱ्या अर्थाने माणूस दीर्घकाळ निरोगी होऊ शकतो आणि श्रमाच्या माध्यमातूनच आपली उपजीविका भागविण्यासाठी श्रम करणे कष्ट करणे अत्यंत गरजेचे असल्याचे महात्मा बसवेश्वरांनी सांगितले. देह धर्मानुसार वागा देह कष्ट करण्यासाठी आहे म्हणून कष्टाला महत्त्व द्या अशा आशयाचे समाज प्रबोधन त्या काळामध्ये बसवेश्वरांनी केल्याचे पाहायला मिळते. महात्मा बसवेश्वरानी अंधश्रद्धा निर्मूलनासाठी व्यापक लोकचळवळ उभी केली. सर्व अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा यांचा त्याग करायला लोकांना सांगितले. ज्योतिष, भविष्य, पंचांग, जादू टोना, तंत्र विद्या इत्यादी ला खऱ्या अर्थाने दूर करण्याचा प्रयत्न केला. आणि माणसाला विज्ञानवादी बनवण्याचा प्रयत्न महात्मा बसवेश्वरांनी केल्याचे पाहायला मिळते. सामाजिक सुधारणे बरोबरच आर्थिक सुधारणांची सुद्धा नितांत गरज असते असे बसवेश्वर यांनी सांगितले. केवळ सामाजिक आर्थिक पैलुंचा नव्हे तर संपूर्ण मानवी जीवनाचा त्यानी विचार केल्याचे पाहायला मिळते. वर्तमानकालीन समाजवाद समतावाद आधी सर्व पैलू यांचे दर्शन त्यांच्या तत्त्वज्ञानामध्ये पाहायला मिळते. हे लक्ष्य प्राप्त करण्यासाठी प्रामुख्याने बसवेश्वरांनी दोन तत्त्वे अनिर्वाय अनिवार्य म्हणून त्याकाळी स्वीकारली त्यामध्ये नंबर एक कायक व नंबर दोन दासोह.. ही दोन तत्त्वे होती. या शब्दाचे संक्षिप्त माहिती पाहताना कायक चा सरळ साधा अर्थ आहे वृत्ती. अथवा पेशा असा असा अर्थ होतो. परंतु सर्व वृत्ती कायक बनू शकत नाही. लोक मंगलाच्या भावनेशी निगडित वृतीलाच कायक वृती म्हणता येते .तर दुसरे तत्त्व म्हणजे दासोह होय. स्वतःला समाजाचा दास समजून वर्तन करणे म्हणजे दासोह होय. आपला जीवन निर्वाह चालवण्यासाठी किमान कमाई राखून ठेवून .बाकीची कमाई समाजासाठी अर्पित करणे याला दासोह असे म्हटले आहे. अशाप्रकारे जीवन जगत असताना सत्कर्म नसेल तर कोणालाही सुख मिळणार नाही सर्वांच्या हिताचे कर्म हेच श्रेष्ठ धर्म आहे. म्हणून कर्मयोगाच्या माध्यमातून कृषी कृतिशीलतेच्या माध्यमातून मानवी जीवनाला समृद्ध आणि संपन्न बनविण्याचा विचार महात्मा बसवेश्वर आणि त्या कालखंडामध्ये मांडल्याचे पाहायला मिळते.महात्मा बसवेश्वरांनी त्या कालखंडामध्ये समाजपरिवर्तनाची चळवळ मध्ययुगीन भारताच्या इतिहासामध्ये एक क्रांतीकारी पर्व निर्माण करणारी ठरली. म्हणून खऱ्या अर्थाने समाजक्रांतीचे उद्गाते बुद्धानंतर चा खरा विद्रोही महात्मा म्हणून महात्मा बसवेश्वरांकडे संपूर्ण जग अतिशय आदराने पाहत

असल्याचे पाहायला मिळते. महात्मा बुध्दानंतर खरे विद्रोही संत व लोकशाहीचे संस्थापक म्हणून महात्मा बस्वेश्वरांचे जीवन व कार्य हजारो वर्ष मानवमुक्तीचा संदेश देणारे ठरेल यात तिळमात्र शंका नाही.

**संदर्भ ग्रंथ**

*बहुजन नायक महात्मा बसवेश्वर*
*महात्मा बसवेश्वर- प्राचार्य शिवाजीराव भोसले*
*क्रांतिकारी बसवेश्वर जगत ज्योती बसवेश्वर- डॉ. सूर्यकांत घुगरे*
*संत साहित्य आणि दलित संवेदना संत साहित्य आणि अंधश्रद्धा निर्मूलन- प्राचार्य भगत सर*
*महात्मा बसवेश्वर बाराव्या शतकातील आद्य समाजसुधारक- डॉ. अशोक मेनकुदळे*
*बसवेश्वर रचिला पाया- डॉ. अशोक कामत*
*श्री.बसवेश्वर -एस.एस.वडेर*

# जातीयतेची शृंखला तोडणारे समाज सुधारक : महात्मा बसवेश्वर

प्राचार्य डॉ. राम जाधव

बाराव्या शतकातील थोर समाज सुधारक म्हणून महात्मा बसवेश्वर यांच्या कार्याला मानाचा मुजरा करावा लागेल. कारण ज्या काळात धर्म, जात, पंथ, मंगल - अमंगल यांचा हैदोस सुरु होता त्या काळात महात्मा बसवेश्वर यांनी मोठ्या निर्धाराने जात - पात, धर्म - पंथ यांच्या शृंखला तोडून आपल्या कल्पनेतील समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्याला इतिहास साक्षी आहे. भारतीय भूमी संताची भूमी म्हणून ओळखली जाते, तसेच ही देवभूमी म्हणूनही ओळखली जाते. त्याच बरोबर ही भूमी समाज सुधारकांची भूमी म्हणूनही ओळखली जाते. महात्मा गौतमबुध्दांनी या भूमीवर शांततेचा संदेश दिला. त्या गोष्टीला सुमारे अडीच हजार वर्षे उलटून गेली परंतु त्यांच्या कल्पनेतली शांतता शोधण्यात आपण यश मिळवू शकलो नाही. महात्मा बसवेश्वर यांनी जातीव्यवस्थेवर शब्दांचे व कर्तृत्वाचे आसूड ओढून जात नष्ट करण्याचा प्रयत्न केला पण अजूनही आपणास जातीयता नष्ट करण्यात यश आले नाही ही खरी खंत आहे. ही शोकांतीका आहे, असेच म्हणावे लागेल. महात्मा बसवेश्वर यांचा जन्म इ.स. 1105 मध्ये विजापूर जिल्ह्यातील बसवन बागेवाडी या गावी झाला. त्यांच्या आईचे नांव मादलांबिका व वडिलांचे नांव मादिराज असे होते. असे अनेक पुरावे जरी उपलब्ध असले तरीही म.बसवेश्वर यांच्या जन्मतिथी बद्दल विचारवंतात एकवाक्यता नाही. एक गोष्ट मात्र स्पष्ट निदर्शनास येते ती म्हणजे आमच्या बुध्दीच्या आणि तर्काच्या आधारे आम्ही समाजातील वेगवेगळ्या काळात होऊन गेलेल्या आमच्या थोर विभुतींच्या जन्मतीथी वरुन आम्ही सामान्य माणसाच्या मनात संदिग्धता, संशय निर्माण करण्यात मात्र यश मिळविले आहे. कारण अशा थोर विभुतीबध्दल ज्या जन्मतिथी वरुन वाद निर्माण करुन काय साध्य होते ? कोणते आत्मिक समाधान मिळते ? या प्रश्नाचे उत्तर मात्र अनुत्तरीतच राहत असते हे मात्र मान्यच करावे लागेल. तसाच काहीसा प्रकार बसवेश्वरांच्या जन्मतीथीवरुन घडला आहे. असो, पण महात्मा बसवेश्वर हे बालपणापासूनच अत्यंत मुलगामी विचार करणारे होते हे त्यांच्या जीव चरित्रावरुन म्हणता येईल. वयाच्या अवघ्या आठव्या वर्षीच त्यांनी स्वत:च्या घरापासूनच जुन्या परंपरा व रुढी बद्दलची नराजी व्यक्त केली आणि बंडाची - समाज सुधारणेचा झेंडा फडकवण्यास सुरुवात केली. बालवयात बालकांना अनेक प्रश्न पडतात. आपल्या मनातही भावना ते आई-वडिलांकडे व्यक्त करतात व आपले समाधान होईल असे उत्तर आई-वडिलांनी द्यावे असे त्यांना वाटते. म.बसवेश्वर आठ वर्षाचे झाले असतांना आई-वडिलांना त्यांची मुंज करावीशी वाटली, परंतु बसवेश्वरांनी आपली मुंज करण्याआधी आपल्या पेक्षा मोठ्या असलेल्या बहिणीची मुंज करावी मगच आपली करावी असा हट्ट धरला, त्याचबरोबर ते आपल्या आई-वडिलांना प्रश्न विचारु लागले की, यज्ञात दुध, तुप का बरे टाकायचे ? निष्पाप प्राण्यांचा बळी का द्यायचा ? देव प्राण्यांचा बळी का मागतो ? आपण माणसा - माणसांचा भेद करतो तो कोणता असतो ? अशा विविध प्रश्नांच्या सरबत्तीने आई - वडिल निरुत्तर झाले. आपल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे न मिळाल्यामुळे महात्मा बसवेश्वर यांनी ज्ञानसाधनेसाठी घर व गाव याचा त्याग करुन कृष्णा व मलप्रभा या दोन नद्यांच्या संगमस्थळी - कुडलसंगम येथे ज्ञानसाधना केली. (१) महात्मा बसवेश्वरांनी येथे तब्बल 12 वर्षे (वयाच्या बावीस वर्षापर्यंत) तप - साधना केली. येथे सर्व धर्माचा, पंथाचा अभ्यास करत असतांना त्यांचे मामा बलदेव हे कूडलसंगमला आले व त्यांनी म.बसवेश्वरांना मंगळवेढ्याला घेऊन आले आणि त्यांचा विवाह आपल्या मुलीशी गंगांबिका हिच्याशी लावून दिले. बलदेव हे राजा बिज्जलाच्या दरबारात होते. राजा बिज्जलाकडे त्यांचा राबता होता. त्यांच्या शब्दाला मान होता. त्यांच्या विनंतीवरुन राजा बिज्जलांनी म.बसवेश्वर यांना करणिकपदी विराजमान केले. म.बसवेश्वरांच्या कर्तबगारीचे, त्यांच्या ज्ञानाचा राजा बिज्जलांना मोठा अभिमान वाटे. म्हणुनच त्यांनी म.बसवेश्वरांची नियुक्ती कल्याण राजाच्या महामंत्रीपदी केली. या घटनेनंतर मात्र म.बसवेश्वर शासन - प्रशासन पर्वाचा प्रारंभ झाला. म.बसवेश्वरांनी सर्वप्रथम प्रशासनातील अधिकारांच्या आसनावर बसलेले परंतु स्वत:च

भ्रष्टाचारी असलेले तसेच कामचुकारपणा करणा-या अधिका-यांना बडतर्फ केले व भ्रष्टाचारमुक्त, लोकाभिमुख, लोकप्रिय प्रशासन सेवा निर्माण केली. अधिकारारुढ असलेल्या कोणत्याही अधिका-याने अथवा राजनियुक्त पदाधिका-याने स्वत:ला जनतेचा मालक न समजता स्वत:ला जनतेचा सेवक समजून शासन - प्रशासन केले पाहिजे हा विचार रुजविला आणि त्यातुनच पुढे त्यांनी समाजसुधारणेचे कार्य सुरु केले. त्यासाठी ते अस्पृश्यांच्या इलाख्यात जाऊ लागले, त्यांच्या अडी-अडचणी समजून घेऊ लागले. त्यांच्यासोबत वार्तालाप करणे, त्यांच्या सोबत भोजन करणे, त्यांच्या मनातील भय दूर करणे, माणसा-माणसातील निर्माण झालेली जातीयतेची दरी दूर करणे एवढेच नव्हे तर समाजात रुढ झालेली सतीप्रथा, देवदासी प्रथा सोडून द्यावयासाठी समाजाला विश्वासात घेऊन ती हळूहळू बंद करणे अशा सुधारणा करु लागल्यामुळे सामान्यतला सामान्य माणसाचा म.बसवेश्वरांच्या विचारावर विश्वास बसू लागला व तो निर्भयपणे आपली व्यथा, आपल्या अडचणी त्यांचे समोर मांडू लागला, त्यामुळे 12 व्या शतकात पारंपारीक पध्दतीने चालत आलेल्या रुढी - परंपरेला हादरे बसू लागले. प्रचलित असलेल्या चाली - रिती बंद करुन अस्तित्वाला बाधा आणणा-या म.बसवेश्वरांना यापासून कसे प्रवृत्त करावे याचाच विचार त्यांचे विरोधक मंडळी करु लागली. परंतु एव्हाना म.बसवेश्वरांचा समाज सुधारणेचा रथ वेगाने दोडू लागला आणि त्या रथावर विराजमान झालेले म.बसवेश्वर मंगळवेढा (जि.सोलापूर) येथे अनुभव मंटप स्थापन करुन तिथे समाजातील सर्व जाती, धर्म, पंथीयांसाठी समाज सुधारणावादी विचार मांडण्याचे एक (मुक्त) व्यासपीठ निर्माण करुन दिले. आणि या जगात आलेला प्रत्येक माणूस स्वत:चे विचार मुक्तपणे मांडण्यास सक्षम आहे हे जगाला दाखवून दिले. म्हणूनच तर म.बसवेश्वरांनी स्थापन केलेले अनुभव मंटप म्हणजे जगातील पहिली लोकशाहीचे संसद आहे असा निर्वाळा दिला जातो. पण हे काम फार सहज, सोप्या पध्दतीने झाले नाही, त्यासाठी त्यांना जागोजागी वैचारिक संघर्ष करावा लागला हे मात्र आपणास विसरता येणार नाही. महात्मा बसवेश्वर हे समतावादी होते. कारण त्यांनी समाजातल्या आठरा पगड जाती-जमातीतील स्त्री-पुरुषांना मानवी मूल्ये म्हणजे काय हे समजाऊन सांगितले, आणि जगातील सर्व मानव सारखेच आहेत, कुणीही श्रेष्ठ वा कनिष्ठ नाहीत हा विचार समाजमनात रुजविला म्हणूनच त्यांचे स्थान महापुरुषांच्या यादीमध्ये अग्रक्रमाने घेतले जाते. जगभरात ज्या प्रमाणे म.गौतमबुध्द, महावीर जैन, मोहम्मद पैगंबर, गुरुनानक, येशुख्रिस्त यांचे नांव ज्या आदराने घेतले जाते तेवढ्याच आदराने म.बसवेश्वरांचेही नाव लिंगायत धर्माचे संस्थापक म्हणून घेतले जाते. कारण या धर्माच्या माध्यमातून त्यांनी वर्णव्यवस्थेत विरोधच केला असे नाही तर समाजात असलेली अंध्दश्रध्दा, अज्ञान, दारिद्य दूर करण्यासाठी जातीयतेच्या शृंखला तोडून टाकल्या. जातीयतेचे उच्चाटन केल्याशिवाय आपले विचार जनसामान्यापर्यंत जाणार नाहीत. त्यांच्या मनातील भावना जाणून घ्यायची असेल तर या सर्व समाजाला बोलतं करणं गरजेचं आहे, त्यासाठी आधी जातीयतेची बंधनं निर्मिती केली व सामान्य माणसाचा आवाज स्पष्टपणे, कणखरपणे ऐकण्याचा प्रघात पाडला. विशेषत: त्यांनी या अनुभव मंटपात स्त्रीयांना फार मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन विचार मांडण्याची संधी दिली व स्त्रियांना प्रतिष्ठा प्राप्त झाली. स्त्रियांच्या अज्ञानाचा, अशिक्षितपणाचा फायदा घेऊन त्यांची आर्थिक लुबाडणून केली जात होती. त्याला आळा बसला. या सर्व सुधारणावादी विचाराचा समाजमनावर एवढा मोठा पगडा बसला की बाराव्या शतातल्या या महापुरुषाने कल्याणमध्ये एका चांभार समाजाच्या मुलाशी ब्राम्हण समाजातील मुलीचा प्रतिलोम विवाह घडवून आणण्याएवढी या लिंगायत धर्मातील शरण - शरणी म्हणून संबांधल्या जाणा-या समाजाची वैचारिक उंची वाढविण्याचे कार्य केले. म्हणूनच जातीयतेच्या शृंखला तोडणारे समाजसुधारक म्हणून म.बसवेश्वरोचे नाव इतिहासात अजरामर झाले आहे. महात्मा बसवेश्वरांनी निर्माण केलेल्या अनुभव मंटपात अनेक जाती-धर्माचे शरण एकत्र नांदत होते. अल्लमप्रभू, अक्कमहादेवी, सिध्दराम, चेन्नबसवण्णा यांच्यासह चांभार हरळय्या, कुंभार गुंडय्या, न्हावी आपण्णा, सोनार किन्नरी ब्रतय्या, मातंग चेन्नय्या, धोबी माचीदेव, बुरुड केतय्या, डोहर कक्कय्या, नावाडी चौडय्या,वेश्या संकत्वे, सत्यक्का, लक्कम्मा, अक्कम्मा, दुग्गुळे, बोंतादेवी, रामय्या असे सर्व प्रकारचे कायक (श्रम) करणारे स्त्री - पुरुष अनुभव मंटपात एकत्र बसून चर्चा करीत. (२)

बसववादी शरणांनी वर्णाश्रम पध्दती, वर्गव्यवस्था, जाती व्यवस्था, लिंगभेद व अस्पृश्यता उखडून टाकली. बसवण्णा मानवतावादी होते. दया त्यांचा धर्म होता. समता हा बसवण्णांचा ध्यास व श्वास होता. म.बसवण्णांनी स्त्री - पुरुष विषमता नष्ट करुन स्त्री शक्तीचा विधायक कार्यासाठी उपयोग करुन घेतला. स्त्रीया वचने लिहू लागल्या. त्यांची प्रज्ञा - प्रतिभा जागृत झाली. 70 स्त्रीया अनुभव मंटपाच्या सदस्या होत्या. बारा बलुतेदार व आठरा आलुतेदार बसवण्णांचे सखे सोबती व शिलेदार होते. वंचित उपेक्षित बहुजन समाज बसवण्णांच्या समता चळवळीचा केंद्रबिंदू होता. उच्च व श्रेष्ठ होण्याची इच्छा नाही तर शरणांच्या सवे राहण्याची इच्छा बसवण्णा व्यक्त करतात. माझे कुल कोणते ? तर मादार चेन्नय्याचे आहे. माझे पिता मादार चन्नय्या, आजोबा कक्कय्या व बंधु किन्नरी बोमय्या आहेत. चन्नय्या व कक्कय्या माझे कुलगोत्र आहेत. अशा प्रकारचे सुधारणावादी कुलगोत्र सांगणारे म.बसवेश्वर 12 व्या शतकातले क्रांतीकारक समाजसुधारकच आहेत. ज्या काळात शुभ-अशुभ, मंगल-अमंगल या मानसिकतेत वावरणा-या समाजाच्या मनातून जातीयतेची मुळे उखडून टाकणे हे अशक्य होते; तेच महत् कठीण कार्य त्यांनी करुन दाखवले. आणि जात-पात, धर्म-पंथ हे थोतांड आहे हा विचार समाजमनात बिंबवण्याचे कार्य त्यांनी केले आहे. म्हणूनच म.बसवेश्वरांनी आणि त्यांचे समकालीन आठरा पगड जातीच्या शरणांनी जी वचने रचली आतूनही जातीयता नष्ट करणे हाच हेतु होता. महात्मा बसवेश्वरांनी शरण-शरणींच्या मनात आणखी एक तत्व रुजविले होते ते म्हणजे कायक व दासोह. कायक म्हणजे कमावणे आणि दासोह म्हणजे वितरण करणे. काय - दासोहाचे पालन केल्यावर संगृहवृत्तीचा प्रश्नच येणार नाही हा विचार त्यांनी मांडून संगृहवृत्तीस विरोधच केला होता. कायक व दासोह हे म.बसवेश्वरांच्या तत्वज्ञानाचे दोन मुख्य तत्वे आहेत. कायक व दासोह एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. कायक म्हणजे नित्य कर्तव्य, विश्वातील प्रत्येक कायक करणारा घटक हा श्रमयोगाचा आनंद घेत असतो. कायक हा सर्वांना अनिवार्य आहे. म.बसवेश्वरांनी कायकाला कैलास संबोधले आहे. कायकाव्दारे प्राप्त अतिरिक्त संपत्ती समाजासाठी व्यय करणे म्हणजे दासोह. दासोह म्हणजे मी समाजाचा दास, सेवक आहे. स्वत:साठी जगत जगत थोडे समाजासाठी जगणे म्हणजे दाहोह. धन, धान्य, वेळ, श्रम व ज्ञानरुपाने समाजची सेवा करणे हा दासोह तत्वाचा व्यापक अर्थ आहे. (४) महात्मा बसवेश्वरांनी 12 व्या शतकात एवढे सुधारणावादी, एवढे पुढारलेले तत्वज्ञान जगाला सांगितले आहे. यावरुन त्यांच्या द्रष्टेपणाची जाणीव होते. 'इतरांसाठी जगलास तर जगलास, स्वत:साठी जगलास तर मेलास' असे विचार म.बसवेश्वरांच्या या तत्वज्ञानातूनच जन्माला आले असावे असे म्हणता येईल. बाराव्या शतकात सर्वत्र अंधश्रध्दा, दांभिकता, वैदिक कर्मकांडे जातीय स्तोम माजलेले होते. अशा विदारक परिस्थितीत विषमतेला कडाडुन विरोध करीत समाज परिवर्तनाची पताका खांद्यावर घेऊन दिशादर्शकाचे कार्य म.बसवेश्वर यांनी केले. अत्यंत तल्लख बुध्दी आणि बंडखोर विचाराचे पाईक असलेल्या म.बसवेश्वरांनी अगदी बालपणापासूनच सनातनी प्रवृत्तीला मुठमाती देण्याची कार्य केले आणि तेही आपल्या घरापासूनच ! कारण दैववादी परंपरेत बहुजन समाजाला जखडून ठेवण्याचे काम इथल्या व्यवस्थेने करुन ठेवले होते. माणसाचे माणूसपण नाकारण्याचे कट कारस्थान खुलेआम होत होते. तथागत भगवान बुध्दानंतर महात्मा बसवेश्वरांनी इथल्या प्रस्थापित व्यवस्थेवर प्रहार केले आणि बहुजन समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावले. तत्कालिन परिस्थितीच्या विरुध्द लढा देणे ही साधी आणि सोपी गोष्ट नव्हती परंतु आपल्या वैचारिक अधिष्ठाणाच्या बळावर त्यांनी तळागाळातल्या समाजातील अठरा पगड जातींना सन्मानाने जगण्याचा नवा मार्ग दाखवला म्हणूनच म.बसवेश्वरांचे विचार आज नऊशे वर्षानंतरही क्रांतीकारकच वाटतात. (५) आजच्या एकविसाव्या शतकात जातीयतेची टोकं अधिक प्रभावी होत असतांना म.बसवेश्वरांच्या क्रांतीकारी विचाराचे अनुकरण करण्याची हीच खरी वेळ आहे. हे समजून घेणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात छत्रपती राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, गोपाळ गणेश आगरकर, महर्षि धोंडो केशव कर्वे, जगन्नाथ शंकरसेठ, बाळशास्त्री जांभेकर, दादोबा तर्खडकर, डॉ.भाऊदाजी लाड, स्वामी दयानंद, ग.वा. जोशी, न्या. म.गो. रानडे, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, सयाजीराव गायकवाड, महर्षि नि.रा.शिंदे, महात्मा गांधी, विनोबा भावे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख, बाबा आमटे, पंडिता रमाबाई, वि.दा. सावरकर, स्वामी विवेकानंद, डॉ.शिवाजीराव पटवर्धन, एस.एम.

जोशी, राजा राम मोहन रॉय, फिरोजशहा मेहता, रविंद्रनाथ टागोर, चित्तरंजन दास, सरदार पटेल, डॉ. राजेंद्र प्रसाद, मौलाना आजाद, सुभाषचंद्र बोस, गाडगेबाबा, ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम या सारख्या शेकडो समाजसुधारक, विचारवंत संतानी म.बसवेश्वर यांच्यानंतरच्या काळात समाजसुधारन्याचा विचार दिला आहे, मात्र अद्यापही भारतीय समाज जाती-पातीच्या शृंखला तोडायला तयार नाही ही खरी शोकांकिता आहे. ज्या दिवशी सर्व समाजातील लोकांनी जातीयतेची शृंखला तोडून आपण सर्व एकच आहोत, आपण माणूस म्हणून जन्माला आलो आहोत येथे जन्म झाल्यानंतर आपणास जातीयतेचं लेबल लागलं आहे हे काही जन्माला येताना लागलेलं लेबल नाही अशी भावना आपल्या मनात निर्माण होईल तो दिवस ख-या अर्थाने महात्मा बसवेश्वरांनी सांगितलेला विचार समाजरुढ होत आहे याचा आनंद साजरा करणारा दिवस ठरेल असे वाटते.

**संदर्भ ग्रंथ :**

*बसव वचन, गुंजन भाग - 1 सं.प्रा.भीमराव पाटील*
*अंतर्वेध - राजू ब. जुबरे.*
*शरण संगम व कल्याण महोत्सव - सं. रविशंकर काळा.*
*जगत् ज्योती म.बसवेश्वर जयंती विशेषांक दै.सत्यप्रभा.*
*प्रेरणादायी म.बसवेश्वर.*
*परिवर्तनाचा महामेरु, म.बसवेश्वर.*
*बसवेश्वर - विकिपीडीया.*

## अनुभव मंटप : महात्मा बसवेश्वरांचे अद्वितीय कार्य

**प्राचार्य डॉ. सदानंद हरिबा गोणे & प्रा. डॉ. पद्माकर बालाजी गोणे**
*उज्वल ग्रामीण महाविद्यालय, घोणसी ता. जळकोट जि. लातूर*
*भूगोल विभाग,उज्वल ग्रामीण महाविद्यालय, घोणसी ता. जळकोट जि. लातूर*

**प्रस्तावना:** कर्नाटकात आणि इतरत्र सापडलेल्या शिलालेखांवरुन हे स्पष्ट होते की, लिंगायत धर्माचे थोर सुधारकख-या अर्थाने संस्थापक महात्मा बसवेश्वर इ.स.1134 ते 1196 या काळात होऊन गेले. त्या लेखांवरुन व इतर साहित्यावरुन हेही दिसून येते की, कल्याण येथील शैव राजा बिज्जळ यांच्या दरबारी ते पंतप्रधान व खजिन्याचे प्रमुख अधिकारी होते. बिज्जळ राजाने कर्नाटकातील गुलबर्गा शहरापासून 60 मैल अंतरावर असलेले ऐतिहासिक महत्वाचे कल्याण शहर चालुक्य राजाकडून हिसकावून घेतले व इ.स. 1157 ते 1167 च्या काळात तेथे राज्य केले. बसवेश्वरांनी पंतप्रधानपद सांभाळून अनेक क्रांतीकारक सुधारणा घडवून आणल्या. त्यामध्ये त्यांचे महत्वाचे कार्य म्हणजे अनुभव मंटपाची (आध्यात्मिक अनुभव संस्था) स्थापना होय. समकालीन शरणांच्या वचनांवरुन व बसवेश्वरांच्या मृत्युनंतर सुमारे 30 वर्षांनी लिहिल्या गेलेल्या त्यांच्या चारित्रावरुन, भारताच्या धार्मिक इतिहासात अजोड व अविस्मरणीय ठरलेल्या अनुभव मंटपाची स्थापना बसवेश्वरांनीच केली हे सिध्द होते. समकालीन शरणांची वचणे म्हणजे प्रत्यक्ष साक्षी होत. त्यामुळे त्यांना अधिकृत आधार मानायला हरकत नाही. म्हणून बसवेश्वरांनीच अनुभव मंटपाची स्थापना केली या ऐतिहासिक सत्या बद्दल तिळमात्र शंका नाही.

**अनुभव मंटपाच्या स्थापनेची कारणे :** अशा प्रकारची एक संस्था निर्माण करण्यामागे थोर सुधारकाचा मुख्य उद्देश हा होता की, तत्कालीन मरणासन्न धर्माला नवजीवन देणे.त्याने त्या धर्माला बुध्दी दिली म्हणण्यापेक्षा त्याला -हदय व हात दिले म्हणजे जास्त संयुक्तिक होईल.तत्कालीन समाज शोचनीय अशा अवनतीप्रत पोहोचला व मरणाच्या पंथाला लागलेल्या मानवतेला त्यामुळे मुळीच मदत होऊ शकत नव्हती. यावर उपाय म्हणूनच बसवेश्वरांनी धर्मामध्ये जिवंतपणा आणण्याचा प्रयत्न केला व अनुभवाच्या पायावर त्या धर्माची पुनर्निर्मीती करण्याचा विडा उचलला. त्यातूनच अंतत: अनुभव मंटपाची स्थापना झाली. दुस-या शब्दांत सांगायचे म्हणजे, बसवेश्वरांनी एका बाजुला जटिल अशा यांत्रिक व्रताचारणापासुन जो खुप काही सांगे, पण कृती मात्र शुण्य, अशा दोन्ही बाजुंनी धर्माचे रक्षण करण्यासाठी मोठा लढा दिला.

**अनुभव मंटपाचे धर्मिक महत्व :** अनुभव मंटप म्हणजेच धार्मिक अनुभव संस्था स्थापन करणारे थोर सुधारक बसवेश्वर त्यांचे केंद्रबिंदू होते व त्यांच्याभोवती लिंगायत संत, म्हणजेच धार्मिक अनुभव असलेले शरण जमा झाले. बसवेश्वरांना व अनुभव मंटपाला मदत करणारे, समकालीन वडीलधारे शरण म्हणजे मादार चेन्नय्या व डोहर कक्कय्या जे अस्पृश्य जातीमधून आलेले होते. ते दोघे श्रेष्ठ अशा आध्यात्मिक पिता व पितामह म्हणून संबोधित असत. प्रजा प्रभूत्वावर आधारित धर्म निर्माण करण्याचा बसवेश्वरांचा अमाप उत्साह, त्यांची तीव्र देवभक्ती, त्यांची मानव सेवेची अथक शक्ती, ज्यामुळे ते स्वत:ला सर्व शिवभक्तांपेक्षा कनिष्ठ समजत असत. त्यांचे निष्कपट -हदय, चुकभूल जाहीरपणे कबुल करणारे थोर मन, त्यांचा अनुकरणीय स्वार्थत्याग अशा थोर गुणांमुळे मंटपाच्या वैभवात भर पडली. अशा या अनुभव मंटपाची उभारणी मुख्यत: तिघा थोर शरणांनी केली. बसवेश्वरा, त्यांचा भाचा चेन्न बसवेश्वर आणि अल्लम प्रभू यांची तुलना ख्रिश्चन धर्मातील प्राचिन थोर धर्म प्रचारकांशी करता येईल.

**अनुभव मंटपाचे आधार स्तंभ :** अल्पकाळातच अनुभव मंटपाची कीर्ती सा-या भारतभर पसरली आणि निरनिराळ्या मतपंथांचे स्त्री-पुरुष त्यांच्या झेंड्याखाली एकत्र जमले. लिंगायत धर्माच्या अनेक प्राचीन ग्रंथावरुन असे समजते की, देशाच्या दुरदुरच्या प्रदेशातून उदा : पांड्य, चोळ, चेर, गुजरात, ओरिसा, बंगाल, काश्मीर, नेपाळ वगैरे

भागांतून शेकडो शिवभक्तांचा समूह एकत्र जमला. काश्मीरचा राजा महादेव भूपाल या नव्या पुनरुज्जीवन कार्याने प्रभावित झाला व त्याने आपल्या राज्याचा त्याग करुन अनुभव मंटपात प्रवेश मिळविला. नंतरच्या काळात त्याने साधी राहणी पत्कारती व उदरनिर्वाहासाठी मोळी विकण्याचा उद्योग सुरु केला. खुप दुरुन आलेला हा शरण एके काळचा राजा कल्याणमध्ये आल्यावर मोळिगे मारच्या (मोळी विक्या मारय्या) या नावाने ओळखला जाऊ लागला. त्याची पत्नी, पुर्वीची राणी महादेवी या नावाने तेथे वावरु लागली. अनुभव मंटपाच्या आध्यात्मिक पुष्पवाटिकेमध्ये काश्मीरची ही जोडी नीलकमलासारखी शोभत होती. कारण दोघेही गुप्त भक्तीकरुन प्रेमळ वागणुकीसाठी प्रसिध्द होते, ते केवळ बाहेरील दिखऊपणा किंवा राजवैभव किंवा अलौकिक परित्याग या गोष्टींमुळे अनुभव मंटपात उठुन दिसत नव्हते, तर आंतरिक साध्या राहणीने त्यांचा कीर्तिसुगंध सर्वत्र दरवळत होता. त्या राणीचे जे त्रोटक चरित्र साहित्यामधून उपलब्ध झाले आहे, त्यावरुन ती स्त्री कुळालाच आदर्श नारी झाली होती. कारण तिचे स्त्री सुलभ धैर्य व नैतिक धीटपणा त्याबरोबरच सौम्यता व विनयशीलता या गुणांमुळे ती आपल्या नव-याला सदैव सोबती, सल्लागार व मार्गदर्शक ठरली होती. उत्तरेकडील या राजदंपतीप्रमाणेच दक्षिण भागातूनही असाच एक राजा, सकलेश मादरस आपल्या राज्याचा परित्याग करुन कल्याणला गेला व तेथे एका तपस्व्याचे जीवन जगू लागला. वडिलांच्या आदेशानुसार त्याने बसवेश्वरांच्या नव्या चळवळीला हातभार लावला. अशी अनेक रत्ने कल्याणला धावून गेली. फक्त उच्च स्तरातील लोक कल्याणला गेले असे मुळच नाही. अनेक प्रकारच्या उद्योग धंद्यातील सामान्य माणसेही तेथे गोळा झाली.

**अनुभव मंटपाचे स्थान :** अनुभव मंटपाची सभा बसवेश्वरांच्या वाड्यातील एका खुल्या दालनात चालत असे. त्या दालनाला प्रारंभी महामने (महाभवन) म्हणत. नंतर त्यालाच अनुभव मंटप म्हणू लागले. या धार्मिक अनुभव मंदिरात प्रत्येक सभासद इतरांना आपल्यापेक्षा वडीलधारा समजत असे. त्या सभासदांच्या निवासासाठी अनुभव मंटपापासुन काही मैल अंतराच्या परिसरात ठिकठिकाणी जमिनीमध्ये गुहा खोदलेल्या होत्या. त्यांचे भग्नावशेष बसव कल्याणच्या अवशेषांमध्ये अजही पाहवयास मिळतात.

**अनुभव मंटपाची साधना :**

1) मुर्तिपुजक भारतामध्ये अनुभव मंटप अस्तित्वात येण्यापुर्वी कित्येक शतके मुळीच प्रचारात नसलेली अशी देवपुजेची नवीन पध्दत प्रचारात आणून त्यांनी देवोपासनेची कल्पना व पध्दत यामध्ये आमुलाग्र क्रांती घडवून आणली. अनुभव मंटपाने इष्टलिंगपुजा सुरु केली. देव एक आहे त्या एका देवाची उपासना करावी ही गर्जना केली.

2) लिंगदीक्षा पध्दत प्रचारात आणल्यामुळे सर्व जातींच्या व पंथाच्या स्त्री-पुरुषांना या नव्या धर्मात मुक्त प्रवेश मिळाला. या धर्माच्या सर्व अनुयायांना बंधुभाव निर्माण केला.

3) षट्स्थल सिध्दांताच्या प्रचाराने आत्मान्तराचे तत्व क्षीण झाले व त्यामुळे पुनर्जन्मवादाची पाळे-मुळे खणून काढण्यात आली.

4) आध्यात्मिक क्षेत्रात पुरुषांपेक्षा कमी दर्जा मुळीच नव्हता. त्यामुळेच धार्मिक क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचे मन:पुर्वक स्वागत करण्यात येई. इतकेच नव्हे, तर पुरुषांपेक्षा स्त्रियांची मुक्तकंठाने स्तुती करण्यात येई. अनुभव मंटपातील या अपवादात्मक सवलतीमुळेच भारतीय स्त्रियांची भाग्यरेषा एकदम बदलली.

5) अनुभव मंटप म्हणजे, लिंगायत धर्माचा चैतन्यस्त्रोत होता. अनेक मृतवत लोकांमध्ये नवचैतन्य निर्माण करुन व पापपंकात बुडालेल्या अनेक लोकांना वर उचलून त्यांच्यात अद्‌भुत परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य त्या अनुभव मंटपात झाले आहे.

6) तेथे स्फटिकासारखे -हदय परिशुध्द करण्यावर जास्त भर देण्यात येत आहे. तेथील शरण आपल्या अंतरंगात खोल-खोल शिरत व अधिकाअधिक दोष शोधून काढत. त्यामुळे आत्मशुध्दीसाठी तेथे अधिकाधिक प्रयत्न केला जाई.

7) धार्मिक बाबतीत आचार-विचारांचे पुर्ण स्वातंत्र्य व चर्चेला पुर्णवाव तेथे होता. परिणामी, तेथील प्रत्येक सभासद आपला अनुभव मुक्तपणे शुन्य सिंहासन च्या चरणी अर्पण करु लागला.

8) आपले विचार व अनुभव नव्या स्वतंत्र शैलीमध्ये व्यक्त करण्याची प्रथा सुरु झाल्यामुळे कन्नड भाषा समृध्द झाली.
9) कायकाला (श्रमाला) धार्मिक महत्व देऊन त्याची प्रतिष्ठा वाढविली व त्याबद्दलचे प्रेम सर्वांमध्ये निर्माण केले. ज्या शारिरिक श्रमाला स्वत:ला उच्चभ्रु समजणारे लोक हीन समजत, तेच काम मंगलमय व पवित्र समजून देवाच्या व मानवजातीच्या सेवेचे एक साधन मानण्यात आले.
10) अंधश्रध्दा व धार्मिक अपवित्र्याची विवेकहीन भीती यासारख्या अनिष्ट गोष्टिंपासून या नव्या समाजाला पुर्ण मुक्त करण्यात आले.
11) आधुनिक मानसशास्त्राने केलेले विविध प्रकारचे वर्गीकरण अनुभव मंटपात पहावयास मिळते. तो मंटप म्हणजे, धार्मिक अनुभवाच्या सुंदर नमुण्यांचे एक छोटे संग्रहालय होते असे म्हटल्यास वावगे ठरु नये.

अशा प्रकारची अद्‌भुत संस्था देशाच्या व जगाच्या इतिहासात अव्दितीयच म्हणावी लागेल. अशोकाची धर्मसभा, तामिळ संतांचा संगम, प्राचीन उपनिषत्कालीन जनकाची धर्मपरिषद किंवा अलीकडील अकबराची धर्मसभा वगैरेंची या प्रसंगी आठवण होते. परंतू अनुभव मंटप त्या सर्वांहुन वेगळाच होता. त्याने धार्मिक तत्वज्ञान व आचरण यांच्यात प्रचंड उलथापालथ घडवून आणली. थोडक्यात सांगायचे असेल तर, भारतीय धार्मिक इतिहासात या सम हा, नसे दुजा, असे म्हणावे लागेल.

**संदर्भ ग्रंथ :**

*अनुभव मंटप : संपादक राजु ब. जुबरे, महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी जि.बिदर - 2020.*
*ऐतिहासिक बसवकल्याण : प्रा. भीमराव ब्र. पाटील, बसव परिषद, भालकी.*
*शरण क्रांती दिशा आणि पाऊलखुणा : प्रा. भालचंद्र जयशेट्टी, बसव परिषद, भालकी.*
*षट्स्थल दर्शन : प्रा. डॉ. श्री. बसवलिंग पट्टदेवरु, बसव परिषद, भालकी.*

# महात्मा बसवेश्वरांची सामाजिक चळवळ

**प्रा. डॉ. विश्वनाथ गोविंदराव कंधारे**

*सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, वै.धुंडामहाराज देगलूरकर महाविद्यालय, देगलूर, ता. देगलूर जि.नांदेड*

मंगळवेढा राज्यात कडचुर्य वंशीय घराण्याचे राज्य होते. हे कडचुर्य कल्याणाच्या चालुक्य घराण्याचे मांडलिक होते. आजच्या कर्नाटक राज्यातील विजापुर जिल्हयातील बसवण्णां बागेवाडी गावातील मदीराज व मादालंविका यांचे पोटी इ.स. 1105 मध्ये अक्षय तृतीयाच्या दिवशी पुत्ररत्न जन्मास आले. जन्मलेल्या या पुत्राचे नाव बसव ठेवण्यात आले. तोच पुढे दिनदलीतांच्या उध्दारक व शोषितांचा बंधु सर्वांचा आण्णा महात्मा बसवण्णां झाले. बालपण व शिक्षण बसव गोडस, सुदृढ शरीराचा मनाने शांत घोर गंभिर तिक्ष्ण बुध्दिचा मुलगा होता. लेखन, गणीत, वाचन भरत छंदशास्त्र, व्याकरण, साहित्य, संगीत, मुळाक्षरे, अंकलिपी यामध्ये त्याने प्राविण्य मिळविले. बुध्दी तिक्ष्ण असल्याने बसवाने सर्व धर्मशास्त्रे अभ्यासली. बसवाचे निरीक्षण शक्ती अत्यंत सुक्ष्म होती. उपजत प्रज्ञा व प्रतिमा लाभलेल्या बसवाने चिकित्सक विद्रोही प्रश्न विचारुन सर्वांना आश्चर्य चकित केले.

**1) लिंगायत धर्माची पार्श्वभुमी :** 12 व्या शतकामध्ये व त्यापुर्वी देखील बौध्द धर्म, जैन धर्म आणी काळामुख धर्म या तीनही धर्माचे प्राबल्य होते. आठव्या शतकापासून ते 12 व्या शतकापर्यंत सिध्द धर्म संपुर्ण भारतात एक प्रमुख धर्म म्हणुन पसरलेला होता. त्याचबरोबर नाथपंथांचाही प्रसार झालेला होता. कर्नाटकात काळामुख परंपरेच्या मंटांचे अधिक प्राबल्य होते. 12 व्या शतकातील विविध धर्माकडुन झालेल्या अमानविय कृत्यास बळी पडलेल्या लोकांनी आत्मोन्नतीचा मार्ग शोधन्यास प्रारंभ केला होता. अशा परिस्थितीत समस्त मानकुलांचा उध्दार करण्यासाठी श्री बसवेश्वरांचे आगमन झाले व लिंगायत धर्माची खरी चळवळ येथुन सुरुवात झाली.

**2) बसवेश्वरांची मुख्य भंडारी म्हणून नेमणुक :** बसवण्णां राजवाड्याकडे आले असता बसवण्णा राजवाड्यातील कारभाराचे निरीक्षण करत असताना तेथे चाललेल्या भ्रष्टाचाराचा व्यवहार पाहून आश्चर्य चकित झाले. सिध्दाराम मंत्री हिशोब तपासणी आले असता मुख्य भांडारपाल यांनी त्यांच्यासमोर वार्षीक जमाखर्चाचा मसुदा मांडला. मंत्री सिध्दाराम तपासत असताना बसवण्णाच्या नजरेत एक फसवेगीरी दिसली त्या क्षणी बसवण्णा म्हणाले की मंत्रीमहोदय या जागी हिशोबात दोनदा दोनदा खर्चात घातलेले आकडे नोंदवुन सरकारी खजीन्यातुन पाच कोटी होणाचा दुरुपयोग केला गेला आहे. त्यामुळे प्रमाणीक गणकांना बोलवून त्यांच्याकडुन तपासणी केली तेंव्हा पाच कोटी होणाचा अपव्यय केलेला आठवुन आला. केवळ नजरेने इतकी मोठी चुक ओळखना-या बसवण्णांच्या गणित ज्ञानावर प्रभावित होऊन वर्षाकाठी 101 होणाचे वेतन देवुन मुख्य भंडारी म्हणून बसवण्णांची नेमणुक करण्यात आली.

**3) महात्मा बसवेश्वरांची जाती निर्मुलन चळवळ:**

शेट कसा म्हणु की श्रीयाळ शेटीस?
परीट म्हणुन कसा मदीयाळ माचय्यास
चांभार कसा म्हणु, डोहर कक्कयास
मातंग कसा म्हणु, मादार चन्नयास

जातीवरुन व व्यवसायावरुन माणसाचे श्रेष्ठत्व प्रमाण मानना-या बसवण्णांनी कक्कयास सर्वश्रेष्ठ महत्व दिले. “कायाक व कैलास म्हणजे” श्रम हेच कैलास होय, असा श्रमांचा शाश्वत सिध्दांत त्यांनी मांडला. त्यामुळे वर्णव्यवस्थेच्या इमारती आपोआपच कोसळल्या, बसवण्णांनी श्रम करणा-यांना सन्मान दिला. आळसी व ऐतखाऊ लोक हे राष्ट्रविनाशाचे कारण ठरु शकतात हे सिध्द केले. त्यामुळे गोरगरीब व उपेक्षित लोकांचे शोषण करणा-या पुरोहीत दुकानदारीला तडा गेला आणि भारतीय राज्यघटनेचा मुळ गाभा असलेली समता 12 व्या शतकात बसवण्णांच्या कार्यक्षेत्रात नांदु लागली. हा योगायोग नव्हे, चमत्कार नव्हे तर बसवण्णांच्या विद्रोहाचा परीपाक आहे.

**4) विरशैव व लिंगायत चळवळ :** भारत हा देश विभीन्न धर्म पंथ, संप्रदाय आणि अनेक जातींनी संमीश्रीत असा बहुविविध प्रकारचा आहे. अनेक धर्माप्रमाणेच त्यांचे - त्यांचे समाजही येथे गुणागोविंदाने वास्तव्य करतात, त्या

अनेक समाजापैकी विरशैव अथवा लिंगायत हा एक अल्पसंख्यांक समाज आहे. सद्यकालीन हिंदू समाजात शैव आणि वैष्णव असे दोन प्रवाह आढळतात. शैव प्रवाह शिव अथवा परशिव देवतेवर आणि वैष्णव विष्णु देवतेवर आधारीत आहे. तसे पाहीले तर मुळ भारतिय संस्कृतीही अनार्य अथवा अवैधिक आणि शिवदेवतेवर जोपासले आहे. तिलाच सिंधु संस्कृती असे म्हणतात.

**5) सद्यकालीन विरशैव समाज व आरक्षण :** विरशैव धर्मातील मालाजंगम, बेडाजंगम, बुडगा जंगम, हरळ्या (हराळी), कक्कया, (कंकय्या), चन्नया या जातीचा अनुसुचित जाती मध्ये समावेश केला असून त्या जातीबद्दल सत्य व विश्वसनिय माहिती खालीलप्रमाणे आहे. माला जंगम, बुडगा जंगम, बेडाजंगम ह्या जाती विरशैव धर्मातील (गुरुबर्ग) शाखेतील आहे. हा वर्ग मागासलेला आहे.

1) मालाजंगम : गळयात रुद्राक्ष माळ घालतात, आडवे भस्म, त्रिपुंड कपाळावर धारण करतात.

2) बेडाजंगम : लिंगायत शिवभक्ताचे घरी विवाह व इतर धार्मीक प्रसंगी क्रियाक्रम करतात.

3) बुडगा जंगम : झोळी घेवुन कोदंड भिक्षा मागने, क्रियाक्रम करणे व मठाची सेवा करणारे असतात.

4) लिंगदर : विरशैव धर्मातील भक्त धर्माला लिंगधर म्हणतात. त्यांनाच लिंगदर, लिंगधारी, लिंगवन, लिंगांगी, लिंगायत असे पर्यायवाची शब्द आहेत. या सर्वांचा अर्थ एकच असून ते गळ्यात लिंग (गुरुने दिलेले इष्टालिंग) धारण करतात. यातील विरशैव हा ग्रंथीक शब्द व लिंगायत हा रुढ शब्द आहे. लिंगधारीचा लिंगधर - लिंगदर असा अर्थ झाला. म्हणजे 'ध' चा 'द' होऊन (Lingader) असा अपभ्रंश झाला व महाराष्ट्र शासनाने त्याला मराठीत लिंगडेर केले.

5) हरळय्या : हि जात बसव कालीन चांभार संत हरळय्या यांचे नावावरुन रुढ झाली. त्याचा मुलगा शिलवंत आणि मधुय्या ब्राम्हणाची मुलगी बनज्जा यांचा विवाह 12 व्या शतकात बसवेश्वराने लावला आणि अस्पृश्यता नष्ट केली, या संताचे नावावरुन हरळय्या ही जात झाली.

6) कक्कय्या : हा देखील बसवकालीन थोर विरशैव संत विरशैव धर्मरक्षणासाठी लढून तो धारातिर्थी पडला, त्याचे नावावरुन कक्कय्या ही जात झाली. हा डोहर (ढोर) समाजाचा होता.

7) चनय्या : हा बसवकालीन मांग जातीचा संत होता, त्याच्या नावाने ही जात झाली. या सर्व संतांना बसवेश्वरांच्या अनुभव मंटप या धार्मीक संस्थेत महत्वाचे स्थान होते. हरळय्या, चनय्या या व्यक्तीच्या नावाने जाती निर्माण झाल्या. माल, बुडगा, बेडा या आचरणानुसार जाती झाल्या. तसेच विरशैव धर्मातील क्रियाक्रमानुसार लिंगदर ही जात मानल्या गेली.

उत्तराधिका-यांची निवड : जोपर्यंत आमच्या मठांच्या उत्तराधिका-यांची निवड वेगवेगळ्या जातीमधुन होणार नाही तोपर्यंत मठांचा उध्दार होणार नाही. एकाच जातीची मक्तेदारी ही आमच्या मठ व्यवस्थेतील धोक्याची घंटा आहे. म्हणुन यात बदल झाला पाहिजे. समजा आता एका जातीचा स्वामीजी असेल तर पुढील स्वामीजी दुस-या जातीचा निवडला पाहिजे. एकाच जातीची मक्तेदारी संपुष्टात आनावी हाच निर्णय घेण्यात यावा. असे झाले नाही तर आमचे मठ ही वंश परंपरागत चालनारी मोठी ग्रस्त धर्मी होतील त्या दिशेनेच मठांची वाटचाल चालू आहे. हे वेळीच थांबले पाहिजे. मी जंगम असेन तर पुढील उत्तराधिकारी भक्त वर्गातील असावा त्यापुढे तेली नेमावा त्यानंतर पंचमसाली असावा त्यापुढे रेड्डी, वाणी, न्हावी, परीट, चांभार, मातंग अशा विविध कायकजिवींना मठाचे उत्तराधिकारी केल्याने जातीव्यवस्था संपुष्टात येईल. आपण जोपर्यंत बदलत नाही तोपर्यंत सुधारणा परीवर्तन होने शक्य नाही. या अर्थाने शुध्दीकरण, नवीकरण होणे फार गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

*लिंगवंताची लिंगप्रभा : बस्वराज गुरु.*

*बसव मार्ग : डॉ. एम.एम. मेनसिनकाई.*

*महात्मा बसवण्णांची पाच नितीमुल्ये : पुज्य श्री डॉ. बसवलिंग पट्टदेवस.*

---

## महात्मा बसवेश्वर यांचे सामाजिक योगदान : एक दृष्टिक्षेप

**प्रा.डॉ. श्यामसुंदर पंढरीनाथ वाघमारे**

*प्रोफेसर तथा लोकप्रशासन विभाग प्रमुख, शारदा महाविद्यालय परभणी. E-mail: drswaghmare@gmail.com*

---

भारतीय समाजव्यवस्थेच्या नियंत्रणामध्ये वैदिक धर्म अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत होता.नव्हे, वैदिक धर्म भारतीय , अर्थ व राज्यव्यवस्थेचे संचालन देखील करीत होता. परंतु धर्म आणि त्यातील तत्त्व व्यक्तीच्या नैतिक, आध्यात्मिक उन्नतीच्या दृष्टीने प्रयत्न करण्यासाठी निर्माण झालेले असतानाही भारतीय वैदिक धर्माने मात्र स्त्री शूद्रांचे, म्हणजेच बहुजन समाजाचे नैतिक अधःपतन करण्याचा, त्यांचे सर्वांगीण शोषण करण्याचा प्रयत्नकेला. त्यामुळे समाज व्यवस्थेचा आधार धर्म व्यवस्था असल्याने धर्म व्यवस्थाच शोषण व अन्यायाचा पुरस्कार करीत असल्याने, साहजिकच भारतीय समाज व्यवस्थेतही अशाच प्रकारचे शोषण व अन्यायी तत्त्वांचे पालन करून संपूर्ण समाजाचे कल्याण पाहण्याऐवजी व्यवस्थेने विशिष्ट लोकांचे हित जोपासण्याचा प्रयत्न केला. म्हणजेच बाराव्या शतकापर्यंत भारतीय समाज व्यवस्थेत वर्णभेद,जातिभेद,स्त्रीदास्य, अस्पृश्यता, असमानता,अंधश्रद्धा,कर्मकांड, भ्रष्टाचार यासारखे असंख्य दोष निर्माण झाले होते. त्यामुळे समाज व्यवस्था विषमतावादी व शोषण युक्त बनली होती. म्हणूनच या समाज व्यवस्थेत परिवर्तन करणे आवश्यक झाले होते. त्यामुळेच आधुनिक मूल्य व विचारधारेवर आधारित, ज्यामध्ये वरील प्रकारचे दोष राहणार नाहीत अशी समतावादी, मानवतावादी समाज व्यवस्था निर्माण करण्याचा महत्त्वाचा प्रयत्न महात्मा बसवेश्वरांनीकेला.

महात्मा बसवेश्वर लहानपणापासूनच चिकित्सक बुद्धीचे असल्यामुळे त्यांनी कुडलसंगमला आल्यानंतर ब्राह्मण धर्माशी संबंधित ग्रंथांचा अभ्यास केला होता. त्यानंतर ते या निष्कर्षापर्यंत आले होते की, तत्कालीन समाजात निर्माण झालेली विषमता,जातीयता,कर्मकांड,अंधश्रद्धा, दारिद्य व शोषण सर्व वैदिक संस्कृतीची फळे आहेत. म्हणूनच त्यांनी समाजाचे अवमूल्यन करणारी मुले व वर्चस्व नाकारण्याचे फार मोठे धाडस बाराव्या शतकात केले. गौतम बुद्धानंतर वेद व त्यातील विषमतत्वज्ञानावर जाहीरपणे टीका करण्याचे धाडस मध्ययुगात सर्वात प्रथम बसवेश्वरांनी केले होते.

1. **ग्रंथप्रामाण्यासनकार:** देव, धर्मग्रंथ स्वतःचेच श्रेष्ठत्व , पण ते स्वतःचे रक्षण करू शकत नसतील, सत्य ओळखू शकत नसतील आणि त्यांच्यामध्येच फार मोठे दोष असतील, तर सर्व सामान्यांसाठी त्यांचा काय उपयोग? म्हणूनच बसवेश्वरांनी बाकी सर्व व्यर्थ मानून फक्त कुडलसंगमदेवासम्हणजेच सत्य आणि नित्य मानून ग्रंथप्रामाण्यसाफ झिडकारले.सत्यता लपविणार्या ग्रंथामुळे समाजात तेढ निर्माण होते. परिणामी समाज दिशाहीन होतो आणि दिशाहीन समाजात समता प्रस्थापित करणे अत्यंत कठीण काम असते. म्हणूनच बसवेश्वरांनी वैदिक ग्रंथांना विरोध . वैदिक ग्रंथांतील सामाजिक विषमता व कर्मकांडाची पाळेमुळे पाहून बसवेश्वर म्हणतात,

आदिपुराण असुरांना मारकआहे,
वेदपुराण बकऱ्याला मारक आहे,
रामपूराणराक्षसाला मारक आहे,
भारतपुराण गोत्राला मारकआहे,
सर्व पुराणे कर्माधीन आहेत
तुमच्या पुराणासम अन्य नाही कुडलसंगमदेवा.

म्हणजेच वैदिकांनी पुराणांची निर्मिती स्वतःच्या रक्षणासाठी आणि इतर समाजाचे शोषण करण्यासाठीच केली . प्रत्येक पुराणात हिंसा,मारकता,कर्मकांड दिसत असून स्वार्थाने पुराणे कर्माधिन झालेली आहेत असे बसवेश्वर म्हणतात. म्हणूनच अंधश्रद्धा व कर्मकांडावर आधारित वेद,पुराणयुक्त संस्कृती बसवेश्वरांनी नाकारली.

2. **यज्ञ पुरोहित व बळी प्रथेला विरोध:** बसवेश्वर मात्र चिकित्सक प्रवृत्तीचे असल्याने त्यांनी यज्ञप्रथेचा त्यातील बाह्य अवडंबरांचा सखोल अभ्यास केला. या वेळी त्यांच्या लक्षात आले की, काही स्वार्थी पंडितांनी आपल्या स्वहिताकरिता आंधळ्या श्रद्धा निर्माण करून या यज्ञांच्या माध्यमातून लोकांना लुटणे सुरू केले होते. त्यामुळे यज्ञसंस्कृती समाजास घातक आहे म्हणून त्यांनी यज्ञ, पुरोहित व बळी प्रथेवर जोरदार प्रहार चढविला. एका वचनामध्ये बसवेश्वर म्हणतात,

चार वेद जाणून घेतले,सोळाशास्त्रे, अठरा पुराणे,
अठ्ठाविस आगम हे सर्व,वाचून,ऐकून,होम करुन
त्यात बकऱ्याचा बळी देऊन खाणे हा आचार आहे?

म्हणजेच वेद,शास्त्रे, आगम वाचन करूनहोमामध्ये एखाद्या निष्पाप बकऱ्याचा बळी देत असाल तर तो सदाचार नाही, स्वसमाधानाकरिता कर्मकांड उपयोगाचे नाहीत, होम,हवन, यज्ञाच्या माध्यमातून आपणास कोणतीच फलप्राप्ती होणार नाही असा उपदेश त्यांनी केला. पुरोहितांचे शोषणकार्य, यज्ञातील अपव्यय, सोवळ्याचा अतिरेक,बाह्य कर्मकांड,दुषटाचरण यातून निर्माण होणारी मानसिक गुलामगिरी यावर बसवेश्वरांनी सडकून टीका केली आहे.

3. **चातुर्वर्ण्य व्यवस्थाअमान्य:** बाराव्या शतकातील समाजातील विविध प्रकारच्या विषमतेची मूळे प्राचीन काळापासून चालत आलेल्या आपल्या समाजव्यवस्थेत आहेत. म्हणूनच या दोषास्पद पायावर उभारलेल्या समाजव्यवस्थेची शल्यचिकित्सा आवश्यक आहे असे बसवेश्वरांना वाटले. म्हणूनच त्यांनी सर्वात पहिला प्रहार केला तो चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर. कारण ही चातुर्वर्ण्य व्यवस्था वैदिक संस्कृतीचा मूळ आधार असून यातूनच पुढे समाजात अनेक विकृती निर्माण झाल्या. अशा प्रचंड संख्येने असलेल्या बहुजन समाजाचे शूद्रांचे जीवन मात्र अत्यंत लांच्छनास्पद स्वरूपाचे होते. या शूद्र समजल्या जाणाऱ्या लोकांना त्यांचे नैसर्गिक हक्क व अधिकारापासून पूर्णतः वंचित करून त्यांचे शारीरिक मानसिक व आर्थिक शोषण व्यवस्थेने करविले होते. या सर्वांची पाठराखण करणारी तरस्त्री-शुद्रांसाठी कर्दनकाळ ठरली होती.चातुर्वर्ण्य व्यवस्थेची उभारणी ब्राम्हणांचे हित जोपासून इतर बहुजन वर्गाचे विशेषतः शूद्रांचे सर्वांगीण शोषण करण्यासाठी झाली होती. भारतीय समाजाची जी आज सामाजिक, धार्मिक व आर्थिक स्वरूपाची विभागणी झाली आहे, त्यातून प्रचंड स्वरुपाची विषमता निर्माण झाली, त्याच्या मुळाशी चातुर्वर्ण्य व्यवस्था होती.म्हणून महात्मा बसवेश्वरांनी समानतेवर आधारलेला समाज निर्माण करण्यासाठी ही चातुर्वर्ण्यपद्धती नाकारली. समाजाचे विभाजन न करता गरजेनुरूप, कौशल्यानुसार विभाजन करून एकरूप समाज निर्मितीचे कार्य त्यांनी सुरु केले होते.

4. **जातीव्यवस्थेला विरोध:** भारतीय समाज व्यवस्थेला लागलेला फार मोठा शाप म्हणजे जातीव्यवस्था होय. या जातिव्यवस्थेचा उदय आजपासून दोन हजार वर्षांपेक्षाही अधिक काळापासून झाला आहे .समाजात विशिष्ट परिस्थितीमध्ये उदयाला आलेल्या वर्णव्यवस्थेचे रूपांतर जाती व्यवस्थेमध्ये झाले आहे. खरे तर, समाजाच्या प्रगतीसाठी कर्तृत्वावर आधारित वर्गवारी उपयुक्त ठरत असते. आजही आपल्या प्रशासकीय व्यवस्थेत कौशल्यावर आधारित श्रेणी पद्धत प्रचलित आहे. परंतु प्राचीन काळात सुरू झालेल्या वर्ण किंवा श्रेणी पद्धतीचे जेव्हा जाती पद्धतीत रूपांतर झाले, तेव्हा कर्माचा आधार हा गुण न राहता जन्म ठरला गेला. त्यानुसार ज्या जातीत जन्माला आला, त्याचे कर्म ठरले गेले. यामुळे कौशल्य,गुण या बाबी मागे पडून श्रमाची कामे करणारे, सेवेची जबाबदारी सांभाळणारे वर्ग कनिष्ठ, नीच मानले जाऊन बुद्धीची कामे करणारी जात श्रेष्ठ मानली जाऊ लागली. हळूहळू वरिष्ठ जातींनी समाजावर आपली पकड घट्ट बसवून शूद्र समजल्या जाणाऱ्या जातीतील लोकांची शोषण प्रक्रिया सुरू केली.जाती- जातीमध्ये प्रचंड भेदाभेद निर्माण होऊन समाजाची विषमतेवर विभागणी झाली. श्रेष्ठ-कनिष्ठ ठरविणारी माणसा-माणसात भेद निर्माण करणारी, एका समुदायाचे सर्व मानवी हक्क नाकारणारी परंपरागत अशी जाती पद्धती बसवेश्वरांना अजिबात मान्य नव्हती. म्हणूनच त्यांनी अनेक वचनांच्या माध्यमातून, कृतीच्या माध्यमातून जाती पद्धतीला विरोध केलेला दिसतो. त्याचे परिणामही महात्मा बसवेश्वरांना लवकरच पुढे दिसू लागले. त्यांनी स्थापन

केलेल्या अनुभव मंडपातील प्रवेशाचा जातींवर आधारलेला असल्यामुळे अठरापगड जातींची मंडळी अनुभव मंडपात प्रवेश घेऊ शकली व समाजापुढे नवा आदर्श निर्माण करू शकली. म्हणजेच गौतम बुद्धा नंतर मध्ययुगात जाती पद्धतीला विरोध करण्याचे कार्य प्रथम महात्मा बसवेश्वरांनी केले आहे.

5. **अस्पृश्यता निवारण्याचा प्रयत्न:** भारतीय समाज व्यवस्थेला लागलेला महाभयंकर रोग म्हणजे अस्पृश्यता होय. माणसाला जनावरा पेक्षाही हीन आणि अन्यायी जीवन भोगावयास लावण्याचा हा एक अघोरी प्रकार होय. त्यामध्ये माणसाचे मन मारणे, त्या किळसवाण्या नरकाचा रहिवास तो स्वेच्छेने परत करील अशी वृत्ती त्याच्या ठिकाणी उत्पन्न करणे,निर्वाहाच्या दरवाजावर जागोजागी निषेध नियमांचेपहारे बसवून त्याला अगतिक व अभिमान शून्य करणे, अन्यायाने करकचून बांधल्यावर अधून मधूनदातृत्वाचे खरकटे त्याच्या अंगावर फेकून त्याला कृतज्ञ करू पाहणे म्हणजे अस्पृश्यता होय. अशा या मानवी रोगाने भारताचे फार मोठे नुकसान केले आहे. म्हणूनच अस्पृश्यता नष्ट झाल्याशिवाय जातीयता नष्ट होणार नाही आणि जातीयता नष्ट झाल्याशिवाय सामाजिक समता प्रस्थापित होणार नाही आणि त्याशिवाय समाजाची, देशाची खरी प्रगती होणार नाही याची जाणीव सर्वप्रथम महात्मा बसवेश्वरांना झाली होती. म्हणूनच त्यांनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी कृतिशील कार्यवाही सुरू केली होती.

6. **शिक्षणाबाबत नवदृष्टीकोण:** महात्मा बसवेश्वरांनी कोणताही भेद न करता सर्व मानवजातीसाठी खुले आणि मुक्त वातावरणामध्ये शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. अनुभव मंटपातील अठरापगड जातीची,गरीब-श्रीमंत,स्त्री-पुरुष शूद्रादी याचे उत्तम उदाहरण आहे. या सोबतच शिक्षणास, श्रम संस्कृतीला महत्त्व देऊन, उद्योग व्यवसायाला गौरव प्राप्त करून देऊन शिक्षणाच्या माध्यमातून,स्त्री शुद्रा सह सर्व व्यक्ती, समाज सद्‌गुणी बनविण्याचा प्रयत्न केला. अज्ञान हे सर्व दुःखांचे मूळ मानून ज्ञानाच्या माध्यमातून दुःखावर विजय मिळविता येतो हे बुद्धाचे तत्व महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात पुन्हा पुढेआणले. या संदर्भातप्रा. राजशेखर सोलापुरे म्हणतात,महात्मा बसवेश्वरांचा अज्ञान अस्ताचा विचार प्रत्येकाने स्वीकारला तर व्यक्तीनिर्मित सर्व समस्यांचा अंत निश्चित होईल यात शंका नाही. म्हणजेच सर्व मानसिक, सामाजिक व आर्थिक समस्यांवर रामबाण उपाय आहे. हे बसवेश्वरांनीसांगितले. या ज्ञानदानाच्या कार्यासाठीच अनुभव मंटप स्थापन करून योग्य ही महात्मा बसवेश्वरांनी सुरू केली होती.

7. **स्त्री-जीवन विषयक सुधारणा:** भारतीय समाज व्यवस्थेचा मूलभूत आधार असलेली स्त्री वेगवेगळ्या रुढी, परंपरा व धार्मिक बंधनांनी प्राचीन काळापासूनच बांधली गेल्यामुळे अधिकार व हक्कांपासून वंचित होऊन शरीर असून प्राण नसल्यासारखी झाली होती. भारतातील जवळपास सर्व शास्त्रे स्मृती व पुराणकारांनी स्त्रि ही जन्मताच शुद्र असते,यावर शिक्कामोर्तब केले होते प्राचीन काळापासून वेद अध्ययन,शिक्षणाचा,संपत्तीचा, घटस्फोटाचा स्त्रीला अधिकार मिळू न देता पुरुषांच्या उपभोगाची एक वस्तू म्हणूनच तिला सेवेसाठी वापरण्याचा प्रयत्न सुरु होता आणि आजही तो सुरू आहे. म्हणूनच डॉ.आ. ह. साळुंखे म्हणतात, एकूणच हिंदू संस्कृतीने स्त्री जीवनावर प्रचंड स्वरूपाचा अन्याय केला आहे. बाराव्या शतकामध्येही स्त्रियांचे जीवन फारसे सुधारलेले नव्हते.स्त्री- जीवनाची ससेहोलपट, तिच्यावर होणारा अन्याय, स्वतः महात्मा बसवेश्वरांनी पाहिला, अभ्यासला होता. म्हणूनच स्त्रियांच्या जीवनामध्ये आमूलाग्र परिवर्तनाची आवश्यकता आहे हे बसवेश्वरांनी हेरले. महात्मा बसवेश्वराकडे दूरदृष्टी असल्यामुळे भविष्यातील भारतीय समाजाची प्रगती आणि स्त्री जीवनाचा विकास या बाबी परस्परांशी जोडल्या आहेत. स्त्री कुटुंब आणि समाज जीवनाचा महत्त्वाचा घटक असल्यामुळे ह्या घटकाला दुबळे ठेवणे म्हणजे संपूर्ण समाज व देशाला दुबळे ठेवण्या यासारखे आहे, असे महात्मा बसवेश्वरांना वाटले. म्हणूनच महात्मा बसवेश्वरांनी स्त्रीला धार्मिक, सामाजिक व आर्थिक दृष्टिकोनातून सशक्त करण्याची मोहीम हाती घेतली.

8. **गुन्हेगारांना सुधारण्याची संधी:** गुन्हेगारी हा एक सामाजिक रोग आहे. त्याचे विपरीत परिणाम व्यक्ती व समाजावर होत असतात. म्हणूनच त्याचे उच्चाटन आवश्यक आहे. आज आपल्या समाजामध्ये मुख्य प्रवाह सोडून वाममार्गाला जाणारे किंवा समाज मान्य नसलेले उद्योग व्यवसाय करणारे अनेक व्यक्ती व समाज समाज घटक आहेत.मध्ययुगातही अशा प्रकारच्या अपप्रवृत्ती ला बळी पडलेले समाजविघातक कृती करणारे अनेक गुन्हेगार व्यक्ती समुदाय होते. त्यांना अनेक कठोर स्वरूपाच्या शिक्षा दिल्या जात असत. अशा व्यक्ती समुदायाला वठणीवर आणण्यासाठी दोन मार्ग अपेक्षित असतात. त्यामध्ये पहिला मार्ग अहिंसात्मक पद्धतीने परिवर्तन करण्याचा आणि दुसरा दंडात्मक कार्यवाही करून शिक्षा करण्याचा. त्यामध्ये सर्वसामान्य पणे दुसरा मार्ग प्रत्येक व्यक्ती व शासक

निवडत असतो. जवळपास अनेक शासकांनी हा दुसरा मार्ग निवडलेला दिसून येतो. परंतु या दंडात्मक बंदोबस्ताचा परिणाम दूरगामी राहील की नाही याची शाश्वती नसते. याचा अनुभव आज पर्यंत जग घेत आले आहे. पहिला अहिंसात्मक मन परिवर्तनाचा जो मार्गआहे,तोहळूयश देणारा पण कायमचे यश देणारा आहे, म्हणूनच महात्मा बसवेश्वरांनी अहिंसात्मक गुन्हेगाराला प्रायश्चित्त घेण्याचा एक मार्ग उपलब्ध करून दिला होता.

**9. अंधश्रद्धा, कर्मकांड विरोधी जागृती:** बाराव्या शतकापर्यंत दक्षिण भारतामध्ये समाजात अनेक अंधश्रद्धा व कर्मकांड निर्माण झाले होते.अज्ञान, अंधश्रद्धा व भीतीपोटी लोक भुताखेतांच्या ची पूजा करु लागले होते. नद्या,नाले, स्मशानभूमीसह वृक्ष, रस्त्यावरचा दगड,मारी,मस्ती,सूप,कंगवा,धनुष्य, मातीची गाडगी यासारख्या बाबीही देवता बनल्या होत्या. त्यामुळे देवतांची संख्या बेसुमार वाढली होती.परिणामतः समाज त्याचे दुष्परिणामही होऊ लागला होता. महात्मा बसवेश्वरांनी सामाजिक परिवर्तनासाठी समाजाच्या तत्कालीन स्थितीची ज्या वेळेला चिरफाड केली, त्या वेळेस त्यांच्या निदर्शनास आलेले होते की, भारतीय समाजाची जी दुर्दशा झालेली आहे, सामान्य जनांचे जे शोषण सुरू आहे, त्यामुळे हे लोक गरीब बनत आहेत, त्या दुर्दशेचे, शोषण व गरिबीचे मूळच या अंधश्रद्धा व कर्मकांडाच्या मध्ये आहे. म्हणूनच बसवेश्वरांनी अज्ञानी व अंधश्रद्धाळू बनलेल्या समाजाला श्रद्धा व विवेकाच्या आधारावर जागरूक बनविण्याचा प्रयत्न केला. महात्मा बसवेश्वरांच्या काळात भारतीय समाजात ढोंगीपूजा, यज्ञयाग, बहुदेवतावाद, तीर्थयात्रा, उत्सव, ज्योतिष, शकुन-अपशकुन, वार, वेळ, राशी, नक्षत्र या संदर्भाने अनेक अंधश्रद्धा व कर्मकांड निर्माण झाले होते. ते दूर करण्याचा महात्मा बसवेश्वरांनी महत्त्वाचा प्रयत्न केला. अंधश्रद्धा व कर्मकांडावर कठोर प्रहार करून समाजाला नवी दिशा देण्याचा त्या अनुषंगाने सामाजिक दोष दूर करून व समाजाची निर्मिती करण्याचा बसवंत महात्मा बसवेश्वरांनी प्रयत्नकेला. यासाठी नशिबावर अवलंबून न राहता केवळ शिवशिव करत न बसता,दैववादाला फाटा देऊन प्रयत्न वादावर,परिश्रमावर श्रद्धा ठेवण्याचा उपदेश त्यांनी केला. आजही हा त्यांचा उपदेश प्रासंगिक ठरतो. भारतीय दैववादी जनता ईश्वराच्या भक्ती व दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात पैसा आणि वेळ खर्च करीत आहे. एवढाच वेळ आणि पैसा समाजाच्या हितासाठी जर वापरला तर समाजाचे चित्र फार बदललेले दिसणार आहे. निश्चितच यासाठी बसवेश्वरांचे विचार तत्त्वज्ञान स्वीकारावे लागणार आहे ,कारण खरा ईश्वर कृतीशील आहे, हे बसवेश्वर यांनी सांगितले होते. एकंदरीत महात्मा बसवेश्वर केवळ वाचाळ पंडिता प्रमाणे समाज उद्धाराचे नुसते भाषणच करून थांबले नाहीत, तर तत्कालीन समाजव्यवस्थेमध्ये जे दोष निर्माण झाले ते दूर करण्यासाठी त्यांनी एक भक्कम चळवळ उभी केली. या नवसामाजिक व आर्थिक उत्थानाच्या चळवळीच्या माध्यमातून समाजाला आधुनिक दृष्टी त्यांनी प्राप्त करून दिली. तीच दृष्टी आजही दीपस्तंभाप्रमाणे आपणा सर्वांना प्रकाशीत करीत आहे महाराष्ट्राच्या संदर्भात सांगायचे झाल्यास, संत तुकाराम, छत्रपती शिवाजी, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, महात्मा गांधी,डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्या मार्गाने कार्यरत झाले, त्यासाठी निश्चितच बसवेश्वरांच्या परिवर्तनाच्या या चळवळीचा प्रकाशित होता. म्हणूनच डॉ.पि.बी. देसाई म्हणतात, महात्मा बसवेश्वर केवळ रिकामा तत्वज्ञानी,धर्मात्मा, विचारवंत नव्हते, तर प्रत्यक्ष कृती, गती व ठामपणा असणाऱ्या मनाचा व भावनांचा आवेश असलेला तो मानव होता. त्यांच्या क्रांतिकारी मनाने आपल्या कल्पना व आदर्श प्रत्यक्ष कृतीत आणण्याचे मार्ग शोधले. म्हणजेच समाजव्यवस्थेच्या परिवर्तनासाठी त्यांचे योगदान अभूतपूर्व असेच होते.

**संदर्भसूची :-**

*राधाकृष्णन सर्वपल्ली, धर्म और समाज, राजपाल अँड सन्स,दिल्ली, पृष्ठ क्रमांक79.*

*मेनकुदळे अशोक, आद्य समाज सुधारक महात्मा , महाराष्ट्र बसवपरिषद, हिरेमठ संस्थान, भालकी (कर्नाटक)दुसरीआवृत्ती, डिसेंबर 2008, पृष्ठ क्रमांक 81.*

*पाटील बाळासाहेब (संपा), बसव पथ (मराठी द्वैमासिक),मे - जून 2011, पृष्ठ क्रमांक 43.*

*पाटील बाळासाहेब (संपा), बसव पथ मराठीद्वैमासिक,नोव्हे-डिसें. 2010, पृष्ठक्रमांक 34 35.*

*दोडमनी शालिनीताई (संपा.), महामानव बसवण्णांची समग्र वचने, पृष्ठ क्रमांक30.*

*डोणगावकर वेदप्रकाश, महात्मा बसवेश्वरांचेतत्वज्ञान,पृष्ठ क्रमांक 25*

*जिरोबे राजेंद्र, वचनामृत बसवेश्वरी, श्री. व्ही. बी. पाटील, श्री. मृत्युंजय शरण साहित्य प्रचारक संघ, हिराबाग, मुंबई 1983, पृष्ठ क्रमांक 1*

*डॉक्टर सचितानंद बिचेवार, परिवर्तनाचा महामेरू महात्मा बसवेश्वर, स्वाती प्रकाशन पूर्णा, प्रथम प्रथम आवृत्ती, एप्रिल 2015, पृष्ठ क्रमांक.92, ते112*

---

# महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांची प्रासंगिक गरज

**प्रा. डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे**

*मराठी विभाग प्रमुख, शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव ता. चाकूर जि. लातूर*

*ई मेल -bdigole007@gmail.com*

---

भारतामध्ये अनेक महाकवी, नाथ, महानुभाव, संत, पंडित, शहिर, महात्मे, धर्मप्रेषित होऊन गेले आहेत. भारतीय संस्कृतीची इमारत भक्कम करणा-या अनेक महामानवांमध्ये महात्मा बसवेश्वरांचे स्थान सर्वश्रेष्ठ आहे. महात्मा गोतमबुध्द, महावीर, येशू ख्रिस्त, महंमद पैगंबर, झरथ्रुष्ट्र, गुरूनानक, बहाऊल्ला यांच्याप्रमाणेच महात्मा बसवेश्वर धर्मप्रेषित आहेत. महात्मा बसवेश्वर 12 व्या शतकातील वीरशैव शिवरंगामध्ये एक ज्येष्ठ समाजसुधारक आणि राष्ट्रसंत, मध्ययुगीन भारताचे जनक होत. वारकरी, महानुभव, समर्थ आदि मराठी संतसप्रंदायाची बीजे बसवेश्वरप्रणीत क्रांतीत द्रग्गोचर होतात. वारकरी व महानुभाव संप्रदायातील जनमान्यांच्या प्रादेशिक भाषेचा कैवार, स्त्री-शुद्रादींवर होणा-या अन्यायाविरूध्द केलेला दंभस्फोट, उच्च-नीच विषमतेविरूध्द केलेली प्रखर टीका, भक्तीची शिकवण, शुध्दाचरण, कीर्तनाचा पुरस्कार हे सारे विशेष बसवेश्वरांच्या शरण चळवळीने आधीच सांगीतले आहेत. सा-या दक्षिण भारतात अठरापगड जातींना एक नवीन पारमार्थिक जाग आणली होती. क्रांतीकारक बसवेश्वरांच्या संगठन कौशल्यामुळे अक्षरशः हजारो स्त्री-पुरूषांना दिलासा मिळाला. विविध जाती जमातीतून संतकवी उदयाला आले. कोणत्याही जातीधर्मातील सामान्य माणसाला लिंग धारण करता येतो. श्रमशक्तीला प्रतिष्ठा दिली 'काय कवे कैलास', (श्रम हेच स्वर्ग) हा महामंत्र दिला. 'दासोह' सारखी दानपरंपरा सूरू केली. या दान परंपरेची आज कोरोना कोविड 19 च्या महामारी संकटात अडकलेल्या समाजाला प्रासंगिक गरज आहे. स्त्रियांना धर्मचिंतनाचा अधिकार मिळवून दिला. अनुभाव मंटपात लोकशाहीची बीजे पेरली. महात्मा बसवेश्वरही केवळ एक धर्मसंस्थापक व्यक्ती नाही, तर अखिल मानवजातीच्या अंतिम कल्याणाच्या दिशेने प्रयत्नशील राहण्याची अखंड प्रेरण देणारी एक शक्ती आहे. कन्नड आणि मराठी संतसाहित्याचे नाते फार पुरातन काळापासून अत्यंत दृढ आहे. भौगोलिक व ऐतिहासिक कारणांनी एकमेकांवर अवलंबून आहेत. दोन्ही राज्यातील लोकांचा आहार, वेशभुषा, सण-उत्सवच, जत्रा-यात्रा, आराध्यदेवता आणि संतपरंपरा, संगीत इत्यादी गोष्टीत समानता दिसून येते. महानुभाव, वारकरी इत्यादी संप्रदायाच्या साहित्यावर महात्मा बसवेश्वरांच्या वचन साहित्याचा प्रभाव ठळकपणे दिसून येतो. महात्मा गांधीसारख्या व्यक्तीसुध्दा त्यांच्या या सामाजिक कार्यामुळे प्रभावित झाल्या. म्हणून त्यांनी ''महात्मा बसवेश्वर हे देशातील पहिले समाजवादी आहेत''. असे गौरवोद्‌गार काढले आहेत. महात्मा बसवेश्वरांनी आचार हाच स्वर्ग अनाचार हा केवळ नरक असे म्हटले आहे. बसवेश्वरांनी आपल्या एका वचनात ''आपला देह हाच देवाचे मंदिर आहे, दोन पायावर ते अढळ उभे आहे, आपले मस्तक हेच त्याचा कळस आहे.'' असे म्हटले आहे. अशा ईश्वर तत्वाची आराधना करणारे सर्व लोक समान आहेत. या जगात माझ्यापेक्षा लहान कोणी नाही आणि देवापेक्षा मोठा कोणी नाही. जी व्यक्ती सर्व मानव कोटीचे भले चिंतते तो महात्मा आहे. संत ज्ञानेश्वरांनीही चांगदेवपासष्टी, ज्ञानेश्वरी, अमृतानुभवातून जिथे जीव तिथे शिव ही चिद्‌विलासवादाची, विश्वकल्याणाची, मानवतावादाची संकल्पना मांडली ते महत्मा बसवेश्वरांच्या प्रभावातून मांडली आहे. संत

नामदेवांना तर महाराष्ट्राचे महात्मा बसवेश्वर म्हणावे इतके दोघांच्या कार्यात साम्य आहे. महात्मा बसवेश्वरांनी अनुभव मंटपाची स्थापना करून सर्व जातीधर्माच्या लोकांना एका झेंडयाखाली आणले आणि समानतेचा संदेश जगाला दिला. त्याचप्रमाणे संत नामदेवांनी सुंभाचा करोदारा करून, हातात चिपळया, गळयात विना घेऊन तेराव्या शतकातील सर्व जातीधर्माच्या स्त्री-पुरूषांना, भोळया भाबडया लोकांना एकत्र आणून कीर्तनाच्या माध्यमातून 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी।।' असे म्हटले असे लोकोध्दाराचे कार्य केले. ''शिंपीयाचा नामा, दिसा माजी शिवी। रात्री माजी शिवी।।'' म्हणजे श्रम हेच ईश्वर ही शिकवणूक दिली. स्वतंत्र विचार करण्याची क्षमता बालवयापासूनच दोघांमध्ये होती. बसवेश्वरांनी वीरशैव पंथाच्या माध्यमातून जी शिवशरण चळवळ उभी केली. ती अभूतपूर्व घटना होती. महाराष्ट्रातील समाजसुधारकांना विशेषतः महात्मा गांधी, महात्मा फूले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज इत्यादींना बसवेश्वरांच्या कार्यापासून प्रेरणा मिळाली. साहित्यिक, कवी, योगी, क्रांतीकारक यांना व्यासपीठावर आणून सुसंघटीत केले. धर्मचिंतन व तत्वचिंतन सर्वसामान्यांची लोकभाषा असलेल्या कन्नड भाषेत सूरू केले. लोकभाषेला धर्मवाणी बनविले. जेथे सत्य, शील, करूणा, मानवता नांदते तो आदर्श समाज ही सामाजिक जाणीव होती. महात्मा बसवेश्वर हे आचारशुध्द मानव होते.

महात्मा बसवेश्वरांमध्ये भेदाभेद, वाद, कलह दिसून येत नाही. अशा वाईट बाबींकडे लक्ष न घालता माणसाच्या धार्मिक व मानसिक विकासाला अधिक प्राधान्य दिले. त्यांनी त्यांच्या वचनांमधून नीती व सदाचरण यांना फार महत्व दिले आहे. समाजामध्ये जेथे जेथे दुर्वर्तन दिसून येते, तेथे तेथे त्यांनी वज्राप्रमाणे भेदून कठोरपणे खंडन केले. संत तुकारामांनीही लोककल्याणाची तळमळ आपल्या अभंगातून व्यक्त करताना म्हटले की, ''बुडती हे जन। न देखवे जेष्ठा। म्हणोनि येतो कळवळा।।'' त्याप्रमाणे महात्मा बसवेश्वरांच्या वचनातील विश्वबंधुत्वाचे विचार अतिशय महत्वाचे आहेत. ते समस्त चराचर प्राण्यांकडे करूणादृष्टी ठेऊन पाहत असत. दयाविरहित धर्म तो कोणता? दया हवी समस्त प्राणीमात्रांमध्ये दयाच धर्माचे मूळ असते. डोंगरावरील झाडे डोंगरास व्यपिल्याविना राहती का? विचार करून पाहिल्यास सृष्टीमधील समस्त प्राणी त्या परमात्म्याप्रती गेल्याविना राहती का? दुष्टांपासून दूर राहण्या पळून जाणा-या प्राण्यांचा पाठलाग करून त्यांना ठार मारल्यास परमेश्वर त्यांना नरकात ढकलल्याशिवाय राहिल का? समस्त प्राण्यांची अत्यंत काळजी घेण्याची शिकवण आपल्या वचनसाहित्यातून दिली. हा पर्यावरणवादी विचार आज चिन या देशाने पायदळी तुडवून पर्यावरणाचे प्रदुषण वाढवले आहे. चिनने सैनिकांना पक्षांचा पाठलाग करायला लावून एका दिवसात दोन लाख पक्षी मारले. त्यामुळे निसर्गाचा समतोल ढासाळून विषाणूचा प्रार्दूभाव वाढला. त्याचा परिणाम आज सर्व जगाला भोगावे लागत आहे. हे हा निसर्गवादी, पर्यावरणवादी विचार आज एकविसाव्या शतकातही गरजेचा आहे. म्हणून मीच श्रेष्ठ, मोठा, शहाणा असे म्हणून संकट ओढवून माणूस घेत आहे. अंतरंगात ज्ञान प्राप्त न करता व बहिरंगात आचरण न करता, ईश्वराची, कृपा माझ्यावर होईना, हवालदिल होणारे आणि प्राण्यांची हत्या करणा-यांचा आणि पुत्रशोक एकाच प्रकारचा प्रसंग होय. चार वेद, अठरा पुराणे, सहा शास्त्रे यांचा अभ्यास केला, तर माझेच खरे, असे रेटून सांगत आहेत. दुस-यांचे म्हणणे जिंकून त्यांना पराजित करावे असे एखादी तरी वाक्ये कुठे लिहिले आहे का? या सर्वांचे चिंतन केल्यास सर्व प्राण्यांचा संहार करावा, त्यांचे हातपाय तोडावेत असे एखादे विधान कुठेही आढळत नाही. तर त्या सर्वांमध्ये सर्वजीवदयापरताच सांगितलेली आहे. महामा गौतमबुध्दानेही जातककथांमध्ये सर्वांवर दया, करूणा दाखवा हेच सांगितले आहे. संत नामदेवांनी भूतदया सांगितली आहे. म्हणजे सर्व प्राणीमात्रांवर दया करा त्याचबरोबर महात्मा चक्रधरांनी संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनीही हाच विचार मांडला आहे. 'ससीकरक्षण' या

लीळेत चक्रधरांनी सशाचा पारध्यांपासून जीव वाचवून जंगलात सोडून दिले. हा पर्यावरणवादी विचार आज खूप आवश्यक आहे. हाच विचार महात्मा बसवेश्वर मांडताना म्हणतात की, एखाद्याशी व्यवहार करताना त्याला मालक समजून व आपण सेवक माणूस बोलावे वाटेने चालताना हात मागे पुढे हलविताना पंख असलेले सूक्ष्म कीटक असतात. त्यांना धक्का बसून दुखापत होऊ नये याची काळजी घेऊन चालावे. सर्वजीवदयापरता पाळताना कोणताही भेदभाव न करता समानता पाळावी. चर व अचर प्राण्यांविषयी दया असावी. सर्वजीवदयापरवाचा संभ्रम पाळून लिंगाचे स्मरण केल्यास त्यामध्ये समरस होण्याची भक्ती निर्माण होते. अगदी हा विचार आजच्या वैज्ञानिक युगाची कास धरणा-यांना लागू आहे. तुम्ही पृथ्वीवर व्यवहार करताना तुम्हीही जगा आणि आम्हांलाही जगू द्या असा करत नाही. श्रीमंत - गरीब, ज्ञानी - अज्ञानी, व्यापारी - कामगार, स्वामी - सेवक, अधिकारी - खालचे कर्मचारी, श्रेष्ठ - कनिष्ठ असा भोदभाव ठेवून लोक अहंकार, गर्व, ताठा, द्वेष, मत्सर, लोभ ठेऊन दुस-यावर अन्याय करतात. साधू, संत, भ्रष्ट वगात आहेत. समाजात चारित्र्य, शील, नीतीमत्ता उरलेली नाही. मग आपण परमेश्वराला दोष देत आहोत. आज धर्मभोळेपणा, कीर्तन, भजन, भक्ती, देव, धर्म या कोरोनावर का मात करत नाही मला असे वाटते की, पृथ्वीवर आपण कसेही स्वार्थसाठी स्वैर वागून स्वातंत्र्याचा दूरूपयोग करायचा. नदीत हागून ठेवायचे आणि नद्या प्रदुषित झाल्या म्हणायचे. मग तिथे ईश्वर काय करील आपण सृष्टीमधील सूक्ष्म जीवांवर प्रेम करू लागलो. त्यांना समानतेची वागणूक देऊ लागलो, कष्ट करू लागलो, आई -वडीलांची सेवा करू लागलो म्हणजे इथेच ईश्वरभक्ती असते. हा विचार बसवेश्वरांनी बाराव्या शतकात सांगितलेला आहे. समस्त प्राणी हे आपल्याला नाचणा-या बाहुल्या वाटू लागल्या तर हा भेदभाव होईल. दुस-यांना कमी समजू नका. सर्व प्राण्यांना उत्पत्ति - स्थिती - लय अवस्थात्रयाने खेळविणारे गुणत्रयरूपी ब्रम्ह, विष्णू, शिव हे नावाचे तीन देव आहेत. हा अद्वैती तत्वज्ञानाचा विचार त्यांनी मांडला आहे. आपण जिंकून दुस-यांना पराभूत करण्याची भावना अगदी वाईट असून ती सर्व जीवांमध्ये सारखीच आहे. सूर्योदय झाल्यावर सूर्यकिरण चांगला वाईट जीव न म्हणता शुध्द, अशुध्द न मानता सर्वांना सारखे प्रकाशित करतात. तद्वत माझ्या मनात तथ्य, मिथ्य, राग द्वेष हे विकार मिळूनच आपला प्रभाव पाडतात. परंतु कोणताही भेदभाव न मानता सर्व जीवावर तुझी कृपा चालू राहू दे अशी धारणा माणसाची असावी असा बसवेश्वरांना मानवाला समानतेचा व करूणेचा संदेश आपल्या वचनातून दिलेला आहे. जातीयतेचे भेदभाव महात्मा बसवेश्वरांना मान्य नाहीत. तसेच स्त्री-पुरूष भेदभावही त्यांच्या ठिकाणी नाहीत. सर्वजण समान मानून जेथे बोलण्यात व चालण्यात एकरूपता आहे. तेथे त्यांनी महत्व दिले आहे. बसवेश्वरांनी जातिभेदाला मूळीच थारा दिला नव्हता. त्यांनी नेहमी सदाचार व सद्वर्तनाला महत्व दिले होते आणि ते ज्यांच्या ठिकाणी होते, त्यांनाच ते कुलीन मानत होते. आजही लिंगायत धर्म ब्राम्हणविरोधी आहे असे समाजतात. हे अगदी साफ चुकीचे आहे. महात्मा बसवेश्वर जातीविषयी अगदी अगदी उच्च पातळीवर विचार करतात. ते कोणत्याही जातीधर्माचा द्वेष करत नाहीत. शत्रूंना मित्रासमान मानतात. बसवेश्वरांच्या मते धर्म म्हणजेच समताभाव होय प्रत्येक जीव हा शिवांश असल्यामुळे प्रत्येक मानव हा मुलतः समान आहे. या विचाराचा त्यांनी आग्रह धरलेला आहे. हा मोठा अन् तो लहान हा आपला अन् तो परका ही भावना, प्रवृत्ती कोणत्याही व्यक्तीने बाळगू नये. सर्वजण समान आहेत. शिवऐक्य आहेत अशा मानवतावादी समतावादी विचारांचे बसवेश्वरांनी समर्थन केले आहे. धर्म, जात, वंश, वर्ण, वर्ग, लिंग, व्यवसाय अथवा कोणताही सामाजिक भेदभाव त्यांनी बाराकोस दूर ठेवला. प्रत्येकाचा माणूस म्हणून सदोदित गौरव झाला पाहिजे. सर्वच परमेश्वराची लेकरे आहेत हा समताभाव व मानवताभाव व्यक्त करताना महात्मा बसवेश्वर एका वचनात म्हणतात, ''हा कोण? हा

कोण? असे म्हणू देऊ नका, असा भावही माझ्या मनी येऊ देऊ नका, हा आमुचा, हा आमुची, हा आमुचा असेच म्हणवून घ्या, हे कुडलसंगमदेवा'' बाराव्या शतकात पंतप्रधानपदी असताना बसवेश्वरांनी ब्राम्हण व चांभार यांच्यातील आंतरजातीय विवाहाला जी मान्यता दिली तसेच स्पृश्य - अस्पृश्य यांच्यातील सामाजिक समतेसाठी आपल्या पंतप्रधानपदाचा जो त्याग केला. त्यामध्ये समतेचीच भावना दिसून येते हे आजच्या राजकीय नेत्यांनी महात्मा बसेवश्वरांच्या विचारांचे चिंतन करून समाजात राबवावेत. प्रा. भीमाशंकर बोधे यांनी म्हटल्याप्रमाणे ''तयार चौकटीमध्ये चित्र रंगविणे खूप कठीण असते. जातीच्या उतरंडीमध्ये पूर्वाश्रमीचे ब्राम्हण म्हणून बसवेश्वर सर्वोच्चस्थानी असताना देखील त्यांनी सामाजिक समतेचा व जातिविहीन समाजरचनेचा आग्रह धरला. हेच बसवेश्वरांचे खरेखुरे मोठेपण आणि सामाजिक दृष्टेपण होय.'' महात्मा बसवेश्वरांचा वैचारिक दृष्टीकोण खूप सर्वसमावेशक व व्यापक आहे. महात्मा बसेवश्वरांनी स्त्रियांना गौण लेखणा-या प्रवृत्तींना तसेच सर्व प्रकारच्या अंधप्रथांना कडाडून विरोध केला आहे. बसवेश्वरांच्या मते स्त्री ही कोणत्याच बाबतीत पुरूषापेक्षा कमी अथवा गौण असू शकत नाही. हाच प्रभाव पुढे संतावर पडला आहे. वारकरी संप्रदायातही संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत सोयराबाई, संत कान्होपात्रा, संत बहेणाबाई, संत निर्मला या स्त्रियांना समतेची वागणूक मिळाली ज्याप्रमाणे संतानी परस्त्री आम्हा रूक्मिणी माते समान मानले. त्याचप्रमाणे वीरशैव संप्रदायातील शिवभक्तांनी परस्त्रीला पार्वतीमातेसमान मानावे. स्त्रियांना पाहून चंचल होऊ नको रे मना, उद्दामपणे वागणा-या मदान्धांना किडयांच्या कुडात फेकल्याविना राहील का, आमचा देवराय सोडू? म्हणून जेथे पाहावे तेथे मन आकर्षित झाले, तर शपथ, परस्त्रीस प्रत्यक्ष महादेवी म्हणून पाहीन. असे बसवेश्वरांनी तत्कालीन समाजाला स्त्रियांचा आदर करण्यास सांगितला आहे. महात्मा बसवेश्वरांचा स्त्रीविषयक दृष्टीकोण आजच्या समाजाने आत्मसात केला तर स्त्रियांवर, अत्याचार, बलात्कार, क्रूर अशा हत्या होणार नाहीत. म्हणून त्यांच्या विचारांची आजच्या भरकटलेल्या तरूणांना प्रासंगिक गरज आहे. बसवेश्वरांच्या या समतावादी दृष्टीकोणावर भाष्य करताना निर्मलकुमार फडकूले म्हणतात, ''भारतीय समाजात स्त्रीच्या कपाळी शतकानुशतके गुलामगीरीच लिहिली गेली माता, भगिनी, पत्नी आणि कन्या या नात्यांनी पुरूषांच्या जीवनात वावरणारी स्त्री नेहमीच पुरूषांपेक्षा कनिष्ठ प्रतीची मानली गेली. स्त्रीचा उल्लेख प्राचीन काळापासून शुद्रांच्या बरोबरीनेच केला गेला. धर्माच्या नावाखाली तिच्यावर बंधने घालण्यात आली होती. स्त्रीच्या जीवनाला व व्यक्तिमत्वाला पुरूषाइतकीच प्रतिष्ठा आहे. पुरूषाहून स्त्री कोणत्याही अर्थाने कमी दर्जाची नाही. स्त्री - पुरूष समान आहेत, असा उद्घोष बसवेश्वरांनी केला आणि स्त्रीच्या ठायी असलेल्या शक्तिची, बुध्दीची, प्रतिभेची व कर्तृत्वाची , जाणीव सा-या समाजाला करून दिली. सुधारलेल्या युरोपखंडातदेखील अलिकडेच स्त्री-पुरूषांची समानता मान्य करण्यात आली, पण बाराव्या शतकात स्त्रीच्या भोवती उभारण्यात आलेली अशास्त्रीय व अधार्मिक कुंपणे मोडून काढून स्त्रीमुक्तीचा नवा विचार रचनात्मक दृष्टीकोणातून मांडणारे बसवेश्वर काळाच्या कितीतरी पुढे पाहू शकत होते. याबद्दल संशय करत नाही.'' बसवेश्वरांच्या या विचारांचा प्रभाव छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज यांच्यावर पडला. हा आदर्श आजही घेण्यासारखा आहे. आपल्याकडे पुरूषाला जीवनाची अनेक क्षेत्रे सदैव खुली आहेत. विवाह, प्रपंचाचा त्याग करूनसुध्दा तो रमार्थयात्री ठरू शकतो. याउलट स्त्रीला मात्र पुरूषाच्या भावविश्वात स्थान असेल तर असते आणि त्याच विश्वात रमून तिला त्याच्या प्रपंचाची बाग फुलवावी लागते. एखाद्या वृक्षाच्या आधाराने स्वतःची सिमित वाट स्वीकारणा-या विनम्र वेलीसारखी तिची स्थिती राहते. अशा एकूण सामाजिक परिस्थितीत बसवेश्वरांनी स्त्रियांना विशुध्द भक्तीमध्ये जीवन पुरूषांप्रमाणेच निवडण्याचा अधिकार आहे हे पटवून दिले. अक्का

महादेवी हे त्यांचे उत्तम उदाहरण ठरते. बसवेश्वरांच्या प्रेरणेने कर्नाटक-महाराष्ट्रात अनेक ठिकाणी वीरशैव पंथाचा प्रचार-प्रसार होऊ शकला. स्त्रीवर्गाची आणि उपेक्षित जमातीची प्रतिष्ठा वाढू लागली. समता, बंधुता या मूल्यांचे महत्व मान्य होऊ लागले. कल्याणातील मधुवैय्या या प्रतिष्ठित ब्राम्हणाच्या रत्ना नावाच्या मुलीचा विवाह हरळैय्या नामक अस्पृश्याच्या शीलवंत या मुलाशी जुळवून आणण्यात बसवेश्वरांनी पुढाकार घेतला तेंव्हा सनातनी वृत्तीचे लोक खुपच खवळले. मधुवैय्या हा जरी उच्चकुलीन ब्राम्हण असला तरी तो शिवशरण आहे. त्याचप्रमाणे चर्मकार हरळैय्या देखील शिवशरणापैकीच आहे. त्यामुळे त्यांच्या जाती जमाती भिन्न नाहीत शिवशरण सारे एकाच जातीचे असतात. शिवाय विवाहाला अनुभवपंथाचा आणि शिवशरणांचा पाठींबा होता. बसवेश्वरांनी सनातन्यांच्या विरोधाची पर्वा न करता जिद्दीने हा आंतरजातीय विवाह घडवून दाखविला त्या काळातील हे महत्वाचे सामाजिक कार्य आहे. अनुभवमंटपाच्या साहयाने बसवेश्वरांनी सामाजिक क्रांतीच्या दिशेने त्या काळात फार मोठी वाटचाल केली. समता, बंधूता श्रमप्रतिष्ठा ही त्यांच्या क्रांतीकार्याची मुख्य त्रीसूत्री होती. अनुभवमंटपात पुरूषाच्या बरोबरीने स्त्रियादेखील चर्चा, संवाद करीत असत. सत्यक्वल रायम्मा, अक्कनागम्मा, नीलम्मा, मुक्ताम्मा, लक्कम्मा, कळब्वा इत्यादी अनेक भगीनींना अनुभवमंटपामुळेच समाजात प्रतिष्ठा प्राप्त झाली. पुरूषांप्रमाणे स्त्रियांनाही लिंगदिक्षा दिली. तत्कालीन समाजातील स्त्रियांना महादेवी, शक्तीस्वरूप मानले. बालविवाहाला विरोध, पुर्नविवाहाला व आंतरजातीय विवाहाला पाठिंबा हे बसवेश्वरांचे कार्य त्याही काळात क्रांतीकारक ठरले. तसेच आजही समाजाच्या विकासासाठी संजिवनी आहे. बाराव्या शतकात कर्मकांडाचे फार मोठे थैमान माजले होते. समाज आत्मभान विसरून धावत सुटला होता. पूजा, विधी, हवन, यज्ञ, अग्निपूजा यासंबंधी समाजात अंधश्रध्दा बोकाळलेली होती. अशा कर्मकांडावर बसवेश्वरांनी प्रथमतः प्रहार केला. यज्ञाधी विधीची पूर्तता हा वेळ, श्रम व पैसा यांचा शुध्द अपव्यय होय. बसवेश्वरांनी होम, हवन, यज्ञ, पूजा निषेध मानले आहेत. अशा यज्ञांमध्ये बळी देण्यासाठी ओढून नेत असलेल्या बोकडाला उद्देशून आपल्या वचनात सांगतात, ''मंत्र म्हणत-म्हणत, पहा देती तुला बळी, अरे बोकडा तू रड, वेद वाचना-यापुढे रड तुझ्या रडण्याने तरी बळी देणा-यांना करील शासन कुडलसंगमदेव'' पुरोहित वर्गाने नानाविध प्रकारच्या वैदिक मंत्राचे मायाजाल उभे करून अंधश्रध्दांना खत-पाणी घातले. पूजा, उपचार, कर्मकांड यांचे अवास्तव स्तोम त्यांनी कधीही मान्य केले नाही. अशा थोतांड, बुवाबाजी, ढोंगी, संन्याशी, कर्मकांड निर्माण करून समाजाची फसवणूक करणा-या दांभिक प्रवृत्तीवर वज्राप्रमाणे कठोर अशा शब्दांत प्रहार केला. संत गाडगेबाबा यांनीही नवस-सायास, बळी देणे याला विरोध केला. यांनीही पुराण कथा सांगून समाजाला लुबाडणा-यांचा पर्दाफाश केला. महाभारतातील रामायण, भागवत, उपनिषद, मनुस्मृती इत्यादी ग्रंथातील कथा सांगून आणि यजमानाने दिलेल्या भीक्षेवर आपल्या भारतात दिडशे वर्ष राज्य ब्रिटीशांनी करून 40 कोटी जनतेच्या डोक्यावरील केस मोजले याचा यांना पत्ताही लागला नाही. ज्ञानवृध्दिंगत करणारे विचार समाजाला कधीही सांगितले नाहीत. म्हणून तर आपल्या देशातील लोकांना गुलामगिरीचे जीवन जगावे लागले. अशा कर्मकांडाचा आणि वाईट प्रवृत्तींचा विरोध लोकहितवाद्यांनी केला आहे. त्यांच्यावर बसवेश्वरांच्या विचारांचा प्रभाव मला जाणवतो. मागील चार पाच वर्षात अशा प्रवृत्तीला डॉ. नरेंद्र दाभोळकर, कलबुर्गी, कॉ. गोविंद पानसरे यांनी विरोध केला म्हणून त्यांचा खून करण्यात आला आहे. पुरोगामी विचाराला सतत संपवण्याचा प्रयत्न आपल्या देशात झालेला आहे. बसवेश्वरांनी समाजातील वाईट प्रथांना, प्रवृत्तीला आपल्या वचन साहित्यातून विरोध करून सत्यता समाजासमोर आणली. अंधश्रध्देमुळे सर्वसामान्यांचे शतकानुशतके शोषण होत राहिले. त्याची खंत महात्मा बसवेश्वरांनी व्यक्त केली आहे. माणसामध्ये फक्त नैतिकता असली पाहिजे असे म्हटले जाते.

पण नेमके नीतीमत्ता म्हणजे काय? हेच अजूनही समजलेले नाही ईश्वरभक्तीसाठी अंतरंगशुध्दी व बहिरंगशुध्दी आवश्यक आहे. संत तुकारामांनी ''नाही निर्मळ मन वरून काय करील साबण'' ''हातच्या काकणाला आरसा कशाला'' ''शुध्द बीजापोटी फळे रसाळ गोमटी'' असे म्हटले आहे. ''खाण तशी माती'' ''गहू तशी रोटी'' ''वरून एक आतून एक'' ''खायचे दात वेगळे अन् दाखवायचे दात वेगळे'' ''खाली मुंडी पाताळ धुंडी'' असे सर्व आज चालले आहे. मग कितीही तीर्थयात्रा करून काही सामाजाचा विकास होत नसतो. म्हणून बसवेश्वरांना अंतरगंशुध्दी, तर बहिरंगशुध्दी म्हणजे कृती, वर्तन व आचार यांची शुध्दी होय. असे सांगितले आहे. संत एकनाथांनीही ''त्याग म्हणजे गंगास्नान नव्हे तर कोणतीही वासना लालसा नसणे म्हणजे त्याग होय. त्याचप्रमाणे स्वामी चक्रधरांनी ''ज्ञानेविना वैराग्य काई करावे आणि वैराग्यविना ज्ञान काई करावे'' असे म्हटले आहे.या हे दोन्हीही तत्व माणसात असले तरच नीतीमत्ता वाढीस लागते. महात्मा बसवेश्वर आपल्या एका वचनात म्हणतात, ''नको करू चोरी, नको करू हत्या, नको बोलू असत्य, नको धरू मनी द्वेष, नको करू आत्मस्तूती नको करू निंदानालस्ती, नको मानू कोणा तुच्छ हीच खरी अंतरंगशुध्दी, हीच बहिरंग शुध्दी या सप्तवर्तक सूत्राचा अंगिकार करणे म्हणजे ईश्वरप्राप्तीचा खराखुरा धर्ममार्ग असल्याचे सांगितले आहे. मानवी मन हे वा-यापेक्षा चंचल व पाण्यापेक्षा पातळ असलेले दिसून येते. ''मन करा रे प्रसन्न, सव सिध्दीचे कारण.'' असे समर्थांनी म्हटले आहे. संत सजजनांच्या घरी कुठलेच वैभव नसते. ज्यांचे जीवन दारिद्रयात जाते. पण संत मनाने मात्र प्रसन्न असतात. वैभवाची, श्रीमंतीची लालसा नसते. सोने मृत्तीकेसमान असते. मानवाने स्थिर मनाने कोणतेही कार्य करावे. मनाची एकरूपता, तादात्म्यता महत्वाची असते असे बसवेश्वरांनी सांगितले आहे. आज लोकांचे मन कितीही कमावले श्रीमंत असले तरी समाधान नाहीत म्हणून तर भौतिक हव्यासापोटी अनेक संकटाला तोंड द्यावे लागत आहे. आजच्या समाजाने आत्मसात करण्याची नितांत गरज आहे. कृतीभक्तीचे महत्व सांगणारे महत्मा बसवेश्वर हे पहिले महामानव आहेत. देव, दैव, नशीब, कर्म, योग गोंजारत बसले तर काहीही हाती लागणार नाही. आपले नशीब आपणच घडवावे लागते. ''देरे हरी पलंगावरी'' म्हटले तर कांहीच मिळणार नाही. स्वकष्टातून अर्थार्जन करून स्वाभिमानाने जीवन जगण्यात निर्भेळ असा आनंद असतो. श्रम हेच ईश्वर आहे. दैववाद, निवृत्तीवाद मानवाला निष्क्रिय बनवतात. प्रयत्नवादाने व प्रवृत्तीवादाने निष्क्रियतेवर मात करता येते म्हणून समर्थ रामदासांनी म्हटले. ''रगडीता वाळूचे कण तेलही गळे'' वारकी संप्रदायातील संत सावता माळी यांनी ''आम्हा हाती माट नाडा, पाणी जाती फूल झाडा, लसूण मिरची कोथिंबिरी अवघी व्यापील पंढरी'' संत गोरा कुंभार, संत सेना न्हावी, संत चोखोबा, संत नरहरी सोनार, संत गाडगेबाबा यांच्यावरही बसवेश्वरांच्या विचारांचा प्रभाव जाणवतो. आपल्या कामातच धर्म, पांडूरंग, राम शोधला. बसवेश्वरांनी कर्म हाच धर्मशीलता, कर्तव्य हीच ईश्वर प्राप्ती कर्तव्यानंद हाच मोक्षानंद काम हाच दाम, काम हाच राम रहिम, सेवा हाच मेवा, श्रम हाच स्वर्ग, ईश्वरपूजा, कैलास, नैवेद्य हेच सर्वस्व कायकवे कैलासचा खराखुरा अर्थ आहे. मार्क्सवादी विचार बसवेश्वरांनी बाराव्या शतकातच मांडला आहे. मानवाने आपले कार्य, निष्ठेने, सद्भावनेने व कर्तव्यबुध्दीने पार पाडले तर पृथ्वीवर साक्षात नंदनवन, अर्थात कैलास निर्माण करणे शक्य आहे. एका वचनात महात्मा बसवेश्वर म्हणतात, ''ज्याने आपल्या घामाने ही काळी माती भिजवली, अखंड श्रमाने ज्याने आपला देह राबवला, कष्ट उपसले पोटासाठी ज्याने आपले तन आणि मन श्रमपूर्वक झिजवले, श्रमाची पूजा करून ज्याने शिवाची पूजा केली, श्रमिकाच्या झोपडीला जो कैलास मानतो, जशी वाणी तशी करणी, तोच जगत्गुरू झाला.'' म्हणून तर महात्मा गांधी म्हणतात, ''सुमारे आठशे वर्षापूर्वी कर्नाटकांत सत्य, अहिंसा, समता आणि श्रमगौरव या महान तत्वांचा प्रचार व प्रसार केला. त्यांची ही तत्वे म्हणजे

भारतीय संस्कृतीचे परिपाक आहेत. बसवेश्वरांनी आरंभलेले मानवतावादी कार्य आता मला पूर्ण करायचे आहे.'' त्याचबरोबर डॉ. एस. जी. तोंडारे यांनी म्हटले की, ''कार्लमार्क्स यांनी अतिरिक्त मूल्यांचा सिध्दांत मांडला तथापि त्यांनी संपतीच्या वाटपासंबंधी फारसे सांगितले नाही. महात्मा बसवेश्वरांनी कार्लमार्क्सपेक्षा पुढे जाऊन श्रमाच्या उच्चतम पावित्र्यासंबंधी विचार मांडला. सामाजिक समतेसाठी आर्थिक विषमता दूर करण्याची अपरिहार्यता, बसवेश्वरांनी प्रतिपादन केली.'' (डॉ. सूर्यकांत घुगरे, जगत्ज्योती बसवेश्वर, महाराष्ट्र बसव समिती, नांदेड) प्रथम आवृत्ती, 2003, पृष्ठ क्र. 40 व 49) सारांश महात्मा बसवेश्वरांनी वीरशैव संप्रदायात आपल्या वैचारिक विचारातून सामान्य माणसांची सेवा केली. संस्कृत भाषेतील गहन, ज्ञान लोकांच्या भाषेत सांगून एक प्रकारचे बंड केले. समाजातील वाईट चालीरीती, प्रथा वचनांच्या माध्यमातून उघडयावर मांडले. समाजाला मानवतेच्या विश्वशांतीचा संदेश दिला. त्यांची सामाजिक चळवळ सर्वसामान्यांसाठी होती. महात्मा बसवेश्वर आज, आपल्यात नाहीत ते होऊन गेले असे म्हणणे चूकीचे आहे. कारण त्यांचे आदर्श, मूल्य, प्रतिक विचारस्वरूपात प्रत्येकात आहेत आणि अखंड राहतील. वीरशैव संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या शब्दातून सांगावयाचे तर, ''धर्म वीरशैव रसातळा जाता झाला बसव त्राता शिवरूपी'' समाज जेंव्हा जेंव्हा एखाद्या संकटात अडकतो किंवा समाजाला ग्लानी पसरून अवकळा पसरते तेंव्हा महापुरूषांच्या विचारांची आवश्यकता असते. म्हणून आजही त्यांच्या विचाराची समाजाला मात्रा गुणकारी ठरणारी आहे. त्यांचे विचार प्रामुख्याने पुरोगामी, विज्ञानवादी, वास्तववाद, विवेकवाद, समाजवाद, श्रमवाद, यावर आधारलेले आहेत. त्याचप्रमाणे मानवता, बंधूभाव, दया, सहानुभूती, त्याग, सत्य, पावित्र्य, नम्रता, नैतिकता, प्रामाणिकता, सौजन्यशीलता, अनुभवशीलता, वस्तुनिष्ठता, सामाजिक गौरव, सामाजिक न्याय, सामाजिक एकात्मता, संघटन, दीनोध्दार, प्रतितोध्दार, दलितोध्दार, स्त्रियोध्दार, समाजोध्दार, दासोहशीलता, सहकार्यशीलता, समाजविषयक कर्तव्यनिष्ठा, कायकनिष्ठा समाजाच्या विकासासाठी खूप प्रासंगिक गरज आहे. या एकविसाव्या शतकात जगामध्ये सगळीकडे यंत्रासारखा माणूस वागत आहे. मानवाधिकाराची भाषा बोलली जात आहे. तथापि नऊशे वर्षापूर्वी बाराव्या शतकात याचं मानवी मूल्यावर धर्मसंकल्पनेची व्यावहारिक प्रतिष्ठापना बसवेश्वरांनी केली आहे. याच पार्श्वभूमी वर डॉ. व्ही. के. गोकाक म्हणतात, ''बसवेश्वर हे आधुनिक विचारवंतापेक्षाही अधिक आधुनिक होते.'' (डॉ. सूर्यकांत घुगरे उपरोक्त पृष्ठ क्र. 7) जग आज धर्म, देव यापासून दूर पळत आहेत. अमेरिका, रशिया, जपान, चिन, इटली इत्यादी देश उत्तरोत्तर आधुनिकतावादाची कास धरत आहेत. भौतिकदृष्टया अतिप्रगत आजपर्यंत म्हटले जात असत. पण कोरोना सारख्या महामारीपुढे या देशांनी अक्षरशः गुडघे टेकवले आहेत. अतिप्रगती, अतिभोगवाद सत्ता, संपत्ती भोगलालुपता तिथे विनाश असतो. 'अति तेथे माती' होत असते. या देशातील समाजरचनेची घडी विस्कटलेली आहे. विवाहसंस्था आणि कुटूंबसंस्था विस्कळीत व विघटीत झाल्या आहेत. लैंगिकता, बहुविवाह, घटस्फोट, मानसिक अस्थिरता, वैफल्य, नैतिक मूल्यांचा -हास, जागतिकीकरण, यांत्रिकीकरण, सामाजिक माध्यमांचा अतिरेक, यासारख्या अनेक समस्यांचे थैमान माजल्याने, प्रेम, स्नेह, सामंजस्य, सहिष्णुता, भ्रातृभाव, मानवता, विश्वबंधुत्व इत्यादी समाज संवर्धनासाठी आवश्यक मूल्यांची जोपासना धर्मामुळे आणि संत, महात्मे यांचे विचार आत्मसात केल्यामुळे होऊ शकते धर्माची शिकवण ही मूलतः मानवतेची शिकवण असते. त्यामुळे धर्म जीवंत राहिला तर मानवता जीवंत राहील, असा बसवेश्वरांचे दावा होता. बसवेश्वरांना धर्मामध्ये अंधश्रध्दा नव्हे तर शुध्द श्रध्दा, शुध्दभक्ती, शुध्दविचार अभिप्रेत आहे. त्यांच्यामते धर्म म्हणजे स्नेह, आत्मीयता, सहानुभूती, सामंजस्य, अहिंसा, करूणा, दया, क्षमा, शांती, मानवता होय. अहिंसा म्हणजेच दया हा धर्माचा मूलाधार होय. बसवेश्वरांच्या

दृष्टीकोनातून ''दया धर्माहुनि थोर'' आहे. या विचाराची आजच्या घडीला जगाला खूप गरज आहे. तरच समाजाची घडी नीट बसेल. विज्ञान व तंत्रज्ञान यांतील विलक्षण प्रगतीमुळे माणूस चंद्रावर व विविध ग्रहांवर गेला. पृथ्वीवरून आकाशात काय चालले आहे याचा शोध घेत आहे. परंतु कोणी कोणाला ओळखत नाही. माणूस, माणसापासून बाराकोस दूर जात आहे. नातं गोतं संपुष्टात येत आहे. यामुळे जगाची स्थिती आपण उघडया डोळयांनी बघतच आहोत. एक प्रकारची जैविक युध्दाची टांगती तलवार आज प्रत्येकाला दिसत आहे. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय युध्दजन्य परिस्थितीमुळे विषाणूच्या संकटात अडकल्यामुळे एकप्रकारची जागतिक, आर्थिक अशांतता वाढली आहे. अमेरिका चीनला या कोविड - 19 मुळे जबाबदार धरून चीनवर गुरगुरत आहे. हे धुमसणे, गुरगुरणे यातून बाहेर पडल्यानंतर स्फोटात रूपांतर होईल असे वाटते. अशा प्राप्त परिस्थितीमध्ये मला वाटते की, महात्मा बसवेश्वरांचा हा व्यापक, सर्वसमावेशक विचार आवश्यक आहे. व्यक्तीची अंतरंग आणि बहिरंग उन्नती, सामाजिक विकास आणि राष्ट्रसंवर्धन करणा-या गोष्टींना बसवेश्वरांनी धर्म मानलेला आहे. मानवातील सद्भाव जागृत करणे, प्रत्येकाचा माणूस म्हणून सदोदीत गौरव करणे, हे विश्वची माझे घर मानणे आणि जीवाला शिवत्व मिळवून देणे हा त्यांचा मौलिक विचार हा सामाजिक चिंतनाच्या पातळीवरचा आहे.

**संदर्भग्रंथ :-**

*(संपा.) डॉ. फ. गु. हळकट्टी, 'वचन सिध्दांत सार' महाराष्ट्र बसव परिषद हिरेमठ संस्थान भालकी, जि. बिदर, प्रथमावृत्ती, 2016*
*डॉ. सूर्यकांत घुगरे, 'जगत्ज्योती बसवेश्वर महाराष्ट्र बसव समिती नांदेड, प्रथमावृत्ती, 2003*
*(संपा.) भीमराव पाटील, 'युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर, व्हीजन कॉम्प्यूटर्स, लातूर प्रथमावृत्ती, 2016*
*डॉ. अशोक कामत, 'महात्मा बसवेश्वर' सत्संग प्रतिष्ठान, पुणे, 1999.*

# परिवर्तनवादी युगपुरुषः महात्मा बसवेश्वर

**प्रा.डॉ.शंकर लेखणे**
*लोकप्रशासन विभाग प्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शंकरनगर ता. बिलोली जि. नांदेड*

**प्रास्ताविकः-** भारतातील धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवनामध्ये परिवर्तनवादी विचारांची एक फार मोठी व समृद्ध अशी परंपरा राहिली आहे. या परंपरेतील एक परिवर्तनवादी युगपुरुष म्हणजे महात्मा बसवेश्वर होय. १२ व्या शतकांमध्ये आपल्या विचारातून व आचारातून त्यांनी समाजामध्ये समतेची बिजे रोवली, आणि समाजामध्ये मानवतावादाची ज्योत प्रज्वलित केली तत्कालीन धार्मिक व जाती-पातीच्या भेदभावातून व शोषणातून माणसाला बाहेर काढून समतेच्या तत्वज्ञानावर आधारित अशा लिंगायत धर्माची स्थापना केली. महात्मा बसवेश्वरांच्या जन्म तारखेबद्दल मतभिन्नता असली तरी त्यांचा जन्म अक्षय तृतीयेला झाल्याचे मानले जाते,म्हणून त्यांची सार्वजनिक जयंती याच दिवशी साजरी केली जाते. महात्मा बसवेश्वर यांचा जन्म ११०५ साली कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यात बागेवाडी येथे झाला. महात्मा बसवेश्वर हे समतावादी होते,त्यामुळेच समाजामध्ये ज्या ज्या ठिकाणी त्यांना भेदभाव व विषमता दिसली त्यावर त्यांनी टीका केली, एवढ्यावरच ते थांबले नाही तर त्या विषमतेविरुद्ध लढून समताधिष्ठित समाज निर्माण केला. 'शिवानुभव मंटप', 'कायक वे कैलास','दासोह','श्रमप्रतिष्ठा','आंतरजातीय विवाह', या सारख्या सिद्धांताची व विचारांची मांडणी करून आणि त्यानुसार प्रत्यक्ष कार्य करून परिवर्तनवादी विचारांचा मार्ग प्रशस्त केला.

* शिवानुभव मंटपः- बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी आजच्या लोकशाही व्यवस्थेसारखी सर्वांना अभिव्यक्तींचे, विचारांचे स्वातंत्र्य देणाऱ्या शिवानुभव मंटपची कल्याण येथे स्थापना केली. या विचारपीठात सर्वांना सहभागी होण्याची समान संधी होती, कोणत्याही जातीधर्मातील स्त्री-पुरुष यात सहभागी होऊ शकत होते. त्या काळात लिंगभेद, जातीभेद व वर्णभेद टोकाचा होता. समाजात मानसे या भेदाभेदामुळे एकमेकांच्या जवळ येत नव्हते. त्याकाळात सर्वांना एकाच मंटपात एकत्र आणण्याचे क्रांतिकारक कार्य महात्मा बसवेश्वरांनी केले. या शिवानुभव मंटपात सहभागी होणाऱ्या पुरुषांना शिवशरण व स्त्रियांना शिवशरणी असे संबोधण्यात येत असे. या ठिकाणी वेगवेगळ्या सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक विषयावर चर्चा होत असत. लोकांच्या मनातील प्रश्नोत्तरे संवाद स्वरुपात मांडली जात असत तसेच विचारांची देवाण-घेवाण होत असे, त्यामुळे त्याकाळात समाजप्रबोधनाच्या कार्याला गती मिळाली.

**कायक वे कैलासः-** महात्मा बसवेश्वरांनी लोकांच्या केवळ धार्मिक आध्यात्मिक उन्नतीकडे लक्ष दिले नाही तर त्यांच्या आर्थिक समृद्धीकडे, व्यावसायिक स्वातंत्र्याकडे आणि व्यावहारिक शुद्ध्तेकडेही जाणीवपूर्वक लक्ष दिले होते. लोकांना श्रमाची महती कळावी,श्रमाला प्रतिष्ठा यावी, यासाठी त्यांनी 'कायक वे कैलास' हा सिद्धांत मांडून लोकांना उपदेशित केले की, ' तुम्ही जे काम मनापासून करता तीच भगवान शिवाची पूजा आहे, उपासना आहे'. कर्म हीच पूजा आहे हा संदेश देऊन त्यांनी श्रम प्रतिष्ठेला महत्त्वाचे स्थान दिले. त्यामुळे कोणतेही काम कनिष्ठ नसते प्रत्येकाने आपल्या कामाकडे कर्तव्याकडे शुद्ध दृष्टीने पाहिले पाहिजे असा उपदेश करून समाजातील लोकांना कर्मप्रवृत्त केले. त्याचबरोबर काम करून तुम्ही जी संपत्ती मिळवता त्याचा वापरही शुद्धतेने झाला पाहिजे. संपत्तीचा संचय करण्याऐवजी तिचा उपयोग समाजासाठी झाला पाहिजे. असा ते संदेश देत असत यासाठी त्यांनी 'दासोह' हा सिद्धांत मांडलेला दिसून येतो.

**आंतरजातीय विवाहः-** आधुनिकतेकडे प्रचंड वेगाने जाणाऱ्या भारतीय समाजव्यवस्थेत आजही आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहाला लोकांची सर्वसंमती असलेली दिसून येत नाही. अशा प्रकारच्या विवाहांना कायदेशीर मान्यता असली तरी कुटुंब व समाज मान्यता देईलच असे नाही, अशा विवाहांना कुटुंबाकडून व जात बांधवांकडून मोठ्या

प्रमाणात विरोध होत असल्याची असंख्य उदाहरणे आपल्या सभोवताली दिसून येतात. परंतु आंतरजातीय विवाह बाराव्या शतकात घडवून आणण्याचे क्रांतिकारक कार्य महात्मा बसवेश्वरांनी केलेले दिसून येते. मानवनिर्मित जातीपातीच्या भिंतींना त्यांनी त्या काळात सुरुंग लावल्याचे दिसून येते. मागास जातीतील संत हरळय्या आणि उच्चभ्रू जातीतील कलावती यांचा विवाह घडवून आणला आणि आपल्या समताधिष्ठित क्रांतिकारी समाजकार्याला महात्मा बसवेश्वरांनी गतिमान केले.

**महिला सबलीकरण:-** महिलांना समाजात हक्क देऊन त्यांना सशक्त करण्यासाठी आजही शासनाला अनेक कायदे करावे लागत आहेत, महिला सबलीकरणासाठी अनेक कार्यक्रम राबवून प्रयत्न करावे लागत आहेत. तरीही पुरुषप्रधान संस्कृती कोणत्या ना कोणत्या प्रकारे स्त्रियांवर बंधने घालण्याचा प्रयत्न करत असते. एकंदरीत लिंगभेदाची मानसिकता काही प्रमाणात का असेना आजही समाजामध्ये दिसून येते व स्त्रियांना आपल्या हक्कासाठी आजही लढावे लागते. यावरून बाराव्या शतकात महिलांवर किती बंधने असतील याचा आपल्याला अंदाज येऊ शकतो. तत्कालीन समाजाने स्त्रियांना धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक बंधनात जखडून ठेवले होते. त्यामुळे स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेत निम्न समजले जात असे, अशा परिस्थितीत महात्मा बसवेश्वरांनी क्रांतिकारक पावले उचलून स्त्रियांना अनेक निर्बंधातून मुक्त केले. स्त्रियांना धार्मिक व अध्यात्मिक अधिकार मिळवून दिले, अनुभव मंटपात स्त्रियांना सहभागी करून घेतले, त्यांना मत मांडण्याचा, अभिव्यक्तीचा हक्क दिला त्याचबरोबर स्त्रियांच्या बाबतीत असलेल्या अशुद्धतेच्या व पंचसुतकाच्या कल्पनेतून मुक्त केले.

**कर्मकांडातून समाजाची मुक्तता:-** महात्मा बसवेश्वरांनी लिंगायत धर्माची स्थापना करून कर्मकांडात अडकलेल्या लोकांची कर्मकांडातून मुक्तता केली. होमहवन,मूर्तिपूजा या कर्मकांडाची आवश्यकता नसल्याचा विचार त्यांनी मांडला. देवाची पुजा करण्यासाठी मंदिरात जाण्याची आवश्यकता नाही तर आपल्या देहाला देवालय माना, अशा विचारांची रुजूवात केली. आपल्या अनेक वचनांनी लोकांना आध्यात्मिकदृष्ट्या उन्नत, समृद्ध करण्याचा महात्मा बसवेश्वर यांनी प्रयत्न केला. लोकांना अंधश्रद्धेतून मुक्त करून त्यांचे आचरण शुद्ध व्हावे यासाठी आपल्या वचनातून प्रबोधन केले, सर्व माणसे एक आहेत असा समतेचा विचार मांडला. लोकांना विवेकवादी मार्ग दाखविला, खऱ्या ज्ञानाचे मंगलमय प्रकाश दर्शन घडविले आणि नवसमाज निर्माण केला. महात्मा बसवेश्वर यांचे बाराव्या शतकातील हे क्रांतिकारी कार्य पाहिल्यानंतर ते क्रांतिकारक युगपुरुष होते व त्यांनी परिवर्तनवादी समाज निर्मितीचा मार्ग आपल्या कार्याने तेजांकित केल्याचे दिसून येते.

**संदर्भ:-**

*डॉ. सचितानंद बिचेवार, परिवर्तनाचा महामेरू महात्मा बसवेश्वर, स्वाती प्रकाशन, पूर्णा- 2015*
*डॉ. शरदचंद्र देगलूरकर, संत साहित्याचा सामाजिक अन्वयार्थ,देगलूर-2004.*
*प्राचार्य शिवाजीराव भोसले, हितगोष्टी, अक्षरब्रह्म प्रकाशन, पुणे- 2004*
*https://mr.m.wikipedia.org*
*https://www.santsahitya.in*
*https://www.inmarathi.com*

## युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर

**डॉ. माधव बसवंते**
*प्राध्यापक तथा मराठी विभागप्रमुख, राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड, जि.नांदेड*
*ई-मेल - madhavgbt@gmail.com*

महात्मा बसवेश्वर हे 'लिंगायत' धर्मसंस्कृतीचे प्रवर्तक आहेत. भारतातील बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी विषमतावादी समाजव्यवस्थेला समतेचे व न्यायाचे नवे वळण दिले. समाजातील उच्चनीचता, अस्पृश्यता, वर्गभेद, वर्णभेद याविरुद्ध त्यांनी निकराचा लढा दिला. सर्व जाती-धर्मातील स्त्री-पुरुषांना समान अधिकारांचे हक्क दिले. महात्मा बसवेश्वर हे कृतिशील क्रांतिकारक आणि युगप्रवर्तक होते. श्रेष्ठ कवी, संत आणि कुशाग्र बुद्धीचे ते तत्वज्ञ होते. स्त्रीयांचे उद्धारकर्ते होते. महात्मा बसवेश्वर हे भारतातील बाराव्या शतकातील धर्मसुधारणांच्या आंदोलनाचे क्रांतिकारक प्रवर्तक होते. महात्मा बसेवश्वरांनी आयुष्यभर समाजातील भेदभाव व कर्मकांडावर जोरदार हल्ले करीत एका नव्या मानवतावादी व समतावादी नवसमाजाची निर्मिती केली. आपला अनुभव, चिंतन, अभ्यास व वचन साहित्याच्या माध्यमातून वंचित, उपेक्षित, पीडित, अस्पृश्य व स्त्रीयांना आत्मविश्वास देऊन त्यांना मुक्तीचा मार्ग दाखविला. विषमतेने ग्रासलेल्या समाज व्यवस्थेला त्यांना बुद्धीप्रामाण्यवादी बनविले. महात्मा बसवेश्वरांनी व्यवस्था परिवर्तनाच्या ध्येयाने पेटलेले होते. अज्ञानाकडून ज्ञानाकडे व अंधश्रद्धेकडून विज्ञाननिष्ठतेकडे जाण्यासाठी त्यांनी समाजाला दिशादिग्दर्शन केले. मंदिरात बसून दगड धोंड्याची पूजा करण्यापेक्षा अनुभव मंटपात एकत्र बसून लोकहिताच्या विषयावर चर्चा व विचारमंथन करण्याचा संदेश दिला. एक परिवर्तनवादी युगपुरुष, विद्रोही महात्मा व तत्त्वज्ञानी समाजप्रबोधक म्हणून महात्मा बसवेश्वर विश्वविख्यात आहेत. समतेचा पुरस्कार करणारे ते कृतिशील समाज क्रांतिकारक आहेत. भारतातील बाराव्या शतकातील युगनायक, निर्भय समाजक्रांतिकारक आणि दक्षिण भारताचा बुद्ध म्हणून महात्मा बसवेश्वरांचा गौरवाने उल्लेख करावा लागतो.

प्रस्तावना : महात्मा बसेवश्वर पूर्वकालीन दक्षिण भारतात प्रामुख्याने शैव, वैष्णव, जैन व बौद्ध हे प्रमुख संप्रदाय होते. यात प्रामुख्याने जैन धर्माचा विशेष प्रभाव होता. फक्त ब्राह्मणांनाच वेदपठणास मान्यता होती. मूर्तीपूजेत समाज गुरफटलेला होता. देवळा-देवळात देवदासी ठेवल्या जात होत्या. पाऊस पाडण्यासाठी तंत्र-मंत्र व पशूबळी दिला जात होता, समाजात स्वर्ग-नरक व पुनर्जन्मावर प्रचंड विश्वास होता. तत्कालीन समाज ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र यात विभागला होता. ब्राह्मणांना विशेष अधिकार होता. शूद्र व स्त्रियांना ज्ञानप्राप्तीचा अधिकार नव्हता. वेश्या व्यवसाय, बालविवाह व देवदासी यासारख्या अनिष्ठ प्रथा प्रचलित होत्या. जातीभेदातील दरी वाढत गेल्यामुळे माणुसकीचा अंत झाला होता. अस्पृश्य, स्त्रिया व पीडित समाज लाचार झाला होता. व्याजाने पैसे देण्याचा सावकारांचा व्यवसाय जोमाने चालू होता. यातच अस्पृश्यांची व कष्टकऱ्यांची आर्थिक परिस्थिती चिंतनीय झाली होती. अस्पृश्य हे जणू ब्राह्मण व उच्चवर्णीयांचे गुलामच झाले होते. अशा गुलामीत जीवन जगणाऱ्या अस्पृश्य समाजाला, स्त्रीयांना, कष्टकऱ्यांना महात्मा बसवेश्वरांनी मानवमुक्तीचा मार्ग दाखविला. भारतीय समाज व्यवस्थेमध्ये ऐक्याच्या निर्माणासाठी त्यांनी अनुभव मंटपाची स्थापना केली. महात्मा बसवेश्वरांनी तत्कालीन समाजातील स्त्रियांना सामाजिक, आर्थिक, आध्यात्मिक व वाङ्मयीन लेखनाचे स्वातंत्र्य व अधिकार दिले होते. श्रम हाच कैलास आणि स्वर्ग असल्याचे त्यांनी व्यापक व शाश्वत तत्त्वज्ञान मांडले, तसेच बसवेश्वरांनी ढोंगी भक्तांच्या बाह्य भक्तीवरही सडाडून टीका केली आहे.

**बसवेश्वरांचे जीवन :** बाराव्या शतकात तत्कालीन म्हैसूर राज्यातील व सध्याच्या कर्नाटक राज्यातील बागेवाडी, जि.विजापूर येथे इ.स.११०५ मध्ये शैव ब्राह्मण कुटुंबात महात्मा बसवेश्वरांचा जन्म झाला. ज्या गावी म.बसवेश्वरांचा जन्म झाला होता ते गाव 'बसवण्णाची बागेवाडी' या नावाने ओळखली जाते. म.बसवेश्वरांच्या वडीलाचे नाव मादिराज

होते, तर आईचे नाव मादलांबिका होते. महात्मा बसवेश्वरांच्या जन्मकाळाविषयी संशोधक, अभ्यासक व विचारवंतामध्ये मतभेद असले, तरी त्यांचा जन्म हा सामान्यतः वैशाखातील अक्षय तृतीयेला झाल्याचे मानले जाते. अलिकडे काही अभ्यासकांनी महात्मा बसवेश्वरांचा जन्म २५ एप्रिल, ११०५ रोजी झाल्याचे सांगतात. मादिराज व मादलांबिका यांना मुलगा नव्हता, आपणास मुलगा व्हावा, म्हणून त्यांनी नंदीला नवस केला होता. पुत्राचा जन्म झाल्याने नंदीचा कृपाप्रसाद म्हणून त्यांनी आपल्या मुलाचे नाव 'बसव' ठेवले. बसव हा लहानपणापासूनच अत्यंत संवेदनशील व बुद्धीमान होता. समाजातील अनिष्ठ रुढी-परंपरा पाहून बसव अंतर्मुख होत होता. घरच्या घरी बसवचे कन्नड भाषेतील प्राथमिक शिक्षण पूर्ण झाले. मुळाक्षरे, अंकलिपी, पुराणे, रामायण, महाभारत, वेद यांचे त्यांनी वाचन व पाठांतर केले. बसवच्या घरच्या शिक्षणाला तीन वर्षे पूर्ण झाली होती. समाजातील माणसा-माणसांतील होणाऱ्या विटाळामुळे तो अस्वस्थ व चिंताग्रस्त होत होता. ब्राह्मणांना कुत्री, मांजरी यासारख्या जनावरांचा विटाळ का होत नाही? साप, गुरे, गाढव, पक्षी, बेडूक यांनी तलावातील पाणी पिऊनही ते तलावातील पाणी का बाटत नाही? शूद्र व अस्पृश्यांनी पिल्याने पाणी का बाटते ? अशा अनेक नवविचारांनी बसव अस्वस्थ होत असत. आठ वर्षे पूर्ण झालेल्या बसवने उपनयन सारख्या संस्काराचा विधी हा स्त्री-पुरुषांमध्ये भेदभाव निर्माण करणारा आहे, म्हणून बसवने अत्यंत तत्त्वनिष्ठतेने या उपनयन संस्कारास विरोध केला होता. पुढील विद्यार्जनासाठी बसवने कूडलसंगमक्षेत्री गेले. कूडल हा कन्नड भाषेतील शब्द असून त्याचा अर्थ 'संगम' अस आहे. कूडलसंगमेश्वर हे एक नयनमनोहर, पावन व पवित्र शैव क्षेत्र आहे. या ठिकाणी एका विद्वान ब्राह्मणाची ब्रह्मपुरी हेती. कूडलसंगम येथे बसवने ईशान्यगुरुला वंदन करून आपला परिचय करून दिला व पुढे बसव ईशान्यगुरुच्या आश्रमात राहून ज्ञानप्रातीना प्रारंभ केला. बसवेश्वरांनी कूडलसंगमला आपले आई-वडील व सर्वस्व मानून या पवित्र स्थळी त्यांनी ज्ञानसाधना केली आणि याच ठिकाणी त्यांच्या तत्त्वज्ञानाची मूळ पायाभरणी झाली. गुरुकूलात ते तल्लीन होत होते. ईशान्यगुरुचे प्रबोधन व प्रवचन ऐकून बसवेश्वर हे आपला अभ्यास, मनन, चिंतन व पाठांतरात मग्न होत असत. बसवने मुंज करून न घेतल्यामुळे त्यांच्या आई-वडिलांना धक्का बसल्यामुळे बसवच्या आई-वडीलांचे निधन झाले. बसवने आपल्या आई-वडीलांच्या मृत्यूचे दुःख विसरून आपल्या पुढील कार्यासाठी ते जिद्दीने अधिक प्रवृत्त झाले. बसवचे ईशान्यगुरु हे कोणत्याही धर्माचे विशिष्ट प्रचारक नव्हते.ईशान्यगुरुच्या मार्गदर्शनामुळे बसवला आत्मज्ञान प्राप्त होऊन त्यांच्यात चिन्मयदृष्टी निर्माण झाली होती. बसव हा पुढे श्रेष्ठ शिवोपासक म्हणून बसवण्णा' झाले. बसवण्णा कूडलसंगमच्या पंचक्रोशीतील विविध जाती-धर्मातील माणसांचे व समाज स्थितीचे अवलोकन केले. धर्माच्यनावावर होणारे शोषण, सावकारांकडून होणारी लुबाडणूक, माणसांची रंगेल वृत्ती, देवदासी, पोतराज, वेश्या व्यवसाय, पशूबळी यासारखे चित्र पाहून बसवण्णांच्या मनातील विद्रोह अधिक पेटला. पुरुषी ब्राह्मणांनी लिहिलेली धर्मग्रंथ ही स्त्रियांवर अन्यायकरणारी आहेत. अस्पृश्य माणसांच्या सावल्यांचाही उच्चवर्णियांना विटाळ होत होता. ब्राह्मणांनी आपले वर्चस्व कायम ठेवण्यासाठीकल्पिलेल्या या धूर्त कल्पला आहेत, म्हणून बसवच्या मनात प्रचंड चीड व तिरस्कर निर्माण झाला होता. मामा मंत्री बलदेव व ईशान्यगुरुंच्या आशीर्वादाने बसवचा विवाह गंगाबिका यांच्यासोबत झाला. विवाहानंतर मंगळवेढा येथे बसवेश्वरांना कोषागारखात्यात करणिक' म्हणून नियुक्ती देण्यात आली. आपल्या नियुक्तीच्या सेवाकाळात बसवेश्वरांनी करवसुलीला प्राधान्य दिले व भ्रष्टाचन करणाऱ्या अधिकाऱ्यांना समज दिली. बसवेश्वरांची कर्मनिष्ठा व प्रामाणिकपणा पाहून त्यांना कोषागार मंत्री म्हणून पदोन्नतीदेण्यात आली. बसवेश्वरांच्या कार्याबद्दल राजा बिज्जळ हा खूष होता. कूट भाषेतील ताम्रपटाने वाचन केल्याबद्दल राज बिजळनीआपल्या दरबारात बसवेश्वरांचा सत्कार व गौरव केला. वयोवृद्ध क्षत्रिय मंत्री सिद्धरस यांना 'नीलांबिका' या नावाची एकुलती एक सुंदर व बुद्धीमान कन्या होती. नीलांबिका ही राजा बिज्जळची मानलेली बहिण होती. 'नीलांबिका' या सुंदर व बुद्धिमान असलेल्या क्षत्रिय कन्येसोबत बसवेश्वरांचा दुसरा विवाह मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. ईश्वर भक्तीतील भेदाभेद नष्ट करण्यासाठी बसवेश्वरांनी 'इष्टलिंगाच्या' भक्तीचे सार्वत्रिकरण करून मंदिर प्रवेश नाकारलेल्या समाजातील माणसांना त्यांनी 'इष्टलिंग' स्वरूपातील परशिवाची छोटी प्रतिकृती भेट दिली. शूर व पराक्रमी असलेला राजा बिज्जळने पुढे आपले सत्ताकेंद्र मंगळवेढा येथून कल्याण येथे हलविले. त्यामुळे राजा बिजळने बसवेश्वरांना कल्याण

येथे पाचारण करून त्यांनी आपल्या दरबारात बसवेश्वरांना महामंत्र्याचा दर्जा दिला. आध्यात्मिक संसद म्हणून बसवेश्वरांनी कल्याण येथे 'अनुभव मंटप' स्थापन करून अल्लमप्रभू यांना अनुभव मंटपाचे पहिले अध्यक्ष केले. कल्याणच्या वास्तव्यात महात्मा बसवेश्वर हे कोणताही भेदाभेद न करता सर्व जाती-धर्माच्या लोकांना भेटत होते. विशेषतः अस्पृश्य म्हणून गावाकुसाबाहेर राहणाऱ्या नागीदेव कांबळे यांच्या घरी जाऊन त्यांनी भोजन केले होते. बसवेश्वरांची ही वाढती लोकप्रियता पाहून राजा बिजळच्या दरबारातील अनेक ब्राह्मण ज्येष्ठ मंत्र्यांचा अहंकार दुखाला जात होता. बसवेश्वरांचे वर्तन धर्माच्या विरूद्ध आहे, यासाठी बसवेश्वरांना धर्मशासन करण्यात यावे, म्हणून राज बिजळला भडकविण्यात येत होते. दुसरीकडे मात्र बसवेश्वरांच्या अनुभव मंटपातील गर्दी दिवसेंदिवस वाढतच जात होती. बसवेश्वर हे आपल्या पांढऱ्या शुभ्र घोड्यावरून आपल्या दरबारी जात असताना वाटेतच त्यांना हरळय्या या चांभाराची भेट झाली. बसवेश्वरांच्या अनुभव मंटपातीलतत्त्वज्ञानामुळे जातीने ब्राह्मण असलेल्या मधुवय्याची मुलगी कलावती' व जातीने चांभार असलेल्या हरळय्याचा मुलगा शीलवंत' यांचा आंतरजातीय विवाह संपन्न झाला. ही घटना ऐकून राजा बिजळने मधुवरस (मधुवय्या) व हरळय्या यांना कठोर शिक्षा म्हणून प्रथम त्यांचे डोळे काढण्यात आले आणि त्यानंतर त्यांना हत्तीच्या पायी बांधून मृत्यूदंडाची कठोर शिक्षा देण्यात आली. राजपुरोहितांच्या दबावाखाली येऊन बसवेश्वरांचे काहीही न ऐकता राजा बिजलाने माणुसकीला काळीमा लावणारा निर्णय घेतल्यामुळेच बसवेश्वरांनी आपल्या मंत्रीपदाचा त्याग केला. हजारो शरण-शरणींनी मधुवरस-हरळय्या यांच्या देहांत दंडाच्या निर्णयाचा सर्वत्र विरोध करण्यात आला. यामुळे राजा बिजळ व बसव यांच्यात प्रचंड मतभेद वाढले होते. जगदेवने व त्यांच्या शिष्यांनी राजा बिजळचा वध केला. त्यानंतर जयदेवने आत्महत्या केली आणि त्यांचे शिष्य पकडल्या गेले होते. अशा या कठीण अवस्थेत शरण-शरणींच्या संयमांचा अंत झाला होता. बसवेश्वरांचा आवडता पांढरा घोडा रात्रीच्या वेळी कोणत्या दिशेने गेला हे कुणालाच ठाऊक नव्हते. यामुळे कल्याणमधील हजारो शरण-शरणींच्या जीवनात अंधार पसरला होता. हजारो लोक आपली तहान-भूक विसरून बसवेश्वरांचा शोध घेत होते. कुणाच्याही घरात चुली पेटल्या नव्हत्या. संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली होती. बसवेश्वर कल्याण सोडून कूडलसंगमकडील आपल्या ईशान्यगुरुच्या आश्रमाकडे प्रयाण केले आणि अखेर महात्मा बसवेश्वर हे वयाच्या ६२ व्या वर्षी कूडलसंगमक्षेत्री इ.स.१९६७ साली लिंगैक्य झाले.

**वर्णव्यवस्था नाकारली :** महात्मा बसवेश्वरांनी हिंदू धर्मातील वर्णव्यवस्था किंवा ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र ही चातुर्वर्ण्यव्यवस्था नाकारली होती. या विषम विकृतीविरूद्ध बसवेश्वरांनी बंड पुकारले होते. बसवेश्वरांनी अनेक धर्मग्रंथांचा अभ्यास करून चातुर्वर्ण्य, जातिव्यवस्था व अस्पृश्यता ही ईश्वर निर्मित नसल्याचे त्यांनी स्पष्टपणे सांगून समाजातील जाती-धर्माच्या, वर्ण-वर्णाच्या बुरूजांवर समता निर्माणासाठी प्रचंड हल्ले केले. व्यवसायावरून जातीची निर्मिती झाली, म्हणून बसवेश्वर आपल्या एका वचनात म्हणतात :

लोह तापवून झाला लोहार
वस्त्र विणून झाला विणकर
कपडे धुवून परीट-धोबी झाला
वेदपठण करून झाला ब्राह्मण

मध्ययुगीन काळात अस्पृश्यांना माणूस म्हणून सन्मानाने जगता येत नव्हते. म्हणूनच बसवेश्वरांनी अस्पृश्यता मानणाऱ्या समाज व्यवस्थेचा धिक्कार केला. माणसा-माणसात अस्पृश्यता पाळणारी व्यवस्था ही केवळ माणसांवरील अन्याय वा अपमान नव्हता, तर प्रत्यक्ष देवाचाच अपमान होता अशी बसवेश्वरांची स्पष्ट मानवतावादी विचारधारा होती. ईश्वरप्राप्तीसाठी होमहवन, यज्ञ यासारख्या ढोंगी भक्तीवर व पोटभरू कर्मकांडावर त्यांनी हल्ले केले आहेत. बसवेश्वरांनी समाजाला कधीही पुनर्जन्माविषयी प्रलोभन दाखविले नाही. माणसांचा जनर्जन्म हा त्यांच्या कर्मावर अवलंबून असतो, म्हणून माणसांनी मिळालेल्या या जन्माचे सार्थक करावे असा उपदेश केला आहे. सर्व माणसांनी आपआपल्या जाती-धर्माचा भेदभाव विसरून याच पृथ्वीवर घाम गाळून पृथ्वीवरच स्वर्ग बनवू शकतात असा त्यांनी समाजाला संदेश वा विश्वास दिला आहे. शुभ-अशुभ, तिथी-नक्षत्रे, नशीब, ज्योतिष्य, ग्रह, गुरु, राशी

यासारख्या पाप-पुण्याच्या कल्पना माणसांना निष्क्रिय करतात. अशा क्रांतिकारी विचारांची पेरणी बसवेश्वरांनी समाजामध्ये केली. बसवेश्वरांनी समाजातील जातीचा भेदाभेद नष्ट करण्यासाठी त्यांनी अस्पृश्यांच्या घरी स्वतः भोजनास जात होते.

**स्त्री मुक्तीचे प्रणेते :** बाराव्या शतकात भारतात देव, धर्म, संस्कृती, रूढी व पंरपरेच्या नावाखाली प्रत्येक जाती-धर्मातील स्त्रियांचे मानसिक, शारीरिक व आर्थिक शोषण केले जात होते. स्त्रिया ह्या जन्मतःच दृष्ट, चंचल, अविचारी, अज्ञानी, भ्रष्ट व एकंदरीत माणसांच्या विश्वासास अपात्र असतात. अशा कोणत्याही स्त्रियांना स्वतःचा चेहरा नव्हता, स्वतंत्र विचार नव्हता. अभिव्यक्तीचे विचार स्वातंत्र्य नव्हते. पुरुषांबरोबरचा कोणताही समान अधिकार नव्हता. कोणतेही धार्मिक, आध्यात्मिक व शैक्षणिक स्वातंत्र्य नव्हते. अशा अंधारयुगात जगणाऱ्या स्त्रियांना महात्मा बसवेश्वरांनी मुक्तीचे पंख दिने. सामर्थ्याचे बळ दिले. समता, स्वातंत्र्य, न्याय, भक्ती व अभिव्यक्तीचा अधिकार दिला. उद्योग-व्यवसायाचे स्वातंत्र्य दिले. विधवांना पुनर्विवाहाचा हक्क व अधिकार दिला. महात्मा बसवेश्वरांच्या क्रांतिकारी विचारामुळेच लिंगायत धर्मात विधवा स्त्रिया ह्या विवाह समारंभ वा इतर धार्मिक विधीमध्ये मुक्तपणे सहभागी होत होत्या. एवढेच नव्हे तर, बसवेश्वरांनी वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांना मार्गदर्शन करीत त्यांचा पुनर्विवाह व पुनर्वसन केले. ही भारताच्या मध्ययुगीन काळातील सामाजिक क्रांतिकारी घटना आहे, म्हणूनच महात्मा बसवेश्वर हे स्त्रियांचे उद्धारकर्ते व प्रणेते आहेत. महात्मा बसवेश्वरांच्या अनुभव मंटपात साधारणतः सत्याहत्तर स्त्रियांची नोंद दिसून येते.

**अनुभव मंटप** : समाजातील सर्व जाती-धर्मातील स्त्री-पुरुषांसाठी विचारांची आदान-प्रदान, चिंतन, लेखन, प्रबोधन व ज्ञान प्राप्तीसाठी महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात अनुभव मंटपची स्थापना केली. महात्मा बसवेश्वर हे मंगळवेढा येथे वास्तव्यास असतानाच 'अनुभव मंटप' या सांस्कृतिक पीठ निर्माणाच्या चिंतनास त्यांनी प्रारंभ केला होता. पुढे कल्याण येथे त्यांनी अनुभव मंटपाची स्थापना केली. अनुभव मंटपात तत्कालीन समाजातील सर्व अठरापगड जातीतील स्त्री-पुरुषांच्या प्रतिनिधींचा समावेश होता. अनुभव मंटप ही लोकशाही तत्त्वावर चालणारी जणू एक धर्मसंसदच होती. अनुभव मंटप हे एक समाजाचे संस्कारपीठ होते, मुक्त ज्ञानपीठ होते. जणू ही सामाजिक प्रबोधनाची प्रयोगशाळाच होती. जाती-धर्मानी विषारी झालेल्या माणसांतील देवत्वाला जागे करण्यासाठी बसवेश्वरांचे हे अनुभव मंटप होते. सातशे पुरुष व सत्याहत्तर स्त्रिया या अनुभव मंटपात सभासद होत्या. अनुभव मंटपात जात, धर्म, पंथ, लिंग, वर्ण व व्यवसाय असा कोणताही भेदभाव नव्हता. या सांस्कृतिक पीठाच्या सर्व सभासदांना समान अधिकार व समान स्वातंत्र्य होते. अनुभव मंटपातील सभासद असलेल्या पुरुषांना 'शरण' व स्त्री सभासदांना 'शरणी' या नावाने ओळखले जात होते. अनुभव मंटपातील शरण-शरणी यांनी आपली अभिव्यक्ती कन्नड भाषेतील 'वचन' या मुक्तछंद काव्य प्रकारातून व्यक्त केली आहे. अनुभव मंटपातील किमान दोनशे शरण-शरणींनी कन्नड भाषेत आपल्या 'वचन' साहित्याची निर्मिती केली आहे. देशाच्या विविध प्रांतातील स्त्री-पुरुष बसवेश्वरांच्या अनुभव मंटपात दाखल झाल्या होत्या. त्यामुळे अनुभव मंटपातील शरण-शरणींनी लिहिलेल्या वचनांची संख्या कोट्यावधीची होती. बसवेश्वरांनी आपल्या अनुभव मंटपाची समानता व लोकशाहीच्या तत्वावर आधारित काही मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली होती, म्हणूनच महात्मा बसवेश्वरांच्या अनुभव मंटपास 'आधुनिक संसद' म्हणावे लागते.

**बसवेश्वरांचे 'वचन' साहित्य :** महात्मा बसवेश्वरांच्या प्रेरणेतून वचन साहित्याची निर्मिती झाली आहे. वचन हा लिंगायतांचा धर्मग्रंथ आहे. मानवतावादी आचरण करणाऱ्या व्यक्तींची रचना म्हणजे 'वचने' होत. बसवतत्त्व, लिंगायत धर्म व वीरशैव संस्कृतीचा एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणजे वचनसाहित्य होय. वचनसाहित्यात वीरशैव धर्माचे तत्त्व, स्वरूप, सिद्धांत आणि साधनेवर भाष्य करण्यात आले आहे. एकंदरीत वचनसाहित्य म्हणजे लिंगायताच्या पंचाचाराचे नीतिशास्त्रच होय. बसवेश्वरांनी वचन साहित्यातून स्त्री-पुरुषांना समानतेचा संदेश दिला आहे. बसवेश्वरांची मूळ कन्नड भाषेतील ही वचने प्रामुख्याने सर्वजीवनस्पर्शी, सर्वजीवनव्यापी व सर्वजीवनप्रभावी या तत्वावर आधारित असून ती साधारणतः २३ भाषेत भाषांतरित झाल्याचे दिसून येते. बसवेश्वर अहिंसेचे पुरस्कृते होते. प्राण्यांची हिंसा करणाऱ्यांना उपदेश करताना ते आपल्या एका वचनात म्हणतात :

नवसाचा बकरा, सणासी आणिला
तोरण पानाला, खाऊ लागे
बळी जावयाचे, नाही तया भान
पोटाकडे ध्यान, बापुड्याचे
जन्म घेई जैसा, मरतसे तैसा
अज्ञानी तो ऐसा, बळी जाय
कूडलसंगमदेवा ! वधिती जे त्यासी
मरण तयांसी, चुकेल काय ?

वेद, शास्त्रे व पुराणे यांचे वाचन करीत प्राण्यांचे बळी देऊन मांस भक्षण करणाऱ्यांना कोणताही धर्म नसतो. सर्व प्राणिमात्रांविषयी दया असावी हाच माणसवांचा मूळ धर्म असावा अशी बसवेश्वरांची विचारधारा होती. महात्मा बसवेश्वरांच्या जडणघडणीमध्ये 'कृष्णा-मलप्रभा' नद्यांच्या संगम क्षेत्राला विशेष महत्त्व आहे, म्हणूनच बसवेश्वरांच्या अनेक वचनांच्या शेवटी 'कुडलसंगमदेवा' अशी नाममुद्रा वापरल्याचे दिसून येते. संस्कृत भाषेच्या अज्ञानामुळे समाजातील सर्वसामान्य स्त्री-पुरुष हे ज्ञानापासून वंचित झाले होते, म्हणून 'संस्कृत झुगारा आपल्या मातृभाषेत लोकभाषेत विचार व्यक्त करा वचने लिहा. कन्नडमधून आत्मानुभव व्यक्त करा' असा उपदेश करीत बसवेश्वरांनी लोकभाषेचा पुरस्कार केला होता.

**कायक व दासोहविचार :** महात्मा बसवेश्वरांनी समाजातील स्त्री-पुरुषांना श्रमाची नवी दृष्टी दिली. माणसाला स्वावलंबी होण्यासाठी श्रमाशिवाय पर्याय नाही, म्हणून बसवेश्वरांनी कायक व दासोह विचारांची क्रांतिकारी कल्पना मांडली. समाजातील गरीबी व विषमता दूर करून समाजात आर्थिक समृद्धता निर्माण करण्याचीही मूळ संकल्पना आहे. शारीरिक श्रम वा व्यवसाय म्हणजे 'कायक' होय. माणसांच्या प्रत्येक श्रमाला प्रतिष्ठा असते. केवळ आर्थिक संपन्नतेसाठी 'कायक' महत्त्वाचे नसून प्रत्येकांनी स्वयंश्रमाने आपली धनसंपत्ती वाढवावी. आपल्या परिश्रमाने प्राप्त केलेल्या आपल्या अतिरिक्त धन वा संपत्तीचा वापर हा कोणत्याही जातीधर्माचा विचार न करता ती लोककल्याणासाठी खर्च करावी, हाच दासोह' विचारांचा मूळ गाभा आहे. प्रामाणिकपणे कमावलेली संपत्ती ही गरजवंतांना वितरण करणे म्हणजे 'दासोह' होय. कायक हा कैलास असून यावर समाज व देशाच्या विकासाची गती अवलंबून असते. स्वत:च्या उपजिवीकेसाठी व समाजहितासाठी प्रत्येकांनी श्रम केले पाहिजे यावर महात्मा बसवेश्वरांचा कटाक्ष होता. दुसऱ्यांच्या परिश्रमावर व घामावर जगणे हे पाप असून ऐतखाऊ व शोषकांचा त्यांनी धिक्कार केला आहे. अतिरिक्त धान्य साठवून न ठेवता ती भूकेल्यांना द्या, अनाथांचे नाथ व्हा. ज्या माणसामध्ये दासोहभाव नाही, त्यांचे जीवन व्यर्थ आहे. आत्मकल्याणापेक्षा देश व समाज कल्याणासाठी योगदान द्यायला हवे. प्रामाणिक अर्थार्जन आणि अतिरिक्त संपत्तीचा समजासाठी उपयोग करण्यासाठी महात्मा बसवेश्वरांनी 'कायक' व 'दासोह विचारांचा' सिद्धांत सांगितला आहे.

**समारोप :** महात्मा बसवेश्वरांचे समग्र तत्त्वज्ञान हे मानवतावादी आहे. समता, स्वातंत्र्य, सत्य, अहिंसा आणि श्रमप्रतिष्ठा या शाश्वत तत्त्वांचा त्यांनी आयुष्यभर प्रचार व प्रसार केला. महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात ब्राह्मण व चांभार यांच्यात आंतरजातीय विवाह घडवून आणून तत्कालीन समाजव्यवस्थेला व राजसत्तेला हादरून टाकले आणि प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध बंड केले. महात्मा बसवेश्वर हे एक क्रांतिकारक, समाजसुधारक व तत्त्वचिंतक होते. न्याय व समतेचे उपासक होते. देवालयाच्या पावित्र्यापेक्षा माणसांच्या देहालयाचे पावित्र्य श्रेष्ठ असल्याचे त्यांनी सांगितले. अस्पृश्य स्त्री-पुरुषांना निर्भिड होऊन सन्मानाने जगण्याचा संदेश दिला. जाती-धर्म विरहित नव्या समाज व्यवस्थेच्या निर्मितीसाठी गळ्यात सर्वांना समतेचे इष्टलिंग' प्रतीक दिले. कर्मकांडावर हल्ले करीत अंधश्रद्धा निर्मूलनाचे समाजाला लोकशिक्षण दिले. त्यांनी समाजातील सर्व जाती-धर्मातील शुद्र स्त्री-पुरुषांना साक्षर केले. समाजाला श्रमप्रतिष्ठेचा मंत्र दिला. म.बसवेश्वरांनी बाराव्या शतकात जगाला समतेची देणगी दिली.

## मध्ययुगीन भारतातील विद्रोही समाजसुधारक : महात्मा बसवेश्वर

**प्रा.सचिन अशोक धेंडे**

*श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा( महाराष्ट्र), ई मेल : dsachin100@gmail.com*

भारतातील बाराव्या शतकातील एक महान तत्त्वज्ञानी, समाजप्रबोधनकार, वंचित-शोषितांच्या चळवळीचे अग्रदूत, लिंगायत धर्मसंस्थापक म्हणून महात्मा बसवेश्वर यांना ओळखले जाते. त्यांचा जन्म कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील बागेवाडी या गावात इ.स.११०५ साली प्रतिष्ठित वीरशैव कुटुंबात झाला.१ त्यांच्या वडिलांचे नाव मादिराज व आईचे नाव मादलांबिका असे होते. त्यांच्या जन्मकाळाविषयी मतभेद असले, तरी सामान्यतः त्यांचा जन्म वैशाखातील अक्षय्य तृतीयेला झाल्याचे मानले जाते. त्यांना बसव, बसवण्णा असे देखील म्हटले जाते. त्यांनी धर्म, समाज, तत्त्वज्ञान, वाङ्मय, राजकारण इ. क्षेत्रांत केलेले कार्य क्रांतिकारक स्वरूपाचे आहे. त्यांनी वयाच्या आठव्या वर्षी मुंज करून घ्यायचे नाकारले आणि घर सोडून ते कूडलसंगम (जि. विजापूर) येथे निघून गेले. कृष्णा व मलप्रभा या नद्यांच्या संगमावरील कुडलसंगम येथे मोठे अध्ययन केंद्र होते. तेथे बसवेश्वरांनी बारा वर्षे वास्तव्य केले. कूडलसंगम येथे त्यांनी वेगवेगळ्या भाषा, धर्म, तत्त्वज्ञान इत्यादींचा अभ्यास केला.

**सामाजिक विचार :** महात्मा बसवेश्वर यांनी भारतीय समाजातील दारिद्र्य-विषमता नष्ट करण्यासाठी आणि आर्थिक समता निर्माण करण्यासाठी "कायक वे कैलास" तसेच “दासोह”२ असा पर्यायी मार्ग सांगितला. "कायक वे कैलास" म्हणजे कर्म करण्यातच स्वर्ग आहे असा प्रयत्नवादी विचार त्यांनी मांडला.मात्र तो कर्मसिद्धांतावर आधारलेला नव्हता तर त्यात व्यक्तीला व्यवसाय स्वातंत्र्याचा आधार होता. श्रमप्रतिष्ठेबरोबरच संपत्तीची गरजेनुसार विभागणी((दासोह) करण्याची भूमिका मांडली. यावरून महात्मा बसवेश्वरांच्या समतावादी दृष्टीची कल्पना येते. त्याचबरोबर कोणतेही काम कमी प्रतीचे किंवा उच्च प्रतीचे नसते, सर्व मानव समान आहेत. कोणतीही जात श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नाही असे तत्त्वज्ञान त्यांनी मांडले.३ महात्मा बसवेश्वरांनी ‘सबका साथ सबका विकास’ ही भूमिका बाराव्या शतकातच मांडल्याचे दिसून येते. महात्मा बसवेश्वरांनी हिंदू धर्मातील जातीव्यवस्था, स्त्रीदास्य, अस्पृश्यता यांसारख्या कुप्रथांविरुद्ध संघर्ष केला.४ निर्गुण, निराकार एकेश्वरवादी श्रद्धेचा पुरस्कार केला.

**लोकशाही संसदेची स्थापना:** महात्मा बसवेश्वर यांनी इ.स.११३२ मध्ये मंगळवेढा येथे "जगातील पहिली लोकशाही संसद म्हणजेच 'अनुभव मंटपाची' स्थापना केली.५ या अनुभव मंटपात सर्व धर्मातील लोक एकत्र येऊन सामाजिक अडचणींवर कशी मात करावी यावर चर्चा करण्याचे कार्य चालत असे. बसवण्णांनी समाजातील रूढीपरंपरा, वाईट चालीरीती यांना विरोध करून समाजाच्या हितकारक गोष्टींची अंमलबजावणी करणारी नवीन यंत्रणा तयार केली. शास्त्र प्रमाणापेक्षा स्वानुभव प्रमाणाच श्रेष्ठ मानण्याची वृत्ती अनुयायी वर्गामध्ये निर्माण केली. महात्मा बसवेश्वर यांनी जीवन व जग यांना नकार न देता जग हेच परमेश्वर उपासनेचे स्थान मानून श्रमाद्वारे उपासनेची भूमिका मांडली.६

**लिंगायत धर्म:** महात्मा बसवेश्वरांनी वेदशास्त्र, होम-हवन, मूर्तिपूजा नाकारून समतेवर आधारीत नवा 'लिंगायत धर्म' स्थापन केला. सर्व मानव एकच आहोत हे सांगताना ते आपल्या वचनात म्हणतात-

“हा कोणाचा, हा कोणाचा, हा कोणाचा ऐसे नच म्हणवावे;<br>
हा आमुचा, हा आमुचा, हा आमुचा ऐसेचि वदवावे.<br>
कुडलसंगमदेवा, तुमचा घरचा पुत्र म्हणवावे.”

मंदिर म्हणजे बहुजनाचे अंधश्रद्धा व भोळी मनोवृत्तीचे केंद्र आहे. म्हणून बसवण्णांनी आपल्या अनुयायांना मंदिर न बांधण्याचा आदेश दिला आहे.७ आपल्या देहालाच देवालय माना. देवालयापेक्षा देहालय श्रेष्ठ आहे.अशी शुद्ध विचारसरणी बसवण्णांची होती. बसवण्णा एका वचनात म्हणतात- ‘दगडात देव नाही, वृक्षात देव नाही, इतर

कुठल्याही तीर्थ क्षेत्रात देव नाही तर देव हा तुमच्यातच आहे.तुमच्या आंतर मनात देव आहे,तुमचे मनच प्रधान आहे, प्रमुख आहे. मनाची थोरपणाशी ओळख करून द्या.'

महात्मा बसवेश्र्वरांनी वेद, पुराण, स्वर्ग, देव देवता, आत्मा, पुनर्जन्म, यज्ञ, वैकल्य यांसारख्या संकल्पना नाकारल्या.८ त्यांनी ज्ञान, भक्ती व कर्म यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. 'ॐ नमः शिवाय' हा षडक्षरी मंत्र त्यांना अत्यंत प्रिय होता. त्यांनी दया, अहिंसा, सत्य, सदाचार, नीती, शील इत्यादींचा प्रचार केला. एकाच देवाची भक्ती करा, भूतदया बाळगा, प्रेमाने वागा, परोपकार करा अशी त्यांची शिकवण होती. म्हणूनच महात्मा बसवेश्वरांना दक्षिणेतील बुद्ध म्हणून आदराने गौरवण्यात येते. महात्मा बसवेश्र्वरांनी धर्मप्रसारासाठी संन्यास घेतला नाही. मंटपातील चर्चेच्या माध्यमातून वेगवेगळ्या जातिजमातींच्या लोकांमध्ये बंधुभाव आणि विचार-स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माण केली. त्यांनी त्यांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी अनेक ठिकाणी मठ स्थापन केले. तेथे योग्य व्यक्तींची नियुक्ती केली. काश्मीरपासून केरळपर्यंत व ब्राह्मणापासून अस्पृश्यापर्यतच्या सर्वच घटकातील अनुयायी त्यांना मिळाले. यावरून त्यांच्या प्रभावी संघटनशक्तीची कल्पना येऊ शकते.

महात्मा बसवेश्वरांनी वर्णव्यवस्थेला त्यांनी प्रखर विरोध केला. मूर्तीपूजेला विरोध करताना महात्मा बसवेश्वर प्रतिपादन करतात-

'लाखांनी घडली मूर्ती ती पतळे,
देवत्व कैसे अग्नीत वितळे,
गरजेनुसार जे जाती विकले,
सांगा त्यांना का देव मानू?'९

बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी उभारलेल्या महान कार्याचा प्रभाव समकालीन गोरखनाथ व नंतर झालेल्या महात्मा चक्रधर, संत एकनाथ, संत नामदेव अशा संतांवरही पडल्याचे दृष्टीस येते. महात्मा बसवेश्वरांनी चातुवर्णाला विरोध केला. वर्णभेद, जातीभेद नुसतेच नाकारले नाही तर त्यावर ते त्यांनी सडकून टीका केली. वर्ण व्यवस्थेवर प्रहार करतांना ते म्हणतात-

वेदावर खडग प्रहार करेन
शास्त्राला बेड्या लावीन
तर्कशास्त्राच्या पाठीवर आसुड ओढेन
आगमशास्त्राचे नाक कापेन
मातंग चेन्नयाचा प्रिय आहे मी,
कुडलसंगमदेवा.१०

महात्मा बसवेश्वर यांचे मते "शुभ कार्यासाठी लिंगायतांनी ज्योतिषाकडे मुहूर्त पाहण्याची गरज नाही.रोजचा येणारा प्रत्येक दिवस हा शुभ असतो. जन्मावरून व व्यवसायावरून स्पृश्यता, अस्पृश्यता मानू नये. कुळ, जातीमुळे श्रेष्ठता कमी होत नाही." ते अस्पृश्यांना आदराने 'माहेश्वर' म्हणून संबोधत. सम्राट बिजलाची राजधानी असलेल्या कल्याण शहरातील एका रस्त्याचे नाव बसवेश्वरांनी 'दिव्य माहेश्वर' असे ठेवले होते. त्यांच्या मते, 'यात्रा म्हणजे श्रम, पैसा व वेळ यांचा अपव्यय होय.' कार्ल मार्क्स च्याही पूर्वी त्यांनी भारतीय लोकांच्या दारिद्रयाची कारणमीमांसा करताना ऐतिहासिक भौतिकवादी दृष्टीकोन मांडल्याचे दिसून येते. ते म्हणतात, 'दारिद्रय़ हे पाप नसून मानव निर्मित व्यवस्थेचा भाग आहे.'११

**स्त्री बंधमुक्तीचे प्रणेते :** मध्ययुगीन भारतीय समाजव्यवस्थेतही स्त्रीला शुद्र समजले जात असे. तिला मोक्ष नाही, असा समज होता. त्यांनी बालविवाह प्रथेला विरोध केला. तसेच विधवांच्या पुनर्विवाहाला मान्यता दिली. सर्व मानव समान आहेत, याचा अर्थ स्त्री व पुरूष हेही समान आहेत, असे त्यांचे मत होते. बसवेश्वरांनी स्त्रियांना लिंग दीक्षेचा पुरुषाप्रमाणेच अधिकार दिला. त्यामुळे स्त्रियांना धार्मीक स्वातंत्र्य बहाल झाले. मत स्वातंत्र्याचा अधिकार दिला.१२ आध्यात्मिक उपासनेची परवानगी दिली.

बसवेश्वरांच्या कार्यामुळे प्रेरित होऊन नंतर अक्क दहादेवी, राणी महादेवी, मुक्तायका, नागलंबिका आदी अनेक स्त्री संत नावारूपाला आल्या. अबला ही सबला होऊ शकते, हे बसवेश्वरांनी जगाला दाखवून दिले. तत्कालीन अनुभवमंटपातील चर्चेत पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियाही भाग घेत. तत्कालीन समाजव्यवस्थेला व राजसत्तेला हादरवून टाकणारा आंतरजातीय विवाह त्यांच्या पुढाकाराने घडला. मागास जातीतील संत हरळय्या यांचा मुलगा शीलवंत व मधुररस ब्राह्मण मंत्र्याची मुलगी कलावती यांच्यात आंतरजातीय विवाह घडवून आणला.१३ बाराव्या शतकात बसवेश्र्वरांनी सुरू केलेले हे कार्य निश्र्चित क्रांतिकारक होते.

**समारोप :** बौद्ध, जैन, शीख, ख्रिश्चन धर्माप्रमाणे लिंगायत हा स्वतंत्र धर्म आहे. तो अन्य कोणत्याही धर्माची शाखा अथवा पंथ नाही. अशी भूमिका मांडून आजतागायत लिंगायत धर्माला स्वतंत्र धर्म म्हणून मान्यता मिळावी यासाठी आंदोलनेही होताना दिसतात.

महात्मा बसवेश्वरांच्या वचन साहित्यातून विश्वकल्याणासाठी सामाजिक क्रांतीची ज्योत प्रज्वलित झाल्याचे दिसते. त्यांनी समतेचा स्फुल्लिंग सामान्य माणसाच्या अंत:करणात चेतवला होता. अंधश्रद्धा, कर्मकांड, जातीयता, बळी प्रथा, व्रतवैकल्य, उपास-तापास इत्यादींवर प्रखर हल्ला करण्याची हिंमत दाखवली. म्हणूनच ख-या अर्थानी महात्मा बसवेश्वर हे रुढी-अंधश्रद्धा-अस्पृश्यता-विषमता-शोषण-गुलामगिरी विरुद्ध पेटून उठणारे विद्रोही विचारवंत म्हणून आजच्या काळात देखील त्यांचे कार्य उठून दिसते.

## संदर्भ सूची :

*Desai P.B., Basaweshvar and his times, Karnataka University, Dharwar, 1968, P.168*

*https://www.inmarathi.com/12340/basaveshwar-maharaj-information/ 28 April 2017*

*कामत अशोक, महात्मा बसवेश्वर, सत्संग प्रकाशन,पुणे, १९९९ पृ. क्र. ८५*

*नष्टे नानासाहेब, दैनिक तरुणभारत,बेळगाव, ५ मे १९९२, पृ.क्र. ०२*

*पाटील एस.,एम., महात्मा बसवेश्वर आणि आणि कार्ल मार्क्स, सन्मित्र प्रकाशन, कोल्हापूर, २०१० पृ.क्र. १७*

*कामत अशोक व पसारकर शे.दे.(संपा.) वीरशैव संतसाहित्य अभ्यासग्रंथ, वीरशैव साहित्य संशोधन मंडळ, सोलापूर, १९९२ पृ.क्र. १२१-१२२*

*https://mr.wikipedia.org/ बसवेश्वर*

*तिपेरुद्रस्वामी एच.,(अनु.) रोहिणी तुकदेव, भारतीय साहित्याचे निर्माते बसवेश्वर,साहित्य अकादमी, नवी दिल्ली, २००६, पृ.क्र. २७-२८*

*दैनिक प्रहार, मुंबई आवृत्ती, दिनांक, ०२ में २०१४*

*फडकुले निर्मलकुमार,विदर्भ गंगा मराठी साप्ताहिक, नागपूर, ११ एप्रिल १९८८, पृ.क्र. ४-५*

*पाटील एस.,एम.,उपरोक्त, पृ.क्र. ४८*

*उपरोक्त पृ.क्र. ५६-५७*

*तिपेरुद्रस्वामी एच.,(अनु.) रोहिणी तुकदेव, उपरोक्त, पृ.क्र. २४-२५*

## सामाजीक न्याय,समता आणी बंधुभाव निर्मीतीचे आद्य प्रवर्तकः जगतज्योती महात्मा बसवेश्वर

**प्रोफेसर डॉ.एकंबेकर पंचशील.**
*लोकप्रशासन विभाग प्रमुख, वसंतराव नाईक महाविद्यालय,वसरणी,नांदेड.*

महात्मा बसवेश्वरानी स्वातंत्र्य, समता व बंधुतेच्या, मानवतेच्या प्रतिष्ठापनेसाठी क्रांती केली. म्हणून ही क्रांती मानवमुक्तीचा आदर्श ठरली. या क्रांतीने लोकशाहीची पायाभरणी केली. म्हणून महात्मा बसवेश्वरांना समतेचा महानायक, मानवतेचा मानबिंदू मानले जाते, समतेचा उपासक मानले जाते. ब्राह्मणेत्तर कुटुंबांमध्ये जन्माला येऊन दुःख यातना झेलून त्याविरुद्ध विद्रोह करणे समजू शकतो. पण उच्च ब्राह्मण कुळांमध्ये जन्माला येऊन इतरांना गुलाम बनविण्याचे अधिकार जन्मजात प्राप्त असतानाही, शोषणाचा, जातीयवादाचा, धर्म वादाचा पुरस्कार न करता केवळ मानवता व माणुसकीच्या दृष्टिकोनातून बसवेश्वरांनी आपले सर्वस्व पणाला लावले. बुद्धानंतर विद्रोहाची मशाल तेवत ठेवण्याचे काम महात्मा बसवेश्वरांनी केले.

महात्मा बसवेश्वरांनी १२ व्या शतकात एवढे सुधारणावादी, एवढे पुढारलेले तत्वज्ञान जगाला सांगितले आहे. यावरुन त्यांच्या द्रष्टेपणाची जाणीव होते.'इतरांसाठी जगलास तर जगलास, स्वत:साठी जगलास तर मेलास' असे विचार म.बसवेश्वरांच्या या तत्वज्ञानातूनच जन्माला आले असावे असे म्हणता येईल. बाराव्या शतकात सर्वत्र अंधश्रध्दा, दांभिकता, वैदिक कर्मकांडे जातीय स्तोम माजलेले होते. अशा विदारक परिस्थितीत विषमतेला कडाडुन विरोध करीत समाज परिवर्तनाची पताका खांद्यावर घेऊन दिशादर्शकाचे कार्य म.बसवेश्वर यांनी केले. अत्यंत तल्लख बुध्दी आणि बंडखोर विचाराचे पाईक असलेल्या म.बसवेश्वरांनी अगदी बालपणापासूनच सनातनी प्रवृत्तीला मुठमाती देण्याची कार्य केले आणि तेही आपल्या घरापासूनच! कारण दैववादी परंपरेत बहुजन समाजाला जखडून ठेवण्याचे काम इथल्या व्यवस्थेने करुन ठेवले होते. माणसाचे माणूसपण नाकारण्याचे कट कारस्थान खुलेआम होत होते. तथागत भगवान बुध्दानंतर महात्मा बसवेश्वरांनी इथल्या प्रस्थापित व्यवस्थेवर प्रहार केले आणि बहुजन समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावले. तत्कालिन परिस्थितीच्या विरुध्द लढा देणे ही साधी आणि सोपी गोष्ट नव्हती परंतु आपल्या वैचारिक अधिष्ठाणाच्या बळावर त्यांनी तळागाळातल्या समाजातील अठरा पगड जातींना सन्मानाने जगण्याचा नवा मार्ग दाखवला म्हणूनच म.बसवेश्वरांचे विचार आज नऊशे वर्षानंतरही क्रांतीकारकच वाटतात.

महाराष्ट्रामध्ये महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. आंबेडकर यांचे युग अवतरू शकले. त्यावेळचा समाज अज्ञान व अंधारामध्ये चाचपडत होता. समाजात अनिष्ठ परंपरा, चालीरीती, रूढी होत्या. समाजात वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था, विषमता नांदत होती. अशावेळी प्रस्थापित व्यवस्थेला वयाच्या केवळ आठव्या वर्षी बसवेश्वरांनी धक्का दिला. उपनयन संस्कार जोपर्यंत माझ्या ताईचा होत नाही, तोपर्यंत माझा उपनयन संस्कार करावयाचा नाही. अशी कणखर भूमिका घेऊन केवळ आठव्या वर्षी स्त्री-पुरुष समानतेचे बिगूल फुंकले. गृहत्यागानंतर जातवेद मुन्नीच्या आश्रमात कृष्णा नदीकाठी कुडल संगम येथे बारा वर्षे ज्ञानसाधना केली. ज्ञानसाधनेनंतर चालुक्याच्या राज्यकारभारात कारकून ते चालुक्यांचा पंतप्रधान अशी दैदीप्यमान वाटचाल केली. सुरुवातीचा काळ मंगळवेढा परिसरामध्ये व त्या नंतर कर्नाटकात बसवकल्याण परिसरात चंदनाप्रमाणे जिझून जनतेची सेवा केली. या संपूर्ण वाटचालीत प्रस्थापित व्यवस्थेला धक्के देऊन स्वातंत्र्य, समता व बंधुतेची प्रतिष्ठापना करून कल्याणकारी राज्य सत्ता निर्माण केली. हे कल्याणकारी राज्य निर्माण करण्यासाठी बसवेश्वरांना सर्वस्वाचे दान द्यावे लागले.कारकून ते पंतप्रधान अशी वाटचाल करत असताना बसवेश्वरांनी अनेक क्रांतिकारक कार्य केले. प्रत्यक्ष कृती व उक्तीतून समाजात सर्वांगीण परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. अनुभव मंडपाच्या माध्यमातून लोकशाही संसद निर्माण केली. पुढे महाराष्ट्र, कर्नाटक व देशातील अनेक राज्यात बसवेश्वर यांच्या प्रेरणेतून समाजसेवक व

विचारवंताची पिढी निर्माण झाली. बसवेश्वरांनी अल्प काळामध्ये राज्यकारभाराच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक सुधारणा घडवून आणल्या.त्याचबरोबर समाजात सगळीकडे उच-निचता, असमानता, स्वातंत्र्याचा अभाव, हक्क अधिकाराचा अभाव अशा समाज विघातक गोष्टीचा. संत महात्मा बसवेश्वरांनी जवळून अनुभव घेतलेला होता.या सर्व गोष्टीचा मुळातुन संपवन्यासाठी त्यांनी समाज सुधारनेचे कार्य हाती घेतले. त्यांनी प्रथम सर्वांना एकत्रित करुण एक संघटन केले. सर्वांना शिक्षित केले, स्वंय रोजगाराचे धडे दिले. ते असे म्हणतात की, समाजातील सर्वजण एकच आहेत.त्यांच्या मध्ये रोटी बेटी व्यवहार झाला पाहिजे, सर्वांना सर्वच प्रकारचे स्वातंत्र्य ,हक्क, अधिकार मिळावेत यासाठी ते आग्रही होते. स्त्री असो की पुरुष त्यामध्ये भेद करू नये , सर्वांना समान वागणूक द्यावी असा त्यांचा व्यापक दृष्टीकोण होता. ते आपल्या एका वचनात म्हणतात,

" लोह तापवून झाला लोहार,
वस्त्र विणून झाला विणकर ,
कपडे धुहुन परीट धोबी झाला,
तसाच वेद पठन करुण झाला ब्राह्मण "

जाती पाती नष्ट झाल्याशिवाय समाजात एकोपा शक्ति निर्माण होणार नाही.हे संत महात्मा बसवेश्वर जानून होते. या करीता त्यांनी प्रत्यक्ष कृति केलेली आहे. त्यांनी स्वत: अंतर्जातीय विवाह करुण घेतला. तसेच ब्राह्मण आणि शुद्र यांच्यात अंतर्जातीय विवाह घडवून आणला. यासाठी त्यांना अनेक संकटांना सामोरे जावे लागले होते. संत महात्मा बसवेश्वरांचे सामाजिक सुधारणे बरोबर धार्मिक कार्य अतिशय महत्व पूर्ण आहे. धर्मातील बुरसटलेल्या जुनाट विचारांचा ते विरोध करतात वैदिक संस्कृती चा गाभा म्हणज विषमतातेची विकृति पोसनारी चातुर्वर्ण्य संकल्पना, तिच्या मुळावरच ते घाव घालतात. धर्म सुधारणा हवी असेल तर जुन्या विचारांचा विध्वन्स आवयशक. ही वर्णव्यवस्था मुठभरांचे अस्तित्व स्वीकारुन.बहुजनाचे जीवन नाकारनारी आहे. ही समाज स्थिति बदलून जाती वर्णात सामाजिक अभिसरण व्हावे या हेतुमुळे त्यांनी चातुर्वर्ण्य नाकारले.त्याचबरोबर होमहवन ,कर्मकांड ,स्वर्ग ,पुनर्जन्म आदींचे अस्तिव अमान्य करुन,या गोष्टी मानवास हानिकारक आहेत, याचे महत्व पटवून देऊन त्यापासून सर्वांना परावृत्त करण्याचा प्रयत्न करतात.आणि त्यांच्या खालील वचनांच्या वैशिष्ट्यावरुनलक्षात येते

राजा त्याचा पराक्रम , राज्यकारभार , राज्यस्तुती यांना सोडून वेगळे विशेस विषय व्यक्त करणारे वचनसाहित्य आहे.

पौराणिक आणि काल्पनिक व्यक्तीमधील ढोंगीपणा उघड करणारे वचनसाहित्य आहे.

यज्ञ-आग, कर्मकांड, यज्ञबळी,वेद,शास्त्र यांना नाकारणारे वचनसाहित्य आहे.

जात-वर्ण -वर्ग-लिंगभेद नस्ष्ट करून समानता निर्माण करणारे वचनसाहित्य आहे.

समानता आणि विश्वबंधुत्व निर्माण करणारे वचनसाहित्य आहे.

सामान्य जनतेच्या आचार-विचाराला प्राधान्य देणारे वचनसाहित्य आहे.

अनुभव चर्चा करण्यासाठी अनुभवमंटपाच्या विद्यापीठाची स्थापना करणारे वचनसाहित्य आहे.

कर्नाटकात वचनांना चलनी नाण्याची उपमा दिली जाते.आदराने ,अंत:करणानी परिशुद्ध भावनेने स्वीकारावीत असा कृपा भाव जनमयी यावा अश्या अमूल्य कृती ,वचन शक्तीतील भक्ती , जीवनात पाळावयाचे वचन शास्त्र होय. त्यात अनिष्ट प्रथा व परंपरांचा त्याग केला,स्त्री-पुरुष समानतेचा स्वीकार केला, जातीप्रथा मोडीत काढली,आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह ला प्राधान्य दिले, विधवा-पुनर्विवाह केले, स्त्रियांना धर्मप्रचारक म्हणून मान्यता दिली,मंदिराचा त्याग केला व मंदिर व्यवस्था नाकारली,ज्ञान बहुजनांसाठी खुले केले, एकेश्वरवादाचा आग्रह धरला, श्रप्रतिष्ठा जोपासली, स्वातंत्र्य समता व बंधुता जोपासली,भेदाभेद करणारा धर्म नाकारला,धर्म भेद करणारा संस्कार नाकारला, स्वतः आंतरजातीय विवाह केला, ज्ञानमार्ग भक्तिमार्ग कर्ममार्गाने राज्यकारभार केला, वेद व ब्राह्मणांची मक्तेदारी मोडून काढली, पशुबळी ला विरोध केला, देव व भक्तांमध्ये एजंट नाकारला,हरळ्याने बनवलेली चप्पल डोक्यावर घेऊन श्रमाचा गौरव केला, शिक्षेपेक्षा दयेवर भर देऊन परिवर्तन केले. गाय चोराला

वासरू भेट दिले. अशा क्रांतिकारी सुधारणा करून मानव मुक्तीचा मार्ग अंगीकारला. समतेसाठी प्रधानमंत्री पदाचा त्याग केला. पण मानवता व माणुसकीशी तडजोड केली नाही.

महात्मा बसवेश्वरांच्या जीवनचरित्रातून आपण काय शिकायचं तर जीवनामध्ये ज्ञानप्राप्ती बरोबरच ज्ञानाचे उपयोजन महत्त्वाचे आहे. केवळ पुस्तकी ज्ञान कामाचे नाही. तर पुस्तकातील जोपर्यंत मस्तकामध्ये येत नाही तोपर्यंत परिवर्तन घडत नाही असा विचार त्यांनी मांडला. यावरून हे स्पष्ट होते की बसवेश्वर माहीत असून उपयोग नाही. केवळ ऐकून उपयोग नाही.केवळ बसवेश्वरांचा जय म्हणून उपयोग नाही. केवळ बसवेश्वर तोंडपाठ करून उपयोग नाही. तर त्यासाठी बसवेश्वरांनी दाखविलेल्या मार्गाने चालावे लागेल.बसवेश्र्वरांनी कर्नाटकात स्थापन केलेल्या लिंगायत धर्मात सर्व जातीतील स्त्रीपुरूषांना अध्यात्मिक स्वातंत्र्य, उपासना स्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले.सर्वांनाच शिवाची भक्ती करून त्याला प्रसन्न करून घेण्याचे स्वातंत्र्य आहे, ही शिकवण त्यांनी दिली. ते असे

"मानवी कुळे अनेक असली तरी
योनीमधून जन्म एकच प्रकारचा असे
वाक्चातुर्य कितीही असून काय उपयोग?
योग्य काय ते जाणणे एकच प्रकारचे असे.
वस्तू,जात,गोत्र यांमध्ये विशेष म्हटल्यास
दिवस -रात्र हा द्विधा भाव घालविण्या.
प्रकाश अंधार हे दोन भेदभाव राहिल्याविना न असती.||

मानवांचे कुळ असलेतरी सर्वांचा जन्म योनीमधूनच होत असतो.जन्मण्याची रितीही एकच असते.वेद-शास्र-आगमांद्वारे अनेक प्रकारे मनोरंजकपणे सांगितले तरी मोक्षाविषयी निश्चित पणे सांगण्याची रीत एकच असते.शेकडो रिती नसतात.पुन्हा:शेकडो कुळे व अठरापगड जाती असल्या तरी त्यांमधील गोत्रे दोनच-एक उत्तम व दुसरा अधम कसे म्हणता येईल.तसेच, दिवस व रात्र दोन्हीचा निर्णय करण्यासाठी उजेड व अंधार यांचाच आधार घ्यावा लागतो, त्याशिवाय दुसरा उपाय नसतो. स्त्री-पुरुष या दोनच जाती असून शेकडो कुळे अठरा जाती म्हटल्यास आम्ही सांगितलेले वाक्य उल्लंघून दिसणारे शास्त्र, प्रत्यक्ष ज्ञान दुसरे कुठले असणार? सर्व जातीचे लोक एकाच विहिरीचे पाणी वापरतात. वावरणारी जमीन एकच, सर्वावर प्रकाशणारा सूर्यही एकच आहे. चौकशी करून निरीक्षण करणारा डोळा एकच असतो, तेथेही डोळ्यातील बाहुली नाना रूपे पाहून ती बाहुली सुरुप-कुरुप, वेशभूषा, दागदागिने अशा अनेक तऱ्हा पाहून रूपे अनेक असली तरी पाहणारा डोळा एकच असतो. हे सर्व जाणून शिवच सर्वश्रेष्ठ म्हणून शेकडो कुळे अठरा जाती यांचे सूचक मुळीच नाही असा विचार समाजात रुजविण्याचा प्रयत्न महात्मा बसवेश्वरांनी आपल्या वाचनातून काही उपदेश केलेला आहेत. ते असे

महात्मा बसवेश्वरांनी सांगितलेले उपदेश -

**१) एकदेव उपासना -** बाराव्या शतकाच्या काळात समाजातील लोक अनेक-अनेक देव देवींची उपासना करीत. हे कमी वाटले म्हणून अग्नी, पृथ्वी, सुर्य, चंद्र, जलदेवता, कुळदेवता, दशावतार, गणेण, काली, यल्लम्मा, रेणुकांबा इतकेच काय तर कुत्रा वानर, नाग, वाघोबा, गाय-बैल, मुंग्या हे प्राणी तसेच भिंती , गढ्या, किल्ले, विहरी, शेते, झाडे, नद्या-नाले यात राहणारे भूत-पिशाच्च, मैलार, मल्हारी, खंडोबा, मरीआई, मुंग्या, मातामाय इत्यादिची पुजा करीत.

समाजातील ही अनेक देवांची उपासना करणे म्हणजे एकाही देवावर विश्वास नसल्या सारखे आहे. मग एकही देव प्रसन्न होणार नाही. म्हणून बसवेश्वरांनी एकाच देवावर विश्वास ठेवणारी भक्ती करा असा उपदेश केला.

**२) स्वर्ग-नरक विश्वात कोठेही नाही -** देवलोक, मृत्युलोक ह्या दोन्ही वसाहती आकाशात कोठेही नाहीत. जेथे सत्य, शील, करुणा, माणुसकी आहे तेथेच साक्षात स्वर्ग नांदतो आणि जेथे अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार आहे तोच नरक आहे. सदाचारच स्वर्ग आणि अनाचारक नरक होय.

**३) पाचही सूतके पाळू नका -** स्त्रियांच्या मासिक पाळीत जो स्त्राव पाझरतो तो स्त्री ही प्रजननासाठी सक्षम आहे त्याचे घोतक आहे. मातृत्वाशक्ती गौरवांकीत करणारा विटाळ हा अपवित्र कसा असू शकतो? म्हणून बसवेश्वर म्हणतात ऋतुस्नात, विटाळशी, रजस्वलेला अस्पृश्य समजू नये. तसेच इतर जातींचा विटाळ, उष्टे खाण्याचा विटाळ, मृत्युचा विटाळ, जन्माचा विटाळ ही पाचही सूतके पाळू नयेत. मात्र स्वच्छता ठेवावी व काळजी घ्यावी.

**४) पुनर्जन्माचे आमिष दाखविले नाही -** समाजात हा गैरसमज पसरविण्यात आलेला आहे की, सध्या मिळालेले जीवन हे मागच्या जन्मीचे पाप आहे. पुढच्या जन्म वैभव संपन्न घरात घ्यावयाचा असेल तर पुण्य गोळा करण्यासाठी व्रतवैकल्ये, उपवास करा. तीर्थयात्रा, नद्यात स्थान, सुवर्णदान, गोदान, भूमीदान, दानधर्म करा, देवळे बांधा, या जन्माची कर्मफळे पुढच्या जन्मात भोगावी लागतात. यालाच कर्मविपाक सिध्दांत म्हणतात. बसवेश्वरांना हे मान्य नाही. त्यांनी स्वर्गाचे अमिष व नरकाची भिती दाखवली नाही. बसवेश्वरांना मेल्यानंतरच्या जीवनाच्या केलेल्या कल्पना मान्य नाहीत.

**५) पृथ्वीलाच स्वर्ग बनवू या -** आपण जन्मालो ते हे दिसणारे अनुभवास येणारे जग खोटे नाही. मिथ्या किंवा लटके नाही. म्हणून आपण राहातो त्या पृथ्वीवरच घाम गाळून परिश्रम करुन सुखे निर्माण करु या असा भौतिकवादी, इहजीवनवादी विचार बसवेश्वरांनी मानवजातीला दिलेला आहे. स्वर्गाचे आमिष, प्रलोभन व नरकाची भीती त्यांनी लोकांना दाखबली नाही. कायक करण्याचे श्रम केल्यानेच पृथ्वीचा स्वर्ग होऊ शकतो हा मानवतावादी विचारच लोकांना सुखात ठेवू शकतो.

**६) संन्यास घेऊ नये, भिक्षावृत्तीचा निषेध -** इंद्रिय दमनाने विषय विकार वाढतात. चांगल्या विचार-भावनावर दाबलेले विषय विकार कुरघोडी करतात. म्हणून तारुण्य आल्यावर विवाह करावा, परंतू आजन्म अविवाहीत राहणे, परमेश्वर प्राप्तीसाठी संन्सास घेणे, सर्वसामान्य व्यक्तीसाठी योग्य नव्हे. ज्यांच्या आपल्या विकारांवर ताबा आहे, योग बळाने ज्यांना मनाला नियंत्रित करता येते, अशा निग्रही, ध्येयवादी, सिध्दीप्राप्त योगींनी समाजाच्या कल्याणासाठी सन्यास व्रत अवश्य धारण करावे. एखाद्या चांगल्या समाज कार्यासाठी उच्च ध्येय प्राप्तीसाठी समर्पित भावनेने कार्य करावयाचे असेल अशांनी अविवाहित राहून संन्याशी जीवन जगावे. बसवेश्वरांनी संन्यास घेणे बंधनकारक न ठेवता ऐच्छिक ठेवलेले आहे. संन्यास घेतल्याने पत्नी व मुले यांच्यावर अन्याय होतात, भिक्षा मागतात म्हणून भिक्षा मागून जगणा-यांचा त्यांनी निषेध केलेला आहे.

**७) अंधश्रध्दा नाहिशा केल्या -** बसवेश्वर म्हणतात, देवाला प्रसन्न करण्यासाठी मुक्या प्राण्यांचे बळी देऊ नका. होम हवनात गरिबांना न मिळणारे दुध, तुप, दही, लोणी, वस्त्रे, टाकू नका. व्रत, वैकल्ये, नवस प्रायश्चिताचे विधी, उपास-तपास करुन शरीराला कष्ट देवू नका. देवदेवतेला पोटच्या मुली अर्पण करुन त्यांना देवदासी, जोगतीणी, भावीण, गणिका, मुरळी, आराधिनी, कसबिणी करु नका.

**८) पाप-पुण्याच्या कल्पना मानवाला निष्क्रीय करतात -** आपल्या नशिबी आलेली दु:खे, संकटे, मंदबुध्दी, दारिद्य हे मागच्या जन्मीच्या पापाचे फळ आहे ते म्हणे ब्रम्हलिखीत असते. ते अपरिवर्तनीयच असते. यावरच्या विश्वासामुळे श्रध्दाळू माणूस या जीवनात कोणतेही परिश्रम, प्रयत्न व साहस करीत नाही. कारण कितीही प्रयत्न केले तरी ब्रम्हलिखीत बदलणारच नाही तर प्रयत्नच कशाला करावा? परिणामी माणूस आत्मविश्वास गमावून निष्क्रीय होतो. मग इतर सुलभ मार्गाने म्हणजे गुप्तधन कसे मिळेत, जुगारातुन पैसे कसे मिळतील असे विचार त्याच्या मनात निर्माण होतात. म्हणून पाप-पुण्याच्या कल्पना झुगारुन द्यावयास पाहिजे. परिश्रमामुळेच आपले जीवन बदलू शकते यावर प्रत्येकाचा विश्वास असावा.

**९) शकून-अपशकून, तिथी, नक्षत्रे यावर विश्वास ठेवू नका -** शकून-अपशकून, मांजर आडवी गेली, तारा निखळला, कावळा ओरडला, मध्यरात्री कुत्रा वेल्हाळला, पाल चुकचकली, घुबडाचा घुघुत्कार यावर विश्वास ठेवू नये.लग्न जुळवितांना आई-वडील, नातेवाईक वधु-वर शरण यांना जे मान्य तोच शुभयोग समजावा. राशीकुट, गुण, ग्रह, नक्षत्रे, जुळली आहेत असे समजावे.

**१०) गुन्हेगारांना सभ्य समाजात आणले -** जन्मत: सर्वच लोक निष्पाप व चांगले असतात, परंतू वाईट मित्रांच्या संगतीमुळे, दारिद्रयामुळे, रोजच्या गरजा पुर्ण न झाल्यामुळे, पोटच्या भुकेमुळे, आपल्यांना खायला मिळत नसल्यामुळे स्त्रिया-पुरुष अनैतिक व्यवसायाकडे वळून चोर, गुन्हेगार बनतात, मुली देवदासी, मुरळया, वैश्या बनतात. त्यांना चांगले समजाविले, उपदेश केला (समुपदेशन) चांगले वागविले तर वाईट लोकही सभ्य होऊन प्रतिष्ठीत चांगले जीवन जगू शकतात यावर बसवेश्वरांचा विश्वास होता. त्यामुळे त्यांनी दारु गुत्तेदार मारय्या, गायचोर उरिलिंगपेद्दी, काश्मिरचा मारेकरी चिक्कच्या, संकव्वा (पुर्वायुष्यातील वेश्या) यांना सभ्य समाजात आणून कायक (कर्म) करण्यास दिले आणि अनुभव मंटपाचे सदस्य केले.

**११) नागिदेव कांबळे या अस्पृश्याकडे भोजन -** महामंत्री बसवेश्वर समाजातील शुद्र समजल्या जाणा-यांच्या घरी जात. त्यांचे भोजन प्रसाद स्वीकारित असत. बसवेश्वरांच्या आचरणाने व कृतीने प्रभावित होऊन अनेक शुद्रांनी अनेक देवांची पुजा सोडून इष्टलिंग भक्ती स्वीकारली. एक दिवस नागिदेव कांबळे या अस्पृश्यानेही त्यांना भोजनाचे निमंत्रण दिले. गावकुसाबाहेरची अनेक स्त्री-पुरुष मंडळी सहभागी झाली होती. कर्मठ लोक वाकून खात्री करुन घेऊ लागले. बसवेश्वरांनी दुर्लक्ष केले आणि जमलेल्या स्त्री-पुरुषांना इष्टलिंग भक्ती स्विकारण्यास सांगितले. रोज अनुभव मंटपात यावयास सांगितले. बसवेश्वराने अस्पृश्य नागिदेव कांबळे यांच्याकडे भोजन करुन आपल्या कृतीतून व आचारातून समाजात जातीभेद पाळू नका असा चांगला संदेश दिला.

**१२) स्त्रियांना स्वातंत्र्य -** स्त्रियांना शिक्षण घेण्याचा, दिक्षा घेण्याचा, संपत्ती घेण्याचा, राजसत्ता सांभाळण्याच्या, पतीची निवड करण्याचा, विधवांना विवाहाचा, घटस्फोटाचा हे सारे अधिकार नव्हते. स्त्रियांची संपत्ती सारखी देवाणघेवाण होई. कर्मठ लोकांनी तिला व्रतवैकल्ये, उपासतपास इतर कर्मकांडातच आजन्म गुंतवून ठेवले. बसवेश्वरांना या गुलामी प्रथेची कल्पना होतीच. पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही मन, भावना, बुध्दी, शक्ती असते याची जाणीव असल्यामुळे तिला विकासाच्या संधी उपलब्ध करुन दिल्या. स्त्रियांची पाचही सुतकातून मुक्ती केली. अनुभव मंटपातील स्त्रियांना लिहिणे, वाचणे शिकवून साक्षर केले. जे वाटते ते मत अनेक स्त्री-पुरुषांच्या समोर हिमतीने व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य बहाल केले. स्त्रिया वाद-विवादात सहभागी होऊ लागल्या. स्वाभिमानाने आपले विचार वचन काव्यातून व्यक्त करु लागल्या. अर्थार्जनाची कामे (कायक) करु लागल्या. बसवेश्वरांनी बाल विवाहाला विरोध केला. पुनर्विवाह, आंतरजातीय विवाहाला, विधवांच्या विवाहाला प्रोत्साहन दिले. कल्याण क्रांतीत वचन साहित्याला राज्याच्या सैनिकांनी आग लावल्यावर त्यातून बरेच वचन साहित्याचे गठ्ठे सातशे किलोमीटर अंतरावरील डोंगर कपारीत दुर्गम जंगलात उळवी (जि.उत्तर कन्नड) येथे सुरक्षित नेले. केवढी ही वचननिष्ठ व ज्ञाननिष्ठा अनुभव मंटपातील अनेक स्त्रियांनी विविध प्रकारचे उद्योग, व्यवसाय सुरु केलेले होते. उदा : सूत कातणे, सौंदर्य प्रसाधने विकणे, धान कोंडणे, तेलघाणी चालविणे, सुतार काम, स्त्री-पुरुषांना लिहणे-वाचणे शिकविणे, ज्ञानदान करणे इ.बसवेश्वरांनी स्त्रियांना स्वावलंबी, कर्तव्य कठोर व स्वाभिमानी बनवून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला.

वरीलप्रमाणे भेदभावामध्ये होरपळलेल्यांचा आणि गरिबीत खितपत पडलेल्यांचा कैवारी होणे होय. मानवांच्या घनतेस (श्रेष्ठत्वास) उचलून धरणे होय. सर्व प्रकारच्या भेदभावांच्या निर्मूलन कार्यात सहकार्य करणे होय. या पृथ्वीस सकल जीवात्म्यांचे महाविवास व माहेर होण्यालायक करणे होय. कायकाव्दारे अर्थात शरीरिक श्रमामुळे येणारे अनुभव आणि आपल्या सारखेच इतरांना समजण्यासाठी दासोह करणे. या सा-यातून अनुभवासंगे समाधानाने जगणे होय. असे महात्मा बसवेश्वरांचे क्रांतीकार्य दिसून येते. महात्मा बसवेश्वर नैसर्गिक सत्य सांगतात. त्यांची विवेकवादावर आणि विज्ञानवादावर प्रचंड निष्ठा होती.मानवतावादी आणि समतावादी समाज निर्मितीसाठी जात हीच घातक असते.तिलाच समूळ नष्ट करायचे असेल तर भाषणे देऊन, पुस्तके लिहून किंवा परिसंवाद ठेवून होत नाही त्यासाठी आंतरजातीय विवाह लावून देणे ही कृतीच केली पाहिजे याची पुरेपूर जाणीव महात्मा बसवेश्वरांना होती म्हणून च त्यांनी त्यांच्या काळात अनेक आंतरजातीय विवाह लावून दिले म्हणून महात्मा बसवण्णा जगातील जातीनिर्मुलनाचा पहिला कर्ता प्रणेता होता असे मला वाटते.बोलण्यापेक्षा कृतीवर भर देणारा एक महान कर्ता समाज सुधारक म्हणजे महात्मा बसवेश्वर हेच होते यात तीळमात्र शंका नाही.मानवतावाद,समता,स्वातंत्र्य, बंधूभाव,

सामाजिक न्याय ही संविधानिक मूल्ये' समाजात रूजविण्याचा पहिला प्रयत्न महात्मा बसवेश्र्वरांनी केले हे निर्विवाद सत्य आहे.

**संदर्भसूची:-**

*डॉ. सुर्यकांत घुगरे :जगत्ज्योतीबसवेश्वर, महाराष्ट्र बसव समिती, नांदेड - 2003*
*भगत रा. तु. : संत साहित्य आणि अंधश्रध्दा निर्मुलन, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर - 2002*
*डॉ. राजेश्वर सोलापुरे : लिंगायत एकस्वतंत्र धर्म, अरुणा प्रकाशन, लातूर - 2013*
*रमजान दर्गा : बसवेश्वरांचा विश्वसंदेश, महाराष्ट्र बसव परिषद, भालकी, सातवी आवृत्ती - 2018*
*डॉ. अशोक ग. मेनकुदळे : महात्मा बसवेश्वर, महाराष्ट्र बसव परिषद भालकी, तीसरी आवृत्ती - 2019.*
*डॉ.एच.थिप्पेरुद्र स्वामी : बसवेश्वर, साहित्य अकॅडमी, नई दिल्ली - 1982*
*दुर्गा भागवत : धर्म आणि लोक साहित्य, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई - 1975*
*प्रा. भिमराव ब्रम्हाजीराव पाटील : ऐतिहासिक बसकल्याण पर्यटन मार्गदर्शिका, शरण साहित्य मंडळ लातूर – 2014*
*प्रा. करडीगुद्दी आर.एम.(अनुवादक मराठी)वचन सिध्दांत सार-महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान भालकी जि.बिदर प्रथम आवृत्ती १५जानेवारी,२०१६.*
*डॉ.सोमनाथ रोडे-सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा बसवेश्वर अश्विनी प्रकाशन, लातूर प्रथमावृती अक्षय्य तृतीया दि.२७ एप्रिल,२००९*
*डॉ.श्रीदेवी शंकराप्पा कडगे-महात्मा बसवेश्वर व्यक्ती आणि वाड्.मय इसाप प्रकाशन, नांदेड प्रथमावृती २८मार्च,२०१७.*
*सुभाष किशनराव देशपांडे-महात्मा बसवेश्वर कार्य आणि कर्तृत्व-जनशक्ती वाचक चळवळ औरंगाबाद प्रथमावृती २१मार्च,२०१५.*

## महात्मा बसवेश्वर यांचा स्त्रीवादी दृष्टीकोन

**प्रा. डॉ. विजय वारकड**

*मराठी विभाग, संशोधन मार्गदर्शक, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड ता. मुखेड जि. नांदेड*

महाराष्ट्रात वारकरी, महानुभाव, नाथ व सुफी संप्रदायांनी मराठी वाङ्.मयाच्या इतिहासात मोलाची भर घातली. या संप्रदायांनी महाराष्ट्र संस्कृतीच्या जडणघडणीला हातभार लावला. या सर्व संप्रदायाप्रमाणे महाराष्ट्राच्या जडण-घडणीत वीरशैव संप्रदायाचा सिंहाचा वाटा आहे. विश्वातील अखिल मानव जातीस समतेचा संदेश देणारे आद्य समाजसुधारक म्हणजे म. बसवेश्वर होत. वीरशैव व लिंगायत या नावाने प्रामुख्याने सर्वांना परिचित असलेला हा संप्रदाय बसवधर्म, शिवधर्म, शरणधर्म, जंगम इत्यादी नावानेही ओळखला जातो. अनेक संप्रदायाने स्त्री-पुरुष यांच्यात भेद केले. स्त्रियांसाठी व पुरुषांसाठी वेगवेगळे आचार सांगितलेत; परंतु वीरशैव संप्रदायाने स्त्री व पुरुषांना समान हक्क दिलेत. स्त्रियांच्या विचाराला प्रथमच वीरशैव संप्रदायाने वाचा फोडली. स्त्रियांनासुद्धा धर्मगुरू होता येते, जन्मामुळे किंवा लिंगभेदामुळे कोणीही श्रेष्ठ वा कनिष्ठ ठरत नाहीत तर सर्वजण समान आहेत, अशी शिकवण वीरशैव संप्रदायाने दिली.

विश्वज्योती महात्मा बसवेश्वरांचा जन्म म्हणजे विश्वातील एक विस्मयकारी घटना होय. सकल जीवात्म्याच्या कल्याणासाठी दीन-दुःखित, पतित, पददलितांच्या उत्थानासाठी, समानतेसाठी, दुःख, दारिद्र्य, अज्ञान, मूढता यांच्या समूळ निर्दालनासाठी बाराव्या शतकात बसवण्णांनी मांडलेली समग्र क्रांती अप्रतिम म्हणावी लागेल. कारण, "समय महापुरुषोंको जन्म देता है, और महापुरुष युग का निर्माण करते है।"१ सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि स्त्री-पुरुषांमध्ये समानता साधल्याशिवाय कल्याणकारी समाजाची स्थापना करणे असंभव आहे. अशी समानता साधण्यासाठी समाजाला वर्गरहित, वर्णरहित, जातीरहित आणि लिंगभेद रहित झाले पाहिजे. अशा रीतीने समता समाजासाठी बसवण्णांनी आपले तन, मन, धन, अर्पण केले.

महात्मा बसवेश्वरपूर्व सामाजिक स्थिती फार विचित्र होती, यावेळी स्त्रियांचे जीवन अत्यंत दयनीय बनले होते. स्त्रीने लहानपणी वडिलांच्या आज्ञेत, प्रौढपणात पतीच्या तर त्यानंतर मुलाच्या आज्ञेप्रमाणे चालावे असा एक सर्वसामान्य संकेत बनला होता. पती हाच तिचा परमेश्वर असल्यामुळे पतीची सेवा आणि वंशपरंपरेचा विकास करण्यासाठी मुलांना जन्म देणे, हेच तिच्या जीवनाचे ध्येय बनले होते. म्हणजे स्त्री ही मनुष्य नसून ती उपभोगाची वस्तू आहे, याचदृष्टीने तिच्याकडे पाहिले जात होते. "जी पत्नी गुलामाप्रमाणे काम करते, गणिके प्रमाणे लैंगिक सुख देते, मातेप्रमाणे पतीच्या भोजनाची काळजी घेते आणि अडचणीच्या प्रसंगी त्याला योग्य सल्ला देते ती स्त्री पतिव्रता आहे,"२ असे म्हटले आहे.

बालविवाह प्रचलित असलेल्या त्यावेळच्या समाजात विधवा-पुनर्विवाह याला धर्माने परवानगी दिली नव्हती. ब्राह्मण व काही उच्च जातींमध्ये विधवेचे केशवपन केले जात असत. सतीप्रथा यावेळी प्रचलित असून पतीबरोबर सती जाण्या-या स्त्रीचे समाजातील स्थान अद्वितीय असे होते. जातीअंतर्गतच विवाह करावा असा सामान्य संकेत असून आंतरजातीय विवाह समाज स्वीकारत नव्हता. "ब्राह्मणाने चार, क्षत्रियांनी तीन, वैश्यानी दोन तर अस्पृश्यांनी फक्त एका पत्नीसोबत विवाह करण्याची परवानगी होती."३ त्यावेळी शिक्षण सर्वांसाठी खुली नसून मुक्त वातावरणात दिल्या जात नव्हते. प्रामुख्याने ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्यांना त्यांच्या व्यवसायानुरूप शिक्षण घेण्याचा अधिकार असला तरी, ब्राह्मणाव्यतिरिक्तचे वर्ग फार अल्प प्रमाणात शिक्षण घेत असत. शिक्षण देण्यासाठी मठ, मंदिर व आश्रमाचा वापर केला जात असे. राजाने दिलेले दान व अग्रहारातून मंदिर व मठांचे व्यवस्थापन चालत असे. धार्मिक, जीवनोपयोगी व व्यावहारिक शिक्षण दिल्या जात असून त्यात धार्मिकतेचा अधिक प्रभाव होता. महत्त्वाची बाब

म्हणजे स्त्री व शूद्र मात्र शिक्षणापासून पूर्णतः वंचित होते. "मुलींनी शिक्षण घेतले तर तिला वैधव्य प्राप्त होईल"४ अशी समजूत समाजात प्रचलित होती. अस्पृश्य आणि शिक्षण यांचे नातेच तुटल्यामुळे हा वर्ग कायमचा ज्ञानी होण्यापासून, पर्यायाने स्वाभिमानी व संपन्न बनण्यापासून वंचित राहिला होता. त्यामुळे समाजव्यवस्था विषमतवादी व शोषणयुक्त बनली होती. या समाजव्यवस्थेत परिवर्तन करणे आवश्यक झाले होते. त्यामुळे आधुनिक मूल्य व विचारधारेवर आधारित अशी समतावादी, मानवतावादी, समाजव्यवस्था निर्माण करण्याचा चिरंतन प्रयत्न म. बसवेश्वरांनी केला.

कर्नाटक मधील विजापूर जिल्ह्यातील बागेवाडी या गावी मादरस व मादलांबिका या दाम्पत्याच्या पोटी जन्मलेल्या म. बसवेश्वर यांचा तात्कालिक धर्म परंपरेनुसार वयाच्या आठव्या वर्षी मौजी बंधनाचा कार्यक्रम त्यांच्या वडिलांनी म्हणजे मादीराज यांनी केला. परंतु बुद्धीला न पटणारे विचार व कार्य यांचा बसवण्णांनी कडाडून विरोध केला. एवढेच नव्हे तर "उपनयन संस्कार माझ्यासाठी आवश्यक नसून तो करावयाचा असल्यास प्रथम मोठी बहीण नागम्माचा पहिल्यांदा करावा, स्त्री आणि पुरूष यांच्यामध्ये भेद करणारा हा धार्मिक संस्कार मला मान्य नाही"५ असा बंडखोर विचार त्यांनी वडिलांना बोलून दाखवला.

कालांतराने कल्याणला आल्यानंतर बसव विचारांचा प्रसार मोठ्या प्रमाणात होऊ लागला. त्यामुळे हळूहळू संपूर्ण भारतामधून त्यांच्या विचारांकडे आकृष्ट होणारा वर्ग कल्याणकडे येऊ लागला. कल्याण याच ठिकाणी म. बसवेश्वरांनी इ.स. ११५४ मध्ये वर्णाश्रमव्यवस्था, जातिभेद, स्पृश्यास्पृश्यता, स्त्रीदास्यत्व, धार्मिक कर्मकांड व सामाजिक अन्याय-अत्याचाराच्या उच्चाटनासाठी 'अनुभव मंटप' स्थापन केला. "म. बसवेश्वरांच्या अनुभव मंटपात ३३ स्त्रियांना शेरणेंचा दर्जा दिला गेला. स्त्रियांवर लादलेली विटाळाची बंधने बसवण्णांनी झुगारून दिली. स्त्रियांनी मंदिरात प्रवेश करू नये, धार्मीक संस्कारात सहभागी होवू नये, यासारख्या अशास्त्रीय कुंपनात स्त्रीजीवन अडकले होते. ही कुंपने म. बसवेश्वरांनी मोडून काढली. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे कल्याण राज्यातील वेश्याव्यवसाय करणाऱ्या कित्येक स्त्रियांना म. बसवेश्वरांनी मुक्त केले. त्यांना विविध कामे देऊन त्यांचे समाजात पुनर्वसन केले."६ अशातऱ्हेने म. बसवेश्वरांचा स्त्रीमुक्तीचा विचार केवळ धार्मिक क्षेत्रापुरता मर्यादित नव्हता तर त्यांना सामाजिक व आर्थिक गुलामगिरीतून मुक्त करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. अनुभव मंटपाच्या माध्यमातून लघुद्योग, व्यवसायाचे ज्ञान देण्याचा प्रयत्न सुरू केला. म. बसवेश्वरांची पत्नी शरणी गंगांबिका यांच्या नेतृत्वाखाली ठिकठिकाणी स्त्री शिक्षणाची केंद्रे उघडण्यात आली होती. प्रौढ शिक्षणासाठी 'कायक' केंद्र स्थापन करण्यात आली होती. यामधून विविध कुटिरोद्योगाचे शिक्षण देण्यात येत असे. अनुभव मंटपांतील स्त्री अथवा पुरुषांनी कोणते तरी कार्य केले पाहिजे असे बंधन होते. एवढेच नव्हे तर अनुभव मंटपात वेश्या व्यवसाय कारण-या स्त्रियांनाही प्रवेश दिला होता. यातील 'सुळे संकव्वे' नावाच्या एका शेरणीने (पूर्वीची वेश्या) वचन निर्मिती केली आहे.

वैराग्यशालिनी अक्कमहादेवी, शिवप्रिया, पद्मावती, लिंगम्मा इत्यादी कितीतरी स्त्रियांना अनुभव मंटपाच्या व्यासपीठावर आणून म. बसवेश्वरांनी स्त्रियांना पुरुषांबरोबरच सन्मानाने वागविले. याच अनुभव मंटपात अनेक शिवशरणी कवयित्री झाल्यात. बसवेश्वरांच्या पत्नी निलांबिका, गंगांबिका यांनी स्त्रियांना साक्षर करून सुलभ असा भक्तीचा मार्ग दाखविला. या मंटपातील शिक्षणामुळे स्त्रिया परीपूर्ण झाल्या. याविषयी अक्कमहादेवी म्हणते -

"स्त्री जातीला हीन म्हणून हिणवू नका
पुरुषी कसोट्याचा अडसर मी घालुनी
सुगंधी कवच चढवून, तिलक लावूनी
हात सरसावून रणशिंग फुंकल्यावर
बांधलेल्या नि-या सुटल्या तर
तुमची शपथ! पहा चन्नमल्लिकार्जुन!"७

पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही आपली उन्नती करून घेण्याचा अधिकार आहे. सर्वजण शिवाचेच अंश असल्यामुळे स्त्री-पुरुष असा भेदभाव करता कामा नये.

म. बसवेश्वरांची बहीण नागम्मा हिने अनुभव मंटपातील कार्यामध्ये पडद्याआड राहून बजावलेली भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. कल्याण क्रांतीनंतरच्या काळात तर लिंगायत चळवळ, सामाजिक परिवर्तनाची चळवळ चालविण्याचे, त्यासाठी प्रसंगी हातामध्ये तलवार घेवून शत्रूशी दोन हात करण्याचे कार्य नागम्माने केलेले आहे. म्हणजेच बाराव्या शतकासारख्या स्त्रियांना अधिकार आणि हक्क नसलेल्या काळात मानवतावादी कार्यासाठी शौर्याने आणि धैर्याने लढणारी शरण संस्कृतीरक्षक माता नागमा आजच्या काळातील स्त्रियांसाठी एक आदर्शवत स्वरूपाचे व्यक्तिमत्व म्हणावे लागेल.

**सारांश,**

महात्मा बसवेश्वर हे स्त्रीमुक्ती चळवळीचे आद्य प्रणेते होते. महिलांना संघटीत करून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला. व्यवसाय, पुनर्विवाह, सतीबंदी, विधवाविवाह, आंतरजातीय विवाह या संदर्भात म. बसवेश्वरांनी केलेले कार्य खरोखरच वंदनीय आहे.

बसवण्णा आज देहरूपाने नसले तरी त्यांनी रुजवलेली समानता, स्वातंत्र्य, बंधुता, कायक, दासोह ही रोपटी वाढत वाढत त्याचा वेलू गगनावरी गेला आहे. त्या वेलीवर सुख, शांती व समृद्धीचा परिमळ पसरविणारा मोगरा फुलला आहे. त्याचा सुगंध आपल्या जीवनात भरून घेवून आपले जीवन कृतार्थ करून घेणे ही समस्त मानवजातीची जबाबदारी आहे.

**संदर्भग्रंथ**

*शिवयोगिनी अक्कमहादेवी, तिवारी भगवानदास, बसवशांती मिशन प्रकाशन, धारवाड, प्र. आ. २००३, पृ. ४.*
*परिवर्तनाचा महामेरू, म. बसवेश्वर, डॉ. बिचेवार सचितानंद, स्वाती प्रकाशन पुर्णा, जि. परभणी प्र. आ. २०१५, पृ. २९.*
*तत्रैव – पृ. २८.*
*तत्रैव – पृ. २९.*
*बसवण्णा, मोगलेवार सुधाकर, अ. भा. वीरशैव साहित्य मंडळ, नागपूर, प्र.आ. २००५, पृ. १३.*
*साहित्यसमीक्षा: संदर्भ आणि वाटचाल, (संपा.) डॉ. चिमोरे सुशील प्रकाश व इतर, साद प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. २०१४, पृ. ५०.*
*पाऊलखुणा, डॉ. तंगावार म. ई. मुक्तरंग प्रकाशन, लातूर, प्र. आ. २००७, पृ. ६८.*

# महात्मा बसवेश्वर : कायक व दासोह मानवी जीवनाचे मुलाधार

**प्राचार्य डॉ. अडकिणे एस. बी.**
*महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड जि.नांदेड*

**प्रस्तावना** : भारतात आजपर्यंत अनेक संत होऊन गेले आहेत. याच नामावलीत महात्मा बसवेश्वर यांचा अग्रक्रमाणे अंतर्भाव होतो. महात्मा बसवेश्वरांनी लोकांना समता, बंधुभाव, श्रम, मानवता, अहिंसा, परोपकार, स्त्री स्वातंत्र्य, लोकशाही, एक ईश्वर उपासना इत्यादी गुणांची शिकवण दिली. महात्मा बसवेश्वर हे मध्ययुगीन भारताच्या धार्मिक, सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक, राजकीय व सामाजिक जीवनातील जेष्ठ समाज परिवर्तनवादी युगपुरुष होते. समाज सुधारकांच्या यादीतही त्यांचे स्थान आहे. म्हणूनच त्यांना आद्य भारतीय समाजसुधारक, क्रांतीयोगी व युगपुरुष मानले जाते. इसवी सनाच्या 12 व्या शतकात कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्वर - बागेवाडी या गावात 1105 साली प्रतिष्ठित कुटुंबात बसवेश्वरांचा जन्म झाला. काहींच्यामते तो इंगळेश्वर जि.विजापूर या गावी झाला असावा. त्यांच्या जन्मकाळाविषयी मतभेद असले, तरी सामान्यत: त्यांचा जन्म वैशाखातील अक्षय तृतीयेला झाल्याचे मानले जाते. मादिराज-मादलांबिका या पती-पत्नीस यांच्या पोटी पुत्ररत्न झाले. पुत्राचे नाव बसव ठेवण्यात आले.

**गृहितके :**

1) मनापासून केलेले प्रत्येक काम हिच खरी शिव उपासना हे त्यांच्या कायक व कैलास सिध्दांताचे सार होय.
2) आपण कमावलेले धन केवळ स्वत: पुरते न वापरता त्याचा समाजासाठी उपयोग करण्याची संकल्पना म्हणजे दासोह सिध्दांत होय.

**संशोधन पध्दती :** सदरील शोध निबंधात व्दितीयक स्त्रोताव्दारे तथ्य संकलन केले आहे. यासाठी विषयाला अनुसरुन संदर्भग्रंथ, विविध मासिकातील लेख, वर्तमानपत्रातील लेख तसेच गुगल वेबसाईट वरील संदर्भ इ. चा वापर केला आहे.

**कायक सिद्धांत :** महात्मा बसवेश्वरांनी स्वयंपुर्ण समाजासाठी कायक या सिद्धांताचे प्रतिपादन केले आहे. काया या संस्कृत मधील शब्दापासुन कायक या शब्दाची उत्पत्ती झाली आहे. सर्वसामान्य: कायकाचा अर्थ शरीराव्दारे केले जाणारे कार्य होय. बसववादी शरणांनी कायक या शब्दाला विशेष महत्व प्राप्त करुन दिले आहे. कायक हे व्यक्तींच्या क्रिया प्रवणतेतून समाज कल्याण साधण्याचे एक महत्वपूर्ण साधन मानून ती प्रत्येक व्यक्तीची जीवनशैली व्हावी यासाठी बसवेश्वरांनी कायक परिकल्पना मांडली. कायक या शब्दाला कार्य, काम, कर्तव्य असे प्रतिशब्द आहेत किंवा वापरतात. या पेक्षा ही कायक हा शब्द सर्व शब्दांपेक्षा व्यापक स्वरुपाचा शब्द आहे. कारण येथे मानवाचे कार्य फक्त स्वकेंद्री नसुन ते समाजासाठी आहे.

महात्मा बसवेश्वरांनी कायक सिद्धांत मांडताना तीन नियमाची बंधने घालून दिले.

1) प्रत्येकाने आप-आपल्या आवडीनुसार आपल्या ऐपतीनुसार आपला व्यवसाय निवडून त्यात प्रगती करावी. येथे व्यवसायाला स्वातंत्र्य दिले.
2) प्रत्येकाने आपल्या दैनंदिन गरजा भागवण्यासाठी जेवढे आवश्यक तेवढेच द्रव्य (पैसा, धन) मिळवावे, कमवावे. अधिकची हाव, हावरटपणा धरु नये व भिक्षा, भिक ही यावर अवलंबून राहू नये.
3) प्रत्येकाने कष्ट करुन स्व:तच्या घामाने पैसा कमवावा (अर्थोत्पादन) करावे आणि आपली उपजीविका चालवावी.

कायक सिध्दांतात बसवेश्वरांनी व्यक्तीला श्रम करुन अर्थार्जन करावे, व्यवसाय स्वातंत्र्य आणि अधिक संपत्ती न बाळगता किंवा चक्क भिक्षापात्र घेऊन भीक न मागावी अशी तीन सुत्र प्रतिपादन केले आहेत. बसवेश्वर आपल्या वचनात कायकाचे महत्व स्पष्ट करतात महात्मा बसवेश्वर म्हणतात, की कष्टाला अनन्य साधारण महत्व दिले आहे. ज्याने आपल्या घामाने ही काळी माती भिजवली, अखंड श्रमाने ज्याने आपला देह राबवला, कष्ट उपसले पोटासाठी, ज्याने आपले तन आणि मन श्रम पुर्वक झिजवले, श्रमाची पुजा करुन ज्याने शिवाची पुजा केली,

श्रमिकांच्या झोपडीला जो कैलास मानतो ।
ज्याची वाणी तशी करणी हे कूडलसंगमदेवा तो जगद्‌गुरु झाला ॥

बसवेश्वरांनी सांगितलेल्या कायकाचा परिपुर्ण अवलंब करण्यात आला तर भारतीय समाज स्वयंपुर्ण होऊन आर्थिक सुबत्तेने समृध्द होईल. कायक हे भौतिक व आध्यात्मिक विकासाला चालणा देणारे तत्व आहे. जे बसवेश्वरांनी सर्वांगीण प्रगतीसाठी योजिले होते. कायकात म्हणजेच श्रमात मग्न असल्यास देव-देवतांना विसरण्याचा विचार बसवेश्वर मांडतात. बसवेश्वरांनी अशाप्रकारे कायकाला ईश्वर कल्पनेपेक्षा जास्त महत्व देऊन कर्मकांडात अडकलेल्या समाजाला मुक्त करुन आर्थिक उत्थानासाठी समाजातील सर्व लोकांची सामुहिक शक्ती उपयोगाला आणण्याचा प्रयत्न केला होता. महात्मा बसवेश्वरांनी कायक सिध्दांताला धर्म क्षेत्रात पुर्णत: लागू करण्याचा मांडलेला विचार मध्ययुगीन कालखंडात अभिनव व आधुनिकतेचा परिपोष करणारा होता.

दासोह सिद्धांत : 12 व्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी आदर्श अशी राजकीय व सामाजिक अर्थव्यवस्था आध्यात्मिक मार्गाने निर्माण केली. कायकाच्या माध्यमातून संपत्तीचे अर्जन करण्याचा उत्तम मार्ग सांगतानाच जेंव्हा समाजातील व्यक्तीकडे अतिरिक्त संपत्ती जमा होते तेंव्हा त्या संपत्तीचे योग्य वापर होण्यासाठी बसवेश्वरांनी दासोह हा विचार मांडला. कायक व दासोह या परस्पर पुरक संकल्पना असुन मी समाजाचा दास आहे, म्हणून मी जे काही कायक करतो किंवा त्यातून जे काही अर्जित करतो त्यावर समाजाचाही हक्क आहे. ही भावना बसवेश्वरांच्या दासोह संकल्पनेचा मूलाधार आहे. थोडक्यात कायकातून प्राप्त संपत्तीचे लोक कल्याणासाठी केलेले अर्पण म्हणजे दासोह होय. महात्मा बसवेश्वरांनी दासोह ही संकल्पना बहुव्यापक ठेवली आहे. यात केवळ संपत्तीचेच नव्हे तर वस्तु, ज्ञान, वेळ, श्रम अशा भिन्न प्रकारच्या दासोहांचा समावेश केला आहे. सर्वांचे कल्याण साधले जावे यासाठी दासोहाला ते प्राधान्य देतात. दासोह हा केवळ विचार नसुन ती प्रत्येकाची वृत्ती बनली पाहिजे असे बसवेश्वरांचे मत होते. म्हणूनच ते म्हणतात की, देणे न जमल्यास देण्याची भावना तरी जोपासावी. जो पर्यंत सामाजिक कल्याणाचे साध्य प्राप्त होऊ शकणार नाही, हे बसवेश्वरांना माहीत होते. म्हणूनच त्यांनी दासोह नवीन आर्थिक संकल्पना मांडली. समाजातील व्यक्तींनी दासोहाला आपल्या जीवन व्यवहारात अंमलात आणावे यासाठी बसवेश्वरांनी आपल्या वचनातून मार्गदर्शन केले आहे. महात्मा बसवेश्वरांनी त्रिविध दासोहाचा विचार मांडला आहे. यात तन, मन व धन अशा त्रिसुत्रांचा समावेश आहे. या त्रयीव्दारे केलेले दासोह हाच पुर्ण दासोह आहे असे त्यांचे मत आहे. या त्रिविध दासोहाबद्दल व्यक्तीने कसे तत्पर रहावे याचे मार्गदर्शन करताना ते म्हणतात लोककल्याणार्थ संपत्तीचे वितरण दासोहाव्दारे होऊ लागले तर समाजात समतोल राहिल आणि विषमता निर्माण होणार नाही. अशा पध्दती बसवेश्वरांनी कायक व दासोह मानवी जीवनाचे मुलधार आहेत असे आपल्या क्रांतीकारी वचनातून स्पष्ट केले आहे.

सारांश : कायक व कैलास Work is Heaven असा मूलमंत्र सांगून श्रमातूनच ईश्वराचे वस्तीस्था निर्माण होते किंवा ते कैलास आहे म्हणून माणसाने श्रमोपासना करण्याचा आग्रह ते धरतात. संपत्तीचे समान वितरण अहिंसेच्या मार्गाने व्हायचे असेल तर दासोह ही उत्तम व्यवस्था मानावी लागते. तन, मन, धनाने प्रत्येक जण जर दासोह करु लागला तर समाजात क्रांती होण्यास वेळ लागणार नाही.

**निष्कर्ष :**

1) मनापासुन केलेले प्रत्येक काम हीची खरी शिवउपासना हे त्यांच्या कायकवे कैलास सिध्दांताचे सार होय. शारिरीक श्रम वा व्यवसाय हाच स्वर्ग (कैलास) आहे. कोणत्याही प्रकारचे काम शारिरीक श्रम हे हिन दर्जाचे नाहीत असे सांगून त्यांनी श्रमप्रतिष्ठा वाढवली.

2) दासोह सिध्दांतात आपण कमावलेले धन केवळ स्वत: पुरते न वापरता त्याचा समाजासाठी उपयोग करण्याची संकल्पना त्यांनी मांडली. दासोह मांडल्यामुळे बसवेश्वरांची वृत्ती समाजवादी, समतावादी होती, असे दिसुन येते.

**संदर्भ ग्रंथ :**

*समग्र क्रांतीकारी बसवेश्वर : सुर्यकांत घुगरे, प्रकाशन बसवेश्वर पीठ, कर्नाटक विश्वविद्यालय, धारवाड - 2003.*
*बसवेश्वर रचिला पाया : अशोक कामत, बसव सेंटर, सोलापूर - 2001.*
*लिंगायत एक स्वतंत्र धर्म : डॉ. राजेश्वर सोलापूरे, अरुणा प्रकाशन, लातूर - 2014.*
*बसव प्रज्ञा : रमजान दर्गा, महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी जि.बिदर - 2017.*
*ऐतिहासिक बसवकल्याण : प्रा. भीमराव ब्रम्हाजीराव पाटील, शरण साहित्य मंडळ, लातूर - 2014*
*महात्मा बसवेश्वर : डॉ. अशोक गं. मेनकुदळे, महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी जि. बिदर - 2019.*
*www.santsahitya.in.*
*www.thinkmaharashtra.com.*
*www.inmarathi.com.*

## ज ार्यातून क्रांती घडविणारे महात्मा बसवेश्वर....

**डॉ. विजया साजरे**

*पदव्युत्तर इतिहास विभाज व संशोध-न जेंद्र, श्री शिवाजी कॉलेज कंधार जि. नांदेड*

**प्रस्तावना**

बाराव्या शतकामध्ये भारतीय समाज अनेक चालीरीती, रूढी-परंपरा,अंधश्रद्धा, कर्मकांड, विषमता, भेदभाव, स्त्री दास्यत्व, जातीयता इत्यादींनी त्रस्त होऊन मरगळलेल्या अवस्थेत होता. अशा परिस्थितीत त्या काळातील समाजात नवचैतन्य क्रांतीचे विचार निर्माण करण्याचे महा-न कार्य महात्मा बसवेश्वरांनी केले. मान,अपमान, कष्ट, टीका सहन करीत त्यांनी प्रस्थापितांविरुद्ध मोठा संघर्ष उभा केला. हे त्या शतकातील सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक, राजकीय जीवनातील परिवर्तनवादी युजपुरुष, महान तत्त्वज्ञानी, समाजप्रबोधक, प्रसिद्ध वचनकार म्हणून नावारूपाला आले .

**१) समानतेची वाजजूज :** महात्मा बसवेश्वरांनी जातीपातींच्या भिंती गाडून तत्कालीन समाजव्यवस्थेला समानतेची दिशा देवून सर्वसामान्यांना स्वत्वाची ओळख निर्माण करून दिली. महात्मा बसवेश्वर यांच्या तत्वज्ञानाचा मूळ गाभाच सामाजिक समता होता. त्यांनी समाजातील शोषण, भेदभाव ,जातीभेद,श्रेष्ठ-कनिष्ठ विरोधी समतेची लढाई लढली नाही तर ती आपल्या कार्याच्या प्रचितीतुन यशस्वी करून दाखवली. महात्मा बसवेश्वरांनी चातुर्वर्णाला करून वर्णभेद, जातीभेद नुसतेच नाकारले नाही तर त्यावर त्यांनी सडकून टीका ही केली म्हणून तर ते आपल्या ज ार्यातून क्रांती निर्माण करणारे महान समतावादी,मानवतावादी समाजसुधारक म्हटले जातात.

**२) जातीव्यवस्थेविरुद्ध ज ार्य:** समाजातील धर्मातील जातिव्यवस्थेविरुद्ध व पारंपरिक अंधश्र्धदा व रूढी प्रथांविरुद्ध संघर्ष जे ला. त्यांनी निर्गुण, निराकार एकेश्वरवादी श्रद्धेचा पुरस्कार करणारे ते महान तत्वचिंतक होते.जेव्हा सामाजिक जीवन हे अंधःकारमय झाले होते. अनेक चालीरीती पाप-पुण्याची दहशत, उच्च-नीच, श्रेष्ठ- ज निष्ठ, ज ामज री-कष्टकरी वर्गाची पिळवणूक इत्यादींनी समाजजीवन पोखरून गेले होते. त्याच काळात विषमता, कर्मकांड अंधश्रद्धेच्या विरोधी आणि मानवतावाद, समानतेचा विचार देवून समाजातील विविध जाती धर्मातील लाजो स्त्री -पुरुष, पददलितांना, शोषितांना मुख्य प्रवाहात त्यांनी आणले. ही त्या काळातील एक महान सामाजिक क्रांतीच होती. अशा परिस्थितीत समाजाला उभे करण्याचे धाडस महात्मा बसवेश्वरांनी करून दाखवले त्यासाठी त्यांना तत्ज ाली-न समाजसत्तेशी, राजसत्तेशी प्रचंड संघर्ष करावा लागला. महात्मा बसवेश्वरांनी आपल्या कार्यातून क्रांतीचे बीजे निर्माण जे ली.

**३) मानवतावादी दृष्टीज ो-न :** आपल्या अलौकिक समतावादी विचारधारेतून मानवतावादी समाज घडवून त्यांनी दाखवला.जातीपातीत बंदिस्त असलेल्या अशा समाजव्यवस्थेवर आघात करताना त्यांनी जन्मावरून व व्यवसायावरून स्पृश्यता, अस्पृश्यता मानू नये. कुळ, जातीमुळे श्रेष्ठता कमी होत नाही यासाठी त्यांनी आपल्या वचनातून प्रखर टीका केली.महात्मा बसवेश्वरांना अस्पृश्यांविषयी अपार प्रेम होते त्यांच्यासाठी त्यांनी स्वयंपूर्ण सर्वांगसुंदर आणि सर्वश्रेष्ठ असा विचार त्यांनी मांडला समाजातील जनसामा-याबद्दल प्रेम हे त्यांच्या जीवनाचे अविभाज्य अंग होते आणि त्याच तत्वासाठी त्यांनी प्रधान मंत्रीपदाचा राजीनामा दिला तो फक्त जनसामान्यांच्या

उद्धारासाठी महात्मा बसवेश्वर हे समतेसाठी नेहमी झटणारा एक तेजाने चमकणारा तारा होता . ते अस्पृश्यांना आदराने 'माहेश्वर' म्हणतं असत.महात्मा बसवेश्वरांच्या काळात समाजव्यवस्थेत स्त्रीला दुय्यम स्थान होते. तिला मोक्ष नाही, असा समज होता. यावर बसवेश्वरांनी प्रखर टीका केली .स्त्रीवर अन्याय होतो , हे ओळखून त्यांनी स्त्रीला शिक्षित केले,चालते-बोलते केले. अनुभवमंटपात स्त्रियांना प्रतिनिधीत्व मिळाल्यामुळेच त्यांच्या धर्मकार्याला सामर्थ्य स्वातंत्र्याचा अधिकार दिला. आध्यात्मिक उपासनेची परवानगी दिली.

**४) स्त्रियांना समानतेची वाजजूज :** बसवेश्वरांच्या कार्यामुळे प्रेरित होऊन नंतर अक्कमहादेवी, राणी महादेवी, मुक्तायका, नागलंबिका आदी अनेक स्त्रिया नावारूपाला आल्या. स्त्री ही अबला नसून वेळ तर ती सबला ही होऊ शकते, हे बसवेश्वरांनी जगाला दाखवून दिले. तत्कालीन समाजव्यवस्थेला व राजसत्तेला हादरवून टाकणारा आंतरजातीय विवाह त्यांच्या पुढाकाराने घडला. त्याकाळी त्यांनी बालविवाहाला विरोध केला, पण विधवा विवाहाला मान्यता दिली. मागास जातीतील संत हरळय्या यांचा मुलगा शीलवंत व मधुररस ब्राह्मण मंर्त्याची मुलगी कलावती यांच्यात विवाह घडवून आणला. आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार केला.आजच्या समाजवादी विचारसरणीचा पुरस्कार केला. महात्मा बसवेश्वरांच्या कृतिशील वैचारिक चळवळीचा प्रभाव तत्कालीन समाजव्यवस्थेवर पडला आणि जातीपातींच्या भिंती गाडून लाखोंच्या जनसमूहाने महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांचा प्रसार केला. महात्मा बसवेश्वरांनी जातीपातींच्या भिंती गाडून तत्कालीन समाजव्यवस्थेला छेद देवून ज्यांनी लिंग धारण केले तो 'लिंगायत' ही ओळख सर्व सामान्यांना दिली होती. आपल्या वचन साहित्याद्वारे त्यांनी मानवमात्रांसाठी,विश्वकल्याणाठी सामाजिक क्रांतीची ज्योत प्रज्वलित केली.समतावादी विचार सामान्य माणसाच्या अंतःकरणात जागवून ख-या अर्थानी महात्मा बसवेश्वर यांनी मानवतावादी विचार समाजापर्यत पोहचविण्याचे कार्य केले. १२ व्या शतकातील भारताच्या धार्मिक, सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक, राजकीय व सामाजिक जीवनातील ज्येष्ठ समाज परिवर्तनवादी युगपुरुष, समाजप्रबोधक, प्रसिद्ध कवी आणि समाजाला एकत्र बांधण्यात पुढाकार घेणारे एक महान तत्त्वज्ञानी होते.

**५) कर्माला महत्व :** महात्मा बसवेश्वर यांनी समाजातील गरिबी, विषमता दूर करून आर्थिक समृद्धता निर्माण करण्यासाठी त्यांनी समाजाला "कायक वै कैलास" आणि "दासोह" अश्या दोन क्रांतिकारक संकल्पना मानवाच्या शारीरिक श्रमातुन लोकांच्या हृदयात निर्माण केल्या .

महात्मा बसवेश्वरांनी शारीरिक श्रम वा व्यवसाय हाच स्वर्ग (कैलास) आहे, अशी घोषणा करणारा 'कायक वै कैलास' हा बसवेश्वरांनी मांडलेला एक महान सिद्धांत आहे. कोणत्याही प्रकारचे शारीरिक श्रम हे हीन दर्जाचे नाहीत, असे सांगून त्यांनी समाजामध्ये श्रमप्रतिष्ठा वाढविली. प्रत्येक व्यक्तीने आपल्या श्रमावरच आपली उपजीविका चालवावी असें त्यांचे धोरण होते.

**६) श्रमप्रतिष्ठेचा पुरस्कार :** बसवेश्वरांचे अवतार कार्य बाराव्या शतकातील असून, समाजातील अराजक व मरगळ परिस्थिती दूर करण्यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्ती सुसंस्कृत बनला पाहिजे. कारण सदाचाराने पृथ्वीचा स्वर्ग होतो. अनाचारातून नरक बनतो. सदाचाराद्वारे अनाचार हद्दपार करता येऊ शकतो. यात महत्त्वाचे म्हणजे जिणे लाजिरवाणे होऊ नये, स्वातंर्त्य व आत्मसन्मान कायम रहावा म्हणून 'कायक वै कैलास' सिद्धांताची बसवेश्वरांनी मांडणी केली. या सिद्धांतामध्ये पाच तत्त्वांचा बसवेश्वरांनी कल्पकपणे विचार केला. त्यात शरीरश्रम, बौद्धिकश्रम, पैसा गुंतवणूक, सेवा आणि शुभ चिंतन अथवा आशीर्वाद (उपदेश) या पाच तत्त्वांना प्राधान्य दिले. कर्म, क्रिया हा सजीवांचा प्रगतीचा सर्वोच्च गुणधर्म आहे. जगाचे अस्तितत्त्व क्रिया, कर्मावर आधारलेले आहे. म्हणूनच क्रिया थांबली की जग शून्य ठरते! श्रम हाच स्वर्ग आहे. हिच मुळी समस्त मानवाचा गुणधर्म असल्याचा मौलिक विचार बसवेश्वरांनी

जगाला दिला. कायक सिद्धांत पाळताना पैशामुळे तफावत निर्माण होण्याचा धोकाही बसवेश्वरांना माहीत होता. गरजेपेक्षा जास्त पैशातूनच श्रीमंत- गरीब असा विरोधाभास निर्माण होतो. पैशामुळे व्यवस्थेत बाधा होऊ नये या हेतूने 'दासोह' हा विचार मांडला. दैवाने दिले असेल तर दैवाला अर्पज झाले पाहिजे. यातच निरंकारी भावना जपणे आवश्यक आहे. 'दासोह ' द्वारे असमर्थ व्यक्तीच्या पालनपोषणाची सोय व्हावी असा मनोदय बसवेश्वरां-नी व्यापक दृष्टीने केला आहे. उद्योगाच्या अनुवंशकतेमुळे निर्माण झालेल्या जातीमुळे समाजामध्ये आलेल्या उच्च-नीच भेदभाव व कालांतराने जाती ह्या धर्मामध्ये रूपांतर होताना निर्माज झालेले श्रमविषयज भेदभाव महात्मा बसवेश्वर यांनी आपल्या कायकातून नष्ट केले.१

**७) अहिंसक विचारसरणी:** महात्मा बसवेर्श्वरांच्या उपदेशामुळे वेजवेजळ्या व्यवसायांना, विशेषतः ज्रामोद्योजां-ना, प्रोत्साहन मिळाले आणि सर्व व्यावसायिकांमध्ये समभाव निर्माण झाला. बसवेर्श्वरांचे राजकारण हे अहिंसावादी विचाराचे होते व समाजकारण सध्याच्या संसदेसारखे लोकशाही तत्वावर आधारित होते. येथे निर्माज जे लेली शिवानुभवमंटप म्हणजेच 'अनुभवमंटप 'ही संस्था जागतिक इतिहासातील अनन्यसाधारण संस्था होय.या संस्थेत सर्वांना आपले मत विचार प्रकट करण्याचे विचारपीठ होते. त्या काळातील पहिले लोकशाहीची संसद होती असे म्हणायला काही हरकत नाही . वेगवेगळ्या जातींतील व व्यवसायांतील भक्त म्हणजेच शिवशरण येथे एकत्र जमत आणि विविध विषयांवर चर्चा करीत असत. ही चर्चा लयबद्ध गद्यातून होत असे. तत्ज ाली-न शिवशरज-शरणींची अशी वचने पुढे संग्रहीत करण्यात आली. मंटपातील चर्चेच्या माध्यमातून त्यांनी लोकांमध्ये जनजागृती करण्याचे काम त्यां-नी जे ले. अनुभव मंटप येथे परिसंवादाच्या स्वरूपाची जी चर्चा होत असे, तीच वचन साहित्याच्या रूपाने प्रसिद्ध झाली. वचन साहित्यातून त्यांनी समाजात प्रबोधनरूपी विचार पेरले.महात्मा बसवेश्वरांच्या तत्वानुसार दया हेच वीरशैव लिंगायत समाजाचे मूळ तत्व आहे. समाजाच्या विकासासाठी त्यांनी स्वर्ग लोकांना भूलोकात आणले जे दिसत नाही त्याबद्दल ते काहीही बोलले नाही पण त्यांनी मंदिरातून देव माणसाच्या शरीराकडे आणला.अध्यात्माच्या साधनेबरोबरच जीवनाच्या आसक्तीला महत्व दिले.[२] ज्ञा-न केवळ संपादन करून न थांबता जीवनच ज्ञानमय केले पाहिजे हे तत्व त्यांनी आपल्या विचारातून लोकांना सांगितले. कार्याच्या क्रांतीमधून कल्पनेला जगामध्ये पहिल्यांदा आकार दिलेला आणि आपल्या क्रांतीला आपणच तोंड देवून त्यामध्ये लीन झालेला महात्मा बसवेश्वर हा पहिला महापुरुष होता. एक जात, एक देव, समानता, बंधुता, व्यक्तीस्वातंर्त्य ही सर्व पायाभूत तत्वे त्यांच्या क्रांतीचे बीजे होती. सामाजिज , धार्मिक क्रांतीमुळे हे सर्व साध्य होते म्हणून त्यांनी अस्पृश्यता, जातीयता निर्मूलनासाठी एकदेव उपासनेला महत्व दिले. देशाच्या ऐक्यासाठी इष्टलिंग उपासनेला महत्व दिले.३ अनुभवमंटप, ज ायज वै जैलास, दासोह या तत्वानुसार आधुनिक क्रांती घडून आणली. महात्मा बसवेश्वरांच्या विचारांची आज ख□्या अर्थाने जरज आहे ती त्यांनी सांजितलेल्या मार्जाचे अ-नुज रज केले तर जगामध्ये दया, शांती, सुख, समाधान, समानता, बंधुता एकत्र नांदू शकेल. महात्मा बसवेश्वरांनी समतावादी, मानवतावादी मूल्याची समाज जीवनामध्ये रुजवण केली आहे.महात्मा बसवेश्वरांनी निर्माण केलेली नवसामाजिज व आर्थिक उत्थानाच्या चळवळीच्या माध्यमातून समाजाला आधुनिक दृष्टी त्यांनी प्राप्त करून दिली. तीच दृष्टी आज जनसामान्याला दीपस्तंभासारखे प्रकाशित करीत आहेत. समाजातील प्रत्येक व्यक्ती सुसंस्कृत बनला पाहिजे. ज ारज सदाचाराने पृथ्वीचा स्वर्ग होतो. अनाचारातून -नरक बनतो. सदाचाराद्वारे अनाचार हद्दपार करता येऊ शकतो. यात महत्त्वाचे म्हणजे जिणे लाजिरवाणे होऊ नये, स्वातंर्त्य व आत्मसन्मान कायम रहावा म्हणून 'कायज वै जैलास' सिद्धांताची बसवेश्वरांनी मांडणी केली. या सिद्धांतामध्ये पाच तत्त्वांचा बसवेश्वरांनी कल्पकपणे विचार केला. त्यात शरीरश्रम, बौद्धिकश्रम, पैसा गुंतवणूक, सेवा आणि शुभ चिंतन अथवा आशीर्वाद (उपदेश) या पाच तत्त्वांना प्राधान्य दिले. जर्म, त्रि या हा सजिवाचा प्रगतीचा सर्वोच्च गुणधर्म आहे. जगाचे अस्तितत्त्व क्रिया, कर्मावर आधारलेले आहे. म्हणूनच क्रिया थांबली की जग शून्य ठरते! श्रम हाच स्वर्ग आहे. हिच मुळी समस्त मानवाचा गुणधर्म असल्याचा मौलिक विचार बसवेश्वरांनी जगाला दिला. कायक सिद्धांत पाळताना पैशामुळे तफावत निर्माण होण्याचा धोकाही बसवेश्वरांना माहीत होता. गरजेपेक्षा जास्त पैशातूनच श्रीमंत- जरीब असा विरोधाभास निर्माण होतो. पैशामुळे व्यवस्थेत

बाधा होऊ नये या हेतूने 'दासोह' हा विचार मांडला. दैवाने दिले असेल तर दैवाला अर्पज झाले पाहिजे. यातच निरंकारी भावना जपणे आवश्यक आहे. 'दासोह ' द्वारे असमर्थ व्यक्तीच्या पालनपोषणाची सोय व्हावी असा मनोदय बसवेश्वरांनी व्यापक दृष्टीने केला आहे.उद्योगाच्या अनुवंशक्तेमुळे निर्माण झालेल्या जातीमुळे समाजामध्ये आलेल्या उच्च-नीच भेदभाव व कालांतराने जाती ह्या धर्मामध्ये रूपांतर होताना निर्माज झालेले श्रमविषयक भेदभाव महात्मा बसवेश्वर यांनी आपल्या कायकातून नष्ट केले.महात्मा बसवेश्वर यांनी श्रम सिद्धांताला केवळ आर्थिक बैठक देऊन ते थांबले नाहीत, तर श्रम सिद्धांताला त्यांनी आध्यात्मिक बैठकीची जोड दिली. ज ोणतेही काम लहान-मोठे नाही.आपल्या शरीराने मनापासून केलेले प्रत्येक कार्य हीच खरी शिवाची उपासना हे त्यांच्या 'कायक वे कैलास' सिद्धांताचे सार होय समाजातील गरिबी, विषमता दूर करून आर्थिक समृद्धता िनर्माज करण्यासाठी त्यांनी समाजाला "कायक वे कैलास" आणि "दासोह" अश्या दोन क्रांतिकारक संकल्पना दिल्या शारीरिक श्रम वा व्यवसाय हाच स्वर्ग (कैलास) आहे. कोणत्याही प्रकारचे शारीरिक श्रम हे हीन दर्जाचे नाहीत, असे सांगून त्यांनी समाजमनात श्रमप्रतिष्ठा वाढविली. कायक हे केवळ पैशासाठी सांगितलेले नाही. तसेच ते कर्मसिद्धांतावर आधारलेले नसून त्यात व्यक्तीला व्यवसाय स्वातंर्त्य देण्यात आलेले आहे.श्रम प्रतिष्ठेबरोबरच गरजेनुसार संपत्तीची विभागणी करावी, ही विचारसरणी दासोहमध्ये मांडल्यामुळे बसवेश्र्वरांची वृत्ती समाजवादी, समतावादी होती, असे दिसून येते. दासोह सिद्धांतात आपण ज मावलेले धन केवळ स्वतः पूरते न वापरता त्याचा समाजासाठी उपयोग करण्याची संकल्पना त्यांनी मांडली. येथे निर्माण केलेली शिवानुभवमंटप म्हणजेच 'अनुभवमंटप 'ही संस्था जागतिक इतिहासातील अनन्यसाधारण संस्था होय.या संस्थेत सर्वाना आपले मत विचार प्रकट करण्याचे विचारपीठ होते. त्या काळातील पहिले लोकशाहीची संसद होती असे म्हणायला काही हरकत नाही . वेगवेगळ्या जातींतील व व्यवसायांतील भक्त म्हणजेच शिवशरण येथे एकत्र जमत आणि विविध विषयांवर चर्चा करीत असत. ही चर्चा लयबद्ध गद्यातून होत असे. तत्कालीन शिवशरण-शरणींची अशी वचने पुढे संग्रहीत करण्यात आली. मंटपातील चर्चेच्या माध्यमातून त्यांनी लोकांमध्ये जनजागृती करण्याचे काम त्यां-ी जे ले . अनुभव मंटप येथे परिसंवादाच्या स्वरूपाची जी चर्चा होत असे, तीच वचन साहित्याच्या रूपाने प्रसिद्ध झाली. वचन साहित्यातून त्यांनी समाजात प्रबोधनरूपी विचार पेरले.महात्मा बसवेश्वरांच्या तत्वानुसार दया हेच वीरशैव लिंगायत समाजाचे मूळ तत्व आहे. समाजाच्या विकासासाठी त्यांनी स्वर्ग लोकांना भूलोकात आणले जे दिसत नाहीत. त्याबद्दल ते काहीही बोलले नाही पण त्यांनी मंदिरातून देव माणसाच्या शरीराकडे आणला.[४]

**८) आर्थिक स्वातंत्र्य :** अध्यात्माच्या साधनेबरोबरच जीवनाच्या आसक्तीला महत्व दिले. ज्ञा-न जे वळ संपाद-न ज रू-न न थांबता जीवनच ज्ञानमय केले पाहिजे हे तत्व त्यांनी आपल्या विचारातून लोकांना सांगितले. कार्याच्या क्रांतीमधून ज ल्प-नेला जगामध्ये पहिल्यांदा आकार दिलेला आणि आपल्या क्रांतीला आपणच तोंड देवून त्यामध्ये लीन झालेला महात्मा बसवेश्वर हा पहिला महापुरुष होता.[५] एक जात, एक देव, समानता, बंधुता, व्यक्तीस्वातंर्त्य ही सर्व पायाभूत तत्वे त्यांच्या क्रांतीचे बीजे होती. सामाजिक, धार्मिक क्रांतीमुळे हे सर्व साध्य होते म्हणून त्यांनी अस्पृश्यता, जातीयता निर्मूलनासाठी एकदेव उपासनेला महत्व दिले. देशाच्या ऐक्यासाठी इष्टलिंग उपासनेला महत्व दिले. अनुभवमंटप, कायक वै कैलास, दासोह या तत्वानुसार आधुनिक क्रांती घडून आणली. महात्मा बसवेश्वरांच्या विचारांची आज ज□्या अर्था-ने जरज आहे ती त्यांनी सांजितलेल्या मार्जाचे अ-नुज रज जे ले तर जजामध्ये दया, शांती, सुज, समाधा-न, समानता, बंधुता एकत्र नांदू शकेल. महात्मा बसवेश्वरांनी समतावादी, मानवतावादी मूल्याची समाज जीवनामध्ये रुजवण केली आहे.महात्मा बसवेश्वरांनी निर्माण केलेली नवसामाजिक व आर्थिक उत्थानाच्या चळवळीच्या माध्यमातून समाजाला आधुनिक दृष्टी त्यांनी प्राप्त करून दिली. तीच दृष्टी आज जनसामान्याला दीपस्तंभासारजे प्रकाशित करीत आहे. महात्मा बसवेश्वरांच्या प्रत्यक्ष कृती, गती, सत्यता, समता या तत्वातून त्यांनी उपेक्षित समाजाला प्रेरणा दिली. त्यांचे क्रांतिकारी विचार आज समाज व्यवस्थेत झालेले बदल अभूतपूर्व आहेत. म्हणून त्यांचे विचार आधुनिक काळात सुद्धा प्रेरणादायी ठरतात.[६]

**९) समाजबदलासाठी मूल्यपरिवर्तन:** मानवी जीवनात आणि समाजात एक प्रकारची स्थितीशिलता असते काही माणसे आपापल्या जातीपरंपरेत गुंतलेले असतात अशा समाजात नवचैतन्य आणण्याचा प्रयत्न महात्मा बसवेश्वरानी

तत्कालीन समाजाविरुद्ध करण्याचा प्रयत्न ज े ला.समाजाला समानतेची वाट दाखवून समता, बंधुता, लोकशाही, विचार स्वातंर्त्य, मुक्तचर्चेत सर्वाना समान स्थान देण्याचा प्रयत्न केला. ७

**िनष्ज ष**

१) महात्मा बसवेश्वरानी कायक वै कैलास मार्फत समाजातील उच्च निचता नष्ट ज े ली.

२) शारीरिक श्रमाला महत्व देवून जो श्रम करेल तोच श्रेष्ठ ठरेल हा मूलमंत्र दिला.

३) सर्व समाजाला सामानतेची शिज वज देवू न सर्वाना इष्टलिंगाच्या एका धाग्यात बांधून सर्वाना एकत्र जोडण्याचा प्रयत्न ज े ला.

**संदर्भसूची**

*पाटील शंकर, नडकट्टी सविता, वचन, बसव समिती बेंगलुरु २०१२*
*चवंडके मिलिंद, व्दितीय शंभू : महात्मा बसवेश्वर, Maharashtra Times*
*26 Apr 2020*
*कांबळे प्रकाश, परिवर्तनवादी युगपुरुष महात्मा बसवेश्वर, esakal, 26 April 2020.*
*Www.Social studies foundation.Org.*
*www.santsahity.com*
*मे-ाकुदळे अशोक, समाजसुधारक महामंत्री महात्मा बसवेश्वर, सुविद्या प्रकाशन सोलापूर*
*`देशपांडे सुभाष, महात्मा बसवेश्वर कार्य आणि कर्तृत्व, जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद.*

## महामारीत महात्मा बसवेश्वरांचा संदेश

**डॉ.रवींद्र बेम्बरे**
*वै.धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय, देगलूर, Email - rvbembare@gmail.com*

द्रष्टा युगपुरुष आणि दक्षिण भारतातील समग्र क्रांतीचा उदगाता म्हणून बसवेश्वरांचे स्थान लोकह्रुदयात कायम आहे. मानवजातीसाठी चिरनुतन दीपस्तंभ म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. यज्ञयागादी कर्मकांड, व्रतवैकल्य, नवससायास, मूर्तिपूजा, मंदिरमहात्म्य, मुहूर्त संकल्पना, फलज्योतिष्य, विटाळ, पंचसुतक, सर्व प्रकारची विषमता या विवेकाला न पटणाऱ्या गोष्टी नाकारून समता, बंधुता, सत्य, अहिंसा, भूतदया, विवेकनिष्ठा, उद्योगशीलता या चिरंतन मूल्याच्या आधारे बाराव्या शतकात बसवेश्वरांनी कल्याणक्रांती घडवून आणली. बसवेश्वरांनी आपली कृती, उक्ती आणि लेखणीतून ज्या मूल्यांची उपासना केली, ती मूल्य चिरंतन स्वरूपाची आहेत. त्यांचे वचन साहित्य म्हणजे चिरंतन सत्याचा अखंडित शोधच आहे. म्हणून प्रत्येक काळाशी ते संवादी ठरते. काळाच्या उदरातून निर्माण झालेल्या नवनवीन आव्हानांना सामोरे जाण्याचे बळ देते. एकविसावे शतक प्रचंड उलथापालथीचे आणि गुंतागुंतीच्या आव्हानाचे गतिमान शतक ठरले. जागतिकीकरणातील जीवघेणी स्पर्धा, मानवी मूल्यांचा ऱ्हास, आर्थिक विषमतेची वाढती दरी, पर्यावरणाचे ढासळते संतुलन, वाढत विसंवाद, वैफल्य, बेरोजगारी, महागाई, रोगराई अशा अनेक समस्यांनी या शतकातला माणूस घेरला आहे. आता मागील एक वर्षांपासून कोरोना विषाणूच्या महामारीने संपूर्ण जग हादरून गेले आहे. जगाला एका वेगळ्या वळणावर घेऊन जाणारे हे संकट सर्वार्थाने अभूतपर्व आहे. या पार्श्वभूमीवर महात्मा बसवेश्वरांच्या विचाराच्या प्रासंगिकतेचा वेध प्रस्तुत लेखात घ्यायचा आहे.

आज प्रत्येक माणूस प्रचंड धास्तावलेला आहे. महामारीचा इतिहास पहिला तर 'कुछ हैजेसे मरे तो कुछ हैबतसे मरे।' या म्हणी प्रमाणे आजारापेक्षा धास्तीने अधिक लोक दगावली. धास्तीतून संकट टळत नसून त्याची तीव्रता वाढत असते. यामुळे देशात उद्या मनोरुग्णांची संख्या वाढणार असल्याचा मानसतज्ज्ञांचा दावा आहे. या दृष्टीने बसवेश्वरांचे पुढील वचन उदबोधक ठरते. 'भिऊन नाही चालत / भेदरून नाही चालत / वज्रपंजरी राहून नाही चालत / काकुळतीला येऊन नाही चुकत हो / धीर खचून हतबल झाले तरी / होणारे नाही टळत कुडलसंगम देवा ' भीतीपोटी संकटाची धास्ती घेण्यापेक्षा धैर्य ठेवून विवेकाने संकट समजून घेऊन त्याला सामोरे जाणे हिताचे असल्याचे बसवेश्वर सांगतात. कोणतीही महामारी वर्ण,जात, धर्म, पंथ, प्रांत, गरीब-श्रीमंत, ज्ञानी- अज्ञानी अशा गोष्टी पाहत नाही. म्हणून असे कृत्रिम भेद बाजुला सारून माणसाला माणूस जोडण्याचा संदेश बसवेश्वरांनी दिला. 'हा कोणाचा, हा कोणाचा, हा कोणाचा म्हणवू नका हो. / हा आमचा, हा आमचा, हा आमचा म्हणवा हो' या त्यांच्या उक्ती प्रमाणे सर्व भेदभाव विसरून एकत्र येण्याची ही वेळ आहे. करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी वेळोवेळी टाळेबंदीचा मार्ग स्वीकारण्यात आला. यात जगातील सर्व मंदिर आणि प्रार्थनास्थळेही बंदीस्त झाली. यामुळे घरातच उपासनेचा नवा मार्ग चोखाळणे भाग आहे, असा मार्ग बसवेश्वरांनी बाराव्या शतकातच दाखवला. देव मंदिरातील नश्वर धातू, दगड आणि लाकडाच्या मूर्तीत नसून आपल्या अंतरंगात आहे. आपला देहच देवालय आहे. 'धनवान बांधिती शिवालय, / देवा गरीब मी करू काय ? / मम पायच खांब, देह देऊळ, / शिर पहा सुवर्णकळस / कूडलसंगम देवा ऐका हो, / स्थावर पावे नाश, परी जंगम असे अविनाश ' असे बसवेश्वर सांगतात. आता मंदिरात जाण्याचा अट्टाहास करण्यापेक्षा मिळालेल्या एकांतात आपल्या देहातला देव शोधणे आज अधिक हिताचे ठरणार आहे. आपल्या आत डोकावून आत्मबल उंचावणे आवश्यक आहे. आपल्या देहालाच देवालय समजून म्हणजे जगातली अनमोल संपत्ती समजून देह निरोगी ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आज आपल्याकडे किती भौतिक संपत्ती आहे हे महत्त्वाचे नाही, तर आपले शरीर किती बळकट आहे हे महत्त्वाचे आहे. आपली रोगप्रतिकारक्षमता आज अत्यंत महत्त्वाची आहे. संपत्ती मिळवण्यासाठी धावपळ करून देहाकडे दुर्लक्ष करण्यापेक्षा या देहालाच आज

सर्वोच्च संपत्ती मानली पाहिजे. परमेश्वर उपासनेच्या नावाखाली उठसूट उपवास करत बसण्यापेक्षा चौरस आहार घेऊन योगासने, प्राणायाम, व्यायाम करणे आवश्यक आहे. संकट काळात सामाजिक स्नेहभाव आणि एकोपा हा खूप महत्त्वाचा असतो. कोरोना महामारीत गर्दी टाळणे आणि सामाजिक अंतर राखणे आवश्यक आहे. असे असले तरी महामारीचा शिकार ठरलेल्या लोकांना भावनिक ओलावा देणे तितकेच गरजेचे आहे. आज कोरोनाग्रस्त व्यक्ती आणि त्याच्या कुटुंबावर अप्रत्यक्षपणे बहिष्कारच घातला जात आहे. कोणताही गुन्हा नसताना पूर्ण कुटुंबाला अस्पृश्यतेच्या तीव्र वेदना सहन कराव्या लागत आहे. सामाजिक अंतर राखून त्यांना मदत केल्यास व प्रेमाचे चार शब्द बोलल्यास आपल्याला कोरोना संसर्ग होत नाही. आजारी व्यक्तींना मानसिकदृष्ट्या आधार देणे आज नितांत गरजेचे आहे. म्हणून कोरोना महामारीच्या नावाखाली आत्मकेंद्रित न होता समाजाभिमुख होणे आवश्यक आहे. सामाजिक स्नेहभावाचा संदेश देण्याच्या भूमिकेतून महात्मा बसवेश्वर म्हणतात, 'काय हो आलात, सर्व ठीक आहे ना म्हटल्यास, / तुमचे ऐश्वर्य उडून जाईल का ? / बसून घ्या म्हटल्यास पडेल का खळगा जमिनीस ? / तात्काळ बोलल्यास डोक्याची कवटी फुटून जाईल का ? / नाही दिलेत तरी देण्याची बुद्धी नसेल, तर / नाक कापल्याशिवाय सोडेल का, कुडलसंगमदेव ?' संकटात सापडलेल्या माणसाला मदत करणे, त्याला भावनिक ओलावा देणे, कोणत्याही परमेश्वर पूजेपेक्षा श्रेष्ठ आहे, हा संदेश महात्मा बसवेश्वरांच्या वचनातून मिळतो. सामाजिक स्नेहभाव न जपता आत्मकेंद्रित जीवन जगणारा स्वार्थी माणूस परमेश्वराच्या दृष्टीने नाही त्याज्यच असतो. महात्मा बसवेश्वरांनी वरील वचनात सांगितल्याप्रमाणे समाजाप्रती संवेदनशीलता जोपासली, सामाजिक एकोपा जपला तर अशा कितीही महामारी आल्या तरी माणूस समर्थपणे त्याचा मुकाबला करील. आज देशातील एकसष्ट टक्के संपत्ती केवळ एक टक्के लोकाकडे साचलेली आहे. ही आर्थिक दरी उत्तरोत्तर वाढतच आहे. वर्तमान महामारीतून उदभवलेल्या आर्थिक संकटावर मात करण्यासाठी श्रीमंताकडे साचलेला अतिरिक्त पैसा विनियोगात येणे गरजेचे असल्याचे अर्थतज्ज्ञ सांगत आहेत. अतिरिक्त संपतीचा संचय ही समाजाची चोरी आणि पाप असल्याचे बसवेश्वर सांगतात. 'सोन्याचा एक कण, वस्त्राचा एक धागा जरी / आजच्यासाठी, उद्यासाठी पाहिजे म्हणालो तर / तुमची शपथ, तुमच्या प्रमथांची शपथ' ही बसवेश्वरांची भूमिका या देशातले आजचे कुबेर काही अंशी जरी स्वीकारले तरी देश आर्थिक संकटातून निश्चित बाहेर पडेल. दुष्काळात उपाशी पोटी झोपणाऱ्या चोरांच्या लेकरासाठी बसवेश्वर आपल्या पत्नीच्या अंगावरील दागिने काढून देतात. संपत्तीपेक्षा माणूस जोडणे आणि जपण्यावर बसवेश्वरांचा भर होता. सामाजिक स्नेहभाव जोपासण्याचा संदेश त्यांनी आपल्या अनेक वचनातून दिला. आज माणसातला संवाद काही अंशी तुटत चालला आहे. अशा संकटातून तरी सामाजिक स्नेहभाव जोपासण्याचा धडा घेणे गरजेचे ठरते. आज करोना महामारीतील संकटात जीवनावश्यक वस्तुंची साठेबाजी करून चढ्या दराने विक्री करणारे काही महाभाग दिसतात. यातले काही धार्मिकतेचा आव आणून वावरतात. अशा लोभी आणि दांभिक प्रवृत्तीचा बसवेश्वरांनी धिक्कार केला आहे.'छप्पन वाचले काय आणि छप्पन ऐकले काय ? / आशा सुटत नाही, रोष जात नाही, / मज्जन घालून फल काय ? / वागण्या-बोलण्यात मेळ नसलेल्या ढोंग्यांना पाहून / हसतो आमचा कुडलसंगमदेव' अनेक नफेखोर लोक टाळेबंदीत साठेबाजी करून आज देशा समोरील समस्येत भर घालत आहेत. अशा संकटात आपल्या सभोवतीच्या लोकांना मदत करणे ही राष्ट्र सेवा आणि परमेश्वर पूजा ठरणार आहे. 'भाताचे एक शीत पाहता कावळा / हाक न मारी का आपल्या परिवारास ? / घासभर अन्न दिसता कोंबडी, / न बोलवी का आपल्या कुलबांधवास ? ' या वचनातून कावळा कोंबड्या सारख्या पक्षा पासून तरी सामाजिक न्यायाचा धडा माणसाने घेतला पाहिजे, अशी अपेक्षा बसवेश्वर करतात. अशा संकटातही आपलाच स्वार्थ साधणारे लोक बसवेश्वरांच्या दृष्टीने कावळा कोंबड्यापेक्षा हीन ठरतात. कोरोना महामारीच्या दुसऱ्या तडाख्यात आपल्या सभोवतीची अनेक माणसे हे जग सोडून जाताना दिसत आहेत. मानवी जीवनाची नश्वरता, क्षणभंगुरता काय असते ? ते आज पहायला मिळत आहे. तरीही त्यातून कोणता बोध न घेता अशाही परिस्थितीत माणूस माणसाला लुबाडत आहे. काही डॉक्टर प्रामाणिकपणे रुग्ण सेवा करत आहेत, ही जमेची बाजू असली तरी काही ठिकाणी मात्र रुग्णसेवेच्या नावाखाली होणाऱ्या लुबाडणूकीच्या घटना ऐकल्यानंतर माणुसकीवरचा विश्वासच उडत आहे. रेमडिसीयर सारख्या इंजेक्शनचा

काळाबाजार माणसाला हादरवून सोडणारा आहे. माणसाच्या मृत्यूनंतर प्रेत ताब्यात घ्यायलाही लाच द्यायला लागत आहे. मरणाच्या दारातही माणसाला लुटण्याचा हा किळसवाणा प्रकार पाहिल्यानंतर महात्मा बसवेश्वरांच्या वचनाची प्रस्तुतता आज लक्षात येते. 'सनाला आणलेली नवसफेडीची मेंढी / तोरणाची पाने चरत आहे / मरणार असल्याची जाणीव तिला नाही, / पोटाची खळगी भरून घेत आहे / जशी जन्मली, तशी मेली / तिला मारणारे अमर राहतील, कुडलसंगमदेवा ?' अशा महामारीत आपल्या डोळ्यादेखत मरणाऱ्या माणसांना निर्दयीपणे लुटणारे आपल्यालाही मरण आहे हे मात्र विसरत आहेत. या भूतलावर स्वर्ग निर्माण करण्याचे सामर्थ्य असलेला सर्वश्रेष्ट जीव म्हणून बसवेश्वरांनी माणसाकडे पाहिले आहे. कोरोना विषाणूमुळे आलेले संकट म्हणजे आपले मनुष्यत्व सिद्ध करण्याची कसोटीच आहे. अशा संकटकाळात ऑक्सीजन सिलेंडर, रेमडेसियर इंजेक्शन, औषधी आणि जीवनावश्यक वस्तुंची साठेबाजी करून त्याचा काळाबाजार करणे म्हणजे आपले मनुष्यत्व नाकारणेच आहे. महात्मा बसवेश्वरांनी आपल्या जीवनातील अनेक प्रसंगातून दुःखीताप्रती संवेदना कशी जपावी ? याचा कृतिशील संदेश जगाला दिला. आज कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर आपल्या सभोवतीच्या असह्य लोकांना मदत करणे, कोरोनाग्रस्त लोकांना प्रेमाचे दोन शब्द बोलून त्यांचे मनोबल उंचावणे हीच खरी महात्मा बसवेश्वरांना आदरांजली ठरेल. अशा प्रसंगी महात्मा बसवेश्वर जयंतीचा रस्त्यावर उत्सव करण्यापेक्षा त्यांच्या विचाराची उपासना करून त्यात अस्वस्थ वर्तमानातील प्रश्नांची उत्तरे शोधणे गरजेचे आहे. वर्तमान कोरोना महामारीत महात्मा बसवेश्वरांच्या विचारांची ऊर्जा घेऊन आलेल्या संकटावर मात करणे हेच महात्मा बसवेश्वरांना जयंतीनिमित्त सार्थ अभिवादन ठरेल.

**महात्मा बसवेश्वरांची ज्ञानाची संकल्पना – एक अभ्यास**

**सहा. प्रा. जगदीश जायेवार**
*संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट जि.लातूर*

१८ व्या शतकात ज्या महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाला महत्त्व देत ज्ञानाच्या दिव्याचे प्रदीप केले होते. त्याच ज्ञानाच्या दिव्याची ज्योत महात्मा बसवेश्वरांनी १२ व्या शतकात आपल्या विचार आणि कार्यातून पेटविली. ख-या अर्थाने बाल बसवाला ज्ञानाचे महत्त्व त्यांच्या वयाच्या आठव्या वर्षीच कळाले होते. त्यांनी वयाच्या सहाव्या वर्षीच ज्ञानधारणेला सुरूवात केली होती. परंतु प्राप्त होत असलेल्या ज्ञानामध्ये विसंगतता आढळून आल्याने ते यथार्थ ज्ञानाच्या शोधात कूडलसंगम येथे आले होते. कूडलसंगम ही संत-महंतांची भूमी होती. म्हणून त्यांचा विश्वास होता की, संगमावरच त्यांना ख-या ज्ञानाची प्राप्ती होईल आणि ते त्यांनी तेथेच अनुभवले. 'अनुभव हाच खरा गुरू आहे'. असे म्हणणा-या महात्मा बसवेश्वरांनी पारमार्थिक जीवनापेक्षा वास्तव जीवनाला अधिक महत्त्व दिले आणि वास्तव जीवन सुखी-समाधानी बनविण्यासाठी त्यांनी आपल्या अनुभवाद्वारे ज्ञानाला महत्त्व दिले. अज्ञानाचा नाश करून स्वावलंबी जीवन जगण्यासाठी ज्ञानाला महत्त्व देणा-या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २० व्या शतकात 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे' असे म्हटले होते. परंतु त्याही अगोदर म्हणजेच इ.स.च्या १२ व्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी धार्मिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय विषमता मिटविण्यासाठी, धर्मातील कूप्रथा थांबविण्यासाठी, श्रमाला महत्त्व देण्यासाठी ज्ञानाला महत्त्व दिले. शिक्षणातून ज्ञानाची प्राप्ती होते आणि ज्ञानामुळेच अज्ञानाचा नाश होतो हे जाणून महात्मा बसवेश्वरांनी श्रमासोबतच ज्ञानाचाही पुरस्कार केला.

**ज्ञानाची संकल्पना** महात्मा बसवेश्वर हे बालपणापासूनच आध्यात्मिक वृत्तीचे होते. त्यांचा ईश्वरावर विश्वास होता आणि ईश्वराच्या भक्तीवर देखील त्यांचा विश्वास होता. ख-या भक्तीनेच ईश्वर पावतो किंवा ईश्वराचा साक्षात्कार होतो. अशी त्यांची धारणा होती. ईश्वराची भक्ती करायची असेल तर मनुष्याच्या ठिकाणी प्रथमतः भाव असणे आवश्यक असते आणि तो भाव मनुष्याच्या ठिकाणी तेव्हाच निर्माण होतो जेव्हा मनुष्य हा ज्ञानापासून दूर राहतो. म्हणूनच महात्मा बसवेश्वरांनी अज्ञानापासून दूर राहण्यासाठी ज्ञान हे आवश्यक असल्याचे सांगितले.

ज्ञानाविना काया असेल?
ज्ञानाविना प्राण असेल?
ज्ञानाविना अधिकार असेल?
ज्ञानाविना भक्ती असेल?

कूडलसंगमदेवा तुम्ही परिपूर्ण असल्याने अवगुणाला थारा नाही.

वरील वचनातून हे लक्षात येईल की, मनुष्याला ज्ञानामुळे आत्मज्ञान प्राप्त होते आणि या आत्मज्ञानामुळेच तो मनुष्य ईश्वराविषयीचे ज्ञानसुद्धा प्राप्त करू शकतो अर्थातच ज्याला ईश्वराविषयीचे ज्ञान प्राप्त होते. त्या व्यक्तीला आपल्या शरीरावर, आपल्या प्राणावर (मनावर) अधिकार गाजविता येतो आणि असा भक्तियुक्त अधिकार गाजविणारी व्यक्ती ही निश्चितच सद्गुणी बनते हे या ठिकाणी लक्षात येते. महात्मा बसवेश्वरांनी आध्यात्मिक दृष्टिकोनातूनच ज्ञानाचे महत्त्व पटवून सांगितले नाही तर सामाजिक दृष्टिकोण समोर ठेवून ज्ञानाचे महत्त्व सांगण्याचा प्रयत्न केला. किंबहूना सामाजिक उन्नतीसाठी ज्ञानाचे महत्त्व लक्षात घेवून पहिल्यांदा धर्माच्या आधारे ज्ञानाचे महत्त्व सांगण्याचा प्रयत्न केला. असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. गौतम बुद्धांनी ज्याप्रमाणे अज्ञान हे दु:खाचे कारण आहे असे सांगितले होते. त्याचप्रमाणे बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनीसुद्धा अज्ञानामुळेच मुनष्याच्या जीवनात दु:ख येते असे सांगितले आहे. हा आशय त्यांच्या पुढील वचनातून लक्षात येते.

अज्ञानामुळे जन्मला अहंकार आणि ममता,
अज्ञानामुळे जन्मली मनाची चंचलता,

अज्ञानामुळे जन्मले इंद्रिय-उद्रेक,
अज्ञानामुळे जन्मला देहमोह,
अज्ञानामुळे जन्मली अतिआकांक्षा,
अज्ञानामुळे जन्मला त्रिविध मल,
अज्ञानामुळे जन्मला संसार,
अज्ञानामुळे जन्मला राग द्वेष,
अज्ञानामुळे जन्मला सर्वप्रपंच,
अज्ञानामुळे जन्मले सर्व दुःख,
कूडलसंगमदेवा, या अज्ञान भ्रमाला नष्ट केल्याविना
तुमच्यात समरस होता येत नाही देवा.

ज्ञानाच्या अभावामुळे व्यक्ती अवगुणी होतो आणि त्याच्या जीवनात अनेक दुःख येतात. तेव्हा या दुःखांची कारणे सांगावयाचे झाल्यास त्या अवगुणी व्यक्तीची ओळख सांगावयाचे झाल्यास तो अहंकाराने वागतो. तो अस्थिर असतो. तो देहमोह बाळगतो. तो अतिआकांक्षा ठेवतो. तो राग-दोष बाळगणारा असतो. वरील गोष्टी ज्याच्याजवळ असतात. तो अवगुणी म्हटला जातो आणि तो वरील सर्व गोष्टी बाळगतो. म्हणूनच त्यांच्या वाटेला दुःख येतात. म्हणूनच महात्मा बसवेश्वरांनी सुखी जीवनाचा मार्ग सांगताना ज्ञानाचा पुरस्कार केला असल्याचे वरील वचनातून प्रत्ययास येते. समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात सुख यावे म्हणून ज्ञानाचा पुरस्कारी करणारे बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वर हे एकमेव होते. ज्ञानामुळे मनुष्य अंधकारातून बाहेर पडतो. धर्माच्या बंधनात न राहता सत्याने वागतो. म्हणजेच तो धर्मातील कर्मकांडात न अडकता सदाचाराने व समतेने वागत असतो. ज्ञानामुळेच मनुष्य धर्मातील कूप्रथांना विरोध करून त्यात सुधारणा करु शकतो. तसेच ज्ञानामुळेच मनुष्य 'धर्माचा' खरा अर्थ लावतो. असा महात्मा बसवेश्वरांचा विश्वास होता. म्हणूनच त्यांनी ज्ञानाला महत्त्व दिले आणि प्रत्येकाने ज्ञान प्राप्त केले पाहिजे असे आवाहन केले. महात्मा बसवेश्वरांनी ज्ञानाचा पुरस्कार फक्त आपल्या विचारातूनच केला असे नाहीतर त्यांनी प्रत्यक्ष कृतीतूनसुद्धा ज्ञानाचा प्रसार केला. महात्मा बसवेश्वरांनी अनुभव मंटपाची उभारणी केल्यानंतर त्या ठिकाणी अनेक जाती-धर्माचे लोक येवून राहू लागले. त्यात काही लोक अशिक्षित होते. त्याकाळी विद्यार्जनाला धार्मिक अधिष्ठान लाभलेले होते. धार्मिक शिक्षण हे अधिक प्रमाणात संस्कृत भाषेतच असायचे. संस्कृत शिकविणारे फक्त उच्चवर्णिय होते. परिणामी, अनेक लोक या शिक्षणापासून वंचित राहायचे. महात्मा बसवेश्वर हे मूळ ब्राम्हण जातीचे होते. त्यांना विद्यार्जन करणे सोपे गेले. परंतु त्याच महात्मा बसवेश्वरांनी संस्कृत भाषेत असलेले ज्ञान कन्नड भाषेत जगासमोर ठेवले. इतकेच नव्हे, तर त्यांनी प्राप्त ज्ञानामध्ये त्रुटी काढल्या आणि त्या त्रुटी कन्नड भाषेत मांडल्या. पर्यायाने ज्ञान हे सार्वजनिक व्हावे, सर्वांना प्राप्त करता यावे. यासाठी त्यांनी मातृभाषेला महत्त्व दिले. त्यांच्या या पद्धतीमुळे अनुभव मंटपातील अनेक लोक त्यांच्याकडून कन्नड, संस्कृत भाषा शिकू लागले व त्यानुसार आपआपले अनुभव, विचार वचन रूपात मांडू लागले, विद्यार्जन करू लागले आणि याच विद्येने, अनुभवाने कल्याणक्रांती घडविली हे सत्य विसरता येत नाही. महात्मा बसवेश्वर म्हणतात,

ज्ञानाच्या प्रभावाने अज्ञानाचा
नाश पहा हो
ज्योतीच्या प्रभावाने अंधकाराचा
नाश पहा हो
सत्याच्या प्रभावाने असत्याचा
नाश पहा हो
परिसाच्या प्रभावाने असत्याचा
नाश पहा हो
कूडलसंगाच्या शरणांच्या अनुभवाने
मम भवनाश पहा हो.

ज्ञानाला महत्त्व देत महात्मा बसवेश्वरांनी ज्ञानाच्याच प्रभावामुळे अज्ञानाचा, अंधकाराचा, असत्याचा नाश होतो असे सांगत ज्ञान हे परिसासारखे प्रभावी तत्त्व असून या ज्ञानामुळे लोहसुद्धा सोने बनू शकते. असा विश्वास महात्मा बसवेश्वरांनी वरील वचनातून व्यक्त केला आहे. एकंदर महात्मा बसवेश्वरांनी सुखी जीवन जगण्यासाठी व विवेक जागृत ठेवण्यासाठी ज्ञानाला महत्त्व दिले. त्याचबरोबर ज्ञानाचा पुरस्कारही केला.

**संदर्भसूची**

*कामत, ए. (१९९९). महात्मा बसवेश्वर. पुणे : सत्संग प्रतिष्ठान पर्वती,*

*पाटील, बी., करंजकर., पाटील, बी. (२००६). युगप्रवर्तक. महात्मा बसवेश्वर.*

*कामत, ए. (१९९९). महात्मा बसवेश्वर सत्संग, प्रतिष्ठान. पुणे : पार्वती,*

*बसवराज, एस. (२००९). समग्र क्रांतीप्रर्वतक महात्मा बसवेश्वर. लातूर : अमृता प्रकाशन,*

*जत्ती, ए. (२००९). वचनकार आणि व्यक्तीमत्त्व विकास. बंगळूर : बसव समिती,*

*घोडमोडे, के. यु., घोडमोडे, के. (२०१२). शैक्षणिक विचारवंत भारतीय व पाश्चात्य. नागपूर : विद्या प्रकाशन,*

# बाराव्या शतकातील पहिले समाजसुधारक श्री महात्मा बसवेश्वर

**डॉ. सिद्धेश्वर रा. शेटकर**

*सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख, संजीवनी महाविद्यालय चापोली,*
*ता.- चाकूर, जि.- लातूर*

**प्रस्तावना :** बाराव्या शतकात सर्वात प्रथम समाज जागृती करणारा समाज सुधारक म्हणून श्री महात्मा बसवेश्वर यांच्याकडे पाहिले जाते त्यांनीच त्या काळामध्ये राजकीय, सामाजिक आणि धार्मिक परिस्थितीचा अंदाज घेऊन या ठिकाणी असणारी जातीव्यवस्था आणि त्यापासून होणारे समाजाचे विभाजन थांबवण्यासाठी सर्वधर्म समभाव पद्धतीमधून जनजागृती करण्याचे काम केलेले आहे. त्यामुळेच या महान विभूतींना सर्वप्रथम नमन: युरोप खंडात वैचारिक क्रांतीची सुरुवात होण्यापूर्वीच भारतात बाराव्या शतकात कर्नाटक राज्यामध्ये भूतपूर्व क्रांती झालेली आपणास पहावयास मिळते. या क्रांतीचे जनक श्री महात्मा बसवेश्वर आणि त्यांच्या समकालीन शिवशरण त्या काळामध्ये कल्याण-नगर नावाने प्रसिद्धीस असणारे शहर की जे आज बिदर जिल्ह्यातील बसवकल्याण या नावाने प्रसिद्ध आहे. त्याच ठिकाणी त्यांनी क्रांतीची ज्योत पेटवली आणि त्या ठिकाणी अनुभव मंडपांची उभारणी केलेली आहे. या क्रांतीची प्रभाव प्रामुख्याने या ठिकाणी असणारे जातिभेद स्त्री-पुरुष भिन्नता वेगवेगळ्या धर्मात असणाऱ्या अनिष्ट प्रथा, पौरानिक देव पूजन, अज्ञान, रूढी, परंपरा, या दृष्टीचे उच्चाटन होण्यासाठी मदत मिळाली आज प्रत्येक विद्यापीठातून अनेक निरीक्षण-परीक्षण करून संशोधकांच्या मार्गदर्शनाखाली प्रबंध लिहिले जातात परंतु बाराव्या शतकात श्री महात्मा बसवेश्वर यांनी अनुभव मंडप या नावाने अद्भुत असे जनजागृतीचे विद्यापीठच उभे केले होते साहित्याचे सुंदर नवे दालन त्याने निर्माण केलेले आहे या मंडपात केवळ धार्मिकच विषयावर संशोधन केले जाते असे नाही तर सामाजिक, राजकीय व आर्थिक संदर्भात देखील मोठ्या प्रमाणात संशोधन केले जाते हे आपणास पहावयास मिळते. काळानुसार काळाचे पाऊल जो ओळखतो मानवी मनांचा वेध घेण्याची ज्यांच्यामध्ये शक्ती आहे भविष्याची ज्यांना जाण आहे जो या सर्व गोष्टींचा विनम्र भावनेने विचारमंथन करतो व ज्यामध्ये निर्णय घेण्याची योग्य पद्धतींची क्षमता आहे असे युगपुरुष म्हणून त्यांना जागतिक स्तरावर ओळखले जाते असे विश्व गुरु बसवन्ना आपणास पहावयास मिळतात. त्यामुळेच श्री महात्मा बसवेश्वर यांना आद्य क्रांतिकारक संत म्हणून संबोधले जाते.

**श्री महात्मा बसवेश्वरांचे बालपण-** म्हैसूर राज्यातील विजापूर जिल्ह्यात बागेवाडी या तालुक्याच्या गावी या महान संतांचा जन्म वैशाख शुद्ध अक्षय तृतीया सन 1105 मध्ये झाला त्यांच्या वडिलांचे नाव मंडगेय मादीराज तर आईचे नाव मंदाबी असे होते मादिराजाचे घराणे वैश्य, ब्राह्मण होते. महात्मा बसवेश्वर हे लहानपणापासूनच बुद्धिमान होते. त्यांच्या आई-वडिलांचे छत्र वयाचा सोळा वर्षांपूर्वी हरवले त्यावेळी त्यांच्याकडे समाज कटू तेने वागू लागला त्यांनी आपल्या बहिण (अक्कनागम्मा) बरोबर गाव सोडून कुडलसंगम येथे आले कुडलसंगम हे मलप्रभा व कृष्णा नदीच्या संगमावर वसलेले विजापूर जिल्ह्यातील रमणीय गाव या गावांमध्ये संगमेश्वर यांचे देऊळ आहे या ठिकाणी जाऊन बसवांना संगमनाथच आपले माता-पिता आणि सर्वस्व मानू लागले या गावांमध्ये बसवण्णाची धार्मिक व सामाजिक पायाभरणी झालेली आहे.

**श्री महात्मा बसवेश्वर यांचा जीवन प्रवास**

अनु.क्र. घटना इ. स. वर्ष /वास्तव्य कार्यकाळ

१ जन्म बागेवाडी जिल्हा विजापूर कर्नाटक ११०५-१११३ आठ वर्ष

२ उपनयन संस्कार १११३ मध्ये वयाच्या आठव्या वर्षी

३ कुडलसंगम येथे आगमन व ज्ञानसाधना १११३-११२६ तेरा वर्ष

४ मंगळवेढा जिल्हा सोलापूर येथे आगमन व वास्तव्य ११२७-११३२ सहा वर्ष
५ बसवकल्याण येथे आगमन व राजा बिज्जल दरबारात प्रधानमंत्री म्हणून कार्य ११३२-११६७ छत्तीस वर्ष
६ बसवकल्याण येथे अनुभव मंडप स्थापना ११४१
७ श्री महात्मा बसवेश्वर यांचा एकूण जीवन काळ ११०५-११६७ बासष्ठ वर्ष

**बसवन बागेवाडी**- श्री महात्मा बसवेश्वर यांचा जन्म याच बागेवाडीत बाराव्या शतकात झाला त्या गावास आज बसवन बागेवाडी या नावाने ओळखले जाते कर्नाटक राज्यातील विजापूर जिल्ह्यातील हे तालुक्याचे ठिकाण आहे सुप्रसिद्ध असे नंदीकेश्वराचे प्राचीन शिवमंदिर असून पुढे भव्य असे नंदीची मूर्ती हे बसवन्ना बागेवाडी ची मुख्य आकर्षण आहे.

**इंगळेश्वर**- हे श्री महात्मा बसवेश्वर यांच्या मामाचे गाव आहे ती बागेवाडी पासून तीन किमी अंतरावर असून त्या ठिकाणी श्री महात्मा बसवेश्वर महाराज आपल्या बहिण नागम्मा सोबत मामाच्या घरी वास्तव्यास काही काळ राहिले आहेत या ठिकाणी जैन साधूंचे मोठ्या प्रमाणात वास्तव्य होते राजा बिजल ही जैन धर्माचा असल्यामुळे या परिसरात जैन धर्मीय लेण्या, मंदिरे, बाहुबली गोमटेश्वर यांचे 58 फुटांची उंच अशी मूर्ती या ठिकाणी आहे.

**कुडलसंगम**- कुडलसंगम हे श्री महात्मा बसवेश्वर यांचे तपोभूमी आहे याच ठिकाणी महाराजांनी विविध धर्मदर्शनाचा सखोल स्वरूपात अभ्यास केलेला आहे संस्कृत भाषेचे अध्ययन पण केले आहे येथील चिंतनातूनच महाराजांना परिवर्तनाची बीजारोपण झालेली आहे या ठिकाणी शैवांचे एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे या ठिकाणी कृष्णा, घटप्रभा व मलप्रभा नद्यांच्या संगमावर हे कुडलसंगम तालुका हुनगुन्द बागलकोट जिल्ह्यातील क्षेत्र आहे कोरीव दगडावरील सुंदर शिल्पकला असलेले कुडलसंगमेश्वरांचे प्राचीन शिवमंदिर हे येथील मुख्य आकर्षण आहे. आज कर्नाटक सरकारने या क्षेत्रांचा विकास व्हावा म्हणून कुडलसंगम विकास बोर्डाची स्थापना पण केली आहे प्रामुख्याने या ठिकाणी कृष्ण, मलप्रभा आणि घटप्रभा नद्यांच्या संगमात श्री महात्मा बसवेश्वर महाराजांची मध्यभागी समाधी आहे त्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी पायऱ्या उतरून जवळपास शंभर फूट जावे लागते हे भारतातील एक नाविन्यपूर्ण दर्जा असणारे बस्वक्षेत्र आहे. या बागेवाडी जवळपास तीस किलोमीटर अंतरावर आहे.

**मंगळवेढा**- मंगळवेढा हे गाव महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्ह्यामधील तालुक्याचे ठिकाण आहे याठिकाणी बाराव्या शतकात राजा बिज्जलाची राजधानी होती त्यावेळेस मंगळवेढा राज्यात उस्मानाबाद, परांडा, सोलापूर, सांगली, सातारा, विजापूर, गुलबर्गा, बागेवाडी, कुडलसंगम या कर्नाटक आणि महाराष्ट्रातील प्रांतांचा समावेश असताना दिसून येतो या ठिकाणी श्री महात्मा बसवेश्वर यांचे मामा राजा बिजल दरबारी अधिकारी म्हणून काम करत होते मामा बलदेव यांच्या सांगण्यावरून महात्मा बसवेश्वर हे कुठला संगम सोडून मंगळवेढा येथे कर्णिक पदावर नोकरीस आले होते तेव्हा त्यांचा काही कार्यकाळ या गावांमध्ये देखील वास्तव्यास असलेला दिसून येतो.

**धार्मिक व सामाजिक स्थिती**- बसवन्नांच्या उदय काळातील वैदिक धर्मातील यज्ञयाग प्राण्यांची होणारी हिंसा या सर्व कर्मकांडांचा सर्वसामान्य लोकांना वीट आलेला होता त्यावेळेस वैदिक धर्माचा प्रसार हा मनुस्मृति वर असल्यामुळे मनुस्मृति मधील वर्णभेद आणि जातिभेद यामध्ये समाजांचे तुकडे पडत होते त्यावेळेस दलित व स्त्रिया वर मोठ्या प्रमाणात अन्याय-अत्याचार होत असत त्या दोघांनाही धार्मिक, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय स्वातंत्र्य नव्हते म्हणून हे दोन्ही घटक नाविलाजास्तव, अन्याय, अत्याचार सहन करत होते त्यावेळी राजसत्तेवर धर्म संस्थेचा अंकुश होता या सर्व परिस्थितींचा श्री महात्मा बसवेश्वर लहानपणापासूनच परिणाम झालेला दिसून येतो किंबहुना समाजांची आणि राष्टाची दुरावस्था दूर करण्यासाठीच त्यांचा अवतार झालेला असावा.

**आदर्श शासनकर्ता**- शासन कर्ता चांगला असेल तर निश्चितच त्या राष्ट्राची निर्मिती चांगले होते आणि प्रगती पण होत असते त्याकाळी देखील प्रामुख्याने राजेशाही असताना देखील श्री महात्मा बसवेश्वरांच्या उत्तम प्रशासक या नात्याने त्या काळात म्हणजेच बाराव्या शतकात बिज्जल राजाला एक कर्तबगार प्रधानमंत्री मिळाला होता महात्मा बसवेश्वर हे अवतारी पुरुष होते त्यांचे हृदय शिवशरण यांचे संतांचे होते ते धर्मशील होते आपल्या राजाला उच्च शिखरावर पोहोचण्यासाठी त्यांच्याकडे त्यांच्या मनामध्ये सतत प्रेरणा निर्माण करणारा गुण अवगत होता तो ईश्वर

साक्षात्कार आत्मसाक्षात्कार निर्गुण निरंकार अशा अनेक गुणांनी संपन्न असणारा असा शासन त्या काळात त्या राज्याला मिळाले त्या राज्यांचे भाग्य समजावे लागेल म्हणूनच त्यांनी सांसारिक (विवाह करून) होऊन उच्च आदर्श यांची पुर्ती करावी अशी आज्ञा महागुरू जातवेद मुनि व कुलदैवत संगमनाथ याची झाली त्यांनी भावी संसाराकडे काही अटी व शर्ती ठेवल्या होत्या त्या मान्य करून पण घेतल्या असा हा आदर्श डोळ्यासमोर ठेवून श्री महात्मा बसवन्ना एक उत्तम प्रशासक यांना त्यांनी काम करणारा समाज सुधारक म्हणून ओळखला जातो.

**निष्कर्ष-** श्री महात्मा बसेश्वर महाराजाचे बाराव्या शतकामधील समाज सुधारण्याचे काम निश्चितच सर्वांना प्रेरणा देणारी आहेत कारण त्या काळी दलितावर होणारे अन्याय स्त्री-पुरुष भेद निर्माण करून स्त्रियांना मिळणारी वागणूक समाजव्यवस्थेला भेद निर्माण करणारी होती.पण महाराजानी सर्वधर्मसमभाव ठेवून समानतेची शिकवण देऊन त्यावेळी वीरशैव लिगायात धर्मांची स्थापना करून सर्वांना हक्क आणि अधिकारांची जाणीव निर्माण करून दिली असताना आपणास पहावयास मिळते.

**संदर्भ ग्रंथ-**

*बसवपुराण- संपादक राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज, राजूरकर*
*बाराव्या शतकातील कर्नाटकांचा सत्याग्रही- महात्मा बसवेश्वर, लेखक- बाळाप्पा बोंदाडे*
*महात्मा बसवेश्वर जीवन व तत्वज्ञान- श्री प्रभू राज लिगडे*
*युग प्रवर्तक महात्मा बसवेश्वर- संपादक प्रा. भीमराव पाटील व प्रा. विजयकुमार करंजकर*
*बसवकालीन शरण दांपत्य- सौ. शिवकला मंडकी*

# जगत्ज्योती महात्मा बसवेश्वरांचे धर्मविषयक सामाजिक चिंतन

**प्रा. डॉ. सुरेश विठ्ठलराव धनवडे**
*सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शंकरनगर, ता.बिलोली जि.नांदेड*

**प्रस्तावना** - भारतात आजपर्यंत अनेक संत, सत्पुरुष, तत्वज्ञ होऊन गेलेले आहेत. त्यात गौतम बुध्द, वर्धमान महावीर, गुरुनानक, चक्रधर याच नामावलीत महात्मा बसवेश्वर यांचाही समावेश होतो. महात्मा बसवेश्वरांनी लोकांना अहिंसा, परोपकार, बंधुभाव, श्रम, समता, सामर्थ्य, मानवता, विवेकनिष्ठा, लोकशाही, स्त्री स्वातंत्र्य, एकदेवोपासना इत्यादी गुणांची शिकवण दिली. त्यांचे चरित्र व कार्य माहित करुन घेतल्याने आपल्या ज्ञानात मोलाची भर पडणार आहे. इसवी सनाच्या बाराव्या शतकात मंगळवेढा नावाचे लहान राज्य होते. तेथे कळचूर्य घराणाच्या बिज्जळाचे राज्य होते. दक्षिण भारतात चालुक्य सम्राटांचे मोठे साम्राज्य होते. चालुक्य साम्राज्याची राजधानी कल्याण येथे होती. सम्राट चालुक्य विक्रमादित्याच्या कन्येचा पुत्र (नातू) म्हणजे मंगळवेढा राज्याचा राजा बिज्जळ हा होय. बिज्जळाचे मंगळवेढा राज्यात बारा गावाच्या मांडलिक राज्य होते. बिज्जळाचे मंगळवेढा राज्यात बारा गावच्या प्रमुखाला पुरवराधिश्वर असे म्हणत असत. मादिराज हे इंगळेश्वर बागेवाडी परिसराचे पुरवराधिश्वर होते. मदिराज-मादलांबिका या पती-पत्नीत कन्या नागलांबिका आणि पुत्र बसव म्हणजेच बसवेश्वर, बसवण्णा किंवा बसवराज हे अपत्ये होती. पुरवराधिश्वर मादिराज धार्मिक, सात्विक होते. बागेवाडीत त्यांचा मोठा चिरेबंदी वाडा होता. गोठा गाई-वासरांनी भरलेला होता. गावाबाहेर चांगली शेती होती. 1105 मधील वैशाख शुध्द तृतियेला अक्षय तृतियेच्या दिवशी जवळच्याच इंगळेश्वर येथील माहेरी मादलांबिकेला पुत्ररत्न झाले. पुत्राचे नांव बसव ठेवण्यात आले. बागेवाडीत सर्वांना आनंदी आनंद झाला. हाच बसव पुढे समता युगाचा प्रारंभकर्ता क्रांतिसुर्य महात्मा बसवेश्वर म्हणून जगापुढे आला.

**गृहितके -**

1) भारतात धर्माला खुप महत्व आहे.

2) बसवेश्वरांचे धर्मविषयक सामाजिक चिंतन म्हणजेच वीरशैव अर्थात लिंगायत धर्म होय.

संशोधन पध्दती - प्रस्तुत शोध निबंधात व्दितीयक स्त्रोताव्दारे तथ्य संकलन केले आहे. यासाठी विषयांनुरुप संदर्भ ग्रंथ, लेख, वर्तमानपत्रातील लेख इ. चा वापर केला आहे. तसेच जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांचे चारित्र्य, विविध संदर्भ ग्रंथ यांचा वापर केला आहे.

**जगत्ज्योती महात्मा बसवेश्वरांचे धर्मविषयक सामाजिक चिंतन** - भारतात धर्माची व्यापकता ही लक्षणीय आहे. म्हणूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की भारतात धार्मिक संकल्पना या इतक्या अधिक प्रमाणात आढळतात की, त्यांनी समाज जीवनाचे सर्व अंग व्यापून टाकलेले आहे. धर्मव्यतिरिक्त भारत काहीच नाही. धर्माचे वलय व व्याप्ती लक्षात घेण्यासाठी धर्माचा अर्थबोध करुन घेणे प्रथमत: महत्वाचे ठरते. धर्म हा मानवी जीवनाची धारणा करत असतो. कारण धर्म हा शब्द ज्या धृ या धातूपासून बनला आहे, त्या धृ चा अर्थ धारण करणे, आधार देणे किंवा पोषण करणे असा होतो. धर्म या शब्दाच्या व्युत्पत्तीवरुन धारयतिस धर्म: असा उल्लेख केला जातो. याचा अर्थ म्हणजे जो धरुन ठेवतो किंवा धारण करतो तो धर्म होय. थोडक्यात व्यक्तीस नियमित मार्गाच्या बाहेर जो जावू देत नाही तो धर्म होय. धर्म, संस्कृती, सभ्यता, तत्वज्ञान व अध्यात्म यांचा 6 हजार वर्षांपेक्षाही अधिक भूषणावह इतिहास लाभलेला भारत हा जगातील एक प्रमुख देश आहे. भारत हा मुलत: कुटूंब प्रधान, कृषीप्रधान तसाच तो धर्म प्रधान समाज आहे. धर्म हा भारतीय जीवनपध्दतीचा जणू आत्मा होय. धर्म आणि भारत यांच्यातील अतूट नातेसंबंध व्यक्त करताना असे म्हणता येईल कि भारताचे दुसरे नाव म्हणजे धर्म होय. असे म्हटले तरी ते वावगे ठरणार नाही.

**भारत : एक धर्मभूमी -** एकंदरीत भारतीय समाजावरील धर्माचा प्रभाव हा शाश्वत स्वरुपात आढळतो. भारतीयांची आध्यात्मिकता आबाधित असल्याचा दावा करताना साप्ताहिक ब्लिट्झ चे संपादक म्हणतात, आपल्या देशात धर्म व अध्यात्माची मुळे इतकी खोल व मजबुत आहेत की जगातले कोणतेही तुफान त्याला हलवू शकत नाही. भारत म्हणजेच धर्म होय, धर्म ही भारताची एक भूषणावह परंपरा ठरलेली आहे. यासाठीच भारताला धर्मक्षेत्र व धर्मभूमी (A Land of Religions) म्हटलेले आहे. भारतीय संस्कृतीला भारतातल्या सर्व धर्मांचे महत्वपुर्ण योगदान लाभलेले आहे. किंबहूना विविध धर्मांच्या तत्वांचा व मुल्यांचा अविष्कार म्हणजेच भारतीय संस्कृती होय. भारतीय अस्मिता, एकता व एकात्मतेचे संवर्धन करण्यासाठी आवश्यक असलेला महान सांस्कृतिक वारसा (Cultural Heritage) भारतातील हिन्दू, इस्लाम, ख्रिस्ती, वीरशैव, शीख, बौध्द, जैन व पारशी या धर्मांनी सातत्याने जोपासला आहे.

वीरशैव आणि बसवेश्वर - बसवेश्वर ही समग्र वीरशैव जगताची एक आस्मिता होय. बसवेश्वर हे वीरशैवांचे परमभूषण होय. बसवेश्वर ही वीरशैव धर्म, समाज व संस्कृती यांची प्रेरणा होय. बसवेश्वर हे वीरशैवांचे सारसर्वस्व होय. वीरशैव हा भारतातील एक अतिप्राचीन धर्म आहे. इतर धर्माप्रमाणे वीरशैव धर्मातही बरेच चढउतार झालेले आहेत. श्रीकृष्णांनी गीतेत सांगितल्याप्रमाणे जेंव्हा-जेंव्हा धर्मावर ग्लानि, संकट येते तेंव्हा - तेंव्हा देव अवतार घेईल आणि धर्माचे रक्षण करील. 12 व्या शतकाच्या दरम्यान भारतभर पसरलेल्या वीरशैव धर्मावर ग्लानि आलेली होती. वीरशैव धर्माची आस्मिता लोप पावत होती. वीरशैव धर्मांचे स्वरुप अंधुक, अस्पष्ट व अस्थिर बनलेले होते. त्यावेळी नंदीचा अवतार धारण करुन बसवेश्वर जन्मले आणि वीरशैव धर्माला सुस्थिरता व सुस्वरुपता मिळवून दिली. वीरशैव संत शिरोमणी मन्मथ स्वामीजी यांच्याच सांगावयाचे तर, धर्म वीरशैव रसातळा जाता। झाला बसव त्राता, शिवरुपी।। असे गौरव उद्गार काढले आहेत.

**मानवी मूल्यांवर आधारित बसवेश्वरांची धर्म संकल्पना -** धर्माबाबत प्रत्येक समाजात काही विचार, काही गोष्टी निश्चित झालेल्या आहेत. धर्माबाबत काही समीकरणे देखील रुढ झालेली आहेत. उदाहरणार्थ- धर्म म्हणजे देव, देवदर्शन, देवपूजा, धर्मग्रंथ चिंतन, नामःस्मरण, मंत्रोच्चार, जपजाप्य, गुरुदर्शन, पाद्यपुजा, पालखी मिरवणून, होमहवन, उपासतापास, नद्यातील पवित्र स्नान, तीर्थयात्रा, व्रतवैकल्ये इत्यादी होत. बसवेश्वरांच्या मते यापैकी फार थोड्या गोष्टी धर्मात येतात, पण अवघ्या याच गोष्टी म्हणजे धर्म नव्हे. बसवेश्वरांची धर्माची संकल्पना ही प्रामुख्याने विज्ञानवाद, वास्तववाद, प्रवृत्तीवाद, विवेकवाद आणि व्यवहारवाद यावर आधारलेली आहे. बसवेश्वर देखील एक गोष्ट मान्य करतात की धर्म म्हणजे भक्ति आणि उपासना होय. तथापी कशाची भक्ती करावयाची आणि उपासना कशी करावयाची ? याबाबत बसवेश्वरांचा एक वेगळा, व्यापक व सर्वसमावेशक असा दृष्टिकोन आहे. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास त्यांच्या मते धर्म म्हणजे एकेश्वरी शिवभक्ती आणि शिवोपासना होय. त्याचप्रमाणे मानवता, समता, बंधुभाव, सद्भाव, सामंजस्य, सहिष्णुता, सेवाभाव, अहिंसा, दया, सहानुभूती, त्याग, सत्य, पावित्र्य, नम्रता, नैतिकता, प्रामाणिकता, सहनशिलता, सौजण्यशिलता, वस्तूनिष्ठता, सामाजिक गौरव, सामाजिक न्याय, सामाजिक एकात्मता, सामाजिक संघटन, दीनोध्दार, प्रतितोध्दार, दलितोध्दार, स्त्रियोध्दार, समाजोध्दार, दासोहसीलता, (अन्न संतर्पण), सहकार्य शिलता, कायक निष्ठा, समाजविषयक कर्तव्यभावना इत्यादी सामाजिक दृष्ट्या उपयुक्त व महत्वाच्या गोष्टींना महात्मा बसवेश्वरांनी धर्म (Religion) मानलेल आहे. बसवेश्वरांनी धर्मविषयक संकल्पनाही मुलत: मानवी मूल्यांशी (Human Values) संबंधीत आहे. या 21 व्या शतकात जगामध्ये सर्वत्र मानवाधिकारांची (Human Rights) भाषा बोलली जात आहे. तथापी 900 वर्षापुर्वी 12 व्या शतकात याच मानवी मुल्यांवर अर्थसंकल्पनेची व्यावहारिक प्रतिष्ठापना बसवेश्वरांनी केलेली आहे, हे मुद्दा लक्षात घेण्यासारखे आहे. याच पार्श्वभूमीवर भारतीय ज्ञानपीठ पुरस्कार विजेते डॉ. व्ही. के. गोहाक म्हणतात, बसवेश्वर हे आधुनिक विचारवंतांपेक्षाही अधिक आधुनिक होते.

**धर्म :** मानवतेच्या जीवंतपणाचे लक्षण - बसवेश्वरांच्या दृष्टीने धर्म हि केवळ वैयक्तिक अनुभूती अथवा वैयक्तिक बाब नसून ती एक सामाजिक घटना आहे. (Religion is basically a Social Phenomenon). धर्माविषयीच्या याच विचारांचे समर्थन अलिकडे ऑगस्ट कॉम्ट, एमिल, डरखीम, मॅक्स वेबर यांसारख्या अग्रणी समाजशास्त्रज्ञांनी केलेले आहे. कार्ल मार्क्स यांनी मात्र धर्माला अफूची गोळी म्हणजे अनावश्यक बाब मानलेली आहे. तथापी बसवेश्वरांनी धर्माचा सामाजिक आशय कटाक्षाने जोपासला. त्यांनी धर्माला एक श्रध्दात्मक, संघटनात्मक, परिवर्तनात्मक व विकासात्मक शक्ती मानलेली आहे. त्यामुळे बसवेश्वरांच्या सर्वच कार्यांना आणि एकूण सामाजिक तत्वज्ञानाला धर्माचा फार मोठा आशय लाभलेला आहे. बसवेश्वरांच्या बहुतेक विचारांमध्ये धर्माचे सामाजिक महात्म (Social

Significance of Religion) प्रतिबिंबित झालेले आढळते. किंबहुना डॉ. जावरे गौडा यांनी म्हटल्या प्रमाणे "मानवी समाजाची संपूर्ण पुनर्रचना करणे हे बसवेश्वरांच्या दृष्टीने धर्मांचे अंतिम उदिष्ट होय." धर्म ही व्यक्तीची तशीच समाजाची एक प्रमुख गरज असते. बसवेश्वरांचा असा विश्वास होता की धर्म हा मन:शांति व आत्मशांतिचा मार्ग आहे. वैचारिक परिवर्तन, सामाजिक परिवर्तन, सामाजिक सामंजस्य, सामाजिक सहकार्य, आर्थिक उन्नती व सामाजिक विकास घडवून आणण्याचे एक समाजधारणातत्व आणि समाजविकासतत्व आहे.

**धर्मापासुन दूर म्हणजे मानवतेपासून दूर** - जगातले काही देश आज धर्मापासून दूर चालले आहेत. धर्मापासुन दूर चाललेल्या अमेरिका, रशिया, जपान इत्यादी भौतिकदृष्ट्या अतिप्रगत देशांतील विवाह संस्था आणि कुटुंबसंस्था विस्कळीत व विघटीत झाल्या आहेत. त्या देशात बहुविवाह, लैंगिकता, घटस्फोट, मानसिक अस्थिरता, वैफल्य, नैतिक मूल्यांचा -हास, नैतिक संघर्ष यांसारख्या अनेक समस्या उद्भवलेल्या आहेत. परस्पर प्रेम, स्नेह, सांमजस्य, सहिष्णुभाव, मातृभाव, मानवता, विश्वबंधुत्व इत्यादी समाज संवर्धनासाठी आवश्यक मूल्यांची जोपासना धर्मामुळे होऊ शकते. धर्माचे शिकवण ही मुलत: मानवतेची शिकवण असते. त्यामुळे धर्म जीवंत राहिला तर मानवता जीवंत राहील. असा बसवेश्वरांचा दावा होता. अर्थात बसवेश्वरांना धर्मामध्ये अंधश्रध्दा नव्हे तर शुध्दश्रध्दा, शुध्दभक्ति, शुध्दविचार अभिप्रेत आहे. त्यांच्यामते धर्म म्हणजे स्नेह, आत्मीयता, सहानुभूती, सामंजस्य, अहिंसा, करुणा, दया आणि मानवता होय. अहिंसा म्हणजेच दया हा धर्माचा मूलाधार होय. बसवेश्वरांच्या दृष्टीकोनातून दया धर्माहुनी थोर होय. आपल्या एका वचनात बसवेश्वर म्हणतात

दये विना धर्म तो कसा ? दयेविना धर्म तो कोणता ?
दया हवी सकल प्राणीमात्रांठायी. दया हेचि धर्माची मूळ
न रुचे कूडल संगमदेवास दयेविना अन्य.

विज्ञान व तंत्रज्ञान यांतील विलक्षण प्रगतीमुळे मानव चंद्रादी ग्रहांवर गेलेला आहे. पण त्याचवेळी तो मानवापासुन आणि मानवतेपासून खुप दूर चाललेला आहे. धर्माच्या ख-या अर्थांपासून म्हणजेच मानवतेपासून दूर जात असलेल्या समाजांची स्थिती आपण पाहतोच आहोत. युध्दाची टांगती तलवार आज प्रत्येक देशाला दिसत आहे. परिणामत: राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय युध्दजनक परिस्थितीमुळे एक प्रकारची जागतिक अशांतता वाढलेली आहे.

सारांश - महात्मा बसवेश्वरांचा धर्म विषयकचा दृष्टिकोन हा व्यापक व सर्वसमावेशक आहे. व्यक्ती उन्नती, सामाजिक विकास आणि राष्ट्र संवर्धन करणा-या गोष्टींना बसवेश्वरांनी धर्म मानलेला आहे. तेंव्हा बसवेश्वरांची धर्मविषयक संकल्पना ही मानवी मूल्यांशी संबंधीत आहे. मानवांतील सद्भाव जागृत करणे, प्रत्येकाचा माणूस म्हणून सदोदित गौरव करणे, विश्वाला कुटुंब मानणे आणि जीवाला शिवत्व मिळवून देणे हा महात्मा बसवेश्वरांचा धर्म विषयक सामाजिक चिंतनाचा आशय होय. मानवी मुल्यांवर आधारित राष्ट्राची आणि समग्र विश्वाची पुनर्रचना करणे हे महात्मा बसवेश्वरांच्या दृष्टीने धर्माचे अंतिम उदिष्ट होय.

**निष्कर्ष** -

1) शिवम् सत्यम् जगत् सत्यम् अर्थात शिव सत्य आहे, शक्ति सत्य आहे तसे विश्वही सत्य आहे. या जन्मावर या जगण्यावर शतदां प्रेम करावे, अशा संपूर्ण प्रयत्नवाद, प्रवृत्तीवाद व विज्ञानवादाचे समर्थन बसवेश्वरांनी आपल्या धर्मविषयक विचारांत केलेले आहे.

2) नानाविध प्रकारच्या अंधश्रध्दातून बाहेर काढून मानवाला शाश्वत समाधान मिळवून देण्यासाठी व अखिल मानव जातिची उन्नती घडवुन आणण्यासाठी महात्मा बसवेश्वरांनी ही धर्मविषयक शिकवण जण दिपस्तंभाप्रमाणे आणि ध्रुवताऱ्याप्रमाणे सदैव मार्गदर्शने करीत राहील.

**संदर्भ ग्रंथ सुची** -

*सुर्यकांत घुगरे : समग्र क्रांतीकारी बसवेश्वर, बसवेश्वर पीठ, कर्नाटक विश्वविद्यालय, धारवाड - 2003.*
*अशोक कामत : बसवेश्वरे रचिला पाया, बसव सेंटर, सोलापूर - 2001*
*स.अ. डांगे : हिंदू धर्म आणि तत्वज्ञान, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर - 1973*
*रमजान दर्गा : बसवेश्वरांचा देव, महाराष्ट्र बसव परिषद, भालकी - 2007*
*शालिनी दोडमनी : श्री शिवशरण गाती बसवमहिमा, बसवधर्म प्रचार संस्था, भालकी - 2007*
*महादेवी माता (अनुवाद श्रीकंठमुर्ती एस.), लिंगायत धर्म दर्पण, विश्व कल्याण मिशन, बसव मंटप, बेंगळुरु - 1993*
*सोलपुरे अमर : बसव दर्शन, इंद्र पब्लिकेशन्स, औरंगाबाद – 2007*

# महात्मा बस्वेश्वरांचे कार्य आणि कर्तृत्व एक अभ्यास

**डॉ.आशा नरसिंगराव गिते**
*लोकप्रशासन विभाग प्रमुख, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड*

उत्त्म स्मरणशक्ती, कुशाग्र बुध्दीमत्ता, प्रमाणिकपणा, शुध्द चारित्र्य, निस्वार्थभाव, निर्भयपणा, बंडखोरवृत्ती, विज्ञाननिष्ठ, परोपकारी, सभाधिष्ठ, समानतेचा पूजारी, क्रांतिविर, इत्यादी अष्टपैलू नेतृत्व म्हणजेच महात्मा बसवेश्वर होत. अशा या महामानवाचा जन्म सद्याच्या कर्नाटकातील इ.स.1105 रोजी विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्वर-बागेवाडी या लहानशा खेडे गावात झाला. त्यांचे वडील मणिराज बागेवाडी आगाराचे भांडारप्रमुख होते. तर आई मादुलांबा या शिवभक्त होत्या. बसवेश्वरांच्या भावाचे नाव देवराज व बहिणीचे नाव नागम्मा होते. बसवेश्वर कर्मठ विधींना विरोध करत. त्यांनी वयाच्या आठव्या वर्षी मुंजीची तयारी झाल्यावर 'मला आधीच लिंगदीक्षा मिळाली आहे' असे म्हणून मुंज करून घ्यायचे नाकारले आणि घर सोडून ते कूडलसंगम (जि. विजापूर) येथे निघून गेले. कृष्णा व मलप्रभा या नद्यांच्या संगमावरील कुडलसंगम येथे मोठे अध्ययन केंद्र होते. तेथे बस्वेश्वरांनी बारा वर्षे वास्तव्य केले. कूडलसंगम येथे त्यांनी वेगवेगळ्या भाषा, धर्म, तत्त्वज्ञान इत्यादींचा अभ्यास केला. त्यांचा विवाह त्यांच्या मामाच्या मुलीशी झाला. तेव्हा ते सोलापुरातील मंगळवेढा येथे आले. तेथे ते एकतीस वर्षे राहिले.

**बस्वेश्वरांचे कार्य आणि कर्तृत्वाचा आढावा**

12 व्या शतकामध्ये बस्वेश्वरांनी धर्म आणि समाजसुधारणेसाठी केलेल्या कार्याचा मागोवा पुढील मुद्यांच्या आधारे घेण्यात आलेला आहे.

**1. लोकशाही शासनसंस्थेची स्थापना**

युरोपातील मॉग्ना कार्टा, फ्रेंच राज्य क्रांती, इंग्लंडची रक्त विरहीत क्रांती यामुळे लोकशाही उदयास आली आहे असा गैरसमज सर्वत्र आहे. परंतु या सर्व घटनेच्या अगोदर बस्वेश्वरांनी तत्कालीन समाजव्यवस्थेत उच्च-नीच, स्पृश्य-अस्पृश्य, प्रथा-परंपरा, चालिरीती, कर्मकांड इत्यादी समस्यांने भारतीय समाजव्यवस्था पोखरली गेली होती. मणूस्मृती या तत्कालीन धर्मग्रंथाने मानवाचे ब्राम्हण, श्रेत्रीय, वैश्य आणि शूद्र अशा वर्णात विभाजन केले. शूद्रांणा प्राण्यापेक्षाही हीन वागणूक दिली जात होती. त्यामुळे या विषमतावादी व्यवस्थेचे समूळ उच्चाटन करण्यासाठी त्यांनी मंगळवेढा येथे "लोकशाही संसद म्हणजेच 'अनुभव मंटपाची' स्थापना केली. हा अनुभव मंटप आजच्या लोकशाही व्यवस्थेपेक्षा उच्च होता. त्यांच्या अनुभव मंटपातूनच स्वतंत्र्य, समता, बंधुता, न्याय इत्यादी लोकशाही मूल्यांची पायाभरणी सर्वप्रथम त्यांनी केली. अनुभव मंटपात सर्व धर्मातील लोक एकत्र येऊन सामाजिक अडचणींवर कशी मात करावी यावर चर्चा करण्याचे कार्य चालत असे. बस्वेश्वरांनी समाजातील रूढीपरंपरा, वाईट चालीरीती यांना विरोध करून समाजाच्या हितकारक गोष्टींची अंमलबजावणी करणारी नवीन यंत्रणा तयार केली. बाराव्या शतकातील आदर्श प्रशासक, समतेचे प्रणेते म्हणून महात्मा बसवेश्वरांना ओळखले जाते. सर्व प्रथम लोकशाही मूल्याची सुरूवात ही म.बसवेश्वरांनी 12 व्या शतकात अनूभव मंटपाच्या माध्यमातून केल्याचे वचनसाहित्यातून दिसून येते. एकूणच त्यांनी वचनसाहित्यात समता, मूल्य, न्याय, बंधूता, एकात्मता तसेच स्वातंत्र्य, अधिकार, नियंत्रण व शिस्त, सूशासन आणि प्रशासन आदी बाबींवर सखोल विवेचन केले. सद्यस्थितीत शासन व प्रशासनाला या विचारांचा अवलंब केल्यास निश्चितच देशात निर्माण होणारी विषमता, हिंसा ,भेदभाव व जातीय राजकारण इत्यादी समस्यांना आळा घालता येईल. त्यामुळे आज देशात निर्माण झालेल्या दुषीत समाजव्यवस्था व भ्रष्ट शासनव्यवस्थेचे निर्मूलन करण्यासाठी बस्वेश्वरांचे विचार निश्चितच उपयोगी पडणारे आहेत.

2. **समाजव्यवस्थेचे संघटन:** समुद्राला भरती येते, त्यानंतर ओहोटी येते. सूर्य मध्यावर येतो आणि नंतर मावळतोही. समाजाचेही तसेच असते. या भूमीने गौतम बुध्द, चार्वाक, महावीर सम्राट अशोक, चंद्रगुप इत्यादींच्या काळात समाजाची भरभराट झाली आणि नंतरच्या काळात अधोगतीही झाली. निरर्थक अंगरूढींनी उच्छाद मांडला. स्पृश्य अस्पृश्यता यांसारख्या समाजाला मागे खेचणाऱ्या प्रथा बोकाळल्या. दुर्दैव असे की हे सारे धर्माची झूल

पांघरून सुरू होते. अशावेळी बसवेश्वर यांचा उदय झाला आहे. विस्कटलेल्या समाजाला एका धाग्यात बांधण्याचे उत्तम साधन म्हणजे आध्यात्मिक शक्ती आहे, असे बस्वेश्वरांनी जानले होते. त्यासाठीच त्यांनी "अनुभव मंडप' ही संस्था स्थापन केली. या संस्थेमध्ये समाजव्यवस्थेने बहिष्कृत केलेले किंवा वाळी टाकलेले सर्वांना विनाअट प्रवेश होता. तसेच स्त्री-पुरूष असा भेद न मानता सर्वांना द्वारे खुली होती. जातीभेदाला तर थाराही नव्हता. प्रत्येक माणसाला धार्मिक जीवन जगण्याची समान संधी मिळावी. त्या धार्मिक जीवनात जन्म, जात, व्यवसाय, स्त्री पुरुष म्हणून भेदभाव केला जाऊ नये.

3. **आध्यात्मिक कार्यावर भर:** 19 व्या शतकातील थोर सुधारक स्वामी विवेकानंदांच्या शब्दांत सांगायचे तर आधुनिक सुधारणावाद्यांना धर्माची मोडतोड केल्यावाचून सामाजिक सुधारणा करणे अशक्य वाटते. अलीकडच्या काळात असा प्रयत्न ज्यांनी ज्यांनी केला, त्यांना अपयश मिळल्याचे दिसते. कारण त्यांच्यापैकी फारच थोड्यांनी स्वतःच अभ्यास केला होता आणि सर्व धर्मांची जननी असलेल्या आपल्या धर्माचे शिक्षण, त्यासाठी आवश्यक ती साधना तर एकाचीही झाली नव्हती. समाजाची अवनती होते, ती धर्मामुळे नव्हे तर धर्मतत्त्वांचे योग्यरीतीने पालन न केल्याने, हे महात्मा बसवेश्वर जाणून होते. कृष्णा आणि मलापहारी नद्यांच्या संगम ठिकाणी असलेल्या गुरुकुलात ज्ञानी गुरुजनांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शिक्षण घेतले होते. विविध ग्रंथांचा, ज्ञानाच्या सर्व शाखांचा अभ्यास केला होता. त्यामुळे त्यांनी संस्कृत ग्रंथातील धर्मतत्त्वे कन्नडमधून लिहिली. बसवेश्वर पूर्व कन्नड वाङ्मय फक्त पद्यस्वरूपात लिहिले गेले होते. बस्वेश्वरांनी गद्यातून वचने लिहिण्यास सुरुवात केली, त्यामुळे कन्नड भाषेतील गद्य वाङ्मयाचा विकास झाला. वचनांच्या माध्यमातून समाजाच्या निरनिराळ्या बाबींवर प्रकाश टाकण्यात आला. समाजाची नैतिक व धार्मिकदृष्ट्या रचना कशी असावी, हे सांगण्यात आले. प्रत्येकाने आपल्या पोटापाण्याचा व्यवसाय करतानाच प्रामाणिक व आध्यात्मिक जीवन जगायला मार्गदर्शक ठरतील अशी तत्त्वे बस्वेश्वरांनी समाजाला दिली. ज्याप्रमाणे महाराष्ट्रात संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांचे अभंग मुकोगत आहेत त्याचप्रमाणे कर्नाटक आणि दक्षिण महाराष्ट्रातील खेड्यांतील लोकांच्या जिभेवर आजही बसवेश्वरांची वचने आरूढ झालेली दिसतात. बस्वेश्वरांचे समाजपोषक विचार आणि आचार याने प्रभावित होऊन चालुक्य राजाच्या दरबारात बस्वेश्वरांना मानाचे स्थान मिळाले. सर्वसामान्यांच्या उन्नतीची कामे करण्यात बस्वेश्वरांचा हातखंडा होता. निस्पृहता आणि कर्तृत्वाच्या बळावर ते राज्याच्या मंत्रिपदी आरूढ झाले. सत्ता, वैभव, कीर्ती पायाशी लोळण घेतानाही ते आध्यात्मिक नीतिमूल्यांपासून ढळले नाहीत.

4. **समाजवादी विचारांची पायाभरणी:** बस्वेश्वरांनी समाजामध्ये आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी श्रम आणि गरजेनुसार संपत्तीची विभागणी करण्याला प्राधान्य दिले. त्यांनी दासोह सिद्धांतात आपण कमावलेले धन केवळ स्वतः पूरते न वापरता त्याचा समाजासाठी उपयोग करण्याची संकल्पना त्यांनी मांडली. या त्यांच्या धोरणामुळे ग्रामोद्योगांना, प्रोत्साहन मिळाले आणि सर्व व्यावसायिकांमध्ये समभाव निर्माण झाला.

स्त्रीच्या समाजात होणारे शोषण लक्षात घेऊन त्यांनी स्त्रियांसाठी मोठे भरीव कार्य केले. यात स्त्रियांना मत स्वातंत्र्याचा अधिकार, धार्मिक आणि आध्यात्मिक हक्क देऊन स्त्रियांची अशुद्धतेच्या कल्पनेतून आणि पंचसुतका पासून मुक्तता केली. त्यामुळे पुढील काळात समाजावादी विचार रूजण्यास बस्वेश्वरांचे विचार मोलोंचे ठरले.

5. **आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन:** समाजातील भेदभाव कमी करून समाजात समानता प्रस्थापित करावयाची असेल तर रोटी बेटीचे व्यवहार होणे गरजेचे होते, हे बसवेश्वर जाणून होते. त्यामुळेच त्यांनी तत्कालीन समाजव्यवस्थेत राजसत्तेने लादलेल्या बंधने झुगारून लावण्यासाठी त्यांनी बसवेश्वरांनी १२ व्या शतकात मागास जातीतील संत हरळय्या यांचा मुलगा शीलवंत व मधुरस ब्राह्मण मंत्र्याची मुलगी कलावती यांच्यात विवाह घडवून आणला. तत्कालीन समाजव्यवस्थेच्या विरोधात जावून ब्राम्हण आणि शूद्र जातीत विवाह घडून आणणे हा १२ व्या शतकात खूपच क्रांतिकारक आणि धाडसी कार्य होते. कारण आजही म्हणजे ९०० वर्षांनंतरही आपल्या समाजाची असा विवाह स्वीकारण्याची पूर्ण मानसिकता झालेली नाही.

6. **प्रथा-परंपरा किंवा कर्मकांडाविषयी कार्य:** मणूस्मृतीने प्रथा-परंपरा आणि कर्मकांडाला खतपाणी घालून समाजात मोठ्या प्रमाणात अंधश्रध्दा प्रस्थापित केली होती. याविषयी ते पुढील वचनात म्हणता की,

चांभार उत्तम तो दुर्वास
कश्यप लोहार, कौंडिण्य तो न्हावी
तिन्ही लोकी बरवी प्रसिद्धी ती
जातीचे श्रेष्ठत्व हाची वेडाचार

वरील वचनात बसवेश्वर म्हणतात की, व्यक्तीचे अंतरंगच शुध्द नसेल तर अंगा भस्म, माती टिळा, गळी माळा असा बाहे देखावा करून काय उपयोग आहे, ज्या गोष्टी आपल्या आचरणात येणे कठीण आहे त्याच गोष्टीच्या बाह्य अवडंबराने स्वतः शुद्ध मनाचे आहोत असा खोटा आव आणतात. जे देवाला दूध, लोणी, तूप अर्पण करतात ते अंधभक्त होत. त्या संदर्भात बसवण्णा म्हणतात,

दुग्ध ते उच्छिट तथा वासराचे।
पाणी ते मत्स्याचे उच्छिष्टची।
पुष्प ते उच्छिट तथा भ्रमराचे।
साधन पूजेचे काय सांगा ?

दूध हे वासराचे उष्ट असते, पाणी माशांचे उष्ट असते, पुष्प भ्रमराचे उष्ट असते असे वापरलेले अस्वच्छ उष्ट साधने देवाच्या पूजेचे साधन होऊ शकते का ? अशाप्रकारे बसवण्णांनी अंधश्रद्धा, कर्मकांड, जातीयता, बळी प्रथा, व्रतवैकल्य, उपास-तापास इत्यादींवर प्रखर हल्ला केला आहे.

**7. दैव किंवा ईश्वरवादाला विरोध :** बसवेश्वर यांच्यावर बौध्द तत्त्वज्ञानाचा प्रभाव असल्यामुळे त्यांनी दैववाद किंवा ईश्वरवादाला नाकारले आहे. बस्वेश्वरांच्या मते शुध्द आचरण आणि सत्य व्यवहार हाच ईश्वराकडे घेऊन जाणारा मार्ग आहे. त्यामुळे बस्वेश्वरांच्या विचारांना मनूवाद्यांनी दैववाद प्राप्त करून देण्यासाठी त्यात मोडतोड केली आहे. आज लिंगायत विरुद्ध वीरशैव असा भेद निर्माण झाला आहे. वीरशैव हे सनातन धर्माचे कट्टर पुरस्कर्ते आहेत. वर्णधर्म त्यांना मान्य आहे, ब्राह्मण व्रतवैकल्ये मान्य आहेत. वीरशैव विचारधारेचा प्रमुख ग्रंथ सिंद्धान्त 'शिखामणी' हा वर्णाश्रम धर्मावर आधारित असल्याचे कारण हा ग्रंथ आगम, निगम, शैवपुराण, वेद शास्त्र इत्यादींच्या मूळ स्रोतांशी बांधलेला आहे. त्यामुळे आज मुळ बस्वेश्वरांच्या विचारांपासून समाज फार दूर गेला आहे. स्वतःला बस्वेश्वरांचे अनुयायी म्हणून घेणारे राशीभविष्य, सत्य नारायण, लग्नाचे मुहूर्त, धार्मिक विधी, पूजा-अर्चा, कर्मकांड, देव, व्रतवैकल्य, यज्ञ, अंधश्रद्धा, आत्मा अशा चाकोरीत गुंतलेले आहेत. अशा कर्मकांडातून समाजाला बाहेर काढण्यासाठीच महात्मा बस्वेश्वरांनी अनुभव मंटपाची स्थापना केली. तसेच वेद, पुराण, स्वर्ग, देव देवता, आत्मा, पुनर्जन्म, यज्ञ, वैकल्य ही थोतांडे नाकारली आणि ७७० परगड जातीतील लोकांना सोबत घेऊन सर्वसमावेशक धर्माची स्थापना केली होती.

**सारांश:** एकंदरीत महात्मा बस्वेश्वरांच्या वरील कार्यावरून असे स्पष्ट होते की, महात्मा बस्वेश्वरांनी समाजव्यवस्थेच्या बाहेरील वंचित, कुपोषित, दबलेले, पिचलेल्या समाजाला मुख्य प्रवाहात आण्यासाठी सर्वसमावेश मानवतावादी समाजाची स्थापना केली होती. परंतु पुढे त्यांच्या कार्यात मोडतोड करून त्यांच्या कार्याला दैववादाचे रूप देण्याबरोबर त्यांचे कार्य विशिष्ट जातीपुरते मर्यादित केले जात आहे. त्यामुळे समाजाने महात्मा बस्वेश्वरांचे विचार मोघमपणे आचरणात न आणता त्यांच्या खोलात जाऊन मुख्ये उदेश जाणून घेऊन तशी कृती करणे आवश्यकत आहे.

## संदर्भग्रंथ


*केतकर श्री व्यं.महाराष्ट्रीय ज्ञानकोश, महाराष्ट्रीय ज्ञानकोश मंडळ, नागपूर, शनीवार पेठ, पुणे*

*देवकर के.एस.श्री क्षेत्र उळवी महात्मा, पारू प्रकाशन, कर्नाटक, 1984*

*दुबे शामचरण, भारतीय समाज, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नवी दिल्ली, 1994*

*भुसारी र.म., प्राचीन महाराष्ट्राचा धार्मिक इतिहास, महाराष्ट्र साहित्य परिषद, औरंगाबाद, 1995*

*मोगलेवार सुधाकर, वीरशैव विश्वकोश खंड-1, अखिल भारतीय मराठी वीरशैव साहित्य मंडळ, नागपूर, 2001*

*Radhkrishnan_ The Hindu view of Life, George Allen & Uniwin (India) pvt. Ltd. Bombay _1971*

*Ghugre Suryakant – Veershavism in India – Sadhana Book Stall , Gadhinglaj – 1995*

*Hunshal S. M. The Lingayat Movement Basav samiti Bangalore- 2004*

# प्रगतिशील समाज सुधारक : महात्मा बसवेश्वर

**प्रा.डॉ. मधुकर राऊत**
*(हिंदी वि. अध्यक्ष), महात्मा ज्योतिबा फुले महविद्यालय, मुखेड, ता.मुखेड जि.नांदेड*

समकालीन समाज, संस्कृती और साहित्य की जिन मुल्यों की आवश्यकता होती है । उन जिवन मुल्यों को प्रतिपादित करनेवाला साहित्य प्रासंगिक होता है । समाज परिवर्तन के साथ-साथ मुल्यों में भी परिवर्तन आता है। समाज की आवश्यकताएँ भी बदलती है। और यह बदलाव साहित्य में भी देखा जा सकता है। लेकीन कुछ विचार और मुल्य कालजयी होते है। लेकीन कुछ विचार और मुल्य कालजयी होते है जिनकी हमे सदैव आवश्यकता होती है। इन मुल्यों अभिव्यक्ती करनेवाली रचनाएँ एवं साहित्यिक प्रवृत्तियाँ सदैव महत्वपुर्ण होती है। उनका कहत्व किसी भी काल मेंह होता है। समय, संदर्भ और स्थितियाँ बदलने के बाद थी उन रचनाओं का महत्व कम नहीं होता वे रचनाएँ समाज जीवन के लिए दृष्टि से देखा जाए तो संत साहित्य का महत्व जितना मध्यकाल में था उतना ही आज भी है। भारतीय इतिहास में मध्ययुग, जीवन संघर्ष एवं आंदोलनों से ओतप्रोत है। इस काल में भारतीय राजाओं की सत्ता क्षीण हो रही थी । विदेशी शासन से देश भयभीत था । संपुर्ण देश में विभिन्न धार्मिक संप्रदायों का उदय हो रहा था । 12 वी सदी में वर्णभेद, लिंगभेद के आधार पर मनुष्य-मनुष्य में भेद किए जा रहे थे । कर्मकांड, अंधश्रध्दा का अंधकार चारो और फैला था। जिससे समाज की रीढ टुट रही थी। खुद को ब्राम्हण कलहाने वाले चाहे वह कितना भी चरित्रहीन हो वह श्रेष्ठ बन बैठा और शुद्र कितना भी चरित्र संपन्न, पवित्र, आचरणशिल, विद्यानिपुन हो उसे नीच ही समझा जाता था। भारत की इस पवित्र भूमि में अनेक संत महात्माओं का जन्म हुआ। संत एवं महात्माओं ने अपनी वाणी और लेखनी तथा अपनी कृति से समाज के एक नई दिशा प्रदान की। महात्मा बसवेश्वर ने अपने वचन साहित्य में इसी समाज व्यवस्थापर प्रहार किया। बसव जी का प्रगतशिल चेतना का स्वर वचन साहित्य में दिखाई देता है। महात्मा बसवेश्वर का विद्रोह उनके बचपन से प्रारंभ होता है। इनके माता पिता बचपन की अवस्था में उपनय संस्कार करना चाह रहे थे। बसवण्णा ने अपने माता-पिता से कहा की मेरी बहन का सबसे पहले उपनय संस्कार होगा। तब उनके पिता ने कहा की लडकी को धर्म संस्कार नहीं दे सकते यह कुलाचार के विरुध्द होगा। बसवण्णा ने ऐसे वेचादार धर्म विरोध किया। बसवण्णा ने लेखन, वाचन, छंदशास्त्र, व्याकरण, साहित्य, संगित आदि को आत्मसात किया था। उपजत प्रज्ञा और प्रतिभा उन्हे प्राप्त थी। इसलिए उन्होंने स्त्री-पुरुषों के भेद का विरोध किया। इसी प्रसंग से विद्रोह का प्रारंभ हुआ। म.बसवेश्वर ने भारत भूमिपर बढ रही जाती प्रथा का खुलकर विरोध किया। जाती प्रथा और वर्ण भेद के बारे में उन्होंने कहा...

महारवस्ती एवं शिवालय की भूमि क्या अलग है।
मातंग चन्नय्या पिता मेरे
ढोर कक्कय्या (चांभार) दादाजी मेरे
काका चिक्कय्या मेरा
किन्नर बोमय्या (सुनार) मेरा
डकय्या बोमय्या (डोम) मेरा
हडपद अप्पण्ण (नाई) मेरा
मडिवाल माचय्या (धोबी) मेरा
कैसे जानोगे तुम मुझे...

सामाजिक क्रांती अपार साहस की माँग करती है। बिना साहस और मौलिक चिंतन के कोई कैसे क्रांतीकारक हो सकता है। अन्य क्रांतियों की तुलना में सामाजिक क्रांति काफी दुशावार कार्य करती है। महात्मा

बसवेश्वर ने इस कार्य को साहस और लगन से पूरा किया है। अपने काल में सामाजिक, धार्मिक तथा भक्ति के क्षेत्र में चल रहे पाखंड को देखकर महात्मा बसवेश्वर ने सामाजिक समता का निर्माण किया। सामाजिक, राजनैतिक, धार्मिक क्षेत्र में नैतिकता का -हास चिंता का विषय बन गया है। प्रशासन के उच्च अधिकारियों और जनता का नेतृत्व करनेवाले तथाकथित नेताओं के नैतिक, चारित्रिक अध:पतन की चर्चा अब बेकार ही है। क्योंकी वहाँ भ्रष्टाचार ही शिष्टाचार बन गया है। धार्मिक क्षेत्र भी अछुता नहीं रहा है। एक और उपभोक्ताबाद का बोलबाला है तो दुसरी और आये दिन मंदिर-मजिदों की संख्या बढती जा रही है। अंधविश्वास और ढोंगी बाबाओं के चमत्कार दिन-ब-दिन बढते जा रहे है। शंकराचार्य भी यहाँ हत्या के मामले में आरोपी बन जाते है। धार्मिक कट्टरता बढती जा रही है। और धर्म के नामपर दंगा-फसाद आम बात होते जा रही है। कई गाँवो मे आज भी अछुतों को मंदिर प्रवेश नकारा जाता है। इन परिस्थियों को देखते हुए ऐसे लगता है कि मध्यकाल में संत साहित्य कितना महत्वपुर्ण लगता है। भारत में मध्ययुगीन इतिहास की सबसे प्रमुख घटना भक्ति आंदोलन है। महात्मा बसवेश्वर एक उच्च कोटी के भक्त, अध्यात्मिक नेता, वीर शैव धर्मोध्दारक और क्रांतिकारी समाज सुधारक थे। उन्होने वर्णव्यवस्था और वेदोचित कर्मकांड का विरोध किया। विभिन्न देवी-देवता ओं की पुजा, आराधना, आदि के अधिन होकर भटकने वालों जनसमुदाय को दिव्य संदेश व्दारा सरल भक्ति का मार्ग दिखाकर जनता को सहारा दिया। धार्मिक कर्मकांड का खुलकर विरोध किया। महात्मा बसवेश्वर एक उच्च कोटी के भक्त थे। वीरशैव समाज के सुधारक थे। उनका कार्य एक क्रांतिकारक के रुप में दिखाई देता है। उन्होंने वर्णव्यवस्था विरुध्द में कार्य किया। उन्होंने भक्ती के क्षेत्र में अध्यात्मिक बंधुत्व का उपदेश देकर ईश्वर के साम्राज्य में सबको समान माना है। आत्मशुध्दि, सच्चाई, सदाचारपुर्ण नैतिक जीवनपर उन्होंने अपना उपदेश दिया। समाज में नैतिक स्तर उँचा करने का कार्य महात्मा बसवेश्वर जी ने किया है। महात्मा बसवेश्वर जी ने उपदेश देते हुए कहा की सच्ची मेहनत करने पर बल दिय। "कायक ही कैलाश" है यह संदेश देते हुए श्रम को प्रतिपादीत किया है। बसवेश्वर ने के अनुसार "कायक" वह उद्योग है जिसके व्दारा साधक को आत्मज्ञान की प्राप्ती होती है। वीरशैव धर्म के अनुसार प्रत्येक व्यक्ति को अपना अपना कर्तव्य पुरा करना चाहिए। अध्यात्मिक साधना के लिए गृहस्थी (घर) त्यागने की आवश्यकता नहीं है। महात्मा बसवेश्वर स्वयं गृहस्थ थे और उन्होने राज्य के मंत्रीपद पर आसीन होकर राजकार्य का भी निर्वाह किया। इस तरह पलायन, परावलंबन, आलस्य आदि का खंडन करते हुए कायक के महत्व को स्थापित करके जनता की समाज के प्रति व गृहस्थी के प्रति कर्तव्य भावना को जगाया और लोगो को विदित हुआ की सांसारिक जीवन और भक्तिमार्ग एक दुसरे के विरोधी नहीं है। महात्मा बसवेश्वर कुशल संघटक थे। उन्होंने हजारो अनुयायियों को संघटित कर कल्याण नामक स्थान में "अनुभव मंटप" में सम्मिलिन शिवशरणों के अनुभव ही कन्नड में वचन साहित्य कहलाता है। यहाँ मथित विचार ही आगे चलकर वीरशैव मत को निश्चित रुप देने में सहायक हुए। बसवेश्वर ने भक्तों के कथित अनुभवों की ही प्रतिपादित किया। 12 वी सदीतक आते-आते वर्णभेद, जातीभेद, लिंगभेद के आधार पर मनुष्य-मनुष्य में भेद किया जा रहा था। अंधश्रध्दा का चारोऔर बोलबाला था। सामन्य जनता को जीवन अभिशाप बन गया था। अनुभव मंटप जनतंत्र की विश्व की पहली संसर थी। ज्ञान, समता, एकता, शांती का यह एक तार्थक्षेत्र था। अनुभव मंटप में ही वैश्विक तत्वज्ञान तथा मानवीय मुल्य देने वाला प्रगतशिल वचन साहित्य लिखा गया। महात्मा बसवेश्वर ने कठोर परिश्रम का समर्थन किया। श्रम में ही ईश्वर है। कायकवे कैलास इस वैश्विक सिध्दांत का प्रतिपादन बसव ने किया। श्रम को प्रतिष्ठा दिलाई। परमार्थिक मोक्ष श्रम से प्राप्त होगा। समाज एवं राष्ट्र का उत्कर्ष प्रज्ञा के श्रम पर ही निर्भर है। श्रम को प्रतिष्ठा देनेवाले महात्मा बसवेश्वर के विचारों का प्रभाव रुस के विचारक चिंतक कार्ल-मार्क्स में दिखाई देता है। समाज में जो बहिस्कृत थे वे श्रमिक थे। बसवेश्वर ने कर्म ही सबसे बडा स्वर्ग है यह संदेश दिया है, सभी संतोने यही संदेश दिया है। ऐसे प्रगतिशील विचारों की आवश्यकता समाज को है।

**संदर्भ संकेत -**

*युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर - संपादक प्रा. भीमराव पाटील*
*साप्ताहीक जय सियाराम अंक - महात्मा बसवेश्वर जयंती विशेषांक*
*साप्ताहीक जय सियाराम अंक - महात्मा बसवेश्वर जयंती विशेषांक*
*समाज सुधारक महामंत्री म. बसवेश्वर - डॉ. अशोक मेनकुदळे*

# MAHAATMA BASVESHWARA AND HIS SOCIAL BENEVOLENCE

**Dr. Prasad A. Joshi**

*Head & Research Guide Dept. of English, M.J.P. College Mukhed, Dist. Nanded*

***Abstract***

*The Sharanas remembering Basaveshwara for the twelfth century dispatched a transformation to establish the framework of a general public dependent on the rule of social uniformity building up friendly fairness is in the face is of the significant elements of humanism in Basaveshwara. Basaveshwara possesses a remarkable spot in profound and social circles. During the 12 thcentury Basaveshwara drove a strict upset to slaughter the evil spirit of standing and ideology which took steps to control the predetermination of the man brought into the world in a Brahmin family.*

**INTRODUCTION:** Basaveshwara set his own model by dismissing the custom ridden Vedic religion for Veerashivism, on arising lively religion having an incredible worry for humankind in general including the abused, misused, and an oppressed class of untouchables declining to go through the string service, Basaveshwara supported the upset at the grass-root level. His upset energized the low standing individuals and made them mindful about the significance of their job in building the new local area rising above hindrances of rank and having a balance of societal position and openings on the whole circles of human existence. He respected all people including the high conceived minister and the low conceived distant as equivalent according to God and that they ought to be treated with equivalent equity and praises. Basaveshwara composed numerous sonnets (Vachanas) on this point, where he drastically communicates his thoughts. Quite possibly the most mainstream vachanas of Basaveshwara gives a decent impression of the nearby association between friendly qualities and otherworldliness in a circumstance of regular day-to-day existence.“O lord, let them not say! To whom become he, to Whom, to whom? Let them say; he is ours, Yes ours, ours! O lord Kudal Sangama, Let them say, a son of Your house” Basaveshwara doesn't need even a more grounded to be regarded based on his oundation, his family, or rank, yet he desires to be conceded into a similar otherworldly legacy.

In another Vachana Bas aveshwara works out the subject of the good for nothing customary divisions interestingly with the solitary genuine distinction between individuals, which he finds in their demeanor towards commitment as his Vachana says; “God, O God mark my prayer, I shall call all devotees of Shiva equal, From the Brahamana at one end, To the lowest born man at the other end, I shall call all unbelievers equal, From the Brahaman at one end, To the untouchable at the other end, This is what my heart believer? In saying this should I have any doubt? Be it as small as a sesqmum bud, O lord Kudal Sangama, Chop off my nose so that, The teeth stick out!” Here, he expressly alludes to position definition, with the Brahamana on top and the low station distant at the base, which has lost its implications among the lovers. Regardless of whether they are Brahmanas or untouchables, there is no distinction since the genuine point is that they are world-lings. Thusly, the customary division of individuals into different ranks is totally nullified. Basaveshwara is called Vishwaguru on the grounds that he ingrained confidence in his devotees that anyone on the planet. Regardless of rank, ideology, merit, identity, and so on, one can rise above and become God being in association with Purana. In any case, Basaveshwar with gutsy bluntness recognized the common shades of malice of the Hindu society and proposed available resources to take another direction. The way of thinking of the Basavana needs to assemble from his expressions, the Vacahnas. He attempted to construct a Vibrant casteless, creedless society loaded with human estimations of proliferated it through Vachanas. They were

principally focused on the normal individual and looked to demystify God as huge areas of society had been denied of admittance to the writings Vachana is fundamentally the rich experience of Basavana direct put into a smooth beautiful configuration. There are more than 1,000 Vachana which are useful titbits by Basavana maintaining fundamental human estimations of leniency, consideration, empathy, and human nobility. Basavana denounces abuse, segregation, and brutality. He savagely contended for social equity, equivalent freedoms for the poise of work and he was answerable for the social upheaval and transformation. The Vachanas have been deciphered by various researchers and at various time-frames however, it is deciphered the consideration esteems are profoundly applicable even today and will be significant for a long time to come. It was the breath of Basavan's way of thinking. He dismissed the standing framework and eagerly (exceptional) decried the country that a few networks are better than others and destroyed the edifices of prevalence from the personalities of his partners. His instructing we read routed to all people the same. He lectured the correspondence of ladies, dismissed the station framework and the objections and the inherited privileges of Brahmins to the brotherhood just as its conventional custom, love. Basavan's social transformation for self-refinement and self-improvement of each individual is given in the Vachanas. A Basavana complex commitment towards the revival of the contemporary practice ridden society was his acknowledgment of ladies ' singularity of their privileges. Women were not qualified to offer petitions to bear with the men. The Basavana allowed equivalent rights for ladies as well as raised her status to parenthood and divine nature. Ladies are not Maya (hallucination) but rather the lady is truly heavenly. He supported equivalent freedom for ladies with men altogether handle, social, strict, and monetary. Kayaks – Work Doctrine Concept of kayak ( work-tenet) not just expresses that everybody ought to make money by work finished with the perspiration of his forehead yet additionally in the soul of commitment of that work to God. His idea of Kayaka cuts at the foundation of the conventional station request of the general public of varnashrama. Kayak is a profound perspective on work. Carlyle says work is love however Basavana says Kayakave – Kailas, which means work is the Abode of God. The arrangement of Anubhava Mantapa the institute of socio-profound encounters was a remarkable work of Basavanna. it was where having conversations and carrying out conversations for the government assistance of mankind. What's more, Vachanas were presented and philosophical talks held. Dr. S. Radhakrishnan, eminent logician, and the previous president have named AnubhavaMantapa as "The primary ReligiousParliament of the world."Basaveswara and his partner Sharanas began to end advanced an abstract structure that had an all-inclusiveness of allure, the Vachanas or brief verse. This writing focused on friendly upliftment and self- acknowledgment was sufficiently basic to be perceived by the most oblivious and extraordinary enough to be appreciated by the complex. Vachanasahitya is a type of cadenced writing in Kannada that advanced in the eleventh century and prospered in the twelfth century Vacahana in a real sense signifies "what is said," Kudalasangma was Basavann's own divinity. This name shows up toward the finish of each Vachana as a characteristic of personality. Basava composed a large number of Vachanas.

**CONCLUSION:** The message Basava is a message of affection and sympathy combined with commitment. It regards all people as equivalent and it sees no difference between one individual and another. It advances empathy towards all living creatures including creatures and plants. Today a few foreboding shadows of brutality, carnage, human bombs, illegal intimidation disdain wrongdoing appears to accumulate strength with their revolting countenances not too far off of the world, undermining the actual presence of Humanity of this excellent Earth of our own. At a particularly critical time in our set of experiences, we can return to Basava and look for direction, motivation, and light from the way of thinking that is appropriately perceived and deciphered to the everyday person, it

will help society. On the off chance that the reformer and writer Basava were alive today, we would consider him a dissident, or even a revolutionary. Back in the twelfth century, when he led development in Karnataka, this is the manner by which he depicted the plenty of requesting divine beings who keep ordinary citizens in their bondage. It was not simply the divine beings who "lived off the cause of individuals" or were, here and there, "more terrible than canines". There were likewise where these divine beings resided – the sanctuaries – and all the more critically, the ones who controlled this sanctuary culture, stuffing themselves for the sake of religion. The rich sanctuaries that permitted ministers to be incredible doorkeepers of conventionality kept individuals in their hopeless spots. Basava's thoughts and words scrutinized sanctuary and cleric, the whole traditionalist and manipulative situation, as "static". Furthermore, he demanded that there was a "dynamic" elective. For what reason should profound experience be without reason? Basava disdained the silly custom? Basava took his scrutinize of the foundation to its intelligent end. Expanding on reason, on the dynamic, on the resistance to man-made custom, ministry, sanctuaries, and their divine beings, Basava gave the most impressive test: all men are equivalent, paying little mind to rank; and all ladies are equivalent to men. When King Bijjala interrogated him regarding the extremist between standing marriage arranged by Basava's associates in the development, he asked the Lord, "Would we say we are not all brought into the world of a similar source, a lady's belly? No man at any point emerged from his mom's ears." Basava didn't just mouth clichés against standing persecution. Similarly, as he ate with the lower standings and invited them into his development, he intimated himself into the ancestry of those considered sub-par by the customary. Basava may have been conceived a Brahmin; however, he shed the holy string, the agrahara culture of the Brahmins, the ministers, and sanctuary culture. He turned into an offspring of butchers, water-transporters, grub finders. He turned into an offspring of the lower stations, of the most reduced "untouchables". This is the means by which he made himself human. Was Channayya's child better than Kakkayya's girl? They are equivalent in our development, said Basava. At the point when his men experienced difficulty figuring out how to live this uniformity, Basava utilized words and pictures to help them to remember the objective premise of fairness. He sang words, for example, by the weaver writer, Devara Dasimayya. Basava's own sonnet about people utilized a sexually unbiased picture to say that sex equity is just regular: So Basava's content, as it's continually looking for a significant life, regardless of whether of the individual or the local area, front grounded uniformity and reason. It must be underlined that even the profound in Basava's way of thinking incorporated the social, political, and financial parts of the local area. Not at all like other Bhakti or reverential developments which put singular salvation first, Basava's sharana development, and the Lingayatism he established, upheld a more libertarian Bhakti – shunning customary sanctuary love, icon love, aimless ceremonies, and even renunciation. The profound was solidly situated in individuals' lives in genuine society. Anybody, paying little heed to position, sexual orientation, or local area could turn into a sharana. The development gave the average folks of the Kalyana realm a feeling of their human worthwhile pushing them from the outskirts toward the standard. The weapon of the development was an assemblage of writing: sonnets called vachanas – "what is said" – in language that associated with the ordinary citizens. It didn't last, obviously. The emergency point for the development came when the sharanas coordinated a between rank marriage. The dads of the lady and man of the hour were executed, hauled by an elephant. The ruler of Kalyana was slaughtered; rebellion followed. Basava had to leave the city, and his end is covered in secret. Throughout the long term, the development which had fairness at its heart turned into another standing. Today, the Lingayats structure a significant number in Karnataka. They are someplace in the rank progressive system however employ financial and political force. What's

more, in a dismal incongruity, Basava's inheritance has been appropriated by moderate components strong of the new traditional in India. For somebody who is motivated by Basava's content today – his words, his thoughts, and his life – what is the route forward? How would you battle the bending of Basava's thoughts and words, the casteism conceived out of an enemy of standing development? How would you keep his difficulties alive today, and challenge both old and new sanctuaries, clerics, and divine beings? The old disparities that persevere and the new imbalances that make the further division. "The rank contrasts between the advantaged and the oppressed is conceived out of "religion" while the distinction between poor people and the rich is conceived out of work."

**REFERENCES:**

*Speaking of Siva, by A. K. Ramanujan. Penguin. 1973. ISBN 978-0-14044-270-0 • Shiva Prakash, H.S. (1997). "Kannada". In Ayyappapanicker (ed.). Medieval Indian Literature:An Anthology. Sahitya Akademi. ISBN 978-81-260-0365-5.*

*"Linga" as Lord Supreme in the Vacancies of Basava, R Blake Michael (1982), Numen, Volume 29, Issue 2, pages 202–219*

*Lingayats as a Sect, William McCormack (1963), The Journal of the Royal Anthropological Institute of Great Britain and Ireland, Vol. 93, No. 1, pages 59–71*

*Work as Worship in Vīraśaiva Tradition, R Blake Michael (1982), Journal of the American Academy of Religion, Vol. 50, No. 4, pages 605–619*

*MN Srinivas (1980), The Remembered Village, University of California Press, ISBN 978-0520039483, pages 307–308*

*^ Jump up to:[a b c] Jan Peter Schouten (1995), Revolution of the Mystics: On the Social Aspects of Vīraśaivism, Motilal Banarsidass, ISBN 978-8120812383, pages 9–10*

*^ Jan Peter Schouten (1995), Revolution of the Mystics: On the Social Aspects of Vīraśaivism, Motilal Banarsidass, ISBN 978-8120812383, pages 111–112*

*^ サイ (2005-). Sai. [Sai]. OCLC 852251154. Check date values in: |date= (help)*

*^ Jessica Frazier et al (2014), The Bloomsbury Companion to Hindu Studies, Bloomsbury Academic, ISBN 978-1472511515, page 281*

*^ T.V. Sivanandan (11 February 2011). "Basaveshwara's statue may come up in London". The Hindu. Retrieved 7 September 2013.*

*^ "Lambeth Basaveshwara - Home". www.lambethbasaveshwara.co.uk.*

*^ Image of the Prime Minister paying homage to Basaveshwara statue in London The Hindu (14 November 2015)*

# संत महात्मा बसवेश्वर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या तत्वज्ञानातील मुल्यदृष्टी

**डॉ. उद्धव न. कांबळे**

*सहायक प्राध्यापक, तत्त्वज्ञान विभाग, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था,नागपुर*

**प्रस्तावना-** संताची भूमी अशी आपल्या भारत देशाची ओळख आहे. संताची खूप मोठी परंपरा आपल्या देशाला लाभली म्हणूनच येथे सद् विचार वृद्धिगत होऊ शकले . संत ही अशी व्यक्ति असते जी कधीही स्वत: साठी नाही तर इतरांसाठी जगणारी असते. सतत त्यांच्या चिंतन, मनन आणि विचारांचा केंद्रबिंदु मानवी जीवनाचे कल्याण उद्धार ,विकास हे राहिलेले आहे. संतांच्या या विचारांची अनुभूति आपल्याला कुठे अभंगातून तर कुठे वचन, काव्य यांच्या माध्यमातून होत असते. संतानी रचलेले अभंग ,काव्य ,वचन हे समाजाच्या विकासाचे आरसेच असतात. या मुल्यरुपी आरशाच्या माध्यमातून संतानी समाजातील लोकांचे प्रबोधन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या प्रबोधनातुनच पुर्णपणे समाजातील लोकांच्या विचारामध्ये मोठ्या प्रमाणात बदल झाले.सर्वजण चिकित्सक दृष्टी कोणातुन समाज वास्तव समजुन घेण्याचा प्रयत्न करू लागले. हीच संतांच्या कार्याची यशस्वीता होती. हीच मुल्यदृष्टी संत महात्मा बसवेश्वर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारातून समाजाला लाभली. याठिकाणी मी या निबंधाच्या माध्यमातुन दोन राष्ट्र पुरूषांच्या तत्वज्ञानातील मुल्यदृष्टीचे महत्त्व मांडन्याचा प्रयत्न करीत आहे. दोन्ही महापुरूषांच्या जीवनामध्ये खुप मोठे अंतर आहे. पण दोन्ही संताच्या विचारांचा केंद्रबिंदु मानवी कल्याण हेच आहे. संत महात्मा बसवेश्वर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचार आणि कार्यामध्ये समानता दिसून येते . त्यांचे तत्त्वज्ञानरूपी मुल्यात्मक विचार पुढील प्रमाणे आहेत. संत महात्मा बसवेश्वरांचा जन्म कर्नाटकात मध्ययुगीन कालखंडात झाला. जन्माने ते वैष्णव ब्राह्मण होते. तर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जांचा जन्म महाराष्ट्रात १९ व्या शतकात झाला. ते जन्माने ठाकुर घराण्यातील होते. दोन्ही राष्ट्र संतानी सघंटनात्मक कार्याला महत्व दिलेले आहे. संत महात्मा बसवेश्वरांनी त्यांच्या कार्याची सुरवातच सघंटन बांधणीतुन केलेली होती. जेव्हा कल्याण या ठिकाणी बिज्जल राजाच्या दरबारी महात्मा बसवेश्वर महामंत्री म्हणून कार्यरत होते. महामंत्री पदाची कामगिरी पार पाडत असताना त्यांचा समाजातील अनेक लोकांशी स्नेहाचे नाते तयार झाले. मध्य युगातील समाज वास्तवाची जाणीव त्यांना लहान वयापासूनच होती. या विषमतेच्या विरोधी काम करण्याची त्यांच्या मनाची जबरदस्त इच्छाशक्ती होती. ही इच्छाशक्ती कार्य रूपास येण्यास कल्याण ही अनुकूल असणारी जागा आहे, असे संत महात्मा बसवेश्वर यांना वाटले. म्हणून त्यांनी या ठिकाणी अनुभवमंटप ची स्थापना केली. अनुभवमंटप हे लोकांना आपले विचार आदान प्रदान करण्याची , आपले जिवनातील दुःख निवारन्याचे ,शिक्षित होण्याचे एक विचारपीठ आहे. तसेच अनुभवमंटप हे सर्वांचे श्रद्धास्थान राहिल, येथे सर्वांना प्रवेशाची सामान संधी असेल असे संत महात्मा बसवेश्व रांनी घोषित केले. याच कारणामुळे अनुभवमंटप पुढे एक संत महात्मा बसवेश्वर विचारांचे संघटन तयार झाले. या ठिकाणीअनेकांनी वचन साहित्याची निर्मिती केली. हे वचन साहित्य म्हणजेच त्यांच्या जीवनाचे अनुभव होते. समाज वास्तव होत. आणि तेच संत महात्मा बसवेश्वरांचे तत्वज्ञान होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा सामुदायिक जीवनावर विश्वास होता. समाजाची प्रगति एकटा मनुष्य करू शकत नाही. समाजाच्या उन्नति करीता आपण मानवाचे संघटन केले पाहिजे असे त्यांना वाटत होते. ते आपल्या एका अभंगात संघटनेचे महत्त्व सांगतात.

" पशु पक्षी किटके ,बघ मेळ करुण राहती
आपत्ति येता कोणती ,अति संघटूनिया धावति
तु मानवाचा देह धरुनी ,का न तुज ही भावना
निज भावशक्ति वर्धना ,कर सामुदायिक प्रार्थना "

संघटन हे सर्वांच्या उद्दात्त भावनेतुन यशस्वी होऊ शकते ,त्या करिता संघटनेचा संकल्प जेवढा उद्दात्त असेल तेवढ्या प्रमाणात ती संघटनना पुढे जात असते. असे ते म्हणतात.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे असे मत होते की, समाज हितासाठी समाजाचे आवश्यक व उचित परिवर्तन करने म्हणजे क्रांति. ही क्रांति अहिसंक, शांतता प्रधान व विधायक मार्गाने समाजाकडूनच संघटीतपने केली गेली पाहिजे. आपल्या धर्माचा अभिमान बाळगणारे लोक आपल्याच बांधवांना कुत्र्या मांजरा इतकीही किंमत देत नाहीत, हे उघड्या डोळ्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी बघितले आणि जनतेला हक़ दिली.

" हा जाती भेद विसरुनी एक हो आम्ही,  
अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातुनी "

जातीयता व अस्पृश्यता निवारनाचे कार्य त्यांनी केले. जातीभाव नष्ट व्हावा म्हणून त्यांनी सेवा मंडळाच्या माध्यमातुन सहभोजन कार्यक्रम घडवून आणला. या सहभोजनाला अठरा पगड़ जातीचे लोक एकत्रित यायचे. येथे सर्वजण सर्व प्रकारचे विषमतामूलक भाव विसरून एकत्रित येत असत. अशा कार्यक्रमामुळे लोक जाग्रति घडवून आणण्यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यशस्वी झाले. समाज सुधारने करीता राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी अनेक गोष्टी वर काम केले.त्यामध्ये मंदिर प्रवेश चळवळ, आंतर जातीय विवाहाचा पुरस्कार , स्त्री जीवन सुधार , बाल विवाहास विरोध , हुंडा प्रथेचा विरोध , अंतरंग शुद्धी इ. या प्रत्येक घटकांचा विचार करताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज असे म्हणतात की, यातील माणुसकी विरोधी सर्व गोष्टीना माझा विरोध असुन , त्या समूळ नष्ट झाल्या पाहिजेत. येथे मानव एक केंद्रभुत घटक म्हणून सर्वांना सामान संधी,स्वातंत्र्य ,समता ,न्याय ,बंधुता प्राप्त व्हावी असे मला वाटते. जेणेकरून समाजाचा सर्वांगीण विकास होईल. समाजात सगळीकडे उच-निचता, असमानता, स्वातंत्र्याचा अभाव, हक्क अधिकाराचा अभाव अशा समाज विघातक गोष्टीचा. संत महात्मा बसवेश्वरांनी जवळून अनुभव घेतलेला होता.या सर्व गोष्टीचा मुळातुन संपवन्यासाठी त्यांनी समाज सुधारनेचे कार्य हाती घेतले. त्यांनी प्रथम सर्वांना एकत्रित करुण एक संघटन केले. सर्वांना शिक्षित केले, स्वंय रोजगाराचे धडे दिले. ते असे म्हणतात की, समाजातील सर्वजण एकच आहेत.त्यांच्या मध्ये रोटी बेटी व्यवहार झाला पाहिजे, सर्वांना सर्वच प्रकारचे स्वातंत्र्य ,हक्क, अधिकार मिळावेत यासाठी ते आग्रही होते. स्त्री असो की पुरुष त्यामध्ये भेद करू नये , सर्वांना समान वागणूक द्यावी असा त्यांचा व्यापक दृष्टीकोण होता. ते आपल्या एका वचनात म्हणतात,

" लोह तापवून झाला लोहार,  
वस्त्र विणून झाला विणकर ,  
कपडे धुहुन परीट धोबी झाला,  
तसाच वेद पठन करुण झाला ब्राह्मण "

जाती पाती नष्ट झाल्याशिवाय समाजात एकोपा शक्ति निर्माण होणार नाही.हे संत महात्मा बसवेश्वर जानून होते. या करीता त्यांनी प्रत्यक्ष कृति केलेली आहे. त्यांनी स्वत: अंतर्जातीय विवाह करुण घेतला. तसेच ब्राह्मण आणि शुद्र यांच्यात अंतर्जातीय विवाह घडवून आणला. यासाठी त्यांना अनेक संकटांना सामोरे जावे लागले होते. संत महात्मा बसवेश्वरांचे सामाजिक सुधारणे बरोबर धार्मिक कार्य अतिशय महत्व पूर्ण आहे. धर्मातील बुरसटलेल्या जुनाट विचारांचा ते विरोध करतात वैदिक संस्कृती चा गाभा म्हणज विषमतातेची विकृति पोसनारी चातुर्वर्ण्य संकल्पना, तिच्या मुळावरच ते घाव घालतात. धर्म सुधारणा हवी असेल तर जुन्या विचारांचा विध्वन्स आवयशक. ही वर्णव्यवस्था मुठभरांचे अस्तित्व स्वीकारुन.बहुजनाचे जीवन नाकारनारी आहे. ही समाज स्थिति बदलून जाती वर्णात सामाजिक अभिसरण व्हावे या हेतुमुळे त्यांनी चातुर्वर्ण्य नाकारले. त्याचबरोबर होमहवन ,कर्मकांड ,स्वर्ग ,पुनर्जन्म आदींचे अस्तिव अमान्य करुन,या गोष्टी मानवास हानिकारक आहेत, याचे महत्व पटवून देऊन त्यापासून सर्वांना परावृत्त करण्याचा प्रयत्न करतात. धर्मातील कल्पनांना बळी पडलेल्या लोकांना सुधारन्या करीता अतिशय सोप्या शब्दात धर्म व धर्मासोबत येणाऱ्या घटकांचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चिकित्सक विवेचन करतात. खरा धर्म कसा असावा या विषयी ते म्हणतात,

" मुख्य धर्माचे लक्षण त्याग,अहिंसा,सत्यपूर्ण  
अपरिगृह, ब्रह्मचर्य जाण तारतम्य युक्त  
निर्भयता, शरीरश्रम परस्पराशी अभेद प्रेम

पूरक व्हावया विद्या सत्कर्म सकलासाठी
सर्व विश्वची व्हावे सुखी ही धर्माची दृष्टी नेटकी
ती आणखी सर्व गावलोकी तरीच लाभ ”

मंदिरामध्ये स्थापित देव आणि देवाचे अनुयायी यांच्यामध्ये असलेला मध्यस्थ यानेच समाजाला अधोगतिला नेले. अंधश्रद्धा पसरून समाजाची दिशाभूल करण्याचे अनैतिक कृत्ये भट, पंडे ,पुजारी करतात. म्हणून त्यांचे अस्तित्व असू नये,असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात. मूर्तिपूजेचा विरोध करताना ते असे म्हणतात की,ज्यांच्या मूर्तीचे पूजन आपण करतो त्यांच्या गुणाची व त्यांच्या कर्तव्याची ज्योत आपल्यात उजळली गेली पाहिजे. त्यांनी अस्तित्वात नसलेल्या वैकुंठाचे अस्तित्व नाकारून , अस्तित्वात असलेल्या वैकुंठाचे वर्णन केलेले आहे. आपण ज्या ठिकाणी राहतो त्या ठिकाणी गरीब-श्रीमंत ,उच –नीच ,पक्ष –पंथ भेद नसेल ,आपला परका ही भावना नसेल ,सर्वजण आनंदाने एकत्रित राहत असतील तर त्या ठिकाणी चहुकडे आनंदी आनंद राहिल यालाच राष्ट्रसंत तुकडोजी महाराजां नी वैकुंठ म्हटले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या मते,स्त्री शिक्षण हे स्त्रीच्या गुलामीच्या श्रृखंला तोडन्याचे प्रभावी साधन असल्यामुळे तिला शिक्षण देण्याची व्यवस्था समाजाने केली पाहिजे.यामुळेच महिलांच्या आतंरिक गुणांचा विकास होऊन समाजाचा विकास होईल. संत महात्मा बसवेश्वरांनी अनुभवमंटपाच्या माध्यमातून अनेक स्त्रियांना लिहिणे,वाचने या गोष्टी शिकविल्या म्हणून त्या काळात अनेक वचन साहित्य निर्माण करणार्या अक्क महादेवी सारख्या अनेक स्त्रिया कवयत्री बनू शकल्या. व्यक्तीच्या जीवनाशी अतिशय गरजेचा विषय म्हणजे पैसा.या पैशासाठी प्रत्येकाला काम असणे ,कामाला प्रतिष्ठा असणे या विषयी दोन्ही संतांचे विचार अगदी सामान आहेत. संत महात्मा बसवेश्वरांनी कायक (श्रम ) संकल्पनेचे महत्त्व प्रतिपादन केले. कायक म्हणजेच श्रम करने. प्रत्येकानी जीवन जगण्यासाठी श्रम करावे.श्रमातुन मिळालेल्या पैश्यातुनच आपल्या गरजा भागवाव्या असे सांगितले.हे श्रम नैतिक असावे.त्यामध्ये कसलाच अनैतिक मार्ग नसावा.जीवनात प्रत्येकानी स्वावलंबी असावे.आपले जीवन हे ईतरावर लादू नये. स्वावलंबी होऊन जगलो तर जीवनाचे महत्व कळू शकते. अथवा दुसऱ्याच्या आधारावर जगने याला अर्थच उरत नाही.असे जगने म्हणजेच निरर्थक आहे.त्याचा प्रत्येकानी तिरस्कार केला पाहिजे,असे संत महात्मा बसवेश्वर म्हणतात. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी श्रमाला विशेष महत्त्व दिले.ते म्हणतात स्वंयस्पुर्तिने समोर या,स्वत: श्रम करा,सामुदायिक श्रमदान करा असा त्यांचा आग्रह होता. श्रमाविना धड धाकट माणसाला भिक मागता खायला देणे,ऐत खाऊ लोकांना पोसने म्हणजे श्रमाची प्रतिष्टा कमी करने होय. म्हणून वृद्ध ,आजारी व्यक्ति ,लहान मूल या व्यतिरिक्त कोणालाही श्रम केल्याशिवय काही देऊ नये असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सांगतात.देश स्वावलंबी झाला पाहिजे. त्याकरिता प्रत्येक व्यक्तिमध्ये स्वावलंबनाची भावना असणे व ती कृतीत आणने आवश्यक आहे.

संत महात्मा बसवेश्वर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे वरील सर्व मुल्यात्मक विचार मानव,समाज आणि राष्ट्रहिताच्या दृष्टीकोनातून त्यांच्या काळात तर महत्वपूर्ण होतेच पण आजही त्यांच्या विचारांची प्रस्तुता आहे.म्हणून अशा महान राष्ट्र संतांचे विचार समाजात रुजवने हे तुम्हा-आम्हा सर्वांचे आद्य कर्त्यव समजुन त्याकडे पाहणे गरजेचे आहे असे मला वाटते.

**संदर्भ-**

*अशोक ग.मेनकुदले, आद्य समाज सुधारक महात्मा बसवेश्वर, महाराष्ट्र बसव परिषद,भालकी,डिसे.२०१८.*
*भगवानदास तिवारी, महात्मा बसवेश्वर व्यक्ति और धर्शन.*
*शालिनी दोडमनी ,वचन साहित्य चिंतन, महाराष्ट्र बसव परिषद,भालकी सप्टे. २०००.*
*सूर्यकांत घुघरे ,वीरशैव इतर धर्म आणि समाज, साधना प्रकाशन,कोल्हापुर,२०००*
*प्रफुल्ल टाले, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या साहित्यातील मुल्य विचार, साईं ज्योति प्रकाशन,नागपुर, जाने.२०२०.*
*व्ही.एन.स्वामी, महाराष्ट्रा तील समाज सुधारक,संत,साहित्यिक आणि थोर भारतीय विचारवंत, विद्या भारती प्रकाशन,लातूर २०११.*
*राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामगिता ,गुरुदेव सेवा मंडल ,अमरावती,ऑक्टो.२००२.*
*व्ही.बी.पाटिल, २० व्या शतकातील महाराष्ट्रा तील समाज सुधारनेचा इतिहास,के.सागर,प्रकाशन ,पुणे,२००४.*
*रघुनाथ कडवे,मानवतेचे पुजारी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संस्कार प्रकाशन ,नागपुर,२००४.*

## महात्मा बसवेश्वर: स्त्री मुक्ती चळवळीचे जनक

**पाटील वैशाली शिवराज**
*महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,मुखेड, मुखेड जि. नांदेड*

**प्रस्तावना:-** वीरशैव समाजाचे संस्थापक महात्मा बसवेश्वर यांचा जन्म कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इ.स. 1105 मध्ये झाला. जरी त्यांचा जन्म काळाबाबत मतभेद असले तरी त्यांच्या जन्म वैशाखातील अक्षयतृतीय झाल्याचे मानतात. संत बसवेश्वरांनी कर्नाटक राज्याच्या धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक, इतिहासात अमूल्य योगदान दिले आहे. बसवेश्वरांनी वयाच्या आठव्या वर्षी स्वतःची मुंज करण्याचे नाकारून समाजातील अनिष्ट परंपरेला विरोध केला. त्यानंतर गृहत्याग करून ते विजापूरातील कुंडल संगम देव येथे अध्ययन करायला सुरुवात केली. त्यांनी वेद मुनी गुरू म्हणून आदर्श गुरू लाभले. बाराव्या वर्षी त्यांनी वेगवेगळ्या भाषा, धर्म, तत्वज्ञान यांचा सखोल अभ्यास त्यांनी केले संत बसवेश्वरांनी मंगळवेढ्यातील बिजवल राजांकडे कारकुनाची नोकरी सुरू केली. अथक परिश्रम,कामावर अतूट निष्ठा यामुळे बसवेश्वरांची राजाचा कोश आधिकारी म्हणून निवड झाली. चाणक्य हुशार असल्यामुळे राज्याचे प्रधान बनले. बाराव्या शतकातील सामाजिक स्थिती पाहता देवधर्माच्या व सांस्कृतिक परंपरेच्या नावाखाली स्त्रियांची शारीरिक, मानसिक शोषण सुरू होते. स्त्रियांना समाजात व कुटुंबात सन्मानाचे, गौरवाचे स्थान नव्हते एकूणच हिंदू परंपरेत ही स्त्री परावलंबी परस्वाधीन आणि कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य नसलेली अशी संपूर्ण वंचित शोषित अशी होती. तिचे जगणे मरणे पतीच्या कृत्वावर अवलंबून होते. पती मरण पावला की ती सती जाणे किंवा मरण यातना भोगत स्वतःचे अस्तित्व संपत नाग्र्यपणे जगणे एवढेच तिच्या पदरी होते. धार्मिक कर्मकांडात तिचा सहभाग मर्यादित स्वरूपाचा होता. अनेक बाजूंनी तिचे जीवन दडपून टाकले गेलेले दिसते. स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता अशा सामाजिक परिस्थितीत समाजात व धार्मिक कार्यात पुरुषांइतकेच स्त्रियांना ही स्थान आहे. अशी ठाम भूमिका बसवन्नाची होती. या सर्व शिवशरनानी या संदर्भात अत्यंत सकारात्मक भूमिका विचारपूर्वक स्वीकारलेली होती. हिंदु धर्मात तर स्त्रीला भलताच विरोध कुठल्याही वैदिक धर्म पिठाची स्त्री ही अच्चुत मानकरी नाही. कुठल्या धर्मात स्त्रीला खऱ्या अर्थाने समान हक्क आहेत. स्त्री व पुरुष यांच्या समानतेचे विचार प्रकट करणारी महात्मा बसवेश्वर सारखे एकही व्यक्ती आजवर झालेली नाहीये. स्त्री व पुरुष भिन्न नाहीत ही शिकवण प्रथमता बसवेश्वरांनी नीच दिली. स्त्रियांना समानतेचे हक्क दिले. स्त्रीलाही धर्मगुरू होता येते हे त्यांनी दाखवून दिले. 'कुंकू' हे फक्त शोभेचे सौंदर्य वाढवण्याचे साधन आहे. स्त्रिया स्त्रीचे खरेच सौभाग्य म्हणजे आत्मा होय. हे त्यांनी प्रतिपादन केले. बाळपण रजस्व म्हणजे घाण या अवस्थेत स्त्रीला शिवू नये. सुतक पाळणे आवश्यक आहेत इत्यादी अनेक गोष्टी बसवेश्वरांनी कडून टाकल्या आहेत. आजच्या आधुनिक जगात महात्मा बसवेश्वर यांचे विचार खरोखरच पूजनीय आणि अनुकरणीय वाटतात. बसवांन्ना आणि ज्योतिराव यांच्यात साम्य दर्शवणाऱ्या या घटना होत. महात्मा बसवेश्वरांनी आपली थोरली बहीण अक्का नागाई हिस विद्यारंभ करणारा उपनयन संस्कार करा म्हणून आई-वडील आणि ब्राह्मण पंडितांना सांगितले परंतु स्त्री शुद्ध मानलेल्या तत्कालीन व्यवस्थेने हे नाकारले. बसवांन्नानी स्त्री-पुरुष मतभेद करणारा हा मुंज संस्कार स्पष्टपणें नाकारला. परिणामी त्यांना ग्रह त्याग करावा लागला असाच प्रसंग जोतीरावांच्या जीवनातही घडला आहेज्योतीराव शूद्रांच्या शिक्षणाचा आग्रह धरत होते हे ठीक परंतु त्यांची पत्नी सावित्रीबाई शिकून जेव्हा स्त्रियांना शिक्षण घेऊ लागल्या तेव्हा पुरोहितांच्या कान भरणी मुळे वडील गोविंदरावांनी ज्योतिरावांना घराबाहेर काढले हा त्याग असामान्य आहे म्हणूनच या त्यागातून स्त्री कुळाचा उद्धार झाला.

**स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नती चे ध्येय:-** बसवन्ना आणि ज्योतिराव या उभय महात्म्याने स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नती चे ध्येय मनाशी बाळगून कार्य केले आहे. स्त्रियांवरील अन्याय कारक अनिष्ट रूढी परंपरा यांच्या विरोधात त्यांनी

जोरदार आवाज उठवला सती प्रथा, केशव पण यावर बंदी आणली. स्त्री ही माया शूद्र अपवित्र अस्पृश्य मोक्ष मार्गातील धोंड नसून ती प्रत्यक्ष महादेवी आहे हा बसू अण्णांचा दृष्टिकोन होता असाच उदात व मानवीय दृष्टिकोन बाळगून महात्मा फुले यांनी स्त्री उत्थान घडवून आणले. बसवांन्नानि स्त्रिया विषयावर म्हणजे विधवांच्या पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. वेशांना समाज प्रवाहात आणून सामाजिक प्रतिष्ठा मिळवून दिली.बसवन्नानी वेश पुत्र असो दासीपुत्र असो शिव दीक्षा प्राप्त केल्यानंतर साक्षात शिव मानून त्यांचे पादोदक प्रसाद सेवन करावे असे म्हटले आहे. विधवा वेश्या निराधार स्त्रियांना उभयंतानी दिलेला सामाजिक आधार अत्यंत क्रांतिकारक आहे बसवन्ना यांनी 16000 वेश्यांचा उद्धार केल्याचा उल्लेख पुराणात येतो. ज्ञान योग,कर्म, भक्ती, पूजा. उपासना, जप, तप, ध्यान, आराधना, समाधी, भजन, कीर्तन, दान आधी सर्व धार्मिक अनुष्ठान ही व्यक्ती चैतन्याला विश्व चैतन्याशी एकरूप करण्याची श्रेष्ठ साधने आहेत.

**स्त्रीजीवन विषयक सुधारणा:-** महात्मा बसवन्ना स्त्रियांवर होणारा अन्याय ससेहोलपट थांबवण्यासाठी स्त्रियांच्या जीवनामध्ये आमूलाग्र परिवर्तनाची आवश्यकता आहे असे वाटले म्हणून त्यांनी स्त्रियांची प्रगती व जीवनाचा विकास यावर भर दिला. महात्मा बसवण्णा यांनी सुरू केलेल्या चळवळीत महिलांना समान स्थान होते यासंदर्भात बाबासाहेब आंबेडकर ,महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे असे अनेक समाजसुधारकांनी स्त्रियांच्या राजकीय सामाजिक धार्मिक व आर्थिक हक्काबद्दल प्रयत्न केले परंतु धार्मिक क्षेत्रात स्त्रिया पुरुषाइतक्याच हक्कदार आहेत. आजही स्त्रियांवर जेथे अनन्वित अत्याचार होतात तेथे त्याकाळी बसवांन्ना आणि स्त्रियांना गुलामगिरीतून बाहेर काढण्यासाठी केवढा प्रखर लढा दिला असेल याची कल्पना येते. सर्व क्षेत्रात स्त्रिया यशस्वी होऊ शकतात हे सिद्ध झाले. काही क्षेत्रात तर त्या पुरुषांपेक्षा काकणभर सरस ठरतात हेही सिद्ध झाले आहे. महात्मा बसवन्ना यांनी हे जाणले होते म्हणूनच स्त्रीमुक्तीची चळवळ त्यांनी सुरू केली त्यात ते यशस्वी झाले. म्हणजेच महात्मा बसवन्नानि कित्येक युगापासून अनेक प्रकारच्या बंधनात ठेवलेल्या स्त्रियांना समाज समता, स्वातंत्र्य व सामाजिक अधिकार मिळवून दिले म्हणून त्यांचे हे कार्य स्त्री जगताच्या दृष्टीने क्रांतिकारक ठरलेले दिसते. महात्मा बसवान्नानी आपले उदात्त विचार लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी बसवकल्याण जिल्हा बिदर येथे अनुभव मंटपाची स्थापना केली. व मानव मुक्तीचा मार्ग त्यांनी या अनुभव मंटपातून दिला. अनुभव मंटपाच्या जडणघडणीत या स्त्रियांना खूप मोलाचा वाटा दिला. अक्कामहादेवी चा सहभाग तर हा या चळवळीचा वैचारिक आधार प्राप्त करून देणारा ठरतो. अनेक शरणाच्या पुरुषांच्या बायका अनुभव मंटपाच्या चर्चेत भाग घेऊन ठामपणे आपले मत मांडत असत त्यांचे म्हणजे सर्वजण कोणताही भेदभाव न करता ऐकून घेत असत. लिंगभेदावर आधारित कोणत्याही प्रकारचा भेदभाव बसवांन्ना व त्यांच्याशरनानी मान्य नव्हता. या अनुभव मंटपात 770 सभासद होते यातील 700 शरण पुरुष आणि 70 शरण स्त्रिया होत्या. या 70 शरण पैकी 34 शरणीनी वचन रचना केलेली आहे. यामध्ये अक्का महादेवी मोळीगे महादेवी आय्दाक्की, लक्काम्मा ,मुक्ताएक्का ,रेव्मा ,सोम्मा, गंगाबिका, नीलंबिका, गणिका इत्यादी कितीतरी ज्ञात-अज्ञात शरनानी कन्नड वचने साहित्य समृद्ध केलेले आहे.

**बालविवाहास विरोध व पुनर्विवाहास मान्यता:-** महात्मा बसवण्णा यांनी बालविवाह विरोध करून स्त्रीमुक्तीची संकल्पना मांडली. आपल्या अनुयाना यांना बालविवाह करण्यापासून परावृत्त केले. त्यांनी विधवा विवाहास मान्यता दिली असे पुनर्विवाह स्वतः घडवून आणून समाजासमोर एक आदर्श ठेवला. तो पहिला आंतरजातीय विवाह होता. हरळ्या या चांभाराचा मुलगा शीलवंत आणि माधुवय्या ब्राह्मणाची मुलगी कलावती यांचा विवाह बसवांना यांनी लावून दिले. पती निधनानंतर पत्नीने सती जाणे, केशवपन करणे ,पांढरे वस्त्र परिधान करणे इत्यादी बाबी बसवांना मान्य नव्हत्या. स्त्रियांचे गौरव करताना बसवांन्ना त्यांच्या एका वचनात म्हणतात की

" श्री चे दिव्वे रूप पहा रूप पहा पुराताण्यानो
बाल्याचे मुग्ध रूप पहा पुराताण्यानो"
स्वतःमध्ये स्वतः निश्चळ वर्नातीत आहे
या कुंडलसंगम देवताचे व्यक्तिमत्व
माझ्या महादेवी अक्कत आहे"

म्हणजे पुरुषां इतकेच आणि पुरुषां सारखेच आनंदी कर्त्यवे संपन्न जीवन जगण्याचा स्त्रियांना अधिकार आहे.

**आंतरजातीय विवाहास पुढाकार:-**पुरातन काळात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, या तिघांचे सुधारण सोबत रोटी-बेटी व्यवहार बंद असलेला दिसतो. बाराव्या शतकापर्यंत जात सोडून दुसऱ्या जातीतील मुला-मुलींशी विवाह करणे म्हणजे जात भेद सामाजिक गुन्हा मानला जात होता यावेळी बसवांन्ना जाती मुक्तीचे कार्य अनुभव मंटपात पार पाडत

होते या काळात अनुभव मंटपातील सर्व सदस्यांना माणूस ही एकच जात आहे अशी शिकवण महात्मा बसवण्णा यांनी शिकवण देत असत.

**स्त्रियांची सुतका पासून मुक्ती:-** हिंदू धर्मामध्ये विटाळ सोवळेओवळे या संकल्पना परिचित असलेल्या दिसतात सुतके सोवळे-ओवळे पाळणे हे अस्पृश्यांचे प्रतीक असलेले दिसते. या सोहळ्या ओव्यात, विटाळा च्या माध्यमातून अस्पृश्य स्त्रियांवर समाज आणि कुटुंबातील दुय्यमता लादण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. आजही हिंदू समाजात एखाद्या बाळाला जन्म दिला स्त्री रजःस्वतःला झाले तर विटाळ मानला जातो. एखाद्याचा मृत्यू झाल्या तर काही दिवस सुतक पाळला जातो. बसवांना आपल्या एका वचनात सांगतात की गुरुद्वारे लिंग धारणा पंचाचारचार व वरण अष्ट वरन पालनाने भाऊ बंधन पुनर्जन्म विटाळ सुतक यापासून लिंगायत व्यक्ती मुक्त होतो असे सांगितले आहे.

**अस्पृश्य शिवशरण यांचा चळवळीत सहभाग:-** जातिभेद विरुद्ध चळवळीच्या आंदोलनातील सर्व शरणांनवर प्रभाव पडलेला दिसतो भेद रहित सर्व शरण शरणी अनुभव मंटपात येत असतात त्यांच्यावर बसवांन्ना यांच्या विचारांचा प्रभाव असलेला दिसून येतो. महात्मा बसवन्ना आणि अनुभव मंटपाच्याच्या माध्यमातून स्त्रियांच्या स्वलंबन यासाठी प्रयत्न केलेले दिसतात. यामुळे लघु उद्योग व्यवसाय याचे ज्ञान देण्याचा प्रयत्न सुरू केला याबाबत मल्लेश्वरी मुंगी म्हणतात कायदा केंद्र उद्योग स्थळे स्थापन करण्यात आलेली होती. हे अशा प्रकारे महात्मा बसवन्ना आणि स्त्रियांच्या मुक्तीची चळवळ उभी केली या चळवळीत अनेक स्त्रियांना सहभागी नोंदविला अक्का महादेवी मोळीगेमहादेवी, लक्कंमा, मुक्ताएक्का, रेवामा, सोमय्या,निलाम्बिका इत्यादी कितीतरी ज्ञात-अज्ञात शरण यांनी कन्नड वचन साहित्य समृद्ध केलेले आहे. या शरणी स्त्री वचकार सर्व जातीतून, व्यवसायातून व आर्थिक परिस्थितीतून आलेल्या होत्या. त्यांच्यात जागृती घडून साक्षर केले आणि त्यांना प्रतिष्ठा मिळवून दिली. समस्त स्त्रियांना ताठ मानेने जगणे जगण्याला वाघायला शिकवले तटस्थ वृत्तीने समाजाकडे पाहायला शिकवले स्वाभिमान, श्रमनिष्ठा, स्त्री साक्षरता ,बालविवाहाला विरोध ,पुनर्विवाहाला प्रोत्साहन, आंतरजातीय विवाहाला पाठिंबा, स्त्रियांची वाद-विवाद परीससंवाद हे उपक्रम बसवण्णा यांच्या धोरणांच्या एक भाग होते. स्त्री आणि पुरुष यांचे सहजीवन म्हणजे समृती होय समवृत्ती मध्ये स्त्री ही पुरुषाला समान मानले म्हणून महात्मा बसवन्ना स्त्री-पुरुष चळवळीचे जनक म्हणून संबोधले गेलेले आहे. अशाप्रकारे दासीपुत्र अथवा वेश्या पुत्र हे लिंग दिक्षणे सर्व समान होतात त्यातून प्रत्यक्ष शिव म्हणून वंदन करावे.

**संदर्भ:-**

*घुगरे सूर्यकांत: वीरशैव व इतर धर्म आणि समाज प्रयोग क्र. 165*
*लिंगडे जयदेवीताई: शिवयोगी सिद्धरामेश्वर यांची निशक वचने प्रो क्र. 15*
*अजू जुबरे: रोहन पृष्ठ क्र. 29*
*डॉ. दे. जोरे घोडा महात्मा बसवेश्वर डॉक्टर आंबेडकर पृष्ठ क्र. 14*
*डॉ. सचिदानंद बिचेवार: लिंगायत ऐतिहासिक मागोवा पुष्ट क्र. 57*
*हर्डेकर मंजप्पा: बसव बोधामृत पृष्ठ क्र. 9*

---

**सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा बसवेश्वर यांच्या कार्याचा आढावा...**

**बोंबले राजू बालासाहेब** (M.A. M.LIB.SET/NET)
*ग्रंथपाल, हुतात्मा जयंतराव पाटील महाविद्यालय हिमायतनगर.*

---

*सार*

*भारतासारख्या लोकशाही देशाचा विचार केला तर या देशा चा इतिहास खूपच रंजक आणि गौरवशाली राहिलेला दिसून येतो. अशा भारतासारख्या देशांमध्ये अनेक समाजसुधारक, युगपुरुष होऊन गेले त्यामध्ये म्हणजे महात्मा बसेश्वर महाराज अशा महापुरुषाची आजही या जगाला गरज भासत आहे. कारण त्यांनी केलेले कार्य हे सहजासहजी नव्हते अत्यंत पराक्रमी ज्ञानरूपी असे तत्त्वज्ञान त्यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिली. असेच एक महापुरुष 900-वर्षांपूर्वी होऊन गेले ते म्हणजे विश्वगुरू जगत ज्योती महात्मा बसवेश्वर.*

**पार्श्वभूमी** :- महात्मा बसेश्वर यांचा जन्म 1905 मध्ये मैसूर राज्यातील विजापूर जिल्ह्यात बागेवाडी या तालुक्याच्या गावी झाला. या गावाला बसवण्याची बागेवाडी असेही म्हणतात. वडीलाचे नाव मादिराज आणि आईचे नाव मादलाबीका होते. भावाचे नाव देवराज व बहिणीचे नाव नागमा होते. वयाच्या आठव्या वर्षी ज्ञान मिळवण्यासाठी ते कृष्णा व मलप्रभा या नद्यांच्या संगमावरील कुंडल संगम येथे गेले. ते पशुपालन सेवा चे प्राचीन अध्ययन केंद्र होते. सुमारे बारा वर्षे वास्तव्य केलेले आढळून येते. त्यांनी वेगवेगळ्या भाषा धर्म तत्वज्ञान इत्यादीचा अभ्यास केला. त्यांचा विवाह त्यांच्या मामाच्या मुलीशी झाला. तेव्हा ते सोलापुरातील मंगळवेढा येथे आले. इथे जवळपास 31 वर्षे राहिले असे आढळून येते.

- सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा बसवेश्वर यांच्या कार्याचा आढावा...

* जगातील पहिली संसद (भारतीय लोकशाही संस्थेची स्थापना) - अनुभव मंटप

महात्मा बसवेश्वरांनी अठरापगड जाती धर्मातील स्त्री-पुरुषांसाठी वैचारिक चिंतन आणि संवाद करण्यासाठी अनुभव मंटप नावाचे सामाजिक-सांस्कृतिक विचारपीठ बाराव्या शतकात स्थापन केले. इंग्लंडच्या पार्लमेंटच्या अगोदर महात्मा बसवेश्वरांनी ही संसद भरविली म्हणूनच जगातील पहिली संसद होण्याचा बहुमान अनुभव मंटपाकडे जातो. या अनुभव मंटपात सर्व धर्माचे लोक एकत्र येऊन सामाजिक अडचणीवर कशी मात करावी. यावर चर्चा करण्याचे कार्य चालत असे. बसवेश्वरांनी समाजातील रूढी परंपरा वाईट चालीरीती यांचा विरोध करून समाजाच्या हितकारक गोष्टी ची अंमलबजावणी करणारी नवीन यंत्रणा तयार केली. बाराव्या शतकातील आदर्श प्रशासक समतेचे प्रणेते म्हणून महात्मा बसवेश्वरांना ओळखले जाते. सर्व प्रथम लोकशाही मूल्यांची सुरुवात ही महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात अनुभव मंटपाच्या माध्यमातून केल्याचे आढळून येते. वाचन साहित्यातून त्याच प्रमाणे दिसून येते. एकूणच त्यांनी वाचन साहित्यात समता, न्याय, बंधुता ,एकात्मता तसेच स्वातंत्र्य अधिकार नियंत्रण व शिस्त सुशासन आणि प्रशासन आदी बाबींवर सखोल विवेचन केले आहे. सद्यस्थितीत शासन व प्रशासनाला या विचारांचा अवलंब केल्यास निश्चितच देशात निर्माण होणारी विषमता भेदभाव व जातीय राजकारण इत्यादी समस्या व पायबंध आळा घालता येईल. परिणामतः चांगले सुशासन व प्रशासन व्यवस्था निर्माण होईल.

* **अंधश्रद्धा निर्मूलनाचे पुरस्कर्ते :-** बाराव्या शतकामध्ये संपूर्ण जगच दैववादाच्या आहारी गेले होते. तेव्हा त्यांनी दलितांना समान संधी द्या जातीभेद, वर्णभेद, लिंगभेद करू नका. कोंबडे-बकरे कापू नका. सो-कष्टावर जगा. भिक्षा मागून खाऊ नका. काम करा. कष्ट करा. हे त्यांच्या कायक कैलास सिद्धांतामध्ये त्यांनी सांगितले आहे. समाज सेवा करा. पर्यावरणाचे रक्षण करा. ज्योतिष्य भविष्य वास्तुशास्त्र पाहू नका. होम-हवन करु नका. अस्पृश्यता पाहू नका. मांसाहार करू नका. व्यसनाधीन बनवू नका. चोरी लबाडी करू नका. खोटे बोलू नका. अशा आपल्या वाणीतून त्यांनी समाजप्रबोधन केले. महात्मा बसवेश्वरांनी सर्वच दिवस आणि रात्री शुभ आहेत. कर्मकांड वर्ज माना.

म्हणजेच अंधश्रद्धा निर्मूलन व अनिष्ट चालीरीतींचे खंडनहोईल. या चळवळीचे आद्य प्रवर्तक महात्मा बसवेश्वर होते हे मान्य करावेच लागेल.

* **देवालयापेक्षा दिहालय श्रेष्ठ :-** देवालयापेक्षा देहालयाचे श्रेष्ठत्व प्रतिपादन करणारा मध्ययुगातील सर्वश्रेष्ठ संत म्हणून महात्मा बसवेश्वर यांच्याकडे पाहिले जाते. ईस्टलिंगाच्या रूपाने ईश्वर आपल्या शरीरावरच धारण केल्यामुळे पूजेची जरुरी नाही. असे त्यांनी सांगितले होते. देहालयासारखे पवित्र देवालय नाही. कारण देवालय स्थिर असते. तर दिहालय चलीत असते. म्हणून आपल्या एका वचनात ते म्हणतात...

सधन बांधिती देवालय !
देवा मी गरीब करू काय ? !!
देहाची माझे मंदिर !
पायच माझे देवळाचे खांब !!
मस्तक माझे देवळाचा कळस !
स्थावर पावे नाश !!
जंगम हे अविनाश !
परीसावे बा कुंडलसंगम देवा !!

जोपर्यंत आपल्या देहात प्राण आहे. तोपर्यंत देवालयापेक्षा देहालयाच्या गाभाऱ्यात देव जास्त सुरक्षित राहू शकतो. मंदिर शुद्धी पेक्षा अंतःकरणाची शुद्धी अधिक महत्त्वाची असते. "तुझे आहे तुजपाशी परी तू जागा चुकलासी" त्यांची खरी जाणीव महात्मा बसवेश्वर यांनी करून दिली आहे. त्यांनी देवालयापेक्षा पेक्षा देहालयाचे श्रेष्ठत्व प्रतिपादन केले आहे.

* **कायक वे कैलास आणि दासोह संकल्पना :-** महात्मा बसेश्वर यांनी समाजातील गरिबी, विषमता दूर करून आर्थिक समृद्धता निर्माण करण्यासाठी त्यांनी समाजाला कायक वे कैलास आणि दासोह अशा दोन क्रांतिकारक संकल्पना दिल्या. मनापासून केलेले प्रत्येक काम हीच खरी शिवा उपासना आहे. त्यांच्या कायक वे कैलास सिद्धांताचे सार होय. शारीरिक श्रम वा व्यवसाय हाच स्वर्ग कैलास आहे. कोणत्याही प्रकारचे शारीरिक श्रम हे हीन दर्जाचे नाहीत. असे सांगून त्यांनी श्रमप्रतिष्ठा वाढविली. कायक हे केवळ पैशासाठी सांगितलेले नाही. तसेच ते कर्म सिद्धांतावर आधारलेले नसून. त्याच व्यक्तीला व्यवसाय स्वातंत्र्य देण्यात आलेले आहे. श्रमप्रतिष्ठा बरोबर गरजेनुसार संपत्तीची विभागणी करावी. ही विचारसरणी दासहो या सिद्धांत मध्ये मांडल्यामुळे बसवेश्वरांची वृत्ती समाजवादी, समतावादी होती असे, दिसून येते दासहो सिद्धांतात आपण कमावलेले धन केवळ स्वतःपुरते न वापरता त्यांचा समाजासाठी उपयोग करण्याची संकल्पना त्यांनी मांडली. कायक वे कैलास श्रम- हाच स्वर्ग होय हे महात्मा बसवेश्वर यांचे प्रसिद्ध वचन आहे. कायक याचा शब्दशः अर्थ देहासी निगडीत ते ते सर्व असा होतो. काया म्हणजे देह किंवा शरीर अंगमेहनत किंवा व्यक्तीने केलेले कुठलेही कार्य असा त्याचा अर्थ होतो. दासहो मध्ये सचोटीने व प्रामाणिक पणे धन संपत्ती कमवावी आणि नंतर संपत्ती उरली तर तिचा विनियोग गुरु, लिंग, जंगम यांच्या सेवेसाठी करा. अतिरिक्त संपत्तीच्या वाटपाची कल्पना दासहो सिद्धांतामध्ये त्यांनी मांडली आहे. म्हणजे कमाविलेल्या संपत्तीचे लोकांमध्ये वितरण करणे होय.

* **क्रांतिकारक समाजसुधारक :-** बसवेश्वरांनी केलेल्या सामाजिक सुधारणा क्रांतिकारक स्वरूपाच्या होत्या. त्यांनी पुरस्कृत केलेली आदर्श तत्त्वे प्रत्यक्ष व्यवहारात व आचरणात आलेली होती. सर्वसामान्य लोकांना त्यांची शिकवण समजली होती. आणि त्यामुळेच असंख्य ते लोक त्यांचे अनुयायी झाले होते. कर्नाटकच्या इतिहासत हीच क्रांतिकारी चळवळ म्हणून लक्षात घेतली जाते. एकट्या एवढ्या मोठ्या सामाजिक व धार्मिक क्रांतीचा प्रणेता

असलेल्या बसवेश्वर महाराज नम्रता भाव असलेल्या व्यक्तिमत्व म्हणून माणूस होता. म्हणुन तो एका वचनात म्हणतो की....

माझ्याहून नीच नाही कुणीही,
शिवभक्ता हून श्रेष्ठ नाही कोणीही,
तुझे चरण पहा
हे कुंडल सगमेश्वरा
हीच माझी परीक्षा होय...

* संदर्भसूची :-

*युग प्रवर्तक महात्मा बसवेश्वर- संपादक पाटील भीमराव, लातूर*
*यादव कालीन महाराष्ट्र- पानसे मू. , मुंबई*
*संत वाड्मयाची सामाजिक फलश्रुती- सरदार ग. ,पुणे*
*महात्मा बसवेश्वर यांचा कायक सिद्धांत- पाटील भीमराव ,किणीकर*
*महात्मा बसेश्वर- रोडे सोमनाथ ,लातूर*
*WWW.GOOGLE.COM*

## महात्मा बसेश्वर यांचा "कायक वे कैलास" सिद्धांताचे महत्व...

**वाकडकर महेश गणपतराव** (M. Sc .SET/NET)
*प्रा.रसायनशास्त्र विभाग प्रमुख, हुतात्मा जयंतराव पाटील महाविद्यालय हिमायतनगर*

***सार***

*बसेश्वर यांच्या मते प्रत्येक व्यक्तीने आपला चरितार्थ चालविण्यासाठी कोणता तरी व्यवसाय केला पाहिजे. प्रामाणिकपणे कार्यरत असणे या गोष्टीला त्यांनी अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले आहे. महात्मा बसेश्वर हे खऱ्या अर्थाने समताधिष्ठित जीवनशैलीचे प्रतिपादन करणारे कालमार्क्सच्या अगोदरचे प्रमुख प्रवक्ते म्हणून लक्षात घेतले पाहिजेत. श्रम केल्याशिवाय भाकरी खायच्या कोणालाही अधिकार नाही. हे सूत्र बसवेश्वरांनी कालमार्क्सच्या पूर्वी सातशे वर्ष अगोदर समाजासमोर मांडले होते. "श्रम हाच साक्षात कैलास आणि स्वर्ग होय". अशी अत्यंत अर्थ पूर्वक व्यापक भूमिका त्यांनी मांडली.*

पार्श्वभूमी :- मनापासून केलेली प्रत्येक काम हीच खरी शिव उपासना हे त्यांच्या कायक वे कैलास सिद्धांताचे सार होय. शारीरिक श्रम व व्यवसाय हाच स्वर्ग कैलास आहे. कोणत्याही प्रकारचे शारीरिक श्रम हे हीन दर्जाचे नाहीत. असे सांगून त्यांनी श्रमप्रतिष्ठा वाढविली कायक हे केवळ पैशासाठी सांगितलेले नाही. तसेच ते कर्म सिद्धांतावर आधारलेली नसून त्यात व्यक्तीला व्यवसाय स्वतंत्र देण्यात आलेले आहे. म्हणूनच नेहमी सतत काहीतरी कार्य,काम करीत रहा असे संत बसवेश्वरांनी सांगितले आहे.

- महात्मा बसेश्वर यांचा "कायक वे कैलास" सिद्धांताचे महत्व...

कृषिकर्म हेचि कायक, पिकवितो धरणी
तनु मन श्रमवुनी, धन-धान्य अनुनी
दासहो करी, त्या परम सदभक्ताचे
दर्शन घडवा तयाच्या चरणाचे
शुद्ध तयाचे तनु-मन
अन बोल तयाचे पावन
करणीही शुद्ध हेची कारण !
करी तयासी उपदेश, तोची सद्गुरू परमेश
ऐशा सदभक्ताचे निवास मानुनी कैलास
करितो लिंगार्चन, तो जंगम जगतपावन
ऐशाप्रती विश्वास ठेवीनी
नमो नमो मने मी माथा झुकुवोनी
कुंडलसंगमदेवा !!

वरील वाचनाद्वारे महात्मा बसवेश्वरांनी शरीरा श्रमाचे किंवा श्रमिकाची तसेच शेतकऱ्यांचे महत्त्व पटवून दिलेले आहे. जो कोणी नित्य कायक करणारा आहे. तो कोणीही असो, कामगार, कर्मचारी वर्ग, व्यवसायिक, शेतकरी आपल्या शारीरिक कष्टाचे घाम गाळून शेतातली माती भिजवितो आपल्या देहश्रमासाठी कष्ट करतो. काळाया मातीची सेवा करतो. मशागत करतो. स्वतःच्या पोटासाठी तन-मन व काया श्रमपूर्वक झीजवतो, श्रमाची पूजा, शिवपूजा म्हणून आत्म समाधानाने आपल्या झोपडीत राहतो. ही झोपडीच खरोखर कैलास आहे. असे मानून लिंगार्चना करतो तोच खरा जंगम आहे. त्यांना देव मंदिरात दिसला नाही मंदिराचा दगड घडविणाऱ्या मूर्तिकारांच्या रुपात देव दिसला. कायक करणाऱ्याला त्याच्या कायकातच देव भेटतो. त्याच्या सोबत झोपडीत देव राहतो. साक्षात

जीवात शिव आहे. अवघे जीव ची शिव तर मंग माणूसच महादेव आहे. महात्मा बसवेश्वरांनी कष्ट केल्याशिवाय पर्याय नाही, मग तो कुणीही असो कायक काम करावेच लागेल. आसे त्यांनी सर्व जनतेला उपदेश केलेला आहे.

शरण निद्राधीन असता जप पहा
शरण उठूनी बैसता शिवरात्र पहा
शरण पाउले टाकीत शेत्र पहा
शरण बोल बोलता ते शिवतत्त्व पहा
कुंडल संगमाच्या शरणाची
कायाच कैलास पहा

अशाप्रकारे नित्य कायक करणाऱ्या शरणाची झोपच जप आहे. त्याचे चरण जिथे पडतील ते शेत, घर, गाव पवित्र क्षेत्र होईल. अशा शरणाचे आचार-विचार शिवतत्त्व आहेत. कायम निष्ठ अशा आमच्या शरणाची कायाच देहच साक्षात कैलास आहे. देहच देवालय-शिवालय आहे. अशा व्यक्ती केंद्री व कायक केंद्री विचार महात्मा बसवेश्वरांनी आपल्या वचनातून प्रगट केलेली आहे. कायक निष्ठतेचा विचार महात्मा बसवेश्वरांनी, नंतर संत गाडगेबाबा यांनी सुद्धा मांडलेला आहे . संत गाडगेबाबांना खराटा व टोपलीद्वारे केल्या जाणाऱ्या स्वच्छतेच्या तत्वज्ञानात देव दिसला. त्यांनी मंदिरात देव पाहिला नाही तर ग्रामस्वच्छतेच्या कायकत देव पाहिला. महात्मा बसेश्वराचा कायक सिद्धांत हा जीवन मूल्य सिद्धांत होता. समाजसेवा करण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे आपला नित्य कायक आहे. आपण आपला नित्य कायक करणे हीच समाजसेवा आहे. कारण प्रत्येकाच्या कायका मुळे समाजाच्या नाना विध गरजा भागविल्या जातात. कायक दोन प्रकारचे असतात एक "शारीरिक श्रम" व दुसरा "बौद्धिक श्रमाचा" भारतात आज बौद्धिक श्रमाची बेकारी आहे. परंतु शारीरिक श्रमाची बेकारी नाही. शहरात एकीकडे लोकांच्या हातांना काम नाही. दुसरीकडे ग्रामीण भागात शेतात काम करायला मजूर नाहीत. ही विसंगती आहे आजच्या युवक शरीर श्रमापासून दूर गेलेला आहे. त्यासाठी महात्मा बसवेश्वरांच्या कायक सिद्धांताचा प्रसार जन माणसापर्यंत झाला पाहिजे. ही काळाची गरज आहे असे सांगण्याचा प्रयत्न थोडक्यात केलेला आहे.

• महात्मा बसेश्वर यांच्या कायक सिद्धांताची प्रस्तुतता... श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी कायक वे एक कैलास या जीवन मंत्राचा प्रसार करणे आज काळाची गरज बनली आहे. कायक वे कैलास हा जीवन मंत्र कुण्या एका जाती, धर्म प्रांत किंवा देशा पुरता मर्यादित नसून. अखिल मानव व विश्व कल्याणाचा हा आचारमंत्र आहे . प्रत्येक व्यक्ती कुटुंब, समाज व देश विश्व विकासासाठी कायक सिद्धांताची कृतिशीलता आवश्यक आहे. असे सिद्धांतामध्ये बसवेश्वरांनी सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.

- भारतासारख्या लोकशाही देशाचा विकास करण्यासाठी कायक सिद्धांत म्हणजे कामा शिवाय पर्याय नाही. कष्ट करावेच लागतील. तरच भारत 2024 पर्यंत महासत्ता होण्याची स्वप्न पाहू शकतो.
- सामाजिक राजकीय सांस्कृतिक व क्रीडा इत्यादी क्षेत्रांमध्ये नाविन्यपूर्ण काम सत्यता पडताळून केले पाहिजे.
- 2021 मध्ये आपण जगत आहोत या मध्ये अंधश्रद्धा, जादूटोणा या गोष्टीवर विश्वास ठेवला नाही पाहिजे कायम कायक सेवा, काम केले पाहिजे.
- शारीरिक श्रम व बौद्धिक श्रम हे कायक दोन्ही प्रकारचे श्रम सर्व व्यक्तीने केलेच पाहिजे
- महात्मा बसवेश्वरांनी खरोखरच बाराव्या शतकांमध्ये कायक अर्थ अगदी सरळ सोपा पद्धतीने सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. आणि आपण सर्वांनी तो आत्मसात केला पाहिजे प्रत्येकाने शारीरिक काम असो, या बौद्धिक काम असो हे केलेच पाहिजे.
- कायका मध्ये बसवेश्वरांनी सत्य बोला एकनिष्ठ रहा व नेहमी काम करीत राहा असा संदेश दिलेला आहे.

संदर्भसूची :-

*महात्मा बसवेश्वर यांचा कायक सिद्धांत - पाटील भीमराव ,किणीकर*
*महात्मा बसेश्वर- रोडे सोमनाथ ,लातूर*
*संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती - सरदार ग. ,पुणे*
*युग प्रवर्तक महात्मा बसवेश्वर- संपादक पाटील भीमराव, लातूर*
*यादव कालीन महाराष्ट्र - पानसे मू. , मुंबई*
*WWW.GOOGLE.COM*

# संत ज्ञानेश्वर व महात्मा बसवेश्वर यांचे तत्वविचार

**डॉ. आहेर दिलीप किसन**
*मराठी विभाग, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड, ता.मुखेड जि. नांदेड.*
*मोब.नं.९८९०८३९५२१*

महाराष्ट्र ही संतांची आणि विरांची भूमी आहे.वीरत्व आणि वैराग्याच्या परंपरा येथे एकत्र नांदल्या. मराठीची साहित्यगंगा प्रवृत्ती आणि निवृत्तीच्या काठाकाठाने वाहिली. कर्मकांडाविरुद्ध बंड, जनसामान्याविषयी कळवळा, भाषेचा ज्वलंत अभिमान, ' दुरितांचे तिमिर नष्ट करून ' ज्ञानाची पव्हे उघडण्याचा प्रयत्न सर्व धर्मसंप्रदायातील संतांनी केला आहे. मराठी संत हेच मध्ययुगीन महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक ऐक्याचे खरे शिल्पकार होत. बाराव्या शतकात ज्ञानेश्वरांनी 'भागवत' धर्माचा पाया घालून वारकरी संप्रदायाचा कायापालट घडवून आणला. आणि महाराष्ट्रात धार्मिक व सामाजिक प्रबोधनाची मुहूर्तमेढ रोवली. एकंदरीत महाराष्ट्राच्या संस्कृतीचीच नव्हे तर, मराठी साहित्याची ही जडण-घडण करण्यात निरनिराळे संप्रदाय आणि पंथीयांनी फार मोठा हातभार लावलेला दिसतो. कित्येक संप्रदाय मध्ययुगापूर्वी अस्तित्वात होते तर, काहीचा उदय मध्ययुगात झालेला आहे.आपआपल्या सांप्रदायिक परंपरांचे सातत्य कायम ठेवण्याच्या प्रयत्नात साहित्याचेही भरण-पोषण केलेले दिसते. या सर्वांचा परिणाम महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वातावरणास बळकटी आणण्यास महत्त्वपूर्ण ठरला आहे. तत्त्वप्रणाली आणि साधना यांच्या बाबतीत सर्व संप्रदायात एकवाक्यता आढळत नसली तरी सर्व पंथांची समान अशी उद्दिष्ट्ये होती. धर्माचे स्वरूप साधना आणि आचरण सर्वांना सहजगत्या करता येईल. अशा स्वरूपाचे होते. या सर्व पंथाचा एक कटाक्ष होता. या समान उद्दिष्टामुळे समाजात विविध पंथाच्या विचारसरणीचा प्रसार झाला. या अनुषंगाने महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाचा पाया घातला गेला. आणि या पाया भरणीचे कार्य संत ज्ञानेश्वरांनी केले. संत ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्रात भागवत धर्माची प्रतिष्ठापणा केली. निष्काम कर्मयोगाचे महत्त्व त्यांनी प्रस्थापित केले. अध्यात्माच्या क्षेत्रात सर्व वर्णांना समानतेचे स्थान दिले. भक्तीला परब्रह्माच्या तोडीची प्रतिष्ठा ज्ञानेश्वरीच्या रूपाने लाभली.

'गृहस्थाश्रम न सांडीता:कर्मरेखा नोलांडिता'

हा भक्तिमार्ग आचारिता येतो. असे त्यांनी ज्ञानेश्वरीद्वारे समाजाला सांगितले. नीती संबंधीच्या कल्पनात त्यांनी बदल घडवून आणला. ज्ञानेश्वरांच्या सामाजिक व संस्कृतिक कार्याविषयी प्रा.ह.श्री.शेणोलीकर लिहितात,"सत्य,अहिंसा, दया, सर्वांभूती समभाव, अमानित्व ,अदंभत्व, अक्रोधत्व इ. गुणांचे स्वरूप स्पष्ट करताना वैयक्तिक आणि सामाजिक दोन्ही अंगांनी ज्ञानेश्वर विचार करीत आहेत असे स्पष्ट दिसून येते. त्याचप्रमाणे संन्यास, तप, यज्ञ त्याग, वैराग्य इत्यादीचे अर्थ ज्याप्रमाणे ज्ञानेश्वरांनी केले आहेत, त्यावरून केवळ आध्यात्मिक भूमिकेवरून ज्ञानेश्वर बोलत नसून आपल्या भोवतालच्या समाजाची नीतिमत्ता कशी उंचावेल आणि लोकांचे सांसारिक जीवनही निकोप नि निरामय कसे होईल. या कळकळीने ते बोलत आहेत अशी खात्री पटते."१ ज्ञानेश्वरांनी वैयक्तिक मोक्षाच्या हेतूने ग्रंथलेखन केलेले नाही. तत्वज्ञान सांगत असताना ज्ञानेश्वर कुठल्याही अतिरेकाच्या टोकाला जात नाहीत व आग्रही प्रतिपादन करीत नाहीत. ज्ञानेश्वर निरूपणात नेहमीच समतोल साधतात. ल.रा.पांगारकरांच्या भाषेत सांगायचे म्हटले तर 'ज्ञानेश्वरीत कर्म आहे पण कर्माची कटकट नाही. भक्ती आहे पण ती भोळीभाबडी नाही. ज्ञान आहे, पण केवळ शब्दज्ञान नाही.' २

**ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान**- ज्ञानेश्वरांच्या कार्याला साजेसे प्रभावी असे व्यक्तिमत्व त्यांना लाभले. क्रांतदर्शी तत्त्वज्ञ, आत्मानुभवी,योगी,भूतदयावादी संत आणि प्रतिभासंपन्न कवी अशा चतुर्विध भूमिकांनी ज्ञानेश्वरांचे व्यक्तिमत्त्व संपन्न झाले आहे. तत्वज्ञानाच्या बाबतीत नाथपंथी अद्वैत मत,शाड;कर वेदांत व कश्मिरी शैवमत यांचा संस्कार ज्ञानेश्वराच्या बुद्धीवर झालेला दिसतो. ज्ञानेश्वरांनी गीतेच्या अठरा अध्यायांची विभागणीही परंपरेला सोडून स्वतंत्रपणे केली

आहे.तत्वज्ञान मांडताना ज्ञानेश्वरांनी खंडण-मंडणाची पंडिती पद्धत अवलंबिली नाही. आत्मानुभवाचा उत्स्फूर्त अविष्कार असेच त्यांच्या तात्विक विवेचनाचे स्वरूप आहे. ज्ञानेश्वर हे पूर्णतः अद्वैतवादी होते. तर मध्वाचार्य व रामानुजाचार्य हे विशिष्ठा द्वैती होते. सारे काही ब्रह्मच आहे हा त्यांचा सिद्धांत आहे. शंकराचार्यांनी द्वैत मताचे खंडन करण्यासाठी मायावादाचा आधार घेतला. पण ज्ञानेश्वरांचा अद्वैतवाद व शंकराचार्यांचा मायावाद हे भिन्न आहेत. आत्मा व त्याच्या जोडीला मिथ्य माया आहे. पण मिथ्य का होईना ही माया ज्ञानेश्वरांना मान्य नव्हती. मायावादाचा त्याग करून ते पूर्ण अद्वैताचे प्रतिपादन करतात. ब्रह्मसत्य जगनमिथ्य हे शंकराचार्यांचे सूत्र आहे.तर 'एऱ्हवी अवघेची आत्मा', हे ज्ञानेश्वरांचे सूत्र आहे. ज्ञानेश्वर जगत परमात्म्याहुन भिन्न मानीतच नाहीत. दृश्य जग हे आत्मरूप असल्याने त्याचा निरास कसा करावयाचा.

हे आतु बहिरी मिंया कोंदले ।<br>
जग निखिल माझेची ओतले ।।

लाटा या समुद्राहून भिन्न नसतात तर पाण्याच्या लाटांच्या रूपाने त्या प्रत्ययाला येतात. त्याप्रमाणे हे नामरूपात्मक विश्व भिन्न नाहीच, तर परमात्म्याचा हाच स्वरूप विस्तार आहे .

"माझे या विस्तारपणे नावे । हे जगचि नव्हे आघवे ।<br>
जैसे दुध मुरले स्वभावे । तरी तेचि दधि ।।<br>
का बीजची जाले तरु । अथवा भांगारते अलंकारु।<br>
तैसा मज एकाचा विस्तारू। ते हे जग ।।"

रत्न आणि त्याचे तेज हे दोन वेगवेगळे नसून ते एकच आहे. त्याचप्रमाणे हे दृश्य जग हा आत्म्याचाच प्रकाश आहे. बी आणि झाड वेगळे नाही. दोन भिन्नभिन्न वस्तूंचा संबंध जोडणे ठीक आहे .पण त्या वेगळ्या मानने योग्य नाही. यापुढे जाऊन ज्ञानेश्वर म्हणतात.

"नाना कल्लोळ परंपरा संतती जैसा सागरा ।<br>
आम्हा आणि चराचरा संबंधू तैसा।।<br>
म्हणोनी वन्ही आणि ज्वाळा ।<br>
दोन्ही वन्हीच केवळा ।।<br>
तेवि मी गा सकळू । संबंधू वावो ।।"३

ज्ञानेश्वरांच्या अद्वैतवादात 'एक आत्माच सर्व रुपानी नटलेला आहे. शिवापासून तृणापर्यंत अथवा ब्रह्मदेवापासून मुंगीपर्यंत एक आत्माच स्फुरत आहे. किंबहुना विश्व व त्यात भरलेला आत्मा एवढे द्वैत त्यांच्या ठिकाणी संभवत नाही; तर अवघा एक आत्माच आहे'. असे प्रा.दांडेकर प्रतिपादन करतात.

ज्ञानेश्वरांनी जगाच्या उत्पत्तीचा आणि विलयाचाही विचार केला आहे. पण त्यांच्या तत्वज्ञानानुसार तर जगात काहीच उत्पन्न होत नाही. आत्मा हा मूळचाच असतो. तोच सृष्टीरूपाने नटलेला आहे. तेव्हा निर्माण व्हायचे काय? आणि विलय तरी कशाचा होणार? हाच आजातवाद होय. मग हा विश्वाचा पसारा कोठून आला? यासाठी जगद्गुरु शंकराचार्य मायावादाचा आधार घेतात. ज्ञानेश्वरांना मायावाद मान्य नाही. नामरूपाचा पसारा माया निर्मित नाही असे ते म्हणतात. यापुढे जाऊन ज्ञानेश्वर म्हणतात माया ही वांझेची संतती आहे. ही वांझ संतती कशी काय निर्माण करू शकते? मग ही निर्मिती झाली कशी हे सांगतांना ज्ञानेश्वर म्हणतात.

"तरी सूर्यासकट आघवि । हे विश्वरचना नेदावी।<br>
ते दीप्ती माझी जाणावी। अवंती आहे।।"

हे प्रगट विश्व जर आत्मरूप असेल तर मोक्ष ही कल्पना व्यर्थ नव्हे काय? दोन भिन्न भिन्न नसतीलच तर मग कोणापासून कुणाला मोक्ष मिळवण्याची गरजच नाही. त्यामुळे दोन अवस्थाच नाहीत. त्यामुळे मोक्ष हाही भ्रम आहे आणि बंध हाही भ्रमच आहे.

अशा प्रकारचा अत्यंतिक अद्वैतवाद ज्ञानेश्वर मांडतात ज्ञानेश्वर तत्वज्ञानाचे निरूपण करताना ज्ञानेश्वरीत काव्य आपोआप फुलू लागते. काव्यातून ज्ञानेश्वरांचे व्यक्तिमत्व अविष्कृत होते. भक्त, ज्ञानी, योगी, यांची वर्णन करताना त्या वृतींनी संपन्न असणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या व्यक्तिमत्त्वाला काव्याचे पाझर फुटतात, त्यामुळे तत्वज्ञानासारखा रूक्ष विषय ही कोमल आणि कांत बनतो. ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान म्हणजे दोन भिन्न रंगाच्या आडव्या-उभ्या धाग्यांनी विणलेले हे दोन भिन्न रंगाचे मधून झाक दाखविणारे भरजरी वस्त्र आहे. असे गौरोद्गर श्री ग. श्री. हुपरीकर काढतात. याशिवाय ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ज्ञान, कर्म ,आणि भक्ती यांचा सुंदर असा त्रिवेणी संगम झालेला दिसतो, शांत, भक्ती, आणि वत्सल या रसांना ज्ञानेश्वरांनी अधिक महत्त्व दिले. असून त्यांचा आविष्कार ज्ञानेश्वरीत समर्थपणे झाला आहे. ज्ञानेश्वरीच्या शेवटी ज्ञानेश्वरांनी मागितलेल्या 'हे विश्वचि माझे घर' या पसायदानात त्यांचे विश्वव्यापी मोठेपण, साधुत्व आणि शुचित्व दिसते. भक्त तत्त्वज्ञ आणि कवी अशी त्याच्या व्यक्तिमत्त्वाची अंगे 'ज्ञानेश्वरी' च्या रूपाने आपणास ज्ञात होतात.

**महात्मा बसवेश्वर यांचे तत्वज्ञान :-** मध्ययुगीन कालखंडात महाराष्ट्रात नाथ ,महानुभाव ,वारकरी, दत्त ,आणि समर्थ संप्रदायाचा उदय झाला. याच कालखंडात कर्नाटकात वीरशैव संप्रदायाचा उदय झाला. देशातील सर्वात जुना आणि बहुप्रचिलित हा धर्मसंप्रदाय पुढे महाराष्ट्रातही विस्तारलेला आहे. महानुभव ,नाथ, आणि वारकरी या तिन्ही संप्रदयाचे वीरशैव संप्रदायाशी जवळचे नाते आहे. मूलतः शैव असणारे हे संप्रदाय उपासनेने मात्र ते वैष्णव आहेत. दोघांच्याही वाङ्मयात सांप्रदायिक धारणांना महत्त्व आहे. त्यांचे वाङ;मय धर्मसाधनेतून जन्माला आले आहे. एकंदरीत सर्व धर्मसंप्रदायाच्या अभ्यासासंदर्भात र.बा.मंचरकर लिहितात. "कोणत्याही धर्मसंप्रदायाच्या अभ्यासात त्या संप्रदायाच्या उगमाचा मागोवा घेतला जातो. त्याची वाटचाल शोधली जाते. उपास्यदेवतेच्या विशिष्ट रूपाचा साभिप्राय उलगडा केला जातो. त्या संप्रदायाने पुरस्कारिलेल्या जीवनमार्गाच्या घडणीतील तत्त्वविचारांच्या वाटा निश्चित केला जातो. सांप्रदायिक विचारानुसार आदर्श जीवनक्रमाचे म्हणजे आचारधर्माचे विवरण केले जाते. संप्रदायप्रवर्तक आणि संप्रदायपोषक अशा तत्त्वचिंतक सिद्ध पुरुषांच्या चरित्राचा बोधही महत्त्वाचा ठरतो." वीरशैव संप्रदायाच्या संदर्भात त्यांच्या उपास्यदेवता,उपासने मागील अधिष्ठान, त्यांच्या आचारधर्माचे विवरण, संप्रदाय वाढविणारे तस्पुरुष त्यातून प्रवर्तित झालेले वाड;मय त्यांचे तत्त्वविचार यांचा विचार होणे गरजेचे आहे. तसेच कर्नाटक आणि महाराष्ट्र यांचा अनुबंध जोडणारा एक घटक म्हणून वीरशैव संप्रदायाचा आणि त्यांच्या विचाराचा अभ्यास महत्त्वाचा वाटतो. वीरशैव संप्रदायाचे संस्थापक कोण या विषयीचा वाद आता मिटला असून, या संप्रदायाचे संस्थापनेचे श्रेय पाचही आचार्यांना देणारा एक मतप्रवाह आहे. महात्मा बसवेश्वरांनी शैवांच्या परंपरागत विचार धनाची तपासणी करून आपल्या उत्कट शिवभक्तीने आणि समाजोधाराच्या तळमळीने वीरशैव व मतांचे परिवर्तन केले. त्यामुळे महात्मा बसवेश्वर वीरशैव संप्रदायाचे संस्थापक नसून संप्रदायाला क्रांतिकारक वळण देणारे धर्मधुरीण होत. ही बाब सर्वमान्य झाली आहे. महात्मा बसवेश्वरांनी केलेले कार्य इतके मौलिक आहे की धर्म संस्थापक पंचाचार्या बरोबरच महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांचे चिंतन होणे गरजेचे वाटते. महात्मा बसवेश्वरांनी वीरशैव संप्रदयाचे पुनरुज्जीवन आणि सार्वत्रिक प्रचाराचे काम, समतेचा पुरस्कार, जातीयतेचा धिक्कार, करण्याचे कार्य केले. महात्मा बसवेश्वर हे संतकवी आणि समाजसुधारक होते .महात्मा बसवेश्वरांच्या धर्मविस्तार कार्याची सुरुवात 'कुंडलसंगम' क्षेत्रापासून झाली. 'कुंडलसंगम' हे तत्कालीन अध्ययन केंद्र होते. बसवेश्वरांना अर्भकावस्थेत लिंग धारणा करून वीरशैव पंथाची दिक्षा देणारे श्री ईशान्य गुरु कुंडलसंगम चे कुलपती होते बसवेश्वरांनी या ठिकाणी वेद, उपनिषदे ,आगम पुराणे ,काव्य,तसेच धर्ममते या धर्मतत्त्वाचा अभ्यास केला. बसवेश्वरांनी स्वतःला धार्मिक आणि सामाजिक कार्यात वाहून घेतले. जाती ,धर्म ,लिंग, यांचा अडथळा न येऊ देता त्यांनी सर्वांना धर्माची दारे खुली केली. त्यांनी स्थापन केलेल्या 'अनुभव मंटप' या सामाजिक व धार्मिक विचार मंचाद्वारे त्यांनी अल्लमप्रभू,सिद्धराम, मदिवाळ,माचय्या, अंबीगर ,चोडया आदि कर्नाटकातील तर उरी ,लिंगदेव (महाराष्ट्र)सकलेश, मादरस ( आंध्र)आदि देशभरातील संत साधकांना आकर्षित केले. महात्मा बसवेश्वर हे समतावादी आणि समाजवादी असल्यामुळे धर्मकार्यांमध्ये उच्च-नीच असा भेदभाव ठेवला नाही. महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात बसवकल्याण येथे

वीरशैव धर्माची स्थापना केली. वर्णाश्रम पद्धतीवर विश्वास न ठेवता वीरशैव, लिंगायत धर्माचे जे विचार सांगितले आहे,तेच विचारा अगोदर गौतम बुद्धांनी आणि भगवान महावीरांनी आपल्या धर्मात सांगितलेले होते. म्हणूनच वीरशैव धर्म बुद्ध विचारधारेला जवळच आहे. त्यामुळेच महात्मा बसवेश्वरांना बाराव्या शतकातले बुद्ध म्हणून संबोधले जाते. भारतातील तत्कालीन पुरोहित वर्गाने धार्मिक, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या बहुजन समाजाचे मोठ्या प्रमाणात शोषण केले होते. या शोषित वर्गावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध महात्मा गौतम बुद्ध आणि महात्मा बसवेश्वर यांच्या अनुयायांना संघर्ष करावा लागला. आणि त्यांनी समाजाला समता, प्रेम, बंधुत्व,अपरिग्रह यांची शिकवण व मानवतावाद शिकवला, कोणताही संप्रदाय उभा राहातो तो त्याच्या विचार धारेवर. प्रत्येक संप्रदायाची एक विचार धारा असते. त्यामुळे संप्रदायाच्या अभ्यासात विचारधारे बरोबरच त्या संप्रदायातील तत्वज्ञान विचारात घ्यावे लागते. वीरशैव संप्रदायाच्या दृष्टीने 'सिद्धांत शिखामणी' व 'श्रीकरभाष्य' या दोन ग्रंथांना अनन्यसाधारण महत्व आहे. सिद्धांत शिखामणी या ग्रंथातून वीरशैव धर्म संप्रदायाची सर्व तत्त्वे एकत्र रूपात मांडणाऱ्या या संस्कृत ग्रंथाला धर्मग्रंथाची प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. मराठीमध्ये शांतलिंगाचा 'विवेकचिंतामणी' आणि मन्मथ स्वामी शिवलिंगाचे 'परमरहस्य' हे ग्रंथ वीरशैव व तत्त्वज्ञानाचा उलगडा करणारे महत्त्वपूर्ण ग्रंथ मानले जातात. हिंदू धर्माच्या तत्त्वज्ञानामध्ये द्वैत, अद्वैत,विशिष्टा द्वैत, शैवसिद्धांत असे जे भेद प्रसिद्ध आहेत. त्यामध्ये वीरशैव सिद्धांत हा शक्तिविशिष्टाद्वैत या नावाने ओळखला जातो. लिंगाशी सामरस्य साधणारे हे तत्वज्ञान शक्तिविशिष्टाद्वैत म्हटले जाते. वीरशैव सिद्धांताप्रमाणे जगाचा निर्माता, त्राता सहारकर्ता, 'परशिव' असून तो द्वंद्वातील निर्गुण, निराकार, सच्चिदानंद असून शक्तीयुक्त आहे. ही शक्ती परशिवात अधिष्ठित आहे. म्हणून या सिद्धांताला शक्तिविशिष्टाद्वैत असे म्हणतात वीरशैव संप्रदायात शिवशरनांच्या अनुभवाला महत्त्व देतात. सहा पायऱ्यांनी भक्ताची भक्ती आणि उपास्य यांत उत्क्रमण होते. आणि अखेरी ऐक्य निर्माण होते. असा तत्त्वविचार सांगणारा 'षटस्थिलसिद्धांत' हा ग्रंथ महत्त्वपूर्ण मानला जातो. वीरशैवांचे तत्त्वज्ञान समजून घेण्यासाठी भारतीय तत्त्वज्ञानाच्या व्यापक व्युहात नेमके स्थान समजून घ्यायला हवे. भारतीय तत्वज्ञानात प्रामुख्याने निगम आणि अगम अशा दोन प्रधान तत्व धारा आहेत. पैकी अगम तत्व धारेचा पुरस्कार करणारा या संप्रदायाने जीवनाला अध्यात्माचे अधिष्ठान लाभावे. अशी भावना व्यक्त केले आहे. वीरशैव एकेश्वरवादी आहेत. त्यांचा एकच एक ईश्वर म्हणजे शिव होय. शिव नित्य स्वतंत्र अनिर्वचनीय अगोचर, निराकार आणि चैतन्यरूप आहे. जीव, जगत आणि जगदीश (ईश्वर) यांचे स्वरूप आणि परस्परसंबंध जाणणे म्हणजे तत्त्वज्ञान होय. उपरोक्त तत्वज्ञानाला महात्मा बसवेश्वरांनी सुसंगत अशी जोड दिली आहे. महात्मा बसेश्वर म्हणतात देव हा प्रत्येकाच्या आत्म्यात वास्तव्य करून राहतो. आपणास देवाचा साक्षात्कार व्हावयचा असेल तर, आपल्यातील बौद्धिक आणि भावनात्मक पातळी उंचावली पाहिजे आणि त्यास भक्तीची जोड दिली पाहिजे. महात्मा बसवेश्वरांच्या तत्वज्ञाना संदर्भात डॉ.वैजनाथ फास्के लिहितात, "महात्मा बसवेश्वरांच्या तत्त्वज्ञानामध्ये तपस्वी लोकांच्या चिंतनाला प्रत्यक्ष जीवनाच्या कृतिशीलतेची त्याची जोड दिली आहे. या जगापासून मी अलिप्त राहून काही कमवू शकत नाही किंवा केवळ लहान लहान कृतीच करीत राहिले तरी ते जीवन नव्हे. त्याला अंतरिक जोड हवी. त्यांचे तत्वज्ञान हे प्रवृत्ती आणि निवृत्ती यांच्या दोन्हीतून निर्माण झालेले तत्वज्ञान आहे. भगवत गीतेतील तत्त्वज्ञान हे निष्काम कर्मावर आधारलेले आहे. आणि उपनिषदप्रमाणे मनुष्य हे देवाचे चिरंतन अंश आहे. तो अंतर्यामी आहे. ह्या दोन्ही तत्त्वाचे मिलन म्हणजे महात्मा बसवेश्वर यांचे तत्त्वज्ञान होय."५ महात्मा बसवेश्वरांनी भगवद्गीतेतील तत्वज्ञानाधारित परमेश्वर प्राप्तीच्या मार्गात तीन महत्त्वपूर्ण गोष्टी सांगितल्या त्या म्हणजे ज्ञान, इच्छा आणि क्रिया ह्या होय. या तिन्हीच्या संगमातून परमेश्वर प्राप्तीचा आनंद मिळतो. संत ज्ञानेश्वरांच्या तत्वज्ञानाचा विचार करता एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे त्यांच्या अद्वैतीसिद्धांत ज्ञान,कर्म आणि भक्ती यांचा सुंदर मिलाफ झाला आहे. ज्ञानकर्मयोगयुक्त भक्तीला ते निष्ठा मानतात. ज्ञानेश्वरांनी ज्ञान,कर्म आणि भक्ती यांचा अपूर्व समन्वय साधला आहे. याशिवाय महात्मा बसवेश्वरांनी अंतरंगशुद्धी व बाह्यरंगशुद्धीवर अधिक भर दिला आहे. मनाच्या या दोन शुद्धी परमेश्वर प्राप्तीचे खरे साधन ठरेल. यासाठी काही तत्वज्ञानाचा अंगीकार केला पाहिजे या तत्वाविषयी डॉ. वैजनाथ फास्के लिहितात,

" चोरी करू नको ,हत्या करू नको.

खोटं बोलू नये, क्रोधी बनू नको.
दुसऱ्यांना दोष देऊ नये.
स्वतःची स्तुती करू नको.
हीच अंतरंग शुद्धी व बहिरंग शुद्धी होय"६

**सारांश-** मध्ययुगीन कालखंडात महाराष्ट्रात उदयाला आलेले वेगवेगळे धर्मसंप्रदाय आप आपल्या तत्त्वविचाराचा प्रचार-प्रसार करीत होते. अध्यात्मिक भक्ती या सर्वांच्या मुळाशी होती. वारकरी पंथाने समता विचारांची उभारणी करण्याचा प्रयत्न केला. ज्ञानदेव, नामदेवांनी भक्तीच्या क्षेत्रात समतेचा पुरस्कार केला. पण सामाजिक जीवनातील विषम विषमतेला त्यांनी हात लावला नाही. या सर्व मर्यादा लक्षात घेता. महात्मा बसवेश्वरांनी समतेचे व न्यायाचे सर्वांगीण समर्थन केले. स्त्री-पुरुष समानतेचा उद्‌घोष केला. स्त्रीमुक्तीची चळवळ एका अर्थाने बसवेश्वर यांनीच प्रथम मध्ययुगात सुरू केली. बाराव्या शतकांत सर्वांगीण क्रांतीचा ध्वज महात्मा बसवेश्वरांनी फडकवला.संत, राज्यकर्ता,उत्कट, भावकवी, विचारवंत आणि समाजसुधारक अशा विविध अंगांनी महात्मा बसवेश्वर यांचे व्यक्तिमत्त्व परिपूर्ण बनले होते. त्यांचे तत्त्वविचार आपल्या मनात व चिंतनात राहिले पाहिजेत. महात्मा बसवेश्वर अध्ययनाचा आणि अनुकरणाचा मुख्य विषय व्हावा यासाठीचा हा सर्व लेखन प्रपंच.

= शिवशरणात =

**संदर्भग्रंथ सूची :-**

*शेणोलीकर . ह. श्री.,'प्राचीन मराठी वाङ्‌मयाचे स्वरूप' मोघे प्रकाशन सहावी आवृत्ती*
*पांगारकर ल.रा.,'मराठी वाङ्‌मयाचा इतिहास, खंड पहिला आ दुसरे'*
*नसीर बादकर ल.रा.,'प्राचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास' फडके प्रकाशन कोल्हापूर जानेवारी 1988*
*मंचरकर र.बा., 'धर्म संप्रदाय आणि मध्ययुगीन मराठी वाङ्‌मय, प्रतिमा प्रकाशन,जानेवारी 2000*
*पाटील भीमराव, करंजकर विजयकुमार, युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर आवड प्र.आवृत्ती-२००६*
*तत्रेव*
*सरदार ग.बा., संत वाङ्‌मयाची सामाजिक फलश्रुती म.सा.प. पुणे 1950*
*धोंड म.वा.,'ज्ञानेश्वर स्वरूप तत्वज्ञान आणि काव्य' राजहंस प्रकाशन पुणे.*

## महात्मा बसवेश्वर आणि त्यांच्या वचन साहित्याचे महत्व

**प्रा.डॉ.प्रकाश डी.राठोड**
*भूगोल विभाग, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,मुखेड, ता.मुखेड जी.नांदेड*

विश्वगुरु जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज (बसव,बसवण्णा) वीरशैव धर्माचे संस्थापक यांचा कार्यकाळ इ.स.११०५ ते इ.स.११६५ असून ते कर्नाटकातील संत समाजसुधारक होते.त्यांनी हिंदू धर्मातील जातीव्यवस्थेविरुद्ध संघर्ष केला व निर्गुण, निराकार एकेश्वरवादी श्रद्धेचा पुरस्कार केला.भारतीय लोकशाही संसदेची महणजेच ' अनुभव मंटपाची ' बसवण्णानी मंगळवेढा येथे स्थापना केली.विविध ग्रंथाचा,ज्ञानाच्या सर्व शाखाचा अभ्यास केला.त्यामुळे संस्कृत ग्रंथातील धर्मतत्वे कन्नडमधून लिहिली बसवण्णापूर्वी कन्नड वांड:मय फक्त पद्यस्वरुपात लिहिले गेले होते.बसवण्णानी गद्यातून वचने लिहिण्यास सुरुवात केली.मूळ कन्नड भाषेतील वचन साहित्य नुकतेच २३ भाषेत रूपांतरित झाले असून २८ एप्रिल २०१७ रोजी बसवेश्वर जयंतीचे औचित्य साधून देशाचे पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या हस्ते हे " वचन साहित्य '' देशाला समर्पित करण्यात आले आहे. त्यामुळे कन्नडमधील गद्य वांड:मयाचा विकास झाला.महाराष्ट्रातील खेड्यातील लोकांच्या जिभेवर आजही बसवेश्वरांची वचने आरूढ झालेली दिसतात. भारतीय साहित्यामध्ये कन्नड वचन साहित्याला एक ऐतिहासिक व सामाजिक अचारात्मक महत्वाचे स्थान आहे.बसववादी शिवशरण हेच वचन साहित्याचे निर्माते आहेत. मानवीमुल्ये, नैतिकता,प्रामाणिकता,अंत:करणातील अध्यात्मता भरून ठेवलेले वचन साहित्य हि विश्व साहित्याला महन मानवतावादी सामाजिक कल्याणाच्या जीवन शैलीस जगण्याची महण देणगीच आहे.

**१.बसवेश्वारांच्या वचन वाड:मयाचा इतिहास :-** वचन म्हणजे प्रतिज्ञा,वचन म्हणजे आचरण,वचन म्हणजे अत्मसाक्षीने केलेले निवेदन होय. बोले तैसा चाले नसून चाले तैसा बोले म्हणजे वचन होय. लोकांनी लोकांच्या कल्याणासाठी,लोकांच्यात राहून लोकांच्या बोली भाषेतून,भावगीत, लक्षणामध्ये एक अनुभवसिद्ध गद्य आहे.विचारांचे व आचरणाचे सांगड असलेले एक जिवंत साहित्य आहे.लोक संहिता म्हणजे वचन,जन सामन्यांची शरणांची धर्म संहिता म्हणजे वचन.

**२.वचन साहित्याची निर्माती,पूर्वीच्या काळातील भाषा आणि साहित्यरूप :-** पाचव्या शतकामध्ये बौद्धानी पाली भाषेचा आणि जैन संप्रदायाने कन्नड भाषेचा स्वीकार केला.गौतमबुद्ध आणि महावीर यांनी पौराणिक आणि ऐतिहासिक व्यक्ती बरोबर त्यांच्या विचाराचा,तत्वज्ञानाचा आणि भाषेचा स्वीकार नवीन तत्वाज्ञानात केला.हि बाब चिंतन करायला लावणारी आहे.तरीही कन्नड आणि मराठी भाषेची जननी म्हणून संस्कृत भाषेला मं दिला जातो.पाचव्या शतकात वैदिक धर्माच्या कर्मकांडाला कंटाळून जैन व बौद्ध धर्म उदयाला आले.याच धर्माला पर्याय म्हणून धार्मिक बंधुत्व वाढविण्यासाठी सामान्य लोकांच्या विकासासाठी भारतीय संस्कृतीत अनेक ऋषीमुनी,साधू-संत,शरण-महंत यांनी ११ व्या शतकापासून भक्तिमार्गाची चळवळ उभी केली.उत्तरेकडून मुसलमानाच्या आणि अलेक्झांडरच्या आगमनाबरोबर ग्रीक,उर्दू,अरेबिक आणि पारसी भाषेतील साहित्य भारतात पदार्पण केले. अनेक संघर्षामुळे उत्तरेकडील हिंदी भाषा आणि दक्षिणेला मराठी,कन्नड,तामिळी,तेलगु,मल्याळी भाषा उदयाला आल्या असून भाषा आणि साहित्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

**३.वचन साहित्याचा उगम :-** आशिया खंडात सर्वप्रथम सामाजिक,धार्मिक,साहित्यिक क्रांती घडून आली.ती १२व्या शतकामध्ये कर्नाटकात विश्वगुरु बसवण्णानी कल्यानक्रांती घडविली.या क्रांतीचे प्रभावी हथियार म्हणजे वचन साहित्य अथवा वचन वाड:मय होय.त्याच्या साह्याने वचन साहित्याच्या तलवारीला धार दिली.भारतात कर्मकांड,असमानता ,पिळवणूक,अज्ञान,अंधश्रद्धा,यांचे खोलवर गेलेली पाळेमुळे खणून काढून शोषण रहित समाजनीर्माण करणे,आत्मकल्याण,मानवतावादी अधिकार हे अनुभव मंटपाच्या विद्यापिठातील अनुभवाने हि क्रांतीची तलवार कन्नड भाषेच्या म्यानात विराजमान झाली.थोडक्यात वचन साहित्य एक सर्वोदय चैतन्यशक्तीतील भक्ती असून त्यात मानव जातीचे कल्याण व मानवतावादी विकासाचे ध्येय आहे. शिव शरणानी व आत:करणातील अनुभव वचनकारांनी राजेशाही,पुरोहीतवादी देवालय संस्कृतीला प्रतिकार केल्यामुळे कन्नड साहित्यातील शिवभक्त कवीने पाल्कुरीके सोमनाथने तेलगु भाषेत बसव पुराणंम हा अजरामर ग्रंथ लिहिला (इ.स.१२६०) भीम कवीने त्याचे कानडीत भाषांतर केले.म्हेसूर प्रांतात हा अतिशय लोकप्रिय ग्रंथ आहे.अत्यंत भक्तिभावाने लोक त्याची पारायणे

करतात.वचनशास्त्र हे देखील वीरशैव धार्मिक वाड:मयाचे एक प्रमुख व महत्वाचे अंग आहे.वचनकाराच्या रचनांना म्हणजेच वचनांना उधेशून वचन शास्त्र असा शब्द प्रयोग केला जातो.यामध्ये सामन्यात: देवारदासिमय्या, अल्लम्प्रभू, बसवेश्वर, चन्न बसवेश्वर, सिद्धरामेश्वर,अक्कम्हादेवी,कोंडगुळी,केशीराज,डोहरकंकय्या,मादारचन्य्या, एकांतरामय्या तेलगु बोमाय्या यांना प्रथम वचनकार अथवा बसव काळातील वयोवृद्ध वचनकार असावेत असा अभिप्राय ग्रंथातून विद्वानांनी दिला आहे. या वचनामध्ये विविध विषय हाताळलेले आहेत वचनातील प्रमुख विषयाचा उल्लेख करतांना महादेवी म्हणतात.वचनामध्ये मुख्यत्वे करून आंतरिक विश्लेषण,समाजविकृतीचे विश्लेषण,आदर्श समाज निर्माण करण्यामागील तळमळ,सत्याचा पाठपुरावा आणि मानव जातीचे कल्याण हे पाच मुलभूत विषय आढळतात.डॉ.द.वी.चाफेकर यांनी १०० निवडक वचनाचा भावानुवाद प्रसिध्द केलेला आहे. वचनातील मुख्य विषयाबाबत म्हणतात वचनात विश्व परमेश्वर व मनुष्य या संबंधी अगदी सोप्या कानडी भाषेत विचार प्रवर्तक विवेचन केलेले आहे.म्हणून वचने अत्यंत सुंदर व दैनंदिन जीवनात परिणामकारक झाली आहेत.

**अ.सामाजिक वर्तनाचे सात नीती तत्व बसव :-** १.नको करू चोरी, २.नको करू हत्या,३.नको बोलू असत्य,४.नको मनी धरू द्वेश ,५.नको करू आत्मस्तुती,६.नको करू निंदानालस्ती,७.नको माणू कोणा तुच्छ हीच खरी अंतरंग शुद्धी,हीच बहिरंग शुद्धि हीच कुडलसंगमाला प्रसन्न करण्याची खरी पध्दती.

**ब. शिवकुलोद्धारक बसव :-**

कोणी असोत जातीने कनिस्ट
लिंग स्पर्शाने नस्ट होती कुळे
परीस स्पर्शाने,लोखंड होई सोने
येतो लिंग दिक्षेने,शिवकुळी
कुडलसंगम देवा,याची जाणीव नाही,
नको ऐसा संदेही शिवकुळी

**क.अस्पृश्य दाहक बसव :-** डोहार तो कंकय्या,असे पितृ स्थानी पितामह मानी चन्नयासी,जगणे ते माझे किती सहज ते,स्वपच सांगतीत,सुखदाई,भवित सद्गुण त्या सानिध्यात जाहलो कृतार्थ तेथेची,मी कनिस्ट जातीत जन्मने का दोष ? न कळे हा रोष,कोणाचा तो कुडलसंगम देवा ! व्यर्थ कुल धर्म विधी लिखित ! मर्म आगळेच.

**ड.निज गुणी बसव :-** एक देव लोक दुज्ये मृत्यू लोक ,निहे ऐसा देख,एक जाणा सत्य वचन हेची,जाणा देव लोक मिथ्य वचन देख,मृत्यू लोक,आचरणी स्वर्ग अनाचार नर्क (नरक ) कुडम संगम एक साक्ष यासी.

**इ.समतावादी बसव :-** कावळा बघता भाताचे शीत,गोळा करी आपले नात गोत ! कोंबडा गुटी पाहता , आरवूनी बोलवी कुल समस्ता ! कुडल संगम देवा,शिवभक्त होऊनी जो भक्ती पक्ष हीन,तो कावळे कोम्बडयाहून अति हीन !

**वचन साहित्याची गुणवैशिस्टे :-**

- राजा त्याचा पराक्रम, राज्यकारभार, राज्यस्तुती यांना सोडून वेगळे विशेस विषय व्यक्त करणारे वचनसाहित्य आहे.
- पौराणिक आणि काल्पनिक व्यक्तीमधील ढोंगीपणा उघड करणारे वचनसाहित्य आहे.
- यज्ञ-आग, कर्मकांड, यज्ञबळी,वेद,शास्त्र यांना नाकारणारे वचनसाहित्य आहे.
- जात-वर्ण -वर्ग-लिंगभेद नस्ट करून समानता निर्माण करणारे वचनसाहित्य आहे.
- समानता आणि विश्वबंधुत्व निर्माण करणारे वचनसाहित्य आहे.
- सामान्य जनतेच्या आचार-विचाराला प्राधान्य देणारे वचनसाहित्य आहे.
- अनुभव चर्चा करण्यासाठी अनुभवमंटपाच्या विद्यापीठाची स्थापना करणारे वचनसाहित्य आहे.

कर्नाटकात वचनांना चलनी नाण्याची उपमा दिली जाते.आदराने ,अंत:करणानी परिशुद्ध भावनेने स्वीकारावीत असा कृपा भाव जनमयी यावा अश्या अमूल्य कृती ,वचन शक्तीतील भक्ती , जीवनात पाळावयाचे वचन शास्त्र होय.

---

# आंतरजातीय विवाहाचे अध्य पुरस्कर्ते:: महात्मा बसवेश्वर

**प्रा. उमाकांत शिवदास चलवदे**

*संशोधक, M.Sc.M.Ed.SET, DSM, Ph.D.(appear) जगत जागृती विद्या मंदिर, चाकुर .*
*ता. चाकूर जि. लातूर, Email: uchalwade27@gmail.com*

---

**प्रस्तावना :** भारत भूमी ही विविध धर्माच्या उगमाचे स्थान आहे. या भूमीतच सनातन हिंदू धर्म, बौद्ध धर्म ,जैन धर्म, शीख धर्म व लिंगायत धर्म यांचा उगम झाला आहे. हिंदू धर्म हा भारतातील सर्वात जुना धर्म आहे. या मधे अनेक दोष आहेत.या दोषावर मात करण्यासाठी इतर धर्मांची स्थापना झाली आहे. हिंदू धर्मातील वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था ही भेद निर्माण करणारी आहे. यावर मात करण्यासाठी संत महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात मानवतावादी व समानतावादी लिंगायत धर्माची स्थापना केली आहे. सदर संशोधन शोध निबंधामध्ये महात्मा बसवेश्वरांनी केलेल्या जातीभेद निर्मुलन व आंतरजातीय विवाह या चिरंतन कार्याची ओळख करून घेणार आहोत.

**चिरंतन तत्त्व म्हणजे काय?** चिरंतन म्हणजे जुना, प्राचीन ,पुरातन व शाश्वत असा अर्थ होतो. जे तत्त्व त्रिकालाबाधित सत्य आहे. त्याला चिरंतन तत्त्व म्हणतात. शाश्वत हा एक चिरंतनाला प्रतिशब्द आहे. शाश्वत म्हणजे अविनाशी, चिरकाळ टिकणारा होय. मानवी समाजाच्या उत्कर्षासाठी काही तत्व चिरंतन असतात. जे कोणत्याही काळासाठी लागू पडतात. सत्य बोलणे, चोरी न करणे, अहिंसा, धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, श्रमप्रतिष्ठा, समता, बंधुता ही काही चिरंतन तत्वे आहेत. जी पुरातन काळासाठी लागून होती, आजही आणि भविष्यासाठीही महत्त्वाचे आहेत. या तत्वांचा समाजाने स्वीकार केला पाहिजे. संत महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकामध्ये समाजामध्ये समतावादावर व मानवतावादावर आधारित असलेली अशा लिंगायत धर्माची स्थापना केली आहे. बाराव्या शतकांमध्ये जातिभेद, लिंगभेद, वर्णभेद, अस्पृश्यता असमानता आणि अन्याय मोठ्या प्रमाणात वाढला होता. यामुळे दलित, शूद्र व स्त्रिया यांचे जीवन हे असह्य झाले होते. त्यांना एक मानव म्हणून वागवले जात नव्हते. त्यांना पशूपेक्षाही हीन दर्जाची वागणूक दिली जात होती. संत महात्मा बसवेश्वरांच्या संवेदनशील मनाला हे का मान्य नव्हते. जातीयभेद निर्मूलनासाठी महात्मा विशेष आणि शाश्वत असेच कार्य केले आहे.

**जातीभेद निर्मूलन:** संत महात्मा बसवेश्वरांनी भेदभावावर आधारलेली समाज व्यवस्था नाकारली. त्यांनी वेदप्रामाण्य व पुराणग्रंथप्रामाण्य नाकारले. कारण की हया ग्रंथातच विषमता निर्माण करणारी वर्णव्यवस्था होती. समाजाच्या सुख सोयीसाठी ऋग्वेदामध्ये श्रमविभागणी वर आधारित वर्णव्यवस्था निर्माण करण्यात आली. परंतु त्यात पुरुषसूक्त घुसडण्यात आले. त्यामुळे वर्णव्यवस्थेचे रूपांतर जातीव्यवस्थेत झाले आहेत. ऋग्वेदात म्हटले आहे की, “त्या सर्वात्मक पुरुषाने मुखातून ब्राह्मण, बाहुपासून क्षत्रिय, मांडयापासून वैश्य तर पायापासून शूद्र बनला”.मनूने पुरुष सुक्तात सांगितलेली समाजरचना ही परमेश्वराच्या इच्छेनुसार झालेली आहे, असे आग्रहपूर्वक सांगितले. त्याने वर्णव्यवस्थेचे रूपांतर जातीव्यवस्थेत केले. त्यामुळे जात ही जन्मावरून ठरू लागली. जातिभेदांमुळे शूद्र समजल्या जाणाऱ्या लोकांचे नैसर्गिक आणि अधिकारापासून पूर्णत: वंचित करून त्यांचे शारीरिक, मानसिक व आर्थिक शोषण व्यवस्थेने करविले होते. त्या सर्वांची पाठराखण करणारी मनुस्मृती तर स्त्री आणि शुद्रासाठी कर्दनकाळ ठरली होती. म्हणून बसवेश्वर हे अभ्यास व अनुभवांती या अनैसर्गिक व्यवस्थेच्या विरोधात ठामपणे उभे राहिले होते. जातीचा अभिमान मानणार्यसाठी महात्मा बसवेश्वर एका वाचनात म्हणतात,

व्यास मत्स्यगंधा चा पुत्र
मार्कंडेय मातंगीचा पुत्र
मंदोदरी मंडूककन्या अगस्ती कोळी आहे,
दुर्वास चांभार आहे कश्यप लोहार आहे,

कोंडीण्य न्हावी आहे ते तिन्ही जगात प्रसिद्ध आहेत.
श्वपच असला तरी शिवभक्तच कुलीन श्रेष्ठ आहे.

या वचनातील प्रत्येकाची जात ही कनिष्ठ मानली गेली आहे परंतु त्या त्या व्यक्तीने आपल्या कर्तुत्वाने आपले आगळे वेगळे श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. म्हणूनच महात्मा बसवेश्वर म्हणतात कुलीन , श्रेष्ठत्व हे जाती वर नव्हे तर गुणावर अवलंबून आहे. संत महात्मा बसवेश्वर यांना स्वतःच्या जातीचा अहंकार नव्हता. म्हणून स्वतःला ब्राह्मण समजण्याऐवजी ते एक वचनात म्हणतात.

चेन्नय्याच्या घरच्या दासाचा पुत्र,
कक्कयाच्या घरची दासी पुत्री,
या दोघांनी गोवऱ्या वेचण्यास शेतात जाऊन संग केला,
त्या दोघांच्या पोटी माझा जन्म झाला कुडलसंगम देवाच्या साक्षीने.

संत महात्मा बसवेश्वरांनी फक्त जातीभेदाचे निर्मूलन करण्याचा प्रयत्न केला नाही तर शुद्र व अतिशूद्र व्यक्तीबाबत अस्पृश्यता निवारण्याचा प्रयत्न केला आहे. ते एका वचनात म्हणतात,

अस्पृश्य असला तरी काय झाले ?
लिंग भक्त श्रेष्ठ कुलीन आहे .
श्रद्धा ठेवून संदेह करणे योग्य नाही पहा.
गळ्यात बांधले, स्पर्श केला, विभूती लेपन केले
तरी काय प्रयोजन, मन शुद्ध नसेल तर?
भाव शुद्धी विना भक्ती होणार नाही ,कुडलसंगम देवा

या वचनाच्या माध्यमातून संत महात्मा बसवेश्वर म्हणतात की, वरवरचा देखावा करून, मन शुद्ध न ठेवता जर कोणी श्रेष्ठ मानून भक्ती करीत असेल आणि एखादा अस्पृश्य प्रामाणिकपणे वाटचाल करीत असेल तर तो अस्पृश्य असतानाही श्रेष्ठ आहे.

**आंतरजातीय विवाह साठी पुढाकार:** प्राचीन काळापासून भारतीय समाजात चार वर्णांमध्ये विभागला गेला होता. चतुर्थ मानल्या गेलेल्या शुद्रासोबत वरील तीन वर्गाचे रोटी-बेटी व्यवहार होत नव्हता. त्यामुळे समाज हा जीत पराजित, स्पृश आणि अस्पृश अशा दोन गटात विभागला गेला होता. पुढे श्रेष्ठ-कनिष्ठ अशा अहंकारातून ब्राह्मण आणि क्षत्रिय, ब्राह्मण आणि वैश्य यांच्यामधील रोटी-बेटी व्यवहार बंद झाला. कालांतराने व्यवसायावरून जाती निर्माण झाल्या. हळूहळू जातीजातीमध्ये रोटी व्यवहार बंद झाले. बाराव्या शतकातील जात सोडून दुसऱ्या जातीतील मुला मुली तील विवाह म्हणजे फार मोठा सामाजिक गुन्हा मानला जात होता. म्हणजे आंतरजातीय विवाह बाराव्या शतकापर्यंत समाजात बंद झाला होता. बसवेश्वरांनी अनुभव मंडपातील सर्व सदस्यांना जातीय बंध तोडण्याची शिकवण दिली होती. जो कोणी कोणत्याही जातीचा व्यक्ती हा लिंगायत होत असे त्यामुळे प्रत्येकाची पूर्वाश्रमीची जात गळून पडत असे. त्यांच्यामध्ये कसल्याही प्रकारचा भेद राहत नव्हता. एखाद्या व्यक्तीने एकदा इष्टलिंग दीक्षा घेतली की, त्यांची पूर्वीची जात, कुळ, गोत्र नष्ट होऊन तो लिंगायत म्हणजे समान स्वरूपाचा समान दर्जाचा होत असे. त्यामुळे त्यांच्या सामाजिक व्यवहारातील सर्व बंधने आपोआपच संपुष्टात येतात अशी समाजव्यवस्था बसवेश्वरांच्या शिकवणीतून निर्माण झाली होती. म्हणूनच ते म्हणतात दासीपुत्र असो ,वेश्या पुत्र असो त्याने लिंग दीक्षा घेतल्यानंतर तो साक्षात शिवरूप होतो. म्हणूनच अनुभव मंटपाचे सदस्य असलेला जन्माने चांभार असलेला हरळय्या व जन्माने ब्राह्मण असलेला मधुवरस यांनी बसव विचाराने प्रभावित होऊन आपल्या मुला-मुलींचा विवाह लावून देण्याचा निर्णय घेतला. सहाजिकच पूर्वीच्या भिन्न जातीतील, परंतु शरण झाल्याने समान सामाजिक पातळीवर आलेल्या या दोन व्यक्तींच्या मुलांच्या अनुक्रमे शीलवंत व कलावतीच्या विवाहाला बसवेश्वरासहित अनुभव मंटपाने परवानगी दिली. एवढेच नव्हे तर त्यासाठी विशेष पुढाकार घेतला त्यानुसार हरळय्या पुत्र शीलवंत व मधुवरस कन्या कलावती यांचा विवाह अनेक शरणांच्या उपस्थितीत अनुभव मंटपात मोठ्या थाटात पार पडला. हा प्रतिलोम विवाह असल्याने धर्मपंडितांनी याला आक्षेप घेतला. हा धर्म बुडवण्याचा एक भाग असल्याने वेळीच आवर घातला नाही तर धर्मसंकटात येऊ शकतो.म्हणून सनातन्यांनी राजा बिजल्लाकडे तक्रार केली. यासाठी महात्मा बसवेश्वरांना जाब

विचारण्यात आला. परंतु बसवेश्वरांनी राजापुढे न झुकता या आंतरजातीय विवाहाचा जोरदार पाठपुरावा केला. एवढेच नव्हे तर हा आंतरजातीय विवाह नसून दोन लिंगवंता मधील विवाह असल्याचे सांगून जातीयवादयापुढे नवा पर्याय उभा केला. परिणामतः सनातन्यांच्या धमकीमुळे राजा बिजल्लानी बसवेश्वरांना मंत्री पद सोडण्याचा आदेश दिला. यावेळी एका क्षणाचाही विचार न करता केवळ तत्वासाठी महात्मा बसवेश्वरांनी मंत्रीपदाचा त्याग केला.
या उदाहरणावरून महात्मा बसवेश्वरांनी प्रतिलोम विवाहाचा पुरस्कार केल्याचे दिसून येते. त्यांनी स्वतःच्या जीवनामध्ये सुद्धा अनुलोम विवाहाचा पुरस्कार केल्याचे दिसून येते. मंगळवेढ्यातील वयोवृद्ध मंत्री सिद्धरस पद्मौगंधी यांची एकुलती एक कन्या होती. 'नालांबिका' तिचे नाव होते. अतिसुंदर, सुस्वरूप व बुद्धिमान होती. मृत्युसमयी सिद्धरसाने राजपदावरील बिजल्लाला बोलावून आपली एकुलती एक कन्या 'निलांबिका' हिचा सांभाळ करण्यास व तिचा विवाह करण्यास विनवले. अशी ही नालंबिका बिज्जल राजाची मानलेली बहीण होती. राजा बसवेश्वरावर खुश होते. त्यामुळे त्यांनी आपली ही मानलेली बहीण निलांबिका हिचा बसवेश्वराबरोबर दुसरा विवाह थाटामाटाने लावून दिला. बसवेश्वर हे जन्माने ब्राह्मण होते व निलांबिका ही क्षत्रिय कन्या होती. यावरून महात्मा बसवेश्वरांनी प्रतिलोम विवाह केल्याचे दिसून येते.

**आंतरजातीय विवाहाची प्रासंगिकता:** आंतरजातीय विवाह म्हणजे एकाच धर्मातील परंतु भिन्न जातीच्या दोन व्यक्ती मधील विवाह होय. हे विवाह दोन प्रकारचे आहेत. एक अनुलोम विवाह व दुसरा प्रतिलोम विवाह होय. अनुलोम विवाहामध्ये उच्च वर्ण,जाती,कुल,वंश, उपजातील पुरुषाचे निम्न वर्ण, जाती, कुल,वंश, उपजातीतील स्त्रीशी होणारे लग्न तर प्रतिलोम विवाह म्हणजे उच्च वर्ण, जाती, वंश, उपजाती तील स्त्रीचे निम्न वर्ण,जात वंश व उपजातीतील पुरुषबरोबर होणारे लग्न होय. आजही आधुनिक काळामध्ये जातिभेद, लिंगभेद, अस्पृश्यता, आंतरजातीय विवाहास विरोध या समस्या सोडवता आल्या नाहीत. इ.स. 2011 च्या सर्वेनुसार फक्त 5.8 टक्के लग्न आंतरजातीय होत आहेत. इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटच्या इ.स. 2017 च्या सर्वेनुसार शहरी क्षेत्रात 4.9 टक्के तर ग्रामीण क्षेत्रात 5.2 टक्के लग्न हे आंतरजातीय पद्धतीने होत आहेत. गरीब समाजात 5.9 टक्के तर श्रीमंत समाजात4.0 टक्के विवाह आंतरजातीय पद्धतीने होत आहेत. या सर्वाचा विचार केला तर जो समाज स्वतःला सुशिक्षित शहरी व श्रीमंत समजत आहे त्यांनी अजूनही जातीभेदाला मूठमाती दिली नाही. भारतात सर्वात जास्त 55% अंतर जातिविवाह मिझोराम या राज्यात होतात तर मध्यप्रदेशात फक्त एक टक्का विवाह आंतरजातीय होत आहेत. भारताच्या संविधानामध्ये सुद्धा आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास मान्यता देण्यात आली आहे. संविधानाच्या स्पेशल मॅरेज अ‍ॅक्ट 1954 नुसार कोणत्याही भिन्न जातीच्या धर्माच्या व्यक्तीतील विवाह करता येत आहे. इ.स. 1917 साली नरेंद्र मोदी च्या केंद्र सरकारने आंतरजातीय विवाहासाठी आर्थिक मदत जाहीर केली आहे. यानुसार 2.5 लाख रुपये मदत जाहीर केली आहे. या विवाहाच्या जोडप्यातील एक व्यक्ती दलित असले पाहिजे. यावरून आजही भारतीय समाजामध्ये आंतरजातीय विवाहाला मान्यता दिली जात नाही.

**सारांश:** समाज व्यवस्थेमध्ये वर्णव्यवस्था जातीव्यवस्था ही खोलवर रुजलेली आहे. जात नाही ती जात असे म्हटले जाते. हे खरे आहे. महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकामध्ये जे कार्य केलेले आहे ते कार्य शाश्वत चिरकाळ टिकणारे आहे. कारण की आधुनिक समाजामध्ये जाती जाती मधे भेद केला जातो. बाराव्या शतकामध्ये आंतरजातीय विवाहाला पुढाकार घेणे हे महात्मा बसवेश्वरांच्या कार्यावरून आणि वर्तनावरून दिसून येते. अत्यंत अवघड अशा परिस्थितीमध्ये बाराव्या शतकामध्ये महात्मा बसवेश्वरांनी स्वतः अनुलोम विवाह केला व प्रतिलोम विवाह घडवून आणला. या प्रश्नाची जाणीव महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकामध्ये झाली होती. म्हणून त्यांचे हे कार्य जे आहे ते चिरंतन आहे. प्रत्येक काळामध्ये टिकणारे आहे आणि शाश्वत असे कार्य आहे असे म्हणावे लागेल.

**संदर्भ:**


*बिराजदार एम. एस., वचन विचार वाहिनी, वचन अध्ययन पीठ मंडळ, उदगीर जि. लातूर.*
*आंबेडकर भि.र., शूद्र पूर्वी कोण होते?, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद.*
*बीचेवर स.श., परिवर्तनाचा महामेरू महात्मा बसवेश्वर, स्वाती प्रकाशन, पूर्णा.*
*जुबरे रा.ब., शरण जीवन दर्शन, महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी.*
*लिगाडे जयदेवीताई, वचन दीप्ती महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी.*

# महात्मा बसवेश्वर: परिवर्तनीय योद्धा

**डॉ.कहाळेकर सी.एम.**

*लोकप्रशासन विभाग व संशोधन मार्गदर्शक, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,मुखेड ता. मुखेड जि नांदेड*

**प्रस्तावना :-** भारतीय इतिहासात महात्मा बसवेश्वर यांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक ,कौटुंबिक, क्रांतिकारक चळवळी व आध्यात्मिक सांस्कृतिक, बौद्धिक, नैतिक ,मानवी मूल्ये रुजविली. उच्च-नीच, श्रीमंत-गरीब, श्रेष्ठ-कनिष्ठ ,वर्ण ,अस्पृश्य यांच्यातील विषमता नष्ट करण्यासाठी स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुत्व विषयीचे विचार भविष्य काळात कसे साध्य होतील हे स्पष्ट केलेले आहे. महात्मा बसवेश्वर यांच्या जीवन चरित्राचा विचार केल्यास मानवाचा सूक्ष्म व शरीरावर व मनावर परिणाम होतो. ते मानवाच्या देहाशी निगडित असल्यामुळे आत्मिक परिवर्तन व त्यांच्या अंतकरणात आदर्श मानवी समाजाचे स्वप्न त्यांनी संपूर्ण मानवी जीवनाला सुसंस्कृत व सुखद असा जगण्याचा एक सत्य मार्ग, जीवनात कधीही आनंदमय मार्ग सापडणार नाही असे मत मांडले. भारताच्या इतिहासात महात्मा बसवेश्वर यांनी कर्नाटकात बाराव्या शतकाची असे काही विचार सांगितले की, ते मानवतावादाला अनुसरून आहेत ते सर्व काही अद्वितीयच आहेत. या विचारांची महती ही अतुलनीय स्वरूपाची आहे. असे म्हटल्यास वावग ठरणार नाही सत्य हे पवित्र नितळ शुद्ध नितळ नि सुंदर असे चिरंतन जीवन मूल्य निराकार आहे. याचे साकार रूप म्हणजे महात्मा बसवेश्वर यांचे जीवन दर्शन होय. महात्मा बसवेश्वर यांच्या सात्विक चिंतनात अंग-लिंग सामरस्याप्रमाणे लिंग-जंगम सामरस्य हे प्रमाणभूत मानले आहे. लिंगव्यक्तित्व हे व्यक्तिगत स्वरूपाचे आहे, तर जंगम व्यक्तित्व हे सामाजिक, सार्वजनिक स्वरूपाची आहे, व्यक्तिगत सत्याचरण हे जंगम व्यक्तित्वात सार्वजनिक सत्याचरणच म्हटले जाते. 'सत्य बोलणेच देवलोक','स्वरूपी शस्त्र धरून सदभक्त विजयी झाले.' बसवेश्वरांची ही सत्य दृष्टी अशी

'सत्य सर्वांचे आधी घर।  
सर्व धर्मांचे माहेर ।।  
सत्य सुखाला आधार ।  
बाकी सर्व अंधकार ।।'

बाराव्या शतकात कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्वर - बागेवाडी या गावात ११०५ साली प्रतिष्ठीत पशुपात शैव कम्मेकुलातील एका कुटूंबात जन्म झाला. काहींच्या मते तो इंगळेश्वर जि.विजापूर या गावी झाला असावा असे मत आहे. त्यांच्या जन्मकाळाविषयी मतभेद, असलेतरी सामान्यत;त्यांचा जन्म २५एप्रील११०५वैशाख शुध्द तृतीया अक्षय्य तृतीया दिवशी महात्मा बसवण्णांचा जन्म झाला. त्यांचे वडीलमदिराज आणि आईचे नाव मादलांबीका हे होते. भावाचे नाव देवराज व बहिणीचे नाव नागम्मा होते. वयाच्या आठव्या वर्षी ज्ञान मिळविण्यासाठी ते कृष्ण व मलप्रभा या नद्यांच्या संगमावरील कुडल संगम येथे गेले, ते पशुपात शैवांचे प्राचीन अध्ययन केंद्र होते. तेथे बसवेश्वरांनी बारा वर्ष वास्तव्य केले. कुडलसंगम येथे त्यांनी वेगवेगळ्या भाषा, धर्म, तत्वज्ञान इत्यादींचा अभ्यास केला. त्यांचा विवाह त्यांच्या मामाच्या मुलीशी झाला. तेंव्हा ते सोलापुरातील मंगळवेढा येथे आले. तेथे ते एकतीस वर्षे वास्तव्य केले.

**गृहितके -**

1) 12व्या शतकात समाजाच्या विरोधात जाऊन अनेक रुढी, परंपरा यांना विरोध केला.

2) स्त्रीयांसाठी अनेक क्रांतीकारी कार्य केले.

**संशोधन पध्दती** - प्रस्तुत शोध निबंधात व्दितीयक स्त्रोताव्दारे तथ्य संकलन केले आहे. यासाठी विषयानुरुप संदर्भ ग्रंथ लेख इत्यादीचा वापर केला आहे. तसेच जगतज्योती महात्मा बसवेश्वरांचे चारित्र्य, विविध संदर्भ ग्रंथ यांचा वापर केला आहे.

महात्मा बसवेश्वरांनी सांगितलेले उपदेश -

**१) एकदेव उपासना** - बाराव्या शतकाच्या काळात समाजातील लोक अनेक-अनेक देव देवींची उपासना करीत. हे कमी वाटले म्हणून अग्नी, पृथ्वी, सुर्य, चंद्र, जलदेवता, कुळदेवता, दशावतार, गणेण, काली, यल्लम्मा, रेणुकांबा इतकेच काय तर कुत्रा वानर, नाग, वाघोबा, गाय-बैल, मुंग्या हे प्राणी तसेच भिंती , गढ्या, किल्ले, विहरी, शेते, झाडे, नद्या-नाले यात राहणारे भूत-पिशाच्च, मैलार, मल्हारी, खंडोबा, मरीआई, मुंग्या, मातामाय इत्यादिची पुजा करीत. समाजातील ही अनेक देवांची उपासना करणे म्हणजे एकाही देवावर विश्वास नसल्या सारखे आहे. मग एकही देव प्रसन्न होणार नाही. म्हणून बसवेश्वरांनी एकाच देवावर विश्वास ठेवणारी भक्ती करा असा उपदेश केला.

**२) स्वर्ग-नरक विश्वात कोठेही नाही** - देवलोक, मृत्युलोक ह्या दोन्ही वसाहती आकाशात कोठेही नाहीत. जेथे सत्य, शील, करुणा, माणुसकी आहे तेथेच साक्षात स्वर्ग नांदतो आणि जेथे अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार आहे तोच नरक आहे. सदाचारच स्वर्ग आणि अनाचारक नरक होय.

**३) पाचही सूतके पाळू नका** - स्त्रियांच्या मासिक पाळीत जो स्त्राव पाझरतो तो स्त्री ही प्रजननासाठी सक्षम आहे त्याचे घोतक आहे. मातृत्वाशक्ती गौरवांकीत करणारा विटाळ हा अपवित्र कसा असू शकतो? म्हणून बसवेश्वर म्हणतात ऋतुस्नात, विटाळशी, रजस्वलेला अस्पृश्य समजू नये. तसेच इतर जातींचा विटाळ, उष्टे खाण्याचा विटाळ, मृत्युचा विटाळ, जन्माचा विटाळ ही पाचही सूतके पाळू नयेत. मात्र स्वच्छता ठेवावी व काळजी घ्यावी.

**४) पुनर्जन्माचे आमिष दाखविले नाही** - समाजात हा गैरसमज पसरविण्यात आलेला आहे की, सध्या मिळालेले जीवन हे मागच्या जन्मीचे पाप आहे. पुढच्या जन्म वैभव संपन्न घरात घ्यावयाचा असेल तर पुण्य गोळा करण्यासाठी व्रतवैकल्ये, उपवास करा. तीर्थयात्रा, नद्यात स्थान, सुवर्णदान, गोदान, भूमीदान, दानधर्म करा, देवळे बांधा, या जन्माची कर्मफळे पुढच्या जन्मात भोगावी लागतात. यालाच कर्मविपाक सिध्दांत म्हणतात. बसवेश्वरांना हे मान्य नाही. त्यांनी स्वर्गाचे अमिष व नरकाची भिती दाखवली नाही. बसवेश्वरांना मेल्यानंतरच्या जीवनाच्या केलेल्या कल्पना मान्य नाहीत.

**५) पृथ्वीलाच स्वर्ग बनवू या** - आपण जन्मालो ते हे दिसणारे अनुभवास येणारे जग खोटे नाही. मिथ्या किंवा लटके नाही. म्हणून आपण राहातो त्या पृथ्वीवरच घाम गाळून परिश्रम करुन सुखे निर्माण करु या असा भौतिकवादी, इहजीवनवादी विचार बसवेश्वरांनी मानवजातीला दिलेला आहे. स्वर्गाचे आमिष, प्रलोभन व नरकाची भीती त्यांनी लोकांना दाखबली नाही. कायक करण्याचे श्रम केल्यानेच पृथ्वीचा स्वर्ग होऊ शकतो हा मानवतावादी विचारच लोकांना सुखात ठेवू शकतो.

**६) संन्यास घेऊ नये, भिक्षावृत्तीचा निषेध** - इंद्रिय दमनाने विषय विकार वाढतात. चांगल्या विचार-भावनावर दाबलेले विषय विकार कुरघोडी करतात. म्हणून तारुण्य आल्यावर विवाह करावा, परंतू आजन्म अविवाहीत राहणे, परमेश्वर प्राप्तीसाठी संन्सास घेणे, सर्वसामान्य व्यक्तीसाठी योग्य नव्हे. ज्यांच्या आपल्या विकारांवर ताबा आहे, योग बळाने ज्यांना मनाला नियंत्रित करता येते, अशा निग्रही, ध्येयवादी, सिध्दीप्राप्त योगींनी समाजाच्या कल्याणासाठी सन्यास व्रत अवश्य धारण करावे. एखाद्या चांगल्या समाज कार्यासाठी उच्च ध्येय प्राप्तीसाठी समर्पित भावनेने कार्य करावयाचे असेल अशांनी अविवाहित राहून संन्याशी जीवन जगावे. बसवेश्वरांनी संन्यास घेणे बंधनकारक न ठेवता ऐच्छिक ठेवलेले आहे. संन्यास घेतल्याने पत्नी व मुले यांच्यावर अन्याय होतात, भिक्षा मागतात म्हणून भिक्षा मागून जगणा-यांचा त्यांनी निषेध केलेला आहे.

**७) अंधश्रध्दा नाहिशा केल्या** - बसवेश्वर म्हणतात, देवाला प्रसन्न करण्यासाठी मुक्या प्राण्यांचे बळी देऊ नका. होम हवनात गरिबांना न मिळणारे दुध, तुप, दही, लोणी, वस्त्रे, टाकू नका. व्रत, वैकल्ये, नवस प्रायश्चिताचे विधी,

उपास-तपास करुन शरीराला कष्ट देवू नका. देवदेवतेला पोटच्या मुली अर्पण करुन त्यांना देवदासी, जोगतीणी, भावीण, गणिका, मुरळी, आराधिनी, कसबिणी करु नका.

**८) पाप-पुण्याच्या कल्पना मानवाला निष्क्रीय करतात -** आपल्या नशिबी आलेली दु:खे, संकटे, मंदबुध्दी, दारिद्य हे मागच्या जन्मीच्या पापाचे फळ आहे ते म्हणे ब्रम्हलिखीत असते. ते अपरिवर्तनीयच असते. यावरच्या विश्वासामुळे श्रध्दाळू माणूस या जीवनात कोणतेही परिश्रम, प्रयत्न व साहस करीत नाही. कारण कितीही प्रयत्न केले तरी ब्रम्हलिखीत बदलणारच नाही तर प्रयत्नच कशाला करावा? परिणामी माणूस आत्मविश्वास गमावून निष्क्रीय होतो. मग इतर सुलभ मार्गाने म्हणजे गुप्तधन कसे मिळेत, जुगारातुन पैसे कसे मिळतील असे विचार त्याच्या मनात निर्माण होतात. म्हणून पाप-पुण्याच्या कल्पना झुगारुन द्यावयास पाहिजे. परिश्रमामुळेच आपले जीवन बदलू शकते यावर प्रत्येकाचा विश्वास असावा.

**९) शकून-अपशकून, तिथी, नक्षत्रे यावर विश्वास ठेवू नका -** शकून-अपशकून, मांजर आडवी गेली, तारा निखळला, कावळा ओरडला, मध्यरात्री कुत्रा वेल्हाळला, पाल चुकचकली, घुबडाचा घुघुत्कार यावर विश्वास ठेवू नये.लग्न जुळवितांना आई-वडील, नातेवाईक वधु-वर शरण यांना जे मान्य तोच शुभयोग समजावा. राशीकुट, गुण, ग्रह, नक्षत्रे, जुळली आहेत असे समजावे.

**१०) गुन्हेगारांना सभ्य समाजात आणले -** जन्मत: सर्वच लोक निष्पाप व चांगले असतात, परंतू वाईट मित्रांच्या संगतीमुळे, दारिद्रयामुळे, रोजच्या गरजा पुर्ण न झाल्यामुळे, पोटच्या भुकेमुळे, आपत्यांना खायला मिळत नसल्यामुळे स्त्रिया-पुरुष अनैतिक व्यवसायाकडे वळून चोर, गुन्हेगार बनतात, मुली देवदासी, मुरळया, वैश्या बनतात. त्यांना चांगले समजाविले, उपदेश केला (समुपदेशन) चांगले वागविले तर वाईट लोकही सभ्य होऊन प्रतिष्टीत चांगले जीवन जगू शकतात यावर बसवेश्वरांचा विश्वास होता. त्यामुळे त्यांनी दारु गुत्तेदार मारय्या, गायचोर उरिलिंगपेद्दी, काश्मिरचा मारेकरी चिक्कच्या, संकव्वा (पुर्वायुष्यातील वेश्या) यांना सभ्य समाजात आणून कायक (कर्म) करण्यास दिले आणि अनुभव मंटपाचे सदस्य केले.

**११) नागिदेव कांबळे या अस्पृश्याकडे भोजन -** महामंत्री बसवेश्वर समाजातील शुद्र समजल्या जाणा-यांच्या घरी जात. त्यांचे भोजन प्रसाद स्वीकारित असत. बसवेश्वरांच्या आचरणाने व कृतीने प्रभावित होऊन अनेक शुद्रांनी अनेक देवांची पुजा सोडून इष्टलिंग भक्ती स्वीकारली. एक दिवस नागिदेव कांबळे या अस्पृश्यानेही त्यांना भोजनाचे निमंत्रण दिले. गावकुसाबाहेरची अनेक स्त्री-पुरुष मंडळी सहभागी झाली होती. कर्मठ लोक वाकून खात्री करुन घेऊ लागले. बसवेश्वरांनी दुर्लक्ष केले आणि जमलेल्या स्त्री-पुरुषांना इष्टलिंग भक्ती स्विकारण्यास सांगितले. रोज अनुभव मंटपात यावयास सांगितले. बसवेश्वराने अस्पृश्य नागिदेव कांबळे यांच्याकडे भोजन करुन आपल्या कृतीतून व आचारातून समाजात जातीभेद पाळू नका असा चांगला संदेश दिला.

**१२) स्त्रियांना स्वातंत्र्य -** स्त्रियांना शिक्षण घेण्याचा, दिक्षा घेण्याचा, संपत्ती घेण्याचा, राजसत्ता सांभाळण्याच्या, पतीची निवड करण्याचा, विधवांना विवाहाचा, घटस्फोटाचा हे सारे अधिकार नव्हते. स्त्रियांची संपत्ती सारखी देवाणघेवाण होई. कर्मठ लोकांनी तिला व्रतवैकल्ये, उपासतपास इतर कर्मकांडातच आजन्म गुंतवून ठेवले.

बसवेश्वरांना या गुलामी प्रथेची कल्पना होतीच. पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही मन, भावना, बुध्दी, शक्ती असते याची जाणीव असल्यामुळे तिला विकासाच्या संधी उपलब्ध करुन दिल्या. स्त्रियांची पाचही सुतकातून मुक्ती केली. अनुभव मंटपातील स्त्रियांना लिहिणे, वाचणे शिकवून साक्षर केले. जे वाटते ते मत अनेक स्त्री-पुरुषांच्या समोर हिमतीने व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य बहाल केले. स्त्रिया वाद-विवादात सहभागी होऊ लागल्या. स्वाभिमानाने आपले विचार वचन काव्यातून व्यक्त करु लागल्या. अर्थार्जनाची कामे (कायक) करु लागल्या. बसवेश्वरांनी बाल विवाहाला विरोध केला. पुनर्विवाह, आंतरजातीय विवाहाला, विधवांच्या विवाहाला प्रोत्साहन दिले. कल्याण क्रांतीत वचन साहित्याला राज्याच्या सैनिकांनी आग लावल्यावर त्यातून बरेच वचन साहित्याचे गठ्ठे सातशे किलोमीटर अंतरावरील डोंगर कपारीत दुर्गम जंगलात उळवी (जि.उत्तर कन्नड) येथे सुरक्षित नेले. केवढी ही वचननिष्ठ व ज्ञाननिष्ठा अनुभव मंटपातील अनेक स्त्रियांनी विविध प्रकारचे उद्योग, व्यवसाय सुरु केलेले होते. उदा : सूत कातणे, सौंदर्य प्रसाधने

विकणे, धान कोंडणे, तेलघाणी चालविणे, सुतार काम, स्त्री-पुरुषांना लिहणे-वाचणे शिकविणे, ज्ञानदान करणे इ.बसवेश्वरांनी स्त्रियांना स्वावलंबी, कर्तव्य कठोर व स्वाभिमानी बनवून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला.

वरीलप्रमाणे भेदभावामध्ये होरपळलेल्यांचा आणि गरिबीत खितपत पडलेल्यांचा कैवारी होणे होय. मानवांच्या घनतेस (श्रेष्ठत्वास) उचलून धरणे होय. सर्व प्रकारच्या भेदभावांच्या निर्मूलन कार्यात सहकार्य करणे होय. या पृथ्वीस सकल जीवात्म्यांचे महाविवास व माहेर होण्यालायक करणे होय. कायकाव्दारे अर्थात शरीरिक श्रमामुळे येणारे अनुभव आणि आपल्या सारखेच इतरांना समजण्यासाठी दासोह करणे. या सा-यातून अनुभवासंगे समाधानाने जगणे होय. असे महात्मा बसवेश्वरांचे क्रांतीकार्य दिसून येते.

**निष्कर्ष** -

1) स्त्रीयांसाठी महात्मा बसवेश्वरांनी केलेले कार्य अप्रतिम स्वरुपाचे व चिरकाल आहे.

2) समाजातील विविध अंधश्रध्दा दूर करण्याचे महान कार्य बसवेश्वरांनी केले.

3) बसवेश्वरांनी केलेले क्रांतीकार्य आजही समाजामध्ये त्यांच्या कार्यरुपाने दिसून येतात.

**संदर्भसूची:-**

*डॉ. सुर्यकांत घुगरे : जगत्ज्योतीबसवेश्वर, महाराष्ट्र बसव समिती, नांदेड - 2003*
*भगत रा. तु. : संत साहित्य आणि अंधश्रध्दा निर्मुलन, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर - 2002*
*डॉ. राजेश्वर सोलापुरे : लिंगायत एकस्वतंत्र धर्म, अरुणा प्रकाशन, लातूर - 2013*
*रमजान दर्गा : बसवेश्वरांचा विश्वसंदेश, महाराष्ट्र बसव परिषद, भालकी, सातवी आवृत्ती - 2018*
*डॉ. अशोक ग. मेनकुदळे : महात्मा बसवेश्वर, महाराष्ट्र बसव परिषद भालकी, तीसरी आवृत्ती - 2019.*
*डॉ.एच.थिप्पेरुद्र स्वामी : बसवेश्वर, साहित्य अकॅडमी, नई दिल्ली - 1982*
*दुर्गा भागवत : धर्म आणि लोक साहित्य, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई - 1975*
*प्रा. भिमराव ब्रम्हाजीराव पाटील : ऐतिहासिक बसकल्याण पर्यटन मार्गदर्शिका, शरण साहित्य मंडळ लातूर – 2014*

# MAHATMA BASWESHWAR: FATHER OF SOCIAL REVOLUTION

**Dr. Hatode Kirtiratna B.**
*Dept.of English, Mahatma Jyotiba Phule Mahavidyalaya, Mukhed*

***Abstract***

*Mahatma Basweshwar was a very eminent social reformer and philosopher in the 12th century in Karnataka. Through his vachanas and sharanas (Small poems} he spread his humanistic principles and tenets which were all humanitarian. His contribution towards humanity in all was extremely praiseworthy. He sacrificed the traditional shaivism and embraced a novel and revolutionary shaivism, which encompassed equality to both men and women, in- discrimination between higher class and lower class, sacrifice to temple worshiping. He advocated that God does not reside in temples; instead, He resides in man's physique. He resembles Mahatma Jyotiba Phule, Rajarshi Shahu Maharaj, and Dr. Babasaheb Ambedkar in his modern and revolutionary thoughts.*

***Keywords:*** *vachnas, sharanas, anubhavamantapa*

Mahatma Basweshwar was born in 12th century wherein society was scattered on a larger scale. Every cast had certain allocated profession. There were four principal social classes: Brahmin, Kshetriya, Vaishya and Shudra. All these social classes were allocated certain tasks. The lowest class was Shudra who had to do a very shoddy work. They were considered untouchables. The Brahmins were supposed to perform various rituals in temples. They had privilege to learn and perform educational tasks. These people used to look down upon other classes. Brahmins had their certain principles to abide by. But since they didnot abide by their tenets, Mahatma Basweshwar criticised the Brahmins due to their hypocritic nature and behaviour. As far as religions in Karnataka were concerned, there were many like Jain, Vaishnav. Shaiv, Boudha. Every religion had their particular, individual history. In Karnataka during the 12th century, Shaivism was the most popular religion. Those who worship God Shiva are known to be the followers of Shaivism. There are many sects and sub-sects in shaivism. Mahatma Basweshwar was completely against the traditional shaivism which advocated many dogmatic conventions. He criticised various meaningless traditions and traditional behaviours. He advocated that his followers should not build temples to worship God because according to him God does not reside in temples. Instead God resides in our physique. So he insisted on the physique instead of temples. Mahatma Basweshwar had his faith quite internal. His philosophy resembles that of Saint Tukobaray who said 'body is temple, soul Pandharinath.' He asked his followers to sacrifice superstitions. He believed that to perform religious ceremonies, man does not need astrologers. He defined untouchables in the following words…

One who kills is sinful,
One who eats stale meat is of lower caste,
One who loves the whole mankind
Is from supreme birth.

Mahatma Basweshwar prevented his followesr from getting tempted toward wealth. His reformational work was really revolutionary. He always hated those who run after more money and self pride. He believed in 'work is worship.' He said that in order to earn a livelihood, Man should do any kind of work or profession. He said asking for alms is a great sin. His ideology of 'work is worship' is in line with Raja Ram Mohan Roy, Mahatma Jotiba Phule, Rajarshi Shahu Maharaj, Mahatma Gandhi, Dr. Babasaheb Ambedkar. To say that Mahatma Basweshwar is a modern revolutionary reformer is not incorrect. His contribution towards women empowerment is also highly considerable. In the 12th

century, women did not have right to get education. The higher class kept women far away from reading and learning of religious scriptures. They were not independent and had no equality as compared to men. Therefore Mahatma Basweshwar insisted on women's education, their freedom to speak, permission to their spiritual worship, He inspired women to do various professions. Since he was a proponent of women's equality, almost 32 women wrote vachnas. The vachnas of Akkamadevi, Rani Mahadevi, Muktakka, Revamma, Lakamma, Gangabica are some famous ones. Mahatma Basweshwar was a proponent of truth and justice. The tenets and principles that his vachnas and sharanas illustrate were far beyond their age. The minds of dogmatic people never liked his thoughts and so they always opposed his principles. But Mahatma Basweshwar never hated these people and their tendency never did he resist them because he knew that whatever he was doing was in line with truth and Justice. He made very brave efforts to eliminate superstition, sainthood, homehavanas, sacrificial custom, fasting conventions. In order to discuss ideological meditation and address the problems of underprivileged people, Mahatma Basweshwar established a novel, social and cultural forum named Anubhavamantapa. There were 777 members in this forum in which there were 77 women. The issues related to all the affected people were discussed and solutions used to be sought. These members never maintained any discrimination on the basis of caste, religion, sect, gender, age, class, profession, language etc. Maharashtra's Dnyaneshwarkar and Dr. Shridhar Venkatesh Ketkar said that had Mahatma Basweshwar's principles been circulated and spread throughout India, he would have received the credit to first implement the principles. To sum up in a nutshell, Mahatma Basweshwar was, after Gautam Buddha was the first person to initiate the age of social Enlightenment. He was a great modern philosopher who fought for the equality, independence for women and lower class people. His vachnas and sharanas are very inspirational and are not confined to only one religion, On the contrary, they are useful for the whole humanity.

**References:**

*Mahatma Basweshwar: Work and Achievement- Subhash Deshpande; Janshakti Vachak Chalval*
*Mahatma Basweshwar: Somnath Rode; Vidyabharti Prakashan*
*Basav Siddhant: Prof. Baburao Mashalkar; Maharashtra Basav Parishad Prakashan*

# समतावादी जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर

**डॉ.केरबा कांबळे**

*(एम.ए., एम.एड, नेट, पीएच.डी.), विषयतज्ज्ञ पंचायत समिती, मुखेड*

**प्रस्तावना :** 'ज ायज वे जै लास' व 'दासोह' या क्रांतिकारी तत्त्वज्ञानाचे निर्माते, जगातील पहिली संसद संबोधल्या जाणाऱ्या अनुभव मंटपाचे संस्थापक, धर्मसंस्थापक, आपल्या कार्य कर्तृत्वातून अख्ख्या जगाला शांतीचा संदेश देणारे महात्मा बसवेश्वर यांचा जन्म मंगळवेढा राज्यातील बागेवाडी या छोट्या गावात मडगी मादिराज आणि मादलांबिका या पाशुपत शैव कम्मे कुळातील दाम्पत्याच्या पोटी २५ एप्रिल ११०५ मध्ये अक्षय तृतीयेच्या दिवशी झाला. महात्मा बसवण्णा या नावाने ओळखले जाणारे बसवेश्वर हे मादिराज व मादलांबिका यांचे तिसरे सुपूत्र. महात्मा बसवेश्वरांच्या जन्मतारखेच्या बाबतीत मतभेद होते पण डॉ.पी.बी. सावंत यांच्या संशोधनानुसार हेच वर्ष ठरवले गेले. भारतात समाजसुधारकांची वैभवशाली परंपरा दिसून येते. या परंपरेतील अग्रगण्य नाव म्हणजे महात्मा बसवेश्वर होय. महात्मा बसवेश्वर वीरशैव धर्माचे पुनरुज्जीवन करणारे महान विभूती होते. समता हे प्रमुख सूत्र महात्मा बसवेश्वरांच्या धर्मप्रसारात आहे. बालविवाहाला विरोध हा एक बसवेश्वर महाराजांचा महत्त्वाचा संदेश जगाला दिलेली देण आहे.

**महात्मा बसवेश्वरांचा आर्थिक समतावाद:** बसवेश्वरांच्या काळात समाजात अनाचार, अंधश्रद्धा वाढली होती. समाजात अनिष्ट प्रथा परंपरांचे स्तोम माजले होते. त्यामुळेच समाजातील गरीबी दूर करून समाजात आर्थिक समृद्धता आणण्यासाठी त्यांनी 'ज ायज वे जै लास' आणि 'दासोह' यांचा पुरस्कार केला. सामाजिक सलोख्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा प्रयोग होता. समाजातील गरीबी दूर झाली तर आपोआपच मानवाचा, समाजाचा देशाचा विकास होण्यास वेळ लागत नाही. त्यामुळे बसवेश्वरांनी त्या काळातच गरिबी हटावची सुरुवात केली असे म्हणता येईल. महात्मा बसवेश्वरांनी या विचारासोबतच जनेला ऐतखाऊ प्रवृत्तीपासून सुद्धा दूर ठेवला आले पाहिजे. जेव्हा मोफत दोन वेळचे अन्न दिले जाईल त्याच्या मोबदल्यात श्रम किंवा कार्यमग्न ठेवावे याचाच अर्थ ऐतखाऊ वृत्तीकडून कायकवादाकडे पाऊल टाकून गरीब जनतेचा विकास होईल असे मत मांडले. कष्टाने आणि प्रामाणिकपणे मिळविलेल्या मिळकतीचा काही भाग समाजातील गरजूंसाठी वापरला पाहिजे असे मत त्यांनी मांडले.महात्मा बसवेश्वरानी 'ज ायज वे जै लास' (Work is heaven) या संदेशात 'शारीरिक श्रम आणि कोणताही व्यवसाय हेच स्वर्ग आहे, कैलास आहे' असे म्हटले आहे. श्रमप्रतिष्ठा जपली पाहिजे. श्रमप्रतिष्ठेबरोबरच गरजेनुसार संपत्तीची विभागणी झाली पाहिजे असे मत ते व्यक्त करतात. म्हणूनच त्यांनी याला कृतीची जोड दिलेली दिसून येते. त्यांनी श्रमाला आणि श्रमिकाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिलेली दिसून येते.

**विधवांच्या पुनर्विवाहाला मान्यता देऊन भरीव सामाजिक योगदानः** सर्व मानव समान आहेत. याचा अर्थ स्त्री व पुरुष हे दोन्ही समान आहेत. असे महात्मा बसवेश्वरांचे मत होते. त्यामुळेच त्यांनी स्त्रियांना लिंगदिक्षा हा अधिकार पुरुषांप्रमाणेच मिळवून दिला. परिणामी स्त्रियांना धार्मिक स्वातंत्र्य प्राप्त झाले. स्त्री पुरुष यांच्यात भेद करणारा उपनयन संस्कार बसवेश्वरांनी नाकारला. आपला त्रास आपल्या आईवडिलांना होऊ नये म्हणून वयाच्या आठव्या वर्षी त्यांनी गृहत्याग केला. नंतर त्यांनी स्त्रियांच्या प्रश्नाला महत्त्व देऊन विधवा पुनर्विवाहाला मान्यता देण्यासाठी संघर्ष केला. त्यांनी अनेक महिलांना समक्ष केले. निर्णय प्रक्रियेतील त्यांचा सहभाग वाढविला. महात्मा बसवेश्वरांच्या अनुभव मंटपातील चर्चेत स्त्रिया पुरुषांबरोबर सहभागी होत असत. विविध विषयांवर आपले मत मांडत, वादविवाद करत असत. बालविवाह झाल्यास बालमातांचे मृत्यू,बालके अपंग जन्मून अविकसित समाज निर्माण होईल. त्यामुळे त्यांच्या 'सर्व असती एकच तुम्हाला जाणून घेण्यासाठी कुडलसंगम देवा' या मतानुसार विधवांना पुनर्विवाह करण्यासाठी प्रयत्न करून विधवांना या कर्मठ संस्कृतीच्या बाहेर काढून महिलांना मुक्त केले व विधवांचे पुनर्वसन केले. महिलांना सर्वाधिज ार मिळवून दिले.

**अंधश्रद्धा, कर्मकांड, जातीयता यावर कठोर प्रहारः** बसवेश्वरांनी अंधश्रद्धा, कर्मकांड, जातीयता, व्रत, बळी, उपास याला कडाडून विरोध केला. भोळ्या मनोवृत्तीतून अंधश्रद्धा जोपासली जाते आणि त्याचे समाज जीवनावर वाईट परिणाम होतात तो समाज विकासातील अडथळा ठरतो त्यामुळे त्यांनी आपल्या अनुयायांना मंदिर न बांधण्याचा सल्ला दिलेला आहे म्हणून बसेवश्वरांचे मंदिर देशात कुठेही पहायला मिळत नाहीत. याबद्दल ते म्हणतात, 'देवालयापेक्षा देहालय श्रेष्ठ आहे'

एका वचनात बसवेश्वर म्हणतात-

'दगडाचा देव नव्हे, मातीचा देव नव्हे
वृक्षदेव देव नव्हे, सेतुबंध रामेश्वर
अन् इतर क्षेत्राचा, देव देव नव्हे
देव तुमच्या अंतर्यामी, हे कूडलसंगमदेवा।।'

यावरून महात्मा बसवेश्वरांच्या विचारांची स्पष्टता दिसून येते.

अंधश्रद्धा, जातीयता, व्रतवैकल्ये, बळी यांपासून समाज मुक्त करण्यासाठी समाजाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी महात्मा बसवेश्वरांनी 'अनुभव मंटपा'ची स्थापना केली. या मंटपाच्या माध्यमातून वचन साहित्याची विपूल प्रमाणात निर्मिती झाली. या सर्व जातीधर्मांतील लोकांकडून वचने लिहिली गेली. जी मानवी जीवनाकरिता अत्यंत मार्गदर्शक आहेत. विशेष म्हणजे यात स्त्रियांचा सहभाग उल्लेखनीय होता. विशेषतः वेद, पुराण, देव, आत्मा, स्वर्ग, पुनर्जन्म या बाबी नाकारल्या गेल्या. विविध जाती धर्मातील लोकांना सोबत घेऊन महात्मा बसवेश्वरांनी सुधारणावादी, समतावादी लिंगायत धर्माची स्थापना केली.

**सारांशः** महात्मा बसवेश्वर एक विद्वान समतावादी मानव धर्माची जोपासना करणारे महान विभूती आहेत. एक ज्ञानी व्यक्तिमत्त्व, मानवाचा विकास होण्यासाठी धडपडणारे वेदशास्त्र व धनुर्विद्येत तरबेज, इतर कलांतही पारंगत, परखड विचार व्यक्त करणारे होते. मानवतावादाची शिकवण देणारे परिवर्तनाचे महामेरु म्हणजे महात्मा बसवेश्वर होत. समाजातील अंधविश्वास, जातिभेद, वर्णभेद, असमानता, विषमता, अनिष्ट रुढी, बहुदेवोपासना, शोषण याविषयी समाजात जनजागृती करून समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

**संदर्भ**

*महात्मा बसवेश्वर-अशोक कामत*
*वचन-डॉ.एम.एम. कलबुर्गी*
*शरण जीवन दर्शन - राजु ब. जुबरे*
*ञ ांतिकारी युगप्रवर्तक - डॉ.अशोक मेनकुदळे*
*महात्मा बसवेश्वर - कार्य आणि कर्तृत्व- सुभाष देशपांडे*
*इंटरनेट व जयंती उत्सव पत्रिका महाराष्ट्र शासन*

## मानवी हक्क आणि जगत्ज्योती महात्मा बसवेश्वरांचे तत्व

**प्रा. डॉ. कलवले गोविंद केरबा**
*क्रीडा संचालक, के. टी. पी. महाविद्यालय, हाडोळती, ता.अहमदपूर जि. लातूर*

**प्रस्तावना -** मानवी हक्क म्हणजे सामाजिक दृष्ट्या वंचित वर्गाचा विकास वयोवृध्द, कामगार, विकलांग व्यक्तींचे कल्याण होय. भारतीय समाजात ऐतिहासिकदृष्ट्या व्यवसायावर आधारित जातींची उतरंड बघायला मिळते. यामध्ये समाजातील स्थान पारंपारिक व्यवसायावरुन ठरत असे. तथाकथित अस्वच्छ किंवा दूषित व्यवसाय करणा-यांना अस्पृश्य समजले गेले आणि अशा समुदायांना कायमच सामाजिक, अर्थिक, शैक्षणिक हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले. त्यामुळे या समुदायाचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक मागासलेपणा वाढतच गेले. 26 जानेवारी 1950 रोजी अस्तित्वात आलेल्या भारताच्या राज्यघटनेत अस्पृश्यता नष्ट करुन सामाजिक दृष्ट्या वंचित असलेल्या गटांसाठी समानता प्राप्त करण्यासाठी तरतुदी करण्यात आल्या. सामाजिक दृष्ट्या वंचितवर्गाच्या विकासासाठी महत्वाच्या तरतुदी करण्यात आल्या. यासाठी घटनेच्या कलम 341, कलम 340 वेळोवेळी सिध्द झालेल्या कायद्यान्वये या समाजातील जातींचा किंवा जमातींचा निर्देश स्पष्ट करण्यात आले आहेत. महात्मा बसवेश्वरांनी जातीपातींच्या भिंती गाढुन तत्कालीन समाज व्यवस्थेला एक वेगळीच ओळख दिली होती. त्यांनी शोषणविरोधी, भेदभाव विरोधी, जातीभेदा विरोधी, जेष्ठ-कनिष्ठ विरोधी समतेची लढाई नुसती लढली नाही तर ती यशस्वी करुन दाखवली. महात्मा बसवेश्वर यांचा जन्म 1105 मध्ये बागेवाडी जि.विजापूर कर्नाटक येथे वैशाखातील अक्षय तृतीयला झाला. (जन्म तारीख आणि वर्ष या विषयी मतभेद आहेत पण खूप संशोधनाअंती इतिहास संशोधक डॉ. पी. बी. सावंत यांनी 1105 हेच वर्ष ठरवले आहे.) दरवर्षी त्याच दिवशी देशभरात बसव जयंती साजरी केली जाते, खास करुन कुडलसंगम (कर्नाटक), कपीलधार, (महाराष्ट्र), बसव कल्याण (कर्नाटक) येथे ही जयंती जोरदार साजरी केली जाते. 1913 मध्ये कर्नाटक गांधी म्हणून ओळखले जाणारे हेर्डेकर मंजप्पा यांनी दावणगेरे (कर्नाटक) येथे पहिली सार्वजनिक बसव जयंती साजरी केली.

**गृहितके -**

1) भारतात मानवी हक्का संदर्भात कायद्यात तरतुद करण्यात आली आहे.

2) 12 व्या शतकात मानवी हक्का संबंधी महात्मा बसवेश्वरांनी केलेले कार्य हे एक क्रांतीकारी, समाजाच्या विरोधात जाऊक केलेले अप्रतिम कार्य होय.

**संशोधन पध्दती** -सदरील शोध निबंधात व्दितीयक स्त्रोताव्दारे तथ्य संकलन केले आहे. यासाठी विषयांनुरुप संदर्भ ग्रंथ, लेख, वर्तमानपत्रातील लेख इ.चा वापर केला आहे. तसेच जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर यांचे चारित्र्य, विविध संदर्भ ग्रंथ यांचा उपयोग केला आहे.

**मानवी हक्क आणि महात्मा बसवेश्वरांचे तत्व -** स्त्री असो वा पुरुष, गरीब असो वा श्रीमंत किंवा सवर्ण असो वा अस्पृश्य, जगातील सर्व मानव हे देवाच्या चैतण्याने रसरसलेले आहेत हे जंगमलिगांच्या घोषणेव्दारे प्रतिपादन केले शिवाय असमानता ही कृत्रिम असल्याचे जाहिर केले त्यामुळे बसवण्णांच्या शरण संकुलात अस्पृश्य महिला, गरीब आणि सर्व प्रकारचे कायक जीवी सर्वसमानतेचा भाव प्राप्त करु शकले. म्हणून बिज्जळ राजाचे मंत्री असलेले ब्राम्हण मधुवरस हे शरण झाल्यामुळे नीचकुळातून मुक्त झाले. अशा विविध जातींचा संकर झालेले शरणसंकुल म्हणजे सर्व रीतीने असमानतेला पायदळी तुडवून मानवी हक्कांचा ध्वज जगाच्या पाठीवर फडकविणारा समाज निर्माण झाला. या शरण संकुलात सर्वांनी आपल्या व इतरांच्या जातींना अंतर्मनातून मिटवून आपआपल्या कायकाचा सांभाळ केला. नवरा-बायकोतील उच्च-नीचतेचे अनुच भाव निघुन गेल्यामुळे समानतेचे साहचर्य भाव उगम पावले. अशा त-हेने, वर्ग, वर्ण, जात कुळ, कायक अर्थात उद्योग-धंदा आणि लिंगभेदाचा लवलेश नसलेला समाज निर्माण केल्याची व

साधल्याची ही एक मानवी इतिहासातील अद्‌भूत घटना म्हणावी लागेल. मानवी हक्कांच्या बाबतीत जागतिक घोषणापत्रातील सर्वच्या सर्व मुद्दे खालील अवतरणांमध्ये (कंसा मध्ये) बसव तत्वांचे विचार व सिध्दांत सूचित करण्यात आले आहेत.

1) मानवी हक्काच्या घोषणापत्रातील सर्व हक्क आणि स्वातंत्र्य हे सर्वांसाठी समान आहेत - (हा कोणाचा, हा कोणाचा, हा कोणाचा असे न म्हणवी देवा. हा आमचा, हा आमचा, हा आमचा असे म्हणवी देवा, कंडलसंगमदेवा असे बसवेश्वरांनी सांगितले आहे. शिवाय घोडेस्वारांना चामर धरल्याने पाहून जाऊन शिरसाष्टांग नमस्कार घालून पाय धरतात. गरीब बिचारा भक्त आलेला पाहुन "वेळ नाही, हो बाजुला" असे म्हणतात. अशा त-हेने बसवण्णांनी आपला सात्विक, कोप देखील व्यक्त केला आहे.)

2) सर्व मानव जन्माने स्वतंत्र होत आणि दर्जा तसेच हक्कांनी समान होत - (कूडलसंगमदेवाचे शरण हे स्वतंत्र व धीर होत असे आपल्या वचनात बसवण्णानी सांगीतले आहे. शिवाय आपल्या आचरणाव्दारे ही सिध्द केले. आमच्या कुलतिलक मांतग चेन्नय्या तुमच्यापेक्षा आधिक्य होय पहा कुडलसंगमदेवा अशा रीतीने मानवाचे घनत्व (श्रेष्ठत्व) उचलून धरले आहे.)

3) प्रत्येकाला जगण्याचे स्वातंत्र्य असल्याचा आणि स्वसंरक्षणाचा हक्क आहे - (शिवभक्त होऊन भक्तिपक्ष नसे तर त्यात, तर कावळया-कोंबड्याहून होत अतिहीन कूडलसंगम देवा असे बसवेश्वरांनी समजावून सांगितले आहे. या वचनाव्दारे बसवेश्वरांचा भक्तिपक्ष हा प्रत्येकाला जीवन जगण्याचा, स्वातंत्र्य उपभोगण्याचा आणि स्वरक्षणाचा हक्क मिळवून देतो.)

4) गुलामगिरीला अवकाश नाही - (दासीपूत्र असो, वेश्यापुत्र असो, शिवदीक्षा घेतल्यानंतर तो साक्षात "शिव" असे समजून त्यांना वंदन करावे आणि त्यांची पूजा करुन, पादोद्दक सेवन करणेच योग्य होय. असे सांगून बसवेश्वरांनी सर्व मानवमात्रांचा जीव, समान व अबाधित असल्याचे शिवाय सर्वांचा दर्जा समान असल्याचे दाखवून दिले आहे.)

5) कोणालाही विरोधात क्रूरतेने वागविले जाणार नाही, अमानुष शिक्षा देता येणार नाही - (सकल जीवात्मांचा कल्याणाची अपेक्षा करणा-या माझ्या कुडलसंगमदेवाचे शरणगणच कुलीन होत. असे बसवेश्वरांनी सांगितल्यामुळे क्रुरता व अमानुष चालींना अति तीव्रतेने विरोध केला आहे.)

6) कायद्यापुढे प्रत्येक व्यक्ती समान म्हणून संबोधून घेण्याचा हक्क आहे - (बसववादी शरण या हक्काशी सहमत होते. परंतू हे सिध्द करण्यासाठी तत्कालीन राजाज्ञेने त्यांना संधी मिळू दिली नाही. उलट शरण चांभार हरळ्या आणि पूर्वाश्रमीचा ब्राम्हण मधुवरस यांच्यातील रक्तसंबंध प्रस्थापित करण्यासाठी त्यांच्या मुला-मुलीत लग्नसंबंध होऊ न देता व त्यांना विचार व्यक्त करण्याचा अवकाशही न देता मधुवरस, हरळच्या व त्याचा मुलगा शीलवंत यांची अमानुष हत्या करण्यात आली.)

7) आपल्या मूलभूत हक्कांसाठी न्याय मागण्याचा हक्क प्रत्येकाला आहे - (सिंहाच्या नखाशिवाय हत्ती अंकुशाला भितो काय हो ? तैशापरी मी बिज्जळ राजाचा महामंत्री असलो तरी त्यांना मी भितो काय ? कुडलसंगमदेवा, तु सर्व जीवदयापालक असल्या कारणाने केवळ तूला भितो. अशा रितीने म.बसवेश्वर आपल्या हक्काचे प्रतिपादन करतात.)

8) आपल्या देशात मानवी हक्कांचे दमन चालल्यास दुस-या देशात आश्रय घेण्याचा अधिकार राहिल - (आंतरजातीय विवाह घडवून आणल्यामुळे बसवेश्वरांना हद्दपार करण्यात आले. त्यांना बिज्जळ राज्याच्या सीमेबाहेर कूडल संगम येथे जावे लागले. इकडे कल्याण नगरीमध्ये शरणांचे शिरकाण चाललेले पाहत अनेक शरणांना दुस-या प्रांतात आश्रय घेणे भाग पडले.)

9) कोणालाही मनात आल्यानुसार कैद करता येणार नाही - (चांभार हरळय्यांना मुलगा शीलवंत आणि पूर्वाश्रमीचा ब्राम्हण मधुवरस यांची मुलगी लावण्यवती यांच्यात विवाह झाल्यामुळे बिज्जळ राजाने त्या शरणांना कैदेत ठेवले. शरण तत्वानुसार त्यांच्यात जातीभेद न मानता या विवाहाला बसवादी शरणांनी संमती दिली होती. परंतू वैदिक

धर्मानुसार आंतरजातीय विवाह व वर्णसंकर झाल्याचा आरोप ठेवून हरळय्या, मधुवरस व शीलवंत यांना अटक करुन आपल्या मनात आल्याप्रमाणे क्रुरपणे त्यांची हत्या करण्यात आली.

10) स्वतंत्र न्याय मंडळाव्दारे न्याय मागण्याचा हक्क प्रत्येकाला आहे - (राजा बिज्जळाने शरणांचा न्याय मागण्याचा हक्क अमान्य करुन एकतर्फी न्याय दिला आणि क्रुर शिक्षा देऊन हिंसेला कारणीभूत झाल्यामुळे कल्याण येथे हत्याकांड (शिरकाण) केले.)

11) आरोप सिध्द झाल्याशिवाय न्यायनिवाडा होईपर्यंत निरपराधी म्हणवून घेण्याचा हक्क राहील, मग तो कोणीही असो - (त्या काळात असा हक्क शरणांना मिळविण्यासाठी योग्य न्यायपध्दती बिज्जळ राजाच्या राज्यात नव्हती. राजा कर्मठ वैदिकांच्या दबावाखाली होता.)

12) कोणाच्याही खाजगी जीवनात हस्तक्षेप करता येणार नाही. कोणाच्याही श्रेष्ठत्वास कमीपणा आणता येणार नाही - (कुडलसंगमदेवा भक्तांचे कुलगोत्र शोधल्यास तुझ्या राणीवासाची शपथ असे बसवेश्वर म्हणतात. बसवेश्वर कोणाचीही पूर्वाश्रित जात, कुल, गोत्र, किंवा वैयक्तिक जीवनात कधीही डोकावले नाहीत.)

13) प्रत्येकाला आपल्या देशात मुक्तपणे संचार करण्याचा हक्क राहील - (जातिसंकर झाल्यानंतर त्यांच्यात कुळ, गोत्र, किंवा जात शोधाल काय ? बसवेश्वरांनी असा प्रश्न करुन सर्वांना, शुद्रातिशुद्रांना मुक्त संचार करण्याचा हक्क मिळवून दिला. मनुस्मृतीप्रमाणे अस्पृश्यांना हा हक्क नव्हता.)

14) प्रत्येकाला राष्ट्रीयतेचा हक्क राहील - (आजच्या सारखी राष्ट्रीयतेची भावना किंवा कल्पना त्या काळात नसली तरी देखील काश्मीरचा राजा महादेव भूपाल आपल्या पत्नीसह कल्याण नगरीत मोळिगे मारय्या म्हणवून घेऊन व मरुळ शंकरदेव अफगाणिस्थानातील कण्बतूर येथून कल्याण येथे स्थायिक झाले आणि बसवेश्वरांच्या पर्यायी नवसमाजामध्ये मानाचे स्थान मिळविले.

15) प्रत्येकाला स्थावर मिळकत संपादनाचा हक्क राहील - (मी शेती करीत आहे गुरु पूजनासाठी, मी व्यवहार करीत आहे. लिंगार्चनेसाठी, मी परसेवा करीत आहे जंगम सेवा व दासोह अर्थात मिळकतीचा विनियोग समाज बांधवांसाठी कर्तव्य म्हणून करीत आहे. असे बसवण्णांनी सांगितले आहे. आपल्या स्थावर मिळकतीच्या हक्काबरोबरच सामाजिक जबाबदारी बद्दलही ते समजावून सांगतात.)

**सारांश** - अशा रीतीने बसवादी प्रथमगण 12 व्या शतकातच मानवी हक्कांचे प्रतिपादक होऊन देदिव्यमान झाले आहेत. त्यांची अभूतपुर्व साधना व कर्तव्ये मानवी हक्कांसाठीच होती. अशा प्रकारचा वरील विचार पाश्चिमात्य जगाला सुचण्यासाठी व समजण्यासाठी 20 व्या शतकापर्यंत वाट पहावी लागली शिवाय दोन महायुध्दांना सामोरे जावे लागले.

**निष्कर्ष** -

1) भारताच्या संविधानामध्ये या मानवी हक्कातील अंश अंतर्भूत झाल्यामुळे बसवेश्वरांची वचने भारताच्या संविधानाच्या जिव्हाळ्याची ठरली आहेत.

2) महात्मा बसवेश्वरांची वचने अंगीकारल्यास आंतरराष्ट्रीय पातळीचे मानवी हक्क आणि आपल्या देशाच्या संविधानाचा एक काळात गौरव करण्यासारखे आहे.

**संदर्भग्रंथ** -

*मानवी हक्क : य.च.म.मुक्त विद्यापीठ, नशिक, अभ्यासक्रम पाठ्यपुस्तक एम.ए.*
*सं.प्रा.माशाळकर, डॉ. तंगावार : बसवतत्व चिंतन, महाराष्ट्र बसव परिषद, भालकी जि.बिदर.*
*प्रा. भालचंद्र जयशेट्टी : शरण क्रांती, महाराष्ट्र बसव परिषद, भालकी जि.बिदर*
*रमजान दर्गा : बसव प्रज्ञा, महाराष्ट्र बसव परिषद, भालकी जि.बीदर.*
*डॉ. अशोक गं.मेनकुदळे : क्रांतीकारी सुगप्रवर्तक, महाराष्ट्र बसव परिषद भालकी, जि.बिदर.*
*म.पु.पाटील व शि.बा. संकनवाडे : वीरशैव धर्मामृत, बेळगाव-कोल्हापूर, - 1982.*
*प्राचार्य रा.तु. भगत : संत साहित्य आणि अंधश्रध्दा निर्मुलन, चैतन्य प्रकाशन कोल्हापूर, - 2002.*
*डॉ.पी.एम. देसाई : बसवेश्वर अॅन्ड हिजटाइम्स, कर्नाटक युनिव्हर्सिटी, धारवाड - 1968*
*डॉ.हुनशाळ : दि लिंगायत मूव्हमेंट, कर्नाटक साहित्य मंदीर, धारवाड -1947*
*बसव समिती : बसव दर्शन बेंगलोरु - 1987*

# महात्मा बसवेश्वरांनी स्थापित केलेल्या लिंगायत धर्माचे तत्वज्ञान

**प्रा. डॉ. बी. एन. नागलगावे**
*पंडित दीनदयाळ उपाध्याय महाविद्यालय, देवणी ता.देवणी जि. लातूर*

**प्रस्तावना -** मध्ययुगिन कालखंडात धर्माला आलेले विक्षिप्त रुप भयावह होते. महात्मा बसवेश्वरांनी धर्माच्या क्षेत्रात अमुलाग्र परिवर्तन घडवून आणण्यासाठी मौलिक कार्य 12 व्या शतकात केले. महात्मा बसवेश्वरांनी धार्मिक सुधारणांचा विचार करताना हिंदू धर्माच्या मूलभुत चौकटीलाच धक्का देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. पुर्णत: अवैदिक स्वरुपाची धर्मिक विचारसरणी मांडत बसवेश्वरांनी धर्माच्या क्षेत्रात वाढलेल्या अनिष्ठ प्रथा दूर करण्यासाठी कडवा संघर्ष केला. हिंदू धर्मातच सुधारणा करण्याच्या हेतू यामागे बसवेश्वरांचा नव्हता तर त्यांनी नव्या धर्माची प्रस्थापना करुन धार्मिक क्रांत घडवून आणली. महात्मा बसवेश्वर हे एक जेष्ठ समाजसुधारक आणि राष्ट्रसंत होत. बसवेश्वर हे मध्ययुगीन भारताचे जनक होत. 12 व्या शतकातील साधारणत: 1132 ते 1167 हा बसवेश्वरांचा जिवनकाळ होय. इ.स. 1132 च्या अर्थात शके 1054 च्या वैशाख शुध्द तृतीया म्हणजेच अक्षय तृतीया दिवशी बसवेश्वरांचा जन्म झाला आणि इ.स. 1167 मधील श्रावण शुध्द पंचमी म्हणजेच नागपंचमी दिवशी बसवेश्वरांनी संजिवन समाधी घेतली. हा दिवस पुढे बसवपंचमी म्हणून रुढ झाला. (काही संशोधक इ.स. 1105 हे बसवेश्वरांचे जन्म वर्ष मानतात.) कोणताही धर्म संस्थापकाशिवाय अस्तित्वातच येऊ शकत नाही. तसेच कोणत्याही धर्माला स्वतंत्र धर्म म्हणून मान्यता मिळवायची असेल तर धर्मसंस्थापक आवश्यक ठरतो. या दृष्टिने विचार केल्यास लिंगायत धर्माच्या संस्थापकाचा शोध सर्वप्रथम घेणे क्रमप्राप्त ठरते. बाराव्या शतकात दक्षिण भारतात कल्याण राज्यात स्थापन करण्यात आलेल्या लिंगायत धर्माचे संस्थापक हे महात्मा बसवण्णा आहेत.

**गृहितके -**

1) भारतात धर्माला महत्व आहे, धर्माशिवाय व्यक्तीचे जीवनाचे नियमन व नियंत्रण करणारी आणि अध्यात्म व आचाराचे व्यावहारिक धडे देणारी महत्वपुर्ण संस्था राहिली आहे.

2) लिंगायत धर्माची तात्विक बैठक बसवेश्वरांनी तत्वज्ञानाच्या माध्यमातून स्पष्ट केलेली आहे.

**संशोधन पध्दती -** प्रस्तुत शोध निबंधात व्दितीयक स्त्रोताव्दारे तथ्य संकलन केले आहे. यासाठी विषयांनुरुप संदर्भ ग्रंथ, लेख, वर्तमानपत्रातील लेख इ. चा वापर केला आहे. तसेच महात्मा बसवेश्वरांचे चारित्र्य, विविध संदर्भ ग्रंथ यांचा वापर यासाठी केला आहे.

**लिंगायत धर्माचे तत्वज्ञान -** लिंगायत धर्माची तात्विक बैठक बसवेश्वरांनी अष्टावरण, पंचाचार व षट् स्थल या तीन सुत्रांच्या माध्यमातून स्पष्ट केलेली आहे. बसवेश्वरांनी स्थापित केलेल्या लिंगायत धर्माच्या या तत्वज्ञानात्मक संकल्पना थोडक्यात खालीलप्रमाणे विचार करता येईल.

**अष्टावरण -** आवरण म्हणजे झाकून असलेला कवच, सुरक्षित असलेला असा होय. आठ गोष्टींचे आवरण म्हणजे अष्टावरण होय. यात प्रथम गुरु, व्दितीय लिंग, तृतीय जंगम, चतुर्थ विभूती, पंचम रुद्राक्ष, षष्ठ मंत्र, सप्तम पादोदके, आष्टम प्रसाद यांचा समावेश होतो. अष्टावरणाबद्दल रथिनासबापथी असे सांगितले आहे की, अष्टावरण हे अध्यात्मिक आनंदमय अनुभवाचे आठ खांब आहेत. या अष्ट अवरणातील प्रत्येक आवरणाचे विश्लेषण पुढील प्रमाणे.

**1) गुरु -** लिंगायत धर्माच्या मान्यतेनुसार शिवलिंगाची गुरुच्या रुपात पुजा करणे अपेक्षित आहे. बसवेश्वरांनी अरिवे गुरु म्हणजेच ज्ञान हेच गुरु म्हटले आहे. अनुभवातून मिळणा-या ज्ञानाला गुरुच्या स्थानी मानण्यात आले आहे. लिंगायत धर्मातील अष्टावरणात गुरु ही एखादी भोंदू व्यक्ती नाही.

**2) लिंग** - लिंगायत धर्म संकल्पनेनुसार लिंग म्हणजे इष्टलिंग होय. लिंग, इष्टलिंग, शिव इत्यादी नावने ते ओळखले जाते. आठ वस्तुंनी तयार झालेले हे इष्टलिंग लिंगायतानी गळयात बांधून त्याची नित्य वैज्ञानिक दृष्टीने पुजा करणे आवश्यक मानले आहे.

**3) जंगम** - जंगम याचा अर्थ धर्म प्रसारक आणि समाज अशा दोन प्रकारचा आहे. मानव जातीच्या कल्याणासाठी जे क्रियाशील असतात ते जंगम असतात. असे जंगम सद्दढ व सुखी राहिले पाहिजेत तरच समाज समृध्द व संपन्न होतो ही या मागे धारणा आहे.

**4) विभूती किंवा भस्म** - मानवी शरीरावर धर्माचे चिन्हांकित म्हणून भस्म हे आवरण धारण केले जाते. लिंगायत व्यक्ती हाताच्या तीन बोटांनी कपाळावर आडवे भस्म लावतो व तर्जनी बोटाने एक गोलाकार उमटवितो. बसवेश्वरांची एक समकालीन शरणी अक्कमहादेवी भस्माबद्दल म्हणले की, काम वृत्तीस भस्म करणारे हे भस्म पहा. लिंगायतांच्या अर्चनाप्रणालीत विभूतीला अनन्य साधारण महत्व आहे.

**5) रुद्राक्ष** - रुद्राक्ष धारण करणे पवित्र आणि आरोग्यवर्धक असते, अशी लिंगायतांची धारणा आहे. रुद्राक्षाचे 38 प्रकार सांगितले जातात. उदा: एकमुखी, व्दिमुखी, चारमुखी इत्यादी.

**6) मंत्र** - अध्यात्मिक साधनेचा एक मार्ग म्हणून मंत्र या आवरणाचे विवेचन लिंगायत धर्मात केले गेले आहे. ज्या ओंकारातून विश्व निर्मिती असे अध्यात्म मानते तोच ओम नम: शिवाय हा मंत्र यात स्वीकारला आहे. महात्मा बसवेश्वर तर या मंत्राशिवाय दुसरा मंत्र माहित नाही असे म्हणतात. या मंत्राव्दारे विश्वाशी व्यक्तीला जोडण्याचा प्रयत्नच लिंगायत धर्म करतो.

**7) पादोदक** - पादोदक या शब्दाचा फार व्यापक अर्थ सांगण्यात येतो. पाद म्हणजे भगवान शिवाचे आनंददायी ज्ञान होय. थोडक्यात ज्ञानाचे अर्जन करणे म्हणजे पादोदक होय.

**8) प्रसाद** - प्रसाद हा शब्द समर्पण भावाशी संबंधीत आहे. कारण समर्पण भावनेतून जे प्राप्त होते त्याला स्विकारणे आणि या भावनेने जीवन जगणे म्हणजे प्रसाद होय. तसेच प्रसाद ग्रहण हे त्या अवस्थेत भक्ताकडून केले जाते, त्यात कोणतेही अन्न व वस्तू शिवाय अर्पण करुन सिध्द होत असते. दासोहातून केले जाणारे दान हे देखील प्रसादच मानले जाते. वरील अष्टावरण हे लिंगायत धर्माचे बाह्यस्वरुप आहे.

**पंचाचार** - पंचाचारातून लिंगायतांची आचार पध्दती अविष्कृत होते. कोणत्या आचारांचे पालन लिंगायत धर्मातील व्यक्तींनी करावे यासंबंधी यात मार्गदर्शन केले आहे. अनुभव मंटपातील शरणांनी या पंचाचारांचे आचरण करुन एक आदर्श प्रस्थापित केला होता. या पंचाचाराबद्दल खालील प्रमाणे विवेचन करता येईल.

**1) लिंगाचार** - अंगावरचे लिंग इष्टलिंग हे शील व नीतीचे प्रतिनिधीत्व करतो म्हणून तो धारण करण्याचा आचार म्हणजे लिंगाचार होय. अंग-लिंग संयोग झाल्यास प्राणलिंग होते. लिंगाचारामुळे लिंगायत इतर इष्टलिंग पुजकाकडे समानतेने पाहतो.

**2) सदाचार** - शुध्दता, सरलता व नैतिकतेने आचरण करणे म्हणजे सदाचार होय. चोरी, हत्या, मिथ्या बोलणे, राग, घृणा आत्मस्तुती, परनिंदा न करणे म्हणजे सदाचार होय. थोडक्यात सामाजिक बांधिलकी मानून वर्तन करणे हे या सदाचारात अपेक्षित आहे. सदाचारात कायकाला महत्व देण्यात आले आहे. कारण कायक करणारा सदाचारी बनतो.

**3) शिवाचार** - शिव म्हणजे मंगल, शुभ, कल्याण, हित इत्यादी. शिवाचार म्हणजे मंगलकारक आचरण, कल्याणकारी वर्तन होय. प्रत्येक जीवात शिवाचा संचार आहे म्हणून प्रत्येकाशी समानतेने आचरण करणे म्हणजे शिवाचार होय. बसवेश्वर या अनुषंगानेच एका वचनात म्हणतात, सकल जीवात्म्यांचे कल्याण इच्छिनाराच खरा शरण आहे.

**4) गणाचार** - धर्माचे रक्षण हे गणाचाराचे सुत्र आहे. लिंगायत धर्माविरुध्द कार्य करणा-या व्यक्ती विरुध्द संघटीत होण्याचे गणाचार सांगतो. गणाचाराबद्दल माते महादेवी म्हणतात की, गणाचार म्हणजे सहनशिलता व न्यायाचा पाठपुरावा या शस्त्राने अन्यायावर मात करणे, चांगुलपनाने दुष्ट प्रवृत्तींचा निष्णपात करणे, अहिंसेने हिंसेवर विजय

मिळविणे आणि प्रेमाने तिरस्काराचे परिशिलन करणे होय. समाजातील अन्यायी व दुष्ट प्रवृत्तींशी मृत्युची तमा न बाळगता निराकाराने सामना करणे म्हणजे गणाचार होय.

5) **भृताच्यार** - भृताच्यार म्हणजे विश्वबंधुत्ववादाची आचरण पध्दती होय. सर्वांप्रती मानवता, नम्रता, दया, करुणा, आणि प्रेमाने वागणे म्हणजे भृताच्यार होय. भ्रष्ट या शब्दाचा अर्थ सेवक असा ही होतो. परंतू भृताच्यार म्हणजे दास्यत्व नाही. भृताच्यारत प्रेमाने सेवा करणे अभिप्रेत आहे. लिंगायतांची अचारनीती वरील पंचाचारातून अभिव्यक्त झाली आहे.

**षट्स्थल** - षट्स्थल म्हणजे सहा पाय-या किंवा सहा स्थान होय. आष्टावरण हे लिंगायतांचे शरीर, पंचाचार प्राण तर षट्स्थल हे -हदय आहे. पंचाचार हे नैतिक बाजू आणि षट्स्थल हे तात्विक बाजू स्पष्ट करणारे आहेत. लिंगायत धर्मातील साधकाला षट्स्थलाच्या सहा अवस्थेतून गेल्यासच ज्ञानप्राप्ती होते. षष्ट्स्थलाची संकल्पना अनुभव मंटपाच्या प्रदिर्घ चर्चेतून उगम पावली. पुढे ही संकल्पना सिध्दांताच्या रुपात याच चर्चेतून विकसित झाली. महात्मा बसवेश्वरांचे भाचे आणि अनुभव मंटपाचे महासचिव चन्नबसवेश्वर यांनी षटस्थलाच्या सैध्दांतीक बांधणीत मोलाचे योगदान दिले होते. म्हणूनच त्यांना षट्स्थल चक्रवर्ती ही पदवी दिली जाते. षट्स्थलामध्ये भक्त स्थल, माहेश्वर स्थल, प्रसादी स्थल, प्राणलिंग स्थल, शरणस्थल, ऐक्यस्थल अशा स्थलांचा समावेश आहे. अनुभव मंटपाचे तृतीय अध्यक्ष असणा-या सिध्दरामेश्वरांनी षट्स्थलाचे विवेचनात एका वचनातून केले आहे. ते म्हणतात, ज्या-ज्या अवस्थेची प्राप्ती माणसास त्या-त्या स्थळातील आध्यात्मिक गुणावर प्राप्त होते, असे सिध्दरामेश्वरांचे मत आहे. या षटस्थल सिध्दांताचे विश्लेषण खालील प्रमाणे करता येते.

1) **भक्त स्थल** - भक्त स्थल हे व्यक्तीच्या अंतर्गत आणि बहिरंगाच्या विकसन मार्गातील पहिले सोपान आहे. असे ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ.हिरेयल्लूर ईश्वरन् म्हणतात. या अवस्थेत भक्ताची श्रध्दा जागृत होते आणि क्रियाशक्ती प्रखर बनते. क्रिया व भक्ती या दोन्हीचा संगम होवून लिंगाचे स्वरुप भक्तास प्राप्त होते. परंतू ब-याचवेळेस भक्ती म्हणजे काय ? हा प्रश्न पडतो. याचे उत्तर म्हणजे, भक्तीचे चार अंगे असून यात प्रथम देवावर विश्वास ठेवणे, व्दितीय बसवेश्वर प्रणित अनुभाव ज्ञानाच्या गुरुला जाणणे, तृतीय इष्टलिंगाला देव मानणे व त्याची अनुभूती घेणे व चतुर्थ समाज सेवेतूनच भक्ती मार्गाच्या अवस्थेची प्राप्ती होते, असे लिंगायत तत्वज्ञान म्हणते, भक्त स्थलासच श्रध्दा स्थल असेही म्हणतात.

2) **महेश्वर (माहेश्वर) स्थल** - चेनबसेश्वरांनी आपल्या एका वचनातून माहेश्वरांच्या स्थलाचे स्पष्टीकरण केले आहे. या वचनातून जीवनातील संयम व अढळ मानसिक शक्तीतून माहेश्वर स्थलाची प्राप्ती व्यक्तीला होते असा वरील वचनाचा भावार्थ आहे. माहेश्वर स्थलाला निष्ठा स्थल या नावानेही संबोधले जाते. इष्टलिंग, वचनग्रंथ यावर निष्ठा या स्थलात अभिप्रेत आहे.

3) **प्रसादी स्थल (प्रसाद स्थल)** - माहेश्वर स्थलातील निष्ठा प्रसादी स्थळात अवधानाच्या रुपात परावर्तीत होत असते. म्हणूनच प्रसादी स्थलास अवधानस्थल असेही म्हणतात. इष्टलिंगाकडे अधिक अवधानाने म्हणजे एकाग्रतेने लक्ष देणे म्हणजे प्रसादी स्थल होय. समर्पणाची जी भावना पहिल्या भक्त अवस्थेत निर्माण होते, ती या प्रसादी अवस्थेत अधिक दृढ होते.

4) **प्राणलिंग स्थल (प्राणलिंगी)** - अनुभव स्थल या नावानेही प्राणलिंगी स्थलास ओळखले जाते. कारण साधन अवधान भक्तीने परिपक्व होऊन अनुभव सुखाची प्राप्ती करतो. इथे स्वत्वाचा व विश्वात्वाचा अनुभव साधकाला प्राप्त होत असतो. प्राणलिंगी स्थलासंबंधी थोडक्यात प्राणलिंग स्थलात व्यक्ती स्वत:चाच शोध किंवा अनुभव घेत असतो.

5) **शरण स्थल** - शरण स्थलाचे पर्यायी नामभिधान आनदीस्थल असे ही आहे. सिध्दरामेश्वरांनी म्हटल्याप्रमाणे यात संकल्पसिध्दता असते. या संकल्पसिध्दतेचाच आनंद साधक व्यक्त करतो किंवा अनुभवतो. तसेच तो अनुभवाचा परमोच्च आनंद या स्थलात घेत असतो. सर्व विकरांपासून मुक्ती प्राप्त होण्याची ही अवस्था होय, या उच्च वैचारिक अवस्थेत साधक सर्व भेद विसरुन जातो आणि तो ख-या अर्थाने शरण होतो.

**6) ऐक्य स्थल -** ऐक्य स्थल हा षट्स्थल सिध्दांतातील शेवटचा टप्पा होय. ऐक्य म्हणजे सामरस्य म्हणूनच या स्थलास सामरस्य स्थल असेही म्हटले जाते. उपरोक्त पाच अवस्थेतून साधक जेंव्हा अंतिम टोकाला येतो तेंव्हा तो ऐक्य स्थलात पदार्पण करतो. स्वयंच शिव किंवा लिंग आहेत या अनुभूतीची हि अवस्था आहे. यालाच अंग व लिंग सामरस म्हणतात. जीव व शिवाचे ऐक्य स्थलाचा मुळ उद्देश आहे. प्रतिकांचा वापर करुन बसवेश्वर ऐक्य स्थलातील लिंगाग सामरस्याचे विवेचन करतात, जो पर्यंत ऐक्य होत नाही तो पर्यंत साधनेला काहिच नाही असे बसवेश्वरांचे मत आहे.

**सारांश -** महात्मा बसवेश्वरांनी लिंगायत धर्माची स्थापना करुन त्याचे तत्वज्ञान व्यावहारिक पातळीवर जनसामान्यांचा आचरणात आणता यावे यासाठी प्रयत्न केला.

**निष्कर्ष -**

1) साधकाच्या साधनेसाठी विविध अवस्थांची निर्मिती करुन अंतरंगाचे परिपूर्ण ज्ञान व बहिरंगात दातृत्वाची जाण निर्माण करणारे बसवेश्वर हे काया म्हणजे शारिरिक कार्यात सदभक्ती निर्माण करुन सदैव लिंगाचा व सर्वांगाचा संपन्न भाव जोपासतात.

2) अष्टावरण हे लिंगायत धर्माचे बाह्य स्वरुप आहे, लिंगायतांची आचारनीती वरील पंचाचारातून अभिव्यक्त होते, बसवेश्वरांनी षट्स्थलाची संकल्पना मांडून व्यक्तीची आध्यात्मिक उन्नती करण्याची सोपी पध्दती विकसित केली.

**संदर्भ ग्रंथ -**

*डॉ.सोलापूरे राजेश्वर : लिंगायत एक स्वतंत्र धर्म, अरुणा प्रकाशन, लातूर - व्दितीय आवृत्ती* - 2014

*काटकर सरजू : बसवेश्वर आणि लिंगायत अध्ययन, अकाडेमी, बेळगाव* - 2004

*घुगरे सुर्यकांत : वीरशैव व इतर धर्म आणि समाज, साधना बुक स्टॉल, गटहिग्लज, कोल्हापूर* - 1999

*जवरेगौडा दे. : लोकायत लिंगायत, महाराष्ट्र बसव परिषद, भालकी* - 2008

*डांगे स.अ. : हिंदू धर्म आणि तत्वज्ञान, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर* - 1973

*माता महादेवी : लिंगायत धर्म दर्पण, विश्व कल्याण मिशन, बेंगलूर* - 1997

# वचन साहित्याचा शोध व बोध

**श्री.अर्जुन बंडू गजमल**
*ग्रंथपाल, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड, ता. मुखेड जि.नांदेड*

**प्रास्ताविक:**-- बाराव्या शतकातील बसवयुग म्हणजे मानवी जीवनातील सर्वोत्कर्षाचे सुवर्णयुग होय. जगाच्या इतिहासात अशा प्रकारचा सर्वांगीण क्रांतीचा काळ क्वचितच आढळेल; किंबहुना नाहीच म्हटल्यास वावगे होणार नाही. हे विधान बसवाभिमानापोटी करतो असे कोणी समजू नये. हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे. एकाच काळात, एकाच ठिकाणी हजारो संत, शरण बसवेश्वरांच्या महान कार्याला हातभार लावतात; स्वहस्ताक्षरात हजारो, नव्हे लाखो वचने लिहितात; खांद्याला खांदा भिडवून नवमन्वंतराच्या स्वागतासाठी एका आवाजात घोषणा देतात; देवालय संस्कृतीचा पाडाव करून त्या ठिकाणी देहालय संस्कृतीची मुहूर्तमेढ करतात; तेथे शूद्रातिशूद्रापासून भूसुर म्हणविणारे ब्राम्हणसुद्धा मांडीला मांडी लावून 'अनुभव मंटप' या संस्थेमध्ये खुल्या दिलाने चर्चा करतातः अत्यंत शूद्र समजलेला स्त्रीवर्गही तेथे भाग घेऊन पुरुषवर्गाशी वाद करतात याची कल्पनाच रोमांचित करून जाते. हे कधी शक्य आहे का अशी शंका मनात चमकून जाते. परंतु हे एक ऐतिहासिक सत्य आहे हे मान्य केल्याशिवाय गत्यंतर नाही.

**वचनसाहित्याचा शोध:**-येथे शोध हा शब्द दोन वेगवेगळे अर्थ देतो. एक शोध म्हणजे उगम व दोन, शोध म्हणजे शोधून काढणे. या दोन्ही अर्थाने वचनसाहित्याचा शोध घेणे आवश्यक आहे. तत्पूर्वी बसवपूर्व साहित्य कसे होते याची थोडीशी झलक पाहणे योग्य ठरेल.

**बसवपूर्व साहित्य :**- बसवेश्वरांच्या पूर्वी कर्नाटकात जैन साहित्य विपुल प्रमाणात निर्माण झाले होते. त्यातील बहुतांश साहित्य काव्यामध्ये होते. अत्यंत प्रगल्भ, उद्दाम, संस्कृतप्रचुर व तितकेच किचकट असे ते साहित्य होते. राजेमहाराजे, देवदेवता, पुराणे, रामायण, महाभारत या विषयांवर ते साहित्य लिहिले गेले होते. आपली विद्वत्ता प्रदर्शित करण्यासाठी मोठमोठ्या पंडितांमध्ये, विद्वानांमध्ये चढाओढ लागलेली असायची. राजेमहाराजे खूष होऊन त्यांना मोठमोठी पारितोषिके देत असत. मात्र सर्वसामान्य लोकांना त्याचा गंधही माहीत नसे. अशा या विलक्षण परिस्थितीमध्ये वचनसाहित्याचा उदय झाला.

**वचनसाहित्याचा उगम:**-वचनसाहित्याच्या निर्मितीचे श्रेय सामान्यपणे बसवेश्वरांना देण्यात येते. परंतु बसवेश्वरांच्या काही वर्षे आधी जेडर (कोष्टी) वासिमप्पा हे शरण होऊन गेले. केवळ काहीच वर्षांचा फरक असल्यामुळे काही विद्वान त्यांना बसवेश्वरांचा समकालीन मानतात. परंतु बसवकाळातीत इष्टलिंग, कायक, दासोह इ. महत्त्वाचे पारिभाषिक शब्द दासिमप्प्याच्या वचनांत आढळत नाहीत. त्यांच्या उपलब्ध १७६ वचनांमध्ये कोठेही बसवेश्वरांचा उल्लेख नाही. म्हणून ते बसवेश्वरांच्या काही वर्षे आधी होऊन गेले असावेत असे वाटते. त्यामुळे त्यांनाच आद्य वचनकार म्हणणे संयुक्तिक होईल. म्हणून त्यांच्या काळापासूनच वचनसाहित्याचा उगम झाला असे म्हणावे लागते. जेडर दासिमय्यांच्या निधनानंतर त्यांची पत्नी दुग्गळे ही काही वर्षे हयात होती. तिने मात्र आपल्या उपलब्ध दोन्ही वचनामध्ये बसवेश्वरांची मनापासून स्तुती केली आहे.

**बसवकालीन वचनसाहित्य:**- कर्नाटक शासनाने उपलब्ध सर्व वचनांचा संग्रह करून १४ खंडांमध्ये ती प्रसिद्ध केली आहेत. त्यातील ९ खंड बसवकालीन वचनांसाठी वापरले असून बाकीचे ५ खंड बसवोत्तर कालीन वचने संग्रहित करून प्रसिद्ध केले आहेत. शेवटच्या १५ व्या खंडात पारिभाषिक शब्दकोश आहे. बसवकालीन वचनांची माहिती खालीलप्रमाणे आहे. (प्रथम आवृत्ती व द्वितीय आवृत्तीची आकडेवारी क्रमाने दिली आहे.)

खंड १ बसवेश्वर १४२६ व १४१४ वचने

खंड २ अल्लमप्रभू: १६४५ व १६७० वचने

खंड ३ चेन्नबसवेश्वर १७९२ व १७६३ वचने
खंड ४ सिद्धरामेश्वर १६७९ व १९९२ वचने
खंड ५ ३३ शरणी ११०७ वचने व ३४ शरणी १३५० वचने
खंड ६ ते ९ (भाग १) - १२१ शरणांची ६५३७ वचने व १२१ शरणांची ६५२३ वचने,
खंड ९ (भाग २) अज्ञात ५४ शरणांची २५० वचने व अज्ञात ५४ शरणांची २५५ वचने,
एकूण शरण शरणी २१२ शरण शरणींची १४४३६ वचने व २१३ शरण
शरणींची १४९६७ वचने.

वरील वचनकारांमध्ये सर्व स्तरांतील लोक आढळतात. उरिलिंग पेद्दी शुद्ध होता. लिंगदीक्षा घेऊन थोर विद्वान झाला. त्याची ३६६ वचने उपलब्ध असून सुमारे २०० संस्कृत श्लोक त्याच्या वचनांत आढळतात. शेतकरी मुद्दण्णा, चोर मारितंदे, कोळी कण्णप्पा, गोरखनाथ, भांडखोर कामण्णा, सैनिक मायण्णा, ढोर कक्कय्या, विनोदी मारितंदे, बहुरूपी चौडय्या, भिकारी भीमय्या, चांभार चेन्नय्या, न्हावी रेचण्णा, महार शिवनागमय्या, दारुविक्या मारय्या असे सर्व स्तरांतील शरण एकत्र जमून चर्चा करून आपापले अनुभव वचनांमध्ये व्यक्त करत होते, ही घटनाच अद्‌भुत वाटते.

**बसवोत्तरकालीन वचनसाहित्य:** - कर्नाटक शासनाच्या दोन आवृत्त्यांमधील बसवोत्तरकालीन वचनकार व त्यांची वचने अशी : खंड १० ते १४३० वचनकारांची ६५९० वचने व ३५ वचनकारांची ६७६० वचने. येथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, हे सर्व वचनकार मध्यमवर्गीय किंवा उच्चवर्गीय असून कोणीही निम्नवर्गीय नाहीत. तसेच एकही स्त्री नाही. म्हणजे, ज्या बसवेश्वरांनी आपल्या हयातीत सर्व स्तरांतील लोकांना आपल्या विशाल बाहूंमध्ये कवटाळले व सर्वसमानता प्रस्थापित केली; त्या तत्त्वांची नंतरच्या काळात पायमल्ली झाली व पे रे माझ्या मागल्या' अशी स्थिती निर्माण झाली. त्याची कारणे नंतर पाहू.

**वचनसाहित्याचा शोध:**बसवेश्वरांच्या क्रांतिकारक सुधारणांना तत्कालीन कर्मठ लोकांकडून नेहमीच प्रतिरोध होत गेला. शेवटी कल्याणमध्ये हिंसक, उद्रेक झाला. (त्यापूर्वीच बसवेश्वर, अल्लमप्रभू वगैरे प्रमुख शरण कल्याण सोडून गेले होते.) बिज्जळ राजाने तिघा शरणांना हत्तीच्या पायाखाली चिरडून ठार मारले. प्रतिकार म्हणून बिज्जळाचा खून झाला. सर्व शरण-शरणींना कल्याण सोडून दूर जावे लागले. बिज्जळाच्या सैन्याने पाठलाग करून शेकडो शरणांना कंठस्नान घातले. खूपशा वचनसाहित्याचा नाश केला. उरलेले वचनसाहित्य शरणांनी ठिकठिकाणी लपवून ठेवले. सुमारे ३०० वर्षे ते अज्ञात राहिले. नंतर विजयनगर साम्राज्यांतील प्रौढ देवरायाच्या काळात या अज्ञात वचनसाहित्याचा शोध सुरू झाला. सापडलेल्या वचनांचा संग्रह करून शून्यसंपादन, लिंगलीलाविलासचारित्र, भैरवेश्वर कथामणिसूत्र रत्नाकर इत्यादी ग्रंथ लिहिले गेले, तथापि अजून खूप साहित्य अज्ञातच राहिले होते.

**वचनसाहित्याचा आधुनिक शोध:-** लिंगैक्य डॉ. फ. गु. हळकट्टी यांना वचनसाहित्य संशोधनाचे पितामह म्हणतात. त्यांनी वचनसाहित्याच्या संशोधनासाठी आपले सारे जीवन समर्पित केले होते. सुरुवातीला काही दिवस त्यांनी वकिली केली, परंतु आपल्या मामाच्या प्रेरणेने वकिली सोडून वचनसाहित्याच्या संशोधनासाठी स्वतःला वाहून घेतले. 'हितचिंतक प्रिंटिंग प्रेस' विजापूरमध्ये सुरू केला.वचनसाहित्याच्या संशोधनाची माहिती सर्वांना कळविण्यासाठी 'शिवानुभव' मासिक सुरू केले. खेड्यापाड्यामध्ये, मठांमध्ये, देवस्थानांमध्ये अज्ञातपणे पडून राहिलेले वचनसाहित्य शोधून काढून प्रसिद्ध करण्याचे महान कार्य त्यांनी जीवनभर चालविले. 'वचनशास्त्रसार भाग १, २ व ३ 'शरणचरितामृत' 'शिवानुभव शब्दकोश', 'वचनगायन' वगैरे अनेक अमूल्य ग्रंथ प्रसिद्ध करून वचनसाहित्याची ओळख आधुनिक जगाला करून दिली.

**जागतिक अध्यात्मिक साहित्य :-** प्राचीन काळापासून आध्यात्मिक साहित्य निर्माण होत गेले. ग्रीस, सुमेरिया, चीन, सिंधू खोरे इत्यादी ठिकाणी प्राचीन साहित्य आढळते. येशू ख्रिस्तांचे बायबल व त्यातील जुना करार व नवा करार; महंमद पैगंबरांचे कुराण, झरतुष्ट्रांचे झेंद अवेस्ता, चीनमधील धार्मिक तत्त्वज्ञान, बाबिलोन, पर्शिया, इजिप्त येथील प्राचीन ग्रंथ, सॉक्रेटिस ॲरिस्टॉटल प्लेटो पांचे धार्मिक विचार यांचा त्यात मुख्यतः समावेश होतो.

**भारतीय आध्यात्मिक साहित्य:-**भारतामध्ये प्राचीन काळापासून आध्यात्मिक साहित्य निर्माण होत गेले आहे. चार वेद अति प्राचीन ग्रंथ मानले जातात. उपनिषदे, आरण्यके, ब्राह्मणे, स्मृती पुराणे असे विपुल प्रमाणात साहित्य निर्माण झाले. तसेच महावीरांचे जैन साहित्य, गौतम बुद्धांचे त्रिपिटक, शिखांचे ग्रंथसाहेब वगैरे धार्मिक साहित्य निर्माण झाले.

त्याच मालिकेत बसवेश्वर व त्यांच्या शरणांचे वचनसाहित्य निर्माण झाले. महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाचे संत साहित्य निर्माण झाले. नामदेवांपासून ज्ञानदेव तुकारामांच्या अभंगांपर्यंत हरतऱ्हेचे धार्मिक साहित्य निर्माण झाले. तसेच, कबीर, तुलसीदास, मीराबाई, चैतन्य महाप्रभू यांनीही बरेच साहित्य निर्माण केले आहे. भारतात धार्मिक साहित्याला कधीच तोटा पडला नाही.

**वचनसाहित्याचे वैशिष्ट्य:**-जागतिक व भारतीय आध्यात्मिक साहित्याहून वचनसाहित्य एकदम वेगळे आहे. इतर कोणतेही साहित्य वचनसाहित्याची बरोबरी करू शकत नाही. त्याची कारणे अशी

अ) इतर सर्व धर्मग्रंथ धर्मसंस्थापकांच्या उपदेशाचा संग्रह असून त्यांच्या शिष्यांनी तो संग्रह केला आहे. या उलट, बसवेश्वर व त्यांच्या सहकाऱ्यांनी आपले अनुभव, विचार व तत्त्वे स्वतः लिहून काढली आहेत. इतर कुठल्याही धर्मात असे घडलेले नाही.

आ) सामान्य लोकांच्या भाषेत, कन्नडमध्ये वचनसाहित्य लिहिले गेले आहे. गद्यामध्ये छोट्या छोट्या वाक्यांमध्ये सुटसुटीत भाषेत वचने लिहिली असल्यामुळे सर्वांना ती समजतात.

इ) अनेक उदाहरणे देऊन शेवटी तत्त्वाचे प्रतिपादन केले आहे. त्यामुळे ते तत्त्व चटकन समजते.

ई) बसवेश्वरांसारख्या कविहृदयी शरणांनी काव्यमय भाषा वापरली असून प्रास, अनुप्रास, श्लेष, अतिशयोक्ती, रूपक, उपमा यांचा आपल्या वचनांत उपयोग केला

आहे.3)वचनकारांनी आपल्या उद्योगांतील उपकरणांचा आणि क्रमाचा उल्लेख करून त्यांचा अध्यात्माशी संबंध जोडला आहे. त्यांचा उद्योग (क) अध्यात्म झाला आहे.

ऊ) काही वचने, दोनच ओळींची अगदी छोटी आहेत. उदा. बसवेश्वराचे अल्लमप्रभूची ५ वचने, चेन्नबसवेश्वरांची ८ वचने व सिद्धरामेश्वची २६ वचने दोन ओळींची आहेत. पाउलट काही वचने बरीच लांबलचक असून ७-८ पाने भरण्याइतकी आहेत.

प्र.) प्रत्येक वचनकाराचे अनुभव, विचार, अभिव्यक्ती मार्ग वेगळे आहेत. परंतु सर्वांच्या तत्त्वांमध्ये व सिद्धांतामध्ये एकरूपता बसवेश्वरांच्या तत्त्वज्ञानाचाच पाठपुरावा सर्व वचनकार करतात.

ऐ) वचनकारांना अभिव्यक्तीचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. काही वेळासारखी झाडूवाली बाई चेन्नबसवेश्वरांसारख्या महाज्ञानी शरणाशी वाद घालून आपले वेगळे मत मांडते.

ओ) स्वरवचने (चालीवर गाता येण्यासारखी पद्यासारखी), का (भविष्यकथनाची) देखील काही वचनकारांनी लिहिली आहेत. आजही कोडीमठ व बबलादीमठ येथे दरवर्षी कालज्ञानवचने सांगितली जातात.

**वचनसाहित्यापासून बोध :**-वचनसाहित्याचा बोध म्हणजे बसवेश्वरांच्या तत्वज्ञानाचा बोध असून त्यांनी स्थापिलेल्या लिंगायत धर्माचे सार होय. त्यातील काही प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

अ) देव एकच असून त्याची नावे अनेक आहेत. तो निराकार असून भक्तांच्या उद्धारासाठी गुरू, लिंग व जंगम या तीन रूपांत तो प्रकट होतो. येथे लिंग म्हणजे इष्टलिंग होय.

आ) त्या देवापासूनच म्हणजे त्याचीच रूपे होत. त्यामुळे हे विश्व व सर्व
सारे विश्व निर्माण झाले असून या जगातील सर्व प्राणिमात्र
प्राणी म्हणजे माया नव्हे,

इ) इष्टलिंगाच्या उपासनेने लिंगांगसामरस्य प्राप्त करणे हेच मानवी जीवनाचे ध्येय असून त्यासाठी अष्टावरण, पंचाचार व षट्स्थल हे मार्ग आहेत. चातुर्वर्ण्यातील ब्राह्मण श्रेष्ठ, शूद्र कनिष्ठ ही भावना चुकीची असून चार आश्रमापैकी संन्यासी श्रेष्ठ व गृहस्थ कनिष्ठ ही कल्पनाही योग्य नव्हे. ही सर्व
व्यवस्था मानवनिर्मित असून तिच्याशी देवाचा संबंध नाही.

उ) लिंगायत धर्मात पंचसुतके, जातीपाती, ज्योतिषशास्त्र, वास्तुशास्त्र, अंधश्रद्धा, मूढ कल्पना, परंपरागत अयोग्य चालीरीती, स्त्री-पुरुष भेदभाव, कर्मसिद्धांत,पुनर्जन्म, स्वर्ग-नरक, पापपुण्य इत्यादी गोष्टींना थारा नाही.

(ऊ) प्रत्येकाने आपल्या उपजीवनासाठी उद्योग (कायक) केलाच पाहिजे व त्यातील थोडा भाग दासोहासाठी (सामाजिक अभिवृद्धीसाठी) खर्च केला पाहिजे. कायक सत्य व शुद्ध असले पाहिजे. सर्व उद्योग समान असून त्यामध्ये श्रेष्ठ-कनिष्ठ भावना नाही. त्यामुळे सामाजिक समता प्रस्थापित होते.

ए) इष्टलिंगाशिवाय इतर देवदेवतांची उपासना करू नये. देवस्थाने, तीर्थक्षेत्रे, नद्या, वृक्ष, प्राणी, जत्रा, व्रतवैकल्ये, होमहवन, उपास-तपास, देह दंडविणारे नियम इत्यादी गोष्टी या धर्मात निषिद्ध आहेत. कारण, बाह्य अवडंबरापेक्षा मनाच्या शुद्धीला महत्त्व दिले पाहिजे.

ऐ) लिंगधारी सदा शुची व लिंगधारी सर्व समान या तत्त्वांमुळे अशुद्धतेची व अपवित्रतेची भावना नाही. तसेच सर्वसमानता तत्त्वामुळे श्रेष्ठ-कनिष्ठ भावनेला जागाच नाही.

ह्या दृष्टीने लिंगायतांवर फार मोठी जबाबदारी येऊन पडलेली आहे.

वचनसाहित्य विविध भाषांमधून अनुवादित होऊन ते प्रकाशित झाले पाहिजे, लिंगायत धर्माचे तत्त्वज्ञान व शरणांच्या जीवनचरित्राची ओळख करून देणारी छोटी छोटी पुस्तके कन्नडेतर भाषांमध्ये प्रकाशित झाली पाहिजेत, कन्नडेतर भाषांमध्ये धर्मप्रसारक, प्रवचनकार, व्याख्याते, गायक, चित्रकार, लोककलाकार, नाटककार आदी लोकांचे गट कार्यरत झाले पाहिजेत. त्यांनी आधुनिक साधनांचा उपयोग करून घेतला पाहिजे, कन्नडेतर भाषांमध्ये शिबिरे, संमेलने, अधिवेशने, चर्चासत्रे आयोजित केली पाहिजेत. सामान्य लोकांच्या मनावरील हिंदू धर्म व अन्य सांप्रदायिक विचारांचा पगडा दूर केला पाहिजे. बसव तत्त्वानुसार धर्मसंस्कार देण्याचे प्रशिक्षण देणारी व्यवस्था निर्माण केली पाहिजे. अशा प्रकारे अनेक कर्तव्य बजावून शरण संस्कृतीचे रक्षण व संवर्धन करण्याची जबाबदारी आपणा सर्वांना पार पाडावी लागणार आहे.

**संदर्भ सूची:-**

*लिंगायत तत्त्वज्ञान व आचरण लेखक प्रा. राजशेखर म. करडीगुड़ी प्रकाशक : महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान भालकी, जि. बीदर, कर्नाटक राज्य*

*VACHAN CHINTAN: Written by Poojya Shri Dr. Basavaling Palladdevaru, Translated from Kannada into Marathi by Sou Swaroopa Appasaheb Birajdar. Published by: Maharashtra Basava Parished, Hiremath Sansthan, Bhalki*

*बसवतत्त्वांचे आचरण आणि आपण पूज्य श्री डॉ. बसवलिंग प मराठी अनुवाद सौ. मृणालिनी चं. कोटूर सौ. सविता सि. नडकट्टी प्रकाशक महाराष्ट्र बसव परिषद हरेमठ संस्थान, भालकी (जि. बीदर, कर्नाटक)*

*बहुजन नायक महात्मा बसवेश्वर*

*महात्मा बसवेश्वर - प्राचार्य शिवाजीराव भोसले*

*क्रांतिकारी बसवेश्वर जगत ज्योती बसवेश्वर - डॉ. सूर्यकांत घुगरे*

*संत साहित्य आणि दलित संवेदना संत साहित्य आणि अंधश्रद्धा निर्मूलन - प्राचार्य भगत सर*

*महात्मा बसवेश्वर बाराव्या शतकातील आद्य समाजसुधारक - डॉ. अशोक मेनकुदळे*

*बसवेश्वर रचिला पाया - डॉ. अशोक कामत*

*श्री.बसवेश्वर -एस.एस.वडेर*

---

# महात्मा बसवेश्वरांचे क्रांती,परिवर्तनात्मक कार्ये

**प्रा. डॉ. भगवान शंकरराव वाघमारे**

*लोकप्रशाशन विभाग प्रमुख ॲड . बी. डी. हंबर्डे महाविद्यालय, आष्टी जि. बीड*

**प्रा. डॉ. संजय भालेराव**

*लोकप्रशाशन विभाग प्रमुख, शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कन्नड जि . औरंगाबाद*

---

**प्रस्तावना -** बाराव्या शतकात कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्वर - बागेवाडी या गावात 1105 साली प्रतिष्ठीत पशुपात शैव कम्मेकुलातील एका कुटूंबात जन्म झाला. काहींच्या मते तो इंगळेश्वर जि.विजापूर या गावी झाला असावा असे मत आहे. त्यांच्या जन्मकाळाविषयी मतभेद, असलेतरी सामान्यत;त्यांचा जन्म 25 एप्रील 1105 वैशाख शुध्द तृतीया अक्षय्य तृतीया दिवशी महात्मा बसवण्णांचा जन्म झाला. त्यांचे वडीलमदिराज आणि आईचे नाव मादलांबीका हे होते. भावाचे नाव देवराज व बहिणीचे नाव नागम्मा होते. वयाच्या आठव्या वर्षी ज्ञान मिळविण्यासाठी ते कृष्ण व मलप्रभा या नद्यांच्या संगमावरील कुडल संगम येथे गेले, ते पशुपात शैवांचे प्राचीन अध्ययन केंद्र होते. तेथे बसवेश्वरांनी बारा वर्ष वास्तव्य केले. कुडलसंगम येथे त्यांनी वेगवेगळ्या भाषा, धर्म, तत्वज्ञान इत्यादींचा अभ्यास केला. त्यांचा विवाह त्यांच्या मामाच्या मुलीशी झाला. तेंव्हा ते सोलापुरातील मंगळवेढा येथे आले. तेथे ते एकतीस वर्षे वास्तव्य केले.

**महात्मा बसवेश्वरांचे क्रांतीकार्ये -**

**1) पाचही सूतके पाळू नका -** स्त्रियांच्या मासिक पाळीत जो स्त्राव पाझरतो तो स्त्री ही प्रजननासाठी सक्षम आहे त्याचे घोतक आहे. मातृत्वाशक्ती गौरवांकीत करणारा विटाळ हा अपवित्र कसा असू शकतो? म्हणून बसवेश्वर म्हणतात ऋतुस्नात, विटाळशी, रजस्वलेला अस्पृश्य समजू नये. तसेच इतर जातींचा विटाळ, उष्टे खाण्याचा विटाळ, मृत्युचा विटाळ, जन्माचा विटाळ ही पाचही सूतके पाळू नयेत. मात्र स्वच्छता ठेवावी व काळजी घ्यावी.

**2) संन्यास घेऊ नये, भिक्षावृत्तीचा निषेध -** इंद्रिय दमनाने विषय विकार वाढतात. चांगल्या विचार-भावनावर दाबलेले विषय विकार कुरघोडी करतात. म्हणून तारुण्य आल्यावर विवाह करावा, परंतू आजन्म अविवाहीत राहणे, परमेश्वर प्राप्तीसाठी संन्सास घेणे, सर्वसामान्य व्यक्तीसाठी योग्य नव्हे. ज्यांच्या आपल्या विकारांवर ताबा आहे, योग बळाने ज्यांना मनाला नियंत्रित करता येते, अशा निग्रही, ध्येयवादी, सिध्दीप्राप्त योगींनी समाजाच्या कल्याणासाठी सन्यास व्रत अवश्य धारण करावे. एखाद्या चांगल्या समाज कार्यासाठी उच्च ध्येय प्राप्तीसाठी समर्पित भावनेने कार्य करावयाचे असेल अशांनी अविवाहित राहून संन्याशी जीवन जगावे. बसवेश्वरांनी संन्यास घेणे बंधनकारक न ठेवता ऐच्छिक ठेवलेले आहे. संन्यास घेतल्याने पत्नी व मुले यांच्यावर अन्याय होतात, भिक्षा मागतात म्हणून भिक्षा मागून जगणा-यांचा त्यांनी निषेध केलेला आहे.

**3) एकदेव उपासना -** बाराव्या शतकाच्या काळात समाजातील लोक अनेक-अनेक देव देवींची उपासना करीत. हे कमी वाटले म्हणून अग्नी, पृथ्वी, सुर्य, चंद्र, जलदेवता, कुळदेवता, दशावतार, गणेण, काली, यल्लम्मा, रेणुकांबा इतकेच काय तर कुत्रा वानर, नाग, वाघोबा, गाय-बैल, मुंग्या हे प्राणी तसेच भिंती , गढ्या, किल्ले, विहरी, शेते, झाडे, नद्या-नाले यात राहणारे भूत-पिशाच्च, मैलार, मल्हारी, खंडोबा, मरीआई, मुंग्या, मातामाय इत्यादिची पुजा करीत.

समाजातील ही अनेक देवांची उपासना करणे म्हणजे एकाही देवावर विश्वास नसल्या सारखे आहे. मग एकही देव प्रसन्न होणार नाही. म्हणून बसवेश्वरांनी एकाच देवावर विश्वास ठेवणारी भक्ती करा असा उपदेश केला.

**4) स्वर्ग-नरक विश्वात कोठेही नाही -** देवलोक, मृत्युलोक ह्या दोन्ही वसाहती आकाशात कोठेही नाहीत. जेथे सत्य, शील, करुणा, माणुसकी आहे तेथेच साक्षात स्वर्ग नांदतो आणि जेथे अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार आहे तोच नरक आहे. सदाचारच स्वर्ग आणि अनाचारक नरक होय.

**5) अंधश्रध्दा नाहिशा केल्या -** बसवेश्वर म्हणतात, देवाला प्रसन्न करण्यासाठी मुक्या प्राण्यांचे बळी देऊ नका. होम हवनात गरिबांना न मिळणारे दुध, तुप, दही, लोणी, वस्त्रे, टाकू नका. व्रत, वैकल्ये, नवस प्रायश्चिताचे विधी, उपास-तपास करुन शरीराला कष्ट देवू नका. देवदेवतेला पोटच्या मुली अर्पण करुन त्यांना देवदासी, जोगतीणी, भावीण, गणिका, मुरळी, आराधिनी, कसबिणी करु नका.

**6) पाप-पुण्याच्या कल्पना मानवाला निष्क्रीय करतात -** आपल्या नशिबी आलेली दु:खे, संकटे, मंदबुध्दी, दारिद्य हे मागच्या जन्मीच्या पापाचे फळ आहे ते म्हणे ब्रम्हलिखीत असते. ते अपरिवर्तनीयच असते. यावरच्या विश्वासामुळे श्रध्दाळू माणूस या जीवनात कोणतेही परिश्रम, प्रयत्न व साहस करीत नाही. कारण कितीही प्रयत्न केले तरी ब्रम्हलिखीत बदलणारच नाही तर प्रयत्नच कशाला करावा? परिणामी माणूस आत्मविश्वास गमावून निष्क्रीय होतो. मग इतर सुलभ मार्गाने म्हणजे गुप्तधन कसे मिळेत, जुगारातुन पैसे कसे मिळतील असे विचार त्याच्या मनात निर्माण होतात. म्हणून पाप-पुण्याच्या कल्पना झुगारुन द्यावयास पाहिजे. परिश्रमामुळेच आपले जीवन बदलू शकते यावर प्रत्येकाचा विश्वास असावा.

**7) पुनर्जन्माचे आमिष दाखविले नाही -** समाजात हा गैरसमज पसरविण्यात आलेला आहे की, सध्या मिळालेले जीवन हे मागच्या जन्मीचे पाप आहे. पुढच्या जन्म वैभव संपन्न घरात घ्यावयाचा असेल तर पुण्य गोळा करण्यासाठी व्रतवैकल्ये, उपवास करा. तीर्थयात्रा, नद्यात स्थान, सुवर्णदान, गोदान, भूमीदान, दानधर्म करा, देवळे बांधा, या जन्माची कर्मफळे पुढच्या जन्मात भोगावी लागतात. यालाच कर्मविपाक सिध्दांत म्हणतात. बसवेश्वरांना हे मान्य नाही. त्यांनी स्वर्गाचे अमिष व नरकाची भिती दाखवली नाही. बसवेश्वरांना मेल्यानंतरच्या जीवनाच्या केलेल्या कल्पना मान्य नाहीत.

**8) पृथ्वीलाच स्वर्ग बनवू या -** आपण जन्मालो ते हे दिसणारे अनुभवास येणारे जग खोटे नाही. मिथ्या किंवा लटके नाही. म्हणून आपण राहातो त्या पृथ्वीवरच घाम गाळून परिश्रम करुन सुखे निर्माण करु या असा भौतिकवादी, इहजीवनवादी विचार बसवेश्वरांनी मानवजातीला दिलेला आहे. स्वर्गाचे आमिष, प्रलोभन व नरकाची भीती त्यांनी लोकांना दाखबली नाही. कायक करण्याचे श्रम केल्यानेच पृथ्वीचा स्वर्ग होऊ शकतो हा मानवतावादी विचारच लोकांना सुखात ठेवू शकतो.

**9) शकून-अपशकून, तिथी, नक्षत्रे यावर विश्वास ठेवू नका -** शकून-अपशकून, मांजर आडवी गेली, तारा निखळला, कावळा ओरडला, मध्यरात्री कुत्रा वेल्हाळला, पाल चुकचकली, घुबडाचा घुघुत्कार यावर विश्वास ठेवू नये.लग्न जुळवितांना आई-वडील, नातेवाईक वधु-वर शरण यांना जे मान्य तोच शुभयोग समजावा. राशीकुट, गुण, ग्रह, नक्षत्रे, जुळली आहेत असे समजावे.

**10) गुन्हेगारांना सभ्य समाजात आणले -** जन्मत: सर्वच लोक निष्पाप व चांगले असतात, परंतू वाईट मित्रांच्या संगतीमुळे, दारिद्रयामुळे, रोजच्या गरजा पुर्ण न झाल्यामुळे, पोटच्या भुकेमुळे, आपत्यांना खायला मिळत नसल्यामुळे स्त्रिया-पुरुष अनैतिक व्यवसायाकडे वळून चोर, गुन्हेगार बनतात, मुली देवदासी, मुरळया, वैश्या बनतात. त्यांना चांगले समजाविले, उपदेश केला (समुपदेशन) चांगले वागविले तर वाईट लोकही सभ्य होऊन प्रतिष्ठीत चांगले जीवन जगू शकतात यावर बसवेश्वरांचा विश्वास होता. त्यामुळे त्यांनी दारु गुत्तेदार मारय्या, गायचोर उरिलिंगपेद्दी, काश्मिरचा मारेकरी चिक्कच्या, संकव्वा (पुर्वायुष्यातील वेश्या) यांना सभ्य समाजात आणून कायक (कर्म) करण्यास दिले आणि अनुभव मंटपाचे सदस्य केले.

**11) नागिदेव कांबळे या अस्पृश्याकडे भोजन -**

महामंत्री बसवेश्वर समाजातील शुद्र समजल्या जाणा-यांच्या घरी जात. त्यांचे भोजन प्रसाद स्वीकारित असत. बसवेश्वरांच्या आचरणाने व कृतीने प्रभावित होऊन अनेक शुद्रांनी अनेक देवांची पुजा सोडून इष्टलिंग भक्ती

स्वीकारली. एक दिवस नागिदेव कांबळे या अस्पृश्यानेही त्यांना भोजनाचे निमंत्रण दिले. गावकुसाबाहेरची अनेक स्त्री-पुरुष मंडळी सहभागी झाली होती. कर्मठ लोक वाकून खात्री करुन घेऊ लागले. बसवेश्वरांनी दुर्लक्ष केले आणि जमलेल्या स्त्री-पुरुषांना इष्टलिंग भक्ती स्विकारण्यास सांगितले. रोज अनुभव मंटपात यावयास सांगितले. बसवेश्वराने अस्पृश्य नागिदेव कांबळे यांच्याकडे भोजन करुन आपल्या कृतीतून व आचारातून समाजात जातीभेद पाळू नका असा चांगला संदेश दिला.

**12) स्त्रियांना स्वातंत्र्य -** स्त्रियांना शिक्षण घेण्याचा, दिक्षा घेण्याचा, संपत्ती घेण्याचा, राजसत्ता सांभाळण्याच्या, पतीची निवड करण्याचा, विधवांना विवाहाचा, घटस्फोटाचा हे सारे अधिकार नव्हते. स्त्रियांची संपत्ती सारखी देवाणघेवाण होई. कर्मठ लोकांनी तिला व्रतवैकल्ये, उपासतपास इतर कर्मकांडातच आजन्म गुंतवून ठेवले.

बसवेश्वरांना या गुलामी प्रथेची कल्पना होतीच. पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही मन, भावना, बुध्दी, शक्ती असते याची जाणीव असल्यामुळे तिला विकासाच्या संधी उपलब्ध करुन दिल्या. स्त्रियांची पाचही सुतकातून मुक्ती केली. अनुभव मंटपातील स्त्रियांना लिहिणे, वाचणे शिकवून साक्षर केले. जे वाटते ते मत अनेक स्त्री-पुरुषांच्या समोर हिमतीने व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य बहाल केले. स्त्रिया वाद-विवादात सहभागी होऊ लागल्या. स्वाभिमानाने आपले विचार वचन काव्यातून व्यक्त करु लागल्या. अर्थार्जनाची कामे (कायक) करु लागल्या. बसवेश्वरांनी बाल विवाहाला विरोध केला. पुनर्विवाह, आंतरजातीय विवाहाला, विधवांच्या विवाहाला प्रोत्साहन दिले. कल्याण क्रांतीत वचन साहित्याला राज्याच्या सैनिकांनी आग लावल्यावर त्यातून बरेच वचन साहित्याचे गठ्ठे सातशे किलोमीटर अंतरावरील डोंगर कपारीत दुर्गम जंगलात उळवी (जि.उत्तर कन्नड) येथे सुरक्षित नेले. केवढी ही वचननिष्ठ व ज्ञाननिष्ठा अनुभव मंटपातील अनेक स्त्रियांनी विविध प्रकारचे उद्योग, व्यवसाय सुरु केलेले होते. उदा : सूत कातणे, सौंदर्य प्रसाधने विकणे, धान कोंडणे, तेलघाणी चालविणे, सुतार काम, स्त्री-पुरुषांना लिहणे-वाचणे शिकविणे, ज्ञानदान करणे इ.बसवेश्वरांनी स्त्रियांना स्वावलंबी, कर्तव्य कठोर व स्वाभिमानी बनवून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला.

**सारांश -** भेदभावामध्ये होरपळलेल्यांचा आणि गरिबीत खितपत पडलेल्यांचा कैवारी होणे होय. मानवांच्या घनतेस (श्रेष्ठत्वास) उचलून धरणे होय. सर्व प्रकारच्या भेदभावांच्या निर्मूलन कार्यात सहकार्य करणे होय. या पृथ्वीस सकल जीवात्म्यांचे महाविवास व माहेर होण्यालायक करणे होय. कायकाव्दारे अर्थात शरीरिक श्रमामुळे येणारे अनुभव आणि आपल्या सारखेच इतरांना समजण्यासाठी दासोह करणे. या सा-यातून अनुभवासंगे समाधानाने जगणे होय. असे महात्मा बसवेश्वरांचे क्रांतीकार्य दिसून येते.

**संदर्भग्रंथ -**

*डॉ. अशोक ग. मेनकुदळे : महात्मा बसवेश्वर, महाराष्ट्र बसव परिषद भालकी, तीसरी आवृत्ती - 2019.*
*डॉ. राजेश्वर सोलापुरे : लिंगायत एकस्वतंत्र धर्म, अरुणा प्रकाशन, लातूर - 2013*
*डॉ. सुर्यकांत घुगरे : जगत्ज्योतीबसवेश्वर, महाराष्ट्र बसव समिती, नांदेड - 2003*
*रमजान दर्गा : बसवेश्वरांचा विश्वसंदेश, महाराष्ट्र बसव परिषद, भालकी, सातवी आवृत्ती - 2018*
*प्रा. भिमराव ब्रम्हाजीराव पाटील : ऐतिहासिक बसकल्याण पर्यटन मार्गदर्शिका, शरण साहित्य मंडळ लातूर - 2014*
*डॉ.एच.थिप्पेरुद्र स्वामी : बसवेश्वर, साहित्य अकॅडमी, नई दिल्ली - 1982*
*दुर्गा भागवत : धर्म आणि लोक साहित्य, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई - 1975*
*भगत रा. तु. : संत साहित्य आणि अंधश्रध्दा निर्मुलन, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर - 2002*

## आद्य समाजसुधारक- महात्मा बसवेश्वर

**प्रा. डॉ. विक्रम अभिमन्यू ओतारी**
*दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील महाविद्यालय, पारगाव., मो. नं. ९६५७७३०९५५०*
*Email- otarivikram550@gmail.com*

- **प्रास्ताविक:-** मध्ययुगात अनेक समाज व धर्मसुधारक होऊन गेले. त्यापैकी महात्मा बसवेश्वर एक होय. इ.स.वी.सन बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी त्यांच्या विचार व कार्यामुळे ते इतिहासात अजरामर झाले आहे. लिंगायत पंथाचे प्रवर्तक आहेत कर्नाटकाच्या धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक इतिहासात संत महात्मा बसवेश्वर यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे मानले गेले आहे. आद्य समाजसुधारक तसेच कर्माचे शत्रू सांगणारी आणि वीरशैव धर्माचे पुनरुज्जीवन करणारी थोर विभूती म्हणून संत बसवेश्वर यांच्याकडे पाहिले जाते. धर्म, समाज, तत्वज्ञान, वाड्मय, राजकारण अशा विविध क्षेत्रातील त्यांचे कार्य क्रांतिकारक स्वरूपाचे आहे.१
- **मुंजीला विरोध:-** वयाच्या आठव्या वर्षापर्यंत बसवेश्वर बागेवाडीत राहिले. बसवेश्वर लहान वयापासूनच चिकिस्तक व विवेकी वृत्तीचे होते. त्यांनी लहानपणी उपनयन संस्काराला विरोध केला. त्यांनी सांगितले की, माझ्या अगोदर माझ्या बहिणीचा म्हणजे अक्कानागम्माचा गंमत उपनयन संस्कार झाला पाहिजे. परंतु मादिराज म्हणाले की, धर्मग्रंथाप्रमाणेच मुलाची मुंज होऊ शकते. मुलीची मुंज होऊ शकत नाही. त्यावर बसवेश्वर म्हणाले की, मुलगा व मुलगी यामध्ये लिंगभेद करणाऱ्या धर्मग्रंथांचे नियम मला मान्य नाहीत.

उपनयन संस्काराच्या वेळी बसवेश्वरांनी आपल्या धार्मिक संवादातून सर्वांना निरुत्तर केले. आठ वर्षाच्या बसवेश्वरांनी उपनयन संस्काराला विरोध करीत, धर्मचिकिस्तेतील फोलपणा दाखविला व इथूनच बसवेश्वरांच्या विद्रोही विचारांची सुरुवात झालेली दिसते. विचारांची प्रेरणा माणसाला विद्रोह करायला शिकवीत असते. याचाच प्रत्यय बसवेश्वरांच्या जीवनातील या प्रसंगातून दिसून येतो. वैदिक परंपरेला नाकारणारा बसवेश्वरांचा पहिला विद्रोह परिवर्तनवादी समाजाची नांदी ठरलेला पाहावयास मिळतो.२

- **आध्यात्मिक विद्यापीठाची स्थापना:-** गुरु जातवेदमुनींनी बसवेश्वरांना ज्ञान प्रसारासाठी आणि वीरशैव धर्माच्या प्रचारासाठी दक्षिणेतील कलचुरी या ठिकाणी पाठविले. बसवेश्वरांनी या काळात अनेक लोकोपयोगी कामे केली. अनेक अनिष्ट चालीरीती बंद केल्या. बालविवाहाला कडाडून विरोध करून विधवा विवाहाला मान्यता दिली. बसवेश्वरांनी `शिवानुभवमंटप` नावाच्या आध्यात्मिक विद्यापीठाची स्थापना केली.३ या विद्यापीठाच्या माध्यमातून बसवेश्वरांनी विश्वशांती आणि विश्वबंधुत्वाचा संदेश देऊन आम्तोद्धाराचे आणि लोकोद्धाराचे मानवतावादी कार्य केले. माणसासारखा माणूस असून सुद्धा त्याचा विटाळ दुसऱ्यांना का होतो? असे अनेक अनाकलनीय प्रश्न त्यांच्या मनात उभे राहिले, त्या बसवाण्णानी स्त्री-पुरुष समानतेचा उद्‌घोष करणाऱ्या व पददलितांना त्यांचा खरा अधिकार देणाऱ्या वीर लिंगायत धर्माचे पुनरुज्जीवन करण्याचे काम केले.
- **जातीय विषमतेला विरोध:-** समाज व्यवस्थेला लाभलेला अनादी अनंत रोग म्हणजे जातीयवाद. बसवाण्णांनी १२ व्या शतकाच्या प्रारंभीच जातीअंताचा लढा आचरणातून आरंभीला होता. बसवेश्वरांनी केलेला हा विद्रोह व्यवस्थेला सहन झाला नाही म्हणून बसवाण्णांना बिज्जळाचे प्रधानपद सोडावे लागले. बसवेश्वरांनी आपल्या वीरशैव लिंगायत धर्मात ज्या तत्त्वज्ञानाचा, आचार- विचार, नितीचा सदुपयोग केला, त्याचाच उपयोग काही शतकांपूर्वी वर्धमान महावीर आणि गौतम बुद्धांनी केला होता. बुद्ध आणि महावीर यांचा काळ वेगळा असला तरी बसवेश्वरांनी स्थळ-काल परत्वे ज्या इष्टलिंग धर्म प्रतिपादनाचे वर्णन केले होते, ते वैचारिकदृष्ट्या गौतम बुद्धांच्या विचारांशी मिळते जुळते आहे. म्हणूनच बसवेश्वरांना १२ व्या शतकातील बुद्ध म्हणून संबोधले जाते.४

- **स्त्रीमुक्तीचा पुरस्कार:-** वेदकाळात स्त्री-पुरुषांचा दर्जा समान होता हे मान्य होण्यासारखे नाही. कुटुंब व समाजाच्या पातळीवर स्त्रियांचे स्थान हे अत्यंत दुय्यम होते. स्त्रियांनी पूजापाठ, वेदपठण करू नये, कोणताही धार्मिक विधी मध्ये सहभाग घेऊ नये अशा प्रकारचे बंधने होती. परंतु पुढे महात्मा बसवेश्वरांच्या दृष्टीकोनातून स्त्रियांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल घडवून आणला. चूल आणि मूल एवढ्यापुरतेच त्यांचे क्षेत्र मर्यादित राहिले नसून पुरुषांच्या बरोबरीने स्थान त्यांना देण्यात येऊ लागले. महात्मा बसवेश्वरांनी स्थापन केलेल्या अनुभव मंटपामध्ये विविध जातीधर्मातील स्त्रिया या मुक्तपणे आपले विचार अनुभव मांडू लागले. त्यातून समाज प्रबोधनात्मक वचनांची निर्मिती झाली. पत्नीच्या निधनानंतर जसा पुरुषाशी पुनर्विवाह करण्याची परवानगी होती तसेच पतीच्या निधनानंतर स्त्रीस देखील पुनर्विवाहाची परवानगी असली पाहिजे, या बसवेश्वरांच्या विचारातून स्त्रियांना पुनर्विवाह परवानगी मिळू लागली. विधवा स्त्रियाप्रमाणे वेश्यांच्या जीवनाकडे पाहण्याचा बसवेश्वरांचा दृष्टिकोण अधिकच व्यापक व समतापूर्वक होता. जंगम यांच्याद्वारे वेश्या अवस्थेतील स्त्रियांमध्ये नैतिक मूल्यांचा प्रचार करण्यात आल्यामुळे अनेक वेश्यांमध्ये मन परिवर्तन घडवून आणले व उपजीविकेची पाप मार्ग सोडून काय मार्ग पत्करला. उदा.- सुळी संकवे या वेश्या स्त्रीस कायक मार्गाला लावून तिचे पुनर्वसन घडवून आणले.
- **नवधर्मसंदेश:-** समाजात आढळणारे कर्मकांड व बहुदेवोपासना यास समाजातील अंधश्रद्धा हीच कारणीभूत आहे, असे बसवेश्वरांना वाटत होते. म्हणून त्यांनी एकदेवोपासनेचा पुरस्कार केला. बसवेश्वरांनी सांगितले की, लहान आकाराचे इष्टलिंग प्रत्येक स्त्री-पुरुषाने आपल्या अंगावर धारण करावे. म्हणजे मग केव्हाही, कोठेही सुलभ शिवशक्ती करता येऊ शकते. त्यासाठी देवालाये, तीर्थक्षेत्रे इत्यादी ठिकाणी जाण्याची अजिबात गरज नाही.५ इष्टलिंग दीक्षा कोणालाही घेता येईल. स्त्री असो वा पुरुष असो, गरीब -श्रीमंत व चार वर्णातील सर्व जातीतील लोक यासाठी पात्र आहे. यामध्ये विविध जातीधर्मातील लोक एकाच श्रद्धा - छत्राखाली येतील त्यांच्या मधील भेदभाव संपेल व आपण सर्व एकच आहोत ही भावना त्यांच्यामध्ये सातत्याने वास करीत राहील. प्रत्येकाला स्वतःचा उद्धार करून घेण्याचा अधिकार आहे, अशा प्रकारे `नवधर्मसंदेश` बसवेश्वरांनी दिला.
- **आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार:-** बसवेश्वरांनी आपल्या तत्त्वांना, विचारांना धरूनच एक आंतरजातीय विवाह घडवून आणला आणि कल्याण राज्यात उलथापालथ झाली. अनुभव मंटपाचे दोन सदस्य हरळय्या व मधुवरस यांच्या मुलांचा विवाह झाला. जन्माने चांभार असलेल्या हरळय्याचा मुलगा शीलवंत व जन्माने ब्राह्मण असलेल्या मधुवरसची ची कन्या कलावती. जन्माने मिळालेल्या जाती सोडल्या तर रूप, गुण, विद्या व स्वभाव या दृष्टीने दोघे एकमेकांना अनुरूप होते. अनुभव मंडपातील शिवशरण असल्याने जातीपातीचे दोघांनाही बंधन नव्हते. अनुभव मंटपाच्या सभागृहात मोठ्या थाटामाटात विवाह पार पडला. या विवाहास एक लाख 96 हजार शरण-शरणी वधू वरास आशीर्वाद देण्यासाठी उपस्थित होते. बसवेश्वरांसह बहुतेकांना परिणामांची कल्पना होती.६

या आंतरजातीय विवाहाची बातमी वाऱ्यासारखी कल्याणनगरीत पसरली. अनेकांनी राजाचा महाल गाठला व राजाला सांगू लागले. शिवशरणाकडे कानाडोळा केला तर महाराजांचे आसन देखील धोक्यात यायला वेळ लागणार नाही. बसवेश्वरांवर कारवाई झाली नाही तर, समाज उद्ध्वस्त होईल. राजाने सावध राहावे, असे इशारे बिज्जल राजाला देण्यात आले.

- **सारांश:-** महात्मा बसवेश्वरांनी सामाजिक कार्याला विशेष गती दिली. समाजातील अंधश्रद्धा, जातीभेद, स्त्री-विषयक दृष्टिकोन यामध्ये आमूलाग्र बदल घडवून आणला. कोणत्याच प्रकारची सामाजिक विषमता बसवेश्वरांना मान्य नव्हती. महात्मा बसवेश्वरांनी समूह चर्चेतून अनेक चांगल्या गोष्टी स्वीकारल्या. परंतु सन्यास, निष्क्रीयता, एतखाऊपणा, भिक्षा मागणे हे पाप ठरविले. `कायकवे कैलास`, श्रमपूजा ही शिव पूजा आहे, यापुढे जाऊन ते असे म्हणतात की व्यक्ती, कुटुंब, समाज, राज्य व विश्वकल्याणासाठी सत्य, शुद्ध व नित्य केलेले बौध्दिक व शारीरिक श्रम म्हणजे `कायक` होय. मानवतेवर व माणुसकीवर त्यांची अतूट श्रद्धा होती. म्हणून दया, करुणा, परोपकार यासारख्या जीवनमूल्यांचा त्यांनी पुरस्कार केला. चोर, दरोडेखोर यासारख्या सामाजिक गुन्हेगारांना अत्यंत उदार मनाने क्षमा करून, त्यांना सज्जनांच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले.

जातीनिरपेक्ष, जातीविरहित समाज निर्माण करणे हे महात्मा बसवेश्वर त्यांचे ध्येय होते. प्रत्येक दिवस नवा संकल्प घेऊन यायचं व तो पूर्ण होऊन मावळायाचा. अशाप्रकारे महात्मा बसवेश्वर यांचे समाजपरिवर्तनाचे कार्य होते.

- **संदर्भः-**

*पाटील भीमराव ब्रम्हाजीराव, `बसवस्थळे` ( पर्यटन मार्गदर्शिका), शरण साहित्य मंडळ, २७ एप्रिल २००९, पृ. १.*
*मेनकुदळे अशोक गंगाधर, आद्य समाजसुधारक महात्मा बसवेश्वर, पूर्वोक्त, पृ. १४.*
*मडकी शशिकला क्रांतीज्योती देवमानव, बसवण्णा, महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी, २०१०, पृ. ३७.*
*जयशेट्टी भालचंद्र, समतासूर्य म. बसवेश्वर, उपरोक्त पृ. १९.*
*मेनकुदळे अशोक गंगाधर, आद्य समाजसुधारक, पूर्वोक्त, पृ. २९.*
*विरुपाक्षप्पा वी.( अनुवाद प्रभाशंकर टी. जी.) शरणतत्व विवेचन बसव समिती बेंगळूर, पृ. ११६.*

---

# महात्मा बसवेश्वरांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन व कार्ये

**प्रा. डॉ. शिवाजी किशनराव बल्लोरे**
*सहा. प्राध्यापज , श्री.ज़ु मारस्वामी महाविद्यालय, औसा.*

---

**प्रस्तावना :** महात्मा बसवेश्वर हे १२ व्या शतकातील एक क्रांतीकारी युग पुरुष तसेच समाजसुधारक आहेत. भारतीय समाजातील विशेष करुन दक्षिण भागातील अंधश्रध्दा, कर्मकांड, विषमता, भेदभाव, स्त्री दास्यत्व, जातीयता, श्रेष्ठ कनिष्ठता, अस्पृश्यता अशा कितीतरी समस्येने त्रस्त झालेल्या व मरगळलेल्या समाजाला नवचैतन्य देण्याचे कार्य त्यांनी केले आहे. प्रस्थापित समाजाकडून होणाऱ्या शोषणविरोधी, भेदभाव, गुलामगिरी व पिळवणुकी विरुध्द बंड करण्याचे कार्य त्यांनी केलेले आहे. समाजव्यवस्थेतील समता, बंधूता, अभिव्यक्ती, स्वातंत्र, विवेक विचारसरणीची बिजे पेरण्याचे कार्ये त्यांनी केले. या बरोबरच स्त्री पुरुष समानतेचा पुरस्कार, प्रवाहाच्या बाहेर फेकल्या गेलेल्या स्त्रीयांना व वंचितांना मुख्य प्रवाहात आणुन त्यांना त्यांचे नैसर्गिकरित्या प्राप्त अधिकार मिळवून देण्याचे महान कार्ये त्यांनी केले आहे.

**स्त्रीवादी दृष्टीकोन :** समकालीन स्थितीत कुटूंब व समाजाच्या पातळीवर स्त्रियांचे स्थान हे अत्यंत दुय्यम व शोषन रहित होते. स्त्रीयांनी पुजापाठ, वेदपठण, यज्ञ होम करु नये, धार्मिक विधीमध्ये सहभागी होऊ नये. तसेच पुरुषासमान असलेल्या अधिकारावर मर्यादा आणल्या गेल्या. स्त्रीयांना जो निसर्गताह प्राप्त अधिकार मिळायला पाहिजे ते मिळत नव्हते. स्त्रीया या शोषन व गुलामगिरीला बळी जाताना दिसून येत होत्या. स्त्रीला सर्वच जाचक बंधनातुन मुक्त करण्यासाठी १२ व्या शतकात वचन साहित्याच्या व शरणच्या माध्यमातून मिळवून देण्याचे कार्ये बसवण्णांनी ज़े ले आहे.

**१. विधवा पुर्नविवाह :** समाजव्यवस्थेने पतीच्या निधनानंतर स्त्री ही एक तर सती म्हणून जावी अथवा जिवनभर विधवा म्हणुन समाजात जगावी असा प्रचलित नियम केला होता. "धर्मशास्त्राने तिला दोषी मानून तिचा पूर्नविवाह नाकारला. एवढेच नव्हे तर, ती अमंगल, अशुभ म्हणून तिला सण उस्तवामध्ये, समारंभामध्ये व धार्मिक विधीमध्ये सहभाग नाकारला. त्यामुळे तिला फक्त अपनास्पद, तुच्छतापूर्ण घराच्या चार भिंतीमध्ये आपले जिवन कसेबसे जगावे लागत असे. स्त्रीयांना असलेले नैसर्गिक हक्क नाकारले, तसेच केशवपन करुन अलंकार, चांगले वस्त्रे, चांगले भोजन ग्रहण न करण्यासारखी हजारो बंधने स्त्रीवर लादण्यात आली. [१] परंतु बसवण्णांनी स्त्री जिवनाच्या स्वातंत्र्यावरील मर्यादा व नैसर्गिक हक्क लक्षात घेता. पतीच्या निधनानंतर स्त्रीयांना देखील पुर्नविवाह करता यावा याकरिता त्यांनी विधवा पुर्नविवाहाची संकल्पना १२ व्या शतकात रुढ केली. नुसती संकल्पनाच मांडली नाही तर प्रत्यक्षात अनेक विधवा स्त्रीचा पुर्नविवाह लावून विधवा पुर्नविवाहाची मुहूर्तमेढ त्याकाळी त्यांनी प्रचलित समाजव्यवस्थेत रुढ केली.

**२. वेश्याचे पुर्नवस-न :** विधवा स्त्रीयाप्रमाणे वेश्यांच्या बाबतीतही अधिक व्यापक व समतापुर्वक विचार मांडलेले आहेत. वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांचे पुर्नवसन करण्यावर बसवण्णांनी भर दिला. जंगम यांच्याव्दारे वेश्या अवस्थेतील स्त्रियांमध्ये नैतिक मूल्यांचा प्रचार करण्यासाठी व त्यांची जीवनपध्दती सुधारणा व्हावी याकरिता प्रयत्न केला. नैतिक मूल्यांच्या विचारातून त्यांनी वेश्यांचे मन परिवर्तन करुन उपजिवेकेसाठी वाम मार्ग कायक मार्ग मोडून पत्करायला सांगितला. उदा. सुळी संकवे या वेश्या स्त्रीस कायक मार्गाला लावून तिचे पुर्नवसन घडवून आणले.

देवालयांमध्ये गाणे, नृत्य करणे याबरोबरच वेश्या ही त्यंची वृत्ती होती. त्यापैकी काही स्त्रिया बसवण्णांच्या विचाराने व प्रभावाने परिवर्तित होऊन शरणी झाल्या. त्यांनाही अनुभव मंटपात गौरवाचे स्थान मिळाले.[२] अशा प्रकारे वेश्यांना सन्मानाचे व स्वावलंबी बनवून जीवन देण्यचे महत्त्वाचे कार्य बसवण्णांनी केले.

**३. आंतरजातीय विवाहास प्राधान्य :** बसवेश्वरांनी आपल्या तत्वांना, विचारांना धरुनच एक आंतरजातीय विवाह घडवून आणला. अनुभव मंटपाचे दोन सदस्य, हरळय्या व मधुबरस यांच्या मुलांचा विवाह केला. जन्माने चांभार

असलेल्या हरळ्यांचा मुलगा शीलवंत व जन्माने ब्राह्मण असलेल्या मधुवरसचा आंतरजातीय विवाह केला. आंतर जातीय विवाहाच्या माध्यमातून जन्माने मिळालेल्या जाती सोडल्या तर रुप, गुण विद्या व स्वभाव यांना महत्व दिले.[३] अनुभव मंटपातील शिवशरण असल्याने जातीपातीचे दोघांनाही बंधन नव्हते. अशा आंतरजातीय विवाहाची संकल्पना प्रत्यक्षात अंमलात आणण्याचे कार्य त्यांनी १२ व्या शतकात केलेले आहे.

**४. स्त्री आरक्षण व समता :** बसवण्णांनी मंगळवेढा येथील स्थापन केलेल्या अनुभव मंटप ही संकल्पना लोकशाही संसद म्हणून जगात परिचीत आहे. या अनुभव मंटपात शिवशरण येथे एकत्र जमत आणि विविध विषयावंर चर्चा करत, आणि या मंडपाच्या माध्यमातून विषमता, हिंसा, भेदभाव इ. समस्येच्या विरोधात लोकांमध्ये जागृतीचे कार्य होत असत. या मंटपाच्या माध्यमातून समाजात न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, एकात्मता, शिस्त, सुशासन व प्रशासन आदी बाबी रुढ केलेल्या आहे. याठिकाणी दलितांना सहभागी करुन घेण्याबरोबरच स्त्रीयांना ही या मंटपात आरक्षण देण्यात आलेले पहावायास मिळते. म्हणजेच या मंटपात पुरुषा बरोबरच स्त्रीयांनाही समतेच्या न्यायातून सर्वच अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. स्त्री व दलितांच्या आरक्षणाची संकल्पना बसवण्णांनी १२ व्या शतकात या मंटपाच्या माध्यमातून समाजात अंमलात आणली.

**५. स्त्रियांची सुतकापासून मुक्ती :** त्या काळात प्रचलित समाजव्यवस्थेत सोवळ, विटाळाच्या माध्यमातून अस्पृश्य व स्त्रियांवर समाज व कुटूंबातील दुय्यमता लादण्याचा प्रयत्न केलेला होता. एखाद्या बाळाला जन्म दिला, स्त्री रजःस्वला झाली तर तिचा विटाळ मानल जात, एखाद्याचा घरात मृत्यू झाला तर काही दिवस सुतक पाळले जाते. अशा अनेक बाबतीत सुतकाच्या नावाखाली स्त्रीयांना दुय्यमत्व देण्यात येत होते.[४] परंतु बसवण्णांनी "पंचाचार व अष्टावरण पालनाने भावबंधन, पुनर्जन्म, विटाळ, सुतक यापासून लिंगायत स्त्री मुक्त होते असे सांगितले आहे."[५] अल्लमप्रभू विटाळाला व सुतकाला विरोध करताना म्हणतात विटाळाशिवाय पिंडाच्या स्थिरतेला आश्रय आहे का ? विटाळामुळेच जीवन जन्माला येतो मग ते शुद्र कसे होऊ शकते ? ज्या स्त्रीत्वामुळे पुरुषाचा जन्म झाला ती स्त्री कशी शूद्र, अस्पृश्य होते ? तसेच अल्लमप्रभु म्हणतात.

स्त्री भक्तिण असेल तर विटाळास घाबरु नये !
पती भक्ती असेल तर कुणाला घाबरु नये !
स्त्रीपतीचा देहसुखाचा भाव मिटून लिंगच पती झाल्यावर!
स्त्रीला पती असेल का ? पतीला सती असेल का ?[६]

महात्मा बसवेश्वर म्हणतात की, ऋतस्नात रजस्वलेला अशुची, अस्पृश्य समजु नये, जातीचे सुतक, उच्छिष्टांचे सुतक, रजोसुतक, जन्म आणि मृत्युच्या वेळचे सुतक अशी पाचही सुतके न पाळता इष्टलिंगोपासना व नियत्नैमित्यिक कर्मे करावीत.[७] अशा प्रकारे बसवण्णांनी विटाळ, सोवळे या संकल्पनेच्या नावाखाली स्त्रियांना मिळालेले दुय्यमत्वाची वागणुक याचा विरोध केला. स्त्रीयांना सोवळ्याच्या माध्यमातुन मिळत असलेली अस्पृश्यतेची प्रथा थांबविली व समाजात स्त्रीयांना आत्मसन्मानाने जगण्याची संधी मिळून दिली.

**६. स्त्री पुरुष भेदभावास विरोध :**

" शरण नि शारणींनी आपल्या वचनांमध्ये आपापले अनुभव, विचार, तत्व व्यक्त केले आहे. तसेच समाजातील अनेक चुकीच्या धारणा, धर्म, जात-पात, उच्च-निच भेदभाव यांच्याबरोबरच स्त्रीयांना लिंगभेदावर आधारावर दिलेली दुय्यम दर्जाच्या वागणुकीला बसवण्णांनी विरोध केला. शरणांनी आपल्या वचनांमध्ये स्त्रियांना बहिण, माता, पुण्यमती, साक्षात कपिलसिध्द मल्लिकार्जुन म्हणुन संबोधिले आहे. केवळ प्रापंचिक किंवा संसारिक पातळीवरच नव्हे तर, परमार्थिक पातळीवर सुध्दा तिच्यात भेदभाव न करता समान अधिकार मिळवून दिला. परमार्थिक दृष्टीने त्यांनी सांगितले. स्त्री आणि पुरुषामध्ये आत्मभेद नाही.

"स्तन केस आहेत म्हणून स्त्री म्हणती
दाढी, मिशा आहेत म्हणून पुरुष म्हणती
आत संचारणारा आत्मा स्त्री ही नव्हे पुरुषही नव्हे,

पाहा राम-नाथा !"

व्यक्ती म्हणजे केवळ शरीर किंवा देह नव्हे, तर त्यातील परमतत्व परमात्माचा अंश असलेला आत्माच सत्य आहे. त्यानेच शरीराला चैतन्य मिळते् आणि हा आत्मा स्त्री-पुरुषांमध्ये वेगवेगळा नसतो तर एकाच प्रकारचा असतो.[८] असा त्यांनी स्त्री अन् पुरुषामध्ये आत्मभेद नाही. आत्मा हा लिंगभेद करत नाही आत्म्याचे स्वरुप सारखेच आहे त्यात भेद नसतो असे वचन साहित्यातून त्यांनी सांगितलेले आहे.

**७. स्त्री ही माया नव्हे :** बहूतेक करुन जगातील सर्व धर्माप्रमाणे सुवर्ण, माती, स्त्री यांना माया, प्रमुख माया म्हणुन प्रतिबिंबित केले आहे. ती नानारुपाने पीडीते. स्त्रीला छळणारी पीडा आहे. दूष्ट शक्ती आहे म्हणून प्रतिबिंबित केले आहे ह्या वादाला शरणांनी उत्तर दिले आहे की,

"म्हणती स्त्रिस माय, स्त्री ही माया नव्हे.
म्हणती मातीस माया, माती ही माया नव्हे,
म्हणती सुवर्जास माया, सुवर्ज माया नव्हे,
मनापुढील आशाच माया पहा गुहेश्वरा !"

अशा प्रकारे सोने, माती आणि स्त्री (जर जोरु, जमिन, ह्या माया नव्हेत, मनापुढील आशाच माया होऊन पीडीतात म्हणून अल्लमप्रभू सांगतात.) स्त्रीला फक्त माया न समजता व पिडीत छळणारी न मानता स्त्रीला त्या वाईट बंधणातून मुक्त करण्याचे कार्य वचनाच्या माध्यमातून बसवण्णांनी केले.[९]

**८. स्त्री शिक्षण व आर्थिक स्वावलंबन :** पुरुष प्रधान संस्कृतीमुळे स्त्रीयांना त्या काळात शिक्षणाचा हक्क नाकारण्यात आलेला होता. तर कुटूंब व समाजव्यवस्थेने आर्थिक दृष्टीने मर्यादा आणलेल्या होत्या. चुल अन मुल यापुरतेच स्त्रीला बंदिस्त केले होते. परंतु शिक्षणाच्या माध्यमातुन स्त्री स्वयंपूर्ण व शहाणी होते. तर व्यावसायीक शिक्षणाच्या माध्यमातुन ती स्वावलंबी आणि स्वाभिमानी होते, यांची पुर्ण जाणीव बसवण्णांला होती. बसवण्णांनी याच स्त्री शिक्षणाच्या अट्टाहासासाठी शिक्षण हे स्त्रियांना स्वावलंबन व सन्मानापर्यंत घेवून जात असल्यामुळे स्त्रियांना पुरुषाप्रमाणेच उपनयन अधिकार मिळाला पाहिजे म्हणून आपल्या वडिलांसोबत वादविवाद केला होता. उपयन आणि शिक्षण, शिक्षण आणि स्वावलंबन या बाबी परस्परांशी जोडलेल्या असल्यामुळे बसवण्णांनी स्त्री शिक्षणाचा अट्टाहास धरला होता. त्यांची सुरुवात त्यांनी अनुभव मंटपाच्या माध्यमातून लघुउद्योग, व्यवसायाचे ज्ञान देण्याचा प्रयत्न सुरु केला.[१०] याबाबत लल्लेश्वरी मूगी म्हणतात " महात्मा बसवेश्वरांची पत्नी शरणी गंगाम्बिका यांच्या नेतृत्वाखाली कल्याणात ठिकठिकाणी स्त्री शिक्षणाची केंद्रे उघडण्यात आली होती. प्रौढ शिक्षणासाठी कायक केंद्र (कायकस्थळे) स्थापन करण्यात आली होती आणि त्यामधून विविध कुटिरोद्योगांचे शिक्षण देण्यात येत असे. त्यातील अनेक विभागात त्या-त्या कायकातील निष्णात अशा व्यक्तीची देखरेखीसाठी नेमणूक केली गेली होती."[११] अशा प्रकारे बसवण्णांनी समाजातील स्त्रीयांना शिक्षणाची व्यवस्था करुन तसेच कुटिरोद्योगांच्या प्रशिक्षणातून स्वावलंबी व स्वाभिमानी बनवून सन्मानाने उभे केले होते.

**सारांश :** भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रीला शुद्र, बहिष्कृत समजले जात असे. स्त्रीयांवर अन्याय अत्याचार होत होता. स्त्रीयांना स्वातंत्र्याचा, आध्यात्मिक व धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार नव्हता तो मिळवून देण्यात बसवण्णांनी १२ व्या शतकात महत्त्वाची भुमिका राहिलेली. स्त्रियांची अशुध्दतेच्या कल्पनेतून आणि पंचसुतकापासून सुटका करण्याचे कार्ये बसवण्णांनी केलेले आहे. धार्मिक व आध्यात्मिक जिवनात जन्म, जात, व्यवसाय, भेदभाव केला जावु नये तसेच स्त्री-पुरुष भेदभावातून स्त्रीयांच्या स्वातंत्र्यावर मर्यादा येवु नये याकरिता धार्मिक, सामाजिक, राजकिय, शिक्षण क्षेत्रात पुरुषा समान स्त्रीयांना संधी मिळवून देण्याचे कार्ये बसवण्णांनी केलेले आहे. स्त्रीयांना सुतका पासुन मुक्ती, विधवा पुर्नविवाह, सती प्रथावर बंदी, आंतरजाती विवाहास मान्यता, स्त्री शिक्षण तथा स्वावलंबनासाठी कुटी उद्योगाचे शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, पुरुषा समान कार्ये करणे व समान संधीची उपलब्धी, महानुभव मंटपाच्या माध्यमातुन केली. लोकशाही व्यवस्थेत स्त्री सहभाग व आरक्षणाची तरतुद १२ व्या शतकात बसवण्णांनी केलेली आहे. अशा उदारमतवादी दृष्टीकोनातून स्त्री विषयक विचाराची व सुधारणावादी विचाराचे बिजारोपण बसवण्णांनी केलेले आहे.

**संदर्भ :**

*बिचेवार सचितानंद, २०१५ : परिवर्तनाचा महामेरु महात्मा बसवेश्वर, स्वाती प्रज ाश-ा, पुर्जा,पृ.५४.*
*सविता नडकट्टी, २०१२ : शरण साहित्यातील स्त्री दर्शन, बसव (सिंध्दात संपा. बाबूराव माशाळक्र, तंगावार,) महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी, पृ.१५४.*
*बिचेवार सचितानंद, उपरोक्त,पृ.५६.*
*बिचेवार सचितानंद, उपरोक्त,पृ.५२.*
*मेनकुदळे अशोक, २००३: समाजसुधारक महात्मा बसवेश्वर, सुविधा प्रकाशन, सोलापुर, पृ.८४.*
*सविता नडकट्टी, उपरोक्त, पृ.१५१.*
*मेनकुदळे अशोक, उपरोक्त, पृ.८४.*
*बाबुराव माशाळकर, तंगावार, २०१२: बसव सिध्दांत, महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी, पृ.१४९.*
*सविता नडकट्टी, उपरोक्त पृ.१५०.*
*बिचेवार सचितानंद, उपरोक्त, पृ.५९.*
*मूंगी लल्लेश्वरी, संतीनी बसवयुगातील, पृ.८०.*
*भालचंद्र जयशेट्टी, १९९८ : वचन, कर्नाटक साहित्य अकादमी, बैंगलूर.*

## महात्मा बसवेश्वरांचे स्त्री विषयक विचार व कार्य

**प्रा. डॉ. पाटील बी.टी.**

*भूगोल विभाग प्रमुख, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड, ता.मुखेड जि.नांदेड*

महात्मा बसवेश्वरांच्या सामाजिक विचाराचे विश्लेषण करीत असताना त्यांचा स्त्री विषयक दृष्टीकोन, त्या काळातील स्त्रियांची अवस्था व त्या संदर्भात त्यांनी केले कार्य या बाबींना ही फार महत्व आहे. याच दृष्टीने त्या काळातील स्त्री विषयक दृष्टीकोनाचा संक्षिप्त आढावा घेतलेला आहे. भारतीय इतिहासातील 12 व्या शतकाच्या पुर्वीचे अवलोकन केल्यास स्त्रियांना कधी आदराने पाहिले जात असे तर कधी तिला हिन व तुच्छ समजून कोणत्याही प्रकारची संधी दिली जात नसे. उपषिद काळामध्ये स्त्रियांना गौरव व आदर सत्कार व सर्व प्रकारचे स्वातंत्र दिले जात होते. इ.स.पुर्व 300 नंतर मात्र स्त्रियांना एक भोग वस्तु मानण्यात आले. मनूस्मृती युगामध्ये स्त्रियांवर विविध प्रकारची बंधने टाकुन ती स्वातंत्र्याला योग्य नाही असे म्हटलेले आहे. या प्रकारे स्त्रियांना धार्मिक, शैक्षणिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रापर्यंत संपूर्णपणे वंचित करण्यात आले होते. बसवेश्वरांच्या बालपणीही स्त्रियांना धार्मिक व इतर स्वातंत्र्यापासून वंचित ठेवण्यात आले होते. त्याचा ही परिणाम त्यांच्या मनावर झाला होता. पुढे बसवेश्वरांनी कुंडल संगम मध्ये अध्ययन करित असताना गुरुवर्यांना असा प्रश्न केला की, स्त्रियांना सुध्दा वेदशास्त्र व उपनिषदाचा अध्ययन करत असताना धार्मिक संस्कार का दिले जावू नये ? कारण ह्या पासून त्यांना वंचित ठेवणे हे निसर्ग विरोधी आहे. त्यांचा हा विचार ऐकुण गुरुवर्य ही प्रभावित झाले व अशाप्रकारे त्यांनी त्या काळातील सांप्रदायिक पध्दतीस विरोध केला. त्यांनी स्त्रियांना अनुभव मंडपामध्ये सर्व समस्यावर व प्रश्नावर चर्चा करण्याची संधी उपलब्ध करुन दिली. कारण त्या काळामध्ये स्त्रियांना शिक्षणापासुन दूर ठेवले जात असे. तेंव्हा स्त्रियांना शिक्षण सुविधा प्राप्त करुन दिली. इतकेच नव्हे तर स्वातंत्र्य विचार व ज्ञान प्राप्ती करुन घेण्याची संधी देण्यात आली. बसवेश्वरांनी धार्मिक क्षेत्रातुन वंचित झालेल्या स्त्रियांना धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार तर दिलाच पण त्या बरोबरच कनिष्ठ वर्गीय स्त्रियांना सुध्दा धार्मिक आचरणाची संधी दिली. स्त्रियांना पुरुषा समान सर्व प्रकारचे धर्मिक शिक्षण देवुन आचरण व धर्म संस्कारांना ती सुध्दा योग्य आहे, असे त्यांनी मत मांडले. स्त्री व पुरुष यांच्यामध्ये भेद न करता दोघांनाही समान स्थान दिले. स्त्रियांचे जीवन चुल आणि मुल इतकेच न राहता त्यांच्या क्रांतीमुळे ते सर्वपरीने विकसित झाले. स्त्री ही शारिरिक दृष्ट्या काही प्रमाणात दुर्बल असली तरी तिला सर्व प्रकारच्या व्यवस्थेतून वंचित करणे बसवेश्वरांना मान्य नव्हते. त्यांनी स्त्रियांना केवळ माता न समजता महामाता ही संज्ञा देवून जगदोध्दारक शक्ती स्त्रियांकडे आहे, असे विचार व्यक्त करुन स्त्रियांना आध्यात्मिक व्यव्हारामध्ये सर्व प्रकारची संधी उपलब्ध करुन दिली.

**सती प्रथेस विरोध :** सती गेल्या शिवाय स्त्रीला मुक्ती नाही हा विचार त्या काळात सर्व मान्य असून पतिच्या मृत शरिरासोबचत स्त्रीला जीवंत जाळले जात असत. पती मेल्यानंतर विधवा स्त्रिला जीवन जगणे असह्य केले जात असे. अशा अवस्थेत त्या प्रथेविरोधात आवाज उठविण्याचे कार्य बसवेश्वरांनी केले. विधवा विवाह, पुर्नविवाह याला संमती मिळवून देऊन स्त्रियांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. तसेच बालविवाहाला विरोध करुन समाजातील सर्व वर्गांना समान लेखुन समाजात सुधारणा घडवुन आणल्या.

**वैश्या व्यवसायावर बंदी :** समाजातील वैश्या प्रवृततीला घातलेले बंधन व स्त्री वैश्यांना पुनरुजीवन प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना दिली जाणारी सर्व प्रकारची मदत व संधी प्राप्त करुन देण्याचे कार्य केले.

**कुटीर उद्योगाची निर्मिती :** महात्मा बसवेश्वरांनी स्त्रियांसाठी केवळ, धार्मिक, सामाजिक व कौटुंबिक क्षेत्रातच सुधारणा न करता त्यांनी स्त्रियांना कुटीरउद्योगही उपलब्ध करुन देऊन आर्थिक बाबतीत ही स्त्रियांचा समाजामध्ये मान उंचविण्याचा प्रयत्न करुन स्त्री ही भक्ती, मुक्ती व युक्तीची देवी आहे हा विचार रुढ केला.

बसवेश्वरांचा स्त्री विषयक विचार आधुनिक काळातील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचाराला अनुरुप होते. महत्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज यांच्या स्त्री विषयक विचाराला बसवेश्वरांचे हे विचार अनुरुप आहेत. स्त्रीयांच्या दर्जात झालेले अमुलाग्र बदल, सामाजिक परिवर्तन याचे श्रेय महात्मा बसवेश्वरांना द्यावे लागते. म्हणूनच स्त्री उध्दारक म्हणून त्यांचा गौरव केला जातो.

**संदर्भ ग्रंथ :**

*कायक विचाराचा अन्वयार्थ बसव गौरव विशेषांक, नागपुर - डॉ. हिरेमठ राजेश्वर.*

*Basava – Journal – Sarojani S.*

*बस्वराज विश्वयम - डॉ. हिरेमठ राजेश्वर.*

---

# BASAVESHWAR'S PHILOSOPHY HUMANITY ON SOCIAL REFORMS" `AND SOCIAL EQUITY

**Dr. B.V. Halmandge**
*Dept. of economics, Gramin Mahavidyalaya, Vasantnagar, dist. Nanded*
*dhalmandge2015@gmail.com*

---

***Abstract***

*Through the indian constitution has emphasized concept of humanity and social equity with social reforms with his philosophy. It has been achieved in india since independence. It is highlighted that it is was achieved in Kalyana. Basava Kalyan of bidder district in Karnataka) at the early 12th century due to contribution of Vishwa guru Basavashwara and other Shivasharanas the society was based on equality and humanity and freedom of expression was given to all the individual irrespective of caste, class gender race the research paper highlighted the philosophical contribution on basaveshwar to achieve humanity equality social reforms-based society*

***Key:*** *philosophy, Irrespective, Equity Social, Humanity socio Religious.*

**Introduction -** "Basavanna emphasized Constant personal Spiritual development as the path to profound enlightenment. He championed the use of vernacular Language, Kannada, in all spiritual discussions so Hat & translation and interpretation by the elite is unnecessary, and the Spiritual ideas. one can understand every Lord Basava 12th century taught the world about the importance of Enlightenment. Work culture. Democracy. Human Rights, Genders, and Racial equality to form an egalitarian Society. He was great thinker who formed a model classless Society and called it SHARANA SANKULA, SHARAN SANKULA' was a Society of the people. Who denied gender, Caste racial and class discriminations? SHARANAS were the pious people most of them were from working class and from lower State of the society. They believed Hat Good is in our duties and in our body is the form of conscience. Basavanna was born in 1105 CE in the town of barasan bangewadi in the northern par of larnatak to madarasa and madalambike a kannada brahamin family deveted to hindu deity shiva. He was named basava, a kannada form of the Sanskrit veshabh in honar of Nandi bull (carrier of shiva) and the local Shaivism addition. Basavanna grew up in kudalasangama near the bank of shivers Krishna and its tributary malapratha. Basava spent twelve years studying in the hindu temple in the town of kudalarangama. baravanna married gangambike a cousin form his mothers side her father was provincial prime minster of brijal. The kalachusi king. He began working as an accantant to the court of the king. When his maternal uncle died. The king invited him to be the chief minster. The living alos married basava's sister named nogamma as chief minister of the kingdowm basavanna used the state treasury to initiate social reforms and religious moment focussed on reviving Shaivism recognizing and empowering asceties who were called jamgamas. One of the innovative institutions he launched in the 12th century was the anubhava A public assembly and gathering which affeached men and women across various walks of life from distant lands to openly discuss spiritual economic and social issues of life.the composed poetry in local language, and spread his message to the masses. His teaching and verses such as kayakave Kailas (work is the path to Kailash bliss heaven) become popular. Basava advocated that every human being was equal irrespective of caste and that all reforms of manual labour was equally important. Michael state that it wasn't birth but behaviour that determined a true saint and shiv bhakta.

In the view of Basava and sharanas community

Shree Basava also known as basweshwara or basavanna is known as the founder of the Lingayat religious sect in india he brought on a social changed the lower caste people into a higher thinking of gad or shiva. Basweshwara fought against in the injustice and in equality in society especially against the human caste system. The said the spread social a wariness and preached the eradication of includability. According to tradition which developed offer basava's time veesashaivasm was taramite by five pamchacharyes. Namely renukachanrye, Dasukachary, Ekorama Pnditharadhye and vishweswara, and first tought by renukachanrye to sage Agastya.
A Vedic Sers.

Mahadeshwar established anubhava mantapa a spiritual institution at basavakalyan in bidar district. Its objective is: Discussing social economic and religious problem without discriminating between caste or gender advocate equality and independence for women anubhava mantapa which assembly was established by shiv basavanna. Basweshwar advocated that all human beings ware equal, regarding of caste and that all forms of manual labours were equally essential. He also denouneed atrocious ordeals or penance to body to receive the grace of God and a Vidhya held belief of one God. The philosophy is based on simple human values. Basaveshwara propagated veesashaivasm philosophy. He was against the cast-based system and encanged the philosophy of work is worship where body acts as a temple. He said that no work is more or less importance. Every work has its own significance. He also tried to follow this philosophy in his life. He was advocated that one should come ones living.

**Objective of study**

1. to study the philosophy of Basava
2. to study the basavanna vachangalu

**Research methodology**

The present study totally depends on the secondary literature information is obtained from the various sources. The information is collected from various literacy and philosophical articles and philosophical books are main source for this article. It includes search reference books of literature which are related to the research paper.

**Significance of the study**

**Basavanna Vehanagalu meaning**

Thought the Indian constitution has emphasized the concept of humanity and social equality. It has been achieved in India since independence it is highlighted that it was achieved in Kalyana at early $12^{th}$ century due to the contribution of Vishva Guru basaveshwara and other Shivasharanas. The social was based on equality add humanity and freedom of expression was given to all the individuals irrespective of caste

class and gender. The research paper highlighted. the philosophical contributions of Basaveshwara to achieve humanity and equality band Society. 1. Vishwaguru Basaveshwar,

Vishwaguru Basaveshwar of Baravanna was bam in Bagade (of undivided Bajpur distinct in Karnataka) during 1131 AD. His fathers were madrasa and mesalamine was his mother. They belong to Bach • min community. As a religious tradition, he was initiated with the holy thread janivasa in upanoyans (Thread ceremony) at the early age of eight years. Janivara. Left home and went to kudalasangama from where he was educated in all respects.

In the later stage, he went to Kalyana, where the kalchuri King Bijjala (1157-1167) was ruling Because of his highly intellectual personality, he was appointed as a Karnotaka (Accountant) is the initial stage in the court of King bijjala and later he became the prime minister of Bijjala after proving his administrative ability

2. Philosophy of Humanity and social Equality It is worth to emphasize in the 19th century Basavashwara was believed in equality among all.
The kinds of people,

Basaveshwara is an outstanding socio-economic spiritual reform of India. Like Buddha. He organised man movement on a large scale against a caste ridden society. The priority class and the princely class who praised one another as god on earth kept the masses under subjection through fear and superstition. Discrimination in quality segregation Vikram the evil practice of world renounced nandina life and devoted eat exclusively to more preaching. But basaveshwara lived married life and followed kayaka (work as ministry underking bijjala)

For organising his reforms movement to achieve quality. Basaveshwara was established and above moutapa. Where everyone expresses their ideas irrespective of caste and gender. The idea expressed by Shivasharanas (male philosopher) where in terms of performance concerned all men are equal. As far as the (male ethical value of significance of man is concern and everyone is equal to everyone else. Another word this equality e jewels at the philosophical level (jungawa 1986). But it may be observed that basaveshwara concept of equality was not just a philosophical are religious formulation. It was broader in approach.

Basaveshwara was idea of natural equality express superbly in the following Vachanas (literary vesses).

***Unless the flow of blood appears***
***There is no harborage***
***Where in the embryo may well?***
***The function of seed is even the same***
***Greed lust anger and joy***
***Whatever you read or hear, what fruit***
***What is the rule to judge a caste?***
***The embryor needs the seven elements***
***It is the same berth out of the same womb***
***Same the alliance of the self and soul***
***What them the embryo usefulness of caste***
***You are break Smith it heads***
***A Wasser man if you beat***
***A waver if you lay the warp***
***A brahamin, if you read a book***
***Is any body in the world***
***delivered thought the ears***
***therefore, okudala sangam lord***
***The Well born is the man who know***
***The nature of divinity***

***(deveerappa – 1967)***

According to basaveshwara all the people both male and female are formed of the seven elements and come from same world women and through the same passage both of them share in common the desires. The 12th century temptations the anger and joy and the pole gamut of passion that

the flash in here to. None is the world it is delivered through the ear, where are them the superiority of one over the other.

During the basaveshwara bus time the work of a fashion house judge on tile based off his caste alone. He revolted against other blind and superstitions practice of deciding a person position and world on the strength of his caste. And Proclaimed that there who love all living beings should alone be regarded on the well born in one office Vachanas he said.

***"The man who slays he is a pariah***
***The man who eats the cassion is a caste person***
***Where is the caste here where?***
***Our kudalasang as Sharna***
***Who love all living things?***
***He is the well born one."***

Basaveshwara dead not care for the cast in which a person was born. Recognise the characters conduct and action of the person.

He had an idea that human beings share will all animals the need for sustenance and which main animals the capacity to enjoy pleasure and do suffer pain. However, he said, those who have kindness for humanity should be regarded as hi born therefore one who performs a good action is to the nose as a good and bad action as a bad. Mean is known by their actions. But to what is extent are men equal. As it noted earlier. In one of his vachanas. Basaveshwara pointed out that the soul is present in every individual irrespective of is weather one is a common or mam. A kind a bigger is rich or poor. Therefore, men should be severed equal in the severed sense he recognised the intrinsic value of man. It is attitude of a jivan Mukta that is reflective in basaveshwara. It is interesting to jiving note that basaveshwara live model saints Shri Aurobindo, in the oneness of humanity to quote. Jeevan Mukta is a person having equality of spirit a fundamental oneness of attitude to all persons and all things and happening.

Because of the perception of all as the one (Scott 1962) Mahatma Gandhi on the contrary upheld the caste system based on the Varnama Dharma. Historically heargues. Caste has played on important role in Indian society it has prevented pauperism. It has answer it that the religious as well as the political needs of the community it has acted as an institution of self-government and bulk work against the operation of the rules. Whatever the origin of the four-fold caste system and whatever the governing principles behind it by the time of basaveshwara it had taken perverse turn. Basaveshwara considered the caste system as a chief barrier and so the eradicate both varna and caste systems. In accordance with his social philosophy based on the principle of love and equal respect for every human being. He considered the caste systems as a great obstacle in the way of achieving the solidarity of the people.

Even in the present context caste has been the one greater obstacle to the political cohesion social harmony and economic progress of indian basaveshwara naturally revolted against caste and yet one more vachana of his may be cited as infusing the logic of his stand.

***On the same earth stands***
***The out castes hovel***
***And the deity's temple whether for ritual or for rinsing***
***Is not water, same***

***To one who knows him self***
***All caste coalesces as one***
***Even but to the same end known THREE but are ONE***
***My lord kudalarangama***
***(Sundar Raj and Hakari 1965)***

This clearly brings out the logic behind basaveshwara credo. Nature does not discriminate, the same water is used by both the so-called high-born end the untouchable, for ablution, drinking and worship and for morning toilet. The temple and grand. Basaveshwara sord. What if one is low born and who loves god is noble' this dis basaveshwara lounch. In the 12th century a movement for the abolition of untouchability. The shame of Hindu society and deep rooted in humans' practice which he defected, opposed and combated and to all the sacsed lows of God and natural.

Barasaveshwar revolted against caste system which was given much importance of education to priently clares and proclaimed that knowledge was not monopoly of a few people education meant for a few was the cause of discrimination of the and the law (puranic 1977) basaveshwara pointed out that caste had nothing to do with a personas achievement. There ware persons like markandaya Mondadori Agastya, Durvasa, karyappa who ware untouchables. Yet by their good work they become marks it very clear

***Vyara is a fishman's son***
***Markandaya of an out caste born***
***Madodari the daughter of a frog***
***O, look not caste in caste***
***What ware you in the part***
***Indeed, Agastya was a fowler***
***Durvasa, a maker of shoes***
***Karyappa blacksmith***
***The sage kaundany by name***
***was as these worids know***
***a barber …. Murk ye all the words***
***of our kudalasanga sun:***
***what matters on is lowly born***
***Only a shivabhakta is well born***
***(deveerappa 1977)***

There great saints ware born in the family of untouchables yet by lint of their achievements. Good qualities and their love towards humanity.

become a notable person which fact reveals are basavanna that the greatness of man does not lie in his birth but it in his devotion and good deeds. Hence caste does not matter the primary consideration is that we all are human beings. The very untouchable. Therefore, whom High born had kept at a distance. Where are provided with equal opportunities by Basavanna to participate in the deliberation of the Therefore, Anubhava mantapa. It has one equal status to all persons there was no distraction made between man and man has being High or low hence there was one outstanding aspect of basaveshwara achievement. It was the laboratory of basava oven preaching. He thought equality and

so the mantapa was open to all distinction old and young, rich and poor, man and women, high and low, kings and servants, where all these equal.

According to basaveshwara equal respect should show to all irrespective of their wealth sex or religion (Basavaraj 1964) respect should be shown if they are honest sincere and morally sound and good their behaviour in the present day's context particularly in India the measure of man depends on his health and high construction even though he may be essential and engaged and also stressed tile importance of politeness in speech and behaviour.

Basaveshwara strongly considered the behaviour of higher caste people which degradable. The very existence of common people. The common practice was that whenever untouchables and other section of society used to approach the higher caste people, they did not get due respect and where never asked to sit. Hence basaveshwara condemned such as attitude and said all human beings belongs to one tratersity and the following Vachanas testifies to it.

***Let not the world ask me***
***As it a stronger***
***Who is he who is he who is he?***
***I would they acknowledge me***
***He is our own our own our own***
***Accept me as they son***
***Of thine on household***
***My lord kudalasangama***

***(Sundar Raj Hakari 1965)***

This clearly indicates the basaveshwara believed universal brotherhood, he said
***Nan lesser than, I hold***
***And I never can be hold***
***a greater than Shivas devolve***
***By they fact and my mind***
***This I affirm***
***Has the role of truth, and?***
***The same may live confirm***
***Lord kudalasangama***
***(Sundar Raj and Hakari 1965)***

The above stated vachana very clear that nobody is superior in this world and he stresses the need for kindness and humanity in one's behaviour and basava believes that all life is fact one and from this believe follows the absolute equality of the social status of human beings. To show all basava believes men are equal heaven devalues is own birth in in brahmana community and identities himself with people of low birth. (Kalyan pressed 1984) the best illustration of this are the following vachanas.

***The son of servant maid in change house***
***The daughter of maid in in kukkayas as house***
***These two went out together dung***

***And fell together, I the sun***
***Born of those to so witness me***
***(Lord kudalasangama 1967)***

In another vachanas says his real kith and kin are the so-called untouchables

***Channayya, the cobier is may rise***
***Kakkavya, the tanner, may uncle be***
***Kakkavya is may grandsire to***
***Bommavva the lutanist***
***There, why kudalasargama do you not***
***Take cognizance***
***(Deveerappa – 1967)***

The above vachanas clearly shows that the fact that Basaveshwara did not practice and equality where more lip service is paid to the idea of equality. He disses not intend to have equality of women, meraly in the literal seme. But tried to established pragmatic and religious equality (Tipperrudraswamy 1983) moderly and humanity ware the characteristic featured of basaveshwara speech and conduct. Unlike the priest of the pare he preached and practiced without resourcing to any propaganda. the devotees mainly comprising and the degraded ware affeached to him and contacts with them and paid visits to their houses. He shared their feelings and their hearts. Thus, he was a common (Desai 1968)

Kayaka and dosoha are the twin important principals through which basaveshwara ensured equality. Basavanna attributed significant meaning to the concept of kayaka and dasoha. It is not merely.

Work and distribution, but something. That help form the basis of socio-economic equality. Kayaka is also regarded as an important means for the removal all in equalities economic social religious and spiritual unlike the Gandhian principle of breed labour, basaveshwara principal of kayaka apart from reducing economic and social inequality. Hence one can say that basweshwara principle of kayaka is broder and comprehensive in its speech. The following dasoha sutra of poojya shri sharamabasuvappa appa of Gulbarga enable us to understand the essence of basweshwara principle of Kayaka.

***Labour performed***
***As a means to dasoha***
***Is a kayaka***
***Meditating and God***
***without egol***
***is mantra***
***doing work is performed***
***with composure of mind and devotion***
***whenever dosoha is done***
***there Lakshmi will be***
***through kayaka the things you offer***
***one made fit as offerings***
***doing for done self alone***
***is a poor way of living***

***doing for others and well***
***is a good way of life***
***doing for others***
***dedicating it all to God***
***That is kayakildasaha***
***The best way of living***
***Mahadasohi saroma basava***
***(judithkroll and basavaraja 1988)***

When the ordinary people work for their livelihood, it becomes an employment but where sharans perform dosoha to realize the self and help social development it becomes kayaka (hendi 1984)

Hence according to basaveshwara principles of kayak, all occupation is equal, have equal dignity and equally beneficial to society.

Basaveshwara was a practical philosopher made notable contribution to is practical philosophy through his concept of kayaka which certainly anticipated the kayaka Gandhian concept of bread labour. Kayaka cuts at the kayaka loss of traditional versa or caste hierarchy embodying innate the loss principles of the equality of all men and the essential dignity of labour. This old concept is almost totally in confirmly with the modern democratic principles and socialism.

It's good is equitable distribution of wealth and work in the kayaka system of society everybody works according to his capacity and nobody ideas are bags.

Basaveshwara strongly condemned the act of those who propagated distinctive of cast on the basis of one's work for livelihood. In one of his vachanas, he said:

***You are a blacksmith if you heat the iron***
***A washerman if you wash clothes***
***A vayava if you lay the warp***
***A brahmin if you read the basava Vedas***
***False utterly false, are the stories of divine birth***
***The higher type of man is the man***
***Who knows himself?***

A person position or status in society should determine on tile basis office ACS and character and not on basis of his profession. A dustman has a differed circle of friends but the ought not to be considerate to be and inferior sort of men".

A notable feature of his principle of kayaka is that every man is dustman free to choose any work that he wants to follow and this enhances the dignity of labour.

Basaveshwara advocates not the hereditary profession but pleads for the choice of occupation another important principle is dasoha since everyone earn his minimum requirement through kayaka, he contributed the rest of his labour to society instead of using the same for the accumulation of personal wealth hence, kayaka does not encourage the amassing of wealth, kayaka is to be done in the sprit of dasoha. Hence there is and end to all exploitation and to all disparities of wealth. The two basis principles of basaveshwara could use in equality among all sections of the society.

Basaveshwara did not advocate violence in order to bring about equality but adopted peaceful and democratic methods. What he did was to remove glaring differences between man and man. Through his principles of kayaka and Dasoha. The equality which basaveshwara emphasized as a desirable is not the equality of capacity. The in equality which he lamented is not the inequality religious

and spiritual the growth of an individual's personality he was concerned not with biological phenomena but with a spiritual relation and the conducts to be based on it. His view was that men are men because the soul is present in every individual.

**Outcome of the study:** On review of finding from the study it is to summarise that basaveshwara philosophy will be of great importance to contemporary management functions which a many employee it develops

A. Economic responsiveness
B. Social responsiveness
C. Cultural responsiveness

Basaveshwara philosophy, as a model based on egalitarian approach, it brings out the essence of equality commitment, consistency and dignity of labour. The key principles of basaveshwar philosophy include

- Kayaka – economic responsiveness
- Dosoha **-** social responsiveness

The above principles indicate the scope of philosophy

To extend its relevance in managing human resources by creating strong emphasis in

- Engaging in social responsibility
- Work they perform
- Stakeholder's relations
- Aligning and achieving organization's goal
- Adapting and contributing to society they exist
- Work ethos.

**Concluding remarks** : Though basaveshwar's philosophy was emphasized equality based on humanity irrespective of religious and castes race at the early $12^{th}$ century, still india has not been achieved equality till now even the principles of Basaveshwar's and other Shivasharanas ware formed basis for the concept of humanity social equality and social reforms till now emphasized by the indian constitution. The anubhava mantapa is regarded as first parliament, where everyone irrespective of caste and gender were participated in discussion pertaining to different socio-economic political, religious and philosophical issues. It shows that, basaveshwara was also given freedom of speech to both men and women of all caste equality. Thus, to conclude Basaveshwara philosophy is a universal work which can be of relevant to any and every discipline which exist and is related to society. In this regard basaveshwara philosophy can be on efficient source of relevene for society to achieve it organizational goal by effective implementation Basaveshwara's philosophy in human beings.

**References:**

*Bandy opadhyaya s (1969) social and political thoughts Gandhiji, new Delhi: allied Publication 1969*
*Basavaraja SL (1964): Basava Vachanamsutha.*
*Banglaru basava samiti 1964*
*Desai P.B. (1968): Basaveshwara and his times*
*Deveesappa, H (1967) Vachanas of Basavanna,*
*Annona baloga 1967*
*Hendi B.B. (1984): basaveshwara Karnataka university 1984*
*Judithroll and basavaraja (1988) dosoha sutra of Poojya shri sharamabasuvappa appa (trans) Gulbarga*
*Kalyanprasad H (1984): Basava and Gandhi on caste*
*Basava journal Vol. 9 No. 2 1984*
*Kumar Swamiji (1966): mirror of Vaishnavism nasekalyan math 1966.*
*Puranic siddayya (1977) basavanna jeevana hagu sandhetha. Ph.D. thesis Dharwad: Karnataka university 1979.*
*Rajashek haraiah T.R. (1976): understanding basava basaba Journal Vol.1 No 1 may 1976 P. 21.22*
*Dr. Jagannath KJ (2018) Basaveshwar's philosophy on Humanity and social equality. Research revives Journals volume 03 issue 07 July 2018.*
*Smmoth Nime ledger (2017) shivasharanchi Vachane ILA Graphics – Banglaru*
*Sou. Ashali panjara (2014) Sharan Jeevan darshan Maharashtra Basava parishada, Hiremath southern bhalki*

# विचारवंतांनी घडविलेले महात्मा बसवेश्वर दर्शन

**प्रा.डॉ.संतोष कल्याणराव मंगनाळे**
*भूगोल विभाग, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड ता.मुखेड जि.नांदेड मो.नं. 9823229833*

**प्रस्ताविक -**

भारतामध्ये अनेक संत, महात्मे व धर्मप्रषित झालेले आहेत. संपुर्ण विश्वामध्ये भारतीय संस्कृतीची प्रतिष्ठापना आणि उध्दार करणा-या अनेक विभूतिंमध्ये बसवेश्वरांचे स्थान महत् स्वरुपाचे आहे. यासाठीच जगत्ज्योति हे एक विशेषणही बसवेश्वरांना लाभलेले आहे. सर्वांनाच वंदनीय वाटणा-या गौतम बुध्द, भगवान महाविर, येशू ख्रिस्त, महंमद पैगंबर, झरथुष्ट्र, गुरुनानक, बहाऊल्ला, यांच्याप्रमाणेच बसवेश्वर हे आणखी एक प्रमुख धर्म प्रेषित होत.

महात्मा बसवेश्वर हे एक जेष्ठ समाज सुधारक आणि राष्ट्रसंत होत. बसवेश्वर हे मध्ययुरीन भारताचे जनक होत. 12 व्या शतकातील साधारणत: 1132 ते 1167 हा बसवेश्वराचा जीवनकाल होय. इ.स.1132 च्या अर्थात शके 1054 च्या वैशाख शुध्द तृतीया म्हणजेच अक्षय - तृतीया दिवशी बसवेश्वरांचा जन्म झाला. आणि इ.स.1167 मधील श्रावण शुध्द पंचमी म्हणजेच नागपंचमी दिवशी बसवेश्वरांनी संजिवन समाधी घेतली. हा दिवस पुढे बसवपंचमी म्हणून रुढ झाला.

**विचारवंतांनी घडविलेले महात्मा बसवेश्वर दर्शन :**

महात्मा बसवेश्वरांविषयी पाश्चात्य तसेच भारतीय तत्वज्ञ, इतिहासकार, विचारवंत, धर्मगुरु, राष्ट्रपति, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल, मंत्री, राजकीय नेते, समाज सुधारक, सामाजिक कार्यकर्ते, साहित्यिक, लेखक, नियकालिकांचे संपादक, कवी, संशोधन संस्था, प्रकाशन संस्था, संशोधक इत्यादींनी आपले विचार-प्रतिक्रिया, मनोगत, विचार अभिव्यक्त करुन बसवेश्वरांच्या एकंदरीत जीवनकार्यांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकलेला आहे. प्रस्तुत संदर्भात मानवतावादी आद्य क्रांतिकारी समाजसुधारक, स्त्री-मुक्ति संकल्पना आणि चळवळीचे आद्यप्रणेते, समाजवादी अर्थशास्त्र बसवेश्वर, विश्ववंद्य, धर्मोव्दारक तसेच महाकवी बसवेश्वर या 6 प्रमुख दृष्टीकोनांतून बसवेश्वरांच्या सर्वसमावेशक व्यक्तिमत्वाचा परिचय करुन दिलेला आहे.

**अ) मानवतावादी आद्य क्रांतिकारी समाजसुधारक -**

**1) गिरीश कार्नाड (एक अष्टपैलू व्यक्तिमत्व आणि भारतीय ज्ञानपीठ पारितोषिक विजेते)-** कर्नाटकाच्या इतिहासात इ.स.1168 च्या आधीची दोन दशके विशेष महत्वाची ठरली आहेत. या कालखंडात बसवण्णांनी कल्याण नगरित कवी, द्रष्टे, योगी, सामाजिक क्रांतिकारक यांना एकत्र आणले. इतिहासात याआधी आणि यानंतर अशा प्रकारची घटना आढळत नाही. हे सर्वजण एकत्र येवुन संस्कृत ऐवजी मातृभाषेतून देव आणि माणूस याविषयी विचार विनीयम आणि चर्चा करत. मुर्तीपुजा आणि देवालय ही संस्था त्यांनी ठामपणे नाकारली. जे स्थिर आहे (स्थावर) ते त्यांनी नाकारलं, मानवी देह केंद्रीभूत मानला आणि जंगम तत्वावर भर दिला. त्यांनी स्त्री-पुरुष समानता मानली होती. त्यांनी जातीय व्यवस्थेला कडाडून विरोध केला. केवळ तात्विक भूमिकेतून नव्हे, प्रत्यक्ष कृतीमध्येही या अखेरच्या मुद्दावर त्यांच्यावर सनातण्यांच्या रोष ओढवला आणि अखेर ह्या क्रांतीचे भयानक रक्तपातात पर्यवसान झाले.

**2) आचार्य विनोबा भावे (जेष्ठ समाज सुधारक व भू-दान चळवळीचे प्रणेते) :** सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रांतील सुधारणेचे कार्य भारतात पुर्वीपासूनच चालत आलेले आहे. काहीजन असे आग्रहाने सांगत असतात की सामाजिक सुधारणांची चळवळ ब्रिटीशांच्या आगमनानंतरच आणि राजाराम मोहनरॉय व इतरांनी सुरु केली. तथापी हे खरे नाही. कारण कर्नाटकमध्ये 800 वर्षापूर्वीच बसवेश्वर नावाच्या एका थोर व्यक्तीने अशा बहुतेक सुधारणा

आमलात आणलेल्या होत्या की ज्यांची आपण या 20 व्या शतकात कल्पना करीत आहोत. थोडक्यातच सांगावयाचे तर सुसंस्कृत मनाला पटतील अशाच तत्वांचा बसवेश्वराने उपदेश केलेला आहे.

**3) मानवेंद्र रॉय - (प्रख्यात राजकिय विचारवंत):** बसवेश्वर हे मध्ययुगीन भारताचे जनक होत. बसवेश्वरांच्या नेतृत्वाखालील १२ व्या शतकातील लिंगायत चळवळ ही सामाजिक क्रांतीची चळवळ होती. भारताच्या सुधारणा कार्याचा तो पहिला स्फोट होता.

**4) डॉ.हरिभाऊ केदार - (माजी कुलगुरु, नागपूर विद्यापीठ):** या देशात बुध्दानंतर मानवतावादी मोलाचे कार्य बसवेश्वरांनी केले आणि समाजात एकात्मता प्रस्थापित केली. बसवेश्वरांची शिकवण आजही स्फूर्तिदायक आहे.

**5) कृष्ण शिवराम हेगडे - (विद्यासचिव-महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक व संशोधन मंडळ, पुणे):** आपल्या संविधानात आपण स्वीकारलेली अनेक मार्गदर्शक तत्वे आठ शतकांआधी बसवेश्वर सांगून गेले आहेत. असे म्हटले तर ती अतिशेक्ती होणार नाही..... अलिकडील काळात होऊन गेलेल्या भारतीय आणि महाराष्ट्रीय समाज सुधारकांना विशेषत: महात्मा गांधी, महात्मा फुले, डॉ.बी.आर.आंबेडकर इत्यादींना बसवेश्वरांच्या कार्यापासून प्रेरणा मिळाली असावी, असे म्हणण्याचा मला मोह होतो.

**6) जयप्रकाश नारायण - (समाजवादी जेष्ठ विचारवंत):** वर्णभेद, वर्गभेद, उच्च-नीच भेद, स्पृश्यास्पृश्य भेद यांविरुध्द सर्वप्रथम झगडणारे बसवेश्वर हे आद्य समाजवादी होत. कर्मठ, सनातनी व उच्चभू लोकांच्या स्वार्थी दडपणाला पाहिला टोला मारलेले बसवेश्वर हे समाजक्रांतीकरक होत.

**7) डॉ.व्यंकटेश श्रीधर केतकर - (महाराष्ट्रीय ज्ञानकोश्कार):** बसवेश्वरांचे कार्य महान होते. त्यांच्या सिध्दांतांचा प्रसार भारतात सर्वत्र झाला असता तर आज ज्या सुधारणांसाठी प्रयत्न चालू आहेत, त्या अंमलात आणण्याचे श्रेय बसवेश्वरांनाच लाभले असते.

**8) सर जेम्स कॅम्बेल - (पाश्चात्य विचारवंत):** आधुनिक समाजसुधारक बसवेश्वरांची भाषा बोलत आहेत आणि त्यांचेच विचार कृतीत आणण्याचे प्रयत्न करीत आहेत.

**9) ऑर्थर माईल्स - (पाश्चात्य विचारवंत):** बसवेश्वर हे भारताचे पहिले स्वतंत्र विचारवादी व लोककल्याणकारक प्रतिभावंत होते. जुन्या बुरसटलेल्या रुढी विरुध्द हातात बंडाचा झेंडा घेणारे पहिले समाजसुधारक होय.

10) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी - (मराठी विश्वकोशकार)

धर्म, समाज, तत्वज्ञान, वाङ्मय आणि राजकारणविषयकच्या क्षेत्रांत बसवेश्वरांनी केलेली कामगिरी खरोखरच क्रांतीकारक आहे.

**11) डॉ. यु. म.पठाण - (महाराष्ट्रातील संत साहित्याचे गाढे अभ्यासक):** सामाजिक तसेच अध्यात्मिक क्षेत्रांतील समता हे बसवेश्वरांच्या तत्व प्रणालीचे प्राणभूत तत्व होय. बसवेश्वरांची समातावादी भूमिका ही क्रांतिदर्शी होती.

**12) आर.वेंकटरमन - (माजी राष्ट्रपती):** बसवेश्वरामध्ये असामान्य हळवेपणा व विलक्षण द्रष्टेपणा होता. 800 वर्षापुर्वीच त्यांनी सामाजिक आणि धार्मिक समतेची शिकवण दिलेली आहे. जातियता अथवा पंथभेद न मानता धर्माची कवाडे सर्वांसाठी खुली करण्याचे श्रेय बसवेश्वरांनाच जाते.

**13) महात्मा गांधी - (राष्ट्रपिता):** सुमारे आठशे वर्षापुर्वी बसवेश्वरांनी कर्नाटकात सत्य, अहिंसा, समता आणि श्रमगौरव या महान तत्वांचा प्रचार व प्रसार केला. त्यांची हि तत्वे म्हणजे भारतीय संस्कृतीचे परिपाक आहेत. बसवेश्वरांनी आंरभलेले मानवतावादी कार्य आता मला पूर्ण करावयाचे आहे.

**14) इंदिरा गांधी - (माजी पंतप्रधान व भारतरत्न):** महात्मा बसवेश्वर हे मध्यकालीन श्रेष्ठ संतापैकी एक प्रमुख होत. त्यांनी सामाजिक परिवर्तन घडवून आणले. सर्व मानव ईश्वराची लेकरे असुन ती समान दर्जाची आहेत, हे त्यांचे तत्व असुन ते पटवून देण्यावर त्यांनी जोर दिला.

**15) कै. विलासराव देशमुख - (माजी मुख्यमंत्री - महाराष्ट्र):** जात आणि पंथभेद यांवर मात करुन सर्वांना बरोबर घेऊन जाऊन देशाची प्रगती घडवून आणण्याची शिकवण महात्मा बसवेश्वरांनी दिली.

**16) कै. राजीव गांधी - (माजी पंतप्रधान व भारतरत्न):** श्रम हाच स्वर्ग मानून मानवजातीमध्ये समानतेची शिकवण देणा-या 12 व्या शतकातील समाजसुधारक संत महात्मा बसवेश्वर यांच्या शिकवणुकीचे आपण आचरण केले पाहिजे. समाजातील पददलित आणि दुर्बल घटकांच्या उध्दारासाठी बसवेश्वरांनी जे कार्य केले ते आजही मार्गदर्शक आहे.

**17) इंडियन एक्सप्रेस, मुंबई - (25 एप्रिल 1955):** बुध्द, रामानुज व इतर समाजसुधारकांनी जन्मजात सामाजिक विषमता नष्ट करण्यावर प्रामुख्याने भर दिला होता. त्यांच्यातील उणीवा जाणून वीरशैव धर्माची स्थापना करणा-या बसवांनी आपले नवीन क्षेत्र निर्माण केले. जातियतेचा शाप दूर करण्यासाठी नवी दिशा दाखविली. भारतीय समाज रचनेच्या विकासासाठी प्रयत्न केले. बसवांच्या बौध्दिक, अध्यात्मिक व सामाजिक कार्यामुळे त्यांना विशेष महत्व प्राप्त झाले. त्यामुळे बसवा अजरामर झाले.

**18) डॉ. गुरुदेव रानडे - (न्यायमुर्ती व तत्वज्ञ)**

श्री बसवेश्वर हे एक थोर भारतीय, मानवतावादी तत्वज्ञ होते. ते सॉक्रिटिस, प्लेटो, सेंट पॉल, मर्टिन ल्युथर यांच्या पंक्तीत सह बसतील. महात्मा गांधी आणि महात्मा बसवेश्वर यांच्यात बरेच साम्य आहे.

**19) डॉ. के. ईश्वरन् - (कॅनडातील समाजशास्त्रज्ञ)**

हे बसवण्णा होत की ज्यांनी सर्वप्रथम भारतीय समाजाला लोकशाही संस्कृतीचा भक्कम आधार दिला.

**20) पी. नृसिंहराव - (माजी पंतप्रधान) :** बसवेश्वर हे आद्य आंतरराष्ट्रीयवादी होत.

**21) यशवंतराव चव्हाण - (माजी उपपंतप्रधान व आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार)**

बसवेश्वरांच्या तत्वज्ञानात कोणतेच भेदभाव नाहीत. देश वाचविण्याचा हा आदर्श इतर समाजांनी गिरविण्यासारखा आहे.

**22) ग्यानी झैलसिंग - (माजी राष्ट्रपती):** महात्मा बसवेश्वरांचा मानवतावादच राष्ट्राला तारु शकेल.

**23) शिवराज पाटील - (माजी लोकसभा सभापती):** महात्मा बसवेश्वरांचा काळ 12 व्या शतकातला. त्यांनी राजकारणाला आणि समाजाला नवीन वळण दिले. त्यांच्या विचारांमुळे समाजातल्या उणीवा ब-याच प्रमाणात कमी झाल्या. त्यांच्या विचारांतील बहुतेक तत्वांचा उल्लेख आज भारतीय राज्यघटनेत आपणांस पहावयास मिळतो.

**24) सुशीलकुमार शिंदे - (माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य):** बाराव्या शतकात सामाजिक क्षेत्रांत महात्मा बसवेश्वरांनी जी क्रांती घडवून आणली ती अभूतपुर्व होती. त्यांचे विचार आजही होकायंत्राप्रमाणे सुखी जीवन जगण्याचे मार्ग दाखवित आहे.

**ब) स्त्री-मुक्ती संकल्पना आणि चळवळीचे आद्यप्रणेते -**

**1) टाइम्स ऑफ इंडिया - (अग्रलेख 17 मे 1918):** बसवेश्वरांच्या चळवळीचे हे वैशिष्ट्य आहे की त्यांच्या पुर्वी जरी अनेकांनी सामाजिक व धार्मिक सुधारणांसाठी प्रयत्न केले असले तरी बसवेश्वरांनी त्या काळी अति साहस दाखवून स्त्री-मुक्ती तसेच सुधारणा यासाठी प्रचंड कार्य केले. बालविवाह, विधवांची गुलामगिरी, स्त्रियांची उन्नती इत्यादीबाबत बसवेश्वरांनी विधायक व तेजस्वी प्रयत्न केले. आजसुध्दा प्रत्येक वर्षी या विषयावर परिषदां होतात अनेक प्रकारचे प्रयत्न होतात, तरी बसवेश्वरांच्या तुलनेत त्या नगण्य आहेत.

**2) डॉ. जयदेवीताई लिगाडे - (कन्नड व मराठी वीरशैव जेष्ठ साहित्यिक):** 12 व्या शतकातील शिवशरणी (वीरशैव स्त्रिया) स्त्री-विमोचनाच्या क्रांतीकार्याच्या अध्वर्यु ठरल्या. महात्मा बसवेश्वरांसारख्या दिव्य मानवांनी व इतर शिवशरणांनी या कार्यास सहानुभूती दाखविली आणि ते स्वत: त्यात सहभागी झाले.

**क) समाजवादी अर्थशास्त्रज्ञ बसवेश्वर -**

**1) डॉ. सुर्यकांत घुगरे - (विरशैव धर्म व समाजशास्त्राचे संशोधक):** कार्ल मार्क्स यांनी श्रमाला प्रतिष्ठा दिली. तथापी 900 वर्षापूर्वीच बसवेश्वरांनी, श्रमाला प्रतिष्ठेबरोबर श्रेष्ठता आणि पवित्र्यही दिलेले आहे. कायकवे कैलास अर्थात कर्म हाच धर्म, श्रम हाच स्वर्ग, कर्तव्य हेच प्रासव्य, सेवा हाच शिवा हा श्रमाकडे पाहण्याचा बसवेश्वरांचा एक

अपूर्व दृष्टीकोन होय... बसवेश्वरांनी स्त्रियोव्दारासाठी गृहत्याग केला आणि अस्पृश्योव्दारासाठी पंतप्रधान पदत्याग केला. वस्तुत: बसवेश्वर हे स्त्री-स्वातंत्र्याचे व सबलीकरणाचे आद्य दीक्षा गुरु होत.

**2) दैनिक तरुण भारत - (संपादक, सोलापूर 25.01.1994):** समाजातील सर्वच लोकांनी सातत्याने व प्रामाणिकपणे श्रम करीत राहिल्यास स्वत:चा आणि पर्यायाने समाजाचा विकास घडून येतो. श्रम प्रतिष्ठा हा बसवेश्वरांचा संदेश आहे. श्रम प्रतिष्ठा हा बसवेश्वरांचा संदेश आहे. श्रम न करता संपत्ती मिळविणे पाप ठरते, हा बसवेश्वरांचा संदेश आजही उपयुक्त ठरतो.

**3) प्राचार्य शिवाजीराव भोसले - (महाराष्ट्रातील ख्यातमान विचारवंत व्याख्याते):** आजही व्यक्ती आणि समाज यांच्या स्वाथ्यासाठी कायकवे कैलास हे मंत्र साधन उपयोगी पडू शकेल. आजच्या लोकसभा, विधानसभा या अनुभव मंडपाप्रमाणे झाल्या आणि नागरिकांनी कायकाचा अवलंब केला तर मानव कुलाचा भाग्योदय सत्वर घडेल. बाराव्या शतकात बसवेश्वरांनी केलेला प्रयोग एकविसाव्या शतकात आठवावा आणि अनुसरावा एवढा आदर्शवादी होता.

**ड) विश्ववंद्य बसवेश्वर –**

**1) जॉन रसेल - (पाश्चात्य विचारवंत)** दयेला धर्म मानणारा, स्त्री-पुरुषांना समान हक्क जाहीर करणारा, सहकार्याने जीवन जगून प्रत्येकाला उद्योग करण्यास आव्हान करणारा बसवेश्वर हा एक देवमाणूस समजला पाहिजे.

**2) बाबामहाराज सातारकर - (ज्ञानेवश्वरीचे आधुनिक भाष्यकार)** अमर्याद पुरुषोत्तम महात्मा बसवेश्वर यांचे व्यक्तिमत्व आकाशाएवढे असल्यामुळे नागरिकांनी त्यांना महात्मा पद बहाल केले.

**3) डॉ. एम. सी. मोदी - (पद्मभूषण व आंतरराष्ट्रीय कीर्तिचे नेत्र विशारद)** बसवेश्वर कर्नाटकात (भारतात) जन्मले ही मोठी चूक झाली. जर ते अन्य कोणत्या देशात जन्मले असते तर कार्ल मार्क्स प्रमाणे संबंध जग बसवेश्वरांना डोक्यावर घेतले असते.

**4) एच.ई.जे. व्रोगेप - (नेदरलॅन्ड येथील एक विचारवंत)** बसवण्णांचा संदेश त्यांच्या काळाइतकाच आजही आवश्यक आहे. बसवण्णांच्या आदर्शामुळे जगाला आणखी उन्नत स्वरुप देणे शक्य आहे.

**ई) धमौध्दारक बसवेश्वर -**

**1) रॉयल एशियाटिक सोसायटी, इंग्लंड (एका ग्रंथातील प्रस्तावना, भाष्यांतर)** हिन्दुस्थानात जे धर्म संस्थापक होऊन गेले, त्यांच्यामध्ये जे जे आवश्यक गुण होते, त्या सर्वाहून अधिक योग्यतेचे श्री बसवेश्वर होते.

**2) रेजिनॉल इन्थॉव्हेन - (पाश्चात्य विचारवंत)** 12 व्या शतकात बसव हे एक मोठे सुधारक होऊन गेले. लिंगायत धर्माच्या प्रसारार्थ त्यांचेच प्रयत्न मुलत: कारणीभूत आहेत.

**3) दैनिक मराठवाडा - (संपादक- औरंगाबाद, 28 नोव्हेंबर 1980)** मध्ययुगीन हिन्दू धर्म, संस्कृती, वर्णव्यवस्था, व कर्मकांडाच्या चिवट चौकटीतून सोडविण्याचा प्रयत्न करणा-या महापुरुषांमध्ये लिंगायत धर्मसंस्थापक महात्मा बसवेश्वरांचा क्रमांक खूप वरचा आहे.

**4) पंडित महादेवशास्त्री जोशी - (भारतीय संस्कृती कोषकार)** बसवेश्वर हे वीरशैव मताला क्रांतीकारक वळण देणारे प्रमुख धर्मधुरीण होत. शिवभक्तीचा एक प्रकार म्हणूनच त्यांनी शरीरश्रमाला प्राधान्य दिले.

**5) नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली - (श्री बसवेश्वर ग्रंथातील प्रस्तावणा)** श्री बसवेश्वर हे 12 व्या शतकातील एक महान व्यक्तिमत्व होय. ते कन्नड भाषेतील श्रेष्ठ कवी म्हणून तर मानले जातातच. शिवाय एक थोर संत नि प्रेषित म्हणून ही प्रसिध्द आहेत.

**6) प्र. बा. गजेंद्रगडकर - (माजी सरन्यायाधिश सुप्रीम कोर्ट नवी दिल्ली)** बसवांची शिवकण ही अद्यापि दुर्दैवाने सर्वत्र समजलेली नाही. जेव्हा त्यांचे कार्य व शिकवण जगाला कळेल तेंव्हा बुध्द आणि महावीर यांच्या बरोबरीने बसवांना स्थान द्यावे लागेल.

**ऊ) महाकवी बसवेश्वर -**

**1) साहित्य अकॅडमी - (नवी दिल्ली)** बसवेश्वर हे आधुनिक भारतिय साहित्याचे निर्माते होते.

**2) डॉ.झाकीर हुसेन - (माजी राष्ट्रपती)** भारतातील प्रभावी संत मालिकेत बसवेश्वरांचे उच्च स्थान त्यांच्या कन्नड भाषेच्या सेवेमुळे आणि मानवाच्या कल्याण कार्यामुळे प्रस्थापित होते. वचनांच्या रुपाने कन्नड काव्याला श्रेष्ठत्व प्राप्त झाले आहे.

**3) रेव्हरंड सार्जंट - (पाश्चात्य विचारवंत)** बसवांपुर्वी कन्नड व वाड्मय संस्कृत मधील अलंकारिक शब्दांनी प्रचुर होते. आणि त्यामुळे हे वाड्मय बोजड व कृत्रिम वाटत असे. बसवानंतर मात्र कन्नड शब्दांचा वापर वाढला व संस्कृत शब्दप्रयोग कमी झाले.

**4) बंडाप्पा रेवणसिध्दप्पा झुंजे - (वकील)** तुकाराम महाराज ज्या प्रमाणे असंख्य अभंगवाणीने आपणांतून भंग पावले नाहीत, त्याप्रमाणेच श्री महानुभाव बसवेश्वर हेही आपल्या असंख्य वचनांनी आपणांशी बोलत आहेत.

**5) डॉ. के. व्ही. इवेलेबिल - (पाश्चात्य विचारवंत)** वाड्मय आणि तत्वज्ञान दृष्ट्या खूप उच्चतम व दर्जेदार असलेली बसवांची वचने ही जगातील एक श्रेष्ठ कलाकृती म्हणून स्वीकारली गेली पाहिजे कारण बसव साहित्यांचा संदेश आज देखील केवळ भारतालाच नव्हे तर संपूर्ण विश्वाला प्रेरणादायक, मार्गदर्शक आणि उपयुक्त आहे.

वरील संदर्भात वेगवेगळ्या विचारवंतांनी घडविलेले बसवेश्वर दर्शन एकूण 6 प्रमुख दृष्टिकोनांतून बसवेश्वरांच्या सर्वसमावेशक व्यक्तिमत्वाचा परिचय करुन दिलेला आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची -**

*डॉ. अशोक कामत : महात्मा बसवेश्वर, सत्संग प्रतिष्ठान, पुणे (1999)*
*डॉ. सुर्यकांत घुगरे : जगत्ज्योती बसवेश्वर, महाराष्ट्र बसव समिती, नांदेड (2003)*
*डॉ. द. वा.चाफेकर : बसववाणी, कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषद, गुलबर्गा, (1991)*
*डॉ. सुर्यकांत घुगरे : वीरशैव व इतर धर्म आणि समाज : साधना बुक स्टॉल, गडहिंग्लज (1999)*
*राजेंद्र जिरोबे : वचनामृत बसवेश्वरी, श्री मृत्युंजय शरण साहित्य प्रचारक संघ, मुबई (1983)*
*गिरीश कार्नाड (रुपांतर : उमा कुलकर्णी) : तलेदण्ड (नाटक), सुगावा प्रकाशन, पुणे, (1992)*
*रेषा अष्टुरे : षट्स्थल चक्रवर्तीचन बसवेश्वर आणि शिवयोगी सिध्दरामेश्वर यांचे वचनामृत, लातूर (1995)*
*डॉ. पी. एम. देसाई : बसवेश्वर ॲण्ड हिज टाइम्स, कर्नाटक युनिव्हर्सिटी, धारवाड (1968)*
*दुर्गा भागवत : धर्म आणि लोकसाहित्य, पॉप्युलर प्रकाशन मुंबई (1975)*
*या व्यतिरिक्त इतर काही शासकिय प्रकाशने, संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रातील संपादकिय लेख, अनेक नियतकालिके इ. चा उपयोग हा लेख लिहण्यासाठी केला आहे.*

# महात्मा बसवेश्वरांचे वचन आणि कार्याचे अध्ययन

**प्रा. वडजे धनंजय बाबाराव**
*विज्ञान विभाग प्रमुख, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड, ता.मुखेड जि. नांदेड, मो. नं. 9028802025*

महाराष्ट्राच्या संत परंपरेतील वीरशैव मराठी संतांचा वाड:मयीन, धार्मिक, सामाजिक व सांस्कृतीक कार्य लक्षणिय आहे. या सर्व वीरशैव मराठी संताचे प्रेरणास्थान महात्मा बसवेश्वर हे आहेत. बाराव्या शतकातील महात्मा बसवेश्वराच्या तत्वज्ञानाचा विचारसरणीचा व कार्याचा फार मोठा प्रभाव महाराष्ट्रीय धर्म संप्रददायावरही तेराव्या शतकापासूनच पडला. महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात सांगितलेले विचार आजच्या लॉकडाऊनच्या कालावधीत मार्गदर्शक ठरतात. बसवेश्वरांनी अनावश्यक खर्च करु नका, फुकटचे कोणाला काही देवू नका आणि फुकटचे कोनाचे काही घेवू नका हे वचन साहित्यामधुन बाराव्या शतकात सांगीतले होते.

महात्मा बसवेश्वराच्या क्रांतीकारक, दृष्ट्या, सामाजिक न्याय देणा-या, बुरसटलेल्या सनातनी, कर्मठ, अन्याय मुलक, स्वार्थपरायण मानसिकतेला प्रखर विरोध करणा-या निर्भय विचारसरणीचा प्रभाव कर्नाटकावर जसा पडला, तसाच महाराष्ट्रावरही पडला. धर्म प्रबोधन, धर्माचा पुर्नविचार व समाज प्रबोधन यांचा अपुर्व समन्वय म्हणजे महात्मा बसवेश्वर यांच जिवन व त्यांचं कार्य होय. यातून भारतीय संस्कृतीत आगळ्या बसव युगाचा उदय व विकास झाला. भक्ती चळवळीला एक नवं वळण भिनलं, एक वेगळं अधिष्ठान प्राप्त झालं. बसवेश्वरांनी शरण चळवळीच्या माध्यमातून सामाजिक क्रांतीचं रणशिंगच फुंकले, या चळवळीत सामील झालेल्या पुरुषांना शरण तर महिलांना शरणी असे नाव देण्यात आले. या चळवळीने लिंगायत धर्माच्या पुनरुज्जीवनात लक्षणिय योगदान दिले. शरण चळवळीचे मुख्य वैशिष्ट्ये समता, समानता, बंधुता, विवेक, कायक, दासोह ही ठरली. मानव सर्व एकच आहेत हे त्यांनी वचनाव्दारे सांगीतले. म.बसवेश्वराच्या प्रेरणेमधुन निर्माण झालेले वचनसाहित्य हे भारतिय साहीत्याचा एक प्रमुख प्रकार ठरले. बसवेश्वराचे वचने सर्व जिवन स्पर्श सर्व जिवनव्यापी व सर्व जिवन प्रभावी आहेत.

बालपणापासूनच ते धर्मचिंतन व समाज चिंतन करीत. स्त्री, शुद्रांना आपल्या उद्धाराचा नाकारलेला अधिकार, कर्मकांडाच अनावश्यक प्राबल्य, चातुर्वर्ण्य व्यवस्थेतील विषमता यामुळे ते अस्वस्थ व अंतर्मुख होत. मुंजीसारखे विधी / कर्मकांड अनावश्यक आहेत. असं त्यांच मत असल्यानं त्यांनी मुंज करुन घेण्यास विरोध केला. त्याच प्रमाणं देवदासी, बळी देण्याचीप्रथा, व्यवसाय व जाती यांच्यातील श्रेष्ठकनिष्ठता, कर्मकांड हे त्यांना मान्यच नव्हतं. त्याला विरोध करुन त्यांनी नव समाज निर्मीती केली. एकाच देवाची म्हणजे ईष्टलिंगाची साधना करा देहच देवालय आहे, एकत्र या, चर्चा करा, सुसंवाद साधा, स्त्रियांना समान अधिकार द्या, पंचसुतके पाळु नका, दलितांना समान संधी द्या, जातीभेद, लिंगभेद, वर्णभेद करु नका, कष्ट करा, भिक मागून खाऊ नका, कायकात (काम करण्यातच) कैलास आहे. दासोह (अन्नदान) सेवा करा. पर्यावरण संरक्षण करा. दगड-धोंड्याची पुजा करु नका. पुरो हिताच्या हस्ते देवपूजा संरक्षण करण्यापेक्षा ही पुजा करण्याचा आनंद स्वत: घ्या. ज्योतिष, भविष्य, वास्तुशास्त्र, पंचांग पाहण्यात वेळ घालवू नका. अनुभव मंडपात बसा, चर्चा करा, प्रश्न-उत्तर करा, वचन साहित्य वाचा, शुभाशुभ पाहू नका. एकमेकांना भेटल्यावर शरणु-शरणार्थी म्हणत नमस्कार म्हणा. संन्यास वादाचे उदाततीकरण करु नका. सांसारिक जीवन आनंदी व समाधानाने जगा. माणसाला माणसाप्रमाणे वागवा. पशु हत्या करु नका, मांसाहार करु नका, हत्या करु नका, रागापासून दूर रहा, व्यसनाधिन बनु नका, चोरी करु नका, खोटे बोलू नका, कुणाची घृणा करु नका. दया हाच धर्म आहे. शरणाची थट्टा मस्करी करु नका, नवस-सायास करत बसू नका, अंधश्रद्धेपासून लांब रहा. उपवास, तापास, व्रतवैकल्ये करु नका, वेळ, दिवस, वर्ष यात भेद करु नका, प्रत्येक दिवस आणि वार शुभच आहे. मृत्यु ही महानवमी आहे. त्याचे स्वागत करा. संसार सोडून हिमालयात जावू नका, काल्पनिक स्वर्ग,

नरक यावर विश्वास ठेवु नका. सदाचार स्वर्ग आहे तर अनाचार नर्क आहे. शिक्षण घ्या, वचन साहित्य वाचा, ज्ञानी व्हा, नैतिक बना, विवेकी बना.

**लिंगायत शब्दाचा अर्थ :** लिंग + आयात = लिंगायत. इष्टलिंग म्हणजे विश्वाचं प्रतिरुप असलेले शिवाचे प्रतिक, आयात म्हणजे धारण करणे किंवा स्विकारणे होय. लिंग धारण करणारा तो लिंगायत. लिंगायत धर्मात जन्म झालेला असला तरी गळ्यात शिवलिंग धारण करुन दररोज शिवलिंगाची पुजा करणाराच लिंगायत समजला जातो. लिंगायत धर्मिय शुध्द शाखाहारी, निर्व्यसनी व कट्टर शिवभक्त असतात. वर्ण, वंश, लिंग (स्त्री, पुरुष) जात जन्म ठिकाण असा कोणताही भेद न करता प्रत्येक स्त्री-पुरुषाला लिंग धारण करुन लिंगायत होता येते. ईष्टलिंग हे समतेचे व विज्ञानाचे प्रतिक आहे. त्याची भक्ती करावी कोणताही कर्म उच्च व निच नाही कर्म हेच कैलास. या विचाराचा प्रसार करुन त्यांना सर्व व्यावसायियक व जातीच्या लोकांना समपातळीवर आणलं. आपल्या विचाराच्या प्रसारासाठी त्यांनी अनुभव मंटप या विचार पिठाची स्थापना केली व त्यांच्या या कार्याला मोठा प्रतिसाद मिळाला. आंतरजातीय विवाह लावून समाजाची मानसिकता बदलली. वीरशैव धर्माच्या तत्वज्ञानाचा गाभा म्हणजे षट्स्थल सिद्धांत होय. कायक, दोह, सदाचार, समता व धर्मभाव ही त्यांच्या कार्याची पंचसुत्री होती. महात्मा बसवेश्वरामुळे नवचैतन्य लाभलेला वीरशैव धर्म हा भारतातला एक प्रमुख धर्म आहे.

**म.बसवेश्वरांनी अनुभव मंडपातून लोकशाहीची निर्मिती केली :** 12 व्या शतकातही एकविसाव्या शतकाचे आधूनिक विचार असलेल्या म.बसवेश्वरांनी अनुभव मंडपातून लोकशाहीची निर्मिती केली. अनुभव मंडप ही जागतीक, इतिहासातील अनन्य साधारण संस्था होय. विविध जाती धर्मातील स्त्री - पुरुषांना गळ्यात इष्टलिंग, परिधान करुन एकत्र जमवून निरनिराळ्या विषयावर चर्चेच्या माध्यमातून जनजागृती केली व ख-या अर्थाने स्त्री पुरुषांना समान अधिकार बहाल करुन स्त्रियाच्या आरक्षणाचे जनक ठरले. महात्मा बसवेश्वरांएवढा कृतीशिल महापुरुष मध्य युगात केवळ भारतातच नव्हे तर संपुर्ण जगात पहावयास मिळणार नाही.

**महात्मा बसवेश्वरांचे काही वचनं :**

हा कोणाचा, हा कोणाचा, हा कोणाचा असे नच म्हणवावे।
हा आमुचा, हा आमुचा, हा आमुचा असेचि वदवावे।
कुंडलसंगमदेवा तुमच्या घरचा पुत्र म्हणावे।

- महात्मा बसवण्णा

वचनामृत (कन्नड)

तुप्पद सविगे अलग नेक्कुव
सोणगनंते यन्न बाळुवे,
संसार संगव बिडद नोडेन्न मनवू,
इ नायितनव माणिसु,
कुडलसंगम देवय्या,
निम्म धर्म ........................ महात्मा बसवण्णा.

(मराठी)

तुपाच्या आशेने खडग् चाटणा-या
कुत्र्याप्रमाणे जगतोय,
संसारसंग सोडेना माझे मन,
हा लोचटपणा दुर करणे हा तुमचा धर्म,
कुंडलसंगम देवा .............. महात्मा बसवण्णा.

**आपला चरितार्थ चालविण्यासाठी कोणताही व्यवसाय केला पाहीजे :** महात्मा बसवेश्वर यांचे आणखी एक वचन होते काय कवे कैलास (श्रम हाच स्वर्ग) कायक म्हणजे देहाची निगडीत ते ते सर्व होय, काया म्हणजे देह किंवा शरीर. अंग मेहनत किंवा व्यक्तीने केलेले कुठलेही कार्य असा त्याचा अर्थ होतो. म.बसवेश्वराच्या मते प्रत्येक व्यक्तीने आपला चरीतार्थ चालविण्यासाठी कोणताही व्यवसाय केला पाहीजे. श्रम केल्या शिवाय भाकरी खाण्याचा कोणालाही अधिकार नाही. हे सुत्र महात्मा बसवेश्वरांनी कार्ल मार्क्स च्या पुर्वी सातशे वर्ष अगोदर समाजासमोर मांडले. श्रम हाच साक्षात कैलास आधि स्वर्ग होय.

**समतेच्या लढाईतच त्यांना होतात्म्य मिळाले असावे :** अनुभव मंडपातील शिवशरण यांनी अस्पृश्यता व जातीभेद विरुध्द एक निर्णयक पाऊल उचलले ते आंतरजातिय विवाहाचे. चातुर्वर्णी यांना दिलेला हा सर्वात मोठा धक्का होता. परिणामी सनातन वाद्यांनी हिंसेचे थैमान चालवले व अराजकता माजवली. भक्ती, ज्ञान, करुणा व सात्विकतेच्या स्तंभावर उभारलेल्या अनुभव मंडपातील शिव शरणावरती भ्याड हल्ले केले. समतेची उद्‌घोषणा करणाऱ्या वचन साहित्याला पाठीवर बांधून सर्व शिवशरण शस्त्र हातात घेवून वचन साहित्याच्या रक्षणासाठी लढु लागले. त्यामुळे महात्मा बसवेश्वर खिन्न मनाने कुंडलसंगम क्षेत्री गेले की त्यांचे अपहरण झाले. महात्मा बसवेश्वराच्या समाधीचे रहस्य संत तुकोबारायाच्या संदेह वैकुंठगमना इतकेच रहस्यमय असले पाहिजे. समतेच्या लढाईतच त्यांना होतात्म्य मिळाले असावे हे काळाच्या गर्भात दडलेल्या वास्तविकतेच्या उदयासाठी, नव्या समान निर्मितीसाठी संत सहित्याच्या अभ्यासाची संशोधनाची खरी गरज आहे. कुठलेही महात्मे हे जात, भाषा, धर्म, प्रांत या पुरते मर्यादीत नसतात तर ते सकल मानवजातीच्या पुनुरुत्थानाचे आदर्श असतात.

# लिंगायत विमर्श और महात्मा बसवेश्वर

**प्रा. डॉ. शिवसर्जन होनाजी टाले**

*महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय मुखेड़, तह.मुखेड, जि. नांदेड. ७७९८९१७४०१*

*taleshivsarjan@gmail.com*

आज कई नए विमर्श हिंदी साहित्य में और अन्य साहित्य में लिखे जाने लगे हैं । लिंगायत विमर्श विशेष रूप से दक्षिण भारत में प्रमुखता से विकसित होने लगा । कन्नड़ भाषा में इसका प्रचार और प्रसार हुवा । उसी के साथ महाराष्ट्र में मराठी तथा दक्षिणी हिंदी के रूप में इसका विकास होने लगा । कर्नाटक तथा महाराष्ट्र और अन्य सात राज्यों में लिंगायत विमर्श के बारे में चर्चाएं होने लगी । इस पर कई सारे मुद्दों में परिसंवाद तथा चर्चासत्रों का आयोजन किया जाने लगा । इस विमर्श को सर्वोच्च न्यायालय के निवृत्त न्यायाधीश गजेंद्र गड़कर जी ने भी अपना शोधलेख प्रस्तुत किया है । लिंगायत समाज में सदियों से उपेक्षित वर्ग का समायोजन होता है। 'अनुभव मंडल' के कई जातियों का समावेश भी इस विमर्श में किया गया ।

लिंगायत विमर्श के उद्भव और विकास को देखा जाए तो 12 वीं सदी में इसका उद्भव महात्मा बसवेश्वर के द्वारा रचित 'वचनों' के रूप में हुवा । उसी तरह से इसका विकास आगे चलकर वर्तमान समय में कई विद्वानों द्वारा लिंगायत विमर्श के उपलक्ष में अपनी किताबें, शोधलेख तथा अन्य साहित्य लिखा जाने लगा । 12 वीं सदी से लेकर आज तक जो सुदृढ़ समाज समझा जाने लगा था, लेकिन उसका अंतर्गत निरतंर शोषण होने लगा था । उसकी उपेक्षा उसी काल से होती आ रही है । यहां तक की, ऊपरी चमक के कारण इसकी अंतर्गत समस्याओं को निरंतर दबाया गया । इसे कहा गया कि, "यह व्यापारी वर्ग जैसे की तेली, वाणी आदि बहुत ही सक्षम वर्ग था । लेकिन इसकी अंदर की सच्चाई को निहारा जाए तो इनकी कई समस्याओं को हम उजागर कर सकते हैं । यह समाज निरंतर राजाओं की कठपुतली बनकर रहा है।'' इसकी शुरुआत महात्मा बसवेश्वर जी से ही होती हुयी दिखाई देती है । जिस राजा के यहाँ वो प्रधानमंत्री के रूप में कार्य करते थे आखिरकार उसी राजा ने उनके ऊपर अन्याय और अत्याचार किया । यह केवल ब्राह्मणों के कहने पर हुआ था, इसका उच्चारण हम आगे लिखने वाले हैं। महात्मा बसवेश्वर अपने बीस साल के आयु में वेदों के महा पंडित बन चुके थे। उन्होंने सभी शास्त्रों का ज्ञान पारंगत कर लिया था। वह इतने विद्वान थे कि उनकी विद्वता को देखकर बिज्वल राजा ने अपने राज्य का प्रधान मंत्री उन्हें बनाया । महात्मा बसवेश्वर ज्ञान के साथ-साथ धनुर्विद्या में भी पारंगत थे। उनके बारे में एक विशेष बात यह है कि वह जन्म से ब्राह्मण थे। लेकिन बाद में विश्वमंडल , लिंगायत मंडल अथवा अनुभव मंडल के निर्माण के बाद उन्होंने लिंग का स्वीकार किया। 'लिंग' का अर्थ 'अपने आप से एक होना' यह था । महात्मा बसवेश्वर समाज में समानता चाहते थे । इसलिए उन्होंने 'अनुभव मंडल' का निर्माण किया । जहां पर ना कोई बड़ा न छोटा, न कोई अछूत, सभी एक ही मंडल के सदस्य थे । इसीलिए महात्मा बसवेश्वर जी को दक्षिण भारत का बुद्ध कहा गया । 'अनुभव मंडल' यानी आज की 'भारत की संसद' उसे कहा जा सकता है। जहां पर जाती-पाती ना होकर एकता का संदेश दिया गया । उसी 'अनुभव मंडल' में एक शूद्र को उस मंडल का प्रमुख बनाया गया । जिसमें 770 विभिन्न जाति धर्म के सदस्य थे । जहां पर कोई अमीर कोई गरीब नहीं था, वह सभी 'लिंगैक्य' हो चुके थे । मूर्ति पूजा को महात्मा बसवेश्वर मानते नहीं थे । मंदिर के भगवान की पूजा -अर्च्या वह नहीं करते थे, उनका कहना था कि "हम अपने काया (देह) को ही भगवान बना ले, जिस तरीके से मनुष्य निर्माण में भगवान ने उच्च-निच्चता का भेद नहीं किया, तो हम उस मनुष्य में उच्च – निच्चता का भेद करनेवाले कोण होते है ? शूद्र-सवर्ण ऐसा भेदभाव क्यों करें ?" एसे ही विचारों को उस मंडल में प्रस्तुत किया जाने लगा । यह सारी बातें 12 वीं शताब्दी में भारत में होने लगी। जो काल पूरी तरीके से अंधश्रद्धा, पाखंड , उच्च - नीचता, वर्ग संघर्ष, छुआछूत , पौराणिक कथाओं से भरा पड़ा था। बाह्य-आडम्बर से

भरा यह काल था । ब्राह्मणों ने महात्मा बसवेश्वर जी का विरोध करना शुरू किया । उन्होंने इस समाज में महात्मा बसवेश्वर जी के बारे में उटपटांग बातें करना शुरू कर दिया। लेकिन जब ज्ञान की बात आती है तो, महात्मा बसवेश्वर इन सब से कई गुना आगे थे । अपनी विद्वता के बल पर उन्होंने बड़े-बड़े विद्वानों को पछाड़ दिया था, वेदों का सही अर्थ उन्होंने ब्राह्मणों को बताया इसी कारण वह बिज्वल राजा के प्रधानमंत्री बने। ब्राह्मण उस काल में ज्ञान पर अपना अधिकार समझते थे । ज्ञान को ब्राह्मणों से छुड़ाकर जनसामान्य तक लेके जाने का कार्य महात्मा बसवेश्वर जी ने किया । उसी काल में उन्होंने सामान्य वर्ग द्वारा 'वचन ग्रंथ' लिखवाये । 'वचनों' के आधार पर उन्होंने एक ऐसे समाज का गठन किया, जिसके बलबूते पर उन्होंने अपनी छाप उस सामान्य वर्ग पर छोड़ी जो निरंतर कई सुविधाओं से वंचित था । 'वचन साहित्य' एक सशक्त साहित्य था । जिसके कारण समता, एकता, बंधुता, मानवीयता का संदेश समाज में दूर-दूर तक जाने लगा। जिस कारण अनेकों समाज के ,जाति-धर्म के, वर्गों के, लोग अनुभव मंडल के सदस्य बने। इसी कारण से लिंगायत का निर्माण हुआ।

'अनुभव मंडल' यह महात्मा बसवेश्वर जी की संकल्पना थी। वहां पर ज्ञान के बलबूते पर ही समाज जिंदा था। 'अनुभव मंडल' 12 वीं सदी में सर्वधर्म समभाव के विचारों से प्रेरित एक ऐसी संसद थी' जो शूद्र, हरिजन, दलित, कुचला हुआ, अछूत, उच्च वर्गीय, निम्नवर्गीय, मध्यमवर्गीय आदि ,,सभी जाति-धर्म के लोग वही रहते थे। छुआछूत जैसी समस्या का निराकरण ,बाह्यआडंबर का विरोध, पाखंडवाद का विरोध पहली बार इस संसद में किया गया। वहां पर उच्चता को कोई जगह नहीं थी। कहा जाता है कि अनुभव मंडल के मंत्री मधुर सनावते जो मूल ब्राह्मण थे ,उनकी इकलौती बेटी का ब्याह उसी मंत्रिमंडल के सदस्य एक चर्मकार परिवार के लड़के कुमार से मंडल के 770 सदस्यों के समक्ष विवाह संपन्न हुआ। 12 वीं सदी में ऐसी घटना का होना इसका अर्थ ब्राह्मणों के ऊपर हुआ बड़ा प्रहार था। इसी के आगे ब्राह्मणों ने बिज्वल राजा को उकसा कर मधुकर सनावत और कुमार को हाथी के पैर के नीचे दिया गया। महात्मा बसवेश्वर जी को इस घटना से गहरा दुख हुआ। राजा की अज्ञानता का उन्होंने विरोध किया। उन्होंने' प्रधान मंत्री पद से इस्तीफा दे दिया। महात्मा बसवेश्वर रूढी परंपरा से अधिक ज्ञान को महत्व देते थे। इसी रूप में कबीर दास का एक दोहा बहुत ही सटीक लगता है। कहते हैं कि-

" जाति न पूछो साधु की, पूछ लीजिए ज्ञान।
मोल करो तलवार का, पड़ी रहने दो म्यान ।।"

महात्मा बसवेश्वर के विचार भी इसी रूप में प्रस्तुत हुए थे वह कहते थे कि "गंगा नहाने से बुरे कर्म धोए नहीं जाएगें ।" महात्मा बसवेश्वर के 'वचनों' से उस काल के सामान्य जनता को एक अलग ऊर्जा का प्रदान हुआ। एक एक वचन लिखने के लिए सभी संसद की अनुमति लेनी पड़ती थी। जब सभी को वचन अच्छा लगे तभी उसे साहित्य के रूप में संजोया जाता था। महात्मा बसवेश्वर जात -पात का विरोध करते थे। समाज में व्याप्त वर्ण व्यवस्था तथा जाति-पाति के भेदभाव में सुधार करना चाहते थे। महात्मा बसवेश्वर जी ने सांप्रदायिकता का भी विरोध किया। किसी दूसरे के धर्म को नीचा दिखाकर खुद के धर्म को ऊंचा कहना यह उनको पसंद नहीं था।

समाज सुधार और महात्मा बसवेश्वर इनका घनिष्ठ संबंध था । 12 वीं सदी में पाखंड से भरा हुआ, सांप्रदायिक से भरा हुआ , समाज रूढी- परंपरा परंपरा में लीन था । तभी समाज सुधार की नीव किसी ने रखी होगी तो, वह महात्मा बसवेश्वर जी ने रखी थी। उस काल में सामान्य लोगों को सांस लेने की अनुमति नहीं थी । उसी काल में उनके लिए समाज के नए द्वार खोलने का कार्य बसवेश्वर जी ने किया। जिन लोगों को गांव में रहने की भी अनुमति नहीं थी उन लोगों के लिए एक नई विचारधारा का गठन बसवेश्वर जी ने किया। इसीलिए महात्मा बसवेश्वर को दक्षिण का बुद्ध कहा जाता है। इन्हीं के विचारों से प्रेरणा लेकर कबीर दास, रविदास, संत नामदेव, गुरु नानक, छत्रपति शिवाजी महाराज, महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबा साहब अंबेडकर आदि कई ने इसी विचारधारा को आगे बढ़ाया। डॉ.अंबेडकर जी को संविधान लिखने की प्रेरणा महात्मा बसवेश्वर के 'अनुभव मंडल' के माध्यम से ही मिली। समता, एकता, बंधुता आदि के प्रवर्तक महात्मा बसवेश्वर जी को कहा जाता है। उन्होंने लिंगायत जो 'लिंग को एक्य' के रूप में मानता है। जो स्वयं में ही भगवान को ढूंढता है। अच्छे कर्मों को ही स्वर्ग मानता है। मूर्ति पूजा का

विरोध करता है। ऐसे कई गुणों से संपूर्ण समाज का निर्माण उस काल में महात्मा बसवेश्वर जी ने किया। उन्हीं के विचारों से प्रभावित होकर अन्य साहित्यकार भी 'वचन' लिखने लगे। लिंगायत धर्म का प्रचार और प्रसार आज भी निरंतर जारी है। आज एक नई पहल लिंगायत समाज के रूप में उभर कर सामने आ रही है । अल्पसंख्याक धर्म का दर्जा मांगने वाले समाज के रूप में आज बसवेश्वर जी के विचारों को मूर्त रूप देने की पहल हो रही हैं।

तत्कालीन समाज व्यवस्था में भी आज महात्मा बसवेश्वर जी के विचारों की आवश्यकता आ पड़ी है । इसका ताजा उदाहरण बिहार के मुख्यमंत्री मांझी को मंदिर में प्रवेश नकारा गया था। भारत के पूर्व गृहमंत्री के हाथों मूर्ति का उद्घाटन किया गया। लेकिन समाज में एक कु परंपरा के चलते ब्राह्मणवादी विचारधारा को यह रास नहीं आया। गृह मंत्री दिल्ली के लिए जब रवाना हुए तो , ब्राह्मणवादी विचारधारा के लोगों ने दलित मंत्री द्वारा किए गए इस उद्घाटन पर छुआछूत का आरोप लगाया। मूर्ति को 21 घाट का पानी लाकर शुद्ध किया गया। यह आज के भारत की हर जगह की कहानी है। ऐसे में एक दार्शनिक , सात्विक विचारों की आवश्यकता हमारे समाज को आ पड़ी है। बसवेश्वर जी के वचन आज भी प्रासंगिक लगते हैं।

संक्षिप्त रूप में कहा जाए तो बसवेश्वर एक ऐसे संत थे जिन्होंने 800 साल पहले नारी प्रताड़ना को खत्म करने की लड़ाई लढी, साथ ही वह शिव के उपासक थे, और उन्होंने मठों, मंदिरों में फैली कुरीतियों, अंधविश्वास और अमीरों की सत्ता को चुनौती दी। एक संत जिसके नाम से कन्नड़ साहित्य का एक पूरा युग जाना जाता है। बसवेश्वर खुद ब्राह्मण परिवार में जन्मे थे उन्होंने ब्राह्मणों की वर्चस्व वादी व्यवस्था का विरोध किया। वह जन्म आधारित व्यवस्था की जगह, कर्म आधारित व्यवस्था में विश्वास करते थे। उन्होंने कुरीतियों को हटाने के लिए इस नए संप्रदाय की स्थापना की, जिसका नाम 'लिंगायत' था। बता दे लिंगायत पहले हिंदू वैदिक धर्म का ही पालन करता था। लेकिन 'अनुभव मंडल' की स्थापना के बाद अपने स्वतंत्र विचारों को वह प्रस्तुत करने लगा। वैदिक धर्म से अलग विचारों को समाज में दार्शनिक विचारों को बोया। आज लिंगायत समाज के दार्शनिक और समाज सुधारक महात्मा बसवेश्वर उन्हें विश्व गुरु, भक्ति भंडारी और बसव भी कहा जाता है। 'काय् कवे कैलाश' श्रम ही स्वर्ग है, काया ही शरीर है, श्रम करें तो सभी कुछ प्राप्त होगा, दूसरों का छीनना ,लूटना बसवेश्वर जी को पसंद नहीं था। मेहनत पर विश्वास रखते थे। उपर्युक्त विवेचन के आधार पर कहा जाए तो लिंगायत विमर्श बारहवीं शती से चलती आ रही निरंतर समाज सुधार से जुटी हुई एक धारा है। आज उसी लिंगायत को अपना हक्क पाने के लिए आंदोलन का पर्याय ही सामने दिखाई दे रहा है। लिंगायत समाज बसव के विचारों की एक असीम सुंदर धारा है, जो निरंतर प्रवाहमान है। कन्नड़ साहित्य में लिंगायत विमर्श को बहुत ही अच्छे ढंग से प्रस्तुत किया गया। आज वही समाज अपने मूलभूत अधिकार के लिए रस्ते पर उतर रहा है। सरकार उनकी मांगों को सहजता से ना लेते हुए,केवल शब्द के बानचला रही है ।लेकिन एक न एक दिन उनके मांग की पूर्ति हेतु आवश्यक कदम उठाना जरूरी है। नहीं तो, यह समाज आगे चलकर अपना बड़ा विद्रोही रूप जरूर प्रस्तुत करेगा इसमें कोई दो राय नहीं है ।

**संदर्भ ग्रंथ :-**

*संपादक डॉ.एम.एम.कुलबर्गी- बसव समिति ।*
*अशोक कामत - महात्मा बसवेश्वर ।*
*डॉ. राजशेखर सोलापुर- आधुनिकता के अग्रदूत महात्मा बसवेश्वर, लिंगायत एक स्वतंत्र धर्म, बसवेश्वर वचन साहित्य ।*
*डॉ. सच्चिदानंद बिचेवर- परिवर्तनाचा महामेरुंमहात्मा बसवेश्वर ।*
*डॉ. सच्चिदानंद बिचेवर- लिंगायत एक स्वतंत्र धर्म ।*
*डॉ. शंकरराव कप्पीकेरी- कबीर और बसवेश्वर तुलनात्मक अध्ययन ।*
*सुभाष देशपांडे- महात्मा बसवेश्वर कार्य और कर्तव्य ।*
*काशीनाथ अंबलगे- बसवेश्वर, काव्य शक्ति और सामाजिक शक्ति ।*

## सामाजिक क्रांतीचे जनक: महात्मा बसवेश्वर

**प्रा. संग्राम जी. आंदे**
*समाजशास्त्र विभाग, महात्मा ज्योतीबा फुले महाविद्यालय, मुखेड, ता.मुखेड जि.नांदेड*

भारताच्या इतिहासामध्ये कर्नाटकने 12 व्या शतकाची अशी काही पाने जोडली आहेत जी वैश्वीक मंचावर अव्दितीय आहेत. 12 व्या शतकाच्या पुर्व काळात जितके चिंतन होऊन गेले, जितकी आंदोलने झाली तितके तत्वदर्शने पुढे आली. त्या सर्वांचे सार-सत्व 12 व्या शतकातील शरणांनी महात्मा बसवेश्वरांच्या नेत्रत्वाखाली सा-या जगाला प्रदान केले. महात्मा बसवेश्वरांची विचारधारा गेली सुमारे 900 वर्ष कन्नड भाषेत बंदीस्त राहीली, हे आपले दुर्देवच म्हणावे लागेल. बसवेश्वरांची चिंतनधारा सामाजिक, आर्थिक आणि राजकिय विचारधारा आर्वाचीन सर्व विख्यात विचारवंताच्या तत्वज्ञानाच्या विचारप्रणालीपेक्षाही अधिक श्रेष्ठ, उपयुक्त आणि अनुसरणीय असल्याची प्रचिती विव्दान चिंतकांना होऊ लागली. आजपर्यंत बसवेश्वरांकडे धार्मीक दृष्टीकोनातुचन पाहीले जात होते. आता त्यांच्या तत्वचिंतनामधुन वैश्विक मुल्यांची जाणीव करुन घेतली जात आहे.

12 व्या शतकात कर्नाटक राज्यातील विजापुर जिल्ह्यातील बाघेवाडी नगरात मादांबा व मदिराज या आराध्य ब्राम्हण दांम्पत्याच्या पोटी महात्मा बसवेश्वर जन्माला आले. त्यांनी हिंदू संस्कृतीतील उपनयन संस्काराला वयाच्या 08 व्या वर्षीच विरोध करुन ग्रहत्याग केला आणि कुंडलसंगम क्षेत्रात संगमेश्वर गुरुच्या आश्रमात येवुन विद्याध्यास केला. तेथे त्यांनी अनेक धर्मशास्त्रे, उपनिषदे व तात्विक ग्रंथाचा अभ्यास, मनन, चिंतन केले व आपली बौधिक पातळी उंच केली. त्यांना नंदीचा अवतार मानतात. पुढे जैन राजा बिज्वल दरबारात त्यांना प्रधानमंत्रीपद बहाल करण्यात येवुन आंध्रप्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र सिमेच्या मध्यभागी असलेल्या कल्याणनगरात वास्तव्य करु लागले. 12 व्या शतकात कल्याण हे प्रतिभुकलास बंदे होते. एका हातात राजदंड आणि दुस-या हातात धर्मदंड घेवुन बसवण्णांनी लिंगायत धर्माला नवी दिशा दिली. नवीन तेज बहाल केले. ग्लानी दुर केली आणि धर्माचा उध्दार केला. धर्माला तात्वीक बैठक मिळावी आचरणात एकसुत्रता असावी आणि समानता नांदावी यासाठी अनुभव मंटप या नावाचे धर्मसंसद स्थापन करुन त्याचे अध्यक्षपदी अध्यात्मीक क्षेत्रात अग्रगण्य म्हणून नावलौकीक प्राप्त झालेल्या प्रभु देवांना विराजमान केले. या अनुभव मंटपात 770 शिवरण व 70 शिवरण संतनी होत्या. आपल्या धर्मसंस्थेत लोकशाहीर तत्वाचा पुरस्कार करुन स्वातंत्र्य, समता, बंधुता ही तत्वे आचरणात आणली.

नदी पाहीली की डुबकी मारतात
झाड पाहीले की, प्रदक्षणा घालतात.
आटनारे पाणी आणि वटना-या झाडावर
विश्वास ठेवणारे तुम्हास कसे जाणनार.
कुंडलसंगमदेवा

पंचचारातील तिसरा आचार शिवाचार :(सामाजिक नितीतत्व)

शिवाचार हा पंचचारातील तिसरा आचार आहे. शिवाचार म्हणजे सामाजिक नितीतत्व होय. आपण सर्वजण एकाच परमात्म्याची लेकरे आहोत असे म्हणून जातीभेद न करता बंधुत्वाने जिवन जगणे म्हणजे शिवाचार होय. अंगावर लिंग धारण केल्याचे पुर्व आश्रम न पाहता परस्पर सहभोजन करणे म्हणजे शिवाचार होय. दासीपुत्र असो, वैश्यापुत्र असो इष्टलिंग दिक्षा झाल्यावर साक्षात शिव मानुन त्यांना वंदन करुन पुजुन त्यांचा पादोदक प्रसाद स्विकारणे म्हणजेच शिवाचार होय.

महात्मा बसवण्णांनी म्हटल्याप्रमाणे हा कोण, हा कोण, हा कोण असे न म्हणता हा आमचा, हा आमचा, हा आमचा या विश्वकुटुंबी भावनेने या जगावर प्रेम करणे असा विशाल अर्थ या शिवाचारामध्ये दडलेला आहे. आपण पित असलेले पाणी, वास्तव्य केलेली भुमी, हवा, आकाश, प्रकाश हे सर्व एकच असताना माणसा-माणसात भेदभाव करणे कितपत योग्य आहे.

शिवाचार तत्वाचे पालन करत गेल्याने सर्वामध्ये शिवभाव जागृत होतो. सर्वांच्य -हदयात शिवरुपाचे दर्शन होते. बसवण्णांनी केवळ आपल्या इष्टलिंगात शिवदर्शन केले नाही तर, मातंग चनय्या, ढोहर ककय्या, नुलिया चंद्या, गुरुड केतय्या, चांभार हरळया यांच्या -हदयात शिवाचे दर्शन केले. हजारो वर्षापासून शुद्र, अस्प्रश्य म्हणुन हिनवल्या गेलेल्या मानसांना बसवेश्वरांनी पिता, काका, दादा म्हणुन -हदयाशी कवटाळले आणि त्यांना इष्टलिंग दिक्षा देवुन धार्मीक स्वतंत्र्य दिले गेले. आजही मातंग समाजाच्या गळ्यामध्ये लिंग आहे. हे बसवेश्वरांचे एक सामाजिक परिवर्तन होय. त्यांना शिक्षण देवून त्यांचे प्रबोधन केले, त्यामुळे अनेक शरणांनी वचन रचना केली. ही महात्मा बसवेश्वरांनी केलेली फार मोठी सामाजिक क्रांती होय. हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

बसवेश्वर म्हणतात की, मातंग चनय्याचा पुत्र मी चनय्याच्या मुखातील तांबुल खाईन त्याची परिक्षा वस्त्रे घालीन, त्यांच्या परिक्षेची राखन करील हे कुंडलसंगमदेवा तुजविन अधिक आमचा मातंग चनय्या हि बसवण्णांची वचने, उक्ती त्यांची सामाजिक तळमळ आणि दलीताप्रती असलेली आपार निष्ठा प्रतिनिधीत्व करते एवढेच नाही तर चनय्याच्या घरचा दासीपुत्र, कक्कयाच्या घरची दासीकन्या दोघांचे एकत्र राहणे हे बसवेश्वर महाराज जाहिरपणे सांगतात.

महात्मा बसवण्णां अस्पृश्यता निवारन, लिंगभेद आणि जातीभेद निर्मुलनासाठी आयुष्यभर संघर्ष करीत राहीले. पहिल्यांदा ते दलितांच्या वस्तीत गेले, शिवनागमच्या यांच्या घरी भोजन केले, महामनेत सहभोजनाची सुरुवात केली. रोटीनंतर बेटी व्यवहार करण्यास प्रारंभ केला, यांचे उदाहरण म्हणजे हरळ्यांचा मुलगा शिलवंत आणि मधुवरस यांची मुलगी लावण्यवती यांचा विवाह होय. शतकानुशतकाची जातीयता त्यांनी गाढुन टाकली. मानवतेची महासिध्दी प्राप्त झाली.

एके दिवशी नागीदेव कांबळेच्या घरी जावुन बसवण्णा जेवन केले असता त्यांना मंत्री राजा बिज्जळकडे बसवेश्वरांना राजदरबारात बोलवण्यात आले आणि त्यांना विचारले की, नागीदेव कांबळेच्या घरी जेवण का केले तर बसवेश्वरांनी उत्तर दिले की, माझे रक्त लालच आहे आणि नागीदेव कांबळेचे रक्त लालच आहे आणि नागिदेव कांबळे ही इष्टलींग धारण केलेले होते. म्हणून मी त्यांच्याघरी जेवन केलो आहे. असे बसवेश्वरांनी उत्तर दिले.

कोणत्याही जातीचा असो,
महादेवास स्मरणा-यांच्या
तोंडाचे तांबुल खायीन, त्याची पायशी वस्त्रे घालीन,
त्याची पादत्राने राखुन जिवन जगेन, कुंडलसंगमदेवा.

तात्पर्य म्हणजे शिवाचार म्हणजे जे-जे दिसे दृष्टिपुढे। ते-ते अवघे शिवरुप गाठे।। अशी विशाल दृष्टि प्राप्त घेणे होय. अशी शिवसृष्टी प्राप्त झाली म्हणजे सामाजिक समानता प्रस्थापित होते. हेच सामाजिक नितीतत्व होय.

मानवाने स्वत:च्या उन्नतीसाठी वेगवेगळ्या परीसरात राहुन आपल्या आवश्यकते प्रमाणे ज्ञानाचा मार्गाचा अवलंब केलेला आहे. काही काळानंतर त्या ज्ञानाचा मार्ग जिवनामध्ये रुपांतरीत झालेला दिसतो. आपण धर्माविषयी सुध्दा असु शकतो. मनुष्याच्या जिवनात दुख: आणि मरण नसते, तर बहुतेक त्याने परमात्मा व धर्म ह्याची कल्पना केलेली नसती. जगामध्ये समस्त जिवराशीस मृत्यु अनिवार्य आहे. मनुष्याला मृत्यु भय वाटते, कारण तो समजतो की, स्वत: च्या जिवनामध्ये सदा शाश्वर सुखाच्या भ्रांतीमुळे मणुष्य आपल्या जिवनावर उत्कट प्रेम करताना दिसून येतो. इ.स. 1167 मध्ये वयाच्या 66 व्या वर्षी बसवेश्वर महाराज संगमेश्वराशी एकरुप झाले, कर्नाटक सरकारने कृष्णा आणि मलप्रभा नदीच्या संगमावर बसवेश्वरांचे समाधी स्थळ उभारलेले आहे. तरी बसवेश्वर महाराजाच्या जन्मशताब्दीला कोटी-कोटी प्रणाम.

संशोधन म्हणजे अल्पविराम, अर्धविरामाच्या मार्गे पुर्णविरामाकडे मार्गस्त राहण्याची क्रिया असते. त्यामुळे नवनवीन संदर्भतेनुसार संशोधक आपल्या अभिप्रायात सुधारणा घडवीत असतो.

**संदर्भ ग्रंथ :**

*लिंगवंताची लिंगप्रभा : बस्वराज गुरु.*
*बसव मार्ग : डॉ. एम.एम. मेनसिनकाई.*
*महात्मा बसवण्णांची पाच नितीमुल्ये : पुज्य श्री डॉ. बसवलिंग पट्टदेवस.*
*प्रा. आनंद बळीराम कर्णे.*

## स्त्री स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते महिला सबलीकरणाचे अग्रदुत - महात्मा बसवण्णा

**प्रा.देशमुख गंगाधर बालाजीराव**
*इतिहास विभाग, वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय, देगलूर, ता.देगलुर जि.नांदेड*

स्त्री स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते, महिला सबलीकरणाचे अग्रदुत समता वादाचे जनक क्रांतीसुर्य जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर.12 व्या शतकातील या महापुरुषाचा जन्म कर्नाटकातील विजापूर जिल्हयातील बागेवाडी गावात वैशाख शुध्द तृतीया (अक्षयतृतीया) शके 1124 म्हणजेच इ.स.1139 मध्ये आई मादालांबिका व वडील मादरसांच्या पोटी झाला संस्कारशील चारित्र्यसंपन्न वीरशैवाराध्य आचार विचाराने प्रभावित असणा-या कुळातील दामपत्यांच्या पोटी बसवेश्वरांचा जन्म झाल्यामुळे बालपणापासुनच धर्मशास्त्राच्या आचारसुत्राची ओळख व शिकवण बालमनावर रुजू लागली. अनुकुल कौटुंबिक परिस्थिती आणि उपजत चौकस व कुशाग्र बुध्दीमत्तेची देण असणा-या बसवण्णांच्या ज्ञानकक्षा वाढविण्यास प्रारंभ झाल्या. महात्मा बसवण्णाची मोठी बहिण आक्का नागालांबिकावर महात्मा बसवण्णांचे फार प्रेम होते. 12 व्या शतकातील तत्कालीन सामाजिक बाबीचा विचार करता इस्लामी अत्याचाराचे वाढते आक्रमणे, त्याचबरोबर पांरपारिक वैदिक धर्माचे मुळ अधिष्ठान बाजुला सारुन सनातनी वैदिकांनी आपल्या निजी स्वार्थ्यासाठी मानवी घातक वर्ण व्यवस्था धर्माच्या नावावर निर्माण करुन अंधश्रध्दा, अस्पृश्यता, जातिभेद, धार्मिकतेवर देवदासी प्रथा, बालविवाह, सतीप्रथा अशा अनिष्ठ प्रथेखाली स्त्रीचे मनोबल कमी करुन त्यांना अबला बनवण्यास प्रारंभ झाले होते. समाजातील स्त्रियावर होणा-या विविधांगी बाबीतून होणारा छळ बसवण्णाला दिसत होता. बालवयातच आपल्या आईवडीलांना वेगवेगळे प्रश्न विचारुन शंकांचे निरसन करुन करुन घेण्याची मानसिकता मुळ धरु लागली. जीवनात मानवी मुल्यांला महत्व की मानवी प्रवृत्तीने आपल्या सोईनुसार घालून दिलेल्या प्रथा परंपरेला महत्व द्यावे या बाबीचा विचार आपल्या सदविवेक बुध्दीच्या मनचक्क्षुत सतत विचाराचे थैमान वाढत चालले होते.

वीर शैवाच्या कुळात जन्मास आलेल्या महात्मा बसवण्णाच्या जीवनातही प्रत्यक्ष अनेक बाबीला सामोरे जाण्याची वेळ येत होती. 12 व्या शतकात वीरशैवात विविध धर्मिक बाबीला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले. गळ्यात शिवलिंग धारण करुन मुंज करण्याची पध्दत होती. महात्मा बसवण्णाने आई-वडीलाकडून मुंज करण्याच्या धार्मिक विधीला नकार दिला कारण बसवण्णाची मोठी बहिण आक्का नागलांबिका एकाच कुळातील,एकाच दामपत्याच्या पोटी जन्म घेतलेली अपत्ये फक्त फरक हा स्त्रि आणि पुरुष, मग पुरुषाचीच मुंज करण्याची वीधीला मान्यता आहे स्त्रियांना का नाही ? अशा प्रकारच्या विद्रोही आणि स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करण्याचे काम 12 व्या शतकात बसवण्णाने केले. बसवण्णाच्या अशा विद्रोही क्रांतीकरक विचारामुळे बागेवाडीचे तथाकथीत धर्मपीठाने बाल बसवण्णाला आपल्या जन्मभूमीतुन हद्दपार करण्याच्या विचारापर्यंत येऊन पोहचवले. आपल्या विचारावर ठाम असणा-या बसवण्णाने उदान्त ध्येय डोळ्यासमोर ठेवून मानवी नीती मुल्याची खरी ओळख सामान्य जनमानसात निर्माण करण्यासाठी जन्मभुमीचा त्याग केला.

बागेवाडीचा त्याग केल्यानंतर बसवण्णा कुंडलसंगम क्षेत्रातील जातवेद मुनीच्या आश्रमात दाखल झाले. त्याठिकाणी वेद, उपनिषद, आगम, पुराण इत्यादी धार्मिक तत्वज्ञानाचा समग्र अभ्यास करण्यास प्रारंभ केले. महात्मा बसवण्णा ज्या क्षेत्रात वास्तव्यात होते त्याक्षेत्राततत्कालीन स्थितीत चालुक्य राजवटीची सत्ता होती. मंगळवेढ्यात चालूक्य घराण्याचा मांडलिक म्हणून बिजल राजा राज्य करीत होता. बिजल राजांचा दंडाधिकारी म्हणून बसवेश्वराचे मामा होते. वेद उपनिषेद, पुराण यामध्ये कुशल असणा-या बसवेश्वरास बलदेवांनी आपली मुलगी गंगांबिकाचा विवाह लावून दिला. बसवेश्वराने गुरु जातवेद मुनीच्या आदेशाप्रमाणे विवाह करुन राजसत्ता आणि धर्मसत्तेचा आधार घेत आपल्या ध्येय धोरणाला मूर्त स्वरुप देण्यास प्रारंभ केले. काही कालावध लोटल्यानंतर महात्मा

बसवेश्वरांनी दुसरा विवाह सिध्दरस राज्याची क्षत्रिय कन्येशी केला. हा विवाह आंतरजातीय होता. या विवाहामुळे जनमानसात आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन मिळू लागले. महात्मा बसवेश्वराच्या जीवनात अनेक घटना परीवर्तनवादी घडण्यास प्रारंभ झाले. पारंपारीक सनातनी रुढी परंपरा विरुध्द बंड करण्यात प्रारंभ केले. सामान्य जनमानसाला लोकभाषेतून विचार सांगण्यास प्रारंभ केले. त्यातुनच विचाराच्या आधारे तात्वीक अधिष्ठान निर्माण होऊन अनुभव मंडळाला मुर्त स्वरुप आले. सर्व जाती धर्मातील लोकांचा सहभाग वाढण्यास प्रारंभ झाले. सामुहिक चिंतन, चर्चा सहभोजनाचा मार्ग अंगीकारला जाऊ लागला. यातुनच समतेचा विचार, स्त्री पुरुष समानता या बाबीवर विचार अधिष्ठान निर्माण झाले. बसवेश्वराने मानवी मुल्याच्या बाबीवर बोट ठेवून कन्नड साहित्याच्या इतिहासात अमुल्य ठेवा निर्माण केला. स्त्रीयांच्या स्वातंत्र्याचा विचार करता सर्वप्रथम बसवण्णाने स्त्रीमुक्ती, स्त्रियाच्या अधिकारासाठी आपल्या मातृभुमीचा त्याग केला. तेच ध्येय साध्य करण्यासाठी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करुन अनुभव मंडपातील महिलांचा प्रवेश हा तत्कालीन स्थितीतील भविष्यातील स्त्रियांच्या हक्क कर्तव्याची मुहुर्त भेट रोवण्याचे काम बसवण्णाने केले.

महात्मा बसवेश्वराने आपल्या अनुभव मंडपात सर्व जातीधर्माच्या स्त्रियांना प्रवेश देऊन त्याच्या शैक्षणिक, धार्मिक, आर्थिक, वैचारिक बाबीला प्रोत्साहन दिले. अनुभव मंडपात 70 स्त्रीया होत्या. त्यात प्रामुख्याने आक्कामालाबिका, सत्याका, नागांबिका, निलांबिका, अक्का महादेवी अशा अनेक स्त्रियाचा सहभाग होता. स्त्रियांना साक्षरतेबरोबर युध्द प्रशिक्षण देण्यात येऊ लागले, स्त्रियांना स्वावलंबी जीवन जगता यावे यासाठी महात्मा बसवेश्वराने रुढी परंपरेला मुठमाती देत स्त्रिमुक्ती चळवळीची सुरुवात केली. प्राचीन काळातील स्त्रियांना समाजात ज्या अर्थी मातृसत्ताक बाबीला महत्व दिले होते ती पध्दत कालांतराने पुरषकेंद्री बनुन पितृसत्ताक समाजव्यवस्थाअंगभूत झाली.तेंव्हापासुन स्त्रि पारतंत्र्यास प्रारंभ झाला. स्त्री-पुरुष समानतेची भावना पुरुषामध्ये जोपर्यंत येत नाही तोपर्यंत समाजव्यवस्थेत बदल होणार नाही ही तत्कालीन परिस्थितीतून जाणीव झाल्यानंतर महात्मा बसवेश्वरांनी स्त्रियांच्या उध्दारासाठी अनुभव मंडपाचे सुगम माध्यम निवडुन स्त्री उध्दाराचे कार्य केले. अनुभव मंडपातील स्त्रियांना शरणी म्हटले जात असे. अनुभव मंडपातील 70 शरणीपैकी 35 शरणीनी लिहिलेले वचन आजही उपलब्ध आहेत. बसवकालीन शरणी स्त्रियांचा विचार करता,अनुभव मंडपात समाजातील विविध स्तरांतून आलेल्या शरणी काही उच्च कुळातील, काही निम्नवर्गीय तर काही विरक्त तर काही सांसारीक होत्या. विरक्त शरणीमध्ये अक्का महादेवीचे स्थान सर्वात मोठे मानले जाते, इतर शरणीपैकी सर्वात जास्त वचने (434) अक्का महादेवीने रचलेली आढळून येतात. काव्यप्रतिभेची देण असणा-या अक्का महादेवीच्या वचनातून तात्वीक आणि साहित्यिक स्वरुपाचे साकार स्वरुप दिसून येते, दुसरी विरक्त शरणी म्हणजे बोंतादेवी बसवेश्वराची किर्ती ऐकूण काश्मीरमधील आपल्या वडीलांचे राजवैभव सोडून कल्याण येथे पोहचली. कल्याणमधील शरणाच्या सहवासात राहून कन्नड भाषा शिकून वचने लिहिली. अशा प्रकारे गोग्गवा, अक्का नागम्मा, सत्यक्का इत्यादींनी अनुभव मंडपाच्या माध्यमातुन स्वत:चा उध्दार करुन घेतला. महात्मा बसवेश्वरांनी स्त्रियांना प्रतिष्ठा, स्वातंत्र्य, अनुभव मंडपाच्या व्यासपिठावरुन खुले केल्यामुळे मध्ययुगीन कालखंडात स्त्रिमुक्ती चळवळीला प्रारंभ झाला.

महात्मा बसवेश्वरांनी स्त्रियावरील होणा-या अत्याचाराविरुध्द आवाज उठवण्याचे काम केले. बालविवाहास विरोध, पुनविवाहाचा पुरस्कार केला, देवदासी प्रथेवर प्रहार केले. सतीप्रथा नाकारली, आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार करुन अनुभव मंडपाच्या माध्यमातून चर्मकार व ब्राम्हण या दोन जातीत आंतरजातीय विवाह घडवून आणला, म्हणुनच महात्मा बसचेश्वरांना कर्ते समाज सुधारक आणी स्त्री स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते, स्त्रीमुक्ती चळवळीचे प्रणेते म्हणून ओळखले जाते. बसवण्णाने समाजातील अनिष्ठ प्रथा परंपरा आणि जनमानसाने तुच्छ लेखलेल्या बाबीवर विचार करुन कृतिशील मार्गाचा अंगिकार केल्याचे दिसून येते. त्याचे उदाहरण म्हणजे 12 हजार वैश्याचे -हदयपरीवर्तन करुन त्यांचे योग्य त्या शरणांशी लग्न लावून देवून अनुभव मंडपाच्या माध्यमातून संसारी व भक्तीमार्गाला लावले. त्यामध्ये सुळे, संकव्वा, हादर, कायकद, मारय्याची पुण्यस्त्री गंगम्मा अशा काही वचनकार शरणीची उदाहरणे देता येतील. समाजातून वाळीत टाकलेल्या स्त्रियांचे योग्य मार्गाने उर्वरीत आयुष्य मार्गी

लावल्यामुळे अनुभव मंडपातील लोकांनी त्यांना पुण्यस्त्री म्हणून ओळखण्यास प्रारंभ केला. अनुभव मंडपात बसवण्णाने आपल्या सहकार्याच्या मदतीने सामान्य जनमानसात भक्ती मार्गाबरोबर सर्वांगीन विकासाचे ध्येय साध्य करण्याची पार्श्वभूमी निर्माण केली. स्त्रियांनीही व्यवसाय, उद्योगास प्रारंभ करण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा करुन अनुभव मंडपाच्या सदस्य असणा-या सर्व शरणींना आपला उदरनिर्वाह भागवण्यासाठी व्यवसाय करणे अनिवार्य केले. त्यामुळेच अनेक शरणी स्त्रियांनी महात्मा बसवण्णाच्या विचारानुसार वेगवेगळे व्यवसाय, काम करण्यास प्रारंभ केले. त्यामध्ये प्रामुख्याने कश्मीरमधील राणी मोळीगे महादेवी हिने मोळी विकणे, आय्दक्की लक्कमाचे बाजारात सांडलेले धान्य गोळा करण्याचे काम, रेवम्माचे सौंदर्य प्रसाधने विकणे, सोमम्माचे धान्य कुटने असे कामे शरणीने करण्यास प्रारंभ केले. महात्मा बसवेश्वरांनी अनुभव मंडपातील स्त्रियांना कर्तव्यनिष्ठा, स्वावलंबन, स्वाभीमानी जीवन जगण्यासाठी श्रम हेच खुप महत्वपुर्ण असल्याची जाणीव करुन दिल्याचे दिसून येते. श्रमाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त करुन देऊन आर्थिक स्वातंत्र्य त्याच बरोबर महिला सबलीकरनाला 12 व्या शतकात प्रत्यक्ष अमलात आणून दिले हीभवीष्याची नांदी होती.

महात्मा बसवण्णाने स्त्रि-पुरुष समतेला महत्व दिले कारण हिंदू धर्म शास्त्रकारांनी स्त्रिला शुद्र, अपवित्र समजले होते. या मानसिकतेतून स्त्रियांना बाहेर काढून योग्य स्थान देण्यासाठी 12 व्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीने समान अधिकार दिले. त्यामध्ये इष्टलिंग धारण करणे, दिक्षा संस्कार, भक्तीमार्ग, साधनामार्ग खुले केले. समाजोध्दारासाठी स्त्रियोध्दार अपरीहार्य असल्याचा विचार तत्कालीन स्थितीत मांडला. पुरुषाहून स्त्रीकोणत्याही बाबीमध्ये कमी दर्जाची नाही अशा प्रकारचा उद्घोष केला. यावरुन महात्मा बसवेश्वरांच्या स्त्रीस्वातंत्र्याचे आणि महिला सबलीकरणासाठी रचनात्मक दृष्टिने मांडलेले विचार भविष्यातील स्त्रियांसाठी किती महत्वपुर्ण होते हे समजते. आधुनिक काळात विविध बाबीचा वापर करुन स्त्रिशिक्षण, महिला सबलीकरणाच्या योग्य त्या सुविधा पुरवुन सुध्दा जे पुर्णपणे साद्य करुन घेता आलेले नाही ते बसवेश्वरांनी 12 व्या शतकात स्त्रियांना मानाचे स्थान, समानता, स्वालंबन, शिक्षण, उद्योग-व्यवसायाची कास निर्माण करुन दिली. स्त्रियांना ज्ञान व साहित्य निर्मीती प्रक्रियेमध्ये अनुभव मंडपात सहभागी करुन घेवुन क्रांतीकारक कार्य केले. म्हणुन समाजातील जाती व्यवस्थेतील आणि स्त्रि-पुरुषातील विषमता नाहीसी झाली.

माझ्याहुन लहान कोणी नाही,
शिवभक्ताहून महान कोणी नाही,
यास तुमचे चरण साक्ष, माझे मन साक्ष.
कुंडलसंगमदेवा, मजला हेच दिव्य.

असे पदोपदीने बसवण्णांनी अनुभव मंडपात सांगितल्यामुळे उच-निच भाव संपुष्ठात आला. स्त्रियांना स्वातंत्र्य मिळाले. पुरुषांइतकीच आध्यात्मीक समानता स्वातंत्र्य मिळाले. तत्कालीन स्थितीतील अनुभव मंडप म्हणजे आजच्या लोकशाहीची मुहूर्त भेट होती. आध्यात्मीक लोकशाही बसवण्णाच्या विचाराचे मुर्त स्वरुप असल्याचे दिसून येते. त्यामुळेच स्त्रि स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते आणि महिला सबलीकरणाचा अग्रदूत म्हणून महात्मा बसवेश्वरांना ओळखले जाते.

## संदर्भ -

*बस्वराज शंकरय्या स्वामी : समग्र क्रांतीप्रवर्तक महात्मा बसवेश्वर, अमृता प्रकाशन.*
*डॉ. अशोक मेनकुदळे : क्रांतीकारी युग प्रवर्तक महात्मा बसवेश्वर, महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी. तृ.आ. - 2014*
*डॉ. सोमनाथ रोडे : सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा बसवेश्वर, अश्विनी प्रकाशन, लातूर.*
*संपादक : बाळासाहेब मलगौंडा पाटील, बसव पथ (मराठी व्दैमासीक) अंक 5 वा वर्ष 6 वे, मार्च-एप्रिल 2016.*
*संपादक : परमेश्वर विश्वंभर आप्पा लांडगे, प्रभुप्रसाद (जिवनस्पर्शी - एक परीपुर्ण मराठी मासिक), वर्ष 3 रे अंक 5 वा, माहे मे - 2011.*
*संपादक बाळासाहेब मलगौंडा पाटील : बसवपथ (मराठी व्दैमासीक) अंक 3 वर्ष 5 वे, नोव्हेबर - डिसेंबर 2014.*

# बसवकल्याण : समग्र समाज क्रांतीचे केंद्र

**डॉ. व्यंकट इरवंतराव पाटील**
*सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट, जि.लातूर*

**प्रस्तावना :** इसवी सनाच्या बाराव्या शतकात मंगळवेढा नावाचे लहान राज्य होते. तेथे कळचुर्य घराण्याच्या बिज्जळाचे राज्य होते. दक्षिण भारतात चालूक्य सम्राटांचे मोठे साम्राज्य होते. चालुक्य साम्राज्याची राजधानी कल्याण येथे होती. सम्राट चालुक्य विक्रमादित्याच्या कन्येचा पुत्र (नातू) म्हणजे मंगळवेढा राज्याचा राजा बिज्जळ होय. बिज्जळाचे मंगळवेढा राज्य हे सार्वभौम कल्याण राज्याचे मांडलिक राज्य होते. मंगळवेढा राज्यात बारा गावाच्या प्रमुखाला पुरवराधिश्वर असे म्हणत असत. मादिराज हे इंगळेश्वर बागेवाडी परिसराचे पुरवराधिश्वर होते. मादिराज - मादलांबिका या पती-पत्नीस पुत्र बसव म्हणजेच बसवेश्वर, बसवण्णा किंवा बसवराज हे अपत्य होते. 1105 मधील वैशाख शुध्द तृतियेला अक्षय तृतीयेच्या दिवशी जवळच्याच इंगळेश्वर येथील माहेरी मादलांबिकाला पुत्ररत्न झाले. पुत्राचे नाव बसव ठेवण्यात आले. हाच बसव पुढे समता युगाचा प्रारंभकर्ता महात्मा बसवेश्वर म्हणून जगापुढे आला. बसवकल्याणचा राजकिय इतिहास महात्मा बसवेश्वरांचे समग्र समाज क्रांतीचे केंद्र, शरण संस्कृतीचा प्रभाव त्यांचे अवशेष विविध शरणांचे चरित्रकार्य, येथे प्रकट झाले.

**लिंगायत धर्म केंद्र : बसवकल्याण :** बसव कल्याण बसवेश्वरांच्या जीवनकार्याच्या दृष्टीने सर्वात महत्वाचे स्थळ आहे. बसवेश्वरांची ही कर्मभूमी, कायकभूमी व शरणभूमी आहे. बसवण्णांच्या नेतृत्वाखाली येथे 27 वर्ष अनुभव मंटप चालला. 770 शरण अनुभव मंटपाचे सदस्य होते. कल्याणचे वैभव विविध शिलालेखातून प्रकट होते. बसवकल्याण भूमीत अक्कनागय्या, चेन्नबसवेश्वर, गंगांबिका, शिवदैव, अक्महादेवी, मडिवाळमाचय्या, कक्कय्या, चन्नय्या, हडपद, अलमप्रभू कल्याणमध्ये व परिसरात राहत होते. बाराव्या शतकात कल्याणमध्ये महात्मा बसवेश्वरांनी शैवपरंपरेतील विविध शैव पंथांना एकत्र करुन स्वतंत्र लिंगायत या समतावादी धर्माची स्थापना केली तर याच कालखंडात वैष्णव पंथामधुन पंढरपूर येथे वारकरी भक्ती संप्रदायाची स्थापना झाली.

**महात्मा बसवेश्वरांची चतु:सुत्री आणि बसवकल्याण :**

**1) अनुभव मंटप :** बसवकल्याण अनुभव मंटपाचे स्थापना केंद्र आहे. बसवण्णांनी येथे प्रथम अनुभव मंटप चालू केला. बसवकल्याणच्या जुन्या गावात आजही अनुभव मंटपाचे स्थळ दाखविले जाते. अनुभव मंटप बसवण्णांचे समग्र समाजक्रांती केंद्र होते. अनुभव मंटपामुळेच माणसं घडली, माणसं उभी राहिली. समाजाला नवी दिशा व दृष्टी प्राप्त झाली. अनुभव मंटपामुळेच देशभरातून सर्व शरण शरणी बसवकल्याणला आले. बसवण्णासह सर्व शरण बसवकल्याणच्या अनुभव मंटपात चर्चा करण्यासाठी बसत होते. अनुभव मंटप हे आजच्या संसदेचे प्रारुप होतो. सर्वांना समान प्रवेश व समान अधिकार हे अनुभव मंटपाचे वैशिष्ट्ये होते. बसवण्णा व त्यांच्या अनुभव मंटपामुळे बसवकल्याण बाराव्या शतकात परिवर्तनाचे केंद्र बनले. बाराव्या शतकात बसवकल्याण बसवण्णांच्या कार्यकर्तृत्वामुळे, क्रांतीकारी चळवळीचे मुख्य केंद्र राहिले, परिणामी समाजसुधारणेला अधिक गती मिळाली. बसवकल्याण मध्ये अनेक शरण संत, समाजसुधारक, समाज सेवक, वचनसाहित्य व कायकयोगी घडले. संपुर्ण समाज क्रांती घडून आली. या क्रांतीकार्याचे युगप्रवर्तक होते बसवण्णा, त्यांचा अनुभव मंटप आणि बसवकल्याण ही भूमी.

**2) वचन साहित्य :** बसववादी शरणांनी बसवकल्याणच्या अनुभव मंटपात बसून वचन साहित्य निर्माण केले. अक्षरशुन्य, गावकुसाबाहेर राहणारे, शुद्र, अतिशुद्र व भटके लोक साक्षर झाले. त्यांची प्रज्ञा जागृत झाली, त्यांनी वचन साहित्याचे निर्माण केले, म्हणून बाराव्या शतकात बसवकल्याण वचन विद्यापीठ होते. शरण साहित्याचा नवा प्रवाह या बसवकल्याण भूमित जन्माला आला. कन्नड लोक भाषेत नवे साहित्यविश्व निर्माण झाले. समग्र

वचनवाड्मय याच भूमित रचले गेले. वचन साहित्याची निमार्ण भूमी म्हणजे बसवकल्याण आहे. आज जरी बसवकल्याण एक तालुक्याचे स्थळ असले तरी त्या काळी ही चालुक्याची दक्षिणेतील सर्वात मोठी राजगादी व राजधानी होती. राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, साहित्यिक व परिवर्तनाचे मुख्य केंद्रच बसवकल्याण (कल्याण) होते. म्हणून कल्याणी बसवेश्वर असा उल्लेख काही ठिकाणी सापडतो.

**3) शरण परिवार :** बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांच्या पुढाकाराने शरण संस्कृती व शरण संघाची स्वतंत्र आचारसंहिता तयार झाली. बसवकल्याणच्या अनुभव मंटपात नानाविध कायक करणारे कायक निष्ठ शरण शरणी सहभागी होऊन शरण साहित्य लिहू लागले. सर्व जाती -जमातीचे शरण एकसंघ झाले. एकदेवोपासनेचे तत्व अंगीकारत इष्टलिंगरुपात देवपूजा करु लागले. त्यामुळे मंदिर संस्कृतीचे प्रश्न कमी होऊन शिवलिंग संस्कृती ऐवजी इष्टलिंग संस्कृतीचे तत्व सर्वमान्य येऊन राहू लागले, काहींनी तर आपले सर्वस्वीजीवनच शरण संस्कृतीला समर्पित केले. महात्मा बसवेश्वरांनी शरण संघात समता व एकता निर्माण केली होती. सर्व शरणांनी शरणत्व वृत्तीचा अंगिकार केला होता. नित्य, सत्य, शुध्द, परिश्रम करुन प्रामाणिकपणे जीवन जगणारे शरण महान होते. शरणसंघ हा एक महापरिवार होता.

**4) शरण संस्कृती :** बाराव्या शतकात बसवकल्याण समग्र समाजक्रांती केंद्र राहिल्यामुळे बसवकल्याणच्या सभोवतीचा किमान 300 कि.मी. परिसर या शरण संस्कृतीने खुपच प्रभावित झालेला दिसून येतो. गळ्यात इष्टलिंग बांधण्याची प्रथा, शरणु शरणार्थ, शरणांची नावे, आडनावे, संस्कार, सण, उत्सव इत्यादी बाबतीत मात्र गेल्या 900 वर्षात शरण संस्कृती उत्तर कर्नाटकात बिदर, गुलबर्गा, विजापूर, धारवाड, बेळगाव, बालकोट, चित्रदुर्ग जिल्ह्यात पिढ्यानं-पिढ्या रुढी प्रवाहित होत आलेली आहे. महाराष्ट्रात आजही लिंगायताची संख्या जास्त प्रमाणात बसवकल्याण व कर्नाटक प्रांताच्या शेजारील सोलापूर, सांगली, कोल्हापूर, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, बीड, हिंगोली, महाराष्ट्रात उर्वरीत सर्व जिल्ह्यात लिंगायत विरळ संख्येत आहेत. तसेच आंध्रप्रदेशातही लिंगायताची संख्या सर्वाधिक काही जिल्ह्यात आहे.

**कल्याणीचे नामकरण : बसवकल्याण :** कल्याणचे प्राचीन नाव कल्याणी होते. चालूक्य राजवंशानी इ.स. 10 व्या शतकात कल्याणी येथे भव्य भुईकोट किल्ला बांधला. या किल्यास बिज्जल राजवाडा म्हणतात. त्यानंतर इस्लामी राज्यात कल्याणीला कसबा कल्याण व किल्ले कल्याण म्हटले जाऊ लागले. स्वातंत्र्यानंतर 1965 ला महाराष्ट्रातील सोलापूरचे बाबासाहेब वारद यांनी शासन दरबारी प्रयत्न करुन कल्याणचे नाव बदलून बसव कल्याण केले. 1965 नंतर सर्व शासकिय दप्तरात बसवकल्याण अशी नोंद करण्यात आली. बसवेश्वरांच्या कार्यकर्तृत्वाची साक्षीदार असलेली कल्याणी आज बसवकल्याण या नावाने ओळखली जात आहे. सद्याचे बसवकल्याण महाराष्ट्र, कर्नाटक सिमेवरील कर्नाटकप्रांताच्या बीदर जिल्ह्यातील तालुक्याचे स्थळ आहे. या शहराचा आज वेगाने विकास होत आहे.

**स्वातंत्र्योत्तर काळातील बसवकल्याण :** निजामशाही नंतर कल्याणीचा समावेश स्वतंत्र भारतात झाला. 1956 च्या भाषावर प्रांत रचनेनुसार भारतात भाषेच्या आधारे विविध राज्यांची नवीन निर्मिती झाली. कर्नाटक प्रांत बीदर जिल्ह्यात बसवकल्याण (कल्याणी) चा समावेश करण्यात आला. कल्याणी हे पूर्वी राजधानीचे शहर असले तरी आज बीदर जिल्ह्यातील एक तालूक्याचे स्थळ आहे. स्वातंत्र्यानंतर इ.स. 1948 ते 2005 पर्यंत म्हणजे 57 वर्ष बसवकल्याण मधील बसव स्मृतीस्थळाकडे भारत व कर्नाटक शासनाचे दुर्लक्षचे झाले. बसववादी शरणांच्या गुहा गेली 850 वर्षापासुन शरण संस्कृतीचा इतिहास सांगत उभ्या आहेत. स्थानिक लोकांना या गुहेविषयी विशेष माहिती होती. त्याआधारे 2005 साली प्रथमच कर्नाटकचे मुख्यमंत्री एच.डी. कुमार स्वामी यांच्या पुढाकाराने बसवकल्याण विकास प्राधिकरण स्थापन करण्यात आले. या प्राधिकरणाव्दारे शरणांच्या गुहा व बसव स्मृती स्थळे विकसित, संरक्षित व पुनरुज्जीवीत केली जात आहेत. त्यासाठी 130 कोटी रुपये विकासनिधी कर्नाटक शासनाने मंजूर केला होता.

**संदर्भ ग्रंथ :**

*ऐतिहासिक बसवकल्याण : प्रा.भिमराव पाटील, शरण साहित्य मंडळ, लातूर - 2014*
*अनुभव मंटप : राजु ब. जुबरे, महाराष्ट्र बसव परिषद, भालकी - 2020*
*महात्मा बसवेश्वर : डॉ. अशोक ग. मेनकुदळे, महाराष्ट्र बसव परिषद, भालकी - 2017*
*लिंगायत एक स्वतंत्र धर्म : डॉ. राजशेखर सोलापूरे, अरुणा प्रकाशन, लातूर - 2014*

# महात्मा बसवेश्वरांचे समाजातील शिक्षण स्थितीचे दर्शन

**डॉ. कुडकेकर एन.पी.**
*लोकप्रशासन विभाग प्रमुख, संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट, जि.लातूर*

**प्रस्तावना :**

महात्मा बसवेश्वर हे एक जेष्ठ समाजसुधारक आणि राष्ट्रसंत होत. बसवेश्वर हे मध्ययुगीन भारताचे जनक होत. 12 व्या शतकातील साधारणत: 1132 ते 1167 हे बसवेश्वराचा जीवनकाल होय. इ.स. 1132 च्या अर्थात शके 1054 च्या वैशाख शुध्द तृतीया म्हणजेच अक्षय तृतीया दिवशी बसवेश्वरांचा जन्म झाला आणि इ.स. 1167 मधील श्रावण शुध्द पंचमी म्हणजेच नागपंचमी म्हणून रुढ झाला. (काही संशोधक इ.स. 1105 हे बसवेश्वरांचे जन्मवर्ष मानतात. तथापी बसवेश्वरांच्या जीवनातील प्रमुख घटनांचे सुक्ष्म अवलोकन करता 1132 ते 1167 हा 35 वर्षांचाच त्यांचा जीवनकाल योग्य आणि संयुक्तिक वाटतो.

**ईशान्य गुरुंचा विद्याश्रमात प्रवेश :** दिवसभर प्रवास करुन रात्री बसव कृष्णा - मल प्रभा नदीच्या संगमावर ईशान्य गुरुच्या आश्रमात पोहचले तेंव्हा आश्रमवासी झोपलेले होते. नदीकाठच्या संगमेश्वराच्या देवालयात रात्री विश्रांती घेतली. अंधार असतानाच उठुन कृष्णा नदीवर शौचविधी आटोपून स्नान केले. संगमेश्वर ह्या शिवलिंगाची पुजा केली. कुडल या कन्नड शब्दाचा अर्थ आहे संगम. दानशुर राजांनी दाने देऊन निर्माण केलेले विव्दान ब्राम्हणांचे ते आग्रहारी गाव होते. पाचशे विव्दान ब्राम्हणांकडुन या आश्रमाचे व्यवस्थापन केले जाई. ते काळमुखशैव शाखेचे होते. तक्षशिला व नालंदा विद्यापिठाप्रमाणे कुडलसंगम तात्कालीन शैवधर्माचे आध्यात्मिक व शैक्षणिक केंद्र होते. मंदिराजवळ मठ, संन्याशांना राहण्यासाठी गवताच्या खूप झोपड्या होत्या. त्या सभोवताल गुरुंची निवासस्थाने होती. मध्यभागीच्या मोठ्या दालनात गुरुकुलाचे वर्ग चालत. भोजनगृह, छंदवर्ग, आखाडे होते. धनुर्विद्या, तलवार, भालाफेक, खड्म, अश्वरोहण इ. साठी स्वतंत्र व्यवस्था होती. बसवाने ईशान्य गुरुंच्या गुरुकुलात प्रवेश केला तेंव्हा झुंजुमुंजु लागले होते. झुळझुळ वाहणा-या कृष्णेचे पारदर्शी पात्र, किना-यावरील दाट वनराई, पात्रापर्यंत जाण्यासाठीचा चिरेबंदी घाट, मंदिर परिसरातील दीपमाळांची रांग, उंच गोपूरे पाहणा-यांच्या मनावर मांगल्याचा प्रभाव टाकणारा निर्सरम्य रमणीय परिसर होता. अशा शांत वातावरणात, परिसरात अस्वस्थ मनाच्या बसवेश्वरांनी रम्य उष: काली प्रवेश केला. कुण्यातरी आश्रमवासीने गुरुंच्या बसण्याची जागा दाखवली. उच्चासनावर ईशान्यगुरु आपल्या आसनावर सिध्दासन घालून विराजमान झालेले होते. समोरच्या प्रांगणात शिष्य रांगेने बसलेले होते. डोक्यात लांब गाठ दिलेली शेंडी, हातात पळी पंचपात्र, मस्तकास, अंगास त्रिपुंड्र भस्म लावलेले. सर्वांनी शुभ्र स्वच्छ धोतर परिधान केलेले होते. बसवाने विनम्र होऊन गुरुंना वंदन केले. परिचय दिला. हेतू सांगितला, गुरुवर्यांनी त्याचा सस्मित स्विकार केला. अश्या पध्दतीने बसव आश्रमवासी झाला.

**बसवेश्वरांची (बसवाची) दिनक्रम/दिनचर्या :** आश्रमात शिस्तीला खुप महत्व होतो. आश्रमातील शिष्यांना प्रात: काळी उठवून शुचिर्भूत व्हावे लागे. विभूतीचे त्रिपुंड्र लेऊन बागेतील ताजी फुले, बिल्वपत्रे, तोडून संगमेश्वर शिवलिंगाला भक्तीभावपुर्वक अर्पण करावी, शिर्वाचना करावी, थोडा वेळ शिवध्यान करावे. नंतर बसवाची पावले व्यायाम शाळेकडे वळत. दंड, बैठका, सुर्यनकस्कार इत्यादी प्रकारांनी घाम गळेपर्यंत व्यायाम करी. नंतर शस्त्र शिक्षणाच्या दालनाकडे जावून शीरस्त्राणे, चिलखत घालूनतलवार, भालाफेक, खड्ग चालवणे, घोड्यावर घट्ट मांडटाकून रपेट मारणे अशा युध्दात उपयोगी सर्व शस्त्रांचा सराव करावा लागे. व्यायाम व शस्त्रास्त्रांचा सराव झाल्यावर आपल्या पुर्णकुटीत येऊन ध्यानात बसून जैन, बौध्द, वैदिक, शैव, शाक्त, चार्वाक यांनी केलेल्या विश्वासंबंधीच्या कल्याणाचा विचार एकांतात आढळून गुरुंनी सांगितलेल्या माहितीची उजळणी करी. सर्वसासान्यांचे भौतिक व धार्मिक जीवन कसे सुखी करता येईल? याविषयी काळी-काळ चिंतन करीत असे. दुपारचे जेवण सर्व

शिष्यांसमवेत होई. भोजनानंतर काही वेळ विश्रांती घ्यावी. नंतर ईशान्यगुरु विविध विषयावर सविस्तर बोलत. शिष्य अनाकलनीय मुद्द्यावर प्रतिप्रश्न विचारीत. वाद-संवाद होई. गुरु श्रेष्ठांनी सुचविलेल्या ग्रंथाचे शिष्य अध्ययन, मनन, चिंतन करीत, आवश्यक भागाचे पाठांतर करेपर्यंत सुर्यास्त जवळ येई अशी बसवाची कुडलसंगम येथील दिनचर्या होती.

**बसवेश्वरांनी (बसवा) व्रतबंध संस्कार नाकारले :** बसवाने व्रतबंध संस्कार नाकरल्याचा मानसिक धक्का मदिराजांना (वडील) एवढा बसला की त्यांचे रोजचे जेवण कमी-कमी होत गेले. खंगत जाऊन कृश होत गेले. अशाच दु:खद मन:स्थितीत त्यांनी या जगाचा निरोप घेतला. पतीच्या निधनाचा धक्का एवढा जबरदस्त होता की, पंधरा दिवसांनी मादलांबिका (आई) ही दु:खद निधन झाले. बागेवाडीहून अक्का नागलांबिकेने आणलेल्या ह्या दु:खद वार्तेने बसवाच्या मनावर खुपच परिणाम झाला. दु:खाच्या उमाळ्यांनी तोस्फुंदुन -स्फुंदुन रडू लागला. काही काळ गेल्यानंतर बसव अधिकच गंभिरपणे जीवनाचा विचार करु लागला. स्वत:च स्वत:चे सांत्वन करुन घेऊन आपले ध्येय गाठवण्याची अध्ययनाकडे मन बळवून लक्ष देऊ लागला.

**अध्ययन व स्वाध्याय :** कुडलसंगम विद्याश्रमाचे ईशान्य गुरु हे कोणत्याही धर्माचे किंवा विचार प्रणालीचे आग्रही प्रचारक नव्हते. ते शिष्यांना अस्तित्वात असलेल्या सर्वच धर्मपंथाविषयीची तटस्थपणे माहिती, शिक्षण देत. काही धर्मपंथाचे तात्विक विचार चांगले : परंतू प्रत्यक्ष अनुभव प्रचिती वाईट येते असेही शिष्यांच्या लक्षात येऊ लागले. ज्ञान साधनेच्या या काळात त्यांनी वेद, आगम ग्रंथ, षड्दर्शने, श्रृती-स्मृती पुराणे, ब्राम्हाण्यके, उपनिषपदे, रामायण - महाभारत, नायनार संताची भक्तीकाव्ये यांचा सखोल अभ्यास केला. शैवपंथाच्या अनेक शाखांचाही अभ्यास केला. पाशुपत, शैव, लाकुलिश शैव, कापालिक शैव, काळामुखी शैव, काश्मिरी शैव, आघोरपंथी शैव, तामिळ शैव, आराध्य पंथ, नायनार शैव, नाथशैव अशा शिवाला मानणा-या सर्व पंथांच्या तत्वांचा, आचारांचा आणि त्यांचा समाजाच्या अनेकानेक जातीतील लोकांना काय उपयोग होतो आहे याचा तौलनिक अभ्यास केला. समाजात फिरुन तुम्हाला या धर्माचे त्यांच्या अनुयायांच्या वागणुकीचाही प्रत्यक्ष अनुभव घ्यावयाचा आहे, असेही ईशान्यगुरु एक दिवस म्हणाले. आश्रमातील शिष्यांना विभिन्न विषय निरनिराळे गुरु शिकवित आणि त्याचा सराव करावयास लावीत. स्वत:तील काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे सहा विकार मानवाला अध:पतनाकडे नेणारे आहेत. म्हणून या षट् रिंपूवर नियंत्रण मिळविण्याचा सराव करवून घेत.

**धार्मीक समाजस्थितीचे दर्शन :** आश्रमाच्या धोरणानुसार वर्षातुन एकदा शिष्यांना सर्व धर्म पंथाची तीर्थ क्षेत्रे, यात्रास्थळे, कुंभमेळे, यज्ञस्थळे, तीर्थस्थळे, विभिन्न जातीची वसतीस्थळे, वाड्या इ. ठिकाणी नेल्या जाई. त्यातुन पुजा-यांचे विचार व समाजाच्या आवडी-निवडी कळत असत. अशा क्षेत्र भेटीतून पुढील अनुभव पाहावयास मिळाले. देव नवसाला पावतो असा प्रचार भोळ्या-भाबड्या श्रध्दाळू लोकात केल्यामुळे भक्त उदार मनाने सोने-चांदी, पैसे, गाईगुरे, शेतवाडी दान स्वरुपात देत. त्यामुळे पुजा-यांचा व मंदिरांचा फायदाच फायदा होई. धार्मिक, सामाजिक चित्र पाहिल्यावर बसवाच्या -हदय मनात किळस आणणा-या होत्या. बसवाने जशी धार्मिक स्थळे न्याहाळली तशी दक्षिणेतील मुळगुंद, अबलूर, गदग, विजयपुर, मुत्तगी, बळीगावे येथे विद्यादान करणा-या रोग्यांची शुश्रषा करणा-या, आयुर्वेदिक उपचार करणा-या, ललित कंलाचे शिक्षण देणा-या काळमुखी शैवांचेही मठ पाहिले. त्यामुळे या काळमुखी शैवांबद्दल आणि नायनार संतांच्या विशुध्द भक्ती विषयी बसवांच्या मनात अपार श्रध्दाभाव निर्माण झालेला होता.

वरील प्रमाणे बसवेश्वरांचे शिक्षण व धार्मिक समाजस्थितीचे दर्शन आपणास पहावयास मिळते.

**संदर्भ ग्रंथ :**

*बसवपुराण : डॉ. अमरनाथ सोलापूरे, महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी.*
*महात्मा बसवेश्वर : डॉ. अशोक मेनकुदळे, महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी.*
*बसवेश्वरांचा देव : रमजान दर्गा, महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी.*
*बसव दर्शन : अनु : जयदेवीताई लिगाडे, महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी.*

**धार्मिक विचाराचे योगदान - महात्मा बसवेश्वर**

**डॉ. डी. एन. माने**
*भुगोल विभाग प्रमुख, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर*

12 व्या शतकात कर्नाटक राज्यात अनेक धर्म व जातीचा उल्लेख आढळतो. त्यावेळचा समाज अंधश्रध्दा, रुढी, परंपरा, प्रस्थापिताचे वर्चस्व, कर्मकांड इ. मध्ये जखडलेला होता. या लोकांना त्यातून बाहेर काढण्याचे कार्य बसवेश्वरांनी केले. महात्मा बसवेश्वरांनी एक देव उपासना हे तत्व सांगून त्याचे परिशालन करुन वर्णाचार्या विरुध्द शिवाचार्याची स्थापना केली. मानवी जिवनासाठी धर्म व निती आवश्यक आहे. धर्म हे शरिर असून निती हे प्राण आहे हे तत्व त्यांनी धर्मिक बाबतीत स्पष्ट केलेले आहे.

बसवेश्वरांनी सामाजिक सुधारणे बरोबर धर्मिक कार्य केलेले आहे. त्याकाळात अंधश्रध्दा व अनिष्ट जातीभेद होते. तसेच धर्म आचरण हे काही विशिष्ट लोकांच्याच हाती असल्याने ते नष्ट करण्यासाठी बसवेश्वरांनी विरशैव लिंगायत नावाच्या धर्माचा प्रसार केला. या धर्मामध्ये त्यांनी त्या काळातील समाजाच्या वरिष्ठ वर्गापासुन कनिष्ठ वर्गापर्यंत सर्व स्त्री-पुरुषांना सहभागी होण्याची संधी उपलब्ध करुन दिली. परिणाम स्वरुप या धर्माच्या अनुयायामध्ये भरमसाठ वाढ झाली. आज देखील भारताच्या अनेक भागात विशेषत: कर्नाटक राज्यातील धर्म अनुयायी बहुसंख्येने आहेत. इतकेच नव्हे तर अनेक संघ संस्था, मठ ही आहेत. म्हणून बसवेश्वरांना केवळ समाज सुधारक व विचारवंत न म्हणता नवधर्म संस्थापक म्हटले जाते. त्यांनी स्थापन केलेल्या विरशैव लिंगायत धर्मात खालिल तत्वाचा उल्लेख आहे.

अष्टवरण तत्व म्हणजे आठ प्रकारच्या खुणा होय. व्यक्तीला दु:ख, कष्ट, मानसिक वेदना या सर्व वेदनातून व बंधनातून मुक्त करण्यासाठी ही तत्वे सांगितलेली आहेत. ती खालीलप्रमाणे आहेत.

**1) गुरु :** बसवेश्वरांनी अष्टवरणाचे पहिले तत्व म्हणजे गुरु होय, असे म्हटले आहे. गुरु हे शिष्याला मार्गदर्शन करणारे असतात. याची तीन प्रकार पुढील प्रमाणे होय.

I) दिक्षा गुरु
II) शिक्षा गुरु
III) मोक्षा गुरु

या व्दारे त्यांनी माणसाचे जीवनात गुरुचे महत्व स्पष्ट केले.

**2) लिंग :** बसवेश्वरांनी विरशैव लिंगाला देव स्वरुप मानून पुजा-अर्चा करण्यास सांगितलेले आहे. देवाचे प्रतिक या नात्याने या लिंगाना ते महत्व देतात. लिंगाचे तीन प्रकार पडतात ते पुढीलप्रमाणे

I) स्थावर लिंग
II) समाधी लिंग
III) इष्ट लिंग

**3) जंगम :** जंगम म्हणजे धर्म प्रसारक. हा जंगम भक्ताच्या सुख-दु:खात संकटात सहभागी होवून धर्मज्ञान देत असतो. या व्दारा तो मानव जाती बद्दल माया, प्रेम रुजविण्याचे कार्य करतो.

**4) भस्म :** भस्माला विभूती म्हणतात. भक्ताने विभूती लावावेत त्यामुळे शत्रुचा नायनाट होतो.

**5) रुद्राक्ष :** ब्रम्ह, विष्णु, महेश यांचे निवासस्थान असलेले शिवचिन्ह म्हणजे रुद्राक्ष होय. प्रत्येकाने एकमुखी रुद्राक्षाची माळ घालावी.

**6) पादोदक :** गुरु लिंग जंगम याच्या पायावर अभिषेक करुन ते पवित्र पाणी ग्रहण करणे म्हणजे पादोदक होय.

**7) प्रसाद :** इश्वराला अर्पण केलेल्या पदार्थाला प्रसाद म्हणतात.

**8) मंत्र :** ओम नम: शिवाय या शब्दाचा उच्चार म्हणजे मंत्र होय.

वरील चिंतनातून त्यांनी त्या काळातील सामाजिक भिन्नता नष्ट करुन समता प्राप्त करण्यास तसेच इश्वराच्या दृष्टीने कुणीही उच्चनिच नसुन सर्व शिवरुपी आहेत, हे समानतेचे तत्व रुजविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

**पंचाचाराचे तत्व:** पाच प्रकारच्या आचरास पंचाचार असे म्हणतात. एका व्यक्तीने दुस-या व्यक्तीबरोबर वागण्याच्या नियमांना पंचाचार म्हटले आहे. यामध्ये खालिल आचरणाचा समावेश होतो.

1) लिंगाचार 2) सदाचार

3) शिवाचार 4) भ्रत्याचार 5) गणाचार

वरील पंचाचाराच्या तत्वातून त्यांनी देव उपासना, प्रामाणिकपणा, समताभाव, ह्या मनोभावना, स्वाभिमान तसेच त्याग मनोभावना आदी गुणांचा समाजामध्ये धार्मिक मार्गाने प्रसार केल्याचे दिसून येते.

बसवेश्वरांनी धर्मातील एकेश्वर वादाचा प्रेरणा देवून आचार हाच धर्माचा मूळ पाया आहे हे स्पष्ट होते.

**संदर्भ :**

*बसवदर्शन - डॉ. अमर सोलापुरे.*
*मराठवाडा वीरशैव विशेषांक - उद्यमशील विरशैव लिंगायत विशेषांक.*
*युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर - प्रा. पाटील प्रा., करनकर.*

## समतावादी विचारक बसवण्णा और सामाजिक सरोकार

**प्रा. डॉ. एकलारे चंद्रकांत नरसप्पा**

*हिंदी विभाग, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय , मुखेड, त.मुखेड जि.नांदेड*

मनुष्य का जन्म जिस परिवार और समाज में होता है , उस समाज के प्रति प्रतिबद्धता को दर्शाते हुए अपनी सामाजिकता सिद्ध करने के लिए आजीवन संघर्ष करनेवाले ही समाज में वास्तविक रुप से सामाजिक सरोकार निर्माण करते है । 12 वीं शताब्दी का इतिहास अध्ययन करने से ऐसा प्रतीत होता है की , मनुष्य - मनुष्य के भीतर आपसी खून के प्यासे से लोग बन गये थे । जाति , धर्म , रूढी , प्रथा , परंपरा का भेद चरमसीमा पर पहुँ ंचा था । व्यक्तिगत स्वार्थ के लिए मनुष्य किसी भी हद तक जाने लगा था जो हमें उदाहरण मिलते है । अमीर - गरीबों मे दरार निर्माण हुई थी । राजा अपने नियमों का उपयोग स्वयं हित का सोचकर निर्णय लेता था । अमीर – अमीर बन रहा था और गरीब मनुष्य अपने स्तर से नीचे जा रहा था । ऐसे ही युग में एक क्रांतीसूर्य , युगप्रवर्तक ,विश्वविभूति ,समतावादी विचारक , मानवतावादी , जगतज्योति बसवण्णा का जन्म हुआ है।

बसवण्णा का काल अत्याधिक संकटमय काल रहा है । ऐसे समय लोगों को चैन की सांँस लेना भी असम्भव था । लाखों लोग अपने जीवन को कोसने का कार्य करते थे । ऐसे ही युग में बसवण्णा का उदय होना भारतीय इतिहास और जनमानस के लिए प्रेरणादायी , आधारस्तंभ के समान रहा है । बसवण्णा की कुछ विशेषताएँ इस प्रकार है - ज्ञानयोगी , कर्मयोगी , तपस्वी , युगपुरुष , विश्वविभूति , राजयोगी , कायकयोगी , कुंडलिनीयोगी , शिवयोगी , अनुभावी , मोक्षदायक , समाज सुधारक , नीतिवादी , परमविरक्ति , संसारयोगी , लोकसंग्राहक , समाज सेवक , नवसमाज निर्माता , अनुभवमंडप संस्था निर्माता , प्रासादिक , परिसमय , अलौकिक साक्षात्कारी , लोक संग्राहक , साहित्यप्रेमी , सार्वभौम राज्य निर्माता , अहिंसावादी , लोक संसारी , शरण प्रेमी , मानसशास्त्रज्ञ , कुशल संघटक , वैद्यराज , अर्थशास्त्रज्ञ , लिपीतज्ञ , गणितज्ञ , मुत्सद्दी राजनीतिज्ञ , पतितोध्दारक , स्त्री-उद्धारक , दलितोद्धारक , क्रांतिपुरुष , समतावादी , एकदेवोपासक , विश्वकुटुम्बकम् पुरस्कर्ता , जातिभेद के विद्रोही , स्त्री - पुरुष समानता के अधिकारी आदि अलौकिक सद्गुणों की पूँजी बसवण्णा के व्यक्तिमत्व की झलक वचन साहित्य के अध्ययन से परिलक्षित होती है । जो इस वचन साहित्य के अध्ययन से अनगिनत अवधारणाएँ पाठक अनुसंधान कर सकते है ।

बसवण्णा अपने विचारों को वचनों के माध्यम से मूर्त रूप प्रदान करते थे । जिनके वचनों को हम "कुडलसंगमदेव " इस चिन्हांकित भाव से पहचान सकते है । कन्नड भाषा को शिरोधार्य मानकर असीम श्रद्धाभाव से वचन भण्डार समृद्ध करनेवाले बसवण्णा विश्व के सर्वप्रथम शिक्षाप्रेमी एवं साहित्य संयोजक रहे है । जिन्होंने अपने आस पास के गाँव की भाषा को ग्लोबल की दिशा में विचार करने के लिए बाध्य किया है। बसवण्णा के समकालीन अनेक शरण शरणियों ने अपने वचनों के माध्यम से अतुलनीय योगदान देने का महनीय कार्य किये है । जिनमें हडपद अप्पण्णा , अक्का नागम्मा , गंगांबिका , निलांबिका , अल्लमप्रभू , सुळे संगव्वा , आयदक्की लकम्मा , अक्का महादेवी , मोरगी मारय्या , हरळय्या , चन्नबसवण्णा , सिध्दरामेश्वर , चन्नय्या , मधुवय्या , मडिवाळ माचीदेव , सोड्डुल बाचरस , आयदक्की मारय्या , उरलिंग पेद्दी , जेडर दासिमय्या , नुलिय चंदय्या , ककय्या , शिवप्रिया , रायम्मा , धर्मेश्वरलिंग , संगण्णा , सत्यवती , चौडय्या ,.रामण्णा , अमुगीदेव , सोमव्वा , काळव्वा , बोंतादेवी , लिंगम्मा , मोळीगे महादेवी , मसणम्मा , रेमम्मा , केतलदेवी , कामण्णा , चिक्कण्णा , अमुगे रायम्मा , काडसिध्देश्वर , धुळय्या , गोरक्ष , दासरय्या आदि अनेक शरणों का योगदान और समर्पण अवर्णनीय रहा है । जो इन सभी के वचनों में उत्कट भाव - भावनाएँ देखने को मिलते है । वास्तव में इन शरण - शरणियों का कार्य अमृततुल्य रहा है । अपने अंतर्गर्भ में उठनेवाले उत्कट भाव भावनाओं को वाणी प्रदान किये है । बसवण्णा कल्याण राज्य का प्रधानमंत्री पद

त्यागकर कुडलसंगम चले जाने के उपरान्त इस वचन साहित्य को पाखण्डियों द्वारा लुटकर क्षति पहुँचाकर जलाया गया । ऐसे समय प्राणों से प्रिय वचनों की रक्षा के लिए नागाम्बिका , गंगांबिका और अन्य शरणों की सहाय्यता से वचनों को सुरक्षित स्थलों पर लेकर जाते समय अनेक लोग वीरगति को प्राप्त हुए है । हम आज जिन वचनों को आधार बनाते है यह शेष वचन उन वीरों का शौर्य या साहस का प्रतिफल है।

भारतीय समाज व्यवस्था में जाति ,धर्म , पंथ को अधिक महत्त्व दिया गया था। जिसके कारण समाज में जातिव्यवस्था , धार्मिक विद्वेष , अनेक पंथों में भेदभाव निर्माण हुआ था। समाज मे फैले गलत विचारधारा को नष्ट करने के लिए बसवण्णा ने परिवर्तन की लहर दौडाई है । सारे समुदाय के दिलों में आपसी स्नेह , प्रेम और विश्वास निर्माण करने का कार्य किया है । उस युग में देह की अपेक्षा देवालय को अधिक महत्त्व प्राप्त हुआ था । लोग मंदिरों में बसे ईश्वर की पूजा करने के लिए अपना किमती समय गँवा रहे थे । इस समय शूद्र , दलित , पीडित और नारियों को मंदिरों में प्रवेश नकारा गया था । ऐसे सयम जनसमुदाय अपना जीवन व्यर्थ की श्रेणी में मानने लगे थे । इन लोगों की निराशा को आशा में परिवर्तित करने के लिए बसवण्णा ने " ईष्टलिंग " पुजा का सुअवसर प्रदान किया है ।

" इष्टलिंग " पूजा करनेवाला हर कोई व्यक्ति मन से पवित्र और आचार - विचारों सें अधिक सात्विक बनकर कार्य करता है । जिस मंदिर में बसे ईश्वर के दर्शन पाने के लिए तरसनेवाले जिवों को उन्हीं के करतल पर ' ईष्टलिंग ' देकर मनोकामना पूरी करनेवाले बसवण्णा रहे है । मात्र वास्तव में ' इष्टलिंग ' ईश्वर का प्रतिरूप न होकर समग्र विश्व का प्रतिरूप है। जिसे सदैव शरण अपने शरीर पर धारण करके स्वयं के जीवन को धन्यता की श्रेणी में मानने लगा था । पाखंडी ब्राम्हणवादी व्यवस्था को स्वयं का स्वार्थ साध्य करने के सभी मार्ग बंद हुए थे । शरण - शरणी निस्सीम भक्तिभाव से इष्टलिंग को आयात करके स्वयं ' लिंगायत ' बन गये थे । पूर्वाश्रम के सभी जाति , धर्म को भूलकर अंतःप्रेरणा से लिंगायत बन गये थे । ' इष्टलिंग ' की पूजा लोगों के जीवन का अहम् हिस्सा बन गया था ।

बसवण्णा अपने वचनों में देह ही देवालय की संकल्पना का भाव समृद्ध करने का कार्य किया है। देवालय के निर्माण से पंडितों के शोषण का मार्ग खुला हो जाता है । लेकिन देह ही देवालय बनाने से मनुष्य का मन और शरीर दोनों की शुद्धी हो सकती है। मन और शरीर के शुद्धता से अंधश्रद्धा और कर्मकांड को शुद्ध आचरण के द्वारा रोक लगाया जा सकता है । शरण अपने वचनों में कहते है कि , अमीर मनुष्य ही देवालय का निर्माण कर सकता है और मै पामर देवालय कैसे बाँध सकता हूँ ? मेरे पास तो धन और साधनों का अभाव है । मै बसवण्णा का शरण हूँ , मेरे दो पैर ही इस देह देवालय के खंबे है और मेरा मस्तिष्क ही इस मंदिर का कलश मात्र है। शरणों के पास इतना पवित्र देवालय होने के उपरांत अन्य किसी देवालय में जाने की आवश्यकता क्या है ? अमिरों के मंदिरों को लूटने का डर सताता है । जनसामान्य के शरीर रुपी देवालय को कोई क्षति नहीं पहुँचा सकता । इस अनमोल तत्वज्ञान को बहुत ही सरल शब्दों में व्यक्त किया गया है ।

" धनवान बनाते है शिवालय ,
मै क्या बनवाऊँ , निर्धन!
टाँगे मेरी है खंबे , देह ही मंदिर ,
सिर मेरा है सुवर्ण - कलश ,
सुनो , हे कुडलसंगमदेव ,
स्थावर का होता विनाश ,
जंगम का न कोई नाश ! "

" कायक वै कैलास " का अर्थ अधिक सरल और अर्थपूर्ण भाव को बसवण्णा अपने वचनों में प्रकट करते है। मनुष्य के जन्म से लेकर अंतिम क्षण तक निरंतर कर्म करना अनिवार्य बताया गया है । कर्म के बिना मनुष्य का जीवन व्यर्थ है । कर्म करने से नवनिर्माण होने लगता है । कोई भी कर्म निस्सीम , निडर और मान-अपमान से परे

जाकर कार्य करने से स्वर्ग से भी सुंदर कलाकृति का निर्माण हो सकता है । श्रद्धा भाव के द्वारा कर्म करने से मनुष्य निकम्मेपन के प्रवृत्ति से कोसो दूर जा सकता है । व्यक्ती अपने कर्म से ही स्वर्ग और नरक का निर्माण कर सकता है । अपनी काया ( शरीर ) से मेहनत करके जो आनंद की प्राप्ति होती है वह किसी पद , प्रतिष्ठा और धन से असंभव है । कायक करने से शोषण व्यवस्था समाप्त हो जाती है । कायक करने से व्यक्ति के कार्य करने से मन में बुराई का भाव निर्माण नहीं होता । कर्म से राजा और रंक दोनों एक समान होते है । मनुष्य का चरितार्थ करने के लिए छोटे से छोटा और बडे से बडा कार्य भी आनंद से करना यही ' कर्मसिद्धांत ' है । सभी शरण और शरणी किसी न किसी कार्य में रत रहते थे । जो भी कर्म करते थे उसमें तल्लीनता के साथ कैलास या स्वर्ग का निर्माण करते थे। जैसे की अच्छे कर्मों का परिणाम अच्छा ही फल देता है ।

शरण अपने अच्छे कर्मों से प्राप्त करनेवाला धन संचय जीवन व्यतीत करने के लिए जितना आवश्यक है उतना ही अपने पास रखता था । अधिक प्राप्त धन ' दासोह ' कर देता था । यह दासोह ' लिंगायत ' धर्म के प्रचार - प्रसार के लिए सहाय्यक होता है । अपेक्षा से अधिक धनसंचय करना व्यर्थ बताया है। लोकमंगल की मनोकामना शरणों के ' दासोह ' की पद्धति में थी। ' दासोह ' से कल्याण राज्य में आनेवाले लोगों के अवभगत के लिए सहाय्यभूत हो जाता था । सत्य , न्याय और यथा आवश्यक धन कमाना ही लोककल्याण की कामना करता है । अधिक धनसंचय मनुष्य के आलस्य को बढावा देता है । नित् कर्म के लिए जितना धन आवश्यक है उतना ही अपने पास रखकर अन्य धन ' दासोह ' कर देते थे ।

कल्याण में ' अनुभवमंडप ' नामक एक परमोच्च संस्था का निर्माण किया गया था । जो सभी लोगों के कल्याण और हित को ध्यान में रखकर निर्णय लिया जाता था। यहाँ पर आनेवाले कोई शरण और शरणी श्रेष्ठ - कनिष्ठ नहीं थे । सारे समान माने जाते थे । कुल 770 शरण - शरणी मिलकर अनुभवमंडप में विचार - विनिमय करते थे । जिनमें विशेष कर 70 शरणियाँ थी । जिस समय स्त्री को समता की अधिकारिणी न मानते हुए एक उपभोग का साधन माना जाता था , उस समय स्त्री को समता की अधिकारिणी और समाज विकास की हितकारिणी माना गया था । सामान्य स्त्री शिक्षा को त्याज्य माना गया था । उस युग में स्त्री शिक्षा के अवसर खुले करते हुए वचनों का लेखन करने का मार्गदर्शन दिया गया था । यहाँ स्त्री पुरुष के बराबर चर्चा में सम्मिलित हो जाती थी । दोनों के विचारमंथन के बाद अध्यक्ष अंतिम निष्कर्ष निकालकर सभी को आश्वस्थ कर देते थे । भारत या विश्व के इतिहास में सर्वप्रथम लोकतंत्र को अपनाकर संसद बनाया गया था । यहाँ पर लोगों के द्वारा लोगों के हित में निर्णय लिये जाते थे । दिनभर सुचारू , त्यागमय भावना से कर्म करकर लोग रात में अनुभवमंडप का हिस्सा बन जाते थे । इस अनुभवमंडप की एक विशेषता यह है कि , शूद्र जाति के समझे जानेवाले अल्लमप्रभू को अनुभवमंडप की अध्यक्षता के स्थान पर विराजमान किया गया था । जो विद्वत्ता , त्याग , समर्पण और सर्वसमावेशक तत्व के आधार पर सम्भव बना था। जिनकी अध्यक्षता में समता , स्वतंत्रता , बंधुत्व और न्याय को प्रधानता दी गयी थी ।

बसवण्णा अपने ज्ञान , तत्व और मिमांसा से प्रजाप्रभूत्व का राज्य निर्माण किये थे । इस राज्य में किसी व्यक्ति , संस्था की प्रमुखता नहीं थी । जनसामान्यों को प्रमुखता देकर सप्तरंगोंवाले इंद्रधनुष्य का राज्य बनाया था । लोगों के हित में लोगों द्वारा लिये जानेवाले निर्णय प्रजाप्रभूत्व है । प्रजा के हित में कार्य करना राजा का कर्तव्य है । राजा का नेतृत्व ही प्रजा का कल्याण करना है । जहांँ पर प्रजा स्वयं विशिष्ट विचारों से प्रेरित होकर आपसी स्नेह , प्रेम , ममत्व , दया , क्षमा , शांति , समता और अहिंसा के मार्ग पर चलती है , वहाँ पर राजा की भूमिका केवल कुटुम्बप्रमुख की होती है । इस राज्य में जिनेवाले सभी हर्ष , उल्लास और आनंद के साथ रहते थे । राजा अलग न होकर वह स्वयं को उस समाज एक अंश मानकर चलता था । यहीं प्रजाप्रभूत्व की धारणा रहीं है ।

मनुष्य को अपने सुचारू रूप से जीवन निर्वाह करने के लिए मानवता का भाव मन में रखना आवश्यक है। मानवतावाद से दया का भाव विकसित होने लगता है । सकल जीव और प्राणीमात्रांओं के प्रति हृदय में दया का भाव जागृत हो जाता है। जिससे किसी प्राणी को कष्ट का सामना नहीं करना पडता । बसवण्णा के बचपन का एक प्रसंग है। सारे बालक खेलते समय कोई एक बालक कुएँ में गिर गया था । उस समय बसवण्णा अपने प्राणों की

अपेक्षा न करते हुए उस बालक के प्राण बचाये थे । दूसरों के प्रति अपने मन में दया का भाव जागृत होने से ही ऐसा सत्कर्म हो सकता है । जिस कर्म से हमें गौरव के पात्र माना जाता है। मनुष्य और सभी जीवों पर दया और प्रेम से प्रेम की वर्षा होती है । बसवण्णा अपने घर में काम करनेवाले अनेक छोटे , बडे , शूद्र , निम्न जाति के लोगों को देखते थे । इन लोगों के साथ परिवारवालों का व्यवहार भेदभाव का था । ऐसे व्यवहार को देखने के बाद बसवण्णा के मन में कसमसाहट होने लगती थी । वे इन दीन - दलितों के लिए चिंतित थे । एक दिन घर के पीछवाडे में भीमण्णा नामक चमार जाति का व्यक्ति जूते बनाकर लाया था । उस व्यक्ति के हाथ से जूते लेने के बजाय उस पर गोमूत्र छिडककर घर के अंदर लिए गये थे । उस समय बसवण्णा अपने माँ से अपने मन के भितर उठनेवाले बवाल को शांत करना चाहते थे । मात्र उस समय उन्हें कहा जाता था कि , " आपको अभी कुछ समझ में नहीं आता बडे होने के बाद समझ में आ जायेगा । " इस अनुत्तरीत प्रश्न की तलाश में बसवण्णा रहते थे । मन की बेचैनी सदैव उत्तर की तलाश में रहती थी । लोगों के उद्धार के लिए परिवर्तन की दिशा में कार्य करते रहे है । पूर्वाश्रम का धर्म छोडकर लिंग को धारण करके ' लिंगायत ' बनने के अनेक उदाहरण पाये जाते है । बसवण्णा दीन , दलित , स्त्री उध्दार के लिए अंतिम साँस तक कार्य करते रहे है । ' लिंगायत ' बनने के बाद वह समता का अधिकारी बन जाता था । बसवण्णा के ज्ञान , योग , अष्टावरण , तपस्या , साधना , आचरण , नीति , नैतिकता , सप्तशील ,अनुभावी आदि तत्वज्ञान की ओर देश - विदेश के विभिन्न राज्यों के लोग , राजा आकृष्ठ हुए थे । जो अपना सर्वस्व त्यागकर या स्वेच्छा से कल्याण में आकर बसने लगे थे।

मनुष्य के जीवन में आनंदमय जीवन व्यतीत करने के लिए अंतरंग और बहिरंग शुध्दी अनिवार्य है । जिसे बसवण्णा अपने सप्तशील सिध्दांत एवं सप्तसूत्र के माध्यम से अपने वचनों में व्यक्त करते है । प्रथम चोरी न करें , दूसरा हत्या न करें , तिसरा मिथ्या न बोले , चौथा क्रोधित न बने , पाँचवा किसी का तिरस्कार न करें , छठा स्वयं की आत्मस्तुति न करें और सातवाँ किसी की निन्दा न करें । इन सप्तांग सिध्दांत के माध्यम से शरण - शरणियों ने जीवन को कृत - कृत बनाया है । इन सप्तसूत्रों का स्वीकार करके जीवन व्यतीत करने से मनुष्य का जीवन अंतरंग और बहिरंग दोनों दृष्टि से शुध्द हो जाता है ।

" कभी न करें चोरी और नकरें वध
झूठ न बोले कभी और न करें क्रोध
औरों से घिन मत कर
अपनी स्तुति कभी न कर
सम्मुख किसी की तौहीन न कर
अंतरंग की यहीं शुध्दी
बहिरंग की यहीं शुध्दी
कुडलसंगमदेव को मनवाने की यहीं विधि । "

बसवण्णा के इस एक वचन में 8 शास्त्रों का वर्णन मिलता है - चोरी का सम्बन्ध अर्थशास्त्र , हत्या का पाप धर्मशास्त्र , झूठ बोलने का कार्य नीतिशास्त्र , क्रोधीत होने का संबंध मानसशास्त्र , तिरस्कार करने का व्यवहार सामाजिक शास्त्र , आत्मस्तुति करने का दुराचार आचार शास्त्र , निंदा नालस्ति करना राजनीति शास्त्र और अंतरंग - बहिरंग शुद्धी अध्यात्मशास्त्र ।

निष्कर्ष रूप से बसवण्णा के समग्र वचनों का अध्ययन करने से उनका जीवन ही एक विश्वविद्यालय का ज्ञान भण्डार है । जिस ज्ञान का अध्ययन करनेवाले अनुसंधाता को अपनी आयु कम पड सकती है । जिनके तत्वज्ञान और दर्शनशास्त्र के प्रमुख बिंदू इस प्रकार है - गुरु , लिंग , जंगम की प्रधानता , इष्टलिंग पूजा , कायक वै कैलास , जाति , धर्म भेदभाव का विरोध , दलित उद्धारक , दयाभाव , स्त्री - पुरुष समानता , मानवतावाद , सामाजिक समता के पुरस्कर्ता , स्वर्ग - नरक की संकल्पना , देह ही देवालय , बहुदेवोपासना का विरोध , सप्तशील सिद्धांत , प्रजाप्रभुत्व

का तत्व , कर्मकांड का विरोध , अंधश्रद्धा निर्मूलन , पर्यावरण संवर्धन , नारी मुक्ती का आंदोलन , भारतीय संस्कृति और संस्कार का अनुपम संयोजन , अनुभवमंडप , धार्मिक आडम्बरों का खंडन , अहिंसावाद , अष्टावरण , दासोह पद्धति , आंतरजातिय विवाह के पुरस्कर्ता , पद , प्रतिष्ठा के निर्मोही व्यक्तिमत्व , निति - नैतिकता के पुजारी , वचन संहिता के भक्ति भंडारी आदि । बसवण्णा के वचन साहित्य का अवलोकन करने से ऐसे संजीवन बिंदूओं पर दृष्टि पडती है । समाज के क्षतिग्रस्त व्यवस्था को नवजीवन देकर उनका जीवन धन्य धन्य करनेवाले बसवण्णा जनसामान्य मनुष्य , संत से परे है । इस महामानव को शब्दों में व्यक्त करना कठीण है । ईश्वर की संकल्पना अनेक लोगों ने मनगढंत ढंग से रचने का प्रयास किया है। वास्तविकता के धरातल पर अ " बसवेश्वर " की अपेक्षा " बसवण्णा " शब्द का प्रयोग सच्चाई के रुप में प्रकट होता है । सही मायने में ' बसवण्णा ' शब्द को ईश्वर बताकर ' बसवेश्वर ' बनाया गया है । मात्र ' बसवण्णा ' कोई ईश्वर नहीं थे । सारांश रुप से यही कहा जा सकता है कि , जो मनुष्य सामान्य से असामान्य कुशलता के साथ करनेवाले कार्य से उस असीम छोर या बिंदू पर पहुँचता है । जो चंद्र - सूर्य के अनुकूल निरंतर सेवाभाव मन में रखकर मार्गक्रमण करने लगता है । बसवण्णा के कार्य की सिध्दता ' बहुजन हिताय बहुजन सुखाय ' के राजमार्ग पर चलनेवाली है । बसवण्णा संत , सुधारक , विचारक , ज्ञानी , योगी , तपस्वी , त्यागी , कार्यकुशल नेतृत्व आदि भूमिकाओं पाये जाते है ।

**संदर्भ :-**

*वचन - संपा.डॉ. एम.एम.कलबुर्गी*
*बसवमार्ग ( त्रैमासिक ) - संपा.डॉ. टी.जी.प्रभाशंकर ' प्रेमी ' ( अक्तु. दिसम्बर 2012 )*
*म.बसवेश्वर और डॉ. अंबेडकर - डॉ. दे.जवरेगौडा*
*वचन त्रिदल - संपा.शिवानंद*
*अस्मिता की खोज - हिंदी अनु. भालचंद्र जयशेट्टी*
*भारतीय साहित्य की मानवतावादी धाराएँ - डॉ. वृषाली मांद्रेकर*

# MAHATMA BASAWESHWARA AND SOCIAL EDUCATION

**Kolli. Balaraju**
*Vice- principal (Junior), M.J.P. College, Mukhed*

**Introduction:** Basaveshwara (Basavanna) was an Indian 12th-century statesman, philosopher, poet, activist, Lingayat saint in the Shiva-focussed Bhakti movement, seer and social reformer. His first principle guided all his thoughts and activities to complete unity and integrity of body, mind and soul. It is important to think logically or morally. The second principle is all social action should be governed by the same simple set of moral values. The main elements are selflessness, nonattachment, nonviolence and active service. His third conviction was that no society, state or any other institution has any worth or importance apart from its part in contributing to the growth of the individuals of which it is composed. Therefore, the wrong means corrupt the soul and no good can ever come out of them. He fought against social evils of his time such as caste system, discrimination and the ritual practices of Hinduism. His teachings and philosophy transcend all boundaries and address the universal and eternal to establish the welfare state to elevate the position of all persons of the society, irrespective of caste, creed, sex, region and religion. Therefore there is a need of social, moral ethical education for every human being in the society.

**Objectives**

1) Mahatma Basweshwara's Educational values and ideas for society
2) His contribution in the field of social education
3) To make ideal people for ideal society
4) Social education to promote Social, Moral and Ehical values among the people for divine bliss

**Mahatma Basaveshwar's Social Education**

God is one. He is real and unseen supernatural power. He rejected social discrimination, superstitions and rituals, but introduced Ishtalinga with an image of Shiv Linga to be a constant remembering of one's bhakti to Shiva. Living in the socity is a challenge to every one. The goal of life is to live happily in the community with other people. Everyone needs to be polite and should set an example of simple living and high thinking. All men have equal rights to participate in social and spiritual discussions to aquire social and spiritual knowledge for self-evolution and self-purification. It is needed in our society. Everyone should earn his living by work done with sweat, but also in the spirit of that work to God. Share the earnings by feeding Jangamas (poor). As the moral preacher, he advised all the people to live morally, ethically and purify their lives and get salvation. We should stop greed, lust and injustice to lead happy and peaceful life in the society.

**Conclusion:** Samskriti (Culture) is the way of life in our country. Sharana samskriti is the way of life Sharanas to live and attain divinity. Sharanas helps to lead simple life with culture and high thinkimg. Social education will help positive social attitude in new generation. A person who is not a moralist and who does not differentiate between right and wrong cannot rise to the essential level of a true person. The attainment of spiritual growth that has been described by Mahatma Basaweshwara as an essential part of education can be gained only through morality and ethics. Therefore we consider education as a means of attaining salvation and also as a support on the pathway to liberation and happy and comfortable life in the community. We cannot differentiate his preaching from spiritualism for highest attainment in life. Therefore his preaching inspires the community even after centuries.

**References**

*www.basavasamithi.org*
*Carl Olson (2007), The Many Colors of Hinduism: A Thematic-historical Introduction, Rutgers University Press*

# महात्मा बसवेश्वर: आद्य थोर समाजसुधारक

**प्रा.अनिल ह.गोडणारे**
*भौतिकशास्त्र विभाग, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड*
*मो.नं. 9421849319 / 9970677501*

**प्रस्तावना:-**

महात्मा बसवेश्वर हे लिंगायत धर्माचे संस्थापक असून कर्नाटक ही त्याची कर्मभूमी. त्यांनी धर्म, समाज, तत्त्वज्ञान, वाङ्मय, राजकारण इ. क्षेत्रांत केलेले कार्य क्रांतिकारक स्वरूपाचे आहे.धर्मप्रेषित,धर्मोधारक, समजोधारक तत्वज्ञ ,अर्थतज्ञ, मुत्सद्दीराजकारणी ,संत महाकवी, वचन साहित्य निर्मापक ,नवसमाज निर्मापक ,विश्वगुरु जगतज्योति, अशा बहुविध विशेषणातून सकारावे असे बसवेश्वर यांचे सागर स्वरुपी व्यक्तिमत्व होते. महात्मा बसवेश्वर मध्ययुगातील भारताच्या धार्मिक, सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक, राजकीय व सामाजिक जीवनातील ज्येष्ठ समाज परिवर्तनवादी युगपुरुष होते. समाजसुधारकांच्या यादीतही यांचे पहिले स्थान आहे. म्हणूनच त्यांना आद्य भारतीय समाजसुधारक, क्रांतीयोगी व युगपुरुष मानले जाते.

शालिवाहन शके बाराव्या शतकात कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्वर-बागेवाडी या गावात ११०५ साली प्रतिष्ठित वीरशैव कुटुंबात बसवेश्वरांचा जन्म झाला. काहींच्या मते तो इंगळेश्र्वर (जि. विजापूर) या गावी झाला असावा. त्यांच्या जन्मकाळाविषयी मतभेद असले, तरी सामान्यतः त्यांचा जन्म वैशाखातील अक्षय्य तृतीयेला झाल्याचे मानले जाते. त्यांचे वडील मणिराज ऊर्फ भादरस हे बागेवाडी आगाराचे भांडारप्रमुख होते. त्यांच्या पत्नी मादुलांबा (मादंबा) परम शिवभक्त होत्या. बसवेश्वरांच्या भावाचे नाव देवराज व बहिणीचे नाव नागम्मा होते. बसवेश्वर कर्मठ विधींना विरोध करत. त्यांनी वयाच्या आठव्या वर्षी मुंजीची तयारी झाल्यावर 'मला आधीच लिंगदीक्षा मिळाली आहे' असे म्हणून मुंज करून घ्यायचे नाकारले आणि घर सोडून ते कूडलसंगम (जि. विजापूर) येथे निघून गेले. कृष्णा व मलप्रभा या नद्यांच्या संगमावरील कुडलसंगम येथे मोठे अध्ययन केंद्र होते. तेथे बसवेश्वरांनी बारा वर्षे वास्तव्य केले. कूडलसंगम येथे त्यांनी वेगवेगळ्या भाषा, धर्म, तत्त्वज्ञान इत्यादींचा अभ्यास केला. त्यांचा विवाह त्यांच्या मामाच्या मुलीशी झाला. तेव्हा ते सोलापुरातील मंगळवेढा येथे आले. तेथे ते एकतीस वर्षे राहिले.

बसवेश्वरांनी बिज्जल राजाकडे कारकूनाच्या नोकरीपासून सुरूवात केली. पुढे त्यांची राजाचा कोषाधिकारी म्हणून निवड झाली. त्यावेळी मंगळवेढा परगणा बिज्जल राजांच्या अधिपत्याखाली होता. त्या राजवटीत मंगळवेढा ही राजधानी होती. बसवेश्वर हे वेदशास्त्रात, धनुर्विद्येत व इतर कलांत पारंगत असल्याने आणि ते हुशार व चाणाक्ष असल्याने राज्याचे प्रधान झाले. त्यांनी अनेक शिवमंदिरे बांधली. रेवणसिद्धेश्वराच्या प्राचीन मंदिराचा जीर्णोद्धार करून बारा ज्योतिर्लिंगांच्या बारा पिंडी एकाच शिवपिंडीवर स्थापन केल्या. पुढे, बसवेश्वरांनी मंगळवेढ्यातूनच लिंगायत धर्माची स्थापना केली व ते धर्मप्रसारासाठी श्रवणबेळगोळा, बसवकल्याण इत्यादी कर्नाटकातील प्रदेशांत आले. तेथे त्यांचा लिंगायात धर्म बऱ्यापैकी रुजला. लिंगायत लोक बसवेश्र्वरांना शिववाहन नंदीचा (काही वेळा स्वतः शिवाचाही) अवतार मानतात. बसव (सं. वृषभ = बैल) या नावावरून ते सूचित होते.

बसवेश्र्वरांचा उदय होण्यापूर्वी कर्नाटकात हिंदू, जैन, बैद्ध इ. धर्म व कापालिक, कालामुख, शाक्त इ. पंथ प्रचलित होते. परंतु ही संयुक्त धर्मपरंपरा भ्रष्ट व अवनत अवस्थेतच होती. त्या पार्श्र्वभूमीवर बसवेश्र्वरांनी शिव हा एकमेव ईश्र्वर असल्याची घोषणा करून शिवोपासनेचा पुरस्कार केला. त्यांच्या उत्कट शिवभक्तीमुळे त्यांना भक्तिभांडारी असे नाव प्राप्त झाले. ते कूडलसंगम येथील संगमेश्र्वराचे निष्ठावंत भक्त होते. त्यांनी ज्ञान, भक्ती व कर्म यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. 'ॐ नमः शिवाय' हा षडक्षरी मंत्र त्यांना अत्यंत प्रिय होता. त्यांनी दया,

अहिंसा, सत्य, सदाचार, नीती, शील इत्यादींचा प्रचार केला. एकाच देवाची भक्ती करा, भूतदया बाळगा, प्रेमाने वागा, परोपकार करा अशी त्यांची शिकवण होती.

इ.स.1152 मध्ये बसवेश्र्वरांनी कल्याण येथील 'महामने' वाड्याजवळ निर्माण केलेली 'शिवानुभवमंटप' म्हणजेच 'अनुभवमंटप' ही संस्था जागतिक धर्मेतिहासातील अनन्यसाधारण संस्था होय.यात 700 पुरुष व 70 स्त्रीया असे एकूण 770 सदस्य होते वेगवेगळ्या जातींतील व व्यवसायांतील भक्त म्हणजेच शिवशरण तेथे एकत्र जमत आणि विविध विषयांवर चर्चा करीत असत.या मध्ये सामाजिक आर्थिक अध्यात्मिक आणि आत्मानुभवासंबधी चर्चा होत असे. चर्चेनंतर सदस्य विविध प्रश्नासबधी विचारांना व वचनाना मान्यता देत. त्यानंतर विचार अंतिम समिती साठी मंटपाचे सचिव चन्नबसवेश्वराकडे पाठविले जात त्यांनी त्याला मान्यता दिली की त्यावर शिकमोर्तब होई. अनूभव मंटपातील 770 सदस्या पैकीं 250 सदस्यांनी अंदाजे 1600 कोटी वचने लिहिलेली अशी नोंद आहे

बसवेश्र्वरांनी धर्मप्रसारासाठी संन्यास घेतला नाही, भाष्ये लिहिली नाहीत वा प्रवासही केला नाही; परंतु मंटपातील चर्चेच्या माध्यमातून त्यांनी लोकांमध्ये जागृती केली. तेथे परिसंवादाच्या स्वरूपाची जी चर्चा होत असे, तीच कन्नड साहित्यामध्ये वचनसाहित्याच्या रूपाने प्रसिद्ध झाली. बसवेश्र्वरांनी तेथे होणाऱ्या चर्चेच्या माध्यमातून वेगवेगळ्या जातिजमातींच्या लोकांमध्ये बंधुभाव आणि विचार-स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माण केली.
बसवेश्र्वरांना पारंपारिक भारतीय समाजातील वर्णजातिमूलक उच्चनीचता व विषमता यांची प्रखर जाणीव झाली होती. म्हणूनच त्यांनी चातुर्वर्ण्याला आव्हान देऊन सर्व मानवांना समान मानले. परिणामतः त्यांच्याभोवती सर्व वर्णातील व जातींतील अनुयायी जमा झाले. त्यांनी आंतरजातीय रोटीव्यवहार व बेटीव्यवहार करण्यास प्रोत्साहन दिले. म.बसवेश्वर यांच्या पुढाकाराने12 व्या शतकात मागास जातीतील संत हरळया यांचा मुलगा शिलवंत मधुररस ब्राम्हण मंत्र्यांची मुलगी कलावती यांच्यात आंतरजातीय विवाह घडवून आणला
त्यांनी मधुवय्या यांच्या मुलीचे हरळय्या त्यांनी शिवनागमय्या व ढोर कक्कय्य या अस्पृश्यांच्या घरी जाऊन भोजन केले होते. त्यांनी बालविवाहाला विरोध केला. तसेच विधवांच्या पुनर्विवाहाला मान्यता दिली. सर्व मानव समान आहेत, याचा अर्थ स्त्री व पुरूष हेही समान आहेत, असे त्यांचे मत होते.

बसवेश्वरांनी स्त्रियांना लिंग दीक्षेचा पुरुषाप्रमाणेच अधिकार दिला. त्यामुळे स्त्रियांना धार्मीक स्वातंत्र्य बहाल झाले. त्यांच्या अनुभवमंटपातील चर्चेत पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियाही भाग घेत. बाराव्या शतकात बसवेश्र्वरांनी सुरू केलेले हे कार्य निश्र्चित क्रांतिकारक होते.बसवेश्वरांच्या काळात समाजव्यवस्थेत स्त्रीला शुद्र समजले जात असे. तिला मोक्ष नाही, असा समज होता. यावर बसवेश्वरांनी विडंबन केले. स्त्रीवर अन्याय होत होता, हे ओळखून त्यांनी स्त्रीला शिक्षित केले, चालते-बोलते केले. मत स्वातंत्र्याचा अधिकार दिला. आध्यात्मिक उपासनेची परवानगी दिली. बसवेश्वरांच्या कार्यामुळे प्रेरित होऊन नंतर अक्का महादेवी. राणी महादेवी, मुक्तायका, नागलंबिका आदी अनेक स्त्री संत नावारूपाला आल्या. अबला ही सबला होऊ शकते, हे बसवेश्वरांनी जगाला दाखवून दिले

महात्मा बसवेश्वर यांनी समाजातील गरिबी, विषमता दूर करून आर्थिक समृद्धता निर्माण करण्यासाठी त्यांनी समाजाला ''कायक वे कैलास'' आणि ''दासोह'' अश्या दोन क्रांतिकारक संकल्पना दिल्या. मनापासून केलेले प्रत्येक काम हीच खरी शिव उपासना हे त्यांच्या कायक वे कैलास सिद्धांताचे सार होय. शारीरिक श्रम वा व्यवसाय हाच स्वर्ग (कैलास) आहे.(Work is worship)
कोणत्याही प्रकारचे शारीरिक श्रम हे हीन दर्जाचे नाहीत, असे सांगून त्यांनी श्रमप्रतिष्ठा वाढविली. कायक हे केवळ पैशासाठी सांगितलेले नाही. तसेच ते कर्मसिद्धांतावर आधारलेले नसून त्यात व्यक्तीला व्यवसायस्वातंत्र्य देण्यात आलेले आहे. कायक हा सर्व तत्वज्ञानाचा पाया आहे . कायकाविना तत्वज्ञान ,धर्म ,समाजधारणा, समाजस्वास्थ , संस्कृती इ. सर्व गोष्टी अपुऱ्या ठरतात.कोणतेही काम, क्रीया, कर्म, आचरण कायक ठरू शकत नाही . ते काम सत्य व शुध्द असले पाहिजे. सत्य म्हणजे खरे,प्रामाणिक, मनापासूनचे,खोटे किँवा नकली नसलेले, अस्सल, भेसळ

नसलेले,चोख, बावनकशी, स्वाभाविक, सहज, अकृत्रिम, अव्याज इत्यादी स्वरुपाचे काम तसेच शुद्ध म्हणजे ह्रुदय शुध्द असलेले, शुध्द मनाने केलेले, मनी किंतु न बाळगता केलेले काम.कायकाचे हे सामान्य स्वरूप झाले ते एक तत्व असून तत्वज्ञानात व धर्मात महत्वाची कामगिरी बजावतो

श्रमप्रतिष्ठेबरोबरच गरजेनुसार संपत्तीची विभागणी करावी, ही विचारसरणी (दासोह ) मांडल्यामुळे बसवेश्र्वरांची वृत्ती समाजवादी, समतावादी होती, असे दिसून येते. दासोह सिद्धांतात आपण कमावलेले धन केवळ स्वतः पूरते न वापरता त्याचा समाजासाठी उपयोग करण्याची संकल्पना त्यांनी मांडली. दासोह म्हणजे मी समाजाचा दास सेवक आहे. दासोह म्हणजे दान नव्हे दासोह कर्त्यांचे हात वर नव्हे खाली असतात. गरजेपेक्षा ज्यास्त ते माझे न्हवे; ते समाजाचे आहे ही वृती म्हणजेच दासोह होय.'जगा अन जगु द्या' हा संदेश त्या संकल्पनेत आहे.स्वतःच्या कष्टावर माणूस अपल्या व आपल्या कुटुंबाच्या गरजा भागवू शकतो . तो लोभी बनला तर इतरांना सुखाने जगु देणार नाही. लोभातून स्वार्थ वाढतो . स्वार्थाला सीमा नसते.आपल्या बरोबर इतरांचा विचार करायला माणसाने शिकले पाहिजे. निसर्ग सगळ्याच्या गरजा भागवू शकतो. लोभी माणसाच्या अमर्याद गरजा मात्र तो भागवू शकत नाही. लोभ आणि गरज यात फरक केला पाहिजे. लोभातून सामाजिक संतुलन ढळते. समाजस्वास्थ्य बिघडते. माणसाच्या अति लोभातून च पर्यावरणाचा जागतिक प्रश्न निर्माण झाला आहे. सामाजिक संतुलन हे समतेचा अंगीकार केल्याशिवाय निर्माण करता येत नाही म.बसवेश्वरच्या दासोह या संकल्पनेत संतुलित समाजाचा आशय आहे. त्यांना दासोही समाज हवा होता.दासोही समाज म्हणजे समाजवादी समाज.

बसवेश्वर हे एकेश्वरवादी होते.अवतारवाद त्यांना मान्य नव्हते.इश्वर हा दगडात वा देवळांत शोधण्याची आवश्यकता नाही. तो प्रत्येक व्यक्ती मध्ये दडलेला आहे. प्रत्येकाचे शरीर हेच मंदिर आणि हृदय हेच शिवालय आहे.तळहातावर इष्टलींग ठेवून प्रार्थना व ध्यानधारणा करावी. 16 व्या शतकातील संत तुकाराम यांनी आपल्या अभंगाद्वारें व्यक्त केला आहे

"शेंदुर लावी दगड गोटे I म्हणती आमुचें देव मोठे मोठे I"

यातून स्पष्ट होते की तुकाराम महाराजांना सुध्दा मुर्ती पूजा मान्य नव्हती हाच विचार राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या गीतातुन प्रगट होतो

"लाखेचा देव त्याला अग्निचा भेव,
सोन्याचा देव त्याला चोराचा भेव,
देव अशाने भेटायचा नाही रे,
देव बाजारचा भाजीपाला नाही रे".

महात्मा बसवेश्वर हे नाव आणि त्यांच्या विचारातून निर्माण झालेला लिंगायत समाज हे काही आज जन्माला आलेलं नाही हा बाराव्या शतकां पासून चालत आलेला इतिहास आहे. मात्र ज्या कारणा साठी आणि जी मनीषा मणात ठेवून बसवेश्वरांनी हि खटाटोप केली होती, आणि हा सर्व उपद्याप करण्यासाठी जी काही टीका सहन केली होती तो विचारच आज इतिहास जमा होऊ लागल्याच चित्र दिसतंय. महात्मा बसवेश्वरांनी ज्या विचारांवर लिंगायत समाज स्थापन केला तो म्हणजे "माणूस हा त्याच्या जन्माने नव्हे तर समाजात केलेल्या कर्माने मोठा होत असतो" हा विचार त्यांनी आणि त्यांच्या अनुयायांनी मनाशी घट्ट धरून जात पात गाडत, धर्माच्या भिंती पाडून लिंगायत समाजाची मुहूर्तमेढी रोवली. लिंगायत धर्मात कुठल्याही जातीच्या, व धर्माच्या लोकास येण्यास बंधनं ठेवली नाहीत, जातीपातीची बेडी तोडून गळ्यामध्ये ईष्टलिंग धारण करा आणि माणुसकीचा अर्थ सांगणारा लिंगायत शिव शरण म्हणून वावरा. असा हा सर्वधर्म समभाव सांगणारा सामाज त्या काळात लोकांना रुचणारा नव्हताच.

महात्मा बसवेश्वरांना ह्या साठी बरीच टीका आणि कष्ट सहन करावे लागलेत.लिंगायत समाज आणि ह्या समाजाचे ग्रंथ, विचार मिटवून टाकण्या साठी त्या काळात धर्म रक्षक म्हणून घेणार्यांनी तलवारीचा हि वापर केला. पण हा समाज, ह्या समाजाचा पाया असलेले ह्याचे ग्रंथ आणि विचार, साहित्य सामुग्री वाचवण्यासाठी महात्मा

बसवेश्वरांच्या अनुयायांनासुद्धा तलवारीचे उत्तर तलवारीने देत ह्या समाज उपयोगी ग्रंथांच रक्षण करण्या साठी वेळप्रसंगी प्राणाची आहुती देखील द्यावी लागली.

महात्मा बसवेश्वरांनी त्यांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी अनेक ठिकाणी अनुभवमंटप स्थापन केले. तेथे योग्य व्यक्तींची नियुक्ती केली. काश्मीरपासून केरळपर्यंतच्या, राजापासून रंकापर्यंतच्या आणि ब्राह्मणापासून अस्पृश्यापर्यतच्या अनुयायांचे गर्दी च त्यांच्याभोवती जमले होते. यावरून त्यांच्या समर्थ संघटनशक्तीची कल्पना येऊ शकते. शारीरिक श्रम वा व्यवसाय हाच स्वर्ग (कैलास) आहे, अशी घोषणा करणारा'कायकवकैलास'बसवेश्र्वरांनी मांडलेला महान सिद्धांत आहे.कोणत्याही प्रकारचे शारीरिक श्रम हे हीन दर्जाचे नाहीत, असे सांगून त्यांनी श्रमप्रतिष्ठा वाढवली.महात्मा बसवेश्वरांचा लिंगायत धर्म प्रामुख्याने दलित संवेदनेवर आणि मानव जातीच्या तत्वावर आधारलेला आहे.

आजही या धर्मात विविध जातींचा समावेश आहे. समता हे तत्व त्यांच्या धर्म प्रसाराचे प्रमुख सूत्र आहे. बसवेश्वरांनी हा बंधुभाव धर्मात कायम ठेवला. 'आपण जे कमवतो त्यात ईश्वरांचा वाटा आहे. म्हणून त्यातील दीन दु:खीच्या जीवन कल्याणासाठी दानधर्म केला पाहिजे.' यावर त्यांनी भर दिला होता. त्यांनी जन्माने ब्राम्हणत्व नाकारुन त्यांनी लिंगायत धर्माला नवसंजिवनी प्रदान केली. त्यांना त्यांचे जीवितकार्य पूर्ण झाले असल्याची भावना निर्माण झाल्यावर, ज्या कुंडलसंगमामुळे आपण ईश्वरी इच्छाशक्तीचे साधन बनलो त्या कुंडलसंगमाकडे गेले पाहिजे, असे त्यांना वाटले. इ.स. 1167 मध्ये वयाच्या 62 व्या वर्षी ते संगमेश्वराशी एकरुप झाले. कर्नाटक सरकारने कृष्णा आणि मलप्रभा नदीच्या संगमावर बसवेश्वरांचे समाधीस्थळ उभारले आहे.

भारताच्या सामाजिक इतिहासातील हा उल्कापात होता, वीज कडाडून चमकली व एका निमिषात जगाचे डोळे दिपवून धारतीच्या पोटात शिरली उष:काल होणार होता,पण पुन्हा येथे काळरात्र पसरली.भारताच्या इतिहासात असे अनेकदा घडले आहे परिवर्तनाच्या लाटा अनेकदा उठल्या व विरून गेल्या,आणि म्हणून आमची नाव होती तिथेच राहिली.

**संदर्भ:-**

*प्रा. करडीगुद्दी आर.एम.( अनुवादक मराठी) वचन सिध्दांत सार- महाराष्ट्र बसव परिषद,*
*हिरेमठ संस्थान भालकी जि.बिदर प्रथम आवृत्ती १५जानेवारी,२०१६.*
*डॉ.सोमनाथ रोडे- सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा बसवेश्वर अश्विनी प्रकाशन, लातूर*
*प्रथमावृती अक्षय्य तृतीया दि.२७ एप्रिल,२००९*
*डॉ.श्रीदेवी शंकराप्पा कडगे- महात्मा बसवेश्वर व्यक्ती आणि वाड़.मय इसाप प्रकाशन,*
*नांदेड प्रथमावृती २८मार्च,२०१७.*
*सुभाष किशनराव देशपांडे- महात्मा बसवेश्वर कार्य आणि कर्तृत्व- जनशक्ती वाचक चळवळ*
*औरंगाबाद प्रथमावृती २१मार्च,२०१५.*
*डॉ. सचितानंद बिचेवार, परिवर्तनाचा महामेरू महात्मा बसवेश्वर, स्वाती प्रकाशन, पूर्णा- 2015*
*डॉ. शरदचंद्र देगलूरकर, संत साहित्याचा सामाजिक अन्वयार्थ,देगलूर-2004.*
*प्राचार्य शिवाजीराव भोसले, हितगोष्टी, अक्षरब्रह्म प्रकाशन, पुणे- 2004*

# महात्मा बसवेश्वर यांचे स्त्रीविषयक योगदान

**प्रा. डॉ. दंदे एस. बी.**
*इतिहास विभाग प्रमुख, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर. मो. ९३७०१५४२६०*
*ई- मेल : dandesadashiv@gmail.com*

पृथ्वीवर असे काही महामानव आपल्या योगदानाद्वारे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक आणि नैतिक कार्याची छाप त्या राज्यावर (देशावर), समाजावर न भुतो न भविष्यती अशी निर्माण करतात. म.गौतम बुद्धांनी बौध्द धर्माद्वारे, जैन धर्मने आपल्या तिर्थकारांद्वारे आणि समतासुर्य, जगत् ज्योती म.बसवेश्वरांनी लिंगायत धर्माद्वारे समाजात समानता आणण्यासाठी अतुलनीय असे कार्ये केलेले आहेत. इतिहास म. बसवेश्वरांच्या कार्यांशिवाय लिहता येणार नाही.

समाजात तीन प्रकारची विषमता दिसून येते.जातीच्या किंवा वंशाच्या आधारे, संपत्तीच्या आधारे आणि लिंगभाव आधारे. म. बसवेश्वरांचे स्त्रीविषयक कार्य पाहताना प्रथमतः वैदिक काळातील स्त्रीविषयक दृष्टिकोन पाहिला पाहिजे. वैदिक काळातील समाजात अतिशय प्रभावी असा दर्जा स्त्रीयांना होता. स्त्रीयांना माता, भगिनी, दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती अशा प्रकारे समजून श्रेष्ठ दर्जा दिला जायचा.म.बस्वेश्वरांच्या काळात म्हणजेच १२ व्या शतकात स्त्रियांना अतिशय तुच्छ समजले जायचे. थोडक्यात स्त्रीविषयक दृष्टिकोन अतिशय संकुचित स्वरूपाचा होता. मनुस्मृती काळात स्त्रीयांवर विविध बंधने टाकून ती स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी पात्र नाही म्हणून अनेक बंधनात अडकून स्त्रीयांचे कार्यक्षेत्र मर्यादित केले होते. जैन धर्माच्या शिकवणुकीचा प्रभाव समाजावर राहिलेला नव्हता परिणामी स्त्रीयांचे स्थान खचले होते

म. बस्वेश्वरांनी बालपणापासूनच स्त्रीविषयक बंधनांच्या विविध बाबींचा बारकाईने अभ्यास करूनच नव्हे अनुभवाने स्त्रीविषयक बंधने झुगारून देण्यासाठी विद्रोही वैचारिक व कृतीतून आंदोलन सुरू केले.

## १) सांप्रदायिक पद्धतीस विरोध :

बस्वन्ना कुडलसंगम येथे अध्ययन करत असताना आपल्या ईशान्यगुरुंनाच प्रश्न उपस्थित केला की स्त्रीयांनासुद्धा शास्त्र व उपनिषदे यांचा अभ्यास करण्यासाठी धार्मिक संस्कार (उपनयन) का केला जाऊ नये ?

बस्वन्नांचा उपनयनविधी(मुंज) करण्यासाठी वडील मादिराज आग्रह करत होते पण त्यांनी ठाम विरोध केला आणि म्हंटले बाबा ! मी व्रतबंध संस्कार मुळीच करुन घेणार नाही. चालत आलेल्या परंपरेला, रितीरिवाजास कडाडून विरोध केला. आजपर्यंत रूढी-परंपरा पाळली गेली म्हणून आम्हीही पाळलेच पाहिजे असे कोठे लिहून ठेवले आहे का ? सर्वांनी समजावण्याचा प्रयत्न केला पण बस्वन्नांनी सर्वांचे प्रयत्न व्यर्थ ठरवले. प्रसंगी घर सोडून जाईन पण असा असमानता निर्माण करणाऱ्या विधी नको हे ठाम सांगितले

अशा प्रकारे स्त्री-पुरुषांमध्ये दुजाभाव निर्माण करणाऱ्या सर्व सांप्रदायिक पद्धतीस त्यांनी कडाडून विरोध केले.

## २) अनुभव मंटपाद्वारे योगदान :

अनुभव मंटपाच्या माध्यमातून स्त्रीविषयक बंधने झुगारून पुरुषांएवढे स्थान देण्याचा फार मोठा क्रांतिकारक निर्णय घेऊन अंमलात आणले. समाजातील सर्व समस्येवर, प्रश्नांवर चर्चा करुन अनुभवा द्वारे उत्तरे शोधण्यासाठी स्त्रियांना अधिकार दिले. यामध्ये ७० शरणींनी प्रभावी योगदान दिले म्हणूनच वचन साहित्य हे विश्वव्यापक स्वरुपाचे ठरले. यामध्ये आक्का महादेवी, निलंबिका, गंगांबिका, रेचेम्मा अशा ७० शरणींनी योगदान दिले. आज जवळपास ३४ शरणींचे साहित्य उपलब्ध आहे बाकीचे सनातनी वैदिक विचाराच्या राजा सोविदेवच्या

सैनिकांनी नष्ट केले. यामध्ये शरण साहित्य वाचवण्यासाठी आक्का नागलांबिका, बस्वन्नांची पत्नी गंगांबिका, हरळय्याची पत्नी कल्याणी, सुन कलावती यांनीही प्रभावी प्रयत्न केले.

**३) स्त्रीयांची अस्मिता जागृत केली :**

पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रीयांची अस्मिता दाबून टाकली होती. धर्माने स्त्रीयांचे कार्यक्षेत्र मर्यादित केले होते पण बस्वन्नांनी समतेचा पुरस्कार करुन भ्रामक समजुतीला छेद दिले. स्त्री केवळ भोगवस्तू नसुन पुरुषांएवढे महान कार्ये करु शकते असा विश्वास निर्माण करुन कृतीत उपयोजन केले. स्त्रीशक्तीच्या विद्रोही चळवळीस बस्वन्नांनी सुरुवात केली. आध्यात्मिक क्षेत्रात मुक्तपणे स्त्रियांना वावरु दिले म्हणूनच आक्का महादेवी, काश्मीरची राजकुमारी बोंतादेवी यांनी आपल्या महान भूमिका बजावली. एका वचनात *स्त्रीचे दिव्य रुप पहा पुरातनांनो | बालेचे मुग्धरुप पहा पुरातनांनो ||

**४) लिंगायत धर्माद्वारे स्त्रियांना इष्टलिंग :**

धार्मिक बाबतीत तत्कालीन काळात स्त्रीयांना कोणत्याही प्रकारची स्वातंत्र्य नव्हते. स्त्रियांना इष्टलिंग पूजन करण्याची सर्वप्रथम संधी बस्वन्नांनी उपलब्ध करून क्रांतिकारक पाऊल उचलले. प्रवासात असो किंवा अन्य ठिकाणी इष्टलिंग पुजन सहज करता येते. यामागे फार मोठा वैज्ञानिक दृष्टिकोन दिसून येतो. स्त्रीयांनी अंधश्रध्देस बळी न पडता विश्वव्यापी स्वरूपाची संकल्पना सर्वप्रथम बस्वन्नांनी अंमलात आणली.ईश्वरासाठी सोन्याची, चांदीची आवश्यकता नसुन स्त्रीयांना इष्टलिंग दिक्षा देण्याची व शिक्षणाची व्यवस्था केली. अशा प्रकारे फार मोठा धार्मिक विधी करण्याच्या परंपरेस छेद देऊन सहजपणे स्त्रीया धार्मिक बाबतीत वावरु शकतील, असा व्यापक दृष्टिकोन यामागे होता.

**५) अनेक अमानुष प्रथांना विरोध :**

सर्वप्रथम म. बस्वन्नांनी सतीप्रथेस कडाडून विरोध केला. ही प्रथा नष्ट करण्यासाठी आवाज उठवण्याचे कार्ये केले आणि सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केले. विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार करुन स्त्रिया सुद्धा परत सन्मानाने जीवन जगू शकतात असा विचार मांडुन विधवा पुनर्विवाहास संमती देऊन समाजात विधवांना प्रतिष्ठा मिळवून दिली.

**६) कुटीर उद्योग उपलब्ध करून दिले :**

म. बस्वन्नांनी केवळ धार्मिक, सामाजिक बाबतीतच नव्हे स्वंयपुर्ण जीवन जगण्यासाठी कुटीर उद्योग उपलब्ध करुन दिले.

**७) आंतरजातीय विवाहाद्वारे स्त्रीयांना आपला पती निवडण्याचा हक्क :**

सर्वप्रथम वैचारिक पातळी निर्माण करुन समाजातील श्रेष्ठ-कनिष्ठपणा घालवण्यासाठी आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन दिले.

**८) महिला सबलीकरणासाठी सर्वप्रथम पुढाकार :**

समाजाच्या प्रवाहासोबत सर्वच वाहणारे असतात पण समाजाच्या प्रवाहाविरुद्ध बंडखोरी करुन समाजसुधारणा करण्याचे धाडस म. बस्वन्नांनी केले. स्त्रीयांना अधिकार मिळावेत यासाठी स्वत:च्या घरातून विद्रोही स्वरूप दाखवून शेवटपर्यंत स्त्रीयांना मानाचे स्थान व स्वावलंबी जीवनासाठी योगदान दिले.

अशा प्रकारे १२ व्या शतकात स्त्रीमुक्तीसाठी, महिला सबलीकरणासाठी आवाज उठविला म्हणूनच म. बस्वन्ना स्त्रीमुक्ती चळवळीचे आद्यप्रणेते होते.आजही वैज्ञानिक युगात काही मंदिरांमध्ये स्त्रीयांना प्रवेश बंदी केली जाते तेंव्हा वास्तविक पाहता असे वाटते की म. बस्वन्नांनी खऱ्या अर्थाने १२ व्या शतकात वैज्ञानिक, पुरोगामी विचार मांडले व त्याप्रमाणे कृती, आंदोलन, चळवळी सुरू केल्या हा विद्रोहीपणा खुप काही सांगून जातो.

**९) मानवतावादी दृष्टिकोन :**

स्त्री-पुरुषांना समसमान अधिकार असावेत यासाठी दोघांनाही समान संधी दिली. शिक्षणाचा अधिकार,विवाहाचा निर्णय घेण्याचा अधिकार,आर्थिक स्वातंत्र्य,धार्मिक बाबतीत स्वातंत्र्य असावे यासाठी

मानवतावादी उपक्रमामध्ये स्त्रीयांना सामील करून घेतले. अनुभव मंटपाच्या माध्यमातून स्त्रीयांच्या कार्येक्षेत्रात वाढ केले.

**१०) उदारवादी दृष्टिकोन :**

म. बस्वन्नांनी शरणींना भक्कमपणे पाठिंबा देऊन वचन साहित्यासाठी अनुभव मांडण्याचे अधिकार दिले. बसवन्ना कीती उदारवादी होते हे एका वचनातून सांगताना आक्का महादेवी म्हणतात की, “कामाशी जिंकले बस्वन्ना तव दयेने | सोमधराशी आलिंगीले बसव तव कृपेने | दुजाभाव सारुन, मज मिच गेले विसरून बसव तव कृपेने ||”

**११) स्त्रीविषयक संस्कृतीचा विकास :**

म. बस्वन्नांनी स्त्रीविषयक दृष्टिकोन बदलण्यासाठी स्वातंत्र्य, समता व सर्व अधिकार १२व्या शतकात मिळवून दिले. अनुभव मंटपात समान स्थान दिले. अनेक शिवशरणी अनुभव मंटपात होत्या ज्यांनी खूप मोठे योगदान दिले.आजही भारतीय संसदेत स्त्री आरक्षणाबाबत मतैक्य होत नाही जे १२ व्या शतकात म. बस्वन्नांनी करुन दाखवले.

स्त्रीयांसाठी अनेक उपक्रम राबवले. त्यात वेश्यांचे पुनर्वसन केले परिणामी स्त्रीयांनीही साहित्य निर्मिती करुन बस्वन्नांची चळवळ सार्थक ठरवली. अनुभव मंटपातील स्त्रीया सर्व बाबतीत निपुण होत्या. स्त्रीवर्गाचा सर्वोच्च सन्मान, गौरव १२व्या शतकात म. बस्वन्नांनी केला, यातच बस्वन्नांची स्त्रीविकासाची तळमळ दिसून येते.

**समारोप :**

महात्मा बसवेश्वरांनी स्त्रीयांना गुलामगिरीतुन मुक्त करण्यासाठी सर्वप्रथम क्रांतिकारी योगदान दिले. तत्कालीन काळात स्त्री म्हणजे उपभोगाची वस्तू समजली जात होती पण यास तडा देउन अनुभवसंपन्न महामानवाने विडा उचललेला होता.याची सुरुवात स्वतःच्या कुटुंबापासून केली होती. व्रतबंध संस्कारास विरोध करुन शेवटपर्यंत ठाम राहिले. अनुभव मंटपाद्वारे स्त्रीयांना पुरुषांएवढे क्रांतीकारी स्थान देऊन समाजातील समस्येवर उत्तरे शोधण्याची संधी दिली. पुरुष प्रधान संस्कृतीने स्त्रीयांची अस्मिता दाबून टाकली होती पण म. बस्वन्नांच्या योगदानामुळे स्त्रीयांनी आपले दिव्य रुप वचन साहित्य निर्माण करुन दाखवले. स्त्रीयांना इष्टलिंग पुजन करण्याचा स्वातंत्र्य देऊन व्यापक दृष्टीकोनातून शिक्षणाची व्यवस्था केली. सतीप्रथेस विरोध,बालविवाहास विरोध, विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार करुन स्त्रीयांना आर्थिक स्वावलंबनासाठी कुटीर उद्योग उपलब्ध करून दिले. सर्वात महत्त्वाचे क्रांतीकारी पाऊल म्हणजे आंतरजातीय विवाह. महिला सबलीकरणासाठी पुढाकार घेऊन मानवतावादी दृष्टीकोनातून, उदारवादी दृष्टीकोनातून स्त्रीविषयक प्रगल्भ संस्कृतीचा विकास घडवून आणले.

आज स्त्रीया सर्व क्षेत्रात जो पुढाकार घेत आहेत,कार्याने विविध पदांची शोभा वाढवत आहेत,दैदिप्यमान विकास, संशोधन करत आहेत त्या क्रांती सुर्य म. बस्वन्नांच्या योगदानामुळेच, असेच यासंदर्भात म्हणता येईल यात मुळीच संदेह नाही.

**संदर्भ :**

*महामानव बसवेश्वर : डॉ. सिद्धलिंग पट्टणशेट्टी*
*समतासुर्य महात्मा बसवेश्वर : डॉ. अशोक ग. मेनकुदळे*

# महात्मा बसवेश्वर यांचे क्रांतीकारी विचार

**प्रा. देवशेट्टे सुरेश मनोहरराव**
*इतिहास विभाग प्रमुख, महात्मा ज्योतीबा फुले महाविद्यालय, मुखेड जि. नांदेड*
*मो. नं.7588424471*

आज जगातील मानवाधिकारांच्या संरक्षणासाठी ज्या काळात चळवळी झालेल्या आहेत त्या काळात महात्मा बसवेश्वर हे मानवतावादी सुधारक होते असे म्हणता येईल कारण 12 व्या शतकात त्यांनी समाजसुधारणेचे युग त्यांनी स्वत: निर्माण केलेले होते. महात्मा बसवेश्वरांनी भारतातील सामाजिक, राजकीय, धार्मिक व आर्थिक क्षेत्रात तसेच तत्वज्ञानाच्या साह्याने समाजात मानवतावादी विचारधारणा अस्तित्वात आणून समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता इ. मानवी मूल्य रुजवली.

तसेच भारतीय समाज जीवनात प्राचीन काळापासून जातीला विशेष महत्व दिलेले होते. समाजात जातीप्रमाणे व्यवसाय स्विकारलेले होते. त्यामुळे समाजात श्रेष्ठ - कनिष्ठ, उच्च - नीच या कल्पना समाजात रुढ झालेल्या होत्या. उच्चवर्णीय लोक कनिष्ठ लोकांना हिनतेची वागणूक दिली जात होती. अस्पृश्यता निवारण, स्त्रि समानता, श्रमप्रतिष्ठेचा संदेश सामान्य लोकांपर्यंत पोहचवण्याचे कार्य महात्मा बसवेश्वरांनी केले.

महात्मा बसवेश्वरांनी आपल्या देशात क्रांतीकारी पाऊले उचलून समाजातील जातीयता नष्ट करण्याचा प्रयत्न केला. महात्मा बसवेश्वरांचे विचार अनेक भाषेतील विचारवंतानी आपआपल्या भाषेतून विचार मांडले. त्यामुळेच ते एक थोर क्रांतीकारक होते.

**उपनयन संस्कारास नकार :**

प्राचीन काळापासून हिंदू समाजामध्ये 16 संस्कार सांगितलेले आहेत. त्यातील एक उपनयन संस्कार होय. महात्मा बसवेश्वर 8 वर्षाचे असताना त्यांच्या वडिलांनी त्यांना उपनयन संस्कारासाठी तयार होण्यास सांगितले, पण त्यांनी उपनयन संस्कारासाठी तयार होण्यास नकार दिला.

माझ्यापेक्षा माझी बहीण असतांना तिच्यावर उपनयन संस्कार का करीत नाही ? तेंव्हा वडिल म्हणाले मुलीला उपनयन संस्कार करायचे नसतात, स्त्रियांना अशा धर्मसंस्काराचा अधिकार नसतो. स्त्री आणि पुरुष यांच्यात फरक करणारा धर्मसंस्कार व धर्म मला मान्य नाही.

**गृहत्याग :**

महात्मा बसवेश्वर लहानपणापासूनच एकनिष्ठ विचाराचे होते. वयाच्या 8 व्या वर्षी घर सोडून आईवडिलांचा त्याग करुन कूडलसंगम येथे आले. त्यांनी आपला निर्णय बदलावा यासाठी अनेकांनी त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला पण ते आपल्या निर्णयाशी ठाम होते.

**कूडलसंगम येथे ज्ञानसाधना :**

कुडलसंगम येथील वातावरणात त्यांचे मन रमले. त्यांची दिनचर्या ठरलेली होती. संगमेश्वराची पुजा करताना त्यांचे देहभान हरपत असत. त्यांची अभ्यासूवृत्ती, नम्रता, भक्ती आणि चांगली वागणूक यामूळे ते सर्वांना आवडत असत. कूडलसंगम हे प्रसिध्द तीर्थक्षेत्र होते. बलदेव हे कल्याण राज्याचे मंत्री होते. कल्याण हे चालुक्य राजाची राजधानी होती. बिज्जल नावाचा राजा राज्य करीत होता. बलदेव यांना असे वाटत असे की, बसवेश्वर सारखा ज्ञानी व हुशार माणूस बिज्जल राजाच्या दरबारी असावा व तेथेच त्याच्या ज्ञानाचा उपयोग होवू शकतो.

**राजदरबारी नौकरी :**

महात्मा बसवेश्वर कुंडलसंगम सोडून मंगळवेढा या ठिकाणी आले. तेथील राजांनी त्याची हिशोबनीस या पदावर नियुक्ती केली. 1132 ते 1152 या दरम्यान मंगळवेढा येथे वास्तव्यास होते.

1152 ते कल्याण या ठिकाणी आले. महात्मा बसवेश्वरांच्या आयुष्यात काही महत्वपुर्ण घटना घडत गेल्या, त्यातील महत्वाची घटना म्हणजे कूडलसंगम राजदरबारात दाखल झाला व समाजातील जनतेशी त्याचा जवळून संबंध येवू लागला. दिवसेंदिवस चांगूल पणाचा लोप पावत असलेल्या चांगूलपणाशी तो चिंतन करुन आपल्या ज्ञानाची सांगड घालून समाजातील परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न करु लागला.

महात्मा बसवेश्वर एखादे काम आपल्या हातात घेतल्यावर ते काम मन लावून करीत असत. महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांचा आपण अभ्यास केला तर असे दिसते की त्यांचे विचार 900 वर्षापुर्वीचे होते. ते विचार बरोबरच होते असे सांगता येत नसले तरी त्यांचे विचार महान क्रांतीकारक व समाजसुधारक होते हे ठाम होते.

एम. चिदानंद मुर्ती यांनी श्री महात्मा बसवेश्वर हे चरित्र लिहले आहे. या पुस्तकाचा अनुवाद मराठी भाषेत प्रकाशित झाला आहे.

महात्मा बसवेश्वर यांनी कुडलसंगम सोडून राजदरबारी नोकरी शोधू लागले त्यांना हिशोबनीस म्हणून नोकरी मिळेल अशी आशा होती. ते सरळ शाही खजिन्यात गेले. या खजिन्याचा रखवालदार प्रमुख अधिकारी यांना हिशोब दाखवत होते. पण हिशोब जुळत नव्हता कोठे चुक झाली कोणालाही कळत नव्हते या चुकीमूळे फार मोठे नुकसान होणार होते. हे सर्व बसवेश्वर पाहत होते. त्यातील चुक बसवेश्वराच्या निदर्शनास आली आणि ती चूक त्यांनी सर्वांना दाखवून दिली. बसवेश्वराचे सर्वत्र कौतूक झाले. आणि त्याला राजदरबारी नोकरी मिळाली.

**विश्वासून सल्लागार :**

बसवेश्वर राजदरबारी हिशोबनीस या पदावर नियूक्त झाल्यापासून ते पद सांभाळण्याची जबाबदारी त्यांच्यावर आली. प्रत्येक गोष्ट मन लावून करीत असत. महात्मा बसवेश्वरांना सारखे वाटायचे की, आपण जी ज्ञानसाधना व ज्ञानसंपादन केले त्याचा उपयोग समाजासाठी झाला पाहीजे.

बिज्जल राजाचा विश्वासू सल्लागार म्हणून महात्मा बसवेश्वराची नियूक्ती झाली. विसकटत चाललेली राज्याची घडी नीट बसवण्यासाठी तो राजाला सल्ला देत असत.

**सर्वांचे केंद्रबिंदू :**

बसवेश्वरांचे मोठेपणा सिध्द करण्यासाठी आणखी एक घटना घडली ती म्हणजे राजाला एक ताम्रपट सापडले होते. ताम्रपटावरील लिपीचा बोध कोणासही होत नव्हता. मंत्रीमंडळातील सर्वांनीच त्या ताम्रपटावरील लिपीचा अर्थ कळत नव्हता. ही बातमी महात्मा बसवेश्वर यांना समजली व त्याने ताम्रपटावरील सर्व माहिती वाचून दाखवून त्याचा अर्थ स्पष्ट केला. त्यामुळे त्याच्या बुध्दीमत्तेचा प्रत्यय सर्वांना आला.

त्या ताम्रपटात गुप्तधनाचा उल्लेख आलेला होता. त्यावेळी गुप्त धन कोठेतरी पुरुन ठेवण्याची पध्दत होती. लॉकर्सची व्यवस्था नव्हती गुप्त धनाचा शोध बसवेश्वरांमुळे लागला, त्यामुळे खजिन्यात 66 कोटीची संपत्ती होती. ताम्रपटावरील अवघड लिपी वाचून दाखवणारा विद्वान आपल्या दरबारात आहेत हे अभिमान राजाला वाटला. त्याची राजाने कोषागार मंत्रीपदी नियुक्ती केली व बिज्जळ राजाने आपली मानलेली बहीन नीलांबीका हिचा विवाह बसवेश्वरासोबत लावून दिला.

**वैवाहिक जीवन :**

महात्मा बसवेश्वर वैवाहिक जीवनामध्ये सुखी होते. कुंडलसंगम येथे अनेक वर्ष केलेली ज्ञान तपश्चर्या, धर्माविषयी केलेले चिंतन या सर्वाचा परीणाम त्यांच्या व्यक्तीमत्वावर दिसून येत होता. गंगाबिका आणि निलांबीका या दोन्ही पत्नीना बसवेश्वराच्या आचर-विचार व कार्यासंबधी आदर होता.

बसवेश्वरांना संपत्तीचे आकर्षण नव्हते. त्याच्याकडे सत्ता, संपत्ती असून देखील ते नम्र होते. श्रीमंताविषयी तिरस्कार होता. गोरगरीबाविषयी त्यांच्यात सहानूभूती होती.

राजदरबारातील अधिकारी म्हणून वावरत असताना बसवेश्वरांचे वर्तन हुकुमशहासारखे कधीच नव्हते. उलट त्यांनी आपल्या सत्तेचा, पैशाचा उपयोग सामान्य माणसासाठी केला. 900 वर्षापुर्वी समाजात समानतेचा पुरस्कार करणारा, आग्रह धरणारा, विचारवंत म्हणून बसवेश्वरांचे नाव घ्यावे लागेल. समाजात परिवर्तन घडवून

आणायचे असेल तर प्राचीन ग्रंथाचा अभ्यास केला पाहिजे. म्हणून त्यांनी संस्कृत ग्रंथाचा अभ्यास केला, पण हा अभ्यास करत असताना ही गोष्ट सर्वसामान्यांना कशी कळणार ? म्हणून बसवेश्वरांनी लोकभाषेतून (कन्नड) विचार मांडून समाजात परीवर्तन करण्यासाठी प्रयत्न केले.

बसवेश्वरांनी लहान - मोठा असा भेदभाव केला नाही. बसवेश्वराच्या प्रत्येक वचनातून लोकहीत हाच विचार होता. त्यांचे घर म्हणजे जणू अनुयायाचे निवासस्थानच होते. घरात प्रवेशासाठी परवानगी नसे. बसवेश्वराचे घर म्हणजे अतिथीगृह होते. येणा-यांचे स्वागत होत असे.

**अनुभव मंटप :**

महात्मा बसवेश्वरांच्या क्रांतीकारी विचारांचे प्रमुख लक्ष म्हणजे समाजाचे कल्याण करणे. यासाठी लोकांमध्ये वैचारीक जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला सर्व समाज एकत्रील आला पाहिजे. त्यांच्यावर योग्य संस्कार झाले पाहिजेत. चांगल्या नितीनियमाचे द्रढीकरण झाले पाहिजे. यासाठी माणसामाणसात संवाद निर्माण होणे आवश्यक आहे. अनुभव मंटपाची स्थापना याच उद्देशाने झाली.

1) वर्णभेद-जातीभेदास या संस्थेत अजिबात धारा नाही.
2) स्त्रीसाठी अनुभव मंटपाची दारे खुली आहेत.
3) अल्लामप्रभु यांच्या नेतृत्वाखाली वाद-संवाद होत असे.

अनुभव मंटपाची किर्ती दुरपर्यंत पसरली, त्यामुळे या संस्थेला देशभर प्रतिष्ठा मिळाली. या सर्व विचारामुळे सर्व जातीधर्माचे लोक एकत्रीत येवून लोकहिताचा विचार करु लागले.

**वचनाची निर्मिती :**

महात्मा बसवेश्वरांनी जसे विचारपीठ निर्माण केले त्याचबरोबर चांगले विचार पटवून देण्यासाठी वचनसाहित्य निर्माण केले. या सर्व वचन साहित्यातून अनेक सामाजिक प्रश्नाविषयी चर्चा करण्यात आलेली आहे. ते एक थोर समाजसुधारक होते. त्यांनी समाजाविषयी केलेले चिंतन, अत्यंत महत्वाचे आहे. बसवेश्वरांची वचनसाहित्य हे कन्नड भाषेत आहेत, परंतू आज त्यांचे चरित्र विविध भाषेत उपलब्ध आहेत.

**देह हेच देवालय :**

महात्मा बसवेश्वर यांनी ग्रंथातील सोयी प्रमाणे अर्थ सांगणा-याचा विरोध केला. त्यामुळे समाजात पुजाअर्चा, कर्मकांड मोठ्याप्रमाणात वाढलेले होते. यावर आवर घालण्यासाठी महात्मा बसवेश्वरांनी पुजामध्ये भक्ती व श्रध्दा असणे महत्वाचे आहे. देव देवळात नसून माणसात आहे हा विचार त्यांनी मांडला. देह हेच देवालय ही संकल्पना त्यांनी स्पष्ट करुन दाखवली.

**स्त्री-पुरुष समानता :**

महात्मा बसवेश्वरांनी समाजात समानता निर्माण करुन स्त्री-पुरुष या दोघांना समानतेचा आग्रह धरुन स्त्री आणि पुरुष यांच्यात भेद करु नये असे विचार मांडले. स्त्रीयांना अनुभव मंटप या संस्थेत प्रवेश दिला. स्त्रियांनी अनेक वचने लिहली. स्त्रीयांनी चुल आणि मुल एवढेच विश्व न मानता व्यवहारात देखील स्त्रीयांनी सहभाग घेतला पाहिजे, बसवेश्वरांनी बालविवाहास बंदी घातली.

**कायकवे कैलास :**

महात्मा बसवेश्वरांनी आपले विचार मांडत असताना श्रमाला अधिक महत्व दिले. कायकवे कैलास हा संदेश दिला. कायक या शब्दाचा अर्थ शरीराशी निगडीत असे काम असा आहे. अंगमेहनत, श्रम म्हणजेच कायक. बसवेश्वरांनी श्रम प्रतिष्ठेचा पुरस्कार केला. कोणताही व्यवसाय हा उच्च-नीच प्रतिचा नसतो. कोणताही भक्त माझ्याकडे आल्यावर त्याला मी तयाचा धंदा विचारला तर हे कूडलसंगमदेवा, माझे शरीर उडवले जावे. यावरुन असे समजते की श्रमाला त्यांनी महत्व दिल्याचे दिसून येते.

कोणतेही काम करत असताना फळाची अपेक्षा करु नये आणि फळ मिळालेच तर त्याचा समाजासाठी उपयोग करावा. गरीब असो की श्रीमंत दोघांनीही श्रम हे केलेच पाहिजे.

**दासोह विचार :**

दासोह विचाराची कल्पना मांडून संपत्ती वितरणाच्या बाबतीत आपली भूमिका स्पष्ट केली. संपत्तीचे संकलन हे परीश्रमपूर्वक करावे. संपत्तीचे वितरण गरजू लोकांसाठी करावे. दासोह हा कन्नड शब्द असून त्याचा अर्थ सत्यशुध्द कायकातुन प्राप्त केलेले धन स्वत:पुरते ठेवून, शिल्लक असलेले समाजातील वंचित घटकांना नम्रपणे देणे असा आहे.

**आंतरजातीय विवाह :**

महात्मा बसवेश्वरांनी अस्पृश्यतेच्या संदर्भातही महत्वपुर्ण भूमिका स्पष्ट केली. बसवेश्वर हे निर्भिड होते, तसेच किर्ती देशभर पसरलेली होती. जातीवरुन, धर्मावरुन, व्यवसायावरुन माणूस उच्च-नीच ठरत नाही. अस्पृश्य हा माणूसच आहे. त्यांना वेगळी वागणूक देवू नये. अस्पृश्यता आपल्या अनुभव मंटपामध्ये संधी दिली. अनेक लोकांना लिंगदिक्षा दिली व लिंगायत झालेल्यामध्ये विवाह जुळवून आणला आणि आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन दिले.

**समारोप :**

12 व्या शतकातील महात्मा बसवेश्वर हे मानवतावादी सुधारक होते त्यांनी भारतीय समाजामध्ये समाजसुधारणा घडवुन आणण्यासाठी कार्य केले. महात्मा बसवेश्वरांनी लहानपणापासूनच ईश्वर प्राप्तीची तसेच आध्यात्मिक जीवनाची ओढ होती म्हणून त्यांनी भक्ती मार्गाचा स्विकार केला आणि कुडलसंगम येथे ज्ञान, त्यांची अभ्यासूवृत्ती, नम्रता, भक्ती आणि चांगली वागणून असल्यामुळे ते सर्वांना आवडू लागले. तसेच देह हेच देवालय आहे ठणकावून सांगून आपले विचार वस्तुनिष्ठ व व्यवहाराशी निगडीत होते आणि ते सामान्य मानसाच्या हिताशी संबंधीत होते. महात्मा बसवेश्वर यांनी दरबारात विश्वासू सल्लागार म्हणून कार्य केले, परंतु कार्य करत असताना आपल्या पदाचा कोठेही त्यांनी वापर केल्याचे दिसून येत नाही. पदासाठी स्वत:चा स्वार्थासाठी वापर केला नाही. समाजातील स्त्री-पुरुष समानता आणण्यासाठी प्रयत्न केले, त्यांनी अनुभव मंडप मध्ये स्त्रीयांनी काम करण्याची संधी दिले त्यामुळे समाजात स्त्री-पुरुष समानता निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. आंतरजातीय विवाह घडवून आणले.

श्रम हाच कैलास व स्वर्ग आहे हा विचार समाजात रुजविला. भ्रष्टाचार करुन संपत्तीचे संकलन न करता मेहनतीने पैसा कमवावा. गरजेपुरता पैसा जवळ ठेवावा व उर्वरीत पैसा गरजवंतांना द्यावा असा संदेश समाजाला दिला.

900 वर्षापुर्वी महात्मा बसवेश्वरांनी सामाजिक, आध्यात्मिक, धार्मीक, आर्थिक क्षेत्रात सामान्यांना सन्मानाची वागणूक मिळवून देण्यासाठी महात्मा बसवेश्वरांनी प्रयत्न केले. त्यांनी आपल्या देशात क्रांतीकारी पाऊले उचलून समाजातील जातीयता, नष्ट केली. म्हणून ते एक थोर क्रांतीकारक, थोर महात्मा होते. त्यांचे आज ही विचार आपणास प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरतात.

**संदर्भ ग्रंथ :**

*महात्मा बसवेश्वर : डॉ. सचितानंद बिचेवार.*
*थोर क्रांतीकारक महात्मा बसवेश्वर : डॉ. भगवान अंजनीका.*
*बसव प्रज्ञा : रमजान दर्गा, महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान भालकी, जि.बिदर - 2017.*
*महात्मा बसवेश्वर : डॉ. अशोक गं. मेनकुदळे, महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान भालकी, जि.बिदर - 2019.*
*अनुभव मंटप : राजू जुबरे, महाराष्ट्र बसव परिषद हिरेमठ संस्थान, भालकी जि.बिदर - 2020*

# महिलाओं की स्वतंत्रता के प्रणेता :महात्मा बासवन्ना

**आसमा रिजवान बेग-सौंदलगे**
*शोध- छात्रा -शिवाजी विश्वविद्यालय कोल्हापूर asmabaig1002@gmail.com*

सत्य, करुणा, मानवता का संदेश दुनिया को सबसे पहले तथागत बुद्ध ने दिया था। महात्मा बासवन्ना ने उन्हीं विचारों के साथ 11 वीं शताब्दी में मानवता के विस्मरण को पुनर्जीवित किया। महापुरुषों के काम का अध्ययन उन्हें दिव्य मान्यता देकर अलौकिक विचार कहा जाता है, जबकि सामाजिक परिवर्तन के दृष्टिकोण से महापुरुषों के जीवन और कार्य का अध्ययन धर्मनिरपेक्ष विचार कहा जाता है। बसवा के विचार अद्‌भुत रूप से सोचे-समझे हैं, इसलिए उनका युगप्रवर्तक अवतार भीड़ में खो जाता है, लेकिन जब उन्हें धर्मनिरपेक्ष दृष्टिकोण से सोचा जाता है, तो उनका व्यक्तित्व चमकने लगता है।

अंधविश्वासों, मानदंडों, परंपराओं और असमानताओं पर काबू पाकर बुद्ध के विचारों को अपनाने वाले बसव पहले क्रांतिकारी थे। उन्होंने सामाजिक, धार्मिक और समानता पुरस्कारों के लिए शिवलिंग का प्रतीक इस्तेमाल किया और दलित पीड़ितों को लिंगायत धर्म दिया। बसव ने सभी जातियों को एकजुट किया। कई दलित, अछूत बसव विचारों से प्रेरित, इन शरणार्थियों द्वारा किया गया कार्य बसव विचार वृक्ष का मीठा फल है। 12 वीं शताब्दी में, बसाव महिलाओं को आनंदमंडप मंच पर ले आए, उनके पैरों की बेड़ियों को तोड़ दिया और सभी जातियों की महिलाओं को मानवता के आधार पर रखा।

हमारा भारत महान परंपराओं और समृद्ध संस्कृति में डूबा हुआ देश है। इस देश में कई जातियां, धर्म, रीति-रिवाज, परंपराएं और भाषाएं हैं। लोकतंत्र आज की सबसे लोकप्रिय विचारधाराओं में से एक है। लोकशाही समाज के समग्र परिवर्तन का विचार हैं । यद्यपि भारत ने 15 अगस्त को स्वतंत्रता के द्वार में प्रवेश किया और भारतीय लोकतंत्र का उदय हाल ही में हुआ, इसका इतिहास बहुत पुराना है। महात्मा गोतम बुद्ध, संत नामदेव, महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराज, डॉ। बाबासाहेब अम्बेडकर आदि के विचारों से लोकतंत्र पूरक हो गया है। 12 वीं शताब्दी में बसवजी ने भारतीय समाज में लोकतांत्रिक स्वतंत्रता के मूल्यों की स्थापना में महत्वपूर्ण भूमिका निभाई। महात्मा बसावन का जन्म एक ऐसे परिवार में हुआ था जो अंधविश्वासों और रिवाजों का पालन करता था। बसवन्ना बहुत चालाक, चतुर थे। घर में भगवान की पूजा हमेशा चलती थी, लेकिन बसव उनसे नफरत करते थे।

**म. बसवन्ना का जन्म :**

मंगलावेद के राज्य पर कलचुर्य वंश का शासन था। कलचुर्य कल्याण के चालुक्य परिवार का एक मंडली था। कलचुरी ने बागेवाड़ी के मदिराज पर 'इंगलेश्वर बागवाड़ी' मंडल के 'पुरुवधीश्वर' की उपाधि प्रदान की थी।
मदिराज -मदालम्बिका पति और पत्नी के सबसे बड़े पुत्र 'देवराज' और सबसे बड़ी बेटी 'नागालंबिका' थी।
ऐसा शुभ दिन बागेवाडी के जीवन में उत्पन्न हुआ। 1105 में रोहिणी नक्षत्र पर अक्षय तृतीया के दिन, मदालम्बिके को दूसरी बार पुत्रा रत्न हुवा । बागेवाडी में खुशियाँ थी। बालक का नाम बसव रखा गया। यह बसव बाद में समतायुग 'महात्मा बसवन्ना' के दर्शन के रूप में दुनिया के सामने आया।

**महिलाओं की स्वतंत्रता के प्रणेता महात्मा बासवन्ना:**

दुनिया के इतिहास में, अनगिनत लोगों को अन्याय और उत्पीड़न की एड़ी के नीचे कुचल दिया गया है ।उन्हे जों दुःख मिला वह निसर्गनिर्मित नही था व मानवनिर्मित था । अगर हम ऐसी पितृसत्तात्मक संस्कृति के वर्चस्व के तहत महिलाओं के इतिहास को देखें, तो गुलामी की पीड़ा में रो रही महिलाओं का इतिहास है। क्योंकि पितृसत्तात्मक समाज महिलाओं पर अन्याय करणे मे पुरुषार्थ समजता रहा।स्त्रियां सिर्फ एक शिकार बन कर गई। उसका जीवन धर्मग्रंथ के काटेरी कुंपण मे बंदिस्त होगया ।उनके साथ हों रहा अन्याय और उनके दर्द का शोर किसी को सुनाई

नहीं दिया।ऐसी परिस्थिती 12वे दशकके बसवपूर्व काल मे थी। 12 वे शतक मे एक अभूतपूर्व क्रांती होई । यह क्रांती सिर्फ कर्नाटक के इतिहास मे नही तो संपूर्ण दुनिया के इतिहास में इसकी नोंद की गयी ।और इस क्रांती को कारणीभूत थे महात्मा बसवन्ना ।

बसवन्ना द्वारा चलाए गए आंदोलन में 30 महिलाएं थीं। इस दुनिया के इतिहास में इससे पहले कभी भी किसी आंदोलन में इतने बडे पैमाने पे महिलाओं ने हिस्सा नही लिया था । यह एक अद्‌भुत बात थी।बसवांना की दृष्टी मे स्त्री-पुरुष दोनो समान थे बसवांना के इस क्रांतीने रुढी-परंपरा को अमान्य करते हुए अक्कामहादेवी ,मिजादेवी इन महिलाओं को एक हिम्मत दी इन्होंने बहुत ही साहसी कदम उठाया और दुनिया को दिखा दिया की एक नारी क्या क्या कर सकती है । अक्कामहादेवी जैसा महान व्यक्तित्व इसलिए आया क्योंकि बसवण्णा ने महिलाओं को पूर्ण समानता और स्वतंत्रता दी थी। अक्का इतनी मजबूत हो गयी थी कि उसने राजवैभव को लात मारकर कल्याण का रास्ता पकड़ लिया। स्मृतिकारों ने कहा कि स्त्री माया हैं ।तो वीर वीरंगिनी अक्कामहादेवी ने जोर देकर कहा कि ,अगर महिला पुरुष के लिए माया हैं, तो पुरुष भी महिला के लिए माया है।

बसावन ने महिलाओं को अनुभवमंडप में समान अधिकार दिया, उन्हें अभिव्यक्ति की स्वतंत्रता दी । नारी का अंतर्बाह्य परिवर्तन बसवांना के क्रांती से ही उभर के सामने आया । इसे अनेक उदाहरण हमारे सामने हैं कायकनिष्ठ आयदक्की लक्कम्मा शरानी के चरित्र में देखा जा सकता है एक दिन, उनके पति, जो एक चावल बीनने वाले थे, जब वे सामान्य से अधिक चावल लेकर आए थे, तव लक्कम्मा परेशान और क्रोधित हुई वह अपने पति से साहसपूर्वक पूछती है, "क्या आप संदेश भूल गए हैं?" तुम्हारा मन में ऐसा खयाल क्यूँ आया? बासवन्ना के विचार पर संदेह क्यों? यह कहने का साहस और धैर्य सिर्फ बसवांना के विचारों का ही परिपाक हैं।

स्त्रिया कर्मकांड, वृत्त उपास-तपास इस मे पुरी तरह से डूब गई थी । बसवन्ना ने स्त्री को इण सब से मुक्त किया। स्त्री साक्षरता, बाल- विवाह को विरोध, पुनर्विवाह को प्रोत्साहन, केशमुंडन, सतीप्रथा का विरोध बसवण्णा ने किया । स्त्री के जिंदगी में मानसिक विकलांगता और अधःपतन को दूर कर एक नवे चैतन्य ,उल्हास की ज्योती को बसवण्णा ने जगाया । बसवण्णा ने श्रम प्रतिष्ठा को जगाया । “काय कवे कैलास “ मतलब श्रम ही पूजा है ।ये संदेश बसवण्णा ने दिया।बसवण्णा पूरी तरह से तर्कवादी थे ।वो ऐसी विचार धारा के खिलाफ संघर्ष कर रहे थे जो विषमतावादी थी । बसव विचार पूरी तरह से वैदीक परंपरा के विरुद्ध दिखाई पडता है । क्योंकी बसव विचार समतामूलक है। इसमे श्रमण परंपरा, भिक्षू परंपरा और चार्वाक की भौतिक वादी परंपरा का एक अनुठा मिश्रण दिखाई देता हैं ।बसव विचार अन्याय के विरुद्ध एक धारदार शस्त्र है । बसव विचार बहुजन के लिये सम्मान से जीने का जीवन दर्शन है ।बसव विचार गुलामी की बेडीयां तोडनेवाला मुक्तीमार्ग है ।जो मी बसव विचार का दोहन करेगा उसका कल्याण ना हो ये असंभव है । महात्मा बसवेश्वर हमारे पूर्वज है और देश की दबी कुचली जनता को बसव अपने अग्रणी दिखाई देते है ।विद्रोही विचार धारा को बसवेश्वर का सार्थ अभिमान है ।

---

# GURU MAHATMA BASAVESHWARA: A TRUE SOCIAL REFORMER AND THE NEED OF HIS PREACHING TO THE PRESENT EDUCATIONAL SCENARIO

**Dr. Sudam Laxmankumar**
*M.A., M.Ed., P.G.D.T.E., L.L.B., M.Phil., Ph.D., IQAC & NAAC Coordinator*
*DEGLOOR COLLEGE, DELOOR*

---

## Introduction

A reformer tries to change and improve something such as a law or a social system for the human progress. The social reformers believed in the principle of individual liberty, freedom, and equality of all human beings irrespective of sex, color, race, caste, region or religion. There is also need of educational reforms which helps to live in the society happily with other human beings.

Basaveshwara (Basavanna) was an Indian 12th-century statesman, philosopher, poet, activist, Lingayat saint in the Shiva-focussed Bhakti movement, seer and social reformer.

He fought against social evils of his time such as caste system, discrimination and the ritual practices of Hinduism. His teachings and philosophy transcend all boundaries and address the universal and eternal to establish the welfare state to elevate the position of all persons of the society, irrespective of caste, creed, sex, region and religion. The Vachanas (Brief poetry) penned by the social reformer Basaveshwara which found a place in Constitution would be relevant forever.

Education means all-round drawing out of the best in child and man—body, mind, and spirit. As such, education becomes the basis of personality development in all dimensions—moral, physical, mental, emotional and spiritual. Since ancient times, it is said "Sa Vidya Ya Vimuktaye". It means that with education, we finally attain salvation. This small Sanskrit phrase essentially contains the thought and essence of Value Education. Therefore there is a need of learning the great Indian social reformers like Mahatma Basaveshwara.

## International Status

India is known to the world by many social reformers from Gautama Buddha to Mahatma Phule. Many countries follow the principles of them and inspired by them. There is a need to study those reformers to understand social problems and solve them. Therefore we can say that in the long run educational and social reforms are the foundations on which we can build the character of people to attain welfare state.

## National Status

Students are future of the country. The future of the country depends on the moral values and good character of them. Therefore it is the duty and responsibility of the teacher to impart the social reformers like Mahatma Basaveshwara the youth such as humanity, truthfulness, honesty, humbleness, tolerance, sacrifice and self-fulfillment. Moral lessons and ideology of Basaveshwara should be taught among students in schools and colleges. Therefore there is a need of learning in modern education system to attain peaceful and selfless society.

## Hypothesis

Learning from Mahatma Basaveshwara is compulsory in modern education system for solving problems of life to lead happy and comfortable life. It helps to mould the good character of the learner morally, physically, mentally and spiritually. No student, in a real sense, can be considered to be healthy

in mental, physical and spiritual terms, without learning human values, relationships, self understanding morally and ethically. They help them for self-control and good character.

**Objectives**

1) To learn to live together happily
2) To develop the value and moral education among the students
3) To understand the importance of good character
4) To improve the social values
5) To develop social service among students
6) To show humanity and empathy for others
7) To abolish caste system
8) To avoid superstitions
9) All round development of students: Body, Mind and Soul

It is an attempt to make the discussion of aims and objectives of Basaveshwara as a social reformer to make the people to become the part of resurgent India.

**Significance and need of the problem**

It is essential in modern education system to learn the great Indian social reformers like Mahatma Basaveshwara to become good citizens of our nation because the students are influenced by many modern technological factors such as cinema, Tele Vision, mobile, Whats App, Facebook etc. In the modern education scenario, the learners have knowledge without social awareness to become selfish and individual attainment. The education related to social reformers is neglected in present curricula. Therefore there is a demand of learning about social reformers to change the way of living in the society to attain bliss.

**Some Indian Great Social Reformers**

- Gautama Buddha
- Mahatma Basaveshwar
- Swamy Vivekananda
- Ishwar Chandra Vidyasagar
- Raja Ram Mohan Roy
- Dayanand Saraswati
- Jyotiba Phule
- Beni Madhab Das
- Debendranath Tagore
- Rabindranath Tagore
- Mahatma Gandhi
- Dr. B.R. Ambedkar
- Dwarkanath Ganguly
- Gopal Ganesh Agarkar
- Baba Amte

These above great social reformers appear once a while to serve the humanity, with the spirit of dedication and devotion.

**Mahatma Basaveshwara**:

**The Need of His Preaching to the Present Education Scenario**

He was born in 1131 A.D. at Bagavedi in Bijapur district. He opposed upanayana and went to Kudalasangam. Then he completed the study of Vedas and puranas. He opposed to follow ill culture in

the name of God. He was appointed aas Karanika (Accountant) in the court of king Bijjalain in Kalyan Kingdom. Later he became the Prime Minister because of his talent and administrative ability.

He followed Shiva. Shiva is an unknown superpower. He opposed He fought against the injustice and inequality in society, especially against the caste system. He spread social awareness and preached equality of all human beings and championed the eradication of untouchability.

Basava advocated the wearing of Ishtalinga, a necklace with pendant that contains a small Shiva linga, which means one's own awareness is his/her teacher and the symbol of equality. Linga worship means a drastic change in social circumstances. According to a tradition, Veerashaivism was transmitted by five Panchacharyas, namely Renukacharya, Darukacharya, Ekorama, Panditharadhya, and Vishweswara, and first taught by Renukacharya to sage Agasthya, a Vedic seer. Basaveswara is credited with uniting diverse spiritual trends during his era. He observed his contemporary society where most of them are superstitions and anti- social elements. There was also sex discrimination and women lived in pathetic. Therefore he revolted against all these evils.

**Mahatma Basaveshwar's Social Reforms**

- All human beings are same
- Soul is same for all human beings irrespective of caste, creed, culture, nationality region and religion
- Good Character is more important than caste
- Against the caste system.
- Good speech and everything good around him/her
- Importance is given to Body, mind and Spirit
- Opposed Idolatry
- Men and women are equal
- Own body is temple
- Rejected Vedas and puranas
- No priest between God and man
- No belief of heaven and hell
- No belief in the theory of rebirth
- Not believed in Child marriages
- Encouraged widow's remarriage
- Control anger
- Opposed theft and murder
- Opposed astrology
- Everyone should do hard work with dedication.
- His Vachanas (Brief Poetry) helped to improve social values and spirituality in daily life

**Conclusion**

In conclusion, we can say that Mahatma Basaveshwara proposed the concept of socialism before Karl Marx. He wanted to create casteless society to improve human values of mercy, compassion, kindness, love and human dignity. He opposed exploitation, discrimination and violence. These ideas are relevant and useful in modern education era to improve their living style to increase human values.

Several works are attributed to Basavanna, which are revered in the Lingayat community. These include various Vachana to attain perfect social and happy life. Scholars state that the poems and legends about Basava were written down long after Basava's death but inspired many followers. He advocated that every human being was equal, irrespective of caste and that all forms of manual labor were equally

important. His message is love and compassion with devotion. Therefore show compassion towards all human beings including animals and plants which is very relevant to us in modern educational era.
The great Indian philosophers, saints and poets like Annamyya, Yogi Vemana and Veerabrahmam were inspired by Mahatma Basaveshwara. Basawa Purana was written by Palkuriki Somanathudu in Telugu. He opposed violence, bloodshed and crime. He proposed equal opportunity for men with women in all fields like social, religious and economic which is relevant to learn. Therefore we go back to our social reformers like Mahatma Basaveshwara to learn philosophy and implement his preaching in daily life is called the real education.

**References**

*Carl Olson (2007), The Many Colors of Hinduism: A Thematic-historical Introduction, Rutgers University Press*

*Encyclopedia Britannica (2012), Quote: "Basava, (flourished 12th century, South India), Hindu religious reformer, teacher, theologian, and administrator of the royal treasury of the Kalachuri-dynasty king Bijjala I."*

*R Blake Michael (1992), The Origins of Vīraśaiva Sects, Motilal Banarsidass.*

*SK Das (2005), A History of Indian Literature, 500–1399: From Courtly to the Popular, Sahitya Akademi.*

*Desai P.B. (1960) Basweshwara and His Times.*

*Mathapasvi H.H. (2003) Prophets of Veerashaivism.*

# महात्मा बसवेश्वरांचे कार्य

**प्रा.डॉ. बडुरे राजू सायन्ना**
*मराठी विभाग, श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी.*

**प्रस्तावना :**

इसवी सन ११३१ च्या सुमारास कर्नाटकातील सध्या विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्वर- बागेवाडी गावी महात्मा बसवेश्वरांचा जन्म एका ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव मादिराज आणि आईचे नाव मादंबा होते. मादिराज यांना एकूण तीन अपत्ये होती. त्यांची अनुक्रमे नावे नागम्मा, देवराज व बसवण्णा अशी होती. महात्मा बसवेश्वर हे जन्मताच कुशाग्र व चिकित्सक वृत्तीचे होते. सनातन ब्राह्मण कुटुंबात जन्मल्यामुळे आपल्या घरात आणि सभोवतालच्या परिसरात पाळले जाणारे कर्मठ विधी, रीतीरिवाज याबद्दल त्यांच्या मनात अनेक प्रश्न उभे राहत असत. खेळण्या-बागडण्याच्या वयातच ते अंतर्मुख होऊन या सर्व प्रश्नांचा चिकित्सक वृत्तीने शोध घेत असत. धर्माच्या नावाखाली अंधश्रद्धेचा आणि पोथीनिष्ठेचाच पगडा लोकांच्या मनावर असल्याचे तसेच मंदिरे देखील शोषणाची केंद्रे बनल्याचे त्यांच्या ध्यानात आले. यज्ञ करते वेळी यज्ञात तूप का टाकावे?, देवाच्या नावाने मुक्या प्राण्यांची बळी का द्यावी?, माणसामाणसात भेद कशासाठी पाळावा? इत्यादी अनेक प्रश्न हे त्यांच्या बालबुद्धीस पडत असत.

बालवयातच त्यांची बुद्धी तल्लख होती म्हणूनच तत्कालीन समाज जीवनातील काही अनिष्ट प्रथांना त्यांनी बालवयातच कडाडून विरोध केला. वयाच्या आठव्या वर्षी गुरू आज्ञेप्रमाणे त्यांच्या वडिलांनी त्यांचे मुंज करण्याचे ठरविले. केवळ जातीच्या प्रतिष्ठेसाठी मुंज करून घेण्याच्या या वृत्तीस बसवण्णांने विरोध करून मुंज नाकारली. अनेक देव-देवतांची पूजा करण्यास पण त्यांचा विरोध होता. अनेक देव-देवतांची पूजा नाकारून एकेश्वरवादाचा पुरस्कार त्यांनी बालवयातच केला. यज्ञयागादी कर्मकांडाला, जातीभेदाला तीव्र विरोध त्यांनी बालपणापासूनच केले. एकंदरीत महात्मा बसवेश्वरांचे बालपण हे विद्रोही विचारानी ग्रासलेले होते. पुढे महात्मा बसवेश्वरांनी 'कुंडल-संगम' येथे विद्यार्जन केले. एके दिवशी संगमेश्वर देवालयात पूजा करीत असताना हातातील लिंगातून ज्ञानप्रकाश किरण त्यांच्या दोन भुवयांमध्ये शिरला. त्यांच्या मनात कल्पनेचा विकास झाला आणि त्यातूनच इष्टलिंगाची कल्पना उदयास आली. 'इष्टलिंग' संकल्पना ही भक्तीचाच एक स्त्रोत, माध्यम आहे. ज्याप्रमाणे वारकरी पंथाने नामभक्तीचा पुरस्कार करून त्याचा प्रसार केला. महानुभव पंथाने स्मरणभक्तीचा प्रसार केला तर महात्मा बसवेश्वरांनी लिंगायत धर्माची स्थापना करून इष्टलिंगभक्तीचा प्रचार आणि प्रसार केला. महात्मा बसवेश्वरांनी 'वीरशैव' पंथाचा अर्थात लिंगायत धर्माचा प्रसार व प्रचार समतावादी विचारधारेतून कर्नाटक आणि महाराष्ट्रात केला. बालपणापासूनच त्यांची विचारधारा समतावादी होती.

**महात्मा बसवेश्वरांचे कार्य :**

कर्नाटक आणि महाराष्ट्र राज्यात महात्मा बसवेश्वरांनी वीरशैव पंथाची म्हणजेच लिंगायत धर्माची स्थापना करून एक नवा आदर्शवादी समाज घडविण्याचे फार मोठे कार्य केले आहे. समाजातील अंधविश्वास, रूढी, प्रथा, परंपरा यांना शह देण्यासाठी व त्याचबरोबर विविध विषयावर चर्चा करण्यासाठी महात्मा बसवेश्वरांनी 'अनुभव मंटपाची' स्थापना केली. या अनुभव मंटपाच्या स्थापनेचा मुळ उद्देशच हा होता की, लोकांमध्ये वैचारिक जागृती निर्माण करणे. या अनुभव मंटपात सर्वांना प्रवेश दिला जात होता. जात, धर्म, पंथ, लिंग याला अजिबात थारा दिला जात नव्हता. समाजातील वाईट चालीरिती यांना विरोध करून समाजाच्या हिताच्या गोष्टीची अंमलबजावणी करणारी एक नवीन यंत्रणा तयार केली. ज्या काळात स्त्रियांना घरातील उंबरवठा ओलांढण्याचे स्वातंत्र्य नव्हते अशा कालखंडात महात्मा बसवेश्वरांनी या संस्थेच्या माध्यमातून स्त्रियासाठी दारे खुली करून दिली. हे एक महत्त्वाचे कार्य महात्मा बसवेश्वरांनी केले होते. बाराव्या शतकातील आदर्श प्रशासक, समतेचे प्रणेते म्हणून महात्मा बसेश्वरांना ओळखले जाते. सर्वप्रथम

लोकशाही मूल्यांची सुरुवात ही महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात अनुभव मंटपाच्या माध्यमातून केल्याचे वचन साहित्यातून दिसून येते. महात्मा बसवेश्वरांनी केलेले विविध कार्य हे पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**समतेचा विचार :**

बारावे शतक हा महात्मा बसवेश्वरांचा कालखंड असून या कालखंडातील सामाजिक जीवन पाहिल्यास समाजात विषमतेची बीजे ही खोलवर रुजलेली होती. हिंदू धर्मात राहून सनातनी परंपरा जोपासत वेद, स्मृती, पुराणे, मनुस्मृती यांच्या वर्चस्वाखाली जगत राहिल्यास कोणत्याच प्रकारचा धार्मिक अथवा व्यावहारिक जीवनाचा विकास होणे अशक्य दिसत नव्हते. ही वस्तुस्थिती महात्मा बसवेश्वरांनी ओळखली होती. त्यामुळे त्यांनी सर्वसामान्य लोकांकडे मानवतावादाच्या दृष्टिकोनातून पाहण्यास सुरुवात केली. समाज जीवनाला अनेक अनिष्ट प्रथेने ग्रासले आहे, प्रत्येक क्षेत्रात भेदाभेद दिसून येत आहे हे सर्व नष्ट झाले पाहिजे यासाठी महात्मा बसवेश्वरांनी विचारातून व कृतीतून कार्य केले. त्यामुळे समाजात समतावादी विचारांचे नवीन  प्रवाह वाहू लागले. समाजातील कर्मकांड, पूजा-अर्चा, यज्ञ-यागादी धार्मिक वृत्तीची पीछेहाट झाली. महात्मा बसेश्वरांनी आपल्या विचारातून समता आणि ममता, आंतरिक भक्ती आणि शुद्धता यांची बैठक घेऊन त्यांनी हिंदू समाजातील सामान्य समाजाच्या पायातील अस्पृश्यतेचे साखळदंड तोडून टाकले. समाजातील जातिभेद, उच्च-नीचपणा या नष्ट झाल्या पाहिजे तरच समाजाचा सर्वांगीण विकास होऊ शकतो यासाठी त्यांनी कार्य केले. तत्कालीन समाजव्यवस्थेला व राजसत्तेला हादरवून टाकणारा आंतरजातीय विवाह महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात घडून आणला. मागास जातीतील संत हरळय्या यांचा मुलगा शीलवंत व मधुररस या ब्राह्मण मंत्र्याची मुलगी कलावती यांच्यात आंतरजातीय विवाह घडून आणला. असा आंतरजातीय विवाह तो ही बाराव्या शतकात हे खूपच क्रांतिकारक आणि धाडसी कार्य होते. या आंतरजातीय विवाहाचा फार मोठा प्रभाव समाज मनावर दिसून आला. समता आंदोलनाला, चळवळीला या विवाहामुळे फार मोठे बळ प्राप्त झाले.

तत्कालीन समाजात स्त्री-पुरुष असा भेद केला जात होता. तत्कालीन समाजव्यवस्थेत स्त्रीला शुद्र, बहिष्कृत समजले जात असे. स्त्रियांवर अन्याय होत होता, म्हणून हा अन्याय नष्ट करण्यासाठी, स्त्री-पुरुष भेद नष्ट करण्यासाठी महात्मा बसवेश्वरांनी स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार केला. पुरुषाहून स्त्री कोणत्याही अर्थाने कमी नाही. स्त्री-पुरुष समान आहेत. निसर्गाने कुठेही स्त्री-पुरुष असा भेद केला नाही म्हणून पुरुषांना जितके अधिकार आहेत तितकेच अधिकार स्त्रियांना सुद्धा मिळाले पाहिजे असा विचार महात्मा बसवेश्वरांनी केला. आपल्या कृतीतून व विचारातून स्त्री पुरुष समानता, स्त्रीमुक्ती, स्पृश्य-अस्पृश्य भेदरहित समाज कल्पना, आंतरजातीय विवाह या समानतेच्या सर्व कल्पनांचा रचनात्मक, मूल्यात्मक आणि सकारात्मक दृष्टिकोन समाजात रुजविण्याचे क्रांतिकार्य महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात केले.

**मूर्तिपूजा व मंदिर संस्कृतीस विरोध :**

महात्मा बसवेश्वरांनी आपल्या अभिनव धर्मात जी काही मुल्य प्रस्थापित केली, त्यातील अनेक देवदेवतांच्या मूर्ती पूजेस त्यांनी विरोध केला आहे. महात्मा बसवेश्वरांनी अनेक देवदेवतांच्या पूजा नाकारून त्यांनी एकेश्वरवादाचा पुरस्कार केला होता. लिंगायत धर्मात मूर्तीपूजेला स्थान नाही हे त्यांनी दाखवून दिले. या संदर्भात बसवलिंग पट्टद्देवरू लिहितात, "महात्मा बसवण्णांनी पृथ्वी, पाणी, अग्नी, वायू, आकाश, सूर्य, चंद्र, पंचभूतांची पूजा, नाग, बैल, गाय, आदी प्राणीपूजा, सरस्वती, गणपती, लक्ष्मी, आदी देवतापूजा, विभूतीपूजा नाकारून, निरंजन, निर्गुण, सर्वव्यापी, परात्पर वस्तूंची पूजा करण्यासाठी इष्टलिंग दिले व इतर सर्व देव देवतांच्या पूजेस नकार दिला." यासंबंधी बसवण्णा एका वचनात म्हणतात,

"दगडाचा देव देव नव्हे II  
मातीचा देव देव नव्हे II  
वृक्षदेव देव नव्हे I  
धातूचा देव देव नव्हे II  
सेतूबंध रामेश्वर I

गोकर्ण काशी I
केदार आणि इतर क्षेत्रीचा
देव देव नव्हे II
तुमच्या अंतर्यामीचा देव शोधा I
तुम्हीच देव आहात II"

देवत्वाची एकूण कल्पना वरील रचनात दिली आहे. दगड, माती, वृक्ष, धातू पासून बनविलेल्या मूर्तीत देवत्व कसे असेल? रामेश्वर, गोकर्ण, काशी, केदार इत्यादी क्षेत्राच्या यात्रा करून देव कसा पावणार? या सगळ्या गोष्टी काल्पनिक व अर्थहीन आहेत. साक्षात देव आपल्या अंतर्यामीच वसलेला आहे. तो देव शोधा म्हणजे देव दिसेल असा संदेश त्यांनी दिला आहे.

तसेच त्यांनी मंदिर संस्कृती बाबतही विचार स्पष्ट केले आहे. मंदिर तेच बांधतात ज्यांच्याजवळ संपत्ती आहे. मंदिर बांधण्यासाठी खूप पैसे लागतात. त्यामुळे श्रीमंत लोकच फक्त मंदिरे बांधू शकतात म्हणून महात्मा बसवेश्वरांनी आपल्या शरणाना मंदिर संस्कृतीपासून दूर ठेवले. महात्मा बसवेश्वरांनी शरीरालाच मंदिर मानले.

**काल्पनिक गोष्टींना विरोध :**

महात्मा बसवेश्वरांनी काल्पनिक स्वर्ग, नर्क व मोक्षादी इत्यादी थोतांड कल्पनांना विरोध केला. स्वर्ग, नर्क, मोक्ष या भ्रामक कल्पना आहेत यात तथ्य नाही. खरे बोलणे, सदाचाराने वागणे हाच स्वर्ग असून असत्य बोलणे आणि वागणे हा नर्क आहे. स्वर्ग, नर्क पाताळात कल्पना केली तर एकच देव सापडेल तो म्हणजे कूडल संगमदेव. अशा पद्धतीने महात्मा बसवेश्वरांनी स्वर्ग, नर्क, मोक्ष या काल्पनिक गोष्टींचा सातत्याने विरोध केला आहे.

अंधश्रद्धा, कर्मकांड, अनिष्ट रूढी व परंपरांना विरोध :

बाराव्या शतकातील समाज जीवनात ज्या काही अंधश्रद्धा, कर्मकांड, अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा यांचे प्राबल्य वाढले होते त्या सर्व प्रथा-परंपरांना महात्मा बसवेश्वरांनी विरोध केला. अंधश्रद्धा, कर्मकांड, जातीयता, बळी प्रथा, व्रतवैकल्य, उपास-तपास इत्यादीवर प्रखर हल्ला केला. अत्यंत कठोर शब्दात त्यांनी या सर्व गोष्टीवर टीका केली आहे. ते आपल्या वचनात म्हणतात,

"बोलता चालता देती तुझा बळी, अरे बोकडा रड रे बाबा
वेद जाणकारासमोर रड रे बाबा
शास्त्र जाणकारासमोर रड रे बाबा
तुझ्या रडण्याने त्यांना योग्य शासन होईल कूडल संगमदेवा"

अशा पद्धतीची क्रांतीची, विद्रोहाचची भाषा महात्मा बसवेश्वरांनी वापरून आपल्या चळवळीला गतिमान केले. समाजातील अनिष्ट रूढी, परंपरांचा नायनाट करण्यासाठी त्यांनी वीरशैव धर्म स्थापन केला होता. या वीरशैव धर्माच्या माध्यमातून समाजातील या अनिष्ट रूढी, परंपरा नष्ट करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

**विश्वसंदेश :**

महात्मा बसवेश्वरांनी आपल्या वीरशैव धर्माच्या माध्यमातून विश्वाला काही मौलिक अशा पद्धतीचा संदेश दिला आहे. ज्यामध्ये चोरी कधीच करू नये, पशु, पक्षी, प्राण्यांची हत्या करू नये, नेहमी खरे बोलावे, खोटे कधी बोलू नये, क्रोध कधी कधी करू नये, नेहमी सौजन्याने वागावे, सर्वांना समान लेखावे, कुणाचेही शोषण करू नये, नीतीने व्यवहार करावा, आत्मस्तुती करू नये, प्रत्येकांनी अंगी दया बाळगावी, कष्टाने धन मिळवावे इत्यादी गोष्टीं अंगीकारल्याने मानवी जीवन सुखी व संपन्न होते. यासाठी महात्मा बसवेश्वरांनी हे संदेश विश्वकल्याणासाठी विश्वाला दिले आहे.

**सारांश :**

महात्मा बसवेश्वर हे लहानपणापासूनच धर्मविरोधक व क्रांतिकारक वृत्तीचे होते. बालपणातच त्यांनी विद्रोहाची भूमिका स्वीकारून मुंज विधीला नाकारले. मुंज नाकारणारा पहिला विद्रोही बालक म्हणून महात्मा बसवेश्वरांना

ओळखले जाते. अनेक देवदेवतांचा पूजा करण्यास विरोध करून एकेश्वरवादाचा स्विकार करणारे, यज्ञयागादी कर्मकांडाला, जातीभेदाला विरोध करणारे महात्मा बसवेश्वर होते. महात्मा बसवेश्वरांनी समताधिष्ठित समाजरचना करण्यासाठी वीरशैव धर्माची स्थापना केली. सर्व प्रथम लोकशाही मूल्यांची सुरुवात ही महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात 'अनुभव मंटपाची' स्थापना करून बहुजन समाजाला व दलितांना एकत्र आणून त्यांच्या मनात समतातत्त्वे प्रस्थापित केली. समाजातील ज्या अनिष्ट प्रथा, रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, कर्मकांड, जातीयता, भेदाभेद इत्यादी प्रथांना समाजातून नष्ट करण्यासाठी आपली एक स्वतंत्र तत्त्वप्रणाली निर्माण केली. या तत्वप्रणालीच्या माध्यमातून समताधिष्ठित समाजरचनेची निर्मिती केली. समतेचा विचार, स्त्री-मुक्ती, मूर्तिपूजा व मंदिर संस्कृतीस विरोध, स्वर्ग, नर्क, मोक्ष या काल्पनिक गोष्टींना विरोध, दलित संवेदना इत्यादी कृतिशील विचार महात्मा बसवेश्वरांच्या केलेल्या क्रांतिकारक कार्याने घेतला आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

*कपाळे चंद्रशेखर : 'मराठी वीरशैव संत कवी : बसवलिंग चरित्र आणि वांगमय', शैव भारती शोध प्रतिष्ठान, जंगमवाडी मठ, वाराणसी.*
*पट्टद्देवरू बसवलिंग : 'बसवतत्वांचे आचरण आणि आपण', महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी.*
*पाटील भिमराव ब. : 'ऐतिहासिक बसवकल्याण', महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी.*
*आनेराव- कडगे श्रीदेवी गंगाधर : 'महात्मा बसवेश्वर व्यक्ती आणि वांगमय', इसाप प्रकाशन, नांदेड.*
*भगवान अंजनीकर : 'थोर समाजसुधारक महात्मा बसवेश्वर.'*
*विकिपीडिया.*

## सामाजिक क्रांतीचे अग्रदूत - महात्मा बसवेश्वर

**डॉ. नारायण शिवशेट्टे**
*पानसरे महाविद्यालय अर्जापूर, ता.बिलोली जि. नांदेड. मो.नं.९४२२५५८५७३*

मंगळवेढा राज्यात कळचूर्य वंशीय घराण्याचे राज्य होते. हे कळचूर्य कल्याणच्या चालुक्य घराण्याचे मांडलिक राजे होते. कळचूर्यांनी ' इंगळेश्वर बागेवाडी ' विभागाचे ' पुरवराधिश्वर ' पद बागेवाडी ( जि.विजापूर ) मादिराजांना बहाल केले होते पुरवराधिश्वर हा पंचक्रोशीतील बारा गावचा प्रमुख असे.

' मादिराज - मादलांबिका ' पती-पत्नीस ज्येष्ठ पुत्र ' देवराज ' व जेष्ठ कन्या ' नागलांबिका ' होती. पुरावराधिश्वर मादिराज धार्मिक, सात्विक व सद्वर्तनी असे शैव ब्राह्मण होते. बागेवाडी ऐक प्राचीन नंदिकेश्वर शिवमंदिर आहे. प्रवेशद्वारावर गजलक्ष्मी, आठ दिशांचे दिक्पाल, छतावर मधोमध कोरलेली नटराजाची मूर्ती अशा कलात्मक शिल्पसौंदर्याने शृंगारलेल्या शिवालयाच्या गाभार्यात मोठे शिवलिंग आहे. शिवलींगासमोरचा भव्य नंदी पाहणाऱ्यांच्या मनात भक्तिभाव निर्माण न करील तरच नवल.

बागेवाडीच्या जीवनात असाच एक शुभ दिवस उगवला इ.स ११०५ मधील वैशाख शुद्ध तृतीया, रोहिणी नक्षत्रावर अक्षय तृतीयेच्या शुभ दिवशी मादलांबिकेला दुसऱ्यांदा पुत्ररत्न झाले.बागेवाडी आनंदात निमग्न झाली. नंदीचा कृपाप्रसाद म्हणून मुलाचे नाव ' बसव ' असे ठेवण्यात आले. हाच 'बसव ' किंवा ' संगन बसव ' पुढे समता युगाचा दृष्टा प्रारंभकर्ता महात्मा बसवेश्वर म्हणून जगापुढे आला.

महात्मा बसवेश्वरांच्या जन्मापूर्वी या देशात लोकायत, महावीर व गौतम बुद्ध सारख्या महात्म्यांनी मनुष्यांना कर्माच्या बंधनात अडकून टाकलेल्याना त्यांचे शोषण करणाऱ्यांना शिवाय जन्माधिष्ठित श्रेष्ठत्वाचा कल्पनेस नाकारले. शुद्र अतिशूद्र आधी सर्वांना सर्व रीतीने समानतेने जगण्यासारखे समाजाची कल्पना दिली मात्र बसवेश्वरांनी याची साधना करण्याचा व साध्य करण्याचा मार्ग दाखवून दिला. शिवाय तो आचरणात आणून दाखविला.

महात्मा बसेश्वरांचा देव अंतःसाक्षी आहे. अशा देवाला जाणण्यापूर्वी मूर्ती रूपातील देव हा बसवण्णाचा देव नव्हता. त्या अंतःसाक्षीलाच इष्टलिंग रूपात पाहिले आणि म्हणून इष्टलिंग हे अंतःसाक्षीचे संकेत (प्रतिक) झाले त्या अंतःसाक्षीच्या समोर सारे जगच एक होऊन राहते म्हणूनच सकल जीवमात्रांनी भरलेल्या जंगम जगतालाच अर्थात सकल जीवात्म्यांचा समूहाला देव समजले अशा रीतीने अंतःसाक्षी देव आणि समाज हे त्यांनी वेगवेगळे कधीच पाहिले नाहीत या कारणामुळेच बसवण्णांना लोकात, समाजात देवाचा साक्षात्कार झाला.

' स्वयं लिंगाअनुभवी झाल्यानंतर
कोठला देवलोक, कोठला मृत्युलोक ?
कोठला भेदभाव, कशात भेदभाव हो ?
आलस्य कोठे, कुडलसंगम देवा जवळ ?

( म. बसवेश्वर वचन क्र ९४७ संपुट -१)

बसवेश्वरांना जेव्हा अंतरंगातील देवाचा साक्षात्कार झाला. तेव्हा त्यांना सर्वत्र अभेद दिसू लागले. भेदाभेद भ्रम अमंगळ वाटू लागले. यात तारतम्य ( भेदभाव ) करण्याचे ज्ञान तृणसमान असल्याची जाणीव होऊ लागली. त्यांनी हे सत्य जगाला सांगण्यासाठी जे श्रम घेतले, त्यात त्यांना अजिबात कंटाळा व थकवा आला नाही.

समाज आणि देव ( परशिव) हा गंडभेरुड पक्षाप्रमाणे दोन शिरा आणि एक शरीर असल्यासारखे आहे. शिर वेगवेगळे असले तरी देह एकच असतो -

' भेरुंड पक्षाला देह एक, डोळे दोन
दोन डोक्यामध्ये पडला बांधून

एका डोक्यामध्ये दूध, एका डोक्यामध्ये विष ओतल्यास
त्या एका देहात सोडणार नाही का विष ?
लिंगाची पूजा करून, जंगमाची निंदा केल्यास
कुडलसंगम देवा पहा, मी होरपळून गेलो खास.
( म.बसवेश्वर वचन क्रं १२९९ संपुट - १ )

बसवेश्वरांना इष्टलिंग हे परिपूर्ण समाजाचे प्रतीक असल्याचे दिसते. अशा प्रतीकाला हे ' शरणार्थी ' असे म्हणून अभिवादन करतात. त्या प्रतीकानुसार त्या प्रत्येकाला शोभेल असे समाजाभिमुख आचरण असायलाच पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे.

सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि स्त्री-पुरुषांच्या मध्ये समानता साधल्याशिवाय कल्याण समाजाची स्थापना करणे असंभव आहे. अशी समानता साधण्यासाठी समाजाला वर्ग रहित, वर्ण रहित आणि लिंगभेद रहित ( स्त्री-पुरुष भेदरहित ) झाले पाहिजे. अशा रीतीने समता समाजासाठी बसवण्णांनी आपले तन-मन-धन अर्पण केले. अमानवीय असलेल्या सर्व बाबीवर प्रश्न उपस्थित केले. सर्व दृष्टीने शेवटच्या वर्णातील मनुष्य म्हणून घेणाऱ्यांना मनुधर्मानुसार निर्मित अस्पृश्यतेच्या व सहाय्यकारी कुंडात खितपत पडलेल्यांना पाहून बसवण्णा अतित्रासून दुःखी कष्टी झाले. स्वतः मागास जातीकरणाचा अवलंब करून एक नवीन मनस्थितीतच मिळविली. अस्पृश्यता प्राप्त जाती ही केवळ जाती नसून त्यामागे सर्वांकरिता हेतुपुरस्पर उत्पादन व्यवस्था असते.अस्पृश्यांच्या विरोधात शोषण व्यवस्था असते. शिवाय त्यात अनादर आहे, अपमान आहे , हिंसा आहे , दुःख आहे , योग्य प्रतिफळ नसलेले कष्ट आहे, असहाय्यता आहे , भूक आहे सवर्णांचे हे सारे कर्मकांड पाहून बसवेश्वर जातीकूपामध्ये खितपत पडलेल्या अखेरच्या मनुष्य पर्यंत धावून गेले आणि त्यांना खांद्यावर बसविले आणि वर काढले.

महात्मा बसवेश्वर अस्पृश्यांच्या बाजुने नुसते उभे टाकले नाही तर अनैतिक संबंधातून जन्मुन समाजात अतिकनिष्ठ होऊन जगत असलेल्या बाळांच्या वतीने अभय देण्यासाठी ढाल होऊन राहिले. महात्मा बसवेश्वर किती संवेदनशील होते हे कुडलसंगम देवाला साक्षी बनवून स्वतः अनाथ बाळ झाले.

' मातंग चन्नय्यांच्या घरचा दासपुत्र,
ढोर कक्कयाच्या घरची दासीकन्या,
गेले होते शेतात गोवऱ्या वेचण्या,
त्या दोघांनी तेथे संग केला
त्या दोघांच्या पोटी माझा जन्म झाला
कुडलसंगमदेव यास साक्षी ।
( म.बसवेश्वर वचन क्रं ३४६ संपुट - १ )

मनू हा जातिसंकराचा विरोधक होता. मात्र जातिसंकरच बसवधर्माचा प्राण झाला होता. नैतिक शक्तीपुढे जात-पात ही किती फोल आहे हे बसवेश्वरांनी आपल्या ह्यातीत दाखवून दिले. यावरून असे दिसून येते की बाराव्या शतकात कल्याण नगरीत बसवेश्वरांनी पेटवलेली क्रांतीची ज्योत कधीही शमणार नाही. याची या जगाला जाणीव होऊ लागली आहे.

' हत्या करणारा मातंग ,
अभक्ष भक्षण करणाराच महार,
कुळ म्हणजे काय ? त्यांचे कुळ असे कोणते ?
सकल जीवात्म्याचे कल्याणा चिंतितात
असे आमच्या कुडलसंगमदेवाचे
शरणगणना कुलीन होत ।
( म.बसवेश्वर वचन क्रं ५९१ संपुट - १ )

येथे ' हत्या करणारा ' आणि ' घाण करणारा ' हे शब्द यज्ञासंबंधी आहेत. यज्ञ करणारे, यज्ञात बळी देणारे आणि कायक न करणारे, घाण खाण्यामध्ये, धार्मिक भ्रष्टाचार करण्यामध्ये तल्लीन झाले आहेत, असे बसवेश्वर सुचवितात. जिवाचा बळी घेणाऱ्यांना आणि यज्ञ संस्कृतीला विरोध करणारे शरणगण सकल जीवात्म्याचे कल्याण साधण्याची अपेक्षा ठेवणारे होत असे सांगणारे बसवेश्वर त्यांचा पर्याय सुचवतात कायक व्यवस्थेची कल्पना रुजवितात. भौतिक आणि अध्यात्मिक पृष्ठभूमीतील या व्यवस्थेमध्ये मागणारा भक्त नव्हे ! बसवेश्वरांनी आम्हास दिलेली ही देणगी आहे अशा समाजासाठी आज विश्व उत्सुक आहे.

समाजात आढळणाऱ्या कर्मकांडांना अनेक देवता उपासना कारणीभूत वाटल्यावरून बसवेश्वरांनी एकदेवतोपासनेचा हिरिरीने पुरस्कार केला. शिवस्वरूप विश्वाची प्रतिकृती आणि मनाने इच्छिलेले इष्ट ते देणाऱ्या इस्टलिंगाची भक्ती करावी. लहान आकाराचे इष्टलिंग प्रत्येक स्त्री पुरुषाने आपल्या अंगावर धारण करावे म्हणजे मग केव्हाही, कोठेही सुलभ शिवभक्ती करता येऊ शकते. मग देऊळे-रावळे, तीर्थक्षेत्रे इत्यादी ठिकाणी जाण्याची अजिबात गरज नाही. अशीही इष्टलिंग दीक्षा कोणालाही घेता येईल. स्त्री असो वा पुरूष, चारही वर्णातील सर्व जातीतील गरीब-श्रीमंत राजा-रंक त्यासाठी पात्र आहेत अशा लिंगधारी व्यक्तीची पूर्वाश्रमीची जात नष्ट होईल आणि सर्वजण लिंगायत होतील मग त्यांच्यात उच्च-नीच, गरीब-श्रीमंत ,शिक्षित - अडाणी असा कोणताही भेदभाव उरणार नाही त्यांच्यात रोटी-बेटी व्यवहार ही होऊ शकतील.

संस्कृत भाषेतील ज्ञान सर्व जाती वर्णांना शोषित पीडितांना कळत नाही म्हणून देववाणी संस्कृत ऐवजी आपल्या बोलीभाषेत लोकभाषेत बोलावे व लिहावे स्त्रिया व शूद्रांना ही विद्यादान करावे कारण सर्व जाती वर्णातील सर्वच व्यवसायातील लोकांना स्वतःचा उद्धार करून घेण्याचा अधिकार आहे ते तसे पात्र आहेत बाराव्या शतकात असा क्रांतिकारक नवधर्म संदेश महात्मा बसवेश्वरांनी दिला आहे.

महात्मा बसवेश्वरांनी समूह चर्चेतून अनेक चांगल्या गोष्टी स्वीकारल्या इष्टलिंग उपासकांना बसवेश्वरांनी जीविकोपार्जनाचे काम करणे आवश्यक केले. संन्यास, निष्क्रियता, ऐतखाऊपणा, भिक्षा मागणे पाप ठरविले. कायक संकल्पना जगातील यापूर्वीच्या एकाही धर्म पंथात सांगितलेली नव्हती यापुढे जाऊन ' स्वर्ग-नरक' ही पारंपरिक कल्पना ही त्यांनी नाकारली. पुनर्जन्माचा व कर्मविपाकाचा सिद्धांतही नाकारला. आपण राहतो जगतो ते जग खोटे मांनले नाही ते म्हणत ' या जगातच चांगली कर्मे केल्याने स्वर्गासम सुखे प्राप्त होऊ शकतात. तर वाईट कृत्याने पृथ्वीवरच नरकासम यातना भोगाव्या लागतात. त्यांनी स्पृश्य-अस्पृश्यता, कठोर ब्रह्मचर्य पाळणे, वानप्रस्थाश्रम स्वीकारणे, इंद्रियनिग्रह हिंसा इत्यादी प्रकारांचा निषेध केला. महात्मा बसवेश्वर आस्तिक व श्रद्धाळू होते मानवतेवर व माणुसकीवर त्यांची अतूट श्रद्धा होती. म्हणून दया, करूणा, परोपकार यासारख्या जीवनमूल्यांचा त्यांनी पुरस्कार केला. वेश्या, दारू विक्रेते, चोर, दरोडेखोर यासारख्या सामाजिक गुन्हेगारांना अत्यंत उदार मनाने क्षमा करून त्यांना सज्जनांच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले.

आपल्या देहालाच देवालय करा. असा संदेश महात्मा बसवेश्वरांनी समाज बांधवांना दिला होता. देहालय हेच खरे पवित्र देवालय होय अशी महात्मा बसवेश्वर यांची आंतरिक श्रद्धा होती संत तुकोबारायांच्या ' देह हेच देऊळ आत्मा पंढरीनाथ ' या विचाराशी साधर्म्य साधणारे महात्मा बसवेश्वर यांचे हे मौलिक विचार आहेत. बसवण्णांने अंधश्रद्धेचा तिरस्कार केला आहे त्यांनी आपल्या शिष्यांना अंधश्रद्धांचा त्याग करण्यास सांगितले शुभकार्यासाठी ज्योतिषाकडून मुहूर्त पाहण्याची लिंगायताला गरज नाही असा बसवाचा दृष्टिकोन होता बसवेश्वरांनी अस्पृश्यांची अभिनव व्याख्या केली आहे ती अशी -

' हत्या करणारा नीच म्हणावा
कुंजके मांस खाणारा कनिष्ठ जातीचा म्हणावा
सर्व जीवसृष्टीवर प्रेम करतो
तोच उत्तम जन्माचा म्हणावा । '

बसवाने संत एकनाथाप्रमाणे वर्णाश्रम धर्माच्या विरुद्ध आचरण करून महाराच्या घरी जाण्याचे धाडस दाखविले यातून त्याचा परिवर्तनवादी दृष्टिकोन दिसून येतो.

' कायक वै कैलास ', ' श्रम हाच स्वर्ग ' हे महात्मा बसवेश्वर यांचे प्रसिद्ध वचन आहे कायक चा शब्दशः अर्थ देहाशी निगडीत ते ते सर्व असा होतो. काया म्हणजे देह किंवा शरीर अंगमेहनत किंवा व्यक्तीने केलेले कुठलेही कार्य असा त्याचा अर्थ होतो बसवा च्या मते प्रत्येक व्यक्तीने आपला चरितार्थ चालविण्यासाठी कोणतातरी व्यवसाय केला पाहिजे. प्रमाणिकपणे कार्यरत असणे, या गोष्टीला त्यांनी अत्यंत महत्त्व दिले आहे.

महात्मा बसवेश्वर व त्यांच्या अनुयायांचे विचार ' Works is Worship ' या विचारसरणीशी तंतोतंत जुळणारे वाटतात. राजाराम मोहनरॉय, महात्मा फुले राजर्षी शाहू महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी धोंडो केशव कर्वे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी जी स्वप्ने एकोणिसाव्या व विसाव्या शतकात पाहीली ती महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात आमलात आणली होती.

महात्मा बसवेश्वरांनी केलेल्या सामाजिक सुधारणा क्रांतिकारक स्वरूपाच्या होत्या. त्याने पुरस्कृत केलेली आदर्श तत्वे प्रत्यक्ष व्यवहारात व आचरणात आलेली होती. सर्वसामान्य लोकांना त्यांची शिकवण समजली होती आणि त्यामुळेच असंख्य लोक त्यांचे अनुयायी झाले होते.भारताच्या इतिहासात बाराव्या शतकातील एवढ्या मोठ्या स्वरूपाची धार्मिक आणि सामाजिक चळवळ म्हणून लक्षात घेतली जाते एवढ्या मोठ्या सामाजिक व धार्मिक क्रांतीचा प्रणेता असलेला महात्मा बसेश्वर हा अदितीय नम्रता भाव असलेला माणूस होता म्हणून तो एका वचनात म्हणतो की,

' माझ्याहून नीच नाही कुणी ही<br>
शिवभक्त हुन श्रेष्ठ नाही कुणी ही<br>
तुझे चरण पहा<br>
हे कुडल संगमेश्वरा<br>
हीच माझी परीक्षा होय! '

जातीभेदाचे उच्चाटन, अस्पृश्यता निर्मूलन , स्त्री पुरुष समानता या साऱ्या चळवळीचे श्रेय बसवण्णाकडेच जाते हे मान्य करावे लागेल. बाराव्या शतकात बसवाने भक्ती मार्गाची शिकवण जनतेला दिली जे कार्य महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर, संत नामदेव आणि संत तुकाराम यांनी केले तेच कार्य महात्मा बसवेश्वरांनी कर्नाटकात केले आहे.

सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे अखंड चालू असते. तिचा प्रवाह कधी संथ गतीने तर कधी द्रुत गतीने नेहमीच पुढे पुढे सरकत असतो. परिवर्तनाच्या प्रक्रियेत प्रवाह लुप्त झाल्या सारखा वाटत असला तरी तो नष्ट होत नाही. पण त्यासाठी महात्मा बसवण्णासारखे दूरदर्शी, कर्तव्यनिष्ठ प्रयत्नवादी आणि विवेकी नेत्यांची साथ लाभावी लागते. तरच झालेल्या परिवर्तनाच्या फलश्रुतीची चव सर्वांना चाखायला मिळते. मध्ययुग आणि आधुनिक युगातील सामाजिक प्रबोधनाचे कार्य आणि त्यांच्या स्वरूपात अगदी भिन्नता जाणवते बसवण्णांचा जीवन विषयक दृष्टिकोन आणि आधुनिक काळातील सामाजिक प्रबोधन कार्याचा दृष्टिकोन यात गुणात्मक फरक आहे वैज्ञानिक युगाचा शोध लावण्यापूर्वी बसवनण्णानी धर्म, जात, कुटुंब, विवाह, राज्य इ. सामाजिक संस्था कशा उदयास येतात. कोणत्या परिस्थितीत त्या प्रभाव पडतात आणि त्यांचा ऱ्हास कसा होतो याचे शास्त्रीय विश्लेषण वचन साहित्यातून केले आहे.

महात्मा बसवेश्वर हे सामाजिक क्रांतीचे अग्रदूत होते. समाजातील कुप्रथेचे त्यांनी समोर नाश केलेला आहे. समाजातील कुप्रथा म्हणजे जाती पद्धतीमुळे होणारा भेदभाव आक्रमक समाज व संग्रह प्रवृत्ती इ. संपविण्यासाठी त्यांनी आटोकाट प्रयत्न केले. महात्मा बसवेश्वरांनी अंत्यजाच्या उद्धाराकरिता त्यांनी आपले जीवन वेचले. समाजामध्ये समानता प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी इष्टलिंग निर्माण केले. इष्टलिंग धारण केल्याने व्यक्तीची पूर्व जाती नष्ट होऊन तो शिवकालीन होतो. बसवेश्वरांनी वचनातून सांगितले आहे की, शास्त्रे, पुराणे, गीता, वेद, उपनिषद यामध्ये उदात्त तत्त्वांचा उपदेश दिला गेला आहे. पण विप्रांचा मार्ग, त्यांचे बोलणे- वागणे ह्यामध्ये एकरुपता नाही. यज्ञाच्या नावावर

गोमांस भक्षण करणारे अस्पृश्य होत. व्यास भोईनीचा पुत्र, मातंगीचा पुत्र- मार्कंडेय, मंडूकाची कन्या मंडोदरी, अगस्त-बेरड, दुर्वास-चांभार, कश्यप-लोहार कौण्डिन्य ऋषी- न्हावी अशा प्रसिद्ध ऋषीमुनींचा जन्म निम्न कुळात झालेला असताना देखील आपल्या विद्वत्तेने, ज्ञानाने, योग्यतेने ते प्रसिद्ध झाले. म्हणून जन्माने कुणी श्रेष्ठ नसतो, आपल्या कर्तव्याने, तपस्येने साधनेने व्यक्ती जो महान बनतो तोच कुलीन होय असे त्यांचे मत होते.

महात्मा बसवेश्वर क्रांतिकारक होते, अचानकपणे झालेला बदल म्हणजे क्रांती असा सामान्यतः क्रांतीचा अर्थ घेतला जातो. परंतु हा क्रांती चा अर्थ संकुचित व अपूर्ण आहे. सामाजिक जीवन ज्या मूल्य व्यवस्थेवर उभे असते, त्या मूल्यव्यवस्थेत बदल करणे म्हणजे क्रांती होय. याचा अर्थ मूल्यांतर म्हणजे क्रांती. मूल्यांतर म्हणजे व्यक्ती आणि समाजाच्या वैचारिक दृष्टिकोनात व कलामध्ये बदल घडवून आणणे होय. महात्मा बसवेश्वरांनी व्यक्ती व समाजाच्या वैचारिक दृष्टिकोनात बदल घडून आणण्यासाठी अथक प्रयत्न केले म्हणून ते खरे क्रांतिकारक होते.

भारतीय तत्वज्ञानात इहजीवनाचा आणि श्रमाचा इतका गौरव महात्मा बसवेश्वरांनी प्रथमच केला. संन्यासवादाला लाभलेली प्रतिष्ठा त्यांनी काढून घेतली. हे त्यांच्या तत्त्वद्रष्टीचे एक लक्षणीय अंग आहे. पारलौकिकाचे स्तोम माजलेल्या निवृत्तीप्रधान समाजात नवनिर्मितीचे कार्य होऊ शकत नाही. समाजजीवन क्रियाशील बनावे यासाठी ऐहिक जीवनाला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. नाही तर सामाजिक शक्ती उत्तरोत्तर क्षीन होत जातात असा इतिहास आहे. बसवेश्वरांनी कर्मवादी वीरप्रवृत्तीची चेतना समाजजीवनात ओतली आणि पुरुषार्थाचा ध्वज त्यांनी फडकविला. निढळाचा घाम काढणारा माणूस सामाजिक जीवनात त्यांनी प्रतिष्ठेने उभा केला. हे त्यांचे कार्य व सामान्य स्वरूपाचे आहे. संन्यासाश्रम व वानप्रस्थाश्रमामुळे या देशाच्या अर्ध्या लोकसंख्येची श्रमशक्ती निष्क्रिय व कुंठित झाली ही समाजाची व देशाची हानी होय.

महात्मा बसवेश्वरांच्या पूर्वीच्या काळात भूमिप्रदेश जिंकण्यासाठी स्त्रियांसाठी जगात अनेक लढाया व क्रांत्या झालेल्या होत्या यातूनच रामायण व महाभारत ही घडले, परंतु मानवतेच्या कळवळ्यापोटी मंदिर प्रवेश नसणाऱ्या अठरापगड देवपुत्रांच्या, शूद्रअस्पृश्य स्त्री-पुरुषांच्या तळहातावर समताप्रतीक इष्टलिंग ठेविले गोरगरिबांचे भुकेसाठी हाल होऊ नये यासाठीच ' कायकत्व ' सांगितले म्हणूनच झाली कल्याण क्रांती.

समाजाची उंची व संस्कृतीचे श्रेष्ठपण व्यक्तीच्या सदाचरणावरच अवलंबून असते. आदर्श समाजाच्या निर्मितीसाठी जशी व्यक्तीची आत्मशुद्धी महत्त्वाची तसाच बाह्य आचारही महत्त्वाचा आहे. आकाशात स्वर्गाची अशी वेगळी वसाहत नाही. पृथ्वी खाली पातळही नाही. जेथे माणुसकी, दया, क्षमा, शांती, समता, सत्य, करुणा, प्रेम, चारित्र्य व सौजन्य असेल तोच सदाचार होय तेथेच साक्षात स्वर्ग ! बसवण्णा म्हणतात,

' सत्य बोलणे हाच देवलोक
असत्य बोलणे हाच मृत्युलोक
आचारच स्वर्ग ! अनाचारच असे नरक
सदैव करावी सज्जन संगती ।
नको नको संगती दुर्जनांची
असो सर्प कोणताही, विष त्याचे एक ।
म्हणूनिया देख संग नको ।।

समता, सन्मती, सद्गुणांचे आचरण करा. रज, तम, क्रोध, यापासून मुक्त झाल्यावरच खरा अनुभव अनुभूती येईल.

देवळांची निर्मिती, व्यवस्थापन, यज्ञाचे आयोजन या विषयावर पुराणग्रंथ आहेत. परंतु बळी देऊ नका, जादूटोणा, भूत योनी, सतीप्रथा, जारण मारण विद्या. मंत्र-तंत्र, अघोरी विद्या या अंधश्रद्ध विचाराचे खंडन कोणताही पुराणग्रंथ करीत नाही. महत्त्वाची बाब म्हणजे शुद्र, अतिशूद्र, बारा बलुतेदार, शेतकरी आणि स्त्रिया यांना मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश नव्हता या पार्श्वभूमीवर महात्मा बसवेश्वर म्हणतात,

' सधन बांधिती गोपुरे मंदिरे ।
देवा ! मी गरीब करू काय ?
देहाची असे देवालय । '

महात्मा बसवेश्वरांनी अनुभव मंटपाचा सभामंटप व गाभारा अतिविशाल व अनंत केला पृथ्वीवरील मानव जात त्यात अंतर्भूत होऊ शकेल एवढा अनुभवमंटप आकाश मंटपाएवढा झाला.

संस्कृत ऐवजी जनसामान्यांच्या लोकभाषेचा पुरस्कार व स्त्रियांना स्त्रीलिंग दीक्षा देऊन समतेची वागणूक देणारा परस्परांत रोटी-बेटी व्यवहार यांचे नातेसंबंध प्रारंभ करणारा महामानव म्हणजे महात्मा बसवेश्वर. पाप-पुण्याच्या, स्वर्ग-नरकाच्या अर्थशून्य भाकडकथा, कर्मसंन्यास सिद्धांत नाकारणारा बंडखोर क्रांतिकारक म्हणजे महात्मा बसवेश्वर. स्त्रियांना साक्षर करून उजेडाची नक्षत्र फुले देणारा, मुक्तीचे पंख देणारा मुक्तिदाता, विवेकवादी विश्वविभूती म्हणजे महात्मा बसवेश्वर ! शोषणमुक्त समाजाची निर्मिती करणारा, सामाजिक बांधिलकी स्वीकारणारा आणि उपेक्षित व्याकूळ शुद्रांना हृदयाशी कवटाळणारा, सर्वांचा लाडका करुणासागर अण्णा म्हणजे महात्मा बसवेश्वर होत.

आज नऊशे वर्षानंतरही कोट्यावधी लोकांच्या अंतर्यामीच्या गाभाऱ्यात महात्मा बसवेश्वर यांची कोरीव मूर्ती अजरामर होऊन राहिली आहे आक्रमकांच्या टापांखाली ती चिरडली गेली नाही. भूकंपाने उद्ध्वस्त झाली नाही की धर्मांतराच्या पुरात वाहून गेली नाही. काळ प्रवाहात कित्येक राजे-महाराजे सम्राट राज्यकर्ते आलेत,गेलेत. परंतु काळ ही महात्मा बसवेश्वरांना संपवू शकला नाही. आज एकविसाव्या शतकातही महात्मा बसवेश्वर यांचे इष्टलिंग स्त्री-पुरुषांच्या मर्मबंधात समतेचा संदेश देत डौलत डुलत आहे.

लोकनायक जयप्रकाश नारायण म्हणाले होते, ' वर्णभेद, वर्गभेद, उच्चनीच भेद, स्पृश्यास्पृश्य भेद या विरुद्ध सर्वप्रथम झगडणारे महात्मा बसवेश्वर हे आद्य समाजसुधारक होत. कर्मठ, सनातनी व उच्चप्रभू लोकांच्या स्वार्थी दडपणाला पहिला टोला मारलेले बसवेश्वर हे थोर समाजक्रांतिकारक होते.

बाराव्या शतकातील धार्मिक-सामाजिक क्रांतीला आपण खऱ्या अर्थाने बसवाची क्रांतिकारी चळवळ म्हणून ओळखतो. कारण या ऐतिहासिक चळवळीचा बसवेश्वर एक सर्वमान्य नेता होता. काळाच्या मर्यादा झुगारून महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकातील सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक चळवळीचे नेतृत्व केले म्हणूनच काळाच्या भाळावरती उमटलेली 'बंडखोर समाजसुधारक ' ही बसवेश्वरांची प्रतीमा कोणालाही पुसून टाकता येणार नाही.

**संदर्भ सूची :**

*डॉ अशोक मेनकुदळे - क्रांतिकारी महात्मा बसवेश्वर, महाराष्ट्र बसव परिषद, भालकी जि.बिदर (कर्नाटक), चतुर्थ आवृत्ती, नोव्हेंबर २०१५.*

*प्रा.बाबूराव माशाळकर व प्रा.डॉ. म.ई.तंगावार ( संपादक) - बहव सिद्धांत, महाराष्ट्र बसव परिषद, भालकी जि.बिदर (कर्नाटक), प्रथमावृत्ती २०१२.*

*रमजान दर्गा(मूळ कन्नड लेखक) बसव प्रज्ञा , ( अनुवादक राजेंद्र जिरोबे) महाराष्ट्र बसव परिषद, भालकी जि.बिदर (कर्नाटक), पाचवी आवृत्ती २०१६.*

*डॉ अशोक मेनकुदळे - समतासूर्य महात्मा बसवेश्वर, महाराष्ट्र बसव परिषद, भालकी जि.बिदर (कर्नाटक), चतुर्थ आवृत्ती, नोव्हेंबर २०१७.*

*बाळासाहेब पाटील (संपादक) - बसवपथ, कोल्हापूर द्वैमासिक मार्च- एप्रिल २०२०.*

---

# MAHATMA BASAVESHWARA VISHWAGURU – A RAY OF HOPE FOR MANKIND GROPING IN THE DARK

**Shri Ganjare Bhalchandra Uttamrao**

*Lecturer in Chemistry, Mahatma Jyotiba Phule Mahavidyalaya(Junior) Mukhed.*

---

"Never lose heart while pursuing the path of trust.Live a principled life "

----Lord Basavanna.

**Who is Mahatma Basaweshwar?**

Mahatma Basweshwar , Basavanna was a 12th century Hindu Philosopher, Statesman, Kannada poet in the Shiva – focused Bhakti movement and a social reformer during the dynesty king Bijjala. He spread social awareness, rejected gender or social discrimination, superstitions. He was a mystic, a statesman by profession, a man of letters by taste, a humanist by sympathy and social reformer by conviction.

Basavanna was born in the year 1106 into a Shaivite Kamme Brahmin family in the small town of Ingaleshwar (Bagewadi ) in the Bijapur district of northern Karnataka. He grew up in a strict, religious household, where he was made to wear a sacred thread known as the Janivara, which he did not accept. He rejected both the traditional Sanskrit scriptures and the prevailing Hindu rituals. At an early age he left Bagewadi and spent the next 12 years studying Sangameshwara, at the then-Shaivite stronghold of Kudala Sangama.

There, he developed his spiritual and religious views in association with his societal understanding. His Guru was Játavéda Muni, also known as Eeshánya Guru. His believed in one true and perfect God and campaigned aggressively against untouchability, superstition, temple rituals and the dominance of priestly class. He believed that people should be be shown the right way to reach God and preached equality of all people and castes. For his revolutionary work and exceptional ideas, he earned a great recognition in the 12th century Hindu society.

**Early Life**

His fathers name was Madaras and mother Madalmbike at Brahmin family. He was named Basava, a Kannada form of Sanskrit Vrishabha in honor of Nandi and the local Shaivism. As a religious tradition, he was initiated with the holy thread 'janivara', in Upanayana at the early age of eight years. Basava revolted against this tradition, cut threw his janivara, left home and went to Kudalasangam.

Basava grew up in Kudalasangama (northeast Karnataka), near the banks of rivers Krishna and its tributary Malaprabha. Basava married a cousin from his mother side. His wife Gangambike, was the daughter of the prime minister of Bijjala, the Kalachuri king..When his maternal uncle died, the king invited him to be the chief minister. The king also married Basava's sister named Padmavati.

**Basavanna started his career**

as an accountant at Mangalaveda in the court of Kalachuri king Bijjala, a feudatory of the Kalyani Chalukya. When Bijjala acquired the power at Basavakalyana, by overpowering Tailapa IV(the garandson of Vikramaditya VI, the great Chalukya king), Basavanna also went to Kalyana. With his honesty, hardwork and visionary mission, Basava rose to the position of Prime Minister in the court of king Bijjala, who ruled from 1162—1167 at Kalyana (presently renamed as Basavakalyana). At this state Basav looked around the socio-economic status of the then society where most of the static, superstitious and anti-social elements were ruling. There was much gap between haves and havenots and reach people were harassing and sex discrimination made the lives of women very pathetic.

Basavana revolted against all these evils and he himself started practicing the socialistic norms to bring about drastic change in the society. Hence he became the guiding path to others in bringing the change.

**Vachana : brief poetry : connected to the common people : "what is said"**

He scripted his practical experiences in a novel from of literature called – Vachana. (socio-spiritual hymns) ie He composed poetry in local language, and spread his message to the masses. His teachings and verses such as Káyakavé Kailása..

Basaveshwar wrote many vachanas on Relevance of social philosophy topic. In which he radically express his ideas. One of the most popular vachanas he gives a good impression of the close connection between social values and spirituality in a situation of everyday life.

"O lord, let them not say !
To whom become he, to
whom, to whom ?
Let them say, he is ours,
Yes ours, ours !
O lord Kudal Sangama Let them say,
a son of Yours house. He does not want even a stronger to be respected on the basis of his background, his family or caste, but he hopes to be admitted into the same spiritual heritage. Basava asked all are born out of the same womb, whether they are of high caste or untouchables and the soul is the same, therefore caste discrimination are of no use. Castes are nothing but occupational and functional groupings. By this Basaveshwar rejected traditional calcification into caste.

The Vachanas (poems) composed during this period raised many questions regarding caste, untouchability, Brahminism etc. Unlike Sanskrit that was unfamiliar to large number of people, Vachanas were composed in comprehensible Kannada.

. Basaveswara and his associate Sharanas started end enriched a literary form that had a universality of appeal, the Vachanas or brief poetry. This literature committed to social upliftment and self-realization was simple enough to be understood by the most ignorant and great enough to be admired by the sophisticated. Vachanasahitya is a form of rhythmic writing in Kannada that evolved in the 11th century and flourished in the 12th century Vacahana literally means "that which is said," The composition of Vachanas is an epoch in Kannada literature. The Vachanas composed incorporated various aspects of society. Many of the Vachanas strongly condemned caste and untouchability. Through Vacahanas he emphasised the significance the equality and human dignity particularly for those from the downtrodden sections

The Vachanas disapproved the insincerity and hypocrisy of the Brahmins. For instance in one of his Vachanas he says that "if I say I am a Brahmin, Lord Kudala Sangamadeva laughs aloud" Though the movement is mentioned has Veerashaiva movement, it is important to note that Basavanna did not attempt to create a separate caste, instead it was the 'linga deeksha' (offering Linga) that was provided to untouchables as a way to include them in the 'Anubhava Mantapa' (The hall of spiritual experience.)'

**AnubhavaMantapa:: an outstanding work of Basavanna**.

Anubhava Mantapa was a democratic platform created for social discussions and progressive activities. There, he established the Anubhava Mantapa, – An academy of Experiences , a spiritual parliament to openly discuss Lingayatism, which attracted many saints from throughout India. He believed in the principle Káyakavé Kailása (Work puts you on the path to heaven, Work is the path to Kailash (bliss, heaven), or Work is Worship, Work is Heaven).

Basavanna recognised the fundamental problem behind the existence of caste and untouchability. The Anubhava Mantapa was a collective attempt that included notable individuals like Akkamahadevi,

Allama Prabhu and saints like Channiah and Kakkaih from the untouchable caste. One of the radical steps taken by Basavanna was that he organised an inter-caste marriage between an untouchable groom and a Brahmin bride. In the history of social reform movement the inter-caste marriage organised by Basavanna remains as a remarkable achievement. The formation of Anubhava Mantapa the academy of socio-spiritual experiences was an outstanding work of Basavanna. it was a place where holding discussions and implementing discussions for the welfare of humanity. And Vachanas were recited and philosophical discourses held. Dr. S. Radhakrishnan, renowned philosopher and former president has termed AnubhavaMantapa as "The first ReligiousParliament of the world."

The movement initiated by Basava through Anubhava Mantapa became the basis of a sect of love and faith. It gave rise to a system of ethics and education at once simple and exalted. It sought to inspire ideals of social and religious freedom, such as no previous faith of India had done.

**Human Values of Basaveshwar**

Basaveshwara is called Vishwaguru, because he installed the faith in his followers that anybody in the word. Irrespective of caste, creed, merit, nationality etc., can transcend and become God being in union with purana. But Basaveshwar with courageous frankness acknowledged the prevailing evils of the Hindu society and suggested ways and means to create a new orientation.

The philosophy of the Basavana has to gathered from his sayings, the Vacahnas. He worked to build a vibrant casteless, creedless society full of human values of propagated it through vachanas. They were primarily targeted at the common person and sought to demystify God as large sections of society had been deprived of access to the texts vachana are basically the rich experience of Basavana conduct put into eloquent poetic format.

There are more than one thousand vachana which are words of wisdom by Basavana upholding basic human values of mercy, kindness, compassion, and human dignity. Basavana condemns exploitation, discrimination and violence. He fiercely argued for social justice, equal opportunities of for the dignity of labour and he was responsible for the social revolution and reformation. The vachanas have been interpreted by different scholars and at different time periods whichever way it is interpreted the care values are highly relevant even today and will be relevant for many years to come.

**Equality : breath of Basavan's philosophy**

Basaveshwara's concept of equality is very clear and concrete. His single statement, no one is inferior to me and no one is superior to the Shivabhakta (Enagintha kiriyarilla Shivabhaktarigintha hiriyarilla i.e. nobody is below me and nobody is above the disciple of God ) shows his concern for equality. His basic intension was to establish a society of equals through his vachana's. For that he faced a lot of challenge and opposition from the priestly class. His one vachana, "Evanarava Evanarava Ennadirayya, Eva Nammava Nammava Ennirayya (Never ask who is he, always say that he is our man) clearly shows his intent and concern for the establishment of society of equals. He calls all the sharana's as 'Aiyya' 'Akka/Avve'(e.g. Kakkayya, Haralayya, Madayya, Muktayakka, Sankavve) the highest respect to an individual in Indian Society. He is the first thinker who gave equal importance to women. During his days women were restricted to the four walls of the house. But he makes them to attend and participate in the proceedings of the Anubhava Mantapa. More than 35 women members were there in the Anubhava Mantapa. It was more than the present members of Loksabha. To name a few among them are Akkamahadevi, Gangambike, Nilambike, Muktayakka, Kadire Remmevve, Kottanad Somavva, Sule Sankavve. He makes a strong statement "The base of purity/supremacy is not caste but character". He rejected the caste system and vehemently (intense) denounced the nation that some communities are superior to others and eradicated the complexes of superiority from the minds of his associates. His teaching we read addressed to all men and women alike. He preached the equality of women, rejected

caste system and the destinations and the hereditary rights of Brahmins to priesthood as well as its traditional ritual, worship. Basavan's social reformation for self-purification and self development of every individual is given in the following Vachana which also summarizes the Indian Penal Code – "Do not steal, Do not kill, Do not Utter lies, Do not lose temper Do not Defeat others, Do not Glorify yourself, Do not blame others, These alone will purify within and External And there are the ways to please ourlord Kudalsangam."

**The sharana movement : a dramatic development led by Basvanna**

A dramatic development led by basvanna and others in erstwhile Karnataka –

The sharana movement enabled people from the lower rungs of society to raise their voices against the dominant caste structures .

The sharana movement encouraged equality ,brotherhood and free thinking . It was revolutionary people of the working class got together to fight for equality ,and against inhuman caste and gender discrimination. They created awareness about superstiyion by propogating reason .Most of all the mass movement created by Basavanna and aimed at the root of exploitation by opposing the sanatana trditions of the Brahmins .

**A true visionary**

A true visionary, who was born ahead of his time, he envisioned a society based on sound religious, moral and spiritual values, encompassing one and all. Besides serving the people as a great reformer and a great mystic, he also served as the Prime Minister of the Southern Kalachuri Empire in South India and originated a literary revolution by introducing Vachana Sahitya (Lit. vachana = sayings, prose). Basava is said to have been a mystic by temperament, an idealist by choice, a statesman by profession, a man of letters by taste, a humanist by sympathy, and a social reformer by conviction. Many great yogis and mystics of the time joined his movement, enriching it with the essence of divine experience in the form of Vachanas that define a new way of looking at God and life. Basava's path later gave birth to a new tradition (sampradaya), which became popular in the south as the Lingavanta Dharma or Lingayata movement. Other synonyms for lingayata are Basava Dharma, Sharana Dharma, Vachana Dharma.

---

# महात्मा बसवन्ना के अच्छे दिन

**प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव**
*सहयोगी प्राध्यापक तथा अनुसंधान मार्गदर्शक, स्नातक तथा स्नातोकत्तर राजनीति विज्ञान विभागाध्यक्ष*
*देगलूर महाविद्यालय, देगलूर, ता.देगलूर जिला.नांदेड (महाराष्ट्र) Mobil No. 9423439276*
*Email Id : ratnakarlakshete1@gmail.com*

---

प्रस्तुत शोध लेख मे अच्छे दिन किसे कहते है ? अच्छे दिन के क्या निकष है ? बारवी सदि मे महात्मा बसवन्नाने अच्छे दिन निर्माण हेतू कौनसे सुधार समकालीन सामाजिक –आर्थिक एंव राजनीतिक व्यवस्था मे किये थे और इस व्यवस्था को हम सही मे अच्छे दिन कह सकते है क्या ? महात्मा बसवन्ना के अच्छे दिन से हमे क्या सिख मिलती है ? आदि विषय को स्पष्ट करणे का प्रयास लेखक ने किया है I साथ हि प्रस्तुत लेख भारत के किसी भी राजनीतिक दल के समर्थन हेतू नही लिखा है I या महात्मा बसवन्ना किसी एक राजनीतिक दल के पक्षधर है यह स्पष्ट करणे का कोई भी विचार लेखक का नही है I अच्छे दिन के निर्माण का आश्वासन देकर भारतीय राजनीतिक व्यवस्था को अपनी हाथ मे लेणे का जो यशस्वी प्रयास भाजपा ने किया है , वे और अन्य राजनीतिक दल या विशेषज्ञ , समाजसेवी जो भी अच्छे दिन के निर्माण हेतू अपने जीवन को खपाणा चाहता है उन सभी के लिये अच्छे दिन का प्रारूप महात्मा बसवन्ना ने किसप्रकार निर्माण किया था उसकी याद उन्हे दिलाने का या उन्हे इस ओर देखणे के लिये प्रेरित करणे का मात्र प्रयास इस लेख मे किया है I साथ हि यह लेख किसी भी राजनीतिक दल के अच्छे दिन के निर्माण हेतू किये जानेवाले प्रयास का समीक्षण नही I

2014 लोकसभा के आम चुनाव से भारतीय लोकतंत्र मे अनेक नई विचारधारा , शब्द , राजनीतिक कार्यप्रणाली का निर्माण हुआ I इसमे से एक प्रमुख शब्द है अच्छे दिन I अच्छे दिन इस शब्द का प्रयोग 2014 से लेके भारत के राजनीति , अर्थनीती , जनसंचार माध्यम ,संसद , राज्यो के विधिमंडळ आदि मे अनेक बार हो रहा है I भारतीय राजनीति मे 2014 के लोकसभा चुनाव मे वर्तमान प्रधानमंत्री नरेंद्र मोदिजी ने भारतीय मतदाता को लुभाने या सत्ता हथियाने हेतू अच्छे दिन के निर्माण का आश्वासन दिया था I 2014 के लोकसभा चुनाव से लेके आजतक इस देश मे वास्तव मे अच्छे दिन का निर्माण हुआ क्या ? यह एक समीक्षण का अलग से विषय , जो इस लेख का विषय नही है I

अच्छे दिन क्या है ? इस अच्छे दिन के लिए तो वर्गवार, व्यक्तिवार आकलन गंभीर मसला हो सकता है । साथ हि इसका वस्तुनिष्ठ आकलन करना भी आसान नही है । अच्छे दिन का मतलब अच्छी व्यवस्था से है I जिसे हम अंग्रेजी मे Good System या Good Days कहेंगे I कार्ल मार्क्स कि प्राचीन आदिम साम्यवादि अवस्था , जिन ज्याकस रुसो प्रणीत निसर्ग अवस्था ,छत्रपती शिवाजी महाराज का स्वराज्य , भारतीय संविधान से अभिव्यक्त होता लोकतांत्रिक समाज और शासन आदि को अच्छे दिन कह सकते है I जिस व्यवस्था मे समाज के सभी वर्ग की रोटी , कपडा और मकान यह मुलभूत जरुरते पुरी हो , यह जरुरते पुरी करणे हेतू आवश्यक वातावरण का निर्माण हो I समाज के सभी लोगो को अपने इच्छा नुसार जीवन व्यथित करणे कि आजादी हो , लेकीन इससे दुसरो के जीवन पर कोई आंच न आये यह सोचकर अपना जीवन व्यथित करणे वाला नागरिक होणे से हि अच्छी व्यवस्था निर्माण होती है I जिस व्यवस्था मे हांथ को काम , दिमाग को शिक्षा , पेट के लिये अनाज , मानवता के आधार पर समानता के सूत्र से मिलता हो , वह अच्छी व्यवस्था होती है I

अच्छे दिन के आधार : आदर्श नागरिक हि अच्छे दिन का मुलभूत आधार है I नैतिकता , मानवता ,अहिंसा ,प्रेम , धर्मनिरपेक्षता , विधि का शासन , रोजगार कि प्राप्ती , शिक्षा , सामाजिक –आर्थिक-एंव राजनीतिक आधार पर विषमता का न होना , अभिव्यक्ती स्वातंत्र्य ,सामाजिक न्याय , समताधीष्टीत समाज , स्वच्छ मन से प्रेरित नागरिक

,पिछडो को अवसर , लोकतांत्रिक मन , व्यक्ती .समाज . सरकार और प्रशासन का होना ,सबके प्रति ममत्व , दया,प्रेम का भाव आदि सद्गुणो का व्यक्ती ,समाज के विचार और आचरण मे होना .साथ हि समाज से शोषण ,अन्याय ,अत्याचार, अमानवीय और अलोकतांत्रिक मुल्यो का न होना .

उपरी अच्छे दिन से संबंधित सभी तत्व और मुल्यो का निर्माण बारवी सदि मे महात्मा बसवन्ना ने किया था I जिसका गंध या सुवास उनके और शरण –शरणी ,जंगम आदि के व्यक्तिमत्व और जीवनी से आता है I

महात्मा बसवन्ना का परिचय और जीवनी : भारत संत , महात्मा एंव विभूती की धरोहर एंव वैभवदायी भूमी है I इस भूमी ने मानवता के प्रति सचेत और सजग रहे अनेक महान विभूतीयों को जन्म दिया है I इसलिये भारत को मानवता कि खदान कहते है I इस भूमी मे मानवी जीवन को आनंदी , सुखकारी और वैभवशाली बनाने का सफल प्रयास अनेक महान विभूतियो ने किया है I इस लेख मे बारवी सदि के भारत के महान पुत्र जिन्हे दक्षिण का बुद्ध कहते है , ऐसे प्रतिभा और वैभवशाली व्यक्तिमत्व के धनी महात्मा बसवन्ना का संक्षिप्त मे परिचय और उनके अच्छे दिन के जीवनी को स्पष्ट करना यह एक हेतू है I

भारतीय ईतिहास के मध्ययुगीन काल के बारवी सदि मे वर्तमान कर्नाटक राज्य मे महात्मा बसवन्ना नामक युगपुरुष का जन्म हुआ I महात्मा बसवन्ना का जीवनकाल 1105 से 1167 है I भारत के सांस्कृतिक ईतिहास मे यह काल अंधार युग के नाम से पहचाना जाता है I क्योंकी इस काल मे धर्म व्यवस्था से संबंधित सभी अंगो का मानवी समाज से संबंधित सामाजिक –आर्थिक एंव राजनीतिक सांस्कृतिक व्यवस्था पर गहरा प्रभाव था I समाज सभी प्रकार के विषमता से ओतप्रोत भरा हुआ था I चातुर्वर्ण , वैदिक व्यवस्था , छुत-अछुत , महिलाओ को हीन मानणा, दासी प्रथा , स्त्री –पुरुष विषमता आदि तत्कालीन व्यवस्था के लक्षण थे I यह काल मानवता के प्रति अति हीन काल था I पुरी समाज व्यवस्था बुरे दिन के प्रभाव मे थी , समाज का सिर्फ एक वर्ग छोडकर बाकी अन्य वर्ग का जीवन दुख से भरा था I इसी काल मे महात्मा बसवन्ना ने अच्छे दिन के निर्माण हेतू अथक प्रयास किये I इस लेख मे उन्ही प्रयासो को स्पष्ट करणे का प्रयास लेखक ने किया है I

**अच्छे दिन निर्माण हेतू महात्मा बसवन्नाने किये सुधार :** महात्मा बसवन्ना के काल मे स्थित सामाजिक –आर्थिक एंव राजनीतिक व्यवस्था मे अनेक दोष थे I इन दोषो पर विस्तार से चर्चा करना इस लेख का हेतू नही है I अगर अच्छे दिन का अर्थ अच्छी व्यवस्था से है तो यह बात स्पष्ट होती है की महात्मा बसवन्ना ने बारवी सदि के राजतंत्री , धर्मांध ,जातीप्रधान युग मे मानवता के प्रति सचेत और न्यायी ७७० शरणो का अच्छे दिन के प्रहरी के रूप मे निर्माण किया । लोगो के व्यक्तिगत ,सामाजिक –आर्थिक ,राजनीतिक ,बौद्धिक जरुरतो का सूक्ष्म अध्ययन कर इनको पूर्ण करणे हेतू प्रयास किये I कायक ,अनुभववादी , ज्ञान ,दासोह ,शरण –शरणी ,जंगम ,वचन वाचन ,लोकतंत्र , एकेश्वरवाद ,लिंगायत ,महिला सक्षमीकरण ,सदाचार वे स्वर्ग , अरीवे गुरु ,दया हि धर्म ,मृदू वचन हि जप –तप, मन शुद्धता, अंतरंग –बहिरंग शुद्धता , यह हमारा –यह हमारा ,वैज्ञानिक दृष्टीकोन आदि सुधार किये I जात –धर्म –लिंग विषमता , अवतारवाद, अंधश्रद्धा ,चमत्कार ,भोगवाद ,नशावाद, दहेज ,बहुपत्नीत्व, शोषण ,धर्मांध, अछुत, पुरुषप्रधानता, मंदिर , वैदिक ईश्वरवाद ,कर्मकांड ,मूर्तीपूजा ,बहुदेवोपासना ,शिक्षा के केंद्रीकरण आदि बुरे दिन को प्रतीत करनेवाले सभी विचार और कवायतो को नकारकर उन्हे जड से उखाडकर समाजबाह्य कर दिया I

**महात्मा बस्वन्ना के अच्छे दिन कि विशेषताएं :** बसवन्ना निर्मित व्यवस्था मे कोई चोर नही था , कोई भीख नही मांगता था , कोई संपत्ती का संग्रह नही करता था । समाज मे स्थित सभी वर्ग के लोग समाज और राष्ट्र निर्माण के कार्य मे व्यस्त थे I पद ,प्रतिष्ठा ,सत्ता ,संपत्ती,ज्ञान आदि का समाज को लोकतांत्रिक और नागरी बनाने हेतू प्रयोग मे लाया जाता था I विवेकी और बुद्धिवादी नागरिक थे I सभी के दिल –दिमाख मे समाज सेवा का भाव था I अपने विचार के प्रति दुराग्रह रखनेवाले के प्रति शत्रुत्व का भाव नही था I वेश्या , डाकू ,दरोडेखोर आदि को समाज के मुख्य धारा मे लाकर उनसे वचन साहित्य रुपी ज्ञान का निर्माण करवाया I सामाजिक न्याय ,समता ,स्वातंत्र्य ,मानवाधिकार आदि का जतन और प्रचलन होता था I महात्मा बसवन्ना ने अच्छे दिन के निर्माण हेतू इष्ट्लिंग- कायक वे कैलास –दासोह ,अरीवे गुरु , अनुभव मंटप, वचन साहित्य आदि तत्वो को समाज के सभी वर्गो मे समानता

,बंधुता ,न्याय और विवेक के माध्यम से पहुंचाया I मानवी मुल्यो से ओतप्रोत व्यक्ती और समाज ,पर्यावरण संवर्धन ,अस्पृश्यता निवारण , भ्रष्टाचार निर्मुलन , श्रम प्रतिष्ठा , समाजवादी – व्यसनमुक्ती ,पुरोगामी विचार और आचरण बस्वन्ना के समाज मे थे I महात्मा बस्वन्ना ने जिस समाज का निर्माण किया था उसमे चोरी न भली , हत्या न भली ,मिथ्या न भली ,रोष भला नही ,तिरस्कार भला नही ,आत्मस्तुती न भली ,पर –निंदा न भली, यही अंतरंग शुद्धी –यही बहिरंग शुद्धी यह सामाजिक आचरण के नियम थे I अपने श्रम से उत्पन्न धन को समाज मे स्थित अबला –निर्बल – निर्धन व्यक्ती के कल्याण हेतू समर्पित किया जाता था I सभी के लिये श्रम करना अनिवार्य था I महिला का सन्मान और उसे साक्षात देवी का रूप माना गया I महिला संबंधी उदार दृष्टीकोन था I ज्ञानी- और आचार संपन्न व्यक्ती का उचित सन्मान होता था I दया विहीन धर्म कौनसा है ?दया होनी चाहिए सभी प्राणियो के प्रति ,दया हि धर्म का मूल मंत्र है , दया विहीन को कभी न अपनायेंगे कुडलसंगमदेव इस वचन से बसवप्रणीत समाज का दया एंव क्षमा भाव प्रतीत होता है I बस्वन्नाने नैतिकतापूर्ण जीवन पर जोर दिया I देह हि देवालय के विचार को सभी आचरण मे लाते थे I पुंजीवादी प्रवृत्ती का विरोध कर समाजवादी चिंतन को अपनाकर आर्थिक और ज्ञान के आत्मनिर्भरता कि शिक्षा को प्रचलित किया I राजनीति मे अध्यात्मीकरण और वसुदैव कुटुंबकम के विचार का प्रतिपादन किया I व्यक्तिगत शुद्धाचरण से सामाजिक शुद्धाचरण को साकार किया I

महात्मा बस्वन्ना के उपरी अच्छे दिन के विशेषताओं से हमे अपने जीवन को अच्छा बनाने कि सीख मिलती है I समाज मे छिपी बुराईओं से किसप्रकार लढना चाहिए यह ज्ञात होता है I वर्तमान व्यवस्था मे कार्यरत सभी को महात्मा बस्वन्ना के अच्छी व्यवस्था के विचार प्रेरणादायी है I इसलिये सामाजिक-आर्थिक-राजनीतिक-शिक्षा ,प्रशासन आदि मे कार्यरत सभी के लिये महात्मा बस्वन्ना के अच्छे दिन के विचार मार्गदर्शक है I भारतीय संविधान और महात्मा बस्वन्ना के अच्छे दिन से संबंधित विचारो मे समान धागा है I

क्या सच में समूचे भारत के लिए एक साथ बुरे दिनों का चले जाना और अच्छे दिनों का आ जाना संभव है ? क्या पूरे के पूरे 125 करोड़ लोगों के लिए अच्छे दिन लाए जा सकेंगे, वो भी इतनी जल्दी? मोदी जी के बाकी तमाम नारों जैसे स्वच्छता अभियान या डिजिटल इंडिया का तो फिर भी वस्तुनिष्ठ आकलन हो सकता है पर इस अच्छे दिन के लिए तो वर्गवार, व्यक्तिवार आकलन गंभीर मसला हो सकता है । पतझड हुए बिना पेडो पर नये पत्ते नही आते कठीनाई और संघर्ष सहे बिना अच्छे दिन नही आते I इसप्रकार महात्मा बस्वन्ना के विचारो नुसार अच्छे दिन लाने हेतू हमे शांती और लोकतांत्रिक मार्ग से संघर्ष करने कि प्रेरणा मिलती है I अच्छे दिनो मे सभी के लिये समान अवसर और पिछडो के लिये सामाजिक न्याय के आधार पर विशेषाधिकार का होना जरुरी है I

**संदर्भ ग्रंथ :**

*महात्मा बसवेश्वर का सामाजिक चिंतन : प्रा. डॉ.संतोषकुमार गाजले*
*महात्मा बसवेश्वरांचे तत्वज्ञान : डॉ. वेदप्रकाश डोणगावकर*
*बाराव्या शतकातील आध समाज सुधारक : महात्मा बसवेश्वर : डॉ.अशोक मेनकुदळे*
*विचारशलाका संपादक : प्रा.नागोराव कुंभार – जानेवारी ते सपटेंबर २०१७*

# वीरांगना रानी चेन्नम्मा

**प्रा डॉ अभिमन्यु नरसिंगराव पाटील**
*हिंदी विभाग, वै.धुंडा महाराज महाविद्यालय,देगलूर, चलभाष :- 9421377611*

भारतीय स्वतंत्रता संग्राम सभी भारतीयो के लिए गौरव का विषय है । इस स्वतंत्रता आंदोलन में सभी बाल बच्चे, स्त्री पुरूष ने अपनी अपनी तरह योगदान दिया है । हमारा देश इस साल स्वतंत्रता की पंचहत्तरवी वर्षगाठ मना रहा है । ऐसे मे ही स्वतंत्रता मे महत्वपूर्ण योगदान देनेवाली रानी चन्नम्मा ने केवल योगदान ही नही दिया बल्कि हमारे नव युवको को अपने देश के आजादी के प्रती चिंगारी भी जगायी। हमारी देश की स्वतंत्रता के लिए अनेक राजा महाराजाओ ने लड़ाई लड़ी है। स्वतंत्रता संग्राम में केवल राजाओं और महाराजाओं का योगदान है ऐसा नहीं है। हमारे देश की महिलाओं ने भी बहुत बड़ा योगदान दिया है। हमारे देश की वीर तथा साहसी स्त्रियों ने भी अपनी अपनी तरह योगदान दिया है। इन वीर साहसी महिलाओं में वीरांगनाओं में रानी दुर्गावती, रानी लक्ष्मीबाई, असम की वीरांगना कनकलाता बरूआ आदि का हम नाम ले सकते हैं। आज भी इतिहास की यह पक्तियां सुनते ही हमारे शरीर में कुछ जोश उल्लास होने लगता है ।

जैसे :-

"चमक उठी सन सत्तावन में, वह तलवार पुरानी थी,
बुंदेले हरबोलों के मुंह हमने सुनी कहानी थी,
खूब लड़ी मर्दानी वह तो झांसी वाली रानी थी।"

रानी लक्ष्मीबाई ने हमारे देश और अपने राज्य झांसी की स्वतंत्रता के लिए ब्रिटिश राज्य के खिलाफ लड़ने का साहस किया और अंत में वीरगती को प्राप्त हो गई । रानी लक्ष्मीबाई को कोई संतान नहीं थी, तो उनके पति की मौत होने के बाद सिंहासन खाली था उस खाली सिहांसन को भरने के लिए उन्होंने एक बच्चा गोद लिया लेकिन ऐसे उत्तराधिकारी को अंग्रेज नही मानते थे क्योकि उनकी नीति यह थी कि उन्होंने गोद नीति का विरोध किया और रानी लक्ष्मीबाई के बच्चे को झांसी का उत्तराधिकारी नहीं माना । इसके बाद दोनों में संघर्ष अटल था, और संघर्ष हो गया । उस संघर्ष में रानी लक्ष्मीबाई ने मैं झांसी नहीं दूंगी ऐसा कहकर उन्होंने जंग छेड़ दी । लेकिन कुछ कारण वंश हार का सामना करना पड़ा। असम कि कनकलता बरूआ ने भी स्वतंत्रता संग्राम मे अतुलनीय त्याग, बलिदान देकर अपना शौर्य प्रस्तुत किया । वैसे ही कर्नाटक राज्य के कित्तूर की गद्दी पर रानी चन्नम्मा ने बेटा गोद लेकर उसको अपना उत्तराधिकारी घोषित कर दिया । अंग्रेजों की नीति के कारण कित्तूर की रानी चेन्नम्मा और अंग्रेजो के बीच जंग शुरू हो गई ।और अपने जीवन के आखिरी सांस तक कित्तूर को अंग्रेजों के कब्जे में नहीं जाने दिया लेकिन आखिर में अंग्रेजों की विजय हो जाती है। और रानी चेन्नम्मा का अंत हो जाता है। ऐसे रानी चन्नम्मा वीरांगना का परिचय सामान्य पाठकों को हो इसलिए मैंने वीरांगना रानी चेन्नम्मा के जीवन पर अल्पसा प्रयास है ।

रानी चेन्नम्मा का जन्म कर्नाटक के बेलगांव में 23 अक्टूबर 1778 में हुआ था। रानी चन्नम्मा को बचपन से ही तलवारबाजी, घुड़सवारी और युद्ध के अनेक कलाओं का शौक था। राज परिवार में जन्म होने की वजह से चन्नम्मा को अपना यह शौक पूरा करने का अवसर मिलता है। इन युद्ध कौशल को इतनी अच्छी तरह से शिकने के बाद अपने युद्ध कौशल की वजह से वह प्रसिद्ध हो जाती है। राजपरिवार में जन्म होने की वजह से विवाह भी राज परिवार में होना जरूरी था । एक तो वह राजकुमारी साथ में युद्ध कौशल में पारंगत होने के कारण इन दोनों की वजह से उनका विवाह कर्नाटक के कित्तुर राज्य के देसाई परिवार के राजा राजकुमार मल्लासर्ज के साथ विवाह हो जाता है। विवाह होने के बाद कुछ दिन बहुत ही अच्छी तरह से आनंद और सुख में बीत जाते हैं। लेकिन होनी को कौन टाल सकता है, रानी चेन्नम्मा के जीवन में दुख का पहाड़ टुट जाता है। उनके पती राजा मल्लासर्ज का देहांत हो

जाता है । वह अपने पति के दुख से पूर्ण रूप से बाहर आयी ही नहीं थी की उसके ऊपर दूसरा दु:ख आ जाता है और उसके एकमात्र पुत्र का भी देहांत हो जाता है। पति और पुत्र के देहांत के बाद अब दूसरा संकट सामने खड़ा हो जाता है, कि अब राजगद्दी पर किसको बिठाया जाए । क्योंकि कित्तूर की राजगद्दी खाली हो गई थी। इस खाली राजगद्दी को भरने के लिए रानी चेन्नम्मा को एक पुत्र को गोद लेना पड़ता है । लेकीन उस समय मे बच्चे को गोद लेना आसान नही था । फिर भी रानी चेन्नम्मा ने एक पुत्र को गोद लिया । अपना सारा दु:ख भूलकर वह अपने राज्य को बचाने के लिए लग जाती है । सचमुच उनका यह कार्य बहुत ही बडा है । हमारे देश कि महिला किसी से कम नही है । कठीन परिस्थिति मे अपना साहस दिखाती है । यह कार्य करते समय विरोध की परवा नही कि अपने राज्य के भलाई के लिय जो करना चाहिए वही किया । उसी पुत्र को वह कित्तूर के राजगद्दी का उत्तराधिकारी घोषित कर देती है ।

एक बेटे को गोद में लेकर राज सिंहासन का उत्तराधिकारी घोषित करने के बाद और एक समस्या खड़ी हो जाती है। और वह समस्या यह थी कि वह समय ब्रिटिश शासन का था । और ब्रिटिश शासन का पूरे देश में अमल था । और ब्रिटिश शासन इस गोद नीति के विरोध में थी । रानी चेन्नम्मा ने ब्रिटिश शासन के इस गोद नीति का विरोध करके एक बेटे को गोद में लिया और राजगद्दी का उत्तराधिकारी भी घोषित कर दिया । तो अंग्रेज और चेन्नम्मा में संघर्ष होना अटल था। इसी नीति का विरोध कर रानी चेन्नम्मा ने बेटे को गोद लिया इसलिए भारतीय स्वतंत्रता संग्राम में एक वीरांगना नायिका बनने का गौरव प्राप्त हो जाता है। ब्रिटिश शासन के गवर्नर लॉर्ड डलहौजी ने गोद निषेध नीति की घोषणा की थी। इसी नीति के अनुसार भारत देश के जिन राजवंशों में उत्तराधिकारी नहीं है उनका वारिश नहीं होता उन्हें ब्रिटिश राज्य ईस्ट इंडिया कंपनी अपने कब्जे में ले लेती है । अंग्रेजों ने इस देश के राज्य को हड़पने के लिए इस नीति का निर्माण किया था।

इस गोद निषेध नीति के तहत रानी चन्नम्मा को कित्तूर की गद्दी पर अपने गोद लिए बेटे को बैठाना ब्रिटिश शासन को अच्छा नहीं लगा । गोद लिए बेटे को राज सिंहासन पर बैठाना ब्रिटिश शासन को अपने नियमों के विरुद्ध लगा । इसलिए रानी चेन्नम्मा को ऐसा करने से मना कर देते हैं। इस समस्या को पहले बातचीत से हल करना चाहते थे, लेकिन ब्रिटिश अधिकारियों के साथ बातचीत नहीं बन जाती। तब बाँम्बे प्रेसिडेंसी के गवर्नर से बात करने की कोशिश की जाती है और यह बातचीत भी सफल नही हो जाती है। अंग्रेज अधिकारियों को यह बिल्कुल ही पसंद नहीं था। क्योंकि अंग्रेज कित्तूर पर किसी भी तरह अपना कब्जा जमाना चाहते थे। ब्रिटिश शासन कित्तूर के बहुमूल्य खजाने को अपने कब्जे में करना चाहते थे क्योंकि तब कित्तूर के खजाने में बहुमूल्य आभूषणों के साथ जेवरात सोना हड़पना अंग्रेजों का उद्देश्य था। उस समय उस खजाने की कीमत पंधरा लाख रुपए के आसपास थी। इसके लिए गोद लिए बालक को गद्दी का वारिस मानने से ब्रिटिश शासन साफ इंकार कर देता है । और इसी वजह से कित्तूर और अंग्रेजों के बीच लडाई हो जाती है। अंग्रेज अधिकारियों को लगता था कि एक ओरत को हराना कोई बडी बात नही है । लेकीन रानी चेन्नम्मा युध्द मे पारंगत थी । रानी चेन्नम्मा भी अंग्रेजो को सहज रूप मे विजयी नही होने देती ।

बातचीत की सब कोशिशें नाकाम होने के बाद, यह तय हो जाता है कि अंग्रेज मानने वाले नहीं हैं । तो रानी चन्नम्मा ने संघर्ष करने का फैसला कर दिया। भारत देश की पहेली व रानी थी जो ब्रिटिश शासन ईस्ट इंडिया कंपनी के विरोध में लड़ने के लिए तैयार हो गई । रानी ने अपनी सेना के गठन की तैयारी शुरू कर दी थी । रानी चन्नम्मा की तैयारी का अंग्रेजों को पता चला और दोनों की सेना आमने सामने आ गई। ऐसा संघर्ष जिसका परिणाम क्या होने वाला है यह सबको मालूम था फिर भी रानी चेन्नम्मा ने अंग्रेजो के खिलाफ लड़ाई छेड़ दी थी। क्योंकि कित्तूर एक छोटा सा राज्य था और अंग्रेज आधुनिक हथियारों के साथ तैयार थे । कित्तूर राज्य को हमारे भारतीय राज्य भी छोटे-मोटे और कोई मदद करने वाले नहीं थे । क्योंकि उसी राज्य की समस्या है वह राज्य खुद निपटाए इस प्रकार की हमारी उस वक्त की भावनाएं थी । रानी चन्नम्मा ने भी किसी से मदद नहीं मांगी थी। खुद फैसला कर दिया था और वह फैसला नतीजों का नहीं था यह फैसला आजादी से जीने और मरने का था । रानी चेन्नम्मा ने फैसला किया

था कि या तो आजाद जिंदगी जीयेगी नहीं तो लड़कर मरेगी । जब लड़ाई की शुरुआत हो जाती है तब पहली बार अंग्रेजों ने भारतीय महिला के युद्ध कौशल को देखा और एक महिला किस प्रकार युध्द करती है यह देखकर अंग्रेजों के होश उड़ गए। लेकिन ब्रिटिश युद्ध नीति में माहिर थे । अंग्रेजों का बहुत नुकसान हो रहा था तब उन्होंने कित्तूर को जो रसद आती थी वह रसद ही बंद कर दी साधनों के अभाव के कारण रानी चेन्नम्मा यह लड़ाई हार जाती हैं। अंग्रेज अपनी बड़ी सेना और आधुनिक हथियारों से यह लड़ाई जीत लेते हैं । लेकिन इस लड़ाई में अंग्रेजों का भी भारी नुकसान हो जाता है ।

अंग्रेजों ने अपनी होशियारी अपनी चालाकी और आधुनिक हथियारों से लड़ाई तो जीत ली लेकिन रानी चेन्नम्मा ने उनका बहुत बड़ा नुकसान किया कि वे लंबे समय तक कित्तूर की लड़ाई से उबर नहीं पाए । इस लड़ाई में अंग्रेजों ने बिस हजार सिपाहियों और चारसो बंदूकों का सहारा लिया था । युद्ध के पहले दौर में अंग्रेज सेना का भारी नुकसान हुआ और ब्रिटिश एजेंट और उस भाग के कलेक्टर जॉंन थावकेराय को मौत के घाट उतार दिया । रानी चेन्नम्मा के मुख्य सेनापति बलप्पा ने ब्रिटिश सेना को एक बार तो पीछे हटने पर मजबूर कर दिया । ब्रिटिश सेना के दो प्रमुख अधिकारियों सर वॉंल्टर इलियट और मिस्टर स्टीवेंसन को गिरफ्तार भी कर दिया गया था। इस दौर के लड़ाई के बाद ब्रिटिश अधिकारियों ने समझौते की मांग की और समझौते के तहत इन दो ब्रिटिश अधिकारियों को छोड़ दिया गया और युद्ध को टाल दिया गया । लेकिन ब्रिटिश अधिकारी हार मानने वाले नहीं थे उन्होंने दूसरे मोर्चे से लड़ाई जारी रख दी । दूसरे मोर्चे पर भी कित्तूर की सेना ने बहादुरी दिखाइ और सोलापुर के सब कलेक्टर मुनरो लड़ते हुए मारे गए। यह लड़ाई लंबी चलने की वजह से और कम संसाधनों के धीरे-धीरे खत्म हो जाने की वजह से आखिर में रानी चेन्नम्मा को हार का मुंह देखना पड़ा । और अंग्रेजों ने उने गिरफ्तार करके बैल्होंगल के किले में कैद कर दिया गया। उसी किले में 21 फरवरी 1829 में उन्होंने अपनी आखिरी सांस ले ली। इस महान युद्ध में रानी चेन्नम्मा को स्थानीय मदद मिली । अपनी बहादुरी के लिए कर्नाटक के लोगों मे उन्हें नायिका की तरह पूजा जाता है । उनकी याद में 22 से 24 अक्टूबर को हर साल कित्तूर उत्सव मनाया जाता है । उनके सम्मान में नई दिल्ली के संसद में इनकी मूर्ति भी स्थापित की गई है। इसके अलावा कर्नाटक में भी रानी चेन्नम्मा को सम्मान देने के लिए उनकी मूर्तियां बेंगलुरु और कित्तूर में बनवाई जाती है । आज भी कित्तूर का राजमहल और कुछ ऐतिहासिक इमारतों में इस महान महिला की वीरता की साक्ष देती है। और यह भी महसूस किया जाता है कि उस रानी ने आजादी की एक चिंगारी जगाई उसे ढेरों अन्य लोगों ने प्रेरणा ली । रानी चेन्नम्मा के योगदान को कभी भी भुलाया नहीं जा सकता। रानी चेन्नम्मा केवल महिला शक्ति की प्रतीक है ऐसा नहीं बल्कि वे प्रेरणा स्रोत भी है कि अपनी शर्तों पर जीवन जीने के लिए कोई भी मूल्य कम ही होता है ।

इस तरह वीरांगना रानी चेन्नम्मा का जीवन तमाम भारतीय महालाओं के लिये प्रेरणा देने का काम करता है । रानी चेन्नम्मा और रानी लक्ष्मीबाई का जीवन संघर्ष एक जेसा ही है । इन दोनोही वीरांगनाओ ने अपना वैयक्तिक सुख बाजू मे रखकर प्रजा के सुख को महत्व पूर्ण माना । सचमुच रानी चेन्नम्मा का जीवन त्याग देशप्रेम बलीदान आदि से भरा पडा है ।

# म.बसवेश्वर: कल्याणकारी राज्य एक दृष्टिकोण

**प्रा. डॉ. चिलर्गे बी.व्ही.**
*अर्थशास्त्र विभाग प्रमुख, महात्मा ज्योतीबा फुले महाविद्यालय, मुखेड जि.नांदेड*

राज्यशास्त्रातील 'कल्याणकारी राज्य' ही आधूनिक संकल्पना आहे. पाश्चिमात्य राष्ट्रांकडून आपण ती स्वीकारली आहे हे खरे असले तरी भारतीय परंपरेमध्ये अशा पध्दतीचा विचारच झाला नाही असे म्हणता येत नाही. 12 व्या शतकामध्ये महात बसवेश्वरांनी ज्या मुल्यांची जोपासना केली तीच ती मूल्य, स्वातंत्र्य, समता, न्याय, विवेकनिष्ठा इहवाद ही आहेत. हे समजून घेण्यासाठी महात्मा बसवेश्वरांचा अभ्यास एका विशिष्ट दृष्टिकोणातून करावा लागतो.

ऐतिहासिक सामग्रीच्या आधारे तयार केलेले बसवेश्वरांचे समगृ, परिपुर्ण विश्वसनीय चरित्र अद्याप उपलब्ध नसले तरी, समकालीन शिलालेख - तामृपट, पुढील काळातील उवी लेखकांनी लिहीलेली पुराणे, तसेच बसवण्णा, चेन्नबसवण्णा, अल्लमप्रभू, सिध्दरामेश्वर, अक्कामहादेवी आणि अनुभव मंटपाच्या अन्य वचनकारांच्या आधारे बसवेश्वरांच्या चरित्राची पुर्नबांधणी करता येते. भीमकवीचे बसवपुराण सिंगीराज यांचे अमलबसव चरिते हे ग्रंथ विचारात घेणे युक्त ठरेल.

कल्याणकारी राज्य ही आधुनिक संकल्पना आहे. लोकशाही, कल्याणकारी राज्य व सुशासन हा स्वायत्त नागरी समाजातील मानवी मूल्यांचा चढता क्रम आहे. अब्राहम लिंकनची लोकांनी लांकांकडून आणि लोकांसाठी चालवलेले शासन म्हणजे लोकशाही ही लोकप्रिय सर्वपरिचित व्याख्या आहे. तेंव्हा प्रतिनिधिक, लोकशाहीत मी लोकांचा प्रतिनिधी असल्या कारणाने संपूर्ण नागरिकांच्या कल्याणाची जबाबदारी माझी म्हणजेच शासनाची आहे. हे आत्मभान लोकप्रतिनिधींना असावे हा कल्याणकारी राज्याचा आशय आहे. स्वातंत्र्य, समता व न्याय या मानवी मूल्यांच्या अमंलबजावणीची जबाबदारी शासनाची आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात सत्तांग सिध्दांतातील स्वामी म्हणजे राजा हा राज्यातील सामान्य नागरीक अन्नाविना उपाशीपोटी झोपू नये याची प्रत्यक्ष खात्री करुनच रात्रीचे जेवण करायचा, याला कल्याणकारी राज्य असा शब्दाप्रयोग त्या काळी वापरला गेला नाही, पण कल्याणकारी राज्याचा आशयदेखील हाच आहे की तो आशय राजा नगरराज्यामध्ये अंमलात आणतो आहे. आज लाकशाही कल्याणकारी राज्यात ह्या मुल्यांची अंमलबजावणी होते का ही शंका आहे.

इ.स. 1105 ते 1167 या काळात म.बसवेश्वरांचे जीवन व कार्य आकारास आले. तसा हा काळ संपूर्ण जगातच धर्मांद राजेशाहीचा अंधकारमय तमोयुगाचा होता. अशा काळात अतिशय प्रतिकुल परिस्थितीमध्ये महात्मा बसवेश्वरांनी ह्याच आधूनिक मूल्याची उपासना केली. महात्मा बसवेश्वरांच्या जिवनाचे अंतिम ध्येय काय असेल तर ते मानवी कल्याण होते. अशा मध्ययुगीन राजेशाहीच्या काळात बिज्जळ राजाच्या दरबारात महात्मा बसवेश्वर सामान्य कारकुन (लेखनिक) म्हणून रुजु झाले. पुढे स्वकर्तृत्वावर आपल्या योग्यतेच्या बळावर ते प्रधानमंत्री झाले. एवढेच नाही तर पुढे आपल्या परिश्रमातून स्वकर्तृत्वाची अशी मुद्रा उमटवली की, दैववाद प्रभावहीन होऊन श्रमप्रतिष्ठेवर लोकांचा विश्वास बसायला लागला. बिज्जळ राजाचा हा प्रधानमंत्री सामान्य कष्टकरी जनतेच्या -हदय सिंहासनावर महात्मा म्हणून राज्य करु लागला. ज्या राज्याच्या दरबारी महात्मा बसवेश्वर प्रधानमंत्री होते, त्या राजाचे नाव इतिहासाच्या पुस्तकामध्ये शोधावे लागते. आणि त्याच्या दरबारी प्रधानमंत्री असणा-या व्यक्तिची कार्यमुद्राच अशी होती ज्यामुळे आज आठशे वर्षानंतरही ती नगरी 'बसवकल्याण' म्हणून ओळखली जाते.

मध्ययुगीन काळात धर्माची अंमलबजावनी करणे हेच राजाचे अंतिम उदिष्ट आहे. अशी जवळ-जवळ सर्वच राजांची मानसिकता झालेली होती. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्य, मानवी प्रतिष्ठा लोप पावली. धर्मांधतेतून मानवाचा अमाणूष छळ होऊ लागला. वेद अपौरुषेय आहेत म्हणून त्यांची कठोर अंमलबजावणी सुरु झाली. परिणामी समाज चातुर्वण्यात जाती-पोटजातीत विभागला गेला. म.बसवेश्वरांनी अशा धर्मांधतेविरुध्द बंड करुन विवेकनिष्ठेचा

पुरस्कार केला. पारंपारिक धर्माला छेद देऊन नवीन व्यक्तिस्वातंत्र्य, समता, न्याय या मूल्यांची जोपासना करणारा मानवधर्म प्रस्थापित केला. बालवयातच म.बसवेश्वरांचा उपनयन (मुंज) संस्कार करण्याचा मनोदय पालकांनी व्यक्त केला, तेंव्हा त्यांनी वडिल मादिराजांना प्रश्न केला, अक्कानागम्मा माझ्यापेक्षा मोठी आहे. तिला आगोदर उपनयन संस्कार करा आणि मगच माझी मुंज करा. वडील ग्रंथप्रामाण्यवादी, ते म्हणाले तसे वेदात नाही, म्हणुन तुझ्या बहिणीची मं ुज करता येणार नाही. बसवेश्वरांनी याचा विरोध केला ते म्हणाले ग्रंथ काय सांगतात मला माहित नाही, पण माण्या विवेकाला हे पटत नाही, परिणामी बालवयातच त्यांना घर सोडावे लागले. ही ती विवेकनिष्ठा आहे. ज्यातून युरोपमधील प्रबोधन युगानंतर कल्याणकारी राज्याचा उदय झाला. 19 व्या शतकात आगरकरांनी विवेकनिष्ठा जोपासली. त्यांच्या सुधारक वृत्तपत्राचे ब्रीदवाक्य होते, इष्ट ते बोलणार, साध्य ते करणार, वेद मनुस्मृती हा ग्रंथप्रामाण्यवाद त्यांनी नाकारला. परिणामी, पुण्यात जिवंतपणी प्रेतयात्रा निघाली आधुनिक भारतात धर्माविरोधात बंड करणा-याची ही अवस्था तर मध्ययुगात काय असेल ? विवेकनिष्ठेची उपासना ही सामान्य गोष्ट नाही, म.बसवेश्वरांचे हे बंड फक्त वडिलांविरुध्द नव्हते तर त्यांचे हे बंड वेद प्रामाण्याविरुध्द होते, म्हणून बसवेश्वरांचे हे विधान म्हणजे दीड हजार वर्षापुर्वी सॉक्रेटिसने केलेल्या भाषणाचा प्रतिध्वनीच होय.

म.बसवेश्वरांना, प्रारंभी घर त्यागावे लागले एवढ्यावरच बसवेश्वरांचा संघर्ष थांबला नाही. कल्याण क्रांतीनंतर त्यांच्यासह त्यांच्या सहकारी शरणांना जे भोगावे लागले ते यापेक्षा वेगळे नव्हते. आपल्या देशात हिंदू लोक वेदांना प्रमाणग्रंथ मानतात. वेद हे अपैरुषेय आहेत अशी श्रध्दा आहे, त्याचा दुसरा अर्थ असा की वेद हे साक्षातकारातून अवतीर्ण झालेले आहेत, म्हणुन या साक्षात्कारी लोकांच्या शब्दांना प्रमाण मानले पाहिजे असा कटाक्ष असतो. एखाद्या ग्रंथाला प्रमाण मानले की संशोधन किंवा चिकित्सा यांना काहीएक अवसर राहत नाही. ज्ञानाच्या ग्रंथाचे शेवटचे पान लिहिले गेलेले आहे असा त्यांचा अर्थ होतो. म्हणून विवेकनिष्ठा बुध्दिप्रामाण्याला हेच तर मान्य नसते. म.बसवेश्वरांनी श्रमनिष्ठेत देव पाहिला. जेंव्हा एखादी व्यक्ती आपल्या कामात एवढी एकरुप होते की, ती देहभान विसरते. हा संपूर्ण विश्वाच्या कल्याणाचा विचार आहे. आज चीन जगात महासत्ता म्हणून पुढे येत आहे कशाच्या बळावर ? फक्त आणि फक्त श्रमनिष्ठेच्या बळावर. उद्या सन 2020 मध्ये भारत महासत्ता होणार असेल तर श्रमनिष्ठेच्याच बळावर हा मानवी कल्याणाचा मूलमंत्र आहे. हा मुलमंत्र रुजवण्याचे महान कार्य म.बसवेश्वरांनी केले. आपला विचार सर्वप्रथम कन्नड या लोकभाषेतून मांडला. सर्व जातीतील व पुरुषांप्रमाणे स्त्रियांना समान अधिकार असल्याचे सांगितले. अंगमेहनतीशिवाय मुक्ती नाही. जागेवर बसून आळस करुन किंवा भीक मागून सद्गती प्राप्त होत नाही. आपल्या सर्व विचारांचे सार त्यांनी एका सुत्रात सांगितले, ते सुत्र म्हणजे कायकवे कैलास हे होय.

शरण तत्वज्ञानाचे सार त्यात सामावले आहे. त्याचे सुत्रमय रुप असे की सर्व व्यक्ती समान आहेत. कोणीही इतरांहून उच्च किंवा नीच असू शकत नाही. जन्म, जात, व्यवसाय पद या आधाराने माणसात भेद करता येत नाही, बसवेश्वरांनी धर्म, वर्ण, वर्ग, वंश, जात, लिंग, व्यवसाय अथवा अन्य सामाजिक भेदभाव आणि त्यातून निर्माण झालेल्या श्रेष्ठ-कनिष्ठ प्रवृत्तीस निकरांचा विरोध केलेला आहे. हेच आधुनिक कल्याणकारी राज्याच्या संविधानातील मूलभूत अधिकाराच्या कलम 14 ते 18 या समतेच्या हक्कात समाविष्ठ आहे. म्हणून म.बसवेश्वरांचा विचार हा कल्याणकारी राज्याला पुष्टी देणारा विचार आहे.

आदी शंकराचार्यांनी जगन्मिय्यावाद सांगितला परिणामी व्यवहारात जनन्मियावाद सदैव जनतेची क्रांतिनिष्ठा दडपून टाकण्यासाठी वापरला गेला पण म.बसवेश्वरांनी त्याचा विरोध करुन जगत सत्य आहे हे सिध्द करुन सर्वसामान्य आठरापगड जातीतील कष्टकरी हरळय्या, मडिवाळ माचय्या ढोर कक्कय्या, सत्यवक्का अशा असंख्य सामान्यजनांत आत्मबळ निर्माण करुन पुन्हा क्रांतीची ज्योत पेटवली. बसवेश्वर एका वचनात म्हणतात, देवलोक आणि मृत्युलोक भिन्न नव्हेत ते दोन्ही एक सत्य बोलनेच देवलोक, मिथ्या बोलणेच मृत्युलोक आहे. म्हणजेच स्वर्ग. अरे म्हणणेच नरक. सदाचार हाच स्वर्ग इथेच आणि नरक इथेच याला तूच साक्षीदार हे कुंडलसंगमेश्वर ऐवढ्या साध्या-सोप्या लोकभाषेत विश्वकल्याणाचे तत्वज्ञान दुस-या कुठल्याही विचारवंताला सांगता आले नाही. बसवेश्वराचे

हे वचन सामान्य नाही. विश्वमान्य ग्रीक तत्वज्ञ सॉक्रेटिस ज्ञानांची व्याख्या करतो जी स्थ्ज्ञलकाल निरपेक्ष आहे, सदगुण हेच ज्ञान आहे.

म.बसवेश्वरांनी हेच तत्वज्ञान उपरोक्त वचनात वेगळ्या भाषेत मांडले. सदाचार हाच स्वर्ग आहे. या दोन्हीचा अर्थ एकच आहे. शिक्षणातून पदव्या घेतलेली व्यक्ती ज्ञानी असते हे सॉक्रेटिसला मान्य नाही. त्यांच्या ज्ञानाचा संबंध व्यवहारातील त्यांच्या आचार धर्माशी आहे. सद्‌गुणाशिवाय ज्ञानाला कवडीची किंमत नाही. आधुनिक लोकशाही कल्याणकारी राज्यात शिक्षणातून मिळविलेल्या पदव्यांना ज्ञान समजून महत्व दिले जात आहे. म्हणुनच आज भ्रष्टाचार आतंकवाद इ. या समस्या तांडवनृत्य करीत आहेत. आजचा भारत प्रजासत्ताक गणतंत्र आहे, ह्याचे रुपांतर प्रजाप्रभुत्व गुणतंत्रात करायचे असेल तर, सद्‌गुणाला महत्व द्यावे लागेल. सदाचार हाच स्वर्ग आहे हे स्वीकारावे लागेल. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष केनेडी 1960 च्या दशकात चीनच्या दौ-यावर गेले होते, तेंव्हा त्यांच्या लक्षात आले. चीन उदयाची महासत्त आहे हे एका बुट पॉलिश करणा-या मुलाच्या सदाचारावरुन लक्षात आले. राष्ट्राध्यक्ष केनेडींनी बुट पॉलिस करुन घेतले आणि सुटे पैसे नसतील तर राहू दे म्हटले पण तो मुलगा म्हणाला मी कामाचे दाम घेतो भीक नाही. कारण याचा संबंध माझ्या राष्ट्राच्या प्रतिष्ठेशी आहे. एवढा सदाचार, एवढी श्रमनिष्ठा राष्ट्राला महासत्ता बनवणारी आहे. मानव जातीचे कल्याण करणारे आहे. म.बसवेश्वरांच्या अनुभव मंटपात असे 770 शरण होते. सत्यक्का नगर स्वच्छतेचे काम करणारी स्त्री होती, पण रस्त्यावर पडलेले सोन्याचे अलंकार सुध्दा उचलत नव्हती. लक्कम्मा दासोहासाठी मुठभर जास्त आणलेले तांदूळ परत करण्यास आपल्या पतीला भाग पाडते, यामागे सदाचार हाच स्वर्ग, सद्‌गुण हेच ज्ञान हे तत्वज्ञान आहे. हा सदाचार, सद्‌गुण, श्रमनिष्ठा, विवेकनिष्ठा हे वैश्विक विचार मानवी कल्याणाचे सुत्र आहे. हा विचार प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी आणि संपुर्ण मानवाचे कल्याण करण्यासाठी म.बसवेश्वरांनी त्यांच्या शरणांनिशी 12 व्या शतकात लढा दिला. हा विचार आधुनिक जगातील कल्याणकारी राज्याला उपयुक्त व प्रेरणा देणारा आहे. म्हणून म.बसवेश्वरांच्या कल्याणकारी जीवनकार्यास त्रिवार प्रमाण करुन हा लेखन प्रपंच संपवितो.

# महात्मा बसवेश्वरांचे आर्थिक विचार

**श्री वायपणकर जी.एम.**

*अर्थशास्त्र विभाग, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड ता. मुखेड जि. नांदेड*

बाराव्या शतकाच्या पुर्वार्धात म. बसवेश्वराचा जन्म कर्नाटक राज्यातील विजापुर जिल्ह्यातील बागेवाडी येथे शैव ब्राम्हण असलेल्या वडील मादीराज आणि आई मादलांबिका यांच्या पोटी झाला. त्यांच्या जन्मतारखे विषयी मतभेद असले तरी सामान्यत: त्यांचा जन्म वैशाखातील अक्षय तृतियेला झाल्याचे मानले जाते. वयाच्या आठव्या वर्षी ज्ञान प्राप्तीसाठी ते कृष्णा व मलप्रभा या नद्यांच्या संगमावरील कूडलसंगम येथे गेले. तेथे 12 वर्षे वास्तव्य करुन त्या अध्ययन केंद्रातून वेगवेगळ्या भाषा, धर्म, तत्वज्ञान इ. अभ्यास केला. पुढे त्यांचा विवाह मामाच्या मुलीशी झाला. तेंव्हा ते पुढे सोलापूर जिल्हयातील मंगळवेढा येथे 31 वर्षे राहीले. पुढे लिंगायत धर्माचा प्रचार आणि प्रसार देशभर केला. जगात जन्म घेतलेल्या काही मोजक्या पुण्य पुरुषापैकी बसवेश्वर हे एक आहेत. इतकेच नव्हे तर म.गौतम बुध्द, येशु ख्रिस्त, संत पॉल, गुरुनानक, महात्मा गांधी इत्यादी कोणत्याही सतपुरुषांबरोबर तुलना केल्यास म.बसवेश्वर हे या सर्वांपेक्षा थोडे तरी श्रेष्ठ वाटतात.

प्रकाशातील महाप्रकाश होऊन तळपत असलेले, तेजाळलेले दिसुन येतात. कोणत्याही चिरंतन मुल्यांच्या निकषांची कसोटी लावून, तुलनात्मक दृष्ट्या पाहिले असता, त्यांची साधना व सिद्धी पाहता अत्याधुनिक युगातील विज्ञानवादी लोकांना, विचारवंतांना तसेच साधु-संत, महात्म्यांना आश्चर्यचकित करणारे गुणवैशिष्ट्ये महात्मा बसवेश्वरामध्ये सामावलेले आहेत. आपल्या तप:शक्तीने वर्तमानकाळामध्ये राहून, भूतकाळ व भविष्यकाळाची कुंडली जाणलेले, कल्याण नगरीतच राहुन, जगाच्या जीवनाचे रहस्य ग्रहण केलेले तसेच शिष्यवृंदाना आपल्याकडे आकर्षित केलेले लोककल्याणाकरीता, सकळ प्राणीमात्रांचे भले करण्याकरीता आमूलाग्र क्रांतीची योजना आखून, तिचे नियोजन करुन, तिची अंमलबजावणी केलेले द्दष्टा पुरुष म्हणजेच महात्मा बसवेश्वर होत. विज्ञान आणि उद्यमयुग प्रारंभ होण्यापुर्वीच अर्थशास्त्र विकसीत झाले होते. ॲडमस्मिथ, केन्स, माल्थस व कार्ल मार्क्स इत्यादी अर्थशास्त्रज्ञांनी अर्थशास्त्राच्या विकासासाठी अव्दितीय अशी देणगी दिलेली आहे. वरील सर्व शास्त्रज्ञांपेक्षा पाच-सहाशे वर्षापुर्वीचा महात्मा बसवेश्वराचा जीवनकाळ होता. त्या काळात भारतात अगर जगाच्या कोणत्याही कोप-यात अर्थशास्त्राची आधूनिक परिकल्पनाही नव्हती. आधुनिक अर्थशास्त्रज्ञांना आश्चर्यचकीत करणारे, कार्ल मार्क्स, लेनिन सारख्यांनी कल्पनाही केली नसेल असे अनेक क्रांतीकारक आर्थिक विचार बसवेश्वरांच्या प्रतिभेच्या गर्भातून, चिंतनाच्या मंथनातून, अनुभवाच्या खोलीतून निर्माण झालेले होते.

“कायक आणि दासोह सिध्दांत” हा बसवेश्वरांच्या आर्थिक विचारांचा पाया आहे.

कायक म्हणजे क्रिया करणे, काम करणे, श्रम करणे होय. एवढेच नव्हे तर केवळ क्रिया अथवा श्रम म्हणजेच कायक नव्हे तर बाह्य जग विसरुन एकाग्रतेने, श्रध्दा निष्ठेने आपल्या कामात तल्लीन होऊन, त्याच्यात स्वत:स झोकून देऊन आपली आत्मशक्ती, देहशक्ती सर्वस्व एकवटून समर्पित भावनेने ते कार्य पूर्ण करणे म्हणजेच कायक होय. शराणांच्या आर्थिक विचारधारेत कायक आणि दासोह यांना अग्रस्थान दिलेले आहे. ते उत्पादन आणि वितरण यांचे पर्यायी शब्द आहेत.

त्यांच्या मते, श्रम न करता मिळणारा पैसा, काळ्या धंद्याने मिळालेले धन, अन्यायाने कमविलेली संपत्ती देवालाही मान्य होणार नाही. म्हणून श्रम (कायक) केल्याने मिळणारी साधी मीठभाकरीच लिंगाला (देवाला) अर्पित होते.

जसे कार्ल मार्क्स यांनी व्दंव्दात्मक भौतिक वादास शोषण, वर्गकलह, श्रममुल्य, राष्ट्रीयीकरण इत्यादी आर्थिक विचार आपल्या अपार विव्दतेने सखोल विचार करुन, चर्चा करुन, मुलतत्वांना रुप देऊन, समाजवादाला

विज्ञानाच्या स्तरावर चढविले. त्याच प्रमाणे म. बसेवश्वर व इतर शरणांनी आपल्या तर्क, जिज्ञासा, प्रयोग आणि अनुभव इत्यादींच्या सहाय्याने कायक सिध्दांताला विज्ञानाच्या उंचीप्रत घेऊन गेले. हा सिध्दांत सर्वांच्या आदरास पात्र ठरला.

जगात सर्वात प्रथम सर्वोदय सिध्दांत प्रत्यक्ष आचरणात आणणारे महात्मा बसवेश्वर होत. “सकळ जीवात्म्यांचे भले चिंतणारे आमचे कूडलसंगमदेवाचे शरणच कुळज” असे म्हणणा-या बसवेश्वरांना सर्वोदयाची कल्पना होती. आपले उभे सर्व जीवन त्याच्या सिध्दीसाठीच त्यांनी वेचले होते. शेकडो कुळ जातींच्याना स्वातंत्र्य, समानता, बंधुभाव तत्वाच्या आधारे एक करण्यात, अस्पृश्यता निर्मुलनासाठी जिद्द धरण्यात, सर्वांना समान संधी मिळावी म्हणून आर्थिक नीतीची रचना करण्यात त्यांनी सर्वोदय सिध्दांत प्रत्यक्ष आचरणात आणला. देवाने दिलेली संपत्ती शिवशरणांचीच आहे असे समजून म.बसवेश्वर अपार कमविलेले सर्व द्रव्य जंगमासाठी म्हणजेच समाजासाठी खर्च करीत होते.

आपल्याला आवश्यक असलेल्या मालमत्तेपेक्षा अधिक मालमत्ता आपल्या जवळ बाळगणे म्हणजे चोरी केल्याप्रमाणे आहे. असे त्यांचे मत होते.

काळा पैसा देवाला अर्पित होत नाही, न्याय मार्गानेच पैसा कमवावा. तसे न केल्यास तो पैसा सत्कार्याला मान्य होणार नाही. अन्यायाने द्रव्यार्जन करणे म्हणजेच भ्रष्टाचार होय. सत्य, शुध्द कायकाशिवाय (श्रमाशिवाय) अन्य मार्गांनी कमविलेली एक दमडीही (एक पैसा) त्याज्य आहे. असे त्यांचे मत होते. म्हणून आळस हाच नरक तर सतत उद्योग (काम) हाच स्वर्ग होय. याची जगाला जाणीव करुन देणे, हेच कायक सिध्दांताचे ध्येय होय. याचबरोबर माणसाच्या शारिरीक आणि मानसिक आरोग्याच्या दृष्टीने कायक हे अत्यावश्यक आहे, असे त्यांचे मत होते.

एकंदर कायकाशिवाय (श्रमाशिवाय) आलेला पैसा, संपत्ती सर्व पापमय आहे, अशी त्यांची समजूत होती. तसा त्यांनी उपदेशही केला आहे.

धन (पैसा) एकाच ठिकाणी जमा होऊ नये. संग्रह केलेले धन समाजकार्यास अगर योग्य कार्यास खर्च व्हावे. मात्र ते अनाचार करणा-या दुराचा-यांकरीता खर्च होऊ नये असे त्यांचे मत होते.

पदवी, प्रशस्ती, मानपान मिळविण्यासाठी, दगडावर नाव कोरण्यासाठी म्हणजेच आजच्या आधुनिक काळात स्वत:ची प्रशंसा करण्यासाठी, जाहीरात करण्यासाठी पैसा खर्च करणे व्यर्थ आहे, चुकीचे आहे असे त्यांचे मत होते.

कायकाने उत्पादन, दासोहाने वितरण अशी शरणांची नीती होती. समजाची सेवा करणे हाच दासोह होय. दासोह ही वर्ग, वर्णरहीत समाजात मुक्तपणे वितरण करण्याची क्रिया आहे.

सारांश रुपाने म.बसवेश्वराच्या आर्थिक विचाराबद्दल सांगावयाचे झाल्यास समाजवादी आर्थिक विचारांची पायाभरणी भक्कमपणे करण्याचे काम त्यांनी त्यांच्या काळात केले.

12 व्या शतकात समतावादी विचारधारा जनमानसात रुजवणारे म. बसवेश्वर हे एक उत्तुंग विचाराचे व्यकतीमत्व होऊन गेले, पुढे असेही म्हणता येईल की, म.गौतम बुध्द, येशुख्रिस्त यांच्यानंतर म.बसवेश्वर हे जगातील अव्दितीय बंडखोर व्यक्तीमत्व होते.

एकंदर म.गौतम बुध्द, म.बसवेश्वर, म.गांधी, म.फुले, संत कबीर, पेरीयार रामसामी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर इत्यादी महात्म्यांना जन्म दिलेली भारतमाता ही ख़रोख़रच महान पुण्यवती आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

*समग्र क्रांतीकारी बसवेश्वर : सुर्यकांत घुगरे प्रकाशन, बसवेश्वर पीठ, कर्नाटक विश्वविद्यालय, धारवाड - 2003.*
*बसवेश्वर रचिला पाया : अशोक कामत, बसव सेंटर, सोलापूर - 2001.*
*लिंगायत एक स्वतंत्र धर्म : डॉ. राजेश्वर सोलापूरे, अरुणा प्रकाशन, लातूर - 2014.*
*बसव प्रज्ञा : रमजान दर्गा, महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी जि.बिदर - 2017.*

**महात्मा बसवेश्वर : एक अर्थतज्ञ**

**प्रा. रवींद्र विनायकराव सोनूले**
*वाणिज्य विभाग, महात्मा ज्योतीबा फुले महाविद्यालय, मुखेड जि. नांदेड*

इ.स. 12 व्या शतकात मंगळवेढा नावाचे लहान राज्य होते. तेथे कळचुर्य घराण्याच्या बिजुळाचे राज्य होते. सम्राट चालुक्य विक्रमादित्याच्या कन्येचा पुत्र (नातू) म्हणजे मंगळवेढा राज्याचा राजा बिज्जळ होय. मदिराज हे इंगळेश्वर बागेवाडी परिसराचे पुरवराधिश्वर होते. मादिराज - मालांबिका या पती-पत्नीस कन्या नागलांबिका आणि पुत्र बसव म्हणजेच बसवेश्वर, बसवण्णा किंवा बसवराज हे अपत्ये होती. 1105 मधील वैशाख शुध्द तृतियेला अक्षयतृतीयेच्या दिवशी जवळच्याच इंगळेश्वर येथील माहेरी मादलांबिकेला पुत्ररत्न झाले. पुत्राचे नाव बसव ठेवण्यात आले. हाच बसव पुढे समता युगाचा प्रारंभकर्ता महात्मा बसवेश्वर म्हणून जगापुढे आला.

महात्मा बसवेश्वरांचा धर्म इष्टलिंग प्रतीक असलेला एकेश्वरवादी धर्म आहे. तो वर्ग, वर्ण, जाती आणि स्त्री-पुरुष लिंगभेदाचा विराधक आहे. त्यांनी आपल्या स्वप्नातील हा नवधर्म मानवता, नीती, वैचारीकता, तर्कबध्दता आणि समूहप्रज्ञेच्या आधारावर वास्तवात उतरविला. हा मानव धर्म, मानव संपन्नतेचे मुळ असलेल्या सदुपयोगासमेत आणला. त्यास आपल्याच नैतिक अर्थव्यवस्थेची जोड दिली. हेच या नवधर्माचे खास वैशिष्ट्ये होय.

महात्मा बसवेश्वर हे अर्थतज्ञ होते. म्हणूनच बिज्जळ राजाचे कोषाध्यक्ष झाले. त्यांच्या आर्थिक सिध्दांतामुळे बिज्जळ राजाचे भांडार (खजिना) समृध्द तर झालेच, त्याचबरोबर जनतेचे जीवनमान उंचविण्यात सफल झाले.

बसवण्णांनी हे पाहिले की कायक तत्वाव्दारे मानवशक्तीचा सदुपयोग आणि त्याव्दारे उत्पादन वाढीस लागले, मानव जीवन समृध्द झाले. त्यांच्या या प्रयत्नामुळेच बिज्जळ राजाचे भांडार सहजरित्या भरले. यामुळे कल्याण नगरीत व परिसरात (दान) देणारे व (भिक्षा) वाढणारे होतो. पण मागणारे कोणीच नव्हते.

प्रकृतीसह सकल जीवात्म्यांच्या कल्याणाची अपेक्षा ठेवणेच प्रजाप्रभुत्व असे बसवादी शरणांनी प्रतिपादन केले. अशा प्रजाप्रभुत्वामध्ये दुष्काळ पडत नसतो, हाच अमर्त्य सेन यांचा अर्थशास्त्रीय सिध्दांत आहे.

स्कॉटलंडचे ॲडम स्मिथ हे 18 व्या शतकातील सामाजिक तत्वज्ञानी आणि राजकीय अर्थशास्त्रज्ञ होते. अर्थशास्त्र हे नैतिक पातळीवर थांबले पाहिजे आणि मानवाने सहजतेने, स्वातंत्र्य अनुभवले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. बसवेश्वरांनी 12 व्या शतकात असेच विचार प्रतिपादन केले आणि आपल्या काळातील समाजात कार्यान्वित केले. म्हणून ते नवसमाजाचे, नवीन धर्माचे स्थापनाचार्य बनले.

बसवेश्वरांच्या आर्थिक संकल्पनेची व्याप्ती यापेक्षाही विशाल होती. ती अपरिग्रह कल्पनेची आणि व्याजरहित आर्थिक व्यवस्था होती. येशू ख्रिस्त, महम्मद पैगंबर आणि बसवेश्वर या विभुतीने व्याजाचे अतितीव्रतेने खंडन केले आहे. यामुळे समाजात अनैतिक शक्तीत वाढ होते, हे त्या विभूतीने जाणले होते. बसवेश्वर असे प्रतिपादन करतात की व्याज घेणे तर नाहीच नाही, उसने पण देण्यालाही विरोध करतात. एकाने दुस-याला दिले पाहिजे पण त्यांच्या देण्यात निरपेक्षता असायला पाहिजे.

बसवेश्वरांनी प्रतिपादन केलेला धर्म हा केवळ पुजा करीत बसण्याचा धर्म नव्हे, आर्थिक आणि सामाजिक समता प्रस्थापित करणारा धर्म होय. बसवेश्वरांनी सांगितलेली जंगमभक्ती (अर्थात समाजाची सेवा) आर्थिक दृष्टीने सेवा करण्याची होती.

मनुष्य सरळ व सहज जीवनशैलीने उदंड आयुष्य जगू शकतो. त्याच्या विलासी जीवनामुळे ही धरती विनाशाच्या टोकावर येऊन थांबली आहे, हे प्रत्येकाला कळाले पाहिजे. मनुष्य पैशाच्या अतिमोहातून मुक्त न झाल्यास त्याचा -हास व अध:पतन झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणूनच बसवेश्वर म्हणतात की, संपत्तीला विसरुनच कूडलसंगमदेवाची पुजा करावी.

राज्याच्या खजिन्याला हानी पोहचू देऊ नये, समाजाची सेवा सतत करीत रहावे, हे चांगल्या मनुष्याचे चांगले लक्षण होय. अशा प्रकारे बसवेश्वरांच्या मतानुसार एखाद्या व्यक्ती जवळ धन-संपत्ती संग्रह होत असल्यास ते कायद्यानुसारच मर्यादित असावे. वस्तू किंवा धनसंपत्ती स्वार्थापोटी कोंडून ठेवू नये. कोप-यात पडून कुजू नये. ते समाजाच्या उपयोगी पडले पाहिजे. ते चलनशील झाले पाहिजे. एकंदरीत धनसंपत्ती एखाद्याकडे संग्रहित होऊ नये.

मनुष्याकडे मोह इतका अधिक आहे की, त्याने उदात्ततेने विकास करुन न घेतल्यास या मोहजालावरुन बाहेर पडणे साध्यच नाही आणि ती व्यक्ती सर्व काही पैशाने व वस्तुने मोजत राहील. सुक्ष्मग्राही बसवेश्वर यांनी यांत्रिक, परंपरावादी, कर्मठ भक्ती नाकारण्यास सांगितले आहे. शिवाय सामाजिक प्रज्ञा नसलेल्या श्रीमंत मनुष्याचे अध:पतन व अवनती बद्दलही त्यांच्या वचनात प्रतिबिंब उमटलेले आहे.

अशा रितीने बसवेश्वरांनी आपल्या अनेक वचनांतून विविध प्रकारे म्हटले आहे की, व्यक्तीगत रुपात पैशाला अतिमहत्व देऊ नये. मात्र स्वस्थ समाज निर्मितीसाठी पैशाला अधिक महत्व दिले पाहीजे. मनुष्य जो पर्यंत धनाची आशा सोडणार नाही, तोपर्यंत सामाजिक अनिष्टतेचा नाश होणार नाही. सामाजिकरित्या व्यक्तीचा विकास होणार नाही. म्हणुन बसवेश्वर आपल्या मनातील भावना विशद करताना म्हणतात की -

धनाची आशा सुटणारी नाही ।
अरे, अरे, मानवा, नाश होणा-या हिन आशा नको करु ।
काळ, चांदणे व धनसंपत्ती स्थिर नाही हो ।।

अशा प्रकारे बसवेश्वर मनुष्याचे मन वळविण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्यात परिवर्तन घडवितात आणि घोषणा करतात, अर्थपुर्ण समाज सेवा हीच खरी पुजा !

**संदर्भ ग्रंथ :**

*बसव प्रज्ञा : रमजान दर्गा, महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान भालकी, जि.बिदर - 2017.*
*महात्मा बसवेश्वर : डॉ. अशोक गं. मेनकुदळे, महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान भालकी, जि.बिदर - 2019.*
*अनुभव मंटप : राजू जुबरे, महाराष्ट्र बसव परिषद हिरेमठ संस्थान, भालकी जि.बिदर - 2020*
*बसवेश्वरांचा विश्वसंदेश : रमजान दर्गा, महाराष्ट्र बसव परिषद हिरेमठ संस्थान, भालकी जि.बिदर - 2018*
*ऐतिहासिक बसवकल्याण : प्रा.भीमराव ब्रम्हाजीराव पाटील, शरण साहित्य मंडळ, लातूर - 2014.*

# महात्मा बसवेश्वर एक संत व समाज सुधारक

**डॉ.गित्ते कविता नरसिंगराव(कराड)**
**डॉ.प्रा.गित्ते आशा नरसिंगराव**
*पद – मुख्याध्यापिका, साने गुरजी निवासी प्रा/ मा विद्यालय केज ई-मेल–kavitagitte1705@gmail.com*

महाराष्ट्र ही संतांची भूमी म्हणजन ओळखली जाते. ज्या महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत नामदेव यांसारखे थोर संत होऊन गेले त्याच महाराष्ट्रच्या शेजारील राज्यात म्हणजेच कर्नाटक राज्यातील थोर संत तसेच समाज सुधारक महात्मा बसवेश्वर महाराज.

शालिवाहन शके दहाव्या शतकात कर्नाटकातिल विजापूर जिल्यातील इंगलेश्वर बागेवाडी या गावात ११०५ साली प्रतिष्ठित कुटुंबात बसवेश्वरांचा जन्म झाला. तर काहींच्या मते , त्यांचा जन्म इंगलेश्वर (जि.विजापूर) या गावी झाला असावा असा समज आहे. त्यांच्या जन्माविषयी जरी भेदा-भेद असला तरी सामान्यतः त्यांचा जन्म वैशाखातील अक्षय्य तृतीयेला झाल्याचे मानले जाते.

महात्मा बसवेश्वर हे एक संत व समाजसुधारक होते. त्यांनी हिंदू धर्मातील जातीव्यवस्थे विरुद्ध व अन्य हानिकारक प्रथांविरुद्ध संघर्ष केला. त्यांनी निर्गुण निराकार एकेश्वरवादी श्रद्धेचा पुरस्कार केला. बसवेश्वर कर्मठ विधांनी विरोधी करत. त्यांनी वेगवेगळ्या भाषा, धर्म, तत्वज्ञान, इत्यादी चे अध्ययन कृष्णा व मलप्रभा या नद्यांच्या संगमावरील कुडलसंगम येथे अध्ययन केंद्रात बारा वर्षे अध्ययन केले.

□ **भारतीय लोकशाही संसदेची स्थापना :-** लोकशाही संसदेची म्हणजेच 'अनुभव मंटपाची' स्थापना बसवेश्वरांनी मंगळवेढा येथे केली. या ठिकाणी सर्व धर्मिय लोक एकत्र येऊन सामाजिक प्रश्नावर/अडचणीवर कशी मात करायची यावर चर्चा करण्याचे कार्य चालत असे. बसवेश्वरांनी समाजातील वाईट चालीरीती, रूढी-परंपरा याना विरोध केला. व समाजच्या हितकारक गोष्टींची अमलबजावणी करणारी नवीन यंत्रणा तयार केली. बाराव्या शतकातील आदर्श प्रशासक , रयतेचे प्रणेते म्हणून महात्मा बसवेश्वरांना ओळखले जाते. सर्वप्रथम लोकशाही मूल्यांची सुरुवात १२ व्या शतकात अनुभव मंटपाच्या माध्यमातून केल्याचे वचन साहित्यातून दिसून येते. एकूणच त्यांनी वचन साहित्यात समता, न्याय, बंधुता, एकात्मता मूल्ये तसेच स्वातंत्र्य, अधिकर नियंत्रण व शिस्त व सुशासन प्रशासन आदी बाबींवर सखोल विवेचन केले आहे. सद्यस्थितीत शासन व प्रशासनाने या विचारांचा अवलंब केल्यास निश्चित देशात निर्माण होणारी विषमता, हिंसा, भेदभाव व जातीय राजकारण इत्यादी समस्यांवर पायबंद घालता येईल. परिणामतः चांगले सुशासन व प्रशासन निर्माण होईल.

महात्मा बसवेश्वर यांचे असे वचन होते की, " काय कवे कैलास " (श्रम हाच स्वर्ग) कायक म्हणजे देहाशी निगडीत ते ते सर्व होय. काया म्हणजे देह किंवा शरीर असा त्यांचा अर्थ होतो. बसवेश्वरांच्या मते ," प्रत्येक व्यक्तीने आपला चरितार्थ चालवण्यासाठी कोणतताही व्यवसाय केला पाहिजे".

महात्मा बसवेश्वर म्हणतात, "मना पासून केलेले प्रत्येक काम हीच खरी शिव उपासना हे त्यांच्या कायक व कैलास सिद्धांताचे सार होय". शारीरिक श्रम हा व्यवसाय हाच स्वर्ग (कैलास) आहे. कोणत्याही प्रकारचे शारीरिक श्रम हे हीन दर्जाचे नाही. असे सांगून त्यांनी श्रमप्रतिष्ठा वाढवली. कायक हे केवळ पैश्यांसाठी सांगितलेले नाही. तसेच ते कर्मसिद्धांतावर आधारलेले नसून त्यात व्यक्तीला व्यवसाय स्वतंत्र्य देण्यात आले आहे.

श्रमप्रतिष्टे बरोबरच गरजेनुसार संपत्तीची विभानगी करावी ही विचारसरणी(दासोह) मांडल्यामुळे बसवेश्वरांची वृत्ती समाजवादी समतावादी होती।. आपण कमावलेले धन हे केवळ स्वतःपुरते न वापरता त्याचा समाजासाठी उपयोग करण्याची संकल्पना त्यांनी मांडळी.

ग्रामोद्योगांना, व्यवसायांना त्यांच्या उपदेशामुळे बळ मिळाले. व सर्व व्यावसायिकांनमध्ये समभाव निर्माण झाला.

□ **महिलांसाठी कार्य :-** बसवेश्वरांच्या काळात समाज व्यवस्थेत स्त्री ला क्षुद्र, बहिष्कृत समजले जात असे. स्त्रियांवर अन्याय होत असे, म्हणून त्यांनी स्त्रियांसाठी मत स्वातंत्र्य दिले. तसेच धार्मिक आणि आध्यात्मिक हक्क दिले. स्त्रियांची अशुद्धतेपासून आणि पंचसुतकापासून सुटका केली. तत्कालीन समाज व्यवस्थेला राज सत्तेला हदरवून टाकणारा आंतरजातीय विवाह महात्मा बसवेश्वरांच्या पुढाकाराने १२ व्या शतकात घडला. मागासवर्गीय मुलाचा उच्चवर्णीय वर्गातील (ब्राम्हण) मुलीसोबत विवाह त्यांनी घडवून आणला. व यातूनच त्यांनी जातीय उच्च-नीचता नष्ट केली. विधवा विवाह घडून आला. वरील भरीव कार्य त्यांनी महिलांसाठी केले.

□ **महात्मा बसवेश्वरांनी सांगितलेलं १२ व्या शतकातील विचार :-** बसवेश्वरांनी सांगितलेलं विचार आजही तितकेच महत्वाचे व आवश्यक वाटतात नव्हे तर आवश्यकच आहेत. ते म्हणतात, " अनावश्यक खर्च करू नका, फुकटचे कोणाला काही देऊ नये, आणि फुकटचे घेऊ नये". मानव सर्व एकाच आहेत हे त्यांनी वाचनाद्वारे सांगितले. त्यांनी वचन साहित्यामधून मोलाचे संदेश दिले. एकाच देवाची म्हणजे इष्ट लिंगाची साधना करा. देहच देवालय आहे. एकत्र या, चर्चा करा, सुसंवाद साधा, स्त्रियांना, दलितांना समान संधी द्या, जातीभेद, लिंगभेद, वर्णभेद करू नका. कष्ट करा, भिक्षा मागून खाऊ नका, काम करा, कामातच कैलास आहे. दासोह (अन्नदान) करा, दगडधोंड्याची पूजा करू नका, ज्योतिष, भविष्य, वास्तुशास्त्र, पंचांग पाहण्यात वेळ घालू नका. पशु हत्या, मांसाहार, व्यसन , चोरी, हत्या, करून नाका. खोटे बोलू नका, राग करू नका, माणसाला माणसाप्रमाणे वागवा, दया हाच धर्म आहे.

अंधश्रद्धा, नवस, यापासून लांब राहा. पुण्यदाई कर्म करण्यासाठी उपास-तापास करू नका. प्रत्येक दिवस शुभ आहे. हसत स्वीकारा, सन्यास धारण करू नका, सदाचार स्वर्ग आहे तर अनाचार नरक आहे. शिक्षण घ्या, वाचन करा, ज्ञानी व्हा.

बसवेश्वरांचे विचार आजहीजीवंत आहेत त्याचबरोबर, आधुनिक जगालाया थोर संताचे विचार जगण्याची उमेद देतात.

# महात्मा बसवेश्वरांचे आर्थिक विचार

**प्रा. केंद्रे बी. एस.**
*अर्थशास्त्र विभाग, महात्मा ज्योतीबा फुले महाविद्यालय, मुखेड जि. नांदेड*

भारतात जशी भौगोलिक विविधता आहे तशीच धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, जातीय, भाषीय विविधता देखील दिसून येते. भारताला सामाजिक व सांस्कृतिक विविधतेचा वारसाच लाभलेला आहे. भारतात पुर्वीपासूनच रुढी व परंपरा चालत आलेल्या आहेत. यातील काही रुढी - परंपरा समाजासाठी पोषक तर काही घातक ठरलेल्या आहेत. काळाच्या ओघात धर्म, रुढी, परंपरा यांच्या माध्यमातून काही समाजकंटकानी समाजात विषमतेचे बीज पेरण्याचे काम केले. यातून सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक इत्यादी बाबतीत जाणीवपुर्वक समाजात विषमता निर्माण केली गेली. त्यातून धर्म व समाजव्यवस्थेमध्ये अनेक दोष निर्माण झाले. हे दोष दूर करण्यासाठी अनेक महामानवांनी, समाज सुधारकांनी अविरतपणे प्रयत्न केले. आपल्या विचार व आचारांच्या माध्यमातून त्या-त्या काळातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक परिस्थितीचे तर्कशुध्द आकलन करुन मानव समाजाच्या उत्थानासाठी कार्य केले. असेच थोर समाजसुधारक महात्मा बसवेश्वर यांनी बाराव्या शतकांमध्ये धर्म व समाजव्यवस्थेमध्ये कर्मकांड, दैववाद, यज्ञप्रथा, स्त्रीदास्य, आर्थिक व सामाजिक विषमता, स्पृश्य-अस्पृश्य भेद या सारख्या कुप्रथाचे समुळ उच्चाटण करण्याचे महान कार्य केले. महात्मा बसवेश्वरांच्या आर्थिक विचारांचा आढावा प्रस्तुत लेखात घेणार आहोत.

महात्मा बसवेश्वर यांनी तत्कालीन समाजिक, आर्थिक, धार्मिक, जातीय विषमतेचा अभ्यास करुन अविरतपणे समाज प्रबोधनाचे कार्य केले. बाराव्या शतकात वरिष्ठांनी सत्ता व बुध्दीच्या जोरावर कनिष्ठ वर्गाचे जे शोषण सुरु केले होते, त्यामुळे समाजाच्या गरिबीला, अज्ञानाला, शोषणाला व असमानतेला श्रीमंत आणि पुरोहित वर्गच जबाबदार व कारणीभूत आहे हे बसवेश्वरांच्या लक्षात आले होते. अशा परिस्थितीत महात्मा बसवेश्वरांनी दारिद्री, कनिष्ठ वर्गातील अधिकारहीन लोकांना समाजात बरोबरीचे स्थान प्राप्त करुन देण्याकरीता समताधिष्ठित समाजाची उभारणी करण्यासाठी सर्वात महत्वाच्या आर्थिक व्यवस्थेच्या बदलाची गरज सांगितली. त्यानुसार त्यांनी आर्थिक संरचनेत बदल घडवून आणण्याचा सातत्याने प्रयत्न केला. बसवेश्वरांच्या मते समाजातील गरिबी, बेकारी, दारिद्य, उपासमार, समाजातील आर्थिक विषमता त्याचबरोबर शेतीत राबणारा शेतकरी, शेतमजुर, श्रमिक इत्यादींची आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारायची असेल तर नैसर्गिक साधन संपत्ती व कष्टक-यांच्या श्रमातून उत्पादित झालेली संपत्ती यांचे समान वितरण झाले पाहिजे. आपल्या धर्म व समाजव्यवस्थेच्या चौकटीने सत्ता, अधिकार व संपत्तीचे विषम वाटप केले होते. त्याच कारणामुळे कष्ट करणारा बहुजन समाज गरिबी आणि दारिद्र्यात खितपत पडलेला आहे. म्हणूनच ती जुनी व्यवस्था बदलविण्याचे कार्य महात्मा बसवेश्वरांनी हाती घेतले. त्याकरीता त्यांनी कृषी, श्रमिक, उद्योग व व्यवसाय, धनसंचय व भ्रष्टाचार इत्यादी विषयी आपले आर्थिक विचार मांडले. हे विचार मांडत असताना कायकवे कैलास सिध्दांत व दासोह सिध्दांताची समर्पक अशी मांडणी देखील बसवेश्वरांनी केलेली आहे.

**कृषी विषयक विचार :** प्राचीन काळापासूनच भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. आजही भारताच्या आर्थिक विकासात शेतीक्षेत्राचा महत्वाचा वाटा आहे. बाराव्या शतकात शेती व शेतीआधारीत उद्योगच चालत होते. त्यामुळे शेती क्षेत्राला अनन्य साधारण असे महत्व होते. बाराव्या शतकात देखील शेतीवर मांडलिक राजे, सामंत, दंडनायक, जहागीरदार, पाटील व पुरोहित यांचेच नियंत्रण होते. शेती यांच्याच मालकीची होती. शेतीवर राबणारा, शेतीत कष्ट करणारा, उत्पादन घेणारा श्रमिक व बहुजन वर्ग होता. दिवस-रात्र काबाडकष्ट करुन शेतीत उत्पादन करायचे शेतक-यांनी आणि प्राप्त मोबदला लुटायचा वरिष्ठ सत्ताधीश व बुध्दीवादी वर्गांनी, त्यामुळे शेतीत उत्पादन

जरी जास्तीचे मिळाले तरी शेतक-याची आर्थिक परिस्थिती सुधारत नव्हती कारण जमीनीची मालकी ही सत्ताधारी, बुध्दीवादी लोकांकडे होती. शेतकरी, शेतमजुर, श्रमीक हे शेतीत राबायचे आणि शेतीमालकांना उत्पादन करुन द्यायचे. त्यामुळे समाजात गरिब-श्रीमंतीची मोठी दरी निर्माण झालेली होती. श्रीमंत अधिक श्रीमंत तर गरिब अधिक गरिब बनत चाललेला होता. या कालावधीत सत्ताधारी लोकांनी आपल्या बुद्धीमत्तेच्या जोरावर कष्ट करणा-या गरिब लोकांचे एक प्रकारचे शोषण चालू केले होते. हे बसवेश्वरांच्या लक्षात आले. त्यांच्या मते नैसर्गिक साधन संपत्तीचे वितरण समान झाले पाहिजे. चतुर्थ श्रेणीतील कष्ट करणा-या समाजाला शेतीची मालकी मिळाली पाहिजे. तसेच त्यांनी उत्पादीत केलेल्या शेतमालाचा त्यांच्या श्रमानुसार योग्य तो माबदला मिळाला पाहिजे असे मत बसवेश्वरांनी मांडले व त्या दृष्टिने त्यांनी प्रयत्न चालू केले. महात्मा बसवेश्वरांनी केवळ शेती क्षेत्रच नाही तर सत्ता, अधिकार व संपत्तीचे जे विषम वाटप झालेले आहे त्यांच्या विरोधात एक सामाजिक चळवळच चालू केली. ही संपत्ती वितरणातील त्रुटीच बहुजन वर्गाच्या गरिबीला कारणीभूत आहे, त्यामुळे ही जुनी व्यवस्था बदलविणे महत्वाचे आहे, असे बसवेश्वरांना वाटले व त्यांनी सत्ताधारी व पुरोहित वर्गाच्या विरोधात वैचारिक चळवळ चालू केली. बसवेश्वरांनी आर्थिक चिंतन करुन कायकवे कैलास व दासोह सिध्दांताची मांडणी देखील केली.

**कायकवे कैलास सिध्दांत :** महात्मा बसवेश्वरांना समताधिष्ठित मानवतावादावर आधारित समाजाची उभारणी करावयाची होती. ज्या समाजात कोणी उच्च-निच, गरीब-श्रीमंत, शोषक-शोषित राहणार नाही अशी समाजबांधणी त्यांना करावयाची होती. परंतु यामध्ये सर्वात मोठी समस्या होती ती आर्थिक व्यवस्थेची. बाराव्या शतकातील विषम समाजरचनेचे मूळ विषम अर्थव्यवस्थेमध्ये आहे, आणि त्याला धार्मिकतेचा आधार असल्याची जाणीव महात्मा बसवेश्वरांना झालेली होती. या कालावधीत प्रामाणिक पणे शारिरिक कष्ट करणा-या शुद्र, शेतकरी, श्रमिक यांच्या श्रमाला कोणतीही किंमत राहिली नव्हती. शारीरिक श्रम करणा-या पेक्षा बौध्दीक कार्य करणा-यास अधिक मान-सन्मान व अर्थप्राप्ती होत होती. बसवेश्वरांना समाजातील ही विषमता दूर करुन समाज व अर्थव्यवस्थेच्या मजबुतीसाठी श्रमिकांच्या, गोरगरिबांच्या स्थितीत बदल घडवून समानतेवर आधारित व्यवस्था निर्माण करण्यासाठी धर्म महत्वाची भूमिका बजावू शकतो याची खात्री होती. त्यानुसार धर्माच्या आधारेच त्यांनी कायकवे कैलास सिध्दांताची मांडणी केली.

जगाचे अस्तित्वच क्रियेवर उभारलेले आहे, त्यामुळे क्रिया थांबली की जग शुन्य होते. ख-या अर्थाने कर्म, क्रिया हा प्रत्येक जीवाचा सर्वप्रथम धर्म आहे. या शरिराने केलेल्या कर्म अथवा क्रियेलाच कायक असे म्हटले आहे. बाह्यजग विसरुन एकाग्रतेने, पुर्ण निष्ठेने, प्रामाणिकपणे, सर्व शक्ती एकवटून, समर्पित भावनेने केलेले कार्य म्हणजे कायक होय. कायक ही व्यापक संकल्पना असून तिचे सामाजिक श्रम, परिश्रम, सेवा, कर्तव्ये, बांधिलकी, नोकरी, व्यवसाय, अर्पित कार्य असे काही प्रमुख अर्थ आहेत. कैलास या शब्दाचा अर्थ महादेवाचे निवासस्थान असा असला तरी, या ठिकाणी कैलास म्हणजेच शाश्वत आनंद होय, जो प्रामाणिकपणे कर्म केल्यास प्राप्त होवू शकतो. कर्मातच ईश्वर, श्रमातच स्वर्गप्राप्ती, कर्तव्यपूर्ती हीच ईश्वरप्राप्ती अशा संकल्पनेतून कायकवे कैलास सिध्दांताचे स्पष्टीकरण महात्मा बसवेश्वरांनी केले. प्रत्येक व्यक्तीने प्रामाणिकपणे आणि निष्ठेने कार्य केल्यास समाजातील बेकारी दूर होऊन उत्पन्नात वाढ होईल आणि त्यातूनच अधिक समृध्दता वाढून समाजातील गरिबी व विषमता कमी होईल असे मत बसवेश्वरांनी मांडले. म्हणूनच समाजातील प्रत्येक व्यक्तीने कायक केलेच पाहिजे असा दंडक महात्मा बसवेश्वरांनी घातला होता.

तत्कालीन समाजात धर्म आणि ईश्वरावर लोकांची फार मोठी श्रध्दा होती. त्यामुळे बसवेश्वरांनी ईश्वराचा आधार घेवून कायकवे कैलास ही संकल्पना जनसामान्या पर्यंत पोहोचवली. कायक, क्रिया, कर्म किंवा श्रमामध्येच ख-या अर्थाने ईश्वर समावलेला असल्याने ईश्वराला कर्मकांडाच्या माध्यमातून इतरत्र कुठेच शोधण्याची, त्याकरीता वेळ, पैसा व्यर्थ घालविण्याची गरज नाही. म्हणूनच समाजातील प्रत्येक व्यक्तीने त्याना मिळविलेली, आवडलेली कामे प्रामाणीकपणे करुन शुध्द भावनेने आपली क्रियाशिलता वाढविली पाहिजे. ज्याव्दारे स्वत:चे व समाजाचे उत्पन्न वाढुन समाजाचा एकत्रित विकास होईल जेणेकरुन समाजातील विषमतेची दरी मिटत जाईल. त्यामुळे

समाजातील दु:ख, दैन्यावस्था संपुष्टात येऊन समाजात शांती व सौख्य आपोआपच निर्माण होईल. थोडक्यात कायकवे कैलास या संकल्पनेतून बसवेश्वरानी असे सांगितले की, शुध्द चित्ताने कायक केल्यास धनप्राप्ती निश्चित आहे. म्हणूनच सर्व कल्याणाचे मूळ कायकाला (कर्माला/कार्याला) मानले होते.

थोडक्यात, महात्मा बसवेश्वरांचा कायकवे कैलास हा सिद्धांत धार्मिकता, सामाजिकता व आर्थिकता यांचा सुंदर मिलाफ करणारा आहे. व्यक्ती, समाज व राष्ट्राचा विकास आर्थिक उत्पादनावर अवलंबून असतो. त्यामुळे समाजातील प्रत्येक व्यक्तीने प्रामाणिकपणे, जिद्द व सचोटीने प्रयत्न केल्यास व आपले कार्य व्यवस्थित पार पाडल्यास व्यक्तीचा, समाजाचा पर्यायाने राष्ट्राचा विकास निश्चितपणे होतो. परंतू तत्कालीन समाजव्यवस्थेत स्वार्थी आणि आळशी प्रवृत्तीमुळे कायकत्वाची अंमलबजावणी होत नव्हती म्हणून स्वत: कष्ट न करता, दुस-याच्या श्रमावर जगणा-या व कष्टच न करणा-या लोकांना क्रियाशील बनविण्यासाठी महात्मा बसवेश्वरांनी ईश्वराचा आधार घेऊन हा सिध्दांत लोकांना सांगितला. तत्कालीन लोक धर्म व ईश्वरांना मानणारे असल्याने सहजिकच अर्थप्राप्ती बरोबर ईश्वरप्राप्ती होत असल्याने हा सिध्दांत लोकांना रुचला. म्हणजेच बसवेश्वरांनी या सिध्दांताच्या आधारे नैतिकता, अध्यात्मिकता, सामाजिकता व आर्थिकता या सर्व बाबी साध्य केल्या आणि श्रमाला प्रतिष्ठा व किंमत मिळवून दिली.

**दासोह सिध्दांत :** महात्मा बसवेश्वर हे अष्टपैलू व्यक्तिमत्व होते. ते उत्कृष्ट राजनीतीज्ञ, समाजसुधारक, धर्म संस्थापक होते त्याच प्रमाणे तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा आर्थिक दृष्टिकोणातून सखोल अभ्यास करणारे अर्थतज्ञ देखील होते. समाज आणि अर्थकारण यांचे परस्पर जवळचे नाते आहे तसेच अर्थकारणावरच समाजकारणाची भिस्त असते याची पुरती जाणीव महात्मा बसवेश्वरांना होती. म्हणूनच समाजातील अर्थकारणाची घटी नीट बसविण्यासाठी, आर्थिक विषमता कमी करण्यासाठी कायकवे सिध्दांताबरोबरच दासोह सिध्दांताची देखील त्यांनी मांडणी केली. उत्पादनवाढीसाठी कायकवे सिध्दांत तर संपत्तीच्या वितरणासाठी दासोह सिध्दांताची मांडणी त्यांनी केली.

दासोह हा कन्नड शब्द असून त्याचा अर्थ, प्रामाणिकपणे मिळविलेलया मिळकतीचा काही वाटा समाजासाठी, गरजुसाठी खर्च करणे असा होतो. दासोह म्हणजे दान नव्हे. दासोह म्हणजे देण्यामध्ये कोणत्याही प्रकारचा दातृभाव नसणे होय. म्हणजेच देणा-याच्या मनात मी देतो, तर घेणा-याच्या मनात मी घेतो ही भावना नसल्यामुळे परस्पर उपकाराची भावना राहत नाही. थोडक्यात अहंकार विरहित निस्वार्थ भावनेने केलेले दान म्हणजे दासोह होय.

महात्मा बसवेश्वरांनी त्रिवीध दासोह सांगितला. व्यक्तीच्या जडण-घडणीमध्ये गुरु, लिंग आणि जंगम (समाज) यांचा महत्वाचा वाटा असतो. म्हणून मनुष्याने गुरुला आपले तन, लिंगाला आपले मन तर जंगमाला आपले धन अर्पण करणे म्हणजे त्रिविध दासोह होय. म्हणजेच त्रिविध दासोहाच्या माध्यमातून ज्ञान प्राप्ती, मानसिक सामर्थ्य व समाजहित या तीन महत्वाच्या बाबीची सार्थकता होते. त्यातूनच व्यक्ती व समाजहित जोपासले जावू शकते अशी बसवेश्वरांची धारणा होती.

बाराव्या शतकातही प्रत्येक व्यक्ती सत्ता व अधिकाराचा वापर करुन वाटेल त्या मार्गाने संपत्ती जमा करण्याचा प्रयत्न करित होता. अशा या धनवान व्यक्तींच्या आजु-बाजुला गरजु, गरिब तडफडत असले तरी हा श्रीमंत वर्ग स्वत:च्याच धुंदित तल्लीन राहत होता. हे लोक संपत्तीची साठवणूक करित होते. ते गोर-गरिबामध्ये, गरजू लोकांमध्ये आपल्या संपत्तीचे वितरण करित नसत. त्यामुळे समाजात गरिबी-श्रीमंतीची एक दरी निर्माण झालेली होती. महात्मा बसवेश्वरांच्या मते गरजेपेक्षा अधिक लाभाचे, संपत्तीचे समाज हितासाठी वितरण केले पाहिजे, या धारणेतूनच त्यांनी दासोह सिध्दांत मांडला. दासोहामध्ये प्रामाणिक मिळकतीचा काही भाग गरजूंसाठी, समाजहितासाठी दान देणे अपेक्षित होते. कोणाला त्रास देवून, भिक मागून, अयोग्य मार्गाने, व्याजाने प्राप्त केलेले धन दानासाठी पात्र नाही असे महात्मा बसवेश्वरांचे मत होते.

थोडक्यात महात बसवेश्वरांनी प्रामाणिक कष्ट करण्यासाठी कायकवे सिध्दांत मांडला. या प्रामाणिक कष्टातून संपत्ती मिळविली जाते. त्याचाच काही भाग गरजुंना व गरिबांना तसेच समाज हितासाठी दान करण्यास सांगितले आणि त्यासाठी दासोह सिध्दांनाची मांडणी केली.

महात्मा बसवेश्वरांनी श्रमिकाबद्दल देखील आपले विचार मांडलेले आहेत. समाजात आवश्यक त्या गरजा भागविण्यासाठी प्रत्येकाचीच कार्ये महत्वाची आहेत. त्यामुळे त्यात श्रेष्ठ-कनिष्ठ भाव नसलाच पाहिजे. तसेच व्यक्तीच्या गुणकौशल्यावर आधारीत त्याला व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य असले पाहिजे असे विचार महात्मा बसवेश्वरांनी मांडलेले आहेत. थोडक्यात संपुर्ण समाजाला सुखी, संपन्न व स्वावलंबी बनविण्यासाठी महात्मा बसवेश्वरांनी जीवनभर सामाजिक कार्य केले.

**संदर्भ ग्रंथ :**

*घुगरे सुर्यकांत, वीरशैव इतर धर्म व समाज.*
*कलबुर्गी एम.एम. (संपा.), वचन.*
*डोणगावकर वेदप्रकाश, महात्मा बसवेश्वरांचे तत्वज्ञान.*
*जयशेट्टी भालचंद्र, दोडमनी शालिनी, शरण आंदोलन, महाराष्ट्र बसव परिषद.*
*डॉ.सचितानंद बिचेवार, परिवर्तनाचा महामेरु, महात्मा बसवेश्वर.*

## महात्मा बसवेश्वर: एक समग्र चिंतन

**प्रा.कांबळे आर.जी.**
*व्यवसाय अभ्यासक्रम विभाग, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड, जि.नांदेड.*

**प्रस्तावना:-**

संत महंत चन्ना महात्मा बसवेश्वर यांचा जन्म इ.स.११३१ मध्ये कर्नाटक राज्यात विजापूर जिल्ह्यातील बागेवाडी या गावी झाला. सुरुवातीपासूनच बसवेश्वरांना दिन, दलित, गरीब, जातीयवादी, हिंसा वादी, ई.ना त्यानी लहानपणापासूनच विरोध दर्शविला होता. म्हणून त्यांनी वयाच्या आठव्या वर्षीच उपनयन संस्कारांना तिलांजली देऊन समाजातील अस्पृश्य, जातीयवादी, व्यभिचारी, होणाऱ्या अन्यायाला भेदभावांना योग्य वाचाआणी दिशा देण्याचे महान कार्य सुरू केले. बसवेश्वर हे हिंदू जातिव्यवस्थेवर संघर्ष करणारे पर्व समजले जाऊ लागले. त्यामुळे त्यांना विश्वगुरू असेही म्हटले गेले. ज्यामध्ये धर्म जात, लिंग, भेद यांची परवा न करता प्रत्येकाला समान न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. यासोबतच आठशे वर्षापासून अस्तित्वात असलेल्या नारी प्रतारनेचा खातमा केला. हे सर्व करत करत ते शिवभक्ती ही करत होते. भक्तीच्या माध्यमातून मठातील, मंदिरातील, होणाऱ्या अंधविश्वासाला ही कडा विरोध दर्शविला. त्यासाठी त्यांना खूप मोठा संघर्ष करावा लागला. म्हणूनच त्यांना कन्नड साहित्यातील हिरा मानले गेले. वास्तविक पाहता बसवेश्वर हे ब्राम्हण परिवारातील असून सुद्धा त्यांनी ब्राह्मण वादास जाणीवपुर्वक विरोध केला कारण त्यांचा कर्माच्या व्यवस्थेवर जास्त विश्वास होता. म्हणूनच जातीवाचक कूटनीति ला संपविण्यासाठी त्यांनी नवीन संप्रदायाची निर्मिती केली ती लिंगायत नावाने ओळखली जाते. कर्नाटकातील 18 टक्के लोक हे लिंगायत आहेत. लिंगायत समाजात वेदआणि मूर्तीपूजा, पूर्वजन्म, यावर विश्वास ठेवला नाही. भारताच्या इतिहासात अनेक थोर पुरुष होऊन गेले. अशा थोरांची आज खरी गरज भासत आहे. बसवेश्वरांच्या कार्यातून अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, कर्मकांड, भेदभाव, जातीयता व अस्पृश्यतानी होरपळलेल्या समाजाला धाडस व नवचैतन्य देण्याचे कार्य केले. त्यातून होणारा मान-अपमान, टीका, सहन करून त्या विरोधात संघर्ष केला. त्यामुळे त्यांना विद्रोही असेही म्हटले गेले. तरीही त्यांनी न डगमगता देशातील धार्मिक, साहित्यिक, शैक्षणिक, राजकीय, समाज सेवेतून परिवर्तनच केले. वारंवार होणारा भेदभाव, जातिभेद, शोषण, यासाठी वेळोवेळी लढा देऊन तो यशस्वी केला. तेव्हा होणाऱ्या वर्णभेद, जातीवादावर, कडाडून टीका ही केली.

महात्मा बसवेश्वरांनी समाजातील विषमता दूर करण्यासाठी दोन क्रांतिकारी संकल्पना तयार केल्या त्यातल्याच एक कायक वे कैलास आणि दुसरी दासोह,कायक वे कैलास म्हणजे मनातून केलेली भक्ती हीच खरी उपासना आहे. शारीरिक परिश्रमातून मिळणारे सुख, वैभव, म्हणजेच प्राप्त झालेल्या स्वर्ग आहे. असे ते सांगतात.

दासोह म्हणजे आपल्या श्रमा सोबतच संपत्तीची ही समान विभागणी केले पाहिजे. अशा वृत्तीमुळे बसवेश्वरांची समाजाप्रती असणारी समतावादी विचारधारा आणि समाज हित त्यातून दिसून येते. म्हणूनच ते म्हणायचे आपल्या श्रमातून प्राप्त झालेले धन यात ही समाजाचा वाटा असायला पाहिजे असे त्यांचे मत होते. अशा विचारांमुळेच सर्वांमध्ये समभाव या वागणुकीचा उदय झाला.

**बसवेश्वरांनी बहिस्कारीत स्त्री मुक्ती केली:-**

बसेश्वर यांच्या काळातील स्त्रीला बहिष्कृत समजले जायचे. म्हणून यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला विरोध करून स्त्रीजातीला धार्मिक-अध्यात्मिक, मत स्वातंत्र्याचा अधिकार, व सन्मान, करून बहिष्कृत संकल्पनेतून कायमचे मुक्त केले. यांच्या पुढाकारानेच आंतरजातीय विवाहास मान्यता देऊन विवाह घडवून आणले. परंतु आज हि आपण आंतरजातीय विवाहास पूर्ण मानसिकतेतून स्वीकारण्याचा प्रयत्न ही करत नाही ही शोकांतिका आहे. जनजागृती

सार्वजनिक सभा व मठातून, मंदिरातून, चर्चेद्वारे जनजागृती केली. परिसंवादातून ची चर्चा होत असे तीच उत्तर साहित्यातून वचन साहित्याच्या रूपाने वचन व प्रबोधन रुपी विचार पेरले. भारतीय संविधान हे मूल्यावर आधारित असून त्यात गौतम बुद्ध, महावीर, बसवेश्वर, यांचीच मूल्य ठेवण्यात आलेली आहेत. समाजातील जातीय विषमता लिंगभेद यांना दूर घालविण्यासाठी समतेचे तत्व आचरणात आणावी. कारण समानता हा नीतिधर्म जोपासून समाजात एकनिष्ठ समतेचा संदेश देऊन सामाजिक एकजूट करणे आवश्यक आहे. म्हणूनच साहित्याचा अभ्यास करताना भारतीय संविधान व तत्व या विचारसरणीत दडले आहे असेच वाटते. जर आपण सदाचाराचा, अवलंब केला तर चोरी, लबाडी क्रोध, मत्सर, यांचा नाश होतो.तर बसवेश्वरांच्या वचनात ते सांगतात खोटे बोलू नका, व्यभिचार करू नका, निंदा करू नका, तिरस्कार करू नका, नेहमी सत्याची कास धरा, आणि आपल्यात मनाचे पावित्र्य असेल, तरच मनाची शांती आणि ईश्वर प्राप्ती होते. असे बसवेश्वर नित्य वचनात सांगतात.

"माझ्यापेक्षा लहान कोणी नाही,<br>
शिवभक्ता पेक्षा महान कोणी नाही,<br>
यास माझे मन साक्षी,<br>
तुमचे चरण साक्षी"

असे सुंदर आचरण असणाऱ्या व्यक्तीची सुंदर रचना म्हणजेच वचन होय. तर या वचनाने अंधश्रद्धा, कर्मकांड, बुवाबाजी, जातिभेद, अशा अनेक विषयावर प्रहार करणारे क्रांतिकारक विचार इत्यादींचा त्यांच्या वचनात समावेश आहे. म्हणूनच लिंगायत हा वचनांचा धर्मग्रंथ आहे. हे स्पस्ट होते.

**बसवेश्वरांचा संदेश:-**

बसवेश्वरांचा संदेश म्हणजे साधी वाणी, उच्च विचार, साधी शिकवण, ही समाजाला जपणारी स्त्रोत आहेत. घराघरात जाऊन साध्या जीवनाचे महत्त्व पटवून दिले. आपल्या सुंदर देहातच देवालय आहे. त्यासाठी त्याला सतत प्रसन्न ठेवून होणाऱ्या जातीभेद, वर्णभेद, लिंगभेद, यांना दूर करून स्वकष्टातून, श्रमातून, उपजीविका करा आणि समाजाची सेवा करत करत पर्यावरणाचेही रक्षण करा. माणसाला माणसाप्रमाणे वागणूक द्या. सदाचार बाळगा, विवेकाने, नम्रतेने वागा, आवश्यक तेवढाच खर्च करा, कारण कष्टाची भाकर आपला महाप्रसाद आहे. चारित्र्य सांभाळा, उच्चशिक्षण घ्या, ज्ञानी बना, नेतिक बना, विवेकी बना आणि स्वतः ही या सर्व बाबी आचरणात आणा आणि समाज सुधारण्याचा प्रयत्न करा. या सामान्य माणसातच देशाचे आणि राष्ट्राचे नेतृत्व आपणास मिळणार आहे. म्हणूनच या मुलांना यांचा वेळीच विकासासोबतच निस्वार्थ सेवा भावांचा संस्कार करणे आवश्यक आहे. कारण जनसेवा हीच ईश्वर सेवा या उक्तीप्रमाणे वागलो तरच प्रगती होऊ शकते. म्हणूनच आपल्या सभोवताली कोणी बिमार असेल, तर त्याची सेवा करा त्याला उपचारासाठी मदत करा. कोणी उपाशीपोटी असेल तर त्याला उपदेश करण्याआधी त्याची भूक शमविण्याचा प्रयत्न करा. आणि नंतर उपदेश करा. हृदयात नेहमी सेवाभाव ठेवल्यामुळे अमन, चैन, शांती, यासोबतच सामाजिक विकास होऊ शकतो. त्यासाठी मानवतेला विसरू नका. गरिबांची गरजवंताची सेवा हीच खरी पूजा आहे. म्हणून संतांच्या सहवासात राहून समाजसेवा करा. जोपर्यंत आपण एकमेकाविषयी सहकार्याची भावना जोपासणार नाही, तोपर्यंत सत्कर्म आपणास लाभणार नाही. म्हणून जीवनात सुख निरंतर मिळवण्यासाठी सर्वांच भलं करा. सेवा धर्मात पुढाकार घ्या. अशा सत्यवचनातून संस्काराची ओळख ही आपल्या कार्यातून दिसून आली पाहिजे असे अनमोल संदेश बसवेश्वर यांच्या कार्यातून दिसून येतात.

**नितीतत्वातून समानतेचा संदेश :-**

महात्मा बसवेश्वरांनी त्यांच्या बाराव्या शतकात समता सहित लिंगायत धर्म स्थापन करून त्या धर्मात जात-पात, वर्णभेद गरीब-श्रीमंत, असा भेदभाव न ठेवता सर्व काही समानच आहे. असे सर्वांच्या विकासासाठीचे तत्त्वज्ञान सांगितलेले आहे. ज्यात अष्टावरण, पंचाचार, आणि षटस्थल यांचा समावेश आहे. तर बसवेश्वरांनी पंचाचारातुन पाच निती तत्वांचा आचरणात समावेश करावा असे सांगितले. पंचाचार म्हणजे पाच आचरणाचा समावेश जिथे दिसून येतो. तो पंचाचार. ज्यामधून व्यक्तीची वागणूक विकास, चालणे, सामंजस्य राहणे, विवेकी

होणे, इत्यादी दिसून येतात. या आचारात खरा स्वर्ग आहे. कारण आपले आचरण इंद्रियातून दिसून येते. यात मनाचा फार मोठा उपयोग ही दिसून येतो. त्यातूनच निघणारे शुद्ध विचार, सत्कर्मा साठी उपयोगी येतात. तर अशुद्ध विचार दुर्गुणाकडे, वाईट क्रत्या कडे वळतात. म्हणूनच बसवेश्वरांनी सद्‌गुन, सदाचार, सुविचारांचा ठेवा, जोपासण्यासाठी 5 नीती तत्त्वांचा अवलंब करावे असे सांगितले आहे. त्यामध्येच लिंगाचार, सदाचार, शिवाचार, गणाचार 'भ्रत्याचार यांचा समावेश आहे. लिंगा शिवाय अन्य उपासना न करणे म्हणजेच लिंगाचार. सदाचार म्हणजे गुरु, लिंग, जंगम, यांना अन्नदान पैसा इत्यादी साहित्य अर्पण करणे हे सदाचाराचे रक्षण आहे.

सामाजिक सेवा करून अध्यात्मिक गुणवत्ता वाढवणे होय.

शिवभक्तामध्ये कोणताही जातीभेद, वर्णभेद, न करता राहणे हे शिवाचार आहे.

अन्याया विरुद्ध लढा हाच गणाचार आहे.

सर्वा सोबत सद्विवेक विवेक शीलाचे आचरण हेच भ्रत्याचार होय.

बसवेश्वरांनी सांगितलेल्या पाच तत्त्वातून समाजाचा आणि राष्ट्राचा सर्वांगीण विकासात बहु मोलाचा फायदा झालेला दिसून येत आहे. तसेच ठराविक लोकांनी असे पंचाचार करावे असेही नाही. तर ते सर्वांसाठी सारखेच आहेत. म्हणूनच विश्व मान्य आहेत. यातूनच चारित्र्यसंपन्न, नीतिमान, राष्ट्राची आपण उभारणी करू शकतो.

**नीतीतत्वात बसवेश्वर**

**१) लिंगाचार (धार्मिक नीति तत्व):** मध्ययुगात "धर्म "ही प्रधान व्यवस्था होती. तेव्हा बसवेश्वरांनी लिंगा चारा च्या मदतीने धार्मिक नितीतत्वांचे प्रतिपादन केले. ज्यात एक देव उपासनेला महत्त्व दिले. विश्व निर्माता हा एकच देव असल्यामुळे एकाच देवाची पूजा करावी असे सांगितले. पृथ्वी जशी गोलाकार आहे. तसाच ईस्ट लिंगाचा आकार ही गोल आहे. म्हणून या ईस्टलिंगाची पूजा केली तर सर्व देवांची पूजा पूर्ण होते. कारण या छोट्याश्या इष्टलिंगातच विश्व सामावलेले आहे. या विश्वासतच जगविस्तार, नभोविस्तार असलेला परमात्मा तळहातावरील इष्टलिंगात सामावलेला आहे. बसवेश्वर लहान असताना मित्रासोबत खेळून खेळून त्यांना खूप तहान लागली तेव्हा त्यांनी आईला पाणी मागितले तेव्हा आई म्हणाली, बाळा', हे पाणी सोवळ्याचे आहे बाबांची पूजा पूर्ण होईपर्यंत तुला पाणी पिता येणार नाही. तू आणखी खेळून ये. हे ऐकून बसवेश्वरांनी होकारार्थी मान हलवली. बाबा पूजेत असल्याने त्यांचाही होकार-नकार मिळाला नाही. पाण्याच्या व्याकुळतेने त्यांनी वारंवार आईला विचारले पण आईकडून शेवटपर्यंत नकार मिळाला . त्या वेळातच बसवेश्वरांनी अंगणात छोटे-छोटे आठ खड्डे केली. वडिलांची पूजा संपताच ते अंगणात आले. आणि पाहतात तर काय एकदम आठ खड्डडे.. बसवा, काय केलेस बाळा हे. तेव्हा बसवेश्वर म्हणाले, मी आईला वारंवार पाणी मागितले तिने दिले नाही. म्हणून पाण्यासाठी मी छोट्या-छोट्या विहिरी खोदून पाण्याचा शोध घेत होतो. तेव्हा वडिलांनी बसवेश्वरांना सांगितले की बाळा, एवढ्या खंड्या पेक्षा एकच मोठा खड्डा केला असतास,तर कदाचित तुला पाणी मिळाले असते. हे एकूण बसव म्हणाले, बाबा, तुम्ही पण शंभर देवाची पूजा करण्यापेक्षा एकाच देवाची पूजा केली असती. तर तुम्हालाही नक्कीच देव मिळाला असता. या उत्तराने बसवा चे वडील हतबल झाले. म्हणजेच एक देव उपासना करावी आणि ईस्टलिंग धारण केल्यानंतर इतर कोणत्याही देवाची पूजा न करणे हेच लिंगाचरणाचे नीती तत्व आहे. ज्यामध्ये कुठलाच जातीभेद न ठेवता धार्मिक समानता लिंगाचरणाच्मा आचरणामुळे शोषण, अनिष्ठ, रूढी, परंपरा, यांचा नायनाट होऊन नीतिमान समाजाची निर्मिती होऊ शकते हे सुचवले गेले आहे.

"लाखेचा वितळणारा देव कसा म्हणू?
आगीचा स्पर्श होताच सुरकुतनार्या देवाला कसा योग्य म्हणू?
प्रसंगाला विकला जाणाऱ्या देव कसा योग्य म्हणू?
हल्ल्याच्या भीतीने पुरला जाणारा देव कसा योग्य म्हणू?
सहज भावाचा ,
आत्मैक्य कुंडल संगम एकच देवा"

2) सदाचार (आर्थिक आणि नीती तत्व)

दुसरा आचार हा सदाचार होय. जो आर्थिक निती तत्वाचे प्रतिपादन करतो. ज्या सदाचाराने सत्कारयातून प्राप्त केलेले धन हे समाजाच्या कल्याणासाठी दान करणे हेच पुण्यकर्म होय, हे दर्शविते. प्रमाणापेक्षा जास्त संपत्तीवर आपला अधिकार नसून समाजातील दीनदलित, वंचित, निराधार, अपंग, रोगी, यांच्या कल्याणासाठी याचा वापर हेच बसवेश्वरांच्या सदाचाराची शिकवण होईल. सदाचार यामुळेच व्यक्तीचे कल्याण, समाज कल्याण, राष्ट्र कल्याण व विश्वकल्याण कल्याण होऊ शकते. म्हणूनच आपण केलेल्या कार्याचा मोबदला धर्मासाठी, समाजासाठी, समर्पित करणे हेच आम्हा मोठेपण आहे. कारण त्यात ही प्रामाणिक असते दुसऱ्यांना फसवून, शोषण करून, चोरी करून, दारू विकून, असे कार्य होऊ शकत नाही. तर आपल्या कार्यातूनच समाज हित व्हावे जसे की आपण जेवढे कार्य करतो तेवढाच मोबदला स्वीकारला पाहिजे. जर कामचुकारपणा करून पूर्ण पगार घ्यायचे ठरवले. तर हे कार्य बसवेश्वरांच्या नीती तत्वात बसत नाही शुद्ध धन, संपत्ती ही लिंगाचे मूख असलेल्या जंगमास अर्पण करावी. नेहमीच दानधर्म जोपासणारी वृत्ती बाळगावी. उदाहरणार्थ शरण परीट माचीदेव कपडे धुऊन सर्वांच्या मनातील मालीन्य धूण्याचे कार्य करून ते गुरु झाले तर दोरी वळणारा शरण चंदय्या आपल्या कार्यातच सुख अनुभवून लिंग स्वरूपी झाले आणि झाडलोट करणारी सत्यका सर्वांच्या अंतःकरणातील राग, द्वेष दूर करून जंगम स्वरूपी झाली. म्हणजेच कर्म हे नुसते काम नसून तो एक जीवन योग आहे. काम हा पूर्ण योग आहे. शरणां नी कर्म, काम यांना कायक म्हटले तर दान याला पर्याय म्हणून दासोहाची शिकवण दिली. लिंगायत धर्मामध्ये दान केल्याशिवाय कार्याला पूर्णत्व प्राप्त होत नाही. म्हणूनच काम, कार्य आणि दान हे बसवेश्वरांच्या दृष्टीने खरा सदाचार आहोत.

"करू नको चोरी करू नको हत्या बोलू नको मी त्या कदापिही
नको मानु राग, नको तिरस्कार आत्मस्तुती पण बोलू नको,
हीच अंतरंग बहिरंग शुद्धी,
कुंडल संगम देवास प्रसन्न करणारी हि रीती..."

**३) शिवाचार (सामाजिक नीति भाव):** पंचचारातील शिवाचार चार हा तिसरा आचार आहे. जो सामाजिक नीती तत्वावर आहे. आपण सारेच परमात्म्याची लेकरे आहोत. त्यासाठी मतभेद, जातिभेद, न करता बंधुत्व पणाने जगणे म्हणजेच शिवाचार होय. एकमेकात मिसळून सहभोजन, सहजीवन, वंदन, पूजा हे शिवाचाराचे आचरण आहे. बसवेश्वर म्हणतात मी कोण, तू कोण, हा आमचा, हा तुमचा, असे न करता आम्ही सारे एकच आहोत. या भावनेतूनच जगात एकच प्रेमभाव आहे. हात शिवाचारात जसे निसर्गनिर्मित परमात्म्याने लाभलेले पाणी, राहते घर, हवा, आकाश, प्रकाश, हे सर्व एकच असताना माणसात भेदभाव योग्य नाही. तर शिवाचाराचे पालन केल्याने सर्वांच्या हृदयातच शिवाचाऱ्या चे दर्शन होते. म्हणूनच बसवेश्वरांनी केवळ ईस्ट लिंगातच दर्शन घेतले नाही. तर प्रत्येक दीन, दलित, अस्पृश्य, शूद्र, अशा साऱ्यांना बसवेश्वरांनी पिता, दादा, बंधू, काका, अशा हृदयस्पर्शी नात्याने जवळ करून प्रेम दिले. आणि सर्वांना इष्टलिंग दीक्षा देऊन धार्मिक स्वातंत्र्य व समानता दिली. यामुळेच बसवेश्वरांनी केलेले ही एक सामाजिक क्रांती आहे हे स्पष्ट होते. महात्मा बसवेश्वरांनी जातिभेद, लिंगभेद, अस्पृश्यता निवारण, इत्यादीसाठी कायम संघर्ष केला. बसवेश्वर त्यांच्या समर्थनात म्हणतात. व्यक्ती जातीने नव्हे तर सदाचार, सद्गुणांनी श्रेष्ठ होतो. ज्यांच्या अंतरंगात शिवज्ञान, शिवानूभव, शिवाचार, असतो. तिथे सुतक नसतो. म्हणजेच उदाहरणार्थ, एकदा बसवेश्वर नागदेव कांबळे या शिवभक्तांच्या घरी जाऊन भोजनाचा आस्वाद घेतले. तेव्हा राजा बीज्वल म्हणतो. बसवां तुम्ही वेद, शास्त्र, पुराण, पंडितांना, अस्पृश्य मातंग, म्हणता आणि नागदेवास श्रेष्ठ शिवभक्त म्हणतात. हे नेमके काय आहे. शिवभक्तांच्या शरीरात दूध वाहते आणि इतरांच्या शरीरात रक्त वाहते. तेव्हा बसवेश्वरांनी राजा बीज्वलास स्वतः परीक्षण करून अनुभव घेण्यास सांगितले. नागी देव कांबळेला दरबारात बोलावून त्याच्या बोटाला जखम करण्यात आली. त्या जखमेतून अक्षरशः पांढरेशुभ्र दूध वाहू लागले. हे पाहून राजास धक्काच बसला. आणि

शिवभक्ताची भक्ती कळली. जेव्हा या नागदेवाच्या शरीरातून दुध आले. याचाच अर्थ सदभक्तांच्या अंतरंगात सद्‌गुन असल्यामुळे तो शिवस्वरूपी होतो. सदाचार, सदभाव, हे शिवाचाराचे प्रतीक आहे.

" हा कोणाचा, हा कोणाचा, हा कोणाचा, म्हणू नका हो ,
हा आमचा ,हा आमचा ,हा आमचाच,
म्हणा हो कुंडलसंगम देवा ,हा आपल्या घरचा पुत्र म्हणा हो. "

**४) गणाचार (अन्यायाविरुद्ध सत्याग्रहाचे नीती तत्व):** अन्यायाविरुद्ध अहिंसात्मक रित्या प्रतिकार करणे म्हणजेच गणा चार होय. जीवन जगत असताना लिंगाचारा प्रमाणे कोणालाही त्रास होणार नाही. कोणावरही अन्याय होणार नाही. होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार म्हणून ओळख आहे. त्यास गणाचार् असे म्हणतात. संविधानाने जसे धर्माचे आचरण करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. ते हिरावण्याचा जर कोणी प्रयत्न करत असेल तर त्याविरुद्ध कायद्याच्या चौकटीत राहूनच विरोध केला पाहिजे. गणा चार म्हणजे सत्याग्रह आहे. ज्यात सत्यवादी, समतावादी, स्वातंत्र्यप्रिय लोकशाही, मूल्याच्या आचरणाचा एकत्रित संग्रह म्हणजेच गणाचार होय.

गणाचारात अंतरंगातील काम, क्रोध, लोभ, मोह, माया, मत्सर हे सूड उगवणारे विकार आहेत. तर कुलमद, विद्यामद, योवनमद, सौंदर्यमद, जातीमद, यांच्या प्रलोभनांपासून दूर राहावे. तसेच व्यसनमुक्त राहून आपल्यातील नकारात्मकता दूर करून सकारात्मक चिंतन करणे. हेच अंतरंगातील गणाचार आहे. तर बाह्य अंगातील गणाचार हे समाजातील रूढी, परंपरा, अन्याय, अत्याचार, शोषण, इत्यादी विरुद्ध आवाज उठवणे हे गणाचाराचे तत्त्व आहे. म्हणूनच गणाचारात विनय आणि विरत्व यांचा समावेश आहे. बसवेश्वरांनी समाज समृद्ध समाज निर्माण करण्यासाठी संघर्ष स्वतःहून सर्व दुर्गुणांचा, दुर्व्यसनांचा, त्याग करावा. सत्याग्रह आतून सामाजिक बदल घडवून समाजपरिवर्तनासाठी प्रयत्न करण्यासाठी विरत्वाचा विनय अंगी बाळगला पाहिजे. "देह कष्टवूनी मन शिणवूनी, तुमच्या चरण कमली येणारे भले हे बोल न दग्ध, करती कुंडल संगम देवा, शिवभक्तांच्या यातना त्याच लिंगाच्या यातना "

**५) भ्रत्याचार... (समाजाप्रती विनयशील नितीतत्व)**

जीवनात प्रत्येकामध्ये विनय नम्रता शीलाचे आचरण म्हणजेच भ्रष्टाचार होय. गर्वाने अहंकाराने काहीच साध्य होत नाही ते विनयाने साध्य करून सहज विजयी मन जिंकता येते. म्हणून भ्रताचारी व्यक्तीने नेहमी संयमी आणि सहनशील प्रेमळ असेच वागावे. कारण विनय वंतास मरणाचे भय कधीच राहत नाही. आपले आई-वडील, कुटुंब, समाज, राष्ट्र, सदैव नम्रतेने राहिले पाहिजे त्यामुळेच आपल्या जडणघडणीत त्यांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष वाटा असतो. म्हणूनच यांच्याप्रती कृतज्ञता असावी. असे बसवेश्वर म्हणतात. मजहूनी सान नसे कोणी, शिवभक्तांहूनी नसे महान कोणी, बसवेश्वर म्हणजेच भक्तीच भांडार असून ते स्वतःला भक्ती विहीन गरीब असेच म्हणायचे. कारण त्यांनी मातंग चेन्नय्यास पिता, कोहर कक्कयासआजोबा, किनी ब्रह्म यास बंधू, तसेच समाजातील लहान-थोर गरीब-श्रीमंत श्रेष्ठ-कनिष्ठ स्त्री पुरुष या सर्वांना पिता, बंधू, काका, दादा, अशा कौटुंबिक नात्यांनी ते बोलत असत. म्हणूनच ते विश्व कुटुंबी झालेले आहेत. बसवेश्वर म्हणजेच "जुळलेले हस्त, नम्र मस्तक" असे समजले जात होते. बसवेश्वर यांच्या सोबतीची एक घटना अशी आहे की आंध्र प्रदेशातील किन्नर रमय्या हे अनुभव मंटपाचे सदस्य होते. ते महामनेत दान सेवा करीत होते. एकदा किन्नर ब्रह्म या आणि इतर स्वयंपाकी मिळून कांद्याची भाजी तयार करत होते. तेव्हा बसवेश्वरांना येथील कांद्याचा वास सहन न झाल्याने ते नाक बंद करून निघून गेलेले पाहून ब्रह्म याला आपण अपमानित झाल्यासारखे वाटले. व ते महामन सोडून निघून गेले. ही बातमी बसवेश्वरांना समजली माझ्यामुळे एका शरणा चे मन दुखावले. तेव्हा ते सर्वांना घेऊन प्रत्येकाच्या गळ्यात कांद्याच्या माळा घालून, बैलाच्या गळ्यात कांद्याची माळ घालून, बैलगाडीत कांदे भरून, दिसेल तिकडे कांदेच कांदे अशी गोड मिरवणूक थेट किन्नर ब्रह्म याचा घरी गेली. हे दृश्य पाहताच ब्रह्म याचा रुसवा क्षणात दूर झाला. तो बसवेश्वरांच्या चरणासी लोटांगण घेणार तोच बसवेश्वरांनी कवटाळून अंतकरणातून त्याची क्षमा मागितली. तेव्हा ब्रह्म यांचे डोळे पाणावले एवढी थोर व्यक्ती विचारी व्यक्ती, एका सामान्या समोर कशी नतमस्तक होते. या उदाहरणातून बसवेश्वरांना समतेचे कल्याणी राज्य

निर्माण करता आले. त्यामुळे बसवेश्वर त्यांच्या या तत्वात सांगतात की सर्वांशी नम्र राहून अहंकाराचा त्याग करून संयम सहनशीलता अंगीकृत करून, "व्यक्तिपेक्षा समाज श्रेष्ठ आहे" असा भाव हेच नम्रतेची लेणे असून सर्व जाती धर्मातील लोकांची समानतेचे संबंध निर्माण करून विनया ने जग जिंकावे. असा संदेश बसवेश्वर यांनी आपणास दिला आहे. ज्याची पालन व तत्त्वाचा अवलंब आपण सर्वांनी करून सामाजिक सलोखा, समानता, एकनिष्ठता, विनयशीलता, यांचे रक्षण करण्यासाठी प्रत्येकाने या तत्त्वाचा अवलंब करावा असी बसवेश्वरांची इच्छा आहे.

" नको ब्रह्म पद, नको विष्णुपद, नको देवा रुद्र पदवी,
नको कोणतीच पदवी मज,
तुमच्या श्रेष्ठ भक्तांची चरण भक्ती उमजावी,
अशा महा पदवीचा अनुग्रह करा हो" अनुग्रह... कराव हो..

**संदर्भः-**

*प्रा. करडीगुद्दी आर.एम.(अनुवादक मराठी)वचन सिध्दांत सार-महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान भालकी जि.बिदर प्रथम आवृत्ती १५जानेवारी,२०१६.*
*डॉ.सोमनाथ रोडे-सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा बसवेश्वर अश्विनी प्रकाशन, लातूर प्रथमावृती अक्षय्य तृतीया दि.२७ एप्रिल,२००९*
*डॉ.श्रीदेवी शंकराप्पा कडगे-महात्मा बसवेश्वर व्यक्ती आणि वाङ्मय इसाप प्रकाशन, नांदेड प्रथमावृती २८मार्च,२०१७.*
*सुभाष किशनराव देशपांडे-महात्मा बसवेश्वर कार्य आणि कर्तृत्व-जनशक्ती वाचक चळवळ औरंगाबाद प्रथमावृती २१मार्च,२०१५.*
*डॉ. सचितानंद बिचेवार, परिवर्तनाचा महामेरू महात्मा बसवेश्वर, स्वाती प्रकाशन, पूर्णा- 2015*
*डॉ. शरदचंद्र देगलूरकर, संत साहित्याचा सामाजिक अन्वयार्थ,देगलूर-2004.*
*प्राचार्य शिवाजीराव भोसले, हितगोष्टी, अक्षरब्रह्म प्रकाशन, पुणे- 2004*

---

# सामाजिक सद्भावना के अग्रदूत - महात्मा बसवेश्वर

**डॉ. लुटे मारोती भारतराव**

*हिंदी विभाग, प्रतिभा निकेतन महाविद्यालय नांदेड, भ्रमनध्वनि :- 8975173503*

*अनुडाक:lutemb2011@gmail.com*

---

भारत के विख्यात दार्शनिक महात्मा बसवेश्वर जी ने अपना जीवन समाज उन्नति के लिए समर्पित किया। सदियों से ही भारत देश अपनी संस्कृति और वैभवशीलता के कारण विश्व भर में आकर्षण का केंद्र रहा है। विविध देशों के धर्म प्रचारकों ने भारत की सांस्कृतिक दार्शनिक समरसता पर आक्रमण किया। धीरे-धीरे इन आक्रमणों के कारण भारत में सामंजस्य क्षमता समन्वय एवं सद्भावना की समस्या निर्माण हुयी। धर्म के प्रचारकों ने अपने अपने धर्म का प्रभाव निर्माण करने के लिए अपने अनुयायियों की संख्या बढ़ाने के हितों मंत्र तंत्र बहन नंबर चत्कार कर्मकांड आदि को आधार बनाया। धार्मिक श्रेष्ठता रूपी अहम के कारण लोग एक दूसरे को नीचा दिखाने लगे। वर्ण व्यवस्था ने भी सांप्रदायिक विवाद बढ़ाने का कार्य किया। ऐसी स्थिति में सभी धर्मों से अनेक समाज सुधारक, संत, महात्मा तथा कवियों ने सांप्रदायिक सामंजस्य बनाए रखने के लिए अविस्मरणीय कार्य किए। इस महान कार्य करनेवाले संत महात्माओं के अग्रदूत महात्मा बसवेश्वर जी है। उन्होंने 12 वीं सदी में अपने वचन साहित्य के माध्यम से समाज को समतामूलक दृष्टि प्रदान करने का कार्य किया। उनके द्वारा निर्माण किए गए साहित्य को वचन साहित्य कहा जाता है। जो मूलतः कन्नड़ भाषा में निर्मित है। वचन से तात्पर्य है,-"मनुष्य के मुंह से निकलने वाले सार्थक शब्द या वाणी।"01 इन वचनों में मनुष्य जीवन को समृद्ध बनाने के लिए धार्मिक, सामाजिक, आर्थिक एवं नैतिक क्रांति दृष्टिगत होती है।

सामाजिक संघर्ष के केंद्र में धर्मस्थल तो है ही उसके साथ ही 'अहम्' भी महत्वपूर्ण है। 'अहम्' के कारण अपने संप्रदाय को श्रेष्ठ एवं अन्य संप्रदाय को कनिष्ठा समझने की भावना समाज में बढ़ रही है। इसी भावना के कारण वर्तमान में देश और दुनिया के अनेक धर्मों में विवाद हो रहे हैं। जिससे आम आदमी सुख शांति को खो बैठा है। इस संबंध में महात्मा बसवेश्वर जी कहते हैं, "अहम् से मनुष्य स्वभाव में परधन, परस्त्री, परदेवता, परसंप्रदाय आदि के प्रति अनैतिकता और असत्यता बढ़ रही है। इसी अहम को त्यागने से पूरा विश्व एवं सभी संप्रदाय के लोगों में अपनेपन की भावना का निर्माण होगी और हृदय की विशालता सद्भावना निर्माण करेगी।"02 अर्थात, महात्मा संत बसवेश्वर जी के विचारों में विश्व शांति की कामना है। उनके इस विश्व व्यापक कार्य के कारण उन्हें जैन धर्म संस्थापक वर्धमान महावीर एवं बौद्ध धर्म संस्थापक गौतम बुद्ध की तरह मानवतावादी महात्मा माना जाता है।

**महात्मा बसवेश्वरः-**

महात्मा बसवेश्वर जी के जीवन चरित्र का अध्ययन कांची के शंकराराध्य द्वारा रचित 'बसवपुराण' के आधार पर किया जा सकता है। जो 18वीं सदी में संस्कृत में लिखा गया है। इसके साथ ही कन्नड़ में रचित 'प्रभुलिंगलिले' एवं तमिल में 'बसवपुराण षट्कम्' ग्रंथ भी उनके चरित्र का अध्ययन करने के लिए उपयुक्त है। इन में ग्रंथों के अनुसार संत बसवेश्वर जी का जन्म बीजापुर जिले के बाघेवाड़ी नमक गांव में सन 1131 में से ब्राह्मण परिवार में हुआ। ब्राह्मण परिवार में जन्म लेने के कारण 8 साल की आयु में उनका उपन्यास संस्कार करना अनिवार्य था; लेकिन बसवेश्वर जी बचपन से ही विलक्षण बुद्धि वादी थे। उन्होंने अपने माता-पिता को शिवलिंग धारण करने से उपनयन संस्कार की आवश्यकता ना होने के संबंध में समझाने की कोशिश की। लेकिन उसका कोई विशेष लाभ नहीं हुआ। निरर्थक कर्मकांड को विरोध करने के हेतु संत बसवेश्वर जी को बचपन में ही गृह त्याग करना पड़ा। यहीं से उन्होंने मानवतावादी विचारों का स्वीकार किया। संत बसवेश्वर जी ने तत्कालीन प्रथा, शास्त्र एवं पुराण को तर्क के आधार पर रखकर उसका सत्यान्वेषण किया। यही कारण है कि उनके वचन शाश्वत मूल्यों का निर्वहन करते है।

**एकेश्वरवाद का पुरस्कार:-**

वीरशैव संप्रदाय का मूल मंत्र ही है "एको देवो: परमशिव:'' महात्मा बसवेश्वर जी के अनुसार विविध देवताओं की आराधना से परम तत्व का ऱ्हास होता है। भक्ति केवल कर्मकांड बनकर रह जाती है। यथार्थ भक्ति पतिव्रता स्त्री के समान होनी चाहिए। मूर्ति पूजा करने से परमात्मा और आत्मा में दूरियां बढ़ जाती है। आत्मा ईश्वर का अंश होने के कारण ईश्वर के प्रति मात्र शुद्ध श्रद्धा की आवश्यकता है। संत बसवेश्वर जी कहते हैं-

"नंबिंद हेंडतिगे गंडनोब्ब काणिरो।
नंबबल्ल भक्तंगे देवनोब्बने काणिरो।
बेड बेड अन्य दैववेंबुदु सादर काणिरो।
कुडलसंगमदेव कंडडे मूग कायव काणिरो।"03

अर्थात, जिस प्रकार से कोई पतिव्रता स्त्री केवल अपने पति को ही समर्पित होती है। उसके मन में किसी भी अन्य परपुरुष का विचार नहीं आता। उसी प्रकार से ईश्वर को एकरूप मानकर भक्ति करने से परमात्मा की प्राप्ति होती है। आप किसी भी नाम से ईश्वर का नमस्कार करो सृष्टि का निर्माता एक ही है और उसके के प्रति आपके मन में चीर निष्ठा की आवश्यकता होती है।

**जाति व्यवस्था का विरोध :-**

महात्मा बसवेश्वर जी के वचन साहित्य का केंद्र बिंदु तत्कालीन सामाजिक परिवेश रहा है। वे स्वयं ब्राह्मण कुल में जन्म लेने के पश्चात भी उन्होंने वर्णव्यवस्था पर आधारित जाति व्यवस्था का तीव्र विरोध किया। उनके अनुसार, 'जाति व्यवस्था को खत्म करने के लिए अंतरजातीय विवाह होना आवश्यक है।' महात्मा बसवेश्वर भारत के ऐसे महान संत हैं जिन्होंने भारत का प्रथम अंतरजातीय विवाह अपने मंडप में लगा कर सामाजिक क्रांति के बीज बो दिए। जाति व्यवस्था का खंडन करते हुए वे कहते हैं-

"लोहा गर्म करके लोहान बने,
कपड़े धो कर धोभी बने,
ताने बाने पुरकर जुलाहे बने,
पुस्तक पढ़कर ब्राम्हण बने।
क्या कोई ऐसा है जो कान से जन्मा है यहाँ
अत: है कुडलसंगमदेवा कुलीन वही है
जो लिंगस्थल को सम्यकरित्या जानता हो।"04

महात्मा बसवेश्वर जी जाति व्यवस्था को विरोध करनेवाले पहले संत है। उन्होंने जाति व्यवस्था को विरोध कर मानवता की स्थापना तो की ही, साथ ही कर्म का महत्व प्रतिपादित किया। मनुष्य की श्रेष्ठता जन्म के, कुल के आधार पर नहीं तो कर्म के आधार पर होती है। सभी मनुष्य मात्रा एक ही ईश्वर की संतान है। ईश्वर के सामने उच्च-नीचता का भाव नहीं होता। उन्होंने अपने वचन में कहा कि शिवाले की जमीन और अछूतों की जमीन भिन्न नहीं होती। शौचालय का पानी और मुखमार्जन का पानी अलग नहीं होता। पानी एक ही होता है उदाहरण द्दष्टव्य है-

"नेलवोंदे होलगेरी शिवालयक्के!
जलवोंदे शौचायमनक्के!
कुलवोंदे तन्न तामरिदवंगे,
फलवोंदे षड्दर्शन मुक्तिगे
निलवोंदे कुडलसंगमदेव!

निम्मनरिद् दंगे।"05

कर्मकांड का विरोध :-

वर्तमान समय में बह्यांडबर अत्यधिक मात्रा में बढ़ रहा है। विभिन्न संप्रदाय के कर्मकांड ने मनुष्य को अंधा, अविवेकी बना दिया है। कर्मकांड के कारण मनुष्य का जीवन दु:खमय बन रहा है। इन सब से उभरने के लिए महात्मा बसवेश्वर जी के विचारों का वहन करना आवश्यक है। महात्मा बसवेश्वर जी कर्मकांड के खिलाफ थे। उनका कहना था कि भक्ति के नाम पर बह्यांडबर करना अनुचित है। वे कहते हैं-

"नीर कंडल्लि, मुळगुवरय्या,
मरव कंडल्लि सुतुवरय्या।
बतुव जलवा ओणगुरव मरव
मेच्चिदवरु निम्मनेतबल्लरु
कुडलसंगमदेवा।।"06

अर्थात, गंगा स्नान करने से पाप धोये जाने की मनीषा मिथ्या है। कर्मकांड से, पूजा प्रदक्षिणा एवं तीर्थ स्नान से परम तत्व की पहचान नहीं होती। ऐसे व्यक्ति के परिश्रम व्यर्थ जाते हैं। देवी-देवताओं की पूजा के चक्कर में पड़नेवाले दिशाहीन जनसमुदाय को महात्मा बसवेश्वर जी ने दिव्य वाणी से समझाया है-

"पत्थर का देव देव नहीं,
मिट्टी का देव देव नहीं,
धातु का देव देव नहीं,
गोकर्ण, काशी, केदार आदि क्षेत्रों का
देव देव नहीं देव अंतर्यामी है,
तुम स्वयं ही देव हो।"07

महात्मा बसवेश्वर जी कहते हैं कि मंदिर मस्जिद के माध्यम से पुजारी गरीबों का शोषण करते हैं। हर धर्म के मनुष्य का शरीर ही देवालय है और आत्मा ही उसका ईश्वर है। उसे ईश्वर प्राप्ति के लिए कर्मकांड की आवश्यकता नहीं है।

**स्त्री मुक्तिदाता :-**

सदियों से शोषित स्त्री को पुरुषों के समान सम्मान देने का प्रथम कार्य स्त्री उद्धारक संत महात्मा बसवेश्वर जी ने किया है। भारत की प्राचीनतम संस्कृति को श्रेष्ठ माना जाता है फिर भी उसमें स्त्री को पुरुष प्रधान व्यवस्था का शिकार होना पड़ा। जिस समय में स्त्री को अनेक दृष्टि से शुद्र माना गया, उसी समय महात्मा बसवेश्वर जी ने स्त्री को महादेवी आदि शक्ति स्वरुप माना। उसे पुरुषों के समान जीवन जीने का अधिकार है, इसका एहसास कराया। उनका मानना है कि स्त्री प्राकृतिक रूप से रजस्व को धारण करती है। वह प्रजा उत्पत्ति का आधार है। समाज संचालन का महान उत्तरदायित्व स्त्री ही निभाती है तो अछूत या शुद्र कैसी?

"स्त्री माया नहीं वह तो माता है।
स्त्री अबला या शुद्र नहीं।
वह तो एक शक्ति है।"08

**निष्कर्ष :-**

महात्मा बसवेश्वर जी के जीवन चरित्र एवं वचन साहित्य का अध्ययन करने से स्पष्ट होता है कि महात्मा बसवेश्वर जी की विचारधारा विश्व व्यापक है। उनके कथनी और करनी में भेद नहीं था। सामाजिक व्यवस्था में व्याप्त विसंगतियों, विकृतियों को दूर करने के लिए उन्होंने क्रांतिकारी कदम उठाए। जातिभेद को दूर करने के लिए अंतरजातीय विवाह का समर्थन किया। आर्थिक स्थिति सुधारने के लिए श्रम को प्रतिष्ठित किया। धर्म के नाम पर

अंधविश्वास, पाखंड आदि का तीव्र विरोध कर खंडन किया। सभी जाति धर्म के लोग एक ही शिव के संतान है। संक्षेप में महात्मा बसवेश्वर जी ने नैतिक मूल्यों पर आधारित आदर्श समाज व्यवस्था निर्माण के लिए दिव्य, ज्ञानवर्धक,सम्पूर्ण मानवजाति हितकारक उपदेश दिया। जो विश्व स्तर पर मानव को सुख, शांति और समृधता प्रदान करने के लिए समर्थ है।

**संदर्भ संकेत-**


*हिंदी साहित्य सांप्रदायिक सद्भाव संपा. डॉ. कुरे रमेश,डॉ.प्रवीन शिंदे, प्रा. लुटे मारोती, विकास प्रकाशक कानपुर, 2014, पृष्ठ 234*

*Aayushi international interdisciplinary Research journal volume-V issue-XI November 2018 page 151*

*महात्मा बसवेश्वर काळ: व्यक्ती, वचन साहित्य आणि शरण कार्य, डॉ. अशोक कामत, सत्संग प्रतिष्ठान, 1999, पृष्ठ 228*

*Aayushi International Interdisciplinary Research Journal, Volume-V, Issue-XI, Nov. 2018 Page 151*

*महात्मा बसवेश्वर काळ: व्यक्ती, वचन साहित्य आणि शरण कार्य डॉ. अशोक कामत सत्संग प्रतिष्ठान 1999 पृष्ठ 259*

*वही प्रश्न 258*

*हिंदी–मराठी संत साहित्य में प्रगतिशील चेतना, संपा. प्रो.डॉ.अंबादास देशमुख, डॉ. रंजित यादव, शौर्य पब्लिकेशन लातुर,२०१३ पृष्ठ 04*

*वही पृष्ठ 03*

## आद्य समाज सुधारक, कर्माचे श्रेष्ठत्व सांगणारे बसव

**प्रा. डॉ. गायकवाड एस.बी.**

*कनिष्ठ क्रीडा मार्गदर्शक, महात्मा ज्योतीबा फुले महाविद्यालय, मुखेड जि.नांदेड*

कर्नाटकाच्या धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक इतिहास संत महात्मा बसवेश्वरांचे योगदान अत्यंत महत्वाचे मानले गेले आहे. आद्य समाजसुधारक तसेच कर्माचे श्रेष्ठत्व सांगणारे आणि वीरशैव धर्माचे पुनरुज्जीवन करणारी थोर विभुती म्हणुन संत बसवेश्वर महाराज यांच्याकडे पाहिले जाते. वैशाख शुध्द तृतीया म्हणजे अक्षय तृतीया दीनी इ.स. 1105 मध्ये बसवेश्वर यांचा जन्म झाला. धर्म, समाज, तत्वज्ञान, वाङ्:मय, राजकारण अशा क्षेत्रातील त्यांचे कार्य क्रांतिकारी स्वरुपाचे आहे.

महात्मा बसवेश्वर महाराज यांनी भारताच्या धार्मिक, सांस्कृतीक, साहित्यिक व शैक्षणिक, राजकिय व सामाजिक जीवनातील जेष्ठ समाज परिवर्तनवादी युगपुरुष म्हणुन संत बसवेश्वर महाराज यांच्याकडे पाहीले जाते.

बसवेश्वर महाराजांनी आपल्या समाजातील तत्वज्ञान व समाजकार्य, समाजप्रसार करण्यासाठी महाराष्ट्रातील सोलापूर मधील मंगळवेढा या गावी येवून त्यांनी आपल्या आयुष्यातील 31 वर्षे वास्तव्य केले व त्या ठिकाणी आपला समाज परिवर्तनाच कार्य त्यांनी हाती घेतले व त्या मंगळवेढ्यातून लिंगायत धर्माची स्थापना केली व तिथुन ते आपल्या लिंगायत धर्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी श्रवणबेळगोळा व बसवकल्याण या कर्नाटकातील प्रदेशात आले.

बसवेश्वर महाराजांनी आपला धर्मप्रसार व प्रचार करत असताना त्यांना लिंगायत समाज्यान शिववाहन नंदीचा अवतार मानतात व नंतर त्यांना लिंगायत अनुयायी हे बसव, बसवण्णा, बसवराय या नावाची त्यांना उपाधी देऊ लागले व त्या नावाने प्रसिध्द होऊ लागले.

महात्मा बसवेश्वर हे लहानपनापासुनच रुढी परंपरांना तिव्र विरोध केला व समाजात असणा-या जातीयता, अस्पृश्यता या गोष्टी त्यांना अजिबात आवडत नसत पण आजही आपण समाजात पाहतो, जातीयतेची उतरंड ही चालुच आहे. माणूस आज विज्ञान युगात वावरत असताना सुध्दा आज समाजात उच्च-नीच या गोष्टी आजही आपणाला पाहावयास मिळतात. आज मानसा-मानसात दुरावा निर्माण होऊ लागला. पुर्वीची जी चाल आहे ते आज सुध्दा समाजात पहायला मिळते. जोपर्यंत मानुस समाजाचा विचार करत नाही तो पर्यंत मानसात बदल होत नाही, तो पर्यंत जातीयता नष्ट होत नाही. जो पर्यंत मानसाच्या विचारात परीवर्तन होणार नाही तो पर्यंत कोणताही समाज सुधारत नाही.

बसवेश्वर महाराज हे ज्ञानप्राप्तीसाठी वयाच्या आठव्या वर्षी ते घराबाहेर पडले, त्यांनी मलप्रभा, कृष्णा नदीच्या संगमावर असलेल्या कुडलसंगम या क्षेत्रात येवून ते राहिले व त्याठिकाणी आपले अध्ययन सुरु केले. बसव हे निस्सीम शिव उपासक होते. त्याच काळात त्यांना जातवेदमुनी नावाचे गुरु म्हणुन लाभले व गुरुकडुन त्यांनी बसवरायांनी दिक्षा घेतली व शिवाचे प्रतिक म्हणुन इष्टलिंग आपल्या गळ्यात धारण केले. बसवेश्वरांनी आपल्या गुरुगृही राहुन वेद, उपनिषदे, षड्दर्शने, पुराणाचा सखोल अभ्यास करुन उच्चकोटीचे ज्ञान प्राप्त केले. बसवेश्वर महाराजांनी संस्कृत, पाली, तामीळी या भाषावर आपलं प्रभुत्व मिळविले. त्यांनी वेगवेगळ्या धर्मग्रंथाचा अभ्यास करुन त्यावर चिंतन-मनन केले. बसवेश्वराने अध्ययनाबरोबर धनुर्विद्या अन्य कलागुन अवगत केल्या.

बसवेश्वरांनी कर्माचे श्रेष्ठत्व पटवुन दिले. त्यांनी आपल्या ज्ञानप्राप्तीतुन अनेक ग्रंथाचे लेखन केले. केवळ शिवाचीच उपासना करावी असे आपले ठाम मतही मांडले. पुढे कायकवे कैलास हा विचार त्यांनी मांडला याचा अर्थ केवळ कष्टानेच स्वर्गाची म्हणजे शिवाची मोक्षाची प्राप्ती होते. असे त्यांचे स्पष्ट मत होते. मानवाने

कर्मकांडात गुंतुन न राहता आपली स्वत:ची भाकर मिळविण्सासाठी कष्ट केलं पाहिजे. प्रत्येकाने आपल्या कार्यात सतत व्यस्त राहिले पाहीजे असे ते लोकांना उपदेश करत असत. असे कर्म करण्याच्या वृत्तीला त्यांनी कायक असे नाव दिले. कोणतेही काम अथवा कार्य याला हीन मानु नका, कोणतेही चांगले कार्य करत राहने ते काम करणा-या मानसाचे श्रेष्ठत्वही ठरत नसते अशा विचाराचे बसवेश्वर महाराज होते.

कायक हे व्यक्ति समाज राष्ट्र विश्वाच्या उन्नतीचे, कल्याणाचे स्वाभिमानाचे साधन आहे. कायकहीन समाज हा अधोगतीला जातो. भीक मागणे, चोरी करणे, लाचारी, फसवेगीरी ही कायम न करणा-या आळशी लोकांची लबाडी आहे. गुरु लिंग जंगमाने सुध्दा कायक केलेच पाहिजे असे बसवेश्वर महाराज यांनी सांगितले. सत्य, शुध्द, कायक मरुन आपली उपजिवीका भागवली पाहीजे आणि धन दासोहासाठी अर्पण करावे असा शिरस्ता होता.

बसवेश्वर इष्टलिंगाच्या रुपाने व्याष्टी प्रज्ञेचा विकास केला, सामाजिक शक्ती वृध्दी होईल असे केले. दासोहाच्या सहाय्याने समष्टि विकसीत केले. आतील जग कलवश होत आहे, पण बाह्य नेहमी चलनशील राहिले आहे.

दासोह प्रज्ञा, कायक तत्व समाज कौटुंबिकतेचे अर्थशास्त्र झाले आहे. शरणसती लिंग पती म्हणून सांगताना विश्वच कुटुंबमय झाले. कुटुंब व्यवस्था हळुहळु जय होत असलेल्या समाजाची दयनीय स्थिती कुठल्या स्तराला जावुन पोहोचली आहे हे आपल्याला दैनंदिन पहावयाला मिळते. वैदिक देवता व क्षुद्र देवता यांना धरुन छत्तीस कोटी देवतांना बाजुला सारुन अंत:साक्षी (अंतर्ज्ञान) हेच देवाचे अस्तित्व होय म्हणून सांगितले. भौतिक आशांच्या वलयातून बाहेर येवुन खालच्या स्तरावर वर्गीकरण होणा-या व जन्माचे मुळ कारण करुन वर्गातुन बाहेर पडुन खालच्या जातीत वर्गीकरण होण्याचा मार्ग दाखवून दिला. आपल्या क्रांती न होत्या बाहेर क्रांती होने शक्य नाही हे जगाला पटवून दिले. बसवेश्वरांच्या पर्यायी समाजामध्ये मनुष्य आपला धर्म वर्ण याला प्रमुख न मिळविता गुण व क्रियामुळे प्रमुखाना मिळवितो. बसवेश्वर महाराजांनी कर्माचे श्रेष्ठत्व सांगितले व त्यांचे कार्य हे चिरंतन चालत आहे, त्यांच्या कार्याचा आदर्श घेतला पाहिजे.

# समतेचे पुरस्कर्ते : महात्मा बसवेश्वर

**प्रा. स्वामी एस. जी.**
*जीवशास्त्र विभाग, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड, जि. नांदेड*

12 व्या शतकातील महात्मा बसवेश्वर हे अनेक नव्या संकल्पनेचे जनक ठरतात. त्यांनी आपल्या कृतीद्वारे अनेक नव्या संकल्पना शोधून काढल्या आणि त्याद्वारे समाजाची नवउभारणी केली. त्यात शरण लिंगायत चळवळ, समतेची इष्टलिंग कल्पना, जगत ज्योती गुरु कल्पना, स्वर्ग नरकाची, वास्तव मिमांसा, अनुभव मंटप वचन वाड्मय, कायकवाद शरण संस्कृतीतून आलेला मानवतावाद संपत्तीचा, विश्वस्त सिद्धांत संकल्पनेची फक्त मांडणी न करता प्रत्यक्षात आपल्या कृतीत उतरविण्याचे क्रांतिकार्य कार्य तत्कालीन बंदिस्त समाजात महात्मा बसवेश्वरांनी केले त्यामुळे ते सामाजिक क्रांतीची आद्य निर्माते ठरतात.

म. बसवेश्वर कल्याण येथील राजा बिज्जलच्या दरबारात पंतप्रधान पदावर काम करीत असताना त्यांनी सामाजिक परिवर्तनासाठी जातीव्यवस्था धर्मांधता, अस्पृश्यता, अंधश्रद्धा, स्त्रीदास्य, गुलामगिरी, कर्मकांड, पशुहत्या, पुरोहितशाहीचे वर्चस्व, मूर्ती पूजेचे अवडंबर, मंदिर संस्कृतीचा अतिरेक, शुभ-अशुभ कल्पना सामाजिक समतेची एकतेची लिंगायत चळवळ उभी केली.

विश्व मानवधर्माची खऱ्या अर्थाने मुहूर्तमेढ रोवली बसवेश्वरांना चातुर्वर्ण्य मान्य नव्हते कारण त्याने माणसामाणसात भेदभाव हा अमंगळ असतो. जातीव्यवस्था ही वर्णव्यवस्थेचे परिनीती होती वर्णव्यवस्थेचे विकृत व कुरूप म्हणजे जातीव्यवस्था वेदांनी चातुर्वर्ण्य व्यवस्थेचे समर्थन केले म्हणून बसवेश्वरांनी वेदाचे पावित्र्य अमान्य केले. वेद म्हणजे आणि भेद म्हणजे पक्षपात अन्यायाची निर्मिती पक्षपातातुन होत असते. बसवेश्वरांनी वेदांची कठोर समीक्षा केली. उच्च निचता व माणसामाणसातील व जातीजातीतील असमानतेवर आधारलेली होती म. बसवेश्वरानी अस्पृश्यतेवर कठोर आघात केले.

जातिव्यवस्थेवर प्रचंड प्रहार केले ब्राम्हणी विचार ऐरणीवर ठेवून त्यावर घणाघाती हल्ले चढविले. यांचे विचार वाचल्यानंतर अश्वघोषाच्या वज्रसुची ची आठवण होते.

बसवेश्वरांनी स्त्रियांना समानता व प्रतिष्ठेची वागणूक दिली, महिलांच्या मनातला न्यूनगंड त्यांनी काढून टाकला.

1160 साली त्यांनी कल्याण येथे आत्ताचे बसवकल्याण अनुभव मंटपाची स्थापना केली त्यावेळी ते बिज्जल राजाच्या दरबारी पंतप्रधान होते. राजाच्या संस्थानाचे ते अर्थमंत्री होते राजकारण व राज्यकारभाराचा त्यांचा अनुभव समृद्ध होता. म. बसवेश्वराच्या अमृतमय वचनातून त्यांच्या व्यक्तिमत्वाचे स्पष्ट प्रतिबिंब आढळते. बसव वचनातून त्यांच्या मानसिक व आध्यात्मिक विकासाची आपल्याला कल्पना येते म बसवेश्वराच्या शिलालेखातूनही त्यांच्या विचाराची कल्पना आपणास येते. ते म्हणतात टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही त्याप्रमाणे म बसवेश्वराना अनेक संकटाना सामोरे जावे लागले होते.

आज एकविसाव्या शतकात वावरत असलेले आपण व आजच्या जातीय भेदाने पछाडलेली समाजव्यवस्था पाहिल्यानंतर बाराव्या शतकामध्ये म. बसवेश्वराचा काळ कसा असेल याची कल्पनाच करवत नाही, पण त्या काळातही त्यानी आंतरजातीय विवाह, सामाजिक समता हे विचार त्यांनी मांडले म बसवेश्वराचे विचार कानडी भाषेतून त्यांचे विचार इतर प्रांतातील लोकांना कळलेच नाहीत. वर्णव्यवस्था आस्तित्वात असलेल्या समाजात म. बसवेश्वराचा जन्म झाला या समाजात जातीभेद गडद होता जातीची पायरी ठरलेली होती या समाजातील व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य नव्हते ठराविक चौकटीत राहूनच कार्य करावे लागत असे. समाजव्यवस्थेची चौकट मोडणाऱ्या वर कडक निर्बंध लादले जात असत त्यामुळे समाज व्यवस्थेची चौकट मोडण्याचे धाडस सहसा कुणी करत नसत नेमके

बसवेश्वरानी याच गोष्टींविरुद्ध बंड केला. म. बसवेश्वरांनी आपल्या विचारातून ब्राम्हणी विचारांची निर्भत्सना केली धर्मग्रंथानी दाखविलेला मार्ग ब्राम्हण आचरित नाहीत म्हणूनच आदर्श आणि वस्तुस्थिती यात मोठे अंतर पडत गेले इतर धर्मियांचा ब्राम्हणाबद्दलचा रोष वाढत गेला.

बाराव्या शतकात अस्पृश्यांची स्थिती करुणाजनक होती. त्यांना आपले गावातील आगमन ओरडून सांगावे लागत असे, त्यांच्या ओरडण्यामुळे उच्च जातीतील लोकांना त्यांचा विटाळ टाळणे सुलभ होत असे. असा समज करण्यात आला होता की या लोकांना कोणत्याही प्रकारचा प्रतिष्ठित व्यवसाय करता येत नव्हता बहिष्कृत जातीतील लोक हाच श्रमिकांचा मोठा वर्ग होता. हे लोक सामंताचे गुलामच होते समाजात असंख्य अंधश्रद्धा होत्या काम न करता खाण्याची प्रवृत्ती समाजात वाढत होती. कायक वे कैलास हा महामंत्र म. बसवेश्वरांनी सुचविला कष्ट न करता खाण्याचा अधिकार कुणालाही नाही. काम हेच मोठे स्वर्ग होय इतरत्र भटकण्याची बिलकुल गरज नाही आजची संसदीय शासन पध्दती म.बसवेश्वरानी बाराव्या शतकात सुरुवात केली होती. यावरून म. बसवेश्वरांची दूरदृष्टी लक्ष्यात येते.

भारताच्या इतिहासात प्रथमच सर्व जाती धर्माच्या लोकांचा समावेश असणारे व्यासपीठ निर्माण झाले होते. एका छत्राखाली सर्व जाती धर्माच्या लोकांना आणण्याचे कार्य प्रथम म. बसवेश्वरांनी केले. केवळ पुरुषांना यात सामावून न घेता स्त्रियांना देखील समान अधिकार देऊन सन्मानित केले. भारताच्या इतिहासात एक वस्तुनिष्ठ धार्मिक व सामाजिक आशय असणारे व्यासपीठ म. बसवेश्वरांनी निर्माण केले. म. बसवेश्वर म्हणत सर्व मानवाचे रक्त जर लाल आहे तर मग उच्च निच भेदभाव का यासाठी प्रबोधन व्हावे म्हणून त्यांनी अनुभव मंटपाची स्थापना केली. ठिक ठिकाणच्या अनुभव मंटपात हरळ्या मोची, चनैया चांभार, कोळी बोमय्या, सोनार, मांग, पंडित असे विविध जाती धर्मातील लोक होते म बसवेश्वरानी केवळ विचारातून जातिभेदावर हल्ला केला प्रहार केला असे नसून प्रत्यक्ष कृतीतून त्यांनी समाजासमोर आदर्श ठेवला अनुभव मंटपात समाज प्रबोधनाचे उत्कृष्ट कार्य चालविले जात होते.

याच माध्यमातून आठशे वर्षांपूर्वी म. बसवेश्वरांनी मधूवरस ब्राम्हणाची कन्या आणि हरळ्या मोचीचा पुत्र यांचा आंतरजातीय विवाह लावून दिला महापुरुषांच्या चारित्र्य चिंतनातून समाजाला होणारा बोध मानवतावादी मूल्यांची ओळख करून देणारा असतो. प्रतिकूल परिस्थितीविरुद्ध संघर्ष केल्याशिवाय परिवर्तनाची पहाट होऊ शकत नाही. सामाजिक परिवर्तनासाठी स्वकीय व परकीय या दोघांविरुद्धही लढावे लागते म. बसवेश्वरांनी या दोन्ही पातळीवर आपला लढा लढविला म्हणूनच ते महापुरुष झाले.

**संदर्भ ग्रंथ :**

*महात्मा बसवेश्वर : डॉ. अशोक गं. मेनकुदळे, महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान भालकी, जि.बिदर - 2019.*
*अनुभव मंटप : राजू जुबरे, महाराष्ट्र बसव परिषद हिरेमठ संस्थान, भालकी जि.बिदर - 2020*
*बसवेश्वरांचा विश्वसंदेश : रमजान दर्गा, महाराष्ट्र बसव परिषद हिरेमठ संस्थान, भालकी जि.बिदर - 2018*
*बसव प्रज्ञा : रमजान दर्गा, महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान भालकी, जि.बिदर - 2017.*

---

# महात्मा बसवेश्वर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**प्रा. शिवकुमार बाबुराव गुडमे**
*मु.पो. सांगवी ता. मुखेड जि. नांदेड. मो. 9370786024*

---

चार्वाक-तथागत महात्मा बुद्धांपासून ते महात्मा बसवेश्वर – डॉ. बाबासाहेब आंबेकरांपर्यंत भारतीय समाजात समता, बंधुता,न्याय असावी यासाठीच्या चळवळीने समाजास वैज्ञानिक दृष्टिकोनापर्यंत आणले आहे. वैदिक संस्कृती प्रगल्भ होती पण मध्यकालीन अंधारात चाचपडत असलेल्या समाजात धर्मग्रंथांनी, धर्ममार्तंडांनी स्तोम माजवले होते. अनेक वर्षांपासून चालत आलेल्या परंपरा,चालीरीती जशाच्या तशा स्वीकारण्याचा कल मोडीत काढण्यासाठी १२ व्या शतकात म. बस्वन्नांनी आणि व त्यानंतर विसाव्या शतकात डॉ.आंबेडकरांनी दिलेल्या योगदानाचा आढावा घेण्यासाठीचा हा प्रपंच.

**विद्रोही व्यक्तिमत्व :** महात्मा बस्वन्नांनी परंपरेने चालत आलेल्या रुढी, प्रथा, परंपरा, विधी यांना फाटा देत क्रांतीकारी, युगप्रवर्तक म्हणून कार्ये केले. डॉ.आंबेडकरांनीही रुढी, प्रथा, परंपरा कशा त्याज्य आहेत हे वारंवार सांगुन पददलितांसाठी कार्ये केले.

**दास्यत्व नष्ट करण्यासाठी :** महात्मा बस्वन्नांनी निम्न समाज अंधश्रद्धेच्या आहारी न जाता दैववादी वृत्तीस फाटा द्यावा म्हणून अविरत कार्ये केले. अंधश्रद्धा निर्मूलन करुन उन्नतीचा मार्ग दाखवला. म. बस्वन्नांचाही प्रारब्धावर विश्वास नव्हता. डॉ. आंबेडकरांनीही गुलामीचे बंधने झुगारून द्यायला सांगितली. आपल्या विकासासाठी किंवा दारिद्र्यासाठी स्वत: आपणच जबाबदार आहोत. धर्ममार्तंड, दलाल समाजास लुबाडत आहेत,दिशाभूल करत आहेतअसा कानमंत्र दिला. प्रसंगी सर्वसामान्यांसाठी चवदार तळ्याचा सत्याग्रह केला.

**श्रेष्ठ-कनिष्ठ भेदभाव नष्ट करण्यासाठी धर्माचा आधार :** तत्कालीन धर्मात राहुन उपेक्षित-वंचीत लोकांची म्हणजेच बहुजनांची उन्नती होत नाही म्हणून उन्नती साधण्यासाठी म. बस्वन्नांनी नुतन असा क्रांतीकारी "लिंगायत धर्म" स्थापन केला परिणामी कल्याण क्रांती झाली. डॉ. आंबेडकरांनीही धर्मांतर करून बौद्ध धर्माचा स्वीकार केला आणि भारतात बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन केले. दोन्ही धर्म वैज्ञानिक दृष्टिकोन स्विकारतात.दोन्ही धर्मात अंधश्रध्देस अजिबात स्थान नाही.

**समाजासाठी आपआपल्या पदाचा त्याग :** म. बस्वन्नांनी अस्पृश्याच्या घरी जाऊन शरणु शरणार्थी म्हणत राजवाड्यातुन अस्पृश्यांच्या घरी जाऊन तत्कालीन नियमास तोडले. खजिनदार असुनही अस्पृश्यांच्या घरात जाऊन वर्ण आश्रम पद्धतीचे उल्लंघन केले होते म्हणूनच अशीही आवई उठवली गेली ते स्वत: घाण झाले आणि राजदरबारात येऊन आम्हांसही बाटविले - घाण केले च्च निम्न भेद नष्ट करण्यासाठी दासोह चालविला ज्यात कसलाही भेद केला जात नव्हता. परिणामी बस्वन्नांना आपल्या पुरोगामी कार्यामुळे प्रधानमंत्री पदाचा त्याग केला होता. डॉ. आंबेडकरांनीही हिंदू कोड बिल पास न झाल्यामुळे कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. समाजासाठी पदाचा त्याग हे फार मोठे महामानवाने द्योतक होते.

**साहित्यातून जनजागृती :** म. बस्वन्नांनी अनुभव मंटपातील सर्व शरण व शरणींच्या अनुभवा द्वारे वचन साहित्य निर्माण केले. डॉ. आंबेडकरांनीही अनेक ग्रंथामधून, वृत्तपत्रांतून समाजातील अन्यायी व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवला व फुटक्या लोकांचा सिद्धांत मांडला ज्यात ब्राम्हणी वर्चस्व मान्य नव्हते.

**निरर्थक कर्मकांड अमान्य :** म. बस्वन्नांनी परंपरेने चालत आलेल्या कर्मकांड अमान्य केले. होमहवन,यज्ञ, मुंज, धार्मिक विधी, नदीत स्नान करणे इत्यादी अमान्य केले. स्वर्ग-नरक कल्पना अमान्य करून मुळांपासून हादरवून सोडले. म. बस्वन्नांनी मुर्तीपूजेस विरोध करुन अभिषेक, विधीवत पुजा, अग्निपूजा यावरही सडकून टीका केली. डॉ.

आंबेडकरांनीही कर्मकांडावर सडकून टीका केली. अनिष्ट रूढी परंपरा यांचे उच्चाटन करण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले प्रसंगी मनुस्मृतीचे जाहीर दहन केले. म्हणूनच म. बस्वन्ना आणि डॉ आंबेडकर हे युगप्रवर्तक होत.

**स्त्री उद्धारासाठी कार्ये :** म. बस्वन्नांनी स्त्रीयांसाठी प्रभावी योगदान दिले आहे. बालविवाह, विधवा पुनर्विवाह थांबवण्याचे कार्ये आणि वेश्या व्यवसायातून स्त्रीयांची मुक्तता ही भूमिका खुप काही सांगुन जाते. स्त्रीयांना लिंगदीक्षा देऊन अनुभव मंटपात मानाचे स्थान देऊन क्रांतिकारी असे वचन साहित्य निर्माण केले. मेल्यावर सुतक करण्याची आवश्यकता नाही असे सांगून बाळंत झाल्यावर सुतक नाही, असे ठाम सांगितले. डॉ.आंबेडकरांनीही स्त्री विकासासाठी हिंदू कोड बिल मांडले. जरी ते मान्य झाले नसले तरी त्यातील प्रत्येक तरतूद स्वतंत्र कायदा म्हणून अस्तित्वात आला.

**आंतरजातीय विवाहाचे समर्थन :** म.बस्वन्नांना खालच्या जातीच्या लोकांविषयी अगोदरपासूनच सहानुभूती होती.अधिकाराने मोठ्या पदावर बसुन तर त्यात अधीकच वाढ झाली.अनुभव मंटपातील हरळय्या हा अस्पृश्य होता तर मधुर रस हा ब्राह्मण होता. दोघांचीही गाढ मैत्री होती. मधुवरसाची कन्या आणि हरळय्याचा पुत्र यांचा विवाह करण्याचा क्रांतीकारी निर्णय घेण्यात आला. डॉ. आंबेडकरांनी जातीची बंधने नष्ट करण्यासाठी आंतरजातीय विवाहांना प्राधान्य दिले व म्हंटले खुन का मिलना ही अपनेपन की भावना लाता है

अशा प्रकारे दोन्ही महान विभूतींचे आंतरजातीय विवाहाला प्राधान्य होते.

**अस्पृश्यांना शिक्षण :** अनुभव मंटपात बस्वन्नांनी धार्मिक आणि कायकाच्या बरोबरीने शिक्षण दिले. शिक्षणातून मोक्ष देणारे प्रथम व्यक्तिमत्वं बस्वन्ना होत. १२व्या शतकापर्यंत अक्षर ज्ञान, मर्यादित स्वरूपात होते तरीही म. बस्वन्नांनी अस्पृश्यांमध्ये लिहिण्या-वाचण्याची आणि विचार करण्याची शक्ती निर्माण केली. म. बस्वन्नांचे शुद्ध ,सात्विक मन, दलितांवरील प्रेम हे सर्व प्रभावी दिसून येते. डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या शिक्षण प्रकारावर लक्ष केंद्रित करुन अनेक शैक्षणिक संस्था स्थापन केल्या.जनजागृती केली, वेळोवेळी मार्गदर्शन केले.

**अस्पृश्यता निवारण कार्ये :** म. बस्वन्नांनी अस्पृश्यता अमान्य करुन हरिजनवस्ती व शिवालये यांची जमीन एकच आहे म्हणून अस्पृश्यता अमान्य केली. त्यांच्या सहवासात मातंग जातीचा चेन्नय्या, ढोर ककय्या,मडिवाळ माच्चय्या-धोबी, संगय्या शिकारी, गोगव्वा चरखा चालवत,तर चांभार हरळय्या असे अनेक जातींचे होते पण सर्वांमध्ये एकता होती. डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यता निवारण करण्यासाठी ग्रंथ लिहिले.सत्याग्रह केले, काळाराम मंदिर प्रवेश केले. असे अनेक प्रयत्न करुन अस्पृश्यता निवारणासाठी प्रभावी कायदे केले.

**बस्वन्नांचा मुक्त समाजवाद आणि डॉ. आंबेडकरांचा राज्य समाजवाद :** जगात म. बस्वन्नांनी प्रथमतः १२व्या शतकामध्ये मुक्त समाजवादाचा पुरस्कार करुन प्रतिष्ठा, योग्यता(पात्रता) मिळवून दिली. स्वत: अर्थमंत्री, खजिनदार पदी प्रभावी कामगिरी करत होते. शरण वेगवेगळे धंदे, कुटीर उद्योग, व्यवसाय करुन संपत्ती जमवत उदरनिर्वाह करत होते. अशा प्रकारे कामा बाबतीत श्रेष्ठ कनिष्ठ पणा न राहता समानतेने कार्ये करत होते म्हणूनच राज्यातील सर्वांचे सामाजिक व आर्थिक जीवन समृद्ध झाले होते. स्वत: कष्ट करून उदरनिर्वाह करत होते. कायक वे कैलास ही संकल्पना मांडणारे प्रथम भगीरथ होते. अशा प्रकारे बस्वन्नांना मुक्त समाजवादाचे जनक होते. डॉ. आंबेडकरांनी दलित उद्धारासाठी राज्य समाजवाद मांडला. सामाजिक कल्याण, दुर्बलांचे रक्षण, संपत्तीची योग्य वाटणी, न्याय-समता तत्वावर आधारित असा लोकशाहीच्या चौकटीत समाजवाद मांडला. यात शेती हा राज्याचा(देशाचा) उद्योग असावा, सामुदायिक शेती कसावी,मुलभूत उद्योगांचे राष्टीयीकरण व औद्योगिकीकरण करावे, शेतजमिनीचे राष्ट्रीयीकरण करावे ज्यात जमीनदार, सावकार नसावेत. शेतीसाठी रक्कम सरकार देईल. सरकार शेती ताब्यात घेण्यासाठी शेतकऱ्यास मुळ किंमत देऊन घेईल. आर्थिक स्वावलंबन व्हावे असाही यामागे उद्देश होता. अशा प्रकारे तत्कालीन परिस्थितीनुरुप म. बस्वन्ना आणि डॉ. आंबेडकर यांचे आर्थिक विचार/समाजवादासंदर्भात विचार दिसून येतात. अशा प्रकारे सत्य, अंजिराच्या, दया, करुणा, त्याग, जाती निर्मुलन, स्त्री-पुरुष समानता यावी म्हणून तथागत म. गौतम बुद्धांपासुन ते क्रांतीसुर्य म. बसवेश्वर यांच्या कार्यांच्या प्रवाहास अतीशय गतीमान केले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी.

## महात्मा बसवेश्वर एवं संत कबीर की भक्ति भावना का तुलनात्मक अध्ययन

**डॉ. मुकुंद कवडे**

*हिंदी विभाग, पीपल्स कॉलेज, नांदेड, फोन नं. ९९६०२२२६३७*

आधुनिक और वैश्विक युग में भारतीय साहित्य ने एक नया मोड लिया है। बदलते परिवेश ने साहित्य को समझने एवं अध्ययन करने के नए आयाम खोल दिए हैं। इन आयामों में तुलनात्मक अनुशीलन साहित्य चिंतन एवं विश्लेषण की नई दृष्टि प्रदान करता है विविध भाषाओं के साहित्य के तुलनात्मक अध्ययन द्वारा परिवेश संवेदना, अनुभूति, आशय, चरित्र, शैली आदि का गहन अनुशीलन होता है। तुलनात्मक अनुशीलन का प्रमुख उद्देश्य भी विभिन्न साहित्य के मूल में स्थित परसपर संबधों का अध्ययन करना है। इसीकारण कन्नड भाषा में रचित महात्मा बसवेश्वर के क्रांतिकारी वचनों एवं हिंदी में कबीर के विद्रोही विचारों का तत्कालीन समाज जीवन पर पडे प्रभावों का अध्ययन करना आवश्यक लगता है।

मध्यकालीन भारतीय साहित्य के महान संतो में महात्मा बसवेश्वर एवं संत कबीर का योगदान अनन्यसाधारज रहा है। महात्मा बसवेश्वर जी का दक्षिण भारतीय समाज पर तो संत कबीर जी के विचारों का समग्र उत्तर भारतीय समाज पर गहरा प्रभाव पड़ा है। दोनों ने भी तत्कालीन अमानवीय प्रथा परंपराओं पर प्रहार करके मानवता का संदेश दिया है। केवल कथनी नहीं तो करनी पर बल देते हुए अंधकार में भटक रही जनता को एक नई दिशा दिखाने का काम दोनों संतों ने किया है। दोनों संतों का क्षेत्र, परिवेश अलग-अलग होते हुए भी सदाचरण, बाह्यांडबरों का विरोध, समन्वय की भावना, कर्म की प्रधानता लोककल्याण, जाति-पाँति का विरोध, भक्तिभावना आदि कई बातों में दोनों के साहित्य में कमाल की समानता दिखाई देती है।

मध्यकाल में भक्ति परंपरा का प्रचलन रहा है। तत्कालीन समय में भक्ति के क्षेत्र में काफी बाह्याडंबर प्रचलित थे। जाति प्रथा के साथ-साथ भक्ति के क्षेत्र में कई पाखंड़ थे। जिसका विरोध दोनों संतों ने किया है। संत कबीर ने निर्गुण निराकार, अजन्मा ब्रह्म की भक्ति की है। भक्ति के क्षेत्र में पंडित या पूजारी की मध्यस्थता को उन्होंने अस्वीकार किया है। सच्ची भक्ति करनेवाले भक्त के सानिध्य को भी कबीर ने महत्व दिया है। कबीर के अनुसार मन, वाणी और ज र्म से ही ज़ि या जया प्रभू -नामस्मरज ही सर्वश्रेष्ठ है। वे कहते है कि,

"भगति भजन हरि नाँव है दुजा दुख अपार
मनसा वाचा कर्मना, कबीर सुमिरण सार।"[१]

कबीर भक्तिभावना का समग्र सार भी यही है। कबीर के पहले कुछ इसी प्रकार की भक्तिभावना महात्मा बसवेश्वर की थी। भक्ति के क्षेत्र में महात्मा बसवेश्वर भी किसी प्रकार की मध्यस्थता का विरोध करते हैं। सत्संग पर बल देते हुए महात्मा बसवेश्वर सगुण और निर्गुण ईश्वर के दोनों रुपों को एक ही मानते हैं। संपूर्ण रुप से ईश्वरोपासना ज र-नेवाले

भक्तों के प्रति समर्पित होते हुए वे कहते है कि,

"ज़ु लदैव म-नेदैववे-नजे निम्मवरय्य
तनु मीसलु मन मीसलु

नयन एन्न मीसलु, कुंडलसंगम देव

निम्न शरणरिगे।"२

मध्यकालीन भारतीय संतों ने सत्संग पर अत्याधिक बल दिया है। सच्ची आराधना एवं माया से बचने के लिए संतो का संग महत्वपूर्ण समझा जाता है। महात्मा बसवेश्वर एवं संत कबीर ने संत्संगति को ईश्वरोपासना के लिए महत्वपूर्ण माना है। यहाँ तक कि महात्मा बसवेश्वर संतों में ही ईश्वर के भक्ति को मानते हुए उन्हें ही प्राजसजा जे रुप में देखते हैं। इसलिए वे ईश्वर से प्रार्थना करते हुए कहते हैं कि,

"जंग मवे लिंगवेनगे, जंगमने प्राणवेनगे

कुडलसंगम देवय्या

यनेगेयु नीननेयु जंगम प्रसादवे प्राण।"३

साधु संतों की कृपा हमेशा ही बनी रहने के लिए बसवेश्वर ईश्वर से अनुरोध करते हैं।

संत कबीर भी सत्संग को सबसे अधिक महत्वपूर्ण एवं प्रभावपूर्ण मानते है। अपने प्रभू की खोज के लिए कोई भी भक्त किसी भी तीर्थस्थल पर चला जाय किंतु साधुसंगति और प्रभूभक्ति के बिना कुछ भी प्राप्त नहीं हो सकता-

"मथुरा जावै द्वारिका जावै जावै जगन्नाथ

साध संगति हरिभक्ति बिन कछु न आवै हाथ।"४

कहने का तात्पर्य यही है कि सत्संगति से ही हरिभक्ति की ओर जा सकते हैं। भक्तों को सही दिशा साधु संतो की संगति से ही मिलती है। इसलिए कबीर कुसंगति से बचने एवं सत्संगति के लिए ईश्वर से अनुरोध करते हैं।

भारतीय मध्यकाल में हम देखते हैं कि भक्ति के क्षेत्र में ही नही बल्कि पूरे समाज में जातिप्रथा, धार्मिक बाह्याडंबर एवं वर्णव्यवस्था व्याप्त थी। समग्र समज वर्ण व्यवस्था के आधार पर विभाजित था। ऐसे समय में दजिज में महात्मा बसवेश्वर तथा उत्तर भारत में संत कबीर का आविर्भाव एक क्रांति से कम नही था। महात्मा बसवेश्वर जाति के आधार पर की गई श्रेष्ठता का विरोध करते हैं। उन्होंने कई ऐतिहासिक संदर्भ देकर जाति-पाँति का विरोध किया है। कर्म प्रधानता पर बल देते हुए वे कहते है कि,

"चांभार उत्तम तो दुर्वास कस्यप तो लोहार

कौडिण्य तो न्हावी, तिन्ही लौकी बरवी प्रसिध्दी

जातीचे श्रेष्ठत्व हाथी वेडाचार।"५

संत कबीर ने तो भक्ति के क्षेत्र में ही नहीं बल्कि समग्र समाज में व्याप्त वर्णव्यवस्था एवं जातिव्यवस्था पर कड़ा प्रहार किया है। ईश्वरोपासना करने का अधिकार समाज के कुछ ही लोगों को था जिसका विरोध संत कबीर ने किया है। कबीर के अनुसार सच्ची भक्ति करनेवाले साधु की जाति न पुछकर उसके ज्ञान को देखना चाहिए। कई सारे तार्किक सवाल करते हुए कबीर कहते है कि,

"काहे को कीजै पांडे छोति विचारा

छोत ही ते उपजा संसारा

हमारे कैसे लोहु तुम्हारे कैसे दुध

तुम केसे बामण पांडे हम कैसे सुद"६

अतः निष्कर्ष रुप से हम कह सकते है कि महात्मा बसवेश्वर एवं संत कबीर के विचारों में काफी समानता दिखाई देती है। सदाचरण, जाति-पाँति, बाह्याडंबर, ज्ञान, गुरु का महत्व, निष्ज ाम भाव, सम-वय भाव-ा, जमा, ज रुजा

आदि बातों की दृष्टि से समानता के साथ-साथ भक्ति के क्षेत्र में भी कमाल की समानता दिखाई देती है। वास्तव में दोनों ने भी भक्ति के क्षेत्र में काफी परिवर्तन किये हैं। संत कबीर ने तो भक्ति के क्षेत्र में व्याप्त किताबी ज्ञा-न से भी अधिक प्रेममार्ग को महत्व देकर शास्त्रों के ज्ञान को अंधकारमय माना है। "क्योंकि ऐसे ज्ञान से अंहकार उत्पन्न होता है और अहंकार अंधकार है, अज्ञान है, बंधन है वह तो आदमी को भगवान से दूर ले जाता है।"७

भक्ति के क्षेत्र में गुरु के महत्व को दोनों ने भी स्वीकार किया है। सत्संग पर दोनों ने बल दिया है। जाति-पाँति का विरोध भक्ति के क्षेत्र में ही नहीं बल्कि समग्र समाज की दृष्टि से किया है। महात्मा बसवेश्वर ने ईश्वर के सगुण-निगुर्ण रुपों की चर्चा न करते हुए दोनों के एकरुप होने की बात की है तो संत कबीर सगुण भक्ति ज ा विरोध ज र निर्जुज निराकार ईश्वर के नामस्मरण पर बल देते हैं। तत्कालीन समाज में व्याप्त विषमता का विरोध कर मानवीय मूल्यों जे आधार पर समाजरचना निर्माण करने का उद्देश्य दोनों संतों का रहा है। अतः वर्तमान समाज के लिए भी उनके विचारों की आवश्यकता दिखाई देती है।

**संदर्भसूची :**

*ज बीर ग्रंथावली - पुष्पपालसिंह, पृ. सं. ९१*
*महात्मा बसवेश्वर- डॉ. अशोक कामत, पृ. सं. २४२*
*महात्मा बसवेश्वर - डॉ. अशोक कामत, पृ. सं. २३३*
*ज बीर ग्रंथावली- पुष्पपालसिंह, पृ. सं. २१२*
*समाजक्रांतिचे जनक महात्मा बसवेश्वर, पृ. सं. २१*
*ज बीर ग्रंथावली- पुष्पपालसिंह, पृ. सं. ६५*
*हिंदी ज ाव्य संग्रह- केंद्रीय हिंदी संस्थान, आगरा, पृ. सं. २१४*

# महात्मा बसवेश्वर यांचे धार्मिक विचार ;एक अभ्यास

**प्रा.करुणा विठ्ठलराव जोंधळे ( वाघमारे)**
*संशोधक विद्यार्थिनी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड. मों.न. 8380979026/ 9767806644*
*Email:karunajondhle@gmail.com*

मनुष्य तसा सामाजिक प्राणी आहे त्याचप्रमाणे तो धार्मिक प्राणीही आहे. मनुष्याने समाजामध्ये राहताना उत्तम प्रकारे, मर्यादशील जीवन जगण्यासाठी धर्माची निर्मिती केली आहे. म्हणजेच धर्म माणसाच्या जीवनाची कर्तव्य व मर्यादा सांगणारी व्यवस्था आहे.कर्तव्य नीती आणि सदाचार ही खरी धर्म तत्वे आहेत. त्यानुसार व्यक्तीने जीवन जगण्यास समाजाचे स्वरूप सुसंस्कृत बनू शकते. जगातील प्रत्येक मनुष्याने आपणास कोणत्यातरी धर्माशी जोडून घेतले आहे. म्हणून धर्म व्यक्तिगत जीवनाचा साठीच नव्हे,तर सामाजिक, नैतिक आणि आध्यात्मिक जीवनासाठी अत्यंत उपयुक्त आहे.

चिंतनशील प्रवृत्तीच्या महात्मा बसवेश्वरांनी हे जाणले होते की, धर्म सर्व व्यक्ती व समाजाच्या भल्यासाठी कार्य करू शकतो. परंतु तत्कालीन धर्माने मात्र या उलट समाजातील विशिष्ट व्यक्तींचे भले महत्त्वाचे मानून बहुसंख्य लोकांचे शोषण त्यांचे खच्चीकरण सुरू केले होते. म्हणूनच त्यांनी तत्कालीन धर्म व्यवस्थेत फार मोठे परिवर्तन करुन धर्मच व्यक्ती व समाजाच्या फार मोठ्या परिवर्तनाचे कार्य करू शकते हे दाखवून दिले होते. धर्म माणसाला माणसापासून तोडण्याचे नव्हे , तर जोडण्याचे काम करू शकतो, म्हणून धर्माच्या माध्यमातून मनुष्य जोडो समाज जोडो हे अभियान त्यांनी सुरु केले होते. धर्म मनुष्याला अज्ञाना कडून ज्ञानाकडे घेऊन जाण्याचे अनैतिकतेकडून नैतिकतेकडे घेऊन जाण्याचे खऱ्या अर्थाने मनुष्याला मनुष्य बनविण्याचे कार्य करू शकते, याबाबत महात्मा बसवेश्वर ठामहोते. म्हणून त्यांनी धर्माच्याच माध्यमातून तत्कालीन सर्व क्षेत्रांतील समस्यांवर यशस्वी उत्तर शोधले होते. अशा या त्यांच्यानवधर्म व्यवस्थेचा आढावा खालील प्रमाणे घेता येईल.

**1. एकेश्वरवादाची संकल्पना:** धर्म आणि ईश्वर मनुष्याच्या अधोगतीला नव्हे, प्रगतीला साह्यकारी ठरले पाहिजेत या दृष्टिकोनातून ईश्वरी संकल्पनेचा महात्मा बसवेश्वरांनी पुन्हा आढावा घेऊन देवतांची संख्या आणि स्वरूपाबाबत नवा दृष्टिकोन मांडला. बाराव्या शतकामध्ये बहू देव उपासनेचा अक्षरशः सुळसुळाट झाला होता म्हणूनच देव-देवतांच्या वाढत्या संख्येमुळे भुतलावर कशी अडचण निर्माण झालीआहे, हे उपरोधाने सांगताना महात्मा बसवेश्वर म्हणतात,

मडके देव, सूप देव, रस्त्याचा दगड,
तोही देव पहा!
फणीदेव, धनुष्याची दोरी देव,
माप देव आणि लोटा ही देव पहा!
असे देव झाले फार या भूवर,
पाय ठेवण्यासी जागा नाही पहा,
तथापि देव एकचि आहे,कुडलसंगमदेव.

म्हणजेच महात्मा बसवेश्वरांना बहूदेववाद मान्य नव्हता. देव फक्त एकच असे सांगून त्यांनी एकेश्वरवादाचा पुरस्कार केला. यामागेही त्यांची विशिष्ट स्वरूपाची समाज नीती होती. कारण महात्मा बसवेश्वरांच्या प्रत्येक कृतीमध्ये विषमता विरोध व समतेची प्रतिष्ठापना करण्याचा प्रयत्न झालेला दिसून येतो.

महात्मा बसवेश्वरांच्या मते खरा देव एकच( शून्यस्वरूपी) असून आपण त्यास अनेक नावांनी संबोधून त्याची वेगवेगळ्या स्वरूपात कल्पना केली आहे. याबाबत ते एका वचनात म्हणतात,

देव एक, नावे अनेक,
परम पतिव्रतेसपती एकच हो.
अन्यथा देवापुढे नतमस्तक झाल्यास,
नाक कान कापेल.
अनेक देवांचे उष्टे खाणाऱ्यांना काय म्हणावे,
कुडलसंगम देवा!

म्हणजेच देव हा मुळात एकच असून त्यांची नावे मात्र अनेक आहेत. पतिव्रता स्त्रीला पती एकटाच असतो. त्या स्त्रीने पतिव्रता धर्म सोडून अनेकांना पती म्हणून स्वीकारले तर ,खरापती तिचे नाक कान कापून टाकतो. तसे एका देवा मध्येच भक्ती केंद्रित न करता अन्य देवांची पूजा केली तर लिंग देवाचा कोप होतो. म्हणूनच महात्मा बसवेश्वरांनी एकेश्वर भक्तीचा पुरस्कार केला.

**2. इष्टलिंगधारणेचा पुरस्कार:** मंदिरासारखी ठिकाणे पंडे, पुरोहित,पुजारी यांच्या सत्तेची, शोषणाची केंद्र स्थळे बनवून माणसाला स्वतंत्र करण्याऐवजी गुलाम बनविण्याचे कार्य इथेच सुरू असल्याचे बसवन्ना यांनी पाहिले होते. म्हणूनच त्यांनी मंदिर,मूर्तीपूजा व पुरोहितशाही चा विरोध करताना इष्टलिंग आराधनेचा जोमाने पुरस्कार केला. ईश्वराच्या स्वरूपाविषयी एका वचनामध्ये ते म्हणतात,

विशाल विश्वापार,असीम गगनपार,
त्याही पार तव विस्तारातीतविस्तार.
श्रीचरण तुमचे पाताळापल्याड,
श्रीमुकुट तुमचा ब्रम्हांडापल्याड.
अगम्य,अगोचर, अप्रतिम लिंगप्रभू,
करस्थलावरि माझ्या येउनी अगा
सान तुम्ही झालात कुडलसंगा.

यावरून महात्मा बसवेश्वरांच्या देवाचे व्यापकत्व स्पष्ट होते. तरीही निराकार अशा विशिष्ट शक्तीला प्रतीकात्मक रूपात पाहण्यासाठी, आपल्या तळहातावर ठेवून आराधना करता येण्यासाठी त्यांनी इष्टलिंग स्वरूपात पुढे आणले. याबाबत डॉ.जवरेगौडाम्हणतात, लोकांच्या कल्पनेला एक धारणा पाहिजे, त्यांची श्रद्धा आणि उत्साह वाढविण्यासाठी एक साधन पाहिजे. साधनेच्या पहिल्या टप्प्यात साधकाच्या एकाग्रतेला एक आधार पाहिजे. साधनेच्या पहिल्या चार टप्प्यांसाठी एक संकेत पाहिजे. त्यानंतर मात्र कोणत्याही संकेताची गरज राहत नाही. यानुसारच महात्मा बसवेश्वरांनी साधकांना आधार म्हणून स्थावर लिंगा ऐवजी इष्टलिंग उपलब्ध करून दिले होते.

**3. सदाचार महत्त्वाचा मानला:** महात्मा बसवेश्वरांच्यासदाचाराच्या संदर्भातील अनेक वचनांचा अभ्यास केला असता हे निदर्शनास येते की, त्यांना आचारधर्म प्रथम संपन्न करावयाचा होता. त्यातूनच पुढे समाज संपन्न बनणार होता. आणि म्हणूनच व्यक्ती वर्तनावर प्रथम परिवर्तनाचा मारा करण्याचे काम त्यांनी हाती घेतले. त्यांच्या या आचारशुद्धीच्या चळवळीतूनच सत्य, शुद्ध आचार संपन्न शरणगण तयार झाले. त्यातूनच संपन्न विचारांच्या,समतावादावर, मानवता वादावर विश्वास असणाऱ्या नव समाजाचे अस्तित्व निर्माण होऊ लागले होते. आजही आपल्या समाजातील, देशातील वेगवेगळ्या स्वरूपाच्या ज्या समस्या आहेत, त्यावर कायद्याने कितीही बंधने आणण्याचा प्रयत्न केला, तरीही त्यावर कायमची मात करता येणे शक्य नाही. आपल्या समाज व देशातील क्रूर दोष व समस्या कितीही वरवरचे उपचार केले तरी, मानवी वर्तन जोपर्यंत बदलत नाही, तोपर्यंत कायम राहणार आहेत. म्हणूनच सद्वर्तन, सदाचार सिद्धांत आजही काळाची गरज बनला आहे.

**4. दयाधर्माचा आधार:** महात्मा बसवेश्वरांच्या अगोदर भारतातील धर्मविचार- तत्त्वांमध्ये प्रेम, दया, करुणा आदी तत्वांना महत्त्व दिले होते. परंतु त्याला व्यावहारिक स्वरूप देण्याचा फार मोठा प्रयत्न महात्मा बसवेश्वरांनी केला असल्याचे दिसून येते. महात्मा बसवेश्वरांनी आपली संपूर्ण कारकीर्द मानवजातीच्या कल्याणार्थ घालवली. परंतु

याच वेळी त्यांनी इतर प्राणीमात्रांविषयी सुद्धा मोठी तळमळ ठेवली होती, हे त्यांच्या जीवनातील अनेक घटनांवरून सिद्ध होते. अशाच प्रकारचे संदेश त्यांनी सर्व मानव प्राण्यांना दिले आहेत. म्हणजे धर्म सांगतो, पण अनुयायी ऐक तिलाच याची शाश्वती नसते. परंतु आपला श्रद्धाशील विश्वासू नेता, समाजधुरीण जेव्हा त्या पद्धतीचे स्ववर्तन ठेवून लोकांपुढे आदर्श ठेवतो, तेव्हा मात्र जनता, अनुयायी त्याचे अनुकरण करू लागतात. म्हणून महात्मा बसवेश्वरांनी पहिले स्वतः केले, त्यानंतर दया धर्म पाळण्याचे आवाहन त्यांनी आपल्या अनुयायांना केले. आज निश्चितच क्रूर,आक्रमक, हिंसक मनोवृत्तीच्या काळात अशा दया धर्माची नितांत आवश्यकता आहे.

**5. बाह्य अवडंबर नाकारले:** महात्मा बसवेश्वर चिकित्सक मनोवृत्तीचे, परखड विचारांचे व वास्तवाला महत्त्व देणारे होते. त्यामुळे तत्कालीन धर्म, समाज व एकूणच व्यवस्थेत जी वास्तववादी कृत्ये चालू झाली होती, त्यांना त्यांचा ठाम विरोध होता. ईश्वर आणि धर्म ह्या बाबी मनुष्य व समाज हितासाठी महत्त्वाच्या आहेत, हे मान्य असले तरी ईश्वरास प्रसन्न करण्यासाठी व समाज हित जोपासण्यासाठी बाह्य किंवा दिखाऊ बाबी उपयोगाच्या नाहीत, तर त्यासाठी सत्य व वास्तविक कर्मेचमहत्त्वाची आहेत असा बसवेश्वरांचा संदेश होता.म्हणजेच व्यक्ती व समाजाच्या कल्याणासाठी दिखाऊ भपकेबाज भक्ती व सेवे ऐवजी प्रामाणिक मध्यस्था शिवाय भक्ती व स्वार्थ न ठेवता केलेली जनसेवा हीच खरी ईश्वरसेवा आहे हे सांगण्याचा, त्या अनुषंगाने समाजाला शोषणापासून वाचविण्याचा व खरा ईश्वर दाखवून देण्याचा महत्त्वाचा प्रयास केला. आजही आपला समाज अशाच प्रकारच्या धर्म व ईश्वरा बाबतच्या बाह्य फटकेबाजी ला बळी पडून नाहक आपले नुकसान करून घेत आहे. त्यावर बाह्य दिखाऊ बाबींकडे दुर्लक्ष करून समाजाचे नुकसान काढायचे असेल तर, आजही महात्मा बसवेश्वर यांचे ईश्वर व समाज सेवेबाबत चे वास्तववादी विचार मार्गदर्शक ठरणार आहेत.

**6. अष्टावरण, पंचाचार व षट्स्थल सिद्धांत:** महात्मा बसवेश्वरांच्या उदयापूर्वी भारतामध्ये शिवधर्म प्रचलित होता हे सर्वमान्य आहे. त्या धर्मातील दोष बाजूला सारून, व्यक्ती व समाज हिताच्या दृष्टीने या धर्मातील प्रमुख, महत्त्वाच्या काही तत्वांना व्यावहारिक स्वरूप देऊन ती धर्म तत्वे लोकाभिमुख करण्याचे महत्त्वाचे कार्य महात्मा बसवेश्वरांनी केले. म्हणजे देवधर्म सामान्य जनतेचे हित न पाहता,कुळ-गोत्र, जातीभेद व कर्मकांडाला अधिक महत्त्व देऊ लागल्यामुळे समाजामध्ये दुफळी निर्माण झाली होती. म्हणूनच सर्व भेदाभेद टाळून समानतेच्या आधारावर सर्व समाजातील लोकांना एकत्रित आणण्यासाठी एक देव, एक तत्व व एक व्यवस्था निर्माण करणे जरुरीचे आहे हे महात्मा बसवेश्वरांच्या लक्षात आले. त्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांनी अष्टावरण, पंचाचार आणि स्थल हे लिंगायत धर्म सिद्धांत व्यावहारिक स्वरूपात प्रचलित झाले.

**7. नवीन धर्माची स्थापना:** लिंगायत धर्म चळवळ ही निश्चितच सैद्धांतिक व वैचारिक दृष्ट्या व शैव धर्मापेक्षा वेगळी व लोकाभिमुख स्वरूपाची असलेली दिसूनयेते. म्हणूनच महात्मा बसवेश्वर लिंगायत धर्माचे संस्थापक असल्याचा विचार प्रवाह तयार झाला आहे. याला ऐतिहासिक पुरावे साहित्यिक व तर्कसंगत आधार उपलब्ध झालेले आहेत. विशेष म्हणजे बहुजन समाजासह, असंख्य भारतीय व पाश्चात्य विचारवंतांनी महात्मा बसवेश्वर लिंगायत धर्माचे संस्थापक असल्याचे मान्य केले आहे. या संदर्भात डॉ. अशोक मेनकुदळे यांचे मत अत्यंत महत्त्वाचे वाटते. ते म्हणतात, समस्त मानव जातीचा कैवार घेऊन तळमळीने जो क्रांतिकारक पेटून उठतो, जो समाजातील प्रस्थापित ,स्वार्थी,भोंदूगिरीवर, कर्मठ प्रथा परंपरांवर घणाघाती प्रहार करतो, युगा युगापासून उपेक्षित वंचितांचा अस्तित्वासाठी बदलत्या परिस्थितीनुसार नव्या जीवनमूल्यांचा जो क्रांतदर्शी बंडखोर हिरिरीने पुरस्कार करतो आणि आपली संपूर्ण प्रज्ञा,साधना,विवेक,कर्तृत्व, चारित्र्य अन जीवनसर्वस्व पणाला लावतो, बहुजनांचे जीवन सुखासमाधानाचे करतो, तोच खरा लोकनायक तोच खरा धर्म संस्थापक ठरतो. निश्चितच महात्मा बसवेश्वर या संपूर्ण कसोट्यांवर यथार्थपणे उतरलेले आहेत. म्हणूनच ते खरे धर्मसंस्थापक ठरतात.

धर्म हा भारतीय मनुष्याच्या जीवन पद्धतीच्या अविभाज्य भाग बनला असताना, धर्माने व्यक्ती व समाज उन्नत करण्याचे कार्य करण्याचे निश्चित केले असताना, समाजाला एकसंघ व सुव्यवस्थित ठेवण्याची जबाबदारी धर्माची असताना, बाराव्या शतकातील प्रचलित प्रभावी धर्म या मार्गाने मार्गक्रमण करीत होते का? याचे चिंतन महात्मा

बसवेश्वरांनी केले होते. त्यातूनच तत्कालीन ब्राम्हण धर्माने, धर्मपंडितांनी धर्माबाबत चे सर्व संकेत पायदळी तुडवून धर्म सत्तेचा,शोषणाचा, विषमता अंधश्रद्धा कर्मकांडाचा एक अड्डाच बनविल्याचे त्यांच्या निदर्शनास आले होते. म्हणूनच त्यांनी प्रचलित धर्म व्यवस्थेत व्यापक परिवर्तन करण्याचे नव्हे नवा पर्यायच उपलब्ध करून देण्याचे ठरविले होते ज्या पद्धतीने वैदिक धर्मातील विषमता,जातीयता, कर्मकांड यांना शह देण्यासाठी वर्धमान महावीर व गौतम बुद्धाने धर्म एक पर्याय म्हणून इ.पूर्व.६व्या शतकात उपलब्ध करून दिला होता, त्याच प्रमाणे बाराव्या शतकातील दक्षिणेतील प्रचलित हिंदू धर्माला,शैव धर्माला एक पर्याय म्हणूनच महात्मा बसवेश्वरांनी लिंगायत धर्म उभा केला होता.

महात्मा बसवेश्वरांच्या पूर्वीच्या काळातील सेवांची स्थिती सांगताना डॉक्टर अशोक मेनकुदळे म्हणतात, यावेळी शैव शिवाला अनेक नावांनी संबोधून देवालयातील शिवलिंगाची पूजा करीत शिवाय नाग,गणपति,विष्णू,कुबेरांसारख्या अनेक देवतांची पूजा करीत, त्यासाठी पुरोहित मध्यस्थ म्हणून वापरीत. हेच पुरोहित पापक्षालनासाठी यज्ञ,होम, शांती इ. विधी करावयास सांगून दक्षिणेच्या रुपाने भक्तांना लुबाडत. या वेळी स्त्री व शूद्रांना धार्मिक विधीचे अधिकार नसून जातिभेद,कर्मकांड, अंधश्रद्धेचे फार मोठे स्तोम माजविले गेले होते.सहाजिकच, चिंतनशील व चिकित्सक बसवेश्वरांना हे रुचल्याने त्यांनी एकदेवतावाद,इष्टलिंगाराधना यांचा पुरस्कार करून आपल्या धार्मिक विचारातून जातीयता,विषमता,स्त्रीदास्य,पुरोहितशाही,अंधश्रद्धा,कर्मकांड, बळीप्रथा, पुनर्जन्म या विघातक बाबींवर जोरदार हल्ला चढविला. धर्म केवळ मोक्ष मिळविण्याचे माध्यम न राहता, ते व्यक्ती व समाजाच्या कल्याणाचे, एकात्मतेचे माध्यम बनले पाहिजे या दृष्टिकोनातून धर्म तत्वे त्यांनी मांडली. म्हणजे डॉक्टर राधाकृष्णन म्हणतात त्याप्रमाणे धर्म सामाजिक परिवर्तनाचे साधन बनविण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

## संदर्भसूची


*राधाकृष्णन सर्वपल्ली, धर्म और समाज, राजपाल अँड सन्स,दिल्ली, पृष्ठ क्रमांक79.*

*मेनकुदळे अशोक, आद्य समाज सुधारक महात्मा , महाराष्ट्र बसवपरिषद, हिरेमठ संस्थान, भालकी (कर्नाटक)दुसरीआवृत्ती, डिसेंबर 2008, पृष्ठ क्रमांक 81.*

*पाटील बाळासाहेब (संपा), बसव पथ (मराठी द्वैमासिक),मे -जून 2011,पृष्ठ क्रमांक 43.*

*पाटील बाळासाहेब (संपा), बसव पथ मराठीद्वैमासिक,नोव्हे-डिसें. 2010, पृष्ठक्रमांक 34 35.*

*दोडमनी शालिनीताई (संपा.), महामानव बसवण्णांची समग्र वचने,पृष्ठ क्रमांक30.*

*डोणगावकर वेदप्रकाश, महात्मा बसवेश्वरांचेतत्वज्ञान,पृष्ठ क्रमांक 25*

*जिरोबे राजेंद्र, वचनामृत बसवेश्वरी,श्री.व्ही.बी.पाटील,श्री. मृत्युंजय शरण साहित्य प्रचारक संघ, हिराबाग, मुंबई 1983, पृष्ठ क्रमांक 1*

*डॉक्टर सचितानंद बिचेवार, परिवर्तनाचा महामेरू महात्मा बसवेश्वर, स्वाती प्रकाशन पूर्णा, प्रथम प्रथम आवृत्ती, एप्रिल 2015, पृष्ठ क्रमांक.92, ते112*

# महात्मा बसवेश्वरांचे सामाजिक न्यायासंबंधी विचार व कार्य

**प्रा. डॉ. आर. बी. शेटे**
*राज्यशास्त्र विभागप्रमुख, शंकरराव चव्हाण महाविद्यालय,अर्धापूर*

समाजातील संपूर्ण मानव जात ही निसर्गतः समान असून, त्यांच्या गरजासुद्धा समान आहेत. त्यामुळे प्रत्येक मनुष्याला समानतेची वागणूक मिळणे आवश्यक ठरते. परंतु समाजातील विविध धर्मव्यवस्था, रूढी, परंपरा, जातीव्यवस्था, अंधश्रद्धा, धार्मिक कलह, उच्च-नीच्चता यामुळे व्यक्ती - व्यक्ती मध्ये भेदभाव निर्माण केला गेला. त्यामुळे काही व्यक्ती आणि समूहांवर अन्याय होताना दिसतो. हा अन्याय दूर करून सर्व व्यक्ती समान आहेत या भावनेतून प्रत्येक व्यक्तीला न्याय मिळणे महत्त्वाचे असते. यासाठी सामाजिक न्याय हा महत्त्वाचा ठरतो. यातून प्रत्येकाचा सर्वांगीण विकास होणे महत्त्वाचे असते.भारताबरोबर जगातील अनेक देशांमध्ये मनुष्यांच्यामध्ये जात,धर्म,वंश,परंपरा, वाईट रितीरिवाज, या आधारावर हजारो वर्षापासून अन्याय होताना दिसून येतो. अन्याय दूर करण्यासाठी अनेक महात्म्यांनी आपले जीवन अर्पिले, यात महात्मा गौतम बुद्ध, महात्मा बसवेश्वर,छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, राजे सयाजीराव गायकवाड, भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदी महापुरुषांनी परिवर्तनवादी विचार मांडून सामाजिक न्यायाला अनुकूल असे कार्य केलेले आहे. या सर्व समाजसुधारकांची कार्य सामाजिक न्याय निर्माण करण्यासाठी महत्त्वाचे ठरतात.

शोधनिबंधाची उद्दिष्ट : 1.सामाजिक न्यायाची संकल्पनेचा शोध घेणे .

2. महात्मा बसवेश्वर यांचे सामाजिक न्यायविषयक विचार व कार्याचा अभ्यास करणे. गृहितके : महात्मा बसवेश्वरांचे सामाजिक न्यायाचे विचार व कार्याचे सामाजिक सुधारणेत महत्वाचे योगदान आहे

संशोधन पद्धती : प्रस्तुत शोधनिबंध वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करून लिहिण्यात आला आहे. तथ्य संकलनासाठी दुय्यम साधनसामग्रीचा आधार घेण्यात आला आहे .यात ग्रंथ, इंटरनेट , पुस्तके , वर्तमानपत्र ,नियतकालीके आणि शोधनिबंध यांचा आधार घेऊन शोधनिबंधाचे लेखन करण्यात आले आहे.

शोधनिबंधाची मर्यादा : प्रस्तुत शोधनिबंध हा महात्मा बसवेश्वर यांच्या सामाजिक न्यायविषयक विचार व कार्य यापुरता मर्यादित आहे.

**विषय विवेचन :** परंपरेने सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विषमतेवर आधारित समाजांमध्ये आज सामाजिक न्यायाच्या संकल्पनेबद्दल खूप आकर्षण आहे. शतकानुशतके वरचढ राहिलेल्या घटकांनी सत्ता संपत्ती व प्रतिष्ठा यांचा मोठा वाटा बळकावला आणि बहुजन समाजाला या तीनही गोष्टींपासून वंचित राहावे लागले. लोकशाही मूल्यांची समाजात रुजवणूक झाल्यानंतर ही परंपरागत विषमता असह्य होऊ लागली. यातूनच सामाजिक न्यायाची कल्पना प्रचलित झाली. ज्या समाजव्यवस्थेने हजारो वर्ष बहुजन समाज बांधवांना सामाजिक न्याय नाकारला आणि आजही जाती, धर्माच्या पारंपरिक व ताठर चौकटींना कवटाळून ती उभी आहे. अशा समाजव्यवस्थेला आणि तिला आधारभूत असलेली मूल्यव्यवस्था बाजूला करून त्याजागी नवसमाजनिर्मिती केल्याशिवाय सामाजिक न्याय मिळणे शक्य नाही अशी खात्री सामाजिक न्यायाची बाजू घेणा-या मध्ये निर्माण झाली.1 महात्मा बसवेश्वर यांनी सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी जे महत्त्वपूर्ण विचार मांडून कार्य केले आहे. ते महत्वपूर्ण ठरतात.

**सामाजिक न्यायाची संकल्पना व सामाजिक न्यायाची व्याख्या.**

**1. मराठी विश्वकोश :** सामाजिक न्यायाची संकल्पना, मानवामानवामध्ये सामाजिक स्थितीच्या आधारावर कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करणे, प्रत्येक व्यक्तीला आपल्या क्षमतेनुसार विकासाच्या समान संधी उपलब्ध असणे, कोणत्याच व्यक्तीचे कोणत्याही प्रकारचे शोषण होऊ न देणे,समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या किमान गरजा

पूर्ण होतील अशी व्यवस्था निर्माण करणे. आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होऊ न देणे आणि समाजातील दुर्बल वर्गालाही सुरक्षित वाटावे अशा वातावरणाची निर्मिती करण्यासंबंधी आहे.2

**2. जॉन रॉल्स :** 'समाजाची मूलभूत संरचना हीच सत्ता , स्वातंत्र्य अधिकार , संधी मिळकत व संपत्ती इत्यादींशी संबंधित यावर बेतलेल्या सामाजिक न्यायावर असली पाहिजे. माणसाच्या प्राथमिक गरजांची पूर्ती म्हणजे सामाजिक न्याय होय'.3

वरील व्याख्यांचा अर्थ पाहता असे म्हणता येईल की,ऐतिहासिक काळापासून जात,धर्म, वंश,लिंग,भाषा इत्यादी वरून होणाऱ्या भेदभावामुळे सामाजिक विषमता मोठ्या प्रमाणावर होती. ती विषमता नष्ट करणे आणि विषमतेमुळे मागे पडलेल्या घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करणे म्हणजे सामाजिक न्याय होय. सामाजिक न्याय निर्माण होण्यासाठी देशातील सर्व साधनसंपत्ती आणि वस्तूंची सर्व जनतेमध्ये समान वाटप करणे म्हणजे सामाजिक न्याय आहे. सामाजिक न्याय निर्माण झाल्यास समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, आर्थिक,राजकीय, सामाजिक हक्क स्त्री-पुरुष समानता, समाजातील सर्वांना शिक्षणाची,विकासाची समान संधी इत्यादी मूल्ये आणि तत्वांची सामाजिक न्यायाची उद्दिष्ट ठरतात. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचे दिसते. महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी केवळ विचार व्यक्त केले नाहीतर त्यास अनुकूल कृती केलेली दिसून येते. त्यांच्या या कार्याचे फलित म्हणून आज वंचितांना मिळालेली विकासाची संधी होय. त्यांच्या कार्याचे हे फलित होय.

महात्मा बसवेश्वर यांचे सामाजिक न्याय संबंधीचे विचार व कार्य

भारतात वैदिक,अवैदिक परंपरा असून अवैदिक परंपरेने देव, दैव, अस्पृश्यता उच्चनीचता मानणे व धर्मग्रंथप्रामाण्य अमान्य केले. त्यातून वैदिक परंपरा व अवैदिक परंपरेमध्ये सतत वैचारिक मतभेद व संघर्ष निर्माण होऊन त्यामधून परिवर्तनवादी विचार पुढे आले. महात्मा बसवेश्वरांनी नव परिवर्तनवादी विचार हे सामाजिक न्याय प्रस्थापित करणारे दिसतात. त्यांनी स्वतः जात नाकारून वेद, स्मृती,पुराणे, यांच्या विरोधात आवाज उठवला होता. वैदिक वर्चस्व, जातीभेद, धार्मिक विधी नाकारून, स्पृश्य-अस्पृश्य यांचे विवाह लावून समता प्रस्थापित करण्याचे कार्य केलेली दिसून येतात.ते पुढील मुद्यांच्या आधारे आपणास पाहता येतील.

**जातीय विषमतेला विरोध :** भारतीय समाज व्यवस्थेला लागलेला एक महाभयंकर सामाजिक रोग म्हणजे जातीयवाद होय. महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात जातीअंताचा लढा आपल्या आचरणातून आणलेला दिसतो. त्यांनी स्थापन केलेल्या अनुभव मंटपातून तो दिसून येतो. सर्व जातीतील स्त्री-पुरुषांना समान स्थान प्राप्त करून देऊन सर्व समानतेच्या आधारे सर्व कुळ- जातीचे मिलन घडून आणणे हा त्यांचा मानस होता असे म्हणता येईल. जातीय भेदभाव, स्पृश्य-अस्पृश्यता असे सामाजिक रोग असणे हे निकोप समाजव्यवस्थेला मारक असते, असे महात्मा बसवेश्वर मानत होते.त्यांनी सर्व जातीच्या लोकांना एक इष्टलिंग धारण करून सर्वजण लिंगायत आहेत. त्यामुळे कोणीही मोठा नाही आणि छोटा नाही यासंबंधी पुढील वचनातून स्पष्ट होते.

'कोणत्याही कुळात जन्म घेतला तरी काय झाले?
कुलज असे शिवलिंग धारकच!'4

या वचनातून त्यांनी जाती, कुळ मतभेद यावर पडदा टाकलेला दिसतो. प्रत्येक जण हा ईश्वराचा आहे असे त्यांनी म्हटले आहे.

**जातजन्मापेक्षा कर्मश्रेष्ठ :**

हिंदू समाजात हजारो जाती- जमाती, श्रेणीवर आधारित चातुर्वर्ण्याची उतरंड होती. अस्पृश्यतेची महाभयंकर रूढी होती. अशा रूढीचे पालन मनुष्य म्हणून घेण्यास लांच्छनास्पद गोष्ट आहे.तो एक सामाजिक कलंक आहे. अशा समाजव्यवस्थेचा त्यांनी धिक्कार केला. या बाबतचा विचार त्यांच्या पुढील वचनातून स्पष्ट होतो.

'हत्या करतो तो नीच
सडके मांस खातो तो शूद्र
यात जात ना पात
कुडलसंगमाला शरण जातो,
चराचरावर प्रेम करतो,
तो खरा कुलवंत असतो'.5

वरील वचनातून महात्मा बसवेश्वरांनी माणसाची प्रतिष्ठा ही जात जन्मावरून नसून ती त्याच्या आचार- विचारावरून आणि चारित्र्यावर ठरवावी असे सांगितले. यातून कर्मश्रेष्ठत्वाला त्यांनी स्थान दिले आहे असेच म्हणता येईल.

**स्त्री स्वातंत्र्य पुरस्कार :** भारतात प्राचीन काळी गार्गी, मैत्रेयी, यांना सन्मान होता.यांचे युग उलटून पुष्कळ काळ लोटला होता. यानंतर वैदिक परंपरेने भारतीय स्त्रियांना बंधनात जखडून टाकले होते. स्त्रियांना वेद अध्ययन,धर्मग्रंथांचे अध्ययन करण्यास बंदी घातली होती. शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. स्त्रियांना चूल आणि मूल एवढ्यापुरते मर्यादित करून टाकले होते. अशा परिस्थितीतून स्त्रीला बाहेर काढण्याचे कार्य महात्मा बसवेश्वर यांनी आपल्या अनुभव मंटपच्या माध्यमातून केले. त्यांनी धर्मामध्ये स्त्री-पुरुष भेद नाही हे स्पष्ट करून स्त्रियांना सर्वतोपरी स्वातंत्र्य देऊन स्त्री आणि पुरुष भेद नष्ट केला. पुरुषांप्रमाणे स्त्रियांना सर्व हक्क दिले. वैदिक समाजव्यवस्थेत परिवर्तन घडविण्यासाठी महात्मा बसवेश्वरांनी अनुभव मंटपाची स्थापना केली. अनुभव मंटप हे भारतातील लोकशाही पद्धतीची सुरुवात करणारी व्यवस्था ठरली. या अनुभव मंटप मध्ये 770 सदस्य असल्याचा उल्लेख आहे. या सदस्यांमध्ये अनेक जाती पंथ वर्ण व धर्माचे सदस्य होते. यात अक्कमहादेवी, मुक्तायक्का, लिंगम्मा, गंगाबिका, निलाम्बिका, कल्याणम्मा, वरदानी, दानम्मा,
पद्मावती,रेमव्वे, लक्कम्मा, इत्यादी शरणीच्या वचनावरून स्पष्ट होते.6
स्त्रिया पुरुषांसोबत विचार व्यक्त करत. महात्मा बसवेश्वर यांच्या अनुभव मंडपातून स्त्रियांना अशा प्रकारे संधी उपलब्ध करून देऊन त्यांनी समानतेचे तत्त्व निर्माण केलेली दिसून येते.

**समतेचा पुरस्कार :** लोकशाही शासन व्यवस्थेत समतेला अधिक महत्त्व असते. प्राचीन काळात ते उत्तर आधुनिक काळापर्यंत भारतीय समाजव्यवस्था ही जातीने बंदिस्त व्यवस्था होती. या समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले. यात समतेचे तत्वज्ञान मांडून महात्मा बसवेश्वरांनी समताधिष्ठित समाज व्यवस्था निर्माण करण्याचा यशस्वी प्रयोग केलेला दिसून येतो. तत्कालीन विषमतापूर्वक समाजव्यवस्थेला त्यांनी विरोध केला. समता निर्माण करण्यासाठी त्यांनी सामाजिक क्षेत्रातून कार्य करण्यास प्रारंभ केला. समतेच्या आड येणाऱ्या जातीयता,वर्णभेद , लिंगभेद यांना त्यांनी नाकारले. विषमतेच्या तत्वज्ञानाची मांडणी करणाऱ्या वेद, पुराणे, शास्त्र यांना सुद्धा त्यांनी नाकारले. तसेच वैदिक कर्मकांडावर कडाडून हल्ला केला. धार्मिक क्षेत्रात विषमता नष्ट करण्यासाठी लिंगायत धर्माची स्थापना केली.इष्टलिंग सर्वांना हातात देऊन त्यातून धार्मिक समतेचा पाया त्यांनी घातला. सर्वांना समानतेच्या तत्वांमध्ये आणले. यासोबतच आर्थिक, सामाजिक व राजकीय समतेला सुद्धा त्यांनी महत्व दिले. सर्व वंचितांना राज्यकारभाराचे प्रशिक्षण दिले. अभिव्यक्ती स्वातंत्र्याची समान संधी उपलब्ध करून देऊन त्यातून सामाजिक सुरक्षिततेची भावना वाढीस लावणारी अनुभव मंटप एक सामाजिक अभिसरण व समतेचे समीकरण निर्माण करणारी कार्यशाळा ठरली. समाज कल्याणाच्या दिशेने केलेले कार्य हे सामाजिक समता प्रस्थापित करून सामाजिक न्याय निर्माण करणारे ठरले.

**समारोप** : वंचित समाजाच्या माणसाला माणूस म्हणून जगण्याचे ज्या वैदिक व्यवस्थेने नाकारले होते. अशा व्यवस्थेत परिवर्तन घडून आणण्याचे महान कार्य महात्मा बसवेश्वरांनी केले.
त्यांच्या कार्यामुळे माणसाला माणूस म्हणून जगण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले. अनेक समाज बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वर यांनी बुरसटलेल्या समाजाला एक नवी दिशा देण्याचे कार्यआपल्या विचार व कार्यातून केले.माणसातील भेदभाव,अस्पृश्यता – स्पृश्यता ,उच्च-नीच,

स्त्री–पुरुषभेदभाव दूर करून सर्व मानवजात एक आहे.असा विचार निर्माण करून सर्वांना सामाजिक न्याय निर्माण करून सबंध मानवजातीचा विकास घडवून आणला असेच म्हणता येईल.

**संदर्भ सूची :**

*राजकीय सिद्धांत आणि विश्लेषण ,डॉ.भा.ल.भोळे,पिंपळापूरे अंड कं.पब्लिशर्स ,नागपूर,पेज क्र.१११*
*मराठी विश्वकोष ,महराष्ट्र राज्य साहित्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ,नेटपेज,ले.सुधा काळदाते ,औरंगाबाद*
*जॉन राल्स न्यायाची मुलभूत संकल्पना ,दैनिक लोकसत्ता ,दिनांक.२८ /१०/२०१३*
*बसवकालीन शरणदांपत्य,ले.मडकीशशिकलासोलापूर*
*साहित्य निर्माते बसवेश्वर ,ले.एच.तीप्पेरुद्रस्वामी ,साहित्य अकादमी,पेज क्र.२२*

## महात्मा बसवेश्वर यांचे मौलिक कार्य व संस्कृत साहित्यातील श्लोक

**डॉ. गणंजय यज्ञेश्वरराव कहाळेकर**
*संस्कृत विभाग प्रमुख, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,मुखेड*

निर्गुण, निराकार एकेश्वरवादी श्रद्धेचा पुरस्कार * १ करणारे महात्मा बसवेश्वर हे कर्नाटकातील संत, समाजसुधारक होते. महात्मा बसवेश्वर यांचा परिचय, नामाभिधान,अनुभव मंडप संस्था कार्य, ईष्टलिंगाची साधना व मूल्यसंवर्धन संदेश तसेच संस्कृत साहित्यातील आलेली काही उदाहरणे वानगीदाखल देऊन विशद करण्याचा यत्न येथे करण्यात येत आहे,

बाराव्या शतकात कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्वर-बागेवाडी या गावात ११०५ साली प्रतिष्ठित पशुपात शैव कम्मेकुलातील एका कुटुंबात बसवेश्वरांचा जन्म झाला. काहींच्या मते इंगळेश्वर (जि. विजापूर) या गावी झाला असावा. त्यांच्या जन्मकाळाविषयी मतभेद असले, तरी सामान्यतः त्यांचा जन्म वैशाख शुद्ध तृतीया (अक्षय्य तृतीयेला) झाल्याचे मानले जाते. बसवेश्वरांचे वडील मादिराज आणि आईचे नाव मादलांबिका, भावाचे नाव देवराज व बहिणीचे नाव नागम्मा होते.वयाच्या आठव्या वर्षी ज्ञान मिळविण्यासाठी ते कृष्णा व मलप्रभा या नद्यांच्या संगमावरील कुडलसंगम येथे गेले, ते पशुपात शैवांचे प्राचीन अध्ययन केंद्र होते. तेथे बसवेश्वरांनी बारा वर्षे वास्तव्य केले. कूडलसंगम येथे त्यांनी वेगवेगळ्या भाषा, धर्म, तत्त्वज्ञान इत्यादींचा अभ्यास केला. त्यांचा विवाह त्यांच्या मामाच्या मुलीशी झाला. तेव्हा ते सोलापुरातील मंगळवेढा येथे आले. तेथे ते एकतीस वर्षे राहिले. *२

प्राचीन काळापासून भगवान शिवाची उपासना होत आली आहे. नंदी हा भगवान शिवाचे वाहन आणि शिष्य. कृषिप्रधान भारतात वृषभ (बैल) हा शेतकऱ्यांच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू ठरणे स्वाभाविकच म्हटले पाहिजे. वृषभाला नंदीच्या रूपात पूजण्याची प्रथाही भारतात प्राचीन काळापासून आहे. सोमवार हा भगवान शंकराचा वार मानला गेला आहे. यादिवशी व पोळा सणास बैलांना शेतीकामाला जुंपण्यात येत नाही. शेतात राबणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता भाव ठेवून आठवड्यातून एकदा विश्रांती देण्याची परंपरा आहे.समाजात समरसता निर्माण करणाऱ्या महात्मा बसवेश्वरांना साक्षात नंदीचा अवतार मानले गेले. संस्कृतमधील "वृषभ' या शब्दाचे बसव हे कन्नड रूप. *३ . (बसव यांना लोक प्रेमाने बसवण्णा म्हणत) पुढे लोकांनी त्यांना आदराने "बसवेश्वर' हे नामाभिधान दिले.

समाजाचे ऐक्य म्हणजे येथील अध्यात्मिक शक्तींचे ऐक्य होय, हे तत्त्व बसवण्णांचे होते. भारतातील अध्यात्माचे ऐक्य साधण्यासाठीच त्यांनी "अनुभव मंडप' ही संस्था स्थापन केली. या संस्थेत प्रवेश घेण्यास कोणासही बंदी नव्हती. स्त्रियांनासुद्धा संस्थेचे सभासद होता येत होते. जातीभेदाला तर थाराही नव्हता. प्रत्येक माणसाला धार्मिक जीवन जगण्याची समान संधी मिळावी. त्या धार्मिक जीवनात जन्म, जात, व्यवसाय, स्त्री-पुरुष म्हणून भेदभाव केला जाऊ नये.

बसवण्णा - मंत्री, प्रभुदेव - तेजस्वी आध्यात्मिक नेते, सिद्धाराम - कर्मयोगी, चेन्नबसवण्णा - प्रकांड पंडित, अक्कमहादेवी - महासाध्वी, माचैया - धोबी, रामण्णा - गुराखी, मद्द्य - शेतकरी, रेम्मवे - विणकर, रामीदेव - कोतवाल, कनैया - तेली, संगण्णा - वैद्य, बसप्पा - सुतार, काकैया - चर्मकार, हरळैया - मोची असे विविध क्षेत्रांतील लोक अनुभव मंडपात सहभागी होते. *४

महात्मा बसवेश्वरांनी विविध ग्रंथांचा, ज्ञानाच्या सर्व शाखांचा अभ्यास केला होता. त्यामुळे त्यांनी संस्कृत ग्रंथातील धर्मतत्त्वे कन्नडमधून लिहिली. बसवण्णांपूर्वी कन्नड वाङ्मय फक्त पद्यस्वरूपात लिहिले गेले होते. बसवण्णांनी गद्यातून वचने लिहिण्यास सुरुवात केली, त्यामुळे कन्नड भाषेतील गद्य वाङ्मयाचा विकास झाला. कित्येक शिवशरणांनी म्हणजे शैवसंतांनी बसवण्णांचे अनुकरण केले. या वचनांचा लोकांमध्ये प्रचार केला असून वचनांच्या माध्यमातून समाजाच्या विविध बाबींवर प्रकाश टाकण्यात आला. समाजाची नैतिक व धार्मिकदृष्ट्या

रचना कशी असावी हे सांगून. प्रत्येकाने आपल्या उदरनिर्वाहाचा व्यवसाय करताना प्रामाणिक व आध्यात्मिक जीवन जगायला मार्गदर्शक ठरतील अशी तत्त्वे बसवेश्वरांनी समाजाला दिली.कर्नाटक आणि दक्षिण महाराष्ट्रातील खेड्यांतील लोकांच्या जिभेवर आजही बसवेश्वरांची वचने आरूढ झालेली दिसतात.

बसवण्णांचे समाजपोषक विचार आणि आचार याने प्रभावित होऊन चालुक्य राजाच्या दरबारात बसवण्णांना मानाचे स्थान मिळाले. सर्वसामान्यांच्या उन्नतीची कामे करण्यात बसवण्णांचा हातखंडा होता. निस्पृहता आणि कर्तृत्वाच्या बळावर बसवण्णा राज्याच्या मंत्रिपदी आरूढ झाले. सत्ता आणि वैभव, कीर्ती पायाशी लोळण घेतानाही बसवण्णा आध्यात्मिक नीतिमूल्यांपासून ढळले नाहीत. *५.

ईष्टलिंग म्हणजे समतेचे व विज्ञानाचे प्रतिक असून विश्वाचे प्रतीरूप असलेले शिवाचे प्रतिक आहे. ईष्टलिंगाची साधना करा. देहच देवालय आहे. एकत्र या. चर्चा करा. सुसंवाद साधा. स्त्रियांना समान अधिकार द्या. पंचसुतके पाहू नका. दलितांना समान संधी द्या. जातीभेद, लिंगभेद, वर्णभेद करू नका. कष्ट करा. भिक्षा मागून खाऊ नका. कायकात (काम करण्यातच) कैलास आहे, दासोह (अन्नदान) सेवा करा. पर्यावरण संरक्षण करा. दगडधोंड्यांची पूजा करू नका. अनुभवमंडपात बसा, चर्चा करा, प्रश्न-उत्तर करा, वचन साहित्य वाचा. शुभाशुभ पाहू नका. एकमेकांना भेटल्यावर शरणु-शरणार्थी म्हणत नमस्कार करा. संन्यासवादाचे उदात्तीकरण करू नका. सांसारिक जीवन आनंद व समाधानाने जगा. माणसाला माणसाप्रमाणे वागवा. पशूहत्या करू नका. मांसाहार करू नका. व्यसनाधीन बनू नका. चोरी करू नका. हत्या करू नका. रागापासून दूर राहा, खोटे बोलू नका. कुणाची घृणा करू नका. दया हाच धर्म आहे. शरणांची थट्टामस्करी करू नका. सदाचाराने वागा. चारित्र्य सांभाळा. दानधर्मापेक्षा दासोह महत्त्वाचा आहे..शिक्षण घ्या. वचन साहित्य वाचा. ज्ञानी व्हा. नैतिक बना, विवेकी बना.*६ असा संदेश महात्मा बसवेश्वरांनी दिला आहे .या संदर्भ अनुषंगाने काही संस्कृत साहित्यातील उदाहरणे येथे नमूद करण्यात येत आहेत.

दानधर्मापेक्षा दासोह महत्त्वाचा आहे म्हणजे अन्नदान महत्वाचे आहे असे महात्मा बसवेश्वरांनी म्हटले आहे. याच नैतिकमूल्यास दुजोरा देणारे संस्कृत साहित्यातील भर्तृहरिकृत 'नीतिशतकम्' या ग्रंथातील सुभाषित आहे. ते असे _

दानं भोगो नाशस्तिस्त्रो गतयो भवन्ति वित्तस्य।
यो न ददाति न भुङ्क्ते,तस्य तृतीया गतिर्भवति।।* ७

येथे सुभाषितकारांनी द्रव्याच्या गती संपण्याचे तीन मार्ग सांगितले आहेत. दान, भोग आणि नाश. जी दुसऱ्या देत नाही स्वतः उपभोग घेत नाही त्याची तिसरी गती होते. येथे असे म्हणता येईल आपल्या संपत्तीचा दान आणि उपभोग घेण्याकरिता वापर करावा. धनाच्या गतीचे मार्ग सांगताना संपत्तीचा नाश होऊ नये म्हणजे दान करावे असे वर्णिलें आहे .महात्मा बसवेश्वरांनी दानाचे महत्व वर्णन करत असताना अन्नदान करावे असा उल्लेख केलेला आहे. यास पुष्टी देणारा आणखीन एक श्लोक म्हणजे

शक्यते दुस्त्यजेऽप्यर्थे चिररात्राय जीवितुम्।
न तु भोजनमुत्सृज्य शक्यं वर्तयितुं चिरम्।।* ८

वैद्यकीय सुभाषितसंग्रहात ‘अन्न – प्रकरणम्’ या प्रकरणातील प्रस्तुत श्लोकात अन्नाचे महत्त्व विशद केले आहे. मनुष्य धनाचा त्याग करून दीर्घकाळापर्यंत जिवंत राहू शकतो पण अन्नाचा त्याग करून तो दीर्घकाळ जीवंत राहू शकत नाही. जगू शकत नाही. म्हणजेच अन्नाचे महत्व मानवी जीवनात अनमोल आहे.

महात्मा बसवेश्वरांनी नैतिक मूल्य संदेश प्रसंगी खरे बोला असे सांगितले आहे या अनुषंगाने संस्कृत साहित्यात ‘सत्यं वद।’ हे वचन आहे. हे वचन तैत्तिरीय उपनिषदातील उपदेशात्मक आहे.* ९

महात्मा बसवेश्वरांनी चारित्र्य सांभाळा असा उपदेश केलेला आहे. या अनुषंगाने भर्तृहरिकृत 'नीतिशतकम् ' याच ग्रंथातील महत्व सांगणारे श्लोक _

वह्निस्तस्य जलायते,जलनिधिः कुल्यायते तत्क्षणा-
न्मेरुः स्वल्पशिलायते,मृगपतिः सद्यः कुरुङ्गायते।

व्यालो माल्यगुणायते विषरसः पीयूषवर्षायते
यस्याङ्गेऽखिललोकवल्लभमतं शीलं समुन्मीलति।।*१०

ज्याच्या अंगी सर्व जगाला प्रिय असे "शील "(चरित्र ) विद्यमाने असते त्यास अग्नि-उदकाप्रमाणे, समुद्र - तळ्याप्रमाणे, मेरु,-लहानशा शिलेप्रमाणे,सिंह-हरणाप्रमाणे सर्प- फुलांच्या हार याप्रमाणे तसेच भयंकर विष ही अमृताप्रमाणे होत असते.एकूणच सदाचारी माणूस भयंकर परिस्थितीतही घाबरत नाही त्यासाठी सर्व सोपे असते.तसेच-

ऐश्वर्यस्य विभूषणं सुजनता, शौर्यस्य वाक्संयमो,
ज्ञानस्योपशमः, श्रुतस्य विनयो, वित्तस्य पात्रे व्ययः ।
अक्रोधस्तपसः, क्षमा प्रभवितुर्धर्मस्य निर्व्याजता,
सर्वेषामपि सर्वकारणमिदं शीलं परं भूषणम् ॥ *११

ऐश्वर्याचे आभूषण औदार्य ,शौर्याचे बडबड न करणे, ज्ञानाचे शांती, विद्येचे विनम्रता, धनाचे सत्पात्री दान, तपाचे अक्रोध, सामर्थ्याचे क्षमा आणि धर्माचे सरलता, निष्कपट ही भूषणे आहेत.परंतु या सर्वांचे मूळ कारण सदाचार हे सर्वांचेच आभूषण आहे.म्हणून चारित्र्यसंपन्न असणे आवश्यक आहे.

महात्मा बसवेश्वरांनी अनुभव मंडप संस्थेच्या कार्यातून स्त्री-पुरुष, जात,व्यवसाय हा भेदभाव न करण्याचा अनमोल संदेश दिला असून मानवी जीवनात प्रत्येक व्यक्तीने नीतिमूल्यांचे पालन करावे असा उदात्त विचार मांडलेला आहे. जसे की चारित्र्यसंपन्न असावं, सत्य बोलावे,दान करावे इत्यादी मूल्य. ही मूल्ये समाजाच्या उत्कर्षासाठी निश्चितच उपयुक्त ठरतील.

**संदर्भ :**

*https://hi-in.facebook.com › photos and https://www.facebook.com/829138893826348*
*https://mr.wikipedia.org/wiki/बसवेश्वर*
*https://vivekvichar.vkendra.org/2010/05/blog-post*
*https://vivekvichar.vkendra.org/2010/05/blog-post*
*https://vivekvichar.vkendra.org/2010/05/blog-post*
*i. https://maharashtratimes.com/maharashtra/ahmednagar-news/second-shambhu-mahatma-basaveshwar/articleshow/75375738.cms*
*ii.https://mr.wikipedia.org/wiki/बसवेश्वर*
*भर्तृहरिकृत 'नीतिशतकम्', .संपादक - ह.अ.भावे, वरदा प्रकाशन,पुणे,श्लोक क्र.३४,पृष्ठ क्र.१०६*
*वैद्यकीय सुभाषिते,प्रा.अखिलेश शर्मा,विद्याभारती प्रकाशन,लातूर,श्लोक क्र.०४ ,पृष्ठ क्र.२९*
*तैत्तिरीय उपनिषद, शिक्षावल्ली,अनुवाक ११ / https://vichaarsankalan.wordpress.com*
*i.भर्तृहरिकृत 'नीतिशतकम्', संपादक - ह.अ.भावे, वरदा प्रकाशन,पुणे, श्लोक क्र.७९ ,पृष्ठ क्र.१७१*
*ii. भर्तृहरिकृत 'नीतिशतकम्', प्रा.अखिलेश शर्मा,विद्याभारती प्रकाशन,लातूर,श्लोक क्र.१०८,पृष्ठ क्र. ४१*
*भर्तृहरिकृत 'नीतिशतकम्', संपादक - ह.अ.भावे, वरदा प्रकाशन,पुणे, श्लोक क्र.८० ,पृष्ठ क्र.१७३*

# महात्मा बसवेश्वर आणि मानवतावादी विचारधारा

**प्रा.डॉ. सौ.सुनिता सिद्रामप्पा बिरादार**
*गणित विभाग, श्री हावगीस्वामी महाविद्यालय , उदगीर, ता.उदगीर जि. लातूर*

बाराव्या शतकामध्ये महात्मा बसवेश्वर हे दिव्य पुरुष जन्माला आले होते . या महामानवाच्या कार्यकुशलतेने अनेकांच्या आयुष्यातील दुःखद प्रसंग समाप्त होऊन सुखाचे दोन घास खाण्याचे अनेक प्रसंग आपण पाहतो . या काळामध्ये बिज्जल राजाची राजवट होती . या राजाने कल्याणचे राज्य तैलपच्या राजाकडून राज्य बळकावले होते . बिज्जल राजाला सत्ता , पद , प्रतिष्ठा अधिक प्रिय होते . महात्मा बसवेश्वर हे त्यांच्या राजदरबारात अनेक विविध पदावर भूषणावह कार्य करणारे कर्तव्यपुरुष होते . भक्तीभंडारी बसवेश्वर हे सात्विक विचारधारेचे पाईक होते .

महात्मा बसवेश्वरांनी आपल्या लहानपणापासूनच अतिशय चालाख व तीक्ष्ण बुद्धिमत्तेच्या जोरावर अनेकांना आपलेसे करून घेतले होते . त्याच्या कुशाग्र बुद्धिमत्ता , शौर्य , साहस आणि परोपकाराची जाणीव अनेक बसवप्रेमींना होती . त्यांच्या प्रत्येक कार्यामध्ये शत्रूला देखील आपलेसे करून घेण्याची कला होती . ती सुद्धा वैचारिक आणि सत्याच्या आधारावरच होती . अनेकांच्या डोळ्यातील दुःखाचे अश्रू मिटवून सुखाचे क्षण वाट्याला आणण्यासाठी आटोकाट प्रयत्न करणारे परिवर्तनशील विचारधारेचे संत शिरोमणी , युगप्रवर्तक , विश्वमानवतावादी बसवेश्वर हे होते. बसवेश्वर यांनी आपल्या जीवनामध्ये अनेक असत्य , हिंसा , खोटे बोलणे , फसविणे , लुबाडणूक करणे यासारख्या वाईट गोष्टींचा पुरस्कार न करता सदैव सत्याची बाजू राखून धरली होती . सत्याच्या जोरावर त्यांना समाज शिरोधार्य मानत होता .

बसवेश्वरांच्या तत्त्वज्ञानामध्ये गुरु , लिंग , जंगमाला अधिक प्राधान्य दिल्याचे पाहायला मिळते . त्यांनी आपल्या अष्टावरणात अनेक गोष्टींचा ऊहापोह केलेला आहे . बसवेश्वर ' इष्टलिंग ' पूजेला अधिक महत्व दिले होते . भक्तांच्या गळ्यामध्ये ' इष्टलिंग ' शिवाय पूर्णत्व नाही . परंतु केवळ दिखाव्यासाठी गळ्यात ' इष्टलिंग ' बाळगणारे ढोंगी भक्त बसवेश्वरांना मान्य नव्हते . मनामध्ये शुद्ध भाव ठेवून भक्ति केल्यास सर्व कांही मनोवांछित साध्य करता येते असा दृढ विश्वास त्यांना होता . जो कोणी अंतर्मनातून प्रेरित होऊन ' इष्टलिंग ' धारण करू इच्छित होता , त्या व्यक्तीला गळ्यात लिंग धारण करण्याची परवानगी दिली जात होती . लिंग आणि अंगातील यांच्यातील सामरस या वचनातून दिसून येते -

" करस्थळी इष्टलिंग निरखत
नेत्रीं अश्रुधारा कधीं वाहतील ?
लिंगदृष्टीच प्राण होऊन कधी राहीन ?
मिलन प्राण होऊन कधी राहीन ?
माझ्या अंगविकारांचा संग सुटून
कूडलसंगमदेवा , लिंग - लिंग म्हणत. "

लिंगायत होण्यापूर्वी कोणत्याही जाती , धर्म , पंथाचा असेल तरी त्याचे सहर्ष स्वागत केले जात होते . तो व्यक्ती ' लिंगायत ' झाल्यानंतर समतेचा पाईक मानला जात होता . धर्माचे आचरण करणाऱ्या पुरुषाला शरण आणि स्त्रीला शरणी म्हणून संबोधले जात होते . स्त्री - पुरुषाच्या साह्याने बसवेश्वरांनी आपल्या वैचारिक ज्ञानपीठाची मुहूर्तमेढ रोवली होती . ज्या काळामध्ये शूद्र , महिला , दलितांची सावली देखील अस्पृश्य मानले जात होते . बसवेश्वरांनी अनेक उपेक्षित , अपमानित , पीडितांना एका छत्रछायेखाली आणून त्यांचे पुनरोत्थान केल्याचे पाहायला मिळते .

' कर्म सिद्धांत ' हे त्या काळासाठी अतिशय अनमोल भेट होती . जे आज वर्तमान काळात सुद्धा अत्यंत तंतोतंत लागू आहे . जे आजतागायत सर्वांच्या आयुष्याचे अविभाज्य अंग बनले आहे . कार्याच्या जोरावर माणूस यशाच्या शिखरावर पोहोचतो . ही साधी , सरळ विचारधारा , भावना मांडणारे थोर विचारवंत बसवेश्वर होते . कर्माशिवाय आयुष्याला अर्थ नाही . कर्म हेच माणसाला अनेक संकटातून तारणार आहे . कर्म आणि धर्म यांच्या संयोगाने माणसाचे आयुष्य पावन बनत असते . या पावित्र्याची जपणूक करण्यासाठीच बसवेश्वर शिवशरण तयार करत होते . कर्माच्या बळावरच प्रजा देखील सुंदर आयुष्याचा उपभोग घेऊ शकत होते . कर्म माणसाच्या आयुष्यातील आळस दूर करून सदविवेकी बनण्यासाठी कारणीभूत ठरत असते . माणूस म्हणून जन्माला आल्यानंतर संत संगतीतून स्वतःचा उद्धार करू शकतात , असे अतिशय सामान्य वाटणारे परंतु जीवन जगताना खरा अर्थ उलगडून सांगणारे बसवेश्वर होते .

जगाच्या इतिहासात अनेक थोर संत , महात्मे होऊन गेले . त्या सर्वांमध्ये महात्मा बसवेश्वर हे चालते बोलते समाज सुधारक होते . आयुष्यातील कित्येक अनाथ , अपंग , विधवा , परित्यक्ता या सर्वांना मायेची उब बसवेश्वर देत होते. पराकोटीला पोहचलेला अमानवीय व्यवहार सुधारण्यासाठी सर्व दृष्टीने प्रयत्न करीत होते. एकमेकांविषयी द्वेष , अपमान , तिरस्कार करणाऱ्यांना माणुसकीचा झरा निर्माण करणारे बसवेश्वर होते. ' एक ना धड भाराभर चिंध्या ' या म्हणीप्रमाणे मानव आपल्या जिवनात एकाच ईश्वरांची आराधना करण्याऐवजी बहुदेवोपासना करायला लागला होता . अशा मानवाच्या भक्तिमध्ये तो ध्येयापासून दूर जातो. सगुण साकार ईश्वराची सेवा करण्यासाठी पंडित , पुजारी , ब्राह्मण यांची परवानगी घ्यावी लागते. बसवेश्वर यांच्या सेवामार्गात कोणीही मध्यस्थी नाही . गळ्यातील ईष्टलिंग हेच सदैव सोबतीला असणार आहे .

स्त्री ही केवळ एका परिवाराला सांभाळत नसते तर ती माहेर आणि सासर या दोन्ही परिवारांचे हित लक्षात घेऊन आपले समर्पण कार्य करीत असते . या उदात्त भावनेचा अंगीकार करत बसवेश्वर यांनी सांगितले की , कोणत्या ईश्वराची भक्ती करण्यासाठी भगवे कपडे परिधान करून संन्यास घेण्याची आवश्यकता नाही . पती - पत्नीच्या सुरेख आयुष्यातून सुद्धा भक्तीचे आनंदवन निर्माण करण्याची शक्ति त्यांच्यात आहे . बसवेश्वरांच्या वैचारिक चर्चेत 70 महिला भगिनी अतिशय अभ्यासपूर्ण दृष्टिने सहभागी होत होते . स्त्रियांच्या वैचारिक प्रगल्भतेसमोर अनेक स्वार्थी लोकांचे पितळ उघडे पडलेले इतिहासात साक्ष आहे . महिलांना ' चुल आणि मूल ' याशिवाय काहीच माहीत नव्हते . अशा प्रसंगात बुद्धिमान महिलांची ओळख बसवेश्वरांच्या अनुभवमंडपात आणि वचन साहित्याच्या निर्मितीतून दिसून येते .

' अनुभवमंडप ' हे आजच्या लोकशाहीचे खरे स्वरूप होते. या ठिकाणी 770 स्त्री - पुरुष एका ठिकाणी मिळून विचारांच्या जोरावर चर्चा , विचार , विनिमय करत होते . भक्ति , संस्कृती , संस्कार , आचार-विचार पद्धती , परस्पर सहकार्य इत्यादी विषयावर अतिशय खुली चर्चा करत होते . या चर्चेच्या माध्यमाने लोकांना दररोज नवनवीन विषयांची माहिती मिळत होती . कर्मकांड , अंधश्रद्धा आणि दिखाऊपणा याला कडाडून विरोध करत सत्य व न्यायाची कास धरली जात होती . माणसाचे देह हेच त्याच्या आयुष्यातील स्वर्ग - नरक आहे . शरीराची शुद्धी आतून - बाहेरून करण्याचे अंतिम ध्येय असायला हवे हा संदेश त्यांनी दिला . माणसाच्या कर्मामुळे स्वर्ग आणि नरकाची प्राप्ती होऊ शकते . त्यासाठी इतर कुठेही तपश्चर्येला बसण्याची गरज नाही .

" वडील आमचे मादार चेन्नय्या ,
आजोबा आमचे डोहार कक्कय्या ,
चुलते आमचे चिक्कय्या पहा ,
दादा आमचे किन्नरी बोम्मय्या ,
मज का बरे तुम्ही जाणत नाही , कूडलसंगमदेवा ? "

बहुजन समाजाविषयी कळवळा असल्यामुळे बसवेश्वर शरणाना आपले आप्तस्वकी संबोधित होते . गरीब - श्रीमंताची दरी दूर करून प्रत्येकांमध्ये एकमेकांविषयी जिव्हाळा , प्रेम , स्नेह निर्माण करण्यासाठी सर्वतोपरीने प्रयत्न केले जात होते . माणसाचे विचार शुद्ध असतील तर आचार सुद्धा शुद्ध व्हायला वेळ लागत नाही . प्रत्येक व्यक्ती बसव विचाराने प्रेरित होऊन या कार्यात आपले योगदान देत होता . त्यांच्या आहुतीतून अनेकांच्या आयुष्यात सोनेरी क्षण पहायला मिळत होते . बसवेश्वर हे संत , विचारवंत , ज्ञानवंत , प्रतिभावंत होते . प्रत्येकाच्या संकटाला धावून जाणारे खरे समाजसेवक होते . त्यांच्यातील समाजाविषयी असणारी तळमळ त्यांच्या प्रत्येक वचनातून आपल्याला दिसून येते . ज्ञान साधना आणि योग साधना हे दोन प्रमुख शास्त्र त्यांच्या भक्तिमार्गातील नाण्याच्या दोन बाजू होते . या सत्याच्या जोरावर त्यांनी आपले कार्य अतिशय गरुडाप्रमाणे विशाल भरारी घेणारे बनविले . बसवेश्वरांच्या विचारांचा प्रभाव केवळ कर्नाटक राज्यातील कल्याण क्षेत्रापुरता मर्यादित नव्हता तर सबंध अखंड भारतातील विविध क्षेत्रात सर्वदूर पोहोचलेला होता . त्यामुळेच कश्मीर ते कन्याकुमारी येथिल अनेक राजे , महाराजे , सामान्य जनता या कार्यामध्ये सहभागी झाली होती . कल्याण राज्यामध्ये येणाऱ्या प्रत्येक शरणांचे स्वागत मनापासून केले जात होते . बसवेश्वरांची मोठी बहीण अक्का नागम्मा , पत्नी गंगांबिका व निलांबिका यांनी मिळून दासोह करीत होते . त्यांच्या अंगी सेवाभाव रुजलेला होता . बसवेश्वरांच्या विचारांचा प्रभाव या सर्वांवर अतिशय सखोल झाला होता .

कन्नड भाषेतील वचन हे जगाला प्रेरणा देणारे मोती आहेत . या प्रत्येक मोतीला हिऱ्या पेक्षाही अधिक किंमत आहे . बसवेश्वर यांच्या काळात सुद्धा त्यांचे विरोधक होते . ते सदैव त्यांच्या कार्यात अनेक बाधा व अडचणी आणत होते . परंतु त्यांच्या या विरोधाला अतिशय सडेतोड उत्तर देत होते . एकदा बसवेश्वर कोषाध्यक्ष असताना बिज्जल राजाच्या मनात शंका उपस्थित केले की , बसवेश्वर हे आपल्या राज्यातील धन हे स्वतःच्या कार्यासाठी वापरत आहेत . त्यावेळी बिज्जल राजा अचानक जाऊन त्या ठिकाणी तपासणी केली . राजाला आवश्यक असलेले प्रत्येक हिशोब अतिशय काटेकोरपणे , सुटसुटीत व नियोजनबद्ध पद्धतीने आखलेले होते . बसवेश्वर आपल्या परीक्षेत यशस्वी झाले होते . अशाप्रकारे अनेक प्रसंग त्यांच्या जीवनात निर्माण झाले होते . या साऱ्या प्रसंगामुळे त्यांच्या चरित्राला व चारित्र्याला झळाळी मिळत होती . या ठीकाणी त्यांच्या कार्याची मांडणी करीत असताना कांही प्रमुख बिंदूवर प्रकाश टाकण्यात आले . बसवेश्वर हे धगधगणारा निखारा आणि चंदनाची शीतल देणारे मुलायम लेप आहेत . ज्यांना शब्दात व्यक्त करणे अतिशय कठीण आहे. ते फक्त आणि फक्त अनुभव घेतल्याशिवाय कळणार नाही.

## महात्मा बसवेश्वर आणि तत्वज्ञान

**प्रा. डॉ. राजेश्वर वैजनाथराव पाटील**
*क्रीडा संचालक व प्रमुख, श्री हावगीस्वामी महाविद्यालय , उदगीर. ता.उदगीर जि.लातूर*

भारत देश हा वैचारिक देश आहे . या देशाच्या इतिहासामध्ये प्राचीन काळापासून आजतागायत संत , महात्मे , विचारवंत , प्रज्ञावंतांचा जन्म झाला आहे . त्यांनी आपापल्या कालखंडामध्ये स्वतःच्या आचार व विचारांची एक स्वतंत्र परंपरा निर्माण केली. या वैचारिक विचारांचे वारसदार होण्याचे भाग्य या देशाला लाभले. जगाच्या पाठीवर हा देश प्रेरणा देणारा राष्ट्र म्हणून नावलौकिक मिळविलेला आहे . बुद्ध , बसवेश्वर , कबीर , नामदेव , तुकाराम , छत्रपती शिवाजी महाराज , ज्योतिबा फुले , सावित्रीबाई फुले , छत्रपती शाहू महाराज , डॉ. बाबासाहेब आंबेडकर , अण्णाभाऊ साठे इत्यादी थोर संत , विचारवंताचे योगदान वाखाणण्याजोगे आहे . त्यांनी आपल्या वैचारिक प्रगल्भतेला आचरणाची जोड दिलेली होती. त्यामुळे जनसामान्यांच्या हृदयात आजपर्यंत घर करून आहेत. माणसाच्या मनामध्ये जागा निर्माण करणे जितके सोपे कार्य आहे , त्याहीपेक्षा ते अखंडपणे टिकून ठेवणे अत्यंत कठीण कार्य आहे . जगतज्योती , विश्ववंदनीय , थोर संत , मानवतावादी विचारवंत महात्मा बसवेश्वर हे मध्ययुगीन काळामध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे तेजपुंज व्यक्तिमत्व आहेत .

सामाजिक क्रांतीचे आद्यप्रणेते बसवेश्वर आहेत. त्यांनी स्वतः समाजात जगत असताना येणाऱ्या अडचणीवर समर्थपणे मात करून सुंदर मार्ग उपलब्ध करून दिला . बसवेश्वरांच्या जीवनावर प्रकाश टाकत असताना अनेक गोष्टींचा उहापोह आपल्याला याठिकाणी करता येण्यासारखा आहे. परंतु वेळेची आणि शब्द संख्येची मर्यादा ओळखून त्यांच्या तत्वज्ञानाचा सार या लेखामध्ये मांडण्याचा खटाटोप करत आहे . जगाच्या इतिहासात अनेक क्रांत्या वेळोवेळी घडलेले आहेत . त्यामध्ये फ्रेंचची राज्यक्रांती , अमेरिका , इंग्लंड , रशिया , चीन , जपान , जर्मनी इत्यादी राष्ट्रांमध्ये अनेक क्रांत्या ह्या साम , दाम , दंड , भेद या नीतीचा वापर करून रक्तरंजित करण्यात आले . परंतु भारताच्या इतिहासात एकमेवाद्वितीय रक्तरंजित क्रांती न होता अतिशय शांत पद्धतीने ' शरण क्रांती ' झालेली पाहायला मिळते . ही क्रांती अहिंसा , सत्य , स्वातंत्र्य , बंधुता , न्याय , कर्मवाद , मानवतावाद , गुरु, लिंग , जंगम , दासोह या तत्वावर आधारित होती .

बाराव्या शतकाच्या कालखंडातील राजा बिज्जल यांच्या दरबारात खाजगी कारकुन पदाच्या कार्यापासून ते प्रधान पदापर्यंत सामर्थ्याच्या बळावर बसवेश्वर कार्य करीत होते . हे यश त्यांनी सत्य व कर्माच्या जोरावर साध्य केले होते . बिज्जल राजाने राजदरबारातील अनेक मातब्बर व्यक्तिंना डावळून बसवेश्वरांना ही संधी उपलब्ध करून दिले होते . यामुळे दरबारातील एक गट बसवेश्वरावर नाराज होता . बसवेश्वरांच्या शरण संस्कृतीचा विकास रोखण्यासाठी ही व्यक्ती अतोनात प्रयत्न करीत होती . या कार्यामध्ये त्यांना लवकर यश मिळणे कठीण होते . म्हणूनच बिज्जल राजाच्या वधानंतर पाखंडी ब्राह्मणवादी लोकांनी मिळून बसवेश्वरावर राजाच्या मृत्यूचा आरोप करण्यात आला होता. मधुवरस व हरळय्या यांच्या आंतरजातीय विवाहाची ठिणगी सुध्दा कारण ठरली होती. याचे पर्यावसान अखेर बसवेश्वरांना कल्याण राज्य सोडून जाण्यास सांगण्यात आले . बसवेश्वर कल्याण राज्याची सीमा ओलांडून गेल्यानंतर अनेक शरणांवर अनन्वीत अन्याय - अत्याचार केले गेले . अशा परिस्थितीमध्ये सुद्धा शरणांनी आपले मनोधैर्य आणि शौर्य पणाला लावून वचन साहित्याचे संवर्धन व संरक्षण करण्याची जबाबदारी उचलली होती . या कार्यासाठी अनेक जणांना आपले प्राण सुद्धा गमवावे लागले होते. आज आपण जे वचन साहित्य अभ्यासत आहोत . हे त्या वीर यौध्यांचे त्याग व बलिदान आहे . ज्या व्यक्तींच्या गळ्यात इष्टलिंग आणि कपाळावर विभूती दिसत होती त्यांना मरणयातना किंबहुना मृत्यू देखील दिले जात होते . अशा काळामध्ये अक्का नागम्मा , गंगांबिका , चन्नबसवेश्वर , सिद्धरामेश्वर , अल्लमप्रभु इत्यादी शरणांनी वचन साहित्य सुरक्षित स्थळी पोहचविले होते .

कार्स मार्क्सच्या " Work is Workship " या तत्वापूर्वी बसवेश्वरांनी " कायक वे कैलास " हे कर्म सिद्धांत व तत्वज्ञान जगासमोर मांडले . या विचारांमध्ये कर्माच्या शुद्धीने आचरण , मन आणि जीवनशैलीमध्ये कसा बदल घडत असतो . ते अतिशय मार्मिक शब्दात जनसामान्याला कळेल अशा कन्नड भाषेत विचार व्यक्त केले . त्यांच्या विचारांचा प्रभाव अनेक शरण - शरणी यांच्या वागण्या , बोलण्या आणि विचारशैलीतून दिसून येतो . त्यावेळी जगणारा प्रत्येक व्यक्ती हा सामाजिक बांधिलकी ओळखून अतिशय निस्वार्थ भावनेने जीवन जगत होता . स्त्री-पुरुष यांच्यामधील भेद समाप्त होऊन समन्वयाच्या भावनेने कार्य करताना दिसून येते . संसाराला आवश्यक तितकेच धन संचय करण्याविषयी मोलाचा संदेश बसवेश्वरांनी दिलेला होता . प्रत्येकाला स्वतंत्र जीवन जगण्याचा अधिकार आहे . मात्र या स्वातंत्र्याचा स्वैराचार होऊन जीवन जगण्यास बसवेश्वरांनी विरोध केला .

अनुभवमंडप ही जगाच्या इतिहासातील सर्वप्रथम संसद बसवेश्वरांनी निर्माण केली . याठिकाणी शरण - शरणी आपल्या कर्म , आचरण , व्यवहार , बुध्दीमत्तेच्या जोरावर स्थान निश्चित केले होते . गरीब-श्रीमंत , स्त्री-पुरुष असा भेदभाव याठिकाणी नव्हता . अनुभवमंडपाचे अध्यक्षपद हे शूद्र समजल्या जाणाऱ्या समाजातील अल्लमप्रभू यांना दिले होते . हे पद वैचारिक प्रगल्भतेच्या आधारावर अवलंबून होते . अल्लमप्रभू यांच्याकडे वैचारिक श्रीमंती आणि उंचीमुळे हे पद सोपविण्यात आले होते . दिवसभरात केलेले कार्य ( कायक ) आणि त्यांचे अनुभव अनुभवमंडपात विचार विनिमयासाठी ठेवले जात होते . या विचारमंथनातून अनेकांना नवनवीन अनुभव व शिक्षण मिळत होते .

जगाच्या इतिहासात सर्वप्रथम आंतरजातीय विवाह हे बसवेश्वर यांच्या प्रेरणेतून आणि शरण - शरणी यांच्या चिंतनातून झालेला होता . या आंतरजातीय विवाहाचे पडसाद रक्तरंजित स्वरूप धारण करण्यामध्ये झाले . बसवेश्वर व त्यांचे अनुयायी हे अतिशय शांतीचा मार्ग अवलंबून करून बसव तत्वांचे संवर्धन , प्रचार - प्रसार करण्यावर अधिक भर दिलेला होता . यावेळी पाखंडी समाजातील धर्म भ्रष्ट लोकांनी स्वतःची पोळी भाजण्यासाठी इतरांच्या माथी मारून आपले हित साध्य करण्यासाठी सर्वतोपरीने प्रयत्न चालवले होते . बिज्जल राजासुद्धा बसवेश्वरांच्या वैचारिक निती , नैतिकतेला मानत होते . एका राजाला काही गोष्टी मनात असले तरी दाखविता येत नाही . हेच बिज्जल राजाच्या बाबतीत झाले होते . ज्या राजाचा इतिहास बसवेश्वरांमुळे सुवर्णाक्षरांनी लिहिला जात होता . तेच क्रुर अंधारात काळ्या अक्षराने लिहिला गेला . या गोष्टीला कारणीभूत स्वतः बिज्जल राजा व पाखंडी विचारधारेचे व्यक्ति होते . महात्मा बसवेश्वर यांचे विचार आणि तत्वज्ञान हे नेहमी सत्याच्या आधारावर अवलंबून होते . याचे मूर्तिमंत उदाहरण त्यांचे जीवन व कार्य आहे.

बसवेश्वर यांनी आपल्या वचन साहित्यातून स्वर्ग ,नरक , देव , राक्षस , सत्य , असत्य , आचार , विचार , भक्ती , पूजा , भाव , प्रपंच , कायक , दासोह , प्रेम , दया , क्षमा , शील , शांती , समता , विषमता , अंतरंग , बहिरंग , देह हेच देवालय , शूद्र , भेदभाव , यज्ञ , यात्रा , स्पृश्य , अस्पृश्य , धर्म , कनिष्ठ , श्रेष्ठ इत्यादी तत्वज्ञानाचा पाया अतिशय मजबूत व सामर्थ्यशाली विशद केले . ज्याचे प्रामुख्याने स्वरूप पाहता येते . मानवाच्या मनातील विचारांची शुद्धी या वाचनातून दिसून येते -

" चोरी करू नये , करू नये हत्या
बोलू नये मिथ्या , करू नये तिरस्कार
नये निंदा , करू नये आत्मस्तुती
होऊ नये क्रोधी , हीच अंतरंग शुद्धी ,
हिच बहिरंग शुद्धी
कुडलसंगमदेवाला प्रसन्न करण्याची पद्धती । "

वरील वचनाच्या अतिशय समर्पक भावनेतून विचार , आचारातून शुद्ध भावना निर्माण करुन आपल्या मनातील ईश्वराला प्रसन्न करण्याचा अतिशय सोपा मार्ग याठिकाणी सांगितलेला आहे. चोरी आणि हत्या हे माणसावर लागणारे सर्वात मोठे कलंक आहेत . या लांछनापासून वाचण्यासाठी मोलाचा सल्ला या वचनातून देण्यात आला आहे

. समाजातल्या इतरांची निंदा नालस्ती करून स्वतःची उन्नती करण्याऐवजी अधोगतिला कारणीभूत ठरू शकतो . यशाच्या शिखरावर जाताना आत्मस्तुती करण्यापासून सावध असायला हवे . शांत , संयमी व समाधान स्वभावाने अंतरंग आणि बहिरंग शुद्धीच्या आधारावर ईश्वराला प्राप्त करू शकतो . हे अतिशय मार्मिक चिंतन बसवेश्वर यांच्या अनेक वचनातून दिसून येतो .

समाजात जगत असताना एकमेकांबद्दल आपुलकी निर्माण करण्याविषयी विचार या वचनाच्या माध्यमाने अतिशय सारगर्भित भाव प्रकट होताना दिसत आहेत -

" हा कुणाचा , हा कुणाचा
ऐसे नच वदवावे
हा आमुचा , हा आमचा
ऐसेचि वदवावे
कुडलसंगमदेवाच्या घरचा ,
पुत्रचि वदवावे । "

परक्यांना सुद्धा आपले मानण्याची थोर , विशाल अशी संस्कृती लिंगायत व शरणांची आहे . अठरापगड जातीच्या लोकांना पूर्वाश्रमीचा धर्म त्यागून किंवा त्याच धर्मात असताना सुद्धा इष्टलिंगाची मनोभावे पूजा , अर्चना करून आपल्या जीवनाला धन्यता , संधी बसवेश्वरांनी उपलब्ध करून दिलेली आहे . जीवन आनंदमय बनण्याचा अतिशय सरळ , सोपा मार्ग सांगितलेला आहे . माणसांमध्ये आपसातील मतभेद विसरून आपुलकीने जवळीकता साधता येते . आपुलकीचे नाते अतिशय दृढ विश्वासाचे निर्माण करता येते . असे तत्वज्ञान बसवेश्वरांच्या अनेक वचनातून पाहायला मिळते . बसवेश्वरांच्या क्रांतीची मशाल ही लोकांच्या मनातील अंधकार दूर करून प्रकाशाची वाट दाखवणारी आहे . वाटचालीच्या राजमार्गातून जात असताना अनेक पशु , पक्षी , प्राणी यांना सुद्धा आपले मानण्याची संस्कृती आणि शिकवण बसवेश्वरांच्या तत्वज्ञानातून आपल्याला पहायला मिळते. या थोर विभूतीला भारत देश आणि विदेशात सुद्धा मानवंदना दिली जाते हे विशेष आहे . याचेच उद्हारण म्हणजे इंग्लंड मध्ये उभारलेला बसवेश्वरांचा पुतळा व तत्व प्रचार प्रसार करण्याचे कार्य आहे .

---

## महात्मा बसवेश्वरांचा कायक सिद्धांत

**डॉ. शंकर हणमंतराव कल्याणे**
*मराठी विभागप्रमुख, मास्टर दीनानाथ मंगेशकर, महाविद्यालय, औराद शहा., ता. निलंगा, जि. लातूर.*

---

लिंगायत धर्मसंस्थापक महात्मा बसवेश्वर यांचा जन्म इ.स. 1105 मध्ये कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील बागेवाडी या गावातील शैव कम्मेकुळात मादिराज आणि मादलाम्बिका या दाम्पत्याच्या पोटी झाला. बसवेश्वर हे बालपणापासूनच बंडखोर व विद्रोही स्वरूपाचे होते. त्यांच्या मनात तत्कालीन समाजातील जातिभेद, विषमता, अज्ञान, स्त्रीदास्य याविषयी चीड होती. म्हणजे विषमताधिष्ठित व्यवस्थेला त्यांचा विरोध होता. कर्नाटकातील ज्ञानभूमी असलेल्या बागलकोट जिल्ह्यातील हुणगुंद तालुक्यातील कुडलसंगमस्थित गुरुकुलात सर्व धर्मशास्त्राचे शिक्षण घेतलेल्या बसवेश्वरांना सततच्या चिंतनातून नवी वैचारिक दिशा मिळाली.

गुरुकुलात शिक्षण घेतल्यानंतर मामा बलदेव यांच्या विनंतीवरून ते महाराष्ट्रातील मंगळवेढा येथे आले. राजा बिज्जळाच्या दरबारात कोषागार विभागात प्रथमच हिशेबनीस म्हणून कार्यरत झाले. प्रशासनात कार्य करण्याची संधी मिळाली म्हणून त्यांनी त्या संधीचे सोने केले. या प्रशासकीय कार्याबरोबरच त्यांनी तत्कालीन समाजातील विषमता, जातिभेद, अस्पृश्यता, बहुदेवतावाद, मंदिरसंस्कृतीचे स्तोम, अंधश्रद्धा इत्यादी अनिष्ट प्रथा–परंपरांच्या विरोधात बंड पुकारले. अशाप्रकारे महात्मा बसवेश्वरांनी सामाजिक सुधारणेचा प्रारंभ मंगळवेढ्यातून केला. परिणामी, मंगळवेढा ही त्यांची क्रांतिभूमी ठरली.

महात्मा बसवेश्वरांनी समाजातील प्रश्न सोडविण्यासाठी शरण-शरणींना एकत्र आणून सामूहिक चर्चा आणि संवाद करण्यावर भर दिला. त्यातूनच 'अनुभव मंटप' अस्तित्वात आले. अनुभव मंटप म्हणजे आजच्या संसदेचे मूळ प्रारूप होते, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. या अनुभव मंटपाच्या माध्यमातून त्यांनी बहुजन समाजातील सर्व शरणांना एकत्र आणून त्यांची प्रज्ञा आणि प्रतिभा जागृत केली. प्रत्येकास विचारस्वातंत्र्य दिले. परिणामी, बहुजन समाजातील 770 शरण–शरणी अनुभव मंटपचे सभासद झाले. विशेष म्हणजे हे सर्व सभासद नानाविध जातिधर्मातील होते. अनुभव मंटपाच्या माध्यमातून अनेक वचनकार लिहिते झाले. 'वचनसाहित्य' हे कन्नड भाषेतील सामान्य लोकांचे साहित्य आहे. यासंदर्भात इंद्रजित भालेराव लिहितात – "वचनसाहित्य म्हणजे लोकांनी निर्माण केलेले लोकसाहित्यच होते."1 शरण–शरणी नित्याचा कायक करून उर्वरित वेळेत वचने लिहीत असत. या वचनाची व्याख्या करताना प्रा. भीमराव पाटील लिहितात – "लोकांनी लोकभाषेत, लोकहितासाठी, लोकांमध्ये राहून चर्चा करून लिहिलेले साहित्य म्हणजे वचन साहित्य."2

### 'कायकवे कैलास' सिद्धांत

महात्मा बसवेश्वरांनी 'कायकवे कैलास' हे जीवनमूल्य तत्कालीन समाजाला देऊन श्रमप्रतिष्ठेचा गौरव केला आहे. कायक म्हणजे स्वकष्टावर जगण्यासाठी समर्पित भावनेने केलेले कोणतेही कार्य. यासंदर्भात डॉ. दे. जवरेगौड लिहितात– "केवळ क्रिया अथवा शारीरिक श्रम म्हणजे कायक नव्हे, तर बाह्य जग विसरून एकाग्रतेने, श्रद्धा, निष्ठेने आपल्या कामात तल्लीन होऊन, त्यांच्यात स्वत:स झोकून देऊन आपली आत्मशक्ती, देहशक्ती, सर्वस्व एकवटून समर्पित भावनेने ते कार्य पूर्ण करणे म्हणजे कायक."3 याचा अर्थ कायकच कैलास मानून आपण जे नित्य कर्तव्यकर्म करतो, तेथेच ईश्वर आणि त्यातच कैलास सामावलेला आहे. कायक सोडून ईश्वराच्या शोधात अन्यत्र भटकण्याची आवश्यकता नाही, हा 'कायकवे कैलास'चा सिद्धांत आहे.

श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त झाल्यामुळे कोणतेही कायक हे श्रेष्ठ वा कनिष्ठ नाही. परिणामी, व्यवसायावरून केला जाणारा भेदभाव नष्ट झाला. दुसऱ्याच्या श्रमावर, कष्टावर जगणे पाप समजले जात होते. प्रत्येकांनी आपले कर्तव्यकर्म निष्ठेने आणि प्रामाणिकपणे केले तर मनाला शांती आणि समाधान मिळते. दुसऱ्यांनी

देऊ केलेल्या मिष्टान्नापेक्षा आपल्या घामाची, कष्टाची भाकरच महाप्रसाद आहे, हा श्रमसिद्धांत म. बसवेश्वरांनी जगाला दिला.

कृषिसंस्कृतीमध्ये या श्रमसंस्कृतीला अत्यंत मानाचे स्थान आहे. भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. शेती हा येथील लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. येथील शेतकरी, कष्टकरी माणूस हा रात्रंदिवस मेहनत करतो, काबाडकष्ट करतो; परंतु घाम गाळणाऱ्या या माणसाला समाजात मान-सन्मान, प्रतिष्ठा नाही. त्याची स्वतंत्र ओळख नाही. महात्मा बसवेश्वरांनी मात्र अशा श्रमकऱ्यांना केवळ महत्त्वच दिले नाही तर त्यांना प्रतिष्ठा मिळवून दिली आहे, त्यांचा गौरव केला आहे. श्रमप्रतिष्ठेचा पुरस्कार करताना ते वचनात म्हणतात –

"ज्याने आपल्या घामाने ही काळी माती भिजवली
कष्ट उपसलेत पोटासाठी आयुष्यभर,
अखंड श्रमाने ज्याने आपला देह राबविला
कष्ट उपसले पोटासाठी एकदिलाने –
ज्याने आपले तन, मन श्रमपूर्वक झिजविले,
श्रमाची पूजा करून ज्याने शिवाची पूजा केली
श्रमिकांच्या झोपडीला जो कैलास मानतो
ज्याची वाणी तशी करणी हे कूडलसंगमदेवा,
तोच जगद्‌गुरू झाला."4

शेतकरी तन आणि मनाने अहोरात्र कष्ट करून, घाम गाळून शेती पिकवितो आणि दुसऱ्याच्या अन्नाची व्यवस्था करतो. म्हणून तोच आपला तारणहार आहे. अशा कायकभक्ताला म. बसवेश्वरांनी जगद्‌गुरूची उपाधी दिली आहे.

आपल्या उदरनिर्वाहासाठी प्रत्येकाने श्रम केलेच पाहिजे. मग ते बौद्धिक असो की शारीरिक असो. तो राजा असो की रंक असो. कायक करणे हे प्रत्येकाचे नैतिक कर्तव्य ठरते.

"ह्या दोन्ही हातांनी परिश्रम तू करी ।
मिळेल भाकरी सर्वालागी ।
मोळिगे मारय्या राजा असुनि थोर ।
श्रम भरपूर केले त्याने, कूडलसंगमदेवा ।
कायक जो करील ।
तयाला तारील देव माझा ॥"5

अनुभव मंटपाचा सदस्य झाल्यानंतर सर्वांना कायक करणे बंधनकारक होते. मोळिगे मारय्या जो काश्मीरचा राजा होता तो कल्याणला आल्यानंतर इंधनाचे लाकूड विकण्याचे कायक करतो. श्रमपूजेलाच शिवपूजा मानून कष्ट करणाऱ्या अशा कायकभक्ताला माझा परमेश्वर तारणार आहे, हा कायकविचार वरील वचनातून साकार झाला आहे. कायक बंधनकारक असल्यामुळे ऐतखाऊवृत्तीला प्रतिबंध बसून प्रत्येक जण स्वावलंबी होतो. आज समाजाला भेडसावणाऱ्या भूकबळी, भिक्षावृत्ती, बेरोजगारी, आत्महत्या आदी समस्यांचे निवारण या कायकविचाराने करून क्रियाशील, श्रमशील समाज निर्माण करता येतो, हा सुखी आणि समृद्ध जीवनाचा मूलमंत्र म. बसवेश्वरांनी बाराव्या शतकात दिला.

तत्कालीन समाजात कोणताही उद्योगधंदा किंवा व्यवसाय न करता देवाधर्माच्या नावाखाली जगणाऱ्या पुरोहित वर्गाचे वर्चस्व मोठ्या प्रमाणात होते. अशा घाम न गाळणाऱ्या, कोणतेही श्रम न करणाऱ्या ऐतखाऊ वर्गाला श्रमाचे महत्त्व पटवून देताना म. बसवेश्वर म्हणतात –

"देव माझ्या बरोबर, मला कायकाची काय गरज ?
जर तू म्हणत असशील, तर तुला आहे शपथ

कायक ना उच्च, कायक ना नीच
कायक सर्व एक समान, हे कूडलसंगमदेवा."6

'श्रम हाच स्वर्ग' या वैश्विक मूल्याची मांडणी करताना म. बसवेश्वरांनी व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य दिल्यामुळे प्रत्येकजण आपआपल्या परीने व्यवसाय निवडत होते. परिणामी, कायकावरून केला जाणारा भेदभाव नाहीसा झाला. सर्व श्रमजीवी समान असून सर्व व्यवसायांना त्यांनी समान प्रतिष्ठा मिळवून दिली.

शिक्षणाला कायकाची जोड म्हणून आज विद्यापीठ व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये 'कमवा व शिका' आणि 'राष्ट्रीय सेवा योजने'च्या माध्यमातून श्रमसंस्कृती रूजवली जात आहे. ही अत्यंत महत्त्वाची बाब असून राष्ट्रउभारणीत या कृतिशील, संस्कारशील पिढीचे योगदान मोलाचे राहणार आहे.

आजचे युग हे माहिती आणि तंत्रज्ञानाचे युग म्हणून ओळखले जाते. या तंत्रसंस्कृतीमुळे भौतिक सुख-सोयींमध्ये प्रचंड वाढ झाली. त्यात श्रम करणे, कष्ट करणे कमी झाले. वाहनांची संख्या वाढल्याने माणूस चालणे–फिरणे विसरून गेला आहे. धावपळीच्या या युगात यंत्रवत जीवन जगणारा हा माणूस स्वत:ला इतके गुंतवून ठेवला आहे की, आपल्या आरोग्याची काळजी घेण्याकरिता त्याच्याकडे थोडादेखील वेळ शिल्लक नाही. श्रमाची कामे न करण्याचा परिणाम त्याच्या अनेकविध रोगांवर, आजारपणांवर झाल्याचे दिसून येते. जो घाम गाळतो, कष्ट करतो तोच सुदृढ आणि निरोगी जीवन जगत असल्याचे चित्र अलिकडे पहावयास मिळते. म्हणून आज एकविसाव्या शतकातही म. बसवेश्वरांच्या कायकविचाराची अत्यंत गरज आहे.

**संदर्भग्रंथ:**

*भालेराव, इंद्रजित : 'शेतीचे वचन : शरणांचे कृषिचिंतन', अंतर्भूत : अक्षरगाथा, जाधव मा. मा. (संपा.), बळीवंश प्रकाशन, नांदेड, जुलै– ऑगस्ट– सप्टेंबर 2017, पृ. 50.*
*पाटील, प्रा. भीमराव : 'महात्मा बसवण्णा : चरित्र, त्यांची तत्त्वे आणि समाज', शरण साहित्य मंडळ, लातूर, प्रथमावृत्ती, 2014, पृ.19*
*जेवरेगौडा, डॉ. दे., मडकी, शशिकला रा. : 'म. बसवेश्वर– डॉ. आंबेडकर', महाराष्ट्र बसव परिषद, भालकी (जि. बिदर, कर्नाटक) चतुर्थ आवृत्ती 2013, पृ.98*
*मोगलेवार, डॉ. सुधाकरः 'बसवेश्वरांच्या वचनातील तत्त्वमिमांसा', अंतर्भूतः 'बसवेश्वरी वचन साहित्य', (संपा. प्रा. विजयकुमार करजकर व प्रा. राजशेखर सोलापुरे), प्रथमावृत्ती 2007, पृ.83.*
*करजकर, प्रा. विजयकुमार : 'वचन साहित्य : अक्षर साहित्य', अंतर्भूतः 'बसवेश्वरी वचन साहित्य', उ.नि., पृ.146.*
*कराळे, डॉ. शोभाः 'बसव वचन साहित्यः स्वरूप व संकल्पना', अंतर्भूतः 'बसवेश्वरी वचन साहित्य', उ.नि., पृ.94*

# महात्मा बसवेश्वर यांच्या कार्यांचा एक अभ्यास

**प्रा. गजानन आनंदराव गाडले**
*गणित विभाग, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड, ता. मुखेड जि.नांदेड*

**प्रस्तावना :**

विश्वज्योती महात्मा बसवण्णांचा जन्म म्हणजे विश्वातील एक विस्मयकारी घटना विश्वचैतनांचा पुर्णावतार म्हणता येईल. पददलितांच्या उत्थानासाठी,सर्वसमानतेसाठी दुःख दारिद्रय अज्ञान, मूढता यांचा समूळ नाश करण्यासाठी 12 व्या शतकात त्यांच्या कार्यरूपाने घडवुन आणलेली समग्र क्रांती अप्रतिम म्हणावी लागेल. कन्नडभूमीवर पहिले समाजोधार्मिक आंदोलन बाराव्या शतकात चालले, त्या आंदोलनाचे नायक व्यक्ती म्हणुन बसवण्णा होते. 12 व्या शतकामध्ये भारतीय समाज विशेषकरुन दक्षिण भारतीय समाज हा अनेक परंपरा, रुढी, भेदभाव, अंधश्रधा, विषमता, कर्मकांड, स्त्री दास्यत्व जातीयता इत्यादींनी त्रस्त झालेला मरगळलेला होता. अशा परिस्थीतीत त्या काळात नवचैतन्य निर्माण करण्याचे करण्याचे काम किंवा धाडस हे महात्मा बस्वेश्वरांनी केले. मान, अपमान, कष्ट, टिका सहन करीत त्यांनी प्रस्थपिता विरूध्द मोठा संघर्ष उभा केला.

जागतिक संस्कृतिला श्रेष्ठत्व मिळवून देणारे म्हणजेच आपल्या व्यक्तिमत्वाचे उदात्तीकरण साधलेले ते महापुरुष आणि आपल्या भोवतालच्या परिसराचे उदात्तीकरण साधणारे ते युगपुरुष होते. युगपुरुष हे सामाजिक , धार्मिक, साहित्यीक अशा जीवनाच्या कोणत्यातरी एक क्षेत्रास नवे वळण देतात परंतु बसवण्णानी अशा सर्वच क्षेत्रामध्ये नवे वळण दिल्याकारणाने ते एका क्षेत्रातील युगपुरुष न म्हणविता जीवनाच्या सर्वच क्षेत्रातील युगपुरुष म्हटले जातात, त्यामुळे त्यांना जगाने पाहिलेला एक अपुर्व "समग्र युगपुरुष"म्हणून ओळखने क्रमप्राप्त ठरते.

बसवपुर्व युग म्हणजे, कर्नाटकच्या इतिहासातील वैभवपतनाचा काळ होता. त्याकाळी राजसत्ता, मतसंप्रदाय सत्ता, पुरुषसत्ता इत्यादी हे समाजाचे नियंत्रण करणारे शक्ती होते. त्यापैकी राजसत्तेच्या पोषणासाठी युद्धात भाग घ्यावयाचा, राबुन कर भरायची अशी तत्कालीन प्रजेची स्थिती होती. मतसंप्रदाय सत्तेच्या नावाखाली 'शिष्टपद' (अभिजन) आणि 'जानपर' (बहुजन) धर्माचे पुढारी भक्तांचे शोषण करीत होते.याच प्रकारे पुरुषसत्ता ही स्त्री वर्गाला पायदळी तुडवीत होती. परिणामी समाजात राजवर्ग-प्रजावर्ग, पुरोहितवर्ग-भक्तवर्ग, पुरूषवर्ण-स्त्रीवर्ग अशा प्रकारच्या फुटीन डोके वर काढल्याने एक वर्ग दुसऱ्या वर्गाचे शोषण करीत असताना जीवनव्यवस्थेचा समतोल ढासळला होता .अशा अन्यायी परिस्थितीच्या गर्भातून जन्म घेऊन,सामाजिक ,समतोलनासाठी संघर्ष केला, तो बसवण्णानी.

**महात्मा बसवेश्वरांचा जन्म :**

भारतीय कालगणनेनुसार वैशाख शुद्ध अक्षय तृतीयेचा दिवस हा "बसव जन्मदिन" म्हणून साजरा केला जातो. म. बसवेश्वर यांच्या जन्मवर्ष व लिंगैक्यवर्ष या कालावधीविषयी सर्वाधीक मान्यता असलेली दोन मते आहेत. त्यावरील पहिल्या मतानुसार जन्मवर्ष इ.स. 1105 तर लिंगैक्यवर्ष 1167 असे एकुण जीवितावधी हा 62 वर्षाचा आहे. तर दुसऱ्या मतानुसार जन्मवर्ष इ.स.1131 तर लिंगैक्यवर्ष इ.स. 1167 असे एकुण जीवितावधी हा 36 वर्ष आहे.

**महात्मा बसवेश्वरांची कौटुंबिक माहिती :**

बागेवाडी हे बसवण्णाचे जन्मग्राम असुन या गावाचा उल्लेख अनेक नावांनी तर्दवाडी मध्यग्राम बागवाडी, अग्रहार बागेवाडी, सण इंगळेश्वर बागेवाडी, कन्नड बागेवाडी, तिंगुळेश्वर बागेवाडी, इंगळेश्वर बागेवाडी केला जातो. बागेवाडी हे बसवपिता मादिराजांचे गाव तर इंगळेश्वर हे आई मादलांबीकेचे माहेर होय. या दोन गावामध्ये नऊ-दहा किलोमीटरचे अंतर असल्यामुळे काहींनी "इंगळेश्वर – बागेवाडी" असा उल्लेख केला आहे. आता हे स्थळ "बसवन बागेवाडी" या नावाने प्रसिध्द असून विजयपुर, जिल्यातील तालुका स्थळ आहे .. बसवन्ना चे वडील मादिराज तर्दवाडी

मध्यग्राम असलेल्या बागेवाडीचे पुरवाधिश्वर होते, तर आई मादलांबिका ही दंडनायक (मंत्री) अथवा भसुरोत्तम म्हणून ख्यात असलेल्या बलदेव मंत्र्याची बहीण होती. अशा उन्नत व श्रीमंत परंपरेतील आई-वडिलांच्या पोटी बसवण्णांचा जन्म होतो. त्यास "बसव" असे नामकरण करण्यात येते , बसवण्णाचे पूर्वज हे 'मंडग' या गावात राहत होते नंतर वडील बागेवाडीस येऊन स्थिरावले होते. बसवण्णाची बहीण नागलाबिका, भाऊ देवराज, भाचा चेनबसवण्णा तर ज्येष्ठ पत्नी गंगाम्बिका व दुसरी पत्नी नीलांबिका होती. गंगाम्बिकेश सिध्दरस आणि निलांबिकेस बालसंगय्या अशी दोन आपत्ये झाली . दोन्ही मुले अल्पायुषी ठरले.

**महात्मा बसवेश्वरांचे बालपण :**

बसवणाचे बालपण हे मातृघराण्यातील शिवभक्ती आणि पित्रघरान्याचे विप्रकर्म पाहण्यातच गेले. बसवण्णा जसेजसे मोठे होत गेले,तसतसे त्यांचा कर्ममार्गापेक्षा भक्तिमार्गावरील विश्वास अधिक दृढ होत गेला. बालपणीच त्यांनी वेदपुराण, इतिहास, धर्मशास्त्राचे अध्ययन केले. शैव ब्राम्हण घराण्यात जन्मलेल्या बसवण्णाचे वयाच्या आठव्या वर्षी उपनयन झाले. परंतु त्यांनी कर्मबंधन असलेले जानवे तोडुन ते झिडकारले. ब्राम्हण धर्मातील कर्मकाडांची घृणा वाट्न गृहत्याग केला कोवळ्या वयात जडत्व लाभलेले बसवण्णा , स्थिरावलेली अग्रहार संस्कृती त्यागुन चलनशीलतेचे मौल्य लाभलेल्या भक्ती संस्कृतीकडे वळले. या कालखंडाला "कर्माकडून धर्माकडे" प्रस्थान केल्याचा कालखंड म्हणतात. उच्च वर्णातील लोक जानवे या नावाच्या नियंत्रक दो-याने भारतीय समाजास आपल्या कपिमुठीत ठेवल्याचे म. बसवेश्वर फार लवकर ओळखले होते. अनुत्पादक वर्णाच्या लोकापासुन उत्पादक वर्गाना वेगळे करण्याचे प्रतीक, चिन्ह म्हणुन जानवे अस्तित्वात आलेले आहे. हे बालपणी त्यांच्या लक्षात आलेले होते. बालपणापासुनच व्यावहारिक ज्ञान, कुशलता, चानाक्ष बुध्दी , दुरदृष्टी, आत्मविश्वास ,निडरपणा , स्वावलंबी , वाणीतुन नम्रपणा, नेतृत्वगुण, मेहनती, प्रामाणीकपणा हे गुण त्यांच्या अंगी होते.

**कुडलसंगम येथे प्रस्थान :**

कुडलसंगम हे म.बसवेश्वराचे साधनाक्षेत्र होये, तेथे त्यांनी अध्ययन मुलभुत चिंतन करून आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास साधला. कुडलसंगममधे ईशान्यगुरुच्या आश्रयात राहुन अभ्यास ,चितन, मनन करुन ज्ञानविस्तार वाढविला. पुढील कार्याची पूर्व सिध्दता केली. येथे म. बसवेश्वर बारा वर्ष वास्तव्य केले. या कालावधीत भाषा,धर्म , तत्वज्ञान इ. अभ्यास केला. हे ठिकाण म्हणजे कृष्णा व मलप्रभा या नदयाच्या संगम होय. संगम हे अनेक अर्थाने त्यांच्या आंदोलनासाठीचा संकेत बनते. व्यक्तीगत क्षेत्रात, सामाजिक क्षेत्रात प्रवाहशीलतेचा ध्यास घेतलेल्या त्याच्यासाठी कृष्णा व मलप्रेभेचा प्रवाह जणु प्रेरक ठरला. येथे अंगगुण निरसुन ,लिंगगुण आत्मसात करण्याद्वारे म. बसवण्णाना नवा मानवजन्म लाभला. विकास झाला तो इथेच ! अशा प्रकारे त्यांच्या जीवनात त्यांचे व्यक्तित्व "अंगाकडुन लिंगाकडे" परिवर्तित होण्याचा हा कालखंड होय. कुडलसंगम हे म.बसवेश्वराच्या बहिण आकनागलांबिकाचे सासर होय. येथे म. बसवेश्वरांनी अध्यात्मिक ज्ञानाबरोबरच, लौकिक ज्ञान ही संपादन केले. याच काळात अमानवीय रूढी-परंपराविरुध्द मनात विद्रोह सुरु झाला. कुडलसंगम येथे बीजारोपण झालेल्या विचारांचे रोपटे मंगळवेढयात अंकुरले आणि कल्याणामध्ये हा वेल गगनावरी गेला.

**मंगळवेढा येथे प्रस्थान :**

मंगळवेढा ही तर्दवाडी राज्याची राजधानी होती. म.बसवेश्वराची ज्ञानसाधना व लोककल्याणाची तळमळ पाहुन मामा बलदेवानी आपली मुलगी गंगाम्बिका हिचा म. बसवण्णाशी विवाह लावला. येथे कल्याण चालुक्याचे मांडलिक असलेल्या कळचुरी पेर्माडीचा पुत्र बिज्जळ या प्रांतावर राज्य करीत होता. म्हणून म. बसवण्णा आपल्या उपजीवनासाठी बिज्जळ दरबारात "करणिक" म्हणुन नियुक्ती मिळाली. या दरबारात भांडारी सिद्धरसांची निलाम्बिका नावाची कन्या होती. सिध्दरसाच्या अकाली मृत्यमुळे तिचे संगोपन राजा बिज्जळच करीत होता. म्हणुन नीलम्बीका ही बिज्जळाची मानलेली बहिण होती. बिज्जळ आपल्या राजकीय स्थैर्यासाठी आपली बहिण निलाम्बिकेचा विवाह म. बसवण्णाशी लावला. गंगाम्बिका ही बसवणाची आचार पत्नी होती तर निलाम्बिका ही विचारपत्नी होती. बसवण्णाचे दाम्पत्य जीवन शिवास प्रिय असे होते. बसवाण्णनी मंगळवेढा येथे 'लोकशाही' संसद

म्हणजेच 'अनुभव मंटपाची' स्थापना केली. या अनुभव मंटपात सर्व धर्मातील सर्व लोक एकत्र येऊन सामाजिक अडचणीवर मात कशी करावी यावर चर्चा करण्यास कार्य चालत असे. याचबरोबर वचनरचना, अनुभवगोष्टी आणि जंगमदासोह कार्य सुरुच होते. समाजातील रुढी, परंपरा, वाईट चालीरीती यांना विरोध करून समाजहीतकारक यंत्रणा तयार केली. सर्वप्रथम 12 व्या शतकात "लोकशाही मूल्यांची" सुरुवात या अनुभव मंटपात या माध्यमातून करण्यात आली. याच कालावधीमध्ये बिज्जळाने आपली राजधानी मंगळवेढयाहुन कल्याणला नेली. यामुळे म. बसवण्णाही कल्याणला आले. अनुभव मंटपात स्त्रीयांनादेखील सभासद होता येत होते, जातीभेदाला तर थाराही नव्हता.

**कल्याण येथे प्रस्थान व शरण चळवळ :**

सहाव्या विक्रमादित्याच्या काळात राजधानी म्हणून नावारुपास आलेले कल्याण आता म. बसवण्णाचे समाजोधार्मिक कार्याचे केंद्र म्हणुन कीर्तिमान होऊ लागले. बसवणाच्या अंगी असलेली समतादृष्टी, विनय समाजहिताची तळमळ आणि कार्यतत्परता यामुळे त्यांची ख्याती सर्वत्र पसरली. त्यांच्या या विशाल व्यक्तिमत्वामुळे देशोदेशीचे लोक कल्याणच्या अनुभव मंटपाकडे येऊ लागले. कल्याण मध्ये राजकार्याबरोबरच धार्मिक कार्य केले असंख्य शरण कल्याण मध्ये आले. बसवण्णांनी "महामने" ची उभारणी केली. नित्य गुरु-लिंग जंगमार्चन, दासोह चालविले. बसवणांच्या नेतृत्वाखाली असंख्य शरणांनी इण्टालिंगार्चन, सत्यशुध्द कायक, दासोह ,स्वातंत्र्य, समानता, सदाचार असे तत्वनिष्ठ जीवन चालविले. अनुभव मंटपाची स्थापना झाल्यानंतर अल्लमप्रभु शुन्यपीठाचे अध्यक्ष झाले. अल्लमप्रभुच्या अध्यतेखाली शरण मंदियाळीने अनुभव गोष्टी चालविल्या. त्या चिंतनातून वचन साहित्य निर्माण झाले. विराना आचरणाची जोड असल्यामुळे जात, वर्ग, लिंगभेद होत असानुतन शरणसमाज निर्माण झाला. कायक व दासोह तत्वामुळे कल्याण समृध्द झाले. कल्याण कैलास झाले. कायक म्हणजे श्रम याद्वारे कमविले पाहिजे अन दासोह म्हणजे वितरण याद्वारे विनीयोग केला पाहिजे. या आदर्श सुत्रावर आधारित "कल्याण राज्य" निर्मिण्याचे मंत्री बसवण्णाचे ध्येय होते.

म. बसवण्णा बिज्जळाच्या दरबारात भंडारी (अर्थमंत्री) होऊन आणि शरण संकुलात भक्तीभंडारी होऊन समर्थपणे कार्य करीत होते. एकदा राजदरबारात सापडलेल्या कुट लिपीतीत ताम्रपटाचे वाचन करुन बसवणा राजा बिज्जलास अमाप संपत्तीचा ठेवा मिळवुन देतात. त्यामुळे बिज्जलाचा बसवळयावरील विश्वास अधीक वृद्धींगत होतो. बसवणांच्या समग्र क्रांतीकार्यास अधीक पाठबळ मिळते. "करणीक" असलेले बसवण्णा आपल्या प्रामाणिकतेच्या आणि बुध्दीकोशल्याच्या बळावर अर्थमंत्री , महामंत्री होतात. बसवण्णाची अल्पावधीत झालेली राजकीय घोडदौड पाहुन दरबारातील काही ज्येष्ठ मंत्र्यांच्या मनात द्वेष निर्माण होऊ लागले. परिणामी अशी मंडळी बिज्जल व बसवण्णा यांच्यात दुरावा निर्माण करण्यासाठी दुष्ट हेतुने पुढे सरसावतात. बिज्जळाकडे तक्रारी करीत असत परंतु बिज्जल अशा तथ्यहीन तक्रारीकडे लक्ष देत नव्हता.

तत्कालीन समाजव्यवस्थेत्या व राजसत्तेला हादरवून टाकणारा आंतरजातीय विवाह म. बसवण्णांच्या पुढाकाराने 12 व्या शतकात घडला. मागास जातीतील संत हरळय्या यांचा मुलगा शीलवत व मधुरस ब्राह्मण मंत्र्याची मुलगी लावण्यवती यांच्यात विवाह घडवुन आणला. याच संधीचा फायदा घेऊन पुरोहित वगाने "धर्म बुडाला, धर्म बुडाला" असा कल्लोळ माजविला अशा वेळी म. बसवण्णाना वेळीच रोखले नाही तर राजसिंहासन धोक्यात येईल अशी भीती राजा बिज्जळाच्या मनात निर्माण केली व दबाव आणला. अखेर त्या शरणांना मृत्युदंडाची शिक्षा देण्यात येते. परिणामी कल्याण नगरात मोठया प्रमाणात हिंसाचार उसळला अशा परिस्थतित म. बसवणा प्रधानमंत्रीपदाचा राजीनामा देऊन कुड्लसंगमला जातात. यामुळे कल्याण नगरात अस्थिरता निर्माण होते. या अस्थीरतेचा फायदा घेऊन विरोधक जगदेव आणि मोलेबोम्मयाना कल्याणमध्ये बिज्जळाची हत्या केली. त्याचा आरोप शरणविरोधी मंड्ळीकडुन शरणसमुहावर ठेवला जातो. बिज्जळाचा पुत्र सोविदेव सैन्यासह हल्ले चढवून शरणावर सुड घेत शरणाची हत्या घडवून आणली. शरण वचन रक्षणासाठी पराकाष्ठेचा संघर्ष करीत चोहीदिशेला विखुरतात.

**लिंगायत शब्दाचा अर्थ:** ज्याप्रमाणे ध्रुव तारा भरकलेल्या माणसांना दिशा दर्शवितो. त्याच प्रमाणे महात्मा बसवेश्वर यांनी लिंगायत समाजाला दिशा दर्शवली. लिंगायत शब्दाचा अर्थ लिंग + आयात = लिंगायत याचा अर्थ इष्टलिंग म्हणजे विश्वाच्या आकाराचे माणसाच्या डाव्या हाताच्या उंची ईतके शिवाचे प्रतीक, आयात म्हणजे धारण करणे किंवा स्वीकार करने. लिंगधारण करणारा असा तो लिंगायत असे आहे.

**लिंगायत धर्म चळवळ :** लिंगायत हा स्वतंत्र धर्म आहे. तो कोणत्याही धर्माचा उपजात, शाखा अथवा पंत नाही. जसे बौध्द, जैन, शीख, ख्रिश्चन धर्माला ज्या वैशिष्ट्यामुळे स्वतंत्र धर्म मानले तीच सर्व वैशिष्ट्ये लिंगायत धर्म पुर्ण करु शकतो. स्वतंत्र धर्म म्हणून मान्यता मिळविण्यासाठी धर्मगुरु, धर्मसंहिता ,धर्मग्रंथ, धर्मभाषा धर्मचिन्ह, धर्माचे नाव, धर्मसंस्कार, धार्मिक व्रत , प्रार्थना केंद्र, धर्म तत्वे धर्माचा ध्वज , धर्म ध्येय, धार्मिक सण व उत्सव, धर्मानुयायी या सर्वाचा समावेश लिंगायत धर्मात होतो.

**लिंगायत धर्म कवच-कुंडल:** लिंगाग सामरस्यरूपी साध्य पाप्त करण्यासाठी अष्टावरण, पंचाचार व षट्स्थल असा साधनामार्ग या आपल्या धार्माने सांगितला आहे.

**षट्स्थल :-** बहिरंगाकडून अंतरंगाकडे अंतर्मुख होने म्हणजे षट्स्थल मार्ग होय. जीव शिवात, नर हरात , अंग लिंगात उत्क्रांत होन्याचा मार्ग म्हणजे षट्स्थल मार्ग होय. षट्स्थले पुढील पमाणे आहेत.

1. **भक्तस्थल** :- या स्थलाची प्रमुख लक्षणे म्हणजे अंगी श्रद्धाभक्ती बाणवली पाहीजे. सद्गुरूकडून लिंगदिक्षा प्राप्त केली पाहिजे. सदाचार संपन्न झाला पाहीजे. नित्य जीवनात कायक व दा सोहाचा अवलंब केला पाहिजे. वचनसाहीत्यावर अढळ श्रद्धा असली पाहीजे, नित्य वचन पठन व शरण सत्संगात अनिवार्यपने सहभाग घेणे.
2. **महेश स्थल** :- या स्थलाची लक्षणे आपल्या इष्टलिंगाशिवाय दुसऱ्या कोनत्याही देवदेवतांचे पुजा करीत नाही. जातीभेदावर विश्वास ठेवायचा नाही. दृढ निष्ठा ही अंगी बाणवून साधनामा अवलंबवीतो. एकदेवोपासक होऊन राहतो.
3. **प्रसादी स्थल** :- तन, मन-भाव, इंद्रिये प्रसादमय होऊन सारे काही परमात्म्यारुपी समर्पित करणे हे प्रमुख लक्षणे होय. केवळ आहारपदार्थच नाही तर समस्त विश्वच प्रसादरूप मानतो.
4. **प्राणलिंगी स्थल** :- लिंग हेच प्राण व प्राण हेच लिंग हे प्रमुख लक्षण होय. प्राणलिंगाचा योग म्हणायचे या स्थलात अंतरंगातील पुजा व योगसंधानच मुख्य आहे.
5. **शरण स्थल:-** या स्थलाचे लक्षण म्हणजे स्वत:ला आलेला अनुभव, आनंद साऱ्या जगाला वाटणे होय. आनदभक्तीत आत्म तल्लीन होऊन राहतो. शरण संती लिंगपती भाव आत्मसात केलेला असतो.
6. **ऐक्य स्थल :-** समरस भक्ती म्हणजे ऐक्यस्थल होय. तु मी असा भाव पुर्णपणे लोप पावत्ला जातो. स्वयंलिंग होऊन सर्व क्रिया अंगीकरणे हेच ऐक्यस्थलाचे खरे मर्म होय जलात् जल मिसळणे, अग्नौने कापुर गिळण्याप्रमाणे ऐक्याची स्थीती होते.

**अष्टावरण :**

गुरु, लिंग, जंगम , पादोदक, प्रसाद, विभुती ,रुद्राक्ष, मंत्र यांना अष्टावरण म्हणतात. अष्ट म्हणजे आठ व आवरण म्हणजे रक्षा कवच होय. आठ अवरणे वेगवेगळी वाटत असली तरीही त्यांचा आशय हा एकमेकात गुंतलेला आहे.

1. **गुरु** : - "अज्ञानाचा अंधकार दुर करणारा" म्हणजे गुरु होय. जसे एका ज्योतीने दुसऱ्या ज्योतीस प्रज्वलीत केल्यानंतर त्या दोन्ही मध्ये काही भिन्नतः राहत नाही. त्याचपद्धतीने शिल्य गुरुकडुन ज्ञान प्राप्तकरून तो स्वतः गुरूप होऊ शकतो. एखाद्या धर्मपीठाचा अधिकारी, मठाचा उत्तराधिकारी होऊ शकतो .
2. **लिंग** : - विश्वाच्या उत्पत्ती, स्थिती व ल्यास कारणीभूत असलेले परमश्रेष्ठ चिरंतन तत्व म्हणजे लिंग होय. इष्टलिंग सदगुरुकडून दीक्षेद्वारे प्राप्त करून घ्यावे आणि एकनिष्ठेने आराधना करावी. लिंग धारण करण्यासाठी कोणताही वर्ण, वर्ग, वंश, लिंग, जात ,धर्म असा भेद केला जात नाही.

3. **जंगम** : - लिंगायत धर्मतत्वाचे निष्ठेने आचरण करून ती तत्वे जनमनात पेरणारी व्यक्ती म्हणजे जंगम होय. जगम हा जात नसुन ती एक अर्हता आहे. कोणत्याही जातीचमातील व्यक्ती हा उष्ट्लींग थारी होऊन आचार-विचार शुद ठेवुन अनुभव पाप्तीद्वारे जगम बनु शकतो. समाजाची निःस्वार्थ सेवा करणे हेच सारे जगमत्व आहे.

4. **पादोदक** : मानवातील उच्च-निघता, श्रेष्ठ-कनिष्ठा , अहंन्युनता दुरु करुन, समानता दृढ़ करव्यासाठी पादोदक तत्व आहे. प्रत्येकाच्या अंतरंगातील चिदामृत हे पादोदक आहे. अंतरंगात असणारी अज्ञान , अहंकार व भेदभाव ही पाटोदक नष्ट करते.

5. **प्रसाद** : प्रसाद म्हणजे प्रसन्नता. फक्त ताटात वाढलेले अन्न हे प्रसाद नसुन ईश्वराने आयुष्याचा ताटात वाढलेले सुख-दुख, मानापमान , हानिवृधी हे सर्व ईश्वराचा प्रसाद म्हणुन समत्वाचित्ताने अल्लमप्रभुदेव, कंबली नागदेव, जेहर वुक्कवया, बुरुड केतय्या, चर्मकार हरळय्या, परीट माचय्या ह्या सर्व शरणांमध्ये जंगमम स्वरूप पाहुन त्यांचे पादोदक प्रसाद स्वीकारले.

6. **विभूती** :मानवातील दुर्गणाचा नाश होऊन सदगुरु संवर्धन व्हावेत हा विभुती धारण कख्यामागचा मुळ उद्देश आहे. विभुतीचे दोन प्रकार आहेत. विभुती हे सदभक्तीसाठी बहिरंगात श्रेष्ठ आभुषण आहे.

**सोपाधिक विभुती :** गाईचे शेण वाळवुन ,भाजुन त्याची राळ करून त्यात पादोदक मिश्रण करनमंत्राद्वारे तयार झालेल्या विभुतीस् सोपाधिक विभुती असे म्हातात.

**निरुपाधिक विभूती :** काम, क्रोध, लोभ, मोह मद मत्सर हे षडकिडार भस्म करु न परिशुद्ध होने म्हणजे निरूपाधिक विभुती होय.

**7. रुद्राक्ष :** रुद्राक्ष हे मानवाच्या बहिरंगाचे भूषण आहे तर अंतरंगात ज्ञाननेत्राचे प्रतिक आहे. "आपण शिवज्ञान संपादन केले पहिजे" याची जाणीव निर्माण करण्याची प्रतीक म्हणजे रुद्राक्ष होय. रुद्राक्ष किती मुखी आहे यापेक्षा ते धारण केलेल्याचे मन किती शुद्ध आहे हे महत्वाचे आहे.

**8. मंत्र :** मंत्राने मनाची एकागता वाढते. मन एकाग झाले तर असाध्य ते साध्य करता येते मंत्रो बहिरंगात शिवस्वरुपाची तर अंतरंगात स्व स्वरुपाची जाणीव करून देते. मंत्र म्हणजे सृष्टीक-याचे स्मरण आणी त्याच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचे साधन होय.

**पंचाचार :** लिंगायत तत्वज्ञानात अष्टावरण के अंगस्वरुप तर पंचाचार हे प्रानस्वरुप मानले जाते. पंचाचार हे नैतीक मुल्यांची शिकवण देतात. पंचाचार म्हणजे मनातील अंतर्बाह्य क्रिया शुध्द करून, नियंत्रीत करु न सज्ञान शक्तीने कर्मद्रियांना प्रेरित करणे होय. पाच आचार खालील प्रमाणे आहेत.

**1. लिंगाचार :** लिंगाचार हा धार्मिक नैतिकतेचा संदेश देणारा आचार आहे. लिंगाचार म्हणजे ईटलिंगा व्यतिरिक्त अन्य देव-देवतांची उपासना वर्ण्य मानने. निराकर लिंग हेच परमतत्व जाणून षट्स्थल साधनेदारा अध्यात्मिक परमोन्नती साधणे हा लिंगाचार प्रतिपादनामागील उददेश आहे. लिंगाचारातुन मन शुध्द होते. ईष्टलिंग सदैव अंगावर धारण करावे व उपासनेसाठी विशिष्ट स्थळ ,काळ, प्रदेश यांचे बंधन नाही.

**2. सदाचार :** सदाचाराने मन शुध्य होते. सदाचार हा आर्थिक, नैतिकता व समानता प्रतिपादन करणारा आचार आहे. सदाचार म्हणजे सत्य-शुद्ध कायकाद्वारे प्राप्त केलेल्या त्यातुन आत्मकल्याण तर दासोहाद्वारे समाजोपयोगी कार्यातुन लोककल्याण साधत नीतीपुर्ण जीवन जगने होय. कायक म्हणजेच सत्य-शुद्ध श्रमाचे महत्व कळाले तर चोरी अत्याचार संफ्तीच्या हव्यासापोटी होणारी खुन,शोषन यास आळा बसेल तर दासोहामुळे संग्रह प्रवृत्ती नष्ट होईल वेळेवर आयकर भरल्यास राष्ट्र समृद्ध होईल.

**3. शिवाचार :** शिवाचाराने धन शुद्ध होते. शिवाचार हा सामाजिक समानतेचे प्रतिपादन करते. स्वधर्मनिष्ठा व परधर्म सहिष्णुता असली पाहिजे. यामध्ये समविचारी लिंगाधारी लोकांनी सहभोजन केले पाहिजे यासोबतच रक्तसंबंधादी व्यवहार मणजेच रोटी-बेटी व्यवहाराचे आचरण केले पाहिजे शिवाचार हा सामाजिक नैतिकता शिकवीतो.

**4. गणाचार :** गणाचार म्हणजे विषमता, शोषक , अनैतिकता कार्य, हिंसाचार, भ्रष्टाचार, अन्याय इत्यादी आपल्या अंतरंगात तसेच बहिरंगात असलेल्या दृष्ट वृत्ती, प्रवृतीचा प्रतिकार करणे होय म्हणून म्हणतात, गणाचाराने क्रिया शुध्द होते. गणाचाराचा अंतर्भाव सार्वभोम नैतिकतेत करता येतो. लिंगाचार, सदाचार व शिवाचार यांच्या रक्षणासाठी व संवर्धनासाठी गणाचार आपली भुमिका पार पाडतो. समाजातील अंधश्रल्या व कर्मकांड संपुष्टात आणण्यासाठी प्रयत्न करणे. समाज व राष्ट्राच्या प्रगतीसाठी कटीबध्द राहणे म्हणजेच गणाचारच होय.

**5. भृत्याचार :** भृत्याचार म्हणजे विनय , नमृतायुक्त समावेश होय व्यक्तीपेक्षा समाज, देश श्रेष्ठ आहे या मोठया भावनेने विनम होणे विनयाने झालेले समाजिक परिवर्तन हे दीर्घकाळ टिकुण राहणे. संयमाने शांती व समाधान प्राप्त होते भृत्याचाराणे वाणी शुध्द होते.

**महात्मा बसवेश्वर यांची वचनाद्वारे संदेश :** चराचरात अंतर्भुत असलेल्या जीवजलात्तल्या शृंखलेची प्रमुख कडी असलेल्या "वनस्पतीलाही जीव आहे" असे सर्वप्रथम म. बसवेश्वरांनी आपल्या वचनाद्वारे प्रतिपादन केले. शाकाहारी सुद्धा अशा रीतीने जीवहिंसाद्वारेच आपला असर मिळवितात. असे सांगण्यातून त्यांनी हिसेचे विराट स्वरूप दाखवुन दिले आहे. हेच जगदिश चंद्र बोस यांना २० व्या शतकाच्या प्रारंभी वनस्पतीलाही जीव असल्याचे वैज्ञानिक दृष्ट्या दाखवुन दिले. यज्ञासाठी पाणीबली देव्यास गौतमबुध्दापमाणे म.वसवेश्वर देखील विरोध करतात. मनामध्ये भक्तीभाव बाळगा, कर्मकांड करु नका, कष्टकऱ्याना कमी लेखु नये. श्रमप्रतिष्ठेला महत्व दिले. बालविवाहाला विरोध करून विधवांच्या पुनर्विवाहला मान्यता दिली. चोरी करू नये, सर्वांना सहकर्म्य, खोटे बोलू नये, दुसऱ्याला कमी लेखू नये. सर्वांना सहकार्य करावे. स्वतःची स्तुती व दुसऱ्याची निंदा करू नये. एकाच देवाची म्हणजे इष्टलिंगाची साधना करा. पंचसुतके पाहु नका. दालिताना समान अधिकार दया. दगड - धोंड्याची पुजा करू नका,रागापासून दूर राहा, मोह आवरावा. नवस वगरे कर, नये उपवास वृत्त करु नये. परधनाची आस करु नका. हातउसने, व्याज, आहेर, कर्ज याचा स्वीकार करु नये, अंहकारामुळे विश्वाचा नाश व दयेमुळे विश्वाचे रक्षण असे अंतीम सत्य म. बसवेश्वरांनी वचनाद्वारे दिला आहे.

**शिवनिधी :** धन संपत्तीचा विनीयोग सत्कारणी लागवा व आपल्या परिसरातील कष्टकरी जीवीच्या पाठीशी उभी राहून परिसर शिवमयं करण्यासाठी या शिवनीधीची आवश्यकता सते. कर्जमुक्त समाज निर्माण करण्यासाठी या शिवनिधीची गरज आहे. या शिवनिचा लाभ गरजु लोक घेऊ शकतील. या माध्यमातुन आजूबाजूच्या शेतक-यांना, गरिबांना, उदयोगधंदा करणा-या कायकजीवी लोकांना साहाय्य करुन त्यांना जगण्याचा भरवसा दयावा हे उदिष्टे म. बसवण्णचे होते. या निधीचा वापर बसव संघटना, संस्था ,बसवकेंद्र, बसव समिती, बसवमंच इत्यादीच्या मार्फत कार्यान्वित करावा. कोणताही शेतकरी व कष्टकरी आत्महत्येच्या आहारी न जाता अशा निधीचा वापर गरजवंतासाठी व्हावा असे म. बसवेश्वरांनी सांगितले.

**म. बसवेश्वर शिवैक्य :** कल्याणमधील घडलेल्या सर्व घडामोडी ऐकुण म. बसवाण्णा कुडलसंगम मध्ये ऐक्य पावतात. शून्यात शुन्य होऊन समरसतात . म.बसवेश्वर आज देहरुपानि नसले तरी त्यांनी रुजविलेली स्वातंत्र्य, समानता, बंधुत्व , कायक, दासोह, या वेलीवर सुख शांती व समृध्दीचा परिमळ मोगरा फुलला आहे. याचा सुगंध आपल्या जीवनात भरुन घ्यावे ही मानवजातीची जबाबदारी आहे. कर्नाटक सरकारने कृष्णा व मलप्रभा नदीच्या संगमावर म. बसवेश्वरांचे समाधीस्थळ उभारले आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

*शिवानंद : विश्वज्योति महात्मा बसवण्णांची वचनगाथा, लातूर - एप्रिल 2019.*
*राजेंद्र शंकरप्पा जिरोबे : बसवेश्वरांचा देव, भालकी, डिसेंबर – 2007.*
*शरण संगम व कल्याण महोत्सव - सं. रविशंकर काळा.*
*जगत् ज्योती म.बसवेश्वर जयंती विशेषांक दै.सत्यप्रभा.*
*प्रेरणादायी म.बसवेश्वर.*
*परिवर्तनाचा महामेरु, म.बसवेश्वर.*
*बसवेश्वर - विकिपीडीया.*

# म. बसवेश्वर के वचनों में सामाजिक दर्शन

**प्रा.डॉ. अशोक तुकाराम जाधव**
*सहयोगी प्राध्यापक. कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय, उमरी जि. नांदेड*
*चलभाश :9421839604 ईमेंलः– shrikrushan12@gmail.com*

महात्मा बसवेश्वर जी का जन्म 12 वी सदी में कर्नाटक राज्य के विजापुर जिले के बागेवाडी में हुआ था। उनके पिता का नाम मदिराज उर्फ मादरास था। म बसव कान्नडी होने के कारण उन पर कन्न्ड भाश में प्रचूर मात्राओं में साहित्य लिखा गया है। उनके पिता ने उनका बचपन में बसवण्णा नाम रखा था। बचपन में उनको ऐसे घटना का सामना करना पडा जो उनके बचपन के मस्तिश्क को स्विकार ही नहीं करती थीं। पहली घटना बकरे की बली और दूसरी नाग पंचमी के दिन सॉप को नाग देवता समझकर दूध पिलानेवाले ही, दूसरे दिन सॉप को मार रहे थे। ऐसी सामाजिक घटनाएँ थी जो स्वीकार करने जैसे नही थी। बचपन में ही उन्होंने आपने 'उपनयन संस्कार' का विरोध कर वैदिक समाज के संस्कारो का विरोध किया था। इससे उनके माता पिता को भी बडा दुःख हुआ, और वैदिक समाज को भी झटका लगा। इस तरह से बसव बचपन से ही मानवतावाद को आपना धर्म मानते थे। भगवान गौतम बुध्द, महात्मा कबीर, महावीर, गुरूनानक, महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आबेंडकर, राश्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा, आदि के जैसे सामाजिक कृति ील संत थे।

भारत देश विविध परम्पराओं के साथ साथ विविध भाश, धर्म संप्रदाय, प्रांत, बोलि, संस्कृति, जाति, आदियों से भरा हुआ हैं। वि व के आठ मुख्य धर्म संप्रदायओं में से एक हिन्दू संप्रदाय भारत में हैं, जो पृथक पृथक जातियों, संस्कृतियों, से भरा हुआ है। हिन्दू संप्रदाय का निर्माण 'प्राचीन वैदिक' संप्रदाय से हुआ हैं, ऐसा माना जाता हैं। जैसेः ''प्राचीन वैदिक संप्रदाय से ही हिन्दू संप्रदाय का निर्माण हुआ, जो जाति पर आधारित था, इसलिए व्यक्ति का दर्जा उसके जाति के आनुसार माना जाता था।''[01] तात्पर्यः हिन्दू संप्रदाय में व्यक्ति को उसके गुणोंके बजाए उसके जाति के आधार पर माना जाता था। निम्न वर्ग के लोगों को मानवता नहीं पशु समान दर्जा दिया जाता था। इस हीन भरी भावना का विरोध बसवे वर जी ने आपने वचनों द्वारा किया हैं। उन्होंने आपने जीवन भर निम्न वर्ग के लोगों को इन्सान की तरह दर्जा देने के लिए कृतिशील कार्य किया था, इसलिए वे सामाजिक, दा ानिक, क्रांतिकारी सुधारक थे। उन्होंने कभी भी जाति का समर्थन नहीं किया, वे आपने वचनों में कहते है,–
जैसेः–

**''हत्या करनेवाले नीच**
**सडाहुआ मांस खानेवाले निम्न**
**इसमें जाति न संप्रदाय**
**कूडलसंगम को भारन जानेवाला**
**निर्सग तथा वन्य जीवों से प्रेम करनेवाले**
**सच्चे कुल का''[2]**

इस तरह के वचन लिखकर बसवे वर ने जाति का विरोध कर इन्सानों कों उनके कर्म से, कला गुणों से, उनका दर्जा समझकर लेना चाहिए ऐसा कहा हैं। महात्मा कबीर भी कहते हैं–

जैसेः–

**''जाति न पूछो साधु की, पूछ लीजिए ज्ञान**
**मोल करो तरवार का पडा रहने दो म्यान ''[3]**

अर्थात् व्यक्ति को उसके जाति से उच्च तथा निम्न समजना नहीं चाहिए, बल्कि उसके ज्ञान से, उसके अच्छे कर्मों से, पहचान करनी चाहिए। इसी तरह से महात्मा बसवे वर ने जाति को महत्व नहीं दिया, बल्कि हिन्दू संप्रदाय में चतुवर्ण का विरोध कर कर्म से मान सन्मान करने के लिए जीवन भर प्रयास किया हैं। पृथक पृथक जातियों में रोटी बेटी व्यवहार भी होना चाहिए इसका समर्थन किया हैं।

म. गौतम बुध्द ने अपने जीवन में तीन घटनाओं को देखने के कारण मन में कई सवाल निर्माण हुए इसलिए उन्होंने राजपाठ छोड दिया था। उसके बाद जीवन क्या हैं? जीव किसे कहते हैं, ऐसे आदि सवालों को लेकर बुध्द भ्रमन करते रहे। जीवन का सत्य खोजकर ,वि व कल्याण के लिए बौध्द संप्रदाय की स्थापना कर वि व को भाांती प्रदान की। इसी तरह से म बसवे वर ने आंतर बाहय दोनों को महत्व देकर आत्मा, तन, मन, हद्य आदि में परीवर्तन कर सही मार्ग पर चलनेवाले को म बसवे वर ने अपने 'वीर ौव' सम्प्रदाय में प्रवे ा दिया था। यह सम्प्रदाय वैदिक संम्प्रदाय से अलग और विज्ञान को माननेवाला, मानवतावादी था। इस पर बुध्द के बौध्द संप्रदाय का प्रभाव दृश्टिगोचर होता हैं। क्यों कि उन्होने गौतम बुध्द की तरह अंधश्रध्दा और कर्मकाण्ड का विरोध किया था। म बसवे वर आपने वचनों में कहते है।

जैसेः–

**'' रोता रहे, चिल्लाता रहे**
**हे बकरी तुम कितना भी रो लो**
**वैदिको के अनुसार तुम्हारा बली देनेवाले हैं।''[4]**

हे बकरी के बच्चे यह वैदिक समाजवाले लोग तुम पर कोई दया नहीं करनेवाले हैं। अंधश्रध्दा के नाम पर तुम्हारा बली देना तय हैं। इसलिए तुम चुपचाप बली के लिए तैयार हो जावो।

इसी तरह का वे और एक अंधश्रध्दा का उदाहरण देते हैं।

जैसेः–

**''जब जब अपना दिल कहेगा**
**तब तब भाुभ समय होता हैं**
**सभी पल भाुभ ही है ऐसा मान लो**
**क्यों कि ग्रह, तारे, चंद्र**
**अपने अपने जगह पर हैं।''[5]**

इस तरह से म बसवे  वर ने समय को भाुभ अ  ाुभ माननेवालों का बहुत ही बढियॉ समाचार लिया हैं।

वैदिक संम्प्रदाय में नारी को पुरूशों के समान नहीं माना गया हैं। यह परम्परा कइ सालों से चली आरही है। नारी को केवल घर तक सीमित रखकर हीन दर्जा दिया जाता था। इसी का विरोध करते हुए म बसवे  वर ने 12 वी सदी में नारी का बडा सम्मान किया था। उनमें स्वाभीमान, स्वातंत्र्य, श्रमनीश्ठा, विवेक  ाीलता, पतिनीश्ठा आदि सामाजिक बंधनों को मन में भर दिया था। इस तरह से नारियों को उनका सम्मान तथा लिंग भेद का विरोध कर स्त्री पुरूश समानता प्रस्थापित करने का प्रयास किया।

संत गाडगे बाबा श्रम को बहुत महत्व देते थे। दिन मे खुद स्वंय रस्ते साफ करते थे। रात में कीर्तन कर कर्मकाण्ड, अंधश्रध्दा, आदि का विरोध करते थे, और जन सामान्य को  सही रास्ता दिखाने का प्रयास करते थे। भाायद इन पर म बसवे  वर का प्रभाव होगा क्यों कि म बसवे  वर हाथ मे झाडू, सिर पर ईंडूरी लेकर कहते थे– ' मैं मजदूर का लडका हूँ इस कुडलसंगम भगवान की कृपा दृश्टी से और वारिसदार होने के कारण मैं इस योग्य बना हूँ। यदयपि मैं एक दासी पुत्र हुं।

जैसेः–

**''हाथ में झाडू सिर पर ईंडूरी**
**मैं मजदूर का लडका**
**हे कुडल संगम भगवान**
**मुझे यह विरासत में मिला हुआ हैं**
**मैं तो एक दासीपुत्र हूँ।''**[6]

इस तरह से म बसवे  वर ने खुदको महज एक दासीपुत्र ही मानते थे।

गांधीजी भी कहते हैं 'हम सब भंगी ही हैं। ऐसा बचपण से अपने दिल को कहना चाहिए।' अर्थात् गांधीजी 'श्रम' को महत्व देते थे। निसर्ग नियमानुसार हर एक व्यक्ति ने अपने रोजमर्रा जीवन में अपनी अव  यकता के आनुसार ही हमे लगनेवाली वस्तुओंका उपयोग करना चाहिए। इससे समाज में सामाजिक समानता बनकर रहती हैं। इस तरह से म बसवे  वर ने सभी मानवजाति को एक समान माना हैं। उनके श्रम को महत्व दिया था, जो प्राचीन काल से चली आ रही वर्णव्यवस्था का विरोध कर कर्म को महत्व दिया हैं। इससे वैदिक परम्पराओं को मानने वाले लोगों को बडा झटका लगा था।

**सारांश :–**

म बसवे  वर एक प्रगतीशील संत थे। वह मानवतावाद का स्वीकार करते थे। किन्तु कर्मकाण्ड, अंधश्रध्दा, जाति पाति, उच्च नीच, वर्णभेद आदि का विरोध करते थे। स्त्री पुरूश समानता के बडे आग्रही थे। हजारों सालों से चली आरही वैदिक परम्पराओं का विरोध कर एक नया ''**वीरशैव**'' सम्प्रदाय का निर्माणकर एक नया जीवन प्रदान करना चाहते थे।निम्न वर्ग के लोगों को एक खुली सॉस लेने के लिए आजाद करना चाहते थे। वे दा  ानिक, कृति  ाील,सामाजिक सुधारक थे। 12 वी सदी में वैदिक सम्प्रदाय का विरोध कर नये समाज का निर्माण करना चाहते थे।

**संदर्भ :–**

*पेशवेकालीन महाराश्ट्र ,पी ए गवळी, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद,*
*पॉचवी आवृति सन 2000 पृश्ट संख्या, 64*
*भारतीय साहित्याचे निर्मातें : बसवे वर, एच. तिप्पेरूद्रस्वामी ,साहित्य आकादमी*
*संस्करण– व्दितीय, प्र वर्श 2011 पृश्ट संख्या 22*
*www. Google.com*
*भारतीय साहित्याचे निर्मातें : बसवे वर, एच. तिप्पेरूद्रस्वामी ,साहित्य आकादमी*
*संस्करण– व्दितीय, प्र वर्श 2011 पृश्ट संख्या 28*
*भारतीय साहित्याचे निर्मातें : बसवे वर, एच. तिप्पेरूद्रस्वामी ,साहित्य आकादमी*
*संस्करण– व्दितीय, प्र वर्श 2011 पृश्ट संख्या 30*
*भारतीय साहित्याचे निर्मातें : बसवे वर, एच. तिप्पेरूद्रस्वामी ,साहित्य आकादमी*
*संस्करण– व्दितीय, प्र वर्श 2011 पृश्ट संख्या 37*

# MAHATMA BASVESHWARA: LITERACY RENAISSANCE

**Dr.Umakant Padamwar**
*Associate Prof*essor in *English, Gramin Mahavidyalaya Vasantnager, Mahavidyalaya, Mukhed Dist. Nanded.*
**Dr.Prakash D. Rathod**
*Assistant Professor In Geography, Mahatma Jyotiba Phule, Mukhed. Dist. Nanded.*

Mahatma Basveshwara occupies a prominent place among the great men of india.He lived his life for the wellbeing of his fellow beings.a mystic saint, philosopher, religious leader and social reformer, Basveshwar belonged to that inspired band which entiched Indian culture and civilization.He inculcated the spirit of service and restored the faith in God. He preached the messages of universal love and brotherhood, right conduct and devotion to God and propagated the doctrine of social equality. His greatest achievement was to knit a large community into an integrated whole, irrespective of class and caste.The impact he had on the life of India, particularly in Karnataka is unparalleled.

‘ Vachana’, literally meaning prose, acquired a new vigour at the hands of Basveshwara . He caused renaissance in Kannada literature both in from and content. His is the poetry of life .In the history ofKarnataka with the appearance of Basveshwar in the $12^{th}$ century a new cultural, moral and literacy renaissance took place. A new form of literature called ‘Vachanas’ had colloquil medium using the language of the masses. His ‘ Vachanas ’ were charectorised by simplicity and yet they embodied profound truths of the order of Upanishdic teaching . He presented to us the essence of religion which in other words is the quest of the human soul for the highest elevation. Never before was the spoken kannada used in literature.If in Basveshwara who cultivated and switched this literacy from and raised it to the height of universal literature and caused revolution in Kannada literature both his form and content. It was because of him that veershaiva saints created a literature which was charecterised by an honest and deep self explanation.

Basveshwara had a remarkable power of communicating his ‘Vachanas’ show how progressive and farsighted spiritual leader he was .The figures and images,the similies and metaphors, imageries and word pictures , illustrations and examples , proverbial utterances , countless excerpts from the language of the masses all these are living witnesses not only to his vast experience and human compassion but abo to his artistic achievements.

He succeeded in eliminating the artificial distance that had grown between the literary language of old Kannada poetry and the spoken language of the common man. He enshrined his rich experience, deep insight, and lofty Spiritual realization in a very simple yet profoundly moving language.

Basveshwara , the man with his characteristic way of speaking , his devotion , his sense of dedication , his powerful language , his transparent nature and his inner peace is fully reflected in his ‘Vachannas’. His preachings and practices, his conduct and thought his keenness of insight, the intensity of his emotions are his gifts to us through his ‘Vachnas ’. The vigour and the verbe , the strength and fibre , the unique pattern , the ease and naturalness , the elegance of the spoken kannada language , burst through his ‘Vachanas ’.Basveshwars Spiritual practice , his struggle to pershe it against all odds and his humility are fully represented in his ‘Vachanas ’.

“Literature in fundamentally an expression of life through the medium of language,” (1) Says W.H. Hudson in An Introduction to the study of literature. This can be applied to the vachanas of

Mahatma Basveshwar , He looked at life throughly and from various angles beginning with the common struggle on the material plane and reaching the highest level of metaphysical experience . He could enter deep into the things for he was a keen observer endowed with great poetic insight. His soaring genius, enriched through all observations and varied experiences, has found utterence in the Vachanas as a literary form.

As we read the ‘ Vachanas ’ of Mahatma Basveshwar we realize the truth of Aurobindo’s statement on poetry “ Poetry translation the truth of the higher plane of consciousness in the language of the lower one’’ (2)Basveshwara has translated the truth of all planes of consciousness in the language of the common people . His ‘Vachanas’ incorporate all the feelings and all the levels that elevate and ennoble our life . the high spiritual ideals that he attained , his vision of life , the path he trod,the highest he scaled all these have found expression in form of ‘Vachanas’.

His closeness to the common man has given a new tinge of folk vigour to his language.He uses proverbs extensively and some of his saying themselves have become proverbs. Besides being a social and religious revolutionary he has above caused revolution in Kannada literature, by restoring the living language of people to its central place.

Great man are rare, great poets are rarer, but a great man , who is a great poet is the rarest of all. Basveshwara is the rarest combination of a great man and great poet. He was a great man combining in himself a mystic, a social reformer, an independent thinker and a prophet of the new era. Though his main concern was not literary but he had created a revolution and renaissance in Kannada literature, and in the literature of India.

**Reference:-**

*H. Thipperudra swamy,Makers of Indian literature,Basveshwara,Sahitya Akadami , New Delhi,2017,Page no.57.*

*Sri Aurobindo,collected poems ,Sri Aurobindo Ashram Pandecherry, 2012,Page no.5.*

---

## महात्मा बसवेश्वरांच्या वचनातील मानवतावाद

**म. ई. तंगावार**
*श्री. हावगीस्वामी महाविद्यालय उदगीर,जि.लातूर , ९८९००६५६९०*

---

महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात वचन साहित्याच्या माध्यमातून व कृतीद्वारे अभूतपूर्व अशी क्रांती केली. ही क्रांती खऱ्या अर्थाने परिवर्तनाची होती. अडीच हजार वर्षांपूर्वी भारतात महात्मा गौतम बुद्ध होऊन गेले. खऱ्या अर्थाने जीवनमूल्यांची प्राणप्रतिष्ठा करणारे पहिले महामानव म्हणून महात्मा गौतम बुद्ध यांच्याकडे पाहिले जाते. त्यानंतर कर्नाटकामध्ये अनुभवमंटपाची स्थापना करून जगातील पहिल्या लोकशाहीस महात्मा बसवेश्वरांनी सुरुवात केली. अनुभवमंटप हे खऱ्या अर्थाने अभिव्यक्तीचे केंद्र होते. जीवनमूल्याविषयी चर्चा करण्याचे ते एक ठिकाण होते. साहित्याकडे केवळ मनोरंजनाच्या दृष्टिकोनातून न पाहता जीवन उन्नत करण्याचे एक साधन म्हणून पाहिले पाहिजे. साहित्याचा संबंध हा अनुभूतीशी व सहानुभूती देखील असला पाहिजे. सामान्य माणसाचं हित हेच साहित्याचे प्रयोजन असायला हवे. याची जाणीव महात्मा बसवेश्वर म वचनसाहित्यातून करून देतात. वचन साहित्य एकांतात निर्माण झालेले साहित्य नसून ते चर्चेतून निर्माण झालेले साहित्य होते. महात्मा बसवेश्वरांच्या काळात शरणानी वचन साहित्याच्या माध्यमातून आपल्या अभिव्यक्तीला वाट करून दिल्ली. या सर्व साहित्याचे मेरुमणी महात्मा बसवेश्वर हे होते.

महात्मा बसवेश्वर यांचे वचन साहित्य प्रेरणादायी व दिशादर्शक आहे. एखाद्या साहित्याचे मूल्यमापन करत असताना कलामूल्य व जीवनमूल्य या अंगाने केले जाते, परंतु कला मूल्यापेक्षाही जीवनमूल्य अत्यंत महत्त्वाचे असतात. जीवनमूल्यांची प्राणप्रतिष्ठा करणारे साहित्य हे त्या राष्ट्राची संपत्ती असते. जीवनमूल्य दुसरे-तिसरे काही नसून नीतिमूल्य, मानवीमूल्य होत. माणसाने कसे जगावे, याची शिकवण या मूल्यांच्या माध्यमातून होत असते.

सत्य, अहिंसा, नम्रता, सदाचरण, चारित्र्य, विवेकशीलता, श्रद्धा,स्वातंत्र्य, समता,विश्वबंधुता, मानवता, शिव, सुंदर, प्रामाणिकपणा, नैतिकता व परोपकार इत्यादी कितीतरी जीवनमूल्यांचा आविष्कार महात्मा बसवेश्वरांच्या वचनात व कृतीतून झालेला आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळून सतर वर्ष होऊन गेले आजही स्वातंत्र्य अनेकांपर्यंत पोहोचले नाही. या मूल्यांचा पुरस्कार महात्मा बसवेश्वरांनी तर आठशे वर्षांपूर्वी केलेला होता. स्त्री स्वातंत्र्य हा आजचा केवळ चर्चेचा विषय आहे . परंतु हे स्वातंत्र्य प्रत्यक्ष महात्मा बसवेश्वरांनी अनुभव मंटपात दिले होते.आणि या अनुभवमंटपाचे प्रमुख अल्लंमप्रभू हे बहुजन होते. खऱ्या अर्थाने अनुभवमंटप समतेची मंच होते. म्हणून स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्ये फ्रेंच राज्यक्रांतीने आपल्याला दिलेले नसून याची शिकवण आपणास महात्मा गौतम बुद्ध महात्मा बसवेश्वरांच्या क्रांतिकारी तत्वज्ञानात पहायला मिळते. हजारो वर्षापासून स्त्री शुद्र मानले जात होते. वर्णव्यवस्थेमध्ये शूद्रांना चुकीची वागणूक दिली जात होती. या सर्वांना समानतेची वागणूक महात्मा बसवेश्वरानी दिली.त्यांनी हा आमचा हा आमचा असे म्हटले आहे हा कोणाचा हा कोणाचा असे म्हणू नका अशी त्यांची शिकवण त्यांची होती.कायक कवे कैलास हा सिद्धांत तर सामाजिक तत्वज्ञानाचा गाभा आहे. जो प्रामाणिकपणे श्रम करतो तोच श्रेष्ठ माणूस आहे असं साधं पण अतिशय महत्त्वाचा महात्मा बसवेश्वरांनी मांडला. श्रम करणाऱ्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे महात्मा बसवेश्वर हे क्रांतिकारी महामानव होते.

सत्य, शिव,सुंदर या मूल्यांचा प्रत्यय महात्मा बसवेश्वर यांच्या वचनातून जागोजागी येतो. सत्यमेव जयते या उक्तीप्रमाणे त्यांनी न्यायाने ,प्रेमाने वागणाऱ्या माणसाचा नेहमीच गौरव केले. स्वर्ग व मृत्यू ची व्याख्या करताना महात्मा बसवेश्वरांनी श्रमाला अनन्यसाधारण असे महत्त्व दिले होते. स्वर्ग नर्क यासंदर्भात आपल्या समाजात काही अभ्यासकांनी स्वार्थासाठी लोकांची दिशाभूल केली. संदर्भात महात्मा बसवेश्वर एका वचनात म्हणतात, सत्य बोलणे

हाच देवलोक असत्य बोललने मृत्युलोक. महात्मा बसवेश्वर अहिंसावादी होते. सकळ प्राणिमात्रांची रक्षण आपण केले पाहिजे ही त्यांची भूमिका होती.दया, प्रेम, करुणा हाच खऱ्या अर्थाने मानवधर्माचा पाया होय. यावर महात्मा बसवेश्वरांची निष्ठा होती.

महात्मा बसवेश्वर यांचे नीतीविषयी अनेक वचन आहेत. महात्मा बसवेश्वर बहिरंगापेक्षा अंतरंगाला महत्त्व देणारे समाजसुधारक होते. बाहेरून शरीराला स्वच्छ करण्यापेक्षा आतून शरीर स्वच्छ व शुद्ध केले पाहिजे. कोणाचाही तिरस्कार करू नये. आत्मस्तुती करता कामा नये. अरेरावी, निंदा हे अमानवी आहे.असे महात्मा बसवेश्वर यांनी नीतिविषयक वचनात सांगितले. महात्मा बसवेश्वर यांचे वचन साहित्य वैश्विकसाहित्य आहे.बसवेश्वरांच्या अनुभवमंटप विविध जातीतील शरण शरणी होते, नव्हे तर ते या वचन साहित्यशी एकरूप झाले होते.मानवतावाद बसवेश्वरांच्या साहित्याचा स्थायीभाव होता. महात्मा बसवेश्वरानी केवळ तत्त्वज्ञान सांगितले नाहीत, तर त्यांनी स्वतः आचरणात आणून इतरांना आचरणात आणण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी लावून दिलेला आंतरजातीयविवाह जाती निर्मूलनाच्या दृष्टिकोनातून एक महत्त्वाचे पाऊल होते. तत्वज्ञान ही केवळ बोलण्याची गोष्ट नसून तो आचरणाचा भाग झाला पाहिजे, हा आदर्श बसवेश्वरानी आपल्याला घालून दिले.

दया क्षमा, शांती तेथे देवाची वस्ती असे संतांचे एक वचन आहे. इतरांच्या सुखदुःखाची जाणीव ठेऊन वर्तन करणे हाच मानवाचा खरा धर्म होय.धर्म म्हणजे दुसरे तिसरे काहीही नसून उत्कृष्टपणे जीवन जगण्याची कला. बसवेश्वरांना माणसांबरोबरच प्राणीमात्रांविषयी दयाभाव अपेक्षित होता. यासंदर्भात बसवेश्वर एका वचनात लिहितात, दयेविना धर्म तो कोणता विना धर्म तो कोणता? माझ्यापेक्षा लहान कोणी नाही ही क्रांतिकारी शिकवण महात्मा बसवेश्वर यांची होती. विनम्रता, सदाचार, संस्कार, मानवता इत्यादीचा सुरेख संगम त्यांच्या या वचनात झालेला आहे.

एकंदरीत महात्मा बसवेश्वर ज्ञानसंपन्न, प्रतिभासंपन्न असले तरी आपल्या वचनात पांडित्याचे प्रदर्शन त्यांनी केले नाही. मातृभाषेतून वचन साहित्याची निर्मिती करून समाजाला कर्मकांड व अंधश्रद्धेतून सुटका केली. सामाजिक न्याय, विज्ञानवाद, प्रयत्नवाद इत्यादीचा पुरस्कार करून अस्पृश्यता, जातीयता, सांप्रदायिकता व विषमता निवारण्याचे महत्त्वाचे कार्य महात्मा बसवेश्वरांनी केले. एक विज्ञानप्रेमी, दलितप्रेमी व पर्यावरणप्रेमी म्हणूनही महात्मा बसवेश्वरांच्या वचनाचे चिंतन करायला हवे.

## समतासूर्य महात्मा बसवेश्वर

**प्रा. डॉ. संगीता उप्पे**
*हिंदी विभाग, उज्वल ग्रामीण महाविद्यालय, घोणसी ता.जळकोट जि.लातूर*
*ई–मेल bir.123781@gmail.com*

भारतीय संस्कृति दुनिया में श्रेश्ठ समझी जाती है। लेकिन बारहवी भाताब्दी में भारतीय समाज अंधश्रद्धा, अस्पृ यता, रूढ़ि, प्रथा परम्पराओं में जकड़ा था। अमीर–गरीब और उँच–नीच में की खाई बहुत ही बढ़ गई थी। बहुजन समाज के भाोशण से उनकी स्थिति अत्यंत दयनीय हो गयी थी। इस काल का समाज बिखरा हुआ था। इसमें आमूलाग्र सुधार कर समाज परिवर्तन के लिए अविरत प्रयत्न करनेवाले महान विभूति को हम महात्मा बसवे वर जी के नाम से जानते हैं। खुद का ऐ वर्यसंपन्न जीवन त्यागकर सामान्य जन के कल्याण के लिए सामाजिक विशमता, जातिप्रथा, अंधश्रद्धाओं को जड़ से मिटाने का महान कार्य महात्मा बसवे वरजी ने किया है। कर्नाटक राज्य के विजापुर जिले के बागेवाडी के इस सुपुत्र का जीवन कार्य सदियों से समाज को दिशा और प्रेरणा देता आया है और देता रहेगा। लोगों की प्रत्यक्ष सेवा के महत्व को उन्होंने समझा। समता की जरूरत उन्हें महसूस होने लगी। कन्नड भाशा में सहज भाशा में उन्होंने चोरी नही करना, झूठ नहीं बोलना, हिंसा नहीं करना, सभी को समान दर्जा दो ऐसा उपदे श किया है। उन्होंने समाज की अनेक समस्याओं की, धर्म की चिकित्सा की। धर्म के नाम पर होनेवाले जनसामान्य के शोशण को बंद करने के लिए और समाज में समता प्रस्थापित करने हेतु उन्होंने स्वतंत्र लिंगायत धर्म की स्थापना की। जिसको पहिली धार्मिक क्रांति भी कहा जाता है। उन्होंने अपने जीवन कार्य में स्त्री–पुरुश समानता को बहुत महत्व दिया है। दोनों का समान अधिकार प्रदान किये। यही लिंगायत धर्म और बसवे वर जी के विचारों का मुख्य अंग है। कर्मठ समाज व्यवस्था के विरुद्ध उन्होंने विद्रोह कर मानवतावादी समाज की रचना की। महात्मा बसवे वर जी के समग्र कार्यों में अनुभव मंटप की स्थापना यह अलौकिक और अद्वितीय घटना थी। इसे संस्कारपीठ, मुक्त विश्वविद्यालय और भारत की पहली संसद भी कहा जाता है। सामाजिक, अध्यात्मिक, व्यावहारिक और वैज्ञानिक स्वरूप में यह सामाजिक प्रयोगशाला थी। इस अनुभव मंटप में सभी वर्ग के स्त्री–पुरुशों को अभिव्यक्ति की स्वतंत्रता थी। इसी स्वतंत्रता को अभिव्यक्त करने के लिए वचन साहित्य निर्माण हुआ। अनुभव मंटप में शंका उपस्थित करना, प्रश्न करना, दार्शनिक चर्चाएँ, सामाजिक प्रश्नों पर चिंतन होता था। शरण–शरणी अपनी अनुभूति काव्य प्रकार वचन साहित्य में प्रकट करते थे। इसके माध्यम से वचन साहित्य का भण्डार उन्होंने समाज को उपलब्ध कराया है। कन्नड भाशिक यह साहित्य उत्स्फूर्त और सभी जाति, धर्म के लोगों के विचारों और जीवनानुभवों की मुक्त प्रतिक्रियाएँ थी। जनसामान्य के प्रबोधन का कार्य वचन साहित्य के माध्यम से किया गया है। इसके माध्यम से प्रतिभा का प्रकटीकरण होकर उच्च्य दर्जे का मार्गदर्शनपर और मौलिक साहित्य समाज को मिला। लोक सेवा को उन्होंने अत्यधिक महत्व दिया है। इसलिए लोगों ने बसवे वर जी को 'महात्मा' की उपाधि दी। महात्मा बसवे वर जी ने व्यक्ति विकास के साथ साथ समाज विकास को प्राधान्यक्रम दिया। बसवे वर जी ने आदमी के देह को ही देवालय माना। पत्थर के देवताओं को उन्होंने नकारा था। उनके समतावादी कार्य में अनेक कठिनाइयाँ उत्पन्न हुई लेकिन उन्होंने उसका डटकर मुकाबला किया। उन्होंने शुद्रों, अनाथ, शोशित, भिकारी, चोर, वे याओं को भी जीवन का नया मार्ग दिखाया। उन्हें आत्मनिर्भर बनाया। उन्होंने कहा था कोई छोटा नहीं और कोई बड़ा नहीं है। जातीविरहित

समाज निर्माण का सपना उन्होंने देखा था। जो उन्हे कालजयी सिद्ध करता है। 'कायक वे कैलास' (Work is heaven) इस क्रांतिकारी संदेश के माध्यम से उन्होंने श्रम को प्रतिश्ठा दिलाई। श्रम को उन्होंने स्वर्ग कहा है। श्रम के महत्व को उन्होंने लोगों को समझाया। इसमें शरीर श्रम, बौद्धिक श्रम, धन का उचित उपयोग, सेवा आणि शुभ चिंतन और आशीर्वाद (उपदेश) इन पाच तत्वों को महत्व दिया है। कायक, दासोह और इश्टलिंग जैसा सकारात्मक और परिवर्तनवादी तत्वज्ञान, व्यापक दृश्टिकोन उन्होंने समाज को दिया। जिसने समाज में परिवर्तन और क्रांति ला दी। महात्मा बसवेश्वर जी के विचारों को प्रमाण मानकर कई स्त्री–पुरुशों ने अपना जीवनमार्ग बदलकर अपने जीवन का उद्धार किया। जातिप्रथा, अंधश्रद्धा, अस्पृ यता, स्वर्ग–नरक, मूर्तिपूजा को उन्होंने नकार कर इसके निर्मूलन हेतु अनेक प्रयास किए। लोगों में इसके प्रति व्यापक मात्रा में जनजागृति की। ग्रंथप्रामाण्य को न मानकर आंतर्जातीय विवाह को उन्होंने प्रोत्साहन दिया है। स्त्री को उन्होंने पुरुश के बराबर हक और अधिकार प्रदान किये। उनकी शिक्षा के लिए, सक्षमीकरण के लिए प्रयत्न किये। निर्णय प्रक्रिया में उनका सहभाग बढ़ाया। स्त्रियों को समाज में प्रतिश्ठा दिलाई। उनका यह कार्य स्त्रियों की दृश्टि से ऐतिहासिक और कालजयी साबित हुआ है। स्त्री का दोयम दर्जा, पुरुश का वर्चस्व, शोशण, श्रेश्ठ–कनिश्ठता की प्रवृत्ति को छेद देते हुए उन्होंने समता की मजबुत नींव रखी। स्वातंत्र्य, समता, बंधुता, वैज्ञानिकता इन मूल्यों का उन्होंने पुरस्कार किया है। अहिंसा, श्रमप्रतिश्ठा, सदाचार और सभी का सन्मान इसपर उन्होंने बल दिया है। इसलिए वे युगप्रवर्तक और बहुजनों के उद्धारकर्ता के रूप में उभरे है। भारत के संविधान में महात्मा बसवे वर जी के विचारों का प्रतिबिंब दिखाई देता है। महिला सक्षमीकरण, स्त्री–पुरुश समानता, गरीबी उन्मूलन, अंधश्रद्धा निर्मूलन, अभिव्यक्ति स्वतंत्रता, श्रम प्रतिश्ठा इसके लिए महात्मा बसवे वर जी के विचार बहुत ही मार्गद क हैं। समाज की अराजकता को दूर करने के लिए व्यक्ति सुंसस्कृत होना आवश्यक है। सदाचार से पृथ्वी का स्वर्ग और अनाचार से नरक होगा ऐसा उन्होंने कहा है। उनका यह विवेचन तर्कशुद्ध है। महात्मा बसवे वर जी के विचार पर्यावरणपुरक और लोकतांत्रिक मूल्यों से सम्बन्धित है। दुनिया ने महात्मा बसवेश्वर जी के विचारों और कार्य की सराहना की है। उनका जीवन और कार्य आनेवाढी पीढ़ीयों को सदा ही प्रेरित करता रहेगा। महात्मा बसवेश्वर जी के सामाजिक, आर्थिक, राजकीय एवं धार्मिक विचार भारत के विकास में महत्वपूर्ण भूमिका अदा करनेवाले थे और है। इतना ही नहीं वे आज की समस्याओं के निराकरण के लिए भी उपयुक्त है इसमें कोई संदेह नहीं। समाज की कई समस्याओं को मिटाने के लिए प्रभावी उपाय कर उन्होंने सामाजिक बदलाव करके दिखाया। जो आज भी पथप्रदर्शक है।

**निश्कर्श:** महात्मा बसवेश्वर जी के विचार प्रेरक हैं जिनमें मानव कल्याण का सामर्थ्य है। उनके विचार, कार्य और वचन साहित्य के माध्यम से दिखाया हुआ अहिंसा, समानता, सदाचार का सत्यमार्ग आज भी प्रासंगिक है। वर्तमान युग की कई समस्याओं पर उनके विचार आज भी सटीक और मार्गदर्शक हैं। ऐसे महान समतावादी महापुरुश का बेजोड़ कार्य, उनके सामर्थ्यशाली विचार और मार्गदर्शक वचन साहित्य इनका प्रचार प्रसार समाज के सभी स्तर के लोगों में होना आवश्यक है। वे आज विश्वगुरु, विश्वज्योती, समतावादी, एके वरवादी, स्त्री उद्धारक, मध्ययुगीन हिन्दुस्थान के जनक, पर्यावरणवादी आदि विशेशणों से पहचाने जाते हैं। उनका चरित्र समाज को दिशा देनेवाला है।

**संदर्भ**

*बसवेश्वर काव्यशक्ती और सामाजिक शक्ति–काशिनाथ अंबुलगे*
*भारतीय साहित्याचे निर्माते : बसवेश्वर–एच. तिप्पेरूद्र स्वामी*
*बसवदर्शन–संपा.डॉ.दत्ताहरी होनराव, डॉ.मनोहर भंडारे, 2016*
*बसवसिद्धांत–संपा.डॉ.बाबुराव माशाळकर, डॉ.म.ई. तंगावार, 2012*
*जगत्ज्योती बसवे वर–घुगरे सूर्यकांत, 2003*

# महात्मा बसवेश्वर एक समतावादी महापुरुष : एक अभ्यास

**प्रा. सूनोदकुमार पंढरीनाथ वाघमारे**
*संशोधक विद्यार्थी, सावित्रबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे. मो. नंबर. 8806622358.*

भारतात हजारो वर्षापासून सामाजिक क्रांती प्रतिक्रांती होत आली आहे. सनातन वैदिक जाणकाराने वैदिक आधी साहित्याचा आधार घेऊन वर्ण व्यवस्था निर्माण केली . वर्णांमध्ये जात पोटजात त्याची विभागणी केली. जाती-जातीत उच्चनीचता व श्रेष्ठत्वाच्या कारणांमुळे स्पृश्य-अस्पृश्यतेची भावना समाजात निर्माण झाली. अशा अस्पृश्यतेच्या खाईत भरडल्या जाणाऱ्या समाजाला वर काढण्याचे कार्य त्या त्या काळातील महापुरुषांनी केले व समानता निर्माण करण्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावले. अस्पृश्यता निवारण चळवळीत प्रामुख्याने महावीर , महात्मा बुद्ध , महात्मा बसवेश्वर , गुरुनानक, फुले-शाहू-आंबेडकर यांचे मोलाचे योगदान आहे. बाराव्या शतकात बसवेश्वरांनी समाजाला विषमता , शोषण, अज्ञान , अंधश्रद्धा , अनाचार भ्रष्टाचार, नैसर्गिक विषमता दृष्टिकोन यातून बाहेर काढण्यासाठी अहोरात्र प्रयत्नांची पराकाष्टा केली. सामान्य अस्पृश्य लोकांच्या उद्धारासाठी खोलवर चिंतन करून अस्पृश्यता निवारण केले तरच राष्ट्राचे हित होईल असे सर्वप्रथम बसवेश्वर आम्ही जाणले. अस्पृश्यता नष्ट झाली म्हणजे जातीयता नाश पावेल, जातीयता नाश पावली तर सामाजिक क्रांती यशस्वी होते हे जाणवले .

महात्मा बसवेश्वर यांचा जन्म वैशाख शुद्ध तृतीया रोहिणी नक्षत्र इ स 1105 मध्ये बागेवाडी ( जि विजापूर ) कर्नाटक येथे झाला. ते बालवयापासून बुद्धिवादी होते वडिलांचा आग्रह असताना त्याने स्वतःचा उपनयन संस्कार करून घेतला नाही. अवघ्या वयाच्या आठव्या वर्षी घर सोडून कुंडल संगमेश्वराला विद्याभ्यासासाठी गेले . बारा वर्ष वेदादी शास्त्रांचा अभ्यास करून, मामा बलदेव यांच्या अग्राखातिर इंगळेश्वर येथे आले . संगमेश्वर महादेवाच्या आज्ञेने ते बिज्जल राज्याची राजधानी मंगळवेढ्याला असताना अधिकारी पदाची एक एक पायरी चढत महा मंत्रिपदावर जाऊन पोहोचले , महामंत्री पदापर्यंत जात असताना त्यांचे चिंतन अधिक वृद्धिंगत होत गेले. संस्कृत ग्रंथाचे वाचन, मनन, चिंतन केल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की वेदर भाषा संपन्न असली तरी सर्वसामान्यांना समजणार नाही. त्यांनी कन्नड या भाषेतून समाजप्रबोधनाचे कार्य केले सामाजिक चिकित्सक वृत्तीमुळे त्यांना असे दिसून आले की विषमता ही सर्व प्रकारच्या अधोगतीचे मूळ आहे ज्याप्रमाणे गौतम बुद्धाने सर्व दुःखाचे मूळ कारण तृष्णा (इच्छा आकांक्षा) जाणले त्याप्रमाणे बसवेश्वरांनी निष्कर्ष काढला की सर्व अवनतीचे मूळ ' विषमता 'आहे. बसवेश्वर यांच्या काळात सामाजिक, धार्मिक ,राजकीय, आर्थिक , शैक्षणिक , भाषा, पर्यावरण आदी क्षेत्रांमध्ये विषमतेचा कहर माजला होत.. या सर्वांमध्ये बदल घडून आणण्यासाठी मोठी क्रांती केली व समानता प्रस्थापित केली. त्यांनी केलेल्या क्रांती जाणून घेण्यासाठी ढोबळ मानाने विभागणी केली तर तीन भाग दिसून येतात . 1)मानव समाजातील समानता 2)पंचमहाभूत आतील समानता 3)नैसर्गिक समानता येथे समानता म्हणजे एकात्मता , एकता , समान भाव होय नैसर्गिक भेदभाव नाहीसा करण्याचा प्रयत्न नव्हे तर मानवाने कृतीम पणे निर्माण केलेले भेदभाव नाहीशी करणे होईल

**1) मानवी समाजातील समानता :** बसवेश्वरांनी मानवातील भेदाभेद ओळखून त्यांचे निवारण करण्याचे कार्य केले ते पुढील प्रमाणे सांगता येईल.

अ) **लिंग**: पुरुष प्रधान असलेल्या हिंदू समाजामध्ये स्त्रियांना शूद्र अतिशूद्रा पेक्षा कनिष्ठ समजले जाते, स्त्री ही केवळ भोगाची वस्तू आहे ही भावना होती. पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही मन आहे ,भावना आहे, मती आहे, बुद्धी प्रबलता आहे, कल्पना प्रतिभा आहे , अध्यात्मिक भूक आहे हे सर्व बसवेश्वरांनी जाणून होते, तिच्या पूर्ण व्यक्तिमत्त्वाचे महत्त्व जाणून तिला लिंगधारणा करून पुरुषाच्या बरोबरीने स्थान मिळवून दिले व स्त्री पुरुष समानता निर्माण केली.

आ) **वय** : 'बालादपी सुभाषितम् ( लहान मुलांकडून शिकण्यासारखे खूप काही असते) या उक्तीप्रमाणे वयाने लहान असलेल्या मुलांना कनिष्ठ समजू नये ,वडील माणसांना श्रेष्ठ समजू नये सर्व समान आहेत.

इ) **वर्ण**: सनातनी वेद आधी जाणकाराने वर्णव्यवस्थेला पोषकता निर्माण करून व्यक्तीचा ज्या वर्णनात जन्म झाला त्यातच राहावे अशी व्यवस्था केली. ब्राह्मणांनी अध्ययन करावे , क्षत्रियांनी रक्षण करावे, वैशानी व्यापार व शूद्रांनी आणि वरील तीन वर्णाची चाकरी करावी असा भेद करणे योग्य नाही.

ई) **जाती उपजाती :** पुराण शास्त्रे पुढे करून जातीयतेचे समर्थन करणारे फसव्या मार्गाचा अवलंब करून अंगी असलेल्या कलेला जातीचे स्वरूप दिले . कपडे विणण्याची कला , कृषी कला, वाणिज्य कला , व्यापार कला , याबद्दल बसवेश्वरांनी अत्यंत परिणामकारी निरुपण केले आहे

"तापवून लोहार झाला, धुवून धोबी बनला ,
सुत विणून विणकर झाला,
वेद पठण करून ब्राह्मण झाला".

कलेला जात म्हणून ओळखले जाऊ लागल्यानंतर जाती सर्व एकत्र येऊ नये याची दक्षता पुरोहितांनी घेतली परंतु बसवेश्वरांनी यावर कडाडून हल्ला केला

उ) **कुल** : वडीला कडले कुळ, आई कडले कुळ, भावाचे कुळ असा भेदभाव न करता सर्व एका रक्ताचे आहेत यात भेदभाव करू नये.

ऊ) **गोत्र**: ब्राह्मण लोक ऋषी पासून आपला वंश प्रारंभ झाला हे दाखवण्यासाठी विश्वमित्र, जमदग्नी ,भरद्वाज, गौतम , अत्री वशिष्ट ,अगस्त्य ह्या साथ पैकी एका गोत्राचे आहेत सांगतात . नवीन लिंग धारण केलेल्यांना गोत्र कोणता सांगता येत नसे बसवेश्वर म्हणतात

"गोत्राचे नाव विचारता ,उत्तर न देता गप्प का रहाता ?
डोके खाली वाकून जमिनीवर का लिहीता
गोत्र आमचे मांग चन्नय्यांचे,
ढोर कक्कयाचे असे सांगावे कुंडल संगम देवा"

या निरुपणातून गोत्राचा भेदाभेद नको हे सांगण्याचा प्रयत्न करतात

ए) **गुरु शिष्य**: गुरु -शिष्य , गुरु- भक्त, जंगम -भक्त यांच्यात तरतम भाव नको कारण शिष्य किंवा भक्त पुढे अध्ययन साधनेने गुरु किंवा जंगम होऊ शकतात.

ऐ) **अवयव** : मानवी शरीरातील सर्व घटक हे समान आहेत. डोके श्रेष्ठ व पाय कनिष्ठ असे म्हणता येणार नाही. उजवा हात शुभ डावा हात अशुभ असा भेद करता येणार नाही.

तसेच गरीब-श्रीमंत, सुंदर कुरूप, तरुण वृद्ध ,शिक्षित-अशिक्षित, मालक- सेवक अशा अनेक तऱ्हेच्या भेदभाव दूर करण्याचे कार्य बसवेश्वरांनी केले वरील प्रकारचा सर्व भेद नाहीसा करण्यासाठी लिंग धारी सर्वजण समान आहे हा समानतेचा सिद्धांत मांडला व अनुभव मंडपातून अमलात आणला

**2) पंचमहाभूतातील समानता :** पंचमहाभूते म्हणजे पृथ्वी (जमीन) ,आप (पाणी), तेज ( अग्नी), वायू (वारा) ,व आकाश हे पंचमहाभूते आहेत. यात श्रेष्ठ कनिष्ठ असा कोणताही भेदभाव करू नये असे बसवेश्वर यांनी सांगितले .

अ)जमीन पृथ्वी तर सर्वांचाच भार सहन करते कोणतेही भेद करत नाही त्यामुळे ब्राह्मण ,ऋषी मुनी यांची निवासाची जागा हे श्रेष्ठ व चांडाळ शूद्र वेश्या यांची वस्ती अपवित्र असा प्रश्नच उद्भवत नाही.

आ)पाणी पूजेचे पाणी पवित्र . कपडे धुवायचे किंवा शौचालयाचे पाणी अपवित्र असा भेद करता येत नाही. ते केवळ शुद्ध किंवा अशुद्ध असा फरक करता येईल पाणी हे सर्वांचेच प्रतिबिंब आपल्यामध्ये दाखवित असतो त्यामुळे पवित्र पवित्र मानणे चुकीचे आहे.

जमीन व पाणी या बद्दल चे निरूपण बसवेश्वरांनी असे केले आहे.

" महारवाड्याची वा शीवालयाची
जमीन असे का वेगळी?
शौचाचे वा आजमनाचे पाणी
असे का शुची अशुची"

इ)अग्नि यज्ञात होम हवनासाठी वापरलेला अग्नी व स्वयंपाक घरातील अग्नी हा पवित्र मानने . शेव दहन करायचा अग्नि हा पवित्र मानणे चुकीचे आहे.

ई) वारा मंदिरातील वारा पवित्र शूद्रांच्या वस्तीतील वारा अपवित्र असा भेद करणे योग्य नाही. शुद्ध-अशुद्ध वारा असू शकतो परंतु पवित्र अपवित्र असा भेद निरर्थक आहे.

उ)आकाश मठा आकाश घटा आकाश त्यांच्यात भेद करणे व्यर्थ आहे आकाश सर्वत्र एकच आहे हे ते बसवेश्वर सांगतात की निसर्गातील वस्तू शुद्ध अशुद्ध असू शकतात पण पवित्र अपवित्र नाही पवित्र किंवा अपवित्र ही मनाची भावना आहे ज्याच्या मनी चांगले विचार चिंतन, आचार, सत्संकल्प असेल तर प्रत्येक वस्तू ही पवित्र समजावे जर मनात शंकाकुशंका वाईट विचार दृष्टिकोन असेल तर मन पवित्र ओळखावे .धार्मिक रूढी वाद्याने बरे-वाईट हा गोंधळ कायम पुढे चालु ठेवल्यामुळे लोका बद्दल वाईट भावना आमच्या मनात घर करून राहिले आहे.

**3) निसर्गातील समानता:** निसर्गातल्या सर्व वस्तू मध्ये बुद्धिचातुर्यवाद्याने भेदाभेद निर्माण केला. त्यामुळे माणसाच्या मनात अंधश्रद्धेची भावना निर्माण झाली. शुभ -अशुभ वस्तू असते अशी भीती दाखवण्यात आली .त्याविरुद्ध समतावादी बसवेश्वरांनी या भेदभावाला विरोध केला त्यांनी निसर्गातील कोण कोणत्या क्षेत्रांमध्ये भेदभावाला विरोध करून समता प्रस्थापित केली ते पाहू.

**अ) स्थल :** वाराणसी, रामेश्वर, गोकर्ण ,श्रीशैल इत्यादी धार्मिक क्षेत्रे , तीर्थक्षेत्रे आहेत म्हणून त्यांना पवित्र मानणे व खेडीपाडी शेतीची जमीन यांना कमी लेखणे हा भेदभाव व्यर्थ आहे.

**आ)काल :** सकाळची वेळ, सोमवार, गुरुवार ,पौर्णिमा, श्रावण महिना वगैरे पवित्र मानणे निशा, मंगळवार ,अमावस्या, फाल्गुन महिना अपवित्र मानणे चुकीचे आहे .विवाहाचा मुहूर्त शुभ अशुभ पाहणे निरर्थक आहे. यावर बसवेश्वरांनी खूप छान निरुपण केले आहे.

"माझ्यामुळे ध्यानातच येत नाही आमचा दिवस आणि तमका आठवडा
अमकी रास चांगली की वाईट माझ्या दृष्टीने रात्र हा एक विभाग आणि दिवस हा दुसरा विभाग. भक्तीची एक जातं आणि अ भक्तीची दुसरी जात "

त्यांच्या दृष्टीने सारेच दिवस सारखेच आहेत

**इ)पर्वत ,नदी :** शिवशंकराचे निवास स्थाना असलेला हिमालय पवित्र ,शिवाच्या जटातुन निघालेली गंगा तसेच सिंधू ,सरस्वती ह्या नद्या पवित्र समजल्या जातात. तर इतर नद्यांना अपवित्र समजणे अनुचित आहे.

**ई)वृक्ष:** हिंदू धर्मामध्ये वडा ला पवित्र मानले जाते. स्त्रिया पतीच्या दीर्घायुष्यासाठी त्याची पूजा करतात. पिंपळ हे बुद्धाचे प्रतीक तर औदुंबर दत्ताचे प्रतीक अशी भावना जनसामान्यात आहे. तुळशी नित्य पुजली जाते यांना पवित्र मानणे व इतर झाडांना अपवित्र मानणे चुकीचे आहे. सर्व झाडे उपयोगी असतात 'नास्ति मुलं औषधं ' औषध उपयोगी आहे

**उ) फुल-फळ :** पूजे साठी वापरले जाणारे फुले व फळे जसे कमल, पारिजात ,नारळ ,केळी, सुपारी आदी पवित्र मानणे व इतरांना गोन स्थान देणे हे चुकीचे आहे.

ऊ) प्राणी : गाय ,बैल , हत्ती , घोडा यांना पवित्र समजून पूजले जाते तर गाढव, कुत्रा, मांजर ,पाल यांना शुभ अशुभ मानले जाते .गाईला माता समजून पूजले जाते व म्हशीचे दूध रोजच्या जीवनात वापरून पण महत्त्व दिले जात नाही हा विरोधाभास योग्य नाही.

**ऊ)पक्षी** :गरुड मोर भारद्वाज यांना शुभ तर कावळा घुबड अशुभ मानले जाते हा भेदभाव योग्य नाही.

**ए)दिशा :** पूर्व ,पश्चिम ,दक्षिण उत्तर हे चार दिशा आहेत . आग्नेय, नैऋत्य ,वायव्य ,ईशान्य ही उपचार दिशा तर वर खाली दोन दिशा आहेत पूर्व दिशेला श्रेष्ठ मानणे व दक्षिण दिशेला अनिष्ट ही भावना योग्य नाही .सर्व दिशा ह्या समान आहेत

**ऐ) ग्रह :** ज्योतिष शास्त्रामध्ये ग्रहाबद्दल शुभ अशुभ असा भेदभाव केला आहे .त्यामुळे माणसांच्या मनात गुरु शुक्र श्रेष्ठ व चंद्र मंगळ शनि हे ग्रह अनिष्ट समजले जाते वास्तविकपणे सर्व ग्रह आपापल्या गतीने फिरत असतात. ह्यात शुभ-अशुभ फरक करणे योग्य नाही .

**ओ) नक्षत्र:** अश्विनी , भरणी, रोहिणी, पुष , धनिष्ठा ही नक्षत्रे शुभकारक तर आश्लेषा मूळ ही अनिष्ट कारक मानली जातात. याला वैज्ञानिक आधार नाही. काहीजण मनात अनिष्ट संशय निर्माण करतात खरे पाहिले तर आत्मविश्वासच शुभ आहे .संशय हे अशुभ आहे.

बाराव्या शतकात सामाजिक, धार्मिक ,आर्थिक राजकीय क्षेत्रातील विषमतावादी व्यवस्थेची चिकित्सा महात्मा बसवेश्वरांनी आपल्या वचन साहित्यातून केले. त्यांनी केवळ विश्लेषण केले नाही तर त्या काळातील सामाजिक विषमता नष्ट करणाऱ्या समतावादी विचाराच्या समाजरचने चा पुरस्कार केला. त्यांनी केलेला संघर्ष वर्तमान काळात समाजसुधारणेच्या चळवळी साठी प्रेरणादायी ठरणार आहे . विषमता याला शब्द समानता आहे जिथे विषमता तिथे समता निर्माण करण्याचे कार्य बसवेश्वरांनी केले म्हणून समतावादाचे जनक म्हणणे वेगळे ठरणार नाही.

## संदर्भसूची

*राधाकृष्णन सर्वपल्ली, धर्म और समाज, राजपाल अँड सन्स, दिल्ली, पृष्ठ क्रमांक79.*

*मेनकुदळे अशोक, आद्य समाज सुधारक महात्मा , महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी (कर्नाटक) दुसरी आवृत्ती, डिसेंबर 2008, पृष्ठ क्रमांक 81.*

*पाटील बाळासाहेब (संपा), बसव पथ (मराठी द्वैमासिक), मे - जून 2011, पृष्ठ क्रमांक 43.*

*पाटील बाळासाहेब (संपा), बसव पथ मराठी द्वैमासिक, नोव्हे- डिसें. 2010, पृष्ठ क्रमांक 34 35.*

*दोडमनी शालिनीताई (संपा.), महामानव बसवण्णांची समग्र वचने, पृष्ठ क्रमांक 30.*

*डोणगावकर वेदप्रकाश, महात्मा बसवेश्वरांचे तत्वज्ञान, पृष्ठ क्रमांक 25*

*जिरोबे राजेंद्र, वचनामृत बसवेश्वरी, श्री. व्ही. बी. पाटील, श्री. मृत्युंजय शरण साहित्य प्रचारक संघ, हिराबाग, मुंबई 1983, पृष्ठ क्रमांक 1*

*डॉक्टर सचितानंद बिचेवार, परिवर्तनाचा महामेरू महात्मा बसवेश्वर, स्वाती प्रकाशन पूर्णा, प्रथम प्रथम आवृत्ती, एप्रिल 2015, पृष्ठ क्रमांक.92, ते112*

*डॉ दे जवरेगौडा ,म. बसवेश्वर- डॉ आंबेडकर, महाराष्ट्र बसव परिषद , हिरेमठ संस्थान, भालकी जि बिदर,2013.*

*प्रा. राजशेखर म करडीगुद्दी, लिंगायत तत्वज्ञान व आचरण, महाराष्ट्र बसव परिषद, हिरमठ संस्थान , भालकी जि बिदर द्वितीय आवृत्ती 2013.*

## क्रांतिकारी युगप्रवर्तक बसवण्णा : एक अध्ययन

**डॉ शंकर गंगाधर शिवशेट्टे**
*हिन्दी विभागाध्यक्ष, श्री बंकटस्वामी महाविद्यालय,बीड*

साहित्य समाज का दर्पण है । साहित्यको समाज तक लाने का जिन महान विभूतियोने प्रयास किया है।और समाज में प्रचलित अंधविश्वास, अंधश्रद्धाओं, ऊँच-नीच, जाति-धर्म आदि में परिवर्तन लाकर समाज को आदर्श समाज बनाने के लिए जिन महापुरुषोने योगदान दिया वह संत तुकाराम महाराज, संत कबीरदास, महात्मा बसवेश्वर आदि संतों ने सामाजिक, सांस्कृतिक, नैतिक, आध्यात्मिक एवं साहित्यिक दृष्टि से देश को उनका महत्वपूर्ण योगदान रहा है। कर्नाटक की साहित्यिक इतिहास में 'शरण साहित्य' या 'वचन साहित्य' का अपना महत्वपूर्ण स्थान है। 'शरण साहित्य' काल की दृष्टी से प्राचीन होने के बावजूद भी प्रभाव, समृद्धता की दृष्टि से अधिक समकालीन रहा है। कहा जाता है कि 'शरण साहित्य' क्रांतिकारी साहित्य भी है । बारहवीं शताब्दी का यह युग कर्नाटक के साहित्य और संस्कृति की दृष्टि से अत्यंत प्रखर काल कहा जा सकता है। परंपरागत बंधनों से मुक्त होकर व्यक्ति स्वतंत्रता, मानवीय-मूल्यों के धरातल पर समाज का निर्माण करना ही शरण साहित्य का एक मात्र लक्ष्य रहा। कन्नड़ शरण साहित्य के प्रवर्तक के रूप में महात्मा बसवेश्वर को देख सकते हैं। उन्होंने अपनी क्रांतिकारी चिंतनों के कारण समाज में परिवर्तन लाने का महत्वपूर्ण कार्य किया।

बसवेश्वर का जन्म १२वीं शताब्दी के आरंभिक काल में हुआ । इनके आराध्य कृष्ण और मलप्रभा नदियों के संगम-स्थल पर स्थित 'संगमेश्वर' (शिव) नामक शिव-मंदिर था। यही कारण है कि इनके वचनों के अंत में सर्वत्र 'कूडलसंगमदेव' (शिव) संबोधन आता है। बसवेश्वर ने कलचूरी राज्य के बिज्जल महाराज के आस्थान के दंडनायक होकर राजनीतिक गुप्तचर विभाग में हो रहे अन्यायों का पर्दाफाश किया। समाज में प्रचलित राजनीतिक, सामाजिक, धार्मिक, आध्यात्मिक, नैतिक हीनताओं को देखकर उनमें सुधार लाने का प्रयास किया। समाज में जाति, धर्म, ऊँच-नीच आदि के कारण अव्यवस्था का वातावरण निर्माण हुआ था। राजनीतिक अस्थिरता के कारण सामान्य जनता का जीवन जर्जरित था। बसवेश्वर ने अपनी मेधाशक्ति, धैर्य के बल पर राजनीतिक कूटनीतियों को रोका।

बसवेश्वर ने अध्यात्मिक चिंतन को भी महत्वपूर्ण माना। आध्यात्मिक चिंतन के चक्राधिपति रहे। इसलिए उन्हें 'भक्तिभंडारी बसवण्ण' (भक्ति के आगर) के नाम से भी जाना जाता है। समाज में परिवर्तन लाने हेतु 'वीर शैव पंथ' की स्थापना की। इस पंथ के अंतर्गत सभी धर्मियों को अपनाकर लिंग धारण करवाया। 'अनुभव मंटप' का निर्माण करके विचार गोष्ठियों का आयोजन करते थे। इस सभा में सभी धर्मियों का प्रवेश था। अपनी प्रखर वाणी से समाज में प्रचलित बुराइयों को समाप्त करने का महत्तर कार्य किया। वचनों के माध्यम से सभी जाति-धर्म को लोगों को एकत्रित करके मानवीय मूल्यों का प्रसार किया। सामाजिक कुरीतियों की तीखी आलोचना की। इस संदर्भ में उनका एक वचन इस प्रकार का है -

"भक्तों (शिवभक्त या लिंगायत) को देखकर तुम (वे लोग, जो अवसरवादी होते हैं और समय को देखकर बदलते हैं) सिर मुंड़वाकर (बौद्ध) भिक्षु, जैन-साधुओं के सामने नंगे (दिगंबर और ब्राह्मणों के सामने हरिनाम जपनेवाले (वैष्णव) ब्राह्मण बन जाते हो- जैसा देखते हो, वैसे बन जाते हो इस प्रकर का वेश्यापुत्रों जैसा आचारण (व्यवहार) मत करो। अरे! कूडलसंगमदेव को पूजकर दूसरे देवताओं के सामने सिर झुकानेवाले और ऐसा करने के बाद भी अपने को भक्त कहनेवाले इस अज्ञानियों को क्या कहूँ?"

महात्मा बसवेश्वर के समय समाज में मूर्तिपूजा प्रचलित थी। मूर्तिपूजा के बहाने हिंसात्मक कृत्य फैले हुए थे। पत्थर की पूजा होती थी, लेकिन साधु-संत की अवहेलना की जाती थी। गरीब, भूखे लोगों को खाने के लिए अन्न नहीं रहता

था। लेकिन अज्ञानी जनता पत्थर पर दूध चढाकर उसकी पूजा करते थे। ऐसे संदर्भ में बसवेश्वर ने जनता में जागृति पैदा करने के लिए वचनों का सहारा लिया। लोगों के इस प्रकार के कार्यों की आलोचना करते हुए उन्होंने कहा कि-

कल्लनागर कंडर हालन्नेरे एंबरु
दिट नागर कंदरे कोल्लेंबरु अय्या
उंब जम्गम बंदरे नड़े येंबरु
ऊण्णद लिंगक्के बोनव हिडिवरय्या॥

पत्थर से निर्मित नाग की मूर्ति दिखायी देती है तो उस पर दूध चढाते हैं। लेकिन वहीं सजीव सांप को देखते ही उसकी हत्या करते हैं। भूखे-प्यासे जंगम अगर अन्न-पानी पूछते हैं तो उन्हें भगा देते हैं। वहीं न खानेवाले निर्जीव पत्थर पर दूध, प्रसाद समर्पण करते हैं। यह कैसा अजीब समाजिक प्रथा है, हे! कूडलसंगमदेवा।

मंदिरों का निर्माण करके भगवान की पूजा करने की प्रथा आज भी हमारे यहाँ प्रचलित है। लेकिन बसवेश्वर जी का मानना था कि भगवान तो सर्वव्यापी है उसको मंदिर बनाकर उसमें कैद करने की क्या आवश्यकता है? समाज में संपन्न व्यक्ति जब मंदिर बनाकर अपने पाप का प्रायश्चित करना चाहते थे, ऐसे लोगों को पर व्यंग्य करते हुए बसवेश्वर ने उनकी निंदा की और कहा -

उल्लवरु शिवालयव माडुवरु
नानेनु माडलि बडवनय्या
एन्न काले कंब
देहवे देगुल
शिरवे होन्न कलशवय्या, कूडलसंगमदेवा।

इस वचन में बसवेश्वर ने कहा है कि जो लक्ष्मी के पुत्र हैं वे संपत्ति से मंदिरों का निर्माण करेंगे। लेकिन मैं गरीब हूँ। मेरे पास उतनी संपत्ति नहीं है। इसलिए मेरे पैर ही खंभे हैं, शरीर ही मंदिर और सिर ही सोने का कलश है, कूडलसंगमदेवा! कहकर धार्मिक मित्यांडबरों का खंडन किया।

"हर एक को काम करना ही चाहिए। बिना परिश्रम से दूसरों की कमाई पर खाने का अधिकार किसी को नहीं है। काम-चोर का वैराग्य सचा वैराग्य नहीं है।"4 इस प्रकार महात्मा बसवण्णा का मानना था कि अपने कर्म के अनुसार हमें फल की प्राप्ति करनी चाहिए। अधिक आशा करने से मन में दुराशा उत्पन्न हो सकती है, जो भगवान की उपासना में बाधा पहुँचाती है। आये हुए संपत्ति में पहले साधु-संतों को दान देकर बाद में हमें प्रसाद स्वीकार करना चाहिए। इससे मानव का कल्याण होगा।

महात्मा बसवेश्वर उसी धर्म को श्रेष्ठ मानते थे जो मानव को मानव बनाये, मानव जाति का उद्धार करे, उसे सत्य के मार्ग पर चलने की शिक्षा प्रदान करे। धर्म, भक्ति में कुलीनता का वे विरोध करते थे। सभी धर्मों का मूल दया है मानकर उसे अपने वचनों के द्वारा लोगों में प्रसारित किया। धर्म की परिभाषा देते हुए कहा कि-

"दयविल्लद धर्मवावुदय्या?
दयवे बेकु सकल प्राणिगळेल्लरल्लि।
दयवे धर्मद मूलवय्या।"

ऐसा कौन-सा धर्म है जिसमें दया नहीं है? सभी प्राणियों के प्रति दया होनी चाहिए। दया ही धर्म का मूल है। इस प्रकार कहकर बसवेश्वर ने मानवता को एक उच्च धर्म के स्वरूप का परिचय कराया।

मानव के आचरण संबंधी विषयों पर भी बसवेश्वर ने वाणी से जनता के अंतरंग और बहिरंग शुद्धि का संदेश दिया है। उनके वचनों द्वारा समाज में मानव को कैसे रहना चाहिए, किस तरह जीने से हम भगवान के प्रिय बन सकते हैं इसका सुंदर चित्रण किया है। उनका यह वचन बहुत ही प्रसिद्ध है-

"कळबेड, कोलबेड, हुसिय नुडियलु बेड
मुनिय बेड, अन्यरिगे असह्य पड़बेड
तन्न बण्णिसबेड इदिर हळीयलु बेड
इदे अंतरंग शुद्धि! इदे बहिरंग शुद्धि
इदे नम्म कूडलसंगमननोलिसुव परि।"

इस वचन में उन्होंने यह संदेश दिया है कि- चोरी मत करो, हिंसा न करो, झूठ मत बोलो, क्रोध प्रकट न करो, अन्य जीवियों के प्रति घृणा मत करो, खुद की प्रशंसा मत करो, किसी के विश्वास को मत तोडो। यही अंतरंग और बहिरंग शुद्धि है और यही हमारे कूडलसंगमदेव को प्रसन्न करने के तरीके हैं। किस प्रकार सरल रीतियों को अपनाकर हम उस भगवान के प्रिय बन सकते हैं उसका सुंदर और सरल उपाय बसवेश्वर ने बताया है।
संसार की कमियों, बुराइयों के बारे में आप क्यों सोचते हैं, उसे सुधारने का प्रयास क्यों करते हैं। पहले अपने तन और मन को शुद्ध कीजिए। नहीं तो कुंडलसंगमदेवा आपको नजदीक नहीं आने देंगे।
निष्कर्षत: कह सकते है कि कन्नड़ साहित्य जगत में बसवेश्वर एक समाज सुधारक, मानव कल्याण के प्रवर्तक के रूप में उभरकर आये। उसी तरह हिन्दी साहित्य जगत मे संत कबीरदास द्वारा समाज में प्रचलित अहितकारी मान्यताओं, विश्वासों का खंडन किया। समाज के किसी भी धर्म, जाति या संप्रदाय के बंधन में न बंध कर मानव कल्याण, मानवोद्धार को अपना ध्येय मानकर समाज को सुधारने का महत्वपूर्ण कार्य किया।महात्मा बसवेश्वर ने भी अपने विचारों को 'वचन' नामक साहित्यिक विधा के माध्यम से प्रचलित करके मानव को मानव बनाने का प्रशंसनीय कार्य किया।

# महात्मा बसवेश्वरांचे नीतीतत्वावरील विचार

**डॉ. वसंत आनंदराव पवळे**

*सहाय्यक प्राध्यापक ,वाणिज्य विभाग, कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,शंकरनगर ता. बिलोली जि. नांदेड*

भारताच्या इतिहासात अनेक थोर पुरुष होऊन गेले. अशा थोरांची आज खरी गरज भासत आहे. बसवेश्वरांच्या कार्यातून अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, कर्मकांड, भेदभाव, जातीयता व अस्पृश्यतानी होरपळलेल्या समाजाला धाडस व नवचैतन्य देण्याचे कार्य केले. त्यातून होणारा मान-अपमान, टीका, सहन करून त्या विरोधात संघर्ष केला. त्यामुळे त्यांना विद्रोही असेही म्हटले गेले. तरीही त्यांनी न डगमगता देशातील धार्मिक, साहित्यिक, शैक्षणिक, राजकीय, समाज सेवेतून परिवर्तनच केले. वारंवार होणारा भेदभाव, जातिभेद, शोषण, यासाठी वेळोवेळी लढा देऊन तो यशस्वी केला. तेव्हा होणाऱ्या वर्णभेद, जातीवादावर, कडाडून टीका ही केली.

महात्मा बसवेश्वर यांचा जन्म इ.स.११३१ मध्ये कर्नाटक राज्यात विजापूर जिल्ह्यातील बागेवाडी या गावी झाला. सुरुवातीपासूनच बसवेश्वरांना दिन, दलित, गरीब, जातीयवादी, हिंसा वादी, ई.ना त्यानी लहानपणापासूनच विरोध दर्शविला होता. म्हणून त्यांनी वयाच्या आठव्या वर्षीच उपनयन संस्कारांना तिलांजली देऊन समाजातील अस्पृश्य, जातीयवादी, व्यभिचारी, होणाऱ्या अन्यायाला भेदभावांना योग्य वाचाआणी दिशा देण्याचे महान कार्य सुरू केले. बसवेश्वर हे हिंदू जातिव्यवस्थेवर संघर्ष करणारे पर्व समजले जाऊ लागले. त्यामुळे त्यांना विश्वगुरू असेही म्हटले गेले. ज्यामध्ये धर्म जात, लिंग, भेद यांची परवा न करता प्रत्येकाला समान न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. यासोबतच आठशे वर्षापासून अस्तित्वात असलेल्या नारी प्रतारनेचा खातमा केला. हे सर्व करत करत ते शिवभक्ती ही करत होते. भक्तीच्या माध्यमातून मठातील, मंदिरातील, होणाऱ्या अंधविश्वासाला ही कडा विरोध दर्शविला. त्यासाठी त्यांना खूप मोठा संघर्ष करावा लागला. म्हणूनच त्यांना कन्नड साहित्यातील हिरा मानले गेले. वास्तविक पाहता बसवेश्वर हे ब्राम्हण परिवारातील असून सुद्धा त्यांनी ब्राह्मण वादास जाणीवपुर्वक विरोध केला कारण त्यांचा कर्माच्या व्यवस्थेवर जास्त विश्वास होता. म्हणूनच जातीवाचक कूटनीति ला संपविण्यासाठी त्यांनी नवीन संप्रदायाची निर्मिती केली ती लिंगायत नावाने ओळखली जाते. कर्नाटकातील 18 टक्के लोक हे लिंगायत आहेत. लिंगायत समाजात वेदआणि मूर्तीपूजा, पूर्वजन्म, यावर विश्वास ठेवला नाही.

महात्मा बसवेश्वरांनी समाजातील विषमता दूर करण्यासाठी दोन क्रांतिकारी संकल्पना तयार केल्या त्यातल्याच एक कायक वे कैलास आणि दुसरी दासोह,कायक वे कैलास म्हणजे मनातून केलेली भक्ती हीच खरी उपासना आहे. शारीरिक परिश्रमातून मिळणारे सुख, वैभव, म्हणजेच प्राप्त झालेल्या स्वर्ग आहे. असे ते सांगतात.

**महात्मा बसवेश्वर यांचे नीतीतत्व विषयक विचार :-**

**१) लिंगाचार (धार्मिक नीति तत्व)**

मध्ययुगात "धर्म "ही प्रधान व्यवस्था होती. तेव्हा बसवेश्वरांनी लिंगा चारा च्या मदतीने धार्मिक नितीतत्वांचे प्रतिपादन केले. ज्यात एक देव उपासनेला महत्त्व दिले. विश्व निर्माता हा एकच देव असल्यामुळे एकाच देवाची पूजा करावी असे सांगितले. पृथ्वी जशी गोलाकार आहे. तसाच ईस्ट लिंगाचा आकार ही गोल आहे. म्हणून या ईस्टलिंगाची पूजा केली तर सर्व देवांची पूजा पूर्ण होते. कारण या छोट्याश्या इष्टलिंगातच विश्व सामावलेले आहे. या विश्वासतच जगविस्तार, नभोविस्तार असलेला परमात्मा तळहातावरील इष्टलिंगात सामावलेला आहे. बसवेश्वर लहान असताना मित्रासोबत खेळून खेळून त्यांना खूप तहान लागली तेव्हा त्यांनी आईला पाणी मागितले तेव्हा आई म्हणाली, बाळा', हे पाणी सोवळ्याचे आहे बाबांची पूजा पूर्ण होईपर्यंत तुला पाणी पिता येणार नाही. तू आणखी खेळून ये. हे ऐकून बसवेश्वरांनी होकारार्थी मान हलवली. बाबा पूजेत असल्याने त्यांचाही होकार-नकार मिळाला नाही. पाण्याच्या व्याकुळतेने त्यांनी वारंवार आईला विचारले पण आईकडून शेवटपर्यंत नकार मिळाला . त्या वेळातच बसवेश्वरांनी

अंगणात छोटे-छोटे आठ खड्डे केली. वडिलांची पूजा संपताच ते अंगणात आले. आणि पाहतात तर काय एकदम आठ खड्डडे.. बसवा, काय केलेस बाळा हे. तेव्हा बसवेश्वर म्हणाले, मी आईला वारंवार पाणी मागितले तिने दिले नाही. म्हणून पाण्यासाठी मी छोट्या-छोट्या विहिरी खोदून पाण्याचा शोध घेत होतो. तेव्हा वडिलांनी बसवेश्वरांना सांगितले की बाळा, एवढ्या खंड्या पेक्षा एकच मोठा खड्डा केला असतास,तर कदाचित तुला पाणी मिळाले असते. हे एकूण बसव म्हणाले, बाबा, तुम्ही पण शंभर देवाची पूजा करण्यापेक्षा एकाच देवाची पूजा केली असती. तर तुम्हालाही नक्कीच देव मिळाला असता. या उत्तराने बसवा चे वडील हतबल झाले. म्हणजेच एक देव उपासना करावी आणि ईस्टलिंग धारण केल्यानंतर इतर कोणत्याही देवाची पूजा न करणे हेच लिंगाचरणाचे नीती तत्व आहे. ज्यामध्ये कुठलाच जातीभेद न ठेवता धार्मिक समानता लिंगाचरणाच्मा आचरणामुळे शोषण, अनिष्ठ, रूढी, परंपरा, यांचा नायनाट होऊन नीतिमान समाजाची निर्मिती होऊ शकते हे सुचवले गेले आहे.

"लाखेचा वितळणारा देव कसा म्हणू?
आगीचा स्पर्श होताच सुरकुतनार्या देवाला कसा योग्य म्हणू?
प्रसंगाला विकला जाणाऱ्या देव कसा योग्य म्हणू?
हल्ल्याच्या भीतीने पुरला जाणारा देव कसा योग्य म्हणू?
सहज भावाचा ,
आत्मैक्य कुंडल संगम एकच देवा"

**2) सदाचार (आर्थिक आणि नीती तत्व)** दुसरा आचार हा सदाचार होय. जो आर्थिक निती तत्वाचे प्रतिपादन करतो. ज्या सदाचाराने सत्कारयातून प्राप्त केलेले धन हे समाजाच्या कल्याणासाठी दान करणे हेच पुण्यकर्म होय, हे दर्शविते. प्रमाणापेक्षा जास्त संपत्तीवर आपला अधिकार नसून समाजातील दीनदलित, वंचित, निराधार, अपंग, रोगी, यांच्या कल्याणासाठी याचा वापर हेच बसवेश्वरांच्या सदाचाराची शिकवण होईल. सदाचार यामुळेच व्यक्तीचे कल्याण, समाज कल्याण, राष्ट्र कल्याण व विश्वकल्याण कल्याण होऊ शकते. म्हणूनच आपण केलेल्या कार्याचा मोबदला धर्मासाठी, समाजासाठी, समर्पित करणे हेच आम्हा मोठेपण आहे. कारण त्यात ही प्रामाणिक असते दुसऱ्यांना फसवून, शोषण करून, चोरी करून, दारू विकून, असे कार्य होऊ शकत नाही. तर आपल्या कार्यातूनच समाज हित व्हावे जसे की आपण जेवढे कार्य करतो तेवढाच मोबदला स्वीकारला पाहिजे. जर कामचुकारपणा करून पूर्ण पगार घ्यायचे ठरवले. तर हे कार्य बसवेश्वरांच्या नीती तत्वात बसत नाही शुद्ध धन, संपत्ती ही लिंगाचे मूख असलेल्या जंगमास अर्पण करावी. नेहमीच दानधर्म जोपासणारी वृत्ती बाळगावी. उदाहरणार्थ शरण परीट माचीदेव कपडे धुऊन सर्वांच्या मनातील मालीन्य धूण्याचे कार्य करून ते गुरु झाले तर दोरी वळणारा शरण चंदय्या आपल्या कार्यातच सुख अनुभवून लिंग स्वरूपी झाले आणि झाडलोट करणारी सत्यका सर्वांच्या अंतःकरणातील राग, द्वेष दूर करून जंगम स्वरूपी झाली. म्हणजेच कर्म हे नुसते काम नसून तो एक जीवन योग आहे. काम हा पूर्ण योग आहे. शरणां नी कर्म, काम यांना कायक म्हटले तर दान याला पर्याय म्हणून दासोहाची शिकवण दिली. लिंगायत धर्मामध्ये दान केल्याशिवाय कार्याला पूर्णत्व प्राप्त होत नाही. म्हणूनच काम, कार्य आणि दान हे बसवेश्वरांच्या दृष्टीने खरा सदाचार आहोत.

"करू नको चोरी करू नको हत्या बोलू नको मी त्या कदापिही
नको मानु राग, नको तिरस्कार आत्मस्तुती पण बोलू नको,
हीच अंतरंग बहिरंग शुद्धी,
कुंडल संगम देवास प्रसन्न करणारी हि रीती..."

**३) शिवाचार (सामाजिक नीति भाव)** पंचचारातील शिवाचार चार हा तिसरा आचार आहे. जो सामाजिक नीती तत्वावर आहे. आपण सारेच परमात्म्याची लेकरे आहोत. त्यासाठी मतभेद, जातिभेद, न करता बंधुत्व पणाने जगणे म्हणजेच शिवाचार होय. एकमेकात मिसळून सहभोजन, सहजीवन, वंदन, पूजा हे शिवाचाराचे आचरण आहे. बसवेश्वर म्हणतात मी कोण, तू कोण, हा आमचा, हा तुमचा, असे न करता आम्ही सारे एकच आहोत. या भावनेतूनच

जगात एकच प्रेमभाव आहे. हात शिवाचारात जसे निसर्गनिर्मित परमात्म्याने लाभलेले पाणी, राहते घर, हवा, आकाश, प्रकाश, हे सर्व एकच असताना माणसात भेदभाव योग्य नाही. तर शिवाचाराचे पालन केल्याने सर्वांच्या हृदयातच शिवाचाऱ्या चे दर्शन होते. म्हणूनच बसवेश्वरांनी केवळ ईस्ट लिंगातच दर्शन घेतले नाही. तर प्रत्येक दीन, दलित, अस्पृश्य, शूद्र, अशा साऱ्यांना बसवेश्वरांनी पिता, दादा, बंधू, काका, अशा हृदयस्पर्शी नात्याने जवळ करून प्रेम दिले. आणि सर्वांना इष्टलिंग दीक्षा देऊन धार्मिक स्वातंत्र्य व समानता दिली. यामुळेच बसवेश्वरांनी केलेले ही एक सामाजिक क्रांती आहे हे स्पष्ट होते. महात्मा बसवेश्वरांनी जातिभेद, लिंगभेद, अस्पृश्यता निवारण, इत्यादीसाठी कायम संघर्ष केला. बसवेश्वर त्यांच्या समर्थनात म्हणतात. व्यक्ती जातीने नव्हे तर सदाचार, सद्‌गुणांनी श्रेष्ठ होतो. ज्यांच्या अंतरंगात शिवज्ञान, शिवानूभव, शिवाचार, असतो. तिथे सुतक नसतो. म्हणजेच उदाहरणार्थ, एकदा बसवेश्वर नागदेव कांबळे या शिवभक्तांच्या घरी जाऊन भोजनाचा आस्वाद घेतले. तेव्हा राजा बीज्वल म्हणतो. बसवां तुम्ही वेद, शास्त्र, पुराण, पंडितांना, अस्पृश्य मातंग, म्हणता आणि नागदेवास श्रेष्ठ शिवभक्त म्हणतात. हे नेमके काय आहे. शिवभक्तांच्या शरीरात दूध वाहते आणि इतरांच्या शरीरात रक्त वाहते. तेव्हा बसवेश्वरांनी राजा बीज्वलास स्वतः परीक्षण करून अनुभव घेण्यास सांगितले. नागी देव कांबळेला दरबारात बोलावून त्याच्या बोटाला जखम करण्यात आली. त्या जखमेतून अक्षरशः पांढरेशुभ्र दूध वाहू लागले. हे पाहून राजास धक्काच बसला. आणि शिवभक्ताची भक्ती कळली. जेव्हा या नागदेवाच्या शरीरातून दुध आले. याचाच अर्थ सदभक्तांच्या अंतरंगात सद्‌गुन असल्यामुळे तो शिवस्वरूपी होतो. सदाचार, सदभाव, हे शिवाचाराचे प्रतीक आहे.

" हा कोणाचा, हा कोणाचा, हा कोणाचा, म्हणू नका हो ,
हा आमचा ,हा आमचा ,हा आमचाच,
म्हणा हो कुंडलसंगम देवा ,हा आपल्या घरचा पुत्र म्हणा हो. "

**४) गणाचार (अन्यायाविरुद्ध सत्याग्रहाचे नीती तत्व)** अन्यायाविरुद्ध अहिंसात्मक रित्या प्रतिकार करणे म्हणजेच गणा चार होय. जीवन जगत असताना लिंगाचारा प्रमाणे कोणालाही त्रास होणार नाही. कोणावरही अन्याय होणार नाही. होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार म्हणून ओळख आहे. त्यास गणाचार् असे म्हणतात. संविधानाने जसे धर्माचे आचरण करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. ते हिरावण्याचा जर कोणी प्रयत्न करत असेल तर त्याविरुद्ध कायद्याच्या चौकटीत राहूनच विरोध केला पाहिजे. गणा चार म्हणजे सत्याग्रह आहे. ज्यात सत्यवादी, समतावादी, स्वातंत्र्यप्रिय लोकशाही, मूल्याच्या आचरणाचा एकत्रित संग्रह म्हणजेच गणाचार होय.

गणाचारात अंतरंगातील काम, क्रोध, लोभ, मोह, माया, मत्सर हे सूड उगवणारे विकार आहेत. तर कुलमद, विद्यामद, योवनमद, सौंदर्यमद, जातीमद, यांच्या प्रलोभनांपासून दूर राहावे. तसेच व्यसनमुक्त राहून आपल्यातील नकारात्मकता दूर करून सकारात्मक चिंतन करणे. हेच अंतरंगातील गणाचार आहे. तर बाह्य अंगातील गणाचार हे समाजातील रूढी, परंपरा, अन्याय, अत्याचार, शोषण, इत्यादी विरुद्ध आवाज उठवणे हे गणाचाराचे तत्त्व आहे. म्हणूनच गणाचारात विनय आणि विरत्व यांचा समावेश आहे. बसवेश्वरांनी समाज समृद्ध समाज निर्माण करण्यासाठी संघर्ष स्वतःहून सर्व दुर्गुणांचा, दुर्व्यसनांचा, त्याग करावा. सत्याग्रह आतून सामाजिक बदल घडवून समाजपरिवर्तनासाठी प्रयत्न करण्यासाठी विरत्वाचा विनय अंगी बाळगला पाहिजे. "देह कष्टवूनी मन शिणवूनी, तुमच्या चरण कमली येणारे भले हे बोल न दग्ध, करती कुंडल संगम देवा, शिवभक्तांच्या यातना त्याच लिंगाच्या यातना "

**५) भ्रत्याचार... (समाजाप्रती विनयशील नितीतत्व)** जीवनात प्रत्येकामध्ये विनय नम्रता शीलाचे आचरण म्हणजेच भ्रष्टाचार होय. गर्वाने अहंकाराने काहीच साध्य होत नाही ते विनयाने साध्य करून सहज विजयी मन जिंकता येते. म्हणून भ्रताचारी व्यक्तीने नेहमी संयमी आणि सहनशील प्रेमळ असेच वागावे. कारण विनय वंतास मरणाचे भय कधीच राहत नाही. आपले आई-वडील, कुटुंब, समाज, राष्ट्र, सदैव नम्रतेने राहिले पाहिजे त्यामुळेच आपल्या जडणघडणीत त्यांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष वाटा असतो. म्हणूनच यांच्याप्रती कृतज्ञता असावी. असे बसवेश्वर म्हणतात. मजहूनी सान नसे कोणी, शिवभक्तांहूनी नसे महान कोणी, बसवेश्वर म्हणजेच भक्तीच भांडार असून ते स्वतःला

भक्ती विहीन गरीब असेच म्हणायचे. कारण त्यांनी मातंग चेन्नय्यास पिता, कोहर कक्कयासआजोबा, किनी ब्रह्म यास बंधू, तसेच समाजातील लहान-थोर गरीब-श्रीमंत श्रेष्ठ-कनिष्ठ स्त्री पुरुष या सर्वांना पिता, बंधू, काका, दादा,

अशा कौटुंबिक नात्यांनी ते बोलत असत. म्हणूनच ते विश्व कुटुंबी झालेले आहेत. बसवेश्वर म्हणजेच "जुळलेले हस्त, नम्र मस्तक" असे समजले जात होते. बसवेश्वर यांच्या सोबतीची एक घटना अशी आहे की आंध्र प्रदेशातील किन्नर रमय्या हे अनुभव मंटपाचे सदस्य होते. ते महामनेत दान सेवा करीत होते. एकदा किन्नर ब्रह्म या आणि इतर स्वयंपाकी मिळून कांद्याची भाजी तयार करत होते. तेव्हा बसवेश्वरांना येथील कांद्याचा वास सहन न झाल्याने ते नाक बंद करून निघून गेलेले पाहून ब्रह्म याला आपण अपमानित झाल्यासारखे वाटले. व ते महामन सोडून निघून गेले. ही बातमी बसवेश्वरांना समजली माझ्यामुळे एका शरणा चे मन दुखावले. तेव्हा ते सर्वांना घेऊन प्रत्येकाच्या गळ्यात कांद्याच्या माळा घालून, बैलाच्या गळ्यात कांद्याची माळ घालून, बैलगाडीत कांदे भरून, दिसेल तिकडे कांदेच कांदे अशी गोड मिरवणूक थेट किन्नर ब्रह्म याचा घरी गेली. हे दृश्य पाहताच ब्रह्म याचा रुसवा क्षणात दूर झाला.

तो बसवेश्वरांच्या चरणासी लोटांगण घेणार तोच बसवेश्वरांनी कवटाळून अंतकरणातून त्याची क्षमा मागितली. तेव्हा ब्रह्म यांचे डोळे पाणावले एवढी थोर व्यक्ती विचारी व्यक्ती, एका सामान्या समोर कशी नतमस्तक होते. या उदाहरणातून बसवेश्वरांना समतेचे कल्याणी राज्य निर्माण करता आले. त्यामुळे बसवेश्वर त्यांच्या या तत्वात सांगतात की सर्वांशी नम्र राहून अहंकाराचा त्याग करून संयम सहनशीलता अंगीकृत करून, "व्यक्तिपेक्षा समाज श्रेष्ठ आहे" असा भाव हेच नम्रतेची लेणे असून सर्व जाती धर्मातील लोकांची समानतेचे संबंध निर्माण करून विनया ने जग जिंकावे. असा संदेश बसवेश्वर यांनी आपणास दिला आहे. ज्याची पालन व तत्त्वाचा अवलंब आपण सर्वांनी करून सामाजिक सलोखा, समानता, एकनिष्ठता, विनयशीलता, यांचे रक्षण करण्यासाठी प्रत्येकाने या तत्त्वाचा अवलंब करावा असी बसवेश्वरांची इच्छा आहे.

**संदर्भः-**

*प्रा. करडीगुद्दी आर.एम.(अनुवादक मराठी)वचन सिध्दांत सार-महाराष्ट्र बसव परिषद,*
*हिरेमठ संस्थान भालकी जि.बिदर प्रथम आवृत्ती १५जानेवारी,२०१६.*
*डॉ.सोमनाथ रोडे-सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा बसवेश्वर अश्विनी प्रकाशन, लातूर*
*प्रथमावृती अक्षय्य तृतीया दि.२७ एप्रिल,२००९*
*डॉ.श्रीदेवी शंकराप्पा कडगे-महात्मा बसवेश्वर व्यक्ती आणि वाड्.मय इसाप प्रकाशन,*
*नांदेड प्रथमावृती २८मार्च,२०१७.*
*सुभाष किशनराव देशपांडे-महात्मा बसवेश्वर कार्य आणि कर्तृत्व-जनशक्ती वाचक चळवळ*
*औरंगाबाद प्रथमावृती २१मार्च,२०१५.*
*डॉ. सचितानंद बिचेवार, परिवर्तनाचा महामेरू महात्मा बसवेश्वर, स्वाती प्रकाशन, पूर्णा- 2015*
*डॉ. शरदचंद्र देगलूरकर, संत साहित्याचा सामाजिक अन्वयार्थ,देगलूर-2004.*
*प्राचार्य शिवाजीराव भोसले, हितगोष्टी, अक्षरब्रह्म प्रकाशन, पुणे- 2004*

---

## महात्मा बसवेश्वर और भगवान महावीर के विचारों की साम्यता

**प्रा.डॉ.महावीर सुरेशचंद उदगीरकर**

*हिंदी विभाग, शाहीर अण्णाभाऊ साठे महाविद्यालय, मुखेड*

---

महापुरुष समाज की विरासत होते है। अज्ञानी समाज में ज्ञान की ज्योत जगाकर मानवता की बुनियाद को दृढ बनाते है। जात-धर्म से परे इनका कार्य और कर्तृत्व ही इनकी मुख्य पहचान होता है। स्वार्थवश हमने महापुरुषों को जात-धर्म के बंधनों में बाँधा है। सैंकडों वर्षो से मानव समाज महापुरुषों के विचारों पर चल रहा है और आगे भी चलता रहेगा। हम भारतवासी भाग्यशाली है, जिन्हें ऐसे महापुरुष, संत के विचारों का लाभ मिला है। अतः हमारा परम कर्तव्य है सकल प्राणीमात्र को सुरक्षित और प्रसन्नचित रखने हेतू महापुरुषों के विचारों का सही अर्थ में जीवन में अनुकरण करना चाहिए। विचारों के द्वारा ही आत्मानुशासन करना चाहिए। इसी महान परंपरा के दो महापुरुष है महात्मा बसवेश्वर और भगवान महावीर। महात्मा बसवेश्वर ने मध्ययुग में और चौबीसवे तीर्थंकर भगवान महावीर ने इ.स.पूर्व में समाज को सही राह दिखाई है। दोनों का संघर्ष फलदायी रहा है। इस आलेख में संक्षेप रुप में उनके विचारों की साम्यता के पहलुओं का विवेचन किया है, जो इस प्रकार है-

**१) शाकाहार :-**

महात्मा बसवेश्वर और भगवान महावीर दोनों ने शाकाहार का प्रचार-प्रसार किया। किसी जीव को वेदना देकर हम अपनी भूख नहीं मिटा सकते। मनुष्य का धर्म है, प्रत्येक जीव का सम्मान करना। विज्ञान ने भी साबित कर दिया है कि हम जो आहार लेते है, उसी के परिणाम स्वरुप हमारा मन और शरीर बन जाता हे। मनुष्य का स्थायी भाव शांति है। शांति से आत्मोन्नति प्राप्त होती है।

‘जैसे खावे अन्न वैसे होय मन।
जैसे पीवे पानी वैसे होवे वाणी।’

मनुष्य का मन बहुत चंचल होता है। उसे नियंत्रण में रखने हेतु हमें प्रयत्न करना पडता है। शाकाहार इसमें अहम् भूमिका निभाता है।

**२) जीवों के प्रति आदर भाव :-**

महात्मा बसवेश्वर और भगवान महावीर दोनों मानवता के पक्षधर थे। मनुष्य हो अथवा प्राणी मात्र हो सभी जीवों के प्रति आदर भाव होना, प्रत्येक का कर्तव्य होना चाहिए। जैन धर्म में एक श्लोक है ‘परस्परोपग्रहो जीवानाम’। अर्थात एक जीव दुसरे जीव पर आश्रित है। सभी को स्वतंत्र्य रुप से जीने का अधिकार है। दोनों ही महापुरुषोंने इस विचार को इसीलिए प्रसारित किया क्यों कि कुछ अज्ञानी यज्ञ, होम-हवन के अवसर पर निष्पाप प्राणियों की बली चढ़ाते थे। समाज में अंधश्रध्दा का प्रसार दुर्भाग्य से बढ़ रहा था। मानवता को खतरा निर्माण हो रहा था। इसलिए महात्मा बसवेश्वर और भगवान महावीर दोनों ने जीव सृष्टी के प्रति ममत्व की भावना रखी। दयाभाव अपनाने का आग्रह किया।

**३) उत्तम चारित्र्य का संवर्धन :-**

जैन तत्वज्ञान में भगवान महावीर ने मनुष्य के लिए त्रिरत्न दिये है। जिनके सहारे जीवनयापन करने को कहा है। वह है सम्यक दर्शन, सम्यक ज्ञान और सम्यक चारित्र्य। अर्थात यदि मनुष्य उचित, योग्य विचार अथवा घटना का दर्शन करता है तथा योग्य ज्ञान ग्रहण करता है तो वह उत्तम चारित्र्य संपन्न बन सकता है। चारित्र्य का संबंध उसके कृति से है। कृति दर्शन और ज्ञान पर आधारित होती है। भगवान महावीर के अनुसार यह त्रिरत्न जीवन के अभिन्न अंग है। उसी प्रकार महात्मा बसवेश्वर ने भी चारित्र्य की दृढ बुनियाद को मजबुती देने के लिए निष्कलंक चारित्र्यवाले मनुष्य की आवश्यकता पर बल दिया है। जीवन में धन-वैभव, सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा से बढकर मनुष्य का चारित्र्य होता है। उसे प्राप्त करणे के लिए कठोर साधना, तपस्या, त्याग और संयम की आवश्यकता होती है। तत्कालिन परिवेश को देखते हुए मध्ययुग में महात्मा बसवेश्वर ने मनुष्य की अंतरंग और बहिरंग शुध्दता को महत्व देते है। चारित्र्य का संबंध शुध्दता से होता है। दोनों ही महापुरुषों ने विषभरे मन को मनुष्य के लिए खतरा है ऐसा कहा है। उत्तम चारित्र्यवाले मनुष्य ही उस देश की धरोहर होते है।

**४) सदाचार :-**

भगवान महावीर ने पंचतत्त्व के द्वारा मनुष्य के सदाचार की कल्पना की है। इन तत्त्वों में सत्य, अहिंसा,अचौर्य, अपरिग्रह और ब्रह्मचर्य है। मनुष्य के आचरण में इन तत्त्वों का होना आवश्यक है। सत्यवादी आचरण मनुष्य को उज्वल बनाता है। शारीरिक और मानसिक हिंसा से बचना चाहिए। पराई वस्तु को अपना मानना अथवा चोरी करना अनैतिक है। आवश्यकता से अधिक धनसंपत्ती का मोह रखना परिग्रह की वृत्ती को बढ़ाता है। इसीलिए लोभ-मोह माया से दूर रहना तथा पर स्त्री के प्रति माँ-बहन का रिश्ता स्थापित करना उत्तम ब्रह्मचर्य तत्व कहलाता है। इन तत्त्वों के आचरण से मनुष्य सदाचारी बनता है।

महात्मा बसवेश्वरने भी सदाचारी बनने हेतू सुसंवाद की आवश्यकता प्रतिपादित की। सुसंवाद का आधार मन की पवित्रता, शुध्दता से होता है। मनुष्य जितना तत्त्व, मूल्य का अभ्यास करता है ओर उसे आचरण में लाता है उतना ही वह सदाचारी बनता है। ईश्वर के चरणों में शरण जाना ही लिनता कहलाता है। समर्पन भाव मनुष्य को सदाचारी बनाता है। अच्छे विचारों पर मार्गाक्रमण करना ही सुख-शांति प्राप्ति का साधन है।

सदाचार के संदर्भ में महात्मा बसवेश्वर भी मौलिक विचार देते है। किसी का तिरस्कार, निंदा नहीं करनी चाहिए। असत्य वचनों से बचना चाहिए। हिंसा से दूर रहना चाहिए। चोरी आदि अमानवीय दुष्कर्मो से दूर रहना ही सदाचरण है। साथ-साथ वे परिश्रम का महत्व भी विशद करते है। व्यक्ति को श्रम की प्रतिष्ठा बनाए रखनी चाहिए। श्रमजीवी समाज ही आदर्श बन सकता है। सदाचारी बनने हेतू मनुष्य को उसके अंतरंग और बहिरंग की शुध्दता का ध्यान रखना चाहिए।

ऐसे अनेक सिध्दांत, विचार है जो दोनों में समान नजर आते है। उन्हें शब्दों में बाँधना कठिण है। दोनों ही महापरुषों के विचारों की तुलना करते है तो कई समान मुद्दे नजर आते है। दोनों ने तप, त्याग, साधना के आधार पर आत्मोन्नति प्राप्त की। यही सूत्र सकल समाज के लिए सर्वोन्नति का मार्ग प्रशस्त करता है। समाज का हर वर्ग इन मानवतावादी विचारों से जब बंध जाता है तो वहाँ परमोन्नति की अवस्था आ जाती है। आदर्श समाज की तस्वीर नजर आती है। महात्मा बसवेश्वर ने लिंगायत धर्म की और भगवान महावीर ने जैन धर्म की पताका चारों दिशाओं में लहरायी। दोनों के अनेक अनुयायी धर्म प्रसार के पुनित कार्य में अनवरत रुप से कार्य कर रहे है।

महात्मा बसवेश्वर और भगवान महावीर के कार्य, विचार और चरित्र से हमें प्रेरणा लेनी चाहिए। जीवन में कठिण से कठिण समय पर हिंमत नहीं हारनी चाहिए। संयम और आत्मानुशासन के बल पर कठिण समय को सफलता की सीढी मानकर चलना चाहिए। विपरित परिस्थितियों को सुअवसर के रुप में परिवर्तित करने की क्षमता विकसित करना ही दोनों के जीवन का सार है। भौतिक जगत में मोह-माया, परिग्रह मनुष्य को विचलित करता है। हमारे अंदर विषय-विकार उत्पन्न करता है। ऐसे में आत्मकल्याण से विश्वकल्याण की भावना का विकास करने में भगवान महावीर और महात्मा बसवेश्वर के विचार लाभप्रद साबित होते है।

---

## बाराव्या शतकातील सामाजिक क्रांतीचे उदगाते : जगतज्योती महात्मा बसवेश्वर

**प्रा. डॉ. विजयकुमार शिवदास ढोले**
*मराठी विभाग प्रमुख, संजीवनी महाविद्यालय चापोली, ता.चाकूर जिल्हा लातूर - 413513*
*Email : dholevijay77@gmail.com मो. नं.8788959600*

---

**प्रस्तावना :**

" कायकवे कैलास " हा महामंत्र जगाला देणारे, समाजाच्या, देशाच्या, या जगाच्या कल्याणासाठी प्रत्येक माणसाने श्रमच म्हणजे कायकच केले पाहिजे. श्रम (क्रिया) हेच जीवन, श्रम हाच देव, श्रम हीच पूजा, श्रम हाच स्वर्ग आहे, असा मंत्र जगाला देणारे, श्रमप्रतिष्ठेला रुजवणारे महामानव जगतज्योती महात्मा बसवेश्वर हे बाराव्या शतकातील सामाजिक क्रांतीचे उद्गाते होते.ज्या काळात कर्मकांड, अंधश्रद्धा, जातीप्रथा, सतीप्रथा, वर्णभेद, विषमतावादाच्या विळख्यात आपला देश, या देशातील छोटी छोटी राज्य अडकली होती. राज्यातील बहुजन जनता खूपच त्रस्त होती. त्याकाळात समतानायक, मानवतावादी, स्त्री-स्वातंत्र्याचा उपासक, महामानव महात्मा बसवेश्वर यांचा जन्म झाला. कर्नाटक राज्यातील विजापूर जिल्ह्यातील बागेवाडी या गावी 25 एप्रिल1105 रोजी मादीराज व मदलांबिका यांच्या पोटी महामानव महात्मा बसवेश्वर यांचा जन्म झाला. बालपणापासूनच बसवेश्वर हे हुशार, कुशाग्र व चिकित्सक वृत्तीचे होते. मंडगी हे त्यांचे आडनाव होते.मादीराज यांना गावात खूप मान-सन्मान होता. त्यांचे घराणे पाशुपत शैव होते. लोक यज्ञ का करतात? यज्ञात बोकड या अन्य प्राण्याचा बळी का देतात? अस्पृश्यांचा स्पर्शाने माणूस कसा काय बाटतो? सर्व माणसे असून त्यांच्यात भेदभाव का आहेत? असे अनेक सामाजिक क्रांतीला प्रेरणा देणारे प्रश्न बालपणात बसवेश्वर आपल्या वडिलांना विचारत होते. त्यामुळे संपूर्ण कुटुंब चिंताग्रस्त झाले होते.मादीराज हे ब्राह्मणी वर्चस्वाखाली वागत होते. मुलगा मात्र त्यांच्या विरुद्ध दिशेने जात होता. सत्याचा मार्ग, जनकल्याणाचा मार्ग, श्रद्धेचा, सुखाचा, मानवी कल्याणाचा नवा धर्म शोधण्यात महात्मा बसवेश्वर रात्रंदिन व्यस्त होते.

महात्मा बसवेश्वरांनी जीवनभर जगाच्या, मानवाच्या कल्याणासाठी आपले जीवन अर्पित केले. त्यांचे कार्य भारतालाच काय जगातील प्रत्येक देशाला प्रेरणादायी होते. त्यांच्या जन्माच्या अगोदर या तत्काळात देशातील सामाजिक परिस्थिती काय होती? याबद्दल नागप्पा भीमराव शरणार्थी यांनी असे म्हटले आहे की-"बसवपूर्वकाळात कर्नाटकाची सामान्य जनता राजसत्ता, धर्मसत्ता आणि पुरुष सत्तेच्या कचाट्यात सापडली होती. दुर्बल जनाचे शोषण करीत उच्च वर्गातील लोक आपले ऐष आरामी जीवन जगत होते. गरीब,पददलित जनतेचे अतिशय हाल होत होते. देव आणि धर्म हे उच्चवर्णीयांच्या हातचे खेळणे बनले होते. समाजात विषमता पराकोटीला पोहोचली होती. धार्मिक व राजकीय अस्थिरतेच्या अतिरेक झाला होता. पुरोहित व कर्मठ लोकांच्या हातात धर्म सापडला होता. महिला त्यांच्या गुलामगिरीत अन्याय, हाल सहन करीत होत्या. अंधश्रद्धेचा प्रभाव वाढला होता. हा सर्व अन्याय असाह्य होत असल्यामुळे नव्या प्रकाशासाठी जनता असुरली होती. अशा विषम परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर क्रांतीज्योती महामानव बसवेश्वर अवतीर्ण झाले."1यावरून बसव कालीन व पूर्वकालीन सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीचा परामर्श आपणास वास्तवपणे कळतो आहे. जात, धर्म व वर्णभेदाने बहुजन समाज त्रस्त होता. स्त्री गुलामगिरीत अडकलेली होती. जनता अंधश्रद्धेत वाहत होती. अज्ञानाच्या अंधकारात जनतेचे हाल होत होते. कर्मठ ब्राह्मण समाज व उच्चवर्णीय श्रीमंत लोकांनी दुर्बल बहुजनांचे शोषण केले होते. अशा विषमतावादी परिस्थितीत श्रम व दासोहाची, समतेची, मानवतेची व विश्वबंधुत्वतेची शिकवण देणारे नव्हे, त्याचपद्धतीचे कल्याणकारी राज्य आंमलात आणणारे क्रांतिसूर्य महात्मा बसवण्णाहे भारतासारख्या देशात अवतरले हे तुम्हा आम्हा सर्वांचे भाग्यच होय. लहानपणीच अस्पृश्यांच्या विहिरीत बुडत असलेल्या मुलाला बसवेश्वरांनी बाहेर काढून

त्याचा जीव वाचवला, या घटनेपासूनच महात्मा बसवेश्वर यांच्या सामाजिक कार्याला सुरुवात झालेली आपणास दिसते.

महात्मा बसवेश्वरांनी कुंडलसंगम येथे 12वर्षे शिक्षण घेतले. देशातील सर्व परिस्थितीचा अभ्यास केला. मामा बलदेवाच्या विनंतीवरून मंगळवेढ्यात येऊन राजा बिज्जलाच्या दरबारात रुजू झाले. पुढे बिज्जलराजाने कल्याणच्या चालुक्य राजाचा पराभव केला व ते कल्याण चा राजा बनले. बिज्जल राजाने कल्याणचा प्रधानमंत्री म्हणून बसवेश्वरांना राजवस्त्रे दिली. राज्यकारभार संपल्यावर मंगळवेढ्यातील दीनदलित, गरीब, बहुजन लोकांच्या घरी जाऊन महात्मा बसवेश्वर त्यांची जिव्हाळ्याने चौकशी करू लागले. अस्पृश्यांच्या घरी जाऊ लागले. त्यांच्याशी समतेने वागू लागले. मंगलवेड्यातच सामाजिक क्रांती चा उगम झाला. खूप अभ्यास व चिंतनाने बसवेश्वरांचे मन चिकित्सक बनले. जातीप्रथा, धर्मप्रथा, अंधश्रद्धा, वर्णभेद यांच्याविरुद्ध ते पेटून उठले. सामाजिक समतेचा लढा बाराव्या शतकात त्यांनी सुरू केला. पुढे कल्याणला आल्यावर अनुभवमंटपाची स्थापणा करून कल्याणला क्रांती केंद्र बनविले.

महात्मा बसवेश्वरांनी प्राचीन काळापासून चालत आलेल्या जातीप्रथेला, वर्णव्यवस्थेला, सामाजिक विषमतेला विरोध करून सामाजिक समता स्थापन केली. जीवनभर त्यांनी बहुजनांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले. ढोर, महार, मांग, धनगर, हटकर, चांभार, कुंभार, सुतार,न्हावी,पोतराज या शुद्र जातीच्या लोकांना समतेची वागणूक दिली. ते आपल्या वचनात असे म्हणतात की,

" वडील आमचे मादार चेन्नय्या
आजोबा आमचे डोहर कक्कय्या
चुलते आमचे चिक्कय्या पहा
दादा आमचे किन्नरी बोम्मय्या
तरीहि मज का बरे तुम्ही
जाणत नाही कुंडलसंगम देवा?"

उच्च कुळामध्ये जन्म घेऊनसुद्धा महात्मा बसवण्णाअस्पृश्यांना वडील, आजोबा, दादा, चुलता यांच्या ठिकाणी बहुमान देऊन त्यांना समतेची वागणूक दिली. अस्पृश्यांच्या अडिअडचणी सोडवून त्यांना मान प्रतिष्ठा मिळवून दिली. श्रमाचे व दासोहाचे मंत्र देऊन जीवन जगण्याचा सुकर मार्ग जगाला त्यांनी सांगितला. सर्व अस्पृश्य व बहुजनांना समतेची वागणूक महात्मा बसवेश्वरांना दिली. म्हणूनच सर्व अस्पृश्यांनी देवा पेक्षाही जास्त महात्मा बसवेश्वर यांची पूजा केली. महात्मा बसवेश्वरांना खंत होती की, मी उच्च कुळात जन्माला आलो हे बहुजन लोक मला आपलं मानतील का? पण सर्व बहुजनांनी त्यांना आपल्या हृदयात स्थान दिले.

महात्मा बसवेश्वरांनी राजा बिज्जलाच्या जुन्याराजमहालाच्या खोदकामात सापडलेलला ताम्रपट वाचून दाखवला हा ताम्रपट राज्यातील अनेक हुशार, ज्ञानवंत पंडितानाही वाचता आला नाही. ताम्रपटनुसार राजसिंहासनाखाली धन लपवून ठेवले होते. ही माहिती महात्मा बसवेश्वरांनी राजा बिज्जलाला दिली.त्यानुसार सिंहासनाखाली खोदल्यानंतर सात हंडे धनाचे सापडले. राजा बिज्जल खुष झाला. राजाने त्यांना काही धन देऊ केले. ते घेण्यास त्यांनी नकार दिला."त्या धनावर जनतेचा हक्क आहे. तो जनतेचा पैसा आहे. असे बसवण्णाराजा बिज्जलास म्हणाले."2यावरून राजाने सर्व सापडलेले धन महात्मा बसवेश्वर यांच्या नेतृत्वाखाली लोककल्याणाच्या कामात खर्च केले. राजा जनतेचा सेवक आहेमालक नाही. असे महात्मा बसवेश्वर यांची विचारधारा होती. त्यांना पैशाचा मोह नव्हता. जनसामान्याचा विकास व्हावा हा कळवळा होता. आजच्या नेतेमंडळींनी जी राज्यकारभार करत आहेत. त्यातील अनेक नेते भ्रष्टाचारी असलेले आपणास पहावयास मिळतात. आजपर्यंत नेतेमंडळी या अनेक दिग्गज मंडळींनी अनेक घोटाळे करून जनतेचा पैसा हडप केला आहे. देशाचा विकास व्हायचा असेल तर श्रम व दासोह हे दोन्हीही खूप महत्त्वाचे आहेत.हा मार्ग बाराव्या शतकात राजापासून-मजूरापर्यंत सर्वांनाच महात्मा बसवेश्वर यांनी सांगितला आहे. भ्रष्टाचारापेक्षा सदाचाराला, सत्याला,कष्टाला महत्त्व आहे हिच महात्मा बसवेश्वरांच्या वचनाची मार्मिकता आहे.

राज्यामध्ये लोकशाही या जनतेचे राज्य यावे यासाठी त्यांनी कल्याण येथे अनुभवमंटपाची स्थापणा केली. त्यांचे अध्यक्षपद त्यांनी अल्लमप्रभू सारख्या विद्वान ऋषीकडे प्रदान केले. स्वतःत्या अनुभवमंटपात ते सर्व शरणाच्या सानिध्यात बसून जनकल्याणावर, बहुजनांच्या विकासावर, स्त्री स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, मानवतावादी राज्यकारभार करण्यावर चर्चा करत असत. या अनुभवमंटपात सर्व जाती-धर्मातील 770 शरण सहभागी होते. त्यापैकी 70 स्त्रिया होत्या.70 स्त्रियांपैकी 33स्त्रियांनी वचने लिहिली.प्रा. पाटील वडॉ. करजकर अनुभवमंटपाबद्दल असे म्हणतात की,- “अनुभवमंटप समतावादी विचाराचे माणस घडविणारे विचारमंदिर, समता मंदिर होते....अनुभवमंटप एक मंदिर नाव्हे, ते एक विचारपीठ आहे. माणसांनानीती, नैतिकता व सदाचार शिकवणारे ते नैतिक संस्कार केंद्र होते.”3अनुभव मंटपामध्ये सर्व जाती धर्मातील शरणांनास्थान होते. समता, मानवता, विश्वबंधुता या मूल्यांचे जतन करून जातीभेद, वर्णभेद,धर्मभेद यांना विरोध करून नवसमाज निर्मिती करण्याचे लोकशाही केंद्र म्हणजे अनुभवमंटप होय. ती जगातली पहिली संसद होय.

अनुभवमंटपामुळे अनेक शरणांनी उत्तम अशी वचने लिहिली. महात्मा बसवेश्वर एक प्रतिभावंत कवी होते. त्यांनी आपल्या वचनातून स्त्रियांना समानतेचा दर्जा दिला. त्यांना शिक्षणाचा अधिकार दिला. त्यांना स्वातंत्र्य दिले. मानवाधिकार व सामाजिक समता व न्याय यांचा त्रिवेणी संगम म्हणजे अनुभवमंटप होय. स्त्रीवादी साहित्यनिर्मितीचे केंद्र अनुभवमंटप होते. निरक्षरांना साक्षर करणे व ज्ञानरूपी प्रकाश समाजामध्ये निर्माण करून सत्यासाठी, समतेसाठी क्रांती करणे अनुभव मंटपाचे कार्य होते. महात्मा बसवेश्वरांनी आपल्या वचन साहित्यातून सामाजिक क्रांती केली आहे. समाजपरिवर्तन, प्रबोधन, नैतिकता, मानवता, विश्वबंधुता या विचाराचे लेखनक्रांती म्हणजे वचन साहित्य होय.महात्मा बसवेश्वर आपल्या वचनामध्ये म्हणतात की–

“ हा कोणाचा, हा कोणाचा, हा कुणाचा Iऐसे नच म्हणवी देवा
हा आमचा, हा आमचा, हा आमचा I असे म्हणवी देवा,
कुंडलसंगम देवा, तुमच्या घरचा पुत्र म्हणवा हो देवा.”

यावचनामधून “ हे विश्वची माझे घर! ” हा समतेचा, मानवतेचा व विश्वबंधुत्वाचा संदेश महात्मा बसवेश्वर देतात. कोणी कोणत्याही जातीचा, धर्माचा, प्रांताचा,वर्णाचा या वर्गाचा असो ती सर्व माणसच आहेत. संपूर्ण मानवजात समान आहे. या ठिकाणी सामाजिक विषमतेवर प्रखर टीका करून सामाजिक ऐक्य स्थापण करण्याचा क्रांतिकारी प्रयत्न महात्मा बसवेश्वरांनी केला आहे.

महात्मा बसवेश्वरांनी अंधश्रद्धा,अनाचार ,अत्याचार व ढोंगी लोकावर खूप टीका केली आहे. बोकड देवीला कापल्याने संसार सुखी होत नाही. दारू पिल्याने संसाराचे वाटोळे होते. अंधश्रद्धा व ढोंगी लोकांवर खूप प्रहार त्यांनी केला. डॉ. वेदप्रकाश डोणगावकर “अंधश्रद्धा निर्मूलन आणि बसव विचार” या लेखात अंधश्रद्धेबद्दल असे म्हणतात की,-“जोपर्यंत माणसाची मानसिकता व्यापक बनणार नाही, आपला आणि परका भेद मिटणार नाही. तोपर्यंत खऱ्या अर्थाने समाजात पसरलेली ही सामाजिक अंधश्रद्धा संपविता येणार नाही. कोणतेही अंधश्रद्धा म्हणजे अविवेकीपणा आहे. तो अज्ञानाचा परिणाम आहे”.4या विचाराचे मर्म महात्माबसवणाच्या प्रतिभाशाली बुद्धीकौशल्यात जागृत झाले होते. म्हणुनच त्यांनी अंधश्रद्धारुपी अविवेक व अज्ञान जनमानसाच्या जीवनातून वचनरूपी तत्वज्ञानाचे अमृत पाजून काढून टाकले. स्वार्थीपणापेक्षा आपलेपणा चांगला असतो, असे सांगून बहुजन समाजाचा विवेक वचनाच्या माध्यमातून महात्मा बसवेश्वरानी जागृत केला. समाजालाही जागृत बनवले,विवेकी केले त्यामुळेच सामाजिक ऐक्य स्थापणझाले. लोकांना अनुभवमंट पाच्या साह्याने श्रद्धावान बनविले. ज्ञानी बनविले. महात्मा बसवेश्वर आपल्या वचनात म्हणतात की,-

“ज्ञानाच्या बलाने अज्ञानाचा नाश पाहा हो
ज्योतीच्या बलाने अंधकाराचा नाश पाहा हो
सत्याच्या बलाने असत्याचा नाश पाहा हो
परिसाच्या स्पर्शाने लोहत्वाचानाश पाहा हो

कुडलसंगमदेवाच्या,शरणाच्या अनुभवाने
मम भव नाशपाहाहो "

यावरून ज्ञान अज्ञानाचा, ज्योती अंधकाराचा, सत्य असत्याचा, परीस लोहाचा नाश करतो. त्याप्रमाणे शरण म्हणजे सत्यवचनी, संत, सज्जनांच्या सहवासाने आपल्या मनातील अज्ञान अंधश्रद्धा, अंधकार दूर निघून जातो. म्हणूनच मादार चेन्नय्या, चांभार हारळय्या,ढोर कक्कय्या, महार नागदेव,हडपद अप्पण्णा इत्यादी विविध जातीतील शरणांना अंधश्रद्धा, अज्ञानापासून दूर करून समाजात समता व मानवता स्थापन करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. जात, पात न मानता माणूस हा एकच आहे. ब्राह्मणी वर्चस्वाला नाकारून 'माणसाने माणसाशी माणसासारखे वागावे' ही मानवतावादाची शिकवण त्यांनी दिली."भूमी एकच आहे महारवाडा व शिवालय" यावरून सामाजिक व जातीय ऐक्य भावना आपणास दिसून येते. अस्पृश्यता निर्मूलन संदर्भातडॉ.दे.जवरेगौडा असे म्हणतात की,-"अस्पृश्यता निर्मुलन करण्यात राष्ट्राचा उद्धार असल्याचे जाणलेले बसवेश्वर हे प्रथम पुरुष होत. अस्पृश्यतेचा नाश झाला तरच जातीयता नष्ट होते. जातीयता नि:शेष झाल्यास सामाजिक क्रांती यशस्वी होते. सामाजिक क्रांती झाल्याशिवाय देशाची प्रगती होणार नाही, हे बसवण्णायांनी जाणले होते."5 माणसा-माणसात विषमतेचा मोठा आगडोंब निर्माण झाला होता. त्यावेळी ब्राह्मणी वर्चस्वाने अस्पृश्यांना खूपच हीनतेची वागणूक देऊन छळण्याचे काम केले होते. म्हणून महारवाडा व शिवालय यांची जमीन एकच आहे. त्याचप्रमाणे सर्व जातीतील माणसे समान आहेत. त्यांना मायेने वागवले पाहिजे.हीयशस्वी सामाजिक क्रांती कल्याण येथे महात्मा बसवेश्वरांनी केली.

महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकांमध्ये पहिला आंतरजातीय विवाह लावून दिला.ही त्या काळातील सामाजिक ऐक्याची खूप मोठी क्रांती होती. हरळय्या चांभाराचा मुलगा 'शीलवंत'व माधुवय्या ब्राह्मणाची उपवर कन्या 'कलावती' यांचा जगातील पहिला आंतरजातीय विवाह अनुभवमंटप महात्मा बसवेश्वर व सर्व शरणानी मोठ्या थाटात लावला.सनातनी ब्राह्मणांनी त्याला विरोध केला,तेव्हा कल्याण मध्ये मोठी क्रांती झाली. आंतरजातीय विवाहाने जाती भेद संपतो. चांगली, कुशल संतानाची प्राप्ती होते. सामाजिक ऐक्य टिकून राहते. हे महात्मा बसवेश्वरांना माहित होते. म्हणूनच महात्मा बसवेश्वरांच्या वचनातील तत्वज्ञान अमृतरुपी आहे. ती वचने श्रम करायला शिकवतात व दासोह करायला भाग पाडतात. सदाचारी व विवेकी विचारांचे ज्ञानामृत पाजवतात. त्यांची वचने, त्यांची शब्दरचना मानवाच्या कल्याणाची पवित्र गाथा आहे. म्हणूनच महात्मा बसवेश्वर आपल्या वचनात म्हणतात की-

" देव लोक, मर्त्यलोक नसती हो वेगळे
सत्य बोलणेच देवलोक, असत्य बोलणेच मृत्युलोक
सदाचार स्वर्ग,दुराचार नर्क
कुडलसंगमदेवा, यास तुम्ही प्रमाण"

बसवण्णाहे बिज्जल राजाच्या दरबारात प्रधानमंत्री असले तरी त्यांचे हृदय सतत सर्वसामान्य बहुजन व अस्पृश्य समाजाच्या कल्याणमध्ये गुंतलेले होते. सनातनी पाशातून जनसामान्यांना बाहेर काढाण्याचे सामाजिक कार्य वचनाच्या अनुभवमंटपाच्या माध्यमातून महात्मा बसवण्णायांनी केले आहे.स्वर्ग,नर्क असा काही फरक नाही, आपण सदाचारी, सत्यवचनी वागलो की स्वर्ग, दुराचारी, दूष्ट अंधश्रद्धापूर्ण वागलो की नर्कहाच फरक जनतेला जनसामान्याचा काव्यमय व साध्या भाषेत सांगत. लोक त्यांचे ऐकूण हुशार होत होते.संस्काराबद्दल म. बसवेश्वर म्हणतात कि,-

" चोरी करू नको, खोटे बोलू नको, रागावू नको,
इतरांचा तिरस्कार करू नको,I आत्मस्तुती करू नको,परनिंदा करू नको,
हीच अंतरंगशुद्धी, हीच बहिरंगशुद्धी, I हीच कुंडलसंगमदेवाला प्रसन्न करण्याची रीत आहे."

याठिकाणी समाजातील प्रत्येक माणसाची आचारसहिता सांगून आदर्श व्यक्ती या आदर्श समाज निर्माण करण्यासाठी प्रत्येक माणसाने चोरी करू नये, खोटे बोलू नये, रागावू नये, आत्मस्तुती करू नये, परनिंदा करू नये ह्या पंचतत्वाच्या आचरणाचेपालन केले पाहिजे. हीच प्रत्येकाची अंतरंग- बहिरंग शुद्धी आहे. प्रत्येकाच्या मनात वाईट

भाव नाही आला तर प्रत्येक माणूस, समाज, देश आदर्श बनतो.ही महात्मा गौतम बुद्धाची विचारधारा महात्मा बसवेश्वर समाजाला जागृत करण्यासाठी वाचनाच्या माध्यमातून सांगताना दिसतात. दया हाच सर्वात महत्त्वाचा धर्म आहे. प्राणीमात्रावर,अडल्या- नडल्यावर, गोर-गरीबांवर, अन्यायग्रस्त स्त्रियांवर दया दाखवली पाहिजे. त्यांना मदत केली पाहिजे. जगामध्ये शांती नांदायची असेल तर सदाचार व दयावानबनले पाहिजे. असे महात्मा बसवेश्वर जगाला सांगतात.

अशाप्रकारे जीवनभर कार्य करत करत खूप मोठी सामाजिक क्रांती करणारे महात्मा बसवेश्वर यांनी कृष्णा मलप्रभेच्या किनारी इ.स.1167 साली कुंडलसंगम येथे अखेरचा श्वास घेतला.त्यांची वचने व सामाजिक कार्य आजही जगाला आदर्शाचा मार्ग सांगत आहे. आजही या महामानवाची कीर्ती जगात अजरामर आहे. त्यांचे कार्य धगधगते आहे.

**2) संदर्भ ग्रंथ:**


*क्रांतिकारी महात्मा बसवेश्वर आणि 12 वे शतक: महिलांचा सुवर्णकाळ - नागप्पा भीमराव शरणार्थी- सुविद्या वितरण 374, उत्तर कसबा सोलापूर- प्रथमावृत्ती- एप्रिल 2015- पृष्ठ -1*

*शरण आंदोलन आणि वचन साहित्य -प्रा. भिमराव पाटील व डॉ. विजयकुमार करंजकर, मैत्री प्रकाशन, देशपांडे गल्लीलातूर, प्रथमावृत्ती- डिसेंबर 2017 - पृष्ठ -14*

*तत्रैव - पृष्ठ -23*

*4) अंधश्रद्धा निर्मूलन आणि बसव विचार- डॉ. वेदप्रकाश डोणगावकर बसवपथ( मराठी व्दैमासिक)- नोव्हें- डिसेंबर- 2018 बसव समिती बेंगलोर- पृष्ठ - 25*

*महात्मा बसवेश्वर- डॉ. आंबेडकर- डॉ.दे. जवरेगौडामहाराष्ट्रबसव परिषद,संस्थान भालकी- चौथी आवृत्ती - ऑक्टोबर 2013- पृष्ठ – 29*

# महात्मा बसवेश्वर : काही आयाम

**प्रा. ज्ञानेश्वर भोसले**

*साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, श्री. पी. एल. श्रॉफ कला आणि वाणिज्य महाविद्यालय, चिंचणी*

*ता. डहाणू, जि. पालघर, मो. 7744009016 मेल : dnyanbhosle86@gmail.com*

**जीवन :**

महात्मा बसवेश्वर हे एक विद्रोही संत होते. कर्नाटक प्रांतातील बागेवाडी, जि. विजापूर या ठिकाणी मादिराज-मादलांसिका यांच्या पोटी इ. स. 1105 मध्ये बसवेश्वरांचा जन्म झाला. त्यांच्या जन्मवर्षाबद्दल इ. स. 1105, इ. स. 1131, इ. स. 1132 असे विविध मते अभ्यासकांनी सांगितली आहेत. त्यांचा जन्म हा वैष्णव ब्राह्मण घराण्यात झाला. त्यावेळी ब्राह्मण लोकांना गावचा प्रमुख अग्रहार ही पदवी दिली जायची. महात्मा बसवेश्वरांचे वडीलही बागेवाडी गावचे अग्रहार होते. बालपणातच बसवेश्वरांनी वेद-उपनिषदे, यज्ञ, शास्त्र व सूत्र आदींचा अभ्यास केला. त्यांची मोठी बहीण नागलंबिकांच्या व्यक्तिमत्त्वाचा मोठा प्रभाव होता. जातवेद मुनी यांच्या मार्गदर्शनाखाली कूडलसंगम या ठिकाणी बसवेश्वरांनी सर्वांग ज्ञानाची दीक्षा घेतली. ब्राह्मण कुटुंबात जन्माला येऊनही त्यांनी आपल्या मौजीबंधनाला विरोध केला. 12 वर्षांच्या ज्ञानप्राप्तीनंतर गुरूंच्या म्हणण्यानुसार महात्मा बसवेश्वर यांचे मामा बलदेव बलदेव हे बिज्जल राजाच्या दरबारी मंत्री होते. यांच्या मुलीशी (गंगाबिका) ते विवाहबद्ध झाले. गुरूंच्या संमतीने ते बिज्जल राजाच्या दरबारी कारकून म्हणून रुजू झाले. त्यांच्या मेहनतीमुळे बिज्जल राजाला मोठी करवसुली मिळाली. भ्रष्टाचार कमी झाला. महात्मा बसवेश्वर बिज्जल राजाच्या दरबारी मंत्री असताना बिज्जल राजाने त्यांच्या मानलेल्या मुलीच्या विवाहासाठी महात्मा बसवेश्वरांना मागणी घातली आणि महात्मा बसवेश्वरांनी त्या विवाहास होकार दिला. आपल्या विचारांच्या प्रचार-प्रसारासाठी अनुयायी बनवण्याच्या दृष्टीने त्यांनी अनुभवमंटपाची स्थापना केली. महात्मा बसवेश्वरांच्या पत्नी निलांबिका आणि गंगांबिका यांनी अनुभवमंटपात आलेल्या सर्व स्त्रियांना साक्षर केले.

**महात्मा बसवेश्वरांचे अभ्यासक :** डॉ. उद्धव नरहरी कांबळे यांनी महात्मा बसवेश्वरांवर "महात्मा बसवेश्वरांचे समग्र तत्त्वज्ञान : एक चिकित्सक अभ्यास" या विषयाअंतर्गत पीएच. डी. पदवी मिळवली आहे. त्यामध्ये त्यांनी बसवेश्वरांच्या समग्र तत्त्वज्ञानाचा समग्र आढावा घेतला आहे. त्याचेबराबर भीमाशंकर बिराजदार, कामत अशोक, कारंजकर प्रवीण, गुंजाळ एस. आर., घुगरे सूर्यकांत, चिदानंदमूर्ती एम., जयशेट्टी भालचंद्र, जवरे गौडा दे., जिरोबे राजेंद्र, डोणगावकर वे., देशपांडे सुभाष, पाठक पा. प्रभाकर, पाटील भीमराव, पुजारी सिद्धराम, बसवलिंग पट्टदेवरू, बिचेवार सचितानंद, भागवत दुर्गा, मेनकुदळे अशोक, मल्लदेवरू एच. पी., मिरजकर शांताराम, मोगलेवार सुधाकर, मेणसे कृष्णा, लिंगाडे जयदेवीताई, सोलापुरे राजशेखर, स्वामीजी लिंगानंद, स्वामी बसवराज अशा अनेक अभ्यासकांनी महात्मा बसवेश्वरांच्या कार्य आणि तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला आहे. मेणसे कृष्णा यांनी आपल्या 'बसवेश्वर ते श्री ज्ञानेश्वर' या ग्रंथामध्ये बसवेश्वरांच्या विचारांचा संत ज्ञानेश्वरांवरील प्रभाव स्पष्ट केला आहे.[1]

**वीरशैव धर्मातील समता व स्त्रियांचा सहभाग :** महात्मा बसवेश्वरांनी वीरशैव धर्माची स्थापना केली. प्रबळ शिवनिष्ठा हा महात्मा बसवेश्वरांच्या व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा भाग होता. हा धर्म लिंगायतधर्म, जंगमधर्म, सबवधर्म, इष्टलिंगधर्म, वचनधर्म, शिवधर्म, आगमधर्म या नावांनीही ओळखला जातो. यासंदर्भात घुगरे सूर्यकांत लिहितात, "जगातील अनेक धर्मापैकी वीरशैव धर्म एक होय. वीरशैव धर्म हा विशाल व विशिष्ट आहे. हा सर्व समन्वयवादी धर्म आहे. या धर्मामध्ये ऐहिक व पारलौकिक सुख व समाधान आहे. यात तृप्ती नि सकल अर्थाने प्रकाश आहे."[2] त्यांनी स्त्री-पुरुष, स्पृश्य-अस्पृश्य, गरीब-श्रीमंत अशा भेदांवर आधारीत व्यवस्था नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आयुष्यभर विषमता नष्ट करून समतेवर आधारीत व्यवस्था उभारण्यासाठी लढा दिला. त्यांनी समतेचा उपदेशच केला नाही, तर त्यांनी समतेला प्रत्यक्ष समाजाचाच भाग बनविले. गावकुसाबाहेर राहणाऱ्या नागीदेव कांबळे यांच्या

घरी जाऊन त्यांनी जेवण केले. बिज्जल राजाच्या दरबारी असताना महात्मा बसवेश्वरांनी ब्राह्मण व चांभार यांच्यातील आंतरजातीय विवाहाला संमती दिली, तेव्हा त्यांना मंत्रिपदाचा त्याग करावा लागला. लिंगस्पर्शाने कोणत्याही जातीतील लोकांची कुळे शुद्ध होतात, असे त्यांनी म्हटले आहे. लिंगायत धर्माच्या क्षत्राखाली त्यांनी सर्वांना एकत्र आणले. सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रातील विषमता नष्ट करीत क्रांती घडवली. त्यांनी समता तत्त्वाचा पुरस्कार करून तत्कालीन व्यवस्थेला धक्का दिला. समाजात समता निर्माण करायची असेल, तर सर्वप्रथम स्वत: समतापूरक बनावे, असे त्यांनी सांगितले. देव हा कोणताही भेदाभेद करीत नसून त्या देवाला मानणाऱ्यानेदेखील भेदाभेद करू नये, असे त्यांचे म्हणणे होते. हे स्पष्ट करण्यासाठी त्यांनी दिलेले तर्क महत्त्वाचे आहेत. महारवाड्याची जमीन आणि शिवालयाची जमीन, शौचाला न्यायचे पाणी आणि तोंड धुण्याचे पाणी सारखेच असते. मग का भेदभाव करावा, असा प्रश्न त्यांनी विचारला. निसर्ग प्रकाश, पाणी, वारा, उष्णता या गोष्टी देताना कोणताही भेदभाव करत नाही. त्याप्रमाणे आपणही भेदभाव पाळू नये, असा त्यांनी उपदेश केला. महात्मा बसवेश्वरांनी मनुष्याची जात जन्मापासून नसते, असे सांगितले. लोखंडाचे काम करणाऱ्यास लोहार म्हटले जाते, धुणे धुणाऱ्याला परीट म्हटले जाते, वस्त्र विणणारा विणकर म्हणून ओळखला जातो, वेदपठण करणाऱ्यास ब्राह्मण म्हटले जाते. मनुष्याला जात जन्मामुळे नाही, तर कर्मामुळे मिळते. असे सांगून त्यांनी जातिव्यवस्थेवर टीका केली. वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था यांचे खंडन करताना त्यांनी दिलेले तर्क चिंतनीय आहेत. यासंदर्भात कृष्णा मेणसे लिहितात, “महात्मा बसवेश्वरांनी वर्णव्यवस्थेला अत्यंत तर्कशुद्ध रीतीने चोख उत्तर दिले. ते असे, ‘शूद्र पायापासून जन्माला आले म्हणून तो सर्वांत खालच्या वर्गाचा. मुखापासून ब्राह्मण जन्माला आला म्हणून तो सर्वांत वरिष्ठ वर्गाचा हे म्हणणे खरे असते, तर कोणीही नतमस्तक होऊन आणि पायावर डोके ठेवून नमस्कार केलाच नसता. कारण पायावर (शूद्र) डोके (ब्राह्मण) ठेवल्याने पाच (शूद्र) श्रेष्ठ आहेत. डोके (ब्राह्मण) कनिष्ठ असे मानावे लागेल.”[3] यातून महात्मा बसवेश्वरांचा तर्काधारित दृष्टिकोण प्रत्ययाला येतो. वंचितांना आत्मविश्वासाने, बरोबरीने उभे करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. मधूवरस या ब्राह्मणाच्या व हरळ्या या अस्पृश्याच्या मुला-मुलीच्या आंतरजातीय विवाहाच्या माध्यमातून ब्राह्मण-अस्पृश्य हा जातिभेद दूर करून समाजापुढे एक आदर्श उभा केला. ‘अनुभवमंटप’चा सदस्य सर्व जाती, पंथ, वर्गातील कोणीही होऊ शकत होता. दलित-पददलितांसह सर्वांना सामाजिक व धार्मिक क्षेत्रात समान न्याय देऊन समान पातळीवर आणण्याची अपूर्व अशी कामगिरी त्यांनी केली.

महात्मा बसवेश्वरांनी स्त्री-पुरुष समानतेचाही संदेश दिला. पुरुषांचा जन्म स्त्रीपासून होतो, त्यामुळे स्त्री-पुरुष भेद पाळू नये, असे त्यांनी म्हटले. अनुभवमंटपामध्ये सर्वांना समान अधिकार असल्याने सर्व जातीतील स्त्री-पुरुष येथे दररोज एकत्रित येत असत. येथे सर्वांना विचारस्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य, शिक्षणाचे स्वातंत्र्य मिळालेले होते. अनुभवमंटपामध्ये 350 सदस्य होते. या सदस्यांमध्ये 80 स्त्रीसदस्या होत्या. बाकी सर्व पुरुष सदस्य होते. अनुभवमंटपात स्त्रियांना शरणी, तर पुरुषांना शरण असे म्हटले जायचे. सूर्यकांत घुगरे म्हणतात, “ केवळ महात्मा बसवेश्वरांनीच हे जाहीर केले की, स्त्रियासुद्धा धार्मिक क्षेत्रात पुरुषांइतक्याच हकदार आहेत. आजही स्त्रियांवर जेथे अनन्वित अत्याचार होतात, तेथे त्या काळी महात्मा बसवेश्वरांनी स्त्रियांना गुलामगिरीतून बाहेर काढण्यासाठी केवढा प्रखर लढा दिला असेल, याची कल्पना येते. सर्व क्षेत्रात स्त्रिया यशस्वी होऊ शकतात, हे सिद्ध झाले. काही क्षेत्रात त्या पुरुषांपेक्षा काकणभर सरस ठरतात, हेही सिद्ध झाले आहे. महात्मा बसवेश्वरांनी हे जाणले होते. म्हणूनच स्त्रीमुक्तीची चळवळ त्यांनी सुरू केली आणि त्यात ते यशस्वीही झाले.”[4] यातून महात्मा बसवेश्वरांच्या स्त्रीसुधारणाविषयक विचारांचे आणि कार्याचे श्रेष्ठत्व लक्षात येते. महात्मा बसवेश्वर हे त्या काळाच्या बरेच पुढचे विचार मांडत होते. डॉ. निर्मलकुमार फडकुले यासंदर्भात म्हणतात, “12 व्या शतकात स्त्रीच्या भोवती उभारण्यात आलेली अशास्त्रीय व अधार्मिक कुंपने मोडून काढून स्त्रीमुक्तीचा नवा विचार रचनात्मक दृष्टिकोनातून मांडणारे बसवेश्वर काळाच्या कितीतरी पुढे पाहू शकत होते, याबद्दल संशय उरत नाही.”[5] यातून बसवेश्वरांची दूरदृष्टी लक्षात येते. स्त्री-पुरुष यांच्यात कसलाच भेद नाही. ते समान आहेत, हा विचार महात्मा बसवेश्वर यांनी मांडला. त्यांनी स्त्रीबंधनाला विरोध करून स्त्री-पुरुष समता प्रतिपादन केली. अनुभवमंटपामध्ये स्त्रियांना धार्मिक ग्रंथांचे वाचन करण्याची संधी

दिली. त्याचबरोबर नागलांबिका, गंगाबिका, निलांबिका, लिंगम्मा, रायम्मा, गंगम्मा, विरम्मा, सत्यक्का, लकम्मा, अक्कमहादेवी, सोमव्वे अशा स्त्रियांना वाङ्मयनिर्मितीसाठी प्रोत्साहन दिले. त्यामुळे बाराव्या शतकात अनेक स्त्रीवचनकार उदयास आल्या. लल्लेश्वरी मुंगी यांनी 21 शिवशरणींच्या जीवनकार्याचा आणि त्यांच्या वाङ्मयीन योगदानाचा परिचय करून देणारा 'संतिणी बसवयुगातील' या नावाचा ग्रंथ लिहिला. यासंदर्भात सूर्यकांत घुगरे लिहितात, "बहुतांशी भारतीय वाङ्मयाच्या इतिहासात स्त्रियांचा सहभाग अल्प आहे. परंतु बाराव्या शतकातील कर्नाटक प्रांतात 50 वर्षांच्या कालावधीत लिंगायत चळवळीच्या माध्यमातून 34 स्त्रीसाहित्यिक पुढे आल्या. त्यांनी लिहिलेल्या वचन व भक्तिगीतांमुळे लिंगायत धार्मिक, सामाजिक क्रांती समृद्ध झाली."[6] ज्ञानाशिवाय शरीर, प्राण असूच शकत नाही. ज्ञान हे परिपूर्ण आहे. त्यामुळे तेथे वाईट गुण असू शकत नाहीत. म्हणून ज्ञान असेल, तरच व्यक्ती परिपूर्ण होऊन सद्‌गुणी बनते, असे त्यांनी सांगितले.

**भाषिक कार्य व विद्रोही तत्त्वज्ञान :** महात्मा बसवेश्वरांनी केलेले भाषिक कार्यही महत्त्वाचे आहे. ज्ञान हे सार्वजनिक व्हावे, सर्वांना ते प्राप्त करता यावे यासाठी त्यांनी संस्कृत भाषेत असलेले ज्ञान सर्वसामान्यांची मातृभाषा असलेल्या कन्नड भाषेतून जगासमोर मांडले. हे त्यांचे कार्य हा मोठा विद्रोह होता. त्यांच्या या कार्याचा प्रभाव नंतरच्या कालखंडातील महानुभाव, वारकरी या संप्रदायांवरही पडलेला दिसतो. वेदांमधील ज्ञानामधल्या उणिवा त्यांनी काढल्या आणि त्या कन्नड भाषेतून मांडल्या. तेराव्या शतकातील संत ज्ञानेश्वरांनीदेखील या उणिवा दाखविलेल्या आहेत. बसवेश्वरांनी वेद, उपनिषदे, यज्ञ, शास्त्र, अरण्यके, श्रुती-स्मृती, पुराणे व सूत्र यांचा सखोल अभ्यास केला होता. या ग्रंथांमधील जातिसंस्था, चार्तुवर्ण्यव्यवस्था, कर्मकांड, संन्यास, पंचसुतक, पुनर्जन्म, देवळे, पाप-पुण्य आणि स्वर्ग-नरक आदि संकल्पनांवर त्यांनी कडाडून हल्ला केला. त्यांनी शास्त्र, वेद, श्रुती या धर्मग्रंथांमध्ये कर्मकांडाला महत्त्व दिले असल्याने त्यांना श्रेष्ठ मानू नये, असे सांगितले आहे. 'संत ज्ञानेश्वरांनीदेखील 'वेदु अत्यंत कृपणु जाहला । तिनही वर्णांच्या कानी लागला । स्त्री-शूद्रांसी अबोला । अद्यापि धरोनि ठेला ।' असे सांगून वेदांममधील उणीव दाखवून दिली आहे. संत तुकारामांनीदेखील 'वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा । एरांनी वाहावा भार माथा ।' असे सांगून वेदांपेक्षा आत्मानुभवाला अधिक महत्त्व असल्याचे जाहीर केले. बसवेश्वरांनी दैववादी, आसुरी प्रवृत्तीवर कडाडून हल्ला चढवला. वेद वाचणाऱ्या लोकांसमोर गयावया करून काही उपयोग नाही. कर्म सर्वश्रेष्ठ आहे, असे त्यांनी आग्रहाने सांगितले. महात्मा बसवेश्वरांना अनेकेश्वरवाद मान्य नव्हता. उलट त्यांनी एकेश्वरवादाचा पुरस्कार केला. एक ईश्वर, एक निष्ठा व एकसंघ समाज हे सूत्र जोपासण्यासाठी त्यांनी अनेकेश्वरवादावर हल्ला चढवला. त्यांच्या मते, खरा देव एकच असून त्याची वेगवेगळ्या स्वरूपात कल्पना केली जाते. त्यांच्या मते, भक्त सत्य बोलणारा असावा आणि त्याने गुरू, लिंग, जंगमाची निंदा करू नये. त्यांनी वैदिक साहित्य प्रथम नाकारले. धर्माच्या आचारसंहितेत दयेचा समावेश महात्मा बसवेश्वरांनी केला. त्यांनी दयाभावाला कारुण्य व जगदोद्धाराची जोड दिली. जीवनाची अचारसंहिता त्यांनी आपल्या वचनातून सांगितली. दयारहीत धर्म असूच शकत नाही. सर्व प्राण्यांवर दया करणे हेच धर्माचे अंतरंग आहे, असे त्यांनी सांगितले. सत्य हे धर्माचे प्राणभूत तत्त्व आहे. सत्य निघून गेल्यानंतर धर्माचे केवळ पार्थिव उरते, असे त्यांनी जाणले होते.

**समारोप :**महात्मा बसवेश्वरांच्या जीवनाची वाटचाल आज सर्वांना प्रेरणादायी ठरते. महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकामध्ये प्रस्थापित बुरसटलेली, रुढीग्रस्त व्यवस्था नष्ट करून आधुनिक मूल्यांवर आधारित समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला. ते बालपणापासून चिकित्सक प्रवृत्तीचे, विवेकबुद्धीला पटेल, तेच मानणारे होते. हिंदू धर्मातील कर्मकांडाला विरोध करून त्यांनी धर्मत्याग केला. सदाचाराची शिकवण देत संघटन निर्माण केले. हेच महात्मा बसवेश्वरांचे नीतिशास्त्र आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला आदर्श बनवण्यासाठी त्यांनी आदर्श जीवनाची सूत्रे सांगितली. दया, सत्य, आधुनिक नीतिमूल्यांची प्रस्थापना, एकेश्वरवाद, कर्मकांडाला विरोध, अचौर्य, अहिंसा, सत्यवचन, द्वेषरहितता, निंदेचा त्याग, तुच्छेला विरोध हे त्यांच्या विचारांच्या केंद्रस्थानी होते. याशिवाय श्रमश्रेष्ठता, अपरिग्रह, व्यक्तिप्रतिष्ठा, व्यक्तिस्वातंत्र्य, बंधूता, न्याय, एकेश्वरवाद, विज्ञानवाद हेही त्यांच्या तत्त्वज्ञानाचे महत्त्वाचे अंग होते.

**संदर्भ आणि टिपा :**

*पाहा : मेणसे कृष्णा, 'बसवेश्वर ते श्री ज्ञानेश्वर', मुंबई, 1996*
*घुगरे सूर्यकांत, 'वीरशैव व इतर धर्म आणि समाज', वीरसाप्पा घुगरे, गडहिग्लज, सोलापूर, 2000, पृ. 16*
*मेणसे कृष्णा, 'बसवेश्वर ते श्री ज्ञानेश्वर', मुंबई, 1996, पृ. 89*
*घुगरे सूर्यकांत, 'वीरशैव व इतर धर्म आणि समाज', साधना बुक प्रकाशन, कोल्हापूर, 2000, पृ. 165*
*घुगरे सूर्यकांत, 'वीरशैव व इतर धर्म आणि समाज', साधना बुक प्रकाशन, कोल्हापूर, 2000, पृ. 165*
*घुगरे सूर्यकांत, 'वीरशैव व इतर धर्म आणि समाज', साधना बुक प्रकाशन, कोल्हापूर, 2000, पृ. 177*

# महात्मा बसवेश्वरांचे सामाजिक कार्य

**प्रा.मनोज चंद्रकांत साखरे**
*समाजशास्त्र विभाग, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड, मो.नं. 9764480005*

वीरशैव लिंगायत धर्माची स्थापना करणाऱ्या महात्मा बसवेश्वर यांचा जन्म कर्नाटकात बागेवाडी येथे इसवीसन ११०५ साली मादरस व मदलांबिका यांच्या पोटी झाला. मादरस हे शैव ब्राह्मण होते. बसवेश्वरांच्या मातापित्यांनी त्यांच्या वयाच्या आठव्या वर्षी त्यांचे उपनयन करण्याचे ठरविले पण बसवेश्वरांनी त्या उपनयन संस्काराला विरोध केला. बसवेश्वरांना वाटले की उपनयन म्हणजे केवळ बाहेरून भांडे स्वच्छ करण्यासारखे आहे हा निष्फळ व निरर्थक प्रयत्न आहे. व्यक्तीचे अंतर मन शुद्ध असले पाहिजे अशी त्यांची धारणा झाली व त्यासाठी त्यांनी गृहत्याग करून कुडलसंगमाला गेले. तेथेच त्यांनी वचन साहित्याची रचना करण्यास सुरुवात केली. त्यांनी सुरू केलेल्या धर्मसुधारणाला वचन साहित्याची जोड देऊन काव्याच्या माध्यमातून विचार समाजाच्या सर्व स्तरापर्यंत पोचण्याचा प्रयत्न केला.

**बसवेश्वर आणि समकालीन समाज :** बसवेश्वरांच्या समकालीन समाजात धर्मात व्याभीचार माजला होता, व्यक्ती, धर्म,देव यांची फारकत झाली होती. धर्म हा वर्णाश्रम, कर्मकांड, अंधश्रद्धा, जातिभेद या चार चौकटीत बंदिस्त होता. हा काळ सनातनी लोकांचा व मनुवादी लोकांचा प्रखर प्रभाव असणारा आणि जातीभेदाला खतपाणी घालणारा काळ होता. ज्या समाजात बसवेश्वरांचा जन्म झाला तो वर्ण व्यवस्थेवर आधारित समाज होता. या समाजात जातिभेद गडद होता. जातींची श्रेणी नुसार पायरी ठरलेली होती. या समाजातील व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य नव्हते. ठराविक चौकटीत राहूनच कार्य करावे लागत असत. समाज व्यवस्थेची चौकट मोडणार्यांवर कडक निर्बंध लादले जात असत. त्यामुळे समाजव्यवस्थेची चौकट मोडण्याचे धाडसच सहजासहजी कोणी करत नव्हते. त्याकाळी प्रत्येक जातीचा स्वतःचा निश्चित व्यवसाय होता. प्रत्येक व्यक्तीने जाती नुसारच व्यवसाय करावा अशी बंदिस्त व्यवस्था केली गेली होती. अशा सामाजिक रचनेत ब्राह्मण शिखरावर होते तर, बहिष्कृत तळाशी होते. सामाजिक व्यवस्थेत ब्राह्मणांना सर्व अधिकार होते, ब्राह्मण सुशिक्षित व सुधारलेले होते, सामाजिक व धार्मिक सत्ता त्यांच्याकडे असल्याने ते स्वतःला इतर जाती पेक्षा श्रेष्ठ समजत. परिणामी ब्राह्मणांना जातीच्या श्रेष्ठत्वाचा अहंकार आला होता त्यांना इतर जाती बद्दल, व्यक्ती बद्दल तुच्छता वाटत असे. बसवेश्वरांनी अशा बिकट परिस्थितीत ब्राह्मणांच्या विरोधी बंड केले. आपल्या विचारातून ब्राह्मणांची व ब्राह्मणी व्यवस्थेची निर्भत्सना केली. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी बसवेश्वरांनी धार्मिक सुधारणेला सुरुवात केली. त्यांच्यामते समाजाला एकात्म करायचे असेल तर विश्वात्मक देवाच्या उपासनेची प्रस्थापना करणे आवश्यक आहे. त्यांच्यात विश्वबंधुत्व आणायचे असेल तर समत्व दृष्टी असणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांनी शिवोपासनेत इष्ट बदल घडवून आणले व त्याद्वारे मानवाला विश्वबंधुत्वाचा पातळीवर आणण्याचा प्रयत्न केला. समता, ममता, भक्ती शुद्धी यांची बैठक धर्माला देऊन माणसाला धार्मिक गुलामगिरीतून मुक्त केले.

**एकेश्वर वादाचा पुरस्कार :** बसवेश्वरांनी समाजाला ब्राह्मणी व्यवस्थेच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी, हिंदू धर्मात घुसलेल्या अनेक अनिष्ट प्रथा परंपरांना मोडण्यासाठी, हिंदू धर्मातील अंधश्रद्धा, कर्मकांडाला संपवण्यासाठी एकेश्वरवादाचा पुरस्कार केला. एक देवोपासनेतून हा देव म्हणजे परमशिव मानले या शिवाचे अंगुठ्याएवढे स्वरूप इष्टलिंगाद्वारे निर्मुन प्रत्येक व्यक्तीला इष्टलिंगास शरीरावर धारण करायला लावले. शिवपूजा ही विश्वात्मक पूजा आहे, ती स्वयंपूजा आहे. तिचे पूजनाने विश्वपूजा केल्याचे फळ मिळते ती कोणत्या एका व्यक्तीची वा देवतेची पूजा नसून समष्टीची व शक्तीची निर्गुण-निराकार पूजा होय हे स्पष्ट केले.

खरा देव एक / नव्हेची अनेक /
वेदमान्य देख / कुडलसंगमा //
असे मांडून अनेक देवतांची पूजा करणाऱ्यांवर प्रहार केला.
दुर्गम्मा पोचम्मा करून त्या मूर्ती /
गळ्यात बांधणी ताइत ते/|
कर्ज होता मूर्ती टाकीती विकून /
ठेवुनी गहाण भरती पोटे //
विकला जाणारा नव्हे माझा देव /
कुडलसंगमा सम अन्य नाही //

बसवेश्वरांनी केवळ एका देवाची उपासनाच करण्यावर भर देतानाच देवांची भव्य दिव्य देवालये, मंदिरे उभारण्याला विरोध केला. मंदिरांच्या श्रीमंतीवर प्रहार करताना ते म्हणतात की-

भव्य शिवालय बांधणी सधन बांधू कैसे जान पामर मी /
पाय माझे खांब देह देवालय सुवर्ण कळस होय मस्तक हे/
कुडलसंगमदेवा नाशेल स्थावर अविनाशी थोर जंगम ते //

शिवाची उपासना करणाऱ्यांनी साधे जीवनमान स्वीकारायला हवे. बसवेश्वरांच्या मते गरीब शरणांची घरे छपरांची अथवा गवतांची दिसतील पण त्यात राहणाऱ्याचे मन विशाल, थोर, गंभीर व शिवमय दिसले तिथेच समाधान व परमानंद आढळला.

कुडलसंगमाला उद्देशून ते म्हणतात हा कोण? तो कोण? असे मला म्हणू देऊ नकोस या जगातील सर्वजण माझे आहेत असे माझ्या तोंडातून निघु दे. मला जगरुपी तुझा बाळ म्हणून सर्वांमध्ये तूच दिसु दे. ही विश्वकुटुंबाची भावना त्यांच्यात स्पष्ट जाणवते.

**अनुभव मंटप :** बसवेश्वरांनी ११६० साली अल्लमप्रभूंच्या मार्गदर्शनाखाली कल्याण राज्यात अनुभव मंटपाची स्थापना केली. आजची संसदीय राज्यपद्धतीचा स्त्रोत महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकाच्या मध्यात सुरू केलेल्या अनुभव मंटपातून दिसून येतो. अनुभव मंडपाच्या माध्यमातून भारतात प्रथमच सर्व जाती धर्माच्या लोकांचा समावेश असणारे व्यासपीठ निर्माण झाले होते. एका छत्राखाली सर्व जाती धर्माच्या लोकांना आणण्याचे कार्य प्रथमतः बसवेश्वरांनी केले. केवळ पुरुषांनाच यात सामावून न घेता स्त्रियांना देखील समान अधिकार देऊन सन्मानित केले. अनुभव मंडप हे एक वस्तुनिष्ठ धार्मिक व सामाजिक आशय असणारे एकमेव व्यासपीठ होते. बसवेश्वरांच्या अनुभव मंटपात शिवशरण संत रोज विविध विषयावर मुक्त चर्चा करून त्यातून निघणारे विचार वचनांच्या माध्यमातुन शब्दबद्ध करत. असे १६० कोटी वचने अनुभव मंटपातून रचली गेली. बसवेश्वरांनी कुडलसंगम या आराध्य दैवताच्या नाममुद्रेतून अनेक वचने लिहिली. बसवेश्वरांनी व्यक्ती, समाज आणि दैनंदिन जीवन अशा तिहेरी भूमिकेतून सुसंवाद साधला त्यांचा धर्म आत्मकल्याणापेक्षा समाज कल्याणावर भर देणारा होता.

**स्त्री-पुरुष समता :** जगातल्या सर्व धर्म प्रेषितांनी स्त्रीकडे काहीसे गौणत्वाच्या भावनेने पाहिले आहे त्यामुळे सर्व समाजांमध्ये स्त्री संबंधी अनेक प्रकारच्या प्रथा परंपरा रूढ झाल्या आहेत. विशेषतः गरोदरपण, बाळंतपण व मासिक ऋतूकाळातील विटाळशी संबंधित कल्पनेमुळे स्त्रीला अयोग्य व अपवित्र मानून काही बंधने लागलेली आहेत. ज्यामध्ये देवघरात प्रवेश करू नये, पूजा करू नये, वेदादी धर्मग्रंथांचे वाचन करू नये, मंदिर प्रवेश करू नये, धार्मिक विधी संस्कारात सहभाग घेऊ नये अशा अनेक प्रथा जपण्याची आजही प्रवृत्ती दिसते. बसवेश्वरांनी स्त्रियांना त्या काळी बरोबरीचे अधिकार प्रदान केले. एवढेच नव्हे तर त्यांना अनुभव मंटपाचे सभासदत्व प्रदान केले. महिलांना प्रतिनिधित्व मिळाल्याने त्यांच्या धर्म कार्याला सामर्थ्य प्राप्त झाले होते. त्यांनी बालविवाहाला विरोध केला. विधवा विवाहाला मान्यता दिली. एवढेच नव्हे तर कुमार - वनजाचा आंतरजातीय (ब्राह्मण - चांभार) विवाह अनुभव मंटपात लावून दिला. त्यावेळी शिवशरण स्त्रियादेखील समाज कार्यात अग्रेसर होत्या. त्यांची अनुयायी राणी

गंगाबिकादेवी हिने तर बहुजन स्त्रियांसाठी उद्योगकेंद्रे व साक्षरताकेंद्रे सुरू केली होती. वचनवाङमयाचे रक्षणासाठी स्वतःचा प्रासाद दान केला बसवेश्वरांच्या धर्मकार्यात या स्त्रियांचे मोलाचे योगदान आहे.

**श्रमप्रतिष्ठा :** बसवेश्वरांच्या मते भक्तीचा एक प्रकार म्हणजे शरीरश्रम होय. त्यालाच ते कायक संबोधतात. "कायकवे कैलास" म्हणजे श्रम कैलासा सारखे श्रेष्ठ आहे. याबरोबरच सर्वच श्रम सारख्याच योग्यतेचे व प्रतिष्ठेचे आहेत. यात श्रेष्ठ कनिष्ठत्वाचा भेद नाही. तसेच जगण्यासाठी प्रत्येकाने श्रम करणे अनिवार्य आहे. दुसऱ्याच्या श्रमावर जगू नये. हा त्यांचा दंडक होता. यातून जातीजातीतील भेदभाव नष्ट करता येतो. वर्णाश्रम खिळखिळा करता येतो. याबरोबर संन्यासवृत्ती नष्ट झाली आणि त्या काळी संन्यासवादाला मिळालेली प्रतिष्ठा बसवण्णांनी काढून टाकली. कर्मवादी वीरप्रवृत्तीची चेतना जागवली. श्रमातून उद्योग वाढले उत्पन्नात भर पडली भेदाभेद नष्ट झाले व आर्थिक समता समाजात प्रस्थापित झाली. बसवेश्वरांच्या मते ज्यांने आपल्या घामाने ही काळी माती भिजवली, अखंड श्रमाने ज्यांने देह राबविला, ज्याने आपले तन आणि मन श्रमपूर्वक झिजवले, श्रमाची पूजा करून ज्याने शिवाची पूजा केली. श्रमिकांच्या झोपडीला जो कैलास मानतो त्याची वाणी तशी करणी आहे. तोच कुडलसंगम देवा जगद्‌गुरु झाला असा त्यांचा विश्ववंदनीय जयघोष होता. या श्रमकैलासात त्यांनी दासोंहची नांदी गायिली दासोहं म्हणजे दानधर्म एकमेकांना व समाजकार्याला मदत. सहकार्याची भावना. मनुष्याला एकमेकांच्या जवळ आणणारी शक्ती. स्वतःबरोबरच दुसऱ्यांसाठी सुद्धा जगणे ही भावना या दासोहंपोटी आहे. ही प्रवृत्ती समाजात जेवढी अधिक तेवढे लोककल्याण व सुखी समृद्ध जीवन अधिक म्हणून ते म्हणतात.

शिवशरण दासोहात, तन-मन-धन लावावे/
आळशी न तेथे व्हावे, कवणे काळी //
तन फुलोनिया जावे, मन तल्लीन ते व्हावे /
धना दासोही मोजावे, हेची अनमोल //

**धनसंचयाला विरोध :** बसवेश्वर म्हणतात की वस्त्रातील धागा, सोन्याचा कण, धनधान्य ही उद्यासाठी आहेत असे म्हणणार नाही. असे करेन तर शरणांची शपथ; कारण संचय नसेल तर श्रीमंतीची भावना बळावनार नाही. गरीब-श्रीमंत भेद दिसणार नाही. धनलोभ कोणालाही समाधानी करू शकत नाही. मग त्यातून स्वार्थ मत्सर, हिंसा, वैर, इत्यादी गोष्टी उद्भवतात. त्यांच्या महामने प्रसाद दासोह साठी प्रसिद्ध होता. भारताच्या कानाकोपऱ्यातून येथे संत महंत शिवशरण येत. सुमारे १ लक्ष ९६ हजार लोकांचे दैनंदिन भोजन होई. असा हा प्रसाद विश्वकुटुंब बनला होता. या संबंधात ते म्हणतात की अन्नाचा कण पाहताक्षणी कावळा कावकाव करून नातलगांना बोलवतो, कोंबडा दाणे खाताना ओरडून समस्त कुळास बोलवितो, पण आपण शिव (पवित्र) भक्त असूनही दासोह भावना नसल्याने कावळा या प्राण्यापेक्षाही हीन
ठरतो.

मागितली भिका कक्कयांच्या दारी, चेन्नयाच्या घरी मागितली /
दासयाच्या घरी मागितली, भिक्षांदेही केली हाक ऐसी //
एकत्र आले ऐकुनी माझी हाक, वाढियेली भीक आनंदाने /
कुडलसंगमदेवा भरले माझे पात्र ,भक्ती ती पवित्र तया कृपे //

आपल्यातील सर्वजण जर एकत्र येऊन त्यांच्यात सतसंग घडत गेल्यास शुभयोग, शुभघडीका, राशीग्रह, चंद्रबल, ताराबल, इत्यादी सर्व जुळून आले असे समजा त्यामुळे भविष्य बदलून जाईल. असे ते एकते बद्दल बोलतात.

**अंधश्रद्धेवर प्रहार :** अज्ञानी लोक बकऱ्याला बळी देतात. तो बळी जाण्यापूर्वी सजावटीच्या तोरणाचे पान खाण्यात मग्न असतो नंतर थोड्यावेळात त्याचा बळी जातो. तद्वतच पामर व अज्ञान जीवाचा बळी घेणारे लोक तरी वाचतील काय? देवी-देवता त्यांना वाचवेल काय? लोक दगडी नागाला दूध पाजतात पण तोच नाग जीवंत समोर आला तर त्याला ठार मारतात. भुकेलेल्या जंगमास हाकलून देतात व लिंगाला नैवेद्य दाखवतात ही मूढता व दांभिकता होय.

प्राण्यांचे धन प्रायश्चित्तासाठी आहे हे स्पष्ट करताना श्वानाचे दुध त्याच्या पिल्लासाठी पंचामृतासाठी निरुपयोगी होय. फक्त खाण्यासाठी जन्म घेतला तर डुकराचे जीवन होय अशा जीवनाचा किळस येऊ लागतो.

वडा पिंपळा गुंफुनी दोरा परिक्रमा करीशी
परि न तू कर्म मुक्त होशी //
मंत्र-तंत्र दंभाचाराशी व्यर्थ बळी पडशी /
कुडलसंगमा मान्य न होशी //
सांगणे आगळे, वागणे आगळे |
शास्त्रात न कळे, विप्र कैसे ||
कुडलसंगमदेवा, ऐसे हे लक्षण |
हेच ते प्रमाण, हीन दीन ||

**अस्पृश्यता निवारण :** बाराव्या शतकात अस्पृश्यांची स्थिती फारच वाईट होती गावात प्रवेश करताना त्यांना ओरडून सांगावे लागत होते त्यांच्या अशा ओरडण्याने गावातील उच्च जातीतील लोकांना त्यांचा विटाळ टाळणे सुलभ होत असे. अस्पृश्य संदर्भात भारतातील वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या समजुती होत्या व वेगवेगळ्या दर्जाची हीन वागणूक मिळत होती. अस्पृश्य समाजातील लोकांना कोणत्याही प्रकारच्या प्रतिष्ठित व्यवसाय करता येत नव्हता. अस्पृश्य जातीतील समूह हाच श्रमिकांचा मोठा वर्ग होता. हे लोक सामंताचे गुलामच होते. अस्पृश्य आणि दलित उद्धारासाठी त्यांनी प्रधानमंत्री पदाचा त्याग केला. त्यांनी स्थापन केलेल्या अनुभव मंटपात जातीभेद व लिंगभेद नव्हता. त्यांच्या मंटपात दलित व्यक्ती अधिक होते व त्यांच्यावर त्यांनी निस्सीम प्रेम केले. त्यांना कौटुंबिक जीवनात अग्रस्थान दिले.

ममपिता थोर मांतंग चन्नया, पितामह वीर डोहार कक्कया /
चिक्कयाशि जाणा आपुलाची अय्या, धन्य मम बंधू संत हरळय्या//

हे मानवा तुझा जन्म विटाळातून झाला तरी तू कुळगोत्र शोधतोस त्यावरुन तू मालंगी पुत्र आहेस.

लोह तापवुनी लोहार झाले, कपडे शिवून विणकर |
वेद पठुनी ब्रम्हण, मग कानातून कोण जन्मला ||

प्रत्येकाच्या जन्माची रित जर एकच तर माणसामाणसांत भेद कसले ?

भुईणीया सुत व्यास, मांगीणीचा मार्कंडेय |
मंडुकाची कन्या मंदोदरी, बेरडपुत्र अगस्ती ||
कश्यप लोहार, कोंडीण्य न्हावी, कुळ जातीचे |
श्रेष्ठत्व कमी होत नाही म्हणून कुळजात विचारू नये ||

जातीचे श्रेष्ठत्व हा वेडाचार आहे हे त्यांनी सांगितले. आचाराला त्यांनी महत्त्वाचे स्थान दिले.आचार हा स्वर्ग, अनाचार नर्क तसेच मिथ्यावचन मृत्युलोक आणि सत्यवचन देऊन येथेच त्याची प्रचिती पहायला सापडते. म्हणून ही दोन ठिकाणे वेगळी नाहीत असा विचार त्यांनी मांडला.

**समारोप :** बसवेश्वरांनी बाराव्या शतकात वचन साहित्याच्या माध्यमातून मांडलेले विचार आजही तेवढेच प्रस्तुत आहेत. समाजात भौतिक प्रगती बरोबरच बसवेश्वरांनी सांगितलेले नैतिक, समताधारित, विवेकी मूल्यव्यवस्था असणाऱ्या समाजाची निर्मिती होणे ही आजची काळाची गरज आहे. असे घडायचे असेल तर बसवेश्वरांनी वचन साहित्यातून मांडलेले विचार स्वीकारून त्यांनी सांगितलेल्या मार्गावर चालणे अत्यावश्यक ठरते.

**संदर्भ ग्रंथ :**

*डॉ.सुर्यकांत घुगरे : 'विरशैव व इतर धर्म आणि समाज', साधना बुक स्टॉल, गडहिंग्लज जि.कोल्हापूर, (1999)*
*प्रा.भिमराव पाटील, प्रा.विजयकुमार करजकर (संपा.) : 'युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर', प्रिंट पॅक बिजनेस फॉर्मस्. लातूर. (2006)*
*प्रा.रा.तु.भगत : 'संत साहित्य आणि अंधश्रध्दा निर्मुलन', चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर. (2002).*
*डॉ.अशोक मेनकुदळे : 'क्रांतिकारी युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर', महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी. (2000).*

---

# महात्मा बसवेश्वर आणि मानसिक समतोल

**प्रा.डॉ. जयदीप गोविंदराव कहाळेकर**
*क्रीडा संचालक, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड, ता. मुखेड जि.नांदेड*

---

महात्मा बसवेश्वर भारत भूमीला मिळालेले वैभव आहेत . संत हे आपले आयुष्य समाजातील समतोल राखण्यासाठी कार्य करीत असतात . त्यांच्या जिवनाचा अविभाज्य भाग हा समाज बनतो . सागराच्या अथांग लाटेवर नाविकाला आपली नाव समतोल राखण्यासाठी जशी कसरत करावी लागते तशीच विश्व संत बसवेश्वर यांना करावी लागली होती . त्या काळी समाजात अनिष्ठ प्रवृत्तीचे पेव फुटले होते . जात , धर्म हे एकमेकांच्या विरुद्ध वावरत होते. बसवेश्वर यांनी ज्या राज्यात आपला कार्य विस्तार केला . तो राज्य बिज्जल राजा यांचा होता . मनाच्या गतीला गतिमान तर व्हावे लागते पण त्या गतीला ओळखणे फार महत्त्वाचे असते . याच आधार भूमीवर बसवेश्वर यांचे इष्टलिंग पुजेचे संशोधन त्या काळात पूर्ण झाले. जे आजच्यापेक्षा कित्येक वर्षांपूर्वी पूर्ण झाले होते . तेव्हा संशोधन हे देखिल माहीत नव्हते .

इष्टलिंग पुजा हे प्रत्येकांना दिलेले एक स्वातंत्र्य आहे . मध्ययुगीन कालखंडामध्ये मंदिरातील देव हा ठराविक लोकांचा देव होता . तो श्रीमंत , उच्चभ्रू , सवर्ण वर्गांचा देव असत होता . या देवाला भेटण्यासाठी तळमळीने जगणाऱ्या वर्गाला मात्र दूर ढकलले जात होते . बसवेश्वर या लोकांच्या तळमळीचा भाग झाले . त्यांनी या लोकांसाठी मंदिर , देव्हाऱ्यातील देव तळहातावर दिला . म्हणजेच सदैव सोबत राहणारे इष्टलिंग दिले . ही पुजा मनात शुद्ध भावना ठेवून केव्हाही अन् कोठेही करता येते . यासाठी कोणतेच कठोर परिश्रम , बंधन , अंमलबजावणी करावी लागत नाही . ही पुजा भक्तांनी का व कशासाठी करावी ? या प्रश्नाचे साधे , सोपे उत्तर आहे कि , माणूस जग बदलण्या अगोदर स्वतः बदलला पाहिजे . त्यांच्या अंतरंग व बहिरंगात चलणारे विविध भाव हे शांत आणि संयमी बनायला हवे .

> " करस्थळी इष्टलिंगास निरखत
> नेत्रीं अश्रुधारा कधी वाहतील ?
> लिंगदृष्टीच प्राण होऊन कधी राहीन ?
> मिलनच प्राण होऊन कधी राहीन ?
> माझ्या अंगविकारांचा संग सूटून
> कूडलसंगमदेवा , लिंग - लिंग म्हणत . "

इष्टलिंगाची भक्ति करताना करताना लिंग आणि अंगामध्ये समरस होणाऱ्याला सर्व विकारांवर विजय मिळविता येतो . माणूस म्हणून जगत असताना मनाचा द्वंद्व सुरु असतो . या मानसिक अवस्थेतील समतोल राखण्याचे तंत्र जो व्यक्ति शिकत असतो . तोच खरा यशस्वी व्यक्ति बनतो. जो मनावर नियंत्रण मिळवेल तो जग जिंकण्याची क्षमता ठेवत असतो . बसवेश्वर या मनाच्या स्थितीचा खुप सखोल अभ्यास केला आहे. ज्यावर त्यांचे तत्वज्ञान आणि शिकवण अवलंबून आहे .

महात्मा बसवेश्वर केवळ बोलके सुधारक नसून ते खरे कर्ते सुधारक होते . त्यांनी कर्मावर अधिक विश्वास दाखविला आहे . कर्म हे मानवी जिवनातील अतिशय उपयुक्त तत्व आहे . कर्माच्या जोरावर अनेक राजे , महाराजे , सामान्य माणूस देखील जग जिंकण्याचे स्वप्न उराशी बाळगले होते . ' कर्म हेच ईश्वर ' असा मोलाचा सल्ला बसवेश्वर यांनी दिले . ज्ञान , कर्म , भक्ति या त्रिवेणी संगमामध्ये कर्म हे इतर दोघांवर आपला प्रभाव टाकत असतो . मानवाला जिवनात कोणते ही कार्य करण्याकरिता मनाची शांती , समाधान आवश्यक आहे . आपली क्षमता सिध्द करण्यासाठी मनावर नियंत्रण व नियोजन महत्त्वाचे आहे . ते जिवनात आणि खेळामध्ये देखील आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी मदत करते .

मनाचे नियंत्रण सुटले तर तो सैरभैर होऊन जगत असतो . मन हे सर्वच इंद्रियांवर आपले वर्चस्व प्रस्थापित करून सुरळीतपणा आणत असतो . बसवेश्वर आपल्या भक्तांना ध्यान धारणेचा अतिशय सुरेख मार्ग मोकळा करून दिले .

" काय करु , कसे करु देवा ?
माझ्या मनमर्कटाचा हल्ला जोरात होत आहे .
मज थांबू न देई ते , मज बसू न देई ते ,
क्षणार्धात पाताळी उडी मारे ,
क्षणार्धात आकाशी झेप घेई ,
क्षणार्धात दाही दिशांना धावे .
कूडलसंगमदेवा ,
या मनमर्कटाचा हल्ला चुकवून
कधी मज तुमच्या कुशीत घेता ? "

' अनुभवमंडप ' हे एक असे दिव्य , भव्य आणि पवित्र व्यासपीठ होते . या ठिकाणी प्रत्येक शरण स्वतःच्या क्षमतेनुसार स्थान निश्चित करत होता . ओळख , वशिला यासारखे प्रकार तिथे नव्हते . तो कोणत्या जाती , धर्म , पंथाचे असेल मात्र इष्टलिंग शरीरावर धारण केले की , मग ते शरण - शरणी संबोधले जात होते . कन्नड मध्ये स्त्रीला ' अक्का ' व पुरुषांना ' अण्णा ' असा उल्लेख करुन संबोधले जात होते . ताई , दादा हे शब्द परिवारातील सदस्यांसाठीच वापरले जाते . म्हणजेच बसवेश्वरावर अगाध श्रद्धा ठेवून एकत्र आलेले शरण - शरणी हे वेगवेगळे नसून एकत्रित कुटुंबातील भाग बनून राहत असत . स्त्री , शूद्र , दलित समजल्या जाणाऱ्या अनेक वर्गांना जगण्याचा हक्क , अधिकार बसवेश्वरांनी दिला . हरळय्या हा जातीने चांभार व मधुवरस हे ब्राह्मण होते . या दोघांनी आचरण शुध्दतेमुळे आंतरजातीय विवाह सोहळा साजरा करण्याचा मानस पूर्ण करून दाखविला . याचे परिणाम प्रसंगी त्यांचे प्राण देखिल गमवावे लागले .

वचन साहित्य हे समाज सुधारणेसाठी अनमोल ठेवा आहे . या वचनाच्या जोरावरच बसवेश्वरांची खरी ओळख झाली आहे . त्यांचे विशाल नेतृत्व आणि उदारमतवादी दृष्टिकोण पहायला मिळते . हे वचन निर्माण कार्यात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रिया देखील सहभागी झाले होते . हे भारतीय इतिहासासाठी गौरव व अभिमानाची बाब आहे . जो समाज प्रवाहाच्या बाहेर होता तो स्वाभिमानाने जगत होता . ही खुप मोठी क्रांती घडवून आणली होती. बसवेश्वर खितपत पडलेल्या समाजाला कोणत्या संजिवनीची गरज आहे ते ओळखले होते . आपल्या वचनातून बसवेश्वर व इतर अनेक शरण - शरणी यांनी आपल्या भावना वचनातून व्यक्त केले . या वचनात ज्ञान , भक्ति , कर्म , आचार , विचार , परस्पर संबंध , दासोह इत्यादी गोष्टी सांगितल्या आहेत . ही प्रत्येक गोष्ट मानवाचे जिवन परिवर्तीत करण्यासाठी सहाय्यक ठरत होते .

शरणांचा इतिहास अतिशय जाज्वल्यमय आहे . शरण हे आपल्या जवळील प्रत्येक वस्तु मनाने लिंगार्पण करत असतात . यामुळे मिथ्या गर्व , अंधकार , अहंकार नष्ट होते .राजा , भक्त , वेश्या , मांस भक्षण करणारा या सर्वांचे वर्तन आणि शरणांच्या वर्तनामधील फरक या वचनातून व्यक्त करण्यात आले -

" धनिक लोक राजास भिती पहा ,
भक्त लोक जंगमास भिती पहा ,
वेश्येवर मोहित झालेले तिचे उष्टे खाती पहा .
मांस आवडणारे कुत्र्याचे उष्टेही खाती पहा .
कूडलसंगाच्या शरणांचा शेषप्रसाद
लिंगार्पित करुन , ग्रहण करून श्रेष्ठ ठरलेल्यांना
आमचे चिक्कबसवण्णा जाणती . "

शरणात सेवाभाव अधिक प्रिय मानले जाते . एकमेकांतील दोष , उणिवा काढत बसण्यापेक्षा आपलेसे मानून व्यवहार केल्यानंतर विचार परिवर्तन घडवून आणला जातो . बसवेश्वरांना दांभिक भक्तांचा शेजारी होण्यापेक्षा शरणांच्या घरचा दास होणे अधिक प्रिय आहे . एकदा बसवेश्वरांच्या गायी चोरीला गेले . सेवक दाहीदिशेला शोध मोहीम सुरू केली होती . मात्र बसवेश्वरांची चिंता त्या चोरीला गेलेल्या गायी विषयी नव्हती . ते त्या गायीच्या वासरांना चोरांच्या जवळ पाठविण्याची होती . गायी विना वासरे हंबरत होते . ते बसवेश्वरांना असह्य होत होते . चोराला चोर म्हणू नका ? , कसलीच शोधाशोध करू नका ? दोन्ही ठिकाणी तोच कूडलसंगमदेव आहे .

" चोरांनी गाय चोरली म्हणू नका हो , कृपा करून .
बोंब मारू नका हो , कृपा करून .
शोधाशोध करु नका हो , कृपा करून .
तेथे जेवणाराही संगच , येथे जेवणाराही संगच ,
कूडलसंगमदेवाचा हा एकोभाव . "

बसवेश्वर आपल्या वचनातून विचारांची शुध्दता व्यक्त करत होते . त्या चोरांना ही बाब कळाल्यावर ते गायी परत गोठ्यात आणून सोडले . तात्पर्य असे की , शत्रू किंवा चोर कोणीही असला तर बसव विचार ऐकल्यावर तो निश्चित बदलणारच . याचे मूर्तिमंत उदाहरण अनेक वचनातून सिध्द झाले आहे .

बसवेश्वर यांनी आपल्या विचारांची कास मानसिक समतोल राखण्यावर अधिक भर दिला होता . कोरोना किंवा अनेक अडचणींना सामोरे जाताना प्रत्येकांची दमछाक होत आहे . मन शांत झाले तर कर्म देखिल छान होत असते . बसवेश्वर यांनी आपले वचन जर इंग्रजी भाषेत मांडले असते तर अख्खे जग डोक्यावर घेऊन नाचले असते . मात्र जगाला दिशा देणारे विचार आपल्या डोक्यात शिरत नाहीत ही शोकांतिका आहे . कारण या देशात थोर संत , समाजसुधारक , आदर्श विचारवंतांना जाती , धर्माच्या चौकटीत बंदिस्त केले आहेत . आजच्या काळात मनाचा समतोल राखण्यासाठी केवळ आणि केवळ बसवेश्वर यांचे विचार फायदेशीर ठरू शकतात . क्रीडा क्षेत्रात या तत्वज्ञानाचा अतिशय सुंदर लाभ होऊ शकतो . फक्त त्याकडे लक्ष देणे काळाची गरज बनली आहे.

# महात्मा बसवेश्वरांचे समतावादी तत्त्वज्ञान

**प्रा. डॉ. माधव नरहरी कांबळे**
*संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट जि. लातूर*
*Email. madhav358.2012@rediffmail.com Mobile – ९७६५६४०१२५*

## प्रास्ताविक

भारतात प्राचीन काळापासून जे महामानव होऊन गेले त्यामध्ये महात्मा बसवेश्वर यांचे कार्य क्रांतिकारक व परिवर्तनवादी असेच आहे. तत्कालीन समाजात रूढ असलेल्या अंधश्रद्धा, कर्मकांड, बुवाबाजी, पुरोहितशाही, काल्पनिक धर्मग्रंथ, जातिभेद, स्त्री दास्य यासारख्या अनेक वाईट रूढी परंपरा यावर त्यांनी प्रहार केले आहेत. त्यामुळे बारावे शतक हे क्रांतिकारक शतक मानले जाते. कारण महात्मा बसवेश्वरांनी समाजातील भेदाभेद संस्कृतीला दूर सारून एकमेकाकडे पाहण्याची समतावादी दृष्टी निर्माण केली होती. तसेच नव्या समाजक्रांतीला जन्म देऊन वचन साहित्याच्या माध्यमातून सामाजिक समतेचा संदेश घरोघरी दिल्यामुळे खऱ्या अर्थाने ते समतानायक ठरतात.

## संशोधनाची उद्दिष्टे:-

महात्मा बसवेश्वरांच्या समतावादी तत्वज्ञानाचे आधुनिक संदर्भात विश्लेषण करणे.

## गृहीतक:-

प्रगतिशील समाज निर्माण करण्यासाठी महात्मा बसवेश्वरांच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय, स्त्री विषयक विचार वर्तमान स्थितीत संपूर्ण मानवजातीसाठी मार्गदर्शक व उपयुक्त आहेत.

## संशोधन पद्धती :-

प्रस्तुत शोधनिबंधासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

## तथ्य संकलन व विश्लेषण:-

सदर विचाराचे संकलन आणि विश्लेषण करण्यासाठी संकलनाच्या दुय्यम स्रोताचा आधार घेऊन विश्लेषणात्मक व वर्णनात्मक पद्धतीने महात्मा बसवेश्वरांचे समतावादी विचार सद्यस्थितीत कसे उपयुक्त आहेत हा मांडण्याचा प्रयत्न सदर शोधनिबंधात केला आहे.

महात्मा बसवेश्वर हे क्रांतिकारी युगपुरुष होते त्यांचा जन्म इसवी सन 1606 कर्नाटक राज्यातील विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्वर -बागेवाडी या गावात संप्रदायाची परंपरा जोपासणाऱ्या ब्राह्मण कुटुंबात झाला. बसवेश्वर अगदी लहानपणापासूनच अतिशय बुद्धिमान होते. आठव्या वर्षी त्यांची मुंज व्हायची होती परंतु मोठ्या बहिणीची म्हणजेच नागलंबिकाची मुंज झाली नव्हती. प्रथेप्रमाणे मुलींना तो अधिकारही नव्हता. परंतु हा अधिकार स्त्रियांना नसेल तर तो अधिकार मलाही नको यासाठी महात्मा बसवेश्वरांनी आपल्या स्वतःची मुंज करून घेण्यास विरोध केला होता.

महात्मा बसवेश्वर यांनी कुडल संगम या पवित्र ठिकाणी जातवेद मुनीच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे शिक्षण पूर्ण केले होते. या ठिकाणी वेद, उपनिषद, ब्राह्मण्य आदी ग्रंथांचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. त्यातील सत्य जाणून घेऊन पण पुढे आयुष्यभर त्यांनी वेदादी धर्मग्रंथांना विरोधच केलेला दिसून येतो त्यांनी केवळ वेदच नाकारले नाहीत तर देवदेवतांची पूजा, वर्णभेद, जातिभेद, लिंगभेद, स्त्री-पुरुष भेद अशा सर्व

भेदांना नाकारून त्यांनी समता, प्रेम व बंधुभावाची शिकवण समाजाला दिलेली आहे. तसेच रूढी परंपरा व कर्मकांडाच्या विरोधात नेहमीच बंड पुकारले होते. त्यांना स्त्री-पुरुष भेद मान्य नव्हता. समाजातील सर्वच लोक समान आहेत म्हणून त्यांना समान प्रतिष्ठा, मान मिळाला पाहिजे असे त्यांचे मत होते. त्यामुळे ते आयुष्यभर सर्व उपेक्षित, वंचित, शोषित अशा लोकांना आपुलकीने आदराने वागत राहिले. महार, मांग, ढोर, चांभार, विणकर, परीट, कुंभार, लोहार या जाती केवळ धंद्यामुळे बनलेल्या आहेत म्हणून कुणालाही त्याच्या व्यवसायावरून कमी न लेखता, खालच्या, हलक्या जातीचे न समजता सर्व मानव समान आहेत असे समजून त्यांच्याशी मानवाप्रमाणे वागणे हाच खरा मानवता धर्म आहे असा संदेश त्यांनी आपल्या कृतिशील विचारातून दिलेला दिसून येतो. म्हणून महात्मा बसवेश्वर हे खऱ्या अर्थाने समतावादी संत, समाज सुधारक व महामानव ठरतात.

बसवेश्वरांनी समतेचा संदेश देत असताना खालील वचन सांगितले आहे.

हा कुणाचा, हा कुणाचा,
असे नच म्हणवी देवा;
हा आमचा, हा आमचा,
असे म्हणावे कुंडलसंगम देवा.

महात्मा बसवेश्वर यांनी कल्याण येथे विचार मंटपाची स्थापना केली. या विचार मंडपाच्या अध्यक्षस्थानी अलंप्रभु या मागासवर्गीय जातीतील व्यक्तीला लोकविद्यापीठाचे कुलपती म्हणून नेमले यावरून त्यांचा समतावादी दृष्टिकोण  दिसून येतो. महात्मा बसवेश्वरांनी अठरापगड जातीतील लोकांना विचार मंटपाच्या रूपाने ज्ञानपीठ मिळवून दिले. या अनुभव मंटपात देशातील निराळ्या प्रांतातून व विविध जातीतून येणाऱ्या सर्वसामान्य स्त्री-पुरुषांनाही येथे वचने रचन्याची संधी मिळू लागली. त्यामुळे हजारो वर्षापासून दडपली गेलेली या लोकांची प्रतिभा येथे फुलू लागली. एवढेच नाही तर खालच्या जातीचे लोक वरच्या जातीच्या लोकांच्या मांडीला मांडी लावून येथे वचने रचण्याचे काम करू लागले.

महात्मा बसवेश्वरांनी आपल्या कार्यात स्त्रियांनाही सामावून घेतले होते. स्त्री-पुरुष भेद त्यांना मान्य नव्हता हे त्यांनी वयाच्या आठव्या वर्षीच दाखवून दिले होते. त्यामुळे स्त्रियांना अनुभव मंटपात केवळ समान अधिकार दिला नाही तर त्यांना अभिव्यक्ति स्वातंत्र्यहि दिले. कर्मठ परंपरेने ठेवलेल्या स्त्रियांच्या मानसिक शक्तीचा विकास करुन बाराव्या शतकात बसवेश्वरानी एक अभूतपूर्व क्रांतीच केली. विविध जाती-धर्माच्या सुमारे सत्तर स्त्रिया अनुभव मंडपात दाखल होऊन त्यांनी पुरुषाप्रमाणे स्वतःचे वचन साहित्य निर्माण केली. त्यामुळे समाजात स्त्रीचे एक वेगळी ओळख महात्मा बसवेश्वरांनी सुमारे आठसे वर्षांपूर्वी समता प्रस्थापित करून निर्माण केली होती. म्हणून अनुभव मंटप ही स्वातंत्र्य, समता, बंधुता, प्रेम, आपुलकी, त्याग व न्याय इत्यादी मानवी मूल्य निर्माण करणारी एक लोकशाहीवादी संसद होती.

बाराव्या शतकात सामाजिक परिस्थिती अत्यंत देखणे होते समाजात चातुर वर्णव्यवस्था अस्तित्वात असल्यामुळे एका वर्गाला श्रेष्ठ तर दुसऱ्या वर्गाला कनिष्ठ वागणूक मिळत होती. अशा प्रकारचा भेदभाव महात्मा बसवेश्वर यांना मान्य नव्हता त्यामुळे त्यांनी माणसामाणसात भेदभाव करणारी वर्णव्यवस्था, समाजव्यवस्था नाकारली होती. जात, धर्म, पंथ, लिंग यांना मानता माणसातील भेदभावाचा धिक्कार करून समतेच्या तत्वज्ञानाचा सूर्यप्रकाश प्रत्येक माणसाच्या मनापर्यंत नेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे महात्मा बसवेश्वर हे विषमतेच्या वाटा बंद करून मानव मुक्तीची नवी पहाट व समतेची वाट दाखवणारा खरा मुक्तिदाता होय. त्यांना वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था मान्य नव्हती, त्यामुळे त्यांनी त्या विरोधात बंड

पुकारून समतेच्या पायावर आधारित समाजाची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न केला. ते एवढ्यावरच न थांबता त्यांनी जातीप्रथा आणि जातीव्यवस्था नामशेष करण्यासाठी कल्याण मध्ये चांभार जातीतील शिलवंत व ब्राह्मण जातीतील कलावती या दोघांचा पहिला आंतरजातीय विवाह लावून खरी समाजक्रांती घडवून आणली होती.

महात्मा बसवेश्वरांनी जातीजातीतील भेद अमान्य करून उच्च नीच इत्यादी गोष्टींना विरोध केला चातुर्य वर्णव्यवस्थेमुळे समाज जाती-जातीत विभागाला गेला म्हणून त्यांनी चातुर्य वर्णव्यवस्थेलाही विरोध केला. समाजात विषमता निर्माण करणाऱ्या ब्राह्मण व पुरोहितशाहीलाही त्यांनी विरोध केलेला दिसून येतो महात्मा बसवेश्वर यांनी आपले संपूर्ण जीवन समाजात समता निर्माण करण्यासाठी घालवले असली तरी त्यांच्याच विचाराचा उदोउदो करणारी माणसे आज हजारो वर्षापासून अस्तित्वात असलेल्या जातीयवादाला खतपाणी घालत असताना दिसून येतात, म्हणून महात्मा बसवेश्वर यांच्या सामाजिक तत्वज्ञानाची आज नितांत गरज आहे असे वाटते

**सारांश**

बाराव्या शतकात जातीयता, असमानता, भेदभाव यांनी पोखरलेल्या समाजाला समतेच्या रूळावर आणण्याचे महान कार्य बसवेश्वरांनी केले आहे. थोर संत, खरे कृतिशील समाजसुधारक, युगपुरुष महात्मा बसवेश्वर आज आपल्यात जरी शरीराने नसले तरी ते प्रत्येक बहुजनांच्या मनामध्ये विचाराने मात्र उपस्थित आहेत. त्यांनी प्रत्येक मानवात पेरलेली मानवतेची विचारधारा आजही समाजाला परिवर्तनाकडे घेऊन जाण्यासाठी आवश्यक आहे.

मध्ययुगीन भारतात महात्मा बसवेश्वरांनी आपल्या आचार व विचारातून आधुनिक समाजाच्या निर्मितीसाठी एक मूल्य व्यवस्था निर्माण केली होती. स्वातंत्र्य समता बंधुचा न्याय या मूल्यांच्या आधारे समता आधारित मानवतावादी समाज निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता. एवढेच नाही तर वीरशैव धर्माची दारे स्त्री आणि अस्पृश्यांना खुली करून समतावादी धर्म प्रत्यक्षात आणण्याचे महान कार्य त्यांनी केले होते. अनुभव मंडप वचन साहित्यातून प्रकट झालेले त्यांचे धार्मिक तत्वज्ञानही आधुनिक भारतातील विविध धर्म व सुधारणावादी चळवळींना प्रेरक ठरणारे आहे.

महात्मा बसवेश्वरांनी सांगितलेली जातीविरहित विचार आजच्या जातीवादी राजकारण्यांना जातीविरहित धर्म व्यवस्था निर्माण करण्यासाठी अत्यंत आवश्यक आहेत. तसेच मानवी हक्काची जोपासना बसवेश्वरांच्या तत्वज्ञानामुळे अधिक चांगल्या प्रकारे करता येऊ शकते हे स्पष्ट होते. त्यांनी समाजातील भेदभाव नष्ट करू वंचित,शोषित व स्त्रियांना दिलेले अधिकार स्त्री सबलीकरणासाठी व वंचितांच्या विकासासाठी मार्गदर्शक व आधारभूत असेच आहेत.

## संदर्भ ग्रंथसूची

*संपादक प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, 2020, विचारशलाका, महात्मा बसवेश्वर विचारविश्व विशेषांक, स्नेहा ऑफसेट, लातूर*
*डॉ. वेदप्रकाश डोणगावकर, 2011, महात्मा बसवेश्वर यांचे तत्वज्ञान, स्वाती प्रकाशन, पूर्णा*
*किसन सूर्यवंशी, 2012, परिवर्तनाचा दीपस्तंभ महात्मा बसवेश्वर, पंचफुला प्रकाशन , औरंगाबाद*
*डॉ. टी.जी. प्रभाशंकर, 2008, बसव दर्शन, संत साहित्य संस्थान, नई दिल्ली*
*एच. तीप्पेरुद्र स्वामी, 2011, भारतीय साहित्याचे निर्माते बसवेश्वर, साहित्य अकादमी, मुंबई*
*शालिनी श्रीशैल्य दोडमनी, 2010, शरण संदेश, श्री ऑफसेट प्रिंटर्स, सांगली*
*डॉक्टर भगवानदास तिवारी, 1997, जीवन व संदेश*
*बसव पथ,2016, मराठी मासिक, लुल्ले प्रिंटर्स, लातूर*

# बसवप्रणीत शिक्षण पद्धती

**राजू ब. जुबरे**
*महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी, जि. बिदर – ५८५३२८ Mob. ८९०४६३८९०८*

शिक्षण ही हजारो वर्षापासून निरंतर चालत आलेली प्रक्रिया आहे. कालानुरूप त्याचे स्वरूप बदलत गेले आहे. प्राचीन काळात शिक्षण ही मानवी जीवनाच्या उत्क्रांतीतील अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया होती. रानटी, पशुसम असलेला आदीमानव आपल्या विचारशक्तीच्या बळावर कालानुक्रमे प्रगत होत गेला आहे. त्याने लावलेला अग्नीचा शोध, शेतीचा शोध, अवजारे घडविणारी कला, चित्राची भाषा, डोळ्याची भाषा आणि लिपीची भाषा ही सृजनात्मकता त्याच्या विचारशक्तीची अपत्येच आहेत. ही विचारशक्तीची प्रक्रिया ज्या व्यवस्थेने निरंतर चालू ठेवली होती, तिला आज आपण 'शिक्षण पद्धती' असे म्हणतो.

वेदकाळात ही शिक्षण पद्धती ही मुठभर लोकांच्या कपिमुष्ठित सापडली होती. वैदिक गुरुकुल शिक्षण पद्धतीत 'उपनयन' नावाचा धार्मिक विधी केल्यानंतर गुरूकुलात प्रवेश दिला जाई. परंतु हा विधी विशिष्ट वर्णापुरताच मर्यादित होता. शिवाय स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. वेदकाळानंतर भारतात बौद्ध शिक्षण पद्धती अस्तित्वात आली. 'पब्जा' या धार्मिक विधींनंतर विहारात प्रवेश मिळत असे. बुद्धाने स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार दिला. मुस्लिम शिक्षण पद्धतीत 'बिस्मिला' नावाच्या धार्मिक विधीने मक्ताब येथे शिक्षणासाठी प्रवेश दिला जाई. या सर्व शिक्षण पद्धतीत धर्मप्रसार, नैतिकता आणि मोक्षप्राप्ती हेच शिक्षणाचे मुख्य उद्देश होते. ब्रिटिशांचे आगमन झाल्यानंतर या देशातील शिक्षण पद्धतीची कूस बदललेली दिसते. परंतु, मध्ययुगीन भारतात महात्मा बसवण्णांनी दक्षिणेत नाविण्यपूर्ण अशी 'कायक शिक्षण पद्धती' अस्तित्वात आणली होती. या शिक्षण पद्धतीची मीमांसा करणे, हेच या लेखाचे प्रयोजन होय.

बसवपूर्व काळात या देशात धर्माधिष्ठित ज्ञानप्रधान शिक्षण पद्धती अस्तित्वात होती. बुद्धी ग्रहण करते, ते ज्ञानप्रधान शिक्षण होय. बसवण्णांनी कायकप्रधान शिक्षण पद्धती अस्तित्वात आणली. कायक म्हणजे कायेद्वारा अथवा शरीराद्वारे केले जाणारे सत्य-शुद्ध श्रम असा अर्थ शरणांच्या अनेक वचनांतून व्यक्त होतो. 'सत्य-शुद्ध नसता, ते नव्हे कायक' असे शरणी काळव्वे म्हणते. बसवण्णांनी कायकास सत्य आणि शुद्ध ही दोन मानदंड लावली आहेत. याचा उद्देश आपण करीत असलेले कायक हे व्यक्तिहिताबरोबरच समाजहिताचेही असावे. या अर्थाने कायक शिक्षण पद्धती म्हणजे व्यक्ती व समष्टी कल्याणकारी, श्रमाधिष्ठित शिक्षण पद्धती होय.

**महात्मा बसवण्णा : एक शिक्षणतज्ञ**

व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर त्याला शिक्षण दिले पाहिजे. शिक्षणातूनच मूल्यांतर घडून येते आणि क्रांतीचा उष:काल होतो. व्यवस्था परिवर्तन करण्याचे सामर्थ्य शिक्षणातच आहे, हे जाणलेल्या बसवण्णांनी सर्वांसाठी शिक्षणाची दारं खुली केली. जातीभेद, लिंगभेद, वर्णभेद, वर्गभेद आणि वयोमर्यादा या सर्व बंधनातून ही व्यवस्था मुक्त केली. ते सर्वांच्या दारी, ज्ञान शिदोरी घेऊन गेले. त्या ज्ञानशक्तीनेच पुढे आंदोलनाचे रूप धारण केले.

महात्मा बसवण्णांनी उभारलेले लिंगायत आंदोलन हे सामाजिक, धार्मिक आंदोलनासोबतच वैचारिक आंदोलनही होते. विचारांची परिपक्वता व प्रगाढ निष्ठा असल्याशिवाय कोणतेही आंदोलन यशस्वी होत नाही. जनआंदोलनाला वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून देण्यासाठी शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे गरजेचे असते. म्हणून बसवण्णांनी अनुभव मंटपाची स्थापना केली. त्याद्वारे कायकप्रधान शिक्षण पद्धती अमलात आणली. त्याच्या प्रसार

करण्यासाठी स्वतंत्रपणे काही शरणांची नेमणूकही केलेली दिसते. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे अरिविन मारितंदे होत. ते ज्ञानदासोहाचे कायक करीत असत.

बसवण्णांनी आपल्या राज्यात अशी अनेक 'कायक शिक्षण केंद्र'ही स्थापन केली होती. बसवप्रणीत कायक शिक्षण पद्धतीत महिलांना शिक्षण घेण्याचे स्वातंत्र्य होते. महिला शिक्षणाची जबाबदारी बसवण्णांनी आपली बहीण अक्का नागम्मा, पत्नी गंगाम्बिका आणि नीलम्मा यांच्यावर सोपविली. जंगम ही ज्ञानप्रसारक यंत्रणा उभी केली. शरण हे खऱ्या अर्थाने लोकशिक्षक झाले. शिक्षणाचे माध्यमं मातृभाषा होती. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण केल्यामुळे समाजातील सर्व घटकांना ज्ञान मिळाले. त्यांना अभिव्यक्त होण्याचे स्वातंत्र्य मिळाले. विचारांची देवाण-घेवाण करता आली. वैशिष्यपूर्ण असे वचन साहित्य उदयास आले. एकाच काळी, एकाच विचारपीठावर सुमारे २०० शरणा (पुरुषां)बरोबर सुमारे ३५ (शरणी) स्त्रियांनी वचने लिहिली आहेत. ही बसवण्णांनी केलेली शैक्षणिक क्रांतीच होय.

**अनुभव मंटप : एक विश्वविद्यालय**

महात्मा बसवण्णांनी स्थापन केलेले अनुभव मंटप हे एक विश्वविद्यालय होते. या विश्वविद्यालयात ज्ञान घेण्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून लोक एकत्र आले. आंध्र-तेलंगणातून किन्नरी ब्रह्मय्या, शरण दसरय्या, तमिळनाडूहून मातंग चेन्नय्या, गुजरातहून शरण आदय्या, ओरिसाहून सुज्ञानिदेव, अफगाणिस्थानहून मरूळशंकरदेव, काश्मिरहून महादेव भूपाल, मध्यप्रदेशातून शरण कक्कय्या, महाराष्ट्रातून सिद्धरामेश्वर, उरिलिंगपेद्दी अशाप्रकारे तत्कालीन अनेक देशांचे प्रतिनिधी अनुभव मंटपात सहभागी झाले होते. या विश्वविद्यालयाचे कुलगुरू म्हणून त्याकाळातील महानज्ञानी, अनुभावी अशा अल्लमप्रभूंना नेमण्यात आले होते. चेन्नबसवण्णा हे अनुभव मंटपाचे कार्याध्यक्ष होते. या अनुभव मंटपाचे ७७० एवढे प्रतिनिधी होते. त्यात ७० महिला होत्या. हे ७७० प्रतिनिधी समाजातील वेगवेगळ्या स्तरातून आलेले होते. अनुभव मंटपाची एक स्वतंत्र नियमावली होती. त्याप्रमाणे एक, समतेचे प्रतीक असलेले इष्टलिंग प्रत्येकांनी गळ्यात धारण करावे. दोन, आपल्या उदरनिर्वाहनासाठी सत्य-शुद्ध कायक केलेच पाहिजे. तीन, कायकातून मिळविलेली संपत्ती आपल्या गरजेपुरती ठेवून, शिल्लक संपत्ती समाजातील दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी दासोह करावा. अनुभव मंटप सदस्यांनी हे तीन नियम पाळणे गरजेचे होते.

या अनुभव मंटपातील सकाळच्या सभेत तात्विक विषयांची चर्चा होत असे. संध्याकाळच्या सभेत सामान्य विषयांची चर्चा होत असे. त्यात हे सर्व श्रमजीवी शरण सहभागी होत. प्रत्येकजण आपले अनुभव सांगत असत. या सभेच्या नियमाप्रमाणे इथे, वेदप्रामाण्य अथवा ग्रंथप्रामाण्य मानले जात नसत. फक्त अनुभावप्रामाण्य मान्य केले जाई. सामूहिक चर्चेअंती एकमतांनी सम्मत झालेले विचार 'वचन'रूपाने लिहिले जाई. ही वचने ताडपत्रावर लिहिली जात. अशा वचनांचे स्वतंत्र संग्रहालय निर्माण करण्यात आले होते. त्यास 'वचन भांडार' असे म्हटले जात असे. या वचन भांडाराचे प्रमुख 'शांतरस' होते. शांतरस म्हणजे आजच्या शैक्षणिक परिभाषेतील 'ग्रंथपाल' होत. ते विषयानुरूप वचनांचे गठ्ठे व्यवस्थित भांडारात लावून ठेवत असत. प्रसारासाठी जाणाऱ्या जंगमांना वचन ताडपत्राच्या अनेक प्रती तयार करून देत असत. अशी एक शैक्षणिक शिस्त असलेली ही संस्था म्हणजे आजच्या भाषेतील विद्यापीठच होय.

**शरण : लोकशिक्षक**

अनुभव मंटपातील शरण आपले कायक करीत ज्ञानदासोहाचे कार्य करीत. आपल्या कामातून वेळ काढून ते विविध जाती-धर्मातील लोकांच्या कार्यात सहभागी होत. त्यांच्या घरी जात. समाजातील लोकांचे सुख-दुःख, समस्या जाणून घेत, त्यांच्यातील अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न करीत. त्यांना वचने वाचायला देत. बसवण्णांच्या नेतृत्वाखाली कल्याणमध्ये चाललेल्या क्रांतिकार्याचा परिचय करून देत. अरिविन मारितंदे शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगत. सर्वांनी ज्ञान घेऊन शहाणे होण्याची प्रेरणा देत असत. अज्ञानामुळे आपले कसे शोषण होते, आपण कसे फसतो, हे

मारितंदे समजावून सांगत. शरण दसरय्या पर्यावरण संरक्षणाची शिकवण देत असत. आयदक्की मारय्या, नुलिय चंदय्या श्रमाचे महत्त्व प्रतिपादन करीत. शरण हेंडद मारय्या व्यसनमुक्तीचा संदेश देत. शरण अंबिगर चौडय्या एकदेवोपासना शिकवित. दांभिकता, कर्मकांड, अंधश्रद्धा यांच्याविरुद्ध समाजप्रबोधन करीत. अनिष्ट रूढी परंपरा आणि देवाधर्माच्या नावावर होत असलेले शोषण याविषयी जागृती करीत असत. एकूणच, शरण हे लोकांपर्यंत जाऊन, त्यांना विश्वासात घेऊन मनपरिवर्तनाद्वारे या वैचारिक आंदोलनात सहभागी करून घेत.

**जंगम : ज्ञानप्रसारक**

महात्मा बसवण्णांनी अनुभव मंटपात ज्ञानप्रसारकांची स्वतंत्र अशी एक यंत्रणा उभी केली होती. त्यांना 'जंगम' असे संबोधले जाई. 'जंगम' या शब्दाचा अर्थ चलनशील, चैतन्यात्मक, स्थावर नसलेले असा आहे. अनुभव मंटपात प्रशिक्षित झालेले हे जंगम बसवादी शरणांचे विचार प्रसार करण्यासाठी 'खेड्यात एक रात्र, नगरात पाच रात्री' असा प्रवास करीत असत. असे एक लाख शहाण्णव हजार (१, ९६, ०००) जंगम प्रसारक असल्याची नोंद लिंगायत साहित्यात मिळते. या जंगमाच्या ज्ञानप्रसारक कार्यामुळेच काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंतच्या अनेक प्रातांतून असंख्य शरण कल्याणच्या (बसवकल्याण) अनुभव मंटपात आले. त्याकाळी कुठलीही माध्यमं अस्तित्वात नव्हती. ना वृत्तपत्र, ना दूरदर्शन, ना संगणक, ना इंटरनेट, ना टिव्टर, ना फेसबुक, ना व्हाट्स अप, ना अन्य कोणती वाहिनी, तरीही देशाच्या विविध भागातून लोक कल्याणला आले. यास ही जंगम यंत्रणाच कारणीभूत होती.

**शिक्षणविषयक चिंतन**

आज प्रचलित असलेल्या 'शिक्षण' या शब्दास शरणांनी अरिवू अर्थात निजज्ञान, विद्या, ज्ञान अशी परिभाषा वापरली आहे. बसवादी शरणांनी आपल्या अनेक वचनांतून अज्ञान व त्यामुळे होणारे शोषण, ज्ञानाचे महत्त्व, ज्ञान हे सर्वांठायी उपजतच असते, ज्ञानाचे क्रियेत रूपांतर आणि ज्ञानाची सद्‌गुणांशी सांगड अशा विविध पातळीवर ज्ञानाची मीमांसा केली आहे. महात्मा बसवण्णां हे जसे महान शिक्षणतज्ञ होते, तसेच थोर समाजशास्त्रज्ञही होते. या समाजातील दारिद्रय, मूढता, अंधश्रद्धा, अनिष्ठ रूढी-परंपरा नष्ट करायच्या असतील तर सामान्य माणूस शिकला पाहिजे, असा त्यांचा स्पष्ट अभिप्राय होता. कारण मनुष्याच्या अवनतीस खऱ्या अर्थाने ज्ञानच कारणीभूत असते. अज्ञान आवरल्याने मनुष्याचे जीवन हे पशुसम होते. त्यांच्यातील उपजत ज्ञानाचा, विवेकाचा विकास न झाल्यामुळे तो या सुंदर पृथ्वीतलावरील आनंदी जगणेच हरवून बसतो. अविद्येमुळे मनुष्य कसा वागतो हे सांगताना शरण शिवयोगी सिद्धराम म्हणतात- 'विद्येचा गंध नसलेला मारामारीला तयार. अविद्येची जाणीव नसलेला, जगासच लाथ मारी पहा, कपिलसिद्ध मल्लिकार्जुना.' म्हणूनच बसवण्णा पहिल्यांदा समाजातील अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न करतात. हे अज्ञान कशाच्या बळावर नष्ट होते ? याचे उत्तर देताना महात्मा बसवण्णा 'ज्ञानाच्या बळाने अज्ञानाचा नाश होतो पहा' असे म्हणतात. परंतु, अज्ञान जीवास ज्ञानाचे महत्त्व न कळाल्यामुळे तो कांचन, कामिनी आणि भूमी संपादन करण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घालतो. जगाच्या इतिहासातील अनेक युद्धे ही या तीन गोष्टीच्या प्राप्तीसाठी झालेली दिसून येतात. वास्तविक पाहता या गोष्टी स्थिर आणि शाश्वत नव्हेत; परंतु, जगच यांच्या पाठीमागे लागलेले दिसते. हे पाहून अल्लमप्रभू मनुष्याला सावध करताना म्हणतात :

'भूमी तुझी नव्हे रे, सुवर्ण तुझे नव्हे रे,
कामिनी तुझी नव्हे रे,
व्यवहारी जगासाठी असलेले हे सारे.
अलंकार तुझ ज्ञानरत्न.
नच गमावता हे दिव्यरत्न,
त्या रत्नाने झाल्यास अलंकृत,

आमुच्या गुहेश्वरलिंगाठायी
तुजपरी नसे कोणी श्रीमंत, पहा रे मना.'

या व्यवहारी जगात ज्यांना भूमी, कांचन आणि कामिनी अधिक आहे, त्यांना श्रीमंत मानले जाते. परंतु खऱ्या अर्थाने ते श्रीमंत नव्हेत. खरा श्रीमंत कोण ? ज्याच्याजवळ ज्ञानरूपी रत्न आहे तो. ज्ञान असल्याठायी सर्व सुख-संपत्ती पायाजवळ लोळत घेते. म्हणून मनुष्याने ज्ञानप्राप्त केले पाहिजे. असे अल्लमप्रभू सांगतात. ज्ञानाचे एवढे महत्त्व सांगून ते थांबत नाहीत, तर त्या ज्ञानप्राप्तीचा मार्गही सांगतात, तो असा- 'ज्ञान जाणण्यास सांगून, श्रीगुरूंनी लिंग हाती दिले असता, ज्ञान विसरून लिंगच पूजिणारी मेंढरे पहा, गुहेश्वरा.' हा मार्ग लिंगवंतांना अजूनही अनुसरता आला नाही. महात्मा बसवण्णांनी ज्ञान जाणण्यासाठी प्रत्येकाच्या करस्थळी लिंग दिले. यामागे त्यांचे दोन उद्देश होते. एक, इष्टलिंग धारण केल्यानंतर सर्वजण समान होतील. त्यांच्यात जात, वर्ण, वर्ग, वंश आणि लिंग असे कोणतेही भेद राहणार नाहीत. हा भेदभाव नष्ट करून सर्वांना समान संधी आणि स्वातंत्र्य देणे. दुसरे, हे लिंग अनिमिष दृष्टीने पाहत एकाग्रता संपादन करण्यासाठी आहे. ज्ञानप्राप्त करण्यासाठी मनाची एकाग्रता फार महत्वाची आहे. हे न जाणल्याने बरेच लोक लिंगास पंचामृत घालून पूजा करतात. बेल-फुलांनी त्याला सजवितात. खरे गुह्य न जाणता वरपांगी पूजा करणाऱ्यास अल्लमप्रभूंनी मेंढरे म्हटले आहे. वास्तविक पाहता प्रत्येक जीवाच्या ठायी उपजत ज्ञान असतेच. ते सुप्तावस्थेत असते. जन्मत: कुणीही अज्ञानी नसतो. तो अज्ञानी राहण्यास त्याचा परिसर, कौटुंबिक वातावरण, समाज आणि त्याचे प्रयत्न कारणीभूत असतात. आधुनिक शिक्षणतज्ञ, ''प्रत्येक मुलाला उपजत ज्ञान असते'' हा विचार मांडत आहेत. सुमारे नऊशे वर्षापूर्वी हाच विचार शरणांनी अनुभव मंटपात मांडला होता, हे विशेष. ''वेळ ओळखून आरवणाऱ्या कोंबड्याला, ते ज्ञान कुठून येते ? गोड रसाची चव ओळखून जगणाऱ्या मुंग्यांना, ते ज्ञान कुठून येते ? स्वत: जेवून केवळ आठवणीने पिल्लांचे पोट भरते, हे ज्ञान कुठून येते ? याप्रमाणे, सगळ्या जीवजंतूंना उपजत ज्ञान असते.'' त्या सुप्तावस्थेतील उपजत ज्ञानाचे प्रकटीकरण म्हणजेच शिक्षण होय. असा विचार शरण वेदमूर्ती संगण्ण मांडतात. ती सुप्त विद्या प्राप्त करायची झाली तर काय करावे ? ती विद्या कोणाला प्राप्त होते ? ती कोणाच्या अधीन आहे ? या प्रश्नाचे उत्तर शिवयोगी सिद्धराम देतात, "विद्या ही अभ्यासूच्या अधीन, अविद्या ही सर्वांच्या अधीन. विद्या-अविद्येतील फरक जाणून जगद्वंद्य झाल्यास, महापंडित पहा, कपिलसिद्ध मल्लिकार्जुना.'' विद्या ही फक्त नि फक्त अभ्यासातून प्राप्त होणारी गोष्ट आहे. अभ्यासाशिवाय दुसरा मार्ग नाही. म्हणूनच शिवयोगी सिद्धराम आपल्या वरील मतास पुष्टी देण्यासाठी, "विद्या मिळविण्या इतर आशा विसराव्यात'' असे म्हणतात. इतर आशा म्हणजेच विद्याप्राप्तीची आड येणारी सुखासिन प्रवृत्ती, निद्रा, आळस, भय, भ्रांती होय. यांचा त्याग करून कठोर परिश्रम केल्यास मात्र विद्या प्राप्त होते.

ज्ञानप्राप्तीसाठी शरणांनी सर्व प्रकारची बंधने झुगारून दिली आहेत. त्यांनी सर्वांनाच ज्ञानप्राप्तीची कवाडे सताड उघडली आहेत. वर सांगीतल्याप्रमाणे प्रत्येक जीवजंतूंत उपजत ज्ञान असेल, तर जात, धर्म, पंथ, वर्ण, लिंग पाहून त्यांच्यावर निर्बंध लादणे हे अमानवीय आहे. म्हणूनच बसवण्णांनी अनुभव मंटपात ज्ञानप्राप्तीसाठी सर्वांना मुक्त प्रवेश दिला. त्यांनी वयाचे बंधनही झुगारलेले दिसते. वयाने लहान असलेले चेन्नबसवण्णा अनुभव मंटपाचे कार्याध्यक्ष होते. अत्यंत महत्त्वपूर्ण अशा लिंगायत-षटस्थल तत्त्वज्ञानाची चौकट त्यांनीच मजबूत केली आहे. शरण हरळय्या, शरण कक्कय्या, शरण चेन्नय्या, शरण दासिमय्या, शरण गुंडय्या हे वयाने जेष्ठ असलेल्या शरणांनी अनुभव मंटपात आल्यानंतर शिक्षण घेतले असावे. म्हणूनच अल्लमप्रभू 'ज्ञानास असे का जेष्ठ-कनिष्ठता ?' असे म्हणतात.

'गुरू असो, लिंग असो, जंगम असो ज्ञानाला वंदितो ; अज्ञानाचे खंडन केल्याशिवाय राहणार नाही.' असे म्हणून सर्वांनी ज्ञान प्राप्त केले पाहिजे असा आग्रह धरतात. या जगात ज्ञानालाच खरी किंमत आहे. गुरू आणि जंगम हे ज्ञानी असले पाहिजेत. ते ज्ञानी असतील, तर समाजाला ज्ञानी बनवतील. समाज ज्ञानी करणाऱ्या गुरू आणि जंगम यांच्या चरणी वंदन करतो. असे शरण अरिविन मारितंदे म्हणतात. शरणी अमुगे रायम्मा म्हणते, 'जाणयुक्त परिपूर्ण ज्ञानवंत, तयाच्या चरणी मी नत.' शरणी अक्कम्मा सांगते, 'ज्ञानच असे प्रधान, आचारचि प्राण असलेल्या रामेश्वरलिंगाठायी'. शरणी मुक्तायक्का 'जाणिले आपुले आपल्यासी, तया ज्ञानाचि गुरू' असे म्हणते. खरा ज्ञानी हा कधीही मरत नाही, तो अघोरपाशात अडकत नाही, तर तो 'चिरंजीवी' असतो, असे सिद्धरामेश्वर म्हणतात.

ज्ञानप्राप्त करणे म्हणजे 'चौसष्ट विद्या' शिकून महापंडित होणे, हे शरणांना अभिप्रेत नाही. शरण वेदप्रामाण्य, ग्रंथप्रामाण्य नाकारून अनुभावप्रामाण्यास अधिक महत्त्व देतात. पोपटपंची, शुष्क पांडित्य, बाष्काळ बडबड, कृतीशून्य ज्ञान याचा शरणांनी तिरस्कार केला आहे. शरण आदय्या म्हणतात, "चौसष्ट विद्या शिकून काय करायचे आहे ?....... ज्ञान आचरणात आणेपर्यंत, लिंग सोडले नि बांधले तरी काय होणार ?" कायक शिक्षण पद्धती ही ज्ञानाबरोबरच क्रियेलाही महत्त्व देणारी आहे. ज्ञान-क्रियेचा समन्वय म्हणजेच कायक शिक्षण होय. या संबंधी शरण अमुगी देवय्या म्हणतात, 'ज्ञानाविना क्रिया मूढपणा आहे, क्रियेविना ज्ञान वाचाळ भ्रम आहे.' ज्ञानाविन क्रिया ही पूर्णत्वाला जाणारी नसते. क्रियेविन ज्ञान केवळ भ्रम ठरतो. म्हणून शरणांनी दोन्हीचा समन्वय घातला आहे. शरण चेन्नबसवण्णा ज्ञान आणि क्रिया याचा समन्वय असलेल्या शिक्षणाचा पुरस्कार करतात. ते म्हणतात-

'क्रिया म्हणजे ज्ञान, ते ज्ञानच क्रिया.
ज्ञान म्हणजे जाणणे,
क्रिया म्हणजे जाणल्याप्रमाणे आचरणे.
परस्त्रीला भोगू नये हे ज्ञान,
त्यानुसार आचरणात आणणे हीच क्रिया.
असे आचरण नाही केल्यास तेच अज्ञान पहा,
कूडल चेन्नसंगमदेवा.

शरण चेन्नबसवण्ण ज्ञानाबरोबरच क्रियेला महत्त्व देतात. आचरणाला महत्त्व देतात. ज्ञानाप्रमाणे क्रिया नसेल, आचरण नसेल, तर ते अज्ञान होय, असा स्पष्ट अभिप्राय ते देतात.

शिवयोगी सिद्धराम थोडेशे याच्या पुढे जातात आणि ते शिक्षणाची सांगड सद्गुणप्राप्तीशी घालतात. 'शिक्षण म्हणजे केवळ कान फुंकणे नव्हे, तर सदगुणप्राप्ती होय', असे सांगून सिद्धरामेश्वरांनी चारित्र्यसंपन्न माणूस घडणीच्या शिक्षणाचा आग्रह धरला आहे. शिक्षणास मानवी मूल्यांचे अधिष्ठान लाभले, तर ते अधिक हितकारक ठरते. अन्यथा विनाश अटळ असतो. अशा धोक्याची घंटा त्यांनी दिली आहे.

**अध्यापन पद्धती**

शिक्षण व्यवस्थेत विद्यार्थी, पालक आणि शिक्षक हे तीन घटक अत्यंत महत्वाचे मानले जातात. शिक्षकाची अध्यापन पद्धती प्रभावी व प्रेरणादायी असेल, तर विद्यार्थी आनंददायी शिक्षण प्राप्त करू शकतो. आपण शिक्षणशास्त्र विषयात विविध अध्यापन पद्धतीचा अभ्यास करतो. कालपरत्वे अध्यापन पद्धतीत बदलत गेली आहे. याचे एक मनोज्ञ चित्रण अल्लमप्रभूंच्या एका वचनात अभिव्यक्त झाले आहे. ते वचन असे -

कृतयुगी श्री गुरू शिष्यास मार देऊन
शिकविता ज्ञान, तयासी महाप्रसाद समजेन.
त्रेतायुगी श्री गुरू शिष्यास रागावून
शिकविता ज्ञान, तयासी महाप्रसाद समजेन.
द्वापारयुगी श्री गुरू शिष्यास दरडावून
शिकविता ज्ञान, तयासी महाप्रसाद समजेन.
कलियुगी श्री गुरू शिष्यास प्रणाम करून
शिकविता ज्ञान, तयासी महाप्रसाद समजेन.
गुहेश्वरा, तव कालगतीचा महिमा पाहून,
मी जाहलो विस्मयचकित.

अध्यापन पद्धतीविषयक आधुनिक विचारवंतांनी जे विचार मांडले आहेत, ते विचार सुमारे ९०० वर्षापूर्वी अल्लमप्रभूंनी मांडले आहेत. आज शिक्षकांनीच नम्र होऊन अध्यापन करण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. आधुनिक पिढीची ग्रहनशक्ती अधिक आहे. त्यामुळे त्यांना मारणे, रागावणे, दरडावणे असे करण्याची गरज नाही. त्यांना प्रेमाने समजावून सांगीतले पाहिजे. असे

तज्ञाचे मत आहे. शिवाय सरकारनेही याबाबत कडक निर्देश दिले आहेत.

**कायक शिक्षण पद्धती**

कायक शिक्षण पद्धतीत 'श्रमप्रतिष्ठा' हे मूल्य अत्यंत महत्वाचे मानले जात. प्रत्येकाच्या श्रमाची प्रतिष्ठा समान पातळीची होती. महात्मा बसवण्णांच्या प्रधानमंत्री पदाच्या कायकास जी प्रतिष्ठा होती, तीच प्रतिष्ठा चप्पल शिवणाऱ्या चांभार हरळय्याला होती. सर्व कायकास समान गौरव प्राप्त झाल्यामुळे कायकावरून केला जाणारा श्रेष्ठ-कनिष्ठ भेदभाव नष्ट झाला. कायक शिक्षण पद्धती एवढी बलिष्ठ आणि परिणामकारी झाली म्हणजे व्यवसायावरून निर्माण केली गेलीली जातीव्यवस्था संपुष्टात आली. सर्व श्रमजीवी समान मानल्यामुळे एकभाजन, सहपंक्ती भोजन सुरू झाले. एवढेच नाही तर सहजीवनासाठी परस्पर वैवाहिक संबंधही जुळले. पूर्वाश्रमीचा ब्राह्मण मधुवरस यांची मुलगी लावण्यवती आणि चांभार हरळय्याचा मुलगा शिलवंत याचा विवाह झाला. हे सामाजिक परिवर्तन सहजासहजी घडलेले नाही, तर त्यासाठी कायक शिक्षण पद्धती कारणीभूत होती, हे आपणास नाकारता येत नाही.

कायक शिक्षण पद्धतीत सर्वांना श्रम करणे अनिवार्य होते. म्हणूनच काश्मिरचा राजा महादेव भूपाल कल्याणमध्ये आल्यानंतर मोळी विकण्याचे कायक करतो. 'गुरू असो, लिंग असो. जंगम असो, या सर्वांना कायकामुळेच जीवनमुक्ती' असे शरण नुलिय चंदय्या म्हणतात. कायक अनिवार्य असल्यामुळे प्रत्येकजण स्वावलंबी होतो. ऐतखाऊपणा, कामचुकार प्रवृती, भिक्षावृती यांना आळा बसतो. बेरोजगारीची समस्याच निर्माण होत नाही. बेरोजगारी नसेल, तर त्यामुळे निर्माण होणारी निराशा, मनोवैफल्य, त्यातून वाढणारी व्यसनाधिंनता, कर्जाचा गळफास आणि आत्महत्या हे दुष्टचक्रच संपते.

**समारोप**

बसव प्रणीत कायक शिक्षण पद्धती ही चारित्र्यसंपन्न, नीतिमान समाज निर्माण करणारी, माणूस घडविणारी शिक्षण पद्धती आहे. श्रमप्रतिष्ठा, सदाचार, अहिंसा, सत्य, विनय, मैत्री, समानता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, वैचारिक दृष्टिकोन, कृतज्ञता, संवेदनशीलता, पर्यावरण संरक्षण इत्यादी मूल्यांचे शिकवण ही पद्धती देते. सामाजिक समानतेबरोबरच आर्थिक समानता निर्माण करणे हा या शिक्षण पद्धतीचा महत्त्वाचा उद्देश आहे. त्यासाठी ही कायकाबरोबरच दासोहाची शिकवण देते. दासोहाविना कायकास पूर्णत्व नाही. दासोह म्हणजे सत्य-शुद्ध कायकातून प्राप्त केलेले धन, स्वत:च्या गरजेपुरते ठेवून घेऊन, अधिकचे धन हे समाजातील दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी खर्च करणे होय. अपंग, अनाथ, असह्य, गरीब, उपेक्षित, वृद्ध, वंचित घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेण्यासाठी दासोह फार महत्त्वाची भूमिका पार पाडते. समाज आर्थिकदृष्ट्या समृद्ध आणि समान असला म्हणजे, संपत्तीच्या मोहातून होणारे खून, चोऱ्या, दरोडे, अन्याय, अत्याचार अशा अपप्रवृत्तींना आपसूकच आळा बसेल आणि सुखी व समृद्ध समाज निर्माण होईल. असा सशक्त समाज आणि समर्थ राष्ट्र निर्माण करणेच बसव प्रणीत कायक शिक्षण पद्धतीचे ध्येय होते.

## बसवण्णा : दक्षिण भारताचा बुद्ध

मूळ कन्नड लेखक : **डॉ. एम. एम. कलबुर्गी**
अनुवाद : **राजू ब. जुबरे**

बुद्ध-बसव-आंबेडकर ही कमी-अधिक प्रमाणात एकाच तत्त्वाची तीन मुखे आहेत. या तिघांमध्ये धार्मिक चिंतनाच्या दृष्टीने बसवण्णा हे आंबेडकरांपेक्षा बुद्धाच्या अधिक जवळचे वाटतात. काळाच्या दृष्टीने या दोघांमध्ये सुमारे दीड हजार वर्षांचे अंतर आहे. भौगोलिक दृष्ट्या एक जन उत्तरभारत, दुसरे दक्षिण भारत असा प्रादेशिक वेगळेपणाही आहे. यांच्यात स्थल-काळाच्या दृष्टीने एकमेकांशी काहीही संबंध नाही. तरीही यांच्या विचारांत असलेली साम्यता ही केवळ योगायोग असल्याचे आजवर मानण्यात येत होते. परंतु हा योगायोग नसून, त्यात आंतरिक ऐतिहासिक संबंध आहे. तात्त्विक विकास असल्याचेही जाणवते. म्हणजेच, तात्त्विकदृष्ट्या शरणधर्म(लिंगायतधर्म) हा विकसित पावत गेलेला बौद्धधर्मच वाटतो. बसवण्णा विकसित पावलेला बुद्धच वाटतो.

भारतभूमीवर आज वैदिक स्मारके विराजत असली, तरी त्यांच्या मुळाशी बौद्ध धर्माचे अवशेषच सापडतात. यास कर्नाटकही अपवाद नाही. कारण इथे अशोकपूर्व काळापासून पहिल्या शतकापर्यंत बौद्ध हीनयान (प्राचीन पंथ) परंपरेच्या खूणा दिसून येतात. पहिल्या शतकापासून सातव्या शतकापर्यंत बनवासी, बादामी, चंद्रवळळी, मस्की, सन्नती या ठिकाणी महायान(नवीनपंथ)पंथाची, त्यानंतर सातव्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंत डंबळ, कोळिवाड, बळ्ळेगावी, कदरी याठिकाणी वज्रयानाचे अवशेष सापडतात. यांच्यापासून शेवटी अस्तित्वात आलेला बौद्ध वज्रयान हा नाथ पंथ म्हणून विकसित झाल्याचा अभिप्राय अनेक विद्वानांनी व्यक्त केला आहे. बौद्धांची अवलोकेश्वर, मंजुश्री दैवते ही नाथ शैवांचे लोकेश्वर, मंजुनाथ म्हणून विकसित पावल्याची ही उदाहरणे आहेत. नाथपंथाच्या चर्पटनाथ शतक आणि गोरक्ष सिद्धान्त संग्रहामध्ये बौद्धधर्माची छाया उठून दिसते. आज लिंगायत महापुरुष म्हणून प्रसिद्ध असलेले रेवणसिद्ध, सिद्धराम हे मूलत: नाथसिद्ध असल्याचे अनेक संशोधकांचे मत आहे. गोरक्षनाथाचे गुरू मत्सेंद्रनाथ हेच अल्लमप्रभूचे गुरू अनिमिष ( मत्स्य ) असल्याचा तर्क अनेकांनी केला आहे. अल्लमप्रभू मूलत: नाथसिद्ध असल्याचे सांगितले जाते. ब्राहमण्याचा त्याग करून बसवण्णा वास्तव्यास राहिलेले कूडलसंगम हे मूलत: नाथ संप्रदायाचे (संगमनाथ) केंद्र असल्याचे संशोधक सांगत आहेत. अल्लम, अक्कमहादेवी यांनी चिरविश्रांती घेतलेले 'कदळी' वन नाथसंप्रदायाचे केंद्र (कदळी>कदरी) असल्याचा तर्क दृढ होत आहे. १५व्या शतकातील वीरशैवातील एकशे एक विरक्त हे नाथपंथीय असल्याचे संशोधन अलीकडच्या काळात पुढे येत आहे. एकूणच, नाथपंथाच्या प्रभावात वाढलेला बसवण्णाप्रणीत लिंगायत धर्म हा एका अर्थाने त्या पंथाची जननी असलेल्या बौद्ध धर्माचा ऋणी असल्याचे सांगावे लागते.

बसवण्णांच्या जननकाळी कर्नाटकात अत्यंत प्रसिद्ध पावलेल्या नाथपंथाची गुरुतत्त्व, निष्कलद्वैततत्त्व आणि सत्संगतत्त्व ही मुख्य तत्त्वे होती. सवर्णीय आचार्य धर्मापेक्षा, सामान्य लोकांचा हा अवधूत (नाथ) तत्त्वांचीच प्रेरणा घेऊन बसवण्णांनी बुद्धाप्रमाणे आपला एक नवा 'मध्यम मार्ग' अस्तित्वात आणला. "शिवपथ जाणण्या पाहिजे गुरुपथ आधि" हा बसवण्णांचा विचार नाथ पंथाच्या 'गुरुतत्त्व'चा पथदर्शक वाटतो. शून्यसंपादने ग्रंथात 'सिद्धराम लिंगदीक्षा' ऐवजी 'सिद्धराम गुरुकरुणे' असे पद उपयोजिण्यात आले आहे. नाथ संप्रदायाचे निष्कलशिवतत्त्वच 'बाह्य स्थलाचे प्रतीक' म्हणून बसवण्णांच्या ठायी इष्टलिंगतत्त्व होऊन प्रसारित झाले. शेवटीचे 'सत्संगतत्त्व' यामध्ये जाती, लिंगनिरपेक्ष सामूहिक चर्चा समाविष्ट आहे. जातीभेदनिरसन, लिंगभेदनिरसन करणाऱ्या शरणांचे जंगमतत्त्व आणि सामूहिक चर्चेचे केंद्र असलेली 'अनुभव मंटप परिकल्पना' याचीच आठवण करून देते. अर्थ वेगळा असला तरी, बौद्धाचा 'सुण्ण संपायणा'च शरणांच्या 'शून्यसंपादने' शब्दांस स्फूर्तीदायक ठरला असेल. अशाप्रकारे बसवण्णाच्या गुरू, लिंग, जंगम तत्त्वांचा संबंध नाथ संप्रदायापुरताच सीमीत नसून, बौद्ध धर्मातील बुद्ध, धम्म, संघ

यांच्या पर्यत व्यापलेला दिसतो. “लिंगायततातील गुरू-लिंग-जंगम यांची बौद्ध धर्मातील बुद्ध-धम्म-संघ यांच्याशी साम्यतेच्या पातळीवर तुलना करता येईल. गुरू हा बोधक म्हणजेच मार्गदर्शक असल्याने त्याची बुद्धाशी, लिंग हे परब्रह्म शिवाचे निष्कलरूप असल्याने धम्माशी, समुच्चयार्थ उपयोजिला जाणारा जंगम हा संघाशी जोडता येतो. बौद्धधर्मात बुद्ध-धम्म-संघ यांना असलेले स्थान लिंगायतांमध्ये गुरू-लिंग-जंगम यांना आहे.” हे डॉ. नंदीमठ यांचे मत याप्रसंगी ध्यानात घेण्यासारखे आहे.

बौद्ध धर्मात गाथा लिहिलेल्या थेरींप्रमाणे, नाथसंप्रदायात बानी(वाणी) लिहिलेल्या योगिणी आढळतात. त्याचप्रमाणे शरण परंपरेत वचने लिहिलेल्या वचनकार्तीची संख्या अधिक प्रमाणात असल्याचे आपण पाहतो.

बौद्ध, त्यानंतर नाथ संप्रदाय याचे आणखी एक मुख्य लक्षण म्हणजे जनभाषामाध्यम. शरण चळवळीच्या प्रसंगी कर्नाटकातील धार्मिक क्षेत्र संस्कृत भाषेने आणि साहित्य क्षेत्र हळगन्नड भाषेने प्रभावित झाले होते. शरणांनी या दोन्हीचे निराकरण करून बुद्धाप्रमाणे लोकभाषेमध्ये वचने लिहिली आहेत. नाथसिद्धांनी लोकभाषेचा वापर केला असला तरी, काहीवेळा कोडे, कूट अशा सहजी आकलन न होणाऱ्या सांकेतिक भाषेचा उपयोग करूनही लेखन केले आहे. ही रचना शरणांच्या बेडगीन ( कूट) वचन निर्मितीला प्रेरक ठरली असावी. अशाप्रकारे अनेक अर्थांनी बसवण्णा बुद्धांचे आधुनिक रूप वाटतात. त्यांचे वारसदार असल्याचे दिसून येतात. आत्मतत्त्व, कायकतत्त्व ही नव्याने समाविष्ट केली असली तरी, ‘धार्मिक” म्हणजे “समाजोधार्मिक” म्हणून बुद्धाप्रमाणेच बसवण्णांचाही विश्वास आहे. तात्पर्य म्हणजे केवळ आकस्मिकपणे नाही तर, ऐतिहासिकपणे “बसवण्णास दक्षिण भारताचे बुद्ध” म्हणता येईल.

( संदर्भस्त्रोत : मार्ग, खंड- ७, पृ. २४ ते २६ )

# *कर्म हेच श्रेष्ठ सांगणारे महात्मा बसवेश्वर*

नाव - साक्षी उद्धवराव कराड
ई-मेल - sakshikarad12@gmail.com



कर्नाटक राज्याच्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक, साहित्यिक इतिहासात संत बसवेश्वरांचे योगदान महत्त्वाचे आहे. ते १२ व्या शतकातील एक क्रांतिकारी समाजसुधारक, संत आणि वीरशैव धर्माचे संस्थापक म्हणून ओळखले जात.

बसवेश्वरांचा जन्म इ.स ११०५ मध्ये शालिवाहन शके दहाव्या शतकात कर्नाटकातील इंगळेश्वर बागेवाडी जि. विजापूर या गावात झाला. हे गाव पुढे बसवेश्वरांच्या अलौकीक कार्यामुळे बसवन-बागेवाडी या नावाने ओळखले जाऊ लागले. त्यांच्या घरातील वातावरण अतिशय कर्मठ आणि कर्मकांडी होते. त्यांचे आई-वडील दोघेही शिवाचे भक्त होते. जगाच्या उद्धाराकरिता बसवचा जन्म झाला असे एक योगी पुरुषाने सांगितले होते.

लहापणापासूनच बसवेश्वरांच्या कर्मठ रूढी-परंपराना विरोध होता. जाती-भेद, स्पृश्य- अस्पृश्यता, आशा गोष्टी त्यांना आवडत नसत. वयाच्या अठव्या वर्षी मुंजीस विरोध करून ते ज्ञानप्राप्तीसाठी बाहेर पडले. मलप्रभा-कृष्ण नदीच्या संगमावरील कुंडलसंगम येथे त्यांनी अध्ययन सुरू केले. त्यांनी त्यांचे गुरू जातवेद मुनी यांच्याकडून दिक्षा घेतली. आणि शिवाचे प्रतिक म्हणून 'इष्ठलिंग' त्यांनी

आपल्या गळ्यात धारण केला. बसवेश्र्वरांनी वेद, उपनिषदे, षडदर्शने, पुराणे वगैरेंचा अभ्यास करून ज्ञान मिळवले. त्यांनी संस्कृत, पाली, तमिळ या भाषांवर ही प्रभुत्व मिळवले. केवळ शिवाची उपासना करावी असे महात्मा बसवेश्वर सांगत व तसे त्यांचे ठाम मत होते. **'काय कवे कैलास'** हा विचार त्यांनी मांडला. म्हणजेच केवळ कष्टानेच स्वर्गाची म्हणजे शिवाची प्राप्ती होते.

कर्मकांडात गुंतून न पडता प्रत्येक माणसाने आपली स्वतःची भाकरी मिळवण्याकरिता कष्ठ केलेच पाहिजे. प्रत्येकाने सतत कार्यरत रहावे अश्या वृत्तीला त्यांनी कायक असे म्हटले आहे. कोणतेही काम हे हलक्या प्रतीचे, कनिष्ठ अथवा वरिष्ठ नसते. हीन दर्जाचे नसते. आणि त्यावरून त्या माणसाचे मोठेपण (श्रेष्ठत्व) ठरत नसते. तो ते काम किती मनलावून, दर्जेदार करतो तेच या ठिकाणी महत्वाचे असते. हे त्यांचे विचार 'कानडी' भाषेतून सर्व मानवजातीला त्यांनी दिले आहेत.

ते म्हणतात :-

ज्ञानद बलदिंद अज्ञानाकडे नोड्या,

ज्योतिय बलदिंद अंधकारकडे नोड्या,

सत्यद बलदिंद असत्यकडे नोड्या,

कुडलसंगम शरणर बलदिंद आत्मन अहंकारकडे नोड्या,

कुडमसंगम देवा.

वरील रचनेद्वारे ते सांगतात की, ज्ञानाच्या शक्तीने तू अज्ञानाकडे पहा. याठिकाणी (ज्ञानद = ज्ञान, बलदिंद = शक्ती, नोड्या = पाहणे) ज्योतीच्या शक्तीने अंधकारकडे पाहा. सत्याच्या सामर्थ्याने असत्यकडे पहा. (सत्यद = सत्य ) स्वतःच शरण जाऊन स्वतःच्या अंधकारकडे पहा. तरच तुला खऱ्या ज्ञानाची प्राप्ती होईल. आणि कुडलसंगम देवचे म्हणजेच तुला दर्शन होईल. बसवेश्वरांनी वीरशैव धर्माची मूलतत्त्वेही सांगितली आहेत. त्यास बसवेश्वरांची वचने असे म्हणतात. कळबेड, कोळबेड, हुसीय नुडीयलूबेड, मुनियबेड, अन्यरिगे, असहाय्य पडबेड, तन्नबन्नीस बेड, इदीरी हळेयलु बेड, इदे बहिरंग शुद्धी, इदे नम्म कुडलसंगमदेव नुली सुवषरी. याचा

अर्थ; चोरी करू नये, हत्या करू नये, खोटं बोलू नये, रागावू नको, दुसऱ्याना हीन लेखू नकोस, सर्वांना मदत करत रहा. स्वतःची स्तुती करू नको, दुसऱ्यांची निंदा करू नको, मनाची आणि अंतकरणाची हीच खरी शुद्धी आहे. आशा प्रकारचे आचरण केल्याने तू देवापाशी पोहचशील. म्हणजेच; मोक्ष मिळवशील.

बसवेश्वरांची विद्वता पाहून त्यांचे गुरू जातवेद मुनींनी त्यांना ज्ञानप्रसाराच्या कार्यासाठी आणि वीरशैव धर्माच्या प्रचारासाठी दक्षिणेतील कलचुरी येथे पाठवले. या काळात त्यांनी अनेक लोकोपयोगी / समाजोपयोगी कामे केली. अनके अनिष्ट चालीरीती बंद केल्या, बाल विवाहाला विरोध केला, विधवा विवाहाला मान्यता दिली, जातीभेद, लिंगभेद, वर्णभेद, नष्ट केले. त्यांनी शिवणुभवमंडप नावाच्या आध्यात्मिक विद्यापीठाची स्थापना केली. यातून त्यांनी विश्वशांती आणि विश्वबंधुत्वचा संदेश देऊन आत्मोद्वाराचे आणि लोकोद्वाराचे मानवतावादी कार्य केले.

या कार्यामुळे बसवेश्वरांना विश्वगुरु, विश्वविभूती, भक्तीभंडारी, क्रांतिकारी, महामानव, वचनकार, महात्मा आशा पदव्या मिळाल्या. इ.स ११६७ मध्ये श्रावण शुद्ध प्रतिपदेला बसवेश्वरांनी कुडलसंगम येथे समाधी घेतली. सर्व मानवजातीला आपल्या वचनातुन श्रेष्ठ असा संदेश देऊन मोक्षाचा मार्ग दाखविला.